णारस्य धायसाः क्रियाश्च। [illegible] । [illegible] मितवदासी
धीतानश्रतानीना। ८५॥

मत्स्यपुराण.

(व्यासकृत)

संस्कृत मूळ पुस्तक

शुद्ध करून

प्राकृत टीके सहित

वे॰ शा॰ रा॰ रा॰ जनार्दनाचार्य वळे व अनंताचार्य-

अष्टपुत्रे आदिकरून विद्वान मंडळी कडून

तयार करवून

तें

पुणें येथें

रावजी श्रीधर गोंधळेकर

यांणीं

आपले जगद्धितेच्छु छापखान्यांत छापिलें.

भाग ३रा.

शके १७९५ श्रीमुख नामसंवत्सरे फाल्गुन कृष्ण १० रोज भृगुवार.

तारीख १३ मार्च सन १८७४.

किंमत ७ रु॰ टपालखर्च ।॥—

प्रस्तावना.

व्यासकृत अष्टादश पुराणांत बहुत करून संपूर्ण विषय आहेत, परंतु ते ग्रंथ संस्कृत भाषेंत असून त्यांचा फारसा कोठें संग्रह ही नाहीं. कित्येक ठिकाणीं कांहीं ग्रंथ आहेत, परंतु कांहीं साद्यंत नसून कांहीं कायस्ती असराचे व अशुद्ध व कित्येकांवर टीकाही नाहींत. असें असल्यामुळें त्यांचा उपयोग व्हावा तसा होत नाहीं, यामुळें ते ग्रंथ कांहीं दिवसानीं निरुपयोगी वस्तू प्रमाणें नाहींसे होतील. प्रस्तुत काळीं श्रुति, स्मृति, पुराणें आदिकरून ग्रंथांचा अभ्यास करणारे लोक कालदेश वर्तमाना प्रमाणें उत्तरोत्तर कमी होत चालले आहेत, कारण जी विद्या संपादन केली असतां तिज पासून द्रव्य मिळावें व विद्या करण्यास उत्तेजन येण्याचे मार्ग असावे तेही नाहींत. प्रस्तुतचे राजे यांची देशभाषा व लिपी (इंग्रेजी) शिकलें असतां रोजगार मिळून द्रव्य मिळतें यामुळें बहुत करून सर्व लोक इंग्रेजी विद्येचा अभ्यास करूं लागले आहेत तेणें करून त्यांचे ग्रंथ, धर्म व क्रिया खऱ्या वाटून आपले धर्म खरे किंवा खोटे या विषयीं लोकांस फारच शंका उत्पन्न होत चालल्या आहेत या विषयीं लोकांस दोष देणें केवळ रास्त आहे असेंही नाहीं, कारण ज्याचा रात्रंदिवस अभ्यास त्याप्रमाणें बुद्धि होणें हे स्वाभाविक धर्मच होय. कितीएक लोक आलीकडील विद्वान ह्मणविणारे असें ह्मणतात कीं, दगडाचे देव करून पूजा केल्यांत काय लाभ. संध्या, नाना प्रकारचीं व्रतें, दानें, जप, तर्पणें इत्यादिक स्वकर्मा बद्दल नानाप्रकारचे कुतर्क काढून त्यांत कांहीं नाहीं अशा लोकांस कल्पना उत्पन्न होत चालल्या आहेत. कारण पाहिलें असतां असें वाटतें कीं, या लोकांस आपले ग्रंथ व त्या ग्रंथांची योग्यता व त्यांचा उपयोग व धर्म संबंधीं नियम व त्यांचा विचार इकडे त्यांचें लक्ष्य नसल्यामुळें ते परधर्मीं लीन होतात. आपल्या ग्रंथांत कला, कौशल्य शिल्प, ज्योतिष, जारण, मारण, उच्चाटनादिक सिद्धि, मंत्र शास्त्र, वैद्यक, राजधर्म, आपत्कालचे धर्म, भक्ति, वैराग्य, शृंगार, नीति व कृत, त्रेत, द्वापार या युगांपासून प्रस्तुतचे कली पर्यंतचे धर्म व इतिहास व पुढें जलप्रलया पर्यंत होणारें भविष्य इत्यादिक नाना प्रकारचे आपल्या ग्रंथांतून इतिहास असून ते प्रस्तुत लोकांस कळत नाहीत यामुळें आपल्या देशास अज्ञानी असें कितीएक परराज्यांतील लोक म्हणावयास लागले आहेत. पहा कीं, इतर देशां-

तील लोक फारच अज्ञानी व रानटी होते, परंतु त्यांणी आमचेच ग्रंथांचा संग्रह करून उद्योगानें व मेहेनतीनें त्यांतील कला कौशल्यादिक विषयांचा उपयोग करून या देशास उपयुक्त वस्तूंचा केवढा पुरवठा करीत आहेत इकडे लक्ष्य पुरविलें असतां आमचे देशांतील लोकांचे डोळ्यास अज्ञानाचें पडळ येऊन स्वातंत्र्यपणाचे धंदे व रोजगार न समजल्या मुळें पराधीन पणानें दुसऱ्याची नौकरी करणें भाग पडलें. आतां आपल्या देश बांधवांस कांहीं तरीं सुख व्हावें - आणि आपले जुने ग्रंथ उपयोगांत येऊन लोकांस संपूर्ण विषय समजावे या उद्देशानें पूर्वी व्यासकृत अष्टादश पुराणें संस्कृत मूळ शब्द लिहून त्याचे खालीं प्राकृत टीका याप्रमाणें छापावें असा मनांत विचार करून सन १८६९ चे मार्च महिन्या पासून मत्स्यपुराणास आरंभ करून पाक्षिक पुस्तक छापित होतों त्याचा भाग ३ रा अध्याय १८३ पासून अध्याय २९१ पर्यंत करून प्रत्येक अध्यायांतील सारांशपर अनुक्रमणिका करून शुद्धिपत्र ही केलें आहे. आतां या ग्रंथास मोठ मोठे सरदार व संस्थानिक व या देशावर सार्वभौमपणानें राज्य करणारें इंग्रेज सरकार यांणीं आपला पूर्ण आश्रय दिला पाहिजे ह्मणजे वर्गणी दारांस सदरीं लिहिलेले ग्रंथ घेण्यास फार सुलभ पडून ग्रंथाचे लोकानें लोकांचीही सुधारणा होईल.

सूचना.

अध्याय २०२ हा अंक लिहिणें राहून त्या ठिकाणीं २०३ हा अंक पडून पुढें अनुक्रमानें अंक घातले गेले आहेत.



मत्स्यपुराण.

अनुक्रमणिका.

भाग ३ रा.

त्या ग्रंथांत काय विषय आहे याचें थोडक्यांत ज्ञान होण्या करितां प्रत्येक अध्यायांतील सारांश घेऊन अमुक पृष्ठा पासून अमुक पृष्ठा पर्यंत अध्याय अमुक लिहून पुढें सारांश लिहिला आहे.

अध्या.	पृष्ठ.	सारांश.
१८४	६७३–६८४	सूत ह्मणतात ऋषीहो, कोणी एके काळीं वेदव्यास वाराणसी क्षेत्रास शाप देण्या विषयीं प्रवृत्त झाले हें पाहून शिव पार्वतीस ह्मणाले कीं, हा व्यास साक्षात् नारायणच आहे यास्तव यांस भिक्षा देऊन संतुष्ट करावा असें बोलून शिवानीं त्यास भिक्षा देऊन सांगितलें कीं,- आतां तुम्हीं येथें राहूंनये असें ऐकून व्यास बोलले- अष्टमी व चतुर्दशी त्या दिवशीं मात्र मी येईन.
१८५	६८४–६९६	सूत शौनकादिकांस ह्मणतात ऋषी हो, मार्कंडेयानीं धर्मराजास सांगितलें कीं, नर्मदा नदींत कोणतेही स्थानीं स्नान केलें असतां अश्वमेधादि यज्ञांचें फलप्राप्त होतें आणि नर्मदा व समुद्र यांच्या संगमी दशगुणित पुण्य अधिक आहे.
१८६	६९६–७०५	मार्कंडेय ह्मणतात हे धर्मराजा, पूर्वीं बाणासुराचे त्रिपुर नगराच्या नाशा करितां ऋषी शंकरास शरण गेले तेव्हां शंकर नर्मदातीरीं त्रिपुर नाश कसा करावा असें चिंतन करीत होते त्याकाळीं नारदाचें स्मरण करून- त्यास त्या बाणाच्या त्रिपुरांत छिद्र उत्पन्न कर असें सांगतांच नारदानीं त्या त्रिपुरांत छिद्र निर्माण केलें.

समाप्त.

सूत उवाच ॥ अविमुक्ते महापुण्ये आस्तिकाः शुभद
र्शनाः ॥ विस्मयं परमं जग्मुर्हर्षगद्गदनिस्वनाः ॥१॥

अर्थ- सूत बोलतात शौनकादिक ऋषी हो या महा पुण्य कारक अविमुक्त क्षेत्राच्या माहात्म्य वर्णनाचे श्रवणा विषयीं हर्षानें गद्गदाक्षर युक्त भाषण करणारे व शुभ दृष्टि असे ते आस्तिक ऋषि तें काशी माहात्म्य ऐकून अत्यंत आश्चर्य पावले.

ऊचुस्ते हृष्टमनसः स्कंदं धर्मविदांवरं ॥ ब्रह्मणो देव
पौत्रस्त्वं ब्रह्मण्यो ब्रह्मणः प्रियः ॥२॥

अर्थ- आणि ते आस्तिक सज्जन हर्षयुक्त अंतःकरणानें धर्मवेत्यांतील श्रेष्ठ स्कंदास बोलले हे देवा तुह्मीं ब्रह्म निष्ठ असून ब्रह्म देवांचे प्रिय पौत्र आहां.

ब्राह्मणो ब्रह्मविद्ब्रह्मा ब्रह्मेंद्रो ब्रह्मलोककृत् ॥ ब्रह्म
कृद्ब्रह्मचारी त्वं ब्रह्मादिर्ब्रह्मवत्सलः ॥३॥ ब्रह्मतुल्यो
द्भवकरो ब्रह्मतुल्य नमोस्तु ते ॥ ऋषयो भाविता त्मा
नः श्रुत्वेदं पावनं महत् ॥४॥ तत्त्वं तु परमं ज्ञातं यत्ज्ञा
त्वामृतमश्नुते ॥

अर्थ- तसेंच तुह्मी ब्राह्मण असून ब्रह्मवेत्ते आहां आपण ब्रह्मांश असल्या मुळें तुह्मांस ब्रह्मा व ब्रह्मकुलांतील श्रेष्ठत्व हेतूनें ब्रह्मेंद्र असें ही ह्मणतात तसेंच वेद ज्ञान संपादन केल्यानें ब्रह्मलोक कृत् व ब्रह्म प्राप्ती करून घेण्या मुळें ब्रह्मकृत् असेंही लोक तुह्मास ह्मणत असून आपण सर्वदां ब्रह्मचर्यानें वर्ततां यास्तव तुह्मांस ब्रह्मचारी असें ह्मणतात, त्याच प्रमाणें तुह्मीं ब्रह्माश्रय केल्या मुळें ब्रह्मादि व ब्राह्मणांवर प्रीति करण्यानें ब्रह्मवत्सल या दोन नामानीं प्रसिद्ध असून आपण ब्रह्मदेवा सारखी सृष्टी करण्या त्याकारणानें ब्रह्मदेवा समान आहां तस्मात् तुह्मांस आमचा नमस्कार असो आणि आतां आह्मीं सर्व ऋषी हें परम पवित्रता देणारें श्रेष्ठ काशी क्षेत्र माहात्म्य श्रवण करून ज्याच्या ज्ञानानें मोक्ष प्राप्त होतो तें उत्कृष्ट तत्त्व जाणून चित्त शुद्धि पावलों.

स्वस्ति ते स्कं गमिष्यामो भूर्लोके शंकरालयं ॥५॥

यत्रासौ सर्वभूतात्मा स्थाणुभूतः स्थितः प्रभुः॥ सर्व
लोकहितार्थाय तपस्युग्रे व्यवस्थितः॥ ६॥

अर्थ- असें बोलून ते ऋषी प्रार्थितात कीं, हे कार्तिक स्वामिन् तुमचें कल्याण असो! आता आह्मीं भूर्लोकीं ज्या स्थानीं सर्व लोकांचे हितार्थ सर्व भूतांचे अध्यक्ष प्रभु शंकर निश्चल स्थितीनें उग्रतप करीत आहेत; त्या शिव मंदिरास जातों.

संयोज्य योगेनात्मानं रौद्रीं तनुमुपाश्रितः॥ गुह्य
कैरात्मभूतस्तु आत्मतुल्यगुणैर्वृतः॥ ७॥

अर्थ- ते शंकर आपल्या समान गुणानीं युक्त अशा गुह्यकानीं वेष्टित असून योगनिष्ठ चित्त करून त्यानीं भयंकर तनू धारण केली.

ततोब्रह्मादिभिर्देवैः सिद्धैश्च परमर्षिभिः॥ विज्ञ-
प्तः परया भक्त्या त्वत्प्रसादाद्गणेश्वर॥ ८॥ वस्तुमि
च्छाम नियतमविमुक्ते सुनिश्चिताः॥

अर्थ- नंतर ब्रह्मादिक देव, सिद्ध व उत्तम ऋषी यानीं उत्कृष्ट भक्तीनें शिवास विज्ञापना केली कीं, हे गणनाथ शंकरा तुमच्या प्रसादानें आह्मी या अविमुक्त क्षेत्रांत निरंतर उत्तम निश्चय पूर्वक मनानें वास करण्या विषयीं इच्छितों.

एवंगुणेन थामर्त्या ह्यविमुक्ते वसंति ये॥ ९॥ धर्मशी
लाजितक्रोधा निर्ममा नियतेंद्रियाः॥ ध्यानयोग
पराः सिद्धिं गच्छंति परमाव्ययां॥ १०॥

अर्थ- कारण अशा अनेक गुण संपन्न या अविमुक्त क्षेत्रीं जे मानव वास करतात ते धर्मशील होतात आणि क्रोध जिंकून स्त्री पुत्रा दिकांवरील ममतेचा त्याग करतात व सर्व इंद्रियें स्वाधीन करून ध्यान योगनिष्ठ होत्साते कदापि नाशनपावणारी अशी मोक्ष सिद्धि पावतात.

योगिनो योगसिद्धाश्च योगमोक्षप्रदं विभुं॥ उपासं
ते भक्तियुक्ताः शांता योगगतिंगताः॥ ११॥

अर्थ- आणि योगी योगानें सिद्धिपावलेले व योगसाध्य उत्तम गतीस गेलेले हे सर्वही शांत वृत्तीनें योग व मोक्ष यांस देणाऱ्या व्यापक शंक

रान्दोउत्पन्नत्वा करतात.

स्थानं गुह्यं श्मशानानां सर्वेषामेतदुच्यते ॥ नहियोगादृते मोक्षः प्राप्यते भुवि मानवैः ॥ १२ ॥

अर्थः- तसेंच हें वाराणसी क्षेत्र सर्व स्मशानांत गुप्त आहे कारण या स्थाना प्रमाणें अनायासानें अन्य पृथ्वीवरील मानव योगसाधना वांचून-मोक्षास जात नाहीं.

अविमुक्ते तु वसतां योगो मोक्षश्च सिध्यति ॥ अनेनजन्मनैवेह प्राप्यतेगतिरुत्तमा ॥ १३ ॥

अर्थः- आणि अविमुक्त क्षेत्रवासी जनांस योग व मोक्ष यांचीं साधनें पूर्ण घडून या क्षेत्रांतील एका जन्मानेंच उत्तम गति प्राप्त होते.

एकएवप्रभावोस्ति क्षेत्रस्यपरमेश्वरि ॥ एकेनजन्मनादेविमोक्षंपरमंत्वनुत्तमं ॥ १४ ॥

अर्थः- हे परमेश्वरि देवि या क्षेत्राचें एक सामर्थ्य तर इतरां पेक्षां अधिक असें आहे कीं, या काशी क्षेत्रांतील एकाच जन्मानें सर्व प्राणी अत्युत्तम मोक्षपदास जातात.

अविमुक्ते निवसता व्यासेनामिततेजसा ॥ नैवलब्धा क्वचिद्भिक्षा भ्रममाणेनयत्नतः ॥ १५ ॥

अर्थः- अशा त्या अविमुक्त क्षेत्रांत वास करणारे अपरिमित तेजस्वी-वेदव्यास तेथें एके समयीं भिक्षार्थ यत्नानें भ्रमण करीत होते परंतु त्यांस भिक्षा मिळाली नाहीं.

क्षुधाविष्टस्ततः क्रुद्धोचिंतयंच्छापमुत्तमं ॥ दिनंदिनं प्रतिव्यासः षण्मासं यावतिष्ठति ॥ १६ ॥ कथंममेदं नगरंभिक्षादोषाद्भुतंखिदं ॥

अर्थः- नंतर ते व्यास क्षुधेनें अत्यंत पीडित झाल्यामुळें क्रुद्ध होऊन आतां काशीवासी लोकांस घोर शाप द्यावा असें मनांत आणून बोलले कीं, मी सहा महिने या नगरांत राहून प्रति दिवशीं भिक्षा मागतों परंतु हे नगर वासी जन कां मला भिक्षा देत नाहींत तस्मात् कोणत्या दोषानें हें काशीपूर व्याप्त झालें तें समजत नाहीं.

विप्रोवाक्षत्रियोवापि विधवाब्राह्मणीपिवा ॥ १७ ॥
संस्कृतासंस्कृतावापिपरिपक्काः कथंनुमे ॥ नप्रयच्छं
तिवैलोकाब्राह्मणाश्चर्यकारकं ॥ १८ ॥

अर्थ- आणि कोणी ब्राह्मण, क्षत्रिय, कोणी विध वा ब्राह्मणस्त्रिया, संस्कार झालेले किंवा न झालेले व वयोवस्थादिकानीं परिपक्क झालेले इतर लोक हे कोणीच मला भिक्षा देत नाहीत तस्मात् अशा ब्राह्मणादिक-वर्णानीं हें क्षेत्र आश्चर्य कारक आहे.

एषांशापंप्रदास्यामि तीर्थस्य नगरस्यतु ॥ तीर्थंचा
तीर्थतांयातु नगरंशापयाम्यहं ॥ १९ ॥

अर्थ- यास्तव सर्व लोक येथील तीर्थ व नगर यांस शाप देतों असें बोलून ह्मणतात कीं, या तीर्थाचें तीर्थत्व नष्ट होवो; आतां या नगरास शाप देतों.

माभूत्त्रिपुरुषी विद्या माभूत्त्रिपुरुषंधनं ॥ माभू-
त्त्रिपुरुषंसख्यं व्यासो वाराणसींशपन् ॥ २० ॥

अर्थ- तो असा कीं, या नगरांत त्रिपुरुष पर्यंत विद्या सारखी असणार-नाहीं, तीन पुरुष पर्यंत धन स्थिर राहणार नाहीं; व तीन पुरुष पर्यंत सख्य ही सतत चालणार नाहीं.

अविमुक्ते निवसतां जनानां पुण्यकर्मणां ॥ विघ्नंसृ-
जामि सर्वेषांयेन सिद्धि र्नविद्यते ॥ २१ ॥

अर्थ- आणि या अविमुक्त क्षेत्रवासी पुण्यवंत सर्व जनांस जेणें करून सिद्धि प्राप्त होणार नाहीं असें मी विघ्न आतां उत्पन्न करतों.

व्यासचित्तंतदाज्ञात्वादेवदेव उमापतिः ॥ भीतभीत-
स्तदागौरींतांप्रियांपर्यभाषत ॥ २२ ॥

अर्थ- त्या वेळेस तें व्यासाचें क्षुब्ध झालेलें चित्त जाणून देवाधिदेव उमापति अतिशयें भयभीत होऊन ते समयीं आपल्या प्रिय पार्वतीस भाषण करूं लागले.

शृणुदेविवचोमह्यं यादृशंप्रत्युपस्थितं ॥ कृष्णद्वैपा
यनः कोपाच्छापंदातुं समुद्यतः ॥ २३ ॥

अर्थ- कीं, हे देवि मला प्रस्तुत जो प्रसंग प्राप्त झाला त्याविषयीं माझें भाषण ऐक; तें असें कीं, सांप्रत कृष्ण द्वैपायन नामें प्रसिद्ध साक्षात् नारायणस्वरूपी व्यास कोपानें या नगरास शाप देण्यासाठीं अतिशयें उद्युक्त झाले आहेत.

देव्युवाच ॥ किमर्थं शपते क्रुद्धो व्यासः केन प्रकोपितः ॥ किं कृतं भगवंस्तस्य येन शापं प्रयच्छति ॥ २४

अर्थ- तेव्हां पार्वती बोलली कीं, अहो ऐश्वर्यसंपन्न देवा व्यासास कोणी कोप उत्पन्न केला; त्यामुळें ते क्रुद्ध होऊन शाप किमर्थ देतात तस्मात् त्यानीं शाप देण्यासारखें असें त्यांचें अपराधचरण कोणी काय केलें.

देव देव उवाच ॥ अनेन कृत पस्तप्तं बहून् वर्षगणान् प्रिये ॥ मौनिना ध्यानयुक्तेन द्वादशाब्दान्वरानने ॥ २५ ॥

अर्थ- पश्चात् देवाधिदेव शंकर बोलतात हे प्रिये सुंदरमुखि या व्यासानीं बहुत वर्षें उत्कृष्ट तप केलें यावर बारावर्षें मौन धारण करून ध्यान केलें.

ततः क्षुधा सं संजाता भिक्षामटितुमागतः ॥ नैवास्य केनचिद्भिक्षाग्रासार्धमपि भामिनि ॥ २६

अर्थ- हे सुंदरि नंतर त्यांस क्षुधा उत्पन्न झाल्यामुळें ते या काशीपुरींत भिक्षार्थ भ्रमण करण्यासाठीं आले असून त्यांस कोणी अर्धग्रास परिमित ही भिक्षा दिली नाहीं.

एवं भगवतः काल आसीन् षाण्मासिको मुनेः ॥ ततः क्रोधपरीतात्मा शापं दास्यति सोऽधुना ॥ २७ ॥

अर्थ- या प्रमाणें ते भगवान् व्यास येथें भिक्षार्थ पर्यटन करीत असतां षण्मास परिमित काल गेला तथापि त्यांस भिक्षा न मिळाल्यामुळें त्यांच्या अंतःकरणास क्रोध येऊन ते सांप्रत शाप देत आहेत.

यावन्नैष शपेत्तावदुपायस्तत्र चिंत्यतां ॥ कृष्णद्वैपायनं व्यासं विद्धि नारायणं प्रिये ॥ २८ ॥

अर्थ- तर आतां या व्यासानीं शाप दिला नाहीं तों यांस प्रसन्न करण्या

साठीं तूं कांहीं उपाय कर; कारण हे प्रिये कृष्णद्वैपायन नामक हे व्यास साक्षात् नारायण आहेत असें समज.

कोस्यशापान्नबिभेतित्र्यपिसाक्षात्पितामहः॥अ
दैवंदेवतंकुर्याद्दैवंचाप्यपदैवतं॥२९॥

अर्थ- तस्मात् या व्यासांच्या शापानें साक्षात् ब्रह्मदेव ही भय मानतात; तेव्हां इतर कोण भिणार नाहीं कारण हे व्यास जो देव नाहीं त्यास देव करण्या विषयीं समर्थ असून देवांचा देवपणा ही नाहींसा करितील.

आवांतुमानुषौभूत्वागृहस्थौविहृवासिनौ॥तस्य
तृप्तिकरींभिक्षांप्रयच्छावोवरानने॥३०॥

अर्थ- हे सुंदरमुखि आपण या क्षेत्रांत राहिलों आहों यास्तव आपण गृहस्थाश्रमी मनुष्य वेष धारण करून या व्यासांस तृप्त करणारी भिक्षा देऊं.

एवमुक्त्वाततोदेवीदेवेनशंकरेणतदा॥व्यासस्यद
र्शनंदत्वाकृत्वावेषंतुमानुषं॥३१॥

अर्थ- असें भाषण करून त्या काळीं पार्वती सहित शंकरानीं मनुष्य वेषानें व्यासांचे अग्रभागीं येऊन त्या व्यासांस दर्शन दिलें.

एह्येहिभगवन्सद्योभिक्षांग्राहयसत्तम॥अस्म
द्गृहेकदाचित्त्वंनागतोसिमहामुने॥३२॥

अर्थ- आणि ते उभयतां व्यासांस प्रार्थना करूं लागले कीं, हे ऐश्वर्य-पूर्ण साधो आपण इकडे येऊन सत्वर भिक्षा घ्यावी कारण हे महा मुने-तुह्मीं आमच्या गृहीं कधींच आलां नाहीं.

एतच्छ्रुत्वाप्रीतमनाभिक्षांग्रहीतुमागतः॥भिक्षां
दत्वातुव्यासायषड्रसाममृतोपमां॥३३॥

अर्थ- असें त्या उभयतांचें वचन श्रवण करून व्यास संतुष्ट मनानें ती-भिक्षा ग्रहण करण्या साठीं त्यां समीप आले असतां पार्वती शंकरानीं व्यासांस षड्रस संपन्न अमृता समान मधुर भिक्षा दिली.

अनास्वादितपूर्वासाभक्षितामुनिनातदा॥भिक्षां-
व्यासस्ततोभुक्त्वाचिंतयन्हृष्टमानसः॥३४॥

अर्थ- तेव्हां त्या व्यासानीं पूर्वी कधींच जिचा अद्भुत स्वाद अनुभवला-नव्हता अशा त्या उत्तम भिक्षेचें भोजन करून हर्षयुक्त मनानें ते मुनि चिंतन करूं लागले.

ववंदे वरदं देवं देवींच गिरिजां तदा ॥ व्यासः कमलप-
त्राक्ष इदं वचनमब्रवीत् ॥ ३५ ॥

अर्थ- आणि त्या वेळेस कमलपत्रा समान नेत्रानीं सुशोभित ते व्यास त्या वर दायक पार्वतीसहीत शंकरांस नमस्कार करून हें पुढील भाषण करितात.

देवो देवी नदी गंगा मिष्टमन्नं शुभा गतिः ॥ वाराणस्यां
विशालाक्षि वासः कस्य न रोचते ॥ ३६ ॥

अर्थ- तें असें कीं, हे शंकरा या वाराणसींत देव तुम्हीं, देवी पार्वती, गंगा नदी, मिष्ट अन्न व उत्तम गति अशा वस्तु आहेत तेव्हां हे विशालनेत्रे येथें कोणास बरें वास करणें रुचणार नाहीं.

एवमुक्त्वा ततो व्यासो नगरीमवलोकयन् ॥ चिंतया-
नस्ततो भिक्षां हृदयानंदकारिणीं ॥ ३७ ॥

अर्थ- असें बोलून पश्चात् ते व्यास त्या नगरीस अवलोकन करीत अशी मनास आनंद देणारी भिक्षा पुनः कशी मिळेल असें चिंतन करूं लागले.

अपश्यत्पुरतो देवं देवींच गिरिजां तदा ॥ गृहांगणास्थि
तं व्यासं देवदेवोब्रवीदिदं ॥ ३८ ॥

अर्थ- तों त्या कालीं व्यासानीं आपले अग्रभागीं शंकर पार्वतीस पाहिलें तेव्हां ते देवाधिदेव शिव त्या घराच्या अंगणांत उभेरा राहिलेल्या व्यासांस हें पुढील भाषण करतात.

इह क्षेत्रे न वस्तव्यं क्रोधनस्त्वं महामुने ॥ एवं विस्मय
मापन्नो देवं व्यासोब्रवीद्वचः ॥ ३९ ॥

अर्थ- कीं, हे महामुने तुम्हीं या क्षेत्रांत वास करूं नये, कारण तुम्हीं महा कोपिष्ट आहां; असें त्यांचें भाषण ऐकतांच व्यास विस्मित होऊन हें पुढील वचन शंकरांस बोलतात.

व्यासउवाच ॥ चतुर्दश्यामथाष्टम्यां मवेशं दातु मर्हसि ॥

एवमस्त्वित्यनुज्ञाय तत्रैवांतरधीयत ॥ ४० ॥

अर्थ- तें असें कीं, हे महादेवा चतुर्दशी व अष्टमी या दोन दिवसीं तरीं मला या नगरींत येण्या विषयीं आज्ञा देण्यास आपण योग्य आहां असें व्यासांचें प्रार्थना वचन ऐकतांच ते शिव तथास्तु असें ह्मणून व्यासांस ती आज्ञा देऊन त्या स्थानींच अंतर्धान पावले.

न तद्गृहं न सा देवी न देवो ज्ञायते क्वचित् ॥ एवं त्रैलोक्यविख्यातः पुरा व्यासो महातपाः ॥ ४१ ॥ ज्ञात्वा क्षेत्रगुणान् सर्वान् स्थितस्तस्यैव पार्श्वतः ॥

अर्थ- तों तत्क्षणीं तें गृह व ते पार्वती शंकर हे गुप्त झाले; या मुळें ते कोठें आहेत हें व्यासांस समजेना तेव्हां ते त्रैलोक्य विख्यात महा तपस्वी व्यास त्या दिवसा पासून या क्षेत्राचे सर्व गुण जाणून त्या शंकरांच्याच एका बाजूस राहिले.

एवं व्यासं स्थितं ज्ञात्वा क्षेत्रं शंसंति पंडिताः ॥ ४२ ॥ अविमुक्तगुणानां तु कः समर्थो वदिष्यति ॥

अर्थ- असे व्यास या क्षेत्रांत राहिले हें जाणून ज्ञानी या क्षेत्राची प्रशंसा करितात अशा या काशि क्षेत्राचे गुण वर्णना विषयीं कोणीही समर्थ नाहीं.

देवब्राह्मणविद्विष्टा देवभक्तिविडंबकाः ॥ ४३ ॥ ब्रह्मघ्नाश्च कृतघ्नाश्च तथा नैष्कृतिकाश्च ये ॥ लोकद्विषो गुरुद्विषस्तीर्थायतनदूषकाः ॥ ४४ ॥ सदा पापरताश्चैव ये चान्ये कुत्सिता भुवि ॥ तेषां नास्तीति वासो वै स्थितो सौ दंडनायकः ॥ ४५ ॥

अर्थ- आणि देव ब्राह्मणांचा द्वेषकरणारे, देव भक्तीची विटंबना करणारे, ब्रह्म हत्या करणारे, कृतघ्न (परोपकार न जाणणारे), कपटी, लोकद्वेषी, गुरुद्वेषी, तीर्थ व देव स्थानें यांस दूषण लावणारे, सर्वदा पापां विषयीं तत्पर, व यांहून इतर जे पृथ्वीवरील कुत्सित (निंद्य) आहेत, त्यांचा वास या क्षेत्रांत होत नाहीं कारण येथें दंडनायक काल भैरव दुष्टशासनार्थ निरंतर राहिला आहे.

रक्षणार्थं नियुक्तं वै दंडनायकमुत्तमं ॥ पूजयित्वा यथा शक्त्या गंधपुष्पादिधूपकैः ॥ ४६ ॥ नमस्कारं ततः कृत्वा नायकस्य तु मंत्रवित् ॥

अर्थ- यास्तव काशी क्षेत्रांत राहण्याची इच्छा असेल त्या वेद वेत्यानें त्या रक्षणार्थ योजलेल्या उत्तम दंड नायक भैरवाची यथा शक्ति गंध, पुष्प, धूप दीपानीं पूजा केल्यावर त्या क्षेत्रपालास नमस्कार करून त्याच्या आज्ञेनें या क्षेत्रांत रहावें

सर्ववर्णा वृते क्षेत्रे नानाविधसरीसृपे ॥ ४७ ॥ ईश्वरानुगृहीता हि गतिं गाणेश्वरीं गताः ॥

अर्थ- आणि ब्राह्मणादिक सर्ववर्ण व शेषादिक अनेक प्रकारचे नाग यानीं युक्त अशा या क्षेत्रांतील कितीएक प्राणी ईश्वराच्या अनुग्रहानें नंदिकेश्वर प्रभृति शिवगणांच्या गतीस गेले.

नानारूपधरा दिव्या नानावेषधरास्तथा ॥ ४८ ॥ सुरा वै ये तु सर्वे च तन्निष्ठास्तत्परायणाः ॥ यदिच्छंति परं स्थानं अक्षयं तदवाप्नुयुः ॥ ४९

अर्थ- तसेच अनेक रूपें धारण करणारे अनेक प्रकारचे वेषधारी स्वर्गस्थ देव या सर्वांस ज्या उत्तम स्थानाची इच्छा असेल तदर्थ त्यानीं या काशि क्षेत्रांत एक निष्ठेनें वास केला असतां त्यांस तें अक्षय्य स्थान प्राप्त होतें.

परं पुरं देवपुराद्धि शिष्यते तदुत्तरं ब्रह्मपुरात्पुरस्थितं ॥ तपोबलादीश्वरयोगनिर्मितं नतत्समं ब्रह्मदिवौकसालयं ॥ मनोरमं कामगमं ह्यनामयं अतीत्य तेजांसि तपांसि योगवत् ॥ ५० ॥

अर्थ- कारण हें काशीपुर इंद्राच्या अमरावती नगरीपेक्षां अति उत्कृष्ट असून प्रयागाचे अग्रभागीं असल्यामुळें त्याहून ही श्रेष्ठ आहे आणि तपोबल युक्त ईश्वराच्या संबंधानें तें निर्माण झाल्या कारणानें ब्रह्मादिक सर्व देवांचीं स्थानें या क्षेत्राच्या योग्यते समान नाहींत तसेंच हें काशिक्षेत्र इच्छितस्थलीं गमन करणारें रम्य व निरोगि असून आपले योग सामर्थ्यानें सर्व तेज व तप यांपेक्षां अधिक आहे.

अधिष्ठितस्तु तत्स्थाने देवदेवो विराजते ॥ तपांसिया
नितप्यंते व्रतानि नियमाश्चये ॥ ५१ ॥ सर्वतीर्थाभिषे
कं तु सर्वदानफलानि च ॥ सर्वयज्ञेषु यत्पुण्यमविमु
क्ते तदाप्नुयात् ॥ ५२ ॥

अर्थ- या स्थानीं देवाधिदेव शंकर अध्यक्षत्वें करून शोभत आहेत, म्हणून या काशि क्षेत्र वासी लोकांस तप, व्रतें, नियम, सर्व तीर्थस्नानें, सर्व दान फलें व सकल यज्ञांचीं पुण्यें हीं सर्व प्राप्त होतात.

अतीतं वर्तमानं च अज्ञानात् ज्ञानतोपि वा ॥ सर्वं त-
स्य च यत्पापं क्षेत्रं दृष्ट्वा विनश्यति ॥ ५३ ॥

अर्थ- तसेंच ज्या मानवानें अविमुक्त क्षेत्राचें दर्शन केलें त्याचीं अज्ञानानें केलेलीं व जाणून केलेलीं पूर्वींचीं व वर्तमान काळचीं सर्व पापें नाश पावतात.

शांतेर्दांतैस्तपस्तप्तं यत्किंचिद्धर्मसंज्ञितं ॥ सर्वं च तद
वाप्नोति अविमुक्ते जितेंद्रियः ॥ ५४ ॥

अर्थ- आणि शांत व दांत (इंद्रिय निग्रही) यानीं जें कांहीं धर्माचरण रूप तप केलें तें सर्व अविमुक्त क्षेत्र वासी जितेंद्रियास प्राप्त होतें.

अविमुक्तं समासाद्य लिंगमर्चयते नरः ॥ कल्पको
टिशतैश्चापि नास्ति तस्य पुनर्भवः ॥ ५५ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें या अविमुक्त क्षेत्रांत येऊन जो नर स्वतः लिंगार्चन करितो अथवा इतरां कडून करवितो त्यास शत कोटि कल्पानीं ही पुनः-जन्म घडत नाहीं.

अमरा ह्यक्षयाश्चैव क्रीडंति भवसन्निधौ ॥ क्षेत्र-
तीर्थोपनिषदमविमुक्तं न संशयः ॥ ५६ ॥

अर्थ- आणि क्षय रहित सर्व देव या क्षेत्रांत शंकराचे सन्निध क्रीडा करतात म्हणून हें अविमुक्त क्षेत्र सर्व तीर्थें व क्षेत्रें यांत शिरोभाग (श्रेष्ठ) आहे या विषयीं संशय नाहीं.

अविमुक्ते महादेवमर्चयंति स्तुवंति वै ॥ सर्वपापविनि
र्मुक्तास्तेतिष्ठंत्यजरामराः ॥ ५७ ॥

अर्थ- यास्तव काशि क्षेत्रांत जे महादेवांचें पूजन व स्तवन करतात ते सर्व पापांतून मुक्त होऊन अजरामर देव होतात.

सर्वकामाश्रये यज्ञाः पुनरावृत्तिकाः स्मृताः ॥ अविमुक्ते मृतायेच सर्वेतेत्वनिवर्तकाः ॥ ५८ ॥

अर्थ- तसेच सर्व यज्ञ सकल मनोरथ पूर्ण करणारे आहेत, परंतु त्यांपासून पुनर्जन्माचें निवारण होत नाहीं आणि या अविमुक्त क्षेत्रांत जे मरण पावतात ते सर्व ही जन्म मरणांतून मुक्त होतात.

ग्रहनक्षत्रताराणां कालेनपतनाद्भयं ॥ अविमुक्ते मृतानांतु पतनंनैव विद्यते ॥ ५९ ॥

अर्थ- तसेच ग्रह, नक्षत्रें व इतर तारा यांस कालें करून पतनाचें भय आहे; परंतु काशींत मृत्यु पावणारास अधःपात होतच नाहीं.

कल्पकोटिसहस्रैस्तु कल्पकोटिशतैरपि ॥ नतेषांपुनरावृत्तिर्मृतायेक्षेत्र उत्तमे ॥ ६०

अर्थ- आणि या उत्तम क्षेत्रांत जे मरण पावतात त्यांस कोटिशत कल्पानीं व कोटिसहस्र कल्पानीं ही पुनर्जन्म प्राप्त होत नाहीं.

संसारसागरे घोरे भ्रमंतः कालपर्ययात् ॥ अविमुक्तं समासाद्य गच्छंति मणिकर्णिकां ॥ ६१

अर्थ- त्याच प्रमाणें जे या घोर संसार समुद्रांत कालक्रमानें भ्रमण पावतात ते महा भाग्योदयानें काशीस येऊन मणिकर्णिकेस जातात.

ज्ञात्वा कलियुगं घोरं हाहाभूतमचेतनं ॥ अविमुक्तंनमुंचंति कृतार्थास्तेनराभुवि ॥ ६२ ॥

अर्थ- तसेच या भूमी वरील जे मनुष्य बहुदुःख निमित्त हाहा कार व अज्ञान यानीं युक्त असें हें घोर कलियुग जाणून काशी क्षेत्रास सोडीत नाहींत ते नर कृतार्थ होतात.

अविमुक्तं प्रविष्टस्तु यदिगच्छेत्ततः पुनः ॥ तदा हसंतिभूतानि अन्योन्यंकरताडनं ॥ ६३ ॥

अर्थ- तसाच जो मानव काशींत आल्यावर तो पुनः तेथून अन्यत्र स्थलीं गेला असता ते थाल संपूर्ण भूतें परस्पर हातांवर हात देऊन त्याचा-

उपहास करतात.

कामक्रोधेनलोभेनग्रस्तायेभ्रविमानवाः॥ निष्क्रमं
तेनरादेविदंडनायकमोहिताः॥ ६४॥

अर्थ- हे पार्वति या पृथ्वी वरील जे नर काम, क्रोध व लोभ यानीं ग्रास लेले आहेत, ते दंड नायक भैरवानें उत्पन्न केलेल्या मोहानें व्याप्त होऊन काशींतून बाहेर जातात.

जपध्यानविहीनानांज्ञानवर्जितचेतसां॥ ततोदुः
खहतानांच गतिर्वाराणसीनृणां॥ ६५॥

अर्थ- तसेंच जे मानव जप व ध्यान न करण्यानें अंतःकरणांत ज्ञान शून्य होऊन त्या योगानें अनेक दुःखानीं पीडित झाले त्यांस वाराणसी उत्तम गति देणारी आहे.

तीर्थानांपंचकंसारं विश्वेशानंदकानने॥ दशाश्वमे
धंलोलार्कः केशवोबिंदुमाधवः॥ ६६

अर्थ- तसेंच या विश्वेश्वराच्या आनंद कानन नामक काशि क्षेत्रांतील पांच स्थानें सर्व तीर्थांत मुख्य आहेत, तीं अशीं कीं, दशाश्व मेध, लोलार्क, केशव व बिंदुमाधव हीं चार श्रेष्ठ आहेत.

पंचमीतुमहाश्रेष्ठाप्रोच्यतेमणिकर्णिका॥ एभिस्तु
तीर्थवर्यैश्चवर्ण्यतेह्यविमुक्तकं॥ ६७

अर्थ- आणि त्यांत पांचवी मणिकर्णिका महाश्रेष्ठ आहे असें बोलतात, व हीं श्रेष्ठ तीर्थें काशींत आहेत ह्मणून या क्षेत्राचें वर्णन सर्वोत्कर्षानें होत आहे.

एतद्वैकथितंसर्वंदेव्यैदेवेनभाषितं॥ अविमुक्तस्यक्षे-
त्रस्यतत्सर्वंकथितंद्विजाः॥ ६८॥

अर्थ- सूत बोलतात शौनकादिक ब्राह्मण हो असें हें अविमुक्त क्षेत्राचें सर्व माहात्म्य शंकरानीं पार्वतीस सांगितलें तें संपूर्ण मी तुह्मांस कथन केलें.

इतिश्री मत्स्यपुराणे अविमुक्तमाहात्म्ये चतुरशीत्युत्तरशततमोध्यायः १८४

अध्याय १८५ वा

ऋषयऊचुः॥ माहात्म्यमविमुक्तस्य यथावत्कथितं-
त्वया॥ इदानींनर्मदायास्तुमाहात्म्यंवदसत्तम॥ १॥

अर्थ- पुनः ऋषी प्रश्न करितात अहो साधुश्रेष्ठ सूतहो तुह्मीं काशिक्षेत्रा चा यथास्थित महिमा सांगितला; सांप्रत नर्मदेचें माहात्म्य वर्णन करा.

यत्रोंकारस्यमाहात्म्यंकपिलासंगमस्यच॥ अमरे
शस्यचैवाहुर्माहात्म्यंपापनाशनं॥२॥

अर्थ- कारण त्या नर्मदेच्या माहात्म्यांत ओंकार, कपिलानदी संगम व अमरेश यांचीं पापनाशक माहात्म्यें आहेत असें प्रसिद्ध आहे

कथंप्रलयकालेतुननष्टानर्मदापुरा॥ मार्कंडेयश्चभ
गवान्नविनष्टस्तदाकिल॥ ॥त्वयोक्तंतदिदंसर्वंपुन
र्विस्तरतोवद॥३॥

अर्थ- पूर्वीं प्रलय कालीं नर्मदा, कशी नाश पावली नाहीं; आणि त्या का लीं ऐश्वर्यवान् मार्कंडेय ही कसा नाश पावला नाहीं. हें सर्व तुह्मीं पूर्वीं सांगितलेंच आहे परंतु तें पुनः आतां विस्तारानें कथन करा.

सूतउवाच॥ एतदेवपुरापृष्टः पांडवेनमहात्मना॥
नर्मदायास्तुमाहात्म्यंमार्कंडेयोमहामुनिः॥४॥

अर्थ- तेव्हां सूत बोलले शौनकादिक ऋषीहो पूर्वीं महाबुद्धिमान् धर्मराजानें महा मुनि मार्कंडेयास हेंच नर्मदेचें माहात्म्य विचारिलें.

उग्रेणतपसायुक्तोवनस्थोवनवासिना॥ पृष्टःपूर्वं
महाभागायांधर्मपुत्रेणधीमता॥५॥

अर्थ- तें असें कीं, बुद्धिमान् धर्मराजा वनवासांत असतां त्यानें उग्रतपस्वी असून वनांत राहणाऱ्या मार्कंडेयांस नर्मदा माहात्म्या विषयीं पुरातन मोठी कथा विचारिली.

युधिष्ठिरउवाच॥ श्रुतामेविविधाधर्मास्त्वत्प्रसादा
द्विजोत्तम॥ भूयश्चश्रोतुमिच्छामितन्मेकथयसु
व्रत॥६॥

अर्थ- धर्मराज बोलले हे उत्तम व्रतनिष्ठ ब्राह्मण श्रेष्ठा मार्कंडेया मी- तुमच्या कृपेनें नाना प्रकारचे धर्म श्रवण केले; आतां पुनः मी जें श्रवण करण्या विषयीं इच्छितों तें आपण कृपा करून मला सांगावें.

कथमेषामहापुण्यानदीसर्वत्रविश्रुता॥ नर्मदा-

नामविख्याता तन्मे ब्रूहि महामुने ॥ ७॥

अर्थ- तें असें कीं, हे महामुने मार्कंडेया नर्मदानामें प्रसिद्ध ही महापुण्य कारक नदी सर्वत्र प्रख्यात कशी झाली; हें आपण मला सांगा.

मार्कंडेय उवाच ॥ नर्मदा सरितां श्रेष्ठा सर्वपापप्रणाशिनी ॥ तारयेत्सर्वभूतानि स्थावराणि चराणि च ॥ ८

अर्थ- तेव्हां मार्कंडेय ऋषि बोलले कीं, हे धर्म राजा नर्मदा ही सर्व पापांचा नाश करण्या मुळें सर्व नद्यांत श्रेष्ठ आहे; ह्मणून ही नदी चराचर सर्व प्राणि मात्रांस संसार समुद्रांतून तारते.

नर्मदायास्तु माहात्म्यं पुराणे यन्मया श्रुतं ॥ तदेतद्धि महाराज तत्सर्वं कथयामि ते ॥ ९॥

अर्थ- हे महाराज मी नर्मदेचें माहात्म्य पुराणांत जें श्रवण केलें आहे, तें सर्व तुला कथन करितों.

पुण्या कनखले गंगा कुरुक्षेत्रे सरस्वती ॥ ग्रामे वा यदि वारण्ये पुण्या सर्वत्र नर्मदा ॥ १०॥

अर्थ- तें असें कीं, गोदावरी खनखल तीर्थीं महापुण्य कारक असून सरस्वती कुरुक्षेत्रीं अति पुण्य दायक आहे; आणि नर्मदा तर ग्राम किंवा अरण्य इत्यादिक सर्व प्रदेशांत पुण्य रूपच आहे.

त्रिभिः सारस्वतं तोयं सप्ताहेन तु यामुनं ॥ सद्यः पुनाति गांगेयं दर्शनादेव नार्मदं ॥ ११॥

अर्थ- तसेंच सरस्वतीचें उदक तीन दिवसानीं मनुष्यांस पवित्र करणारें असून यमुनेचें जल सात दिवसानीं शुद्ध करितें; आणि भागीरथीचें तीर्थोदक तत्काळ एकवार स्नान मात्रानेंच पवित्रता देतें; व नर्मदेचें तीर्थजल तर दर्शना बरोबरच शुद्ध करणारें आहे.

कलिंगदेशपश्चार्धे पर्वतेऽमरकंटके ॥ पुण्या च त्रिषु लोकेषु रमणीया मनोरमा ॥ १२॥

अर्थ- कलिंग देशाचे पश्चिमेकडचे अर्धभागावरील पुण्य कारक अमर कंटक नामक पर्वतावर जी नर्मदा आहे ती त्रैलोक्यांतील सर्व देव व ऋषि आदिकरून सज्जनांचे मनास रमविणारी अशी अत्यंत रमणी-

य आहे.

सदेवासुरगंधर्वाऋषयश्चतपोधनाः॥ तपस्तत्वाम
हाराजसिद्धिंचपरमांगताः॥ १३॥

अर्थ- हे सार्वभौम धर्म राजा देव, असुर, गंधर्व व तपोधनऋषि हे सर्वही त्या अमर कंटक पर्वता वरील नर्मदातीरीं तप करून परम सिद्धि पावले.

तत्रस्नात्वानरोराजन्नियमस्थोजितेंद्रियः॥ उपो
ष्यरजनीमेकांकुलानांतारयेच्छतं॥ १४॥

अर्थ- हे राजा त्या अमर कंटक पर्वता वरील नर्मदेंत स्नान करून जो आपलीं मन आदिक सर्व इंद्रियें स्वाधीन ठेवून नियम पूर्वक एक अहोरात्र उपोषण करील तो आपल्या शंभर कुलांस तारील.

जलेश्वरेनरःस्नात्वापिंडंदत्वायथाविधि॥ पितर
स्तस्यतृप्यंतियावदाभूतसंप्लवं॥ १५॥

अर्थ- तसेंच त्या पर्वता वरील जलेश्वर नामक नर्मदेच्या तीर्थी स्नान करून जो मानव यथा शास्त्र विधीनें पिंड प्रदान करील त्याचे पितर ब्रह्मदेवांच्या एक दिवस पर्यंत तृप्त राहतात.

पर्वतस्यसमंतात्तुरुद्रकोटिःप्रतिष्ठिता॥ स्नात्वा
यःकुरुतेतत्रगंधमाल्यानुलेपनैः॥ १६॥ प्रीतस्त-
स्यभवेच्छर्वोरुद्रकोटिर्नसंशयः॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या पर्वताच्या आसमंताद्भागीं शिवाचीं कोटिलिंगें आहेत; तेथें नर्मदा स्नान करून गंध, पुष्पें, व बुका आदिकरून सुगंधि पदार्थांचीं चूर्णें यानीं जो त्या कोटि लिंगांची पूजा करील त्यावरते भगवान् कोटिलिंग स्वरूपी शंकर प्रसन्न होतील या विषयीं संशय नाहीं.

पश्चिमेपर्वतस्यांतेस्वयंदेवोमहेश्वरः॥ १७॥ तत्र
स्नात्वाशुचिर्भूत्वाब्रह्मचारीजितेंद्रियः॥ पितृका
र्यंचकुर्वीतविधिवन्नियतेंद्रियः॥ १८॥ तिलोद-
केनतत्रैवतर्पयेत्पितृदेवताः॥ आसप्तमंकुलं

तस्यस्वर्गेमोदेत पांडव ॥ १९ ॥

अर्थ- हे पांडवा त्या पर्वताच्या पश्चिम भागावर सर्वेश्वर महादेव स्वतः जागरूकतें करून आहेत, तेथें त्यांच्यासन्निध नर्मदेंत स्नान करून शुचि होऊन ब्रह्मचर्यानें सर्व इंद्रियें स्वाधीन ठेवून नियम धारण केलेल्या इंद्रिययुक्त पुरुषानें शास्त्रानुसार विधीनें पितरांचें श्राद्ध करावें आणि तिलोदकानें तेथेंच पितृदेवतांचें तर्पण करावें; म्हणजे तेणें करून त्याचीं सप्त कुलें स्वर्गांत आनंद पावतात.

षष्टिवर्षसहस्राणि स्वर्गलोकेमहीयते ॥ अप्सरो गणसंकीर्णेसिद्धचारणसेविते ॥ २० ॥ दिव्यगंधा नुलिप्तश्च दिव्यालंकारभूषितः ॥ ततःस्वर्गात्प रिभ्रष्टोजायतेविपुलेकुले ॥ २१ ॥ धनवान्दानशी लश्च धार्मिकश्चैवजायते ॥ पुनःस्मरतितत्तीर्थ- गमनंतत्ररोचते ॥ २२ ॥ कुलानितारयेत्सप्तरुद्र- लोकंसगच्छति ॥

अर्थ- आणि तो श्राद्ध करून पितृतर्पण करणारा पुरुष अप्सरांचे समुदाय, सिद्ध व चारण यानीं युक्त अशा स्वर्गलोकांत दिव्य गंधाची उटि व दिव्य अलंकार यानीं सुशोभित होत्साता तेथें साठ हजार वर्षें वास करितो; पश्चात् त्या स्वर्गांतून खालीं पृथ्वीवर येऊन तो श्रीमंतांच्या सत्कुलांत उत्पन्न होऊन धनवान्, दानशूर व धार्मिक असा होतो; नंतर तो पुनः त्या तीर्थाचें स्मरण करून तेथें जाऊन त्या तीर्थाच्या सेवेनें आपल्या सात कुलांस उद्धरून कैलासास जातो.

योजनानांशतंसाग्रंश्रूयतेसरिदुत्तमा ॥ २३ ॥- विस्तारेणतुराजेंद्रयोजनद्वयमायता ॥

अर्थ- हे राजेंद्रा ही श्रेष्ठ नदी नर्मदा सवाशें कोस लांब असून दोन योजनें रुंद आहे.

षष्टिस्तीर्थसहस्राणि षष्टिकोट्यस्तथैवच ॥ २४ पर्वतस्यसमंतात्तु तिष्ठतेमरकंटके ॥

अर्थ- त्याच प्रमाणें साठ कोटि साठ सहस्र तीर्थें हें सर्व प्रकरण त्या-

अमरकंटक पर्वतावर आसमंताद्भागीं असतो.

ब्रह्मचारी शुचिर्भूत्वा जितक्रोधो जितेंद्रियः ॥२५
सर्वहिंसानिवृत्तस्तु सर्वभूतहिते रतः ॥ परं शार्व
समाचारो यस्तु प्राणान् परित्यजेत् ॥२६॥ तस्य
पुण्यफलं राजन् शृणुष्वावहितो मम ॥

अर्थः- तसाच जो मानव ब्रह्मचर्य धारण करून शुचि होत्साता, क्रोध जिंकून मन आदि करून सर्व इंद्रिये स्वाधीन ठेवून संपूर्ण हिंसांचा त्याग करून प्राणिमात्रांच्या हिताविषयीं तत्पर झाला; तो महाशैव त्या अमरकंटक पर्वतावरील नर्मदा तीरीं जर प्राणत्याग करील, तर त्यास काय पुण्य फल प्राप्त होईल तें धर्मराजा तूं स्वस्थ चित्तानें मज पासून श्रवण कर.

शतं वर्षसहस्राणां स्वर्गे मोदेत पांडव ॥२७॥ अप्स
रोगणसंकीर्णे सिद्धचारणसेविते ॥ दिव्यगंधानु
लिप्तश्च दिव्यपुष्पोपशोभितः ॥२८॥ क्रीडते देवलो
कस्थो देवतैः सह मोदते ॥

अर्थः- तें असें कीं, हे पांडवा अप्सरांचे समुदाय, सिद्ध व चारण यानीं युक्त अशा स्वर्गांत तो पुरुष दिव्य गंधाची उटी व पारिजातादिक दिव्य पुष्पांच्या माळा यानीं सुशोभित होत्साता त्या देव लोकांत देव गणां सह वर्तमान क्रीडा करीत असून साठ हजार वर्षें तेथें आनंद पावतो.

ततः स्वर्गात्परिभ्रष्टो राजा भवति वीर्यवान् ॥२९॥
गृहं तु लभते सो वै नानारत्नविभूषितं ॥ स्तंभैर्मणि
मयैर्दिव्यैर्वज्रवैडूर्यभूषितैः ॥३०॥ आलेख्यसहि
तं दिव्यं दासीदाससमन्वितं ॥ मत्तमातंगशब्दैश्च ह
यानां हेषितेन च ॥३१॥ क्षुभ्यते तस्य तद्द्वारं इंद्रस्य
भवनं यथा ॥ राजराजेश्वरः श्रीमान् सर्वस्त्रीजन
वल्लभः ॥३२॥ तस्मिन् गृहे वसित्वा तु क्रीडाभोगस
मन्वितं ॥ जीवेद्वर्षशतं साग्रं सर्वरोगविवर्जितः ॥
३३॥ एवं भोगो भवेत्तस्य यो मृतो मरकंटके ॥

अर्थः- नंतर कांहीं कालानें तो स्वर्गांतून खालीं पृथ्वीवर जन्मास येऊन महा प्रतापी राजा होऊन त्यास अनेक रत्नें व हिरे वैडूर्यमणि यानीं अलंकृत अशा दिव्य मण्यांचे स्तंभ यानीं सुशोभित असून रमणीय चित्रें बहुत दास दासी यानीं युक्त आणि उन्मत्त गज व अश्व यांचे शब्दानीं इंद्र भुवना सारिखें द्वारांत व्याप्त असें दिव्य मंदिर प्राप्त होतें आणि त्या गृहांत तो श्रीमान् सार्वभौम राजा सर्व स्त्रियांस अति प्रिय होत्साता त्या अनेक क्रीडासुख युक्त घरांत वास करून सर्व रोग रहित असून तो पूर्ण शंभर वर्षें पर्यंत वांचतो; या प्रमाणें जो अमरकंटक पर्वतावर नर्मदातीरीं प्राण त्याग करितो त्यास असें अपूर्व पूर्ण सुख प्राप्त होतें.

अग्नौ विषजले वापि तथा चैवत्यनाशके ॥ ३४ ॥ अनिवर्तिका गतिस्तस्य पवनस्यांबरे यथा ॥

अर्थः- तसाच जो कोणी त्या अमरकंटक पर्वतावर अग्नींत किंवा सुवर्णा सारिख्या श्रेष्ठ तीर्थाचे जलांत अथवा अनशन व्रत करून प्राण त्याग करितो त्यास आकाशांतील वायू सारिखी पुनर्जन्मास नयेण्याची गति प्राप्त होते.

पतनं कुरुते यस्तु अमरेशे नराधिप ॥ ३५ ॥ कन्यानां त्रिसहस्राणि एकैकस्यापि चापरे ॥ तिष्ठंति भुवने तस्य प्रेषणं प्रार्थयंति च ॥ ३६ ॥ दिव्य भोगैः सुसंपन्नः क्रीडते कालमक्षयं

अर्थः- हे राजन् तसेंच जो अमरकंटक पर्वतावरून उडी टाकून देहत्याग करतो त्या एकेकाचे मंदिरांत तीन हजार कन्या व इतरही सेवक हे त्याची आज्ञा पालन करण्याच्या इच्छेनें रहातात; आणि तो उत्तम रीतीच्या दिव्य भोगानीं युक्त होऊन प्रलय काल पर्यंत क्रीडा करितो.

पर्वतस्य समंतात्तु रुद्रकोटिः प्रतिष्ठिता ॥ ३७ ॥ स्नानं यः कुरुते तत्र गंधमाल्यानुलेपनैः ॥ प्रीतः सोस्य भवे सर्वो रुद्रकोटिर्न संशयः ॥ ३८ ॥

---

* विष हें सुवर्णाचें नाम निघंटांत प्रसिद्ध आहे.

अर्थः- आणि त्या अमरकंटक पर्वतावर आसमंतात्भागीं कोटि शिवलिंगें आहेत तेथें नर्मदेंतील तीर्थांत जो स्नान करून गंध, पुष्प व उटी यानीं शंकराची पूजा करितो त्यास कोटिलिंगस्वरूपी शिव संतुष्ट होतात यांत संशय नाहीं

पश्चिमेपर्वतस्यांतेश्च यंदेवोमहेश्वरः॥ तत्रस्नात्वा शुचिर्भूत्वाब्रह्मचारीजितेंद्रियः॥ ३९॥ पितृकार्यंच कुर्वीतविधिवन्नियतेंद्रियः॥ तिलोदकेनविधिवत्तर्पयेत्पितृदेवताः॥ ४०॥ आसप्तमंकुलंतस्यस्वर्गेमोदेत पांडव॥ षष्टिवर्षसहस्राणिस्वर्गलोकेमहीयते॥ ४१ दिव्यगंधानुलिप्तश्चदिव्यालंकारभूषितः॥

अर्थः- हे धर्मराजा त्या अमरकंटक पर्वताच्या पश्चिम भागावर महेश्वर देव आहेत; तेथें जो मानव स्नान करून शुचिर्भूत होऊन ब्रह्मचर्यानें इंद्रियें जिंकून त्या स्वाधीन केलेल्या मन आदिकरून सर्व इंद्रियानीं पितरांचें श्राद्ध व तिलोदकानें देवतास्वरूपी पितरांचें तर्पण हें यथाविधीनें करतो त्याचीं सात कुलें स्वर्गीं आनंद पावतात, आणि तो साठ हजार वर्षें स्वर्गलोकीं दिव्य गंधाची उटी व उत्तम अलंकार यानीं भूषित होत्साता तेथील देवगणांस मान्य होतो.

ततःस्वर्गात्परिभ्रष्टोजायतेविपुलेकुले॥ ४२॥ धनवान्दानशीलश्चधार्मिकश्चैवजायते॥

अर्थः- नंतर तो स्वर्गांतून खालीं येऊन भूलोकीं उत्तम कुलांत उत्पन्न होऊन धनवान्, दानशील व धार्मिक असा होतो.

पुनःस्मरतितीर्थार्थंगमनंतत्ररोचते॥ ४३॥ तारयेत्तु कुलान्सप्तरुद्रलोकंसगच्छति॥

अर्थः- पश्चात् पुनः त्या तीर्थाचें माहात्म्य स्मरून त्या तीर्थी गमन करण्याविषयीं त्यास इच्छा होऊन तो आपले सातकुलांचा उद्धार करून रुद्रलोकास जातो.

योजनानांशतंसाग्रंश्रूयतेसरिदुत्तमा॥ ४४॥ विस्तारेणतुराजेंद्रयोजनद्वयमायता॥

अर्थ- हे राजेंद्रा अशीही श्रेष्ठ नदी नर्मदा उगमापासून मुखापर्यंत शंभर योजनें लांब असून दोन योजनें रुंद आहे.

षष्टितीर्थसहस्त्राणिषष्टिकोट्यस्तथैवच ॥ ४५ ॥ प
र्वतस्यसमंतात्तुतिष्ठंत्यमरकंटके ॥

अर्थ- तशींच त्या अमरकंटक पर्वतावर आसमंताद्भागीं साठ कोटि साठ हजार तीर्थें आहेत.

ब्रम्हचारीशुचिर्भूत्वाजितक्रोधोजितेंद्रियः ॥ ४६ ॥
सर्वहिंसानिवृत्तस्तुसर्वभूतहितेरतः ॥ एवंशर्वसमा
चारोयस्तुप्राणान्परित्यजेत् ४७ तस्यपुण्यफलंराज
न्शृणुष्वावहितोमम ॥ शतंवर्षसहस्त्राणांस्वर्गेमो
देतपांडव ॥ ४८ ॥

अर्थ- हे राजन् जो मानव अमरकंटक पर्वतावर ब्रम्हचर्यानें राहून शुचिर्भूत होत्साता क्रोध जिंकून जितेंद्रिय होऊन सर्व हिंसेचा त्याग करून प्राणिमात्रांच्या हिताविषयीं तत्पर असून असाहा आपला सर्व आचार शिव प्रीत्यर्थ करून तेथें प्राणत्याग करतो त्याचें पुण्य फल तूं एकाग्र चित्तानें श्रवण कर. तें असें कीं, हे पांडवा तो मनुष्य एक लक्ष वर्षें पर्यंत स्वर्गीं आनंद पावतो.

पृथिव्यामासमुद्रायामीदृशोनैवजायते ॥ यादृशोयं
नृपश्रेष्ठपर्वतेमरकंटके ॥ ४९ ॥

अर्थ- हे राजश्रेष्ठा आणि तोच त्या अमरककंटक पर्वतीं देह त्याग करणारा मनुष्य पृथ्वीवर जसा ऐश्वर्यवान् होतो तसा या समुद्रवलयांकित सर्व भूमीवर इतर कोणीही उत्पन्न होत नाहीं.

तावत्तीर्थंतुविज्ञेयंपर्वतस्यतुपश्चिमे ॥ ह्रदोजले
श्वरोनामत्रिषुलोकेषुविश्रुतः ॥ ५० ॥

अर्थ- आणि त्या पर्वताच्या पश्चिम भागीं त्रैलोक्य प्रसिद्ध जलेश्वर नामक डोह आहे तेथपर्यंत तें रुद्रकोटि तीर्थ आहे असें जाणावें.

तत्रपिंडप्रदानेनसंध्योपासनकर्मणा ॥ पितरोदश
वर्षाणितर्पितास्तुभवंतिवै ॥ ५१ ॥

अर्थः- त्या तीर्थी संध्या वंदन करून पिंडप्रदान केल्यानें दहा वर्षे पर्यंत पितर तृप्त होतात.

दक्षिणेनर्मदाकूलेकपिलेतिमहानदी ॥ सकलार्ज-
नसंच्छन्नानातिदूरेव्यवस्थिता ॥५२॥

अर्थः- तसीच नर्मदा तीराच्या दक्षिण बाजूस समीपच कपिला नामक महानदी असून ती उगमा पासून मुरवा पर्यंत सर्वत्र उभय तीरीं अर्जुनवृक्षानीं आच्छादित आहे.

सापिपुण्यामहाभागात्रिषुलोकेषुविश्रुता ॥ तत्र
कोटिशतंसाग्रंतीर्थानांतुयुधिष्ठिर ॥५३॥

अर्थः- हे धर्मराजा ती कपिलानदीही त्रैलोक्यांत प्रख्यात पुण्यकारक व लोकांस महाभाग्य संपन्न करणारी अशी असून त्या नदींत उगमा पासून मुरवपर्यंत शंभर कोटि तीर्थे आहेत.

पुराणेश्रूयतेराजन्सर्वंकोटिगुणंभवेत् ॥ तस्या
स्तीरेतुयेवृक्षाःपतिताःकालपर्ययात् ॥ ५४ ॥नर्म
दातोयसंस्पृष्टास्तेपियांतिपरांगतिम् ॥

अर्थः- हे राजन् पुराणांतून असें ऐकण्यांत येतें कीं त्या कपिला नदीच्या तटाकीं केलेलें सर्व कर्मही कोटिगुणित होतें, आणि तिच्या तीरीं जे वृक्ष काळाच्या क्रमानें पडतात तेही तिच्या उदकस्पर्शानें उत्तम गतीस जातात.

द्वितीयातुमहाभागाविशल्यकरणीशुभा ॥५५॥
तत्रतीर्थेनरःस्नात्वाविशल्योभवतिक्षणात् ॥

अर्थः- आणि दुसरीही एक महाभाग्यदायक विशल्यकरणी नामक नदी आहे त्या नदीच्या तीर्थांत मानवानें स्नान केलें असतां क्षणांत त्याच्या अंगांतील व मनांतील सर्व शल्यें दूर होतात.

तत्रदेवगणाःसर्वेसकिन्नरमहोरगाः ॥५६॥ यक्ष
राक्षसगंधर्वाऋषयश्चतपोधनाः ॥ सर्वेसमागता
स्तत्रपर्वतेमरकंटके ॥५७॥

अर्थः- तेथें किन्नर मोठे नाग यांसहित संपूर्ण देवांचे समुदाय, यक्ष,

राक्षस, गंधर्व, तपोधन ऋषी हे सर्व त्या अमरकंटक पर्वतावर आले आहेत.

तैश्च सर्वैः समागम्य मुनिभिश्च तपोधनैः ॥ नर्मदामाश्रिता पुण्या विशल्या नाम नामतः ॥ ५८ ॥ उत्पादिता महाभागा सर्वपापप्रणाशिनी ॥

अर्थः- आणि तपच धन असें मानणारे ऋषी व पूर्वी सांगितलेले देवादिक या सर्वांनीं तेथें येऊन महाभाग्य संपन्न असून संपूर्ण पापांचा नाश करणारी, पुण्यकारक व नर्मदेचा आश्रय करणारी अशी विशल्या नांवाची नदी उत्पन्न केली.

तत्र स्नात्वा नरो राजन् ब्रह्मचारी जितेंद्रियः ॥ ५९ ॥ उपोष्य रजनीमेकां कुलानां तारयेच्छतं ॥

अर्थः- हे राजन् जो नर ब्रम्हचर्य धारण करून जितेंद्रिय होत्साता त्या विशल्या नदींत स्नान करून एक अहोरात्र उपोषण करतो तो आपल्या शंभर कुळांस तारतो.

कपिला च विशल्या च श्रूयते राजसत्तम ॥ ६० ॥ ईश्वरेण पुरा प्रोक्ते लोकानां हितकाम्यया ॥ तत्र स्नात्वा नरो राजन्नश्वमेधफलं लभेत् ॥ ६१ ॥

अर्थः- हे राजश्रेष्ठा पूर्वी ईश्वरानें लोकांचे हित करण्याच्या इच्छेनें कपिला व विशल्या त्या दोन नद्या सांगितल्या असें आमच्या श्रवणांत आहे तस्मात् या नद्यांत जो मनुष्य स्नान करितो त्यास अश्वमेध यज्ञाचें फल प्राप्त होतें.

अनाशकं तु यः कुर्यात्तस्मिंस्तीर्थे नराधिप ॥ सर्वपापविशुद्धात्मा रुद्रलोकं स गच्छति ॥ ६२ ॥

अर्थः- हे राजा त्या तीर्थांत राहून जो मानव निरशन व्रत करतो तो सर्व पापांपासून मुक्त होऊन सबाह्याभ्यंतर शुचि होत्साता शिवलोकास जातो.

नर्मदायास्तु राजेंद्र पुराणे यन्मया श्रुतं ॥ यत्र तत्र नरः स्नात्वा चाश्वमेधफलं लभेत् ॥ ६३ ॥

अर्थः- हे राजेंद्रा म्या पुराणांत जें नर्मदेचें माहात्म्य श्रवण केलें तें असें या नर्मदेंत कोठेंही मनुष्यानें स्नान केलें असतां त्यास अश्वमेध यज्ञाचें

फल प्राप्त होतें.

येवसंत्युत्तरे कूले रुद्रलोकेवसंतिते ॥ सरस्वत्यांच
गंगायांनर्मदायांयुधिष्ठिर ॥ ६४ ॥

अर्थः- हे धर्मराजा सरस्वती गंगा व नर्मदा यांच्या उत्तरतीरीं जे कोणी र
हातात ते शिवलोकीं वास करितात.

समंस्नानंचदानंचयथामेशंकरोब्रवीत् ॥ परित्यज
तियः प्राणान्पर्वतेमरकंटके ॥ ६५ ॥ वर्षकोटिशतंसा
ग्रंरुद्रलोकेमहीयते ॥

अर्थः- आणि नर्मदातीरीं स्नान,दान या दोनीं कर्मांचें फल समान आहे
असें मला शंकरानीं सांगितलें तसेंच अमरकंटक पर्वतीं जो मानव प्राण त्या-
ग करितो तो समग्र शंभर कोटि वर्ष पर्यंत रुद्रलोकांत पूजित होतो.

नर्मदायाजलंपुण्यंफेनोर्मिभिरलंकृतं ॥ ६६ ॥ पवि
त्रंशिरसावंद्यंसर्वपापैःप्रमुच्यते ॥

अर्थः- तसेंच नर्मदेचें उदक फेस व लाटा यानीं सुशोभित असून पुण्य-
कारक व पवित्र आहे त्या उदकास शिरसा वंदन केलें असतां मनुष्य संपू-
र्ण पातकां पासून मुक्त होतो.

नर्मदासर्वतः पुण्याब्रह्महत्यापहारिणी ॥ ६७ ॥ अ
होरात्रोपवासेनमुच्यतेब्रह्महत्यया ॥

अर्थः- आणि नर्मदानदी सर्वत्र उभयतीरीं पुण्यकारक असून ब्रह्मह-
त्येचा नाश करणारी आहे तस्मात् तिचे तीरीं अहोरात्र उपोषण केलें अ-
सतां मनुष्य ब्रह्महत्ये पासून मुक्त होतो.

एवंरम्याचपुण्याचनर्मदापांडुनंदन ॥ ६८ ॥ त्रया
णामपिलोकानांपुण्यात्येषामहानदी ॥

अर्थः- हे पांडुकुमारा अशी ही महानदी नर्मदा तीन लोकांनही रमणीय व पुण्य-
कारक आहे.

वटेश्वरेमहापुण्येगंगाद्वारेतपोवने ॥ ६९ ॥ एतेषुसर्व
स्थानेषुद्विजाःस्युःसंशितव्रताः ॥ श्रुतंदशगुणंपु
ण्यंनर्मदोदधिसंगमे ॥ ७० ॥

अर्थः- त्याच प्रमाणें महापुण्यकारक, वटेश्वर, गंगाद्वार व तपोवन त्या सर्व स्थानीं प्रशंसा योग्य व्रतें करणारे ब्राह्मण आहेत; आणि नर्मदेंतील सर्व तीर्थांपेक्षां नर्मदा व समुद्र यांच्या संगमीं दशगुणित पुण्य अधिक आहे असें मी श्रवण केलें आहे. इतिश्री मत्स्य पुराणे नर्मदा माहात्म्ये अमरेश्वर माहात्म्यं नाम पंचाशीत्युत्तर शततमोऽध्यायः

अध्याय १८६ वा.

मार्कंडेयउवाच॥ नर्मदातुनदीश्रेष्ठापुण्यात्पुण्यतमाहिता॥ मुनिभिस्तुमहाभागैर्विभक्तामोक्षकांक्षिभिः॥१॥

अर्थः- मार्कंडेय ह्मणतात हे धर्मराजा ही नर्मदानदी सर्व नद्यांत श्रेष्ठ असून पुण्य तीर्थांपेक्षांही अतिशयें पुण्यदायक व हितकारक नर्मदाच आहे यास्तव महाभाग्य संपन्न मोक्षेच्छु ऋषीनीं अनेक विचे विभाग केलेले आहेत.

यज्ञोपवीतमात्राणिप्रविभक्तानिपांडव॥ तेषुस्नात्वातुराजेंद्रसर्वपापैः प्रमुच्यते॥२॥

अर्थः- ते असे कीं, हे पांडवा त्या नर्मदेंत एका पुढें एक असे क्रमानें यज्ञोपवीत मात्र प्रदेशांवर तीर्थांचे विभाग केले आहेत; हे राजेंद्रा त्या तीर्थांत मानव स्नान करून सर्व पातकां पासून मुक्त होतो.

जलेश्वरंपरंतीर्थंत्रिषुलोकेषुविश्रुतं॥ तस्योत्पत्तिं कथयतःश्रृणुत्वंपांडुनंदन॥३॥

अर्थः- हे पांडुपुत्रा त्रैलोक्य प्रसिद्ध जलेश्वर नामक एक उत्कृष्ट तीर्थ आहे त्या तीर्थाची उत्पत्ति तूं मज पासून श्रवण कर.

पुरामुनिगणाःसर्वेसेंद्राश्चैवमरुद्गणाः॥ भयोद्विग्नाविरूपाक्षंपरित्रायस्वनःप्रभो॥४॥

अर्थः- पूर्वी ऋषींचे समुदाय व मरुद्गणां सहित इंद्रादिक देव हे सर्व ही भयानें उद्विग्न होऊन उग्रनयन शंकरास ह्मणतात हे प्रभो आमचें तुम्ही रक्षण करावें.

भगवानुवाच॥ स्वागतंतुसुरश्रेष्ठाःकिमर्थमिह

चागताः॥ किंदुःखंकोनुसंतापः कुतोवाभयमागतं॥५

अर्थः- असें त्यांचें भाषण ऐकून शंकर बोलतात देवश्रेष्ठहो तुह्मी आलां हें बहुत उत्तम जाहलें परंतु येथें तुह्मी कोणत्या कारणानें आलां अथवा तुह्मास कोणतें दुःख झालें किंवा काय संताप झाला व तुह्मास कोणापासून भय प्राप्त झालें.

कथयध्वंमहाभागाएवमिच्छामिवेदितुं॥ एवमुक्ता स्तुरुद्रेणाकथयन्संशितव्रताः॥६॥

अर्थः- तें सर्व समजण्या विषयीं मी इच्छितों यास्तव महाभाग्यशाली ऋषीहो तुह्मी हें सर्व कथन करा! असें शंकरानीं भाषण केलें असतां उत्तमव्रत निष्ठ ऋषी शिवास सांगतात.

ऋषयऊचुः॥ अतिवीर्योमहाघोरो दानवोबलदर्पितः बाणोनामेतिविख्यातोयस्यवैत्रिपुरंपुरं॥७॥

अर्थः- कीं हे शंकरा अतिपराक्रमी, महाभयंकर व बलानें उन्मत्त असून त्रिपुराचा स्वामी असा कोणी एक दानव बाणासुर या नामानें प्रसिद्ध आहे.

गगनेसततंदिव्यंभ्रमतेतस्यतेजसा॥ ततोभीता विरूपाक्षत्वामेवशरणंगताः॥८॥

अर्थः- त्या बाणासुराच्या तेजानें तें दिव्य त्रिपुर निरंतर आकाशांत भ्रमण करित आहे ह्मणून हे विरूपाक्षा शिवा आह्मी त्याच्या भीतीनें तुह्मास शरण आलों.

त्रायस्वमहतोदुःखात्त्वंहिनःपरमागतिः॥ एवं प्रसादंदेवेशसर्वेषांकर्तुमर्हसि॥९॥

अर्थः- यास्तव हे देवस्वामिन् शंकरा आपण या महादुःखा पासून आमचें रक्षण करा कारण तुह्मीच आह्मांस उत्कृष्ट गति देणारे आहां, तस्मात् आपण आह्मां सर्वांस प्रसन्न होण्या विषयीं योग्य आहां.

येनदेवाःसगंधर्वाःसुखमेधंतिशंकर॥ परांनिर्वृतिमायांतितत्त्वंप्रभोकर्तुमर्हसि॥१०॥

अर्थः- आणि हे शंकरा ज्या योगानें गंधर्वांसहित देव सुखानें वृद्धि-

गन होऊन परमानंद पावतील, असें कृत्य हे प्रभो आपण करण्यास यो-
ग्य आहां.

भगवानुवाच ॥ एतत्सर्वंकरिष्यामिमाविषादं
गमिष्यथ ॥ अचिरेणैवकालेनकुर्यांयुष्मत्सुखावह
हम् ॥११॥

अर्थ:- तेव्हां भगवान् शंकर बोलतात कीं, ऋषीहो तुमच्या प्रार्थने प्रमा-
णें तुम्हास सुखावह होण्याचें सर्व कृत्य मी अल्पकालानेंच करीन; तस्मा
त तुम्ही खिन्न होऊंनका.

आश्वास्यसतुतान्सर्वान्नर्मदातटमाश्रितः ॥ चिं
तयामासदेवेशस्तद्धर्मप्रतिमानद ॥१२॥

अर्थ:- हे साधुमानदायक धर्मराजा असें त्या सर्व देवादिकांस आश्वास-
न देऊन देवाधिदेव शंकर नर्मदा तीरीं जाऊन त्या दैत्याच्या वधा विषयीं वि-
चार करूं लागले.

अथकेनप्रकारेणहंतव्यंत्रिपुरंमया ॥ परंसंचिंत्य
भगवान्नारदंचास्मरत्तदा ॥ स्मरणादेवसंप्राप्तो
नारदःसमुपस्थितः ॥१३॥

अर्थ:- तो असा कीं मी कोणत्या रीतीनें त्रिपुरांचा नाश करावा असा ब-
हुत विचार करून त्या कालीं ऐश्वर्य संपन्न शंकरानीं नारदाचें स्मरण
करतांच ते नारद अग्रभागीं येऊन उभे राहिले.

नारदउवाच ॥ आज्ञापयमहादेवकिमर्थंचस्मृतो
ह्यहं ॥ किंकार्यंतुमयादेवकर्तव्यंकथयस्वमे ॥१४॥

अर्थ:- आणि शिवास विज्ञापना करितात कीं, हे महादेवा आपण माझें
स्मरण किमर्थ केलें, तेव्हां हे देवा मी तुमचें कोणतें कार्य करावें तें मला सांगा.

भगवानुवाच ॥ गच्छनारदतत्रैवयत्रतत्त्रिपुरंमह
त् ॥ बाणस्यदानवेंद्रस्यशीघ्रंगत्वाचतत्कुरु ॥१५॥

अर्थ:- तेव्हां भगवान भाषण करितात कीं, हे नारदा दानवश्रेष्ठ बाणासु-
राचें मोठें तें त्रिपुर नगर जेथें आहे, तेथें तूं त्वरित गमन करून माझे आज्ञे
प्रमाणें एक कार्य कर.

नाभर्तृदेवतास्तत्रस्त्रियश्चाप्सरसांसमाः॥ता
सांपैतेजसाविप्रभ्रमतेत्रिपुरंदिवि॥१६॥

अर्थ:- तें असें कीं, हे नारदा त्या त्रिपुरांतील स्त्रिया अप्सरां सारख्या असून पतीसच देव असें मानीत आहेत, यामुळें त्यांच्याच त्या पातिव्रत्य बलानें तें त्रिपुर आकाशांत भ्रमण करित आहे.

तत्रगत्वातुविप्रेंद्रमतिमन्यांप्रबोधय॥देवस्यवचनं
श्रुत्वामुनिस्त्वरितविक्रमः॥१७॥

अर्थ:- यास्तव हे विप्रश्रेष्ठा नारदा तूं त्या त्रिपुरांत जाऊन त्या पतिव्रता स्त्रियांस पातिव्रत्य धर्मावांचून इतर धर्मा विषयीं बुद्धि होण्या साठीं त्यांस बोध कर, असें शंकराचें भाषण ऐकून नारदमुनीनीं त्वरित गतीनें त्या त्रिपुरा समीप गमन केलें.

स्त्रीणांहृदयनाशायप्रविष्टस्तत्पुरंप्रति॥शोभतेत
त्पुरंदिव्यंनानारत्नोपशोभितं॥१८॥

अर्थ:- आणि ते नारद तेथील स्त्रियांचें अंतःकरण भ्रष्ट करण्या साठीं त्या पुरांत गेले, तें त्रिपुर अनेक प्रकारच्या रत्नानीं सुशोभित असून रमणीय असल्या मुळें अतिशयें शोभत होतें.

शतयोजनविस्तीर्णंततोद्विगुणमायतं॥ततोपश्य
त्स्थितंतत्रबाणंतुबलदर्पितं॥१९॥

अर्थ:- तसेंच तें नगर शतयोजनें रुंद असून त्याचें द्विगुणित लांब असून त्या पुरांत बलानें गर्विष्ठ अशा बाणासुरास नारदानीं पाहिलें.

मणिकुंडलकेयूरमुकुटेनविराजितं॥हारदोरसु
वर्णैश्चचंद्रकांतविभूषितं॥२०॥रशानातस्यरत्ना
द्याबाहूकनकमंडितो॥चंद्रकांतमहावज्रमणि
विद्रुमभूषिते॥२१॥द्वादशार्कद्युतिनिभेनिविष्टंप
रमासने॥उत्थितोनारदंदृष्ट्वादानवेंद्रोमहाबलः२२

अर्थ:- तें असें कीं, रत्नखचित कर्णकुंडलें, सुवर्णाचीं बाहुभूषणें, मुगुट, हार सुवर्णाचा गोफ चंद्रकांत मणी व कंबरेतील रत्न जडित कांची (करगोटा) यानीं सुशोभित असा तो बाणासुर, चंद्रकांत मणि, मोठे हिरे, रत्नें,

पोंवळीं यानीं जडित असून कांतीनें द्वादश सूर्यासारख्या तेजःपुंज उत्कृष्ट आसनावर बसलेला होता, त्या महाबलाढ्य दानवश्रेष्ठ बाणासुरानें नारदास पाहून प्रत्युत्थान दिलें.

बाण उवाच ॥ देवर्षेत्वंस्वयंप्राप्तोअर्घ्यंपाद्यंनिवेदये ॥ सोभिवाद्ययथान्यायंक्रियतांकिंद्विजोत्तम ॥२३॥

अर्थ- नंतर बाणासुर बोलतो कीं, हे देवर्षे (नारदा) आपण स्वतः आलां यास्तव मीं आपणास अर्घ्य, पाद्य समर्पण करितों असें बोलून त्यांस नमस्कार करून ह्मणतो कीं, हे द्विजश्रेष्ठा आपलें यथायोग्य कार्य मी काय करूं.

चिरात्त्वमागतोविप्रस्थीयतामिदमासनं ॥ एवंसंभाषयित्वातुनारदंऋषिसत्तमं ॥ तस्यभार्यामहादेवीह्यनौपम्यातुनामतः ॥२४॥

अर्थ- नंतर अनौपम्या नामें बाणासुराची मुख्य पट्टराणी त्या श्रेष्ठ नारद ऋषींस बोलली कीं, हे ब्राह्मणा आपण बहुत दिवसानीं प्राप्त झालां यास्तव या आसनावर बसावें असें संभाषण करून ती त्यांचे समीप उभी राहिली.

अनौपम्योवाच ॥ भगवन्केनधर्मेणदेवास्तुष्यंतिनारद ॥ व्रतेननियमेनाथदानेनतपसापिवा ॥२५॥

अर्थ- आणि ती अनौपम्या प्रश्न करिती कीं, हे भगवन् नारदा कोणत्या धर्मानें किंवा व्रतानें अथवा नियमानें दानानें व तपानें देव संतुष्ट होतात तें मला सांगा.

नारद उवाच ॥ तिलधेनुंचयोदद्याद्ब्राह्मणेवेदपारगे, ससागरवनद्वीपादत्ताभवतिमेदिनी ॥२६॥ सूर्यकोटिप्रतीकाशैर्विमानैःसार्वकामिकैः ॥ मोदतेसचिरंकालमक्षयंकृतशासनं ॥२७॥

अर्थ- ते समयीं नारद सांगतात कीं, जो वेदपारंगत ब्राह्मणास तिल धेनु दान करतो त्यास समुद्र वनें द्वीपें यांसहवर्तमान पृथ्वीदान केल्याचें फल प्राप्त होऊन त्या पुण्यानें तो कोटि सूर्यासमान तेजोमय असून सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या अनेक विमानांत बसून बहुकाल पर्यंत आनंद पावतो अशी शास्त्राची आज्ञा सत्य आहे.

आम्रामलकपित्थानिबदराणितथैवच ॥ कदंबचं
पकाशोकाननेकविविधद्रुमान् ॥२८॥ अश्वत्थपिप्प
लांश्चैवकदलीवटदाडिमान् ॥ पिचुमंदंमधूकंचउपो
ष्यस्त्रीददातिया ॥२९॥

अर्थ:- आणि आंबे, आंवळे, कवठें, बोरें, तसेच कळंब चंपक (चाफा) अशोक इत्यादिक अनेक प्रकारचे वृक्ष, अश्वत्थ, पिंपरी, केळी, वड, दाळिंब, निंब वृक्ष व मोहाचे वृक्ष यांचें दान उपोषण करून जी स्त्री करिते, तिला पुढें सांगितलेलीं तीं फळें प्राप्त होतात.

स्तनौकपित्थसदृशावूरूचकदलीसमौ ॥ अश्वत्थेवं
दनीयाचपिचुमंदेसुगंधिनी ॥३०॥ चंपकेचंपकाभा
स्यादशोकेशोकवर्जिता ॥ मधूकेमधुरंवक्तिवटेचमृ
दुगात्रिका ॥३१॥ बदरीसर्वदास्त्रीणांमहासौभाग्य
दायिनी ॥

अर्थ:- तीं अशीं कीं, जी स्त्री उपोषण करून आंबे आंवळे कवठें यांचें दान करते, तिचे स्तन कंवठा सारिखे होतात; आणि केळींचें दान केलें असतां मांड्या केळी सारख्या होतात; अश्वत्थाचें दान केल्यानें ती सर्वांनीं वंदन करण्यास योग्य होते; निंब वृक्ष दिला असतां अंगास सुगंध प्राप्त होतो; चंपकाच्या दानानें शरीर चाफ्या सारख्या पीतवर्ण शोभेनें युक्त होतें; अशोक दिल्यानें स्त्री शोकरहित होते; मोहवृक्षाच्या दानानें मधुर भाषण करणारी होते; व वटवृक्ष दिला असतां तिचें शरीर मृदु होतें; व बोरीचा वृक्ष दिल्यानें सर्वदा स्त्रियांस महत् सौभाग्य प्राप्त होतें.

कुक्कुटीकर्कटीचैवद्व्यष्टौनशस्यते ॥३२॥ कदंब
मिश्रकनकमंजरीपूजनंतथा ॥ अनग्निपक्कमन्नंचप
ञ्चानामभक्षणं ॥३३॥

अर्थ:- परंतु त्या दान करणाऱ्या स्त्रीनें कोंबडी खेकडी व भक्षण योग्य जे पांच नरवांचे प्राणी* त्यावांचून सहावा पांच नरवांचा प्राणी भक्षण करणें

---

* ससा साळशीत दोन जाति कांसव व घोरपड हे पांच नरवांचे पांच भक्षणास उक्त आहेत.

प्रशस्त नाहीं; तसेंच कळंबानें मिश्रित धत्तूराच्या (धोतरा) मंजरीनें देवपूजा करणें विहित नसून अग्नीवर पक्व न झालेलें अन्न व पक्वान्नें यांचें भक्षण करूं नये.

फलानांचपरित्यागःसंध्यामौनंतथैवच ॥ प्रथमंक्षेत्रपालस्यपूजाकार्याप्रयत्नतः ॥३४॥

अर्थ:- आणि फलांचा आहार न करितां संध्याकाळीं मौन धरून प्रयत्नानें पूर्वी क्षेत्रपालाची पूजा करावी.

तस्याभवतिवैभर्तासुखप्रेक्षः सदानघे ॥ अष्टमीच चतुर्थीचपंचमीद्वादशीतथा ॥३५॥ संक्रांतिविषुवश्चैवदिनच्छिद्रमुखंतथा ॥ एतांस्तु दिवसान्दिव्यानुपवासंतियास्त्रियः ॥ तासांतुधर्मयुक्तानांस्वर्गवासोनसंशयः ॥३६॥

अर्थ:- हे निष्पापे अशा सांगितलेल्या नियमानें वागणाऱ्या स्त्रीचा पति तिच्या मुखाकडे पाहून तिच्या मर्जी प्रमाणें सर्वदा वागतो आणि संक्रांति ज्या कालांत रात्रि व दिवस हे समान होतात तो काल, क्षय, वृद्धि, अशा उत्तम दिवशीं ज्या स्त्रिया उपोषण करितात त्या धर्मनिष्ठ स्त्रियांस स्वर्गवास प्राप्त होतो या विषयीं संशय नाहीं.

कलिकालुष्यनिर्मुक्ताः सर्वपापविवर्जिताः ॥ उपवासरतांनारींनोपसर्पतितांयमः ॥३७॥

अर्थ:- व त्या स्त्रिया कलिसंबंधीं कामक्रोधादिक दोष व सर्व पातकें यांतून मुक्त होतात; आणि त्या उपोषण करणाऱ्या स्त्रीच्या समीप यमही येऊं शकत नाहीं.

अनोपम्योवाच ॥ अस्मत्कृतेनपुण्येनपुराजन्मकृतेन वा ॥ भवदागमनंभूतंकिंचित्पृच्छाम्यहंव्रतम् ॥३८॥

अर्थ:- असें त्यांचें भाषण श्रवण करून ती अनोपम्या प्रश्न करिती अहो नारदा, आम्ही या जन्मांत किंवा पूर्वजन्मीं केलेल्या महत् पुण्यानें आपलें आगमन झालें यास्तव मी आपणास व्रता विषयीं किंचित् प्रश्न करितें.

अस्तिविंध्यावलिर्नामबलिपत्नीयशस्विनी ॥ श्वश्रू

र्ममापिविप्रेंद्रनतुष्यतिकदाचन॥३९॥

अर्थ- कारण अहो ब्राह्मणश्रेष्ठा नारदा, बळिराजाची स्त्री विंध्यावळी ती माझी सासू कीर्तिसंपन्न असून तिचें मन मजवर कधींही संतुष्ट असत नाहीं.

श्वशुरोपिसर्वकालंहृष्ट्वाचापिनपश्यति॥अस्तिकुंभीनसीनामननांदापापकारिणी॥४०॥दृष्ट्वानैवांगुलीभंगंसदाकालंकरोतिच॥दिव्येनतुपथायातिमम सौख्यंकथंवद॥४१॥

अर्थ- तसाच श्वशुरही सर्वकाळ मजकडे पाहून न पाहिल्या सारखें करतो; तशीच कुंभीनसी नामें माझी पापिष्ठ नणंद तर मला पाहून सर्वदा बोटें मोडती; तेव्हां आपण मला ज्या उत्तम मार्गानें सौख्य प्राप्त होईल असा एकादा उपाय सांगावा.

ऊषरेनप्ररोहंतिबीजंकुर्यात्कथंचन॥येनव्रतेनचीर्णेनभवंतिवशगाममम॥तद्व्रतंब्रूहिविप्रेंद्रदासभावंव्रजामिते॥४२॥

अर्थ- कारण जसें उखर भूमीमध्यें कोणीही बीज पेरीत नाहींत तसें श्वशुरादिकांच्या अहिताचरणा विषयीं प्रवृत्त होऊं नये याकरितां ज्या व्रतानें हे श्वशुरादिक मला अनुकूल होतील असें व्रत अहो ब्राह्मणश्रेष्ठा मला कथन करा ह्मणजे मी तुमची दासी होईन.

नारदउवाच॥यदेतत्तेमयापूर्वंव्रतमुक्तंशुभानने॥अनेनपार्वतीदेवीचीर्णेनवरवर्णिनि॥४३॥शंकरस्यशरीरस्थाविष्णोर्लक्ष्मीस्तथैवच॥सावित्रीब्रह्मणश्चैववसिष्ठस्याप्यरुंधती॥४४॥एतेनोपोषितेनेहभर्तास्यास्यतितेवशे॥श्वश्रूश्वशुरयोश्चैवमुखबधोभविष्यति॥४५॥

अर्थ- तेव्हां नारद सांगतात. हे उत्तमवर्णशोभित सुंदरमुखि मी पूर्वी जें व्रत तुला सांगितलें तें व्रत तूं आचरण कर, ह्मणजे तेणेंकरून शंकराच्या शरीरीं राहणारी पार्वती, तसीच विष्णूची लक्ष्मी, ब्रह्मदेवाची सावित्री व वसिष्ठाची अरुंधती त्या देवता अनुकूल होतील; आणि त्या उपोषणानें या लोकीं तुझा

पति स्वाधीन होऊन तुझ्या श्वशुरादिकांचें सुख बंद होईल.

एवंश्रुत्वातुसुश्रोणियथेष्टंकर्तुमर्हसि ॥ नारदस्य वचः श्रुत्वाराज्ञीवचनमब्रवीत् ॥ ४६ ॥

अर्थ- हे सुंदरकटि हें माझें भाषण श्रवण करून तू आपलें जें इष्ट असेल त्या साठीं हें व्रत करण्यास योग्य आहेस, असें नारदांचें वचन ऐकून ती अनौपम्या राज पत्नी वाक्य बोलली.

प्रसादंकुरुविप्रेंद्रदानंग्राह्यंयथेप्सितं ॥ सुवर्णमणिरत्नानिवस्त्राण्याभरणानिच ॥ ४७ ॥ नवदास्याम्यहं विप्रयच्चान्यदपिदुर्लभं ॥ प्रगृहाणद्विजश्रेष्ठप्रीयेतां हरिशंकरौ ॥ ४८ ॥

अर्थ- कीं, हे विप्रश्रेष्ठा, आपण मजवर दया करून सुवर्ण, चंद्रकांतादिक मणि, नवरत्नें, वस्त्र, भूषणें व यांहूनही इतर दुर्लभ वस्तु यांचें दान मज पासून यथेच्छ ग्रहण करावें ह्मणजे तेणें करून विष्णु व शंकर हे मला प्रसन्न होतील.

नारद उवाच ॥ अन्यस्मैदीयतांभद्रेक्षीणवृत्तिस्तुयोद्विजः ॥ अहंतुसर्वसंपन्नोमद्भक्तिःक्रियतामिति ॥ ४९ ॥

अर्थ- ते समयीं नारद बोलले हे कल्याणि जो ब्राम्हण वृत्तिहीन असेल अशा इतर ब्राह्मणास दे कारण मी तर सर्व संपत्तीनीं संपन्न आहे यास्तव तूं माझी भक्तिमात्र कर.

एवंतासांमनोहृत्वासर्वासांतुपतिव्रताः ॥ जगामभरतश्रेष्ठस्वकीयंस्थानकंपुनः ॥ ५० ॥

अर्थ- असें बोलून हे भरतकुलश्रेष्ठा धर्मराजा त्या त्रिपुरांतील सर्व स्त्रियांमध्यें ज्या पतिव्रता होत्या त्यांचें मन हरण करून ते नारद पुनः आपल्या पूर्वस्थानास गेले.

ततोथ्यदुष्टहृदयाअन्यतोगतमानसा ॥ पुरेच्छिद्रंसमुत्पन्नंबाणस्यतुमहात्मनः ॥ ५१ ॥

अर्थ- नंतर त्या अनौपम्या नामक बाणासुराच्या स्त्रीचें अंतःकरण गुरुरीतीनें पती वांचून अन्यत्र आसक्त झालें, असें त्या महाधैर्य युक्त बा-

णा स्करान्च्या नगरांत छिद्र उत्पन्न झालें. इतिश्री मत्स्य पुराणे अमरेश्वर माहात्म्यं नाम षडशी त्युत्तर शततमोऽध्यायः १९६

अध्याय १९७ वा.

मार्कंडेयउवाच ॥ यन्मांपृच्छसिकौंतेयतन्मेकथय
तः शृणु ॥ एतस्मिन्नंतरेरुद्रोनर्मदातटमाश्रितः ॥ १ ॥

अर्थ:- मार्कंडेय ह्मणतात हे कुंतीपुत्रा तूं जो मला प्रश्न केलास त्याचें उत्तर मी तुला सांगतों तें श्रवण कर. तें असें कीं, शंकर नारदास बाणास्कराच्या पुरांत पाठवून त्या संधींत आपण नर्मदा तीराचा आश्रय करून राहिले.

नाम्नामरेश्वरंस्थानंत्रिषुलोकेषुविश्रुतं ॥ तस्मिं
स्थानेमहादेवोचिंतयत्त्रिपुरेवधं ॥ २ ॥

अर्थ:- तेथें त्रैलोक्य प्रख्यात अमरेश्वर नामक स्थान आहे त्या स्थानीं राहून महादेव त्रिपुराचा नाश कसा करावा हें चिंतन करूं लागले.

गांडीवंमंदरंकृत्वागुणंकृत्वाचवास्ककिं ॥ स्थानंकृ
त्वातुदेवेशाःस्वंविष्णुंकृत्वाशरोत्तमं ॥ ३ ॥ शल्येचा
ग्निंप्रतिष्ठाप्यमुखेवायुंसमर्पयन् ॥ हयांश्चचतुरोवे
दान्सर्वदेवमयंरथं ॥ ४ ॥ अश्विनौदेवाव
क्षोवज्रधरः स्वयं ॥ सतस्याज्ञांसमादायतोरणेधन
दः स्थितः ॥ ५ ॥ यमस्कंदक्षिणेहस्तेवामेकालस्क
दारुणः ॥ चक्रेत्वमरकोत्थस्कगंधर्वलोकविश्रुताः
६ ॥ प्रजापतीरथश्रेष्ठेब्रह्माचैवतुसारथिः ॥ एवंकृ-
त्वातुदेवेशःसर्वदेवमयंरथं ॥ ७ ॥ सोतिष्ठत्स्थाणुभू
तस्कसहस्त्रपरिवत्सरान् ॥

अर्थ:- तेव्हां त्या महादेवानीं मंदराचलाचें गांडीव धनुष्य करून त्यास वास्कीची दोरी केली तसाच कार्तिकस्वामी बसावयाच्या स्थानीं योजून उत्कृष्ट बाणांत विष्णूस योजिलें; आणि शल्यांत अग्नीस स्थापन करून पुरवांत वायूस स्थापिलें, तसेच सर्व देव रथस्थानीं योजून त्या रथास चार वेद हे अश्व, अश्विनीकुमार हे त्या घोड्यांच्या काहाडण्यावत्या रथाचाकणा वज्रधारी स्वयें इंद्र अशा यांची योजना केली; शंकराच्या आज्ञेनें त्या रथाच्या तोरणावर

कुबेर बसला. त्या रथाच्या उजवे बाजूस यम व डावेबाजूस क्रूर काल यांस बसविलें, त्या रथाच्या चक्रावर कोटि देवगण व लोक प्रख्यात गंधर्व हे योजले, त्याच प्रमाणें त्या श्रेष्ठ रथावर दक्षप्रजापति योजिला व ब्रह्मदेव त्या रथावर सारथि झाले. या प्रमाणें देवांचे स्वामी शंकर यानीं तो सर्व देवमय रथ करून त्यांत आपण अचंचल स्थितीनें सहस्र वर्षपर्यंत बसून राहिले.

यदात्रीणिसमेतानि अंतरिक्षेस्थितानिवै ॥ ८ ॥ त्रिपर्वा
णात्रिशल्येनतदातानिव्यभेदयत् ॥

अर्थ- नंतर ज्या कालीं तीं तिन्हीं पुरें अंतरिक्षांत एकत्रस्थानीं मिळून राहिलीं त्या कालीं शंकरानीं तीन अग्रांच्या बाणानें त्या तीन पुरांचा एककालीं भेद केला.

शरःप्रचोदितस्तेनरुद्रेणात्रिपुरंप्रति ॥ ९ ॥ त्रस्तते
जास्त्रियोजाताबलंतासांव्यशीर्यत ॥ उत्पाताश्चपुरे
तस्मिन्प्रादुर्भूताःसहस्रशः ॥ १० ॥

अर्थ- तो असा कीं, जेव्हां शिवानीं त्रिपुरावर बाण सोडिला तेव्हां त्यांतील स्त्रिया निस्तेज होऊन त्यांचें बल क्षीण झालें, आणि त्या पुरांत सहस्रावधि उत्पात होऊं लागले.

त्रिपुरस्यविनाशायकालरूपाभवंस्तदा ॥ अट्टहा
संप्रमुंचंतिहयाःकाष्ठमयास्तदा ॥ ११ ॥

अर्थ- ते असे कीं, त्या कालीं ते उत्पात त्रिपुराच्या नाशार्थ काला सारखे भयंकर प्रगट झाले व त्याकालीं काष्ठाचे घोडे मोठ्यानें शब्द करूं लागले.

निमेषोन्मेषणंचैवकुर्वंतेचित्ररूपिणः ॥ स्वप्नेपश्यं
तिचात्मानंरक्तांबरविभूषितं ॥ १२ ॥

अर्थ- आणि चित्रांतील घोडे व हत्ती इत्यादिक चित्रें पापण्यांची उघड झाप करूं लागले व तेथील दैत्य आपणांस स्वप्नांत आरक्त वस्त्रानीं भूषित आहों असें पाहूं लागले.

स्वप्नेतुसर्वेपश्यंतविपरीतानियानितु ॥ एतान्प-
श्यंतउत्पातांस्तत्रस्थास्तेतुयेजनाः ॥ १३ ॥

अर्थ- असे त्या त्रिपुरांतील सर्व लोक स्वप्नांत जीं उत्पात सूचक विपरीत

चिन्हें तीं सर्व स्वप्नांत पहात असून त्या भगरांतच होते.

तेषांबलंच बुद्धिश्च हरकोपेननाशिते ॥ ततःसांवर्तकोवायुर्युगांतप्रतिमोमहान् ॥ १४ ॥ समीरितोनलस्तेनउत्तमांगेनधावति ॥ ज्वलंतिपादपास्तत्रपतंति शिखराणिच ॥ १५ ॥

अर्थ- नंतर शंकराच्या कोपानें त्यांचें बल व बुद्धि हीं दोन्हीं नाश पावलीं. पश्चात् प्रलया समान महान् वायु उत्पन्न झाला. त्या वायूनें प्रदिंगत केलेला अग्नि आपल्या ज्वालानीं चहूंकडे धावूं लागला, तेव्हां तेथील वृक्ष दग्ध होऊन शिखरें पडूं लागलीं.

सर्वतोव्याकुलीभूतंहाहाकारमचेतनं ॥ भग्नोद्यानानिसर्वाणिक्षिप्रंतत्प्रत्यभज्यत ॥ १६ ॥

अर्थ- तेव्हां ते त्रिपुरवासी जन चहूंकडून त्या अग्नीनें व्याकुल झाल्याने निश्चेष्ट होऊन हाहाकार करूं लागले. आणि सर्व क्रीडावनें भग्न होऊन तें पुर मोडून पडलें.

तेनैवपीडितंसर्वंज्वलितंत्रिशिखैः शरैः ॥ द्रुमाश्चारामखंडानिगृहाणिविविधानिच ॥ १७ ॥

अर्थ- ते समयीं त्या तीन अग्रांच्या बाणां पासून उत्पन्न झालेल्या अग्नीनें तें सर्व नगर पीडित होऊन दग्ध झालें, तसेच त्या पुरांतील वृक्ष, बागा व अनेक प्रकारचीं मंदिरें हीं दग्ध झालीं.

दशादिक्षुप्रवृत्तोयंसमृद्धोहव्यवाहनः ॥ मनःशिलानांपुंजानिदिशोदशविभागशः ॥ १८ ॥

अर्थ- अशा त्या दशादिशा व्यापून प्रदिंगत झालेल्या अग्नीनें दाही दिशांतील मनशीळांचे समुदाय प्रदीप्त झाले.

शिखाशतैरनेकैस्तुप्रजज्वालहुताशनः ॥ सर्वंकिंशुकवर्णाभंज्वलितं दृश्यतेपुरं ॥ १९ ॥

अर्थ- असा अनेक प्रकारच्या शतावधि ज्वालानीं तो अग्नि प्रदीप्त झाला असतां त्या योगानें प्रज्वलित झालेलें तें संपूर्ण त्रिपुर पळसाच्या रंगा सारखें दिसूं लागलें.

गृहाद्गृहांतरंनैवगंतुंधूमेनशक्यते ॥ हरकोपानलै दग्धंक्रंदमानंसुदुःखितं ॥२०॥

अर्थ- नंतर त्या त्रिपुरांत धुराच्या योगानें कोणीही एका घरांतून दुसऱ्या घरीं जाण्यास समर्थ नाहीं असें झालें, आणि शंकराच्या कोपाग्नीनें तें त्रिपुर दग्ध झाल्या मुळें ते दानव अत्यंत दुःखित होऊन आक्रोश करूं लागले.

प्रदीप्तंसर्वतोदिक्षुदह्यतेत्रिपुरंपुरं ॥ प्रासादशिखराग्राणिव्यशीर्यंतसहस्रशः ॥२१॥

अर्थ- असें तें त्रिपुर नामक नगर सर्व दिशांत अग्नीनें दग्ध होत असतां त्या मुळें, देव व राजे यांचे मंदिरांच्या शिखरांचीं सहस्रावधि अग्रें खालीं पडूं लागलीं.

नानामणिविचित्राणिविमानान्यप्यनेकधा ॥ गृहाणिचैवरम्याणिदह्यंतेदीप्तवन्हिना ॥२२॥

अर्थ- आणि त्या प्रज्वलित अग्नीनें अनेक रत्नखचित विचित्र विमानें व नाना प्रकारचीं रमणीय मंदिरें हीं दग्ध होऊं लागलीं.

धावंतिद्रुमखंडेषुवल्मीषुतथाजनाः ॥ देवागारेषु सर्वेषुप्रज्वलंतःप्रधाविताः ॥२३॥

अर्थ- तेव्हां तेथील लोक त्या अग्नीच्या दाहानें व्यथा पावले असतां ते जनांचे समुदाय, घरांच्या वळचणी व सर्व देवालयें या स्थानीं धावूं लागले.

क्रंदंतिचानलस्पृष्टारुदंतिविविधैःस्वरैः ॥ दह्यंते दानवास्तत्रशतशोथसहस्रशः ॥२४॥

अर्थ- आणि त्या त्रिपुरांतील शतशः सहस्रावधि दानव त्या अग्निस्पर्शानें पीडित झाले असतां, ते आक्रोश पूर्वक अनेक स्वरानीं रुदन करूं लागले.

हंसकारंडवाकीर्णानलिन्यःसहपंकजाः ॥ दृश्यंतेनलदग्धानिपुरोद्यानानिदीर्घिकाः ॥२५॥ अम्लानपंकजच्छन्नाविस्तीर्णायोजनायताः ॥ गिरिकूटनिभास्तत्रप्रासादारत्नभूषिताः ॥२६॥ पतंत्य नलनिर्दग्धा निस्तोयाजलदाइव ॥

अर्थ- तसेंच हंस व कारंडव या पक्ष्यांनीं व्याप्त असून प्रफुल्लित कमलयुक्त येली, त्या त्रिपुरांतील क्रीडावनें कदापि म्लान न होणाऱ्या कमलांनीं आच्छादित असून एक योजन लांब अशा विशाल विहिरी व पर्वत शिखरां समान उंच तेथील रत्नखचित देवालयें व राजमंदिरें हीं सर्वही त्या अग्नीनें दग्ध होऊन खालीं निर्जल मेघा सारिखींच काय पडलेलीं दिसूं लागलीं.

वरस्त्रीबालवृद्धेषुगोषुपक्षिषुवाजिषु ॥ २७ ॥ नि
र्दयोव्यदहद्वन्हिर्हरक्रोधेनप्रेरितः ॥

अर्थ- त्याच प्रमाणें तेथील उत्तम स्त्रिया, बाल, वृद्ध, गायी, पक्षी व अश्व यांस तो शिवाच्या क्रोधानें प्रदीप्त जाहलेला अग्नि निर्दय होऊन जाळूं लागला.

सहस्रशः प्रबुद्धाश्वसुप्ताश्वबहुयोजनाः ॥ २८ ॥ पु
त्रमालिंग्यतेगाढंदह्यंतेत्रिपुराग्निना ॥

अर्थ- तसेंच त्या त्रिपुरांतील जागृत झालेले व निद्रित जाहलेले असे सहस्रावधि बहुत लोक आपले पुत्रांस दृढ आलिंगन करून त्या त्रिपुर दाहक अग्नीनें दग्ध होऊं लागले.

अथतस्मिन्पुरेदीप्तेस्त्रियश्चाप्सरसोपमाः ॥ २९ ॥
अग्निज्वालाहतास्तत्रव्यपतन्धरणीतले ॥

अर्थ- तसेंच तें पुर अग्नीनें प्रज्वलित जाहलें असतां तेथील स्त्रिया अप्सरा समान सुंदर असून त्या अग्नीच्या ज्वालांनीं पीडित होऊन पृथ्वीतलावर पडूं लागल्या.

काचिच्छ्यामाविशालाक्षीमुक्तावलिविभूषिता ॥
३० ॥ धूमेनाकुलितासातुपतिताधरणीतले ॥

अर्थ- आणि कोणी एक मोत्यांच्या माळेनें सुशोभित सोळा वर्षांची कमलनयना तरुण स्त्री त्या अग्नीच्या धुरानें व्याकुल होऊन धरणीवर पडली.

काचित्कनकवर्णाभाइंद्रनीलविभूषिता ॥ ३१ ॥ भ
र्तारंपतितंदृष्ट्वापतितातस्यचोपरि ॥

अर्थ- तशीच कोणी एक सुवर्णासमान कांतीनें युक्त असून इंद्रनील मण्यानीं अति सुशोभित अशी स्त्री आपला पति पडला असें पाहून तीत्याचे अंगावर पडली.

काचिदादित्यसंकाशा प्रमुक्ताचगृहेस्थिता ॥ ३२ ॥
अग्निज्वालाहतासातुपतितागतचेतना ॥

अर्थ- कोणी एक सूर्यासारखी तेजःपुंजस्त्री स्वजनानीं सोडिली असतां, ती घरांत असून त्या अग्नीच्या ज्वालानीं पीडित होऊन गतप्राण होत्साती भूमीवर पडली.

उत्थितोदानवस्तत्रखड्गहस्तोमहाबलः ॥ ३३ ॥ वैश्वानरहतःसोपिपतितोधरणीतले ॥

अर्थ- तसाच त्या त्रिपुरांतील एक महाबलाढ्य खड्गधारी दानव उठून उभा राहिला; परंतु तोही त्या अग्नीनें पीडित झाला असतां पृथ्वीवर पडला.

मेघवर्णापरानारीहारकेयूरभूषिता ॥ ३४ ॥ श्वेतरूपधरानारीबालस्तन्यंन्यधापयत् ॥ दह्यंतंबालकं दृष्ट्वारुदतेमेघशब्दवत् ॥ ३५ ॥

अर्थ- तशीच सजल मेघासमान कृष्णवर्ण असून हार व बाजूबंद यानीं सुशोभित अशी दुसरी कोणी एक स्त्री व कोणी एक गोरवर्णस्त्री या उभयतां आपल्ले पुत्रांस स्तनपान करवीत असतां, आपल्ले बालकांस तो अग्नि दग्ध करूं लागला असें पाहून त्या मेघगर्जना सारख्या शब्दानें रुदन करूं लागल्या.

एवंसतुदहन्नग्निर्हरक्रोधेनप्रेरितः ॥ काचिच्चंद्रप्रभासौम्यावज्रवैडूर्यभूषिता ॥ ३६ ॥ सुतमालिंग्यवेपंतीदग्धापततिभूतले ॥

अर्थ- असा तो अग्नि शिवांच्या क्रोधानें इङ्गिंगत होऊन त्या त्रिपुरांस दग्ध करीत असतां चंद्रासमान सौम्य कांतीनें युक्त असून हिरे व वैडूर्य मणि यानीं सुशोभित कोणी एक स्त्री आपल्ले पुत्रास आलिंगन करून थरथरां कांपत अग्नीनें दग्ध होऊन भूतलावर पडली.

काचित्कुंदेंदुवर्णाभायाशयानागृहेस्थिता ॥ ३७ ॥

गृहे प्रज्वलिते सा तु प्रतिबुद्धा सुदुःखिता ॥

अर्थ- तशीच कोणी एक स्त्री कुंद पुष्प किंवा चंद्र यां समान सौम्य कांतियुक्त असून ती निद्रावश झाल्यामुळें स्वगृहीं असून तें घर अग्नीनें प्रज्वलित झालें असतां ती जागृत होऊन त्या अग्निबाधेनें अत्यंत दुःख पावली.

पश्यंती ज्वलितं सर्वं सुस्तो मे दिवंगतः ॥ ३८ ॥ सुतं संदग्धमालिंग्य पतिता धरणीतले ॥

अर्थ- आणि दुसरी कोणी एक स्त्री आपलें सर्व गृहादिक अग्नीनें दग्ध झालेलें पाहून माझा साक्षात् पुत्र स्वर्गासि गेला, असें बोलून त्या दग्ध झालेल्या पुत्रास आलिंगन करून ती पुत्र शोकानें मूर्छित होऊन भूमीवर पडली.

काचित्सुवर्णवर्णाभा नीलरत्नैर्विभूषिता ॥ ३९ ॥ धूमेनाकुलिता सा तु पतिता धरणीतले ॥

अर्थ- तशीच कोणी एक स्त्री सुवर्णा समान कांतियुक्त पीत वर्णानें संपन्न असून नीलमणि आदि करून अनेक रत्नानीं सुशोभित असून ती धुरानें व्याकुल होऊन पृथिवीवर निजली.

अन्या गृहीतहस्ता तु सखि दह्यति बालिकां ॥ ४० ॥ अनेकदिव्यरत्नाढ्या हस्ता दहनमोहिता ॥ शिरसि त्वंजलिं कृत्वा विज्ञापयति पावकं ॥ ४१ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें दुसरी कोणी एक स्त्री अनेक दिव्य रत्नानीं संपन्न असून त्या अग्नीच्या योगानें भयभीत जाहली आणि आपल्या कन्येस पाहून सखीचा हात धरून बोलली कीं हे सखि हा अग्नि माझ्या कन्येस दग्ध करित आहे असें सखीस सांगून त्या कालीं ती मस्तकावर हात जोडून त्या अग्नीस प्रार्थना करूं लागली.

भगवन्यदि वैरं ते पुरुषेष्वपकारिषु ॥ स्त्रियः किमपराधं ते गृहपंजरकोकिलाः ॥ ४२ ॥

अर्थ- कीं हे भगवन् अग्निदेवा तुला अपकार करणाऱ्या या पुरुषांवर तुझी वैर बुद्धि असणें हें युक्तच आहे, परंतु पिंजऱ्या समान घरांतील कोकिलां सारख्या स्त्रियानीं तुझा काय अपराध केला आहे.

पापनिर्दयनिर्लज्ज कस्ते कोपस्त्रियः प्रति ॥ नदाक्षि
ण्यंनतेलज्जानसत्यंशौर्यवर्जित ॥ ४३ ॥ अनेनस्वरूप
सर्गेणितूपालंभंशिखिन्यदात् ॥

अर्थ- आणि हे अग्ने तूं पापि जनां विषयीं निःशंकपणानें निर्दय आहेस, असें असून तुझा कोप या काळीं स्त्रियांवर किमर्थ चालला आहे, तस्मात् हे शौर्यहीना तुला दाक्षिण्य (चातुर्य) लज्जा व सत्यही नाहींत म्हणून तूं आह्मांस आपल्या ज्वालांनीं उपद्रव देत आहेस, अशी ती अग्नीची निंदा करूं लागली.

किंत्वयानश्रुतंलोकेत्ववध्याः शत्रुयोषितः ॥ ४४ ॥
किंतुतुभ्यंगुणात्येतेदहनोत्सादनंप्रति ॥

अर्थ- तसेच हे अग्ने कोणी शत्रु असले तरी त्यांच्या स्त्रियांचा वध करूं नये हें तूं श्रवण केलें नाहींस काय? या मुळेंच हे अग्ने दीन जनांचा नाश न करण्याचे गुण तुझे अंगीं नाहींत.

नकारुण्यंदयावापिदाक्षिण्यंनस्त्रियःप्रति ॥ ४५ ॥
दयांकुर्वतिम्लेच्छापिदहंतीवीक्ष्ययोषितं ॥

अर्थ- आणि एकादी स्त्री कोणत्याही दुःखानें पीडित झाली असतां तिला पाहून यवनही दया करितात, परंतु हे अग्ने तुला दीन स्त्रियां विषयीं कारुण्य, दया व भीड हीं सर्वथा नाहींत हें काय?

म्लेछानामपिकष्टोसिदुर्निवारोह्यचेतनः ॥ ४६ ॥
एतेचैवगुणास्तुभ्यंदहनोत्सादनंप्रति ॥

अर्थ- हे अग्ने तुला हे लोकसंहारक गुण असल्या वरून तूं यवनांपेक्षांही दुःखदायक असून अति दुर्धर कठोर चित्तयुक्त आहेस.

असावपिदुराचारः स्त्रीणांकिंतेनिपातने ॥ ४७ ॥
दुष्टनिर्घृणनिर्लज्जहुताशिन्मंदभाग्यक ॥ निरा
शस्त्वंदुरावासबलाद्दहसिनिर्दय ॥ ४८ ॥

अर्थ- तस्मात् हे दयाहीन अग्ने तूं दुष्टावर निर्दयपणा करण्या विषयीं निःशंक असून होम केलेल्या सर्व पदार्थांचें भक्षण करित असल्या मुळें मंद भाग्य आहेस, आणि तूं सर्वांची निराशा करणारा असून स्मशानादिक

अपवित्र स्थानांत वास करीत आहेस.

एवंविलप्यमानास्ता जल्पंत्यश्चबहून्यपि॥अ
न्याः क्रोशंतिसंक्रुद्धाबालशोकेनमोहिताः॥४९॥
दहतेनिर्दयोवन्हिः संक्रुद्धः पूर्वशत्रुवत्॥

अर्थ- या प्रमाणें त्रिपुरांतील त्या स्त्रिया विलाप करीत असतां, बहुत निंद्य भाषणें करित होत्या तश्याच दुसऱ्याही स्त्रिया बालकांच्या शोकानें मोहित होऊन अत्यंत क्रुद्ध होत्सात्या मोठ्यानें आक्रोशपूर्वक भाषण करूं लागल्या कीं; हा निर्दय अग्नि एकाद्या पुरातन शत्रू सारखा रुष्ट होऊन आह्मा सर्वांस जाळीत आहे.

पुष्करिण्यां जलंदग्धं कूपेष्वपि तथैवच॥५०॥अ
स्मान्संदह्यम्लेच्छत्वंकांगतिंप्रापयिष्यसि॥एवं
प्रलपतांतासांवन्हिर्वचनमब्रवीत्॥५१॥

अर्थ- तसेंच हे अग्ने त्वां लहान सरोवरें व कूप इत्यादिकांतील उदक शोषिलें, आणि आतां हे यवन समान निर्दया तूं आह्मास दग्ध करून कोणत्या गतीस नेत आहेस, अशीं बहुत अवाच्य भाषणें करणाऱ्या त्या स्त्रियांस तो अग्नि हें पुढील वाक्य बोलतो.

अग्निरुवाच॥स्ववशोनैवयुष्माकंविनाशंतुकरो
म्यहं॥अहमादेशकर्तावैनाहंकर्तास्म्यनुग्रहं॥५२
रुद्रक्रोधसमाविष्टोविविशामियथेच्छया॥

अर्थ- कीं, स्त्रियानो मी आपल्या स्वतंत्रतेनें तुमचा नाश करीत नाहीं, तर मी या काळीं शिवांचा आज्ञाधारक आहे, यास्तव मी सांप्रत तुह्मांवर अनुग्रह करण्यास समर्थ नाहीं; आणि प्रस्तुत मी शंकरांच्या क्रोधानें अतिशयें व्याप्त झाल्या मुळें यथेच्छ सर्वत्र प्रवेश करीत आहें.

ततोबाणोमहातेजास्त्रिपुरंवीक्ष्यदीपितं॥५३॥
सिंहासनस्थः प्रोवाचत्वहदेवैर्विनाशितः॥अ
ल्पसत्वैर्दुराचारैरीश्वरस्यनिवेदितं॥५४॥

अर्थ- नंतर तो सिंहासनस्थित महा तेजस्वी बाणासुर आपलें त्रिपुर अग्नीनें प्रदीप्त झालें असें पाहून बोलला कीं, दुराचारी असून अल्प धैर्य-

युक्त अशा देवानीं शंकरास मजविषयीं कांहीं विपरीत समजाविल्या वरून शिवानीं माझा नाश केला.

अपरीक्ष्य त्वहं दग्धः शंकरेण महात्मना ॥ नान्यः शक्तस्तु मां हन्तुं वर्जयित्वा त्रिलोचनं ॥ ५५ ॥

अर्थ:- परंतु शंकर महाबुद्धिमंत असून त्यानींच परीक्षा केल्या वांचून माझें त्रिपुर दग्ध केलें, कारण त्या त्रिनेत्र शंकरा वांचून माझा नाश करण्या विषयीं कोणीही समर्थ नाहीं.

उत्थितः शिरसा कृत्वा लिंगं त्रिभुवनेश्वरं ॥ निर्गतः स पुरद्वारात् परित्यज्य सुहृत्सुतान् ॥ ५६ ॥

अर्थ:- असें भाषण करून तो बाणासुर आपलें तेथील त्रिभुवनेश्वर नामक शिवलिंग मस्तकावर घेऊन उठला, आणि स्वकीय मित्र आस व पुत्र यांस सोडून त्या त्रिपुराच्या द्वारांतून बाहेर निघाला.

रत्नानि यान्यनर्घाणि स्त्रियो नानाविधास्तथा ॥ गृहीत्वा शिरसा लिंगं गच्छन् गगनमंडलं ॥ ५७ ॥ स्तुवंश्च देवदेवेशं त्रिलोकाधिपतिं शिवं ॥ त्यक्ता पुरी मया देव यदि वध्योस्मि शंकर ॥ ५८ ॥

अर्थ:- ते समयीं तो बाणासुर आपले समागमें अमोलिक अनेक रत्नें व नाना प्रकारच्या स्त्रियांस घेऊन मस्तकावर शिवलिंग धारण करून आकाश मार्गानें जात असतां, त्रैलोक्यनाथ देवाधिदेव शंकरांची स्तुति करीत असून त्यांस विज्ञापना करितो कीं, हे महादेवा या कालीं मी वधास योग्य झालों आहें तर मी या त्रिपुरांचा आतां त्याग केला.

त्वत्प्रसादान्महादेव मा मे लिंगं विनश्यतु ॥ अर्चितं हि मया देव भक्त्या परमया सदा ॥ ५९ ॥

अर्थ:- नंतर माझा वध झाला तरी चिंता नाहीं, परंतु माझ्या या शिवलिंगाचा नाश न व्हावा कारण, मी निरंतर भक्तीनें पूजा करीत असतों.

त्वत्कोपाद्यदि वध्योहं तदिदं मा विनश्यतु ॥ श्लाघ्यमेतन्महादेव त्वत्कोपाद्दहनं मम ॥ ६० ॥

अर्थ:- यास्तव तुमच्या कोपानें माझा वध झाला तरी या शिवलिंगा-

चा नाश न होवो, आणि हे महादेवा मी अपराधी असल्यामुळें तुमच्या रोषानें माझा वध होणें हें युक्तच आहे.

प्रतिजन्ममहादेवत्वत्पादनिरतोस्त्यहं ॥ त्रोटकच्छंदसा देवं स्तोमि त्वां परमेश्वर ॥ ६१ ॥

अर्थः- परंतु आपणांस माझी प्रार्थना इतकीच आहे कीं, मी प्रतिजन्मीं तुमच्या चरण कमलां विषयीं प्रीतीनें तत्पर भक्त होईन अशी आपण मजवर कृपा दृष्टि करावी, एतदर्थ आतां मी त्रोटक* नामक छंदानें आपली स्तुति करितों.

शिवशंकरशर्वहरायनमोभवभीममहेश्वरशर्वनमः ॥ कुसुमायुधदेहविनाशकरत्रिपुरांतकअंधकशूलधर ॥ ६२ ॥

अर्थः- ती अशी कीं, हे महादेवा आपण स्वतः कल्याणरूप असून शरणागत भक्तांचें कल्याण करणारे आहां, तसेच आपण दुष्टांचा संहार करून भक्तांचीं संकटें व पातकें हरण करतां, आणि तुह्मी शरणागतांच्या संसार भयासही भयंकर महाशास्ते असल्यामुळें त्यांच्या त्या भव भीतीचा नाश करणारे आहां, त्याच प्रमाणें तुह्मी पुष्पबाणधारी मदनाचा देह व त्रिपुरासुर यांचें भस्म करून अंधकासुरावर त्याच्या नाशार्थ त्रिशूल धारण करतां, अशा तुह्मां देवास मी नमस्कार करतों.

प्रमदाप्रियकांतविभक्तनमःसुरासुरसिद्धगणैर्नमित ॥ हयवानरसिद्धगजेंद्रमुखवादतिभास्वद्दीर्घविशालमुख ॥ ६३ ॥

अर्थः- हे शंकरा जे लोक स्त्रियांवर प्रीति करतात ते विशेषें करून तुमची सेवा करतात, आणि देव, असुर व सिद्धगण हे आपणांस नमस्कार करीत आहेत, तसेच अश्व, वानर, सिद्ध व गजेंद्र इत्यादिकां

---

* त्रोटक छंदानें स्तुति करण्याचा अभिप्राय असा की, हें आपलें संकट तुटून आपण यांतून मुक्त व्हावें.

पेक्षां तुह्मी अतितेजःपुंज शुभ्रवर्ण असून तुमचें मुख वर्तुलाकार असून विशाल असें रमणीय आहे. अशा तुह्मां देवास नमस्कार असो.

उपलब्धमशक्यतरैरमरैरसुरैः प्रथितोस्मिच बाहुशतैर्बहुभिः॥ प्रणतोस्मिभवंभवभक्तिरतोचलचंद्रकलाकुलदेवनमः॥ ६४॥

अर्थ- त्याच प्रमाणें पराजित होण्यास अशक्य असे देव व असुर यांच्या मुखानें माझ्या या सहस्रभुजां मुळें मी सर्वत्र मख्यात जाहलों असून मी शैवभक्ती विषयीं तत्पर होऊन चंद्राच्यास्थिर कलेनें सुशोभित अशा तुह्मा महादेवास मी नमस्कार करतों.

नचपुत्रकलत्रहयादिधनंममतुत्वदनुस्मरणं शरणं॥ व्यथितोस्मितुबाहुशतैर्बहुभिर्गमिता चमहानरकस्यगति॥ ६५॥

अर्थ- तसेंच पुत्र स्त्रिया व अश्व इत्यादिक द्रव्य यांतील कांहीं एक हितकारक नसून तुमचें सतत स्मरणच मला कल्याणदायक आहे, असें असून मी तर सहस्त्र बाहूंच्या बलानें गर्वयुक्त होऊन या गर्वाच्या व्यथेनें पीडित झाल्या मुळें तुमचा अपराध घडल्यानें आतां मी महा नरक गतीस जाईन.

ननिवर्ततिजन्मनपापमतिः शुचिकर्मनिबद्धमपित्यजति॥ अनुकंपतिविभ्रमतिसततिममन्वेवकुकर्मनिवारयति॥ ६६॥

अर्थ- आणि मी पवित्र कर्मानें युक्त आहें तरी मला ही पापबुद्धि सोडीत नाहीं, या वरून मला पुनर्जन्म सुटत नाहीं, तस्मात् आपण मजवर दया करील असून मला शुद्धीवर आणण्या साठीं तुह्मी वारंवार दुःख देऊन माझें निवारण करीत असतांही माझें हें दुष्कर्मच मला दुःख होण्यास कारण आहे.

यः पठेत्त्रोटकंदिव्यंप्रयतः शुचिमानसः॥ बाणस्येवयथारुद्रस्तस्यापिवरदोभवेत्॥ ६७॥

अर्थ- हें त्रोटक छंदानें केलेलें दिव्य स्तोत्र जो प्राणी प्रयत्नें करून

शुद्धचित्तानें पठन करील; त्यासही शंकर, बाणासुरास प्रसन्न झाल्या सारखे प्रसन्न होऊन वर देतील.

इमंस्तवंमहादिव्यंश्रुत्वादेवोमहेश्वरः॥ प्रसन्न स्सुतदानस्यस्वयंदेवोमहेश्वरः॥ ६८॥

अर्थ- त्या कालीं बाणासुरानें केलेलीही अत्युत्तम स्तुति श्रवण करून महा समर्थ देवाधिदेव शंकर स्वतः त्या बाणासुरास प्रसन्न झाले.

महेश्वर उवाच॥ नभेतव्यंत्वयावत्ससौवर्णेति ष्ठदानव॥ पुत्रपौत्रसुहृद्बंधुभार्याबंधुजनैःसह ६९

अर्थ- आणि तेसमयीं महादेव बोलले कीं, हे वत्सा दनुवंशस्थ बाणासुरा तूं भिऊं नको, आणि आपले पुत्र, पौत्र, स्नेही, आप्त, बांधव, पत्नी व तिचे कोणी संबंधि यां सहवर्तमान या त्रिपुरांतील सुवर्णाच्या पुरांत स्वस्थ रहा.

अद्यप्रभृतिबाणत्वमवध्यस्त्रिदशैरपि॥ भूयस्त स्यवरोदत्तोदेवदेवेनपांडव॥ ७०॥

अर्थ- आणि हे बाणासुरा आज पासून देवांचे हातून तुझा वध हो- णार नाहीं. हे पांडवा हा वर देऊन त्या देवाधि देवानें पुनः त्यास वर दिला.

अक्षयश्चाव्ययोलोकेविचरस्वाकुतोभयः॥ ततो निवारयामासरुद्रः सप्तशिखंतदा॥ ७१॥

अर्थ- तो असा कीं, हे वत्सा तूं क्षय व नाश यानीं रहित होऊन सर्वथा निर्भयपणें सर्व लोकांत यथेच्छ संचार कर. या प्रमाणें वर दिल्या नंतर शिवानीं त्या कालीं त्या सप्त शिखा युक्त अग्नीचें निवारण केलें.

तृतीयंरक्षितंतस्यपुरंतेनमहात्मना॥ भ्रमत्तुगग नेदिव्यंरुद्रतेजः प्रभावतः॥ ७२॥

अर्थ- असें तें बाणासुरानें त्रिपुरांतील तिसरें पुर त्या महाउदार शंक- रानीं रक्षिलें, तें दिव्य पुर शिवांच्या वरप्रदान संबंधि तेजाचे प्रभावानें आकाशमंडलांत सर्वत्र फिरूं लागलें.

एवंतुत्रिपुरंदग्धंशंकरेणमहात्मना॥ ज्वालामा लाप्रदीप्तंतत्पतितंधरणीतले॥ ७३॥

अर्थ- असें तें त्रिपुर महाबुद्धिमान् शंकरानीं जाळिलें तेव्हां तें ज्वाळांच्या समुदायानीं व्याप्त होऊन पृथ्वीतलावर पडलें.

एकंनिपतितंतत्र श्री शैले त्रिपुरांतके ॥ द्वितीयं पतितंतस्मिन्पर्वतेमरकंटके ॥ ७४ ॥

अर्थ- त्यांतील एक पुर त्या श्रीशैल पर्वतावर शिवाचे अग्रभागीं पडलें, आणि दुसरें पुर त्या अमर कंटक पर्वतावर पडलें.

दग्धेषुतेषुराजेंद्र रुद्रकोटिः प्रतिष्ठिता ॥ ज्वलन्नदपतत्तत्रतेन ज्वालेश्वरः स्मृतः ॥ ७५ ॥

अर्थ- हे सार्वभौमा धर्मराजा अशीं तीं पुरें दग्ध झाल्यावर त्या स्थळीं कोटिशिवलिंगांची स्थापना झाली, आणि त्रिपुरांतील एक ज्वालायुक्त पुर त्या अमरकंटक पर्वतावर पडलें ह्मणून त्या स्थानास ज्वालेश्वर असें ह्मणतात.

ऊर्ध्वेनप्रस्थितास्तस्य दिव्यज्वालादिवंगताः ॥ हाहाकारस्तदाजातोदेवासुरकृतोमहान् ॥ ७६ ॥

अर्थ- त्या दग्ध झालेल्या पुराच्या उत्तम ज्वाला स्वर्गलोका पर्यंत गेल्या असतां त्या काळीं देव व असुर यानीं महान् हाहाकार शब्द केला.

शरमस्तंभयद्रुद्रोमाहेश्वरपुरोत्तमे ॥ एवंवृत्तं तदातस्मिन्पर्वतेमरकंटके ॥ ७७ ॥

अर्थ- तेव्हां शिवानीं आपल्या बाणाचें स्तंभन करून तो बाण आपले उत्तम कैलास पुरांत स्थापन केला, असें हें वर्तमान त्या काळीं अमर कंटक पर्वतावर झालें.

चतुर्दशाख्यंभुवनंसमुत्कापांडुनंदन ॥ वर्षकोटिसहस्रंतुत्रिंशत्कोट्यस्तथापराः ॥ ७८ ॥ ततो महीतलंप्राप्यराजाभवतिधार्मिकः ॥ पृथिवीमेकछत्रेण भुंक्तेसतुनसंशयः ॥ ७९ ॥

अर्थ- या प्रमाणें हे पांडुपुत्रा धर्मराजा त्या अमर कंटक पर्वतावरील नर्मदेतील त्या ज्वाळेश्वर नामक तीर्थी स्नान, दान किंवा अनशनादिक जो करतो तो एकसहस्र तीस कोटि वर्षे पर्यंत सत्यलोकांत यथेच्छ सुख भोगून नंत-

र तो पृथ्वीवर जन्मास येऊन धार्मिक सार्वभौम राजा होऊन सर्व पृथ्वीचें एकछत्र राज्य करतो यांत संशय नाहीं.

एवंपुण्योमहाराजपर्वतोमरकंटकः॥ चंद्रसूर्यो परागेतुगच्छेद्योमरकंटकं॥८०॥ अश्वमेधाद्दश गुणंप्रवदंतिमनीषिणः॥ स्वर्गलोकमवाप्नोतिदृ ष्ट्वातत्रमहेश्वरं॥८१॥

अर्थः- हे महाराज युधिष्ठिरा हा अमरकंटक पर्वत असा पुण्यकारक आहे यास्तव चंद्र व सूर्य यांच्या ग्रहण संबंधि पर्वकाळीं जो अमरकंटक पर्वतास जातो त्यास अश्वमेधापेक्षां दशगुणित अधिक पुण्य प्राप्त होतें असें मुनी बोलतात आणि या पर्वतावरील शंकरांचें जो दर्शन करतो त्यास स्वर्गवास प्राप्त होतो.

ब्रह्महत्यागमिष्यंतिराहुग्रस्तेदिवाकरे॥ तदेवंनि खिलंपुण्यंपर्वतेमरकंटके॥८२॥

अर्थः- त्याच प्रमाणें राहूनें सूर्यास आच्छादित केलें असतां त्या सूर्यग्रहणीं जो त्या अमरकंटक पर्वतावर जातो त्याच्या ब्रम्हहत्या दूर होतात, असें हें त्या अमरकंटक पर्वतावर सर्व अप्रतिम पुण्य प्राप्त होतें.

मनसापिस्मरेद्यस्तंगिरिंत्वमरकंटकं॥ चांद्रायण शतंसाग्रंलभतेनात्रसंशयः॥८३॥

अर्थः- तसेंच जो प्राणी या अमरकंटक पर्वताचें स्मरण साहजिक मनानें करील त्यास पूर्ण शंभर चांद्रायणांचें फल प्राप्त होतें यांत संशय नाहीं.

त्रयाणामपिलोकानांविख्यातोमरकंटकः॥ एषपु ण्योगिरिश्रेष्ठः सिद्धगंधर्वसेवितः॥८४॥

अर्थः- हा अमरकंटक पर्वत स्वर्ग, मृत्यु व पाताळ या तिन्ही लोकांत प्रख्यात असून महापुण्यकारक असल्यामुळें सर्व पर्वतांत श्रेष्ठ आहे, म्हणून सिद्ध व गंधर्व हे या पर्वतावर सर्वदा वास करतात.

नानाद्रुमलताकीर्णोनानापुष्पोपशोभितः॥ मृग व्याघ्रसहस्रैस्तुसेव्यमानोमहागिरिः॥८५॥

अर्थः- तो महापर्वत अनेक वृक्ष व वेली यानीं सर्व प्रदेशीं व्याप्त असून

नाना प्रकारच्या पुष्पानीं सुशोभित आहे, म्हणून हजारों मृग व व्याघ्र हे त्या पर्वतावर निरंतर वास करितात.

यत्रसन्निहितोदेवोदेव्यासहमहेश्वरः ॥ ब्रह्मावि ष्णुस्तथावेंद्रोविद्याधरगणैःसह ॥ ८६ ॥ ऋषि- भिःकिन्नरैर्यक्षैर्नित्यमेवनिषेवितः ॥ वासुकिःस हितस्तत्रक्रीडतेपन्नगोत्तमे ॥ ८७ ॥ प्रदक्षिणंतु यःकुर्यात्पर्वतेमरकंटके ॥ पौंडरीकस्ययज्ञस्यफ लंप्राप्नोतिमानवः ॥ ८८ ॥

अर्थ- तसेंच पार्वतीदेवी सहित महासमर्थ शंकर ब्रह्मदेव, विष्णु, विद्याधर गणांसहित इंद्र, ऋषी, किन्नर, यक्ष हे सर्व त्या अमरकंटक पर्वतावर निरंतर सन्निहित असतात, आणि वासुकि ही अनेक नागांसह वर्तमान त्या उत्तम पर्वतावर क्रीडा करतो, तस्मात् अशा या पुण्यकारक अमरकंटक पर्वतास जो मानव प्रदक्षिणा करतो त्यास पौंडरीक नामक यज्ञाचें फल प्राप्त होतें.

तत्रज्वालेश्वरंनामतीर्थंसिद्धनिषेवितं ॥ तत्र स्नात्वादिवंयातियेमृतास्तेपुनर्भवाः ॥ ८९ ॥

अर्थ- त्या अमरकंटक पर्वतावर ज्वालेश्वर नामें तीर्थ प्रसिद्ध आहे, त्याची सेवा सिद्धही करीत असतात, त्या तीर्थांत जे स्नान करतात ते स्वर्गास जातात, आणि त्या तीर्थांत जे देहत्याग करतात ते पुनर्जन्मापासून मुक्त होतात.

ज्वालेश्वरेमहाराजयस्तुप्राणान्परित्यजेत् ॥ चंद्रसूर्योपरागेषुतस्यापिशृणुयत्फलं ॥ ९० ॥

अर्थ- हे महाराज धर्मा, त्या ज्वालेश्वर तीर्थांत चंद्र व सूर्य यांच्या ग्रहण पर्वांत जो प्राणत्याग करील त्यास काय फल प्राप्त होतें तें तूं श्रवण कर.

सर्वकर्मविनिर्मुक्तोज्ञानविज्ञानसंयुतः ॥ रुद्रलो कमवाप्नोतियावदाभूतसंप्लवं ॥ ९१ ॥

अर्थ- तें असें कीं, तो सर्व कर्मांपासून मुक्त होऊन ज्ञान, विज्ञान यानीं संपन्न होत्साता प्रलयकाल पर्यंत कैलास नामक रुद्रलोकांत वास करतो.

अमरेश्वरदेवस्यपर्वतस्यउभेतटे ॥ तत्रताःऋषिको
ट्यस्तःतपस्तप्यंतिसुव्रत ॥ ९२ ॥

अर्थ- हे उत्तमव्रत निष्ठा धर्मराजा अशा त्या अतितेजःपुंज अमरकं-
टक पर्वताचे उभयतटीं कोट्यावधि ऋषि तपकरीत राहिले आहेत.

समंताद्योजनक्षेत्रोगिरिश्चामरकंटकः ॥ अका
मोवासकामोवानर्मदायांशुभेजले ॥ ९३ ॥ स्नात्वा
मुच्यतितैःपापैरुद्रलोकंसगच्छति ॥

अर्थ- असा हा अमरकंटक पर्वत ओरस चौरस मिळून एक योजन क्षेत्रा-
वर आहे या पर्वतावरील नर्मदेच्या पुण्यतीर्थांत सकाम किंवा निष्काम जो
प्राणी स्नान करतो तो सर्व पापांतून मुक्त होऊन रुद्रलोकास जातो.

इतिश्रीमत्स्यपुराणें अमरेश्वर माहात्म्यं नाम सप्ताशी त्युत्तर शततमोध्यायः

अध्याय १८८ वा.

सूत उवाच ॥ पृच्छंतितेमहात्मानोमार्कंडेयंम
हामुनिं ॥ युधिष्ठिरपुरोगास्तेऋषयश्चतपोधनाः ॥ १ ॥

अर्थ- सूत बोलतात शौनकादिक ऋषीहो, ते समर्थ श्रवण करणारे म-
हात्मे धर्मराज प्रमुख राजर्षी, तपच स्वकीयधन असें मानणारे ब्रह्मर्षी हे त्या
मार्कंडेय नामक महर्षीस प्रश्न करतात.

आख्याहि भगवन्तत्थ्यंकावेरीसंगमोमहान् ॥
लोकानांचहितार्थायअस्माकंचविवृद्धये ॥ २ ॥

अर्थ- अहो ऐश्वर्य संपन्ना मार्कंडेया आपण लोकांच्या हितार्थ व
सर्व प्रकारें आमची विशेषवृद्धि होण्यासाठीं मोठ्या कावेरी संगमाचें
सत्य माहात्म्य आह्मास कथन करा?

सदापापरतायेचनरादुष्कृतकारिणः ॥ मुच्यंते
सर्वपापेभ्योगच्छंतिपरमंपदं ॥ एतदिच्छामवि
ज्ञातुंभगवन्वक्तुमर्हसि ॥ ३ ॥

अर्थ- जे मानव सर्वदा पापरत असल्यामुळें दुष्कर्में करतात ते मा-
हात्म्य श्रवणानें संपूर्ण पातकांतून मुक्त होऊन उत्तम पदास जातात तें
माहात्म्य समजण्यासाठीं आह्मी इच्छितों यास्तव अहो भगवन् आ-

पण तें माहात्म्य सांगण्यास योग्य आहां ?

मार्कंडेय उवाच ॥ शृण्वंतु वहिताः सर्वे युधिष्ठिर
पुरोगमाः ॥ अस्ति वीरो महायक्षः कुबेरः सत्यवि
क्रमः ॥ ४ ॥ इदं तीर्थमनुप्राप्य राजा यक्षाधिपोभ
वत् ॥ सिद्धिं प्राप्तो महाराज तन्मे निगदतः शृणु ॥ ५ ॥

अर्थ- त्याकाळीं मार्कंडेय बोलतात कीं, युधिष्ठिरप्रमुख सर्व तुह्मी एकाग्र चित्तानें श्रवण करा, एक सत्यपराक्रमी महान् यक्ष कुबेर नामें वीर आहे, तो या तीर्थास येऊन यक्षाधिपति राजा होऊन सिद्धि पावला, तें आख्यान हे महाराज तूं मज पासून श्रवण कर.

कावेरीनर्मदा यत्र संगमो लोकविश्रुतः ॥ तत्र स्ना
त्वा शुचिर्भूत्वा कुबेरः सत्यविक्रमः ॥ ६ ॥ तपो तप्य
त यक्षेंद्रो दिव्यं वर्षशतं महत् ॥ तस्य तुष्टो महादेवः
प्रदातुं वरमुत्तमं ॥ ७ ॥

अर्थ- तें असें कीं कावेरी व नर्मदा या लोकप्रख्यात नद्यांचा संगम जेथें आहे तेथें सत्यपराक्रमसंपन्न यक्षश्रेष्ठ कुबेरानें स्नान करून शुचिर्भूत होऊन देवांच्या शंभर वर्षें पर्यंत मोठें तप केलें तेव्हां महादेव प्रसन्न होऊन त्यास उत्तम वर देण्यासाठीं तेथें आले.

भो भो यक्ष महासत्व वरं ब्रूहि यथेप्सितं ॥ ब्रूहि का
र्यं यथेष्टं तु यद्वा मनसि वर्तते ॥ ८ ॥

अर्थ- आणि शंकर बोलले हे महाबलाढ्य यक्षा इच्छित वर माग आणि तुझ्या मनांत जें इष्ट कार्य असेल तें मला सांग.

कुबेर उवाच ॥ यदि तुष्टोसि मे देव यदि देयो वरो म
म ॥ अद्य प्रभृति सर्वेषां यक्षाणामधिपो भवे ॥ ९ ॥

अर्थ- तेव्हां कुबेर बोलतो अहो देवा आपण संतुष्ट होऊन मला वर देतां तर आज पासून मी सर्व यक्षांचा राजा होईन असा वर मला द्यावा.

कुबेरस्य वचः श्रुत्वा परितुष्टो महेश्वरः ॥ एवम
स्तु ततो देवस्तत्रैवांतरधीयत ॥ १० ॥

अर्थ- हें कुबेराचें वचन श्रवण करून महासमर्थ शंकर संतुष्ट हो-

ऊन त्यास तथास्तु असें बोलून ते महादेव तेथेंच गुप्त झाले.

सोपिलब्धवरोयक्षः शीघ्रंलब्धफलोदयः॥पू
जितःसतुयक्षैश्वह्यभिषिक्तस्तुपार्थिव॥११॥

अर्थः- नंतर हे राजा शंकरा पासून असा वर प्राप्त होतांच त्या वरानें त्यास त्वरित फल प्राप्त झालें तें असें कीं, यक्षानीं तत्काल कुबेराची पूजा करून त्यास आपल्या राज्याचा अभिषेक केला.

कावेरीसंगमंतत्रसर्वपापप्रणाशनं॥येनरानाभि
जानंतिवंचितास्तेनसंशयः॥१२॥

अर्थः- त्या स्थानीं सर्व पातकांचा नाश करणारा कावेरी संगम आहे, जे मानव त्या संगमास जाणत नाहींत ते मनुष्य जन्मास येऊन फसले यांत संशय नाहीं.

तस्मात्सर्वप्रयत्नेनतत्रस्नायीतमानवः॥कावे
रीचमहापुण्यानर्मदाचमहानदी॥१३॥तत्रस्ना
त्वातुराजेंद्रत्यर्चयेद्वृषभध्वजं॥अश्वमेधफलं
प्राप्यरुद्रलोकेमहीयते॥१४॥

अर्थः- तस्मात् अनेक प्रयत्नानीं त्या कावेरी संगमांत मानवानें स्नान करावें, कारण कावेरी व नर्मदा ह्या दोन्ही महा पुण्यकारक नद्या आहेत, यास्तव हे राजश्रेष्ठा त्यांच्या संगमांत स्नान करून जो वृषभ युक्त ध्वजस्तंभानें शोभणाऱ्या रथांत आरोहण करणाऱ्या शंकरांची पूजा करील तो अश्वमेध यज्ञाचें फल पावून देहपाता नंतर रुद्रलोकांत पूज्य होतो.

अग्निप्रवेशंयः कुर्याद्यश्चकुर्यादनाशकं॥अनिव
र्त्यागतिस्तस्ययथामेशंकरोब्रवीत्॥१५॥

अर्थः- जो मानव कावेरी व नर्मदा यांच्या तीरीं अग्निप्रवेश किंवा अनशन करून देहत्याग करील त्यास पुनर्जन्म रहित गति प्राप्त होईल असें शंकरानीं मला सांगीतलें.

सेव्यमानोवरस्त्रीभिः क्रीडतेदिविरुद्रवत्॥षष्टि
वर्षसहस्राणिषष्टिकोट्यस्तथापराः॥१६॥

अर्थः- आणि तो उत्तम स्त्रियानीं सेवित होत्साता स्वर्गलोकांत साठ को-

दि साठ सहस्र वर्षें पर्यंत शंकरा सारिखा क्रीडा करतो.

मोदतेरुद्रलोकस्थोयत्रतत्रैवगच्छति॥ पुण्यक्ष
यात्परिभ्रष्टोराजाभवतिधार्मिकः॥१७॥

अर्थ- पश्चात् तो रुद्रलोकीं इतस्ततः यथेच्छ सर्वत्र संचार करीत राहून आनंद पावतो, नंतर तेथून पुण्यक्षयानें खालीं येऊन पृथिवीवर धार्मिक राजा होतो.

भोगवान्दानशीलश्चमहाकुलसमुद्भवः॥ तत्र
पीत्वाजलंसम्यक्चांद्रायणफलंलभेत्॥१८॥

अर्थ- तो महत्व कुलांत उत्पन्न होऊन भोगसंपन्न व दानशील होतो, तसेंच अशा त्या कावेरी व नर्मदा यांचें जल प्राशन जो करतो त्यास उत्तम चांद्रायण व्रताचें फल प्राप्त होतें.

स्वर्गंगच्छंतितेमर्त्यायेपिबंतिशुभंजलं॥ गंगाय
मुनयोर्मध्येयत्फलंप्राप्नुयान्नरः॥ कावेरीसंगमे-
स्नात्वातत्फलंतस्यजायते॥१९॥

अर्थ- तसेंच जे मानव कावेरी व नर्मदा यांचें पुण्यकारक उदक प्राशन करितात ते स्वर्गासि जातात आणि गंगा व यमुना यांच्या मध्यें स्नान केल्यानें जें फल प्राप्त होतें तें फल कावेरी संगमांत स्नान करणाऱ्या मानवास प्राप्त होतें.

एवमादितुराजेंद्रकावेरीसंगमेमहत्॥ पुण्यंमह
त्फलंतत्रसर्वपापप्रणाशनम्॥२०॥

अर्थ- हे राजश्रेष्ठ धर्मराजा असें कावेरी संगमीं महा पुण्यकारक तीर्थ आहे ह्मणून स्नान दानादिक करणारास महा फल प्राप्त होऊन त्याचे सर्व पातकांचा नाश होतो. इतिश्री मत्स्यपुराणे अमरेश्वर माहात्म्यंनाम अष्टाशीत्युत्तर शततमोध्यायः १८८

अध्याय १८९ वा.

मार्कंडेयउवाच॥ नार्मदेचोत्तरेकूलेतीर्थंयोजन
विस्तृतं॥ मंत्रेश्वरेतिविख्यातंसर्वपापहरंपरं॥१॥

अर्थ- मार्कंडेय बोलतात हे धर्मराजा नर्मदेच्या उत्तर तीरीं एक योजन

परिमित लांब संपूर्ण पाप हरण करणारें मंत्रेश्वर नामानें प्रसिद्ध असें एक तीर्थ आहे.

तत्रस्नात्वानरोराजन्देवतैः सहमोदते ॥ पंचव र्षसहस्राणिक्रीडतेकामरूपधृक् ॥२॥

अर्थ- हे राजा त्या मंत्रेश्वर तीर्थांत स्नान करून मनुष्य देवांसहित स्वर्ग लोकांत यथेच्छ स्वरूप धारण करून पांच सहस्र वर्षें पर्यंत क्रीडा करतो.

गर्जनंचततोगच्छेद्यत्रमेघस्तथोत्थितः॥ इंद्रजि न्नामसंप्राप्तस्तस्यतीर्थप्रभावतः॥३॥

अर्थ- नंतर जेथें मेघ उत्पन्न झाला त्या गर्जन तीर्थास गमन करावें, त्या तीर्थाच्या प्रभावानें रावण पुत्र, इंद्रजित हें नाम पावला.

मेघनादंततोगच्छेद्यत्रमेघानुगर्जितं॥ मेघना दोगणस्तत्रपरमांगणतांगतः॥४॥

अर्थ- पुढें जेथील उदकाचा शब्द, मेघगर्जने सारिखा होतो त्या मेघनाद तीर्थास गमन करावें, कारण त्या तीर्थाच्या सेवनानें मेघनाद नामा गण शिवाचे गणांत मुख्यत्व पावला.

ततोगच्छेत्तुराजेंद्रतीर्थमाम्रातकेश्वरं॥ तत्र स्नात्वानरोराजन्गोसहस्रफलंलभेत्॥५॥

अर्थ- हे राजेंद्रा धर्मा पुढें आम्रातकेश्वर नामक तीर्थास जावें, तेथें स्नान करणाऱ्या मानवास गोसहस्र दानाचें फल प्राप्त होतें.

नर्मदोत्तरतीरेतुतीर्थंतुविश्रुतंभवेत्॥ तस्मिंस्ती र्थेनरःस्नात्वातर्पयेत्पितृदेवताः॥६॥ सर्वान्का मानवाप्नोतिमनसायेविचिंतिताः॥

अर्थ- तसेंच नर्मदेच्या उत्तर तीरीं विश्रुत नामें तीर्थ आहे, त्या तीर्थीं मनुष्यानें स्नान करून पितर व देव यांचें तर्पण करावें ह्मणजे तेणें करून त्याचे सर्व चिंतित मनोरथ पूर्ण होतात.

ततोगच्छेत्तुराजेंद्रब्रह्मावर्तमितिस्मृतं॥७॥ तत्र सन्निहितोब्रह्मानित्यमेवयुधिष्ठिर॥ तत्रस्नात्वा

तुराजेंद्रब्रह्मलोकेमहीयते ॥ ८ ॥

अर्थ- हे सार्वभौम राजेंद्रा युधिष्ठिरा, त्या पुढें नर्मदेंत ब्रह्मावर्त नामक तीर्थास जावें, कारण तेथें ब्रह्मदेवांचें निरंतर सन्निधान आहे, त्या तीर्थांत स्नान करणारा ब्रह्मलोकांत पूज्य होतो.

ततोंगारेश्वरंगच्छेन्नियतोनियताशनः ॥ सर्व
पापविनिर्मुक्तोरुद्रलोकंसगच्छति ॥ ९ ॥

अर्थ- पुढें भोजनादिकां विषयीं नियम धारण करून अंगारेश्वर तीर्थास गेलें असतां सर्व पापांतून मुक्त होऊन तो रुद्रलोकास जातो.

ततोगच्छेच्चराजेंद्रकपिलातीर्थमुत्तमं ॥ तत्रस्ना
त्वानरोराजन्कपिलादानमाप्नुयात् ॥ १० ॥

अर्थ- हे राजोत्तमा नंतर जो मानव उत्तम कपिला तीर्थास जातो, त्यास हे राजा कपिला (एकवर्णी) गोप्रदान केल्याचें फल प्राप्त होतें.

गच्छेत्करजतीर्थंतुदेवर्षिगणसेवितं ॥ तत्रस्ना
त्वानरोराजन्गोलोकंसमवाप्नुयात् ॥ ११ ॥

अर्थ- पश्चात् देव व ऋषि यांचे समुदायानीं सेवित अशा करज तीर्थास जावें, कारण हे राजा तेथें स्नान करणारा मनुष्य गोलोकास जातो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रकुंडलेश्वरमुत्तमं ॥ तत्रसन्नि
हितोरुद्रस्तिष्ठतेत्युमयासह ॥ १२ ॥ तत्रस्नात्वा
तुराजेंद्रत्यवध्यस्त्रिदशैरपि ॥

अर्थ- हे राजेंद्रा नंतर कुंडलेश्वर नामक उत्तम तीर्थास जावें, कारण तेथें पार्वती सहित शंकरांचें निरंतर सन्निधान असल्यामुळें हे राजवर्या त्या तीर्थांत स्नान करणारा, देवांसही अवध्य होतो.

पिप्पलेशंततोगच्छेत्सर्वपापप्रणाशनं ॥ १३ ॥
तत्रस्नात्वातुराजेंद्ररुद्रलोकेमहीयते ॥

अर्थ- हे सार्वभौम राजा पुढें सर्वपातकांचा नाश करणाऱ्या पिप्पलेश नामक तीर्थास जाऊन तेथें जो स्नान करितो तो शिवलोकीं पूज्य होतो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रविमलेश्वरमुत्तमं ॥ १४ ॥ त
त्रदेवशिलारम्यात्नेश्वरेणविनिर्मिता ॥ तत्रप्राण

परित्यागाद्रुद्रलोकमवाप्नुयात् ॥१५॥

अर्थ- हे सर्वराजमान्या धर्मराजा त्यापुढें विमलेश्वर नामक श्रेष्ठ तीर्थास जावें कारण तेथें साक्षात् शिवानीं देवांची एक शिला निर्माण केली आहे त्या शिलेवर प्राणत्याग केला असतां शिवलोक प्राप्त होतो.

ततःपुष्करिणींगच्छेत्तत्रस्नानंसमाचरेत् ॥स्ना
तमात्रोनरस्तत्रह्यर्धासनंलभेत् ॥१६॥

अर्थ- नंतर पुष्करिणी नामक तीर्थास जावें, कारण जो नर तेथें स्नान करील त्यास इंद्राचें अर्धासन प्राप्त होतें.

नर्मदासरितांश्रेष्ठारुद्रदेहाद्विनिःसृता ॥तार
येत्सर्वभूतानिस्थावराणिचराणिच ॥१७॥

अर्थ- अशी ही नर्मदा शिवाच्या देहा पासून निघाली असून नद्यांतश्रेष्ठ असल्यामुळें स्थावर (वृक्षपाषाणादिक) जंगम (मनुष्य, पशु, पक्ष्यादिक या सर्व चराचर प्राणिमात्रांस भवसागरांतून तारिते.

सर्वदेवाधिदेवेनत्वीश्वरेणमहात्मना ॥ कथिताऋ
षिसंघेभ्योह्यस्माकंचविशेषतः ॥१८॥

अर्थ- अशीही श्रेष्ठ नदी नर्मदा सर्वदेवांत श्रेष्ठ असून महाबुद्धिमंत समर्थ शंकरानीं ऋषिगणांस सांगितली असून आह्मास विशेषें करून वर्णिली.

मुनिभिःसंस्तुताह्येषानर्मदाप्रवरानदी ॥रुद्र
देहाद्विनिष्क्रांतालोकानांहितकाम्यया ॥१९॥
सर्वपापहरानित्यंसर्वदेवनमस्कृता ॥ संस्तुता
देवगंधर्वैरप्सरोभिस्तथैवच ॥२०॥

अर्थ- त्याच प्रमाणें सर्व ऋषि या नर्मदा नामक श्रेष्ठ नदीची उत्तम प्रकारें स्तुति करतात, कारण ही शंकराच्या देहा पासून लोकहिताच्या इच्छेनें निघाली असून सर्व पातकांचा नाश करणारी असल्यामुळें सर्व देव निरंतर इला नमस्कार करतात आणि तेथें देव, गंधर्व व अप्सरा हे त्या नर्मदेची उत्तम स्तुति करतात.

नमःपुण्यजलेत्याद्येनमःसागरगामिनि ॥ नमस्ते

पापशमनिनमोदेविवरानने ॥२१॥

अर्थ:- ती अशी कीं हे नर्मदे तूं नद्यांत मुख्य असून तुझें उदक पुण्यकारक आहे, आणि तूं स्वतः समुद्रास गमन करणारी व सर्व पापांचा नाश करीत असून हे देवि तुझें मुख सर्वांच्या तापत्रयास दूर करतें तस्मात् तुला वारंवार नमस्कार असोत.

नमोस्तुतेऋषिगणसिद्धसेवितेनमोस्तुतेशंकर देहनिःसृते ॥नमोस्तुतेधर्मभृतांवरप्रदेनमोस्तु तेसर्वपवित्रपावने ॥२२॥

अर्थ:- हे नर्मदे तशीच तूं शंकरांच्या देहा पासून निघाल्या मुळें सर्व पवित्र लोकांसही अति पवित्र करणारी असून धर्माचरणनिष्ठ सज्जनांस इष्टवर देणारी आहेस तस्मात् आह्मी तुला पुनःपुनः नमस्कार करतों.

यस्त्विदंपठतेस्तोत्रंनित्यंश्रद्धासमन्वितः॥ब्राह्म णोवेदमाप्नोतिक्षत्रियोविजयीभवेत् ॥२३॥

अर्थ:- जो मानव विश्वास युक्त अंतःकरणानें नित्यशः हें नर्मदा स्तोत्र पठन करतो, तो ब्राह्मण असल्यास वेदविद्येनें संपन्न होतो, व क्षत्रिय असला तर तो सर्वत्र विजयी होतो.

वैश्यस्तुलभतेलाभंशूद्रश्चैवशुभांगतिं ॥अर्था र्थीलभतेह्यर्थंस्मरणादेवनित्यशः ॥२४॥

अर्थ:- तसाच वैश्यास या स्तोत्र पठानें द्रव्यादिक अनेक वस्तूंचा लाभ होऊन शूद्रास उत्तम गति प्राप्त होते, व ज्यास केवळ धनाचीच इच्छा असेल त्यास या नर्मदेच्या नित्यस्मरणमात्रानेंच धन प्राप्ती होते.

नर्मदांसेवतेनित्यंस्वयंदेवोमहेश्वरः॥तेनपुण्या नदीज्ञेयाब्रह्महत्यापहारिणी ॥२५॥

अर्थ:- बहुत काय सांगावें कीं, महासमर्थ शंकरही स्वतः निरंतर नर्मदेचें स्नानादिक करतात तेणेंकरून ही नर्मदा नदी महापुण्यकारक असून ब्रह्महत्यादिक पापांचा नाश करीत आहे. इतिश्री मत्स्यपुराणे नर्मदामाहात्म्ये एकोननवत्युत्तर शततमोऽध्यायः ॥१८९॥

अध्याय १९० वा.

मार्कंडेयउवाच ॥ तदाप्रभृतिब्रह्माद्याॠषयश्च तपोधनाः ॥ सेवंतेनर्मदांराजन्रागक्रोधविवर्जिताः ॥१॥

अर्थ- मार्कंडेय बोलतात. हे धर्मराजा, त्या दिवसा पासून ब्रह्मादिक देव व तपच आपलें धन असें मानणारे ऋषी हे सर्वही इच्छा व क्रोध यांचा त्याग करून नर्मदेची सेवा करतात.

युधिष्ठिरउवाच ॥ कस्मिन्निपतितंशूलंदेवस्यतुमहीतले ॥ तत्रपुण्यंसमाख्याहि यथावन्मुनिसत्तम २

अर्थ- ते समयीं युधिष्ठिर प्रश्न करितो कीं, हे मुनिश्रेष्ठ महादेवाचा त्रिशूल कोणत्या ज्या स्थानीं पृथ्वीतलावर पडला त्यास्थानाचा यथार्थ पुण्यमहिमा मला कथन करा.

मार्कंडेयउवाच ॥ शूलभेदेतिविख्यातंतीर्थंपुण्यतमंमहत् ॥ तत्रस्नात्वार्चयेद्देवंगोसहस्रफलंलभेत् ॥ ३ ॥

अर्थ- तहां मार्कंडेय मुनि बोलले कीं, हे राजा तेथून पुढें नर्मदेंत ज्या स्थलीं शिवाचा त्रिशूळ पडला तेथें शूलभेद नामें महा प्रख्यात अति पुण्यकारक तीर्थ आहे, त्या तीर्थीं स्नान करून शिवपूजा केली असतां सहस्त्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें.

त्रिरात्रंकारयेद्यस्तुतस्मिंस्तीर्थेनराधिप ॥ अर्चयित्वामहादेवंपुनर्जन्मनविद्यते ॥४॥

अर्थ- हे मानवराजा त्यातीर्थाचे तीरीं महादेवांची पूजा करून जो तेथें त्रिरात्र वास करितो त्यास पुनर्जन्म प्राप्त होत नाहीं.

भीमेश्वरंततोगच्छेन्नारदेश्वरमुत्तमं ॥ आदित्येशंमहापुण्यंतथाघृतमधुस्त्रवं ॥५॥ नंदिकेशंपरिष्वज्यपर्यासिंजन्मनःफलं ॥

अर्थ- नंतर भीमेश्वरास जाऊन पुढें उत्तम नारदेश्वरास जावें, तेथून पुढें तूप व मध यांच्या प्रवाहानें युक्त अशा महा पुण्यकारक आदित्येश्वरास जाऊन तेथील नंदिकेश्वरास आलिंगन केलें असतां जन्माचें

पूर्ण साफल्य प्राप्त होतें.

वरुणेशं ततः पश्येत्स्वतंत्रेश्वरमेवच ॥ सर्वतीर्थ
फलं तस्य पंचायतनदर्शनात् ॥ ६ ॥

अर्थ:- त्या पुढें अनुक्रमानें वरुणेश्वर व स्वतंत्रेश्वर यांचें दर्शन घ्यावें, या प्रमाणें पूर्वोक्त्या भीमेश्वरा पासून स्वतंत्रेश्वरापर्यंत या पांच स्थानीं स्नानपूर्वक दर्शन घेतलें असतां सर्व तीर्थ स्नानांचें फल प्राप्त होतें.

ततोगच्छेत्तु राजेंद्र युद्धं यत्र सुसाधितं ॥ कोटि
तीर्थंतु विख्यातमसुरा यत्रमोहिताः ॥ ७ ॥

अर्थ:- हे राजेंद्रा त्या पुढें ज्या स्थलीं देवदैत्यांचें बहुत युद्ध होऊन असुर मोह पावले तेथें कोटितीर्थ प्रसिद्ध आहे.

यत्रैव निहता राजन्दानवा बलदर्पिताः ॥ तेषां
शिरांस्यगृण्हंत सर्वे देवाः समागताः ॥ ८ ॥

अर्थ:- हे राजा आणि युद्धार्थ आलेल्या सर्व देवानीं बलानें गर्वयुक्त झालेल्या दानवांचे शिरच्छेद करून तेथेंच त्यांस मारिलें.

तैरस्तु संस्थापितो देवः शूलपाणिर्वृषध्वजः ॥ कोटि
र्विनिहता तत्र तेन कोटीश्वरः स्मृतः ॥ ९ ॥

अर्थ:- त्या देवानीं नंदिकेश्वर चिन्हाच्या ध्वजयुक्त रथांत आरोहण करणारे त्रिशूलधारी महादेवांची उत्तम प्रकारची स्थापना करून त्यांच्या अनुग्रहानें कोट्यावधि दैत्य तेथें मारिले ह्मणून त्या शिवास कोटीश्वर हें नाम प्राप्त जाहलें.

दर्शनात्तस्य तीर्थस्य सदेहः स्वर्गमारुहेत् ॥ यदा
त्विंद्रेण क्षुद्रलाद्वज्रकीलेन यंत्रितं ॥ १० ॥ तदा
प्रभृति लोकानां स्वर्गमार्गो निवारितः ॥

अर्थ:- ज्या कालीं इंद्रानें क्षुद्रबुद्धीमुळें स्वर्गद्वाराचे कडींत वज्र घातलें तेव्हां पासून लोकांचा स्वर्गास जाण्याचा मार्ग बंद झाला, तो या कोटितीर्थाच्या दर्शनानें मोकळा होऊन तो मानव स्वर्गलोकास आरोहण करतो.

सद्दृष्टं श्रीफलं जग्ध्वा कृत्वा चैव प्रदक्षिणं ॥ पार्वतं
सहृदीमंतु शिरसा चैव धारयेत् ॥ सर्वकामसुसंप

न्नोराजाभवतिपांडव॥१२॥

अर्थ- हे पांडुपुत्रा तसेंच घृतसहित श्रीफल भक्षण करून दीपसहित कैलासवासी शंकराची प्रतिमा मस्तकावर धारण करून जो मानव त्या कोटितीर्थास प्रदक्षिणा करतो तो पृथ्वीवर सर्व भोग संपन्न राजा होतो.

मृतोरुद्रत्वमाप्नोतिततोसौजायतेपुनः॥ स्वर्गादे त्यभवेद्राजाराज्यंकृत्वादिवंव्रजेत्॥१३॥

अर्थ- पश्चात् मरणा नंतर तो रुद्रस्वरूप होऊन पुढें कांहीं कालानें स्वर्गांतून खालीं भूलोकीं जन्मास येऊन राजा होतो, आणि कांहीं काल पृथ्वीनें राज्य करून पुनः तो स्वर्गास गमन करतो.

बहुनेत्रंततः पश्येत्त्रयोदश्यांतुमानवः॥ स्नान मात्रोनरस्तत्रसर्वयज्ञफलंलभेत्॥१४॥

अर्थ- असें त्या शिवदर्शनानें फल आहे, यास्तव मानवानें त्रयोदशीस तेथील त्या त्रिनयन शिवाचें दर्शन घ्यावें, तसेंच त्या तीर्थांत स्नानमात्र केलें असतां सर्व यज्ञांचें फल प्राप्त होतें.

ततोगच्छेत्तुराजेंद्रतीर्थंपरमशोभनं॥ नराणांपा पनाशायह्यगस्त्येश्वरमुत्तमं॥१५॥ तत्रस्नात्वानरो राजन्ब्रह्मलोकेमहीयते॥

अर्थ- हे राजेंद्रा नंतर मानवांच्या पापांचा नाश करणाऱ्या परम मंगलकारक अगस्त्येश्वर नामक उत्तम तीर्थास जावें, कारण हे राजा त्या तीर्थांत स्नान करणारा मनुष्य ब्रह्मलोकांत पूज्य होतो.

कार्तिकस्यतुमासस्यकृष्णपक्षेचतुर्दशी॥१६॥ घृतेनस्नापयेद्देवंसमाधिस्थोजितेंद्रियः॥ एकविंश कुलोपेतोनच्यवेदेश्वरात्पुरात्॥१७॥

अर्थ- त्या अगस्त्येश्वर देवास जो मानव आपलीं मन आदिकरून सर्व इंद्रियें स्वाधीन ठेवून एकाग्रचित्तानें कार्तिकमासीं कृष्णपक्षीं चतुर्दशीचे दिवशीं घृतानें स्नान घालतो, तो आपले एकवीस कुलांसहित शिव पुरास जातो वो पुनः तेथून अधोगतीस येतनाहीं.

धेनुमुपानहच्छत्रंदद्याच्चघृतकंबलं॥ भोजनंचैववि

माणांसर्वंकोटिगुणंभवेत्॥ १८

अर्थ- आणि धेनु, जोडा, छत्री, घृत, कांबळा व ब्राह्मण भोजन इत्यादिक सर्व दानें या अगस्त्येश्वराचे सन्निधानीं केलीं असतां त्या सर्व दानांचें फल अन्यस्थलापेक्षां कोटिगुणित प्राप्त होतें.

ततोगच्छेत्तुराजेंद्रबलाकेश्वरमुत्तमं॥ तत्रस्नात्वा
नरोराजन्सिंहासनपतिर्भवेत्॥१९॥

अर्थ- हे राजोत्तमा त्या पुढें बलाकेश्वर नामक उत्तम तीर्थास जावें, कारण हे राजा त्या तीर्थांत स्नान करणारा सार्वभौम राजा होतो.

नर्मदादक्षिणेकूलेतीर्थंशक्रस्यविश्रुतं॥ उपोष्यर
जनीमेकांस्नानंतत्रसमाचरेत्॥ २०॥

अर्थ- तसेंच नर्मदेच्या दक्षिण तीरीं इंद्राचें प्रसिद्ध तीर्थ आहे, त्या स्थानीं प्रथमतः एक अहोरात्र उपोषण करून दुसरे दिवशीं स्नान करावें.

स्नानंकृत्वायथान्यायमर्चयेच्चजनार्दनं॥ गोसहस्र
फलंतस्यविष्णुलोकंसगच्छति॥२१॥

अर्थ- असें तें यथाविधि स्नान करून जो भक्तीनें जनार्दनाची पूजा करितो त्यास सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होऊन तो अंतीं विष्णुलोकीं गमन करितो.

ऋषितीर्थंततोगच्छेत्सर्वपापहरंनृणां॥ स्नातमा
त्रोनरस्तत्रगोसहस्रफलंलभेत्॥२२॥

अर्थ- नंतर मनुष्यांच्या सर्व पापांचा नाश करणाऱ्या ऋषितीर्थास जाऊन तेथें स्नान केलें असतां तावन्मात्रानेंच मनुष्यास सहस्र गोप्रदानांचें पुण्य प्राप्त होतें.

देवतीर्थंततोगच्छेद्ब्रह्मणानिर्मितंपुरा॥ तत्रस्नात्वान
रोराजन्ब्रह्मलोकेमहीयते॥२३॥

अर्थ- हे राजा तेथून पुढें ब्रह्मदेवानीं पूर्वी निर्माण केलेल्या देवतीर्थी जाऊन स्नान करणारा मानव ब्रह्मलोकांत पूज्य होतो.

अमरकंटकंगच्छेदमरैः स्थापितंपुरा॥ स्नातमात्रोन
रस्तत्ररुद्रलोकेमहीयते॥२४॥

अर्थ- पश्चात् देवानीं पूर्वी स्थापन केलेल्या अमरकंटकपर्वतीं जाऊन तेथें स्नानमात्र केल्यानें तो मानव रुद्रलोकीं मान्य होतो.

ततोगच्छेच्चराजेंद्ररावणेश्वरमुत्तमं ॥ तत्पंचायत
नंदृष्ट्वामुच्यते ब्रह्महत्यया ॥२५॥

अर्थ- हे राजश्रेष्ठा मग रावणेश्वरास जाऊन तेथील उत्तम पंचायतनाचें दर्शनानें हा प्राणी ब्रह्महत्येपासून मुक्त होतो.

ऋणतीर्थंततोगच्छेदृणोध्योमुच्यतेध्रुवं ॥ वटेश्व
रंततोदृष्ट्वापर्याप्तंजन्मनः फलं ॥२६॥

अर्थ- नंतर ऋणतीर्थास गेलें असतां मनुष्य सर्व देवादिकांच्या ऋणांतून निश्चये करून मुक्त होतो, आणि तेथून पुढें जाऊन वटेश्वराचें दर्शन केल्यानें मनुष्य जन्माचें साफल्य होतें.

भीमेश्वरंततोगच्छेत्सर्वव्याधिविनाशनं ॥ स्नात
मात्रोनरोराजन्सर्वदुःखैः प्रमुच्यते ॥२७॥

अर्थ- हे राजा त्यापुढें सर्व व्याधींचा समूळ नाश करणाऱ्या भीमेश्वरतीर्थीं जाऊन स्नानमात्र केल्यानें हा मनुष्य तापत्रय संबंधि सर्व दुःखांतून मुक्त होतो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रतुरासंगममुत्तमं ॥ तत्रस्नात्वा
महादेवमर्चयन्सिद्धिमाप्नुयात् ॥२८॥

अर्थ- हे राजवर्या नंतर तुरानामक नदीशीं झालेल्या नर्मदेच्या संगमास जाऊन त्या उत्तम तीर्थीं स्नान करून तेथील महादेवाची पूजा करणारास मोक्षादिक सर्व सिद्धि प्राप्त होतात.

सोमतीर्थंततोगच्छेत्पश्येच्चंद्रमनुत्तमं ॥ तत्रस्ना
त्वानरोराजन्भक्त्यापरमयायुतः ॥२९॥ तत्क्षणा
द्दिव्यदेहस्थः शिववन्मोदतेचिरं ॥ षष्टिवर्षसहस्रा
णिरुद्रलोकेमहीयते ॥ ३० ॥

अर्थ- हे राजा तेथून सोमतीर्थास जाऊन तेथें स्नान करून उत्कृष्ट भक्ति युक्त अंतःकरणानें चंद्राचें दर्शन घेतलें असतां तत्क्षणीं तो मानव दिव्य देहानें शिवलोकीं जाऊन तेथें साठ सहस्र संवत्सर पर्यंत बहु काल शिवा

सारिखी क्रीडा करीत असून सर्वांस मान्य होतो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रपिंगलेश्वरमुत्तमं ॥ अहोरात्रो
पवासेनत्रिरात्रफलमाप्नुयात् ॥ ३१ ॥

अर्थ- हे राजेंद्रा नंतर पिंगलेश्वर नामक उत्तम स्थानास जाऊन तेथें एक अहोरात्र उपवासानें त्रिरात्र उपोषणें केल्याचें फल प्राप्त होतें.

तस्मिंस्तीर्थेतुराजेंद्रकपिलांयःप्रयच्छति ॥ याव
तितस्यारोमाणितत्प्रसूतिकुलेषुच ॥ ३२ ॥ तावद्वर्ष
सहस्राणिरुद्रलोकेमहीयते ॥

अर्थ- हे राजसत्तमा तसेंच त्या पिंगलेश्वर तीर्थीं जो कपिला (एकवर्णी) गायीचें दान करतो, त्या गायीच्या अंगावरील जितके केश व त्या गायीच्या सर्व संततीचे अंगावरील जेवढे केश असतील तितकीं सहस्र वर्षें पर्यंत तो गोप्रदान करणारा शिवलोकांत पूज्य होतो.

यस्तुप्राणपरित्यागंकुर्यात्तत्रनराधिप ॥ ३३ ॥ अ
क्षयंमोदतेकालंयावच्चंद्रदिवाकरौ ॥

अर्थ- हे मनुष्य राजा त्या पिंगलेश्वर तीर्थीं जो मानव प्राणत्याग करील, तो यावत्काल चंद्र सूर्य आहेत तावत्काल पर्यंत अखंड आनंद पावतो.

नर्मदातटमाश्रित्यतिष्ठेयुर्यत्रमानवाः ॥ ३४ ॥ तेमृ
ताःस्वर्गमायांतिसंतःसुकृतिनोयथा ॥

अर्थ- आणि जे मानव नर्मदा तीराचा आश्रय करून ज्या स्थलीं वास करतील; ते तेथें मरण पावले असतां पुण्यवंत साधू सारखे स्वर्गास जातात.

स्फुरेश्वरंततोगच्छेन्नाम्नाककोटिकेश्वरं ॥ ३५ ॥ गंगा
वतरतेतत्रदिनेपुण्येनसंशयः ॥

अर्थ- नंतर कर्कोटिकेश्वरनामें प्रसिद्ध जो स्फुरेश्वर तेथें जावें, कारण भागीरथी पर्वकाल दिवशीं त्या स्थानीं येत असते

नंदितीर्थंततोगच्छेत्स्नानंतत्रसमाचरेत् ॥ ३६ ॥
तुष्यतेतस्यनंदीशःसोमलोकेमहीयते ॥

अर्थ- पुढें जाऊन नंदितीर्थांत स्नान करावें, तेणें करून नंदीश्वर शंकर त्यास प्रसन्न होऊन तो कैलासांत वास करतो.

ततोदीपेश्वरंगच्छेद्व्यासतीर्थंतपोवनं ॥ ३७ ॥ नि
वर्तिता पुरातत्र व्यासभीता महानदी ॥

अर्थ- त्या पुढें दीपेश्वराचें दर्शन करून व्यास तीर्थास जावें, तेथें व्यासां-
चें तपोवन आहे, त्या तपोवनांत पूर्वी ते व्यास तप करीत असतां ही महान
दी नर्मदा चालली असतां ती व्यासांस भिऊन मागें फिरली.

हुंकारितातुव्यासेनदक्षिणेनततोगता ३८ प्रदक्षि
णंतुयः कुर्यात्तस्मिंस्तीर्थेनराधिप ॥ अक्षयंमोद
तेकालंयावच्चंद्रदिवाकरौ ॥ ३९ ॥

अर्थ- तेव्हां व्यासानीं तिला त्याच मार्गानें पुढें जाण्याविषयीं हुंकारानें सू-
चना केली असतां ती नर्मदा व्यासांच्या दक्षिण भागाकडून गेली, यास्तव त्या
तीर्थी जो प्रदक्षिणा करील तो हे यावत् चंद्र सूर्य आहेत, तावत्काल पर्यंत
अखंड आनंद पावतो.

व्यासस्तस्य भवेत्प्रीतः प्राप्नुयादीप्सितंफलं ॥ सू
त्रेणवेष्टयित्वातुदीपंदेयः सवेदिकः ॥ ४० ॥ क्रीडं
तिह्यक्षयंकालंयथारुद्रस्तथैवच ॥

अर्थ- आणि त्यास व्यास प्रसन्न होऊन त्यांच्या कृपेनें इच्छित फल प्रा-
प्त होतें, तसाच तेथें ओटा घालून त्यावर सूतानें वेष्टन करून वेदव्यासांचे
अग्रभागीं अखंड दीप लावला असतां तो शिवा सारखा सर्वदा आनंद पावतो.

ततोगच्छेच्चराजेंद्र ऐरंडीतीर्थमुत्तमं ॥ ४१ ॥ संग
मेतुनरः स्नात्वामुच्यते सर्वपातकैः ॥

अर्थ- हे राजेंद्रा तेथून पुढें ऐरंडी नामक उत्तम तीर्थास जाऊन तिच्या
संगमीं स्नान करणारा मानव सर्व पापांतून मुक्त होतो.

ऐरंडीत्रिषुलोकेषुविख्यातापापनाशिनी ॥ ४२ ॥
अथवाश्वयुजेमासिशुक्लपक्षेतुचाष्टमी ॥ शुचि
र्भूत्वानरः स्नात्वासोपवासपरायणः ॥ ४३ ॥ ब्राह्म
णंभोजयेदेकंकोटिर्भवतिभोजिता ॥

अर्थ- कारण ती ऐरंडी नदी पापांचा नाश करण्याविषयीं समर्थ असें
त्रैलोक्यांत प्रसिद्ध आहे, अशा त्या ऐरंडी नदींत आश्विनमासांतील शुक्ल-

पक्षीं अष्टमीचे दिवशीं स्नान करून शुचिर्भूत होत्साता जो मनुष्य सतःउ पोषण करून एका ब्राह्मणास भोजन देईल तर त्यास कोटिब्राह्मण भोजनाचें फल प्राप्त होतें

मृत्तिकांशिरसिस्थाप्यत्ववगाह्यचवैजलं ॥ ४४ ॥
नर्मदोदकसंमिश्रंमुच्यतेसर्वकिल्बिषैः ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो मानव नर्मदा व ऐरंडी यांचे संगम तीर्थी आपले मस्तकास मृत्तिका लावून अवगाहन (बुडी) स्नान करील तो सर्व पातकांतून मुक्त होतो.

प्रदक्षिणंतुयःकुर्यात्तस्मिंस्तीर्थेनराधिप ॥ ४५ ॥
प्रदक्षिणीकृतातेनसप्तद्वीपावसुंधरा ॥

अर्थ- हे राजा त्या ऐरंडी संगमतीर्थी जो प्रदक्षिणा करतो त्यास सप्तद्वीप सहित पृथ्वी प्रदक्षिणेचें फल प्राप्त होतें.

ततःसुवर्णसलिलेस्नात्वादत्वातुकांचनं ॥ ४६ ॥ कां
चनेनविमानेनरुद्रलोकेमहीयते ॥

अर्थ- त्या पुढें सुवर्ण सलिल नामक तीर्थी स्नान करून सुवर्णदान करणारा सुवर्ण विमानांत बसून शिवलोकीं वास करतो

ततःस्वर्गाच्युतःकालाद्राजाभवतिवीर्यवान् ॥ ४७
ततोगच्छेत्तुराजेंद्रहीक्षुनद्यास्तुसंगमं ॥ त्रैलोक्य
विश्रुतंदिव्यंतत्रसन्निहितःशिवः ॥ ४८ ॥

अर्थ- नंतर तो कालांतरानें स्वर्गांतून खालीं पृथ्वीवर पराक्रमी राजा होतो, हे राजेंद्रा त्यापुढें नर्मदा व इक्षुनदी यांच्या संगम तीर्थी जावें कारण तेथें निरंतर शिवाचें सन्निधान असल्यामुळें तो दिव्य संगम त्रैलोक्यांत प्रसिद्ध आहे.

तत्रस्नात्वानरोराजन्गाणपत्यमवाप्नुयात् ॥ स्कंद
तीर्थंततोगच्छेत्सर्वपापप्रणाशनं ॥ ४९ ॥ तत्तीर्थंत्रि
विधंपापंस्नानमात्राद्व्यपोहति ॥

अर्थ- हे राजा त्या संगम तीर्थी स्नान करणारास गणांचें स्वामित्व प्राप्त होतें पश्चात् सर्व पापांचा नाश करणाऱ्या स्कंद तीर्थास गेलें असतां तें

तीर्थ कायिक वाचिक व मानसिक या तीन प्रकारच्या पातकांचा स्नान मा त्रानें तत्काळ नाश करितें.

लिंगसारंततोगच्छेत्स्नानंतत्रसमाचरेत्॥५०॥गोस हस्रफलंतस्यरुद्रलोकेमहीयते॥

अर्थ- नंतर लिंगसार नामक तीर्थास जाऊन तेथें स्नान केलें असतां स- हस्र गोप्रदानांचे पुण्यानें तो कैलासांत सर्वांस मान्य होतो.

भंगतीर्थंततोगच्छेत्सर्वपापप्रणाशनं॥५१॥तत्र गत्वातुराजेंद्रस्नानंतत्रसमाचरेत्॥सप्तजन्मकृतैः पापैर्मुच्यतेनात्रसंशयः॥५२॥

अर्थ- पुढें भंग तीर्थास जावें; कारण तें सर्व पापांचा नाश करणारें अ- सल्यामुळें तेथें स्नान केलें असतां हे राजेंद्रा सात जन्म केलेल्या पातकां- तून मुक्त होतो यांत संशय नाहीं.

वटेश्वरंततोगच्छेत्सर्वतीर्थमनुत्तमं॥तत्रस्नात्वा नरोराजन्गोसहस्रफलंलभेत्॥५३॥

अर्थ- मग सर्व तीर्थांत उत्तम, अशा वटेश्वर तीर्थास जाऊन स्नान के- लें असतां हे राजा मनुष्यास सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें.

संगमेशंततोगच्छेत्सर्वदेवनमस्कृतं॥स्नानमा त्रान्नरस्तत्रचेंद्रत्वंलभतेध्रुवं॥५४॥

अर्थ- संगमेश्वर तीर्थास जावें कारण सर्व देवही त्या तीर्थास नमस्का- र करितात यास्तव त्यांत स्नान करणाऱ्या मानवास इंद्रपद प्राप्त होतें या विषयीं संदेह नाहीं.

कोटितीर्थंततोगच्छेत्सर्वपापहरंपरं॥तत्रस्ना त्वानरोराज्यंलभतेनात्रसंशयः॥५५॥

अर्थ- पुढें कोटि तीर्थास जावें कारण तें तीर्थ सर्व पातकांचें निवारण करण्या विषयीं अत्युत्तम आहे अशा तीर्थांत स्नान करणारास निश्चयें क- रून राज्य प्राप्त होतें.

तत्रतीर्थंसमासाद्यदत्वादानंतुयोनरः॥तस्यती र्थप्रभावेनसर्वंकोटिगुणंभवेत्॥५६॥

अर्थ- त्या कोटितीर्थासि जाऊन जो मानव यथा शक्ति दान करतो त्याचें सर्व कर्म त्या तीर्थाच्या प्रभावानें कोटिगुणित फलदायक होतें.

अथनारीभवेत्काचित्तत्रस्नानंसमाचरेत्॥ गौरीतुल्याभवेत्सापिइंद्रपत्नीनसंशयः॥५७॥

अर्थ- तशीच कोणी स्त्री त्या कोटितीर्थांत स्नान करील तर ती त्या पुण्यानें पार्वती किंवा इंद्रपत्नी शची यां सारिखी होईल.

अंगारेशंततोगच्छेत्स्नानंतत्रसमाचरेत्॥ स्नानमात्रोनरस्तत्ररुद्रलोकेमहीयते॥५८॥

अर्थ- त्या पुढें अंगारेश्वर तीर्थासि जाऊन तेथें स्नान केलें असतां तावन्मात्रानेंच तो मानव रुद्रलोकांत मान्य होतो.

अंगारकचतुर्थ्यांतुस्नानंतत्रसमाचरेत्॥ अक्षयंमोदतेकालंशुचिःप्रयतमानसः॥५९॥

अर्थ- आणि अंगारक चतुर्थीचे दिवशीं जो मानव शुचि असून प्रयत्नयुक्त अंतःकरणानें त्या अंगारेश्वर तीर्थीं स्नान करतो तो अक्षय्यकाल पर्यंत आनंद पावतो.

अयोनिसंभवेस्नात्वानपश्येद्योनिसंकटं॥ पांडवेशंतुतत्रैवस्नानंतत्रसमाचरेत्॥६०॥ अक्षयंमोदतेकालमवध्यस्त्रिदशैरपि॥ विष्णुलोकंततोगत्वाक्रीडतेभोगसंयुतः॥६१॥ तत्रभुक्त्वामहाभोगान्मर्त्यराजोभिजायते॥

अर्थ- तसाच जो प्राणी अयोनिसंभव तीर्थांत स्नान करतो तो पुनः गर्भवास संकटांत पडत नाहीं. तसेंच तेथें स्नान करून पांडवेशाचें दर्शन केल्यानें असुरांसही अवध्य होऊन देवांसहित अक्षय्य काल पर्यंत संतोष पावतो नंतर विष्णुलोकास जाऊन अनेक भोगयुक्त होत्सातां क्रीडा करतो आणि त्या लोकींही मोठें सुख भोगून पुढें पृथ्वीवर मनुष्यांचा राजा होतो.

कठेश्वरंततोगच्छेत्तत्रस्नानंसमाचरेत्॥६२॥ उत्तरायणसंप्राप्तोयदिच्छेत्तस्यतद्भवेत्॥

अर्थ- नंतर उत्तरायण प्राप्त झालें असतां कठेश्वरास गमन करून तेथें स्नान केलें असतां मनुष्यास इच्छित फल प्राप्त होतें.

चंद्रभागां ततो गच्छेत्तत्र स्नानं समाचरेत् ॥ ६३ ॥
स्नातमात्रो नरो राजन् सोमलोके महीयते ॥

अर्थ- हे राजा पुढें नर्मदेंतील चंद्रभागा नामक तीर्थासि जाऊन जो मानव तेथें स्नान करतो तो चंद्रलोकांत पूज्य होतो.

ततो गच्छेत्तु राजेंद्र तीर्थं शक्रस्य विश्रुतं ॥ ६४ ॥
पूजितं देवराजेन देवैरपि नमस्कृतं ॥

अर्थ- हे राजश्रेष्ठा नंतर देवराज इंद्रानें पूजित व देवांनीं ही वंद्य अशा प्रसिद्ध इंद्राच्या तीर्थासि गमन करावें.

तत्र स्नात्वा नरो राजन् दानं दत्वा तु कांचनं ॥ ६५ ॥
अथवा नीलवर्णाभं वृषभं यः समुत्सृजेत् ॥ वृषभ-
स्य तु रोमाणि तत्प्रसूतिकुलेषु च ॥ ६६ ॥ तावद्वर्षस
हस्राणि नरो हरपुरे वसेत् ॥ ततः स्वर्गात्परिभ्रष्टो
राजा भवति वीर्यवान् ॥ ६७ ॥ अश्वानां श्वेतवर्णा-
नां सहस्राणां नराधिप ॥ स्वामी भवति मर्त्येषु तस्य
तीर्थप्रभावतः ॥ ६८ ॥

अर्थ- आणि हे राजा त्या इंद्रतीर्थांत स्नान करून मनुष्यानें कांचन दान करावें अथवा नीलवर्ण वृषभाचा उत्सर्ग करावा ह्मणजे त्या वृषभाच्या अंगावर जितके केश आहेत तसाच त्या वृषभापासून उत्पन्न झालेल्या कुलांतील पशूंच्या अंगावर जितके केश असतील तितकीं सहस्र वर्षें पर्यंत तो मनुष्य शंकराच्या नगरांत वास करितो नंतर पुण्य क्षयानें स्वर्गांतून खालीं पृथ्वीवर येऊन पराक्रमी राजा होतो आणि हे नरश्रेष्ठा तो राजा त्या तीर्थाच्या प्रभावानें या मनुष्यलोकांत श्वेत वर्ण सहस्रावधि अश्वांचा स्वामी होतो.

ततो गच्छेत्तु राजेंद्र ब्रह्मावर्तमनुत्तमं ॥ तत्र स्ना
त्वा नरो राजन् तर्पयेत् पितृदेवताः ॥ ६९ ॥

अर्थ- हे राजेंद्रा नंतर त्या नर्मदेंतील अत्युत्कृष्ट ब्रह्मावर्त नामक तीर्था-

स जाऊन तेथें मनुष्यानें स्नान करून पितर देवता यांचें तर्पण करावें.

उपोष्यरजनीमेकांपिंडंदत्वायथाविधि ॥ कन्या
गतेतथादित्येअक्षयंस्यान्नराधिप ॥ ७० ॥

अर्थ- आणि हे मानव राजा, कन्या राशीस सूर्य असतां एक अहोरात्र उपोषण करून यथा शास्त्र विधीनें पिंड दान करावें तेणें करून त्या पितर देवतांची अक्षय्य तृप्ति होते.

ततोगच्छेच्चराजेंद्र कपिलातीर्थमुत्तमं ॥ तत्रस्ना
त्वानरोराजन् कपिलांयःप्रयच्छति ॥ ७१ ॥ संपूर्ण
पृथिवींदत्वायत्फलंतदवाप्नुयात् ॥

अर्थ- हे राजेंद्रा नंतर कपिला नामक उत्तम तीर्थास जाऊन तेथें स्नान करून जो मानव कपिला (एकवर्णी गाय) दान करितो त्यास संपूर्ण पृथ्वी दानाचें फल प्राप्त होतें.

नर्मदेशंपरंतीर्थंनभूतंनभविष्यति ॥ ७२ ॥ तत्रस्ना
त्वानरोराजन्नश्वमेधफलंलभेत् ॥

अर्थ- हे राजा त्या पुढें नर्मदेश नामक उत्तम तीर्थ आहे या तीर्था सारखें महा तीर्थ पूर्वी नसून पुढें भविष्य कालीं ही होणार नाहीं अशा त्या तीर्थी जो स्नान करतो त्यास अश्वमेध यज्ञाचें फल प्राप्त होतें.

नर्मदादक्षिणेकूलेसंगमेश्वरमुत्तमं ॥ ७३ ॥ तत्र
स्नात्वानरोराजन्सर्वयज्ञफलंलभेत् ॥

अर्थ- हे राजन् तेथून पुढें नर्मदेच्या दक्षिण तीरीं संगमेश्वर नामें उत्कृष्ट तीर्थ आहे त्या तीर्थांत स्नान करणाऱ्या मानवास सर्व यज्ञाचें फल प्राप्त होतें.

तत्रसर्वोथितोराजापृथिव्यामेवजायते ॥ ७४ ॥ सर्व
लक्षणसंपूर्णःसर्वव्याधिविवर्जितः ॥

अर्थ- आणि तो मानव सर्व रोग रहित असून सर्व राज लक्षणानीं संपन्न व प्रजा पालनादिक सर्व कार्यां विषयीं उद्युक्त असा राजा होतो.

नार्मदेचोत्तरेकूलेतीर्थंपरमशोभनं ॥ ७५ ॥ आ
दित्यायतनंदिव्यमीश्वरेणतुभाषितं ॥ तस्यतीर्थे

प्रभावेण दत्तं भवति चाक्षयं ॥७६॥

अर्थ- तसेंच नर्मदेच्या उत्तर तीरीं साक्षात् शिवानीं सांगितलेलें आदित्यायतन नामें दिव्य परम सुशोभित तीर्थ आहे, त्या तीर्थी स्नान करून दान केलें असतां तें स्नान दानादिक सर्व कर्म त्या तीर्थाच्या प्रभावानें अक्षय्य फलदायक होतें.

दरिद्रा व्याधिनो ये तु ये तु दुष्कृतकर्मिणः ॥ मुच्यंते सर्वपापेभ्यः सूर्यलोकं तु यांति ते ॥७७॥

अर्थ- तसेंच जे दरिद्री व्याधिग्रस्त व जे निरंतर पाप करणारे ते सर्व ही त्या आदित्यायतन तीर्थीं स्नान दान केल्यानें आपापल्या सर्व पापांतून मुक्त होऊन सूर्य लोकास गमन करतात.

माघमासे तु संप्राप्ते शुक्लपक्षस्य सप्तमी ॥ वसेदायतने तत्र निराहारो जितेंद्रियः ॥७८॥

अर्थ- तसेंच माघमास प्राप्त झाला असतां त्यांत शुक्लपक्षीं सप्तमीचे दिवशीं जो मानव कांहीं एक आहार न करतां सर्व इंद्रियें स्वाधीन ठेवून त्या आदित्यायतन तीर्थीं वास करील.

न जरा व्याधितो मूको न चांधो बधिरोथवा ॥ सुभगो रूपसंपन्नः स्त्रीणां भवति वल्लभः ॥७९॥

अर्थ- तो मानव जरा, व्याधि, मूकत्व, अंधत्व, बधिरत्व (बहिरेपणा) या दोषानीं युक्त न होतां उत्तम भाग्य व रूप यानीं संपन्न होऊन स्त्रियांस अतिप्रिय होतो.

एवं तीर्थं महापुण्यं मार्कंडेयेन भाषितं ॥ ये न जानंति राजेंद्र वंचितास्ते न संशयः ॥८०॥

अर्थ- हे राजेंद्रा असें तें आदित्यायतन नांवाचें तीर्थ मार्कंडेय ऋषीनीं सांगितलें आहे, जे मानव त्या तीर्थास जाणत नाहींत ते मनुष्य जन्मास येऊन फसले असें जाणावें.

गंगेश्वरं ततो गच्छेत् स्नानं तत्र समाचरेत् ॥ स्नातमात्रो नरस्तत्र स्वर्गलोकमवाप्नुयात् ॥८१॥ मोदते स्वर्गलोकस्थो यावदिंद्राश्चतुर्दश ॥

अर्थ- त्या पुढें गर्गेश्वर तीर्थासि जाऊन तेथें स्नान केलें असतां ताव-न्मात्रानेंच तो मानव स्वर्गलोकास जाऊन तेथें चवदा इंद्र होईत तावत् काल पर्यंत स्वर्गलोकांत वास करून आनंद पावतो.

समीपतस्थितंतस्यनागेश्वरतपोवनं॥८२॥ तत्र स्नात्वातुराजेंद्रनागलोकमवाप्नुयात्॥ बह्वीभि नागिकन्याभिःक्रीडतेकालमक्षयं॥८३॥

अर्थ- त्या गर्गेश्वराचे समीप नागेश्वराचें तपोवन आहे हे राजेंद्रा त्या नागेश्वर तीर्थांत जो स्नान करतो तो नाग लोकीं जाऊन तेथें बहुत नाग-कन्यां सह वर्तमान अक्षय्य काल क्रीडा करतो.

कुबेरभवनंगच्छेत्कुबेरोयत्रसंस्थितः॥ काले श्वरंपरंतीर्थंकुबेरोयत्रतोषितः॥८४॥ तत्रस्नात्वा तुराजेंद्रसर्वसंपदमाप्नुयात्॥

अर्थ- हे राजेंद्रा तेथून पुढें जेथें कुबेर निरंतर उत्तम प्रकारें वास करीत आहे त्या कुबेर भवन नामक तीर्थासि जावें मग ज्या स्थळीं कुबेर संतोष पावला त्या कालेश्वर नामक उत्तम तीर्थीं स्नान केलें असतां सर्व संपत्ति प्राप्त होते.

ततःपश्चिमतोगच्छेत्मारुतालयमुत्तमं॥८५॥ तत्रस्नात्वातुराजेंद्रशुचिर्भूत्वासमाहितः॥ कां चनंतुनतोदद्याद्यथाशक्तिस्रबुद्धिमान्॥८६॥ पु ष्पकेणविमानेनवायुलोकंसगच्छति॥

अर्थ- हे राजश्रेष्ठा पश्चात् पश्चिमेकडून मारुतालय नामक उत्तमतीर्थासि जाऊन तेथें स्नान करून शुचिर्भूत होत्साता स्वस्थ चित्तानें जो आपल्या शक्त्यनुसार सुवर्ण दान करील तो बुद्धिमान् पुष्पक विमानांत बसून वायुलोकास गमन करतो.

यमतीर्थंततोगच्छेन्माघमासेयुधिष्ठिर॥८७॥ कृ ष्णापक्षेचतुर्दश्यांस्नानंतत्रसमाचरेत्॥ नक्तंभो ज्यंततःकुर्यान्नपश्येद्योनिसंकटं॥८८॥

अर्थ- हे धर्मराजा नंतर यमतीर्थासि माघमासीं जाऊन तेथें कृष्णप-

क्षीं चतुर्दशीचे दिवशीं (महाशिवरात्रीस) स्नान करून जो मानव नक्तभोजन करतो तो पुनः गर्भवासाचे संकटांत पडत नाहीं.

अहल्यातीर्थं ततो गच्छेत्स्नानं तत्र समाचरेत् ॥
स्नातमात्रो नरस्तत्र ह्यप्सरोभिः प्रमोदते ॥८९॥

अर्थ:- पुढें अहल्या तीर्थास जाऊन तेथें जो स्नान करतो तो मानव त्या स्नानमात्रानें अप्सरां सह वर्तमान आनंद पावतो.

अहल्या च तपस्तप्त्वा तत्र मुक्तिमुपागता ॥ चैत्रमासे तु संप्राप्ते शुक्लपक्षे चतुर्दशी ॥९०॥ कामदेवदिनेतस्मिन्नहल्यां यस्तु पूजयेत् ॥ यत्र यत्र नरोत्पन्नो वरस्तत्र प्रियो भवेत् ॥९१॥ स्त्रीवल्लभो भवेच्छ्रीमान् कामदेव इवापरः ॥

अर्थ:- त्याच अहल्या नामक तीर्थीं अहल्या तप करून मुक्तीस गेली, त्याच तीर्थाचे तीरीं चैत्रमासाचे शुक्लपक्षीं कामदेवाचे त्रयोदशी तिथीस जो तेथील अहल्या प्रतिमेची पूजा करील तो जेथें जेथें मनुष्य जातींत उत्पन्न होईल तेथें तेथें तो श्रेष्ठ, सर्वांस प्रिय, श्रीमान् व साक्षात् मदना सारखा स्त्रियांस अतिप्रिय असा होईल.

अयोध्यां तु समासाद्य तीर्थं रामस्य विश्रुतं ॥९२॥
स्नातमात्रो नरस्तत्र सर्वपापैः प्रमुच्यते ॥

अर्थ:- पुढें अयोध्येस जाऊन रामाचे प्रसिद्ध तीर्थांत स्नान मात्र केल्यानें मानव सर्व पापांतून मुक्त होतो.

सोमतीर्थं ततो गच्छेत्स्नानं तत्र समाचरेत् ॥९३॥
स्नानमात्रो नरस्तत्र सर्वपापैः प्रमुच्यते ॥

अर्थ:- नंतर सोम तीर्थास जाऊन तेथें स्नान केलें असतां तावन्मात्रानें मनुष्य सर्व पातकांतून मुक्त होतो.

सोमग्रहे तु राजेंद्र पापक्षयकरं नृणां ॥९४॥ त्रैलोक्यविश्रुतं राजन् सोमतीर्थं महाफलं ॥

अर्थ:- हे राजेंद्रा तें सोमतीर्थ चंद्रग्रहण पर्वकालीं मनुष्यांच्या सर्व पापांचा नाश करणारें असून हे राजा असें हें सोमतीर्थ महाफलदायक अ-

सून त्रैलोक्यांत प्रसिद्ध आहे.

यस्तु चांद्रायणं कुर्यात्तस्मिंस्तीर्थे नराधिप ॥ ९५ ॥
सर्वपापविशुद्धात्मा सोमलोकं स गच्छति ॥

अर्थ- हे मनुष्य राजा जो मानव त्या सोमतीर्थावर चांद्रायण व्रत करतो तो सर्व पापांतून मुक्त होऊन चंद्रलोकास जातो.

अग्निप्रवेशेऽथ जले अथवापि त्वनाशके ॥ ९६ ॥ सोमतीर्थे मृतो यस्तु नासौ मर्त्येऽभिजायते ॥

अर्थ- तसेंच अग्निप्रवेश जलप्रवेश किंवा अनशनव्रत यानीं जो मानव त्या सोमतीर्थी देह त्याग करील तो पुनः मनुष्य लोकीं उत्पन्न होत नाहीं.

शुक्रतीर्थं ततो गच्छेत्स्नानं तत्र समाचरेत् ॥ ९७
स्नातमात्रो नरस्तत्र गोलोकेषु महीयते ॥

अर्थ- नंतर शुक्र नांवाचे तीर्थी जाऊन स्नान करणारा मानव तावन्मात्रानेंच गोलोकांत पूज्य होतो.

ततो गच्छेच्च राजेंद्र विष्णुतीर्थमनुत्तमं ॥ ९८ ॥ योधनीपुरमाख्यातं विष्णुस्थानमनुत्तमं ॥ असुरा योधितास्तत्र वासुदेवेन कोटिशः ॥ ९९ ॥ तत्र तीर्थं समुत्पन्नं विष्णुः प्रीतो भवेदिह ॥ अहोरात्रोपवासेन ब्रह्महत्यां व्यपोहति ॥ १०० ॥

अर्थ- तदुत्तर हे राजेंद्रा अत्युत्तम विष्णुतीर्थ आहे तथें गमन करावें; कारण तेथें योधनी पुरनामें प्रसिद्ध अत्युत्तम विष्णुस्थान आहे; तेथें सर्वव्याप विष्णूनीं कोटिशः दैत्याशीं युद्ध केलें, त्या स्थळीं जें तीर्थ उत्पन्न झालें त्या तीर्थी विष्णु प्रसन्न होतात; यास्तव त्या विष्णुतीर्थावर एक अहोरात्र उपवास केला असतां ब्रह्महत्येचा नाश होतो.

ततो गच्छेत्तु राजेंद्र तापसेश्वरमुत्तमं ॥ हरिणी व्याधसंत्रस्ता पतिता यत्र सा मृगी ॥ १ ॥ जले प्रक्षिप्तगात्रा तु अंतरिक्षगता च सा ॥ व्याधो विस्मितचित्तस्तु परं विस्मयमागतः ॥ २ ॥ तेन तापेश्वरं तीर्थं न भूतं न भविष्यति ॥

अर्थ- हे राजोत्तमा त्या पुढें तापसेश्वर नामानें उत्तम तीर्थ आहे तेथें गमन करावें त्या स्थानीं एके समयीं कोणी एक हरिणी व्याधाच्या भयानें अत्यंत त्रस्त होऊन त्या तीर्थांत पडली तेव्हां त्या तीर्थाचें उदक त्या हरिणीच्या देहास लागल्यामुळें ती अंतरिक्षांतील नक्षत्र लोकास गेली ते समयीं तेथें बसलेला कोणी एक व्याध (भिल्ल) चित्तांत अत्यंत विस्मित जाहला, तेणें करून असें तें अतिश्रेष्ठ तीर्थ जाहलें कीं, या सारखें तीर्थ लोकांत दुसरें पूर्वीं नव्हतें व पुढेंही होणार नाहीं.

ततोगच्छेत्तुराजेंद्र ब्रह्मतीर्थमनुत्तमं ॥३॥ अमो
हकमितिख्यातंपितृंश्चैवात्रतर्पयेत् ॥

अर्थ- हे राजवर्या तेथून पुढें अत्युत्कृष्ट ब्रम्हतीर्थ आहे त्यास अमोहक तीर्थ असेंही ह्मणतात त्या तीर्थीं पितरांचें तर्पण करावें.

पौर्णमास्याममायांतु श्राद्धं कुर्याद्यथाविधि ॥४
तत्रस्नात्वानरोराजन्पितृपिंडंतुदापयेत् ॥

अर्थ- आणि हे राजा त्या तीर्थीं जो मानव स्नान करून पूर्णिमा व अमावास्या या दोन तिथींस यथाविधि श्राद्ध पूर्वक पितरांस पिंडप्रदान करील.

गजरूपाशिलातत्रतोयमध्येप्रतिष्ठिता ॥५॥ त
स्यांतुदापयेत्पिंडंवैशाख्यांतुविशेषतः ॥ तृप्यं
तिपितरस्तत्रयावत्तिष्ठतिमेदिनी ॥६॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या ब्रह्म तीर्थांत हत्ती एवढी एक शिला उदकाचे मध्यभागीं स्थापन केलेली आहे त्या शिलेवर सर्वदा पिंडदान करावें आणि वैशाखी पूर्णिमेचे दिवशीं पिंडदान विशेषें करून केलें असतां यावत्काल पर्यंत ही पृथ्वी आहे तावत्काल पर्यंत पितर तृप्त होतात.

ततोगच्छेत्तुराजेंद्रसिद्धेश्वरमनुत्तमं ॥ तत्रस्ना
त्वानरोराजन्गणपत्यंतिकव्रजेत् ॥७॥

अर्थ- नंतर हे राजेंद्रा सिद्धेश्वर नामक उत्तम तीर्थास जाऊन स्नान करणारा मानव हे राजा गणपतीच्या समीप गमन करतो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रलिंगोयत्रजनार्दनः ॥ तत्रस्ना
त्वातुराजेंद्रविष्णुलोकेमहीयते ॥८॥

अर्थ- हे राजेंद्रा त्या पुढें ज्या स्थानीं जनार्दन विष्णु आहेत त्या स्थलीं जाऊन जो स्नान करील; हे महाराजा तो विष्णुलोकीं पूज्य होतो.

नर्मदादक्षिणेकूलेतीर्थंपरमशोभनं॥ वामदेवःस्वयंतत्रतपोतप्यतवैमहत्॥९॥ दिव्यंवर्षसहस्रंतुशंकरंपर्युपासत॥

अर्थ- पुढें नर्मदेच्या दक्षिण तीरीं परम उत्कृष्ट तीर्थ आहे, तेथें साक्षात् मदन स्वतः देवांच्यासहस्र वर्षें पर्यंत महा तप करून शंकराचें उत्तम आराधन करीत होता.

समाधिभंगदग्धास्तुशंकरेणमहात्मना॥१०॥ श्वेतपर्वायमश्चैवहुताशःशुक्रपर्वणि॥

अर्थ- पुढें कांहीं कालानें श्वेतपर्वा, यम व अग्नि या त्रिवर्गानीं शुक्रवार युक्त पर्व दिवशीं शिवांच्या समाधीचा भंग केला असतां त्या महात्म्या शंकरानीं त्या तिघांसही दग्ध केलें.

एतेदग्धास्तुतेसर्वेकुसुमेश्वरसंस्थिताः॥११॥ दिव्यवर्षसहस्रेणतुष्टस्तेषांमहेश्वरः॥ उमयासहितोरुद्रस्तुष्टस्तेषांवरप्रदः॥१२॥ मोक्षयित्वातुतान्सर्वान्नर्मदातटमास्थितः॥

अर्थ- तेव्हां ते दग्ध झालेले सर्वही त्या कुसुमेश्वर शिवाचें आराधन करीत राहिले असतां त्याकालीं देवांच्या सहस्र वर्षांनीं पार्वतीसहित परमेश्वर शंकर प्रसन्न होऊन त्या सर्वांसही वर देऊन त्यांस मुक्त करून त्याच नर्मदा तीरीं राहिले.

ततस्तीर्थप्रभावेणपुनर्देवत्वमागताः॥१३॥ त्वत्प्रसादान्महादेवतीर्थंभवतुचोत्तमं॥ अर्धयोजनविस्तीर्णंक्षेत्रंदिक्षुसमंततः॥१४॥

अर्थ- नंतर कांहीं कालानें त्या तीर्थाच्या प्रभावें करून ते सर्व मदनादिक पुनः आपापल्या देवत्वाचा अधिकार पावले, तेव्हां त्यानीं शंकरांस प्रार्थना केली कीं, हे महादेवा आपल्या प्रसादानें हें उत्तम तीर्थ व या तीर्थाचे तीरीं अष्टदिशांस सभोंवतीं चौरस चौरस लांब रुंद अर्धयोजन विस्तीर्ण

पुण्य क्षेत्र ही होवो.

तस्मिंस्तीर्थे नरः स्नात्वा चोपवासपरायणः ॥ कुसु
मायुधरूपेण रुद्रलोके महीयते ॥ १५ ॥

अर्थ- अशा त्या महा तीर्थांत जो मानव स्नान करून उपोषण करील, तो साक्षात् मदना सारिख्या रूपानें शिवलोकांत वास करील.

वैश्वानरो यमश्चैव कामदेवस्तथा मरुत् ॥ तपस्त
प्त्वा तु राजेंद्र परां सिद्धिमवाप्नुयुः ॥ १६ ॥

अर्थ- हे राजेंद्रा असेंते अग्नि, यम, साक्षात् मदन व वायु हे त्या तीर्थी तप करून उत्तम सिद्धि पावले.

अंकोलस्य समीपे तु नातिदूरे तु नस्यवे ॥ स्नानं दा
नं च तत्रैव भोजनं पिंडमेव च ॥ १७ ॥ अग्निप्रवेशोथ
जले अथवा तु ह्यनाशके ॥ अनिवर्तिका गतिस्तस्य
मृतस्यामुत्र जायते ॥ १८ ॥

अर्थ- तसेंच अंकोल तीर्थापासून अति दूर नसून त्याच्याच समीप स्नान, दान, भोजन, पिंड, अग्निप्रवेश, जल प्रवेश किंवा अनशन व्रत यांतून यथाशक्ति जो कर्मे करील त्यास मरणोत्तर परलोकीं उत्तम पद प्राप्त होऊन तो पुनः गर्भवासांत येत नाहीं.

त्र्यंबकेन तु तोयेन यश्चरुं श्रपयेन्नरः ॥ अंकोलमूले द
त्वा तु पिंडं चैव यथाविधि ॥ १९ ॥ तृप्यंति पितरस्तस्य
यावच्चंद्रदिवाकरौ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो मानव त्र्यंबक तीर्थ संबंधि उदकानें चरु करून अंकोल तीर्थाचे मूल प्रदेशावर यथाविधि पिंडदान करील त्याचे पितर यावत् चंद्र सूर्य आहेत तों पर्यंत तृप्त होतात.

उत्तरे त्वयने प्राप्ते शुचः स्नानं करोति यः ॥ २० ॥ पुरुषो
वाथ स्त्री वापि वसेदायतने शुचिः ॥ सिद्धेश्वरस्य दे
वस्य प्रातः पूजां प्रकल्पयेत् ॥ २१ ॥ स यां गतिमवाप्नो
ति न तां सर्वैर्महामखैः ॥

अर्थ- आणि उत्तरायण प्राप्त झालें असतां जे स्त्री पुरुष त्या अंकोल-

तीर्थी सिद्धेश्वराचे देवाळयांत पवित्र तेनें राहून त्या सिद्धेश्वर देवास घृतानें स्नान घालून प्रातः सांग महा पूजा करतील, ते ज्या गतीस जातात; ती गति महा यज्ञांनीं ही प्राप्त होत नाहीं.

यदावतीर्णः कालेनरूपवान्सुभगोभवेत् ॥२२॥ मर्त्येभवतिराजाचलासमुद्रांतगोचरे॥

अर्थ– नंतर ज्या काळीं तो पुण्यक्षय झाल्यामुळें तेथून खालीं येऊन पृथ्वीवर उत्पन्न होईल त्या काळीं तो रूपवान् व उत्तम ऐश्वर्य संपन्न असून समुद्रवलयांकित पृथ्वीचा सार्व भौम राजा होईल.

क्षेत्रपालंनपश्येत्तुदंडपाणिंमहाबलं॥२३॥ वृथा तस्यभवेद्यात्रात्यदृस्वाकर्णकुंडलं॥ एवंतीर्थफलं ज्ञात्वासर्वेदेवाःसमागताः॥ मुंचंतिकुसुमैर्वृष्टिंतेन तत्कुसुमेश्वरं॥१२४॥

अर्थ– त्या अंकोल तीर्थीं हस्तांत दंड व कर्णकुंडलें धारण केलेल्या महा बलाढ्य क्षेत्रपाल शंकरानें दर्शन जो करीत नाहीं त्याची ती यात्रा व्यर्थ होते असें त्या क्षेत्रांतील तीर्थाचें माहात्म्य जाणून सर्व देव तेथें येऊन त्या शंकरावर दिव्य पुष्पांची वृष्टि करतात. ह्मणून त्या शिवास कुसुमेश्वर ह्मणतात. इतिश्री मत्स्यपुराणे नर्मदा माहात्म्ये नवत्युत्तर शततमोऽध्यायः॥१९०॥

अध्याय १९१ वा

मार्कंडेयउवाच॥ भार्गवेशंततोगच्छेद्यत्रसोयत्रजनार्दनः॥ असुरैस्तुमहायुद्धेमहाबलपराक्रमैः॥१॥

अर्थ– पुनः मार्कंडेय ऋषि बोलले हे धर्मराजा नंतर भार्गवेश तीर्थास गमन करावें, तेथें पूर्वी महा संग्रामांत महा बलिष्ठ पराक्रमी असुरानीं विष्णूचा कांहीं पराभव केला.

हुंकारितास्तुदेवेनदानवाःप्रलयंगताः॥ तत्रस्नात्वातुराजेंद्रसर्वपापैःप्रमुच्यते॥२॥

अर्थ– पश्चात् विष्णूनीं हुंकार केला असतां तेणेंकरून त्या सर्व दा-

नवांचा संहार झाला. हे सार्वभौम राजा, त्या स्थानीं स्नान केलें असतां प्राणी सर्व पापांतून मुक्त होतो.

शक्रतीर्थस्य चोत्पत्तिं शृणु त्वं पांडुनंदन ॥ हिमवच्छिखरे रम्ये नानाधातुविचित्रिते ॥ ३ ॥ तरुणादित्यसंकाशे तप्तकांचनसप्रभे ॥ वज्रस्फटिकसोपाने चित्रवेदीशिलातले ॥ ४ ॥ जांबूनदमये दिव्ये नानापुष्पोपशोभिते ॥ तत्रासीनं महादेवं सर्वज्ञं प्रभुमव्ययं ॥ ५ ॥ लोकानुग्रहदं शांतं गणवृंदैः समावृतं ॥ स्कंदनंदिमहाकालवीरभद्रगणादिभिः ६ उमयासहितं देवं मार्कंडिः पर्यपृच्छत ॥

अर्थ- हे पांडुपुत्रा आतां शक्रतीर्थाची उत्पत्ति श्रवण कर ! ती अशी कीं, पूर्वी सुवर्णादिक अनेक धातूंनीं विचित्र शोभायुक्त असून तरुण सूर्य किंवा अग्नींत तप्त केलेलें सुवर्ण यांसारखें तेजःपुंज, हिरे व स्फटिक यांच्या पायऱ्यांचे जिने, नाना प्रकारचे ओटे यानीं तळच्या सुशोभित शिलानीं युक्त व जांबूनद जातीच्या दिव्य सुवर्णाचें असून अनेक प्रकारच्या पुष्पानीं शोभायमान अशा हिमालय पर्वताच्या रमणीय शिखरावर कार्तिकस्वामी, नंदी, महाकाल व वीरभद्र इत्यादिक गणांचे समुदायानीं सभोंवतीं वेष्टित असून लोकांवर अनुग्रह करणारे, शांत, सर्वज्ञ, काळत्रयीं नाशरहित व सर्वांचे प्रभु असे पार्वतीसहित महादेव बसले असतां त्यांस मार्कंडि ऋषीनें प्रश्न केला.

देवदेव महादेव ब्रह्मविष्णिंद्रसंस्तुत ॥ ७ ॥ संसारभयभीतोहं सुखोपायं ब्रवीहि मे ॥ भगवन्भूतभव्येश सर्वपापप्रणाशनं ॥ तीर्थानां परमं तीर्थं तद्वदस्व महेश्वर ॥ ८ ॥

अर्थ- हे देवाधिदेवा महादेवा, ब्रह्मदेव, विष्णु व इंद्र इत्यादिक देव, ऋषि आदिकरून सर्व तुमची उत्तम प्रकारें स्तुति करतात, तस्मात् आपण सर्वोत्कृष्ट देव आहां आणि मी तर संसार संबंधि तापत्रयानें अत्यंत भयभीत जाहलों आहें, यास्तव आपण मला दुःखनाश पूर्वक सुख

होण्याचा उपाय कथन करावा, आणि हे भगवन् तुह्मी भूत भविष्य व वर्तमान या त्रिकाळीं विद्यमान सर्व जगाचे मुख्य ईश्वर आहां ह्मणून आपण सकल पापांचा नाश करणारें असून संपूर्ण तीर्थांत उत्तम असें तीर्थ मला सांगावें.

ईश्वरउवाच॥ शृणुविप्रमहाप्राज्ञसर्वशास्त्रविशारद॥ स्नानार्थंगच्छशक्रमऋषिसंघैःसमावृत॥९॥

अर्थ- त्या काळीं ईश्वर बोलले कीं, हे सर्व शास्त्रनिपुणा महाबुद्धिसंपन्न भाग्यवंत ब्राह्मणा तूं ऋषि समुदायां सहवर्तमान तीर्थ स्नानार्थ गमन कर.

मन्वत्रिकश्यपाश्चैवयाज्ञवल्क्योशनोंगिराः॥ यमापस्तंबसंवर्ताःकात्यायनबृहस्पती॥१०॥ नारदोगौतमश्चैवसेवंतेधर्मकांक्षिणः॥ गंगाकनखलंपुण्यंप्रयागंपुष्करंगयां॥११॥ कुरुक्षेत्रंमहापुण्यंराहुग्रस्तेदिवाकरे॥

अर्थ- कारण स्वायंभुवादिक मनु अत्रि कश्यप याज्ञवल्क्य शुक्राचार्य अंगिरा यम आपस्तंब संवर्तक कात्यायन बृहस्पति नारद व गौतम हे सर्वही धर्मप्राप्तीच्या इच्छेनें गंगा, पुण्यकारक कनखल तीर्थ, प्रयाग, पुष्करक्षेत्र, गया व महा पुण्यदायक कुरुक्षेत्र यांचें सूर्य ग्रहणांत सेवन करतात.

दिवावायदिवारात्रौशक्कुतीर्थंमहाफलं॥१२॥ दर्शनात्स्पर्शनाच्चैवस्नानाद्दानात्तपोजपात्॥ होमाच्चैवोपवासाच्चशक्कुतीर्थंमहाफलं॥१३॥

अर्थ- आणि नर्मदेंतील जें शक्कुतीर्थ आहे तें तर रात्रीं किंवा दिवसां सर्वदा महा फलदायक आहे; तें असें कीं, दर्शन, स्पर्श, स्नान, दान, तप, जप, होम अथवा उपवास या साधनानीं तें शक्कुतीर्थ महा फल देणारें आहे.

शक्कुतीर्थंमहापुण्यंनर्मदायांव्यवस्थितं॥ चाण

क्योनामराजर्षिःसिद्धिंतत्रसमागतः॥१४॥

अर्थः- असें हें महा पुण्यकारक शकु तीर्थ नर्मदेत आहे; या तीर्थाचे तीरीं चाणाक्य नामें राजर्षि तपानें सिद्धि पावला.

एतत्क्षेत्रंकुविपुलंयोजनंवृत्तसंस्थितं॥ शकुती र्थंमहापुण्यंसर्वपापप्रणाशनं॥१५॥

अर्थः- तसेंच हें शकुतीर्थ सर्व पातकांचा नाश करणारें असून महा पुण्यदायक आहे; आणि याचे तीरीं जें क्षेत्र आहे तें एक योजन परिमित विस्तीर्ण असून वर्तुलाकृति आहे.

पादपाग्रेणदृष्टेनब्रह्महत्यांव्यपोहति॥ जगतीद र्शनाच्चैवभ्रूणहत्यांव्यपोहति॥१६॥

अर्थः- त्याच प्रमाणें या शकु तीर्थांतील वृक्षाच्या अग्रदर्शनानें ब्रह्महत्येचें पातक दूर होत असून या तीर्थ तीरच्या भूमीचें अवलोकनानें गर्भहत्या संबंधि पापांचा नाश होतो.

अहंतत्रऋषिश्रेष्ठतिष्ठामित्युमयासह॥ वैशाखे चैत्रमासेतुकृष्णपक्षेचतुर्दशी॥१७॥ कैलासाच्चा पिनिष्क्रम्यतत्रसन्निहितोऽस्म्यहं॥

अर्थः- हे ऋषिश्रेष्ठा, वैशाख व चैत्र या मासांतील कृष्णपक्षीं चतुर्दशीस मी पार्वती सहवर्तमान कैलासाहून निघून त्या शकु तीर्थीं येऊन तेथें सन्निधानीं राहतों

दैत्यदानवगंधर्वाःसिद्धविद्याधरास्तथा॥१८॥ग णाश्चाप्सरसोनागाःसर्वेदेवाःसमागताः॥ गगन स्थास्तुतिष्ठंतिविमानैःसार्वकामिकैः॥१९॥ शकु तीर्थंतुराजेंद्रत्यागताधर्मकांक्षिणः॥

अर्थः- हे राजेंद्रा तसेंच सर्व दैत्य दानव गंधर्व सिद्ध विद्याधर माझे गण अप्सरा नाग व सर्व देव हे संपूर्ण विषय संपन्न विमानानीं धर्मसंपादनाच्या इच्छेनें येऊन आकाश मार्गांत राहून त्या शकु तीर्थाची स्तुति करीत असतात.

रजकेनयथावस्त्रंशकुंभवतिवारिणा॥२०॥आ

जन्मजनितंपापंशक्रुतीर्थंव्यपोहति॥

अर्थ- जसें रजकानें उदकें करून वस्त्राचें क्षालन केलें असतां तें शुभ्र होतें, तसें जन्म प्रभृति केलेलें पाप शक्रु तीर्थाच्या योगानें नाश पावतें.

स्नानंदानंमहापुण्यंमार्कंडेऋषिसत्तम॥२१॥ शक्रुतीर्थात्परंतीर्थंनभूतंनभविष्यति॥

अर्थ- आणि हे मुनिवर्या मार्कंडे, त्या शक्रु तीर्थी केवल स्नान दान हेंही महा पुण्यकारक आहे तस्मात् शक्रु तीर्थापेक्षां अधिक असें अन्य तीर्थ पूर्वी नव्हतें व पुढेंही होणार नाहीं.

पूर्वेवयसिकर्माणिकृत्वापापानिमानवः॥२२॥ अहोरात्रोपवासेनशक्रुतीर्थेव्यपोहति॥

अर्थ- तसेंच मानवानें पूर्व वयांत पाप कर्मे केल्यावर तो शक्रु तीर्थी जाऊन एक अहो रात्र उपवास केल्यानें त्या सर्व पापांतून मुक्त होतो.

तपसाब्रह्मचर्येणयज्ञैर्दानेनवापुनः॥२३॥ देवार्चनेनयापुष्टिर्नसाक्रतुशतैरपि॥

अर्थ- त्याच प्रमाणें तप ब्रह्मचर्य यज्ञ दान व देवपूजा या कर्मानीं शक्रु तीर्थी जें फल प्राप्त होतें तें फल शतशः यज्ञानींही प्राप्त होत नाहीं.

कार्तिकस्यतुमासस्यकृष्णपक्षेचतुर्दशी॥२४॥ घृतेनस्नापयेद्देवमुपोष्यपरमेश्वरं॥ एकविंशकुलोपेतो नच्यवेदेश्वरात्पदात्॥२५॥

अर्थ- आणि कार्तिकमासीं कृष्णपक्षांतील चतुर्दशीस शक्रु तीर्थी उपोषण करून परमेश्वर शंकरास जो मानव घृतानें स्नान घालतो तो आपले एकवीस कुलांसहित कैलास पदास जातो तो पुनः तेथून खालीं येत नाहीं.

शक्रुतीर्थंमहापुण्यमृषिसिद्धनिषेवितं॥ तत्रस्नात्वानरोराजन्पुनर्जन्मभाक्भवेत्॥२६॥

अर्थ- हें शक्रुतीर्थ महत् असल्यामुळें ऋषि व अनेक सिद्ध या तीर्थाची सेवा करतात अशा या तीर्थांत स्नान केलें असतां मानवास पुन-

र्जन्म प्राप्त होत नाहीं.

स्नात्वावैशक्रतीर्थेतुत्यर्चयेत्द्वृषभध्वजं ॥ कपा
लपूरणंकृत्वातुष्यत्यत्रमहेश्वरः ॥ २७ ॥

अर्थ- नंतर शक्रतीर्थी स्नान करून नंदीनें शोभणाऱ्या ध्वजयुक्त रथांत आरोहण करणाऱ्या शिवाची पूजा करून त्याचे हस्तांतील ब्रह्मकपालस्वशक्त्यनुसार धनादिकानें पूर्ण केलें असतां महादेव संतुष्ट होतात.

अर्धनारीश्वरंदेवंपटेभक्त्यालिखापयेत् ॥ शंख
तूर्यनिनादैश्चब्रह्मघोषैश्चसद्द्विजैः ॥ २८ ॥ जागरं
कारयेत्तत्रनृत्यगीतादिमंगलैः ॥

अर्थ- नंतर एका पटावर अर्धांगी पार्वती सहित त्या शंकराचें चित्र काढून शंख आदिकरून अनेक वाद्यांचे शब्द वेदघोष करणारे उत्तम ब्राह्मण गायन व नृत्य इत्यादिक बहुत प्रकारचीं मंगलें या साधनानीं त्या शिवालयांत रात्रौ जागर करावा.

प्रभातेशक्रतीर्थेतुस्नानंवैदेवतार्चनं ॥ २९ ॥ आ
चार्यान्भोजयेत्पश्चाच्छिवव्रतपरान्शुचीन् ॥

अर्थ- पश्चात् प्रातःकाल झाल्यावर त्या शक्रतीर्थांत स्नान करून देवतार्चन केल्या नंतर शिवव्रत निष्ठ पवित्र आचार्यांस भोजन अर्पण करावें.

दक्षिणांचयथाशक्तिवित्तशाठ्यंविवर्जयेत् ॥ ३०
प्रदक्षिणंततःकृत्वाशनैर्देवांतिकंव्रजेत् ॥

अर्थ- आणि आचार्यादिक सर्व ब्राह्मणांस वित्तशाठ्य (कृपणत्व) न करतां यथा शक्ति दक्षिणा देऊन मग मंद गतीनें प्रदक्षिणा करून देवाचे समीप यावें.

एवंवैकुरुतेयस्तुतस्यपुण्यफलंशृणु ॥ ३१ ॥ दि
व्ययानसमारूढोगीयमानोप्सरोगणैः ॥ शिवतु
ल्यबलोपेतस्तिष्ठत्याभूतसंप्लवं ॥ ३२ ॥

अर्थ- असें हें जो व्रत करतो त्यास या व्रत संबंधि पुण्याचें जें फळ

प्राप्त होतें ते श्रवण कर! तो शिवा समान बलानें युक्त होत्साता दिव्य विमानांत आरोहण करून आसमंताद्भागीं अप्सरांचे समुदाय गायन करीत असून प्रलयकाल पर्यंत आनंद पावतो.

शक्रुतीर्थेतुयानारीददातिकनकंशुभं॥ घृतेनस्नापयेद्देवंकुमारंचापिपूजयेत्॥३३॥

अर्थ:- तसेंच जी स्त्री या शक्रुतीर्थांत स्नान करून घृतानें शिवास स्नान घालून कार्तिकस्वामीची पूजा करून उत्तम सुवर्ण दान करिते.

एवंयाकुरुतेभक्त्यातस्याःपुण्यफलंशृणु॥ मोदतेशर्वलोकस्थायावदिंद्राश्चतुर्दश॥३४॥

अर्थ:- या प्रमाणें जी स्त्री भक्तीनें करिते तिला काय पुण्य लागतें हें श्रवण कर, ती चतुर्दश इंद्र होई तावत्काल पर्यंत शिव लोकांत आनंद पावते.

पौर्णमास्यांचतुर्दश्यांसंक्रांतौविषुवेतथा॥ स्नात्वातुसोपवासःसन्विजितात्मासमाहितः॥३५॥
दानंदद्याद्यथाशक्त्याप्रीयेतांहरिशंकरौ॥ एवंतीर्थप्रभावेनसर्वंभवतिचाक्षयं॥३६॥

अर्थ:- आणि जो पुरुष त्या शक्रुतीर्थीं स्नान करून मन आदिकरून सर्व इंद्रियें स्वाधीन ठेऊन उपवास करून पूर्णिमा, चतुर्दशी, संक्रमण व समान रात्रि, दिवस असतात त्या कालीं एकाग्र चित्तानें, हरि व शंकर यांचे प्रीत्यर्थ यथा शक्ति दान करतो त्याचें सर्व कर्म या रीतीनें शक्रुतीर्थीं अनुष्ठान केलें असतां त्या तीर्थाच्या प्रभावानें अक्षय्य फलदायक होतें.

अनाथंदुर्गतंविप्रंनाथवंतमथापिवा॥ उद्वाहयतियस्तीर्थेतस्यपुण्यफलंशृणु॥३७॥

अर्थ:- तसाच अनाथ किंवा दरिद्री अथवा पराधीन अशा ब्राह्मणाचा विवाह शक्रुतीर्थीं जो करील त्यास त्या लग्न संबंधि पुण्याचें काय फल प्राप्त होतें तें श्रवण कर.

यावत्तद्रोमसंख्याचतत्प्रसूतिकुलेषुच॥ तावद्वर्षसहस्राणिशिवलोकेमहीयते॥३८॥

अर्थः- ज्याचें लग्न केलें त्याच्या देहावरील जितके केश व त्या पासून उत्पन्न झालेल्या कुलांतील संततीचे जितके केश असतील तितकीं सहस्र वर्षे तो शिवलोकांत पूज्य होतो. इतिश्री मत्स्य पुराणे नर्मदामाहात्म्ये शुक्लतीर्थानुकीर्तनं नाम एकनवत्युत्तर शततमोऽध्यायः ॥१९१॥

अध्याय १९२.

मार्कंडेयउवाच ॥ ततस्त्वनरकंगच्छेत्स्नानंतत्रस
माचरेत् ॥ स्नानमात्रोनरस्तत्रनरकंचनपश्यति ॥१॥

अर्थः- मार्कंडेय बोलले हे धर्मराजा नंतर अनरक नांवाचे तीर्थी जाऊन स्नान केलें असतां तावन्मात्रानेंच तो मानव नरकास अवलोकन करीत नाहीं.

तस्यतीर्थस्यमाहात्म्यंशृणुत्वंपांडुनंदन ॥ तस्मिं
स्तीर्थेतुराजेंद्र यस्यास्थीनिविनिक्षिपेत् ॥२॥ वि
लयंयांतिसर्वाणिरूपवान्जायतेनरः ॥ गोतीर्थंतु
ततोगत्वासर्वपापान्प्रमुच्यते ॥३॥

अर्थः- हे सार्वभौमा पांडु पुत्रा अनरक नामक तीर्थाचें माहात्म्य श्रवण करत्या तीर्थांत ज्याच्या अस्थि टाकल्या असतां त्या सर्वांचें पाणी होऊन तो जन्मांतरीं रूपवान् मानव होतो पुढें गो तीर्थास जाऊन स्नान मात्र केल्यानें सर्व पापांतून मनुष्य मुक्त होतो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रकपिलातीर्थमुत्तमं ॥ तत्रस्ना
त्वानरोराजन्गोसहस्रफलंलभेत् ॥४॥

अर्थः- हे राजेंद्रा त्या पुढें कपिला नामक उत्तम तीर्थास जावें, कारण हे राजा त्या तीर्थी स्नान केलें असतां सहस्र गोप्रदानांचें फळ प्राप्त होतें.

ज्येष्ठमासेतुसंप्राप्तेचतुर्दश्यांविशेषतः ॥ तत्रोपो
ष्यनरोभक्त्याकपिलांयःप्रयच्छति ॥५॥ घृतेनदी
पंप्रज्वाल्यघृतेनस्नापयेच्छिवं ॥ सघृतंश्रीफलं
जग्ध्वादत्वाचांतेप्रदक्षिणं ॥६॥ घंटाभरणसंयु
क्तांकपिलांयःप्रयच्छति ॥ शिवतुल्यबलोभूत्वा
नैवासौजायतेपुनः ॥७॥

अर्थ- तसेंच ज्येष्ठमासीं चतुर्दशीस विशेषें करून उपोषण करून त्या कपिला तीर्थी जो मानव भक्तीनें कपिला (एकवर्णी) गायीचें दान करतो, आणि तेथील तीर्थाधिपति शंकरास घृतानें स्नान घालून त्यांचे अग्रभागीं घृताचा दीप लावून घृतसहित श्रीफल (नारळ) ब्राह्मणांस दिल्यावर स्वतः भक्षण करून पश्चात् शिवास प्रदक्षिणा घालून मग घंटा व आभरणें यानीं अलंकृत कपिला गाय ब्राह्मणास देईल तो शिवा समान बलिष्ठ होऊन पुनः जन्मास येत नाहीं.

अंगारकदिनेप्राप्तेचतुर्थ्यांतुविशेषतः॥ पूजयेत्तुशिवंभक्त्याब्राह्मणेभ्यश्चभोजनं॥८॥ अंगारकनवम्यांतुअमायांचविशेषतः॥ स्नापयेत्तत्रयत्नेनरूपवान्सुभगोभवेत्॥९॥

अर्थ- त्याच प्रमाणें मंगळवारीं चतुर्थी आली असतां त्या दिवशीं जो विशेषें करून शिव पूजा करून भक्तीनें ब्राह्मणांस भोजन घालील; आणि भौमवार युक्त नवमी व अमावास्या या तिथींस विशेषें करून यत्नानें शिवास महाभिषेकानें स्नान घालील तो रूपवान् व उत्तम ऐश्वर्यसंपन्न होईल.

घृतेनस्नापयेल्लिंगंपूजयेद्भक्तितोद्विजान्॥ पुष्पकेणविमानेनसहस्रैःपरिवारितः॥१०॥ शैवपदमवाप्नोतियत्रचाभिमतंभवेत्॥ अक्षयंमोदतेकालंयथारुद्रस्तथैवसः॥११॥

अर्थ- तसेंच त्या कपिला तीर्थावरील शिवलिंगास घृतानें स्नान घालून भक्तीनें ब्राह्मणांची पूजा करील तो सहस्रावधि सेवकानीं वेष्टित पुष्पक विमानानें शिव पदास जाऊन तेथें यथेष्ट सुख भोगीत असून शिवाप्रमाणें असंख्य काल आनंद पावतो.

यदातुकर्मसंयोगान्मर्त्यलोकमुपागतः॥ राजाभवतिधर्मिष्ठोरूपवान्जायतेकुले॥१२॥

अर्थ- नंतर ज्या कालीं त्या पुण्याच्या शेषानें तो पुनः मनुष्य लोकास येतो त्या कालीं तो उत्तम राजकुलांत धार्मिक व रूपवान् असा राजा होतो.

ततोगच्छेच्च राजेंद्र ऋषितीर्थमनुत्तमं ॥ तृणबिंदु
र्नामऋषिः शापदग्धोव्यवस्थितः ॥१३॥

अर्थ- हे महाराजा पुढें अत्युत्तम ऋषि तीर्थासि जावें, कारण तेथें तृ-
णबिंदु नामा ऋषि कांहीं एक शापानें पीडित झाल्यामुळें राहिला.

तत्तीर्थस्य प्रभावेण शापमुक्तोभवद्द्विजः ॥ ततोग
च्छेत्तु राजेंद्र गंगेश्वरमनुत्तमं ॥१४॥

अर्थ- तो ब्राम्हण त्या तीर्थाच्या प्रभावानें शापांतून मुक्त झाला हे-
राजाधिराजा तेथून पुढें अत्युत्कृष्ट गंगेश्वर तीर्थासि जावें.

श्रावणेमासिसंप्राप्ते कृष्णपक्षे चतुर्दशी ॥ स्नान
मात्रोनरस्तत्र रुद्रलोकेमहीयते ॥१५॥

अर्थ- कारण श्रावण मासाचे कृष्ण पक्षीं चतुर्दशीस त्या गंगेश्वर ती-
र्थीं स्नानमात्र केलें असतां तो मानव शिवलोकांत पूज्य होतो.

पितॄणांतर्पणंकृत्वामुच्यतेचऋणत्रयात् ॥ गंगेश्व
रसमीपेतु गंगावदनमुत्तमं ॥१६॥ अकामोवासका
मोवातत्रस्नात्वातुमानवः ॥ आजन्मजनितैः पापैर्मु
च्यतेनात्रसंशयः ॥१७॥

अर्थ- आणि त्या तीर्थीं पितरांचें तर्पण करणारा मनुष्य देव ऋषि व पि-
तर या त्रिवर्गांच्या ऋणांतून मुक्त होतो; तसेंच या गंगेश्वरा समीप गंगा-
वदन नामें उत्तम तीर्थ आहे त्या तीर्थीं निष्काम किंवा सकाम जो मानव
स्नान करतो तो जन्म प्रभृति केलेल्या सर्व पातकांतून मुक्त होतो.

तत्रतीर्थेनरःस्नात्वाव्रजेद्यत्रशंकरः ॥ सर्वदाप
र्वदिवसेस्नानंतत्रसमाचरेत् ॥१८॥

अर्थ- त्या गंगावदन तीर्थीं केवळ स्नान केल्यानें तो मानव जेथें शं-
कर वास करतात त्या कैलास लोकास जातो तस्मात् त्या गंगावदन तीर्थांत
सर्वदा विशेषें करून पर्वकाल दिवशीं अवश्य स्नान करावें.

पितॄणांतर्पणंकृत्वात्वश्वमेधफलंलभेत् ॥ प्रयागे
यत्फलंदृष्टंशंकरेणमहात्मना ॥१९॥ तदेवनिखि
लंदृष्टंगंगावदनसंगमे ॥

अर्थ- आणि त्या गंगावदन तीर्थीं पितरांचें तर्पण केलें असतां अश्वमेध यज्ञाचें फल प्राप्त होतें तसेंच महात्म स्वरूप शंकरानीं प्रयाग स्नानांत जें फल अवलोकन केलें तेंच पूर्णफल त्यानीं या गंगावदन तीर्थाचे संगमीं पाहिलें आहे.

तस्यैवपश्चिमेस्थानेसमीपेनातिदूरतः॥२०॥द
शाश्वमेधजननंत्रिषुलोकेषुविश्रुतं॥

अर्थ- त्याच गंगावदन तीर्थाचे पश्चिमेस अति दूर नसून समीपस्थानींच दश (दहा) अश्वमेध यज्ञांचें फल देणारें दशाश्वमेध जनन नामें तीर्थ आहे तें त्रैलोक्यांत प्रसिद्ध आहे.

उपोष्यरजनीमेकांमासिभाद्रपदेतथा॥२१॥अ
मायांचनरःस्नात्वाव्रजतेयत्रशंकरः॥

अर्थ- तसेंच भाद्रपद मासीं अमावास्येचे दिवशीं जो मानव त्या तीर्थांत स्नान करून त्या दिवशीं अहोरात्र उपोषण करतो, तो जेथें शंकर आहेत त्या कैलास पदास जातो.

सर्वदापर्वदिवसेस्नानंतत्रसमाचरेत्॥२२॥पितॄ
णांतर्पणंकृत्वाचाश्वमेधफलंलभेत्॥

अर्थ- यास्तव निरंतरव पर्वदिवशीं त्या दशाश्वमेधजनन नामक तीर्थांत स्नान करावें, आणि या तीर्थीं पितरांचें तर्पण केलें असतां अश्वमेध यज्ञाचें फल प्राप्त होतें.

दशाश्वमेधात्पश्चिमतोभृगुर्ब्राह्मणसत्तमः॥२३
दिव्यंवर्षसहस्रंतुईश्वरंपर्युपासत॥

अर्थ- त्या दशाश्वमेध तीर्थाच्या पश्चिम तीरीं ब्राह्मण श्रेष्ठ भृगु, देवांच्या सहस्र वर्षपरिमित कालपर्यंत सदाशिवांचें आराधन करीत होता.

वल्मीकवेष्टितश्चासीत्पक्षिणांचनिकेतनः॥२४॥
आश्चर्यस्तुमहज्जातमुमायाःशंकरस्यच॥

अर्थ- त्याकालीं भृगुऋषीवर वारुळ वाढून त्यावर पक्षी बसूं लागले, तेव्हां शिव आणि पार्वती या उभयतांमध्यें एक महदाश्चर्यकारक चरित्र झाहलें.

गौरीपप्रच्छदेवेशंकोयमेवंतुसंस्थितः ॥२५॥ देवो
वादानवोवाथकथयस्वमहेश्वर ॥

अर्थ- तें असें कीं, ते समयीं पार्वती देवाधिदेव शंकरास प्रश्न करते कीं, देव किंवा दानव यांतून हा असें तप करीत कोण बसला आहे, हें हे महेश्वरा मला कथन करावें ?

महेश्वरउवाच ॥ भृगुर्नामद्विजश्रेष्ठऋषीणांप्रव
रोमुनिः ॥२६॥ मांध्यायतेसमाधिस्थोवरंप्रार्थय
तेप्रिये ॥

अर्थ- नंतर महादेव बोलले कीं हे प्रिये ब्राह्मणश्रेष्ठ भृगु नामें उत्तम ऋषि असून तो मुनि मज पासून वराची प्रार्थना करण्या साठीं समाधि योगानें माझें ध्यान करीत आहे.

ततः प्रहसितादेवीईश्वरंप्रत्यभाषत ॥२७॥ धूमवत्त
च्छिखाजाताततोद्यापिनतुष्यसे ॥ दुराराध्योसि
तेनत्वंनात्रकार्याविचारणा ॥२८॥

अर्थ- तेव्हां पार्वती हास्य वदन करून शंकरास बोलली कीं, या भृगुऋषीच्या शिखेंतून धूर निघूं लागला आहे तरी अद्यापि आपण त्यास प्रसन्न होत नाहीं तस्मात् तुमचें आराधन परम कठीण आहे यांत संशय नाहीं असें मला भासतें.

महेश्वरउवाच ॥ नजानासिमहादेवित्वयंक्रोधेन
वेष्टितः ॥ दर्शयामियथातथ्यंप्रत्ययंतेकरोम्यहं २९

अर्थ- ते समयीं महेश्वर बोलले हे महादेवि हा भृगु मुनि अंतःकरणांत क्रोधानें बहुत व्याप्त आहे हें तूं जाणत नाहींस परंतु सांप्रत मी याच्या क्रोधाचा यथार्थ अनुभव तुला येण्या साठीं एक चमत्कार दाखवितों.

ततःस्मृतोथदेवेनधर्मरूपोवृषस्तदा ॥ स्मरणात्त
स्यदेवस्यवृषःशीघ्रमुपस्थितः ॥३०॥ वदस्वकमानु
षांवाचमादेशोदीयतांप्रभो ॥

अर्थ- असें बोलून शिवानें आपल्या धर्मस्वरूप नंदीचें स्मरण केलें

तेव्हां त्या देवाच्या स्मरणा बरोबर तो नंदी त्वरेनें शंकराचे अग्रभागीं प्राप्त होऊन मनुष्य वाणीनें त्यांस बोलला कीं, हे प्रभो मला काय आज्ञा असेल ती व्हावी.

भगवानुवाच ॥ वल्मीकं त्वं खनस्वेनं विप्रं भूमौ निपातय ॥ ३१ ॥ योगस्थस्तु ततो ध्यायन् भृगुस्तेन निपातितः ॥ तत्क्षणात् क्रोधसंतप्तो हस्तमुत्क्षिप्य सोऽशपत् ॥ ३२ ॥

अर्थ:- ते समयीं भगवान् शिव बोलले कीं, हे नंदिन् तूं हें वारूळ खणून या ब्राह्मणास भूमीवर पाड अशी आज्ञा होतांच नंदीनें योगधारणेनें ध्यान करणाऱ्या त्या भृगूस तत्क्षणीं पाडिलें तेव्हां तो भृगु क्रोधानें संतप्त होत्साता हात वर करून त्या नंदीस शाप देण्या विषयीं उद्युक्त जाहला.

एवं संभाषमाणस्तु कुत्र गच्छसि भो वृष ॥ अद्याहं संप्रकोपेन प्रलयं त्वां नये वृष ॥ ३३ ॥

अर्थ:- असें भाषण करून तो भृगु ऋषि नंदीस ह्मणाला हे वृषभा तूं कोठें जातोस मी आतांच अति कोपानें तुझा संहार करतों.

धर्षितस्तु तदा विप्रस्त्वांतरिक्षं गतो वृषं ॥ आकाशे प्रेक्षते विप्र एतदद्भुतमुत्तमं ॥ ३४ ॥

अर्थ:- असा नंदीनें व्यथित केलेला तो ब्राह्मण त्या कालीं अंतरिक्षांत नंदीचे अंगावर गेला आणि आकाशांत पहातो तों तेथें एक अति अद्भुत त्या ऋषीनें पाहिलें.

तत्र प्रहसिते रुद्र ऋषिरग्रे व्यवस्थितः ॥ तृतीयलोचनं दृष्ट्वा विलक्ष्यात्पतितो भुवि ॥ ३५ ॥ प्रणम्य दंडवद्भूमौ तुष्टाव परमेश्वरं ॥

अर्थ:- तें असें कीं, आकाशांत नंदी नसून तेथें साक्षात् शिवमात्र हास्य करीत आहेत, अशा त्रिनयन शिवास आश्चर्यानें अवलोकन करून भृगुमुनि त्यां पुढें भूमीवर दंडवत् नमस्कार करून त्यांचे अग्रभागीं उभा राहिला; आणि तो ऋषि त्या परमेश्वर शंकराची स्तुति क-

रूं लागला.

प्रणिपत्य भूतनाथं भवोद्भवं त्वामहं दिव्यरूपं ॥ भ
वातीतो भुवनपते प्रभो तु विज्ञापये किंचित् ॥ ३६ ॥

अर्थ- ती अशी कीं, हे जगत्प्रभो आपण संसारातीत असून सर्व भुवनां-चें पालक आहां, तस्मात् सर्व प्राणिमात्रांचे नाथ असून संपूर्ण प्राण्यांच्या उत्पत्तीस कारण अशा दिव्य स्वरूप शोभापूर्णांस तुह्मास मी नमस्कार करून किंचित् विज्ञापना करतों.

त्वद्गुणनिकरान्वक्तुं कः शक्तो भवति मानुषो नाम ॥ वा
सुकिरपि हि कदाचिद्वदनसहस्रं भवेद्यस्य ॥ ३७ ॥

अर्थ- कारण वासुकीस सहस्र मुखें आहेत तरी तोही कदाचित्कालीं तुमच्या गुणसमुदायांचे वर्णनास समर्थ नाहीं; तेव्हां कोण मानव तुम-चें गुण वर्णन करण्यास समर्थ होईल.

भक्त्या तथापि शंकर भुवनपते त्वत्स्तुतौ मुखरः ॥ वद
तः क्षमस्व भगवन्प्रसीद मे नवचरणपतितस्य ॥ ३८ ॥

अर्थ- तथापि हे भुवनपालक, शंकरा तुमच्या भक्ति बलानेंच मी तुम-च्या स्तुती विषयीं समर्थ होईन, परंतु मी तुमच्या चरणांवर पडलों आहें यास्तव हे भगवन् आपणच माझे भाषण संबंधि अपराधाची क्षमा करून मला प्रसन्न व्हा.

सत्वं रजस्तमस्त्वं स्थित्युत्पत्त्योर्विनाशने देव ॥ त्वां
मुक्त्वा भुवनपते भुवनेश्वर नैव दैवतं किंचित् ॥ ३९ ॥

अर्थ- कारण हे देवा आपण सकल विश्वाचे सृष्टि स्थिति व प्रलय या कार्यां विषयीं क्रमानें सत्व रज तम या तीन गुणांस धारण करतां, तस्मात् हे भुवनपालक जगदीश्वरा तुह्मा वांचून इतर मुख्य दैवत को-णतेंही नाहीं.

यमनियमयज्ञदानवेदाभ्यासाश्च धारणायोगः ॥
त्वद्भक्तेः सर्वमिदं नार्हति हि कलां सहस्रांशां ॥ ४० ॥

अर्थ- तसेंच बारा यम बारा नियम यज्ञ दान वेदाभ्यास व धारणायो-ग हें सर्वही कर्म तुमच्या भक्तीचे सहस्रांशाचीही तुलना कालत्रयीं

करण्यास समर्थ होत नाहीं.

उच्छिष्टरसरसायनखड्गांजनपादुकाविवरसिद्धि

र्वा॥ चिन्हं भवव्रतानां दृश्यंति चेह जन्मनि प्रकटं॥४१

अर्थ- सुवर्णादिक रस, अनेक रसायनें, खड्ग, अंजन, पादुका, परकायप्रवेश व सुतलादि लोकांत गमन या संबंधि सर्व सिद्धि जे शिवव्रतें धारण करतात त्यांस या जन्मांतही प्राप्त झालेल्या प्रत्यक्ष दिसतात.

शाठ्येनन मतिंयद्यपिद्दासिलंभूतिमिच्छतोदे

व॥ भक्तिर्भवभेदकरीमोक्षायविनिर्मितानाथ॥४२

अर्थ- कारण हे देवा आपणास भक्तानें कपटें करून जरी नमस्कार केला तरी तुह्मी त्यांस इच्छित ऐश्वर्य देतां यांत आश्चर्य नाहीं तर हे नाथ तुह्मी आपली भक्ति संसार भयाचे नाशार्थ निर्माण केली आहे.

परदारपरस्वरतंपरपरिभवदुःखशोकसंतप्तं॥पर

वदनवीक्षणपरंपरमेश्वरमांपरित्राहि॥४३॥

अर्थ- असे आपण दयालु आहां यास्तव हे परमेश्वरा आपण सर्व प्रकारें माझें संरक्षण करावें; कारण मी परस्त्रिया व परधन यांच्या अभिलाषा विषयीं निरंतर आसक्त असून दुसऱ्याचा पराभव, दुःख व शोक यानीं अति संताप पावून इतरांचे मुखाकडे अवलोकन करण्या विषयीं आसक्त आहें.

मिथ्याभिमानदग्धंक्षणभंगुरविभवविलसंतं॥

क्रूरंकुपथ्याभिमुखंपतितंमांपाहिदेवेश॥४४॥

अर्थ- तसाच मी मिथ्या अभिमानानें दग्ध झालों असून या क्षणभंगुर संसारांतील ऐश्वर्यानें अत्यंत शोभा मानीत असल्यानें क्रूर व कुपथ्या विषयीं तत्पर असा झाल्यामुळें सर्वथा पतित झालों आहें, यास्तव हे देवाधिदेवा आपण माझें रक्षण करावें.

दीनेद्विजगणसार्थेबंधुजनेनैवदूषिताद्याशा॥तृ

ष्णातथापिशंकरकिंमूढंमांविडंबयति॥४५॥

अर्थ- त्याच प्रमाणें ब्राह्मण गणांचा समुदाय दीन झालेला दृष्टि पड-

त असून त्यांज विषयांची माझी आशा स्वकीय बंधुजनांच्या ममतेनें दूषित केली, तथापि हे शंकरा अशीही बांधवांवरील ममता मूर्ख चित्तास मला लोकांत किती विटंबना युक्त करीत आहे.

तृष्णांहरस्वशीघ्रंलक्ष्मींप्रदस्वयावदासिनींनित्यं॥
छिंधिमदमोहपाशानुत्तारयमांमहादेव॥ ४६॥

अर्थ- यास्तव हे महादेवा स्वजनांवरील माझे मनांतील ममता दूर करून निरंतर रहाणारी पूर्ण संपत्ति मला द्यावी; आणि मद व मोह इत्यादिक अंतःकरणांतील षड्‍रिपूंचे पाश तोडून मला या भवसागरांतून तारावें.

करुणाभ्युदयंनामस्तोत्रमिदंसर्वसिद्धिदंदिव्यं॥
यःपठतिभक्तियुक्तस्तस्यतुष्येत्भृगोर्यथाचशिवः
॥४७॥

अर्थ- ऋषीहो असें हें भृगुऋषीनें केलेलें सर्व सिद्धिदायक करुणाभ्युदय नामक उत्तम स्तोत्र जो भक्तीनें पठन करील त्यास सदाशिव भृगूस प्रसन्न झाले तसे प्रसन्न होतील.

ईश्वरउवाच॥अहंतुष्टोस्मितेवत्सप्रार्थयस्वेप्सि
तंवरं॥उमयासहितोदेवोवरंतस्यत्वदापयत्॥४८॥

अर्थ- नंतर शंकर बोलले हे वत्सा भृगुऋषे मी प्रसन्न जाहलों तूं यथेच्छ वर माग! असें बोलून पार्वती सहित शंकर भृगूस वर देण्या विषयीं उद्युक्त जाहले.

भृगुरुवाच॥यदितुष्टोसिदेवेशयदिदेयोवरोमम॥
रुद्रवेदीभवेदेवमेतत्संपादयस्वमे॥४९॥

अर्थ- ते समयीं भृगुमुनि प्रार्थना करतो कीं, हे देवाधिदेवा आपण प्रसन्न होऊन मला वर देतां तर हें माझें स्थान रुद्रवेदी या नामानें प्रसिद्ध व्हावें हा माझा मनोरथ आपण पूर्ण करावा.

ईश्वरउवाच॥एवंभवतुविप्रेंद्रक्रोधस्त्वानभविष्य
ति॥नपितापुत्रयोश्चैवत्वैकमत्यंभविष्यति॥५०॥

अर्थ- त्याकाळीं ईश्वर बोलले कीं, हे ब्राह्मणश्रेष्ठा हें असें तुझ्या इच्छा-

नुरूप हा क्रोध इतःपर तुला येणार नाहीं; कारण क्रोध मनांत उत्पन्न झा-
ला असतां पिता व पुत्र यांतही परस्परें ऐकमत्य रहात नाहीं.

तदाप्रभृति ब्रह्माद्याः सर्वदेवाः सकिन्नराः॥ उपा
संते भृगोस्तीर्थं तुष्टो यत्र महेश्वरः॥५१॥

अर्थ:- त्या दिवसापासून ब्रह्मादिक सर्व देव किन्नरगणांसहित जे-
थें शंकर भृगूस प्रसन्न जाहले त्या भृगुतीर्था समीप आसमंताद्भा-
गीं वास करतात.

दर्शनात्तस्य तीर्थस्य सद्यः पापात्प्रमुच्यते॥ अ
वशाः स्ववशा वापि म्रियंते यत्र मानवाः॥५२॥ गु
ह्याति गुह्यासुगतिस्तेषां निःसंशयं भवेत्॥

अर्थ:- यास्तव अशाया भृगुतीर्थाचे दर्शनानें प्राणी पापांतून तत्का-
ल मुक्त होतो तसेच स्वतंत्र किंवा परतंत्र जे मानव त्या भृगुतीर्थीं मर-
ण पावतात त्यांस निश्चयें करून सर्व गुह्य गतीपेक्षांही अत्यंत गुह्य
अशी उत्तम गति प्राप्त होते.

एतत्क्षेत्रं सुविपुलं सर्वपापप्रणाशनं॥५३॥ त
त्र स्नात्वा दिवं यांति ये मृतास्ते पुनर्भवाः॥

अर्थ:- हें भृगूचें रुद्रवेदी नामक क्षेत्र सर्व पापांचा समूल नाश कर-
णारें असें अति माहात्म्यानें युक्त असल्यामुळें त्या तीर्थीं स्नान केलें अस-
तां स्वर्गगामी होऊन जे तेथें मरण पावतात ते मुक्त होतात.

उपानहौ च छत्रं च देयमन्नं च कांचनं५४ भोजनं च
यथाशक्त्या त्वक्षयं च तथा भवेत्॥

अर्थ:- या भृगुतीर्थीं जे मनुष्य आपल्या शक्त्यनुसार उपानह (जोडा)
छत्री, अन्न, सुवर्ण किंवा भोजन यांतून जें जें यथासंभव दान करतील
तें त्यांचें अक्षय्य फलदायक होतें.

सूर्योपरागे यो दद्याद्दानं चैव यथेच्छया॥५५॥ दी
यमानं तु तद्दानमक्षयं तस्य तद्भवेत्॥

अर्थ:- तसेंच जो मानव त्या भृगुतीर्थीं सूर्यग्रहण पर्वकालीं यथेच्छ
दान करील तें त्यानें केलेलें दान मोक्षफलदायक होतें.

चंद्रसूर्योपरागेषु यत्फलं त्वमरकंटके ॥ ५६ ॥ तदेव
निखिलं पुण्यं भृगुतीर्थे न संशयः ॥

अर्थ- आणि चंद्र व सूर्य यांचे ग्रहणकालीं अमरकंटक पर्वतावर जें फल आहें तेंच संपूर्ण फल भृगुतीर्थी प्राप्त होतें यांत संशय नाहीं.

क्षरंति सर्वदानानि यज्ञदानतपः क्रियाः ॥ ५७ ॥ न
क्षरेत्तु तपस्तप्तं भृगुतीर्थे युधिष्ठिर ॥

अर्थ- तशींच अन्य स्थळीं केलेलीं, सर्व दानांचें साधन द्रव्य, यज्ञ, दानें, तप व कर्मे हीं नाश पावतात; आणि हे धर्मराजा, भृगुतीर्थी केलेलें तप आदि सर्व कर्म नाश पावत नाहीं.

यस्य वै तपसोग्रेण तुष्टेनैव तु शंभुना ॥ ५८ ॥ सा
न्निध्यं तत्र कथितं भृगुतीर्थे नराधिप ॥

अर्थ- कारण हे राजा उग्र तपानें भृगुऋषीस प्रसन्न झालेल्या शंकरानीं आपलें व ब्रह्मादिक सर्व देवांचें सान्निध्य भृगुतीर्थी कथन केलें आहे.

प्रख्यातं त्रिषु लोकेषु यत्र तुष्टो महेश्वरः ॥ ५९ ॥ ए
वं तु वदतो देवि भृगुतीर्थमनुत्तमं ॥ न जानंति नरा
मूढा विष्णुमायाविमोहिताः ॥ ६० ॥

अर्थ- आणि येथें साक्षात् शिव भृगूस प्रसन्न जाहले या कारणानें हें भृगुतीर्थ त्रैलोक्यांत प्रसिद्ध झालें, असें भृगुतीर्थाचें उत्तम माहात्म्य पार्वतीस सांगणाऱ्या शिवांचें वाक्य विष्णुमायेनें मोहित झालेले मूर्ख मानव जाणत नाहींत

नर्मदायां स्थितं दिव्यं भृगुतीर्थं नराधिप ॥ भृगुती
र्थस्य माहात्म्यं यः शृणोति नरः क्वचित् ॥ ६१ ॥ विमु
क्तः सर्वपापेभ्यो रुद्रलोकं स गच्छति ॥

अर्थ- हे राजा असें हें भृगुतीर्थ नर्मदेंत आहे; अशा उत्तम भृगुतीर्थाचें माहात्म्य जो मनुष्य कदाचित् श्रवण करतो तो सर्व पापांतून मुक्त होऊन शिवलोकास गमन करतो.

ततो गच्छेत्तु राजेंद्र गौतमेश्वरमुत्तमं ॥ ६२ ॥ तत्र

स्नात्वा नरो राजन्नुपवासपरायणः ॥ कांचनेन
विमानेन ब्रह्मलोके महीयते ॥ ६३ ॥

अर्थ- हे राजा नंतर गोतमेश्वर नामक उत्तम तीर्थासि जावें; कारण त्या तीर्थी स्नानपूर्वक उपवास करणारा मानव सुवर्णाच्या विमानांत बसून ब्रह्मलोकीं वास करतो.

धौतपापं ततो गच्छेत्क्षेत्रं यत्र वृषेण तु ॥ नर्मदा-
यां कृतं राजन्सर्वपातकनाशनं ॥ ६४ ॥

अर्थ- पुढें नंदीनें नर्मदेंत ज्या स्थळीं धौत पाप नामें तीर्थ केलें आहे हे राजा त्या सर्व पाप नाशक क्षेत्रास गमन करावें.

तत्र तीर्थे नरः स्नात्वा ब्रह्महत्यां विमुंचति ॥ तस्मिं
स्तीर्थे तु राजेंद्र प्राणत्यागं करोति यः ॥ ६५ ॥

अर्थ- कारण हे राजश्रेष्ठा त्या तीर्थी स्नान केलें असतां मानव ब्रह्महत्येंतून मुक्त होतो तसाच जो प्राणी त्या तीर्थी प्राणत्याग करतो.

चतुर्भुजस्त्रिनेत्रश्च शिवतुल्यबलो भवेत् ॥ वसे
त्कल्पायुतं साग्रं शिवतुल्यपराक्रमः ॥ ६६ ॥

अर्थ- तो चार भुज व तीन नेत्र यानीं युक्त होत्साता शिवासमान बल व पराक्रम यानीं संपन्न होऊन पूर्ण दशसहस्र कल्प पर्यंत कैलासांत वास करतो.

कालेन महता प्राप्तः पृथिव्यामेकराट् भवेत् ॥ ततो
गच्छेच्च राजेंद्र ऐरंडीतीर्थमुत्तमं ॥ ६७ ॥

अर्थ- नंतर पुण्य क्षय झाल्या मुळें तेथून बहु कालानें पृथ्वीवर येऊन सार्वभौम राजा होतो, हे राजेंद्रा त्या पुढें ऐरंडी नामक उत्तम तीर्थास गमन करावें.

प्रयागे यत्फलं दृष्टं मार्कंडेयेन भाषितं ॥ तत्फलं
लभते राजन् स्नातमात्रो हि मानवः ॥ ६८ ॥

अर्थ- कारण प्रयाग तीर्थी शास्त्रांत जें फल पाहिलेलें असून तेथील फल मार्कंडेयानें जें सांगितलें आहे हे राजा तें सर्व फल त्या तीर्थी स्नान करणारा मानव स्नानमात्रानेंच पावतो.

मासिभाद्रपदेचैवशुक्लपक्षेचतुर्दशी ॥ उपोष्य
रजनीमेकांतस्मिंस्नानंसमाचरेत् ॥ ६९ ॥ यम
दूतैर्नबाध्येतरुद्रलोकंसगच्छति ॥

अर्थः- तसेंच भाद्रपद मासाचे शुक्लपक्षीं चतुर्दशीस स्नान करून एक अहोरात्र उपोषण करणारा मानव यमदूतांची पीडा न होतां रुद्रलोकास जातो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रसिद्धोयत्रजनार्दनः ॥ ७० ॥ हि
रण्यद्वीपेतिविख्यातंसर्वपापप्रणाशनं ॥ तत्रस्ना
त्वानरोराजन्धनवान्रूपवान्भवेत् ॥ ७१ ॥

अर्थः- हे राजेंद्रा पश्चात् विष्णु ज्या स्थानीं सिद्धि पावले त्या हिरण्य द्वीप नामक तीर्थासि जावें कारण तें तीर्थ सर्व पातकांचा नाश करणारें आहे तेथें स्नान केलें असतां हे राजा मनुष्य धनवान् व रूपवान् असा होतो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रतीर्थंकनखलंमहत् ॥ गरुडे
नतपस्तप्तंतस्मिंस्तीर्थेनराधिप ॥ ७२ ॥

अर्थः- हे राजेंद्रा मग मोठ्या कनखल तीर्थासि जावें कारण हे मानव राजा त्या तीर्थीं गरुडानें पूर्वी तप केलें.

प्रख्यातंत्रिषुलोकेषुयोगिनीतत्रतिष्ठति ॥ क्रीड
तेयोगिभिःसार्धंशिवेनसहनृत्यति ॥ ७३ ॥ तत्र
स्नात्वानरोराजन्रुद्रलोकेमहीयते ॥

अर्थः- तेणें करून तें कनखल तीर्थ त्रैलोक्यांत प्रसिद्ध जाहलें तेथें कोणी एक योगिनी वास करीत असून ती अनेक योग्यां सहित क्रीडा करिते व शिवा सहवर्तमान नृत्य करिते हे राजा त्या तीर्थीं स्नान करणारा मानव रुद्रलोकीं पूज्य होतो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रहंसतीर्थमनुत्तमं ॥ ७४ ॥ हंसा
स्तत्रविनिर्मुक्तागताऊर्ध्वंनसंशयः ॥

अर्थः- हे सार्वभौमा तेथून पुढें हंस तीर्थासि गमन करावें कारण पूर्वी त्या अत्युत्तम तीर्थीं स्नान करून कितीएक हंस किंवा सारासार विवे-

की योगी मुक्त होऊन उत्तम लोकास गेले यांत संदेह नाहीं.

ततोगच्छेत्तुराजेंद्रसिद्धोयत्रजनार्दनः॥७५॥
वाराहंरूपमास्थायअर्चितःपरमेश्वरः॥

अर्थः- हे श्रेष्ठ राजा नंतर विष्णूनीं वराह रूप धारण करून ज्या स्थानीं परमेश्वर स्वरूपी शिवांची पूजा करून ते सिद्धि पावले त्या स्थळीं गमन करावें.

वराहतीर्थेनरःस्नात्वाद्वादश्यांतुविशेषतः॥७६
विष्णुलोकमवाप्नोतिनरकंनचपश्यति॥

अर्थः- कारण त्या वराह तीर्थी स्नान करीत असून विशेषें करून तो मानव द्वादशीस स्नान केलें असतां नरकाकडे न जाता विष्णुलोकास गमन करतो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रचंद्रतीर्थमनुत्तमं॥७७॥पौर्ण
मास्यांविशेषेणस्नानंतत्रसमाचरेत्॥स्नानमात्रो
नरस्तत्रचंद्रलोकेमहीयते॥७८॥

अर्थः- हे राजाधिराजा तदुत्तर अत्युत्कृष्ट चंद्र तीर्थास जाऊन तेथें स्नान करीत असून विशेषें करून त्या तीर्थी पूर्णिमेस स्नान केलें असतां मानव त्या केवल स्नानानें चंद्रलोकीं पूज्य होतो.

दक्षिणेनतुतीरेणकन्यातीर्थंतुविश्रुतं॥शुक्लपक्षे
तृतीयायांस्नानंतत्रसमाचरेत्॥७९॥प्रणिपत्यतुचे
शानंबलिस्तेनप्रसीदति॥

अर्थः- तसेंच पुढें दक्षिण तीरीं कन्या तीर्थ प्रसिद्ध आहे त्या तीर्थी शुक्लपक्षाच्या तृतीयेस स्नान करून नमस्कार केला असतां तेणें करून बलि प्रसन्न होतो.

हरिश्चंद्रपुरंदिव्यमंतरिक्षेचदृश्यते॥८०॥शक्रध्व
जेसमावृत्ते सुप्तेनागरिकेजने॥नर्मदासलिलौघेन
तरूंत्सं प्लावयिष्यति॥८१॥

अर्थः- त्या पुढें उत्तम हरिश्चंद्र पुर आहे तें अंतरिक्ष लोकांत दिसतें तेथें इंद्रध्वजनामें पर्व झालें त्याकाळीं सर्व नगर वासी लोक निद्रिस्त अस-

तां नर्मदा नदीनें आपल्या उदकाच्या ओघानें तीरस्थ वृक्षांस भिजविलें.

अस्मिं स्थाने निवासः स्यात् विष्णुः शंकरमब्रवीत्॥
दीपेश्वरे नरः स्नात्वा लभेद्बहुसुवर्णकं ॥८२॥

अर्थ- या स्थानीं आपला वास असावा असें विष्णूनीं शंकरास भाषण केलें तस्मात् अशा या दीपेश्वर तीर्थी स्नान करणाऱ्या मानवास बहुत सुवर्णाचा लाभ होतो.

ततो गच्छेत्तु राजेंद्र कन्यातीर्थे सुसंगमे ॥ स्नान
मात्रो नरस्तत्र देव्याः स्थानमवाप्नुयात् ॥ ८३॥

अर्थ- हे राजोत्तमा नंतर उत्तम संगम रूप कन्या तीर्थी स्नान करणारा मानव तावन्मात्रानें गौरी लोकास जातो.

देवतीर्थं ततो गच्छेत्सर्वतीर्थमनुत्तमं ॥ तत्र स्नात्वा
तु राजेंद्र देवतैः सह मोदते ॥८४॥

अर्थ- हे राजश्रेष्ठा मग सर्व तीर्थ नामक देवांच्या तीर्थासि जावें, कारण त्या अत्युत्कृष्ट तीर्थी स्नान करणारा मानव स्वर्गांत देवां सहवर्तमान आनंद पावतो.

ततो गच्छेत्तु राजेंद्र शिखितीर्थमनुत्तमं ॥ यत्तत्र दी
यते दानं सर्वं कोटिगुणं भवेत् ॥८५॥

अर्थ- हे राजवर्या पश्चात् अत्युत्तम शिखि तीर्थासि जावें कारण त्या तीर्थी जें केलेलें दान तें सर्व अन्यस्थलापेक्षां कोटिगुणित फलदायक होतें.

अपरपक्षे त्वमायां तु स्नानं तत्र समाचरेत् ॥ ब्राह्म
णं भोजयेदेकं कोटिर्भवति भोजिता ॥ ८६॥

अर्थ- आणि कृष्ण पक्षीं अमावास्येस स्नान करून तेथें एका ब्राह्मणास भोजन दिलें तरी तेणें करून कोटि ब्राम्हण भोजनाचें फल प्राप्त होतें.

भृगुतीर्थं तु राजेंद्र तीर्थकोटिर्व्यवस्थिता ॥ अका
मो वा सकामो वा तत्र स्नानं समाचरेत् ॥८७॥

अर्थ- हे राजेंद्रा तसेंच त्या भृगुतीर्थी कोटि तीर्थें आहेत या करितां सकाम किंवा निष्काम अशा लोकांनीं त्या तीर्थी स्नान करावें.

अश्वमेधमवाप्नोतिदेवतैःसहमोदते ॥ तत्रसिद्धिं
परांप्राप्तोभृगुस्तुमुनिपुंगवः ॥ अवतारः कृतस्तत्र
शंकरेणमहात्मना ॥८८॥

अर्थ - तेणें करून तो त्या भृगुतीर्थी स्नान करणारा अश्वमेधाचें फल पावून देवां सहवर्तमान स्वर्गांत आनंद पावतो कारण तेथें महात्मस्वरूप शंकरानीं आपलें सान्निध्य निरंतर ठेवलें आहे त्यामुळेंच त्या स्थानीं मुनिश्रेष्ठ भृगुऋषि मोक्ष सिद्धि पावला. इतिश्री मत्स्यपुराणे नर्मदा माहात्म्ये द्विनवत्युत्तर शततमोऽध्यायः ॥१९२॥ .

अध्याय १९३ वा.

मार्कंडेयउवाच ॥ ततोगच्छेत्तुराजेंद्रत्वंकुशेश्वर
मुत्तमं ॥ दर्शनात्तस्यदेवस्यमुच्यतेसर्वपातकैः ॥१॥

अर्थ - मार्कंडेय मुनि ह्मणतात हे महाराज धर्मा नंतर उत्तम अंकुशेश्वरास जावें कारण त्या अंकुशेश्वर देवाचे दर्शनानें हा प्राणी सर्व पातकांतून मुक्त होतो.

ततोगच्छेच्चराजेंद्रनर्मदेश्वरमुत्तमं ॥ तत्रस्नात्वान
रोराजन्स्वर्गलोकेमहीयते ॥२॥

अर्थ - हे राजेंद्रा पुढें उत्तम नर्मदेश्वरास गमन करावें; हे राजा त्या तीर्थी स्नान केलें असतां मानव स्वर्ग लोकीं पूज्य होतो.

अश्वतीर्थंततोगच्छेत्स्नानंतत्रसमाचरेत् ॥ सुभ
गोदर्शनीयश्च भोगवान्जायतेनरः ॥३॥

अर्थ - त्या पुढें अश्वतीर्थास जाऊन तेथें स्नान केल्यानें हा मनुष्य महा भाग्यशाली सुरूप व सुखी असा होतो.

पितामहंततोगच्छेत्ब्रह्मणानिर्मितंपुरा ॥ तत्रस्ना
त्वानरोभक्त्यापितृपिंडंतुदापयेत् ॥४॥ तिलदर्भवि
मिश्रंतुत्धुदकंतत्रदापयेत् ॥ तस्यतीर्थप्रभावेन सर्वं
भवतिचाक्षयं ॥५॥

अर्थ - तेथून पुढें पितामह तीर्थास जावें, कारण तें तीर्थ पूर्वी ब्रह्मदेवानीं निर्माण केलें असून तेथें स्नान करून जो मानव भक्तीनें पितरांस पिंड

देऊन त्यांवर तिल व दर्भ यानीं मिश्रित उदक देईल त्याचें सर्व पुण्य या तीर्थाच्या प्रभावानें अक्षय्य फलदायक होतें.

सावित्रीतीर्थमासाद्य यस्तु स्नानं समाचरेत् ॥ विधूय सर्वपापानि ब्रह्मलोके महीयते ॥ ६ ॥

अर्थः- तदुत्तर जो मनुष्य सावित्रीतीर्थास जाऊन तेथें स्नान करील तो सर्व पापांतून मुक्त होऊन ब्रह्मलोकांत पूज्य होतो.

मनोहरं ततो गच्छेत्तीर्थं परमशोभनं ॥ तत्र स्नात्वा नरो राजन् पितृलोके महीयते ॥ ७ ॥

अर्थः- हे राजा नंतर अत्युत्कृष्ट मनोहर तीर्थास जाऊन तेथें जो मानव स्नान करतो तो पितृलोकांत पूज्य होतो.

ततो गच्छेत्तु राजेंद्र मानसं तीर्थमुत्तमं ॥ तत्र स्नात्वा नरो राजन् रुद्रलोके महीयते ॥ ८ ॥

अर्थः- पश्चात् हे राजवर्या धर्मराजा मानस नामक उत्तम तीर्थास जाऊन स्नान करणारा मानव रुद्रलोकांत पूज्य होतो.

ततो गच्छेन्नृराजेंद्र कुंजतीर्थमनुत्तमं ॥ विख्यातं त्रिषु लोकेषु सर्वपापप्रणाशनं ॥ ९ ॥

अर्थः- मग हे राजेंद्रा कुंजनामक अत्युत्तम तीर्थास गमन करावें कारण हें तीर्थ सर्व पापांचा नाश करण्यामुळें त्रैलोक्यांत प्रसिद्ध आहे.

यान्यान्कामयते कामान् पशुपुत्रधनानि च ॥ प्राप्नुयात्तानि सर्वाणि तत्र स्नात्वा नराधिप ॥ १० ॥

अर्थः- आणि हे राजा गायी, हत्ती, घोडे आदिकरून पशु, पुत्र व बहुत धन इत्यादिक अनेक विषयांतून ज्या ज्या विषयांच्या इच्छेनें त्या कुंजतीर्थीं स्नान करणाऱ्या मानवास ते सर्व विषय प्राप्त होतात.

ततो गच्छेत्तु राजेंद्र त्रिदशज्योति विश्रुतं ॥ यत्र ता ऋषिकन्यास्तु तपोतप्यंत सुव्रताः ॥ ११ ॥

अर्थः- हे राजेंद्रा नंतर त्रिदशज्योति नामें प्रसिद्ध तीर्थास जावें; तें तीर्थ ज्या स्थानीं उत्तम व्रतनिष्ठ ऋषिकन्यानीं तप केलें तेथें आहे.

भर्ता भवतु सर्वासामीश्वरः प्रभुरव्ययः ॥ प्रीतस्तासां

महादेवोदंडरूपधरोहरः॥१२॥विकृताननबीभत्स
र्तीतीर्थमुपागतः॥तत्रकन्यामहाराजवरयन्परमे
श्वरः॥१३॥

अर्थ- तें असें कीं हे महाराज आम्हा सर्वांस नाश रहित प्रभु शंकर पति प्राप्त होवो, तेव्हां भक्त संकटें हरण करणारे दंडधारीमहादेव त्या कन्यांस प्रसन्न होऊन त्यांस वरण्यासाठीं ते परमेश्वर उग्रमुख ब्रह्मचाऱ्याचे बीभत्स रूपानें त्या तीर्थी आले.

कन्यांऋषेवरियतःकन्यादानंप्रदीयतां॥तीर्थंतत्रम
हाराजऋषिकन्येतिविश्रुतं॥१४॥तत्रस्नात्वानरो
राजन्सर्वपापैःप्रमुच्यते॥

अर्थ- यास्तव त्या तीर्थी कन्येस वरणाऱ्या ऋषीस अवश्य कन्या दान करावें, या कारणावरून त्या स्थलीं हे महाराज तें तीर्थ ऋषिकन्या नामें प्रसिद्ध झालें, हे राजा तेथें स्नान करणारा मानव सर्व पापांतून मुक्त होतो.

ततोगच्छेत्त्वराजेंद्रस्वर्णबिंदुरितिस्मृतं॥१५॥तत्र
स्नात्वानरोराजन्दुर्गतिंनचपश्यति॥

अर्थ- हे सार्वभौमा धर्मराजा नंतर स्वर्णबिंदु नामक प्रसिद्ध तीर्थी जाऊन जो मानव स्नान करतो तो दुर्गतीचें अवलोकन करीत नाहीं.

अप्सरेशंततोगच्छेत्स्नानंतत्रसमाचरेत्॥१६॥
क्रीडतेनागलोकस्थोप्सरैःसहमोदते॥

अर्थ- पुढें अप्सरेश तीर्थास जाऊन स्नान करणारा नागलोकांतील अप्सरां सह्वर्तमान क्रीडेंत आनंद पावतो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रनरकंतीर्थमुत्तमं॥१७॥तत्रस्ना
त्वार्चयेद्देवंनरकंचनपश्यति॥

अर्थ- हे राजेंद्रा त्यापुढें नरक नामक उत्तम तीर्थास जाऊन स्नान करून तेथील महादेवाची पूजा करणारा मानव नरकास अवलोकन करीत नाहीं.

भारभूतिंततोगच्छेदुपवासपरोजनः॥१८॥एतत्ती
र्थंसमासाद्यचावतारंतुशांभवं॥अर्चयित्वाविरूपा
क्षंरुद्रलोकेमहीयते॥१९॥

अर्थ- तेथून पुढें भारभूति नामक उत्तम तीर्थास जाऊन तेथें स्नानपूर्वक उपवास करणारा सज्जन मनुष्य त्या तीर्थी विद्यमान विरूपाक्ष नामक शिवाच्या अवताराचें पूजन करील तर तो तेणेंकरून रुद्रलोकीं पूज्य होतो.

अस्मिंस्तीर्थेनरः स्नात्वा भारभूतौमहात्मनः॥ यत्रत
त्रमृतस्यापिध्रुवंगाणेश्वरीगतिः॥२०॥

अर्थ- या भारभूति नामक तीर्थी जो मानव स्नान करील तो महात्मा कोठेंही मरण पावला तरी त्यास निश्चयानें शिवगणांचें आधिपत्य प्राप्त होईल.

कार्तिकस्यतुमासस्यत्वर्चयित्वामहेश्वरं॥ अश्वमे
धाद्दशगुणंप्रवदंतिमनीषिणः॥२१॥

अर्थ- तसेंच कार्तिक मासीं त्या तीर्थी स्नान करून तेथील तीर्थाधिपति शंकरांची पूजा करील त्यास अश्वमेध यज्ञापेक्षां दशगुणित अधिक पुण्य प्राप्त होतें असे ज्ञाते ह्मणतात.

दीपकानांशतंतत्रघृतपूर्णंतुदापयेत्॥ विमानैःसू
र्यसंकाशैःव्रजतेयत्रशंकरः॥२२॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या महादेवाचे अग्रभागीं घृतपूर्ण शंभर दिवे लावले असतां तो दीप अर्पण करणारा सूर्यासमान तेजोमय विमानांत बसून जेथें शंकर वास करतात तेथें गमन करतो.

वृषभंयःप्रयच्छेत्तुशंखकुंदेंदुसप्रभं॥ वृषयुक्तेन
यानेनरुद्रलोकंसगच्छति॥२३॥

अर्थ- आणि त्या भारभूति नामक तीर्थी शंख, कुंदपुष्प किंवा चंद्र यांसारखा शुभ्रकांतियुक्त वृषभ ब्राह्मणास अर्पण केला असतां तेणेंकरून तो मानव वृषभयुक्त विमानानें रुद्रलोकीं जातो.

धेनुमेकांतुयोदद्यात्तस्मिंस्तीर्थेनराधिप॥ पायसं
मधुसंयुक्तंभक्ष्याणिविविधानिच॥२४॥ यथाश
क्त्याचराजेंद्रब्राह्मणान्भोजयेत्ततः॥ तस्यतीर्थप्र
भावेणसर्वंकोटिगुणंभवेत्॥२५॥

अर्थ- हे राजा जो मानव प्रथमतः प्रसूत झालेली एक गाय त्या तीर्थी ब्राह्मणास देऊन पश्चात् मध घातलेली दुधाची खीर व अनेक प्रकारचीं प-

कांचें ब्राह्मणांस देऊन यथाशक्तीनें त्यांस भोजन घालील तर त्याचें तें सर्व पुण्यकर्म अन्यस्थलापेक्षां कोटिगुणित अधिक फलदायक होतें.

नर्मदायाजलंपीत्वाह्यर्चयित्वावृषध्वजं ॥ दुर्गतिं चनपश्यंतितस्मिंस्तीर्थेनराधिप ॥२६॥

अर्थ- हे राजा जे मानव त्या भारभूति नामक तीर्थी शिवपूजा करून नर्मदेचें उदक प्राशन करतील ते दुर्गतीचें अवलोकन करीत नाहींत.

हंसयुक्तेनयानेनरुद्रलोकंसगच्छति ॥ यावच्चंद्र श्चसूर्यश्चहिमवांश्चमहोदधिः ॥२७॥ गंगाद्याः सरि तोयावत्तावत्स्वर्गेमहीयते ॥

अर्थ- आणि त्यांतील कोणताही प्राणी मरणा नंतर हंसयुक्त विमानानें रुद्रलोकास जातो, पुढें यावत् काल पर्यंत चंद्र, सूर्य, हिमालय, महान् समुद्र व भागीरथी आदि करून सर्व नद्या हे सर्व आहेत तावत्काल पर्यंत तो स्वर्गांत वास करतो

अनाशकंतुयःकुर्यात्तस्मिंस्तीर्थेनराधिप ॥२८॥ ग र्भवासेतुराजेंद्रनपुनर्जायतेपुमान् ॥

अर्थ- हे सार्वभौम धर्मराजा जो पुरुष त्या भारभूति नामक तीर्थी अनशन व्रत करील तो पुनः गर्भवासाचे संकटांत कदापि येत नाहीं.

ततोगच्छेत्तुराजेंद्रआषाढीतीर्थमुत्तमं ॥२९॥ तत्र स्नात्वानरोराजन्निंद्रस्यार्धासनंलभेत् ॥

अर्थ- हे राजेंद्रा नंतर आषाढी नामक उत्तम तीर्थास जाऊन तेथें स्नान करणाऱ्या मानवास इंद्राचें अर्धासन प्राप्त होतें.

स्त्रियास्तीर्थंततोगच्छेत्सर्वपापप्रणाशनं ॥३०॥ तत्रापिस्नातमात्रस्यध्रुवंगाणेश्वरीगतिः ॥

अर्थ- पुढें सर्व पाप नाशक स्त्री तीर्थास जाऊन तेथें स्नान करणारास तात्मात्रानेंच गणपति लोकाची प्राप्ति होते.

ऐरंडीनर्मदयोश्चसंगमंलोकविश्रुतं ॥३१॥ तच्चती र्थंमहापुण्यंसर्वपापप्रणाशनं ॥ उपवासपरोभूत्वा नित्यव्रतपरायणः ॥३२॥ तत्रस्नात्वातुराजेंद्रमुच्यते

ब्रह्महत्यया ॥

अर्थ- तस्मात पुढें ऐरंडी व नर्मदा यांचा लोक प्रसिद्ध संगम आहे तें तीर्थ सर्व पापांचें नाशक असून महा पुण्यकारक आहे यास्तव हे राजेंद्रा या तीर्थी स्नानपूर्वक उपोषण करून नित्य व्रतें करणारा ब्रम्हहत्ये पासून मुक्त होतो.

ततोगच्छेत्तुराजेंद्रनर्मदोदधिसंगमं ॥ ३३ ॥ जाम
दग्न्यमितिख्यातंसिद्धोयत्रजनार्दनः ॥ यत्रेष्ट्वाब
हुभिर्यज्ञैरिंद्रोदेवाधिपोभवत् ॥ ३४ ॥

अर्थ- हे राजाधिराजा त्या पुढें नर्मदा व समुद्र यांचा संगम आहे; तेथें परशुरामरूपी विष्णू सिद्धी पावले; या हेतूनें त्या तीर्थास जामदग्न्य तीर्थ असें ह्मणतात; त्या स्थानीं बहुत यज्ञ केल्यामुळें इंद्र, देवांचा राजा झाला.

तत्रस्नात्वातुराजेंद्रनर्मदोदधिसंगमे ॥ त्रिगुणंचा
श्वमेधस्यफलंप्राप्नोतिमानवः ॥ ३५ ॥

अर्थ- हे राजेंद्रा त्या नर्मदा सागर संगमीं जो मानव स्नान करतो त्यास अश्वमेध यज्ञाचें त्रिगुणित फल प्राप्त होतें.

पश्चिमस्योदधेःसंधौस्वर्गद्वारविघट्टनं ॥ तत्रदेवाः
सगंधर्वाऋषयःसिद्धचारणाः ॥ ३६ ॥ आराधयंति
देवेशंत्रिसंध्यंविमलेश्वरं ॥ तत्रस्नात्वानरोराजन्
रुद्रलोकेमहीयते ॥ ३७ ॥

अर्थ- हे राजा तसाच पश्चिम समुद्र व नर्मदा यांच्या संगमाचे संधींत स्वर्गद्वार विघट्टन नामें तीर्थ आहे त्यांत स्नान केलें असतां स्वर्गास जाण्याचें द्वार मोकळें होतें, यास्तव देव, गंधर्व, ऋषि, सिद्ध व चारण हे सर्वही त्या स्थानीं राहून तेथील विमलेश्वर नामक महादेवाचें आराधन करतात, तेथें स्नान केल्यानें मानव कैलासांत पूज्य होतो.

विमलेशंपरंतीर्थनभूतंनभविष्यति ॥ तत्रोपवासं
कृत्वायेपश्यंतिविमलेश्वरं ॥ ३८ ॥ सप्तजन्मकृतंपा
पंहित्वायांत्यमरालयं ॥

अर्थ- तस्मात् या विमलेश्वर नामक तीर्थासारखें आह्मा तीर्थ पूर्वी न-

ह्लतें व पुढेंही होणार नाहीं, या विमलेश तीर्थी जे मानव स्नानपूर्वक उपवास करून त्या विमलेश्वराचें दर्शन करतात, ते सप्त जन्म केलेल्या पापांचा त्याग करून स्वर्गलोकास जातात.

ततोगच्छेत्तुराजेंद्र कौशिकीतीर्थमुत्तमं ॥ ३९॥ तत्र स्नात्वानरोराजन्नुपवासपरायणः ॥ उपोष्यरजनीमेकांनियतोनियताशनः॥४०॥ एतत्तीर्थप्रभावेणमुच्यतेब्रह्महत्यया॥

अर्थ- हे राजश्रेष्ठा नंतर तेथील कौशिकी नामक उत्तम तीर्थास जाऊन जो मानव तेथें स्नान पूर्वक एक अहोरात्र उपवास करून दुसरे दिवशीं नियमयुक्त असून नियमित भोजनानें पारणा करील तो या तीर्थाच्या प्रभावानें ब्रह्महत्येंतून मुक्त होतो.

सर्वतीर्थाभिषेकंतुयः पश्येत्सागरेश्वरं ॥४१॥ योजनाभ्यंतरेतिष्ठन्नावर्तेसंस्थितःशिवः॥तंदृष्ट्वासर्वतीर्थानि दृष्टान्येवनसंशयः॥४२॥ सर्वपापविनिर्मुक्तोयत्ररुद्रःसगच्छति॥

अर्थ- नंतर जो मानव त्या नर्मदासागर संगमीं सर्व तीर्थ निधि समुद्राचे उदकांत सुशोभित असून तेथील एक योजन परिमित प्रदेशांतील जलाच्या भोंवऱ्यांत विद्यमान अशा सागरेश्वर नामक शंकरांस तेथें उभे राहून जो अवलोकन करील, त्यास त्या शिवदर्शनानें सर्व तीर्थ दर्शनाचें फल निःसंशय प्राप्त होतें, आणि तो तेणें करून सकल पातकांतून मुक्त होऊन शिवलोकीं जातो.

नर्मदासंगमंयावद्यावच्चामरकंटकं॥४३॥अत्रांतरेमहाराजतीर्थकोट्योदशस्मृताः॥

अर्थ- हे महाराज नर्मदेच्या उगम स्थान मूल अमरकंटक पर्वता पासून नर्मदा सागर संगमा पर्यंत नर्मदेंत सर्व मिळून दहा कोटि तीर्थे आहेत.

तीर्थात्तीर्थांतरंयत्रऋषिकोटिनिषेवितं ॥४४॥ साग्निहोत्रैस्सुविद्वद्भिःसर्वैर्ध्यानपरायणैः॥ सेवितानेनराजेंद्रत्वीप्सितार्थप्रदायिका॥४५॥

अर्थ- हे राजेंद्रा या नर्मदेंत एक तीर्थापुढें दुसरें तीर्थ लागे त्या प्रदेशा पर्यंत प्रत्येक स्थलीं कोट्यावधि ऋषि त्या तीर्थाची सेवा करतात व अग्नि-होत्री असून विद्वान् व ध्याननिष्ठ असे ते सर्व ऋषी आपले कल्याणार्थ धर्मादिक पुरुषार्थ देणाऱ्या त्या नर्मदेचें सेवन करीत आहेत.

यस्त्विदं वै पठेन्नित्यं शृणुयाद्वापि भावतः॥ तस्य तीर्थानि सर्वाणि त्वभिषिंचंति पांडव॥४६॥

अर्थ- हे पांडुपुत्रा धर्मराजा हें नर्मदासंबंधि तीर्थ माहात्म्य नित्य-शः जो भक्तीनें पठन किंवा श्रवण करतो त्यास तीं सर्व तीर्थे आपल्या स्नानाचें फल देतात.

नर्मदा च सदा प्रीता भवेद्वै नात्र संशयः॥ प्रीत स्तस्य भवेद्रुद्रो मार्कंडेयो महामुनिः॥४७॥

अर्थ- ऋषीहो आणि त्या श्रवण पठन करणारास नर्मदा निरंतर निः-संशय प्रसन्न चित्त असते तसेच शंकर व महामुनि मार्कंडेय हेही त्या वर संतुष्ट होतात.

वंध्या चैव लभेत्पुत्रान्दुर्भगा सुभगा भवेत्॥ क-न्या लभेत भर्तारं यश्च वांछेत्तु यत्फलं॥४८॥ तदेव लभते सर्वं नात्र कार्या विचारणा॥

अर्थ- त्याच प्रमाणें वंध्येस पुत्र होतात, भाग्यहीन स्त्रीस भाग्य होतें, कन्येस पति प्राप्त होतो व जो जें फल इच्छील तें फल त्यास पू-र्णतेनें प्राप्त होतें यांत संदेह नाहीं.

ब्राह्मणो वेदमाप्नोति क्षत्रियो विजयी भवेत्॥४९॥ वैश्यस्तु लभते लाभं शूद्रः प्राप्नोति सद्गतिं॥ मूर्ख स्तु लभते विद्यां त्रिसंध्यं यः पठेन्नरः॥ नरकं च न प-श्येत्तु वियोगं च न गच्छति॥५०॥

अर्थ- तशीच ब्राह्मणास वेदविद्या प्राप्त होते; क्षत्रिय सर्वत्र विजयी होतो; वैश्यास धनादिक वस्तूंचा लाभ होतो; शूद्रास उत्तम गति प्रा-प्त होते; मूढास विद्या प्राप्त होते व जो मानव या तीर्थ माहात्म्याचें त्रि-काल पठन करतो त्यास इहलोकीं प्रिय वस्तूंचा वियोग होत नाहीं व

तो मरणोत्तर नरकास जात नाहीं. इतिश्री मत्स्यपुराणे नर्मदामाहात्म्यसमाप्तौ त्रिनवत्युत्तर शततमोऽध्यायः ॥१९३॥

अध्याय १९४ वा.

सूत उवाच ॥ इत्याकर्ण्य स राजेंद्र ओंकारस्याभिवर्णनं ॥ ततः पप्रच्छ देवेशं मत्स्यरूपं जलार्णवे ॥१॥

अर्थ- सूत बोलतात शौनकादि ऋषीहो, पूर्वीं सांगितलेलें ओंकार प्रतिपाद्य शंकराचें माहात्म्य वर्णन श्रवण करून राजश्रेष्ठ मनु, देवाधिदेव मत्स्यरूप विष्णूंस प्रलयोदकांत पुनः प्रश्न करतो.

मनुरुवाच ॥ ऋषीणां नाम गोत्राणि वंशावतरणं तथा ॥ प्रवराणां तथा साम्यमसाम्यं विस्तराद्वद ॥२॥

अर्थ- कीं, अहो भगवन् ऋषींचीं नामें, गोत्रें तसेंच त्यांच्या वंशांचे आरंभापासून क्रम तसेंच प्रवरांचें ऐक्य व भेद हें सर्व विस्तारें करून मला सांगा.

महादेवेन ऋषयः शप्ताः स्वायंभुवांतरे ॥ तेषां वैवस्वते प्राप्ते संभवं मम कीर्तय ॥३॥

अर्थ- त्याच प्रमाणें पूर्वीं स्वायंभुव मन्वंतरीं महादेवानीं ऋषींस शाप दिला असतां पुढें वैवस्वत मन्वंतरांत त्या ऋषींची उत्पत्ति कशी झाली, तो प्रकार मला कथन करा.

दाक्षायणीनां च तथा प्रजाः कीर्तय मे प्रभो ॥ ऋषीणां च तथा वंशं भृगुवंशविवर्धनं ॥४॥

अर्थ- हे प्रभो आणि दक्ष प्रजापतीच्या कन्यांचा वंश व भृगुवंशास वृद्धिंगत करणारा ऋषींचा वंश आपण मला सांगा.

मत्स्य उवाच ॥ मन्वंतरेस्मिन् संप्राप्ते पूर्वं वैवस्वते तथा ॥ चरित्रं कथ्यते राजन् ब्रह्मणः परमेष्ठिनः ॥५॥

अर्थ- ते समयीं मत्स्य बोलतात. हे राजा पूर्वीं हें वैवस्वत मन्वंतर प्राप्त जाहलें असतां त्या काळीं झालेलें सर्वोत्कृष्ट सत्यलोक पदाधिपति ब्रह्मदेवांचें चरित्र मी तुला सांगतो.

महादेवस्य शापेन त्यक्त्वा देहं स्वयं तथा ॥ ऋषयश्च

ससुभ्दूताश्च्यतेशक्रेमहात्मनः॥६॥देवानांमातरो
दृष्ट्वादेवपत्न्यस्तथैवच॥स्कन्नंशक्रंमहाराजब्र
ह्मणःपरमेष्ठिनः॥७॥

अर्थः- पूर्वी महादेवांच्या शापामुळें ऋषींनीं स्वतः देह त्याग केल्या-
वर हे महाराज देवांच्या माता व देवस्त्रिया यांस पाहून परमेष्ठी म-
हा बुद्धिमंत ब्रह्मदेवांचें वीर्य गलित झालें असतां त्या कालीं ते देहत्या-
ग केलेले पुरातन ऋषि उत्पन्न जाहले.

तज्जुहावततोब्रह्माततोजाताहुताशनात्॥त
तोजातोमहातेजाभृगुश्चतपसांनिधिः॥८॥

अर्थः- ते असे कीं, नंतर ब्रह्मदेवानीं आपल्या त्या वीर्याचा होम केला ते-
व्हां अग्नीपासून ते ऋषी उत्पन्न झाले; तो क्रम असा कीं, प्रथमतः तपां-
चा निधि महातेजस्वी भृगु झाला.

अंगारेष्वंगिराजातोर्चिर्भ्योत्रिस्तथैवच॥मरी
चिभ्योमरीचिस्तततोजातोमहातपाः॥९॥

अर्थः- नंतर अंगारांतून (निखाऱ्यांतून) अंगिरा ऋषि झाला; तसा-
च त्या अग्नीच्या ज्वालांतून अत्रिऋषि झाला; व किरणां पासून महातप-
स्वी मरीचि ऋषि उत्पन्न झाला.

केशैस्तुकपिशोजातःपुलस्त्यश्चमहातपाः॥केशैः
प्रलंबैःपुलहस्ततोजातोमहातपाः॥१०॥

अर्थः- मग अग्नीच्या केशांतून महातपस्वी पिंगट वर्ण युक्त पुलस्त्य
मुनि झाला; व अग्नीच्याच मोठ्या लांब केशां पासून महातपस्वी पुल-
ह नामक ऋषि जन्मास आला.

वसुमध्यात्समुत्पन्नोवसिष्ठस्तुतपोधनः॥भृगुः
पुलोम्नस्तुसुतांदिव्यांभार्यामविंदत॥११॥

अर्थः- पश्चात् अग्नीच्या मध्या पासून तपश्चर्यारूप धनसंपन्न वसिष्ठ
उत्पन्न झाला; आणि पुलोम्याची दिव्य कन्या भृगुऋषीची भार्या झाली.

यस्यामस्यसुताजातादेवाद्वादशयाज्ञिकाः॥भुव
नोभौवनश्चैवसुजन्यःसुजनस्तथा॥१२॥क्रतुः

क्रतुश्च मूर्धा च त्याज्यश्च वसुदश्च ह ॥ प्रभवश्चाव्य यश्चैव दक्षोथ द्वादशस्तथा ॥१३॥ इत्येते भृगवो नाम देवा द्वादश कीर्तिताः ॥

अर्थ- तेव्हां त्या भार्येसि भृगूपासून यज्ञकर्म करणारे बारा देव उत्पन्न झाले ते असे कीं, भुवन, भौवन, सुजन्य, सुजन, शुचि, क्रतु, मूर्धा, त्याज्य, वसुद, प्रभव, अव्यय, तसाच बारावा दक्ष हे भृगुवंशांतील द्वादश देव सांगितले.

पौलोम्यां जनयद्विप्रान्देवानां तु कनीयसः ॥१४॥ च्यवनं तु महाभागमाप्नुवानं तथैव च ॥ आप्नुवानात्मजश्चौर्वो जमदग्निस्तदात्मजः ॥१५॥

अर्थ- तसेच भृगूनें पौलोमीचे उदरीं देवांचे कनिष्ठ बंधू ब्राह्मण उत्पन्न केले; यांत प्रथम महाभाग्यशाली च्यवन व दुसरा आप्नुवान त्याचा पुत्र और्व त्यास पुत्र जमदग्नि झाला.

और्वो गोत्रकरस्तेषां भार्गवाणां महात्मनां ॥ तत्र गोत्रकरास्त्वन्ये भृगोर्वै दीप्ततेजसः ॥१६॥

अर्थ- त्यांतील और्व ऋषि हा त्या महाबुद्धिमंत भृगुवंशस्थ ऋषींच्या गोत्रांची वृद्धी करणारा झाला; आणि प्रकाशमान तेजःपुंज भृगूचें गोत्र वृद्धिंगत करणारे अन्यही बहुत ऋषि झाले.

भृगुश्च च्यवनश्चैव आप्नुवानस्तथैव च ॥ और्वश्च जमदग्निश्च वात्स्यो दंडिर्नडायनः ॥१७॥ वैगायनो वीतिहव्यः पैलश्चैवात्र शौनकः ॥ शौनकायन जीवंतिरावेदः कार्पणिस्तथा ॥१८॥ वैहीनरिर्विरूपाक्षो रौहित्यायनिरेव च ॥ वैश्वानरिस्तथा नीलो लुब्धः सावर्णिकश्च सः ॥१९॥ विष्णुः पौरोऽपि बालाकिरैलिकोऽनंतभागिनः ॥ मृतभार्गेयमार्कंडजविनो वीतिनस्तथा ॥२०॥ मंडमांडव्यमांडूकफेनपाः स्तनितस्तथा ॥ स्थलपिंडः शिखावर्णः शार्कराक्षिस्तथैव च ॥२१॥ जालधिः सौधिकः क्षुभ्यः कु

त्सन्यो मौद्गलायनः ॥ कमयिनो देवपतिः पांडुरोचिः सगालवः ॥ २२ ॥ सांकृत्यश्चातकिः सार्पिर्याज्ञपिंडायनस्तथा ॥ गार्ग्यायिनो गायनश्च ऋषिर्गार्ह्यायनस्तथा ॥ २३ ॥ गोष्ठायनो वात्स्यायनो वैशंपायन एवच ॥ वैकर्णिनिः शांकरवो याज्ञेयिर्भ्राष्ट्रकायनिः ॥ २४ ॥ लालारिर्नाकुलिश्चैव लौक्षिण्योपरिमंडलौ ॥ अलुकिः सौचकिः कौत्सस्तथान्यः पैंगलायनिः २५ सात्यायनिर्मालायनिः कौटिलिः कौचहस्तिकः ॥ सौहसोक्तिः सकौवाक्षिः कौशिश्चांद्रमसिस्तथा ॥ २६ ॥ नैकजिह्वो जिह्वकश्च व्यधाद्यो लोहवैरिणः ॥ शारद्वतिकनेतिष्यो लोलाक्षिश्चलकुंडलः ॥ २७ ॥ वागायनिश्चानुमतिः पूर्णिमागतिकोसकृत् ॥ सामान्येन यथा तेषां पंचैते प्रवरा मताः ॥ २८ ॥ भृगुश्च च्यवनश्चैव आप्नुवानस्तथैवच ॥ और्वश्च जमदग्निश्च पंचैते प्रवरा मताः ॥ २९ ॥

अर्थ- ते असे कीं, भृगु, च्यवन, आप्नुवान, और्व, जमदग्नि, वात्स्य, दंडि, नडायन, वैगायन, वीतिहव्य, पैल, शौनक, शौनकायन, जीवंति, आवेद, कार्पणि, वैहीनरि, विरूपाक्ष, रौहित्यायनि, वैश्वानरि, नील, लुब्ध, सावर्णिकि, विष्ण, पौर, बालाकि, ऐलिक, अनंतभागी, मृग, मार्गेयि, मार्कंडि, जवी, वीती, मंड, मांडव्य, मांडूक, फेनप, स्तनित, स्थलपिंड, शिखावर्ण, शार्कराक्षि, जालधि, सौधिक, क्षुभ्य, कुत्सन्य, मौद्गलायन, कमयिन, देवपति, पांडुरोचि, गालव, सांकृत्य, चातकि, सार्पि, याज्ञपिंडायन, गार्ग्यायिन, गायन, गार्ह्यायन नामक ऋषि, गोष्ठायन, वात्स्यायन, वैशंपायन, वैकर्णिनि, शांकरव, याज्ञेयि, भ्राष्ट्रकायनि, लालारि, नाकुलि, लौक्षिण्य, उपरिमंडल, अलुकि, सौचकि, कौत्स, तसाच दुसरा पैंगलायनि, सात्यायनि, मालायनि, कौटिलि, कौचहस्तिक, सौहसोक्ति, कौवाक्षि, कौशि, चांद्रमसि, नैकजिह्व, जिह्वक, व्यधाद्य, लोहवैरी, शारद्वतिक, नेतिष्य, लोलाक्षि, चलकुंडल, वागायनि, अनुमति, पूर्णिमागतिक, असकृत, असे सामान्य

न: भृगुगोत्राची वृद्धि करणारे आहेत त्यांत भृगु च्यवन आप्नुवान औंर्व व जमदग्नि हे पांच श्रेष्ठ असून हेच त्या सर्वांचे पंच प्रवर आहेत.

अतःपरं प्रवक्ष्यामि शृणु त्वन्यान् भृगूद्वहान् ॥ जमदग्निर्विदश्चैव पौलस्त्यो वैजभृत्तथा ॥ ३० ॥ ऋषिश्चोभयजातश्च कायनिः शाकटायनः ॥ औवेयो मारुताश्चैव सर्वेषां प्रवराः शुभाः ॥ ३१ ॥

अर्थ- अतःपर भृगुकुलाची वृद्धि करणारे अन्यही ऋषि मी सांगतों तें तूं श्रवण कर. जमदग्नि, विद, पौलस्त्य, वैजभृत्, उभयजात नामक ऋषि, कायनि, शाकटायन, औवेय, मारुत हे ऋषि सर्वांस शुभकारक असून श्रेष्ठ आहेत.

भृगुश्च च्यवनश्चैव आप्नुवानस्तथैव च ॥ परस्परमवैवाह्या ऋषयः परिकीर्तिताः ॥ ३२ ॥

अर्थ- आणि भृगु च्यवन आप्नुवान हे ऋषी परस्पर विवाहास योग्य नाहींत असें सांगितलें आहे

भृगुदासो मार्गपथो ग्राम्यायनिकटायनी ॥ आपस्तंबिस्तथा बिल्विर्नैकशिः कपिरेव च ॥ ३३ ॥ आर्ष्टिषेणो गार्दभिश्च कार्दमायनिरेव च ॥ आश्वायनिस्तथा रूपिर्येचार्षेयाः प्रकीर्तिताः ॥ ३४ ॥

अर्थ- तसेच भृगुदास, अमार्गपथ, ग्राम्यायनि, कटायनि, आपस्तंबि, बिल्वि, नैकशि, कपि, आर्ष्टिषेण, गार्दभि, कार्दमायनि, आश्वलायनि, रूपि या नांवाचे हे ऋषि स्वकीय वंशाची वृद्धि करणारे प्रसिद्ध आहेत

भृगुश्च च्यवनश्चैव आप्नुवानस्तथैव च ॥ आर्ष्टिषेणस्तथा रूपिः प्रवराः पंच कीर्तिताः ॥ ३५ ॥ परस्परमवैवाह्या ऋषयः परिकीर्तिताः ॥

अर्थ- भृगु, च्यवन, आप्नुवान, आर्ष्टिषेण, तसाच, रूपि हे पांच प्रवर सांगितले आहेत व हे ऋषि परस्परांशीं विवाहास योग्य नाहींत

असे सांगितले आहेत.

यस्कोवावीतिहव्योवामथितस्तस्तथादमः ३६ जै
वंत्यायनिमौंजश्चपिलिश्चैवचलिस्तथा ॥ भागि
लोभागवित्तिश्च कौशापिस्त्वथकाश्यपिः ॥ ३७ ॥
बाल्पिःश्रमदागेपिः सोरस्तिथिस्तथैवच ॥ गार्गी
यस्त्वथजाबालिस्तथापौष्णायनोऋषिः ॥ ३८ ॥
ग्रामदश्चतथैतेषामार्षेयाःप्रवरामताः

अर्थ:- आणि यस्क, वीतिहव्य, मथित, तसाच दम, जैवंत्यायनि, मौंज, पिलि, चलि, भागिल, भागवित्ति, कौशापि, काश्यपि, बाल्पि, श्रमदागेपि, सोर, तिथि, तसाच गार्गीयि, जाबालि, पौष्णायन, ग्रामद, हे ऋषी भृगुकुलांतील वंश वृद्धि करणारे असून श्रेष्ठ आहेत.

भृगुश्च वीतहव्यश्चतथारैवसवैवसौ ॥ ३९ ॥ पर
स्परमवैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः ॥

अर्थ:- तसेच भृगु, वीतहव्य, रैवस, वैवस हे ऋषी एकमेकांशीं विवाहाविषयीं योग्य नव्हेत असें शास्त्रांत सांगितलें आहे.

शालायनिःशाकराक्षोमैत्रेयःखांडवस्तथा ॥ ४० ॥
द्रौणायनोरौक्मायनापिशलीचापिकायनिः ॥ हं
सजिह्वस्तथैतेषामार्षेयाःप्रवरामताः ॥ ४१ ॥

अर्थ:- तसेच भृगुकुलांत शालायनि, शाकराक्ष, मैत्रेय, खांडव, द्रौणायन, रौक्मायन, आपि शली, आपिकायनि, हंसजिह्व, हेही ऋषी स्वकीय वंशाची वृद्धि करणारे श्रेष्ठ आहेत.

भृगुश्चैवाथवध्र्यश्वोदिवोदासस्तथैवच ॥ परस्प
रमवैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः ॥ ४२ ॥

अर्थ:- आणि भृगु, वध्र्यश्व, दिवोदास हे ऋषी परस्पर विवाहास योग्य नाहींत असे शास्त्रांत निर्णीत आहेत.

एकायनोयाज्ञपतिर्मत्स्यगंधस्तथैवच ॥ प्रत्यूहश्च
तथासौरिश्चौक्षिर्वैकार्दमायनिः ॥ ४३ ॥ तथागृत्स
मदोराजन्सनकश्चमहान्ऋषिः ॥ प्रवरास्तथा

कानामार्षेयाः परिकीर्तिताः ॥४४॥

अर्थ- हे राजा तसेच एकायन, यज्ञपति, मत्स्यगंध, मत्यूह, सौरि, औक्षि, कार्दमायनि, गृत्समद, महान् ऋषी सनक हे ऋषी सांगितले-त्या ऋषि वंशांत मसुख असून स्वकीय वंशाची वृद्धि करणारे आहेत.

भृगुर्गृत्समदश्चैव आर्षावेतौ प्रकीर्तितौ ॥ परस्परमवेवात्याऋषीवै परिकीर्तितौ ॥४५॥

अर्थ- त्याच प्रमाणें भृगु, गृत्समद हे दोघे वेद प्रवर्तक असून परस्पर विवाहास योग्य नाहींत असें सांगितलें आहे.

एतेतवोक्ता भृगुवंशजाता महानुभावान्नृपगोत्रकाराः ॥ एषांतुनाम्नापरिकीर्तितेनपापंसमग्रं विजहातिजंतुः ॥४६॥

अर्थ- हे राजा महा समर्थ असून स्वगोत्र प्रवर्तक असे हे भृगुवंशांत उत्पन्न झालेले अनेक ऋषी तुला सांगितले; कारण त्यांच्या नामकीर्तनानें मनुष्य संपूर्ण पातकाचा त्याग करतो. इतिश्री मत्स्यपुराणे भृगुवंशानुकीर्तनंनाम चतुर्नवत्युत्तर शततमोऽध्यायः॥१९४

अध्याय १९५वा.

मत्स्यउवाच ॥ मरीचितनयाराजन्सुरूपानाम विश्रुता ॥ भार्याचांगिरसोदेवास्तस्याःपुत्रादश स्मृताः॥१॥

अर्थ- मत्स्य बोलतात हे राजन् मरीचि ऋषीची कन्या सुरूपा या नावानें मख्यात होती ती अंगिरा मुनीची भार्या झाली असतां तिला दहा देव, पुत्र झाले.

आत्मायुर्दमनोदक्षःसदःप्राणस्तथैवच ॥ हविष्मांश्चगविष्ठश्चऋतःसत्यश्चतेदश ॥२॥

अर्थ- ते असे कीं, आत्मा१ आयु२ दमन३ दक्ष४ सद५ तसाच प्राण६ हविष्मान्७ गविष्ठ८ ऋत९ सत्य१० या नामानीं प्रसिद्ध ते दहा आहेत.

एतेचांगिरसोनामदेवावैसोमपायिनः ॥ सुरूपाज

नयामासऋषीन्सर्वेश्वरानिमान् ॥ ३ ॥

अर्थ- त्या सुरूपानामें मरीचिऋषिकन्येनें त्या अंगिरामुनीपासून ह्या सर्वेश्वर ऋषींस उत्पन्न केलें ते हे आंगिरस नांवाचे देव, यज्ञांत सोम पान करणारे आहेत.

बृहस्पतिंगौतमंचसंवर्त्तमृषिमुत्तमं ॥ उतथ्यंवामदेवंचअजस्यमृषिजंतथा ॥ ४ ॥ इत्येतेऋषयः सर्वे गोत्रकाराःप्रकीर्तिताः ॥ तेषांगोत्रसमुत्पन्नान्गोत्रकारान्निबोधमे ॥ ५ ॥

अर्थ- आणि ती सुरूपास्त्री अंगिराऋषी पासून बृहस्पति, गौतम, उत्तम संवर्त नामक ऋषि, उतथ्य, वामदेव, अजस्य, ऋषिज, यानांवाच्या पुत्रांस प्रसवली हे सर्व ऋषी स्वकीय गोत्रांचे प्रवर्तक असून त्यांच्या गोत्रांत उत्पन्न झालेले गोत्र वृद्धि करणारे ऋषि मज पासून श्रवण कर.

उतथ्योगौतमश्चैवतौलेयोभिजितस्तथा ॥ सार्धनेमिःसलौगाक्षिःक्षीरःकौष्टिकिरेवच ॥ ६ ॥ राहुकर्णिःसौपुरिश्चकैरातिःसामलोमकिः ॥ पौषजितिर्भार्गवतोऋषिश्चैरीडवस्तथा ॥ ७ ॥ कारोटकःसजीवी चउपबिंदुसुरैषिणौ ॥ वाहिनीपतिवैशालीक्रोष्टाचैवारुणायनिः ॥ ८ ॥ सोमोत्रायनिकासोरुकौशल्याः पार्थिवास्तथा ॥ रौहिण्यायनिरेवाग्नीमूलपःपांडुरेव च ॥ ९ ॥ क्षपाविश्वकरोरिश्चपारिकाराररिरेवच ॥ त्र्यार्षेयाःप्रवराश्चैवतेषांचप्रवरान्शृणु ॥ १० ॥

अर्थ- ते असे कीं उतथ्य, गौतम, तौलेय, अभिजित, सार्धनेमि, लौगाक्षि, क्षीर, कौष्टिकि, राहुकर्णि, सौपुरि, कैराति, सामलोमकि, पौषजिति, भार्गवत, तसाच एरीडव ऋषि, कारोटक, सजीवी, उपबिंदु, सुरैषी, वाहिनीपति, वैशालि, क्रोष्टा, आरुणायनि, सोमोत्रायनि, कासोरु, कौशल्य, पार्थिव, रौहिण्यायनि, रेवाग्नि, मूलप, पांडु, क्षपाविश्वकर, अरि, पारिकारारि यासांगीतलेल्या ऋषींचे वेदोक्त तीन प्रवर आहेत ते श्रवण कर.

अंगिराःसुवचोतथ्योउशिजश्चमहानृषिः ॥ परस्पर

मवैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः॥११॥

अर्थ- तेअसेकीं अंगिरा,उत्तमभाषण करणाराउतथ्य,महर्षिउशिजया तीन प्रवरांचे हे ऋषी परस्परें विवाहास योग्य नाहीत असें सांगितलें

आत्रेयायनिसौवेष्योअग्निवेश्यःशिलास्थलिः॥बा लिशायनिश्चैकेपीवाराहिर्बाष्कलिस्तथा॥१२॥सौ टिश्चत्रिणकर्णिश्चप्रावहिश्चाश्वलायनिः॥वाराहि र्बर्हिसादीचशिखाग्रीविस्तथैवच॥१३॥कारकिश्च महाकापिस्तथाचोडुपतिःप्रभुः॥कौचकिर्धूमितश्चै वपुष्पान्वेषिस्तथैवच॥१४॥सोमतन्विर्ब्रह्मतन्विःसा लडिर्बालडिस्तथा॥देवरारिर्देवस्थानिर्हारिकर्णिःस- रिद्भविः॥१५॥प्रावेपिःसाद्यसुग्रीविस्तथागोमेदगंधि कः॥मत्स्याच्छाद्योमूलहरःफलाहारस्तथैवच॥१६ ॥गांगोदधिःकौरुपतिःकौरुक्षेत्रिस्तथैवच॥नायकि र्जैत्यद्रोणिश्चजैव्हलायनिरेवच॥१७॥आपस्तंबि र्मौंजवृष्टिर्मार्ष्टिःपिंगलिरेवच॥पैलश्चैवमहातेजाः शालंकायनिरेवच॥१८॥व्यार्ख्येयोमारुतश्चैषांत्र्या र्षेयःप्रवरोनृप॥

अर्थ- तसेच आत्रेयायनि,सौवेष्य, अग्निवेश्य,शिलास्थलि, बालिशायनि,ऐकेपि,वाराहि,बाष्कलि,सौटि, त्रिणकर्णि,प्रावहि,आश्वलायनि, वाराहि, बर्हिसादी, शिखाग्रीवि,कारकि,महाकापि, तसाच समर्थ उडुपति,कौचकि,धूमित,पुष्पान्वेषि,सोमतन्वि, ब्रह्मतन्वि,सालडि, बालडि,देवरारि, देवस्थानि, हारिकर्णि, सरिद्भवि,प्रावेपि, साद्यसुग्रीवि,गोमेदगंधिक, मत्स्याच्छाद्य,मूलहर, फलाहार,गांगोदधि,कौरुपति, कौरुक्षेत्रि,नायकि, जैत्यद्रोणि, जैव्हलायनि,आपस्तंबि,मौंजवृष्टि,मार्ष्टि पिंगलि, महातेजा पैल, शालंकायनि, व्यार्ख्येयव,मारुत,यासर्व ऋषींस, हे राजा वेदोक्तीनप्रवर आहेत

अंगिराःप्रथमस्तेषांद्वितीयश्चबृहस्पतिः॥१९॥तृ- तीयश्चभरद्वाजःप्रवराःपरिकीर्तिताः॥परस्परम-

वैवाह्याइत्यतेपरिकीर्तिताः॥ २०॥

अर्थ तेअसेकीं प्रथम अंगिरा, दुसरा बृहस्पति वतिसरा भरद्वाज हे तीन प्रवर पूर्वीसांगितलेल्या आंगिरसगोत्रांतील ऋषींचे असल्यावरून तेपरस्पर विवाह संबंधास अयोग्य असेंसांगितलें आहे.

काण्वायनाः कोपचयास्तथावात्स्यतरायणाः॥ भ्रा
ष्ट्रकृद्राष्ट्रपिंडीचलैंद्राणिःसायकायनिः॥ २१॥ क्रो
ष्टाक्षीबहुवीतीचतालकृन्मधुरावहः॥ लावकृद्गाल
विद्गाथीमार्कंटिःपौलिकायनिः॥ २२॥ स्कंदसश्चत
थाचक्रीगार्ग्यःश्यामायनिस्तथा॥ बालाकिःसाह
रिश्चैवपंचार्षेयाःप्रकीर्तिताः॥ २३॥

अर्थ- तसेच काण्वायन, कोपचय, वात्स्यतरायण, भ्राष्ट्रकृत्, राष्ट्रपिंडी लैंद्राणी, सायकायनि, क्रोष्टाक्षी, बहुवीती, तालकृत्, मधुरावह, लाव कृत्, गालवित्, गाथी, मार्कटि, पौलिकायनि, स्कंदस, हेही आंगिरस- गोत्रांतील असून यांसचक्री, गार्ग्य, श्यामायनि, बालाकि वसाहरि हे पां चऋषि लोकांत वेदाची प्रवृत्ति करणारे आहेत.

अंगिराश्चमहातेजादेवाचार्योबृहस्पतिः॥ भरद्वाजः
स्तथागर्गःसैन्यश्चभगवानृषिः॥ २४॥ परस्परम
वैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः॥

अर्थ- आणि महातेजस्वी अंगिरा, देवगुरु बृहस्पति, भरद्वाज, गर्ग व- सैन्यनामक महा तपस्वी ऋषि या पंच प्रवरांचे पूर्वीचे ऋषि परस्पर वि वाहास योग्य नाहीत.

कपीतरःस्वस्तितरोदाक्षिःशक्तिःपतंजलिः॥ २५॥
भूयसिर्जलसंधिश्चबिंदुर्मोदिःकुसीदकिः॥ ऊर्वस्त
राजकेशीचवौषडिःशंसपिस्तथा॥ २६॥ शालिश्च
कलशीकंठोऋषिःकारीरयस्तथा॥ काट्योधान्या
यनिश्चैवभावास्यायनिरेवच॥ २७॥ भारद्वाजिः-
सौबुधिश्चलघ्वीदेवमतिस्तथा॥ त्र्यार्षेयोभिमत-
श्चैषांप्रवरोभूमिपोत्तम॥ २८॥

अर्थ- हे राजा तसेच कपीतर, स्वस्तितर, दाक्षि, शक्ति, पतंजलि, भूयसि, जलसंधि, बिंदुमादि, कुसीदकी, ऊर्व, राजकेशी, वौषडि, शंसपि, शालि, कलशी, कंठ, कारीरय नामक ऋषि, काव्य, धान्यायनि, भावास्यायनि, भारद्वाजि, सौबुधि, लघ्वी, देवमति, या ऋषींस वेदोक्त तीन प्रवर आहेत.

अंगिरादमबाह्यश्च तथा चैवाप्युरुक्षयः॥ परस्परायणार्पणिश्च लौक्षिर्गार्ग्यहरिस्तथा॥ २९॥ गालविश्चैव त्र्यार्षेयः सर्वेषां प्रवरो मतः॥

अर्थ- आणि अंगिरस वंशात अंगिरा, दमबाह्य, तसाच उरुक्षय, परस्परायणि, अर्पणि, लौक्षि, गार्ग्य, हरि व गालवि, यांस सर्वांस ही तीनच प्रवर आहेत.

अंगिराः संकृतिश्चैव गौरवीतिस्तथैव च॥ ३०॥ परस्परमवैवाह्या ऋषयः परिकीर्तिताः॥

अर्थ- ते असे की, अंगिरा, संकृति, व गौरवीति, या तीन प्रवरांचे पूर्वी सांगितलेले ऋषि परस्पर विवाहास योग्य नाहीत असे सांगीतले आहे

बृहदुक्थो वामदेवस्तथा त्रिः प्रवरा मताः॥ ३१॥ अंगिरा बृहदुक्थश्च वामदेवस्तथैव च॥ कुत्सा कुत्सैरवैवाह्या एवमाहुः पुरातनाः॥ ३२॥

अर्थ- तसेच बृहदुक्थ, वामदेव व अत्रि हे तीन प्रवर आणि अंगिरा, बृहदुक्थ, व वामदेव हे त्रिप्रवर परस्परें विवाहास अयोग्य असून तसाच कुत्स ऋषि, हा परस्परांचे भिन्न प्रवरांत आला असतां ते ही एकमेकांशी विवाह संबंधास योग्य नाहीत.

रथीतराणां प्रवराः त्र्यार्षेयाः परिकीर्तिताः॥ अंगिराश्च विरूपश्च तथैव च रथीतरः॥ ३३॥ रथीतराह्यवैवाह्या नित्यमेव रथीतरैः

अर्थ- आणि अंगिरा, विरूप व रथीतर, हे तीन प्रवर व रथीतर हे ज्या प्रवरांत आहेत ते उभयतां परस्परांशी विवाहास योग्य नाहीत.

विष्णुवृद्धिः शिवमतिर्जतृणः कत्तृणस्तथा॥ ३४॥ पुत्रवश्च महातेजास्तथा वैरपरायणः॥ त्र्यार्षेयो भिम

तस्तेषांसर्वेषांप्रवरोनृप॥३५॥

अर्थ- तसेच विष्णुवृद्धि, शिवमति, जन्तृण, ऋतृण आणि महातेजस्वी पुत्रव, व वैर परायण ह्या सर्व ऋषींस हे राजा तीन प्रवर आहेत.

अंगिरामत्स्यदग्धश्चमुद्गलश्चमहातपाः॥ परस्परमवैवा ह्या ऋषयःपरिकीर्तिताः॥३६॥

अर्थ- ते असे की अंगिरा, मत्स्यदग्ध, महातपस्वी मुद्गल या त्रिप्रवरांचे पूर्वी सांगितलेले ऋषी परस्पराशीं विवाह करण्यास योग्य नाहीत असे सांगीतले आहेत.

हंसजिह्वोदेवजिह्वोह्यग्निजिह्वोविराडपः॥ अपाग्नेयस्त्वश्वयकश्चपरण्यस्ताविमोद्गलाः॥३७॥ त्र्यार्षेयाभिमतास्तेषांसर्वेषांप्रवराःशुभाः॥ अंगिराश्चैवतांडिश्चमौद्गल्यश्चमहातपाः॥३८॥ परस्परमवैवा ह्याऋषयःपरिकीर्तिताः

अर्थ- तसेच हंसजिह्व, देवजिह्व, अग्निजिह्व, विराडप, अपाग्नेय, अश्वफ, परण्य, स्ताविव मौद्गल या सर्वांचे अंगिरा, तांडि व महातपस्वी मौद्गल्य हे शुभकारक तीन प्रवर असल्या मुळें परस्पर विवाह संबंधास योग्य नाहींत असें सांगीतलें आहे.

अपांडुश्चगुरुश्चैवतृतीयःशाकटायनः॥ ३९॥ ततःप्रागाथमानारीमार्कंडोमरणःशिवः कटुर्मर्कटपश्चैवतथानाडायनोऋषिः॥४०॥श्यामायनस्तथैवैषां त्र्यार्षेयाःप्रवराःशुभाः॥ अंगिराश्चाजमीढश्चकव्यश्चैवमहातपाः॥४१॥परस्परमवैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः॥

अर्थ- आणि अपांडु, गुरु, तिसरा शाकटायन, प्रागाथ, मानारि, मार्कंड, अमरण, शिव, कटु, मर्कटप, नाडायन ऋषि, श्यामायन, ह्या सर्वांचे शुभ कारक तीन ऋषी प्रवर आहेत ते असे कीं अंगिरा, आजमीढ, महातपस्वी कव्य, हे ऋषी परस्पर विवाहास योग्य नाहींत असें कथन केलें आहे.

तित्तिरिःकपिभूश्चैवगार्ग्यश्चैवमहानृषिः॥४२॥ त्र्या

र्षेयोहिमतस्तेषांसर्वेषांप्रवरःशमः ॥ अंगिरास्तिति-
रिश्चैवकपिभूश्चमहानृषिः ॥ ४३ ॥ परस्परमवैवा-
ह्याऋषयःपरिकीर्तिताः ॥

अर्थ- तसेच तित्तिरि, कपिभू, महानृऋषि गार्ग्य ह्यांचे अंगिरा, तित्तिरि व कपिभू हे वेदोक्त शमकारक तीन प्रवर असल्या मुळें या ऋषींत परस्पर विवाह संबंध विहित नाहीं.

अथऋक्षभरद्वाजोऋषिवान्मानवस्तथा ॥ ४४ ॥
ऋषिर्मैत्रवरश्चैवपंचार्षेयाःप्रकीर्तिताः ॥ अंगिराःस
भरद्वाजस्तथैवचबृहस्पतिः ॥ ४५ ॥ ऋषिर्मित्रवर
श्चैवऋषिवान्मानवस्तथा ॥ परस्परमवैवाह्याऋ
षयःपरिकीर्तिताः ॥ ४६ ॥

अर्थ- तसेच ऋक्ष, भरद्वाज, ऋषिवान्, मानव, मैत्रवरऋषि, हे ऋषी, अंगिरा, भरद्वाज, बृहस्पति, मित्रवरऋषि, वेदाध्ययन संपन्न मानव नामक ऋषींया पंचप्रवरानीं युक्त असल्या मुळें एकमेकाशीं विवाहास योग्य नाहींत असें कथन केलें आहे.

भारद्वाजोहुतःशौंगःशैशिरेयस्तथैवच ॥ इत्येतेक-
थिताःसर्वेद्व्यामुष्यायणगोत्रजाः ॥ ४७ ॥

अर्थ- आणि भारद्वाज, हुत, शौंग, शैशिरेय, हे सर्व ऋषी द्व्यामुष्यायण*-गोत्रांत झाले आहेत.

पंचार्षेयास्तथाह्येषांप्रवराःपरिकीर्तिताः ॥ अंगिरा
श्चभरद्वाजस्तथैवचबृहस्पतिः ॥ मौद्गल्यःशैशिर-
श्चैवप्रवराःपरिकीर्तिताः ॥ ४८ ॥

अर्थ- तसेच ह्यांचे वेदोक्त पांच प्रवर सांगितले ते असें कीं अंगिरा, भरद्वाज, बृहस्पति, मौद्गल्य, शैशिर, हे प्रवर कथन केले आहेत.

एतेतवोक्तांगिरसस्तुवंशेमहानुभावाऋषिगोत्र-
काराः ॥ येषांतुनाम्नापरिकीर्तितेनपापंसमग्रंपुरु-
षोजहाति ॥ ४९ ॥

* दीप रत्नकास पिता व पालक या गोत्रांचा संबंध असतो ह्मणून त्यास द्व्यामुष्यायण ह्मणतात.

अर्थ- याप्रमाणें आंगिरस वंशात महा प्रतापी ऋषी स्वकीय गोत्रांची वृद्धि करणारे झालेले तुला सांगितले; कारण याच्या नाम कीर्तनानें पुरुष आपल्या संपूर्ण पापांचा त्याग करतो. इतिश्रीमत्स्यपुराणेआंगिरसप्रवरानुकीर्तनंनाम पंचनवत्यत्तरशततमोऽध्यायः॥१९५॥

अध्याय १९६वा.

मत्स्यउवाच॥ अत्रिवंशसमुत्पन्नान्गोत्रकारान्निबोधमे॥ कर्दमायनशाखेयास्तथाशारायणाश्चये॥१॥

अर्थ- मत्स्य बोलतात हे मनुराजा अत्रिवंशांत उत्पन्न झालेले स्वगोत्रांचा विस्तार करणारे तसेच कर्दमायन शाखेंतील वशारायण नावानें प्रसिद्ध जे आहेत, ते सर्व मजपासून श्रवण कर.

उद्दालकिः शोणकर्णिरथोशौक्रतवश्चये॥ गौरग्रीवा गौरजिनस्तथाचैत्रायणाश्चये॥२॥ अर्धपण्यावामरथ्यागोपनास्तकिबिंदवः॥ कणजिह्वोहरप्रीतिर्नैद्राणिःशाकलायनिः॥३॥ तैलपश्चसवैलेयोअत्रिर्गोणीपतिस्तथा॥ जलदोभगपादश्चसौपुष्पिश्चमहातपाः॥४॥ छंदोगेयस्तथैतेषांत्र्यार्षेयाःप्रवरामताः॥ श्यावाश्वश्चतथात्रिश्चआर्चनानशएवच॥५॥ परस्परमवैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः॥

अर्थ- ते असे कीं उद्दालकि, शोण, कर्णिरथ, शौक्रतु, गौरग्रीव, गौरजि, चैत्रायण, अर्धपण्य, वामरथ्य, गोपन, तकिबिंदु, कणजिह्व, हरप्रीति, नैद्राणि, शाकलायनि, तैलप, वैलेय, अत्रि, गोणीपति, जलद, भगपाद, महातपस्वी सौपुष्पि, छंदोगेय यांस श्यावाश्व, अत्रि, आर्चनानश, हे वेदोक्त तीन प्रवर असल्यांमुळे हे ऋषि परस्पर विवाह संबधास अनुक्त असें सांगितलें आ.

दाक्षिर्बलिःपर्णविश्चऊर्णनाभिःशिलार्दनिः॥६॥ बीजवापीशिरीषश्चमौजकेशोगविष्ठिरः॥ भलंदनस्तथैतेषांत्र्यार्षेयाःप्रवरामताः॥७॥ अत्रिर्गविष्ठिरश्चैवतथापूर्वातिथिःस्मृतः॥ परस्परमवैवाह्या

ऋषयः परिकीर्तिताः॥ ८॥

अर्थ- तसेच दाक्षि, बलि, पर्णावि, ऊर्णनाभि, शिलार्दनि, बीजवापी, शिरीष, मौंजकेश, गविष्ठिर, भलंदन, यांसही अत्रि, गविष्ठिर, व पूर्वातिथि हे वेदसंमत तीन प्रवर आहेत; यास्तव हे ऋषि एकमेकांशीं विवाहास योग्य नाहींत. असें शास्त्रांत सांगितलें आहे.

आत्रेयपुत्रिकापुत्रानतऊर्ध्वंनिबोधमे॥ कालेयाश्चसवालेयावासरथ्यास्तथैवच॥ ९॥ धात्रेयाश्चैवमैत्रेयास्त्र्यार्षेयाः परिकीर्तिताः॥ अत्रिश्चवामरथ्यश्च पौत्रिश्चैवमहानृषिः॥ परस्परमवैवाह्या- ऋषयः परिकीर्तिताः॥ १०॥

अर्थ- हे मनुराजा इतःपर अत्रिवंशांतील कन्यांचे पुत्र सांगतों ते मजपासून श्रवण कर ते असे कीं कालेय, वालेय, वासरथ्य, धात्रेय, मैत्रेय, ह्या ऋषींस अत्रि, वामरथ्य व महान् ऋषि पौत्रि हे एकच तीन प्रवर असल्यावरून ते परस्परें विवाहसंबधास अयोग्य आहेत

इत्यत्रिवंशप्रभवास्तवोक्तामहानुभावानृपगोत्रकाराः॥ येषांतुनाम्नापरिकीर्तितेनपापंसमग्रंपुरुषोजहाति॥ ११॥

अर्थ- याप्रमाणें हे राजा महासमर्थ असून स्वगोत्राची वृद्धि करणारे असे अत्रिवंशोत्पन्न ऋषि तुला सांगीतले. कारण यांच्या नामकीर्तनानें पुरुष आपलें संपूर्ण पातकांचा त्याग करतो. इतिश्री मत्स्यपुराणे अत्रिवंशानुकीर्तनंनामषण्णवत्युत्तर शततमोऽध्यायः १९६॥

अध्याय १९७ वा.

मत्स्यउवाच॥ अत्रेरेवापरंवंशंतववक्ष्यामिपार्थिव॥ अत्रेः सोमः सुतः श्रीमांस्तस्यवंशोद्भवोनृप॥ १॥ विश्वामित्रस्तुतपसा ब्राह्मण्यंसमवासवान्॥ तस्यवंशमहंवक्ष्ये तन्मेनिगदतः शृणु॥ २॥

अर्थ- मत्स्य सांगतात हे राजन् मी अत्रीचाच दुसरा वंश तुला कथन करतों अत्रिऋषीस श्रीमान् सोम (चंद्र) पुत्र झाला; त्याचे वंशांत उत्पन्न-

झालेला विश्वामित्र मुनि तपानें ब्राह्मणत्व पावला. त्याचा वंश मी तुला सांगतों; तो माझ्या मुखानें तूं श्रवण कर.

विश्वामित्रो देवरातस्तथा वैकृतिगालवः। वतंडश्च सलंकश्च ह्यभयश्चायतायनः॥३॥ श्यामायना याज्ञवल्क्या जाबालाः सैंधवायनाः॥ बाभ्रव्याश्च करीषाश्च संश्रुत्या अथ संश्रुताः॥४॥ उलूपा औपगहया पयोदजनपादपाः॥ खरवाचो हलयमाः साधिता वास्तकौशिकाः॥५॥ त्र्यार्षेयाः प्रवरास्तेषां सर्वेषां परिकीर्तिताः॥ विश्वामित्रो देवरात उद्दालश्च महायशाः॥६॥ परस्परमवैवाह्या ऋषयः परिकीर्तिताः॥

अर्थ- तो असा कीं, विश्वामित्र, देवरात, वैकृतिगालव वतंड, सलंक, अभय, आयतायन, श्यामायन, याज्ञवल्क्य, जाबाल, सैंधवायन, बाभ्रव्य, करीष, संश्रुत्य, संश्रुत, उलूप, औपगहय, पयोद, जनपादप, खरवाक्, हलयम, साधित वास्तक, कौशिक, या सर्व ऋषींस विश्वामित्र देवरात व महायशस्वी उद्दालक हेच तीन प्रवर आहेत म्हणून हे ऋषि परस्पर विवाह करण्यास अयोग्य असें शास्त्रांत सांगीतलें आहे.

देवश्रवाः सुजातेयाः सौसुकाः कारुकायनाः॥७॥ तथा वेदहरातायेकुशिकाश्च नराधिप॥ त्र्यार्षेयोभिमतस्तेषां सर्वेषां प्रवरः शुभः॥८॥ देवश्रवा देवरातो विश्वामित्रस्तथैव च॥ परस्परमवैवाह्या ऋषयः परिकीर्तिताः॥९॥

अर्थ- आणि देवश्रवा, सुजातेय, सौसुक, कारुकायन, तसेच वेदहरात, कुशिक, या सर्व ऋषींस देवश्रवा, देवरात व विश्वामित्र हेच वेदोक्त शुभकारक तीन प्रवर आहेत; यास्तव हे ऋषी एकमेकांशीं विवाहसंबंधास योग्य नाहीत; असें सांगीतलें आहे.

धनंजयः कपर्देयः परिकूटश्च पार्थिव॥ पाणिनिश्चैव त्र्यार्षेयाः सर्व एते प्रकीर्तिताः॥१०॥

अर्थ- हे राजा तसेच धनंजय, कपर्देय, परिकूट व पाणिनि हे सर्व ऋषी त्रि

प्रवरीच आहेत.

विश्वामित्रस्तथाद्यश्चमाधुच्छंदस एवच ॥ त्र्यार्षेयाः प्रवराह्येते ऋषयः परिकीर्तिताः ११ ॥

अर्थ-आणि विश्वामित्र, तसाच आद्य, नामाने प्रसिद्ध, माधुच्छंदस, हेही ऋषी त्रिप्रवरीच आहेत.

विश्वामित्रोमधुच्छंदास्तथाचैवाघमर्षणः ॥ परस्परमवैवाह्या ऋषयः परिकीर्तिताः ॥ १२ ॥

अर्थ-ते असे कीं, विश्वामित्र, मधुच्छंदा, तसाच अघमर्षण या तीन प्रवरांनी युक्त पूर्वी सांगितलेले ऋषी परस्परें विवाह संबंधास अयोग्य आहेत.

कमलायजिनश्चैव अश्मरथ्यस्तथैवच ॥ वंचुलिश्चापि त्र्यार्षेयः सर्वेषां प्रवरोमतः ॥ १३ ॥ विश्वामित्रश्चाश्वरथो वंजुलिश्चमहातपाः ॥ परस्परमवैवाह्या ऋषयः परिकीर्तिताः ॥ १४ ॥

अर्थ-आणि कमलायजि, अश्मरथ्य, वंचुलि, यांस विश्वामित्र, अश्वरथ व महातपस्वी वंजुलि, हे तीन प्रवर असल्यामुळें हे ऋषी परस्पर विवाह संबंधास अनुक्त आहेत.

विश्वामित्रोलोहितश्च अष्टकः पूरणस्तथा ॥ विश्वामित्रः पूरणश्चतयोर्द्वौ प्रवरौस्मृतौ ॥ १५ ॥ परस्परमवैवाह्याः पूरणाश्च परस्परं ॥

अर्थ-तसेच विश्वामित्र, लोहित, अष्टक व पूरण यांतील विश्वामित्र व पूरण यांस दोन प्रवर सांगितले आहेत; यास्तव हे ऋषि व पूरण या प्रवरानें युक्त जे ऋषी तेही एकमेकांशीं विवाह योग्य नाहीत.

लोहिताअष्टकाश्चैषां त्र्यार्षेयाः परिकीर्तिताः ॥ १६ ॥ विश्वामित्रोलोहितश्च अष्टकश्चमहातपाः ॥ अष्टका लोहितैर्नित्यमवैवाह्याः परस्परं ॥ १७ ॥

अर्थ-आणि लोहित व अष्टक, यांस विश्वामित्र, लोहित व महातपस्वी अष्टक हे परस्परांशीं व अष्टक प्रवरी लोहित प्रवरयुक्तांशीं असे सर्वथा विवाह संबंधास अयोग्य आहेत.

उदरेणुः क्रथकश्च ऋषिश्चोदावहिस्तथा ॥ शाट्यायनिः करीराशी शालंकायनिलावकी ॥ १८ ॥ मौंजायनिश्च भगवान् त्र्यार्षेयाः परिकीर्तिताः ॥ खिलिखिलिस्तथा विद्यो विश्वामित्रस्तथैव च ॥ परस्परमवैवाह्या ऋषयः परिकीर्तिताः ॥ १९ ॥

अर्थ- तसेच उदरेणु, क्रथक, उदावहि ऋषि, शाट्यायनि, करीराशी, शालंकायनि, लावकी व महाकीर्तिमान् मौंजायनि, यांस खिलि खिलि, विद्य व, विश्वामित्र हे तीन प्रवर आहेत यास्तव या ऋषींचा परस्परें विवाह संबंध योग्य नाहीं असें कथन केलें आहे.

एते तवोक्ताः कुशिका नरेंद्र महानुभावाः सततं द्विजेंद्राः ॥ येषां तु नाम्ना परिकीर्तितेन पापं समग्रं पुरुषो जहाति ॥ २० ॥

अर्थ- हे नरश्रेष्ठा मनुराजा, महासमर्थ असून ब्राह्मणश्रेष्ठ असे हे विश्वामित्र गोत्रांतील ऋषि मी तुला सांगीतले; कारण यांच्या नामकीर्तनानें पुरुषाच्या सर्व पापांचा नाश होतो. इति श्री मत्स्यपुराणे विश्वामित्र वर्णनं नाम सप्तनवत्युत्तर शततमोऽध्यायः ॥ १९७ ॥

अध्याय १९८ वा.

मत्स्य उवाच ॥ मरीचेः कश्यपः पुत्रः कश्यपस्य तथा कुले ॥ गोत्रकारान्नृषीन्वक्ष्ये तेषां नामानि मे शृणु ॥ १ ॥

अर्थ- मत्स्य बोलतात हे मनुराजा मरीचि ऋषीस कश्यप नामें पुत्र झाला. तसेच त्या कश्यपाच्या कुलांत उत्पन्न झालेले स्वकीय गोत्राची वृद्धि करणारे ऋषी सांगतों; त्यांचीं नामें क्रमानें मजपासून श्रवण कर.

आश्रायणिर्ऋषिगणो मेषकीरिटकायनाः ॥ उदग्रजा माठराश्च भोजा विनयलक्षणाः ॥ २ ॥ शालाहलेयाः कौरिष्ठाः कन्यकाश्चासुरायणाः ॥ मंदाकिन्या वै मृगयाः श्रुतयो भोजपापनाः ॥ ३ ॥ देवयाना गोमयाना ह्यधच्छाया भयाश्च ये ॥ कात्यायनाः शाक्रयाणाः बर्हियोगगदायनाः ॥ ४ ॥ भवनंदि महाचक्रि दा-

क्षपायनएवच ॥ योधयानाःकार्तिवयोहस्तिदानास्तथै
वच ॥ ५ ॥ वात्स्यायनानिकृतजाश्चाश्वलायनिनस्तथा
॥ प्रागायणाःपौलमौलिराश्ववातायनस्तथा ॥ ६ ॥ को
वेरकाश्च श्याकाराअग्निशर्मायणाश्चये ॥ मेषपाःकैकर
सपास्तथाचैवतुबभ्रवः ॥ ७ ॥ प्राचेयोज्ञानसंज्ञेया-
आग्नाप्रासेव्यएवच ॥ श्यामोदरावैवशपास्तथाचैवो-
द्दलायनाः ॥ ८ ॥ काष्ठाहारिणमारीचाआजिह्वायनहा
स्तिकाः ॥ वैकर्णेयाः काश्यपेयाःसासिसाहारिताय-
नाः ॥ मातंगिनश्च भृगवस्त्र्यार्षेयाःपरिकीर्तिताः ॥
वत्सरःकश्यप श्चैवनिध्रुवश्चमहातपाः ॥ १० ॥ परस्प
रमवैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः ॥

अर्थ- तीअशींकीं आश्रायणिनामकऋषिगण, मेष, कीरिटकायन, उदग्र
ज, माठर, भोज, विनयलक्षण, शालाहालेय, कौरिष्ट, कन्यक, आसुरायण,
मंदाकिन्य, वैमृगय, श्रुति, भोजपायन, देवयान, गोमयान, अध श्छाय, अभ
य, कात्यायन, शाक्रयाण, बर्हियोग, गदायन, भवनंदि, महाचक्री, दाक्षपा
यन, योधयान, कार्तिवय, हस्तिदान, वात्स्यायन, निकृतज, आश्वलायनि,
प्रागायण, पौलमौलि, आश्ववातायन, कौबेरक, श्याकार, अग्निशर्मायण, मे
षप, कैकरसप, तसेंच बभ्रु, प्राचेय, ज्ञानसंज्ञेय, आग्नाप्रासेव्य, श्यामोदर, वै-
वशप, तसेंचउद्दलायन, काष्ठाहारी, मारीच, आजिह्वायन, हास्तिक, वैकर्णेय,
काश्यपेय, सासिस, हारितायन, मातंगी, भृगु, हेसर्वऋषी, वत्सर, कश्यप, म
हातपस्वीनिध्रुव, याचतीनप्रवरानींयुक्तअसल्यामुळें परस्परविवाहास यो-
ग्य नाहीत असें कथन केलें आहे.

अतःपरंप्रवक्ष्यामिद्व्यामुष्यायणगोत्रजान् ॥ ११ ॥ अ
नसूयोनाकुरयःस्नातपोराजवर्तपः ॥ शैशिरोदवहि-
श्चैवसैरंध्रीरोपसेवकिः ॥ १२ ॥ यामुनिःकाद्रुपिंगाक्षिः
सजातंबिस्तथैवच ॥ दिवावष्टाश्चइत्येतेभक्त्याज्ञेया-
श्चकाश्यपाः ॥ १३ ॥ त्र्यार्षेयाश्चतथैवेषांसर्वेषांप्रवराः
शुभाः ॥ वत्सरःकाश्यपश्चैववसिष्ठश्चमहातपाः ॥ १४ ॥

परस्परमवैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः॥.

अर्थ- इतःपर आतां आमुष्यायण गोत्रांत झालेले ऋषी तुला सांगतों. ते असेकीं अनसूय, नाकुरय, स्नालप, राजवर्तप, शैशिर, उदवहि, सैरंध्री, रौपसेवकि, यामुनि, काद्रुपिंगाक्षि, सजातंबि, दिवावष्टाश्व या गोत्रांत उत्पन्न झालेल्या ऋषींचें ज्ञानभक्तीनेंच होतें या सर्वांस वत्सर, काश्यप, व महातपस्वी वसिष्ठ, हे च तीन उत्तम प्रवर आहेत यास्तव या ऋषींचा परस्पर विवाहसंबंध अनुक्त आहे.

संयातिश्चनभश्चोभौपिप्पल्योथजलंधरः॥१५॥भुजातपूरः पूर्यश्च कर्दमोगर्दभीमुखः॥हिरण्यबाहुकैरातावुभौकाश्यपगोभिलौ॥१६॥कुलहोवृषकंडश्चमृगकेतुस्तथोत्तरः॥निदाघमसृणौभत्स्यामहांतःकेवलाश्चये॥१७॥शांडिल्योदानवश्चैवतथावैदेवजातयः॥पैप्पलादिस्त्रप्रवराऋषयःपरिकीर्तिताः॥१८॥आर्षेयाभिमताश्चैषांसर्वेषांप्रवराःशुभाः॥असितोदेवलश्चैवकश्यपश्चमहातपाः॥परस्परमवैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः॥१९॥

अर्थ- आणि संयाति, नभ-हे दोन, पिप्पल्य, जलंधर, भुजातपूर, पूर्य, कर्दम, गर्दभीमुख, हिरण्यबाहु, कैरात हे दोघे, काश्यप, गोभिल, कुलह, वृषकंड, मृगकेतु, तसाच उत्तर, निदाघ, मसृण, भत्स्य, जे केवल महांत, शांडिल्य, दानव, तसेंच देवजाति, पैप्पल, दिल्सप्रवर ह्यासर्व ऋषींस असित, देवल, महातपस्वी कश्यप हे च तीन शुभकारक प्रवर असल्यामुळें त्यांचा परस्परें विवाह संबंध होणें विहित नाहीं.

ऋषिप्रधानस्यचकश्यपस्यदाक्षायणीभ्यःसकलंप्रसूतं॥जगत्समग्रंमनुसिंहपुण्यंकिंतेप्रवक्ष्याम्यहमंतरेण॥२०

अर्थ- हे मनुश्रेष्ठा, ऋषिश्रेष्ठ कश्यपाच्या स्त्रिया ज्या दक्षकन्या त्यांपासून सकल जग उत्पन्न झालें हें पुण्यकारक आख्यान अवकाशानें मी तुला सांगूं काय?

इतिश्री मत्स्यपुराणे प्रवरानुकीर्तने कश्यपप्रवर कीर्तनं नाम अष्टनवत्युत्तरशततमोऽध्यायः॥१९८॥

मत्स्यउवाच॥ वसिष्ठवंशजान्विप्रान्निबोधवदतोमः
म॥एकार्षेयस्तुप्रवरोवासिष्ठानांप्रकीर्तितः॥ १॥

अर्थ- मत्स्य बोलतात हे मनुराजा वसिष्ठवंशात झालेले ब्राह्मण मी तुला सांगतों तें मजपासून तूं श्रवण कर; ते असे कीं, वसिष्ठ कुलांतील ऋषींस एकच प्रवर कथन केला आहे.

वसिष्ठाएववासिष्ठाअविवाह्यावसिष्ठजैः॥ व्याघ्रपादा
औपगवावैक्लवाःशाद्वलायनाः॥ २॥ कपिष्ठलाऔप-
लोमाअलब्धाश्चषठाः कठाः॥ गोपायनाबोधपाश्च
दाकव्याह्यथबाह्यकाः॥ ३॥ वालिशयाःपालिशयाः
स्ततोवाग्ग्रंथयश्चये॥ आप स्थूणाःशीतवृत्तास्तथा
ब्राह्मपुरेयकाः॥ ४॥ लोमायनाःस्वस्तिकराःशांडि
लिर्गौडिनिस्तथा॥ वाडोहलिश्चसुमनाश्चोपावृधि
स्तथैवच॥ ५॥ चौलिर्बौलिर्ब्रह्मबलःपौलिःश्रवस
एवच॥ पौडवोयाज्ञवल्क्यश्चएकार्षेया महर्षयः॥ ६॥
वसिष्ठएषांप्रवरअवैवाह्याः परस्परं॥

अर्थ- ते असे कीं वसिष्ठ गोत्रांत उत्पन्न झाले त्यांसच वासिष्ठ गोत्री ह्मणतात, ते वसिष्ठ गोत्रांतील ऋषींशीं विवाहास योग्य नाहींत. त्यांचा क्रम असा कीं व्याघ्रपाद, औपगव, वैक्लव, शाद्वलायन, कपिष्ठल, औपलोम, अलब्ध, षठ, कठ, गोपायन, बोधप, दाकव्य, बाह्यक, वालिशाय, पालिशय, वाग्ग्रंथि, आपस्थूण, शीतवृत्त, ब्राह्मपुरेयक, लोमायन, स्वस्तिकर, शांडिलि, गौडिनि, वाडोहलि, सुमना, तसाच उपावृधि, चौलि, बौलि, ब्रह्मबल, पौलि, श्रवस, पौडव, याज्ञवल्क, या महर्षींस, वशिष्ठ हा एकच प्रवर असल्यामुळें हे ऋषि परस्परें विवाह संबंधास योग्य नाहींत.

शैलालयोमहाकर्णःकौरव्यःक्रोधिनस्तथा॥ ७॥ कपिं
जलावालखिल्याभागवित्तायनाश्चये॥ कौलायनः
कालशिखःकोरकृष्णाःसुरायणाः॥ ८॥ शाकाहा
र्याःशाकधियःकाण्वाउपलपाश्चये॥ शाकायना-
उहाकाश्चअथमाषशरावयः॥ ९॥ दाकायनावालव

योवाकयोगोरथास्तथा॥ लंबायनाःश्यामवयोयेच
क्रोडोदरायणाः॥१०॥ प्रलंबायनाश्चऋषयः औप
मन्यवएवच॥ सांख्यायनाश्चऋषयस्तथावैवेद
शेरकाः॥११॥ पालंकायनउद्गाहाऋषयश्चबले-
क्षवः॥ मातेयाब्रह्मबलिनःपर्णागारिस्तथैवच॥१२
॥आर्षेयोभिमतश्चैषांसर्वेषांप्रवरस्तथा॥ भगी-
वसुर्वशिष्ठश्चइंद्रप्रमदिरेवच॥ १३॥ परस्प-
रमवैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः॥

अर्थ-आणि शैलालय, महाकर्ण, कौरव्य, क्रोधी, कपिंजल, वालखिल्य, भागवित्तायन, कौल्मथन, कालशिख, कोरकृष्ण, सुरायण, शाकाहार्य, शाकधि, काण्व, उपलप, शाकायन, उद्गाक, माषशरावय, दाकायन, वालवय, वाकय, तसेच गोरथ, लंबायन, श्यामवय, क्रोडोदरायण, प्रलंबायनआनांवाचे ऋषि, औपमन्यु, सांख्यायन, तसेच वेदशेरक नांवाचे ऋषी, पालंकायन, उद्गाह, बलेक्षु, मातेय, ब्रह्मबलि, तसाच पर्णागारि, यांस र्व ऋषींस, भगीवसु, वसिष्ठ व इंद्रप्रमदि, हेच तीन प्रवर आहेत यास्तव हे ऋषी एकमेकांशी विवाहांस अयोग्य आहेत असें सांगीतलें.

औपस्थलास्वस्थलयोपालोहालोहलाश्चये॥१४॥
माध्यंदिनोमाक्षतयःपैप्पलादिर्विचक्षुषः॥त्रैशृंगा
यनसैवल्काःकुंडिनश्चनरोत्तम॥१५॥आर्षेश्चा-
भिमताश्चैषांसर्वेषांप्रवराःशुभाः॥ वसिष्ठमित्रा
वरुणौकुंडिनश्चमहातपाः॥१६॥ परस्परमवै-
वाह्याऋषयःपरिकीर्तिताः॥

अर्थ-हे राजन् तसेच औपस्थल, स्वस्थलि, पालोह, लोहल, माध्यंदिन, उमाक्षति, पैप्पलादि, विचक्षुष, त्रैशृंगायन, सैवल्क, कुंडिन, यासर्वांस, वसिष्ठ, मित्रावरुण, महातपस्वी कुंडिन, या तीन प्रवरामुळें हे ऋषी परस्परांशीं विवाहयोग्य नाहींत.

शिवकर्णोवयश्चैवपादपश्चतथैवच॥१७॥आ
र्षेयोभिमतश्चैषांसर्वेषांप्रवरस्तथा॥ जातूक-

ण्योवसिष्ठश्चतथैवात्रिश्चपार्थिव॥ परस्परम
वैवाह्याऋषयःपरिकीर्तिताः॥ १८ ॥

अर्थ आणि हे राजा शिवकर्ण, वय, पादप, इत्यादिकत्यावंशांतील सर्व ऋषीं सजातूकर्ण्य, वसिष्ठ व अत्रि हे तीन प्रवर असल्यामुळें हे ऋषी परस्परें विवाहास अयोग्य आहेत.

वसिष्ठवंशोभिहितामयैतेऋषिप्रधानाःसततंद्विजेंद्राः॥ येषांतुनाम्नापरिकीर्तितेन पापंसमग्रंपुरुषोजहाति॥ १९॥

अर्थ- हे राजा असे हे वसिष्ठवंशांतील ऋषिश्रेष्ठ मुख्य ब्राह्मण मी तुला सांगीतले; कारण यांच्या नामकीर्तनानें पुरुष आपल्या यावज्जन्म केलेल्या समग्र पातकाचा त्याग करितो. इतिश्री मत्स्यपुराणे प्रवरानुकीर्तने वशिष्ठ गोत्र प्रवरानुकीर्तनं नाम नवत्यत्तर शततमो ऽध्यायः॥१९९॥

अध्याय २००वा.

मत्स्यउवाच॥ वसिष्ठस्तुमहातेजानिमेःपूर्वपुरोहितः॥ बभूवुःपार्थिवश्रेष्ठयज्ञास्तस्यसमंततः॥
॥१॥

अर्थ- मत्स्य बोलतात हे राजश्रेष्ठा, महातेजस्वी वसिष्ठऋषि निमिराजाचे पुरातन पुरोहित होते; त्याकाली त्याराजानें आपल्या राज्यांत सर्वत्र यज्ञ केले.

श्रांतात्मापार्थिवश्रेष्ठविशश्रामतदागुरुः॥ तंगत्वापार्थिवश्रेष्ठोनिमिर्वचनमब्रवीत्॥ २॥

अर्थ- तेसमयीं हे राजश्रेष्ठा त्या यज्ञानी वसिष्ठाच्या शरीरास श्रम झाल्या मुळें तो गुरु विश्रांति घेत असतां तो राजश्रेष्ठ निमित्यां समीप जाऊन भाषण करूं लागला.

भगवन्यष्टुमिच्छामितन्मांयाजयमाचिरं॥ तमुवाचमहातेजावसिष्ठःपार्थिवोत्तमं ॥३॥

अर्थ- कीं हे समर्थ मुने मी यज्ञ करण्याविषयीं इच्छितों यास्तव आपण मजकडून यज्ञ त्वरित करवा असें त्याचें वचन श्रवण करून महातेजस्वी

वसिष्ठ ऋषि त्या राजश्रेष्ठ निमीस बोलतात.

कंचित्कालंप्रतीक्षस्वत्वयज्ञैःसुसत्तमैः ॥ श्रांतो-
स्मिराजन्विश्रम्ययाजयिष्यामितेनृप ॥ ४ ॥

अर्थ- हे राजा प्रस्तुत कांहीं काल पर्यंत अवकाश कर. कारण पूर्वींच्या तु झ्या अत्युत्कृष्ट यज्ञानीं मी श्रमलों यास्तव आतां कांहीं विश्रांति घेऊन पश्चा त् थोडक्या दिवसानीं तुज कडून यज्ञ करवीन.

एवमुक्तःप्रत्युवाचवसिष्ठंनृपसत्तम ॥ पारलौकिक
कार्येतुकःप्रतीक्षितुमुत्सहेत् ॥ ५ ॥

अर्थ- हे गुरो असें वसिष्ठानीं भाषण केलें असतां राजश्रेष्ठ निमि त्यांस बोलला कीं, परलोक संबंधी कार्यास अवकाश करण्या विषयीं कोण उत्साह पावेल.

नचमेसोहृदंब्रम्हन्कृतांतेनबलीयसा ॥ धर्मका-
र्येत्वराकार्याचलंयस्माद्धिजीवितं ॥ ६ ॥

अर्थ- आणि हे ब्राह्मणा अति बलिष्ठ यमाशीं माझें सख्य नाहीं व धर्मका र्या विषयीं त्वरा करावी; कारण हें जीवित(आयुष्य)चंचल आहे.

धर्मपथ्योदनोजंतुर्मृतोपिसुखमश्नुते ॥ श्वःकार्य-
मद्यकुर्वीतपूर्वाण्हेचापराण्हिकं ॥ ७ ॥

अर्थ- तसाच जो प्राणी परलोक मार्गांतील हित कारक धर्म, संपादन कर तो; तो मृत झाला तरी सुखच भोगतो, यास्तव मनुष्यानें उद्याकरावयाचें ध र्म कृत्य आज करावें, तसें अपराण्ह कालीं कर्तव्य तें प्रातः कालीं करावें.

नहिप्रतीक्षतेमृत्युःकृतंचास्यनवाकृतं ॥ क्षेत्राप-
णगृहासक्तमन्यत्रगतमानसं ॥ ८ ॥ वृकश्चोरण-
मासाद्यमृत्युरादायगच्छति ॥

अर्थ- कारण या मनुष्यानें स्वहित साधनाचें कर्म केलें किंवा न केलें; ए तन्निमित्त मृत्यु क्षण मात्रही अवकाश करीत नाहीं; तरहा प्राणी, शेत, बाजार, गृह किंवा अन्यत्र कोठेंही आसक्त चित्त असला तथापि त्यास- तो मृत्यु घेऊन जातो; यास दृष्टांत जसा लांडगा बकऱ्या जवळ येऊन- त्यास घेऊन जातो तद्वत्.

नैकांतेनप्रियः कश्चिद्वेष्यश्चास्यनविद्यते ॥ ९ ॥ आ
युष्येकर्मणिक्षीणेप्रसह्यहरतेजनं ॥

अर्थ- कारण या मृत्यूस कोणी अत्यंत प्रिय व द्वेषीही नाहीं; तर आयु
ष्य कारक कर्म क्षीण झालें असतां तो मृत्यु बलात्कारानें लोकांचा सं-
हार करतो.

प्राणवायोश्चलत्वंचत्वयाविदितमेवच ॥ १० ॥ यद
त्रजीव्यतेब्रह्मन्क्षणमात्रंतदद्भुतं ॥

अर्थ- आणि प्राण वायूचें चंचलत्व तुह्मी जाणलेंच आहे. तस्मात् अ-
हो ब्राह्मणा, या लोकीं जें क्षणमात्र जीवन (वांचणें) घडतें तें आश्चर्य कार-
कच आहे

शरीरंशाश्वतं मन्येविद्याभ्यासेधनार्जने ॥ ११ ॥ -
अशाश्वतंधर्मकार्येऋणवानस्मिसंकटे ॥

अर्थ- तसेंच विद्याभ्यास व धन संपादन करणें याविषयीं हें शरीर ब-
हुकाल राहातें असें मी मानतों; आणि हें धर्म कार्यांत अशाश्वत आहे; अ
सें समजतों; तस्मात् मी प्रस्तुत ऋणीपुरुषा सारखा देवांच्या ऋण संक-
टांत आहें.

सोहंसंभृतसंभारोभ वन्मूलमुपागतः ॥ १२ ॥ नचे
द्याजयसेमांत्वंअन्यंयास्यामियाजकं ॥

अर्थ- याप्रमाणें आयुष्य व धर्म यांची गति जाणून मी यज्ञ साहित्य सं
पादन करून तुम्हा कडे आलों; यास्तव या कालीं आपण मज कडून यज्ञ न
करवाल तर मी इतर याज्ञिका कडे जाईन

एवमुक्तस्तदातेननिमिनाब्राह्मणोत्तमः ॥ १३ ॥ शं
शापतंनिमिंक्रोधाद्विदेहस्त्वंभविष्यसि ॥

अर्थ- असें त्या निमि राजानें भाषण केलें असतां, ब्राह्मणोत्तम वसि
ष्ठानें क्रोधें करून त्या निमीस शाप दिला कीं तुझा देह पडेल.

श्रांतंमांत्वंसमुत्सृज्ययस्मादन्यंद्विजोत्तमं ॥ १४ ॥ -
धर्मज्ञस्तुनरेंद्रत्वंयाजकं कर्तुमिच्छसि ॥

अर्थ- कारण हे नरश्रेष्ठा तूं धर्मज्ञ व मी श्रमलेला असें असून तूं मला-

सोडून इतर श्रेष्ठ ब्राम्हणा कडून यज्ञ करविण्याविषयीं इच्छितोस.

निमिस्तंप्रत्युवाचाथधर्मकार्यरतस्यमे ॥ १५ ॥ विघ्नं करोषिनान्येनयाजनंचतथेच्छसि ॥ शापंददासियस्मात्त्वंविदेहोथभविष्यसि ॥ १६ ॥

अर्थ- नंतर निमिराजा त्यास बोलला कीं हे गुरो मी धर्म कार्या विषयीं तत्पर असून तूं मला विघ्न करितोस; आणि अन्यां कडून ही माझा यज्ञ होऊं नये असे इच्छितोस; व मला शापही देतोस तस्मात् तुझा ही देह पात होईल.

एवमुक्तेतुतौजातौविदेहौद्विजपार्थिवौ ॥ देहहीनौतयोर्जीवौब्रम्हाणमुपजग्मतुः ॥ १७ ॥

अर्थ- असें निमीनें भाषण केल्यावर तो वसिष्ठ ब्राह्मण व निमि राजा या उभयतांचे ही देह पडले; तेंव्हा त्या दोघांचे देह रहित जीव ब्रम्हदेवासमीप गेले.

तावागतौसमीक्ष्याथब्रम्हावचनमब्रवीत् ॥ अद्यप्रभृतितेस्थानंनिमिजीवददाम्यहं ॥ १८ ॥

अर्थ- तेंव्हां आपल्या समीप आलेल्या त्या जीवांस पाहून ब्रह्मदेव बोलतात कीं हे निमि नामक जीवा, मी आजपासून तुला राहण्यास स्थान देतों.

नेत्रपक्ष्मसुसर्वेषांत्वंवसिष्यसिपार्थिव ॥ त्वत्संबंधात्तथातेषांनिमेषःसंभविष्यति ॥ १९ ॥

अर्थ- तें असें कीं हे राजा तूं सर्वांचे नेत्रांच्या पापण्यांत रहाशील; व तुझ्या योगानें त्यांच्या पापण्यांची उघड झाप होईल.

चालयिष्यंतितुतदानेत्रपक्ष्माणिमानवाः ॥ एवमुक्तेमनुष्याणांनेत्रपक्ष्मसुसर्वशः ॥ २० ॥ जगामनिमिजीवस्तुवरदानात्स्वयंभुवः ॥

अर्थ- आणि ते सर्व मानव आपले नेत्रांच्या पापण्या हालवितील असें ब्रह्मदेवानीं भाषण केलें असतां त्यांच्या वरदानानें निमिराजाचा जीव संपूर्ण मनुष्यांचे डोळ्यांच्या पापण्यात गेला.

वसिष्ठजीवंभगवान्ब्रम्हावचनमब्रवीत् ॥ २१ ॥ मित्रावरुणयोःपुत्रोवसिष्ठत्वंभविष्यसि ॥

अर्थ- नंतर भगवान् ब्रह्मदेव वशिष्ठाच्या जीवास वाक्य बोलले हे वसिष्ठा, तूं

मित्रावरुणांचा पुत्र होशील.

वसिष्ठेतिचतेनामतत्रापिच भविष्यति ॥ २२ ॥ जन्म
द्वयमतीतंचतत्रापित्वंस्मरिष्यसि ॥

अर्थ- आणि तेथेंही वसिष्ठ हेंच तुझें नाम होईल; तसेंच तूं तेथें पूर्वीच्या दोन्ही जन्मांतील सर्व वृत्त स्मरशील.

एतस्मिन्नेवकालेतुमित्रश्चवरुणस्तथा ॥ २३ ॥ बद-
र्याश्रममासाद्यतपस्तेपतुरव्ययं ॥

अर्थ- असें ब्रम्हदेव बोलले त्या कालीं मित्र व वरुण हे उभयतां देव बदरिकाश्रमास येऊन तेथें अखंड तप करीत होते.

तपस्यतोस्तयोरेवंकदाचिन्माधवेऋतौ ॥ २४ ॥ पु-
ष्पितद्रुमसंस्थानेशुभेदयितमारुते ॥ उर्वशी तुवरा
रोहाकुर्वतीकुसुमोच्चयं ॥ २५ ॥ सुसूक्ष्मरक्तवसना
तयोर्दृष्टिपथंगता ॥

अर्थ- तेव्हां ते उभयतां मित्रावरुण असें तप करीत असतां एके समयीं वसंतऋतूंत प्रफुल्लित बहु पुष्पयुक्त वृक्षांनीं सुशोभित उत्तमउपवनांत सुगंधशीतल वायु वाहत असतां, त्या सुखकारक स्थानीं उत्कृष्ट गुणवती उर्वशी फुलें तोडीत असतां, ती अति सूक्ष्म आरक्त वस्त्र नेसलेली त्या मित्रावरुणांच्या दृष्टीस पडली.

तांदृष्ट्वासुमुखींसुभ्रूंनीलनीरजलोचनां ॥ २६ ॥
उभौचुक्षुभतुर्धैर्यात्तद्रूपपरिमोहितौ ॥

अर्थ- त्या कालीं सुंदर मुख व सुकुटी प्रफुल्लित नील कमलासारखे नेत्र यांनीं सुशोभित अशा त्या उर्वशीला पाहून ते मित्रावरुण तिच्या रूपानें अत्यंत मोहित होऊन त्यांचे चित्तांतील धैर्य नष्ट होऊन ते कामवेगानें व्यथित झाले.

तपस्यतोस्तयोर्वीर्यमस्खलच्चमृगासने ॥ २७ ॥ स्क
न्नंरेतस्ततोदृष्ट्वाशापभीतौपरस्परं ॥ चक्रतुः कल-
शेशुक्रंतोयपूर्णेमनोरमे ॥ २८ ॥

अर्थ- तेव्हां त्या उभयतां तपस्वि देवांचें वीर्य आसनास घेतलेल्या कृष्णाजि

नादर गव्हालें असें अवलोकन करून ते दोघेही परस्परांच्या शापानें भयभीत झाले; ते समयीं त्यानीतें आपलें वीर्य उदकानें भरलेल्या सुंदर कलशांत स्थापन केलें.

तस्मादृषिवरोजातोतेजसाप्रतिमोभुवि॥ वसिष्ठ-श्चाप्यगस्त्यश्चमित्रावरुणयोर्द्वयोः॥२९॥

अर्थ- नंतर मित्र नामा देव व वरुण यांच्या त्या वीर्यापासून अप्रतिम तेजस्वी असून ऋषिमंडलांत श्रेष्ठ असे वसिष्ठ व अगस्त्य हे दोन ऋषिश्रेष्ठ उत्पन्न झाले.

वसिष्ठस्तूपयेमेथभगिनींनारदस्यतु॥ अरुंधतींवरारोहांतस्यांशक्तिमजीजनत्॥३०॥

अर्थ- त्यांतील वसिष्ठानीं उत्तम गुणयुक्त अरुंधतीनामक नारदभगिनीस वरिलें तेव्हां त्यानीं तिचे उदरीं शक्तिनामें पुत्र उत्पन्न केला.

शक्तेःपराशरःपुत्रस्तस्यवंशंनिबोधमे॥ यस्यद्वैपायनःपुत्रःस्वयंविष्णुरजायत॥३१॥

अर्थ- त्या शक्तिनामक ऋषीस पराशर नामें पुत्र झाला त्याचा वंश मज पासून श्रवण कर; तो असा कीं स्वतः विष्णु त्या पराशराचे पुत्र झाले त्यांस द्वैपायन ह्मणतात.

प्रकाशोजनितोयेनलोकेभारतचंद्रमाः॥ पराशरस्य-तस्यत्वंश्रृणुवंशमनुत्तमं॥३२॥

अर्थ- त्या पराशर पुत्र व्यासानीं या भूलोकीं चंद्रासमान आल्हादकारक ज्ञानप्रकाशयुक्त भारत ग्रंथ केला. त्यांच्या पराशर नामक पित्याचा अत्युत्कृष्ट वंश श्रवण कर.

कांडूषपोवाहनपोजेह्मपोभौमतापनः॥ गोपालिरेषांपंचमएतेगौराःपराशराः॥३३॥

अर्थ- तो असा कीं कांडूषप, वाहनप, जैह्मप, भौमतापन, व पांचवा गोपालि हे पराशर वंशांतील ऋषी गौर वर्ण आहेत.

अपोहयावाह्यमयाःख्यातेयाःकौतुजातयः॥ हर्यश्विःपंचमोह्येषांनीलाज्ञेयाःपराशराः॥३४॥

अर्थ- तसेच अपोहय, वाह्यमय, ख्यातेय, कौतुजाति व हर्यश्वि हे पराशर वंशांतील पांच ऋषी कृष्ण वर्ण जाणावे.

काष्र्णायनाः कपिस्करवाः काकेयस्थाजपातयः॥
पुष्करः पंचमश्चैषां कृष्णाज्ञेयाः पराशराः॥३५॥

अर्थ- आणि काष्र्णायन, कपिस्करव, काकेयस्थ, अजपाति व पुष्कर हे पराशर वंशातील पांच ऋषि कृष्ण वर्ण समजावे.

आविष्टायनवालेयास्स्वायष्टाश्चोपयाश्चये॥ इषीकहस्तश्चैतेवैपंचश्वेताः पराशराः॥३६॥

अर्थ- आणि आविष्टायन, वालेय, स्वायष्ट, उपय व इषीकहस्त हे पांच ऋषी पराशार वंशात शुभ्र वर्ण आहेत.

पाटिकोबादरिश्चैवस्तंबाक्रोधनायनाः॥ क्षौमिरेषांपंचमस्त्कएतेश्यामाः पराशराः॥३७॥

अर्थ- तसेच पाटिक, बादरि, स्तंब, क्रोधनायन, क्षौमि हे पांच ऋषि पराशर वंशांत श्यामवर्ण आहेत.

खल्यायनाः वार्ष्णायनास्तैलेयः खलुयूथपाः॥ तंतिरेषांपंचमस्त्कएतेधूम्राः पराशराः॥३८॥

अर्थ- आणि खल्यायन, वार्ष्णायन, तैलेय, यूथप व तंतिहे पांच ऋषि, पराशर वंशात धूम्र वर्ण आहेत.

उक्तास्त्वेतेनृपवंशामुख्याःपरा शराःसूर्यसमप्रभावाः॥ येषांतुनाम्नापरिकीर्तितेनपापंसमग्रंपुरुषोजहाति॥३९॥

अर्थ- हे राजा, सूर्यासमान प्रतापी असून स्वकीय वंशात मुख्य असे हे पराशर वंशांतील ऋषी तुला सांगीतले; कारण यांच्या नाम संकीर्तनानें पुरुषाच्या समग्र पातकाचा नाश होतो. इति श्री मत्स्यपुराणे प्रवरानुकीर्तने वशिष्ठगोत्र पराशर वंशानुकीर्तनं नामद्विशततमोऽध्यायः२००

अध्याय २०१ वा

मत्स्यउवाच॥ अतः परमगस्त्यस्यवक्ष्येवंशोद्भवान्द्विजान्॥ अगस्त्यश्चकरंभश्चकौशल्यः करटस्तथा॥१॥ सुमेधसोमयोभुवस्तथागांधारकायणाः॥ पौलस्त्याः पौलहाश्चैवक्रतुवंशाभवास्त-

था ॥ २ ॥ आर्षेयाभिमताश्चैषां सर्वेषां प्रवराः-
शुभाः ॥ अगस्त्यश्च महेंद्र श्चऋषिश्चैव मयोभु
वः ॥ ३ ॥ परस्परमवैवाह्याऋषयः परिकीर्तिताः ॥

अर्थ- मत्स्य बोलतात हे मनुराजा इतःपर मी अगस्त्य मुनीच्या वंशात उत्प न्न झालेले ब्राम्हण तुला सांगतों; ते असेकीं, अगस्त्य, करंभ, कौशल्य, कर ट, सुमेधस्, मयोभुव, तसेच गांधारकायण, पौलस्त्य, पौलह, ऋतुनाम ऋषि, आणि त्यांच्या वंशांत उत्पन्न झालेले ब्राम्हण, ह्या अगस्त्य वंशांती ल सर्व ऋषींस, अगस्त्य, महेंद्र व मयोभुव हेच तीन प्रवर असल्या मुळें हे ऋ षी परस्पर विवाहास योग्य नाहींत असें सांगीतलें आहे.

पौर्णमासाः पारणाश्चआर्षेयाः परिकीर्तिताः ॥ ४ ॥
अगस्त्यःपौर्णमासश्च पारणश्च महातपाः ॥ परस्प
रमवैवाह्याः पौर्णमासास्तुपारणेः ॥ ५ ॥

अर्थ- आणि पौर्णमास व पारण, यांस अगस्त्य, पौर्णमास, महातपस्वी पारण हे तीन प्रवर आहेत; यास्तव पौर्णमास व पारण यांचा एकच प्रव र असल्या मुळें ते परस्परें विवाह संबंधास अयोग्य आहेत.

एवमुक्तोऋषीणांतु वंशाउत्तमपौरुषः ॥ अतः परं
प्रवक्ष्यामिकिंभवानद्यकथ्यताम् ॥ ६ ॥

अर्थ- हे मनुराजा उत्कृष्ट पराक्रमयुक्त ऋषींचा वंश मी तुला सांगीतला; इतःपर तुला काय कथन करूं तो मला प्रश्न कर.

मनुरुवाच ॥ पुलहस्य पुलस्त्यस्य ऋतोश्चैव महा
त्मनः ॥ अगस्त्यस्य तथाचैव कथं वंशास्तदुच्य-
ताम् ॥ ७ ॥

अर्थ- मनु बोलतो कीं पुलह, पुलस्त्य, महात्मा क्रतु, ऋषि तसाच अगस्त्य मुनि यांचे वंश क्रमानें कसे वृद्धिंगत झाले तें सांगा.१

मत्स्य उवाच ॥ ऋतुःखल्वनपत्योभूद्राजन्वैवस्वतें
तरे ॥ इध्मवाहं सपुत्रत्वेजग्राह ऋषिसत्तमः ॥ ८ ॥
अगस्त्यपुत्रं धर्मज्ञआगस्त्याः ऋतवस्ततः ॥ पुल
हस्य तथापुत्रास्त्रयश्च पृथिवीपते ॥ ९ ॥

अर्थ- मत्स्य भाषण करितात हे राजन् वैवस्वत मन्वंतरीं क्रतु ऋषीस संत-
ती नव्हती म्हणून त्या ऋषिश्रेष्ठानें इध्मवाह नामक ज्ञान संपन्न अगस्त्य पु
त्रास पुत्रत्वें करून मानिले; त्यामुळें अगस्त्य वंशस्थ ऋषींस क्रतुहे नाम-
प्राप्त झालें; आणि हे राजा पुलह ऋषीस तीन पुत्र झाले.

तेषांतुजन्मवक्ष्यामिउत्तरत्रयथाविधि॥पुलहस्य
प्रजांदृष्ट्वानातिप्रीतमनाःस्वकां॥१०॥अगस्त्य-
जंदृढास्यंतुपुत्रत्वेवृतवांस्तुतः॥पौलहाश्चतथा-
राजन्आगस्त्याःपरिकीर्तिताः॥११॥

अर्थ- त्या पुलह ऋषीच्या तिन्ही पुत्रांचे जन्म पुढें यथास्थित सांगेन
परंतु त्याकाळीं पुलह ऋषीनें आपली प्रजा अवलोकन करून त्या प्रजे
पासून विशेष संतोष न झाल्यामुळें त्यानें दृढास्य नामक अगस्त्य पुत्रा
स पुत्रत्वें करून स्वीकारिलें तेव्हां पासून झालेल्या पुलह, वंशांतील ऋ
षींस आगस्त्य असें ह्मणतात.

पुलस्त्यान्वयसंभूतान्दृष्ट्वारक्षःसमुद्भवान्॥अ-
गस्त्यस्यसुतंधीमान्पुत्रत्वेवृतवांस्ततः॥१२पौल
स्त्याश्चतथाराजनागस्त्याःपरिकीर्तिताः॥सगोत्र-
त्वादिमेसर्वेपरस्परमनन्वयाः॥१३॥

अर्थ- आणि बुद्धिमान् पुलस्त्य ऋषीनें आपल्या वंशांत राक्षस उत्पन्न-
झाले असें पाहून त्यानें अगस्त्य ऋषींच्या पुत्रास स्वकीय पुत्र केला, त्यामु
ळें हे राजा, त्या पुलस्त्याचे वंशांतील ऋषींस अगस्त्य हें नाम प्राप्त झालें.
आणि अगस्त्यादिक हे सर्व सगोत्र (एक गोत्री) असल्या कारणानें पर-
स्पर विवाह संबंधास योग्य नाहीत.

एतेतवोक्ताःप्रवराद्विजानांमहानुभावान्नृपवंशका-
राः॥एषांतुनाम्नापरिकीर्तितेनपापंसमग्रंपुरु-
षोजहाति॥१४॥

अर्थ- हे राजा असे महाप्रतापी व वंशवृद्धि करणारे हे श्रेष्ठ ब्राम्हण मी
तुला सांगीतले; कारण यांच्या नामकीर्तनानें पुरुष आपले संपूर्ण पातका
चा त्याग करितो.

इतिश्री मत्स्य पुराणे प्रवरानुकीर्तने अगस्त्य वंशो नाम द्व्यधिक द्विशततमोऽध्यायः॥ २०२॥

अध्याय २०३ रा.

मत्स्यउवाच॥ अस्मिन्वैवस्वतेप्राप्तेश्रृणुधर्मस्यपार्थिव॥दाक्षायणीभ्यःसकलवंशंदेवतमुत्तमं॥१॥

अर्थ- मत्स्य बोलतात हे राजा हें वैवस्वत मन्वंतर प्राप्त झालें असतां यांत धर्म नामक ऋषीपासून दक्ष कन्यांचे उदरीं झालेला सर्व देवतांचा वंश - मजपासून श्रवण कर.

पर्वतादिमहादुर्गशरीराणिनराधिप॥अरुंधत्याः प्रसूतानिधर्माद्वैवस्वतेंतरे॥ २ ॥

अर्थ- तो असा कीं, हे राजा वैवस्वत मन्वंतरीं धर्मापासून अरुंधतीला मोठ्या आकृतीनें फक्त अशीं पर्वतादिक अनेक स्थानें उत्पन्न झालीं; तीं लोकांस सुखानें गमन करण्या विषयीं अशक्य आहेत.

अष्टौचवसवःपुत्राःसोमपाश्चविभोस्तथा॥धरोध्रुवश्चसोमश्चआपश्चैवानिलानलौ॥३॥प्रत्यूषश्चप्रभासश्चवसवोऽष्टौप्रकीर्तिताः॥

अर्थ- तसेच त्या समर्थ धर्मापासून पुत्रत्वें करून अष्ट वसू उत्पन्न झाले ते असे कीं, धर, ध्रुव, सोम, आप, अनिल, अनल, प्रत्यूष, प्रभास, यां नांवांचे अष्ट वसू सांगीतले आहेत.

धरस्यपुत्रोद्रविणःकालःपुत्रोध्रुवस्यतु॥४॥कालस्यावयवानांतुशरीराणिनराधिप॥मूर्तिमंतिचकालाध्दिसंप्रसूतान्यशेषतः॥५॥

अर्थ- हे राजा त्या अष्ट वसूंतील धराचा पुत्र द्रविण, ध्रुवाचा पुत्र काल व त्या काला पासून मूर्तिमंत क्षणलवादिक कालाचे सर्व भाग झाले.

सोमस्यभगवान्वर्चाःश्रीमांश्चापस्यकीर्त्यते॥अनेकजन्मजननःकुमारस्त्वनलस्यतु॥६॥

अर्थ- आणि सोमास वर्चसू नामें ऐश्वर्यवान् पुत्र असून आप नामक वसूस श्रीमान् नांवाचा पुत्र होता व अनला सकुमार नामा पुत्र झाला; त्यांपासून अनेक पुत्र जन्मले

पुरोजवाश्चानिलस्य प्रत्यूषस्य तु देवलः ॥ विश्वक
र्माप्रभासस्य त्रिदशानां स वर्धकिः ॥ ७ ॥ समीहित
कराः प्रोक्ता नागवीथ्यादयो नव ॥

अर्थ- तसाच अनिलास पुरोजवा नामक पुत्र असून; प्रत्यूषाचा पुत्र देवल व प्रभासाचा पुत्र विश्वकर्मा तो देवांचा शिल्पकार होता; त्यास उत्तम इच्छित संपादन करणारे नागवीथि आदिकरून नऊ पुत्र झाले असें सांगीतलें आहे.

लंबापुत्रः स्मृतो घोषो भानोः पुत्राश्च भानवः ॥ ८ ॥-
ग्रहर्क्षाणां च सर्वेषामन्येषां चामितौजसां ॥ मरुत्व
त्यां मरुत्वंतः सर्वे पुत्राः प्रकीर्तिताः ॥ ९ ॥

अर्थ- तसेंच धर्मापासून लंबानामक स्त्रीला घोष नामें पुत्र झाला त्याचप्रमाणें भानु नांवाच्या पत्नीस भानु नामक पुत्र उत्पन्न झाले; आणि तिजपासून सर्व ग्रह, नक्षत्रें, अपरिमित तेजस्वी असे दुसरे ही पुत्र उत्पन्न झाले. धर्मापासून मरुत्वतीस मरुत्वंत नावाचेंच सर्व पुत्र झाले.

संकल्पायाश्च संकल्पस्तथा पुत्रः प्रकीर्तितः ॥ मुहूर्ता
श्च मुहूर्तायाः साध्याः साध्यासुताः स्मृताः ॥ १० ॥

अर्थ- तसेंच संकल्पा नामें धर्माच्या स्त्रीस संकल्प नामें पुत्र असून मुहूर्तेस मुहूर्त नांवाचे पुत्र झाले. आणि साध्या नामक धर्मपत्नीस साध्यनामक पुत्र उत्पन्न झाले.

मनोर्मनुश्च प्राणश्च नरोपानोंच वीर्यवान् ॥ चित्त-
हार्योयनश्चैव हंसो नारायणस्तथा ॥ ११ ॥ विभुश्चा
पि प्रभुश्चैव साध्या द्वादश कीर्तिताः ॥ विश्वायाश्च
तथा पुत्रा विश्वेदेवाः प्रकीर्तिताः ॥ १२ ॥

अर्थ- मन १, उर्मनु २, प्राण ३, नर ४, उपान ५, वीर्यवान् ६, चित्तहार्य ७, अयन ८, हंस ९, नारायण १०, विभु ११, प्रभु १२, असे बारा साध्यनामक देवगण सांगीतले आहेत; आणि विश्वा नामक धर्मस्त्रीस विश्वेदेव नांवाचे पुत्र झाले.

क्रतुर्दक्षो वसुः सत्यः कालकामो मुनिस्तथा ॥ कु
रजो मनुजो बीजो रोचमानश्च ते दश ॥ १३ ॥

अर्थ- क्रतु १, दक्ष २, वसु ३, सत्य ४, कालकाम ५, मुनि ६, कुरज ७, मनुज ८, बीज ९, रोचमान १०, असे विश्वेदेव दहा आहेत.

एतावदुक्तस्तव धर्मवंशः संक्षेपतः पार्थिववंशमुख्य ॥ व्यासेन वक्तुं नहि शक्यमस्ति राजन् विना वर्षशतैरनेकैः ॥ १४ ॥

अर्थ- हे राजवंश मुख्य मनुराजा तुला धर्म वंश संक्षेपानें एतावत्काल सांगीतला; कारण अनेक वर्ष शतानीं विस्तारानें सांगण्यास मी समर्थ नाहीं. इतिश्री मत्स्य पुराणे धर्म वंश वर्णने प्रवरानुकीर्तनं अधिक द्विशततमोऽध्यायः ॥ २०३ ॥

अध्याय २०४ था

मत्स्य उवाच ॥ एतद्वंशभवा विप्राः श्राद्धे भोज्याः प्रयत्नतः ॥ पितॄणां वल्लभं यस्मादेषु श्राद्धं नरेश्वर ॥ १ ॥

अर्थ- हे राजा सांगीतलेल्या ऋषि वंशांत उत्पन्न झालेले ब्राम्हण प्रयत्नानें श्राद्धांत भोजन घालण्यास योग्य आहेत; कारण यांस दिलेलें श्राद्ध भोजन पितरांस अति प्रिय आहे.

अतः परं प्रवक्ष्यामि पितृभिर्याः प्रकीर्तिताः ॥ गाथाः पार्थिवशार्दूल कामयद्भिः पुरे स्वके ॥ २ ॥

अर्थ- हे राज श्रेष्ठा मनुराजा स्वकीय पुरांत मनोरथ करणाऱ्या पितरानीं ज्या गाथा गायन केल्या आहेत त्या मी इतः पर तुला सांगतों.

अपि स्यात्स कुलेस्माकं यो नो दद्याज्जलांजलिं ॥ नदीषु बहुतोयासु शीतलासु विशेषतः ॥ ३ ॥

अर्थ- त्या अशा कीं विपुल उदकानें परिपूर्ण असून अति शीतल अशा नद्यांत आह्मास अंजलीनें जल देणारा असा कोणी आमच्या कुलांत होईल काय.?

अपि स्यात्स कुलेस्माकं यः श्राद्धं नित्यमाचरेत् ॥ पयोमूलफलैर्भक्ष्यैस्तिलतोयेन वा पुनः ॥ ४ ॥

अर्थ- तसेंच दुसरें असें कीं, दुग्ध, मूलें, फलें, भक्ष्य पदार्थ, व तिलोदक यानीं नित्य श्राद्ध करणारा असा आमच्या कुलांत उत्पन्न होईल काय.

अपिस्यात्सकुलेस्माकंयोनोदद्यात्त्रयोदशीं ॥ पा
यसंमधुसर्पिर्भ्यांवर्षासुचमघासुच ॥ ५ ॥

अर्थ- आणि वर्षा कालीं व मघा नक्षत्र युक्त त्रयोदशीस मध, घृत, पायस हे पदार्थ आम्हा पितरांस देणारा असा आमच्या कुलांत कोणी होईल काय

अपिस्यात्सकुलेस्माकंखड्गमांसेनयःसकृत् ॥
श्राद्धंकुर्यात्प्रयत्नेनकालशाकेनवापुनः ॥ ६ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें गेंड्याचें मांस किंवा काल शाक (कटिनिंब) याणीं एक वार तरीं प्रयत्नानें श्राद्ध करणारा असा कोणी पुरुष आमच्या वंशांत उत्पन्न होईल काय ?

कालशाकंमहाशाकंमधुमुन्यन्नमेवच ॥ विषाणव
र्ज्यंखड्गाआसूर्यंतद्दशीमहि ॥ ७ ॥

अर्थ- तसेच काल शाक (कटिनिंब) महाशाक (आलें) मध, हविष्यान्न मध, शिंग नसलेल्या गेंड्याचें मांस हे पदार्थ आह्मी सूर्य आहे तों कालपर्यंत आम्हीं भक्षण करतों.

गयायांदर्शनेराहोःखड्गमांसेनयोगिनां ॥ भोज
येत्कःकुलेस्माकंछायायांकुंजरस्यच ॥ ८ ॥ आ
कल्पकालिकीतृप्तिस्तेनास्माकंभविष्यति ॥ दाता
सर्वेषुलोकेषुकामचारोभविष्यति ॥ ९ ॥ आभूतसं
प्लवंकालंनात्रकार्याविचारणा ॥

अर्थ- आणि गया, राहु दर्शन (ग्रहण), गजच्छायापर्व यांतून कोणते ही देश कालीं गेंड्याच्या मांसानें योगी ब्राह्मणांस भोजन कोणी अर्पण करील तर त्यानें आह्मी कल्प पर्यंत तृप्त होऊन तो श्राद्ध करणारा सर्व लोकीं प्रलय काल पर्यंत यथेच्छ संचार करील यांत संशय नाहीं.

यदेतत्पंचकतस्मादेकेनापिवृषसदा ॥ १० ॥ तृप्तिंप्रा
प्स्यामचानंत्यांकिंपुनःसर्वसंपदा ॥ अपिस्यात्स
कुलेस्माकंदद्यात्कृष्णाजिनंचयः ॥ ११ ॥

अर्थ- आणि कटिनिंब, आलें, मध, हविष्यान्न व शिंगहीन गेंड्याचें मांस या पांच भक्ष्य पदार्थांतून एकानें ही आम्ही पितर सर्वदा अखंड तृप्त

होऊं, तेव्हां त्या पंच भक्ष्यादिक सर्व संपत्तीनें तर तृप्त होऊं. यांत आश्चर्य काय आहे. तसाच आमच्या कुलांत जो कोणी पुत्र उत्पन्न होईल तो- आमचे उद्देशानें कृष्णाजिनाचें दान करील काय.?

अपिस्यात्सकुलेस्माकंकश्चित्पुरुषसत्तमः॥प्र सूयमानांयोधेनुंदद्याद्ब्राह्मणपुंगवे॥१२॥

अर्थ- तशीच गाय प्रसूत होत असतां तेव्हां त्या उभयतोमुखी* गायी चें दान श्रेष्ठ ब्राह्मणास करणारा असा कोणी श्रेष्ठ पुरुष आमच्या वं शांत उत्पन्न होईल काय.?

अपिस्यात्सकुलेस्माकंवृषभंयः समुत्सृजेत्॥ स- र्ववर्णविशेषेणशुक्लंनीलंवृषंतथा॥१३॥

अर्थ- आणि ब्राह्मणादिक श्रेष्ठ वर्ण असून जो आपल्या पितरांच्या उद्दे शानें शुभ्र किंवा नील वर्ण अशा वृषभाचा उत्सर्ग करणारा असा कोणी पुत्र आमच्या वंशांत उत्पन्न होईल काय.?

अपिस्यात्सकुलेस्माकंयःकुर्यात्श्रद्धयान्वितः॥- सुवर्णदानंगोदानंपृथिवीदानमेवच॥१४॥

अर्थ- तसाच भक्तियुक्त कोणी जो स्वशक्त्यनुसार सुवर्णदान गोप्रदान- व पृथ्वीदान ही करील; असा तो पुरुष आमच्या कुलांत होईल काय.?

अपिस्यात्सकुलेस्माकंकश्चित्पुरुषसत्तमः॥ कूपा रामतडागानांवापीनांयश्चकारकः॥१५॥

अर्थ- आणि लोकोपकारार्थ कूप, आड, आराम, (बाग) तडाग (तलाव) व वापी (विहिरी) हीं करविणारा असा कोणी श्रेष्ठ पुरुष आमच्या कुलांत उत्पन्न होईल काय.?

अपिस्यात्सकुलेस्माकंसर्वभावेनयोहरिं॥ प्रया याच्छरणंविष्णुंदेवेशंमधुसूदनं॥१६॥

अर्थ- त्यांचप्रमाणें सर्व देवांचे स्वामी असून मधु दैत्याचे नाशक व- भक्त दुःख हरण करणारे अशा विष्णूंस सर्व भावानें शरण जाणारा- असा कोणी पुरुष आमच्या कुळांत होईल काय.?

*: गाय वीत असतां वासरूं सर्व बाहेर आलें नाहीं तोपर्यंत एकीकडे तिचें मुख व एकीकडे वासराचें मुख असतें म्हणून तिला उभयतोमुखी म्हणतात.

अपिनःसकुलेभूयात्कश्चिद्विद्वान्विचक्षणः॥ धर्मशास्त्राणियोदद्याद्विधिनाविदुषामपि ॥१७॥

अर्थ- आणि जो स्वतः विद्वान् व चतुर असून तो इतर ज्ञान निष्ठांस विधीनें धर्म शास्त्रांचें दान किंवा अध्यापन करणारा असा कोणी पुरुष आमच्या कुलांत होईल काय.

एतावदुक्तं तवभूमिपालश्राद्धस्य कल्पंमुनिसंप्रदिष्टं॥पापापहंपुण्यविवर्धनंचलोकेषुमुरव्यत्वकरंतथैव॥१८॥

अर्थ- हे राजा ऋषीनीं सांगीतलेला असा श्राद्ध प्रकार मी तुला कथन केला; हा पापाचा नाशक व पुण्य वृद्धि कारक असून लोकांत मुख्यत्व - प्राप्तीस ही कारण आहे. इतिश्री मत्स्य पुराणेपितृगाथानु कीर्तनं नाम चतुरधिक द्विशततमोऽध्यायः ॥२०४॥

अध्याय २०५ वा

मनुरुवाच॥प्रसूयमानादातव्याधेनुर्ब्राह्मणपुंगवे॥विधिनाकेनधर्मज्ञदानंदद्याच्चकिंफलं॥१॥

अर्थ- मनु बोलतो अहो देवा तुम्ही धर्म शास्त्रज्ञ आहां यास्तव मी आपणास विचारतों कीं गाय प्रसूत होत असतां त्या काळीं त्या उभय तोमुखी धेनूचें दान कोणत्या विधीनें करावें आणि त्या दानाचें फलकाय आहे.

मत्स्यउवाच॥स्वर्णशृंगीरौप्यखुरांमुक्तालांगूलभूषितां॥ कांस्योपदोहनांराजन्सवत्सांद्विजपुंगवे॥२॥ प्रसूयमानांगांदत्वामहत्पुण्यफलंलभेत्॥यावद्वत्सोयोनिगतोयावद्गर्भंनमुंचति॥३॥तावद्पृथिवीज्ञेयासशैलवनकानना॥

अर्थ- ते समयीं मत्स्य सांगतात हे राजा सुवर्णाचीं शिंगे रुप्याचे - खुर व मोत्याचें पुच्छ या भूषणानीं अलंकृत अशी गाय प्रसूत होत असतां ती उभयतोमुखी धेनु वत्स व धारेचें कांस्य पात्र यांसहित श्रेष्ठ ब्राम्हणास दिली, तर महापुण्यफल प्राप्त होतें; कारण जो काल पर्यंत तो वत्स-

योनींत आहे, तों काल पर्यंत ती गाय पर्वत, वनें व उपवनें यांसहित जी पृथिवी तिच्या सारिखी आहे; यास्तव तिच्या दानानें सर्व पृथिवी दानाचें फल प्राप्त होतें.

प्रसूयमानां यो दद्याद्धेनुं द्रविणसंयुतां ॥ ४ ॥ ससमुद्रगुहा तेन सशैलवनकानना ॥ चतुरंता भवेद्दत्ता पृथिवी नात्र संशयः ॥ ५ ॥

अर्थ- अशी ती प्रसूत होणारी गाय वत्साचें सर्वांग बाहेर न आलें; तों काल पर्यंत बहु द्रव्यसहित ती गाय दान केली असतां दात्यास, समुद्र, गुहा, पर्वत, वनें व उपवनें यांसहित पूर्वादिक चार सायंत दिशांसहित समग्र पृथिवी दानाचें फल प्राप्त होतें यांत संशय नाहीं.

यावंति धेनुरोमाणि वत्सस्य च नराधिप ॥ तावत्संख्यकयुगगणं देवलोके महीयते ॥ ६ ॥

अर्थ- आणि ती गाय व तिचा वत्स यांच्या अंगावर जितके केश असतील तितक्या युगांच्या चौकड्यापर्यंत हे राजा तो उभयतो मुखी गोप्रदान करणारा देवलोकांत वास करतो.

पितॄन्पितामहांश्चैव तथैव प्रपितामहान् ॥ उद्धरिष्यत्यसंदेहान्नरकाद्भूरिदक्षिणः ॥ ७ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या गोप्रदानावर जो दाता विपुल दक्षिणा देतो, तो आपले पितर, पितामह व प्रपितामह यांचा नरकांतून उद्धार करतो; यांत संशय नाहीं.

घृतक्षीरवहाः कुल्या दधिपायसकर्दमाः ॥ यत्र तत्र गतिस्तस्य द्रुमाश्चेप्सितकामदाः ॥ गोलोकः सुलभस्तस्य ब्रह्मलोकश्च पार्थिव ॥ ८ ॥

अर्थ- हे राजा आणि असें गोप्रदान करणारा तो पुरुष ज्या स्थानीं घृत, दुग्ध यांच्या नद्या असून दधि शिप्रा यांचे कर्दम (चिखल) व इच्छित पदार्थ देणारे कल्पवृक्ष हे सर्व विषय आहेत, असे जे गोलोक व सत्यलोक हे त्यास सुखें करून प्राप्त होतात.

स्त्रियश्च तं चंद्रसमानवक्त्राः प्रतप्तजांबूनदतु-

त्यरूपाः॥ महानितंबास्तनुवृत्तमध्याभजंत्यजस्त्रं नलिनाभनेत्राः॥९॥

अर्थ- तशाच चंद्रसमान मुखाने शोभायमान असून अति तप्त जांबूनद सुवर्णासारख्या तेजःपुंज रूपाने युक्त तसाच पुष्ट कटिप्रदेश ग, कंबर वर्तुलाकृति असून बारीक व कमलासारखे कांतियुक्त नेत्र इत्यादिक सलक्षण अवयवानीं सुशोभित स्वर्गवासि सुंदर स्त्रिया त्या गोप्रदान करणाराची निरंतर सेवा करितात. इतिश्री मत्स्यपुराणे उभय मुखी प्रदानि को नाम पंचाधिक द्विशततमोऽध्यायः॥२०५॥.

अध्याय २०६ वा

मनुरुवाच॥ कृष्णाजिनप्रदानस्यविधिकालौम मानघ॥ ब्राम्हणांश्चतथाचक्ष्वतत्रमेसंशयोमहान्॥१॥

अर्थ- पुनः मनुराजा प्रश्न करितो कीं, हे निष्पाप देवा कृष्णाजिन दानाचा विधि काल व या दानास पात्र भूत ब्राह्मण हें सर्व मला कथन करा; कारण याविषयी मला महान् संशय आहे.

मत्स्यउवाच॥ वैशाखीपौर्णमासीचग्रहणेशशिसूर्ययोः॥ पौर्णमासीतुयामाघेह्याषाढीकार्तिकीतथा॥२॥ उत्तरायणं द्वादशीवातस्यांदत्तंमहाफलं॥

अर्थ- तेसमयीं भगवान् मत्स्य बोलतात; हे राजा वैशाखी पूर्णिमा चंद्र, सूर्याचें ग्रहण माघी आषाढी व कार्तिकी पूर्णिमा, उत्तरायण व द्वादशी या तिथींस कृष्णाजिन दान केलें असतां, तें महा फलदायक होतें.

आहिताग्निर्द्विजोयस्तुतद्देयंतस्यपार्थिव॥३॥ यथायेनविधानेनतन्मेनिगदतःशृणु॥

अर्थ हे राजा तें कृष्णाजिन दान अग्नि होत्री ब्राह्मणास ज्या विधीनें जसें द्यावें तसें मज पासून श्रवण कर.

गोमयेनोपलिप्तेतुशुचौदेशेनराधिप॥४॥ आदा

वेवसमास्तीर्यशोभनंशास्तमाविकं ॥ ततःसश्रृंगं
सखुरमास्तरेत्कृष्णमार्गकं ॥ ५ ॥

अर्थ- तो असाकीं हे राजन् गोमयानें सारविलेल्या भूमीवर प्रथमतः च उत्तम विशाल शुभ्र कांबळा घालून वर शिंगे व खुर यांसहित कृष्णाजिन पसरावें

कर्तव्यंरुक्मश्रृंगंतद्रौप्यदंतंतथैवच ॥ लांगूलं-
मौक्तिकैर्युक्तं तिलच्छन्नंतथैवच ॥ ६ ॥ तिलैश्च
शिखिनंकृत्वावाससाच्छादयेच्छुचि ॥ सुवर्णना-
भंतत्कुर्यादलंकुर्याद्विशेषतः ॥ ७ ॥ रत्नैर्गंधैर्यथा
शक्त्यातस्यादिक्षुचविन्यसेत् ॥ कांस्यपात्राणिच
त्वारितेषुदद्याद्यथाक्रमं ॥ ८ ॥

अर्थ- आणि त्या कृष्णाजिनाच्या शिंगांस सुवर्णाचीं शिंगे घालून त्याच्या दंतस्थानीं रुप्याचे दंत करून ठेवावे; तसेंच त्याचे पुच्छास मोत्ये लावून तें तिळानीं आच्छादित करावें; त्याचप्रमाणें त्या मृगचर्मास तिलांची शिखा करून तें पवित्र कृष्णाजिन वस्त्रानें आच्छादित करावें; तशीच त्यास सुवर्णाची नाभि करून स्वशक्त्यनुसार रत्नें व अनेक सुगंध चंदनें यानीं व कांस्यपात्रें अलंकृत करावीं, आणि त्याच्या च्यार दिशांस तीं कांस्य पात्रें पूर्वादिक्रमानें ठेऊन त्यांतच पुरें सांगीतलेले पदार्थ घालावे;

मृन्मयेषुचपात्रेषुपूर्वादिषुयथाक्रमं ॥ घृतंक्षीरं-
दधिक्षौद्रमेवंदद्याद्यथाविधि ॥ ९ ॥

अर्थ- तशींच त्या कृष्णाजिनाच्या पूर्वादिक चार दिशांस मृन्मय चार पात्रें ठेऊन त्यांत क्रमानें घृत, दुग्ध, दधि, व मध हे चार पदार्थ प्रत्येक पात्रांत एक असे विधीनें घालावे

चंपकस्यतथाशाखामव्रणंकुंभमेवच ॥ बाह्यो-
पस्थापनंकुर्याच्छुभचित्तोनिवेशयेत् ॥ १० ॥

अर्थ- तशीच चाफ्याची एक शाखा व छिद्ररहित कलश हे त्या गोमयाच्या मंडला बाहेर यजमानानें शुद्धचित्तें करून स्थापन करावे.

सूक्ष्मवस्त्रंशुभंपीतमाजेनार्थेप्रयोजयेत्॥ तथा
धातुमयीःपात्रीःपादयोस्तस्यदापयेत्॥११॥

अर्थ- आणि पीत वर्ण उत्तम सूक्ष्म वस्त्र कर्त्यानें आपलें अंगपुस-
ण्या साठीं ठेवावें; तशींच धातु मय पात्रें त्या चर्मांचे पायांवरस्थापनकर.

यानिकानिचपापानिमयालोभात्कृतानिवै॥-
लोहपात्रादिदानेनप्रणश्यंतुममाशुवै॥१२॥ति
लपूर्णंततःकृत्वावामपादेनिवेशयेत्॥

अर्थ- तीं अशीं कीं, मीं लोभा मुळें जीं कांहीं पापें केलीं; तीं माझीं पात
कें लोह पात्रा दिकांच्या दानानें शीघ्र नाश पावोत; या मंत्रानें तिळानीं
पूर्ण भरलेलें लोह पात्र त्या कृष्णाजिनाच्या वाम पादावर ठेवावें.

यानिकानिचपापानिकर्णोत्थानि कृतानिच॥-
१३॥ कांस्यपात्रप्रदानेनतानिनश्यंतुमेसदा॥म
धुपूर्णंतुतत्कृत्वापादेवैदक्षिणेन्यसेत्॥१४॥

अर्थ- तशींच जीं कांहीं पापें कर्ण द्वारा केलेलीं आहेत तीं माझीं पात
कें कांस्यपात्र दानानें समस्त नाश पावोत; या मंत्रानें प्रार्थना करून म-
धानें पूर्ण भरलेलें तें पात्र कृष्णाजिनाच्या दक्षिण चरणा वर स्थापन करा.

परापवादपैशून्याद्वृथामांसस्यभक्षणात्॥ तत्रो
त्थितंचमेपापंताम्रपात्रात्प्रणश्यतु॥१५॥

अर्थ- त्याच प्रमाणें लोकांवर मिथ्या आरोप करणें किंवा इतरांचीनिं-
दा करणें, दुसऱ्याचा दोष सूचविणें व वृथा मांस भक्षण करणें यांपासून-
घडलेलें पाप, ताम्र पात्र दानानें नाश पावो.

कन्यानृतानृगवांचैवपरदाराभिमर्शनात्॥ रौप्य
पात्रप्रदानाद्धिक्षिप्रंनाशंप्रयातुमे॥१६॥

अर्थ- तसेंच कन्या व गायी यांविषयीं असत्य भाषणादि करणें व परस्त्रि
यांचा उपभोग करणें यांपासून झालेल्या माझ्या पापाचा नाश रौप्य पात्रा-
च्या दानानें शीघ्र होवो.

उर्ध्वपादेतिमेकार्यंताम्रस्यरजतस्यच॥ जन्मज-
न्मसहस्रेषुकृतंपापंकुबुद्धिना॥१७॥

स्रुवर्णपात्रदानात्तु नाशयाशु जनार्दन ॥

अर्थ- असे हे पूर्वीचे दोन मंत्र म्हणून ताम्र पात्र व रौप्य पात्र हीं दोन्हीं पात्रें त्या कृष्णाजिनाच्या पुढील पायांवर स्थापन करावीं आणि मी सहस्रावधि जन्मांत कुबुद्धीनें केलेलें पाप हे जनार्दना आपण या स्रुवर्ण पात्र दानानें त्वरित नष्ट करावें.

हेममुक्ताविद्रुमंच दाडिमं बीजपूरकं ॥ १८ ॥ प्रशस्तपत्रेश्रवणे खुरेशृंगाटकानिच ॥ एवंकृत्वा यथोक्तेन सर्वशाकफलानिच ॥ १९ ॥

अर्थ- हा मंत्र म्हणून स्रुवर्ण पात्र मध्य भागीं स्थापन करून त्यांत स्रुवर्ण, मौक्तिक, पोंवळें, दाळिंब व महाळुंग हे पदार्थ घालून दोन आम्र पत्रें दोनी कानांवर ठेऊन खुरावर शिंगाडे ठेवावे या प्रमाणें हीं सर्व शाकफळें यथोक्त विधीनें स्थापन करून ठेवावीं.

तस्मात्प्रतिग्रहविद्विद्वान् आहिताग्निर्द्विजोत्तमः ॥ स्नातो वस्त्रयुगच्छन्नः स्वशक्त्या चाप्यलंकृतः ॥ २० ॥ प्रतिग्रहश्चतस्योक्तः पुच्छदेशे महीपते ॥ ततएवं समीपेतु मंत्रमेनमुदीरयेत् ॥ २१ ॥

अर्थ- तसाच त्या कृष्णाजिनाचें दान घेणारा उत्तम ब्राह्मण ज्ञानसंपन्न अग्नीहोत्री असून त्यानें स्नान करून दोन वस्त्रें परिधान केलेलीं असावीं; आणि त्यानें स्वशक्त्यनुसार अलंकार धारण करून त्या कृष्णाजिनाच्या पुच्छाकडे बसून तें दान घ्यावें; हे पृथ्वीपालका पश्चात् त्या मृगचर्मासमीप, हा पुढें सांगीतलेला मंत्र म्हणावा.

कृष्णः कृष्णगलोदेवः कृष्णाजिनधरस्तथा ॥ तद्दानाद्धूतपापस्य प्रीयतां वृषभध्वजः ॥ २२ ॥

अर्थ- तो असा कीं स्वरूपानें कृष्णवर्ण असून पृष्ठावर कृष्णाजिन धारण करणारे व वृषभ चिन्हित ध्वजयुक्त रथांत आरोहण करणारे नील कंठ महादेव या कृष्णाजिनाच्या दानानें निष्पाप झालेल्या यजमानास प्रसन्न होवोत.

अनेनविधिना दत्वा यथावत्कृष्णमार्गकं ॥ नस्पृ-

श्योसौद्विजोराजन्नचितियूपसमोहिसः ॥ २३ ॥

अर्थ- हे राजा या यथासांग विधीनें कृष्णाजिनाचें दान घेणारा ब्राह्मण, स्मशानांतील काष्ठासमान स्पर्शास ही योग्य नाही असें जाणावें.

सदानेश्राद्धकालेच दूरतः परिवर्जयेत् ॥ स्वगृहा

त्प्रेष्यतंविप्रंमंगलस्नानमाचरेत् ॥ २ ॥

अर्थ- तसाच तो कृष्णाजिनाचा प्रतिग्रह करणारा ब्राम्हण सर्व दानें व श्राद्ध प्रसंग यांत सर्वथा वर्ज करावा; आणि तें दान घेतल्या वर त्या ब्राम्हणास यजमानानें स्वगृहांतून बाहेर घालवून स्वतः मंगलस्नान करा.

पूर्णकुंभेन राजेंद्र शाखयाचंपकस्यतु ॥ कृत्वा

चार्यश्च कलशंमंत्रेणानेनमूर्धनि ॥ २५ ॥ आ

प्यायस्वसमुद्रज्येष्ठाऋचासस्नाप्यषोडश, अहतेवा

ससीवीतआचांतः शुचितामियात् ॥ २६ ॥ तद्वा

सः कुंभसहितं नीत्वाक्षेप्यंचतुष्पथे ॥

अर्थ- हे राजेंद्रा नंतर मुख्य आचार्यानें आप्यायस्व या मंत्रानें कलशाचें अभिमंत्रण करून त्या पूर्ण कुंभांतील उदक चाफ्याच्या शाखेनें यजमानाच्या मस्तका वर आचार्यानें समुद्रज्येष्ठा या सूक्ताच्या सोळा ऋचांनीं अभिषेक केल्या वर यजमानानें नवीन दोन वस्त्रें परिधान करून आचमन केलें असतां तो शुद्ध होतो; पश्चात् तें पूर्वीचें वस्त्र त्या कुंभा साहित नेऊनच व्हाठ्या वर टाकावें.

कृतेनानेनयातुष्टिर्नसाशक्यासुरैरपि ॥ २७ ॥

वक्तुंहिनृपतिश्रेष्ठतथाप्युद्देशतः श्रृणु ॥ समग्र

भूमिदानस्यफलंप्राप्नोत्यसंशयं ॥ २८ ॥

अर्थ- या विधीनें कृष्णाजिन दान केलें असतां, जो परमेश्वराचा संतोष होतो. त्याचें परिमाण सांगण्या विषयीं देव ही समर्थ नाहीत; तथापि हे राजश्रेष्ठा किंचित् दिक्प्रदर्शन मात्र श्रवण कर. त्यास सर्व भूदानाचें फल निश्चयें करून प्राप्त होतें.

सर्वान्लोकाञ्जयतिकामचारीविहंगवत् ॥

आभूतसंप्लवंयावत्स्वर्गमाप्नोत्यसंशयं ॥ २९ ॥

अर्थ- तसाच तो सर्व लोकांस जिंकून तो तेथें पश्च्यात्सार रवा यथेच्छ संचार करतो; आणि प्रलय काल पर्यंत स्वर्ग लोकीं निःसंशय वास करतो.

नपिता पुत्रमरणं वियोगं भार्यया सह॥ धनदेशपरित्यागं नचैवेहाप्नुयात्क्वचित्॥ ३०॥

अर्थ- त्याच प्रमाणें कृष्णाजिन दान करणाराचा पिता व पुत्र हे अकालीं मृत्यु पावत नाहीत; तसाच त्याचा भार्येशीं वियोग होत नाहीं; आणि धन व स्वदेश यांचा ही वियोग कदापि या लोकीं त्यास प्राप्त होत नाहीं.

कृष्णोप्सितं कृष्णमृगस्य चर्म दत्त्वा द्विजेंद्राय समाहितात्मा॥ यथोक्तमेतन्मरणं नशोचेत्प्राप्नोत्यभीष्टं मनसः फलं तत्॥ ३१॥

अर्थ- तसेंच श्रीकृष्णास प्रिय जें कृष्णमृगाचें चर्म तें स्वस्थ चित्तानें श्रेष्ठ ब्राह्मणास यथाविधीनें दिलें असतां; तेणें करून दात्यास मरण संबंधि शोक न होतां त्यास मनोदयानुरूप या लोकीं व परलोकीं इष्ट फल प्राप्त होतें. इतिश्री मत्स्यपुराणे कृष्णाजिनप्रदानं नाम षडुत्तरद्विशततमोऽध्यायः॥ २०६॥

अध्याय २०७ वा

मनुरुवाच॥ भगवंछ्रोतुमिच्छामि वृषभस्य च लक्षणं॥ वृषोत्सर्गविधिं चैव तथा पुण्यफलं महत्॥ १॥

अर्थ- मनुराजा प्रश्न करतो कीं हे भगवन् वृषभाचें लक्षण, वृषोत्सर्गाचा विधि तसेंच त्याचें महत्पुण्य व फल हे सर्व श्रवण करण्याविषयीं मी इच्छितों.

मत्स्य उवाच॥ धेनुमादौ परीक्षेत सुशीलां च गुणान्वितां॥ अव्यंगामपरिक्लिष्टां जीववत्सामरोगिणीं॥ २॥ स्निग्धवर्णां स्निग्धखुरां स्निग्धशृंगीं तथैव च॥ मनोहराकृतिं सौम्यां सुप्रमाणामनुत्धतां॥ ३॥ आवर्तैर्दक्षिणावर्तैर्युक्तां दक्षिणतस्तथा॥ वामावर्तैर्वामतश्च विस्तीर्णजघनां

था ॥ ४ ॥ मृदुसंहतताम्रोष्ठीरक्तग्रीवासशोभि
तां ॥ अश्यामदीर्घास्फुटितारक्तजिव्हालथान्व
या ॥ ५ ॥ विस्नावामलनेत्राचशफैरविरलैर्हढैः
॥ वैडूर्यमधुवर्णैश्चजलबुद्बुदसन्निभैः ॥ ६ ॥ रक्त
स्निग्धैश्चनयनैस्तथारक्तकनीनिकैः ॥ ससचतु
र्दशादंताच्तथा वाश्यामतालुका ॥ ७ ॥ षडुन्न-
तासपार्श्वोरूः पृथक्पंचसमायता ॥ अष्टायतशि
रोग्रीवायाराजन्सासलक्षणा ॥ ८ ॥

अर्थ- ते समयीं मत्स्य भगवान् बोलले हे राजा, प्रथमतः गायींची परीक्षा करावी; यास्तव तिचीं सलक्षणें सांगतों तीं अशीं कीं ती गाय उत्तम स्वभाव व गुण यानीं युक्त असून अवयवादिकानीं व्यंग नसून आसमंतात् क्लेशानीं रहित असावी; तसाच तिचा वत्स जिवंत असून तो रोग हीन असावा; त्याचप्रमाणें तिचा वर्ण, खुर व शिंगें हीं कांतियुक्त असून सुंदर सौम्य आकृति व तिचें उत्तम प्रमाण यानीं संपन्न व उध्दत नसावी; तसेंच तिच्या उजव्या अंगावर दक्षिणावर्त भोंवरे व वामांगीं अप्रदक्षिण भोंवरे असून तिच्या ओंटीचा भाग विस्तीर्ण असावा; तसेंच तिचे ओष्ठ आरक्त वर्ण मृदु व मिळालेले असून ती मानेच्या आरक्त वर्णानें सशोभित असावी; आणि तिची जिव्हा कृष्णवर्ण व फुटिर नसून आरक्त व दीर्घ असावी; तसेंच नेत्रही स्नाव रहित स्वच्छ असून तिचे खुर विरळ नसून दृढ असावे. आणि वैडूर्य मणि व मध यांसमान वर्ण युक्त नेत्र असून उदकाच्या बुड बुड्यासारखे वर्तुळ व उंच असावे तशीच नेत्रांची लाली कांति युक्त असून त्यातील बाहुलीही आरक्त वर्ण असावी; अष्ठाणव दंतानीं युक्त असून टाळूचा भाग श्यामवर्ण नसावा; तसेंच तिचे अवयव उंच व वामदक्षिण या दोन्ही बाजू व मांड्या सुंदर, पांच अंगें पुष्ट असून समान दीर्घ शिर, मान व इतर आठ अंगें हीं दहा स्थानें लांब असावीं; हे राजा अशीजी गाय तीच सलक्षण जाणावी.

मनुरुवाच ॥ षडुन्नताः के भगवन् केचपंचसमा-

यता:॥ आयताश्चतथैवाष्टौधनूनांकेशुभावहा:॥
॥९॥

अर्थ- पुन: मनु प्रश्न करतो; हे भगवन् गायींचे कोणते अवयव सहा उंच, पांच कोणते समान दीर्घ, तसेच आठ लांब कोणते हीं सर्व शुभ कारक अंगे मला कथन करा.

मत्स्यउवाच॥ उर: पृष्ठंशिर: कुक्षीश्रोणीच्चवसु धाधिप॥ षडुन्नतानिधेनूनांपूजयंतिविचक्ष णा:॥१०॥

अर्थ- तेसमयीं भगवान् मत्स्य बोलले हे राजा, हृदय, पृष्ठ, मस्त क, दोन कुक्षि व कंबर हीं सहा अंगे उंच असावीं असें ज्ञाते ह्मणतात.

कर्णौनेत्रेललाटंचपंचभास्करनंदन॥ समायता निशास्यंतेपुच्छंसास्नाचसक्थिनी ॥११॥ चत्वा रश्चस्तनाराजन्ज्ञेयाह्यष्टौमनीषिभि:॥ शिरोग्री वायताश्चैतेभूमिपालदश स्मृता:॥१२॥

अर्थ- हे सूर्य नंदना भूपाल कराजा, तसेंच दोन कर्ण दोन नेत्र, वल लाट(कपाळ) हे पांच अवयव समान दीर्घ उत्तम असून पुच्छ, मा नेखालच्या लोंबणाराभाग, मांड्याचार स्तन हे आठ आणि मस्तक व मान दोन मिळून दहा हे सर्व अवयव दीर्घ असावे; ते शुभ कार क असें ज्ञानी लोकांचे मत आहे.

तस्या:सुतंपरीक्षेतवृषभंलक्षणान्वितं॥ उन्न तस्कंधककुदंऋजुलांगूलकंबलं॥१३॥ महा कटितटस्कंधंवैडूर्यमणिलोचनं॥ प्रवालगर्भ शृंगाग्रंसुदीर्घपृथुवालधिं॥१४॥ नवाष्टादश संख्यैर्वातीक्ष्णाग्रैर्दशनै:शुभै:॥ मल्लिकाक्षश्च मोक्तव्योगृहेपिधनधान्यद:॥१५॥ वर्णतस्ता म्रकपिलोब्राम्हणस्यप्रशस्यते

अर्थ- तशाच गायीच्या लक्षण संपन्न वत्साची परीक्षा करावी; एत दर्थ त्याचीं उत्तम लक्षणें सांगतों तीं अशीं कीं त्याच्या स्कंधस्थानीं जे

कोळेंतें उंच असून पुच्छ व मानेखालचा लोंबणारा भागहीं सरळ असावीं. आणि त्याच्या कंबरेचा भाग कोळें हीं मोठीं पुष्ट, नेत्र वैडूर्य मण्यासारखे तेजस्वी, पोंवळ्याच्या गाभ्यासमान शिंगांचीं अग्रें उत्तम लंबायमान बहुकेशयुक्त पुच्छ तीक्ष्ण अग्रयुक्त उत्तम अठरा दांत, हंसासमान नेत्रानीं युक्त असा जो वृषभ तो घरांत धनधान्य दायक असतो; त्याचा उत्सर्ग करावा; आणि तो वृषभ ताम्रवर्ण असून पिंगट वर्णानें युक्त असेल तर तो ब्राह्मणा सशुभ कारक होतो.

श्वेतो रक्तश्च कृष्णश्च गौरः पाटल एव च ॥ शृंगि
णस्ताम्रपृष्ठश्च शबलः पंचवालकैः ॥ पृथुक
र्णो महास्कंधः श्लक्ष्णरोमा च यो भवेत् ॥ रक्ता
क्षः कपिलो यश्च रक्तशृंगतलो भवेत् ॥ १७ ॥
श्वेतोदरः कृष्णपार्श्वो ब्राह्मणस्य तु शस्यते ॥

अर्थ- तसाच शुभ्र, किंवा आरक्त वर्ण, कृष्णवर्ण, पीतवर्ण, अथवा शुभ्र व ताम्र या मिश्र वर्णानें युक्त पृष्ट भागीं आरक्त वर्ण, पांच वर्णांच्या केशानीं विचित्र वर्ण, असा वत्स मोठ्या कर्णानीं युक्त असून मोठें कोळें, बारीक केश, आरक्त नेत्र, शिंगाचा मूलभाग आरक्त वर्ण, शुभ्र उदर, वाम व दक्षिण या दोन्ही बाजू कृष्ण वर्ण असून पिंगट असा गायीचा वत्स ब्राह्मणास कल्याण कारक होतो.

स्निग्धारक्तेन वर्णेन क्षत्रियस्य प्रशस्यते ॥ १८ ॥
कांचनाभेन वैश्यस्य कृष्णेनाप्यंत्यजन्मनः ॥ यस्य
प्रागायते शृंगे भ्रूमुखाभिमुखे सदा ॥ १९ ॥
सर्वेषामेव वर्णानां स सर्वः सर्वार्थसाधकः ॥

अर्थ- तसाच कांतियुक्त आरक्त वर्ण वृषभ क्षत्रिया सहित कारक असून सुवर्णा समान पीत वर्ण युक्त वृषभ वैश्यास सुखकारक व कृष्ण वर्ण वृषभ शूद्रास मंगल दायक आहे; आणि ज्यांचीं शृंगें त्याच्या भोंवया व मुखयांसन्मुख सर्वदा पुढचे भागीं लांब असून सर्व वर्णानीं युक्त असा वृषभ सर्व वर्णांचीं संपूर्ण कार्यें साधणारा अस.

मार्जारपादः कपिलो धन्यः कपिलपिंगलः ॥ २०
॥ श्वेतो मार्जारपादस्तु धन्यो मणिनिभेक्षणः ॥
करटः पिंगलश्चैव श्वेतपादस्तथैव च ॥ २१ ॥ स
र्वपादसितो यश्च द्विपादश्वेत एव च ॥ कपिंजल
निभो धन्यस्तथा तित्तिरिसन्निभः ॥ २२ ॥ आक
र्णमूलश्वेतं तु मुखं यस्य प्रकाशते ॥ नंदीमुखः
स विज्ञेयो रक्तवर्णो विशेषतः ॥ २३ ॥ श्वेतं तु ज
ठरं यस्य भवेत्पृष्ठं च गोपतेः ॥ वृषभः स समुद्राक्षः
सततं कुलवर्धनः ॥ २४ ॥ मल्लिकापुष्पचित्रश्च
धन्यो भवति पुंगवः ॥ कमलैर्मंडलैश्चापि चित्रो भ
वति भाग्यदः ॥ २५ ॥ अतसीपुष्पवर्णश्च तथा ध
न्यतरः स्मृतः ॥ एते धन्यास्तथाधन्यान्कीर्तयि
ष्यामि ते नृप ॥ २६ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें मार्जारासारख्या पायानीं फक्त असून सामान्य-पिंगट वर्ण किंवा अति पिंगट वर्ण जो वृषभ तो घरांत धन वृद्धि कारक-असतो. तसाच शुभ्र वर्ण असून मार्जारासारखे पाय व मण्यासारखे तेजस्वी नेत्र यानीं फक्त जो वृषभ तो ही धन प्राप्तीस कारण आहे; आणि काकवर्ण किंवा पिंगट वर्ण असून चारी शुभ्र पायानीं फक्त, अथवा दोन शुभ्र पायानीं फक्त, तसेच कपिंजल व तित्तिरि या पक्ष्यां समान वर्णानीं फक्त हे वृषभ द्रव्य प्राप्ति दायक आहेत. तसेंच ज्याचें मुख कर्णाचे मूल भागापर्यंत शुभ्र असतें; त्यास नंदी मुख म्हणतात. तो वर्णानें आरक्त असेल तर विशेष कल्याण प्रद होतो. आणि ज्याचें उदर व पृष्ठ हीं शुभ्र असतील; तो समुद्राक्ष वृषभ निरंतर कुलाची वृद्धि करतो. तसाच मोगरीच्या पुष्पा समान विचित्र वर्ण फक्त श्रेष्ठ वृषभ धनप्राप्ति कारक होतो. त्याचप्रमाणें कमलाकार मंडलानीं विचित्र वृषभ भाग्य दायक होतो. तसाच जवसाच्या पुष्पा समान वर्णानें सुशोभित जो वृषभ तो बहु धन प्राप्तीस कारण आहे. हे राजा. हे उत्तम शुभकारक वृषभ सांगितले आतां अशुभ सांगतों

कृष्णाताल्वोष्ठवदनारूक्षशृंगशफाश्चये॥ अव्य
क्तवर्णान्हस्वाश्च व्याघ्रसिंहनिभाश्चये॥ २७॥
ध्वांक्षगृध्रसवर्णाश्च तथामूषकसन्निभाः॥ कुं
ठाः काणास्तथाखंजाः केकराक्षास्तथैवच॥ २८
॥ विषमश्वेतपादाश्च उद्भ्रांतनयनास्तथा॥ नैते
वृषाः प्रमोक्तव्या नचधार्यास्तथागृहे॥ २९॥

अर्थ- ते असे की, ज्यांची टाळू, ओंठ व मुख ही कृष्ण वर्ण ज्यांची शिंगें व खुर निस्तेज, ज्यांचा रंग एकच स्पष्ट नसून आकृतीनें लहान तसेच व्याघ्र व सिंहयांसारखे आकारादिकानीं उग्र, आणि काक, गृध्र व उंदीर यांसारख्या वर्णानें युक्त, त्याच प्रमाणें चालण्या विषयी मंद, अंगहीन, लंगडे, तिरळे एक किंवा तीन शुभ्र वर्ण पायानीं युक्त व वरपाहून गरगरा डोळे फिरविणारे असे हे वृषभ स्वगृहीं बाळगूं नयेत व यांचा वृषोत्सर्गही करूं नये.

मोक्तव्यानांचधार्याणांतेषांवक्ष्यामिलक्षणं॥
स्वस्तिकाकारशृंगाश्च तथामेघौघनिःस्वनाः॥
३०॥ महाप्रमाणाश्च तथामत्तमातंगगामिनः॥
महोरस्का महोच्छ्राया महाबलपराक्रमाः॥ ३१
॥ शिरः कर्णौललाटंचवालधिश्चरणास्तथा॥ ने
त्रे पार्श्वेच कृष्णानिशस्यंतेचंद्रभासिना॥ ३२॥
श्वेतान्येतानिशस्यंते कृष्णस्यतुविशेषतः॥ भू
मौ कर्षतिलांगूलंप्रलंबस्थूलवालधिः॥ ३३॥
पुरस्तादुच्चतोनीलोवृषभश्च प्रशस्यते॥ शक्ति
ध्वजपताकाढ्यायेषांराजीविराजते॥ ३४॥ अ
नड्वाहस्तु तेधन्याश्चित्रसिद्धिजयावहाः॥ प्र
दक्षिणंनिवर्तंतस्वयंयेविनिवर्तिताः॥ ३५॥
समुन्नतशिरोग्रीवाधन्यास्तेयूथवर्धनाः

अर्थ- वृषोत्सर्ग करण्या विषयीं व घरीं संरक्षण करण्या विषयीं योग्य अशा वृषभांचें लक्षण पुनः मी सांगतों तें असें कीं) स्वस्तिकाकार शिंगें

मेघसमुदायासमान शब्द व लांबीचें आदिकरून महत् प्रमाण यानीं युक्त असून उन्मत्त गजासारखे मंद गमन करणारे, तसेंच मोठें हृदय, उंची, बल व पराक्रम यानीं युक्त, आणि मस्तक, कर्ण, ललाट (कपाळ,) पुच्छ पाय, नेत्र व कुक्षि (कुशी) हीं अंगें चंद्रसमान कांतियुक्त शुभ्र वृषभांचीं कृष्ण वर्ण असून नील वर्ण वृषभांचीं हीं अंगें शुभ्र वर्ण असावीं. तसाच जो वृषभ अति दीर्घ व पुष्ट अशा पुच्छानें युक्त असून तो गमन करीत असतां त्याचें पुच्छ मागून भूमीस लागत असून तो पुढील भागीं उंच व कृष्ण वर्ण असला तर अत्युत्तम जाणावा; आणि वर्ची ध्वज व पताका यांनीं युक्त जी वृषभ पंक्ति शोभत्ये; ते वृषभ विचित्र सिद्धि धन व जय प्राप्ति यां विषयीं उत्कृष्ट असतात; तसेंच जे वृषभ मागें फिरविले असतां ते स्वतः दक्षिण बाजूनें फिरत असून उंच मस्तक व यामान यानीं युक्त असतात; ते वृषभ द्रव्य प्राप्ति कारक असून कुलाची वृद्धि करणारे असे असतात.

रक्तशृंगाग्रनयनः श्वेतवर्णो भवेद्यदि ॥ ३६ ॥
शफैः प्रवालसदृशैः नास्तिधन्यतरस्ततः ॥

अर्थ- तसाच जो वृषभ शुभ्र वर्ण असून शिंगाचीं अग्रें आरक्त वर्ण व खुर, वर्णानें पोवळ्यां समान असतील; तर तो वृषभ अत्युत्तम जाणावा.

एतेधार्याः प्रयत्नेन मोक्तव्या यदि वा वृषाः ॥ ३७
॥ धारिताश्च तथा मुक्ता धनधान्यप्रवर्धनाः ॥

अर्थ- तस्मात् असे हे सलक्षण वृषभ प्रयत्नानें स्वगृहीं रक्षावे किंवा उत्सर्ग करून सोडून द्यावे. कारण घरीं ठेवले किंवा उत्सर्ग करून सोडले तरी दोन्हीं प्रकारानीं हे यजमानाच्या धनधान्यांची वृद्धि करतात.

चरणानि मुखं पुच्छं यस्य श्वेतानि गोपतेः ॥ ३८
॥ लाक्षारससवर्णश्च तं नीलमिति निर्दिशेत् ॥
वृष एष समोक्तव्यो न संधार्यो गृहे भवेत् ॥ ३९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें चरण, मुख, पुच्छ हीं ज्या वृषभाचीं शुभ्र असून जो रंगानें, लाखेच्या रसाचे वर्णासारखा असतो; त्यास नील वृषभ

असें म्हणावें; तो वृषभ उत्सर्ग करून सोडावा त्याचा संग्रह स्वगृहीं कदापि करूं नये.

तदर्थमेषाचरति लोके गाथा पुरातनी ॥ एष्टव्या बहवः पुत्रा यद्येकोपि गयां व्रजेत् ॥ ४० ॥ गौरीं चाप्युद्वहेत्कन्यां नीलं वा वृषमुत्सृजेत् ॥ ४१ ॥

अर्थ- असा त्या नील वृषभाचा उत्सर्गच करण्यासाठीं त्याविषयीं पुराणांतील पुरातन गाथा लोकांत प्रसिद्ध आहे. ती अशी कीं, मनुष्यानीं बहुत पुत्र उत्पन्न करावे; कारण त्यांतील एकादा तरी गयाया त्रेस गमन करील; किंवा महा फल दायक दहा वर्षांची कन्या धर्म रीतीनें विवाह करून देईल; अथवा पूर्वीं सांगीतलेल्या नील वृष भाचा उत्सर्ग करील.

एवं वृषं लक्षणसंप्रयुक्तं गृहोद्भवं क्रीतमथापि राजन् ॥ मुक्त्वा न शोचेत मरणं महात्मा मोक्षं गतश्चाहमतोभिधास्ये ॥ ४२ ॥

अर्थ- हे राजा या सांगीतलेल्या उत्तम लक्षणानीं युक्त असून तो स्वगृहीं उत्पन्न झालेला, किंवा विकत घेतलेला अशा वृषभाचा उत्सर्ग केला असतां, त्यास मरण संबंधि दुःख न होतां, तो महात्मा मुक्त झालाच असें समजावें; म्हणूनच मी या वृषोत्सर्गाचें माहात्म्य वर्णन करतों.
इतिश्री मत्स्यपुराणे वृषभ लक्षणं नाम सप्ताधिक द्विशततमोऽध्यायः ॥ २०७ ॥

अध्याय २०८ वा.

सूत उवाच ॥ ततः स राजा देवेशं पप्रच्छामितविक्रमः ॥ पतिव्रतानां माहात्म्यं तत्संबन्धां कथामपि ॥ १ ॥

अर्थ- सूत बोललें कीं, नंतर तो अपार पराक्रमी मनुराजा पुनः देवाधि देव मत्स्य रूपी भगवंतास प्रश्न करतो. हे देवा पतिव्रता स्त्रियांचें माहात्म्य व त्या संबंधि कथाही मला कथन करा. १.

मनुरुवाच ॥ पतिव्रतानां काश्रेष्ठा कया मृत्युः

पराजितः॥ नामसंकीर्तनं कस्याः कीर्तनीयं स दानरैः॥ सर्वपापक्षयकरमिदानीं कथयस्व मे॥ २॥

अर्थ- तशीच श्रेष्ठ पतिव्रता कोणती असून तिणें मृत्यु जिंकिला व कोणत्या पतिव्रतेचें नाम संकीर्तन आपल्या सर्व पापक्षयार्थ निरंतर करावें; यास्तव आतां अशा पतिव्रतेचें आख्यान मला सांगा.

मत्स्य उवाच॥ वैलोम्यं धर्मराजोपि नाचरत्यथ योषितां॥ पतिव्रतानां धर्मज्ञ पूज्यास्तस्यापिताः सदा ॥३॥

अर्थ- त्या काली मत्स्य भगवान् बोलले. हे धर्मज्ञा मनुराजा, यम धर्मराज कधींही पतिव्रता स्त्रियांस विरुद्ध आचरण करीत नाहीत; कारण त्या पतिव्रता सर्वदा त्यास पूज्य आहेत.

अत्र ते वर्णयिष्यामि कथां पापप्रणाशिनीं॥ यथा विमोक्षितो भर्ता मृत्युपाशाद्गतः स्त्रिया॥४॥

अर्थ- याविषयीं तुला सर्व पाप नाशक कथा वर्णन करतों ती अशी कीं एका पतिव्रता स्त्रीनें आपला पति मृत्यु पाशांतून मुक्त केला.

मद्रेषु शाकलो राजा बभूवाश्वपतिः पुरा॥ अपुत्रस्तप्यमानोसौ पुत्रार्थी सर्वकामदां॥ ५॥ आराधयति सावित्रीं लक्षितोसौ द्विजोत्तमैः॥ सिद्धार्थं कं हूयमाना सावित्री प्रत्यहं द्विजैः॥ ६॥ शतसंख्यैश्चतुर्थ्यां तु दशमासागते दिने॥ काले तु दर्शयामास स्वां तनुं मनुजेश्वरं॥ ७॥

अर्थ- तें असें कीं पूर्वी मद्र देशांत शाकल गोत्री अश्वपति नामें राजा होता; तो आपणास पुत्र नसल्या मुळें पुत्राच्या इच्छेनें सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या सावित्री देवीचे प्रसादार्थ तप करीत होता; त्या कालीं श्रेष्ठ ब्राह्मण त्याजवर लक्ष्य ठेवीत राहिले; आणि अर्थसिद्धी करण्या विषयीं समर्थ अशा शंभर ब्राह्मणां कडून राजा प्रतिदिवशीं सावित्रीचे प्रीत्यर्थ होम करवीत असतां, दहा मासा नंतर एके चतु-

र्थीचे दिवशीं उत्तम कालीं त्या सावित्री देवतेनें आपलें साक्षात् स्वरू
प त्या मनुष्य पालक अश्वपति राजास दाखविलें.

सावित्र्युवाच ॥ राजन्भक्तोसिमेनित्यंदास्यामि
त्वांसुतांसदा ॥ तांदत्तांमत्प्रसादेनपुत्रींप्राप्स्य-
सिशोभनां ॥ ८ ॥

अर्थ- आणि ती सावित्री देवी बोलली. हे राजा तूं माझा अखंड भ
क्त आहेस; यास्तव मी तुला कन्या देईन; ती मी आपल्या प्रसादानें-
दिलेली सदा उत्कृष्ट कन्या तुला प्राप्त होईल.

एतावदुक्त्वासाराजन्प्रणतस्यैवपार्थिव ॥ जगा
मादर्शनंदेवीयथावैनृपचंचला ॥ ९ ॥

अर्थ- हे सार्वभौम राजा असें अति नम्र झालेल्या त्या अश्वपतिरा
जास भाषण करून ती सावित्री देवी विद्युल्लते सारखी गुप्त झाली.

मालतीनामतस्यासीद्राज्ञःपत्नीपतिव्रता ॥-
सुषुवेतनयांकालेसावित्रीमिवरूपतः ॥ १० ॥

अर्थ- नंतर त्या राजाची मालती नामक पतिव्रता स्त्री गर्भिणी
होऊन दशम मासीं प्रसूत झाली; तेव्हां तिला सावित्रीसमान एक
स्वरूप कन्या झाली.

सावित्र्याहुतयादत्तातद्रूपसदृशीतथा ॥ सावि
त्रीचभवत्वेषाजगादनृपतिर्द्विजान् ॥ ११ ॥

अर्थ- ती कन्या तपादिकानीं आराधन करून प्रसन्न झालेल्या-
सावित्रीनें दिलेली असून रूपानें ही त्या सावित्री देवी सारखीच
आहे; यास्तव इला सावित्री हें नाम योग्य आहे असें तो राजा ब्राम्ह
णास बोलला.

कालेनयौवनंप्राप्तांददौसत्यवतेपिता ॥ नारद
स्ततःप्राहराजानंदीप्ततेजसं ॥ १२ ॥ संवत्स
रेणक्षीणायुर्भविष्यतिनृपात्मजः ॥

अर्थ- पुढें कालांतरी त्या कन्येस तारुण्य प्राप्त झालें असतां तिचा
पिता, सत्यवान् नामक राजपुत्रास तिला देण्याविषयीं उद्युक्त झाला

असतां नारदानीं येऊन महा तेजस्वी राजास सांगीतलें कीं हाराज पुत्र एक वर्षानें क्षीणायु होईल

सकृत्कन्याप्रदीयंतेचिंतयित्वानराधिपः॥१४
॥तथापिमददौकन्यांद्युमत्सेनात्मजेशुभे॥सा
वित्र्यपिचभर्तारमासाद्यनृपमंदिरे॥१५॥

अर्थ- हे राजा ते समयीं अश्वपति राजानें विचार केला कीं कन्यादान शास्त्रनियमानुसार एक वारच करतात; असें मनांत आणून त्या राजानें ती कन्या सत्यवान् नामक उत्तम द्युमत्सेन राजपुत्रास दिली; त्या कालीं ती सावित्री, तो सत्यवान् भर्ता प्राप्त झाल्यावर त्याचे मंदिरीं राहिली.

नारदस्यतुवाक्येनदूयमानेनचेतसा॥श्वश्रू
षांपरमांचक्रेभर्तृश्वशुरयोर्वने॥१६॥

अर्थ- परंतु ती नारद मुनीच्या वाक्यानें अंतःकरणांत खिन्न असून तशीच धैर्य धारण करून आपला पति सत्यवानास व सासरे यांची उत्तम सेवा करूं लागली.

राज्याद्भ्रष्टः सभार्यस्तुनष्टचक्षुर्नराधिपः॥
नतुतोषं समासाद्यराजपुत्रींतथास्नुषां॥१७॥

अर्थ- तो द्युमत्सेन राजा राज्यावरून पदच्युत झालेला असून अंध होतयास्तव ती राजकन्या आपली सून झाली असतां त्या योगानें तसा संतोष पावला नाहीं.

चतुर्थेहनिमर्तव्यंतथासत्यवताद्विजाः॥श्व
शुरेणाभ्यनुज्ञातातदाराजसुतापिसा॥१८॥
चक्रेत्रिरात्रंधर्मज्ञाप्राप्तेतस्मिंस्तदादिने॥चा
रुपुष्पफलाहारःसत्यवांस्तुययौवनं॥१९॥

अर्थ- हे ऋषी हो नंतर चतुर्थ दिवशीं सत्यवान् मृत्यु पावणार, यास्तव त्या कालीं सावित्री नामक त्या धर्मज्ञा राजकन्येनें श्वशुराची आज्ञा घेऊन सावित्रीचें त्रिरात्र व्रत केलें; मग नियत मृत्यूचा चतुर्थ दिवस प्राप्त झाला असतां त्या दिवशीं तो सत्यवान् उत्तम पुष्प फ

लें आणण्या साठी वनांत गेला.

श्वशुरेणाभ्यनुज्ञातायाचनाभंगभीरुणा॥
साविञ्यपिजगामार्तासहभर्त्रामहद्वन॥२०॥

अर्थ - ते समयीं सावित्रीनें पति समागमें अरण्यांत जाण्या-विषयीं श्वशुराची प्रार्थना केली असतां त्यानें तिच्या प्रार्थनेचा भंग होईल; या भीतीनें आज्ञा दिली असतां ती भर्त्या सह वर्तमान महा वनांत गेली.

चेतसादूयमानेनगूहमानामहद्भयं॥ वनेप्र
प्रच्छभर्तारंद्रुमांश्चासहशांस्तथा॥२१॥

अर्थ - आणि पतीच्या मरणाचें दुःखानें खिन्न झाली असून ती आपलें भय तसेंच मनांत गुप्त ठेऊन वनांतील भिन्न जातींचे वृक्षां विषयीं पतीस प्रश्न करूं लागली.

आश्वासयामाससराजपुत्रींक्लांतांवनेपद्मवि
शालनेत्रां॥संदर्शनेनाथद्रुमद्विजानांतथा
मृगाणांविपिनेनृवीरः॥२२॥

अर्थ - त्या कालीं तो मानव वीर सत्यवान् त्या वनांत श्रम पावलेली असून कमला समान नेत्रांनीं सुशोभित अशा त्या राज कन्येस तेथील वृक्ष, पक्षि व मृग हे दाखऊन त्या सावित्रीचें समाधान करूं लागला. इतिश्री मत्स्य पुराणे सावित्र्या वन प्रवेशो-नामाष्टाधिकद्विशततमो ऽध्यायः॥ २०८ ॥

अध्याय २०९ वा

सत्यवानुवाच॥ वनेस्मिन्शाद्वलाकीर्णे स-
हकारमनोहरं॥ नेत्रघ्राणसुखंपश्यवसंतं
रतिवर्धनं॥१॥

अर्थ - तें असें कीं; हे प्रिये या कोमल तृण युक्त वनांत रमणीय आम्र वृक्षवरति सुखाची वृद्धि करणारा वसंत यांस अवलोकन कर, हा आम्रवृक्ष नेत्र व नासिका यांस सुख कारक आहे.

वनेप्यशोकंवृक्षेनरागवंतंसुपुष्पितं॥ वसं-

तोहसतीवायंमामेवायतलोचने ॥ २ ॥

अर्थ- हे विशाल नयने ह्या वनांतील अशोक वृक्षही पाहून मला असें भासतें की, हा वसंतऋतु उत्तम वर्ण युक्त प्रफुल्लित पुष्पांनीं सुशोभित अशाया अशोक वृक्षाच्या मिषानें मला हसतच आहे कीं काय.

दक्षिणेदक्षिणेनेतांपश्यरम्यांवनस्थलीं ॥ पुष्पितैःकिंशुकैर्युक्तांज्वलितानलसप्रभैः ॥ ३ ॥

अर्थ- हे चतुर स्त्रिये प्रदीप्त अग्नी समान तेजःपुंज असून प्रफुल्लित अशा पलाश (पळस) वृक्षानीं सुशोभित अशी ही दक्षिण बाजूची रमणीय वनभूमी अवलोकन कर.

सुगंधिकुसुमामोदोवनराजिविनिर्गतः ॥ करोतिवायुर्दाक्षिण्यमावयोःश्रमनाशन ॥ ४ ॥

अर्थ- तसाच अरण्य पंक्तींतून आलेला सुगंधि पुष्प संबंधी आनंदकारक वायु आपल्या ग्लानीच्या नाशार्थ आपणावर दया करीत आहे.

पश्चिमेनविशालाक्षि कर्णिकारैःसुपुष्पितैः ॥ कांचनेनविभात्येषावनराजीमनोरमा ॥ ५ ॥ अतिमुक्तलताजालरुद्धमार्गावनस्थली ॥ रम्यासाचारुसर्वांगीकुसुमोत्करभूषणा ॥ ६ ॥ मधुमत्तालिझंकारव्याजेनवरवर्णिनी ॥ चापाकृष्टिंकरोतीवकामःपार्श्वेजिघांसया ॥ ७ ॥

अर्थ- हे विशाल नयने उत्तम पुष्पयुक्त पांगाऱ्यांचे वृक्ष, नाग चांफे यानीं सुशोभित असून कस्तूर मोगरीच्या वेलीचे जाळ्यानीं वेष्टित मार्गानीं युक्त अशीही पश्चिम दिशेकडील स्वतःसिद्ध वनभूमि, ओळीनें एकसारखी रम्य असल्यामुळें सर्वांच्या मनास अत्यंत रमविणारी असून पुष्प समुदायरूप भूषणानीं अलंकृत जशी उत्तमवर्ण संपन्न सर्वांग सुंदर स्त्री सारखी शोभत आहे. आणि पुष्परस प्राशनानें उन्मत्त झालेल्या भ्रमरांच्या झंकार शब्दावरून असें भासतें कीं मदन या बाजूस उभारा हून बाण मारण्याच्या इच्छेनें धनुष्याचें आकर्षणच करीत आहे की काय?

फलास्वादलसद्दृक्ष पुंस्कोकिलविनादिता ॥ वि

भातिचारुतिलकात्वमिवैषावनस्थली ॥ ८ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें फलभक्षणानें सुशोभित कोकिलपक्ष्यांचे शब्दानीं नादित अशी ही वनभूमि, कपाळीं सुंदर कुंकुम तिलक धारण केलेली तूंजशी शोभत्येस तशी शोभत आहे.

कोकिलश्चूतशिखरेमंजरीरेणुपिंजरः ॥ गदितैर्व्यक्ततांयातिकुलीनश्चेष्टितैरिव ॥ ९ ॥

अर्थ- तसाच कोकिलपक्षी आम्र वृक्षाचे अग्रावर बसला असून मोहोराच्या रजानें पीतवर्ण दिसत असून तो मधुर शब्दानीं समजण्यांत येतो. जसा कुलीन पुरुष महत् कृत्यावरून समजतो स येतो.

पुष्परेणुविलिप्तांगींप्रियामनुसरिहूने ॥ कुसुमं-कुसुमंयातिकूजन्कामीशिलीमुखः ॥ १० ॥

अर्थ- आणि कोणी एक कामी (विषयी) भ्रमर, त्यानदीतीरचे वनांत पुष्पसंबंधि रज लागलेल्या अंगानें शोभणाऱ्या भ्रमरीच्या मागून प्रत्येक पुष्पावर गमन करीत आहे.

मंजरींसहकारस्यकांतावच्चाग्रपीडितां ॥ स्वद-तेबहुपुष्पोपिपुंस्कोकिलयुवावने ॥ ११ ॥

अर्थ- तसेंच यावनांत कोणी एक तरुण कोकिल पक्षी बहुत पुष्पें असून-ही त्या सर्व पुष्पांचा त्याग करून आम्र वृक्षाच्या मंजरीस अग्रभागीं स्त्रीसारखें ग्रहण करून तिचा स्वाद घेत आहे.

काकःप्रसूतांवृक्षाग्रेस्वामेकाग्रेणचंचुना ॥ काकीं संभावयत्येषपक्षाच्छादितपुत्रिकां ॥ १२ ॥

अर्थ- तसाच कोणी एक काक, आपली प्रसूत झालेली स्त्री स्वकीयपुत्रांस आपले पंख खालीं घेऊन वृक्षाचे अग्रावर बसली असतां तिचास मान करतो तो असा कीं, आपली चोंच एकाग्र मनानें तिला लावीत आहे.

भूभागंनिम्नमासाद्यदयितासहितोयुवा ॥ नाहारमपिचादत्तेकामाक्रांतः कपिंजलः ॥ १३ ॥

अर्थ- आणि तरुण कपिंजल पक्षी आपल्या स्त्री सह वर्तमान भूमीच्या खोलप्रदेशांत बसला असून तो कामातुर झाल्यामुळें कांहीं एक भक्ष-

ण करीत नाहीं.

कलविंकस्त्करमयन्प्रियोत्संगसमास्थितः॥
मुहुर्मुहुर्विशालाक्षिउत्कंठयतिकामिनः॥१४॥

अर्थ- हे विशाल नयने हा चिमणीचे जा तीचा पक्षी आपल्या स्त्री सहवर्तमान बसून तिला रमवीत होत्साता कामी पुरुषांस वारंवार विलासाविषयीं उत्कंठा यत्क्त करीत आहे.

वृक्षशाखांसमारूढःशुकोयंसहभार्यया॥क
रेणलंबयन्शाखांकरोतिसफलंशिरः॥१५॥

अर्थ- त्याच प्रमाणें हा राघु, स्वकीय भार्येसहित वृक्षशाखे वर बसला असून तो आपले हातानें वरील फांदी आकर्षण करूनतिची फलें आपले मस्तका वर आणून असें सूचवितो कीं वेदसंबंधि शाखेचें फल सर्वांनीं शिरसा मान्य करावें.

वनेत्रपिशितास्वादतृप्तोनिद्रामुपागतः॥शेते-
सिंहयुवाकांताचरणांतरगामिनी॥१६॥

अर्थ- आणि या वनांत मांसभक्षणानें तृप्त झालेला तरुण सिंह निद्रेनें व्यास झाल्या मुळें निजला असून त्याचे चरणमध्य भागीं त्याची स्त्री हीनिद्रिस्थ झाली आहे.

व्याघ्रयोर्मिथुनंपश्यशैलकंदरसंस्थितं॥य-
योर्नेत्रप्रभालोकेगुहाभिन्नेवलक्ष्यते॥१७॥-

अर्थ- तसेंच हें व्याघ्रांचें मिथुन (जोडा) पर्वताच्या गुहेंत बसलेलें अवलोकन कर; कारण त्यांच्या नेत्र कांतीनें ही गुहा, वरून पडल्या सारखी प्रकाशित जाहलेली दिसत आहे.

अयंद्वीपीप्रियांलेढिजिव्हाग्रेणपुनःपुनः॥प्री
तिमायातिचतयालिह्यमानःस्वकांतया॥१८॥

अर्थ- तसाच हा व्याघ्र जिव्हाग्रानें आपले स्त्रीस वारंवार चाटीत असून त्यास्वकीय स्त्रीनें त्यास चाटलें असतां तो परमानंद पावत आहे.

उत्संगकृतमूर्धानंनिद्रापहृतचेतसं॥जंतूध्द
रणतःकांतंसुखयत्येववानरी॥१९॥

अर्थ- तशीच ही वानरी आपले पतीस निद्रा येऊन त्यानें आपल्या मांडी वर मस्तक ठेऊन निद्रा केली असतां ती त्याचे मस्तकांतील उवा आदि करून-जीव काढून त्यास सुख उत्पन्न करीत आहे.

भूमौनिपतितांरामांमार्जारोदर्शितोदरीं॥ नखैर्दंतै र्दंशत्येषनचपीडयतेतथा॥२०॥

अर्थ- आणि हा मार्जार (बोका), भूमीवर उताणी पडून पोट दाखविणाऱ्या आपल्या प्रिय स्त्रीचे उदरास नखें व दांतयानीं तिला दुःख न होतां दंश करीत आहे.

शशकःशशकीचोभेसंसुप्तेपीडितेइमे॥ संलीनगात्रचरणेकर्णैर्व्यक्तिमुपागते॥२१॥

अर्थ- तसेच ससा व त्याची स्त्री हे उभयतां स्त्री पुरुष निद्रेनें व्याप्त झाल्यामुळें आपलीं चरणादिक सर्वांगें आकुंचित करून अतिनिद्रिस्त असून ही ते दीर्घकर्णां वरून ओळखण्यांत आले.

स्नात्वासरसिपद्माढ्येनागस्तुमदनप्रियः॥ संभावयतितन्वंगींमृणालकवलैःप्रियां॥२२॥

अर्थ- तसाच कोणी एक विषयासक्त गज, कमलयुक्त सरोवरांत स्नान करून आपले सूक्ष्मांग शोभित स्त्रीस कमल देठांचे ग्रास देऊन तिचा सत्कार-करीत आहे.

कांतमोथसमुत्थानैःकांतमार्गानुगामिनी॥ करोति कवलंमुस्तैर्वराहीपोतकानुगा॥२३॥

अर्थ- तशीच ही वराह स्त्री आपला पति वर तोंड करून जिकडे गमन करतो; त्यामार्गानें मागून चालली आहे; आणि तिच्या मागें लहान मुलें जात असून ती आपले पतीस नागरमोथ्याचे ग्रास देत आहे.

दृढांगसंधिर्महिषःकर्दमाक्ततनुर्वने॥ अनुव्रजति धावंतींप्रियांबध्दचतुष्करः॥२४॥

अर्थ- आणि सर्वांग संबंधि दृढसंधीनीं युक्त असून कर्दमानें (चिखलानें) शरीर मलिन झालेला महिष (रेडा) कामातुर होऊन आपले पाय हेच कोणी हस्त ते जोडल्या सारखे करूनच काय स्वकीय स्त्री मागें धांवत आहे.

पश्यचार्वंगिसारंगंत्वंकटाक्षविभावनैः॥ सभार्यं

माद्दिपश्यंतं कौतूहलसमन्वित ॥ २५ ॥

अर्थ- हे सुंदरांगि हा स्त्रीसहित हरिण आपले नेत्र कटाक्षांनीं आपणाउभ यतांकडे आश्चर्याने पहात आहे; यांस तूं अवलोकन कर.

पश्यपश्चिमपादेनरोहीकंडूयतेमुखं ॥ स्नेहार्द्रभा वात्कर्षंतीभर्त्तारंशृंगकोटिना ॥ २६ ॥

अर्थ- तसाच हा दुसरा हरिण आपले मुख मागील पायानें खाजवीत अ सून त्यास त्याची स्त्री हरिणी आपलें शिंगाचे अग्रानें सप्रेम भावानें स्वकी- य पतीस आकर्षण करीत आहे. हा चमत्कार पहा.

द्रागिमांचमरींपश्यसितवालामगच्छतीं ॥ अन्वा- स्तेचमरःकामीमांचपश्यतिगर्वितः ॥ २७ ॥

अर्थ- आणि शुभ्र केश युक्त असून गमन करणाऱ्या वनगायीच्यामागें तिचा पति अति गर्विष्ठ कामी गवा, उभा असून तो मजकडे पहात आहे; या- स व यारान गायीं कडे शीघ्र अवलोकन कर.

आतपेगवयंपश्यप्रहृष्टंभार्ययासह ॥ रोमंथनंप्र कुर्वाणंकाकंककुदिवारयन् ॥ २८ ॥

अर्थ- तसाच हा भार्येसहित गवा आपले समीपच उन्हांत रोहत करीत असून आपले पाठीवरील कोब्यावर बसणाऱ्या कावळ्याचें निवारण क- रीत आहे. यांस पहा.

पश्येमंभार्ययासार्धन्यस्ताग्रचरणद्वयं ॥ विपु- लेबदरीस्कंधेबदराशनकाम्यया ॥ २९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणे हा गवा आपल्ये भार्येसह वर्तमान बोरें भक्षण कर- ण्याच्या इच्छेनें खोडा वर पुढील पाय ठेऊन उभा अहे हें अवलोकन कर.

हंसंसभार्यंसरसिविचरंतंसुनिर्मलं ॥ सुमुक्तस्ये- दुबिंबस्यपश्यवैश्रियमुद्वहन् ॥ ३० ॥

अर्थ- तसाच हा अति निर्मल हंस आपले स्त्रीसहित यासरोवरांत क्रीडा करीत आहे; यास अवलोकन कर; कारण हा हंस राहू पासून सर्वथा मुक्त झालेल्या चंद्र मंडला समान अत्यंत शुभ्र व र्ण शोभा धारण करीत आहे.

सभार्यश्चक्रवाकोयंकमलाकरमध्यगः ॥ करो-

तिपद्मिनींकांतांसुपुष्यामिवसुंदरि ॥ ३१ ॥

अर्थ- हे सुंदरि स्वकीय स्त्री सहित हा चक्रवाक पक्षी कमल वनाचे मध्य भागीं बसून त्या उत्तम पुष्य फक्त कमलवेलीस भार्येसारखें करतो; म्हणजे तिचे कमलांतील मकरंद (रस) सेवन करीत आहे.

मयाफलोच्चयःसुभ्रूकृतयापुष्पोच्चयःकृतः ॥ इंधनंन कृतंसुभ्रूतत्करिष्यामिसांप्रतं ॥ ३२ ॥

अर्थ- हे सुंदर भृकुटि शोभित प्रिये मी फलांचा संग्रह केला असून तूं पुष्पांचा संग्रह केला; परंतु समिधा व काष्ठें यांचा संग्रह झाला नाही तो आस्तत मी करतो.

त्वमस्यसरसस्तीरेद्रुमच्छायांसमाश्रिता ॥ क्षणमात्रंप्रतीक्षस्वविश्रमस्वचभामिनि ॥ ३३ ॥

अर्थ- हे सुंदरि तों पर्यंत तूं या सरोवराचे तीरी वृक्षच्छायेच्या आश्रयानें क्षण मात्र बसून विश्रांती करून माझी मार्ग प्रतीक्षा कर.

सावित्र्युवाच ॥ एवमेतत्करिष्यामिममदृष्टिपथस्त्वया ॥ दूरंकांतनकर्तव्योबिभेमिगहनेवने ३४

अर्थ- त्या कालीं सावित्री बोलली हे कांत मी तुमचे आज्ञे प्रमाणें करीन परंतु आपण माझ्या दृष्टी पुढून दूर प्रदेशीं जाऊं नये; कारण या घोर अरण्यांत मला भय वाटतें.

मत्स्यउवाच ॥ ततःसकाष्ठानिचकारतस्मिन्वने तदाराजसुतासमक्षं ॥ तस्याह्यदूरेसरसस्तदानींमेनेचसातंमृतमेवराजन् ॥ ३५ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् बोलले कीं हे राजा नंतर त्या सत्यवानानें त्या कालीं त्या वनांत सावित्री नामक राजकन्येचे समक्ष तिच्या समीप त्या सरोवर तीरीं काष्ठभार सिद्ध केला तों ते समयीं तिणें तो आपला पति मरणोन्मुखच झाला असें पाहिलें. इतिश्रीमत्स्यपुराणेसावित्र्युपाख्याने वन दर्शनं नाम नवाधिक द्विशततमोऽध्यायः ॥ २०९ ॥

अध्याय २१० वा.

मत्स्यउवाच ॥ तस्यपाटयतःकाष्ठंजज्ञेशिरसिवेद

ना ॥ सवेदनार्तः संगस्य भार्यां वचनमब्रवीत् ॥ १ ॥

अर्थ- तें असें कीं मत्स्य सांगतात हे राजा तो सत्यवान् काष्ठें तोडीत असतां त्याच्या मस्तकांत वेदना उत्पन्न झाली; तेव्हां तो त्या वेदनेनें पीडित होऊन भार्येसमीप जाऊन तिला भाषण करतो.

आयासेन ममानेन जाता शिरसि वेदना ॥ तमश्च प्रविशामी वन च जानामि किंचन ॥ २ ॥

अर्थ- कीं हे स्त्रिये या काष्ठें तोडण्याच्या श्रमानें मस्तकांत शूल उत्पन्न होऊन मूर्च्छा आल्या सारखें झाल्यानें मला कांहींच समजेनासें झालें आ०

त्वदुत्संगे शिरः कृत्वा स्वप्तुमिच्छामि सांप्रतं ॥ राजपुत्रीमेवमुक्त्वा तदा स पृथ्वीपपार्थिवः ॥ ३ ॥ तदुत्संगे शिरः कृत्वा निद्रयाविललोचनः ॥

अर्थ- यास्तव मी सांप्रत तुझ्या अंकावर शिर ठेऊन निद्रा करावी असें इच्छितों हें त्या राजकन्येशीं बोलून ते समयीं तो सत्यवान् निद्रेनें व्याकुलनेत्र होऊन त्या सावित्रीच्या मांडीवर मस्तक ठेऊन निजला.

पतिव्रता महाभागा ततः सा राजकन्यका ॥ ४ ॥ ददर्श धर्मराजं तु स्वयं तं देशमागतं ॥

अर्थ- नंतर महाभाग्यसंपन्न त्या सावित्री नामक पतिव्रता राजकन्येनें आपल्या समीप प्रदेशांत स्वतः आलेले धर्मराज पाहिले.

नीलोत्पलदलश्यामं पीतांबरधरं प्रभुं ॥ ५ ॥ विद्युल्लतानिबद्धांगं सतोयमिव तोयदं ॥ किरीटेनार्कवर्णेन कुंडलेभ्यां विराजितं ॥ ६ ॥ हारभारार्पितोरस्कं तथांगदविभूषितं ॥ तथानुगम्यमानं च कालेन सह मृत्युना ॥ ७ ॥

अर्थ- ते असे कीं, नील कमल पत्रासारखे श्याम व पीतांबर धारण केलेले असून समर्थ, विद्युल्लता युक्त सजल मेघासमान सुशोभित आणि सूर्यासारखीं तेजःपुंज मुगुट कुंडलें वक्षस्थळीं हार व बाहु भूषणें यानीं भूषित असे ते यम धर्मराज, समागमें काल व मृत्यु यांस घेऊन त्या वनांत सावित्रीच्या सन्मुख प्रदेशांत आले.

सतुसंप्राप्यतंदेशंदेहात्सत्यवतस्तदा ॥ अंगुष्ठ-
मात्रंपुरुषंपाशबध्दंवशंगतं ॥ ८ ॥ आकृष्यदक्षि
णामाशांप्रययौसत्वरंतदा ॥

अर्थ- आणि ते यमधर्म, सावित्रीचे अग्रभागीं येऊन तत्क्षणीं त्यासत्य वानाच्या देहांतून अंगुष्ठ मात्र पुरुष(जीव)आपल्या पाशानीं बांधून त्यास बाहेर आकर्षून स्वाधीन करून येऊन तत्काल त्वरेनें दक्षिण दिशेसगेले.

सावित्र्यपिवरारोहादृष्ट्वातंगतजीवितं ॥ ९ ॥
अनुवव्राजगच्छंतंधर्मराजमतंद्रिता ॥ कृतांज
लिरुवाचाथहृदयेनप्रवेपता ॥ १० ॥

अर्थ- त्याकालीं कमरेच्या सुंदर पश्चिम भागानें शोभणारी सावित्री ही आपला पति गतप्राण झाला हें पाहून आलस्य रहित हो त्यानी दक्षिणे कडे गमन करणाऱ्या त्या धर्मराजामागें चालली; आणि ती अंतः-करणांत दुःखानें कंपित झाली असून हात जोडून त्या यम धर्मराजास बोलली.

इमंलोकंमातृभक्त्यापितृभक्त्यातुमध्यमं ॥ गुरु-
शुश्रूषयाचैवब्रम्हलोकंसमश्नुते ॥ ११ ॥

अर्थ- कीं मातृ भक्तीनें ही कर्म भूमि प्राप्त होत असून पितृ भक्तीनें स्वर्ग व गुरु शुश्रूषेनें ब्रम्ह लोक हे प्राप्त होतात.

सर्वेतस्यादृताधर्मायस्यैतेत्रयआदृताः ॥ अना-
दृतास्तुयस्यैतेसर्वास्तस्याफलाःक्रियाः ॥ १२ ॥

अर्थ- तस्मात् ज्यानें ह्या तीन कर्मांचा स्वीकार केला त्यास सर्व धर्मांचें फल प्राप्त होतें; आणि ज्यानें ह्या तीन धर्मांचा अंगीकार केला नाहीं त्याच्या संपूर्ण क्रिया निष्फल होतात.

यावत्त्रयस्तेजीवेयुस्तावन्नान्यंसमाचरेत् ॥ तेषां-
चनित्यंशुश्रूषांकुर्यात्प्रियहितेरतः ॥ १३ ॥

अर्थ- यास्तव जोंकाल पर्यंत माता पितर व गुरु हे त्रिवर्ग जीवंत असतील तावत्काल पर्यंत मनुष्यानीं अन्य धर्मांचें आचरण करूं नये; आणि त्यांचें प्रिय व हित यांविषयीं आसक्त होऊन त्यांची नित्य शुश्रूषा करावी.

तेषामनुपरोधेनपारतंत्र्यंयदाचरेत्॥तत्तन्निवेदयेत्तेभ्योमनोवचनकर्मभिः॥त्रिष्वप्येतेषुकृत्यंहि पुरुषस्यसमस्यते॥१४॥

अर्थ- तसेंच इतरांच्या आधीन होऊन कांहीं कर्म करणें तर त्यांतिघांच्या सेवेस विरोध नयेता करावें आणि मन, वाणी व देह यानीं केलेलें सर्व कर्म त्यांस निवेदन करावें अशींहीं केलीं असतां पुरुषास सर्व कर्मांचें पूर्ण फल प्राप्त होतें.

यमउवाच॥कृतेनकामेननिवर्तयाशु धर्मोनतेभ्योपिहिउच्यतेच॥ममोपरोधस्तवचक्लमःस्यात्तथाधनातेनतवब्रवीमि॥१५॥

अर्थ- असें सावित्रीचें भाषण श्रवण करून यम बोलतात हे सावित्रि तूं एतावत्काल पर्यंत केलेला मनोरथ पुरें आतां तूं त्वरित परावृत्त हो, तशाच तूं सांगीतलेल्या तीन गोष्टी हून श्रेष्ठ धर्म कोणीच प्रतिपादन केला नाहीं. आणि तूं मागे नजाशील तर मला जाण्यास अड्चण व तुलाही श्रम होईल; यास्तव सांप्रत मी तुला असें बोलतो.

गुरुपूजारतिर्भक्त्यात्वंचसाध्वीपतिव्रता॥विनिवर्तस्वधर्मज्ञग्लानिर्भवतितेधना॥१६॥

अर्थ- हे सावित्रि तूं धर्मज्ञ असून गुरु पूजे विषयीं प्रीति करणारी; भक्तीनें युक्त सुशील पतिव्रता आहेस म्हणून मी तुला सांगतों कीं तूं मागें फीर कारण प्रस्तुत तुला ग्लानि प्राप्त झाली आहे.

सावित्र्युवाच॥पतिर्हिदैवतंस्त्रीणांपतिरेवपरायणं॥अनुगम्यःस्त्रियासाध्व्यापतिःप्राणधनेश्वरः॥१७॥

अर्थ- असें धर्मराजाचें भाषण ऐकून सावित्री बोलते; अहो यम धर्मा, पतिच स्त्रियांस देव असून तोच त्यांस उत्तम आश्रय ही आहे; आणि स्त्रियांचे प्राण व धन यांचा ही स्वामी तोच यास्तव साध्वी स्त्रियानीं त्याच्याच अनुलक्षें करून गमन करावें.

मितंददातिहिपितामितंभ्रातामितंसुतः॥अ

मितस्यचदातारंभर्त्तारंकानपूजयेत् ॥ १८ ॥

अर्थ- तसेंच पिता, बंधु व पुत्र हे स्त्रियांस सत्पत्व देतात, आणि पति तर स्त्रियांस अपरिमित देणारा आहे तेव्हां कोण स्त्री त्याची पूजा न करील.

नीयतेयत्रभर्त्तामेस्वयंवायत्रगच्छति ॥ मयापि-
तत्रगंतव्यंयथाशक्तिसुरोत्तम ॥ १९ ॥

अर्थ- तस्मात् हे देवोत्तमा आपण, माझ्या पतीस जेथें नेतां; अथवा तो पति स्वतः जिकडें जातो; तिकडेंच मला ही यथा शक्ति गमन करणें अवश्य आहे.

पतिमादायगच्छंतंमनुगंतुमहंयदा ॥ त्वांदेवनहि-
शक्ष्यामितदात्यक्ष्यामिजीवितं ॥ २० ॥

अर्थ- हे देवा आपण माझ्या पतीस घेऊन जात असतां, मी तुमच्या मागें येण्यास जेव्हां असमर्थ होईन तेव्हां मी जीविताचा त्याग करीन.

मनस्विनीतुयाकाचिद्वैधव्याक्षरदूषिता ॥ मुहूर्त-
मपिजीवेतमंडनार्हाह्यमंडिता ॥ २१ ॥

अर्थ- कारण जी कोणी पतिव्रता स्त्री सर्व भूषणादिकास योग्य असून ती वैधव्याचे अक्षरानीं दूषित होऊन पूर्वीच्या सौभाग्य शोभेस अयोग्य झाली असतां एक मुहूर्त (दोन घटिका) पर्यंत तरी कशी प्राण धारण करील.

यमउवाच ॥ पतिव्रतेमहाभागेपरितुष्टोस्मिते-
शुभे ॥ विनासत्यवतःप्राणैर्वरंवरयमाचिरं ॥ २२ ॥

अर्थ- त्याकाळीं यम बोलले. हे शुभ कारके पतिव्रते तूं महाभाग्यवती आहेस; यास्तव मी तुला प्रसन्न आहे; तस्मात् तूं विलंब करतां, सत्यवानाच्या प्राणांवांचून एक वर माग.

सावित्र्युवाच ॥ विनष्टचक्षुषोराज्यंचक्षुषासह
कारय ॥ च्युतराष्ट्रस्यधर्मज्ञश्वशुरस्यमहात्म-
नः ॥ २३ ॥

अर्थ- तेव्हां सावित्री बोलली; अहो धर्मज्ञा माझा श्वशुर महात्मा असून अंध होऊन स्वराज्या वरून पदच्युत झाला आहे; यास्तव आपण-

त्यास नेत्र सहित राज्य होईल असें करावें

यमउवाच ॥ दूरेपथेगच्छनिवर्तभद्रेभविष्यती दंसकलंत्वयोक्तं ॥ ममोपरोध स्तवचक्लमः स्यात्तथाधुनातेनतवब्रवीमि ॥ २९ ॥

अर्थ- त्या कालीं यम बोलतात हे कल्याणि तूं बहु दूर आलीस; आत्तां माघारी जा आलां तुझ्या मार्थ नानुरूप हें सर्व होईल; आणि तुला श्रम होऊन मला जाण्यास प्रतिबंध होतो; म्हणून मी तुला असें सांगतों ॥ इतिश्री मत्स्यपुराणे साविव्र्युपाख्याने प्रथम वरलाभो नाम दशोत्तर-द्विशततमो ऽध्यायः ॥ २१० ॥

अध्याय २११ वा.

साविव्र्युवाच ॥ कुतः क्लमः कुतोदुःखंसद्भिःसहसमागमे ॥ सतांतस्मान्नमेग्लानिस्त्वत्समीपेसुरोत्तम ॥ १ ॥

अर्थ- नंतर सावित्री बोलल्ये अहो देवोत्तमा साधूंचा साधूंशीं समागम घडला असतां त्यांस क्लेश व दुःख कोठून होणार. तस्मात् तुमच्या सान्निध्यामुळें मला ग्लानि प्राप्त होत नाहीं.

साधूनांवाप्यसाधूनांसंतएवसदागतिः॥ नैवासतांनैवसतामसंतोनैवमात्मनः॥ २॥ विषाग्निसर्पशस्त्रेभ्योनतथाजायतेभयं॥ अकारणंजगद्वैरिखलेभ्योजायतेयथा ॥ ३ ॥

अर्थ- तसेंच साधू किंवा असाधू यांस सर्व कालीं सत्पुरुषच आश्रय आहेत आणि असत्पुरुषा पासून साधूंस किंवा असाधूंस सद्गति प्राप्त होत नाहीं; तसेंच विनाकारण जगाशीं वैर करणाऱ्या खला पासून प्राणिमात्रांस जसें भय होतें; तसें विष, अग्नि, सर्प व शस्त्रें यांपासून होत नाहीं.

संतः प्राणानपित्यक्त्वापरार्थंकुर्वतेयथा ॥ तथासंतोपिसंत्यज्यपरपीडासुतत्पराः ॥ ४ ॥

अर्थ- आणि जसे साधू स्वयें प्राणांचाही त्याग करून परोपकार करितात तसे असत्पुरुष प्राणांत यत्न करून इतरांस दुःख देण्या विषयीं

तसर असतात

त्यजत्यसून् नयंलोकस्तृणवद्यस्यकारणात्॥
परोपघातशक्ता स्तपरलोकं तथासतः॥ ५॥

अर्थ- तसेच हे सज्जन परलोकप्राप्त्यर्थ प्राणांस तृणासमान मानून-त्यांचा त्याग करितात तसे दुर्जन, आपले सामर्थ्याचा विनियोग परपीडे विषयीं करून परलोकप्राप्तीच्या साधनाचा त्याग करतात.

निकायेषुनिकायेषु तथाब्रम्हाजगद्गुरुः॥ असता-
मुपघातायराजानंज्ञातवान्स्वयं॥ ६॥

अर्थ- यास्तव सर्व जगद्गुरु ब्रम्हदेवानीं स्वतः सर्व शास्त्रांत शोध करून असें निश्चित केलें कीं, दुष्टांच्या शासनार्थ राजाच योग्य आहे.

नरान्परीक्षयेद्राजासाधूनूसंमानयेत्सदा॥ नि
ग्रहंचासतांकुर्यात्स लोके लोकजित्तमः॥ ७॥

अर्थ- यास्तव राजानें मनुष्यांची परीक्षा करून निरंतर साधूंचा सन्मान करीत असून दुष्टांस दंड केला असतां, तो राजा पृथ्वीवरील सर्व लोकांस जिंकतो.

निग्रहेणासतांराजासतांचपरिपालनात्॥ ए-
तावदेवकर्तव्यंराज्ञास्वर्गमभीप्सता॥ ८॥

अर्थ- आणि राजा, दुर्जनांस शासन करून सत्पुरुषांचे संरक्षण केल्यानें उभय लोकीं कल्याण पावतो; तस्मात् राजानें स्वर्गप्राप्त्यर्थ तेंच कर्म करावें.

राजकृत्यंहिलोकेषुनास्त्यन्यज्जगतीपते॥ अस
तांनिग्रहादेवसतांचपरिपालनात्॥ ९॥

अर्थ- तस्मात् हे पृथ्वीपालका, असज्जनांस दंड करून साधूंचें पालन करणें यावांचून अन्य कृत्य यालोकीं राजास कोणतेंही नाहीं.

राजभिश्चाप्यशास्तानामसतांशासिताभवान्-
॥ तेनत्वमधिकोदेवोदेवेभ्यःप्रतिभासिमे॥ १०॥

अर्थ- आणि भूलोकीं राजदंडांतून चुकलेल्या दुष्टजनांस शासन करणारे आपणच आहां; यामुळें तुम्ही देवांपेक्षां श्रेष्ठ देव आहां असें मला वाटतें.

जगत्तु धार्यते सद्भिः सतामग्र्यस्तथा भवान् ॥ तेन त्वामनुयांत्या मे क्लमो देव न विद्यते ॥ ११ ॥

अर्थ- तसेंच संपूर्ण जगाचें रक्षण ज्या साधूंच्या योगानें होतें; त्या सत्पुरुषांत आपण श्रेष्ठ आहां. यास्तव मी तुमच्या अनुलक्षें येत्यें; तस्मात् हे देवा मला किमपि श्रम नाहीं.

यम उवाच ॥ तुष्टोस्मि ते विशालाक्षि वचनैर्धर्मसंगतैः ॥ विना सत्यवतः प्राणान् वरं वरय मा चिरं ॥ १२

अर्थ- नंतर यम बोलले हे विशाल नयने मी, तुझ्या धर्मानुकूल या भाषणानीं संतुष्ट झालों; यास्तव तूं सत्यवानाचे प्राणां वांचून वर माग याविषयीं विलंब करूं नको.

सावित्र्युवाच ॥ सहोदराणां भ्रातॄणां कामया मि शतं विभो ॥ अनपत्यः पिता प्रीतिं पुत्रलाभा त्प्रयातु मे ॥ १३ ॥

अर्थ - ते समयीं सावित्री बोलत्ये. हे प्रभो मी आपणास शंभर सहोदर (सख्खे) बंधु असावे असें इच्छितें; कारण माझे पित्यास पुत्र नाहीं; यास्तव त्यास पुत्र लाभानें संतोष व्हावा.

तामुवाच यमो गच्छ यथागतमनिंदिते ॥ और्ध्वदैहिककार्येषु यत्नं भर्तुः समाचर ॥ १४ ॥

अर्थ- तेव्हां यम धर्म, सावित्रीस बोलतात. हे स्तुति योग्य सावित्री तूं आलेल्या मार्गानें माघारी जा; आणि पतीच्या उत्तर क्रियेविषयीं यत्न कर.

नानुगंतुमयं शक्यस्त्वया लोकांतरं गतः ॥ पतिव्रतासि तेन त्वं मुहूर्तं मम यास्यसि ॥ १५ ॥

अर्थ- कारण परलोकास गेलेल्या या सत्यवानास पुनः माघारी आणण्यास तूं समर्थ नाहीस; आणि तूं तरी पतिव्रता आहेस; म्हणून मुहूर्त मात्र माझे मार्गांत येत आहेस.

गुरुशुश्रूषणाद्भद्रे तथा सत्यवतो महत् ॥ पुण्यं समार्जितं येन नयाम्येनमहं स्वयं ॥ १६ ॥

अर्थ- तसेंच कल्याण रूपिणि या सत्यवानानें गुरुसेवारूप साधनें क.

रून महत् पुण्य संपादन केलें; यास्तव मी स्वतः यास नेतों.

एतावदेव कर्तव्यं पुरुषेण विजानता॥ मातुः पितुश्च शुश्रूषा गुरोश्च वरवर्णिनि॥ १७॥

अर्थ- तस्मात् हे उत्कृष्ट गुणवति, विशेष ज्ञानसंपन्न पुरुषानें माता, पिता व गुरु यांची सेवा करणें हें च साधन करावें.

तोषितं त्रयमेतच्च सदा सत्यवता वने॥ पूजितं विजितः स्वर्गस्त्वयानेन चिरं शुभे॥ १८॥

अर्थ- हे शुभरूपिणि सत्यवानानें निरंतर वनांत मातापिता व गुरु यात्रिवर्गास सेवेनें संतुष्ट केलें; तेणें करून तूं याच्या योगानें चिरकाल यासह वर्तमान स्वर्ग वास करशील.

तपसा ब्रम्हचर्येण अग्निशुश्रूषया शुभे॥ पुरुषाः स्वर्गमायाति गुरुशुश्रूषया तथा॥ १९॥

अर्थ- हे मंगलकारके, जसे प्राणी तप, ब्रम्हचर्य व अग्निसेवा यासाधनानीं स्वर्गास जातात; तसेते गुरु सेवेनेंही स्वर्ग लोकीं वास करतात.

आचार्यश्च पिता चैव माता भ्राता च पूर्वजः॥ नार्तेनाप्यवमंतव्या ब्राम्हणा न विशेषतः॥ २०॥

अर्थ- तसेच गुरु, पिता, माता व ज्येष्ठ बंधु यांचा अवमान, दुःखादिकानीं पीडित झालेल्यानेंही करूं नये; तसाच ब्राम्हणांचा तर विशेषें करून अपमान न करावा.

आचार्यो ब्रम्हणो मूर्तिः पिता मूर्तिः प्रजापतेः॥ माता पृथिव्या मूर्त्तिस्तु भ्राता वै मूर्तिरात्मनः॥ २१॥

अर्थ- कारण गुरु हा ब्रम्हदेवाची मूर्ति असून पिता, ही त्यांचीच मूर्ति आहे; तशीच माताही पृथ्वीची मूर्ति असून ज्येष्ठ बंधु हा परमात्म्याचीच मूर्ति आहे.

जन्मना पितरौ क्लेशं सहेते संभवे नृणां॥ न तस्य निष्कृतिः शक्या कर्तुं वर्षशतैरपि॥ २२॥

अर्थ- तसेच माता पितर हे मनुष्यांच्या गर्भ संभवापासून जन्मतः अनेक क्लेश सहन करतात. त्यांच्या त्या उपकारांवर प्रत्युपकार करणें मानवां

सशताबधि वर्षांनीं हीं अशक्य आहे.

तयोर्नित्यंप्रियंकुर्यादाचार्यस्यतुसर्वदा॥तेष्वेव
त्रिषुतुष्टेषुतपःसर्वंसमाप्यते॥२३॥

अर्थ- यास्तव मनुष्यानें मातापितरांचें नित्यशः प्रिय करीत असून- गुरूचें तर सर्वदा प्रिय करीत असावें. तेणें करून ते त्रिवर्ग संतुष्ट झाले. असतां त्यास सर्व तपाचें पूर्ण फल प्राप्त होतें.

तेषांत्रयाणांशुश्रूषापरमंतपउच्यते॥नचैतैरननु-
ज्ञातोधर्ममन्यंसमाचरेत्॥२४॥

अर्थ- कारण त्या त्रिवर्गांची सेवा करणें हें मुख्य तप आहे; यास्तव माता, पितर व गुरू यांचे आज्ञे वांचून अन्य धर्माचें आचरण करूं नये.

तएवहित्रयोलोकास्तएवत्रयआश्रमाः॥तएव
चत्रयोवेदास्तथैवोक्तास्त्रयोग्नयः॥२५॥

अर्थ- कारण ते त्रिवर्गच तीन लोक, तीन आश्रम, तीन वेद व तीन- अग्नि हीं आहेत असें जाणावें.

पितावैगार्हपत्योग्निर्मातादक्षिणतःस्मृतः॥गु
रुराहवनीयश्चसाग्नित्रेतागरीयसी॥२६॥

अर्थ- तें असें कीं, पिता हा गार्हपत्य नामा अग्नि असून माता, दक्षिणाग्नि व गुरू, आहवनीय नामक मुख्य अग्नि असे हे त्रिवर्ग अग्निस्वरूपी असल्यामुळें लोकांत श्रेष्ठ आहेत.

त्रिषुप्रमाद्यतेनेषुत्रीन्लोकान्जयतेगृही॥दीप्य
मानःस्ववपुषादेववद्दिविमोदते॥२७॥

अर्थ- यास्तव त्या त्रिवर्गांच्या सेवे विषयीं जो गृहस्थाश्रमी असावध असत नाहीं; तो त्रैलोक्यास स्वाधीन करून आपण तेजःपुंज स्वदेहानें स्वर्गांत देवा सारखा आनंद पावतो.

यमउवाच॥कृतेनकामेननिवर्तभद्रेभविष्य
तीदंसकलंत्वयोक्तं॥ममोपरोधस्तवचक्लमःस्या
त्तथाधनातेनतवब्रवीमि॥२८॥

अर्थ- यम धर्म बोलले हे कल्याण कारिणि माझ्या मागें येण्याचा तु-

ह्या मनोरथ पुरे; तूं जो वर मागीतलास तो. तुला पूर्ण प्राप्त होईल; आतां तूं स्वगृहीं जा; कारण प्रस्तुत तुझ्या आगमनानें माझे गमनास प्रतिबंध होऊन तुला ग्लानि येईल; एतदर्थ मी तुला असें भाषण करतों. -
इतिश्री मत्स्य पुराणे सावित्र्युपाख्याने द्वितीयवरलाभो नामैकादशोत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २११ ॥

अध्याय २१२ वा.

सावित्र्युवाच ॥ धर्मार्जने सुरश्रेष्ठ कुतो ग्लानिः क्रमः स्तथा ॥ त्वपादमूलसेवाच परमं धर्मकारणं ॥ १ ॥

अर्थ- नंतर सावित्री बोलली; हे देवश्रेष्ठा, तुमच्या चरण मूलाची सेवा उत्तम धर्मास कारण आहे; तस्मात् असा धर्म संपादन होत असतां ग्लानि व श्रम हे कोठून होतील;

धर्मार्जनं तथा कार्यं पुरुषेण विजानता ॥ तल्लाभः सर्वलाभेभ्यो यदा देव विशिष्यते ॥ २ ॥

अर्थ- यास्तव विशेष ज्ञान संपन्न पुरुषानें धर्मच संपादन करावा; कारण हे देवा, धर्माचा लाभ सर्व लाभां पेक्षां अधिक आहे.

धर्मश्चार्थश्च कामश्च त्रिवर्गो जन्मनः फलं ॥ धर्महीनस्य कामार्थौ वंध्यासुतसमौ प्रभो ॥ ३ ॥

अर्थ- कारण धर्म, अर्थ व काम हा तीन प्रकारचा पुरुषार्थ संपादन करणें हें मनुष्य जन्माचें फल आहे; आणि वंध्येस जसे पुत्र होतनाहीत तसे धर्म हीन पुरुषास काम व अर्थ हे दोन्ही पुरुषार्थ सर्वथा प्राप्त होत नाहीत.

धर्मादर्थस्तथा कामो धर्माल्लोकद्वयं तथा ॥ धर्म एकोनुयात्येनं यत्र क्वचनगामिनं ॥ ४ ॥

अर्थ- तसेच अर्थ, काम, भूलोक व उत्तम परलोक हे धर्मापासूनच प्राप्त होतात; आणि हा जीव कोठेंही गेला तरी धर्मच त्याचे समागमें येतो.

शरीरेण समं नाशं सर्वमन्यद्धि गच्छति ॥ एको हि जायते जंतुरेक एव विपद्यते ॥ ५ ॥

अर्थ- तसेंच शरीर नाशा बरोबर विद्यादिक सर्व ऐश्वर्याचा तत्क्षणीं-

वियोग होतो; आणि हा प्राणी जसा एकाकी जन्मास येतो; तसा एकटाच-मृत्यु पावतो.

धर्मस्तमनुयात्येकोनसुहृन्नचबांधवाः॥ क्रिया सौभाग्यलावण्यंसर्वंधर्मेणलभ्यते॥६॥

अर्थ- त्याकालीं एक धर्म मात्र त्या समागमें गमन करतो; परंतु मित्र व बांधव हे कोणीही त्याज बरोबर जात नाहीत; आणि कौशल्यादिक-क्रिया, उत्तम भाग्य व सौंदर्य इत्यादिक सर्व फळें धर्मानेंच प्राप्त होतात.

ब्रह्मेंद्रोपेंद्रशर्वेंदुयमार्काग्न्यनिलांभसां॥ वसु-शिवधनदाद्यानांयेलोकाःसर्वकामदाः॥७॥ धर्मे-णतानवाप्नोतिपुरुषःपुरुषांतक॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे प्राणिसंहारक रेवा, ब्रह्मदेव, इंद्र, उपेंद्र (विष्णु)-शिव, चंद्र, यम, सूर्य, अग्नि, वायु, वरुण, अष्टवसु, अश्विनी कुमार व कुबेर इत्यादिक सर्व देवांचे लोक प्राणिमात्रांचे संपूर्ण मनोरथ पूर्ण करणारे असून ते जीवास धर्म संपादनानेंच प्राप्त होतात.

मनोहराणिद्वीपानिवर्षाणिसुखदानि च॥८॥ प्रयांतिधर्मेणनरास्तथैवनरगंडिकाः॥

अर्थ- तसेच सर्व मानव, धर्म साधनानेंच रमणीय अनेक द्वीपें वत्यांतील अत्युत्तम सुख कारक अनेक खंडें यांत गमन करतात; तश्याच उत्तम-महाजनयुक्त अनेक नगरी पुण्यानेंच प्राप्त होतात.

नंदनादीनिसुख्यानिदेवोद्यानानियानिच॥९॥-तानिपुण्येनलभ्यंतेनाकपृष्ठंतथानरैः॥

अर्थ- तशींच देवांचीं नंदनादिक मुख्य क्रिडा वनें व सत्यलोकादिक स्थानेंहीं मानवांस पुण्यानेंच प्राप्त होतात.

विमानानिविचित्राणितथैवाप्सरसःशुभाः॥१०
तैजसानिशरीराणिसदापुण्यवतांफलं॥

अर्थ- आणि विचित्र विमानें तश्याच उत्तम अप्सरा व तेजःपुंज शरीरें हें फल निरंतर पुण्यवंतांसच प्राप्त होतें.

राज्यंनृपतिपूजाचकामसिद्धिस्तथेप्सिता॥-

॥११॥ संस्काराणिचमुख्यानिफलंपुण्यस्यदृश्यते॥

अर्थ- तसेंच राज्य, राजसन्मान, इच्छित विषय प्राप्ति व विद्यादिक जन्मां तरीय मुख्य संस्कार हें सर्व फल पुण्याचेंच आहे.

रुक्मवैडूर्यदंडानिचंडांशुसदृशानिच॥१२॥ चामराणिसुराध्यक्षभवंतिशुभकर्मणां॥

अर्थ- हे देवाध्यक्षा वैडूर्य रत्नखचित सुवर्ण दंड युक्त चवऱ्या, पुण्य कर्मे करणाऱ्या प्राण्यांस प्राप्त होतात.

पूर्णेंदुमंडलाभेनरत्नांशुकविकाशिना॥१३॥ धार्यतांयातिच्छत्रेणनरःपुण्येनकर्मणा॥

अर्थ- तसेंच पूर्णचंद्र मंडला समान शुभ्र कांति युक्त असून रत्न खचित वस्त्रानें सुशोभित असें छत्र पुण्य कर्माचे योगानेंच मनुष्याच्या मस्तकावर धरलें जातें.

जयशंखस्वरौघेणसूतमागधनिस्वनैः॥१४॥ वरासनंसशृंगारंफलंपुण्यस्यकर्मणः॥

अर्थ- तसेंच जयशब्द, शंखशब्द, सूत (पौराणिक) मागध (वंशावळीकथन करणारे) यांचे शब्द व शृंगार साधन वस्त्रयुक्त उत्तम आसन यांची प्राप्ति होणें हें पुण्याचें फल आहे.

वरान्नपानंगीतंचनृत्यंमाल्यानुलेपनं॥१५॥ रत्नवस्त्राणिमुख्यानिफलंपुण्यस्यकर्मणः॥

अर्थ- तसेंच उत्तम अन्न सुगंध उदकादिक पदार्थांचें प्राशन, गायन, सेवक माला पुष्पें गंध उत्कृष्ट रत्नें व वस्त्रें यांची प्राप्ति होणें हें पुण्य कर्माचेंच फल आहे.

रूपौदार्यगुणोपेतास्त्रियश्चातिमनोहराः॥१६॥ वासःप्रासादपृष्ठेषुभवंतिशुभकर्मिणः॥

अर्थ- आणि रूप औदार्यादिक गुण यानीं युक्त सुंदर स्त्रिया व देव किंवा राजे यांच्या मंदिरावरील भागावर वास घडणें हें फल पुण्य कर्म करणारासच प्राप्त होतें.

सुवर्णकिंकिणीमिश्रचामरापीडधारिणः॥१७॥

वहंतितुरगादेवनरंपुण्येनकर्मणा॥

अर्थ- हे देवा, सुवर्णाच्या घागऱ्यानीं फक्त ववन्या वतुरेयानीं शोभणा रे अश्व, पुण्य कर्माच्या योगानें मानवास वाहातात.

तस्यद्वाराणियजनंतपोदानंदमःक्षमा॥१८॥

ब्रम्हचर्यंतथासत्यंतीर्थानुमरणंशुभं॥स्वा-

ध्यायसेवासाधूनांसहवासःसुरार्चनं॥१९॥गु

रूणांचैवशुश्रूषाब्राम्हणानांचपूजनं।इंद्रिया·

णांजयश्चैवब्रम्हचर्यममत्सरं॥२०॥

अर्थ- त्या पुण्य कर्माची द्वारें अशी कीं, यज्ञ, तप, दान, इंद्रियनिग्रह, क्ष· मा, ब्रम्हचर्य, सत्य, तीर्थतीरीं उत्तम मरण, ब्रम्हयज्ञादिक उत्तम अध्यय न साधूंची सेवाव त्यांशी सहवास, देवपूजा, गुरूंची शुश्रूषा, ब्राम्हणाचें· पूजन, इंद्रियें स्वाधीन असणें व वेदाध्ययनार्थ निर्मत्सर अंतःकरणानें- ब्रम्हचर्य करणें या साधनानीं पुण्य प्राप्त होतें.

तस्मात्धर्मःसदाकार्योनित्यमेवविजानता॥-

नहिप्रतीक्षतेमृत्युःकृतमस्यनवाकृतं॥२१॥

अर्थ- तस्मात् बहु ज्ञान संपन्न पुरुषानें निरंतर अवश्य मेव प्रयत्ना नें धर्म संपादन करावा, कारण हा मृत्यु या प्राण्यानें धर्माचरण के· ले किंवा न केलें; याची मार्ग प्रती. क्षा करीत नाहीं.

बालएवचरेध्धर्ममनित्यंदेवजीवितं॥ कोहिजा

नातिकस्याद्यमृत्युरेवापतिष्यति॥२२॥

अर्थ- हे देवा आणि हें आयुष्य अनित्य आहे; यास्तव बाल वयापा- सूनच धर्माचरण करावें; कारण आज कोणास मृत्यु येणारच हें को· णी ही जाणत नाहीं.

पश्यतोप्यस्यलोकस्यमरणंपुरतःस्थितं॥अ

मरस्येवचरितमत्याश्चर्यंसुरोत्तम॥२३॥

अर्थ- हे देवोत्तमा आणि मृत्यु हा सर्व लोकांच्या दृष्टी समोर अनु· भवास येत असून त्यांची स्थिति अमरासारखी चालते हें महदाश्च· र्यच आहे.

एवत्वापेक्षयाबालोवृध्धत्वापेक्षयायुवा॥मृ·
त्योरुत्संगमारूढःस्थविरःकिमपेक्षते॥२४॥

अर्थ- तसाच बालक हा, तारुण्याचे अपेक्षेनें मृत्यूस अति दूर अ·
सून तरुण हा वृध्धावस्थेच्या अवधीनें मृत्यूस दूर आहे; आणि वृध्ध
तर केवळ मृत्यूच्या मांडीवर बसल्यासारखा असून तो जाणून
विषयांचीइच्छा करतो हें काय!

तत्रापिविंदूतस्त्राणंमृत्युनातस्य कागतिः॥न
भयंमरणंचैवप्राणिनामभयंक्वचित्॥तत्रापि
निर्भयाःसंतःसदासुकृतकारिणः॥२५॥

अर्थ- आणि त्या वृध्धावस्थेंतील प्राण्यास त्याचे पुत्रादिकानीं किती
हीसंरक्षणकेलें; तरी मृत्यु, त्याची दुर्दशाच करतो; तस्मात् प्राणिमा·
त्रांस कोठेंही अभय नसून सर्वत्र भय वमरण हीं प्राप्त होतात; असें·
असून ही त्यांतजे प्राणी निरंतर सुकृत करणारे साधु असतात तेस
र्वथा निर्भय असतात·

यमउवाच॥तुष्टोस्मितेविशालाक्षिवचनैर्धर्मसं
युतैः॥विनासत्यवतःप्राणान्वरंवरयमाचिरं२६

अर्थ- नंतर यम धर्म बोलले; हेविशालनयने सावित्रि तुझ्या या धर्म
युक्त भाषणानीं मी संतुष्ट झालों; परंतु तूं यासत्यवानाचे प्राणां वांचून-
यथेच्छ वर माग; या विषयीं विलंब करूंनको·

सावित्र्युवाच॥वरयामित्वयादत्तंपुत्राणांशत·
मौरसं॥अनपत्यस्यलोकेषुगतिःकिलनविद्य
ते॥२७॥

अर्थ- ते व्हां सावित्री बोलली; हे देवा, पुत्रहीन प्राण्यास उत्तम लोकां
त गति प्राप्त होतच नाही; यास्तव आपण कृपाकरूनउत्तमशंभर औरः
स पुत्र मला द्यावे या वरा विषयीं मी प्रार्थना करित्यें·

यमउवाच॥कृतेनकामेननिवर्तभद्रेभविष्य
तीदंसकलंयथोक्तं॥ममोपरोधस्तवचक्लमः
स्यात्तथाध्वनातेनतवब्रवीमि॥२८॥

अर्थ- ते समयीं यम धर्म बोलले, हे सुशीले, सावित्रि माझ्या मागें येण्याचा तुझा मनोरथ पुरे; आणि तूं मागितलें हें सर्व तुला प्राप्त होईल; आतां तूं माघारी जा; कारण सांप्रत कालीं तुझे आगमनानें माझे गमनास प्रतिबंध होऊन तुला ही श्रम होतात. म्हणून मी असें तुला बोलतों.

इतिश्री मत्स्य पुराणे सावित्र्युपाख्याने तृतीय वरलाभो नाम द्वादशोत्तरद्विशततमोऽध्यायः ॥ २१२ ॥

अध्याय २१३ वा

सावित्र्युवाच ॥ धर्माधर्मविधानज्ञ सर्वधर्मप्रवर्तक ॥ त्वमेव जगतो नाथः प्रजासंयमनो यमः ॥ १ ॥

अर्थ- अहो यम धर्मा, आपण धर्म व अधर्म यांची स्थिति जाणणारे असून लोकांत सर्व धर्मांची प्रवृत्ति करणारे व तुम्हीच जगाचे प्रभु असल्यामुळें सर्व प्रजांस स्वधर्मांत वर्तवितां.

कर्मणामनुरूपेण यस्माद्यमयसे प्रजाः ॥ तस्माद्वै प्रोच्यसे देव यम इत्येव नामतः ॥ २ ॥

अर्थ- अहो देवा आपण सर्व प्रजांस त्यांच्या कर्मानुरूप शासन करतां; यास्तव यम नामानें तुमची लोकांत प्रसिद्धि आहे.

धर्मेणेमाः प्रजाः सर्वा यस्माद्रंजयसे प्रभो ॥ तस्मात्ते धर्मराजेति नाम सद्भिर्निगद्यते ॥ ३ ॥

अर्थ- हे प्रभो आपण यां सर्व लोकांस धर्मानें रक्षितां; म्हणून साधू तुम्हास धर्म राज असें म्हणतात.

सुकृतं दुष्कृतं चोभे पुरोधाय यदा जनाः ॥ त्वत्सकाशं मृता यान्ति तस्मात्त्वं मृत्युरुच्यसे ॥ ४ ॥

अर्थ- तसेंच सर्व जन मरणानंतर आपलीं पुण्य पापें पुढें असून त्यांच्या अनुलक्षें करून तुह्मा समीप येतात; या कारणानें तुह्मी, मृत्यु नामानें लोकांत प्रसिद्ध आहां.

कालं कलार्धं कलयन् सर्वेषां त्वं हि तिष्ठसि ॥ तस्मात्कालेति ते नाम प्रोच्यते तत्त्वदर्शिभिः ॥ ५ ॥

अर्थ- आणि आपण सर्व लोकांचे आयुष्याचा संपूर्ण काल आपले मानानें अर्थ कलेसमान करून राहतां; यामुळें तत्वज्ञाते मुनि तुमचें, काल नामानें वर्णन करतात.

सर्वेषामेव भूतानां यस्मादंतकरो महान्॥ तस्मात्त्वमंतकः प्रोक्तः सर्वदेवैर्महाद्युते॥ ६॥

अर्थ- अहो महातेजस्विन् आपण सर्व प्राणिमात्रांचा संहार करणारे आहां; त्यामुळें सकल देव तुम्हास अंतक असें ह्मणतात.

विवस्वतस्त्वं तनयः प्रथमं परिकीर्तितः॥ तस्माद्वैवस्वतो नाम्ना सर्वलोकेषु कथ्यते॥ ७॥

अर्थ- त्याचप्रमाणें आपण सूर्याचे प्रथम पुत्र आहां; याहेतूनें तुम्ही वैवस्वत नामानें सर्व लोकांत प्रसिद्ध आहां.

आयुष्ये कर्मणि क्षीणे गृण्हासि प्रसभं जनं॥ तदा त्वं कथ्यसे लोके सर्वप्राणहरेति वै॥ ८॥

अर्थ- तसेंच आपण सर्व लोकांचें आयुष्य क्षीण झालें असतां त्यांस बलात्कारानें आपले लोकांस नेतां; तेणें करून तुम्हास सर्वप्राणहर असें ह्मणतात.

तव प्रसादाद्देवेश संकरो न प्रजायते॥ सतां सदा गतिर्देव त्वमेव परिकीर्तितः॥ ९॥

अर्थ- हे देवाधिदेवा, तुमच्या दंडाचे भयानें लोकांत संकर होत नाहीं; तस्मात् हे देवा आपण साधूंस निरंतर आश्रय आहां.

जगतोस्य जगन्नाथ मर्यादापरिपालकः॥ पाहि मां त्रिदशश्रेष्ठ दुःखितां शरणागतां॥ पितरौ च तथैवास्य राजपुत्रस्य दुःखितौ॥ १०॥

अर्थ- तस्मात् अहो जगदीशा आपण या जगाच्या धर्मादिक सर्व मर्यादांचें संरक्षण करणारे आहां; यास्तव अहो देवश्रेष्ठा मी धर्मसंबंधानेंच दुःखित झाल्यामुळें आपणांस शरण आल्यें. आणि या राजपुत्राचे मातापितर दुःखित झाले आहेत.

यम उवाच॥ स्तवेन भक्त्या धर्मज्ञे मया तुष्टेन स

त्यवान् ॥ तवभर्ताविमुक्तोयंलब्धकामाव्रजाब-
ले ॥ ११ ॥

अर्थ- त्या काळीं यम धर्म बोलले; हे धर्म ज्ञान संपन्न सावित्रि, तुझ्या या भक्ति युक्त स्तुतीनें मी प्रसन्न होऊन तुझा हा पति सत्य वान् सोडला; आता तुझा मनोरथ पूर्ण झाला; तस्मात् हे अबले तूं स्वगृहीं गमन कर.

राज्यंकृत्वात्वयासार्धंवत्सराशीतिपंचकं ॥ नाक
पृष्ठमथारुह्यत्रिदशैःसहरंस्यते ॥ १२ ॥

अर्थ- आणि हा सत्यवान् इतउत्तर तुजसहित पंचायशीं वर्षे राज्य करून पश्चात् स्वर्गा वरील महर्लोकादिक उत्तम लोकांत जाऊन तेथें देवांसह वर्तमान क्रीडा करील.

त्वयिपुत्रशतंचापिसत्यवान्जनयिष्यति ॥ ते-
चापिसर्वेराजानःक्षत्रियास्त्रिदशोपमाः ॥ १३ ॥
मुख्यास्त्वन्नामपुत्रारव्याभविष्यंतिहिशाश्व
ताः ॥ पितुश्चतेपुत्रशतंभवितातवमातरि ॥ १४ ॥
मालव्यांमालवानामशाश्वताःपुत्रपौत्रिणः ॥ भ्रा
तरस्तेभविष्यंतिक्षत्रियास्त्रिदशोपमाः ॥ १५ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें हा सत्यवान् तुझे उदरीं औरस शंभर पुत्र उत्पन्न करील; तें सर्वही स्वकीय क्षत्रिय धर्मानें देवांसारखे प्रसिद्ध राजे होऊन मुख्यत्वें तुझ्या नामानेंच प्रख्यात होत्साते चिर काल पृथ्वीचें राज्य करतील; तसेंच तुझ्या पित्या पासून तुझ्या मालवी नामक मातेस मालव नामानें प्रसिद्ध अ-सून तेही अनेक पुत्र पौत्रांनीं युक्त होत्साते देवांसमान महा तेजस्वी असे होतील; ते तुझे बंधु क्षत्रिय, पृथ्वी वर चिर काल राज्य करतील.

स्तोत्रेणानेनधर्मज्ञेकल्यमुत्थाययस्तुमाम् ॥ की
र्तयिष्यतितस्यापिदीर्घमायुर्भविष्यति ॥ १६ ॥

अर्थ- तसेंच हे धर्मज्ञे तूं केलेल्या या स्तोत्रानें जो मानव उषः कालीं (पहाटेच्या पांच घटिका रात्रीं) उठून माझी स्तुति करतो; त्यासही दीर्घायुष्य प्राप्त होतें.

मत्स्यउवाच ॥ एतावदुक्त्वाभगवान्यमस्तुप्रमु-

व्यतंराजसुतंमहात्मा ॥ अदर्शनंतत्रयमोजगा
मकालेनसार्धंसहमृत्युनाच ॥ १७ ॥

अर्थ- असें भाषण करून ऐश्वर्य संपन्न असून महात्मे ते यमधर्म, त्या सत्यवान् नामक राजपुत्रास आपले पाशांतून मुक्त करून काल व मृत्यु यांसहित त्या स्थानीं गुप्त झाले. इतिश्री मत्स्यपुराणें सावित्र्युपाख्यानें सत्यवज्जीवित लाभो नाम त्रयोदशोत्तर द्विशततमोऽध्यायः

अध्याय २१४ वा.

मत्स्यउवाच ॥ सावित्रीतुततःसाध्वीजगा-
मवरवर्णिनी ॥ यथायथागतेनैवयत्रासीत्स-
त्यवान्मृतः ॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् बोलले, हे मनुराजा, नंतर ती महापतिव्रता उत्कृष्टगुणवती सावित्री, तेथून आलेल्या मार्गानेंच जेथें सत्यवान् मरण पावला होता; तेथें आली.

सासमासाद्यभर्तारंतस्योत्संगगतंशिरः ॥ कृ-
त्वाविवेशतन्वंगीलंबमानेदिवाकरे ॥ २ ॥

अर्थ- तों सूर्य अस्ताचला समीप गेला. ते समयीं ती सूक्ष्मांगी सावित्री पतीसमीप येऊन त्याचें मस्तक आपले अंकावर घेऊन बसली.

सत्यवानपिनिर्मुक्तोधर्मराजाच्छनैः शनैः ॥ उ
न्मीलयतनेत्राभ्यांप्रास्फुरच्चनराधिप ॥ ३ ॥

अर्थ- हे मनुराजा, त्याकालीं यम धर्मराजापासून मुक्त झालेला तो सत्यवान् ही आपले शरीरांत प्रविष्ट होऊन हळु हळू नेत्र उघडून सर्वांगीं चलन वलन व अंतःकरणांत स्फूर्ति हीं पावला.

ततःप्रत्यागतप्राणःप्रियांवचनमब्रवीत् ॥ क्वा
सौप्रयातःपुरुषोयोमामप्यपकर्षति ॥ ४ ॥

अर्थ- याप्रमाणें सत्यवानास पुनः प्राणप्राप्त झाले असतां, तो आपल्ये भार्येस वाक्य बोलला कीं, हे प्रिये, जो पुरुष, मला देहांतून बाहेर आकर्षण करीत होता; तो कोठें गेला.

नजानामिवरारोहेकश्चासौपुरुषःशुभे ॥ वने-

स्मिनूचारुसर्वांगिसुप्तस्यचदिनंगतं ॥ ५ ॥

अर्थ- हे सुंदर कटि पश्चिम भागानें सुशोभित कल्याण कारिणिस्त्रिये, तो पुरुष कोण हें मी जाणत नाहीं; आणि हे सर्वांग सुंदरि या वनांत आजचा दिवस माझ्या निद्रेनें व्यर्थ गेला.

उपवासपरिश्रांतादुःखिताभवतीमया ॥ अस्मद्दुर्हृदयेनाद्यपितरौदुःखितौतथा ॥ द्रष्टुमिच्छाम्यहं सुभ्रुगमनेत्वरिताभव ॥ ६ ॥

अर्थ- तशीच तूं उपवासानें ग्लान झालेली असून मज समागमें वनांत आल्यामुळें दुःखित झालीस; तसेंच आज आमच्या या अव्यवस्थित चित्तानें माता पितरांस ही बहु दुःख झालें असेल; यास्तव आतां हे सुंदर भृकुटि शोभित – प्रिये तूं त्वरित गमना विषयीं सिद्ध हो.

सावित्र्युवाच ॥ आदित्येस्तमनुप्राप्तेयदितेरुचितंप्रभो ॥ आश्रमंतुप्रयास्यावः श्वशुरौहीन चक्षुषौ ॥ ७ ॥

अर्थ- ते समयीं सावित्री बोलली हे प्राणनाथा या कालीं सूर्यास्त समय झाला; असून तुमची इच्छा असेल तर आपण आश्रमास जाऊं; कारण माझे श्वासू सासरे नेत्र हीन आहेत.

यथावृत्तंचतत्रैवश्रुणुवक्ष्येयथाश्रमे ॥ एतावदुक्त्वाभर्तारंसहभर्त्रातदाययौ ॥ ८ ॥

अर्थ- आणि येथें झालेलें सर्व वृत्त आपले आश्रमांत यथास्थित कथन करीन; तेथेंच आपण तें सविस्तर श्रवण करावें; असें पतीस भाषण करून तात्काल ती सावित्री त्या भर्त्या सहित आश्रमास येण्या विषयीं निघाली.

आससादाश्रमंचैवसहभर्त्रानृपात्मजा ॥ एतस्मिन्नेवकालेतुलब्धचक्षुर्महीपतिः ॥ ९ ॥ द्युमत्सेनः सभार्यस्तुपर्यतप्यतभार्गव ॥ प्रियंपुत्रमपश्यन्वैस्नुषांचैवाथकर्शितौ ॥ १० ॥

अर्थ- सूत म्हणतात हे शौनका, ती राजकन्या सावित्री, पति सहित तस्वकीय आश्रमास आली; त्याच कालीं द्युमत्सेन राजास नेत्र प्राप्त झाले अ-

सनां आपला प्रिय पुत्र सत्य वान् व व्रतानें ग्लान झालेली सावित्री हे दृष्टीन पडल्या मुळें तो स्त्री सहित राजा चिंताग्रस्त झाला.

आश्वास्यमानस्त तथा सतु राजा तपोधनैः ॥-
ददर्श पुत्रमायांतं स्नुषया सह कानने ॥११॥

अर्थ- असतां तेथील तपो वृध्द ऋषीनीं त्या राजास नेत्र प्रासि आदि करून शुभ सूचक चिन्हां वरून पुत्र दर्शनाविषयीं आश्वासन दिलें; तों इतक्यांत त्यानें त्या वनांत सावित्री नामक स्नुनेसहित आपला पुत्र सत्य वान् येत आहे असें अवलोकन केलें.

सावित्रीतु वरारोहा सह सत्यवता तदा ॥ ववंदे
तत्र राजानं सभार्यं क्षत्र पुंगवं ॥१२॥

अर्थ- त्या कालीं उत्तम कटि पश्चाद्भाग स्नुशोभित सावित्री सहित सत्य वानानें त्या आश्रमांत भार्येसहित द्युमत्सेन नामक क्षत्रिय श्रेष्ठ आपले माता पितरांस नमस्कार केला.

परिष्वक्तस्तदा पित्रा सत्यवान् राजनंदनः ॥ अ
भिवाद्य ततः सर्वान् वने तस्मिंस्तपोधनान् ॥१३
॥ उवास तत्र तां रात्रिमृषिभिः सर्वधर्मवित् ॥-
सावित्र्यपि जगादाथ यथावृत्त मनिंदिता ॥
॥१४॥

अर्थ- ते समयीं द्युमत्सेनानें सर्व राजांस आनंद कारक अशा त्या सत्य वान् नामक राज पुत्रास आलिंगन केलें; पश्चात् सत्य वानानें त्या वनांतील सर्व तपोधन ऋषींस नमस्कार करून तो धर्म ज्ञानसंपन्न सत्य वान् त्या ऋषि समागमें आपल्ले आश्रमांत त्या रात्रीं राहिला. नंतर स्तुति योग्य सावित्रीनेंही वनांत झालेलें सर्व वर्तमान त्या ऋषींचे समक्ष श्वशुरादिकांस यथास्थित सांगितलें.

व्रतं समापयामास तस्यामेव यथा निशि ॥ तत
स्तृतीयस्त्रियामांते ससैन्यस्तस्य भूपतेः ॥१५॥
आजगाम जनः सर्वो राज्यार्थाय निमंत्रणे ॥-
विज्ञापयामास तदा तत्र प्रकृति शासनं ॥१६॥

अर्थ- आणि सावित्रीनें त्याच रात्रीं नें वट सावित्रीचें व्रत यथाविधि समाप्त केलें. नंतर त्या रात्रीं त्या द्युमत्सेन राजाच्या पूर्वीचे राजधानींतील सर्व महाजन लोक, सैन्य व मंगल वाद्यें यांसहित त्या द्युमत्सेन राजांस स्वकीय पुरातन राज्य पालना विषयीं निमंत्रणार्थ आले आणि त्यानीं त्याकालीं पूर्वींच्या स्वकीय प्रजांचे संरक्षणा विषयीं विज्ञापना केली.

विचक्षुषस्तेनृपतेयेनराज्यंपुराहृतं॥अमात्यैः
सहतोराजाभवांस्तस्मिन्पुरेनृपः॥ १७॥

अर्थ- कीं हे राजा तूं पूर्वीं नेत्रहीन झालास; तेव्हां ज्या शत्रूनें तुझें राज्य हरण केलें; त्यास प्रधानानीं मारिलें; यास्तव तूं त्यापुरांत राजा होण्यास योग्य आहेस.

एतच्छ्रुत्वाययौराजाबलेनचतुरंगिणा॥लेभेच
सकलराज्यंधर्मराजान्महात्मनः॥१८॥

अर्थ- तें लोकांचें भाषण श्रवण करून तो द्युमत्सेनराजा त्याचतुरंगसैन्यासहित आपले पुरातन राजधानींत येऊन यम धर्म राजांचे वरानें संपूर्ण राज्य पावला.

भ्रातॄणांतुशतंलेभेसावित्र्यपिवरांगना॥एवं
पतिव्रतासाध्वीपितृपक्षंनृपात्मजा॥ १९॥उज्ज
हारवरारोहाभर्तृपक्षंतथैवच॥मोक्षयामासभ
र्तारंमृत्युपाश गतंतदा॥ २० ॥

अर्थ- नंतर त्याकालीं सावित्री नामक त्या श्रेष्ठस्त्रीस हीशंभर बंधु झाले; - असा त्या महा पतिव्रता राजकन्येनें आपलें पितृकुल व पतिकुल या उभय - कुलांचा उद्धार केला; आणि त्या उत्कृष्ट गुणवतीनें आपल्या पतीस ही यमपाशांतून मुक्त केलें.

तस्मात्साध्व्यःस्त्रियःपूज्याःसततंदेववन्नरैः॥
तासांराजन्प्रसादेनधार्यतेवैजगत्त्रयं॥२१॥

अर्थ- तस्मात् पुरुषानीं पतिव्रता स्त्रियांचें निरंतर देवांसारखें पूजन करावें; कारण हे राजा त्या साध्वी स्त्रियांचे कृपेनेंच त्रैलोक्याचें संरक्षण होत आहे.

तासांतुवाक्यंभवतीहमिथ्यानजातुलोकेषुचरा चरेषु ॥ तस्मात्सदाताः परिपूजनीयाः कामान् समग्रानभिकामयानैः ॥ २२ ॥

अर्थ- तसेंच त्या पतिव्रता स्त्रियांचें यासर्व चराचर लोकांविषयींचें वाक्य कदापि असत्य होत नाहीं. यास्तव लोकांनीं आपले सर्व मनोरथ पूर्ण होण्याच्या इच्छेनें त्यापतिव्रतांची सर्वदा पूजा करावी. इतिश्री मत्स्यपुराणें सावित्र्युपाख्यानं नामचतुर्दशोत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २१४ ॥

अध्याय २१५ वा.

मनुरुवाच ॥ राज्ञोभिषिक्तमात्रस्यकिंनुकृत्यतमंभवेत् ॥ एतन्मेसर्वमाचक्ष्वसम्यग्वेत्तियतोभवान् ॥ १ ॥

अर्थ- नंतर मनुराजा प्रश्न करतो कीं हे भगवन्, राज्याभिषेक झाले त्या सर्व राजास अवश्य कर्तव्य कर्म कोणतें विहित आहे; तें सर्व मला कथन करा; कारण आपणच सर्व विषय उत्तम रीतीनें जाणतां.

मत्स्यउवाच ॥ अभिषेकार्द्रशिरसाराज्ञाराज्यावलोकिना ॥ सहायवरणंकार्यंतत्रराज्यंप्रतिष्ठितं ॥ २ ॥

अर्थ- ते समयीं भगवान् मत्स्य बोलले हे मनुराजा, ज्याचे मस्तकावर राज्याभिषेक झाला; त्या राज्यावलोकन करणाऱ्या राजानें आपणास प्रधानादिक अनेक साहाय्य ग्रहण करावे; कारण राज्यस्थिति साहाय्याधीनच आहे.

यदप्यल्पतरंकर्मतदप्येकेनदुष्करं ॥ पुरुषेणासहायेनकिमुराज्यंमहोदयं ॥ ३ ॥

अर्थ- कारण लोकांत जें अति अल्प कार्य असतें; तें ही एकास करणें अशक्य असतें; तेव्हां सहाय्यहीन एकाकी पुरुष, महत्कार्य साधक राज्य करण्यास कसा समर्थ होईल.

तस्मात्सहायान्वरयेत्कुलीनान्नृपतिःस्वयं ॥ शूरान्कुलीनजातीयान्बलयुक्तान्श्रियान्वि-

तान् ॥ ४ ॥

अर्थ- यास्तव राजानें स्वतः परीक्षा करून आपले सहाय्यार्थ, शूर, असून कुलीन वंशांत उत्पन्न झालेले, बलिष्ठ व संपन्न असे लोक ग्रहण करावे.

रूपसत्वगुणोपेतान्सज्जनान्क्षमयान्वितान् ॥ क्लेशक्षमान्महोत्साहान्धर्मज्ञांश्चप्रियंवदान् ॥ ५ ॥ हितोपदेशकान्राज्ञः स्वामिभक्तान्यशोर्थिनः ॥ एवंविधान्सहायांश्च शुभकर्मसुयोजयेत् ॥ ६ ॥

अर्थ- तसेच तें मंत्री आदि करून लोक, रूप, व्यवसाय, पराक्रम धैर्य, गुण व क्षमा यानीं फक्त असून क्लेश सहन करण्या विषयीं समर्थ, मोठ्या उत्साह शक्तीनें फक्त धर्म जाणणारे, प्रिय भाषण करणारे राजास हितोपदेश करून त्याचें व आपलें यश वृद्धिंगत करणारे व मनःपूर्वक स्वामि कार्या विषयीं तत्पर असे सज्जन राजानें आपले साहाय्यार्थ ग्रहण करून त्यांस राजकीय उत्तम अधिकारां वर योजावे.

गुणहीनानपितथाविज्ञायनृपतिः स्वयं ॥ कर्मस्वेव-नियुंजीतयथायोग्येषुभागशः ॥ ७ ॥

अर्थ- तसेंच राजानें स्वतः पूर्वी सांगीतलेल्या उत्तम गुणानीं रहित असून सामान्य गुण फक्त असतील; त्यांचीही परीक्षा करून त्यांस त्यांच्या योग्यतानुसार भिन्न कर्मा विषयीं योजावें.

कुलीनः शीलसंपन्नोधनुर्वेदविशारदः ॥ हस्तिशिक्षाश्वशिक्षासुकुशलः श्लक्ष्णभाषिता ॥ ८ ॥ निमित्तेशाकुनज्ञानेवेत्ताचैवचिकित्सिते ॥ कृतज्ञः कर्मणांशूरस्तथाक्लेशसहोऋजुः ९ ॥ व्यूहतत्व-विधानज्ञः फल्गुसारविशेषवित् ॥ राज्ञासेनापतिः कार्योब्राम्हणः क्षत्रियोथवा ॥ १० ॥

अर्थ- तें असें कीं, कुलीन व सुशील असून धनुर्विद्येंत निपुण, गज व अश्वयांच्या शिक्षे विषयीं कुशल, सुंदर भाषण करणारा, सुचिन्हें, दुश्चिन्हें, शकुन, अपशकुन व रोगादिक अनेक चिकित्सांच्या विषयीं चतुर, सर्व कर्माच्या कृतीचा ज्ञाता व त्या विषयीं शूर असून क्लेश सहन करणारा, बुद्धीनें सरळ, सैन्याच्या

व्यूहांचें यथार्थ तत्व जाणणारा व सर्व प्रकारें सारासार विषय विभागाचा ज्ञाता असा ब्राह्मण किंवा क्षत्रिय यास राजानें सेनापति करावा.

प्रांशुः सुरूपो दक्षश्च प्रियवादी नचोध्धतः ॥ चि-
त्तग्राहश्च सर्वेषां प्रतीहारो विधीयते ॥ ११ ॥

अर्थ- तसाच आकृतीनें उंच व तेजस्वी असून सुरूप, सर्व कार्यांत दक्ष, प्रिय भाषण करणारा, उन्मत्त नसून सर्वांचे चित्त हरण करणारा असा द्वारपाल राजास योग्य आहे.

यथोक्तवादी दूतःस्याद्देशभाषाविशारदः ॥ श-
क्तः क्लेशसहो वाग्मी देशकालविभागवित् ॥ १२ ॥
विज्ञातादेशकालश्च दूतःस स्यान्महीक्षितः ॥ व
क्तानयस्य यःकाले स दूतो नृपतेर्भवेत् ॥ १३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें सत्यवादी असून सर्व देश भाषांत निपुण, सशक्त, दुःखसहन करण्या विषयीं चतुर, साधक देश, कालांचें स्वरूप जाणणारा असून बाधक देश कालांचाही विचार जाणणारा व योग्य कालीं नीतियुक्त भाषण करणारा असा जो दूत तोच राजास योग्य आहे.

प्रांशवो व्यायताःशूराः दृढभक्ता निराकुलाः ॥ रा
ज्ञा तु रक्षिणः कार्याः सदा क्लेशसहा हिताः ॥ १४ ॥

अर्थ- तसेंच कुलादिकांनीं श्रेष्ठ, तेजस्वी, विशेषें करून दीर्घ आकृतीनें युक्त, शूर, दृढ विश्वास युक्त मनानें राजसेवे विषयीं आसक्त, अव्यग्र चित्त, निरंतर दुःख सहना विषयीं समर्थ राजहितार्थ उद्युक्त असे पुरुष, राजानें स्वकीय रक्षणार्थ योजावे.

अनाहार्योनृशंसश्च दृढभक्तिश्च पार्थिवे ॥ तां
बूलधारी भवति नारी वाप्यथ तद्गुणा ॥ १५ ॥

अर्थ- आणि फितुर न होणारा व घातक नसून राजसेवे विषयीं दृढ विश्वास युक्त असा पुरुष किंवा या गुणानीं संपन्न स्त्री हेच राजास तांबूल देण्यास योग्य जाणावे.

षाड्गुण्यविधितत्वज्ञो देशभाषाविशारदः ॥ संधि
विग्रहकः कार्यो राज्ञा नयविशारदः ॥ १६ ॥

अर्थ- तसेंच संधि (शत्रूंशीं सख्य करणें) विग्रह (शत्रूंशीं कलहादिक करणें) यान, (शत्रूं वर चाल करून जाणें) आसन, (राजाची शक्ती कुंठित झाली असतां त्यानें धैर्य करून मार्ग प्रतीक्षा करीत बसणें) द्वैध, (दुर्बलाशीं विरोध व प्रबलाशीं सख्य करणें) आश्रय, (मित्रांस साहाय्य करणें) यांसहा राज्यांग गुणांच्या प्रकाराचें तत्त्व जाणणारा असून सर्व देश भाषा व नीति यांत निष्णात असा पुरुष संधि व विग्रह या कार्यांविषयीं राजानें योजावा.

कृताकृतज्ञो भृत्यानां ज्ञेयः स्याद्देशरक्षिता ॥ आय
व्ययज्ञो लोकज्ञो देशोत्पत्तिविशारदः ॥ १७ ॥

अर्थ- तसाच राजसेवकानीं केलेल्या व न केलेल्या राज कार्यांचा ज्ञाता असून आय, व्यय व सर्व लोकांचें वृत्त यांस जाणणारा व देशांत अन्नोदकादिक सर्व उत्पत्ती विषयीं प्रवीण असा पुरुष देश संरक्षणाचे अधिकारावर योजावा.

सुरूप स्तरुणः प्रांशुर्दृढभक्तिः कुलोचितः ॥
शूरः क्लेशसहश्चैव खड्गधारी प्रकीर्तितः ॥ १८ ॥

अर्थ- आणि रूपानें सुंदर, तरुण, तेजस्वी, पूर्ण विश्वास पात्र, कुलीन, शूर व क्लेश सहन करणारा असा पुरुष राजाचा खड्ग सम्यक् धारण करण्या विषयीं योग्य जाणावा.

शूरश्च बलयुक्तश्च गजाश्वरथकोविदः ॥ धनुर्धारी भवेद्राज्ञः सर्वक्लेशसहः शुचिः ॥ १९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें शूर, बलाढ्य, गज, अश्व व रथ यांविषयीं चतुर, सर्व दुःख सहन करणारा व पवित्र असा पुरुष, राजानें स्वकीय धनुष्य धारणा विषयीं योजावा.

निमित्तशकुनज्ञानी हयशिक्षाविशारदः ॥ हया
युर्वेदतत्त्वज्ञो भुवो भागविचक्षणः ॥ २० ॥

अर्थ- तशींच शुभाशुभ सूचक अनेक निमित्तें व शकुन यांचा ज्ञाता असून अश्वशिक्षे विषयीं निपुण, अश्वांचे वैद्य कांत निष्णात व भूमीचे भाग ज्ञानांत चतुर असा पुरुष राजानें अश्व शाले वर योजावा.

बलाबलज्ञो रथिनः स्थिरदृष्टिः प्रियंवदः ॥ शूर

रश्चकृतविद्यश्चसारथिः परिकीर्तितः ॥२१॥

अर्थ- तसेंच रथीचें बलाबल जाणणारा असून स्थिरदृष्टि, प्रियभाषण करणारा, शूर व विद्या संपादन केलेला असा पुरुष राजानें सारथ्याविषयीं योजावा.

अनाहार्यः शुचिर्दक्षश्चिकित्सितविदांवरः ॥ सूपशास्त्रविशेषज्ञः सूदाध्यक्षः प्रशस्यते ॥२२॥

अर्थ- सर्वथा फितुर न होणारा, पवित्र, चतुर, वैद्यशास्त्रज्ञलोकांत श्रेष्ठ असून पाकशास्त्रांतील सर्व विशेष जाणणारा असा पुरुष राजानें पाककर्त्यावर अध्यक्ष नेमावा.

सूदशास्त्रविधानज्ञाः पराभेद्याः कुलोद्गताः ॥ सर्वेमहानसेधार्याः कृत्तकेशनखानराः ॥२३॥

अर्थ- तसेंच पाकशास्त्रांचा प्रकार जाणणारे असून शत्रूंस कदापि अनुकूल न होणारे व कुलीन असे सर्व पुरुष राजानें आपल्या पाकशालेवर योजून वरचेवर त्यांचे केश व नखेंहीं काटवावीं.

समः शत्रौचमित्रेच धर्मशास्त्रविशारदः ॥ विप्रमुख्यः कुलीनश्चधर्माधिकरणोभवेत् ॥२४॥

अर्थ- आणि शत्रु व मित्र यांविषयीं समदृष्टि असून धर्मशास्त्रांत पूर्ण असा कुलीन श्रेष्ठ ब्राम्हण राजानें धर्माधिकारावर योजावा.

कार्यास्तथाविधास्तत्र द्विजमुख्याः सभासदः ॥ सर्वदेशाक्षराभिज्ञः सर्वशास्त्रविशारदः ॥२५॥ लेखकः कथितोराज्ञः सर्वाधिकरणेषुवै ॥ शीर्षोपेतान्सुसंपूर्णान्समश्रेणिगतान्समान् ॥२६॥ अंतरान्वैलिखेद्यस्तु लेखकः सवरः स्मृतः ॥ उपायवाक्यकुशलः सर्वशास्त्रविशारदः ॥२७॥ बह्वर्थवक्ताचाल्पेन लेखकः स्यान्नृपोत्तम ॥

अर्थ- हे श्रेष्ठ राजा तसेंच धर्मशास्त्रज्ञ असून सर्वत्र समदृष्टि व कुलीन असे श्रेष्ठ ब्राम्हण राजानें त्या धर्माध्यक्षाचे सभासद करावे आणि सर्व

देशांतील लिपि जाणणारा असून संपूर्ण शास्त्रांत निष्णात असा पुरुषराजानें आपल्या हाताखालीं सर्व अधिकारांविषयीं योजावा, तो शरीराच्या उत्तम भागानें युक्त, उत्कृष्ट पूर्ण आकृतीनें संपन्न, समांतर ओळींत असून एकसारखीं व परस्पर समान अंतरानें सुशोभित अशीं अक्षरें लिहिणारा लेखक सर्व लिहिणारांत श्रेष्ठ जाणावा; त्याचप्रमाणे तो साम, दान, दंड व भेद या राज्यांग चार उपाय संबंधि वाक्यांत कुशल असून सर्व शास्त्रांत अभिज्ञ व मित भाषणांत बहुत अर्थाचा संग्रह करणारा असा लेखक श्रेष्ठ समजावा.

पुरुषांतरतत्वज्ञाः प्रांशवश्चाप्यलोलुपाः ॥ २८
॥ धर्माधिकारिणः कार्याः जनादान करानराः ॥
एवंविधास्तथाकार्याराज्ञादौवारिकाजनाः ॥ २९ ॥

अर्थ- तसेंच अन्य पुरुषांचें हृद्गत जाणणारे तेजस्वी, लोभरहित व अनेक रीतीनें सर्व लोकांस सन्मार्गावर आणणारे असे सज्जन, राजानें धर्माधिकारी करावे. तसेंच राजानें द्वारपाल ही धर्माधिकाऱ्याचे गुणांनीं युक्त असतील तेच योजावे.

लोहवस्त्राजिनादीनांरत्नानांचविधानवित् ॥ वि
ज्ञाता फल्गुसाराणामनाहार्यः शुचिः सदा ॥ ३० ॥
निपुणश्चाप्रमत्तश्च धनाध्यक्षः प्रकीर्तितः ॥

अर्थ- आणि सुवर्णादिक धातु, वस्त्रें, व्याघ्राजिनादिक पदार्थ व रत्नें यांचा परीक्षक सारासार वस्तूंचा ज्ञाता, फितुर न होणारा, निरंतर पवित्र, सर्वत्र निपुण व सर्वदा सावध असा पुरुष, राजानें भांडारगृहावर अध्यक्ष योजावा.

आयद्वारेषुसर्वेषुधनाध्यक्षसमानराः ॥ ३१ ॥ व्यय
द्वारेषुचतथाकर्तव्याः पृथिवीक्षिता ॥ ३२ ॥

अर्थ- तसेंच राजानें आपल्या द्रव्य प्राप्तीचे सर्व स्थानीं व व्यय होण्याचे स्थलीं त्या धनाध्यक्षासारखे च पुरुष नेमावे.

परंपरागतोयः स्यादष्टांगेसुचिकित्सिते ॥ ३३ ॥
अनाहार्यः सवैद्यःस्याद्धर्मात्माचकुलोद्भवः ॥ प्रा.

णाचार्यःसविज्ञेयोवरुणात्तस्यभूभुजा ॥ ३३ ॥

अर्थ- तसाच जो वंश परंपरागत असून दर्शनादिक आठ* प्रकारच्या उत्तम परीक्षे विषयीं निष्णात असून फितुर न होणारा, धर्मात्मा व कुलीन असा जो वैद्य असेल; त्यासच राजानें अंगी कारावें; असा राज मान्य जो वैद्य तोच माणसंरक्षणा विषयीं समर्थ आहे असें लोकानीं जाणावें.

राजन्राज्ञासदाकार्यंयथाकार्यंपृथक्जनैः ॥ ह-
स्तिशिक्षाविधानज्ञोवनजातिविशारदः ॥ ३४ ॥
क्लेशक्षमस्तथाराज्ञोगजाध्यक्षःप्रशस्यते ॥

अर्थ- हे राजा, याप्रमाणें निरनिराळे लोकां कडून राजानें पृथक् पृथक् कार्यें सर्वदा करून घ्यावीं; आणि गजास शिक्षा करण्या विषयीं ज्ञान संपन्न असून वनांतील पशु जातींच्या परीक्षे विषयीं निपुण व क्लेश सहना विषयीं समर्थ असा पुरुष गज शाले वर राजानें अध्यक्ष योजावा.

एतैरेवगुणैर्युक्तःस्थासनश्चविशेषतः ॥ ३५ ॥ ग
जारोहीनरेंद्रस्यसर्वकर्मसुशस्यते ॥

अर्थ- त्या गजाध्यक्षाचे गुणानीं युक्त असून अत्युत्तम आसनाच्या स्थितीनें बसणारा असा राजाचे हत्ती वर आरोहण करणारा महात हस्तिशालेंतील सर्व कर्मांत योग्य आहे.

हयशिक्षाविधानज्ञश्चिकित्सितविशारदः ॥ ३६
॥ अश्वाध्यक्षोमहीभर्तुःस्थासनश्चप्रशस्यते ॥

अर्थ- तसाच अश्वांस शिक्षा करण्याचा ज्ञाता असून त्यांच्या रोगादि चिकित्से विषयीं कुशल व अचल स्थितीनें अश्वावर बसणारा असा पुरुष-राजानें अश्वशाले वर अध्यक्ष योजावा.

अनाहार्यश्चशूरश्चतथाप्राज्ञःकुलोद्भवः ॥ ३७
॥ दुर्गाध्यक्षःस्मृतोराज्ञ उद्युक्तःसर्वकर्मसु ॥

अर्थ- त्याचप्रमाणें फितुर न होणारा, शूर, अति बुद्धिमान्, कुलीन व सर्व कर्मां विषयीं उद्युक्त असा पुरुष, राजानें आपले किल्याचे रक्षणा विष-

टीप * नाडी १ जिव्हा २ मल ३ मूत्र ४ मुख ५ अंगस्पर्श ६ स्वर ७ नेत्र ८ अशीं आठ प्रकारची परीक्षा जाणावी.

यीं अध्यक्ष योजावा.

वास्तुविद्याविधानज्ञोलघुहस्तोजितश्रमः ॥३८॥
दीर्घदर्शीचशूरश्चस्थपतिःपरिकीर्तितः ॥

अर्थ- तसाच ग्रहरचने विषयीं ज्याशास्त्रांतील प्रकार जाणणारा असून हस्तलाघवानें फक्त श्रमरहित, दीर्घदर्शी व शूर असा पुरुष राजानें उत्तम बागेच्या रचने वर व मालदारीचे कार्यावर योजावा.

यंत्रमुक्तेपाणिमुक्तेविमुक्तेमुक्तधारिते ॥३९॥ अस्त्राचार्योनिरुद्वेगःकुशलश्चविशिष्यते ॥

अर्थ- आणि यंत्रानें सोडणें, हस्तानें सोडणें, अस्त्रानें मंत्रानीं सोडणें, व सोडलेल्या अस्त्रांचा उपसंहार करणें (परत येणें) याविषयीं समर्थ असून सर्वास्त्रज्ञाता, स्वस्थचित्त व कुशल असा पुरुष धनुर्विद्येच्या शिक्षे विषयीं गुरु योजावा.

वृध्दःकुलोद्भतःसूक्तःपितृपैतामहःशुचिः ॥४०॥-
राज्ञामंतःपुराध्यक्षोविनीतश्चतयेष्यते ॥

अर्थ- तसाच वृध्द,कुलीन,सुफक्त भाषण करणारा, पितृ,पितामह परंपरेनें आलेला शुचि व नम्र असा पुरुष राजानें आपले अंतःपुरांतील कार्या विषयीं अध्यक्ष योजावा.

एवंसप्ताधिकारेषुपुरुषाःसप्ततेपुरे ॥४१॥ परी
क्ष्यचाधिकार्यास्यूराज्ञासर्वेषुकर्मसु ॥

अर्थ- याप्रमाणें राजानें स्वकीय राजधानींत सात अधिकारांवर सात पुरुषांची योजना करावी; तसेंच त्यानें स्वतः सर्व अधिकाऱ्यांची परीक्षा करून त्यांचीसर्व कार्यां विषयीं योजना करावी.

स्थापनाजातितत्वज्ञःसततंप्रतिजाग्रता ॥४२॥ रा
ज्ञःस्यादायुधागारेदक्षःकर्मसुचोद्यतः ॥

अर्थ- सर्व वस्तुमात्र स्थापन करण्याचें तत्वजाणणारा असून निरंतर सावध

टीप:- गजाध्यक्ष १ राजमहात २ अश्वाध्यक्ष ३ किल्लेदार ४ मालदार ५ धनुर्विद्याशिक्षक ६ राजाचें अंतःपुरांतील कार्यांचा अध्यक्ष ७ हे सात अधिकारि समजावे.

चित्त व सर्व कार्याविषयीं उत्कृष्ट असा पुरुष राजानें शस्त्रालयावर योजावा.

कर्माण्यपरिमेयानिराज्ञोनृपकुलोद्वह॥ ४३॥ उत्त
माधममध्यानिबुध्वाकर्माणिपार्थिवः॥ उत्तमाधम-
मध्येषु पुरुषेषुनियोजयेत्॥ ४४॥

अर्थ- हे राजकुलोत्कर्षकारक मनुराजा अशीं राजाचीं अपरिमितकर्में आहेत; तीं उत्तम, मध्यम व कनिष्ठ कार्यें जाणून तीं राजानें उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा अधिकारि पुरुषांचे ठिकाणीं त्यांचे योग्यतानुरूप योजावीं.

नरकर्मविपर्यासाद्राजानाशमवाप्नुयात्॥ नियोगं-
पौरुषंभक्तिंश्रुतंशौर्यंकुलंनयं॥ ४५॥ ज्ञात्वावृत्तिर्वि
धातव्यापुरुषाणांमहीक्षिता॥

अर्थ- कारण अधिकारि पुरुषांच्या कर्मविपर्यासानें राजा नाश पावतो; यास्तव निश्चय, पराक्रम, भक्ति, शास्त्रादिश्रवण, शौर्य, कुल व नीति हे पुरुषांचे गुण जाणून राजानें त्यांस वृत्ती विषयीं आश्रय द्यावा.

पुरुषांतरविज्ञानतत्वसारनिबंधनात्॥ ४६॥ बहुभि
र्मंत्रयेत्कामंराजामंत्रंपृथक्पृथक्॥

अर्थ- तसेंच इतर पुरुषांचे विशेष ज्ञानावरून यथार्थ तात्पर्याचे निश्चयार्थ राजानें बहुत पुरुषांशीं निरनिराळे रीतीनें यथेच्छ मसलत करावी.

मंत्रिणामपिनोकुर्यान्मंत्रीमंत्रप्रकाशनं॥ ४७॥
कचिन्नकस्यविश्वासोभवतीहसदानृणां॥ निश्च
यस्तुसदामंत्रेकार्यएकेनसूरिणा॥ ४८॥

अर्थ- आणि राजानें, मंत्रिलोकांची मसलत त्या मंत्रिमंडळांत ही परस्परांस कळवूं नये; कारण मनुष्यांत कोणाचाही सर्वदा विश्वास, या मसलती विषयीं कचित् स्थलींही उपयुक्त नाहीं; तस्मात् ज्ञानसंपन्न एकाकी राजानें स्वतः च सर्व मसलती विषयीं निश्चय करावा.

भवेद्वानिश्चयावाप्तिःपरबुध्द्युपजीवनात्॥ एक-
स्यैवमहीभर्तुर्भूयःकार्योविनिश्चयः॥ ४९॥

अर्थ- परंतु तो मसलतीचा निश्चय तरी इतरांच्या बुध्दींचे आश्रयानेंच होतो; यास्तव त्या सर्व प्रधानादिकांचें पृथक् मत घेऊन त्याचा राजानें स्व-

तः व पुनः विचार करून दृढनिश्चय करावा.

ब्राम्हणान्पर्युपासीत त्रयीशास्त्रसुनिश्चितान्॥-
नासच्छास्त्रवतो मूढांस्ते हि लोकस्य कंटकाः॥ ५०॥

अर्थ- एतदर्थ राजानें, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, धर्मशास्त्र व दंडनीतिरूप अर्थशास्त्र इत्यादिक उत्तम शास्त्रांत उत्कृष्ट निर्णयकर्ते ज्ञानसंपन्न ब्राम्हणांचा संग्रह करावा; परंतु अधम शास्त्राभिज्ञ मूढांचा संग्रह करूं नये; कारण ते लोक, प्रजांस कांट्यासमान दुःख देणारे असतात.

वृध्दान्हि नित्यं सेवेत विप्रान्वेदविदः शुचीन्॥ तेभ्यः
शिक्षेत विनयं विनीतात्मा च नित्यशः॥ ५१॥

अर्थ- तसेंच राजानें, वेदज्ञानसंपन्न व पवित्र असून ज्ञानवृध्द वयोवृध्द तपोवृध्द व विद्यावृध्द अशा ब्राम्हणांची नित्य सेवा करून त्यापासून नम्रतेनें लीनता किंवा उत्तम नीतिमार्ग यांची निरंतर शिक्षा ग्रहण करावी.

समग्रां वशगां कुर्यात्पृथिवीं नात्र संशयः॥ बहवो वि
नयाद्भ्रष्टा राजानः सपरिच्छदाः॥ ५२॥

अर्थ- कारण अनीति व उन्माद यानीं बहुत राजे ऐश्वर्यसंपन्न असून ही ते भ्रष्ट झाले; तस्मात् राजानें नीतिमार्गाचा आश्रय करूनच समग्र पृथ्वी आपले स्वाधीन करावी; यांत संशय नाही.

वनस्थाश्चैव राज्यानि विनयात्प्रतिपेदिरे॥ त्रैविद्येभ्य
स्त्रयीं विद्यां दंडनीतिं च शाश्वतीं॥ ५३॥ आन्वीक्षि-
कीं त्वात्मविद्यां वार्तारंभांश्च लोकतः॥ इंद्रियाणां
जये योगं समातिष्ठेद्दिवानिशं॥ ५४॥

अर्थ- कारण पूर्वी राज्यावरून पदच्युत होऊन अरण्यवासी झालेले कित्येक राजे नीतिमार्गाचे आश्रयानें पुनः स्वकीय राज्य पावले; यास्तव ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या विद्यात्रयसंपन्न ब्राम्हणांपासून तीतीन प्रकारची विद्या, पुरातन शास्त्रोक्त दंडनीति, सदसद्विचार निर्णयकारक वेदांत विद्या, लोकांपासून व्यापारांस आरंभ करणें, व मन आदि करून इंद्रियें स्वाधीन करणें यांविषयीं राजानीं अहोरात्र प्रयत्न करावा.

जितेंद्रियो हि शक्नोति वशे स्थापयितुं प्रजाः॥ प्रजे-

तराजा बहुभिः क्रतुभिश्च सदक्षिणैः॥ ५५॥

अर्थ- कारण जो राजा जितेंद्रिय असतो; तोच स्वकीय प्रजेस स्वाधीन ठेवण्याविषयीं समर्थ होतो, आणि राजानें स्वराज्य वृध्यर्थ, दक्षिणायुक्त बहुत यज्ञानीं परमेश्वराचें आराधन करावें.

धर्मार्थं चैव विप्रेभ्यो दद्याद्भोगान्धनानि च॥ सांवत्सरिकमाप्तैश्च राष्ट्रादाहारयेद्बलिं॥ ५६॥

अर्थ- त्याचप्रमाणें राजानें धर्मार्थ ब्राम्हणांस अनेक भोगसाधन पदार्थ व धन द्यावें; आणि त्यानें प्रधानादिकां कडून सर्व राष्ट्रांतून आपला करभार ग्रहण करवावा.

स्यात्स्वाध्यायपरो लोके वर्तेत पितृबंधुवत्॥ आवृत्तानां गुरुकुलात् द्विजानां पूजको भवेत्॥ ५७॥

अर्थ- तसेंच राजानें आपले अधिकारानुसार ब्रम्हयज्ञादिक अध्ययन स्वतः करून स्वराज्यांतील ब्राम्हणादिक वर्णांकडून ही करवावें; आणि त्यानें प्रजेविषयीं पिता किंवा बंधु यांसारखें प्रीतीनें वर्तावें; व राजानें गुरुगृहांतून अध्ययन समाप्त करून आलेल्या ब्राम्हणांची पूजा करावी.

नृपाणामक्षयो ह्येष विधिर्ब्राह्मोभिधीयते॥- तत्स्तेना न वामित्रा हरंति न विनश्यति॥ ५८॥

अर्थ- असा हा सर्व विधि वेदोक्त असल्यामुळें राजांस परलोकीं अक्षयफल दायक असून यालोकीं ही चोर शत्रु हे त्याचें राज्य हरण करूं शकत नाहीत, यामुळें तो राजा नाश पावत नाहीं.

तस्माद्राज्ञा निधातव्यो ब्राम्हो वै ह्यक्षयो विधिः॥ समोत्तमाधमै राजा ह्याहूय पालयेत्प्रजाः॥ ५९॥

अर्थ- यास्तव राजानें हा वेदोक्त विधि निरंतर स्वीकारून मध्यम, उत्तम व कनिष्ठ अशा अधिकारिजनांसहित राजानें सर्व प्रजांस बोलावून त्यांचें रक्षण करावें.

न निवर्तेत संग्रामात्क्षात्रं व्रतमनुस्मरन्॥ संग्रामेष्वनिवर्तित्वं प्रजानां परिपालनं॥ ६०॥ शुश्रूषा ब्राम्हणानां च राज्ञां निःश्रेयसं परं॥ कृपणानाथ-

स्थानांविधवानांचपालनं ॥ ६१ ॥ योगक्षेमंचवृ-
त्तिंचतथैवपरिकल्पयेत् ॥ वर्णाश्रमव्यवस्थानं
तथाकार्यंविशेषतः ॥ ६२ ॥

अर्थ- तसेंच राजानें संग्रामांतून पराङ्मुख न होणें हें आपलें क्षत्रियाचें स्वकीय मुख्य धर्मसंबंधि नित्यव्रत स्मरून युध्धांतून मागें फिरूं नये;- आणि प्रजांचें संरक्षण करणें, ब्राम्हणांची सेवा करणें, दरिद्री, अनाथ, वयोवृद्ध, तपोवृध्ध, विद्यावृद्ध, ज्ञानवृद्ध, व विधवा यांचें पालन योग्यतानुरूप त्यांचा योगक्षेम, व उपजीविका, आणि ब्राम्हणादिक वर्ण व ब्रम्हचर्यादिक आश्रम यांची विशेषे करून व्यवस्था हीं सर्व कार्यें राजानें अवश्य करावीं.

स्वधर्मप्रच्युतान्राजास्वधर्मेस्थापयेत्तथा ॥ आश्र
मेषुतथाकार्यमन्नंतैलंचभाजनं ॥ ६३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें राजानें, स्वधर्मापासून भ्रष्टझालेल्या लोकांस पुनः- स्वधर्मांत दंडादिक अनेक रीतीनें स्थापन करावें; तसेंच ऋषींचे आश्रमांत अन्न, तैल व पात्रें यांची व्यवस्था ठेवावी.

स्वयमेवानयेद्राजासत्कृतान्नावमानयेत् ॥ ताप
सेसर्वकार्याणिराज्यमात्मानमेवच ॥ ६४ ॥ निवेद
येत्प्रयत्नेनदेववच्चैनमर्चयेत् ॥ द्वेप्रज्ञेवेदितव्ये
चऋज्वीवक्राचमानवैः ॥ ६५ ॥

अर्थ- तसेंच राजानें स्वतः सर्व लोकमान्य ऋषींस आणावें; त्यांचा अवमान करूं नये; आणि त्यानें स्वदेह, राज्य व त्यासंबंधि प्रजा रक्षणादिक सर्व कार्यें हीं त्या तपस्विजनांस निवेदन करून त्यांची निरंतर प्रयत्नानें- पूजा करावी; तशीच राजा व प्रजा या सर्व लोकांनी सरळ व वक्र या दोन प्रकारची बुध्दि जाणावी.

वक्रांज्ञात्वानसेवेतप्रतिबाधेतचागतां ॥ नास्यच्छि
द्रंपरोविंद्याद्विंद्याच्छिद्रंपरस्यतु ॥ ६६ ॥

टीप ॥ योग (अप्राप्त वस्तु देणें) १ क्षेम (प्राप्त वस्तूचें संरक्षण करणें.) २

अर्थ- कारण सर्व राजादिकानीं वक्र बुद्धि जाणून तिचा अंगीकार करूं नये; आणि ती मनांत आली असतां तिचा त्याग करावा; तसेंच राजानें आपलें छिद्र इतरांस न समजूं देतां दुसऱ्याचें मात्र छिद्र जाणावें.

गूहेत्कूर्म इवांगानि रक्षेद्विवरमात्मनः॥ नविश्वसेदविश्वस्ते विश्वस्ते नातिविश्वसेत्॥ ६७॥

अर्थ- आणि राजानें स्वकीय सर्व राज्यांगें कांसवासारखीं गुप्त करून आपलें छिद्र रक्षावें; त्याचप्रमाणें त्यानें अविश्वास योग्य पुरुषावर विश्वास ठेऊं नये, व विश्वासस्थान पुरुषावर अति विश्वास करूं नये.

विश्वासाद्भयमुत्पन्नं मूलादपि निकृंतति॥ विश्वासयेच्चाप्यपरं तत्वभूतेन हेतुना॥ ६८॥

अर्थ- कारण विश्वासापासून उत्पन्न झालेलें भय समूल नाश करतें; यास्तव अनुभूत यथार्थ कारणानें इतरांवर विश्वास ठेवावा.

बकवच्चिंतयेदर्थान् सिंहवच्च पराक्रमे॥ वृकवच्चापि लुंपेत शशवच्च विनिक्षिपेत्॥ ६९॥

अर्थ- तसेंच राजानें स्वकार्याचें बकासारखें चिंतन करीत असून पराक्रमाविषयीं सिंहासारखें असून लांडग्याप्रमाणें शत्रुधनादिकांचे अपहाराविषयीं तत्पर असावें; व ससासमान स्वार्थसाधक वस्तूंचा गुप्त रीतीनें संग्रह करावा.

दृढप्रहारी च भवेत्तथा सूकरवन्नृपः॥ चित्राकारश्च शिखिवद्दृढभक्तस्तथाश्ववत्॥ ७०॥

अर्थ- त्याचप्रमाणें राजानें रानडुकरासारखा तीक्ष्ण प्रहार शत्रूंस करावा; आणि त्यानें आपला आकार बाह्याकारें मयूरासारखा चित्रविचित्र रमणीय असा सर्वांस दर्शवीत असून प्रजापालनाविषयीं कुत्र्यासारखें दृढ विश्वासानें वर्तावें.

तथा च मधुराभाषी भवेत्कोकिलवन्नृपः॥ काकशंकी भवेन्नित्यमज्ञातवसतिं वसेत्॥ ७१॥

अर्थ- तसेंच राजानें सर्वांशीं कोकिल पक्ष्यासमान मधुर भाषण करावें व त्यानें काक पक्ष्या समान निरंतर शंकित असून नित्यशः आपली-

स्थिति कोणास ही नसमजे अशा रीतीनें सर्वत्र वास करावा.

नापरीक्षितपूर्वंच भोजनं शयनं भजेत्॥ वस्त्रंपु-
ष्पमलंकारं यच्चान्यन्मनुजोत्तम॥ ७२॥

अर्थ- हे मानवश्रेष्ठा, आणि राजानें स्वतः परीक्षा केल्या वांचून भोजन व शयन यांविषयीं प्रवृत्त होऊं नये; तशींच वस्त्रें, पुष्पें, अलंकार व इतर कोणताही पदार्थ यांचा स्वीकार त्यानें परीक्षापूर्वकच करावा.

नगाहेज्जनसंबाधं नचाज्ञातजलाशयं॥ अपरीक्षि
तपूर्वंच पुरुषैराप्तकारिभिः॥ ७३॥

अर्थ- तसेंच राजानें स्वकीय आप्त पुरुषांकडून परीक्षा केल्या वांचून जनसमुदाय व सरोवरादिक जलाशय यांत प्रवेश करूं नये.

नारोहेत्कुंजरं व्यालं नादांतं तुरगं तथा॥ नाविज्ञातां-
स्त्रियं गच्छेन्नैव देवोत्सवे वसेत्॥ ७४॥

अर्थ- त्याच प्रमाणें राजानें सर्पासमान क्रूर गज व अशिक्षित अश्व यांजवर आरोहण करूं नये; तशाच अज्ञात स्त्रीशीं गमन करूं नये; व देवांचे उत्सवांत वास न करावा.

नरेंद्रलक्ष्म्या धर्मज्ञ त्रातायत्तो भवेन्नृपः॥ सद्भृत्याश्च
तथा पुष्टाः सततं प्रतिमानिताः॥ ७५॥ राज्ञा सहा
याः कर्तव्याः पृथिवीं जेतुमिच्छता॥ यथार्हं चाप्य
संभृतो राजा कर्मसु योजयेत्॥ ७६॥

अर्थ- आणि हे धर्मज्ञ मनुराजा, राजानें स्वकीय राज्यलक्ष्मीचे संरक्षणार्थ स्वतंत्र असावें; तसेंच पृथ्वी स्वाधीन होण्याची इच्छा करणाऱ्या राजानें आपलें साहाय्य करणारे बलादि संपन्न उत्तम सेवक निरंतर द्रव्यादि दान मानानीं संतुष्ट करावे; असे राजानें अनेक लोक त्यांच्या योग्यतानुरूप सर्व अधिकारां वर योजावे.

धर्मिष्ठान्धर्मकार्येषु शूरान्संग्रामकर्मसु॥ निपु
णानर्थकृत्येषु सर्वत्रैव तथा शुचीन्॥ ७७॥

अर्थ- ते असे कीं, धार्मिक लोकांची धर्मकार्यां वर, शूर लोकांची संग्रामावर, चतुर लोकांची द्रव्यसंपादनावर व इत्यादिक सर्व अधिकारां वर प-

भिन्न लोकांची अशी राजानें सर्वत्र यथायोग्य योजना करावी.

स्त्रीषु षंढं नियुंजीत तीक्ष्णं दारुणकर्मसु ॥ धर्मे चार्थे च कामे च नये च रविनंदन ॥ ७८ ॥ राजा यथार्हं कुर्याच्च उपधाभिः परीक्षणं ॥

अर्थ- हे सूर्यनंदना आणि स्त्रियांविषयीं नपुंसक, उग्रकर्मावर तीक्ष्ण प्रकृति मनुष्य आणि धर्म, अर्थ, काम, वनीति यां अधिकारांवर योजण्यां विषयीं योग्य जे प्रधानादिक यां सर्वांची योजना राजानें धर्म, अर्थ, काम व भय यांरीतीनीं परीक्षा करून करावी.

समतीतोपदान्भृत्यान्कुर्याद्धस्तवनेचरान् ॥ ७९ ॥ तत्पादान्वेषणे युक्तांस्तदध्यक्षांस्तु कारयेत् ॥ एवमादीनि कर्माणि नृपैः कार्याणि पार्थिव ॥ ८० ॥

अर्थ- हे राजा, तसेच राजानें, लांचनघेणारे असून बलादिकानीं संपन्न असे वनांत संचार करणारे लोकही सेवेस ठेऊन त्यांच्या चालीचे शोधाविषयीं प्रयत्न करणारे असे त्या सेवकांवर अध्यक्ष योजावे. अशीं राजांस बहुत कार्यें उक्त आहेत.

सर्वथा नेष्यते राज्ञस्तीक्ष्णोपकरणक्रमः ॥ कर्माणि पापसाध्यानि यानि राज्ञो नराधिप ॥ ८१ ॥ संतस्तानि न कुर्वंति तस्मात्तानि त्यजेन्नृपः ॥

अर्थ- आणि तीक्ष्ण साधनांचा उपक्रम राजास सर्वथा उपयुक्त नाही; कारण हे मानवाधिपते, पुण्यश्लोक राजे पापसाध्य राजकर्में करीत नाहींत; यास्तव राजानें दुष्कर्मांचा त्याग करावा.

नेष्यते पृथिवीशानां तीक्ष्णोपकरणक्रिया ॥ ८२ ॥ यस्मिन्कर्मणि यस्य स्याद्विशेषेण च कौशलं ॥ तस्मिन्कर्मणि तं राजा परीक्ष्य विनिवेशयेत् ॥ ८३ ॥ पितृपैतामहान्भृत्यान्सर्वकर्मसु योजयेत् ॥

अर्थ- तस्मात् पृथ्वीपालक राजांस तीक्ष्ण साधनाचीं कर्में उपयोगी नाहींत; आणि ज्या कर्मांत ज्या पुरुषाचें अतिचातुर्य असेल; त्याची राजानें परीक्षा करून त्यास त्या कार्यावरच योजावें; वजे सेवक, आपल्या पितृपितामहपरं-

परेनें चालत आले असतील; त्यांस राजानें सर्व अधिकारांविषयीं योजावें.

विनादायादकृत्येषुपरीक्षांस्वकृतांतरान्॥ ८४॥ नि
युंजीतमहाभागतस्यतेहितकारिणः॥

अर्थ- हे महाभाग्य शालिन् मनुराजा, ज्यान्यायाधीशादिक अधिकारी लोकांचें अंतःकरण राजावर आहे; त्यांस राजानें परीक्षे वांचून ही दायविभागाचे अधिकारावर योजावें; कारण ते त्याराजाचें हित कर्ते असतात.

परराजगृहात्प्राप्तान्जनसंग्रहकाम्यया॥ ८५॥
दुष्टान्वाप्यथवादुष्टान्आश्रयीतप्रयत्नतः॥

अर्थ- त्याच प्रमाणें परराज्यांतून आपले राज्यांत आलेले दुष्टचित्त किंवा शुद्ध भाव युक्त अशा पुरुषांस राजानें लोकसंग्रहाच्या इच्छेनें प्रयत्नेंकरून अवश्य आश्रय द्यावा.

दुष्टंविज्ञायविश्वासंनकुर्यात्तत्रभूमिपः॥ ८६॥ वृत्तिं
तस्यापिवर्तेतजनसंग्रहकाम्यया॥

अर्थ- आणि राजानें त्यांतील दुष्ट पुरुषाची वृत्ति जाणून त्यावर विश्वास ठेऊंनये; परंतु लोक संग्रहाच्या इच्छेनें त्यास उपजीविका मात्र द्यावी.

राजादेशांतरप्राप्तंपुरुषंपूजयेत्भृशं॥ ८७॥ माम
यदेशात्संप्राप्तोबहुमानेनचिंतयेत्॥

अर्थ- तसेंच राजानें देशांतरांतून आलेल्या पुरुषाचा बहुमान करावा; कारण हा स्वदेशांतून मजकडे आला आहे; यास्तव मी यास आश्रय दिला-असतां; हा माझें बहु आदरानें स्मरण करील.

कामंभृत्यार्जनंराजानैवकुर्यान्नराधिप॥ ८८॥ नच
वासंविभक्तांस्तान्भृत्यान्कुर्यात्कथंचन॥

अर्थ- हे मनुष्याधिपते, राजानें परीक्षे वांचून बहुत सेवकांचें यथेच्छ संपादनच करूंनये; आणि वेतनादिक दिल्या वांचून राजानें कदापि सेवकास ठेऊंनये.

शत्रवोग्निर्विषंसर्पोनिस्त्रिंशइतिचिंतयेत्॥ ८९॥
भृत्यामनुजशार्दूलरुषितात्र्चतथैकतः॥ तेषांचारेण
चारित्रंराजाविज्ञायनित्यशः॥ ९०॥ गुणिनांपूजनं

कुर्यात्तनिर्गुणानांचशासनं॥ कथिताःसततंराजन्
राजान श्वारचक्षुषः॥ ९१॥

अर्थ- कारण जसे शत्रु, अग्नि, विष, सर्प व खड्ग हे भयंकर आहेत; तसेच- हे मनुष्यश्रेष्ठा, सेवक वेतनादिक न मिळून रुष्ट झाले असतां, तेही एकप्रकारें राजास भीति उत्पन्न करतात; यास्तव राजानें आपल्या चारां (बातमीदार) कडून नित्यशः त्या सर्व सेवकांचे कृत्याचा शोध करून त्यांतील गुणि सेवकांचा सन्मान करीत असून गुणहीन दुष्ट सेवकांस शासन करावें; तस्मात् हे राजन् सर्व राजे, निरंतर चारांचे द्वारानेंच संपूर्ण राजकीय वृत्त जाणतात.

स्वकेदेशेपरेदेशेज्ञानशीलान्विचक्षणान्॥ अनाहा-
र्यान्क्लेशसहान्नियुंजीततथाचरान्॥ ९२॥

अर्थ- यास्तव राजानें स्वदेशांत व परराष्ट्रांत स्वभावसिद्ध ज्ञानसंपन्न- चतुर, फितुर, न होणारे, अनेक प्रकारचे क्लेश सहन करणारे असे दूत गुप्त रूपें वर्तमान शोधाविषयीं योजावे.

जनस्याविदितान्सौम्यान्तथाज्ञातान्परस्परं॥ व
णिजोमंत्रकुशलान्सांवत्सरचिकित्सकान्॥ ९३॥
तथाप्रव्राजिताकारांश्चारान्राजानियोजयेत्॥-
नैकस्यराजाश्रद्दध्यात्चारस्यापिसुभाषितं॥
॥९४॥

अर्थ- ते असे कीं, सर्व लोकांस विदित नसून स्वभावादिकानीं सौम्य व परस्परें अज्ञात असून व्यापारी, मंत्रविद्या किंवा मसलत याविषयीं निष्णात, ज्योतिषी, वैद्य व संन्यासी या अनेक वेषानीं युक्त असे ते बातमीदार, राजानें स्वकीय व परकीय राज्यांत योजावे; परंतु त्यानें एकाचेच प्रिय भाषणावर विश्वास ठेऊं नये.

द्वयोःसंबंधमाज्ञायश्रद्दध्यान्नृपतिस्तदा॥ परस्प-
रस्याविदितौयदिस्यातांचतावुभौ॥ ९५॥

अर्थ- तर त्यांतील दोन तरी दूत जर परस्परांस विदित नसून त्या उभयतांचे पृथक् भाषणांचा संबंध जाणून त्यावर राजानें विश्वास मानावा.

तस्माद्राज्ञाप्रयत्नेनगूढांश्चारान्नियोजयेत्॥ रा-

गापरागौभृत्यानांजनस्यचगुणागुणान्॥ ९६॥ सर्व-
राज्ञांचरायत्तंतेषुयत्नपरोभवेत्॥

अर्थ- तस्मात् राजानें प्रयत्नें करून गुप्तरीतीनें बातमीदार योजावे आ-
णि त्यांजकडून आपले सेवक व प्रजा यांचे गुण, दोष व त्यांची आपणावर प्री-
ति अथवा अप्रीति यांचा शोध करवावा; कारण राजांचें सर्व कार्य चारांचेच
स्वाधीन असतें; यास्तव राजानें सर्वकाल त्यां चारांविषयींच प्रयत्नानें सा-
वध असावें.

कर्मणाकेनमेलोकेजनःसर्वोनुरज्यते॥ ९७॥ विर
ज्यतेकेनतथाविज्ञेयंतन्महीक्षिता॥ विरागजनकं
लोकेवर्जनीयंविशेषतः॥ ९८॥

अर्थ- तें असें कीं, लोकांत कोणत्या कर्मानें सर्वजन मजवर प्रीति करता
त; तसेंच काय कारणानें मजवर अप्रीति करतात. हें राजानें जाणून जेणें
करून प्रजा आपल्यावर अप्रीति करतील; असें त्यानें कर्म सर्वथा वर्ज क-
रावें.

तथाचरागप्रभवाहिलक्ष्म्योराज्ञांमताभास्करवंश
चंद्र॥ तस्मात्प्रयत्नेननरेंद्रसुख्यैःकार्योनुरागोभुवि
मानवेषु॥ ९९॥

अर्थ- कारण हे सूर्यवंशाल्हादकारका, सर्व राज्यलक्ष्मी, प्रजेच्या प्रेमानें
च राजांस प्राप्त होतात; यास्तव श्रेष्ठ राजानीं पृथ्वीवरील सर्व मनुष्यांवर
प्रयत्नानें प्रीति करावी. इतिश्रीमत्स्यपुराणे राजसेनासहाय संपत्ति
र्नाम पंचदशाधिकद्विशततमोऽध्यायः॥ २१५॥ ९॥ ॥ ५॥

अध्याय २१६ वा.

मत्स्यउवाच॥ यथानुवर्तितव्यंस्यान्मनोराज्ञोनुजीवि
ना॥ तथातेकथयिष्यामिनिबोधगदतोमम॥ १॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् बोलले; हे मनु राजा, राजसेवकानें कसें वर्तावें;
तें मी तुला सांगतों; तूं तो विषय माझे मुखांतून श्रवण कर.

राजायत्तुवदेद्वाक्यंश्रोतव्यंतत्प्रयत्नतः॥ आक्षिप्यव-
चनंतस्यनवक्तव्यंतथावचः॥ २॥

अर्थ- तें असें कीं, राजा जें वाक्य बोलेल; तें प्रयत्नानें श्रवण करावें; आणि त्या राजवचनावर आक्षेपनिंदाकारक भाषण कदापि करूं नये

अनुकूलं प्रियं तस्य वक्तव्यं जनसंसदि॥ रहोगतस्य वक्तव्यमप्रियं यद्धितं भवेत्॥ ३॥

अर्थ- तसेंच जनसमुदायांत राजास प्रिय असून अनुकूल असें भाषण करावें; व जें भाषण अप्रिय असून हितकारक असेल, तें सेवकानें राजास एकांतीं करावें.

परार्थमस्य वक्तव्यं समे चेत्तसि पार्थिव॥ स्वार्थः सुहृद्भिर्वक्तव्यो न स्वयं तु कथंचन॥ ४॥

अर्थ- हे राजेंद्रा, ज्या कालीं राजाचें चित्त स्वस्थ असेल, त्या कालीं सेवकानीं परोपकारार्थ भाषण करावें; आणि त्यानीं स्वकार्य तर राजाजवळ त्याचे मित्रां कडून सूचवावें; परंतु तें स्वतः कदापि बोलूं नये.

कार्यातिपातः सर्वेषु रक्षितव्यः प्रयत्नतः॥ न च हिंस्यं धनं किंचिन्नियुक्तेन च कर्मणि॥ ५॥

अर्थ- आणि सेवकानीं सर्वत्र राजकार्य, प्रयत्नानें नाशादिकां पासून रक्षण करावें; तसेंच अधिकारावर योजलेल्या सेवकानें राजधनाचा किंचित्ही नाश होईल असें न करावें.

नोपेक्ष्यस्तस्य मानश्च तथा राज्ञः प्रियो भवेत्॥ राज्ञश्च न तथा कार्यं वेषभाषितचेष्टितं॥ ६॥

अर्थ- तसेंच सेवकानें राजसन्मान करण्याविषयीं औदासिन्य करूं नयें; कारण तसें न केलें तरच तो सेवक, राजास प्रिय होतो; आणि सेवकानें राजासमान वेष, भाषण व कांहीं एक कृत्य करूं नये.

राजलीला न कर्तव्या तद्विद्विष्टं च वर्जयेत्॥ राज्ञः समोऽधिको वा न कार्यो वेषो विजानता॥ ७॥

अर्थ- त्याचप्रमाणें सेवकानें राजासारखी क्रीडा करूं नये; त्यास जें अप्रिय तेंही वर्जावें; तसाच चतुर सेवकानें वेष, राजासारखा किंवा अधिक असा करूं नये.

द्यूतादिषु तथैवान्यत्कौशलं तु प्रदर्शयेत्॥ प्रदर्श्य-

कौशलंचास्यराजानंतुविशेषयेत्॥८॥

अर्थ- तसेंच सेवकानें द्यूतादि कर्मांत आपलें कौशल्य मात्र दर्शवावें; आणि असें चातुर्य दाखवून त्यानें सर्वकर्मांत राजाच जेणें करून अधिक होईल तसें करावें.

अंतःपुरजनाध्यक्षैर्वैरिदूतैर्निराकृतैः॥संसर्गेन-व्रजेद्राजन्विनापार्थिवशासनात्॥९॥

अर्थ- हे राजन् अंतःपुरांतील अधिकारी, शत्रूंचे दूत व अधिकारावरून दूर केलेले यांशीं राजसेवकानीं राजाज्ञे वांचून स्नेहसंबंध करूं नये.

निःस्नेहतांचावमानंप्रयत्नेनतुगोपयेत्॥यच्चगुह्यं भवेद्राज्ञोनतल्लोकेप्रकाशयेत्॥१०॥

अर्थ- आणि सेवकानें अप्रीति व अवमान हे राजाविषयीं प्रयत्नानें रक्षावे; तसेंच जें राजाचें गुह्य कृत्य असेल; तें सेवकानें लोकांत प्रसिद्ध करूं नये.

नृपेणाश्रावितंयत्स्याद्वाच्यावाच्यंनृपोत्तम॥नतत्सं श्रावयेल्लोकेतथाराज्ञोप्रियोभवेत्॥११॥

अर्थ- हे राजश्रेष्ठा, राजानें जें कांहीं वाच्य किंवा अवाच्य असें सेवकास श्रवण करविलें असेल; तें त्यानें लोकांस सांगूं नये; कारण ती गोष्ट लोकांतप्रसिद्ध.केली असतां, तो सेवक,राजास अप्रिय होतो.

आज्ञाप्यमानेवान्यस्मिन्समुत्थायत्वरान्वितः॥कि महंकरवाणीतिवाच्योराजाविजानता॥१२॥

अर्थ- त्याचप्रमाणें राजानें इतरांस आज्ञा केली असतां चतुर सेवकानें त्वरित उठून राजास म्हणावें कीं, मी कोणतें स्वामि कार्य करूं॰

कार्यावस्थांचविज्ञायकार्यमेवयथाभवेत्॥स ततंक्रियमाणेस्मिन्लाघवंतुव्रजेद्ध्रुवं॥१३॥

अर्थ- परंतु कार्याचें स्वरूप जाणून तें ज्यारीतीनें होईल; तसें प्रसंगीं सेवकानें वर्तावें; कारण जर सेवक निरंतर सर्व कार्य करील; तर तो निःसंशय लघुत्व पावेल.

राज्ञःप्रियाणिवाक्यानिनचात्यर्थंपुनःपुनः॥म-

हासशीलश्च भवेन्नचापि भृकुटीमुखः॥१४॥

अर्थ- तशींच सेवकानें राजास प्रिय वचनें बोलावीं; परंतु अतिशयेंत शीं भाषणें वारंवार करूंनये; आणि त्यानें औदउनम शील धारण करावें; व राजाचे अग्रभागीं कपाळास आठ्या घालूंनये.

नातिवक्ता नभिर्वक्ता नच मात्सरिकस्तथा॥आत्म-संभावितश्चैव न भवेत्तु कथंचन॥१५॥

अर्थ- तसेंच अतिभाषण, कोणतें ही निश्चित वचन, मत्सर व स्वतः मानित्व हीं सेवकानीं राजासमीप करूंनये.

दुष्कृतानि नरेंद्रस्य न तु संकीर्तयेत्कचित्॥ वस्त्र-मस्त्रमलंकारं राज्ञा दत्तं तु धारयेत्॥१६॥

अर्थ- तशींच राजाचीं दुष्कर्में सेवकानें कोठें ही बोलूंनये. आणि राजानें दिलेलीं वस्त्रें शस्त्रें व अलंकार हीं त्यानें स्वतः धारण करावीं.

औदार्येण न तद्देयमन्यस्मै भूतिमिच्छता॥ नत्वे-वात्मासनं कार्यं दिवास्वप्नं न कारयेत्॥१७॥

अर्थ- परंतु त्या राजदत्त वस्तूंतील कांहीं एक पदार्थ, राजसेवकानीं आपले ऐश्वर्य इच्छ्यर्थ औदार्यानें इतरांस न देतां स्वतः च उपभोग करावा; आणि त्यानें दिवा निद्रा ही करूं नये.

नानिर्दिष्टे तथा द्वारे प्रविशेत्तु कथंचन॥ नच पश्ये-त्तु राजानमयोग्यासु च भूमिषु॥१८॥

अर्थ- त्याच प्रमाणें सेवकानें आज्ञे वांचून राज द्वारांत प्रवेश करूंनये; आणि त्यानें गमना योग्य स्थानीं राजास अवलोकन करूंनये.

राज्ञस्तु दक्षिणे पार्श्वे वामे चोपविशेत्तदा॥ पुर-स्ताच्च तथा पश्चादासनं तु विगर्हितं॥१९॥

अर्थ- तसेंच सेवकानें राजाचे दक्षिण अथवा वाम या भागीं बसावें; कारण राजाचे पुढें व पृष्ठ भागीं सेवकास बसणें निंद्य आहे.

जृंभां निष्ठीवनं कासं कोपं पर्यस्तिकाश्रयं॥ भृ-कुटिं वांतमुद्गारं तत्समीपे विवर्जयेत्॥२०॥

अर्थ- आणि जांभई थुंकणें, खोकणें, क्रोध, जेंगा बांधून बसणें,

भोंवया वांकड्या करणें, ओकारी देणें व ढेंकर हीं सेवकानें राजापुढें वर्ज करावीं.

स्वयंनत्वनकुर्वीतस्वगुणाख्यापनंबुधः॥ स्वगुणाख्या
पनेयत्नस्त्वपरमेवप्रयोजयेत्॥२१॥

अर्थ - तसेंच चतुर पुरुषानें स्वतः स्वकीय गुणांचें वर्णन राजाचे अग्रभागीं करूं नये; तर तेथें त्यानें आपले गुण वर्णना विषयीं यत्नानें इतरांचीच योजना करावी.

हृदयंनिर्मलंकृत्वापरांभक्तिमुपाश्रितैः॥ अनुजीवि
गणैर्भाव्यंनित्यंराज्ञामतंद्रितैः॥२२॥

अर्थ - त्याच प्रमाणें राजाचे सेवक गणांनी निरंतर आलस्य रहित होऊन आपलें अंतःकरण निर्मल करून राज कार्या विषयीं अत्यंत प्रीतियुक्त असावें.

शाठ्यंलौल्यंचपैशून्यंनास्तिक्यंक्षुद्रतातथा॥ चा
पल्यंचपरित्याज्यंनित्यंराज्ञोनुजीविभिः॥२३॥

अर्थ - आणि राज सेवकानी कपट, लोभ, दुसऱ्याचे दोषसूचविणें, नास्तिकत्व, क्षुद्र कर्म व चपलत्व, यांचा सर्वथा त्याग करावा.

श्रुतिविद्यासुशीलैश्वसंयोज्यात्मानमात्मना॥ रा
जसेवांततःकुर्याद्भूतयेभूतिवर्धनीं॥२४॥

अर्थ - तसेंच वेदविद्येच्या शिक्षेनें सुशील झालेल्या सेवकानी स्वबुधीनें एकाग्र मन करून पश्चात् ऐश्वर्य प्राप्त्यर्थ राजसेवा करावी; कारण राजसेवा आपले ऐश्वर्याची वृद्धि करणारी आहे.

नमस्कार्याःसदाचास्यपुत्रवल्लभमंत्रिणः॥ सचि
वैश्चास्यविश्वासोनतुकार्यःकथंचन॥२५॥

अर्थ - आणि सेवकानीं राजाचे पुत्र, मित्र व प्रधान यांस निरंतर नमस्कार करीत असावें; प्रधानानीं ही राजाचा कदापि विश्वास धरूं नये.

अपृष्टश्चास्यनब्रूयात्कामंब्रूयात्तथायदि॥ हितं
तथ्यंचवचनंहितैःसहसुनिश्चितं॥२६॥

अर्थ - तसेंच सेवकानें राजाचे प्रश्नावांचून त्याशीं भाषण करूं नये; आणि राजाशीं जर यथेच्छ बोलावयाचें असेल तर. तें वचन हितकारक व सत्य असून राजमित्रां सहवर्तमान संकेतांत उत्तम रीतीनें सिद्ध झालें असेल तर तें बोलावें.

चित्तंचैवास्यविज्ञेयंनित्यमेवानुजीविना॥ भर्तुरारा-

धनंकुर्यात्चित्तज्ञोमानवःसरवं॥२७॥

अर्थ- त्याचप्रमाणें सेवकानें राजाचें चित्त निरंतर अवश्य जाणावें; कारण चित्तज्ञ पुरुषास स्वामिसेवा करवानें घडते.

रागापरागौचैवास्यविज्ञेयौभूतिमिच्छता॥त्यजेद्वि रक्तोनृपतीरक्तवृत्तिंतुकारयेत्॥२८॥

अर्थ- तसेंच ऐश्वर्य इच्छिणाऱ्या सेवकानें प्रीति व उदासीनता हे राजाचे मर्मधर्मविशेषें करून जाणावे; कारण राजा उदासीन झाला असतां आपला त्याग करील; एतदर्थ राजा जेणें करून आपणाविषयीं प्रीतियुक्त होईल असें सेवकानें वर्तावें.

विरक्तःकारयेन्नाशंविपक्षाभ्युदयंतथा॥आशाव र्धनकंकृत्वाफलनाशंकरोतिच॥२९॥

अर्थ- कारण राजा, सेवकावर उदासीन झाला असतां, तो त्याचे शत्रूंचा उदय करून त्याचा नाश करील; तसेंच एकादें आशावृद्धीचें कर्म करून त्याचे फळाचाही नाश करतो.

अकोपोपिसकोपाभःप्रसन्नोपिचनिष्फलः॥वा क्यंचसमदंवक्तिवृत्तिच्छेदंकरोतिवै॥३०॥

अर्थ- आणि तो सेवकावर उदासीन झालेला राजा, अंतःकरणांत रुष्ट नसला तरी तो त्याशीं रुष्टासमान वर्ततो, प्रसन्न झाला तरी त्यापासून त्या सेवकास कांहीं एक फल होत नाहीं; त्यासेवकासी विषाद कारक वाक्य बोलतो; व तो राजा त्या सेवकाच्या वृत्तीचाही उच्छेद करतो.

प्रदेशवाक्यमुदितोनसंभावयतेन्यथा॥आराध नासुसर्वासुसुप्तवच्चविचेष्टते॥३१॥

अर्थ- तसेंच त्या सेवकानें एकांत स्थळीं कांहीं प्रियभाषण केलें तरी तो राजा, ते मान्य करीत नाहीं; आणि त्यानें केलेल्या सर्व सेवांत त्यांत तो राजा, निद्रिस्तासारखी कांहीं विपरीतच कृति करतो.

कथासुदोषंक्षिपतिवाक्यभंगंकरोतिच॥लक्ष्य तेविमुखश्चैवगुणसंकीर्तनेपिच॥३२॥

अर्थ- त्याचप्रमाणें ज्या सेवकावर तो उदासीन झालेला राजा, त्या अप्रिय

सेवकानें कांहीं गोष्टी सांगितल्या असतां, त्यांवर दोष देतो; व त्याचे भाषणांचा अनेकरीतीनें भंग करतो; आणि त्या अप्रिय सेवकाच्या गुणांचें उत्तम वर्णन केलें; तर तो राजा त्या गुणश्रवणा विषयीं विमुख असतो.

दृष्टिंक्षिपतिचान्यत्रक्रीयमाणेचकर्मणि ॥ विर
क्तलक्षणंचैतत्शृणुरक्तस्यलक्षणं ॥ ३३ ॥

अर्थ- तसाच ज्या सेवकाविषयीं राजा उदासीन झाला; तो त्या अप्रिय सेवकानें कांहीं सेवा कर्म आरंभिलें; तरी तें अवलोकन न करतां तो राजा आपली दृष्टि अन्यत्रच लावतो; हें सेवकावर उदासीन झालेल्या राजाचें लक्षण सांगितलें आतां सेवकावर प्रीतिकरणाऱ्या राजाचें लक्षण श्रवण कर.

दृष्ट्वाप्रसन्नोभवतिवाक्यंगृण्हातिचादरात् ॥ कु
शलादिपरिप्रश्नंसंप्रयच्छतिचासनं ॥ ३४ ॥

अर्थ- तें असें कीं, सेवकावर प्रीति करणारा राजा, आपले प्रिय सेवकास अवलोकन करून मनांत संतुष्ट होतो. त्याचें भाषण आदरानें ग्रहण करतो; आणि त्या सेवकास क्षेमकुशलादिक प्रश्न करून त्यास आसनही देतो.

विविक्तदर्शनेचास्यरहस्येनंनशंकते ॥ जायतेहृष्टव
दनःश्रुत्वातस्यतुतत्कथां ॥ ३५ ॥

अर्थ- तसाच तो राजा, त्या प्रिय सेवकास एकांतस्थानीं पाहिलें तरी चित्तांत शंकित होत नाहीं; आणि त्यानें कांहीं गोष्ट सांगितली तर किंवा त्याची गोष्ट इतरानीं काढिली असतां ती श्रवण करून तो राजा प्रफुल्लित मुख होतो.

अप्रियाण्यपिवाक्यानितदुक्तान्यभिनंदते ॥ उपा
यनंचगृण्हातिस्तोकमप्यादरात्तथा ॥ ३६ ॥

अर्थ- तशींच त्या प्रिय सेवकानें बोललेल्या अप्रिय वाक्यांचाही आदर करतो; तशीच त्यानें दिलेली भेट अल्पही असली तरी ती आदरानें ग्रहण करतो.

कथांतरेषुस्मरतिप्रहृष्टवदनस्तथा ॥ इतिरक्तस्य
कर्तव्यासेवारविकुलोद्वह ॥ ३७ ॥

अर्थ- तसाच तो राजा अन्य गोष्टींत त्या प्रिय सेवकाचें स्मरण करून प्रफुल्लित मुख होतो; हे सूर्यवंशोत्कर्ष कारक मनुराजा, या लक्षणावरून सेवकानें

आपणावर राजा प्रीति करीत आहे असें जाणून त्याची मनःपूर्वक सेवा करा. वी. आणि राजसेवकांस आपत्काल प्राप्त झाला असतां, त्यानें त्या राजाची सेवा पूर्वी केली असेल तो त्यावर उदासीन झाला तरी त्यानें त्या राजाचा त्याग करूं नये.

मित्रं नचापत्सु तथाच भृत्या भजंति ये निर्गुणमप्रमेयं ॥ विप्र विशेषेण च ते व्रजंति सुरेंद्रधामामरवृंदजुष्टं ॥ ३८ ॥

अर्थ- तसेंच जे पुरुष, आपले मित्रास त्यांचे आपत्कालीं सोडीत नाहीत आणि जे भक्तिमार्गानें निर्गुण असून अपरिमित माहात्म्यानें युक्त अशा सर्वव्यापक परमेश्वराची विशेषें करून सेवा करतात; ते सर्व अमर समुदाययुक्त देवराज इंद्राचे लोकास गमन करतात. इतिश्रीमत्स्यपुराणे राजधर्मेषु अनुजीविवृत्तिर्नाम षोडशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २१६ ॥

अध्याय २१७ वा.

मत्स्य उवाच ॥ राजा सहायसंयुक्तः प्रभूतयवसेंधनं ॥ रम्यमानतसामंतं मध्यमं देशमावसेत् ॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् बोलले हे मनुराजा, प्रधानादिकसाहाय्ययुक्त सार्वभौम राजानें मध्यदेशांत आपली राजधानी करून तेथें वास करावा; त्या देशांत तृण, कांष्ठे बहुल असून तो रमणीय असावा, व तो देश संपूर्ण मांडलिकराजांस ही मान्य असावा.

वैश्यशूद्रजनप्रायमनाहार्यं तथा परैः ॥ किंचिद्ब्राम्हणसंयुक्तं बहुकर्मकरं तथा ॥ २ ॥ अदेवमातृकं रम्यमनुरक्तजनान्वितं ॥ करैरपीडितं चापि बहुपुष्पफलं तथा ॥ ३ ॥ अगम्यं परचक्राणां तद्वासगृहमापदि ॥ समदुःखसुखं राज्ञः सततं प्रियमास्थितं ॥ ४ ॥ सरीसृपविहीनं च व्याघ्रतस्करवर्जितं ॥ एवंविधं यथालाभं राजा विषयमावसेत् ॥ ५ ॥

अर्थ- आणि तो राजधानी करण्याचा देश बहुत वैश्य, शूद्र व यज्ञादि बहु कर्में कर

णारे अल्पब्राम्हण यानीं यक्त असून तो शत्रूंचे स्वाधीन होण्यास अशक्य असावा; तसाच तो देश पर्जन्याची अपेक्षा नसून नद्यादिकांचे पाटांच्या उदकावर धान्यादिकांच्या विपुल उत्पत्तीनें समृद्ध, रमणीय, तसाच राजा, अनेक प्रकारें किंचित् कर घेत असून ही आसनमान तो राजा वर प्रीति करणाऱ्या लोकानीं परिपूर्ण, बहुत पुष्पें व फलें यानीं यक्त असावा; त्याच प्रमाणें तें राजधानी-स्थान, आपत्कालीं परचक्रा (शत्रू) चा प्रवेश होण्यास दुर्घट व राजास सुख दुःखकालीं सर्वदा प्रिय असून तसेंच सर्प, व्याघ्र व चोर यानीं रहित असावा; याप्रकारें यथासंभव सर्वसंपत्तीनीं संपन्न अशा देशांत राजानें स्वकीय राजधानी करून तेथें वास करावा.

तत्र दुर्गं नृपः कुर्यात्षण्णामेकतमं बुधः॥ धनुर्दुर्गं महीदुर्गं नरदुर्गं तथैव च॥६॥ वार्क्षं चैवांबुदुर्गं च गिरिदुर्गं च पार्थिव॥ सर्वेषामेव दुर्गाणां गिरिदुर्गं प्रशस्यते॥७॥

अर्थ- अशाल्या देशांत ज्ञानसंपन्न राजानें सहा प्रकारच्या किल्यांतून श्रेष्ठ एक किल्ला बांधावा. ते सहा प्रकार असे कीं धनुष्यांचा किल्ला, १ भुयिकोट किल्ला, २-मनुष्यांचा कोट, ३ झाडांतील किल्ला, ४ पाण्यांत बांधलेला किल्ला, ५ व पर्वतावरील किल्ला, ६ यासर्वांत डोंगरी किल्लाच उत्तम आहे.

दुर्गं च परिखोपेतं वप्राट्टालकसंयुतं॥ शतघ्नीयंत्रमुख्यैश्च शतशश्च समावृतं॥८॥

अर्थ- तो किल्ला बाहेरून सभोंवती खंदक व बळकट तट यानीं वेष्टित असून त्या किल्यावर शेंकडो तोफा व मोठमोठीं यंत्रेंहीं चहूंकडे ठेवलीं असावीं.

गोपुरं सकपाटं च तत्र स्यात्सुमनोहरं॥ सपताकं गजारूढो येन राजा विशेत्पुरं॥९॥

अर्थ- आणि राजधानीचें सीमाद्वार, सुंदर कपाटें व पताका यानीं सुशोभित असून राजा हत्तीवर बसून बाहेरून नगरांत येण्यासारखें तें उंच व रुंद असावें.

चतस्रश्च तथा तत्र कार्यास्त्वायतवीथयः॥ एकस्मिंस्तत्र वीथ्यग्रे देववेश्म भवेद्दृढं॥१०॥

अर्थ- तसेंच तेथें चार मोठे राजमार्ग असून मुख्य मार्गासन्मुख एक मोठें दृ-

द देवालय बांधावें.

वीथ्यग्रेचद्वितीयेचराजवेश्मविधीयते॥धर्माधि-
कारणंकार्यंवीथ्यग्रेचतृतीयके॥११॥

अर्थ- तसेंच दुसऱ्या रस्त्यासमोर राजमंदिर असून तिसऱ्या मार्गापुढें धर्मा ध्यक्षाचें गृह असावें.

चतुर्थेत्वथवीथ्यग्रेगोपुरंचविधीयते॥आयतंचतु
रस्रंवावृत्तंवाकारयेत्पुरं॥१२॥

अर्थ- त्याचप्रमाणें चवथ्या रस्त्यासमोर गोपुर राजधानीचें सीमा द्वार बमनो रे आणि नगर लांब किंवा चतुष्कोण अथवा वर्तुलाकार वसवावें.

मुक्तिहीनंत्रिकोणंचयवमध्यंतथैवच॥आयतंचतु
रस्रंवावृत्तंवाकारयेत्पुरं॥१३॥

अर्थ- आणि राजाज्ञे वांचून लोकांस बाहेर जाणें न होण्यासारखें व दोबस्त- यत्न मध्य भागीं रुंद व दोन बाजूस लांब असें असावें; अथवा अर्धचंद्राकार किं- वा वज्राच्या आकृतीसारखें करावें.

अर्धचंद्रंप्रशंसंतिनदीतीरेषुतद्वसन्॥अन्यत्तत्रन
कर्तव्यंप्रयत्नेनविजानता॥१४॥

अर्थ- त्यांत नदीतीरीं वास करणाऱ्या राजानें अर्धचंद्राकार नगर वसवावें. कारण राजनीति जाणणारे लोक त्यास्थलीं अर्धचंद्राकृति नगरांचीच प्रशंसा करतात; यास्तव ज्ञानि राजानें नदीतटाकीं अन्यरीतीचें नगर प्रयत्नानें वर्ज करावें.

राज्ञाकोशगृहंकार्यंदक्षिणेराजवेश्मनः॥तस्यापि
दक्षिणेभागेगजस्थानंविधीयते॥१५॥

अर्थ- तसेंच राजानें आपले मंदिराचे दक्षिण भागीं धनाचें भांडार गृह करू न त्याच्या दक्षिण प्रदेशीं गजशाला करावी.

गजानांप्राङ्मुखीशालाकर्तव्यावाप्युदङ्मुखी॥
आग्नेयेचतथाभागेआयुधागारमिष्यते॥१६॥म
हानसंचधर्मज्ञकर्मशालास्तथापराः॥

अर्थ- आणि त्या गजशालेचें मुख पूर्वेस अथवा उत्तरेस असावें तशीच श

सूत्रशाला, पाकशाला व इतर अनेक शिल्पशाला या हे धर्मज्ञ मनु राजा आग्नेयकोणास असाव्या.

गृहं पुरोधसः कार्यं वामतो राजवेश्मनः ॥ १७ ॥ मंत्रिवेदविदां चैव चिकित्साकर्तुरेव च ॥ तत्रैव च तथा भागे कोष्ठागारं विधीयते ॥ १८ ॥

अर्थ- तसेंच राजमंदिराच्या उत्तरेस पुरोहितांचें गृह करावें. तसेंच सर्व मंत्रि; वेदवेत्ते विद्वान् व वैद्य यांचीं घरें, व धान्यागार हीं राजवाड्याचे उत्तरेस असावीं.

गवां स्थानं तथैवात्र तुरगाणां तथैव च ॥ उत्तराभिमुखा श्रेणी तुरगाणां विधीयते ॥ १९ ॥ दक्षिणाभिमुखा वाथ परिशिष्टास्तु गर्हिताः ॥ तुरगास्ते तथा धार्याः प्रदीपैः सार्वरात्रिकैः ॥ २० ॥

अर्थ- तसेंच गायी व बैल यांचे गोठे व अश्वशाला यांची योजना राजमंदिराच्या उत्तरेस करून तेथें ओळीनें ते अश्व उत्तराभिमुख किंवा दक्षिणामुख बांधावे; त्यांचें मुख यावाचून अन्य दिशेस नसावें; व त्या अश्वशालेंत रात्रीं सर्वदा अखंड दीप असावे.

कुक्कुटान्वानरांश्चैव मर्कटांश्च विशेषतः ॥ धारयेदश्वशालासु सवत्सां धेनुमेव च २१ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें कुक्कुट (कोंबडीं) वानरें व मर्कटें (माकडें) व सवत्स गायी यांचें अश्वशालेंत अवश्य स्थापन करावें.

अजाश्च धार्या यत्नेन तुरगाणां हितैषिणा ॥ गोगजाश्वादिशालासु तत्पुरीषस्य निर्गमः ॥ २२ ॥ अस्तंगते न कर्तव्यो देवदेवे दिवाकरे ॥

अर्थ- आणि अश्वहितेच्छु राजानें अश्वशालेंत प्रयत्नानें शेळ्यांचा संग्रह ठेवावा; तसेंच गायी, बैल व घोडे इत्यादिक पशूंच्या शालेंतील त्यांचें शेण व लीद वगैरे सूर्यास्त झाल्यावर काढूं नये.

तत्र तत्र यथास्थानं राजा विज्ञाय सारथीन् ॥ २३ ॥ दद्यादावसथस्थानं सर्वेषामनुपूर्वशः ॥

अर्थ- तसेंच पूर्वीं सांगितलेल्या गजादिक पशूंस शिकविणारे यास वगैरे यांची

परीक्षा करून राजानें त्यांस क्रमानें त्याच्या परफशालेंत यथायोग्य स्थानीं रहाण्या साठीं घरें बांधून द्यावीं.

योधानांशिल्पिनांचैवसर्वेषामविशेषतः ॥ २४ ॥ दद्यादावसथान्दुर्गे कालमंत्रविदांशुभान् ॥

अर्थ- तसेंच योद्धे व शिल्पशास्त्रज्ञ लोक यास र्वांस किल्यांत एकसारखीं घरें द्यावीं आणि समयीं मसलतीविषयीं विचार करणारांस उत्तम घरें किल्यांत बांधून द्यावीं.

गोवैद्यानश्ववैद्यांश्चगजवैद्यांस्तथैवच ॥ २५ ॥ आहरेतभृशंराजादुर्गेहिप्रबलारुजः ॥ कुशीलवानांविप्राणांदुर्गेस्थानंविधीयते ॥ २६ ॥ नबहूनामतोदुर्गे विनाकार्यंतथाभवेत् ॥

अर्थ- त्याचप्रमाणें किल्यांत मोठमोठे अनेक रोग उत्पन्न होतात; यास्तव राजानें गायी, अश्व, व गज यांच्या रोगांची चिकित्सा करून त्यांस औषधें जाणणारे वैद्य तसेंच स्वराज्य व परराष्ट्र यांतील वर्तमान शोधक ब्राह्मण यांस किल्यांत रहावयास अवश्य स्थान द्यावें. याशिवाय इतर बहुत लोकांस कारणा वांचून किल्यांत जागा देऊं नये.

दुर्गेचतत्रकर्तव्यानानाप्रहरणान्विताः ॥ २७ ॥ सहस्रघातिनोराजंस्तैस्तुरक्षाविधीयते ॥

अर्थ- हे राजा अनेक प्रकारच्या आयुधानीं युक्त असून सहस्रावधि सैन्याचा नाश करणारे शूर किल्यांत ठेऊन त्यांज कडून राज्याचें संरक्षण करावें.

दुर्गेद्वाराणिगुप्तानिकार्याण्यपिचभूभुजा ॥ २८ ॥ संचयश्चात्रसर्वेषामायुधानांप्रशस्यते ॥

अर्थ- तसेंच राजानें किल्यास शत्रूस न समजण्या सारखे दरवाजे करून त्यांत सर्व शस्त्रांचा संग्रह करावा हें कृत्य राजास हितकारक आहे.

धनुषांक्षेपणीयानांतोमराणांचपार्थिव ॥ २९ ॥ शराणामथखड्गानांकवचानांतथैवच ॥ लगुडानांगुडानांचहुडानांपरिघैःसह ॥ ३० ॥ अश्मनांचप्रभूतानांमुद्गराणांतथैवच ॥ त्रिशूलानांपट्टिशानांकुठारा

णांच पार्थिव ॥ ३१ ॥ प्रासानांचसशूलानांशक्तीनां चनरोत्तम ॥ परश्वधानांचक्राणांवर्मणांचर्मभिःस ह ॥ ३२ ॥ कुद्दालक्षुरवेत्राणां पीठकानांतथैवच ॥ तुषाणांचैवदात्राणामंगाराणांचसंचयः ॥ ३३ ॥ स र्वेषांशिल्पिभांडानांसंचयश्चात्रचेष्यते ॥

अर्थ- हे राजा त्याचप्रमाणे संग्रह योग्य दुसरे पदार्थ असे कीं, धनुष्ये, गोफणी, भाले व गुरगुज (रवीच्या दांड्यासारखे आयुध) बाण तलवारी, चिरवलतें, लोखंडी सोटे, गोळे, व्याघ्र, बरच्या, बहुत पाषाण तसेच मुद्गल, त्रिशूल पट्टे, कुऱ्हाडी, सांगिनी, त्रिशूळ, सैंति, परशू, चक्रें, कवचें, ढाली, कुदळी, सराटे, वेताच्या छड्या, घोड्या वरील सामान, कोंडा, कोयते, निखारे, कोळसे, सर्व कारागिरांचीं हत्यारें तयार करण्यास योग्य साधनें या सर्व वस्तूंचा राजानें किल्यांत संग्रह करणें त्यास हितकारक आहे.

वादित्राणांचसर्वेषामौषधीनांतथैवच ॥ ३४ ॥ यवसानां प्रभूतानामिंधनस्यचसंचयः ॥

अर्थ- तशीच सर्वप्रकारचीं वाद्यें सर्व औषधी, संपूर्णजातींचें बहुत तृण व काष्ठें यांचा राजानें संग्रह करावा.

गुडस्यसर्वतैलानांगोरसानांतथैवच ॥ ३५ ॥ वसाना मथमज्जानांस्नायूनामस्थिभिःसह ॥ गोचर्मपटहा नांचधान्यानांसर्वतस्तथा ॥ ३६ ॥ तथैवाभ्रपटानां चयवगोधूमयोरपि ॥ रत्नानांसर्ववस्त्राणांलोहाना मप्यशेषतः ॥ ३७ ॥ कलापमुद्गमाषाणांचणका नांतिलैःसह ॥ तथाचसर्वसस्यानांपांसुगोमय- योरपि ॥ ३८ ॥ शणसर्जरसभूर्जजतुलाक्षाचटं कणं ॥ राजासंचिनुयाद्दुर्गेयच्चान्यदपिकिंचन ॥ ३९ ॥

अर्थ- आणि गूळ, सर्व तेलें, गोरस, पशूंचें उदरांतील चर्बी, शिरांसहित अस्थि, बैलाच्या चर्माची रणांतील नौबद, सर्व धान्यें, अभ्रक, सातु, गहु, रत्नें, सर्वप्रकारचीं वस्त्रें, सुवर्णादि सर्व धातु, कमळांचे बी, मूग, उडीद, हरभरे, तीळ, सर्व धान्यांचें बीज, धूळ, गोमय, ताग, साळई वृक्षाचा चीक, पारा, भूर्ज

पत्रें, कथिल, लाख, टाकणखार, यांहून जे कांहीं उपयोगी अन्य पदार्थ ते सर्व ही राजानें किल्यांत संग्रहास ठेवावे.

कुंभाश्चाशीविषैः कार्याः व्यालसिंहादयस्तथा॥ मृगाश्च पक्षिणश्चैव रक्ष्यास्तेच परस्परं॥ ४०॥

अर्थ- तसेच मोठमोठ्या मांड्यांत सर्प, मदोन्मत्त हत्ती, सिंह, अरण्यांतील उपयोगी पशू व पक्षी यांचा संग्रह करून त्यांचें परस्पर साधनानें संरक्षण करावें.

स्थानानिच विरुद्धानां सुगुप्तानि पृथक्पृथक्॥ कर्तव्यानि महाभाग यत्नेन पृथिवीक्षिता॥ ४१॥

अर्थ- हे महाभाग्यशालिन् प्रतिबंधांत ठेवलेल्यां लोकांचे बंदोबस्तासाठीं पृथ्वीपति राजानें प्रयत्नें करून त्यांस निरनिराळीं गुप्तस्थानें सिद्ध करावीं.

उक्तानिचाप्यनुक्तानि राजद्रव्याण्यशेषतः॥ सुगुप्तानि पुरे कुर्यात् जनानां हितकाम्यया॥ ४२॥

अर्थ- आणि राजानें आपले नगरांत प्रजेच्या हितार्थ येथें सांगितलेल्या व न सांगितलेल्या सर्व द्रव्यांचें उत्तम प्रकारें संरक्षण करावें.

जीवकर्षभकाकोलमामलक्याटरूषकान्॥ शालपर्णीपृश्निपर्णीमुद्गपर्णीतथैवच॥ ४३॥ माषपर्णींच मदे द्वे सारिवे द्वे बलात्रयं॥ वाराशवसंती कृष्णा चबृहती कंटकारिका॥ ४४॥ शृंगी शृंगाटकी द्रोणीवर्षामूर्दर्भरेणुका॥ मधुपर्णी विदार्ये द्वे महाक्षीरा महातपाः॥ ४५॥ धन्वनस्सहदेवाह्वा कटुकैरंडकविषः॥ पर्णी शताह्वा मृद्वीका फल्गुखर्जूरयष्टिकाः॥ ४६॥ शुक्रातिशुक्रकाश्मर्यश्छत्रातिच्छत्रवीरणाः॥ इक्षुरिक्षुविकाराश्च फाणिताद्याश्च सत्तम॥ ४७॥ सिंहीच सहदेवीच विश्वेदेवाश्वरोधकं॥ मधुकं पुष्पहंसाख्याशतपुष्पा मधूलिका॥ ४८॥ शतावरी मधूकंच पिप्पलं तालमेवच॥ आत्मगुप्ता कट्फलाख्या दार्विका राजशीर्षकी॥ ४९॥ राजसर्षपधान्याकमृष्यप्रोक्ता तथोत्कटा॥ काल

शाकंपद्मबीजंगोवल्लीमधुवल्लिका ॥ ५० ॥ शीतपा-
कीकुबेराक्षीकाकजिव्होरुपुष्पिका ॥ पर्वतत्रपुसोचो
भौगुंजालकपुनर्नवे ॥ ५१ ॥ कसेरुकारुकाश्मीरीब-
ल्याशाल्लूककेसर ॥ तुषधान्यानिसर्वाणिशमीधान्या
निचैवहि ॥ ५२ ॥ क्षीरंक्षौद्रंतथात क्रंतैलंमज्जाव-
साघृतं ॥ नीपश्चारिष्टकाक्षोरवातामासोमबाणकं
॥ ५३ ॥ एवमादीनिचान्यानिविज्ञेयोमधुरोगणः ॥ रा
जासंचिनुयात्सर्वपुरेनिरवशेषतः ॥ ५४ ॥

अर्थ- हेमहा तपोनिधे मनुराजा, असाणा, बेल धाटी, काकमेवकनांवाचेंविष, - आंवळे, अडुळसा, सालवण, पिठवण, रानमुग, रानउडीद, मेदा वमहामेदा, पांढरी व काळी योदोन जातीची उपळसरी, चिकणा, मध, वावडिंग, श्वासनाशक औषधि, भूईकोहळा, डोरलीमूळ, रिंगणीमूळ, अतिविष, शिंगाड्याचावेल, नीळ, येटोळी, दर्भ, रेणुकबीज, शिवणीमूळ, गुळवेल, पांढरीभूयीकोहळी, ऊस, धामणी चावृक्ष, वाघंटी, कडुतोंडली, एरंड, बचनाग, रानगांजा, बडिशेप, द्राक्षी, काळा उंबर; ज्येष्ठमध, खजुरीचावृक्ष, शुक्रधातूलाउत्पन्न करणारी वतिचा नाश करणारी, वनस्पति, पुष्करमूळ, कोथिंबीर, वेरंबडासारख्या वासाचें पाण्यांत उत्पन्न होणारें गवत, काळा वाळा, तालिमखाना, साकर, गूळ व काकवी इत्यादिक उंसाचेपदार्थ; रान वांगी, महाबला, नागबला, शुभ्र कन्हेर, मोह, जस्ताचें फूल राजहंस नामक वनस्पति, बाळंतशोप, पाथ्री, शतावरी, साकरनिंबु, चवक, माड, कुहिरेचावृक्ष, कायफळ, गोजबान, राजगिरा, काळेशिरस, धने, अतिबला, उंटकटारी, उन्हाळी, कमलबीज, गोकर्णी, गोडमाहळुंगी, लघुचिकणा, सागरगोटी, काबळी, मोठाताग, किराईत, काकडीचेवेल, पांढ्यागुंजांचीवेल, पुनर्नवा, कचोरा, बाफळी, पिंवळीकस्तुरी, चांदवेल, जायफळ, उंडणीचावृक्ष, सालीसहित सर्व धान्यें, शेंगापासून उत्पन्न होणारीं सर्व धान्यें, दूध, मध, ताक, तेल, मज्जा व वसा हेदोनक्रमानें अस्थि वमांस, यांतील चर्बी, घृत, कळंब, कस्थानिंब, अक्रोड, बदाम, सोमवल्ली, व शुभ्रकिंवानिळाकोरांटा, इत्यादिक यासमानच्या इतर औषधी, यांत काहींपूर्वीपासून मधुर असून कितीएक परिणामीं मधुर आहेत; यासर्ववस्तूंचा संग्रह राजानें आपले पुरांत करावा.

दाडिमाम्रातकौचैव तिंतिडीकाम्लवेतसं ॥ भव्य-
कर्कंधलकुचकरमर्द करूषकं ॥ ५५ ॥ बीजपूर
कर्कंडरेमालतीराजबंधुकं ॥ कोलकद्वयपर्णानि
द्वयोराम्रातयोरपि ॥ ५६ ॥ पारावतनागरकंमाची
नोलकमेवच ॥ कपित्थामलकंचुक्रफलदंतशठ
स्यच ॥ ५७ ॥ जांबवंनवनीतंचसौवीरकरूषोद-
के ॥ सुरासवंचमद्यानिमंडतक्रदधीनिच ॥ ५८
॥ शुक्तानिचैवसर्वाणिज्ञेयमाम्लगणंद्विज ॥ एवमा
दीनिचान्यानिराजासंचिनुयात्पुरे ॥ ५९ ॥

अर्थ— हे शौनक मुने, दाळिंब, अंबाडा, चिंच, आमसोल, चुका, कर्मरी, बोरी, ओटी, करवंदी, करूषकनामें फल, महाळुंग, कुहिली, चमेली, असाणा, कंकोळ, भिरें व दोन जातींचा इरसाल आंबा यांचीं पानें, एबनी, नारिंग, मुंगसबेल, ऊंस, कंवठ, भुईआंवळी, आम्लवेतस, लहानईडनिंबु, जांभळांचें आसव, लोणी, कांजी, करूषनामक फलाचें आसव, सर्वप्रकारचीसुरा (दारू) द्राक्षादिकांचीं सर्वआसवें व नशींच मद्यें, सर्वपातळ पदार्थावरील निवळी, ताक, दही, जांभळांचें आसव आदि करून सर्व स्वच्छ असावीं, हेपदार्थ आम्ल (आंबट) गणांत असून आसारखे इतर जे आम्लपदार्थ आहेत, त्यास वांचा संग्रह, राजानें स्वकीयनगरांत करावा.

सैंधवोद्भिदपाठेयपाक्यसामुद्रलोमकं ॥ कुप्यसौव
र्चलविडबालकेयंयवाह्वकं ॥ ६० ॥ और्वक्षारंकालभ
स्मविज्ञेयोलवणोगणः ॥ एवमादीनिचान्यानिरा-
जासंचिनुयात्पुरे ॥ ६१ ॥

अर्थ— तसेंच सैंधव, भूमीपासून उत्पन्न होणारें लवण, पहाडमूळाचें लवण, जवखार, समुद्रापासून होणारें लवण, वेखंडाचा क्षार, तांबें आदिकरून धातूंचा क्षार, संचळखार, बिडलोण, वंजुलक्षार, सूर्यक्षार, भूमीपासून उत्पन्नहोणारा क्षार, चित्रकाचें भस्म, हेपदार्थ लवण गणांत असून यांसारखे अन्यजे क्षारपदार्थ आहेत त्या सर्वांचा, राजानें आपलेराजधानींत संग्रह क-करावा.

पिप्पली पिप्पलीमूलचव्यचित्रकनागरं ॥ कुबेरकंम रिचकंशिग्रुभल्लातसर्षपाः ॥ ६२ ॥ कुष्ठाजमोदाकिणिही हिंगुमूलकधान्यकं ॥ कारवीकुंचिकायाज्या-समुखाकालमालिका ॥ ६३ ॥ फणिज्जकोथलशुनंभूस्तृणंसुरसंतथा ॥ कायस्थाचवयस्थाचहरितालंमनःशिला ॥ ६४ ॥ अमृताचरुदतीचरोहिषंकुंकुमंतथा ॥ जयाएरंडकांडीरंसल्लकीहंजिकातथा ॥ ६५ ॥ सर्वपित्तानिमूत्राणिप्रायोहरितकानिच ॥ फलानिचैवहितथासूक्ष्मैलाहिंगुपत्रिका ॥ ६६ ॥ एवमादीनिचान्यानिगणःकटुकसंज्ञितः ॥ राजासंचिनुयात्तुयाद्दुर्गेप्रयत्नेननृपोत्तमः ॥ ६७ ॥

अर्थ - आणि पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, नागरमोथा, नांदरुकी, काळा मरवा, शेवगा, बिबा, शिरस, कोळिंजन, अजमोदा, श्वेत गोकर्णी, कोनफळ, कोथिंबीर किंवा धने, तिळवण, वेरखंड, मोहऱ्या, वैजयंती नामक तुळस, काळी तुळस, पांढरा मरवा, लसूण, वेरखंडासारख्या वासाचें तृण, वत्साबोळ, रक्तपाडल, लहानकावळी, हरताळ, मनशिळ, बेहडा, धमासा, रोहिसगवत, केशर, भांग, एरंड, कांडवेल, सालई, भारंग, पित्तकारक सर्व मूत्रें, प्रायः तीक्ष्ण भाज्या, तशींच फळें, लहान वेलदोडे, ववाफळी, इत्यादि कडू तर सर्व तीक्ष्ण पदार्थ राजानें आपले नगरांत मेयत्नें करून संग्रहास ठेवावे.

मुस्तंचंदनह्रीबेरकृतमालकदारवः ॥ हरिद्रानलदोशीरनक्तमालकदंबकं ॥ ६८ ॥ दूर्वापटोलकटुकादीर्घत्वक्पत्रकंवचा ॥ किरातत्तिक्तभूतुंबीविषाचातिविषातथा ॥ ६९ ॥ तालीसपत्रतगरंसप्तपर्णविकंकताः ॥ काकोदुंबरिकादिव्यातथाचैवसुरवोद्भवा ॥ ७० ॥ षड्ग्रंथारोहिणीमांसीपर्पटश्चाथदंतिका ॥ रसांजनंभृंगराजपतंगीपरिपेलवं ॥ ७१ ॥ दुःस्पर्शागुरुणीकामाश्यामाकंगंधनाकुली ॥ रूपपर्णीव्याघ्रनखंमंजिष्ठाचतुरंगुला ॥ ७२ ॥ रंभाचैवांकु

रास्फोतातालास्फोताहरेणुका॥ वेत्राग्रवेतसस्तुंबी
विषाणीलोध्रपुष्पिणी॥ ७३॥ मालतीकरकृष्णा-
ख्यावृश्चिकाजीविकातथा॥ पर्णिकाचगुडूचीचस
गणस्तिक्तसंज्ञकः॥ ७४॥ एवमादीनिचान्यानिरा
जासंचिनुयात्पुरे॥

अर्थ - वसेच नागरमोथा, चंदन, वाळा, लघुबाहवा, तेल्यादेवदारू, हळद-काळ्यावाळ्याचें मूळ, काळावाळा, करंजा, कळंब, दूर्वा, पडवळ, कडुकांकडी उंदूकरणी, हिंगुपत्री, कळलावी, नागसरतुंबी, जलपिंपळी, पांढरें अतिविष लघुतालीसपत्र, तगर, सातवण, वेहेकळ, काळाउंबर, ब्राम्ही, कापुरकाची, कुटकी, वेरवंड, मंजिष्ठ, जटामांसी, पित्तपापडा, दंतीमूळ, रसांजन, अगरुचंदन, जलमोह, लहान नागरमोथा, रक्तधमासा, आंबा, सावा, मुंगसवेल, सुरसी, निवडुंग, मंजिष्ठ, बाहवा, चवेण, अंकुर, रानमोगरी, मुसळकंद पांढरीउपळसरी, रेणुकबीज, वेताचाकोंब, जलवेतस, कडुदूधभोपळा, मेंढशिंगी, लघुधायटी, पाहाडमूळ, काळीजिरीं, पिठवण, हरणवेल, थोरएरण, गुळवेल, हा कडुऔषधींचा गण आहे; इत्यादिक इतर सर्व कडुऔषधींचा संग्रह राजानें आपले नगरींत करावा.

अभयामलकंचोभेतथैवचबिभीतकं॥ ७५॥ प्रियं
गुधातकीपुष्पंमोचाख्याचार्जुनासनाः॥ अनंता
स्त्रीतुवरिकास्योनाकंकट्फलंतथा॥ ७६॥ भूर्ज
पत्रंशिलापत्रंपाटलापत्रलोमकं॥ समंगात्रिवृ
तामूलकार्पासागैरिकांजनं॥ ७७॥ विद्रुमंसमधू
च्छिष्टंकुंभिकाकुमुदोत्पलं॥ न्यग्रोधोदुंबराश्वत्थ-
किंशुकाःशिंशपाशमी॥ ७८॥ प्रियालपीलुका-
सारिशिरीषाःपद्मकंतथा॥ बिल्वोग्निमंथःप्लक्ष
श्श्यामाकंचवकोघनं॥ ७९॥ राजादनंकरीरंच

ः थेंप दारुहळदीचा अष्टमांश काढा करून त्यांत समभाग शेळीचें दूध घालून करवून शुष्क केलेलें अंजन.

धान्यकंप्रियकस्तथा ॥ कंकोलाशोकबदराः कदंब खदिरद्वयं ॥ ८० ॥ एषांपत्राणिसाराणिमूलानिकुसुमानिच ॥ एवमादीनिचान्यानिकषायाख्यानि मतोरसः ॥ ८१ ॥ प्रयत्नेननृपश्रेष्ठराजासंचिनुयात्पुरे-

अर्थ- हे राजश्रेष्ठा त्याचप्रमाणे हिरडा आंवळकठी, बेहेडा, पिंपळी, धायटीफूल, सांवरी, अर्जुनवृक्ष, आसाणा, रक्तधमासा, गव्हला, तुरटी, दिंडा, कुंभा, भूर्जपत्र, हिरड्यांचें पत्र, तांबड्यालोध्राचें पत्र, वेखंड, लाजाळू, निशोत्तर, पिंपळमूळ, कापशी, गैरिकादिकधातूंपासून उत्पन्न झालेलें अंजन, पोंवळें, मेण, तांबडीपडवळ, श्वेतकमळ, नीलकमल, वड, उंबर, पळस, शिसवा, शमी, चार, अक्रोड, पुष्करमूळ, शिरस, सुरळदेवदार, बेल, नरवेल, पिंपरी, पीलुनामक वृक्षाचीं फळें, मिरवेलीचें मूळ, नागरमोथा, रिंवणी, कारंदा, धने, वाघांटी, कंकोळ, अशोक, बोर, हळद, पांढरखैर, तांबडाखैर, ह्या औषधींचीं पत्रें, गाभा, मुळें व पुष्पें इत्यादिक यासारख्या अन्य औषधि या सर्व तुरटरसाचे गणांत मानल्या आहेत; यास्तव राजानें प्रयत्नें करून स्वकीयनगरांत यांचा संग्रह करावा.

कीटाश्मनारणेयोग्याव्यंगतायांतथैवच ॥ ८२ ॥ वातधूमाश्ममार्गाणांदूषणानितथैवच ॥ धार्याणिपार्थिवैर्दुर्गेतानिवक्ष्यामिपार्थिव ॥ ८३ ॥

अर्थ- हे राजा तसेंच शत्रुवध व त्यांचे सैन्यादिक साधनें व्यंग करणे यांविषयीं समर्थ असे कीट आणि शत्रूंच्या येण्याचे मार्गास प्रतिबंध करण्यासाठीं वाफ व धूर यांच्या संग्रहाचीं यंत्रें व शिलादिक अनेक साधनें यांचा राजानें संग्रह करावा; तशींच राजानीं किल्ल्यांत दुसरींजी साधनें संग्रहास ठेवावीं. तीं तुला सांगतो;

विषाणांधारणंकार्यंप्रयत्नेनमहीभृजा ॥ विचित्राश्चागदाधार्याविषस्यशमनास्तथा ॥ ८४ ॥

अर्थ- तीं अशीं कीं, राजानें प्रयत्नें करून सर्व विषांचा संग्रह करावा, आणि राजानें विषांचा उपशम करणारीं अनेकप्रकारचीं बाहुभूषणें धारण करावीं.

रक्षोभूतपिशाचघ्नाः पापघ्नाः पुष्टिवर्धनाः ॥ कला

विदश्च पुरुषाःपुरेधार्याःप्रयत्नतः ॥ ८५ ॥

अर्थ- तसेच राक्षस, भूतें पिशाच्चें, यांस दूर करणारे असून पापांचा नाशकरूनव आपलें पालन करणारांची सर्वप्रकारें वृद्धि करणारे व सर्व कळाजाणणारे असे पुरुष राजानें प्रयत्नें करून आपले संग्रहास ठेवावे.

भीतानप्रमत्तान्कुपितांस्तथैवच विमानितान् ॥
कुभृत्यान्पापशीलांश्च नराजावासयेत्पुरे ॥ ८६ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें भित्रे, असावध, रागीट, अपमान पावलेले, कपटव अनीति यारीतीनें वर्तणारे व स्वभावतः पापी अशा मनुष्यांस, राजानें नगरांत रहाण्यास आश्रय देऊनये.

यंत्रायुधाट्टालचयोपपन्नंसमग्रधान्यौषधिसंप्र
युक्तं,वणिग्जनैश्चावृतमावसेतदुर्गंसुगुप्तंनृपतिः
सदैव ॥ ८७ ॥

अर्थ- तशीच अनेक यंत्रें, आयुधें, गच्चा, तट, संपूर्ण धान्यें व औषधी तसेच बहुत व्यापारी सावकार यानीं युक्त अशा सुरक्षित किल्ल्यांत राजानें सर्वदा वास करावा. इतिश्री मत्स्यपुराणे राजनीतौ दुर्गसंपत्ति नामसप्तदशोत्तरद्विशततमोऽध्यायः ॥ २१७ ॥

अध्याय २१८ वा.

मनुरुवाच ॥ रक्षोघ्नानिविषघ्नानियानिधार्याणि
भूभुजा ॥ अगदानिसमाचक्ष्वतानिधर्मभृतां-
वर ॥ १ ॥

अर्थ- मनुप्रश्न करितो हे धर्माध्यक्ष श्रेष्ठ भगवन् राजानें जीं राक्षसनाशक वविषनाशक औषधें संग्रहास ठेवण्यास उपयुक्त आहेत; तीं मला सांगा.

मत्स्यउवाच ॥ बिल्वाटकीयवक्षारंपाटलाबा-
ल्हिकोषणाः ॥ श्रीपर्णीशल्लकीयुक्तोनिक्वाथः
प्रोक्षणंपरं ॥ २ ॥ सविषंप्रोक्षितंतेनसद्योभवति
निर्विषं ॥ यवसैंधवपानीयवस्त्रशय्यासनोद-
क ॥ ३ ॥

अर्थ- तेव्हां मत्स्य सांगतात. हे मनुराजा बेलफळ, सोरटीमृत्तिका, जवखार, पाडळीचीवेल, सागरगोटी, हिंग, पिंपळी, शिवणी, साळई, यांच्या उत्तमस्वच्छ कषायानें विषयुक्त झालेले मातु, सैंधव, प्राशन करण्याचे पदार्थ, वस्त्रें, शय्यास्थान, बसण्याचें स्थल यांवरप्रोक्षण केलें असतां, हे सर्व तत्काल निर्विषहोतात.

कवचाभरणंच्छत्रंवालव्यजनवेश्मनां ॥ शेलुःपाटला तिविषाशिग्रुमूर्वापुनर्नवा ॥ ४ ॥ समंगावृषमूलंचकपि त्थवृषशोणितं ॥ महादंतशठंतद्वत्प्रोक्षणंविषना शनं ॥ ५ ॥

अर्थ- भोंकरि, पाडळी, श्वेत अतिविष, शेवगा, मोर वेल, घेटोळी, मंजिष्ठ, अडुशाचें मूळ, कंवठी, अडुळसा, केंशर, मोठेंईडनिंबु, यांचेकषायानें कवचें, अलंकार, छत्रें, विंझणे वगैरे यांवर प्रोक्षण केलें असतां त्यांस झालेला विषसंबंध दूर होतो.

लाक्षाप्रियंगुमंजिष्ठासममेलाहरेणुका ॥ यष्ट्याव्हाम धराचैवबभ्रुपित्तेनकल्पिताः ॥ ६ ॥ निखनेद्गोविषाण स्थं सप्तरात्रंमहीतले ॥ ततःकृत्वामणिंहेम्नाबध्यंह स्तेनधारयेत् ॥ ७ ॥ संस्पृष्टंसविषंतेनसद्योभवतिनिर्विषं ॥

अर्थ- त्याचप्रमाणें लाख, काळ्यामोहऱ्या, मंजिष्ठ, एलची, हिरडा, ज्येष्ठमध, मधुरखजूरी, यासमभाग औषधींस मुंगसाच्या लाळीचें पुट देऊन त्यागायीच्याशिंगांत घालूनतें भूमीतसप्तरात्र पुरून ठेवावें; नंतर तें काढून सोन्याच्यामण्यांत घालून तो हातांत बांधून त्यानें विषयुक्त पदार्थांस स्पर्श केला असतां, तोतत्काल निर्विष होतो.

मनोव्हयाशमीपत्रंतुंबिकाश्वेतसर्षपाः ॥ ८ ॥ कपि त्थकुष्ठमंजिष्ठाःपित्तेनश्लक्ष्णकल्पिताः ॥ शुनोगोः कपिलायाश्चसौम्याक्षिप्तापरोगदः ॥ ९ ॥ विषजित् परमंकार्यंमणिरत्नंचपूर्ववत् ॥

अर्थ- तसेंच मनशीळ, शमी, जस्ताचें फूल, कडुदुध्याभोपळा, पांढऱ्या मोहऱ्या, कंवठ, कोष्ठकोळिंजन, वमंजिष्ठ, ह्या औषधी, कुत्रें वपिंगटवर्णी गाय यांच्यापित्तांत खलून मृदु झाल्या वर तोकल्क चांदण्यांत ठेवावा; म्हणजे हें औ-

षध, विषनाशाविषयीं अत्यंतसमर्थ होतें; तसेच हिरा वपांच इत्यादिक नवरत्नांतील. मणि या औषधांचे कल्कांत घालून तो पूर्ववत् गायीचे शिंगांत सप्तरात्र भूमींत पुरून ठेऊन मग काढून हातांत बांधला असतां सर्वविषांचा नाश होतो.

मूषिकाजतुकाचापिहस्तेबद्धाविषापहा ॥ १० ॥ हरेणुमांसीमंजिष्ठारजनीमधुकामधु ॥ अक्षत्वक्सुरसंलाक्षा- श्वपित्तंपूर्ववद्भुवि ॥ ११ ॥ वादित्राणिपताकाश्चपिष्टैरेतैःप्रलेपिताः ॥ श्रुत्वादृष्ट्वासमाघ्रायसद्योभवतिनिर्विषः ॥ १२ ॥

अर्थ- तशीच उंदिर कानी, चक्रवर्तिनीनामक औषधि, या हातांत बांधलेल्या असतां विषाचा नाश होतो; आणि रेणुकबीज, जटामांसी, मंजिष्ठ, हळद, मोहा, ज्येष्ठमध, बेहेडा, लफताली सपत्र, मोचरस, लाख, यास वें औषधी कुत्र्याचे पित्तांत खलून तो कल्क शिंगांत घालून पूर्ववत् भूमींत सात दिवस पुरून ठेवावा, नंतरतें औषध काढून त्याचूर्णानें वाद्यें व पताका यांस लेपन करून त्यांचा ध्वनिश्रवण करावा; व तीं वाद्यें व पताका यांचें अवलोकन करून अवघ्राण (वास) करावें; तेणें करून विषबाधा तत्काल दूर होते.

त्र्यूषणंपंचलवणंमंजिष्ठारजनीद्वयं ॥ सूक्ष्मैलात्रिवृता- पत्रंविडंगानींद्रवारुणी ॥ १३ ॥ मधुकंवेतसंक्षौद्रंविषाणेचनिधापयेत् ॥ तस्मादुष्णांबुनामात्रंप्राग्युक्तंयोजयेत्ततः ॥ १४ ॥

अर्थ- सुंठ, मिरीं, पिंपळी, सैंधव, बिडलोण, संचलखार, टाकणखार, समुद्राचें मीठ, मंजिष्ठ, हळद, दारुहळद, लहानएलची, श्वेतनिसोत्तराचें पान, वावडिंग, कंवडळ, ज्येष्ठमध, वेत, मध, हे पदार्थ शिंगांत घालावे; पश्चात् त्यांतून काढून तीं सर्व औषधें उष्णोदका बरोबर प्राशन केलीं असतां, भक्षणांत आलेलें विष, जीर्ण होतें; व निर्विष पदार्थी पासून ही कांहीं एक रोग उत्पन्न होऊं देत नाहींत

शक्रंसर्जरसोपेतसर्षपाएलवालुकैः ॥ १५ ॥ सुवेगातस्कररसरौकुसुमैरर्जुनस्यतु ॥ धूपोवासगृहेहंतिविषंस्थावरजंगमं ॥ १६ ॥

अर्थ- क्षीरकाकोली राळ, शुद्ध केलेला पारा, मोहऱ्या, वाळा, मालकांगोणी, मदनवृक्ष, अमरकंद, अर्जुनवृक्षाचीं पुष्पें या पदार्थांचा केलेला धूप राहाण्याऱ्याच्या गृहांत लावला असतां तेथें बचनागादि संबंधि व सर्प वृश्चिकादि- संबंधि या विषांचा नाश होतो.

नतत्रकीटा नविषं दर्दुरा न सरीसृपाः॥ न कृत्याकर्मणां चापि धूपोयं यत्र दह्यते ॥ १७ ॥

अर्थ- आणि तो पूर्वी चा धूप ज्या गृहांत जळतो त्या गृहांत कृमी, विष, बेडकुळ्या, सर्प व यक्षिणी आदिकरून असुरी देवता, ज्यादू, गारुडी विद्या, महामारी इत्यादिक उपद्रवांचें बल चालत नाहीं.

कल्पितैश्चंदनक्षीरपलाशद्रुमवल्कलैः॥ मूर्वैला वालुसरसानाकुलीतंदुलीयकैः॥ १८ ॥ काथः सर्वोदकार्येषु काकमाचीयुतो हितः॥ रोचना पत्र नेपाली कुंकुमैस्तिलकान्वहन् ॥ १९ ॥ विषैर्न बाध्यते स्याच्च नरनारीनृपप्रियः॥

अर्थ- त्याचप्रमाणें चंदन, भुयिकोहळी, पळस वृक्ष, यांच्या साली. आणि मुरवेल एलची, कांकडी, तेट, मुंगसवेल, तांदुळजा, हे पदार्थ वाटून तो कल्क कावळीच्या काढ्यांत घालून तो काढा उदकापासून झालेल्या विकारावर हितकारक आहे. तसेंच गोरोचन, तमालपत्र, मनशीळ व केशर यांचे तिलक अंगावर धारण केले असतां त्यास विषबाधा न होतां, तो मनुष्य सर्व स्त्री पुरुष राजे यांस प्रिय होतो.

चूर्णैर्हरिद्रामंजिष्ठाकिणिहीकणनिंबजैः ॥ २० ॥ दिग्धं निर्विषतामेति गात्रं सर्वविषार्दितं ॥

अर्थ- हळद, मंजिष्ठ, पांढरा अघाडा, कडूजिरे, कडुनिंब, यांचें चूर्ण कोणत्याही विषाचा उपद्रव जाहलेल्या शरीरास लाविलें असतां विष दूर होतें.

शिरीषस्य फलं पत्रं पुष्पं त्वङ्मूलमेव च ॥ २१ ॥ गोमूत्रघृष्टो ह्यगदः सर्वकर्मकरः स्मृतः॥

अर्थ- तशींच शिरसवृक्षाचीं फळें, पत्रे, पुष्पें, साल व मुळें यांचा गोमूत्रांत खल करून तें सिद्ध झालेलें औषध बचनागादिक विषांचे शुद्धीवर योजावें.

एकवीसमहौषध्यः शृणुचातः परंनृप ॥ २२ ॥ वंध्या कर्कोटकीराजन्विष्णुक्रांतातथोत्कटा ॥ शतमूली सितानंदाबलामोचापटोलिका ॥ २३ ॥ सोमापिंडा निशाचैवतथादग्धरुहाचया ॥ स्थलेकमलिनीया- चविशालीशंखमूलिका ॥ २४ ॥ चंडालीहस्तिमग धागोजापर्णीकरंभिका ॥ रक्ताचैवमहारक्तातथा बर्हिशिखाचया ॥ २५ ॥ कोशातकीनक्तमालंप्रिया लंचसुलोमनी ॥ वारुणीवसुगंधाचतथावेगंधना- कुली ॥ २६ ॥ ईश्वरीशिवगंधाचश्यामलावंशना लिका ॥ जतुकालीमहाश्वेताश्वेताचमधुयष्टिका ॥ २७ ॥ वज्रकः पारिभद्रश्चतथावैसिंधुवारकः ॥- जीवानंदावसुच्छिद्रानतनागरकंटका ॥ २८ ॥- नालंचजालीजातीचतथाचवटपत्रिका ॥ कार्त स्वरमहानीलाकुंदुरुहंसपादिका ॥ २९ ॥ मंडूकप र्णीवाराहीद्वेतथातंडुलीयके ॥ सर्पाक्षीलवली ब्राम्हीविश्वरूपासुखाकरा ॥ ३० ॥ रुजापहावृद्धि करी तथाचैवतुशल्यदा ॥ पत्रिकारोहिणीचैवर- क्तमालामहौषधी ॥ ३१ ॥ तथामलकवंदाकंश्या मचित्रफलाचया ॥ काकोलीक्षीरकाकोलीपीलुपर्णी तथैवच ॥ ३२ ॥ केशिनीवृश्चिकालीचमहानागा शतावरी ॥ गरुडीचतथावेगाजलेकुमुदिनीतथा ॥ ३३ ॥ स्थलेचोत्पलिनीयाचमहाभूमिलताचया ॥ उन्मादिनीसोमराजीसर्वरत्नानिपार्थिव ॥ ३४ ॥- विशेषान्मरकतादीनिकीटपक्षंविशेषतः ॥ जीवजा- ताश्चमणयः सर्वेधार्याः प्रयत्नतः ॥ ३५ ॥

अर्थ- हे महावीर मनुराजा यानंतर तूं श्रेष्ठ औषधी श्रवण कर; त्या अशा कीं;- वाळा, कर्टोली, काळीगोकर्णी, सिंहपिंपळी, महाशतावरी, आंवळी, भांग, चि- कणा, सांवरी, पडवळी, सोमवल्ली, शिळारस, हळद, कुरुहवृक्ष, भूमीवरील

श्वेतकमलांची वेल, आंवा, मुळा, शिवलिंगी, गजपिंपळी, मोठीदुधी, लक्ष्मणा, श्वेतकिन्ही, हिंगुळ, पोंवळी, मयूरशिखा, दोडकी, करंजा, चारोळी, जटामांसी, कांवडळ, अगस्ता, रानतुळसी, रास्ना, नागदवणी, काळाधोत्रा, कापुरकाचरी, जांभळी, बांबूचीनळी, शिलाजित्, काळीकापशी, श्वेतक्षयकोहळा,- वंशलोचन, ज्येष्ठमध, वज्रक्षार, देवदार, निर्गुंडी, जीवक, रानमोगरी, महामेदा, तगर, सुंठ, रिंगणी, लक्ष्मणदेवनळ, तांबडेफुलाचीसोनामुखी, जाई, बटमोगरी, धोत्र्याचेंफळ, काळीगोकर्णी, कवड्याऊद, रक्तलाजाळू, सूर्यफुलाचीवेल, कोनफळी, तांदुळजा, वावडिंग, मोठीमुंगसवेल, मोठीमालकांगोणी, चांदवेल, कृष्णागरू, लक्ष्मणदोडी, धामणीचावृक्ष, थोरविकणा, दुर्गंधखदिर, जायपत्री, रक्तरोडा, रक्तलाजाळू, काळेंअतिविष, बांडगूळ, क्षयआंवळा, कस्तूरी, कळंगडी, काकोली, क्षीरकाकोली, क्षीरमोरवेल, सारववेल, थोरआग्या, स्फटिगोडी उंडी, लक्ष्मणशतावरी, गुळवेल, लक्ष्मणमालकांगोणी, उदकांतीलश्वेतकमलें, भूमीवरील काळ्याकमलांची वेल, शंखपुष्पी, उन्मादकारकऔषधें, बांवची, तशींच पाच आदिकरून सर्वरत्नें पंखाचे समग्रकिडे, नागादिकजाती पासून उत्पन्न होणारे मणी यासर्व वस्तूंचा संग्रह राजानें प्रयत्नें करून करावा.

रक्षोघ्नाश्चविषघ्नाश्च कृत्यावेतालनाशनाः॥ विशेषान्नरनागाश्चगोखरोष्ट्रसमुद्भवाः॥ ३६॥ सर्प-तित्तिरगोमायुबभ्रुमंडूकजाश्चये॥ सिंहव्याघ्रर्क्षमार्जारद्वीपिवानरसंभवाः॥ कपिंजलागजावाजिमहिषेणभवाश्चये॥ ३८॥

अर्थ- तसेच राक्षसांचा उपद्रवदूर करणारे, विषनाशक कृत्यागण ववेतालादिकगण यांचे उपद्रवांचा नाशकरणारे मनुष्य, वनाग यांचा संग्रह राजानें करावा आणि गायी, वृषभ, गर्दभ, उंट, सर्प, लावेपक्षी, कोल्हे, मुंगस, बेडूक, सिंह, व्याघ्र, आस्वल, मार्जार, चित्तेवाघ, वानर, चातक, गज, अश्व, महिष, (रोणगे,) यासर्वां पासून उत्पन्न होणारे असूनराक्षस, विष, कृत्या, ववेताल, यांचा नाशकरणारे पदार्थ राजानें संग्रहास ठेवावे.

इत्येवमेतैः सकलैरुपेतंद्रव्यैश्चसर्वैः स्वपुरं स्मर-

क्षितं ॥ राजावसेत्तत्रगृहंस्वशस्त्रगुणान्वितंल-
क्षणसम्प्रयुक्तं ॥ ३८ ॥

अर्थ- याप्रमाणें पूर्वी सांगितलेलीं देशादिक सर्व साधनें वसकलवस्तू-यानीं संरक्षित अशा स्वकीय नगरांत उत्तम शस्त्र असून सर्व गुण व राजकीय चिन्हें यानीं संपन्न अशामंदिरांत राजानें वास करावा. इतिश्रीमत्स्यपुराणे अगदाध्याये अष्टादशोत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २१८ ॥

अध्याय २१९ वा.

मनुरुवाच ॥ राजरक्षारहस्यानियानिदुर्गेनिधाप
येत् ॥ कारयेद्वामहीभर्तोब्रूहितत्वानितानिच ॥ १ ॥

अर्थ- मनुराजा प्रश्न करतो हे भगवन् राजानें आपले रक्षणाविषयीं जीं गुह्य साधनें किल्ल्यांत अथवा राजधानींत करवून ठेववावीं; तीं यथास्थित मला कथन करा.

मत्स्यउवाच ॥ शिरीषोदुंबरशमीबीजपूरंघृतप्लु
तं ॥ क्षुद्योगःकथितोराजन्मासार्धतुपुरात
नैः ॥ २ ॥

अर्थ- तेसमयीं मत्स्यरूपी भगवान् बोलले कीं, हे राजा शिरस, उंबर, शमी व महाळुंग, हे पदार्थ एकत्र करून तुपांत घालून अर्धमासपर्यंत ठेवून तें भक्षण केलें असतां, क्षुधा प्रदीप्त होते; असें पुरातन ऋषींनीं सांगितलें आहे.

कशेरुफलमूलानिइक्षुमूलंतथाबिसं ॥ दूर्वाक्षी
रघृतेर्मंडःसिद्धोयंमासिकःपरः ॥ ३ ॥ नरंशस्त्र
हतंप्राप्तोनतस्यमरणंभवेत् ॥

अर्थ- कन्नोऱ्याचीं फलें, मूळें, उसाचीं मूळें, कमळाचें मूळ, दूर्वा, दुग्ध, घृत यांचा मंड करून एक मास पर्यंत ठेऊन सिद्ध झालेला तो मंड शस्त्रानें जखम लागलेल्या मनुष्यानें प्राशन केला असतां, तो मृत्यु पावणार नाहीं,

कल्माषवेणुनातत्रजनयेत्तुविभावसुं ॥ ४ ॥-
गृहेग्निरपसव्यंतुक्रियतेयत्रपार्थिव ॥ नान्यो-
ग्निर्ज्वलतेतत्रनात्रकार्याविचारणा ॥ ५ ॥

अर्थ- हे राजा काळ्या रंगाच्या वेळूपासून अग्नि उत्पन्न करावा. आणि

तो अग्नि घरांत त्रिवार प्रदक्षिण फिरविला असतां तेथें दुसरा अग्नि प्रदीप्त होत नाहीं; यांत संशय नाहीं.

कार्पासास्थ्नाभुजंगस्य तेननिर्मोचनंभवेत्॥ सर्पनिर्वासनेधूपःप्रशस्तःसततंगृहे ॥ ६॥

अर्थ- त्याचप्रमाणें कापुस व सर्पाच्या अस्थियांचा धूप निरंतर घरांत लावला असतां, तो, सर्पास गृहांतून बाहेर जाण्याविषयीं समर्थ आहे. तस्मात् सर्प, या धूपानें गृहांतून निघून जातो.

सामुद्रसैंधवयवाविद्युद्दग्धाचमृत्तिका॥ तयानुलिप्तंयद्वेश्मनाग्निनादह्यतेनृप ॥७॥

अर्थ- हे राजा तसेंच समुद्राचें मीठ, सैंधव, सातु व विजेनें दग्ध झालेली मृत्तिका हे पदार्थ एकत्र खलून त्या मातीनें सारविलेलें गृह अग्नीनें दग्ध होत नाहीं.

दिवाचदुर्गेरक्ष्योग्निर्वातिवातेविशेषतः॥ विषाच्चरक्ष्योनृपतिस्तत्रयुक्तिंनिबोधमे॥ ८॥

अर्थ- तसाच अग्नि किल्यांत दिवसास रक्षण करीत असून त्यांत वायु वहात असला तर त्या वेळेस विशेषें करून अग्नि रक्षून ठेवावा; आणि विषापासून राजाचें संरक्षण कसें करावें; यांविषयीं तूं मजपासून युक्ति श्रवण कर.

क्रीडानिमित्तंनृपतिर्धारयेन्मृगपक्षिणः॥ अन्नंवैप्राक्परीक्षेतवह्नौचान्यतरेषुच॥ ९॥

अर्थ- तें असें कीं, राजानें क्रीडेच्या निमित्त हरिणें व पक्षी यांचा संग्रह करावा. आणि त्यानें आपलें भोजन करण्याचें अन्न पूर्वीच अग्नींत टाकून किंवा त्याची अन्यरीतीनें परीक्षा करावी.

वस्त्रंपुष्पमलंकारंभोजनाच्छादनंतथा॥ नापरीक्षितपूर्वंतुस्पृशेदपिमहीपतिः॥ १०॥

अर्थ- तशींच वस्त्रें, पुष्पें, भूषणें, भोजनसाधन अन्न, झगा, नदर नदराण्यावर यातलेलें आच्छादन यांस राजानें परीक्षा केल्यावांचून पूर्वी स्पर्श करूं नये.

स्याच्चासौवक्त्रसंतप्तःसोद्वेगंचनिरीक्षते॥ विषदो

थविषंदत्तंयश्चतत्रपरीक्षते ॥ ११ ॥

अर्थ- तसाच जो विष देणारा तो मुख चर्येत संतप्त दिसत असून श्वास फ
फ अंतःकरणानें अवलोकन करतो; आणि आपण दिल्लें जें विष त्याकडे
च वहू कडून पाहत असतो.

स्रस्तोत्तरीयोविमनाःस्तंभकुड्यादिभिस्तथा ॥ प्र-
च्छादयतिचात्मानंलज्जतेत्वरतेतथा ॥ १२ ॥

अर्थ- त्यांच प्रमाणें तो विष देणारा मनांत खिन्न झाल्यामुळें त्यानें आपले-
अंगास बांधलेलें अंगवस्त्र सैल होऊन खालीं गळून पडतें; आणि लज्जनें तो
खांब, भिंत इत्यादिकांचे आडलपतो; व कांहीं कार्यांत त्वरा करतो.

भुवंविलिखतिग्रीवांतथाचालयतेनृप ॥ कंडू-
यतिचमूर्धानंपरिलोड्याननंतथा ॥ १३ ॥

अर्थ- हे राजा तसाच तो विष देणारा मनुष्य, भूमीवर रेघा काढितो, किं-
वा पोपडे काढितो; आणि मान व मुख हालवून मस्तक खाजवितो.

क्रियासुत्वरितोराजन्विपरीतास्वपिध्रुवं ॥ एव
मादीनिचिन्हानिविषदस्यपरीक्षयेत् ॥ १४ ॥

अर्थ- हे राजन् आणि तो विष घालणारा त्या विषमती काराच्या कर्मी वि
षयीं शीघ्र त्वरा करतो; अशा अनेक लक्षणां वरून राजानें विष देणाराच्या इत्या
दिक बहुत चिन्हांची परीक्षा करावी.

समीपेविक्षिपेदन्नंतदन्नंत्वरयान्वितैः ॥ इंद्रा
युधसुवर्णंतुरूक्षंस्फोरसमन्वितं ॥ १५ ॥ ए-
कावर्तंतुदुर्गंधिभृशंचटचटायते ॥ तद्धूमसे-
वनाज्जंतोःशिरोरोगश्चजायते ॥ १६ ॥

अर्थ- नंतर तें विषयुक्त अन्न राज्याच्या समीप वर्तणाऱ्या सेवकानीं त्वरेनें-
अग्नींत टाकावें; म्हणजे त्या सविष अन्नाचा वर्ण पर्जन्य कालांतील इंद्रधनुष्या
सारखा व रूक्ष होतो; आणि त्या अन्ना वर फोड आल्या सारखे दिसून त्यावर ए
कदाच भोंवऱ्याच्या आकृती समान जाळ होऊन त्या अन्नाचा दुर्गंध सुटून
अग्नींत चरचर असा मोठा शब्द होतो; व त्या अग्निसंबंधी धूर लागला अस
तां प्राणि मात्रांचे मस्तकांस रोग उत्पन्न होतो.

सविषेन्नेविलीयंतेनचपार्थिवमक्षिकाः॥ निली
नाश्चविपद्यंते संस्पृष्टेसविषेनथा॥ १७॥

अर्थ- हेराजा तशाच मक्षिका ही त्यास विषअन्नावर येत नाहीत; आणि कदाचित् येऊन बसल्या असतां, त्या विषयुक्त अन्नाचा स्पर्श होताच त-काल त्या मरण पावतात.

विरज्यतिचकोरस्य दृष्टिः पार्थिवसत्तम॥ विकृतिं
चस्वरोयातिकोकिलस्यतथानृप॥ १८॥

अर्थ- हे सार्वभौमराजा, ते सविष अन्न पाहून चकोर पक्ष्याची दृष्टि त्यावरून मागें फिरते; तसाच कोकिल पक्ष्याचा स्वर तें अन्न पाहताच बिघडतो.

गतिस्खलतिहंसस्य भृंगराजश्चकूजति॥ क्रौंचो
मदमथाभ्येतिकृकवाकुर्विरौतिच॥ १९॥

अर्थ- तसेंच त्या सविष अन्नाचे दर्शन मात्रानें हंसाची गतिस्खलन पावत्ये; मोठा भ्रमर व काका कुवा हे पक्षी शब्द करतात; क्रौंच पक्षी उन्मत्त होतो; व कोंबडा, अतिशयें शब्द करतो.

विक्रोशतिशुकोराजन्सारिकावमतेततः॥ चा
मीकरोन्यतोयातिमृत्युंकारंडवस्तथा॥ २०॥

अर्थ- हे राजन् त्या विषयुक्त अन्नाच्या अवलोकनानें राघू बहुत आक्रोश करतो; साळुंकीस वमन होतें; सुवर्णासारख्या पीत वर्णानें सुशोभित पक्षी त्या अन्नापासून अन्यत्र जातो; व कारंडव (करडुवा) पक्षी मरण पावतो.

मेहतेवानरोराजन्ग्लायतेजीवजीवकः॥ हृष्टरो
मामवेद्रुंकुः पृषतश्चैवरोदिति॥ २१॥

अर्थ- हे राजा त्या अन्नाचे दर्शनानें वानरास मल, मूत्र होतें; मोराच्या पिसासारख्या पिसांचा पक्षी ग्लान होतो; रुंगसाचे अंगावर हर्षानें रोमांच उभे रहातात व हरिण रुदन करतो.

हर्षमायातिचशिखीविषसंदर्शनान्नृप॥ अन्नं
चसविषंराजंश्चिरेणचविपद्यते॥ २२॥

अर्थ- हे मानवरक्षक राजा, मयूर पक्षी, विषदर्शनानें हर्षयुक्त होतो;

आणि विषयुक्त अन्न, बहुकालानें नाशपावतें.

तदाभवतिनिःश्राव्यंपक्वपर्युषितोपमं॥ व्या-
पन्नरसगंधंचचंद्रिकाभिस्तथायुतं॥२३॥

अर्थ- तसेंच तें सविष अन्न चांदण्यांत ठेवलें असतां त्याकालीं तें पंध रादिवसांच्या पर्युषित (शिळ्या) अन्नासारखें रस वगैरे गंध यानीं रहित होऊन दुर्गंधयुक्त झाल्यामुळें श्रवणा सही अयोग्य होतें.

व्यंजनानांतुशष्कत्वंद्रवाणांबुद्बुदोद्भवः॥ स-
सैंधवानांद्रव्याणांजायतेफेनमालिता॥२४॥

अर्थ- त्यांत भाज्या, तिकरें आदिकरून व्यंजन पदार्थ त्या विषयुक्त अन्नाच्या योगानें शष्क होतात, तसेंच जे पातळ पदार्थ आहेत त्यांस बुडबुडे उत्पन्न होतात. व लवणयुक्त पदार्थांस बहुत फेंस येतो,

सस्यराजिश्चताम्रास्यान्नीलाचपयसस्तथा
॥ कोकिलाभाचमद्यस्यतोयस्यचनृपोत्तम॥
॥२५॥

अर्थ- हे सार्वभौमराजा, त्या विषयुक्त अन्नावर धान्य घातलें असतां, ते आरक्त वर्ण होतें; तसेंच दूध कृष्णवर्ण होतें; आणि मद्य व उदक यांचा रंग कोकिल पक्ष्यासमान दिसतो.

धान्याम्लस्यतथाकृष्णाकपिलाकोद्रवस्यच॥ म
धुश्यामाचतक्रस्यनीलापीतातथैवच॥२६॥

अर्थ- तशीच आंबील, त्यास विषपदार्थावर टाकली असतां, तिचा कृष्ण वर्ण होतो, तसाच हरिक धान्याचा पिंगट वर्ण होतो; आणि ताकास, मद्यासारखा वर्ण अथवा कृष्णवर्ण, निळा वर्ण किंवा पीतवर्ण असा रंग प्राप्त होतो.

घृतस्योदकसंकाशाकपोताभाचसक्तुः॥ हरि-
तामाक्षिकस्यापितैलस्यचतथारुणा॥२७॥

अर्थ- त्याच प्रमाणें घृताचा रंग उदकासारखा होतो; तसेंच तेजःपुंज उत्तमशरीर त्या विषसंबंधानें कपोत (खबुतर) या पक्ष्यासारखें निस्तेज दिसतें; आणि मध त्या विषयुक्त पदार्थांच्या संयोगानें हिरवा होतो; व तेल आरक्त वर्ण होतें.

फलानामप्यपक्कानांपाकःक्षिप्रंप्रजायते ॥ प्र-
कोपश्चैवपक्कानांमाल्यानांम्लानतातथा ॥ २८ ॥

अर्थ- तशींचहिरवीं फळें सविष अन्नाचे संयोगानें त्वरितपिकतात; आ-
णि पिकलेलीं फळें तत्काळ उतरतात; वपुष्पेंम्लान होतात.

मृदुताकठिनानांस्यात्मृदूनांचविपर्ययः ॥ सूक्ष्मा
नांरूपदलनंतथाचैवातिरंगता ॥ २९ ॥

अर्थ-तसेचकठिणपदार्थ, विषस्पर्शानेंमृदु वमृदुवस्तु कठिण होतात; वत्या
विषसंबंधानें कोमल मनुष्यांचे रूपाचा नाश होऊन त्यांच्या देहाचा वर्ण वि
परीत होतो.

श्याममंडलताचैववस्त्राणांवैतथैवच ॥ लोहानांच
मणीनांचमलपंकोपदिग्धता ॥ ३० ॥

अर्थ- त्याचप्रमाणें त्या सविष पदार्थावर वस्त्रें ठेवलीं असतां, त्यांवर कृ
ष्णवर्ण मंडलें उठतात; आणि लोखंड वमणियांस त्याविषयुक्त पदार्थांचा
मलिन बलक चिकटून रहातो.

अनुलेपनगंधानांमाल्यानांचनृपोत्तम ॥ विगंध
ताचविज्ञेयातथाराजन्जलस्यतु ॥ ३१ ॥

अर्थ- हेमहाराज, उटीचे गंध, पुष्पें वउदकयांस त्यासविषअन्नाच्या-
संबंधानें दुर्गंध भास होतो.

दंतकाष्ठत्वचःश्यामास्तनुसत्वास्तथैवच ॥ ए-
वमादीनिचिन्हानिविज्ञेयानिनृपोत्तम ॥ ३२ ॥

अर्थ- हेराजेंद्रा, त्यासविष पदार्थांच्या संबंधानें दंत, काष्ठ, त्वचाहीं कृ-
ष्णवर्ण होतात; वजे बलिष्ठ असतात ते कृश होतात; इत्यादिक सविष-
अन्नाचीं चिन्हें जाणावीं.

तस्माद्राजासदातिष्ठेत्मणिमंत्रौषधागणैः ॥ उ
क्तैःसंरक्षितोराजाप्रमादपरिवर्जकः ॥ ३३ ॥

अर्थ- यास्तव राजानें निरंतर यासांगितलेल्या मणि, मंत्र व औषधें-
यांच्या समुदायांसहित असून यानीं स्वतःसुरक्षितरीतीनें वर्तून साव-
ध असावें.

प्रजातरोर्मूलमिहावनीशस्तद्रक्षणाद्राष्ट्रमुपैतिवृ-
द्धिं ॥ तस्मात्प्रयत्नेननृपस्यरक्षासर्वेणकार्यारवि
वंशचंद्र ॥ ३५ ॥

अर्थ- कारण हे सूर्यवंशाल्हादका याभूलोकीं, पृथ्वीपतिहा प्रजारूप वृक्षाचें मूल आहे; यास्तव त्याराजाच्या रक्षणानें राष्ट्र वृद्धिंगत होतें; एतदर्थ राजानें सर्व प्रकारें प्रयत्नें करून आपलें संरक्षण करावें. इतिश्री मत्स्यपुराणे राजरक्षारहस्य कथनं नाम एकोनविंशत्युत्तरद्विशततमोऽध्यायः ॥ २१९॥

अध्याय २२०वा.

मत्स्यउवाच ॥ राजन्पुत्रस्यरक्षाचकर्तव्यापृथिवी
क्षिता ॥ आचार्यश्चात्रकर्तव्योनित्ययुक्तश्चरक्षि
भिः ॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् बोलले कीं, हे राजा, पृथ्वीपतीनें आपले पुत्राचें संरक्षण करावें; तें असें कीं, त्याविषयीं त्यानें एक गुरु ठेवावा; तो त्या राजपुत्रास रक्षण करणाऱ्या सेवकानीं निरंतर युक्त असावा.

धर्मकामार्थशास्त्राणिधनुर्वेदंचशिक्षयेत् ॥ रथेच
कुंजरेचैनंव्यायामंकारयेत्सदा ॥ २ ॥

अर्थ- आणि त्या गुरूकडून राजानें आपले पुत्रास धर्म, अर्थ, व काम यासंबंधि सर्वशास्त्रें व धनुर्वेद हीं शिकवावीं आणि त्या राजकुमरास रथ व गज यांवर बसवून निरंतर व्यायाम करवावा.

शिल्पानिशिक्षयेच्चैनंनाप्तोमिथ्याप्रियंवदेत् ॥ श
रीररक्षाव्याजेनरक्षिणोस्यनियोजयेत् ॥ ३ ॥

अर्थ- तशींच त्यास गुरूनें शिल्प (कलाकौशल्यादिक विद्या) शिकवाव्या. आणि त्या शिक्षकानें त्याशीं असत्य असून प्रिय असें भाषण करूं नये. व त्यानें राजपुत्राच्या देहसंरक्षणार्थ बहुत सेवक नेमावे.

नचास्यसंगोदातव्यःक्रुद्धलुब्धावमानितैः ॥ त-
थाचविनयेदेनंयथायौवनगोचरे ॥ ४ ॥ इंद्रियैर्नाप
कृष्येतसतांमार्गात्सुदुर्गमात् ॥

अर्थ- तसेंच कोपिष्ट, विषयलुब्ध व अपमान पावलेले यांची संगति राज-

पुत्रास घडूं देऊं नये; तसेंच त्यास तरुण वयांत अतिदुर्लभ साधमार्गीतून इं द्रिय संबंधानें भ्रष्टत्व न येईल अशी गुरूनें शिक्षा करावी.

गुणाधानमशक्यंतु यस्यकर्तुस्वभावतः ॥ ५ ॥ बंधनंतस्यकर्तव्यंगुप्तदेशोसुखान्वितं ॥ अविनीतकुमारंहिकुलमाशुविशीर्यते ॥ ६ ॥

अर्थ- तसेंच राजपुत्राच्या स्वभावामुळें त्याजकडून गुण ग्रहण करविण्यास गुरु असमर्थ झाला असतां; गुरूनें त्यास दुःख न होतां गुप्तस्थानीं बांधून ठेवावें; कारण अशिक्षित राजकुमाराचें कुलशीघ्र नाशापावतें.

अधिकारेषुसर्वेषुविनीतंविनियोजयेत् ॥ आदौस्वल्पेततः पश्चात्क्रमेणाथमहत्स्वपि ॥ ७ ॥

अर्थ- आणि गुरूनें वराजानें विनयसंपन्न राजपुत्राची योजना सर्व अधिकारांवर करावी. त्यांत प्रथमतः स्वल्प अधिकारांवर त्यास योजून पश्चात्क्रमानें श्रेष्ठ अधिकारांवर ही योजावें.

मृगयापानमक्षांश्चवर्जयेत्पृथिवीपतिः ॥ एतान्येसेवमानास्तुविनष्टाः पृथिवीक्षितः ॥ ८ ॥ बहवोनरशार्दूलतेषांसंख्यानविद्यते ॥ दिवास्वापंक्षितीशस्तुविशेषेणविवर्जयेत् ॥ ९ ॥

अर्थ- तशीच मृगया, मद्यादिकांचें प्राशन व द्यूत हीं राजानें वर्ज करावीं; कारण हे राजश्रेष्ठा या मृगयादिकांच्या सेवनानें जे बहुत राजे नाशपावले; त्यांची संख्या नाहीं; आणि पृथ्वीपतीनें दिवानिद्रा अवश्य वर्ज करावी.

वाक्पारुष्यंनकर्तव्यंदंडपारुष्यमेवच ॥ परोक्षनिंदाचतथावर्जनीयामहीक्षिता ॥ १० ॥

अर्थ- त्याचप्रमाणें राजानें कठोरभाषण गालिप्रदान, व उग्र दंड करणें हीं करूं नयेत; आणि त्यानें कोणाची ही परोक्ष (असमक्ष) निंदा करूं नये.

अर्थस्यदूषणंराजाद्विप्रकारंविवर्जयेत् ॥ अर्थानांदूषणंचैकंतथार्थेषुचदूषणं ॥ ११ ॥

अर्थ- तसेंच राजानें अर्थसंबंधि दोनप्रकारचें दूषण अवश्य वर्ज्य करावें;- तें असें कीं, एक अर्थसंबंधि दूषण व अर्थावर येणारें दूषण हे दुसरें आहे.

प्राकाराणांसमुच्छेदोदुर्गादीनामसत्क्रिया ॥ अ
र्थानांदूषणंप्रोक्तंविप्रकीर्णत्वमेवच ॥ १२ ॥

अर्थ- त्यांत राजधानी, गांव राजमंदिरें यांचा सर्वथा उच्छेद करणें, किल्ले वतट इत्यादिकांची विपरीत रचना करणें वधनादिक सर्व वस्तूंची अव्यवस्था असणें हें अर्थसंबंधि दूषण आहे.

अदेशकालेयद्दानमपात्रेदानमेवच ॥ अर्थेषुदूष
णंप्रोक्तमसत्कर्मप्रवर्तनं ॥ १३ ॥

अर्थ- आणि अनुक्त देशकालीं व अपात्रीं जें दान करणें, तसाच द्रव्याचा विनियोग असत्कर्मी कडे करणें हें अर्थाविषयीं दुसरें दूषण आहे.

कामःक्रोधोमदोमानोलोभोहर्षस्तथैवच ॥ एतेव
र्ज्याःप्रयत्नेनसादरंपृथिवीक्षिता ॥ १४ ॥

अर्थ- तसेंच काम, क्रोध, मद, गर्व, लोभ व हर्ष हे राजानें अवश्य वर्ज्य करावे.

एतेषांविजयंकृत्वाकार्योभृत्यजयस्ततः ॥ कृत्वा
भृत्यजयंराजापौरान्जानपदान्जयेत् ॥ १५ ॥

अर्थ- असे ते कामक्रोधादिक जिंकून पश्चात् राजानें सेवकांस स्वाधीन करून मग त्यानें आपले राजधानीतील व स्वदेशांतील या लोकांस वश करावें

कृत्वाचविजयंतेषांशत्रून्बाह्यांस्ततोजयेत् ॥-
बाह्याश्चविविधाज्ञेयास्तुल्याभ्यंतरकृत्रिमाः ॥
॥ १६ ॥ गुरवस्तेयथापूर्वंतेषुयत्नपरोभवेत् ॥

अर्थ- असे पूर्वोक्त सर्व स्वाधीन करून नंतर राजानें बाह्य शत्रूंस जिंकावें, ते बाह्य शत्रु अनेक प्रकारचे असतात; त्यांत कित्येक बरोबरीचे असून कित्येक अल्प बल असल्यामुळें ते अभ्यंतरी कृत्रिमी व कांहीं आपणापेक्षां बलिष्ठ असतात; यास्तव त्या शत्रूंचे पराजया विषयीं राजानें निरंतर प्रयत्नशील असावें.

पितृपैतामहंमित्रमभित्रंचतथारिपोः ॥ १७ ॥-
कृत्रिमंचमहाभागमित्रंत्रिविधमुच्यते ॥ तथापि

चगुरुः पूर्वं भवेत्तत्रापिचादृतः ॥ १८ ॥

अर्थ- हे महाभाग्यशालिन्, पिता व पितामह यांच्या परंपरेनें चालत आलेला मित्र, आपले शत्रूचा द्वेषी, उपकारादिक कृतीनें झालेला नवीन मित्र असे हे तीन प्रकारचे मित्र आहेत; तसाच गुरु हा सर्वांच्या पूर्वीचा हितकर्ता मुख्य मित्र आहे; यास्तव राजानें त्या गुरुविषयीं परमादरानें वर्तावें.

स्वाम्यमात्योजनपदोदुर्गंदंडस्तथैवच ॥ कोशोमि त्रंचधर्मज्ञसप्तांगंराज्यमुच्यते ॥ १९ ॥

अर्थ- हे धर्मज्ञ मनुराजा, राजा, १ प्रधान, २ देश, ३ किल्ला, ४ दंड, ५ भांडारगृह, ६ व मित्र ७ हीं राजाचीं सात अंगें आहेत.

सप्तांगस्यापिराज्यस्यमूलंस्वामीप्रकीर्तितः ॥ तन्मू लत्वात्तथांगानांसतुरक्ष्यःप्रयत्नतः ॥ २० ॥

अर्थ- त्यांत राजा हा यासात अंगयुक्त राज्याचें मूल आहे; तस्मात् राजाच्या योगानें प्रधानादिक सहा अंगांची स्थिति होते; यास्तव त्या प्रधानादिकांनीं राजाचें संरक्षण प्रयत्नानें करावें.

षडंगरक्षाकर्तव्यातथातेनप्रयत्नतः ॥ अंगेभ्योय स्तथैकस्तुद्रोहमाचरतेल्पधीः ॥ २१ ॥ बधस्तस्यतु कर्तव्यः शीघ्रमेवमहीक्षिता ॥

अर्थ- तसेंच राजानें ही राज्यहितार्थ प्रधानादिक सहा अंगांचें प्रयत्नानें संरक्षण करावें; आणि त्यांतील कोणी एकादा जो अल्पबुद्धीनें त्या सहा अंगांचा द्रोह करतो; त्यास राजानें प्रतिबंधांत ठेवावें.

नराज्ञामृदुनाभाव्यंमृदुर्हिपरिभूयते ॥ २२ ॥ नभा व्यंदारुणेनातितीक्ष्णादुद्विजतेजनः ॥ कालेमृदुर्यो भवतिकालेभवतिदारुणः ॥ २३ ॥ राजालोकद्वया पेक्षीतस्यलोकद्वयंभवेत् ॥

अर्थ- त्याचप्रमाणें राजानें मृदुवृत्तीनें सर्वत्र वर्तूं नये; कारण कोमल स्वभावानें राजा पराभव पावतो; तसाच त्यानें उग्रस्वभाव ही सर्वत्र दर्शवूं नये; कारण त्या अतिक्रूरतेमुळें सर्व लोक भयभीत होतात; यास्तव जो राजा, हा लोक व परलोक यांच्या इच्छेनें समयीं मृदु व प्रसंगीं भयंकर अशारीती

नें वर्ततो; त्यासयालोकीं वपरलोकीं सुख होतें.

भृत्यैःसहमहीपालःपरिहासंविवर्जयेत् ॥ २४॥
भृत्याःपरिभवंतीहनृपंहर्षवशागतं ॥ व्यसनानि
चसर्वाणिभूपतिःपरिवर्जयेत् ॥ २५ ॥

अर्थ- तसेंच राजानें आपले सेवकांशीं विनोद करूंनये; कारण सेवक, विनोदसंबंधि हर्षाच्या स्वाधीन झालेल्या राजाची अमर्यादा करतात. तशींच सर्व व्यसनें राजानें वर्ज्य करावीं.

लोकसंग्रहणार्थायकृतकव्यसनोभवेत् ॥ शौं-
डीरस्यनरेंद्रस्यनित्यमुद्रिक्तचेतसः ॥ २६ ॥ ज-
नाविरागमायांतिसदादुःसेव्यभावतः ॥ स्मितपू
र्वाभिभाषीस्यात्सर्वस्यैवमहीपतिः ॥ २७ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें राजानें सर्वलोकांच्या संरक्षणार्थ गुणग्रहणाविषयीं व्यसनी असावें; आणि गर्विष्ठ असून निरंतर उच्छृंखल स्वभाव फक्त अशा राजा वर सर्व लोक उदासीन होतात; कारण त्याचा स्वभाव सेवन करण्यास सर्वदा अशक्य असतो; यास्तव राजानें सर्वांशीं हास्य पूर्वक मधुर संभाषणच करावें.

वध्येष्वपिमहाभागभ्रुकुटिंनसमाचरेत् ॥ भा-
व्यंधर्मभृतांश्रेष्ठस्थूललक्ष्येणभूभुजा ॥ २८ ॥

अर्थ- बहुत काय सांगावें हे महाभाग्य शालिन्, प्राणांत शासन योग्य अपराधी मनुष्यां वरही राजानें वक्र भृकुटि (भोंवई) करूंनये; आणि हे धार्मिकश्रेष्ठा, राजानें प्रायः सर्वत्र स्थूल दृष्टि ठेवावी.

स्थूललक्ष्यस्यवशगासर्वाभवतिमेदिनी ॥ अ-
दीर्घसूत्रश्चभवेत्सर्वकर्मसुपार्थिवः ॥ २९ ॥

अर्थ- तसाच जो राजा स्थूल दृष्टि असतो; त्याच्याच स्वाधीन सर्व पृथ्वी होते. आणि राजानें सर्वकार्यांत दीर्घ सूत्री नसावें.

दीर्घसूत्रस्यनृपतेःकर्महानिर्ध्रुवंभवेत् ॥ रागेद
र्पेचमानेचद्रोहेपापेचकर्मणि ॥ ३० ॥ अप्रिये-
चैवकर्तव्येदीर्घसूत्रःप्रशस्यते ॥

अर्थ- कारण दीर्घसूत्री राजाचा कार्यनाश निश्चयें करून होतो. तसेंच विषयाभिलाष, मद, अहंकार, द्रोह, पापकर्म, व प्रजेला अप्रिय कृत्य करणें याविषयीं राजानें दीर्घसूत्री असणें हें त्यास फक्त आहे.

राज्ञा संवृतमंत्रेण सदा भाव्यं नृपोत्तम ॥ ३१ ॥ तस्या संवृतमंत्रस्य राज्ञः सर्वापदो ध्रुवं ॥

अर्थ- हे महाराज, राजानें आपला संकेत निरंतर गुप्त ठेवावा; कारण त्याची ती मसलत प्रसिद्ध झाली असतां, त्यास सर्व विपत्ति नियमें करून प्राप्त होतात.

कृतान्येव तु कार्याणि ज्ञायंते यस्य भूपतेः ॥ ३२ ॥ नारब्धानि महाभाग तस्य स्याद्वसुधा वशे ॥

अर्थ- हे महाभाग्यशालिन् तशींच ज्या राजाचीं संपूर्ण कार्ये सिद्ध झाल्यानंतरच इतरांस समजतात; वतीं आरंभकालीं कोणास ही समजत नाहीत; त्या राजाच्या स्वाधीन ही समग्र पृथ्वी होते.

मंत्रमूलं सदा राज्यं तस्मान्मंत्रः सुरक्षितः ॥ ३३ ॥ कर्तव्यः पृथिवीपालैर्मंत्रभेदभयात्सदा ॥ मंत्रवित्साधितो मंत्रः संपत्तीनां सुखावहः ॥ ३४ ॥ मंत्रच्छलेन बहवो विनष्टाः पृथिवीक्षितः ॥

अर्थ- आणि राज्य हें सर्वदा मसलतीनेंच चालतें; यास्तव राजानीं मसलतीचें संरक्षण गुप्त रीतीनें करावें; कारण मसलत, षट्कर्णी झाली असतां, त्यापासून राजास भय उत्पन्न होतें. तशीच मसलत तरी दूरदर्शी लोकांस हवर्तमान केली; तरच ती सर्व संपत्तीस सुखावह होते; तसेंच बहुत राजे कपटयुक्त मसलतीनें नाश पावले.

आकारैरिंगितैर्गत्या चेष्टया भाषितेन च ॥ ३५ ॥ नेत्रवक्त्रविकारैश्च गृह्यतेंतर्गतं मनः ॥ न यस्य कुशलैस्तस्य वशे सर्वा वसुंधरा ॥ ३६ ॥ भवतीह महीपाल सदा पार्थिवनंदन ॥

अर्थ- तसेंच हे राजकुलानंददायका, आकार, मानसिक अभिप्राय दर्शक चिन्ह, गमन, हस्तादिकानें सूचना करण्याची खूण, व हावभाव,

भाषण, नेत्र वमुख यांचे संकेत या साधनानीं कुशल पुरुष ज्याराजानें गूढमन स्वाधीन करूं शकत नाहीत. अथवा ज्या राजाच्या आकारादिक पूर्व चिन्हां वरून ही कुशल पुरुष ज्याचें गूढमन जाणण्यास समर्थ होत नाहीत, त्या पृथ्वी पालना विषयीं योग्य झालेल्या राजाच्या स्वाधीन सकल पृथिवी होते.

नैकस्तु मंत्रयेन्मंत्रं राजा न बहुभिः सह ॥ ३७ ॥
नारोहेद्विषमां नावमपरीक्षितनाविकां ॥

अर्थ- त्याचप्रमाणें एकाकी राजानें मसलत करूं नये, तशीच बहुत लोकां सह वर्तमान ही करूं नये; आणि ज्या नौके वरील नावाडी लोकांची परीक्षा केली नाहीं; त्या भयंकर नौकेंत बसूं नये.

ये चास्य भूमिजयिनो भवेयुः परिपंथिनः ॥ ३८ ॥
तानानयेद्वशे सर्वान्सामादिभिरुपक्रमैः ॥

अर्थ- आणि पृथ्वी जिंकण्यास प्रवृत्त झालेल्या राजास जे विघ्न करण्याविषयीं उपस्थित होतील; त्या सर्वांस राजानें साम, दान, दंड व भेद इत्यादिक उपायानीं वश करावें.

यथा न स्यात्कृशीभावः प्रजानामनवेक्षया ॥ ३९ ॥
तथा राज्ञा प्रकर्तव्यं स्वराष्ट्रं परिरक्षता ॥

अर्थ- त्याचप्रमाणें प्रजासंरक्षणाकडे चित्त न दिल्या मुळें त्यांस जे स अल्पत्व येते; यास्तव राजानें तसें न करतां; ज्या रीतीनें आपली प्रजा वृद्धिंगत होईल; त्या रीतीस अनुसरून स्वकीय राष्ट्राचे पालना विषयीं तत्पर असावें.

मोहाद्राजा स्वराष्ट्रं यः कर्षयत्यनवेक्षया ॥ ४० ॥ सो चिराद्भ्रश्यते राज्याज्जीविताच्च सबांधवः ॥

अर्थ- तसेंच जो राजा आपले राष्ट्रास अविचारानें रक्षण न करतां दुःख देतो तो स्वकीय बांधवां सहित अल्प कालानेंच राज्यावरून पदच्युत होऊन जीविनाचा ही नाश पावतो.

मृतो वत्सो जातबलः कर्मयोग्यो यथा भवेत् ॥ ४१ ॥
तथा राष्ट्रं महाभाग भृतं कर्मसहं भवेत् ॥

अर्थ- हे महाभाग्य शालिन् गायींच्या वत्साचें उत्तमरीतीनें पोषण केलें असतां, तोजसा कृषि आदिकरून कर्मास योग्य होतो; तसें राष्ट्रही सुरक्षित रक्षिलें असतां, तें राजकीय सर्व कार्यें करण्याविषयीं समर्थ होतें.

योराष्ट्रमनुगृण्हातिराज्यंसपरिरक्षति ॥ ४२ ॥ संजातमुपजीवंस्तुविंदतेसमहत्फलं

अर्थ- तसाच जोराजा स्वराष्ट्रावर कृपादृष्टि ठेवतो; तोच आपल्या राज्याचें संरक्षण करतो. आणि जोराजा प्रजेस क्लेश न देतां त्याप्रजेपासून आपलें उपजीवन करतो; तो महत्फल पावतो.

गृह्यांधिरण्यंधान्यंचमहींराजासुरक्षितां ॥ ४३ ॥ महतातुप्रयत्नेनस्वराष्ट्रस्यचरक्षिता ॥ नित्यंस्वेभ्यः परेभ्यश्चयथामातायथापिता ॥ ४४ ॥

अर्थ- तसेंच राजानें पृथ्वीचें संरक्षण करून तिजपासून सुवर्ण वधान्य ग्रहण करण्यासाठीं त्यानें महाप्रयत्नें करून स्वकीयप्रधानादिकां कडून शत्रु आदिकरून उपद्रवां पासून आपल्या राष्ट्राचें पालन करावें; तें असें कीं; मातापितर जसें स्वकीय अपत्यांचें पोषण करतात.

गोपितानिसदाकुर्यात्संयतानींद्रियाणिच ॥ अजस्रमुपयोक्तव्यंफलंतेभ्यस्तथैवच ॥ ४५ ॥

अर्थ- तशींच राजानें आपलीं इंद्रियें निरंतर नियमानें रक्षून त्यांपासून सर्वदा अक्षय्य फलाचा उपयोग करून घ्यावा.

सर्वंकर्मेदमायत्तंविधानेदैवमानुषे ॥ तयोर्दैवमचिंत्यंचपौरुषेविद्यतेक्रिया ॥ ४६ ॥

अर्थ- तसेंच राजकीय आदिकरून हें सर्व कर्म दैविक वमानुष यादोन उपायांचे आधीन आहे; त्यांतील दैविक साधन चिंतन करण्यास अशक्य असून मनुष्य प्रयत्नांत क्रियारूप साधन मुख्य आहे.

एवंमहींपालयतोस्यभर्तुर्लोकानुरागः परमोभवेत्तु ॥ लोकानुरागप्रभवाचलक्ष्मीर्लक्ष्मीवतश्चापि परांचलक्ष्मीः ॥ ४७ ॥

अर्थ- अशा रीतीनें पृथ्वीपालन करणाऱ्या राजावर प्रजेची अत्यंत प्रीति

उत्पन्न होते; अशी सर्व लोकांची प्रीतिझाली असतां, त्यापासून राज्य लक्ष्मी वृद्धिंगत होऊन त्यासंपत्तीची उत्तरोत्तर वृद्धि होते. इतिश्रीमत्स्यपुराणे द्वितीयशते राजधर्मानुकीर्तनं नामविंशत्युत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २२० ॥

अध्याय २२१वा.

मनुरुवाच ॥ दैवेपुरुषकारेचकिंज्यायस्तद्ब्रवीहि मे ॥ अत्रमेसंशयोदेवच्छेतुमर्हस्यशेषतः ॥१॥

अर्थ- नंतर मनुराजा प्रश्न करतो कीं, हे देवा, दैव व पुरुष प्रयत्न यांत श्रेष्ठ कोणतें याविषयीं मलासंशय आहे; यास्तव आपण ह्याविषय साकल्यें करून कथन करा.

मत्स्यउवाच ॥ स्वमेवकर्मदैवाख्यंविद्धिदेहांतरार्जितं ॥ तस्मात्पौरुषमेवेहश्रेष्ठमाहुर्मनीषिणः ॥२॥

अर्थ- तेसमयीं मत्स्यभगवान् बोलले; हेराजा, अन्य देहांत केलेल्या स्वकर्मासच दैव असें म्हणतात; परंतु त्या दैवापेक्षां सदाचरण रूप पुरुष प्रयत्नच श्रेष्ठ आहे; असें ऋषि मत आहे.

प्रतिकूलंतथादैवंपौरुषेणविहन्यते ॥ मंगलाचारयुक्तानांनित्यमुत्थानशालिनां ॥ ३॥

अर्थ- तसेंच जें दैवप्रतिकूल असतें; तें मंगल कारक सदाचार संपन्न असून निरंतर उद्योग शील अशा पुरुषांच्या प्रयत्नानेंतें दैवही कुंठित होतें.

येषांपूर्वकृतंकर्मसात्विकंमनुजोत्तम ॥ पौरुषेणविनातेषांकेषांचिद्दृश्यतेफलं ॥ ४ ॥

अर्थ- आणि हे मानवश्रेष्ठा, ज्यांचें प्राक्तन कर्म सात्विक असतें; त्यांकितीएक प्राण्यांस उद्योगा वांचून ही फल प्राप्त होतें.

कर्मणाप्राप्यतेलोकेराजसस्यतथाफलं ॥ कृच्छ्रेणकर्मणाविद्धितामसस्यतथाफलं ॥ ५ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें राजस कर्म करणाऱ्या जीवास कर्मानेंच फलप्राप्त होतें. आणि तामस कर्म करणारास कष्टयुक्त कर्मानेंच फलप्राप्त होतें.

पौरुषेणाप्यतेराजन्प्रार्थितव्यंफलंनरैः॥ दैवमेव
विजानंतिनराःपौरुषवर्जिताः॥ ६॥

अर्थ- हे राजन् मनुष्यांस इच्छित फल प्रयत्नानेंच प्राप्त होतें; आणि पराक्रमहीन मानव, दैवच फल प्राप्तीस कारण आहे असें मानतात.

तस्मात्त्रिकालसंयुक्तंदैवंतुसफलंभवेत्॥ पौरुषं
दैवसंपत्त्याकालेफलतिपार्थिव॥७॥

अर्थ- हे राजा तस्मात् कालत्रयीं ही पुरुषप्रयत्न युक्त जें दैव तेंच सफल होतें; या वरून पुरुष पराक्रम हीं दैवानुकूल तेंनेंच ईश्वरनियमित कालीं फलद्रूप होतो.

दैवंपुरुषकारश्चकालश्चपुरुषोत्तम॥ त्रयमेतन्म-
नुष्यस्य पिंडितं स्यात्फलावहं॥ ८ ॥

अर्थ- आणि हे पुरुष श्रेष्ठा, दैव, प्रयत्न व फलोन्मुख काल हें त्रय एकत्र झालें असतां, मनुष्यास फल प्राप्त होतें.

कृषिवृष्टिसमायोगाद्दृश्यंतेफलसिद्धयः॥ तास्तु
कालेप्रदृश्यंतेनैवाकालेकथंचन॥ ९ ॥

अर्थ- भूमि नांगरल्या वर पर्जन्य वृष्टीचा योग झाला असतां धान्यादिक फलाची सिद्धि जशी योग्य कालीं दृष्टिगोचर होते; व अकालीं कदापि होतच नाहीं.

तस्मात्सदैवकर्तव्यंसधर्मंपौरुषंनरैः॥ विपत्ताव
पियस्येहपरलोकेध्रुवंफलं॥ १०॥

अर्थ- तस्मात् मनुष्यानीं निरंतर धर्मसहित प्रयत्न करावा; कारण या लोकीं विपत्तीचें निवारण न झालें तरी परलोकीं निश्चयें करून त्याचें फल प्राप्त होतें.

नालसाःप्राप्नुवंत्यर्थान्नचदैवपरायणाः॥ तस्मा-
त्सर्वप्रयत्नेनआचरेद्धर्ममुत्तमं॥ ११॥

अर्थ- तसेंच जे आलस्ययुक्त व दैवनिष्ठ पुरुष आहेत; त्यांस फलप्राप्ति होत नाहीं; तस्मात् सर्व प्रयत्नानें उत्तम धर्म रूप उद्योगाचें आचरण करावें.

त्यक्त्वालसान्दैवपरान्मनुष्यानुत्थानयुक्तान्पुरुषा

नृहि लक्ष्मीः ॥ अनिष्यमत्नाहृणुयान्नुपेंद्रतस्मात्स
दोत्थानवताहिभाव्यं ॥ १२ ॥

अर्थ- हे राजेंद्रा कारण लक्ष्मी, आलस्ययुक्त व केवल देव निष्ठ अशा मानवांस सोडून धर्मयुक्त उद्योग शील पुरुषांस यत्नानें शोधून त्यांस प्राप्त होते; यास्तव मनुष्यानें निरंतर प्रयत्नशील व्हावें. इतिश्री मत्स्यपुराणे राजधर्मे दैव पुरुष कारो नाम एक विंशत्युत्तर शततमोऽध्यायः ॥ २२१ ॥

अध्याय २२२ वा.

मनुरुवाच ॥ उपायांस्त्वंसमाचक्ष्वसामपूर्वान्म
हाद्युते ॥ लक्षणंचतथातेषांप्रयोगंचसुरोत्तम ॥ १ ॥

अर्थ- मनु प्रश्न करतो हे महातेजस्विन् देवाधिदेवा, राज्यांग जे सामादिक चार उपाय आहेत ते सांगून त्यांचें लक्षण प्रयोजनाही कथन करा.

मत्स्यउवाच ॥ साम भेदस्तथादानदंडश्चमनुजेश्वर
॥ उपेक्षाचतथामायाइंद्रजालंचपार्थिव ॥ २ ॥
प्रयोगाः कथिताः सप्ततन्मेनिगदतः शृणु ॥ द्विवि
धंकथितंसामतथ्यंचातथ्यमेवच ॥ ३ ॥

अर्थ- ते समयीं मत्स्य भगवान् बोलले; हे मनुष्य राज सार्वभौमा, साम, भेद, दान, दंड, उपेक्षा, माया किंवा कपट व इंद्रजाल (गारुडविद्या अथवा व्यूह रचना,) हे सात राज्यांग कार्ये सांगितलीं आहेत; तत्संबंधि कांहीं प्रकार श्रवण कर. तो असाकीं, सत्य व असत्य असें दोन प्रकारचें साम सांगितलें आहे.

तत्राप्यतथ्यंसाधूनामाक्रोशायैवजायते ॥ तत्रसा
धुः प्रयत्नेनसामसाध्योनरोत्तम ॥ ४ ॥

अर्थ- त्यांतील जें असत्य साम आहे; तें साधूंच्या दुःखास कारण होतें; आणि हे मानव श्रेष्ठा, त्यांत जो साधु आहे; तो साम उपाय युक्त प्रयत्नानें साध्य होतो.

महाकुलीनाऋजवोधर्मनित्याजितेंद्रियाः ॥ साम
साध्यानचातथ्यंतेषुसामप्रयोजयेत् ॥ ५ ॥

अर्थ- तसेंच महा कुलीन असून सरळ अंतःकरण युक्त, व धर्मतत्पर असल्या मुळें जितेंद्रिय असे जे मार्फ सामानें अनुकूल होतात; परंतु त्यांविष

यीं असत्य सामाची योजना करूंनये.

तथ्यंसामचकर्तव्यंकुलशीलादिवर्णनं॥तथातदु
पचाराणांकृतानांचैववर्णनं॥६॥

अर्थ- तसेंच त्या सज्जनांशीं कर्तव्य जें साम तें असें कीं, त्यांचें कुल शील इत्यादिकांचें वर्णन करून त्यांनीं आपणांस केलेल्या उपचारांचें वर्णन करावें.

अनयेवतथायुक्त्याकृतज्ञारव्यापनंस्वकं॥एवंसा
म्नाचकर्तव्यावशगाधर्मतत्पराः॥७॥

अर्थ- आणि अशायुक्तीनें आपले उपकार जाणण्याचें शील त्यासत्पुरुषांस सांगावें. अशासामानें ते धर्मनिष्ठ पुरुष स्वाधीन करावे.

साम्नायद्यपिरक्षांसिगृह्णंतीतिपराश्रुतिः॥तथा
प्येतदसाधूनांप्रयुक्तंनोपकारकं॥८॥

अर्थ- जरीं सामानें राक्षस ही वश होतात; असें पूर्णश्रुत आहे तरी हें साम दुर्जनांवर योजलें; असतां, हितकारक होत नाहीं.

अतिशंकितमित्येवंपुरुषंसामवादिनं॥असाधवो
विजानंतितस्मात्तत्तेषुवर्जयेत्॥९॥

अर्थ- कारण जे खलजन आहेत; ते साम उपायाचें भाषण करणाऱ्या पुरुषास हा अत्यंत शंकित चित्त आहे; असें मानतात; यास्तव त्या असज्जनांविषयीं साम उपाय वर्ज्य करावा.

येशुद्धवंशाऋजवःप्रणीताधर्मेस्थिताःसत्यप
राविनीताः॥तेसामसाध्याःपुरुषाःप्रदिष्टामानो
न्नतायेसततंचराजन्॥१०॥

अर्थ- तस्मात् हे राजा, शुद्ध व शांत उत्पन्न झाले असून स्वभावानें सरळ असल्यामुळें योग्य, धर्मशील, सत्यनिष्ठ, अतिनम्र व निरंतर मतिश्रेष्ठ असे जे पुरुष तेच साम उपायानें अनुकूल होतात. इतिश्रीमत्स्यपुराणे राजधर्मे सामविधिर्नाम द्वाविंशत्युत्तरद्विशततमोऽध्यायः॥२२२॥

अध्याय २२३वा.

मत्स्यउवाच ॥ परस्परंतुयेदुष्टाःक्रुद्धाभीता-
वमानिताः ॥ तेषांभेदंप्रयुंजीत भेदसाध्याहि-
तेमताः ॥ १ ॥

अर्थ- मत्स्य बोलले. हे मनुराजा, परस्परें दुष्टत्व मानणारे असून क्रोधयुक्त असल्या मुळें परस्परां पासून भयानें शंकित व अपमान पावलेले असे जे दुर्जन असतात त्यांविषयी भेद (फितुरी) उपायाची योजना करावी; कारण ते भेदानेंच वश होतात.

येतुयेनैवदोषेणपरस्मान्नापिबिभ्यति ॥ तेतुत-
द्दोषपातेनभेदनीयाभृशंततः ॥ २ ॥

अर्थ- तसेच शत्रूचे जे लोक स्वकीय आधिक्यानें आपल्या राजास भीत नाहीत; त्यांचें तें महत्व त्यापाशीं प्रयत्नानें न्यून करून ते त्या शत्रूपासून फितुर करावे.

आत्मीयांदर्शयेदाशांपरस्माद्दर्शयेद्भयं ॥ एवं-
हिभेदयेद्भिन्नान्यथावद्वशमानयेत् ॥ ३ ॥

अर्थ- आणि त्यांस आपली आशा दाखवून शत्रूपासून भयशंका दर्शवावी; अशारीतीनें जे भेद उपायास योग्य असतील ते फितुरीनें जसे वश होतील तसें राजानें वर्तून त्यांस स्वाधीन करावें.

संहताहिविनाभेदंशक्रेणापिसुदुःसहाः ॥ भेद
मेवप्रशंसंतितस्मान्नयविशारदाः ॥ ४ ॥

अर्थ- कारण सर्व दुर्जन एकत्र मिळाले असतां, ते फितुरी वांचून इंद्रानेंही स्वाधीन करण्यास अशक्य आहेत; यास्तव नीतिशास्त्राभिज्ञ लोक त्या दुष्टजनांस अनुकूल करण्याविषयीं भेद उपायच उत्तम आहे; असें म्हणतात.

स्वमुखेनाश्रयेद्भेदंभेदंपरमुखेनच ॥ परीक्ष्यसा
धुमन्येतभेदंपरमुखाच्छ्रुतं ॥ ५ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें शत्रु पक्षाकडील लोकांस राजानें स्वतः किंवा इतरांचे द्वारानें फितुर करावें; परंतु दुसऱ्याच्या द्वारानें झालेल्या फितुराची राजानें स्वतः परीक्षा केल्या वर तो भेद सत्य मानावा.

सद्यःस्वकार्यमुद्दिश्यकुशलैर्येहिभेदिताः ॥ भे
दितास्तेविनिर्दिष्टानैवराज्ञार्थवादिभिः ॥ ६ ॥

अर्थ- तसेंच कार्यप्रसंगीं सकार्याच्या उद्देशानें राजाच्या स्वार्थी साधक कुशल पुरुषानीं जे फितुर होण्यास योग्य शत्रु पक्षीय लोक तत्काली फितुर केले; तरी राजानें ते आपणास सर्वदा सबाह्याभ्यंतर अनुकूल आहेत; असा त्यांवर विश्वास मानूं नये.

अंतःकोपोबहिःकोपोयत्रस्यातांमहीक्षितां ॥ अंतःकोपोमहांस्तत्रनाशकःपृथिवीक्षितां ॥ ७ ॥

अर्थ- ज्याविषयीं अंतःकरणापासून आलेला कोप व मुखचर्यादिक बाह्यचिन्हांवरून दिसण्यांत येणारा क्रोध हे राजांस आहेत परंतु त्यांत अंतःकरण संबंधि जो रोष तो राजांस अत्यंत घातक आहे.

सामानकोपोबाह्यस्तुकोपःप्रोक्तोमहीभृतः ॥ महिषीयुवराजभ्यांतथासेनापतेर्नृप ॥ ८ ॥

अर्थ- तसाच राजाचा बाह्यकोप सामानें शांत होतो. आणि राजपत्नी, युवराजा व सेनापति यांस जो बाह्यक्रोध येतो; तोही सामानें शांत होतो.

अमात्यमन्त्रिणांचैवराजपुत्रेतथैवच ॥ अंतःकोपोविनिर्दिष्टोदारुणःपृथिवीक्षितां ॥ ९ ॥

अर्थ- अमात्यादिक सर्व मंत्री व राजपुत्र यांस मनःपूर्वक रोष आला असतां, तो राजांस भयंकर होतो.

बाह्यकोपेसमुत्पन्नेसुमहत्यपिपार्थिवः ॥ शुद्धांतस्तुमहाभागशीघ्रमेवजयीभवेत् ॥ १० ॥

अर्थ- हे महाभाग्यशालिन् तसाच राजास अतिमहान् बाह्य कोप आला तरी त्याचें अंतःकरण शुद्ध असेल; तर त्यास जय प्राप्त होतो.

अपिशक्रसमोराजाअंतःकोपेननश्यति ॥ सोंतःकोपःप्रयत्नेनतस्माद्रक्ष्योमहीक्षिता ॥ ११ ॥

अर्थ- आणि कोणीही राजा पराक्रमादिकानीं इंद्रासमान श्रेष्ठ जरी असला; तरी तो मनःपूर्वक आलेल्या क्रोधानें नाश पावतो; यास्तव राजानें भय

टीप ॐ राजा, राज्य पदावर असतांच राज्य कारभार करावा व आपले मागें राज्य पदीं बसावें. एतदर्थ त्यानें पुत्रादिक यथाविधि अधिकारी केलेला असतो. तो.

लें करून अंतःकोपाचा त्याग करावा.

परतःकोपमुत्पाद्य भेदेन विजिगीषुणा ॥ ज्ञातीनां
भेदनं कार्यं परेषां विजिगीषुणा ॥ १२ ॥

अर्थ- तसाच जो राजा शत्रूस फितुरीनें जिंकण्याविषयीं इच्छीत असून त्या स त्या रीतीनें शत्रु जिंकण्यास कोणी सहाय्य नसतील; तर त्यानें शत्रूच्या ज्ञातींस फितुर करावें.

रक्ष्यश्चैव प्रयत्नेन ज्ञातिभेदस्तथात्मनः ॥ ज्ञातयः
परितप्यंते सततं परितापिताः ॥ १३ ॥

अर्थ- आणि त्यानें स्वकीय ज्ञाति, शत्रूस फितुर न होण्याविषयीं प्रयत्नानें त्यांस दुःख न देतां त्यांचें संरक्षण करावें; कारण त्यांस त्रास दिला असतां, त्या ज्ञाति निरंतर संताप पावतात.

तथापि तेषां कर्तव्यं सुगंभीरेण चेतसा ॥ ग्रहणं-
दानमानाभ्यां भेदस्तेभ्यो भयंकरः ॥ १४ ॥

अर्थ- जरी कदाचित् स्वकीय ज्ञातींस राजाचे हातून ताप झाला; तरी त्यानें अतिगंभीर चित्तानें त्या ज्ञातींस दान (देणगी) व सन्मान यानीं वश करावें; कारण ते फितुर झाले असतां, त्यांपासून राजास भय उत्पन्न होतें.

नज्ञातिमनुगृण्हंति नज्ञातिं विश्वसंतिच ॥ ज्ञाति
भिर्भेदनीयास्तु रिपवस्तेन पार्थिवैः ॥ १५ ॥

अर्थ- आणि राजे आदिकरून सर्व लोक, स्वकीय ज्ञातींवर अनुग्रह किंवा विश्वास करीत नाहींत असें नाहीं; यास्तव राजानीं शत्रूंच्या ज्ञातींकडून त्यांस फितुर करावें.

भिन्ना हि शक्या रिपवः प्रभूताः स्वल्पेन सैन्येन नि
हंतुमाजौ ॥ सुसंहतानां हि तदस्तु भेदः कार्यो रिपू
णां नयशास्त्रविद्भिः ॥ १६ ॥

अर्थ- कारण प्रबल शत्रु बहुत असले; तरी भेद (फितुरीचा उपाय) केला असतां; ते युध्दांत स्वल्पसैन्यानें पराजित होण्यास शक्य होतात; तस्मात् बहुत जमावानें एकत्र झालेल्या शत्रूंस जिंकण्याविषयीं भेदच हितकारक आहे; यास्तव नीतिशास्त्रज्ञ लोकानीं त्यांचा भेद करावा.

इतिश्री मत्स्य पुराणे राजधर्मे भेदोपायो नाम त्रयो विंशत्युत्तर द्विशततमोऽध्यायः ॥२२३॥

अध्याय २२४वा.

मत्स्यउवाच ॥ सर्वेषामप्युपायानां दानं श्रेष्ठतमं मतं ॥ सुदत्तेनेह भवति दानेनोभयलोकजित् ॥१॥

अर्थ- भगवान् मत्स्य बोलले हे मनु राजा, सामादिक राजकीय सर्व उपायांत दान (देणगी) हा उपाय अत्यंत श्रेष्ठ आहे; कारण ते दान जर उत्तम रीतीनें केलें तर दाता, हालोक व परलोक यांस स्वाधीन करतो.

नसोस्ति राजन् दानेन वशगो यो न जायते ॥ दानेन वशगा देवा भवंतीह सदा नृणां ॥२॥

अर्थ- हे राजन् दुसरें असे की; दानानें वश न होणारा असा पुरुषच कोणी ही नाही; बहुत काय सांगावें देवही दानानें मनुष्यांस पालोकीं निरंतर वश होतात.

दानमेवोपजीवंति प्रजाः सर्वा नृपोत्तम ॥ प्रियोहि दानवान्लोके सर्वस्यैवोपजायते ॥३॥

अर्थ- हे सार्वभौम राजा सर्व प्रजा, दानानेंच उपजीवन पावतात; आणि जो दाता असतो; तोच लोकांत सर्वांस प्रिय होतो.

दानवान चिरेणैव तथा राजा परान् जयेत् ॥ दानवानेव शक्नोति संहतान् भेदितुं परान् ॥४॥

अर्थ- तसाच दान शूर राजा, शत्रूंस अल्पकालांतच जिंकतो; आणि दानशील राजाच एकत्र जमलेल्या शत्रूंस फितुर करण्याविषयीं समर्थ होतो.

यद्यप्यलुब्धगंभीराः पुरुषाः सागरोपमाः ॥ नगृण्हंति तथाप्येते जायंते पक्षपातिनः ॥५॥

अर्थ- तसेंच लुब्ध नसून स्वकीय अभिप्राया विषयीं समुद्रा समान गंभीर असे कोणी जे पुरुष असतील, ते यद्यपि कांहीं एक देणगी घेत नाहीत; तथापि ते त्या दान शूर राजाचे पक्षपाती होतात.

अन्यत्रापि कृतं दानं करोत्यन्यान्यथा वशे ॥ उपाये

भ्यः प्रशंसंतिदानंश्रेष्ठतमंजनाः॥ ६॥

अर्थ- तस्मात् अन्य स्थलीं दान केलें असतां, तीदेणगी ग्रहण न करणारां सही जसें वश करतें; तसा दुसरा कोणताही उपाय लोकांस अनुकूल करण्याविषयीं समर्थ नाहीं; म्हणूनच सर्व जन सामादिक उपायांत यादानउपायाचीच प्रशंसा करतात.

दानंश्रेयस्करंपुंसांदानंश्रेष्ठतमंपरं॥दानवानेव-
लोकेषुपुत्रत्वेध्रियतेसदा॥७॥

अर्थ- तसेंच दान, प्राणिमात्रांस श्रेयस्कर असल्या मुळें तेंच सर्वांत अतिशयें सर्वोत्कृष्ट आहे; आणि दानशील पुरुषच लोकांस पुत्रासमान निरंतर सुख देतो.

नकेवलंदानपराजयंतिभूर्लोकमेकंपुरुषप्रवीराः
॥जयंतितेराजसुरेंद्रलोकंसुदुर्जयंयोविबुधा-
धिवासः॥८॥

अर्थ- त्याच प्रमाणें दानशूर श्रेष्ठ पुरुष, केवल एक भूलोकासच जिंकतात असें नाहीं; तरले देवांचें वसतिस्थान असल्या मुळें अतिदुर्लभ अशा इंद्रलोकासही गमन करतात. इतिश्री मत्स्य पुराणे राजधर्मे दान प्रशंसा नाम चतुर्विंशत्युत्तर द्विशततमोऽध्यायः॥ २२४॥

अध्याय २२५वा.

मत्स्यउवाच॥ नशक्यायेवशीकर्तुमुपायत्रितयेनतु॥ दंडेनतान्वशीकुर्याद्दंडोहिवशकृन्नृणां॥१॥

अर्थ- मत्स्य रूपी भगवान् बोलले हे राजा साम, दान व भेद यातीन उपायानीं जे स्वाधीन होण्याविषयीं शक्य नाहींत; त्यांस राजानें दंडें करून वश करावें; कारण दंड हा सर्वांस वश करण्यास समर्थ आहे.

सम्यक्प्रणयनंतस्यतथाकार्यंमहीक्षिता॥धर्मशा-
स्त्रानुसारेणससहायेनधीमता॥२॥

अर्थ- परंतु बुद्धिमान् राजानें प्रधानादिक सर्व सहाय्यांसह वर्तमान धर्मशास्त्रानुसार त्या दंडाची उत्तम रीतीनें योजना करावी.

तस्यसम्यक्प्रणयनंयथाकार्यंमहीक्षिता॥ वान

प्रस्थांश्च धर्मज्ञान्निर्ममान्निष्परिग्रहान् ॥ ३ ॥ स्वदेशे
परदेशे वा धर्मशास्त्रविशारदान् ॥ समीक्ष्य प्रणयेद्दंडं
सर्वं दंडे प्रतिष्ठितं ॥ ४ ॥

अर्थ- तसीच राजानें त्या दंडाची उत्तम रीतीनें योजना अशी करावी; कीं, वानप्रस्थ, धर्मज्ञाते, ममताहीन, स्त्रीपुत्रादिक परिवार रहित तसेंच स्वदेश व परदेश यांतील धर्मशास्त्रा विषयीं निष्णात अशा सर्वांस राजानें विचार करून यथायोग्य पूर्णदंड करावा; कारण; सर्व राजकीय कृत्य दंडाच्या स्वाधीन आहे.

आश्रमी यदि वा वर्णी पूज्यो वाथ गुरुर्महान् ॥ नादंड्यो
नाम राज्ञोस्ति यः स्वधर्मेण तिष्ठति ॥ ५ ॥

अर्थ- आणि गृहस्थाश्रमी, किंवा ब्रम्हचारी, कोणी पूज्य, गुरु अथवा कोणी श्रेष्ठ यांतील जो स्वधर्मानें जर वर्तत नाहीं. तर तो राजास दंडाविषयीं पात्र नाहीं असें नाहीं.

अदंड्यान्दंडयेद्राजा दंड्यांश्चैवाप्यदंडयन् ॥ इ
हराज्यात्परिभ्रष्टो नरकं च प्रपद्यते ॥ ६ ॥

अर्थ- तसाच जो राजा दंडास योग्य नसून त्यास दंड करील; किंवा दंडयोग्यास दंड न करील; तर तो राजा या लोकीं राज्यापासून भ्रष्ट होऊन देहांतीं नरकास जातो

तस्माद्राज्ञा विनीतेन धर्मशास्त्रानुसारतः ॥ दंडप्र
णयनं कार्यं लोकानुग्रहकाम्यया ॥ ७ ॥

अर्थ- यास्तव सुशिक्षित राजानें लोकहितार्थ धर्मशास्त्रानुसार दंडाची योजना करावी.

यत्र श्यामो लोहिताक्षो दंडश्चरति निर्भयः ॥ प्रजा-
स्तत्र न मुह्यंति नेता चेत्साधु पश्यति ॥ ८

अर्थ- कारण ज्या राज्यांत राजाच्या उत्तम दंडस्थितीनें श्याम वर्ण असून आरक्तनयन फक्त अशी दंड देवता अकुंठित गतीनें संचार करीत असल्यें;- तेथील दंडकर्ता राजा जर प्रजेकडे यथाशास्त्र दृष्टीनें अवलोकन करीत आहे; तरत्या प्रजा अज्ञान स्थितींत जात नाहीत.

बालवृद्धातुरयतिद्विजस्त्रीविधवायतः ॥ मात्स्यन्यायेन भक्ष्येरन्यदि दंडं न पालयेत् ॥ ९॥

अर्थ- अशा रीतीनें राजा, सर्वांस यथायोग्य दंड न करील; तर बाल, वृद्ध, कामातुरादिक आतुर, संन्यासी, ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, स्त्रिया व विधवा हे सर्व ही परस्परें मत्स्यांसाररवे एकमेकांस भक्षण करतील.

देवदैत्योरगगणाः सर्वे भूतपतत्रिणः ॥ उत्क्रामयेयुर्मर्यादां यदि दंडं न पालयेत् ॥ १०॥

अर्थ- तसेंच दंड नसेल तर देव, दैत्य, नागगण, सर्व भूतें व पक्षी हे ही स्वकीय मर्यादेचें उल्लंघन करतील.

एष ब्रम्हाभिशापेषु सर्वप्रहरणेषु च ॥ सर्वविक्रमकोपेषु व्यवसायेचतिष्ठति ॥ ११ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें हा दंडच ब्राम्हणांचे शाप, सर्व आयुधें, सर्व पराक्रम, क्रोध व सर्व प्रकारचा व्यवसाय यांत रहातो.

पूज्यंते दंडिनो देवैर्नपूज्यंते त्वदंडिनः ॥ न ब्रम्हाणं विधातारं न पूषार्यमणावपि ॥ १२ यजंते मानवाः केचित्प्रशांताः सर्वकर्मसु ॥

अर्थ- तसेच प्रजास दंड करणारे राजे, देवांपासून सन्मान पावतात; आणि दंड न करणारे, देवांपासून सत्कार पावत च नाहीत; तसेच अतिशांत असून सर्व कर्मांत आसक्त असे ही कितीएक जन, सर्व जगास धारण करणारे ब्रम्हदेव, पूषानामक आदित्य व अर्यमा नांवाचा पितर यांची विशेष पूजा करीत नाहींत.

रुद्रमग्निंच शक्रंच सूर्याचंद्रमसौ तथा ॥ १३॥ विष्णुं देवगणांश्चान्यान्दंडिनः पूजयंति च ॥

अर्थ- आणि शिव, अग्नि, इंद्र, सूर्य, चंद्र, विष्णु व इतर देवगण हे सर्वांस दंड करणारे आहेत; यास्तव सर्व लोक त्यांची पूजा करतात.

दंडः शास्ति प्रजाः सर्वा दंड एवाभिरक्षति ॥ १४ ॥ दंडः सुप्तेषु जागर्ति दंडं धर्मं विदुर्बुधाः ॥

अर्थ- तसाच दंड हा सर्व प्रजांस शासन करून त्यांचें संरक्षण करतो; व

राजादिक सर्व लोक निद्रिस्त झाले तरी दंड,जागृत असतो; यास्तव ज्ञाते लोक दंडास धर्म असें म्हणतात.

राज दंड भयादेव पापाः पापंनकुर्वते ॥१५॥ यम दंड भयादेके परस्परभयादपि ॥

अर्थ- तसेंच पाप बुद्धियुक्त लोक, राजदंडाचे भयामुळेंच पापें करीत नाहींत; आणि कित्येक जन यमदंडभयानें पातकाचरण करीत नाहींत; व कांहीं लोक परस्पर भयानें पापमार्गांत जात नाहींत.

एवंसांसिध्दिकेलोकेसर्वंदंडेप्रतिष्ठितं ॥१६॥ अंधेतमसिमज्जेयद्यदिदंडनपातयेत् ॥

अर्थ- या प्रमाणें या स्वभाव सिध्द लोकांत सर्व लोकांची स्थिति दंडानें सुस्थिर चालत्ये; आणि असा दंड नसेल; तर बहुत काय सांगावें कीं, हे सर्व लोक या लोकीं सुख नपावतां देहांतीं अंधंतम नरकांत बुडतील.

यस्माद्दंडोदमयतिअदंड्यान्दमयत्यपि ॥ दमनाद्दंडनाच्चैवतस्माद्दंडंविदुर्बुधाः ॥१७॥

अर्थ- तसेंच दंडास अयोग्य अशा पुरुषांचा निग्रह करणाऱ्या पुरुषास हा दंड, शासन करून स्थिती वर आणतो; तस्मात् जिंकणें व शासन करणें या दोन कारणां वरून ज्ञानी लोक त्यास दंड, असें म्हणतात.

दंडस्यभीतेस्त्रिदशैःसमेतैर्भागोधृतःशूलधरस्ययज्ञे ॥ दत्तंकुमारध्वजिनीपतित्ववरंशिशूनांचभयाद्बलस्य ॥१८॥

अर्थ- आणि त्रिशूल धारी शिवाच्या दंड भीतीनें सर्व देव एकत्र जमून त्यानीं यज्ञांत त्यास भाग दिला; तसेंच दैत्य सैन्याचे भयास्तव त्या देवानीं कार्तिक स्वामीस आपलें सेनापतित्व व बालक संरक्षणार्थ वर दिला. इतिश्री मत्स्य पुराणे राज धर्मे दंड प्रशंसा नाम पंचविंशत्युत्तर द्विशततमोऽध्यायः ॥२२५॥

अध्याय २२६वा.

मत्स्यउवाच ॥ दंडप्रणयनार्थायराजासृष्टः स्वयंभुवा ॥ देवभागानुपादायसर्वभूतादिगु-

सर्ये ॥ १ ॥

अर्थ- मत्स्य बोलले कीं, हे राजा, ब्रम्हदेवानीं सर्व लोकपालांचे अंशग्रहण करून सृष्टिकालाचे आरंभीं सर्वांस यथार्थ दंड करून सर्व प्राणिमात्रांच्या संरक्षणार्थ राजा उत्पन्न केला.

तेजसायदमुंकश्चिन्नैवशक्नोतिवीक्षितुं ॥ ततो भवतिलोकेषुराजाभास्करवत्प्रभः ॥ २ ॥

अर्थ- आणि सर्व लोकपालांच्या तेजामुळें राजाकडे अवलोकन करण्यास कोणीही समर्थ होत नाहीं; यास्तव राजा,स्वतेजानें लोकास सूर्यासमान भास होतो.

यदास्यदर्शनेलोकःप्रसादमुपगच्छति ॥ नयनानंदकारित्वात्तदाभवतिचंद्रमाः ॥ ३ ॥

अर्थ- तसेंच सर्व लोक ज्याकाळीं राजाचें दर्शन झालें असतां,आनंद पावतात; त्याकाळीं प्रजेच्या नेत्रांस आनंद उत्पन्न करण्याच्या हेतूनें तो राजा लोकांस चंद्रासारखा संतोष कारक होतो.

यथायमःप्रियद्वेष्येप्राप्तेकालेप्रयच्छति ॥ - तथाराज्ञाविधातव्याःप्रजास्तद्धियमव्रतं ॥ ४ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें यमधर्म जसें सर्व लोकांस यथायोग्य फल देतो; तसें राजानें सर्व प्रजायोग्यतानुरूप पालन कराव्या हें यमाचें व्रत राजास अवश्य इष्ट आहे.

वरुणेनयथापाशैर्बद्धएवप्रदृश्यते ॥ तथापापान्निगृण्हीयाद्व्रतमेतद्धिवारुणं ॥ ५ ॥

अर्थ- तसेंच वरुण आपलें पाशानीं अपराधी पुरुषास जसें बद्ध करतो; तसें राजानें ही पापकर्म नकरण्याविषयीं प्रजेचा निग्रह करावा. हें वरुणाचें व्रत,राजानें अवश्य ग्रहण करावें.

परिपूर्णंयथाचंद्रंदृष्ट्वाहृष्यतिमानवः ॥ तथा प्रकृतयोयस्मिन्सचंद्रव्रतिमोनृपः ॥ ६ ॥

अर्थ- आणि षोडशकलायुक्त पूर्णचंद्र अवलोकन करून मानव जसा हर्ष पावतो; तशा सर्व प्रजा ज्या राजाचे दर्शनानें संतोष पाव-

तात. तो राजा सर्व लोकांस चंद्रासारखा वंद्य होतो.

प्रतापयुक्तस्तेजस्वी नित्यं स्यात्सर्वकर्मसु॥ दुष्टसामंतहिंस्रेषु राजाग्नेयव्रते स्थितः॥७॥

अर्थ- तसेंच प्रतापयुक्त तेजस्वि राजानें निरंतर सर्व कार्यांत तत्पर असून दुष्ट मांडलिक राजे व हिंसा करणारे मनुष्यादिक सर्व प्राणी यांस शासन करण्याविषयीं अग्नीसारखें तीक्ष्ण रीतीनें वर्तावें.

यथा सर्वाणि भूतानि बिभर्ति पार्थिवं व्रतं॥ इंद्रस्यार्कस्य वातस्य यमस्य वरुणस्य च॥८॥ चंद्रस्याग्नेः पृथिव्याश्च तेजो व्रतं नृपश्चरेत्॥ वार्षिकांश्चतुरो मासान्-यथेंद्रोप्यथ वर्षति॥९॥ तथाभिवर्षेत्स्वं राज्यं काममिंद्रव्रतं स्मृतं॥

अर्थ- जशी पृथ्वी सर्व प्राणिमात्रांस धारण करिते; तसेंहें भूमीचें सर्वसहन करण्याचें व्रत, राजास सज्जनांविषयीं अवश्य आहे; आणि इंद्र, सूर्य, वायु, यम, वरुण, चंद्र, अग्नि व पृथ्वी यांचें तेज, राजानें आपले अंगीं धारण करावें; तें असें कीं, जसा इंद्र प्रतिवर्षी वर्षाकालीं चातुर्मास्यांत पर्जन्य वृष्टि करतो. तसें राजानें स्वकीय राष्ट्रांतील प्रजेचे यथेच्छ मनोरथ पूर्ण करावे. हें इंद्रव्रत, राजानें अवश्य ग्रहण करावें.

अष्टौ मासान्यथादित्यस्तोयं हरति रश्मिभिः॥ तथा हरेत्करं राष्ट्रान्नित्यमर्कव्रतं हि तत्॥

अर्थ- तसेंच सूर्य आपले किरणानीं पृथ्वीवरील उदक आठ महिने पर्यंत जसें आकर्षण करतो; तसा राजानें आपले राष्ट्रांतील प्रजेपासून कर ग्रहण करावा. हें सूर्याचें व्रत, राजास सर्वदा अवश्य आहे.

प्रविश्य सर्वभूतानि यथा चरति मारुतः॥ तथा चारैः प्रवेष्टव्यं व्रतमेतद्धि मारुतं॥११॥

अर्थ- त्याचप्रमाणें जसा वायु सर्व प्राणिमात्रांचे अंतर्यामीं प्रवेश करून संचार करतो. तसें राजानें आपले दूतांकडून स्वकीय व परकीय राज्यांत प्रवेश करवून सर्वत्र संचार करवावा हें वायूचें व्रत, राजास अवश्य ग्राह्य आहे.

इतिश्री मत्स्यपुराणे राजधर्मे दंडप्रशंसा नाम षड्विंशत्युत्तरद्विशततमो॰

अध्याय २२७वा.

मत्स्यउवाच ॥ निक्षेप्यस्यसमंमूल्यंदंड्योनिक्षेपभक्तथा वस्त्रादिकसर्वस्यनतदाधर्मोनहीयते ॥१॥

अर्थ— मत्स्य भगवान् बोलले हे मनुराजा, वस्त्रादिक सर्व वस्तु ज्याजवळ ठेवल्या आहेत; त्यानें त्या वस्तूंचा अपहार केला असतां, त्यास राजानें त्या ठेवीच्या समान मूल्याचा (किंमतीचा) दंड करावा; असें केलें असतां धर्मास बाध येत नाहीं.

योनिक्षेपंनार्पयतियश्चानिक्षिप्ययाचते ॥ तावुभौचोरवच्छास्यौदाप्यौवाद्विगुणंधनं ॥२॥

अर्थ— तसाच जो कोणी, ठेवलेली वस्तु ज्याची त्यास जर देत नाहीं. आणि जो आपली ठेव, दुसऱ्याजवळ नठेवतां त्यासजर मागतो. तर राजानें त्यादोघांस चोरासारखें शासन करावें किंवा त्यांपासून ती ठेव नदेणें व ठेव नठेवतां मागणें यांचे द्विगुणित द्रव्याचा दंड करावा.

उपधाभिश्चयः कश्चित्परद्रव्यंहरेन्नरः ॥ ससहायः सहंतव्यः प्रकामंविविधैर्वधैः ॥३॥

अर्थ— आणि जो कोणी मनुष्य कपटानें परद्रव्य हरण करतो; त्यास व त्यानें साहाय्य करणाऱ्या लोकांस ही अनेक प्रकारें वध करण्याचे रीतीनीं त्यास यथेच्छ मारावें.

योयाचितंसमादायनतद्द्याद्यथाक्रमं ॥ सनिगृह्यबलाद्दाप्योदंड्यो वापूर्वसाहसं ॥४॥

अर्थ— तसाच जो कोणी परधन ज्याचें त्यानें मागीतलें असून त्यास पूर्व संकेताप्रमाणें जर देत नाहीं; तर राजानें त्यास बलात्कारानें निग्रह करून दोनशे सत्तर पैसे दंड करून तें द्रव्य ज्याचें त्यास द्यावें.

अज्ञानाद्यदिवाकुर्यात्परद्रव्यस्यविक्रयं ॥ निर्दोषोज्ञानपूर्वंतुचोरवद्वधमर्हति ॥५॥

---

* शेष शतमानापेक्षां अधिक असल्यास प्राणांत शिक्षाकरावी. आणिपन्नास संख्ये हून अधिक असलेंतर हस्तादिक अंगाचा छेद करावा व यापन्नास संख्ये पेक्षां न्यून असलें तर ताडन करावें.

अर्थ- त्याच प्रमाणें जो निर्दोष (सभ्य) पुरुष, अजाणून किंवा बुध्दि पूर्वक जर परद्व्याचा विक्रय करील; तर तो चोरा समान दंडास पात्र होतो.

मूल्यमादाययोविद्यांशिल्पंवानप्रयच्छति॥ दंड्यःसमूल्यंसकलंधर्मज्ञेनमहीक्षिता ॥६॥

अर्थ- तसेंच वेतन किंवा मासिक संकेतानें द्रव्य घेऊन जो दुसऱ्यास विद्या किंवा कला कौशल्य शिकवीत नाहीं. त्यास धर्मज्ञ राजानें त्या दिलेल्या वेतना सहित-पूर्ण दंड करावा.

द्विजभोज्येतुसंप्राप्तेप्रतिवेश्ममभोजयन्॥ हिरण्यमाषकंदंड्यःपापेनास्तिव्यतिक्रमः॥७॥

अर्थ- आणि एकाद्या ब्राम्हणास भोजन लाभाचा प्रसंग प्राप्त झाला असतां, जो प्रत्येक गृहीं त्याचे भोजन प्राप्तीस पतित त्वादि अनेक कारणानीं प्रतिबंध करतो; त्यास राजानें एक मासा सुवर्ण, दंड करावा. कारण दंडा वांचून पापाची निष्कृति होत नाहीं.

आमंत्रितोद्विजोयस्तुवर्तमानश्चस्वेगृहे॥ निष्कारणंनगच्छेद्यःसदाप्योष्टशतंदमं॥८॥

अर्थ- तसाच जो आमंत्रण सांगितलेला ब्राम्ह ण स्वगृहीं असून योग्य कारण नसतां आमंत्रण घेतलेल्या घरीं भोजनास न जाईल, तर त्यास राजानें एकशें-आठ पण (पैसे) दंड करावा.

प्रतिश्रुत्याप्रदातारंसुवर्णंदंडयेन्नृपः॥ भृत्यश्चाज्ञांनकुर्याद्योदर्पात्कर्मयथोदितं॥९॥ सदंड्यःकृष्णलान्यष्टौनदेयंचास्यवेतनं॥

अर्थ- तसेंच जो कोणी वाचा दत्त करून तें त्यास न देईल तर राजानें त्यास ऐंशी गुंजा सोनें दंड करावा. आणि जो सेवक गर्वामुळें राजाज्ञा जर मान्य करीत नाहीं. किंवा राजानें सांगितलेलें कर्म आज्ञे प्रमाणें करीत नाही. तर राजानें त्यास आठ गुंजा सुवर्ण दंड करावा व त्यास नियमित केलेलें वेतन ही देऊं नये.

संगृहीतंनदद्याद्यःकालेवेतनमेवच॥ १०॥ अकालेतुत्यजेद्भृत्यंदंड्यःस्याच्छतमेवच॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो कोणी आपणा कडे झालेलें सेवकाचें धन यथा योग्य

कालीं नदेईल किंवा तो आपले सेवकास जर अकालीं सोडील; तर राजानें त्यास शंभर तोळे सोनें दंड करावा.

योग्रामदेशसस्यानांकृत्वासत्येनसंविदं ॥ ११ ॥ विसंवदेन्नरोलोभात्तंराष्ट्राद्विप्रवासयेत् ॥

अर्थ- तसाच जो पुरुष ग्राम, देश व धान्यें यांविषयीं सत्यत्वानें कांहीं संकेत करून पुढें तो मनुष्य लोभानें त्यापूर्व संकेतास विरुद्ध वर्त्तेल तर राजानें त्यास स्वराष्ट्रांतून घालवून द्यावें.

क्रीत्वाविक्रयवान्किंचित्यस्येहानुशयोभवेत् ॥ १२ ॥ सोंतर्दशाहात्तत्साम्यंदद्याच्चैवाददीतवा

अर्थ- त्याच प्रमाणें कोणी व्यापारी कांहीं वस्तु विकत घेऊन त्याविषयीं संदेहांत पडेल; तर त्या वस्तूची ती बरोबर किम्मत त्या वस्तूच्या मालकानें त्या व्यापाऱ्यास दहा दिवसांचे आंत परत द्यावी. व तो अशी किम्मत परत नदेईल तर ती राजानें त्याज कडून देववावी.

परेणतुदशाहस्यनदद्यान्नैवदापयेत् ॥ १३ ॥ आददन्विददंश्चैवराज्ञादंड्यःशतानिषट् ॥

अर्थ- आणि ती किम्मत तरी त्यानें किंवा राजानें दहा दिवसा पुढें देऊं नये. व देववूं नये; असें असून तो व्यापारी त्या वस्तूच्या मालका पासून ती किम्मत बलात्कारानें परत घेईल अथवा दुसरीच वस्तु त्या मालकास देईल तर राजानें त्यास सहाशें पैसे दंड करावा.

यस्तुदोषवतींकन्यामनाख्यायप्रयच्छति ॥ १४ ॥ तस्यकुर्यान्नृपोदंडस्वयंषण्णवतिंपणान् ॥

अर्थ- तसाच जो कोणी दोष युक्त कन्येचा दोष नसांगतां ती कन्या, वरास देतो; त्यास राजानें स्वतः शाण्णव पैसे दंड करावा.

अकन्यैवेतियःकन्यांब्रूयाद्द्वेषेणमानवः ॥ १५ ॥ सशतंप्राप्नुयाद्दंडंतस्यादोषमदर्शयन् ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो कोणी मानव, एकाद्ये कन्येस, ही *कन्या नव्हे असें कांहीं

---

* दीप आठ वर्षपर्यंत कन्या किंवा लग्न न झालेली ती कन्या असे कन्येंत दोन प्रकार आहेत.

एक दोषानें बोलून तो दोष, तिचे अंगीं जर न दाखवील तर त्यास राजानें शंभर-पैसे दंड करावा.

यस्त्वन्यांदर्शयित्वान्यांवोढुः कन्यांप्रयच्छति॥१६॥उ
त्तमंतस्यकुर्वीतराजादंडंतुसाहसं॥

अर्थ- आणि जो पुरुष एक कन्या दाखवून वरास दुसरीच कन्या देतो. त्यास राजानें एक सहस्र ऐंशी पैसे दंड करावा.

वरोदोषाननाख्याययःकन्यांवरयेदिह॥१७॥दत्ताप्य
दत्तासातस्यराज्ञादंड्यःशतद्वयं॥

अर्थ- तसेंच कोणी वर आपले दोष नसांगतां कन्येस वरील; तरती कन्या त्यास दिली; तथापि न दिल्यासारखीच समजावी; व राजानें त्यास दोनशें पैसे दंड करावा.

प्रदायकन्यांयोन्यस्मैपुनस्तांसंप्रयच्छति॥१८॥दंडः-
कार्योनरेंद्रेणतस्याप्युत्तमसाहसः॥

अर्थ- तसाच जो कोणी मनुष्य, एकाद्यास कन्या दान करून ती कन्या पुनः इतरा देईल.तर राजानें त्यास ही एक हजार आठशें पैसे दंड करावा.

तत्प्रकारेणवावाचाक्रयंपण्यमसंशयं॥१९॥लुब्धोह्य-
न्यत्रविक्रेता षट्शतंदंडमर्हति॥

अर्थ- त्याच रीतीनें कोणी कांहीं वस्तु एकाद्यास विकली किंवा वाचेनें निःसंशय विकत देण्यास कबूल केली असें असून तो लोभानें पुढें दुसऱ्यास विकील तर तो मनुष्य राजानें सहाशें पैसे दंड करण्यास पात्र होईल.

दुहितुःशुल्कविक्रेतासत्यंकारात्तुसंत्यजेत्॥२०॥द्वि
गुणंदंडयेदेनमितिधर्मोव्यवस्थितः॥

अर्थ- आणि जो पुरुष कन्याविक्रय करतो किंवा विवाहकालीं वराकडून आलेलें कन्येचें धन विकतो. त्यास राजानें सत्यवादी लोकांतून दूर करून बाराशें पैसे दंड करावा. अशी धर्माची व्यवस्था आहे.

मूल्यैकदेशंदत्वातुयदिक्रेताधनंत्यजेत्॥२१॥सदं
ड्यामध्यमंदंडंतस्यपण्यस्यमोक्षणे॥

अर्थ- तसाच कोणी जिन्नस विकत घेणार त्या पदार्थाच्या किमतीचा किं-

चित् अंश देऊन बाकीचें धन नदेईल तर राजानें त्यास पांचशें पैसे दंड करून ती वस्तु ज्याची त्यास द्यावी.

दुह्याद्धेनुंचयःपालोगृहीत्वाभक्तवेतनं ॥२२॥ सतुदंड्यः शतंराज्ञासुवर्णंचाप्यरक्षिता ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो गोपाल (गुराखी) यजमानानें दिलेलें वेतन घेऊन गायींची धार काढून घेईल किंवा तिचें संरक्षण नकरील; तर राजानें त्यास शंभर तोळे सुवर्ण दंड करावा.

दंडंदत्वातुविरमेत्स्वामितःकृतलक्षणः ॥२३॥ बध्यः-काष्ठायसैःपाशैस्तस्यकर्मकरोभवेत् ॥

अर्थ- आणि जो पुरुष स्वतः राज चिन्हाचें कांहीं एक कार्य करील; त्यानें दंड देऊन त्या कांमा पासून विराम पावावें. वत्यानें लोखंडी बिड्या घालून घेऊन त्या राजाच्या आज्ञे प्रमाणें काम करावें.

धनुःशतपरीणाहोग्रामस्यतुसमंततः ॥२४॥ द्विगुणंत्रिगुणंवापिनगरस्यतुकल्पयेत् ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ग्रामाच्या आसमंताद्भागीं शंभर धनुष्यें परिमित विस्तीर्ण स्थल मोकळें सोडावें. आणि नगराचे समोंवतीं दोनशें किंवा तीनशें धनुष्यें विशाल प्रदेश मोकळा ठेवावा.

वृतिंतत्रप्रकुर्वीतयामुष्ट्रोनावलोकयेत् ॥२५॥ छिद्रंवा वारयेत्सर्वंश्वसूकरमुखानुगं ॥

अर्थ- तसेंच ते गांव व शहरें यां बाहेर ठेवलेल्या त्या मोकळ्या जाग्या वर तट बांधावा; तो असाकीं, त्यावरून उंटाची दृष्टि पलीकडे नजावी. आणि त्या-कोटास जीं छिद्रें ठेवावीं त्यांत कुत्रे व सूकर (डुकर) यांचें तोंड जाऊनयें. अशीं करावीं.

यत्रापरिवृतंधान्यंविहिंस्युःपशवोयदि ॥२६॥ नतत्र-कारयेद्दंडंनृपतिःपशुरक्षिणे ॥

अर्थ- तसेंच ज्यास्थलीं कांहीं धान्य, वर आच्छादन घातल्यावांचून मोकळें ठेवलें असून पशूनीं त्या धान्याचा नाश केला तरी राजानें त्या पशूचें रक्षण करणारास दंड करूनये.

अनिर्दशाहांगांसूतांवृषदेवपशूंतथा ॥ छिद्रंवावारयेत्स्वैनदंड्या मनुरब्रवीत् ॥

अर्थ- प्रसूत होऊन दहादिवस नझालेली गाय, वृषोत्सर्ग केलेला वृषभ (बैल) व देवाच्या उद्देशानें सोडलेला बोकड आदि करून पशू यांपासून धान्यादिक वस्तूंस होणारा अपाय त्यावस्तूंच्या मालकानेंच निवारण करावा कारण तन्निमित्त त्यांस दंड करूंनये असें मनूचें मत आहे.

अतोन्यथाविनष्टस्यदशांशंदंडमर्हति ॥ २८ ॥ पाल्यस्य पालकस्वामीविनाशेक्षत्रियस्यतु ॥

अर्थ- यांवांचून अन्य प्रकारानें क्षत्रिय वर्णांतील एकाद्या स्वामीचे संरक्षित धनाचा नाश झाला असतां; त्यागायी आदि करून पशूंच्या रक्षकांस - त्या नाश केलेल्या पदार्थांचे दशांश मौल्याचा दंड करावा.

भक्षयित्वोपविष्टस्तुद्विगुणंदंडमर्हति ॥ २९ ॥ विशंदंड्याद्दशगुणंविनाशेक्षत्रियस्यतु ॥

अर्थ- तसाच कोणी त्या धनाचा अपहार करून बसला असतां. त्यासराजानें त्यावस्तूंच्या द्विगुणित द्रव्याचा दंड करावा; आणि वैश्यानें क्षत्रियाच्या धनाचा अपहार केला; तरराजानें त्यासत्यापदार्थाचे किमतीच्या दश गुणित द्रव्याचा दंड करावा.

गृहंतडागमारामंक्षेत्रंवापिसमाहरन् ॥ ३० ॥ शतानि पंचदंडःस्यादज्ञानाद्विशतोदमः ॥

अर्थ- त्याच प्रमाणें गृह, सरोवर, बाग किंवा क्षेत्र (भूमी) यांचा - कोणी बुद्धिपूर्वक अपहार केला. असतां त्यास पांचशें पण दंड करावा व अजाणता अपहार घडला तर त्यास दोनशें पैसे दंड क०

सीमाबंधनकालेतुसीमांतंयोह्विकारयेत् ॥ ३१ ॥ तेषां संज्ञांददानस्तुजिव्हाच्छेदनमाप्नुयात् ॥

अर्थ- तसेंच गांव आदि करून कोणत्याही मर्यादेची शींव करण्याचे समयीं दुसऱ्या शिवेचा नाशजो करील अथवा करवील किंवात्या मर्यादा निर्बंध करणाऱ्या राजकीय अधिकाऱ्याशीं कांहीं संकेत करील तरतो जिव्हाच्छेदनरूप दंडास पात्र होईल.

अथैनामपियोद्द्यात्संविदंवाधिगच्छति ॥ ३२ ॥ उत्त
मंसाहसंदंड्यइतिस्वायंभुवोऽब्रवीत् ॥

अर्थ — तशीच जो कोणी राजसेवक, तीग्रामादिकांची सीमा (शीव) नियमा विरुद्ध अधिक देईल. किंवा गांवकऱ्यांशीं त्याविषयीं कांहीं संकेत-करील तर त्यास राजानें एक सहस्र ऐशीं पण दंड करावा. अशी स्वायंभुव मनूची स्मृति आहे.

वर्णानामानुपूर्व्येणत्रयाणामविशेषतः ॥ ३३ ॥ अका
र्यकारिणःसर्वान्प्रायश्चित्तानिकारयेत् ॥

अर्थ — तसेच ब्राम्हण क्षत्रिय व वैश्य यानीं कांहीं अयोग्य कृत्य केलें असतां, राजानें त्या सर्वां कडून सर्व साधारण प्रकार यथाविधि क्रमानें प्रायश्चित्तें करवावी.

असत्येनप्रमाप्यस्त्रींशूद्रहत्याव्रतंचरेत् ॥ ३४ ॥ दानेन
चधनेनैकंसर्पादीनामशक्नुवन् ॥ एकैकंसचरेत्कृच्छ्रं
द्विजःपापापनुत्तये ॥ ३५ ॥

अर्थ — तीं अशींकीं, कोणी मिथ्या रोपानें स्त्रीवध केला असतां, त्यानें शूद्र हत्या* नामक व्रत करावें. आणि ब्राम्हण क्षत्रिय व वैश्य यांतील कोणी स्वतः सामर्थ्य नसल्या मुळें कांहीं पदार्थ किंवा द्रव्य देऊन इतरा कडून सर्पादिक हिंसक प्राण्यांत एकाद्या जीवास मारील. तर त्यानें त्या हत्येच्या पाप निरसनार्थ प्रत्येक हत्येस एकेक कृच्छ्र** प्रायश्चित्त करावें.

फलदानांचवृक्षाणां छेदनेजप्यमृक्शतं ॥ गुल्मव
ल्लीलतानांचपुष्पितानांचवीरुधां ॥ ३६ ॥

अर्थ — तशीच वारंवार फलें येणारें वृक्ष, झुडपें, वेल, वांकड्या तंतूनीं पसरणाऱ्या वेली व पुष्पयुक्त वेली यांचें छेदन कोणी केलें असतां त्यानें शंभर-

* शूद्र हत्या केली असतां जें प्रायश्चित्त कर्तव्य आहे तें च प्रायश्चित्त करावें.

२** तीनदिवसप्रातः २६ किंवा १५ ग्रास व तीन दिवस सायंकाळीं २२ किंवा १२ ग्रास असें शक्ति तारतम्यानें भोजन करून नंतर ३ दिवस अयाचित करावें आंत कुक्कुटांड प्रमाण अथवा तोंडात जाण्याच्या परिमितीचे २४ ग्रास भक्षण करावे पश्चात् ३ दिवस निर्शन करावें त्याविषयीं अशक्त असल्यास फलहार करून करावें.

गायत्री जप करावा.

अस्थिमतांचसत्वानांसहस्रस्यप्रमापणे ॥ पूर्णेवान
स्यवस्थातुंशूद्रहत्याव्रतंचरेत् ॥ ३७ ॥

अर्थ- नसेच अस्थियुक्त शरीरी जीव एक सहस्र अथवा एक गाड्याच्या पूर्ण भरतीचे मारले असतां त्यानें शूद्र हत्या व्रत करावें.

किंचिद्देयंचविप्रायदद्यादस्थिमतांवधे ॥ अनस्थ्नांचै-
वहिंसायांप्राणायामैर्विशुध्यति ॥ ३८ ॥

अर्थ- नसेच ज्यानें अस्थियुक्त कांहीं जीवमारले त्यानें ब्राम्हणांस किंचित् दान करावें. वअस्थिरहित जीवमारले असतां प्राणायामानीं शुध्दि होते.

अन्नादिजानांसत्वानांरसजानांचसर्वशः ॥ फलपुष्पो
द्भतानांचघृतप्राशोविशोधनं ॥ ३९ ॥

अर्थ- नसेच अन्नादिक पदार्थ व दुग्धादि रस, यांत उत्पन्न झालेलें सर्वप्रकारचे जीव आणि फलें व पुष्पें यांतील प्राणी यांची हत्या केली असतां शास्त्रोक्त नियमानुसार घृत प्राशन पूर्वक उपवास करावा. म्हणजे तेणे करून त्यापापाचें प्रायश्चित्त होतें.

कृष्टानामोषधीनांचजातानांचस्वयंवने ॥ वृथाच्छे
देनगच्छेतदिनमेकंपयोव्रती ॥ ४० ॥

अर्थ- त्याच प्रमाणें भूमी नांगरून पेरलेलीं धान्यें, लावलेल्या औषधी व स्वयें उत्पन्न झालेल्या औषधी यांचें जो निष्कारण छेदन करील तर - त्यानें शास्त्र नियमानुसार दुग्धप्राशन पूर्वक एक अहोरात्र उपोषण करावें.

एतैर्व्रतैरपोह्यंस्यादेनोहिंसासमुद्भवं ॥ स्तेयकर्त्र-
पहर्तॄणांश्रूयतांव्रतमुत्तमं ॥ ४१ ॥

अर्थ- असें हिंसे पासून झालेलें पाप यासांगीतलेल्या व्रतानीं दूर करावें. आतां, चौर्य करणारे व दुसऱ्याच्या वस्तूंचा अपहार करणारे यांचें उत्तम व्रत श्रवण कर.

धान्यान्नधनचौर्याणिकृत्वाकामंद्विजोत्तमः ॥ स-
जातीयगृहादेवकृच्छ्रार्धेनविशुध्यति ॥ ४२ ॥

अर्थ- तें असें कीं, उत्तम ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यानीं आपले सजातीय वर्णा
च्याच गृहांतून धान्य, अन्न व धन यांचें चौर्य केलें असतां ते अर्धकृच्छ्र प्रायश्चि
त्तानें शुद्ध होतात.

मनुष्याणांतुहरणेस्त्रीणांक्षेत्रगृहस्यतु ॥ कूपवापी-
जलानांतुशुद्धिश्चांद्रायणंस्मृतं ॥४३॥

अर्थ- तसाच जो कोणी, दुसऱ्याचीं मनुष्यें, स्त्रिया, क्षेत्र, (भूमी) गृह, कूप (आ
ड) वापी (विहिर) यासंबंधिउदक यांचा अपहार करतो; त्यास चांद्रायण*-
प्रायश्चित्त सांगितलें आहे.

द्रव्याणामल्पसाराणांस्तेयंकृत्वान्यवेश्मतः ॥ चरेत्सां
तपनंकृच्छ्रंतन्निर्यात्यविशुद्धये ॥ ४४ ॥

अर्थ- अशाच अल्प मौल्य फक्त वस्तू दुसऱ्याच्या घरांतून चौर्य करून आ
णल्या असतां, त्याज्याच्या त्यास परत देऊन प्रायश्चित्तार्थ सांतपन** ना
मक कृच्छ्र करावें.

भक्ष्यभोज्यापहरणेयानशय्यासनस्यतु ॥ पुष्पमू
लफलानांतुपंचगव्यंविशोधनं ॥४५॥

अर्थ- तसेंच केवळ भक्षणाचे पदार्थ, भोजनाचे पदार्थ, अश्व, रथ इत्या
दिक वाहनें शय्या, आसन, पुष्पें, मूळें व फळें यांचें चौर्य केलें असतां, पंच
गव्य प्राशनानें शुद्धि होते.

तृणकाष्ठद्रुमाणांतुशुष्कान्नस्यगुडस्यच ॥ चैलच
र्मामिषाणांतुत्रिरात्रंस्यादभोजनं ॥४६॥

अर्थ- तशींच तृण, काष्ठें, वृक्ष, शुष्क अन्न, गूळ, वस्त्रें, चर्मे, मांस किंवा-

---

* तें असें कीं वद्य १ स मयूराच्या अंडा प्रमाण चौदा ग्रास भक्षण करून नंतर प्रतिदिवशीं एकेक ग्रास कमी करीत चतुर्दशीस एक ग्रास भक्षण करावा आणि अमावास्येस उपोषण करून पुनः शु० प्रतिपदेला आरंभ करून पौर्णिमे पर्यंत प्रतिदिवशीं एकेक ग्रास वाढवावा.

** एक दिवस पंचगव्य (गोमूत्र, गोमय, दुग्ध, दधि, घृत, यांचें मिश्रण) भक्षण करून दुसरे दिवशीं उपोषण करणें तें, किंवा पंचगव्य पदार्थ म्हणजे प्रथम दिवशीं गोमूत्र, दुसरे दिवशीं गोमय, तिसरे दिवशीं दूध, चवथे दिवशीं दधि, पांचवे दिवशीं घृत, व सहावे दिवशीं कुशोदक याप्रमाणें प्रत्येक पदार्थ प्रत्येक दिवशीं भक्षून सातवे दिवशीं उपोषण करणें तें.

त्याचे प्रतिनिधिमाष (उडीद) आदिकरून पदार्थ यांचें चौर्य अथवा अपहार केला असतां, त्रिरात्र निरशन करावें.

मणिमुक्ताप्रवालानांताम्रस्यरजतस्यच ॥ अयःकांस्योपलानांचद्वादशाहंकणान्नभुक् ॥ ४७ ॥

अर्थ- तसेच नवरत्नादिक मणि, मौक्तिकें, पोंवळीं, तांबें, रुपें, लोह, कांस्य व खडीसाकर यांचें चौर्य केलें; तर बारादिवस पर्यंत धान्य कण वेंचून आणून त्यांचें भोजन करावें.

कार्पासकीटजोर्णानांद्विशफैकशफस्यच ॥ पक्षिगंधौषधीनांचरज्वाश्चैवत्र्यहंपयः ॥ ४८ ॥

अर्थ- आणि कापुस कृमी पासून उत्पन्न झालेलें रेशीम, दोन किंवा एक खुराचे पशूंची लोकर, पक्षिगंध, औषधी व दोरी यांचे चौर्य केलें असतां, त्रिरात्र केवल दुग्धाहारच करावा.

एतैर्व्रतैरपोहंतिपापंस्तेयकृतंद्विजः ॥ अगम्यागमनीयंतुव्रतैरेभिरपानुदेत् ॥ ४९ ॥

अर्थ- ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यानीं चौर्य संबंधानें घडलेलें स्वकीय पाप, या सांगितलेल्या प्रायश्चित्तानीं दूर करावें; आणि अगम्या गमन संबंधि झालेलें पातक तर या पुढील सांगितलेल्या प्रायश्चित्तानीं दूर करावें.

गुरुतल्पव्रतंकुर्याद्रेतःसिक्त्वास्वयोनिषु ॥ सख्युःपुत्रस्यचस्त्रीषुकुमारीष्वंत्यजासुच ॥ ५० ॥

अर्थ- तीं अशीकीं, ब्राम्हणादिक उत्तम वर्णानीं सजातीय स्त्रिया, मित्र व पुत्र यांच्या स्त्रिया, कुमारी व अंत्यजांच्या स्त्रिया यांशीं गमन केलें असतां गुरुतल्प* नामक व्रत करावें.

पितृष्वस्त्रीयभगिनींस्वस्त्रीयांमातुरेवच ॥ मातुश्चभ्रातुरार्यांगत्वाचांद्रायणंचरेत् ॥ ५१ ॥

अर्थ- तसाच जो पुरुष आपली पितृभगिनीची कन्या किंवा मातृभगिनीची कन्या अथवा मातुल पत्नी (मामी) यांशीं गमन करल्यानें चांद्रायण प्राय-

* टीप गुरुस्त्री गमनास जें प्रायश्चित्त तें करावें.

श्चित्त करावें.

एतास्त्रियस्तु भार्यार्थेनोपगच्छेत्तु बुध्दिमान् ॥-
ज्ञातीश्चमातुलेयास्तेपतिताउपयांतिये ॥ ५२ ॥

अर्थ- आणि पूर्व श्लोकांत सांगितलेल्या त्यास्त्रिया, बांधव कन्या व मा
तुल कन्या यांशीं जे विवाह करतील तेपतित होतात.

अमानुषीषुपुरुषोउदक्यायामयोनिषु ॥ रेतः सि
क्त्वाजलेचैवकृच्छ्रंसांतपनंचरेत् ॥ ५३ ॥

अर्थ- मनुष्य स्त्रीभिन्न गो, महिषी इत्यादिक पशु योनि, रजस्वलास्त्रिया
व मल द्वार व उदक यास्थळीं पुरुषानें आपला वीर्य पात केला असतां-
सांत पन नामक कृच्छ्र प्रायश्चित्त करावें.

मैथुनंचसमालोक्यपुंसियोषितिवाद्विजः ॥ गोया
नेप्सुदिवाचैवसवासास्नानमाचरेत् ॥ ५४ ॥

अर्थ- तसेंच मैथुन कालीं स्त्रीकिंवा पुरुष यांस जर ब्राम्हणानें पाहि
लें अथवा त्यानें वृषभा वर आरोहण केलें; तर त्यानें दिवसासच उद-
कांत सचैल स्नान करावें.

चांडालांत्यस्त्रियोगत्वाभुक्त्वाचप्रतिगृह्यच ॥ प
तत्यज्ञानतोविप्रोज्ञानात्साम्यंतुगच्छति ॥ ५५ ॥

अर्थ- आणि चांडाल व अंत्यज यांच्या स्त्रीशीं ब्राम्हणानें अज्ञानतः गमन
केलें किंवा त्यांकडील भोजन अथवा प्रतिग्रह केला असतां, तोपतित-
होतो. आणि ज्ञान पूर्वक हीं कर्में करील तर तोब्राम्हण, तेचांडाल व अंत्यज
यां समान होईल.

विप्रदुष्टांस्त्रियंभर्तानिरुंध्यादेकवेश्मनि ॥ यत्पुंसः
परदारेषुतच्चैनांचारयेद्व्रतं ॥ ५६ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ब्राम्हण संगानें दूषित झालेल्या स्त्रीस भर्त्यानें
एका पृथक् गृहांत प्रतिबंधांत ठेवावें. आणि तिला त्या कर्माचा पश्चात्ता
प झाल्यावर, पुरुषास जें परस्त्री गमनाचें प्रायश्चित्त आहे तेंच तिज क
डून करवावें.

साचेत्पुनः प्रदुष्येत्तुसदृशेनोपमंत्रिता ॥ कृच्छ्रंचां

द्रायणंचैवत्ततस्याः पावनंस्मृतं ॥५७॥

अर्थ- आणि तीजर सजातीय पुरुषानें रत्यर्थ बोलावलें असतां, पुनः व्यभिचार दोषानें युक्त होईल; तर ती कृछ्र व चांद्रायण यादोन प्रायश्चित्तानीं शुद्ध होते.

यःकरोत्येकरात्रेणवृषलीसेवनंद्विजः॥तदेकभ कुजपन्नित्यंत्रिभिर्वर्षैर्व्यपोहति ॥५८॥

अर्थ- तसाच ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यातीन वर्णांतील जोपुरुष एक रात्र शूद्रस्त्री संग करील; तरतें पाप त्यानें एक भक्त करून तीन वर्षपर्यंत गायत्री जप केला असतां दूर होतें.

एषापापकृतामुक्ताचतुर्णामपिनिष्कृतिः ॥ पति तैःसंप्रयुक्तानामिमांशृणुतनिष्कृतिं ॥५९॥

अर्थ- या प्रमाणें ब्राम्हणादिक चारवर्णांस पाप कर्म निमित्त ही निष्कृति (प्रायश्चित्त) सांगितली. आतां पंच महा पातकादिकानीं पतित झालेल्याशीं संगकरणारास शुध्यर्थ प्रायश्चित्त सांगतों तें श्रवण कर.

संवत्सरेणपततिपतितेनसमाचरन्॥याजना ध्यापनाद्योनाद्नतुयानाशनासनात्॥६०॥

अर्थ- तो प्रकार असा कीं, जो कोणी मनुष्य स्वतः पवित्र असून दुसऱ्याचें यज्ञादिकर्म करणें, अध्ययन सांगणें, विवाह संबंध करणें, बरोबर गमन करणें, भोजन व एकत्र बसणें यासंबंधानीं पतिताशीं एकसंवत्सर पर्यंत संसर्ग करतो तो तावन्मात्र कालानेंच पतित होतो.

योयेनपतितेनैषांसंसर्गंयातिमानवः॥ सतस्यैवव्रतं कुर्यात्तत्संसर्गविशुध्यये॥६१॥

अर्थ- आणि जो मानव त्या पंचमहा पातकी आदिकरून पतितांतील ज्यापतिताशीं संसर्ग करील; त्यानें त्यापतितास शुद्ध होण्याचें जें प्रायश्चित्त तें त्या संसर्गा पासून आपले शुध्यर्थ करावें.

पतितस्योदकंकार्यंसपिंडैर्बांधवैःसह ॥ निंदितेहनिसा यान्हेज्ञातिभिर्गुरुसन्निधौ ॥६२॥

अर्थ- तसेंच पतितास त्याचे पुत्रादिकानीं स्वकीय सपिंड (सप्तपुरुषातील

बांधव) व अवांतर ज्ञाति (सातपिढ्यांच्या बाहेरील बांधव) यांसह वर्तमान कुयोग फक्त दिवशीं सायंकाळीं गुरु,सन्निध असून त्यावेळेस तिलांजलीनें उदक द्यावें.

दासीघटमपांपूर्णंपर्यस्येत्प्रेतवत्सदा ॥ अहोरात्रमुपासीरन्नाशौचंबांधवैःसह ॥ ६३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें पतिताच्या घरस्फोट कर्तव्य झाला तर एकाद्ये दासी कडून उदकानें पूर्ण भरलेला एक घट आणवून तो त्यापतिताचे सभोंवतीं- प्रेतासारखा फिरवून सर्व बांधवानीं त्याघटास स्पर्श करून तो घर फोडून- टाकावा. आणि त्याचें अशौच सर्व बांधवांसहित एक अहोरात्र धरावें त्या पुढें धरूं नये.

निवर्त्तयेरंस्तस्मात्तुसंभाषणसहासनं ॥ दायादस्यप्रमाणंचयात्रामेवचलौकिकीं ॥ ६४ ॥

अर्थ- नंतर सर्व बांधवानीं त्यापतिताशीं संभाषण करणें, एकासनीं बसणें, दायभाग (वांटा) देणें व इतर लौकिक कर्में इत्यादिक व्यवहारांचा- संबंध करूं नये.

ज्येष्ठभावान्निवर्तेतज्येष्ठ्यावाप्तंचयत्पुनः ॥ ज्येष्ठांशंप्राप्नुयाच्चास्ययोवास्याद्गुणतोधिकः ॥ ६५ ॥

अर्थ- तसेंच त्यापतिताचे बंधूनीं त्यास ज्येष्ठत्वानें मानूं नये; आणि ज्येष्ठत्व प्रयुक्त त्यास प्राप्त होणारा- त्याचा जो अंश असेल- तो त्या कनिष्ठांतील जो गुणानीं अधिक असेल त्यानें घ्यावा.

स्थापितांचापिमर्यादांयेभिंद्युःपापकर्मिणः ॥ सर्वे पृथक्दंडनीयाराज्ञाप्रथमसाहसं ॥ ६६ ॥

अर्थ- तसेंच जे पापकर्मी शास्त्र स्थापित कोणत्याही धर्ममर्यादेचा- नाश करतील; तरराजानें त्यासर्वांस प्रत्येकीं दोनशें सत्तर पैसे दंड करावा.

शतंब्राम्हणमाक्रुश्यक्षत्रियोदंडमर्हति ॥ वैश्यस्तुद्विशतंराजन्शूद्रस्तुवधमर्हति ॥ ६७ ॥

अर्थ- हे राजा तसाच जो क्षत्रिय, ब्राम्हणास दुःख देईल; त्यास राजा-

नें शंभर पैसे दंड करावा. आणि वैश्यानें ब्राम्हणास पीडा केली असतां- त्यास दोनशें पैसे दंड करावा. व शूद्रानें ब्राम्हणास उपद्रव केला तर- त्यास त्या उपद्रवाचे तारतम्यानें वध किंवा ताडण अशी शिक्षा करा.

पंचाशद्ब्राम्हणोदंड्यःक्षत्रियस्याभिशंसने ॥ वैश्य
स्याप्यर्धपंचाशच्छूद्रेद्वादशकोदमः ॥ ६८ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ब्राम्हण जर क्षत्रियास व्यथा करील, तर त्या स पन्नास पैसे दंड करावा; आणि ब्राम्हणानें वैश्यास क्लेश दिले असतां पंचवीस पैसे व त्यानें शूद्रास त्रास दिला तर बारा पैसे असा दंड करावा.

क्षत्रियस्याप्नुयाद्वैश्यःसाहसंपुनरेवच ॥ शूद्रः क्ष-
त्रियमाक्रुश्यजिह्वाच्छेदनमाप्नुयात् ॥ ६९ ॥

अर्थ- तसेंच वैश्यानें क्षत्रियाचा छल केल्यास त्यास पांचशें चाळीस पैसे दंड करावा. आणि शूद्रानें क्षत्रियास छळिलें असतां, राजानें त्याचा जिव्हा छेद करावा.

पंचाशत्क्षत्रियोदंड्यस्तथावैश्याभिशंसने ॥ शूद्रे
चैवार्धपंचाशत्तथाधर्मोनहीयते ॥ ७० ॥

अर्थ- तसाच जो क्षत्रिय, वैश्यास दुःख देईल तर त्यास पन्नास पैसे दंड करावा. आणि तो शूद्रास क्लेश देईल तर त्यास पंचवीस पैसे दंड करावा. असें केलें असतां धर्मास बाध येत नाहीं.

वैश्यस्याक्रोशनेदंड्यःशूद्रश्चोत्तमसाहसं ॥ शूद्राक्रो-
शेतथावैश्यःशतार्धंदंडमर्हति ॥ ७१ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें शूद्रानें वैश्यास रोदन करण्या सारखें दुःख दिलें असतां, त्यास एक सहस्र एेंशीं पैसे दंड करावा; वैश्यानें शूद्रास तसे क्लेश दिले तर तो पन्नास पैसे दंड करण्यास योग्य होतो.

सवर्णाक्रोशनेदंड्यस्तथाद्वादशकंस्मृतं ॥ वादेष्वव-
चनीयेषुतदेवद्विगुणंभवेत् ॥ ७२ ॥

अर्थ- तसेंच ब्राम्हणादिक वर्णांनी सजातीय मनुष्यास रोदनापर्यंत- पीडा केली असतां, त्यास बारा पैसे दंड करावा.

एकजातिर्द्विजातिंतुवाचादारुणयाक्षिपन् ॥ जि
ह्वायाःप्राप्नुयाच्छेदंजघन्यःप्रथमोहिसः ॥ ७३॥

अर्थ- तसाच कोणी शूद्र, ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांस कठोर वाणीनें अमर्याद भाषण करील तर तो जिव्हाछेदन दंडास पात्र होतो. कारण ब्राम्हण हा प्रथम वर्ण असल्या मुळें सर्वांस पूज्य आहे. व शूद्र हा चार वर्णांत कनिष्ठ असल्यानें हा त्रिवर्णांचा सेवक आहे.

नामजातिगृहंतेषामभिद्रोहेणकुर्वतः ॥ निक्षेप्योयो
मयःशंकुर्ज्वलन्नास्येदशांगुलः ॥ ७४॥

अर्थ- आणि त्या ब्राम्हणा दिकांचा द्रोह करून जो कोणी आपलें नाम, जाति व गृह यांची प्रसिध्दि करतो; त्याच्या मुखांत दहा अंगुलें लोह मय तप्त शंकु (खिळा) घालावा.

धर्मोपदेशंशूद्रस्तु द्विजानामभिकुर्वतः ॥ तप्तमासेच
येत्तैलंवक्त्रेश्रोत्रेचपार्थिवः ॥ ७५॥

अर्थ- तसाच जो शूद्र, ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांस धर्मोप देश करतो; त्याचे मुखांत व कर्णांत राजानें तप्त केलेलें तैल ओतावें.

श्रुतिंदेशंचजातिंचकर्मशारीरमेवच ॥ वितथंचब्रुव
न्दंड्योराजाद्विगुणसाहसं ॥ ७६॥

अर्थ- आणि श्रुति, देश, जाति, शरीर साध्य कर्म हीं अनृत बोलेल तर राजानें त्यास दोन हजार एकशें साठ पैसे दंड करावा.

यस्तुपातकसंयुक्तःक्षिपेद्वर्णांतरंनरः ॥ उत्तमंसाह
संदंडःपात्यस्तस्मिन्यथाक्रमं ॥ ७७॥

अर्थ- तसाच जोमनुष्य स्वतः पातकी असून इतर वर्णांवर दोष स्थापन करतो; त्यास राजानें शास्त्र क्रमानु सार एक हजार ऐशीं पैसे दंड करावा.

राज्ञोनिवेशनियमंवितथंयांतिवैमिथः ॥ सर्वेद्विगुण-
दंड्यास्तेविप्रलंभान्नृपस्यतु ॥ ७८॥

अर्थ- तसेच जे अधिकारी परस्पर संकेतानें राजस्थापित नियमास-विरुध्द वर्ततात; त्यानीं राजाज्ञेची वंचना केल्या मुळें त्यांस दोन हजार-

एकशें साठ पैसे दंड करावा.

प्रीत्यामयास्याभिहितंप्रमादेनाथवावदेत् ॥ भूयो
नचैवंवक्ष्यामिसतुदंडार्धभाक् भवेत् ॥ ७९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें कोणी एकाद्यास कांहीं अमर्याद भाषण करून; तो न्यायाधीशा पुढें, मी यास स्नेहा मुळें किंवा असावध पणानें चुकून; बोललों परंतु आतां पुनश्च असें बोलणार नाहीं असें म्हणेल तर त्या स एक सहस्त्र ऐंशीं पैसे दंड करावा.

काणंवाप्यथवाखंजमंधंचापितथाविधं ॥ तथैवापि
ब्रुवन्दाप्योदंडंकार्षापणंधनं ॥ ८० ॥

अर्थ- आणि कोणी मनुष्यानें एकादा काणा किंवा पांगळा, खुळपा अथवा अंध (नेत्रहीन) यांस त्यांच्या त्या दोषा वरून त्यांचे मनास दुःख दायक भाषण करून पुढें न्याय काळीं मी थट्टेने किंवा चुकून बोललों असें पुनः बोलणार नाहीं असें कबूल करील तर त्यास एक रूपया दंड करावा.

मातरंपितरंज्येष्ठंभ्रातरंश्वशुरंगुरुं ॥ आक्रोशयन्
शतंदंड्यः पंथानंचार्थयन्गुरोः ॥ ८१ ॥

अर्थ- तसेच माता, पितर, ज्येष्ठबंधु, श्वशुर, गुरु यांस रडविण्या- पर्यंत जो दुःख देतो; व जो गुरूस मला मार्ग द्या. असें म्हणतो त्यास; राजानें शंभर पैसे दंड करावा.

गुरुवर्ज्यंतुमार्गार्हंयोहिमार्गंनयच्छति ॥ सदाप्यः
कृष्णलंराज्ञःतस्यपापस्यशांतये ॥ ८२ ॥

अर्थ- आणि जो मनुष्य; आपला गुरू नसून आपणास जो गुरू सारखा मान्य आहे त्यास जो मनुष्य मार्ग देत नाहीं; त्यास त्या पापाचे शांत्यर्थ राजानें एक गुंज सुवर्ण दंड करावा.

एकजातिर्द्विजातिंतुयेनांगेनापराध्नुयात् ॥ तदेव
च्छेदयेत्तस्यक्षिप्रमेवाविचारयन् ॥ ८३ ॥

अर्थ- तसाच कोणी शूद्र, आपल्या ज्या अंगानें ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांतील कोणाचा अपराध करील तर राजानें विचार न करतां तू-

चा तो अवयव शीघ्र छेदावा.

अवनिष्ठीवतोदर्पाल्द्वावोष्ठोच्छेदयेन्नृप ॥ अवमूत्र
यतोमेढ्रमपशब्दयतोगुदं ॥ ८४ ॥

अर्थ- तें असें कीं, हे राजन्, जो शूद्र, गर्वानें त्या द्विजांचे अंगावर थुंके ल, त्याचे दोन्ही ओष्ठ (ओंठ) छेदावे. आणि त्यांच्या अंगावर मूत्र करील तर त्यानें शिश्न व गुद द्वारानें त्यांचे अंगावर अपान वायूचा शब्द केला असतां मलद्वार यांचें छेदन करावें.

सहासनमभिप्रेप्सु रुत्कृष्टस्यापकृष्टजः ॥ कट्यांकृ
तांकोनिर्वास्यःस्फिचंवाप्यस्यकर्तयेत् ॥ ८५ ॥

अर्थ- तसाच कोणी, हीन वर्णोत्पन्न (शूद्र) ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य. यांच्या एकासनावर बसण्याची इच्छा करील तर राजानें त्यास कमरे वर - डाग देऊन घालवून द्यावें किंवा त्याचे स्फिच (कुले) कातरावे.

केशेषुगृण्हतोहस्तं छेदयेदविचारयन् ॥ पादयोर्नासि-
कायांचग्रीवायांवृषणेषुच ॥ ८६ ॥

अर्थ- तसेच केश, पाय, नासिका, मान व अंडकोश यास्थानीं हातानें धरून ब्राम्हणादिक वर्णांस दुःख देणाऱ्या शूद्राचा हस्त, राजानें छेदावा. त्याविषयीं विचार करूं नये.

त्वग्भेदकःशतंदंड्योलोहितस्यचदर्शकः ॥ मांसभेत्ता
चषण्णिष्कान्निर्वास्यस्त्वस्थिभेदकः ॥ ८७ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो कोणी मनुष्य, दुसऱ्याच्या त्वचेचा भेद करून र क्त बाहेर काढील त्यास शंभर पैसे दंड करावा. आणि मांस विदारण व अस्थि मोडणारास घालवून द्यावें.

अंगभंगकरस्यांगंतदेवापहरेन्नृपः ॥ दंडपारुष्यकृद्दं
ड्योसमुत्थानव्ययंतथा ॥ ८८ ॥

अर्थ- तसाच जो शूद्रादिक हीन वर्ण आपल्या ज्या अवयवानें ब्राम्हणांचें अंग मोडील; तर राजानें त्याचें तें अंग छेदावें. आणि जो राजकीय अधिका

---

* द्विज ब्राम्हण, क्षत्रिय, व वैश्य यांस द्विज हें नाम आहे.

रीजर ब्राम्हणांस शरीर दंडादिक उग्रशासन करतो. तर राजानें त्याच्या द्रव्य वृद्धीचे उद्योगाचा नाश करावा.

अर्धपादकरः कार्योगोगजाश्वोष्ट्रघातकः ॥ पशुक्षु
द्रमृगाणांचहिंसायांद्विगुणोदमः ॥ ८९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें गायी, गज, अश्व व उंट यांचा माणा घात करणारा- चे पाय व हात हे अर्धे तोडावे आणि इतर सामान्य पशु व क्षुद्र हरिण यांची हत्या करील; तर त्यास राजानें ५४० पैसे दंड करून त्यांचें मोल्य त्याच्या स्वामीस देववावें.

पंचाशच्चभवेद्दंड्यस्तथैवमृगपक्षिषु ॥ कृमिकीटेषु
दंड्यःस्याद्रजतस्यचमाषकं ॥ ९० ॥

अर्थ- तसेच मोठे मृग व पक्षि यांस जो मारील त्यास ५० मासे रुपें दंड करावा. आणि कृमि व किडे यांची हिंसा करतो; त्यास एक मासा रुपें दंड करावा.

तस्यानुरूपंमौल्यंचप्रदद्यात्स्वामिनेतथा ॥ सस्वामिका
नासकलंशेषाणांसकलंतथा ॥ ९१ ॥

अर्थ- आणि त्या हरिणादिक पशुपक्ष्यांचें मोल्य त्यांचे मालकास द्यावें; व तसेंच जर कोणी राजकीय पशु किंवा अरण्यांतील पशु मारले तर त्यानें त्या पशूंचें मोल्य व त्याहिंसेचा दंड हें सर्व धन राजास द्यावें.

वृक्षंतुसफलंछित्वासुवर्णदंडमर्हति ॥ द्विगुणंदंडयेच्चै
नंपथिसीम्निजलाशये ॥ ९२ ॥

अर्थ- तसाच कोणी फल फक्त वृक्ष तोडील. तर त्यास एक तोळा सुवर्ण दंड करावा. आणि मार्ग सीमा व सरोवरादिक उदकस्थान यां वरील फल सहित वृक्ष तोडला असतां त्यास दोन तोळे सोनें दंड करावा.

छेदनादफलस्यापिमध्यमंसाहसंस्मृतं ॥ गुल्मवल्ली
लतानांचसुवर्णस्यचमाषकं ॥ ९३ ॥

अर्थ- तशाच फल रहित वृक्षांचें ही कोणी छेदन केलें असतां त्यास पांच शें चाळीस पैसे दंड करावा. आणि झुडपें वेली व कुटिल तंतूनीं पसरणाऱ्या वेलींचें छेदन करणारास एक मासा सोनें दंड करावा.

वृथाच्छेदीतृणस्यापिदंड्यः कार्षापणंभवेत् ॥ त्रिभागं

कृष्णालादंड्याःप्राणिनस्ताडनेतथा ॥ ९४ ॥

अर्थ- तसेंच गवत हीव्यर्थ तोडणारास एक रुपया दंड करावा. आणि जो हरिणादिक दीन प्राण्यांस अपराधावांचून ताडन करील; त्यास सहा गुंजा सोनें दंड करावा.

देशकालानुरूपेणमूल्यंराजाद्रुमादिषु ॥ तत्स्वामिनस्तथादंड्यादंडमुक्तंतुपार्थिव ॥ ९५ ॥

अर्थ- हे राजा आणि कोणी आपले वृक्षवेली इत्यादिक निष्कारण तोडील. तर त्यास ही राजानें देशकालानुरूप त्या वृक्षादिकांचे मूल्याचा दंड करावा.

यत्रातिवर्ततेयुग्यंवैगुण्यात्प्राजकस्यतु ॥ तत्रस्वामीभवेद्दंड्योनात्पश्चेत्प्राजकोभवेत् ॥ ९६ ॥

अर्थ- तसेंच जेथें सारथ्याच्या दोषानें रथ किंवा गाडी इत्यादिक वहन उलटतें; तेथें तो सारथि, समीप नसेल तर तो रथस्वामी दंडास योग्य होईल.

प्राजकश्चभवेदाप्तःप्राजकोदंडमर्हति ॥ नास्तिदंडश्चतस्यापितथावैहेतुकल्पकः ॥ ९७ ॥

अर्थ- आणि तो सारथि, जवळ असेल तर त्यासच दंड करावा. परंतु तो सारथि सन्निधानीं असून रथादिक उलटण्याचा हेतु वास्तविक रीतीनें त्याजकडे नसला तर त्यास दंड नाहीं.

द्रव्याणियोहरेद्यस्यजानतोजानतोपिवा ॥ सतस्योत्पादयेत्तुष्टिंराज्ञोदद्यात्ततोदमं ॥ ९८ ॥

अर्थ- तसाच जो कोणी ज्ञान पूर्वक किंवा अज्ञानतः ज्याचीं द्रव्यें हरण करील; त्यानें तीं धनें ज्याचीं त्यास देऊन त्याचा संतोष करून राजासही दंड द्यावा.

यस्तुरज्जुंघटंकूपाद्धरेद्भिंद्याच्चतांप्रपां ॥ सदंडंप्राप्नुयान्माषंतच्चसंप्रतिपादयेत् ॥ ९९

अर्थ- त्याच प्रमाणें जो मनुष्य मार्गावरील कूप (आड) किंवा वापी (विहीर) ह्यांवरील दोरी अथवा घट (घागर, कळशी आदिकरून पाणी काढ-

ण्याचें भांडें) हें हरण करील; किंवा उदक प्राशनार्थ घातलेली धर्मशाला मोडील त्यानें राजास एक मासा सुवर्ण दंड देऊन त्यादोरी आदिकरून वस्तु पूर्ववत् स्थापन कराव्या.

धान्यंदशभ्यः कुंभेभ्योहरतोभ्यधिकंवधः॥शेषेप्येकादशगुणंतस्यदंडंप्रकल्पयेत्॥१००॥

अर्थ–आणि जो दहा कुंभांपेक्षां अधिक धान्य, सुभिक्षांत चोरील; तर त्यास प्राणांत दंड करावा; व दुर्भिक्षांत त्या धान्याचें चौर्य केलें असतां, ताडन करावें. तसेंच या पेक्षां कमी धान्य चोरील; त्यास त्या धान्याच्या अकरापट धान्याचा दंड करावा.

तथाभक्ष्यान्नपानानांनतथाप्यधिकेवधः॥सुवर्णरजतादीनामुत्तमानांचवाससां॥१०१॥पुरुषाणांकुलीनानांनारीणांचविशेषतः॥महापशूनांहरणेशस्त्राणामौषधस्यच॥॥२॥मुख्यानांचैवरत्नानांहरणेवधमर्हति॥

अर्थ– तसेच भक्षण योग्य पदार्थ, अन्न, मद्यादिक पान योग्य पदार्थ, हे कोणी आपले आहारा पेक्षां अधिक चोरले तरी त्यास प्राणांत दंड नाहीं. आणि सुवर्ण रौप्य, आदिकरून धातु पदार्थ, उत्तम वस्त्रें, कुलीन पुरुष आणि विशेषें करून त्यांच्या स्त्रिया, मुख्य नवरत्नें, गजादिक महापशु, उत्तम शस्त्रें व औषधें यांचें चौर्य करणारा, वधास योग्य होतो;

दध्नःक्षीरस्यतक्रस्यपानीयस्यरसस्यच॥३॥वेणुवैदलभांडानांलवणानांतथैवच॥मृन्मयानांचसर्वेषांमृदोभस्मनएवच॥४॥कालमासाद्यकार्यंचराजादंडंप्रकल्पयेत्॥

अर्थ–तसेंच दहीं, दुग्ध तक्र, उदक, घृतादिकरस, वेळु, दाळी, भांडीं, अनेक लवणें, मृन्मय (मृत्तिकेचीं) सर्वभांडीं, केवल मृत्तिका, भस्म, यांचें चौर्य करणारा वर राजानें केलेल्या कालावधि नियमाचे आंत फिर्याद केली असतां, राजानें त्यास यथाशास्त्र दंड करावा.

---

* टीप द्रोण (अर्धमण) २० अर्धमणांचा एक कुंभ अशा दहा कुंभांचे शंभर मण होतात.

गोषुब्राम्हणसंस्थासुमहिषीषुलथैवच ॥ ५ ॥ अश्वा
पहारकश्चैवसद्यः कार्योर्धपादकः ॥

अर्थ- तशाच ब्राम्हणाचे घरच्या गायी, महिषी (म्हैस) व अश्व यां चा अपहार करणाराचे अर्धेपायराजानें तत्काल तोडावे.

सूत्रकार्पासकिण्वानांगोमयस्यगुडस्यच ॥ ६ ॥ म-
त्स्यानांपक्षिणांचैवतैलस्यचघृतस्यच ॥ मांसस्य
मधुनश्चैवयच्चान्यद्द्रव्यसंभवं ॥ ७ ॥ अन्येषांलव-
णादीनांमद्यानामोदनस्यच ॥ पक्वानानांचसर्वेषां-
तन्मूल्याद्द्विगुणोदमः ॥ ८ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें सूत, कापुस, तांदुळ आदि करून पदार्थांनीं केलेलें मद्य करण्याचें साधन गोमय (गायीचें शेण) गूळ, मत्स्य, पक्षि, तैल, घृत, मांस किंवा त्याचे प्रति निधि उडीद, मध, तसेंच इतर विद्यमान पदार्थ, आणि लवणादिक अन्यपदार्थ, सर्व प्रकारचीं मद्यें ओदन, संपूर्ण पक्वान्नें यांचें जो चौर्य करील त्यास त्याच्या द्विगुणित किमतीचा दंड करावा.

पुष्पेषुहरितेधान्येगुल्मवल्लीलतासुच ॥ ८ ॥ अन्नेषुप
रिपूर्णेषुदंडःस्यात्पंचमाषकं ॥ परिपूर्णेषुधान्येषुशाक-
मूलफलेषुच ॥ ९ ॥ निरन्वयेशतंदंड्यः सान्वयेद्विशतं-
दमः ॥

अर्थ- तशींच पुष्पें, हिरव्या वर्णाचें धान्य, झुडपें, वेली, वांकड्या तंतूनीं पसरत जाणारे वेल, आणि आपत्काल नसून आपले निर्वाह परिमित अन्नें व धान्यें तशाच भाज्या, मूलें, फलें हे पदार्थ एकाकी मनुष्याचे चोरले असतां, त्यास शंभर पैसे दंड करावा. तेच पदार्थ, स कुटुंबाचे हरण केले असतां, त्यास दोनशें पैसे दंड करावा.

येनयेनयथांगेनस्तेनोन्येषुविचेष्टते ॥ १० ॥ तत्तदेवहरे
त्तस्यप्रत्यादेशायपार्थिवः ॥

अर्थ- जो चोर आपले ज्याज्या अंगानीं दुसऱ्यास अपकार करतो, त्याचीत्या कर्मापासून निवृत्ति होण्यासाठीं राजानें त्याचें तें अंग छेदावें.

द्विजोध्वगः क्षीणवृत्तिर्द्वाविक्षू द्वे चमूलके ॥ ११ ॥-

त्रपुसोर्वारुकौद्वौचतावन्मात्रंफलेषुच ॥ तथाचसर्व
धान्यानांमुष्टिर्ग्राह्मणपार्थिव ॥ १२ ॥ शाकेशाकप्रमाणे
नगृह्यमाणेनदुष्यति ॥

अर्थ- आणि हे राजा, जवळचें उपजीविका साधन समाप्त झालेले ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य, यांतील कोणत्याही पांथस्थानें क्षुधाशांत्यर्थ दोन ऊस किंवा दोन मुळें, दोन कांकड्या, दोन खरबुजें, अथवा तत्काली निर्वाह परिमित कोणतीही फलें, मुष्टिमात्र कोणतेंही धान्य, व एका दिवसाच्या निर्वाहाची भाजी, इत्यादिक घेतली असतां तो दूषित होत नाहीं.

वानस्पत्यंफलंमूलंदार्वग्न्यर्थंतथैवच ॥ १३ ॥ तृणं-
गोभ्यवहारार्थमस्तेयंमनुरब्रवीत् ॥

अर्थ- तशींच वनस्पतिसंबंधी फलें, मूलें, अग्निप्रदीप्त करण्यासाठीं काष्ठें, गायीच्या भक्षणापुरतें तृण इत्यादिकांचें ग्रहण केलें तरी तें चौर्य न व्हे असें मनु आपले स्मृतींत बोलला आहे.

अदेववाटिजंपुष्पंदेवतार्थंतथैवच ॥ १४ ॥ आददानः
परक्षेत्रात्नदंडदातुमर्हति ॥

अर्थ- तसेंच कोणी मनुष्यानें देवासाठीं अन्याच्या क्षेत्रांतून घेतलेलें पुष्प देवाच्या उद्देशानें केलेल्या बागेंतलें नसेल तर तो दंड देण्यास योग्य होत नाहीं.

शृंगिणंनखिनंराजन्दंष्ट्रिणंचवधोद्यतं ॥ १५ ॥ यो
हन्यात्नसपापेनलिप्यतेमनुजेश्वर ॥

अर्थ- आणि हे मनुष्येश्वर राजा, शृंगयुक्त वृषभादिक, नखानीं युक्त व्याघ्रादिक व उग्र दाढेचा सिंहादिक यांतील कोणी पशु आपल्या वधार्थ उद्युक्त झाला असतां त्यासजो मनुष्य मारील तो पापानें लिप्त होत नाहीं.

गुरुंवाबालवृद्धंवाब्राम्हणंवाबहुश्रुतं ॥ १६ ॥ आतता-
यिनमायांतंहन्यादेवाविचारयन् ॥

अर्थ- तसेंच गुरु, बाल, वृद्ध, बहुश्रुत ब्राम्हण, यांतील कोणीही आपले प्राण नाशार्थ आला असतां त्यास विचार नकरतां मारावेंच.

नाततायिवधेदोषोहंतुर्भवतिकश्चन ॥ १७ ॥ प्र

काशंवाऽप्रकाशंवामन्युस्तंमन्युमृच्छति ॥

अर्थ- कारण आपल्या वधार्थ उद्युक्त झालेल्या मनुष्यास मारण्या विषयीं कोणताही दोष नाहीं. कारण त्या आततायि मनुष्याचाच स्पष्ट किंवा गुप्त रीतीनें दुसऱ्यास मारण्या विषयीं आलेला क्रोध, इतरास त्या आततायीच्या प्राणांतास कारण होतो.

गृहक्षेत्राभिहर्तारस्तथागम्याभिगामिनः ॥१८॥ अग्निदागरदश्चैवतथाचाभ्युद्यतायुधः ॥ अभिचारंतु कुर्वाणोराजगामिचपैशुनं ॥१९॥ एतेहिकथिता लोकेधर्मज्ञैराततायिनः

अर्थ- गृह, क्षेत्र, यांचे हरण करणारे, अगम्य स्त्रियांशीं गमन करणारे, लोकांच्या गृहास अग्नि लावणारे, अन्नादिकांत विषप्रयोग करणारे, तसेच दुसऱ्या वर शस्त्रें उगारून येणारे, जारणमारणादिक कर्में करणारे, राजाजवळ इतरांचें पैशून्यसूचविणारे, अशा मनुष्यांस लोकांत धर्मशास्त्रज्ञ लोक आततायि असें म्हणतात.

परस्त्रीणांतुसंभाषेत्तीर्थेरण्येगृहेपिवा ॥२०॥ नदीनांचैवसंभेदेसससंग्रहणमाप्नुयात् ॥

अर्थ- आणि तीर्थीं, अरण्यांत, अथवा गृहांत जो परस्त्रियांशीं संभाषण करील किंवा नद्यांचे प्रवाहांचा नाश करील तो मनुष्य बंदिशालेंत ठेवावा.

नसंभाषेत्सहस्त्रीभिः प्रतिषिद्धः समाचरेत् ॥२१॥ प्रतिषिद्धेसमाभाष्यसुवर्णंदंडमर्हति ॥

अर्थ- तसेंच कोणी स्त्रियां सह वर्तमान भाषण करूंनये असा निषेध केल्या जो मनुष्य त्यांशीं बोलेल. किंवा स्त्रीसंभाषणा विषयीं निषेध केलेल्या मनुष्याशीं स्त्री भाषण करील तरते सोळा मासे सोनें दंड करण्यास योग्य होतात.

नैषचारणदारेषुविधिरात्मोपजीविषु ॥२२॥ सज्जयंतिमनुष्येस्तानिगूढं वाचरत्युत ॥ किंचिदेवतुदाप्यःस्यात्संभाषेणापचारयन् ॥२३॥ प्रेष्यासुचैवसर्वासु

गृहप्रव्राजितास्त्र्च ॥

अर्थ – आणि नृत्य करून आपणा पासून उपजीवन करणाऱ्या ज्या वारांगना स्त्रियांशीं संभाषण करून जो त्यांस आपणा पासून बिघडवील त्यास पूर्वी सांगितलेल्या प्रकारानें रुवणी वा दंड नाहीं. कारण त्या नृत्य करणाऱ्या वेश्या, पुरुषाशीं सक्त असून गुप्त रीतीनेंच वर्ततात परंतु राजानें मर्यादा रक्षणार्थ त्यां पासून किंचित् दंड घ्यावा. तशाच दासी व गृहांतून बाहेर निघालेल्या सर्व स्त्रिया यांशीं जो सख्य, संभाषण रूप अपराध करील त्यासही कांहीं दंड करावा.

योकामांदूषयेत्कन्यांससद्योवधमर्हति ॥ २४ ॥ सकामां दूषयानस्त्कप्राप्नुयाद्द्विशतंदमं

अर्थ – तसाच जो पुरुष, एकादी कन्या विषयाचीइच्छा करीतनसून तिला व्यभिचारानें दूषित करतो तोतत्काल वधास योग्य होतो. व इच्छा करणाऱ्या कन्येला व्यभिचारानें दूषितकरतो त्यास दोनशें पण (पैसे) दंड करावा.

यश्चसंरक्षकस्तत्रपुरुषःसतथाभवेत् ॥ २५ ॥ पारदारिकवद्दंड्योयोपिस्यादवकाशदः ॥

अर्थ – तसेंच कोणी व्यभिचारानें कन्येस दूषित करीतअसतां जो त्याचें संरक्षण करतो तोही पुरुष, परस्त्री गमन करणाराच्या दंडास पात्र होतो. व जो मनुष्य व्यभिचारकर्म करणारास स्थल देतो तोहीत्याच दंडासयोग्य होतो.

बलात्संदूषयेद्यस्त्क परभार्यांनरः क्वचित् ॥ २६ ॥ वधोदंडो भवेत्तस्यनापराधोभवेत्स्त्रियः ॥

अर्थ – तसाच कदाचित् जो पुरुष, बलात्कारानें परस्त्रीस व्यभिचारादिक कर्मांनीं अत्यंत दूषित करील किंवा करवील त्यास वध रूप दंड करावा. कारण त्यांत स्त्रीचा अपराध नाहीं.

रजस्त्रितीयंयाकन्यास्वगृहेप्रतिपद्यते ॥ २७ ॥ अदंड्या साभवेद्राज्ञावरयंतीपतिंस्वयं ॥

अर्थ – आणि जी कन्या आपले पितृ गृहांत असून तिला विवाहापूर्वी त्रिवार रजोदर्शन झाल्या वर तिनें स्वतः पति वरला तरी ती राजानें दंड करण्यास यो

ग्य होत नाहीं.

स्वदेशे कन्यकां दत्वा तामादाय तथा व्रजेत् ॥ २८ ॥ परदेशेम
वेद्ध्यः स्त्रीचोरः स यतो भवेत् ॥

अर्थ- तसेंच कोणी आपली कन्या स्वदेशांत दिली असून तिचा पति कप टानें तिला पर देशीं घेऊन जाईल, तर तो. स्त्री चोर असें समजावें. आणि तो याच कारणानें वधास योग्य होईल.

अद्रव्यां मृतपत्नीं तु संगृण्हन्नापराध्यति ॥ २९ ॥ सद्रव्यां तां-
संग्रहीता दंडं तु क्षिप्रमर्हति ॥

अर्थ- आणि जो पुरुष, निर्द्रव्य गतभर्तृका स्त्रीचा संग्रह विषय संबं- धानें करील तो अपराधी होतो; व जो मनुष्य, द्रव्य संपन्न तशा स्त्रीचा संग्र ह विषय लोभादि बुद्धीनें करील; तो त्वरित दंडास पात्र होतो.

उत्कृष्टं याभजेत्कन्यां देयात्तस्यैव सा भवेत् ॥ ३० ॥ यत्त्वा-
न्यं सेवमानां च संयतां वासयेद्गृहे ॥

अर्थ- तशीच जी कन्या ज्या उत्तम पुरुषाचें सेवन करील; ती त्यासच देण्या ला योग्य होते. आणि जी कन्या आपणा पेक्षां मध्यम व अधम अशा पु रुषाचें जर सेवन करील तर त्या कन्येस घरांत निर्बंध करून ठेवावें.

जघन्यमुत्तमा नारी सेवमाना तथैव च ॥ ३१ ॥ भर्त्तारं
लंघयेद्या स्त्री ज्ञातिभिर्बलदर्पिता ॥ तां च निष्कासये-
द्राजा संस्थाने बहुसंस्थिते ॥ ३२ ॥

अर्थ- आणि जी उत्तम वर्णांतील स्त्री हीन जातीच्या पुरुषाचें सेवन- करील व जी रूपादिक बलाच्या गर्वानें पतीचा त्याग करील त्या स्त्रियां स बहुत लोकांच्या निवास स्थानांत राजानें तिच्या ज्ञाती कडून घालवावें.

हृताधिकारां मलिनां पिंडमात्रोपजीविनीं ॥ वासयेत्स्वै
रिणीं नित्यं सवर्णाभिर्दूषितां ॥ ३३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जी स्त्री सजातीय पुरुषाशींच व्यभिचार करून दू षित झाली. तिला पूर्व अधिकारा वरून दूर करून घरांत क्षुधानिवारण- परिमित अन्न मात्र देऊन मलिन वेषानें ठेवावी.

ज्यायसा दूषिता नारी मुंडनं समवाप्नुयात् ॥ वासश्च म-

लिनंनित्यंशिरवांसंप्राप्नुयाद्दश ॥ ३४॥

अर्थ- तशीच जीस्त्री श्रेष्ठ पुरुषाच्या संगानें दूषित होईल तिला निरंतर परिधानार्थ मलिन वस्त्र द्यावें आणि तिचें मुंडन करावें. तें असेंकीं, तिचे दहा पाट काढावे.

ब्राम्हणाः क्षत्रियोवैश्यः क्षत्रविट्शूद्रयोषितः॥ब्रम्ह-
दाप्योभवेद्राजादंडमुत्तमसाहसं ॥ ३५॥

अर्थ- तसेंच ब्राम्हण, क्षत्रिय किंवा वैश्य हे, क्षत्रिय, वैश्य अथवा शूद्र यांच्या स्त्रीशीं गमन करतील तर राजानें त्यांपासून एक हजार एेशीं पैसे दंड ब्राम्हणांस देववावा.

वैश्यागमेन्चविप्रस्यक्षत्रियस्यात्यजांगमे॥मध्यमं
प्रथमंवैश्योदंड्यः शूद्रागमाद्भवेत् ॥ ३६॥

अर्थ- त्याच प्रमाणें ब्राम्हण, वैश्य स्त्रीशीं व क्षत्रिय, अत्यज स्त्रीशीं असे ते संग करतील तर त्यांस पांचशें चाळीस पैसे दंड करावा. आणि वैश्य, शूद्र भार्येशीं व्यभिचार करील तर त्यास दोनशें सत्तर पैसे दंड करावा.

शूद्रः सवर्णागमनेशतंदंड्योमहीक्षिता॥ वैश्यस्तु द्विगु
णंराजन्क्षत्रस्तु त्रिगुणंतथा॥ ३७॥

अर्थ- हे राजन् शूद्रानें सजातीय परस्त्रीशीं समागम केला असतां, राजानें त्यास शंभर पैसे दंड करावा. तसेंच वैश्य व क्षत्रिय यानीं स्ववर्णस्थ परस्त्रीशीं संग केला तर त्यांस क्रमानें शूद्राच्या द्विगुणित व त्रिगुणित असा दंड करावा.

ब्राम्हणश्चभवेद्दंड्यस्तथाराजंश्चतुर्गुणं॥ अगुप्तासुभ-
वेद्दंडः स्वगुप्तास्वधिकोभवेत् ॥ ३८॥

अर्थ- तसाच ब्राम्हण, स्वकीय वर्णीतील परस्त्रीशीं व्यभिचार करील तर त्यास शूद्रापेक्षां चतुर्गुणित दंड करावा. आणि पूर्वींच्या सर्व परस्त्रियांशीं व्यभिचार करणारांस सांगितलेला दंड, त्यांचे पति स्वशक्त्यनुरूप-त्या स्त्रियांस यथेच्छ विषय भोगादिक देण्यानें त्यांचें संरक्षण करीत नसतील तर करावा. व ते पति, त्यां स्त्रियांस यथेच्छ विषय भोगादिक देऊन संरक्षण करीत असून त्यांशीं व्यभिचार करणारांस पूर्वीं सांगितल्या पे.

क्षां दुप्पट दंड करावा.

मातापितृष्वसाश्वश्रूर्मातुलानीपितृव्यजा ॥ पितृ-
व्यसखिशिष्यस्त्रीगर्भिणीतत्सखीतथा ॥ ३९ ॥-
भ्रातृभार्यागमेपूर्वोद्दंडस्तुद्विगुणोभवेत् ॥

अर्थ- तश्याच सर्व माता, पितृभगिनी (आत), श्वश्रू (सासू), मातुल पत्नी (मामी), पितृव्य कन्या (चुलत बहीण,) पितृव्य (चुलता), मित्र, शिष्य यांच्या स्त्रिया, गर्भिणी, माता आदि करून सांगितलेल्या स्त्रियांच्या मैत्रिणी व भ्रातृ पत्नी (भावजय) यांशीं संग करणासच पूर्वीच्या दंडा पेक्षां द्विगुणित दंड करावा.

चंडालींचश्वपाकींचगच्छन्वधमवाप्नुयात् ॥ ४० ॥ति-
र्यग्योनिंचगोवर्ज्यांमैथुनंयोनिषेवते ॥ वपनंप्राप्नुयाद्दंडं-
तस्याश्चयवसादिकं ॥ ४१ ॥

अर्थ- तसेंच ब्राम्हणादि उत्तम वर्णानें, श्व (कुत्रा) मांस भक्षक चंडालस्त्रीशीं गमन केलें असतां, तो प्राणांत शिक्षेस पात्र होतो. आणि जो मनुष्य, गायीवांचून अन्यपशूंशीं मैथुन करतो. त्याचें मुंडन करून त्यापासून दंड घेऊन त्याद्रव्यानें तृण व उदक त्या पशूंस घालावें.

सुवर्णंचभवेद्दंड्योगांव्रजन्मनुजोत्तम ॥ वेश्यागामी
द्विजोदंड्योवेश्याशुल्कसमंपण ॥ ४२ ॥

अर्थ- हे मानव श्रेष्ठा, जो पुरुष गायीशीं मैथुन करील त्यास एक तोळा सुवर्ण दंड करावा. आणि वेश्या गामी ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्यांस त्यावेश्येला दिलेल्या मौल्या समान पणांचा दंड करावा.

गृहीत्वावेतनंवेश्यालोभादन्यत्रगच्छति ॥ वेतनंद्विगु
णंदद्याद्दंडंचद्विगुणंतथा ॥ ४३ ॥

अर्थ- तशीच कोणी वेश्या एका पुरुषा पासून वेतन (मासिक नियमानें दिलेलें धन किंवा तत्कालीं संकेतित केलेलें द्रव्य) घेऊन अधिक लो

---

* टीप शूद्रास दोनशें पैसे, वैश्यास चारशें पैसे, क्षत्रियास सहाशें पैसे व ब्राम्हणास आठशें पैसे अशा क्रमानें दंड करावा.

भानें अन्य पुरुषाशीं गमन करील. तर तिणें त्याप्रथम यजमानास त्या वेतनाच्या द्विगुणित द्रव्य देऊन राजासही तितकाच दंड द्यावा.

अन्यमुद्दिश्ययोवेश्यांनयेदन्यस्य कारणात् ॥ तस्यदंडोभवेद्राजन्सुवर्णस्यच्चमाषकं ॥ ४४ ॥

अर्थ– हे राजन् जो मनुष्य एका अन्य पुरुषाच्या उद्देशानें एकादे वेश्येस त्यावांचून दुसरा कडे नेईल तर त्यास एक मासा सुवर्ण दंड करावा.

नीत्वाभोगान्नयोदद्याद्दाप्योद्विगुणवेतनं ॥ राज्ञश्चद्विगुणं दंडंतथाधर्मोनहीयते ॥ ४५ ॥

अर्थ– तसाच कोणी पुरुष वेश्येस उपभोगार्थ नेऊन तिला भोग नदेईल तर राजानें त्याज कडून तिला संकेताच्या द्विगुणित धन देववून त्यापासून राज दंडही तितकाच घ्यावा.

बहूनांव्रजतामेकांसर्वेतेद्विगुणंदमं ॥ दद्युः पृथक्पृथक्सर्वेदंडंचद्विगुणंपरं ॥ ४६ ॥

अर्थ– आणि एका वेश्ये पाशीं बहुत पुरुषानीं गमन केलें असतां, राजानें त्यांस वेश्येला दिलेल्या धना पेक्षां द्विगुणित द्रव्याचा पृथक् पृथक् दंड करावा. आणि ते निरनिराळा दंड देण्यास असमर्थ असले; तर त्यासर्वी मिळून दुप्पट दंड करावा.

नमातानपितानस्त्रीनऋत्विक्याज्यमानवाः ॥ अन्योन्यंपतितास्त्याज्यायोगेदंड्याःशतानिषट् ॥ ४७ ॥

अर्थ– तसेच माता, पितर, पत्नी, ऋत्विज व यजमान हे कोणी पतित झाले असतां, तेस्वकीय नव्हेत असें मानून त्यांचा त्याग करावा. असें असून ते परस्परें संसर्ग करतील तर त्यांस सहाशें पैसे दंड करावा.

पतितागुरवस्त्याज्यानतुमाताकथंचन ॥ गर्भधारणपोषाभ्यांतेनमातागरीयसी ॥ ४८ ॥

अर्थ– तसेच पतित झालेल्या पिता आदिकरून सर्व गुरूंचा त्याग करावा. परंतु माता पतित झाली तरी तिचा त्याग कदापि करूनये; कारण माता, गर्भाचें धारण व पोषण करण्या मुळें पुत्रास अतिशयें मान्य आहे.

अधीयानोप्यनध्यायेदंड्यः कार्षापणत्रयं ॥ अध्याप-

कश्चद्विगुणंतथाचारस्यलंघने ॥ ४९॥ अनुक्तस्यभवेद्दंडः
सुवर्णस्यचकृष्णलं ॥

अर्थ - तसाच जो मनुष्य अनध्याय दिवशींही अध्ययन करतो. त्यास त्याचे शक्त्यनुसार तीन रुपये किंवा तीनपावले (बाराआणे) दंड करावा.आणि अध्ययन सांगणारा व शास्त्रोक्त आचाराचें उल्लंघन करणारा यांस अध्ययन करणारा पेक्षां द्विगुणित दंड करावा. बज्याविषयीं शास्त्रांत कोठेंच दंडसांगितला नाहीं. तेथें तीन गुंजा सुवर्ण दंड करावा.

भार्यापुत्रश्चदासश्चशिष्योभ्राताचसोदरः॥ ५०॥ कृता
पराधास्ताड्यास्यूरज्जावेणुदलेनवा॥पृष्ठतस्तुशरीरस्य
नोत्तमांगंकथंचन॥ ५१॥ अतोन्यथाप्रहरतःप्राप्तस्या
च्चोरकिल्बिषं ॥

अर्थ - त्याच प्रमाणें भार्या, पुत्र, दास, शिष्य व एकोदर बंधु यानीं ताडन योग्य कांहीं अपराध केला असतां, दोरी किंवा वेळूची कांठी यानीं त्यांच्या पृष्ठ भागा वर ताडन करावें. परंतु मस्तक स्थानीं प्रहार करूनये. असें असून यानियमा विरुद्ध जो त्यांस मारील तोचोरा समान दंडास पात्र होईल.

दूतींसमाव्हयंश्चैवयोनिषिद्धंसमाचरेत्॥ ५२॥ आ
च्छन्नवाप्रकाशंवासदंड्यःपार्थिवेच्छया॥

अर्थ - तसेंच राजानें आपल्या दूतीस बोलावण्या साठीं जो पुरुष पाठविला. तो निज समागमें गुप्तरीतीनें किंवा उघड पणें व्यभिचार करील तर राजानें त्यास यथेच्छ दंड करावा.

वासांसिफलकेःश्लक्ष्णैर्निर्णिज्याद्रजकःशनैः॥ ५३॥
अतोन्यथाहिकुर्वस्तुदंड्यःस्याद्रुक्ममाषकं ॥

अर्थ - त्याच प्रमाणें रजकानें (परीट) उत्तम फळ्या अथवा शिळा यांवर हलक्या हातानें वस्त्रें स्वच्छ धुवावीं. असें असून जो रजक अन्यथा करील. त्यास राजानें एक मासा सुवर्ण दंड करावा.

रसास्त्वधिकृतेश्चैवप्रदेयंयैर्विलुप्यते॥ ५४॥ कर्षके
भ्योर्थमादाययःकुर्यात्करमन्यथा॥ तस्यसर्वस्वमादा
यतंराजाविप्रवासयेत्॥ ५५॥

अर्थ — तसेंच राजानें प्रजा संरक्षणा विषयीं योजलेले जे अधिकारी, इतर लोकांस देण्याचें धन देत नाहीत; आणि ते, शेतकरी लोकांपासून भूमि संबंधि द्रव्य घेऊन राजाचे करांत न्यूनाधिक करतील. तर राजानें त्यांचें सर्वस्व हरण करून त्यांस स्वराष्ट्रांतून घालवून द्यावें.

येनियुक्ताःस्वकार्येषुहन्युःकार्याणिकार्यिणां॥ निर्घृणाःक्रूरमनसःसर्वेकर्मापराधिनः॥५६॥ धनोष्मणापच्यमानास्तान्निःस्वान्कारयेन्नृपः॥ कूटशासनकर्तॄंश्चप्रकृतीनांचदूषकान्॥५७॥

अर्थ — तसेंच राजानें स्वकार्यावर नियमित केलेले जे निर्दय अधिकारी धनमदे करून उन्मत्त झाल्यामुळें क्रूरमनानें परकार्यांचा नाश करतील. किंवा जे कपटानें प्रजांस शासन अथवा उपद्रव करणारे असतील ते सर्वही राज कार्या विषयीं अपराधी आहेत असें समजून राजानें त्यांस निर्द्रव्य करावें.

स्त्रीबालब्राम्हणघ्नाश्चवध्याद्विट्सेविनस्तथा॥ अमात्यःप्राड्विवाकोवायःकुर्यात्कार्यमन्यथा॥५८॥ तस्यसर्वस्वमादायतंराजाविप्रवासयेत्॥

अर्थ — तश्याच स्त्रिया, बाल व ब्राम्हण यांची हत्या करणारे तसेंच शत्रूंची सेवा करणारे यांचा वध करावा. आणि प्रधान किंवा न्यायाधीश यांतील जो कोणी राजा अथवा प्रजा यांचें कार्य अन्यथा करील. त्याचें सर्वस्व हरण करून राजानें त्यास स्वदेशांतून हद्दीपार करावें.

ब्रम्हघ्नश्चसुरापश्चतस्करोगुरुतल्पगः॥५९॥ एतान्सर्वान्पृथक्हिंस्यात्महापातकिनोनरान्॥

अर्थ — तसाच ब्रम्हहत्या करणारा, सुरापी, सुवर्णचोरणारा व गुरुस्त्रीगामी या महा पातकी सर्व मनुष्यांस राजानें प्रत्येक पापि लोकांस निरनिराळा दंड करावा.

महापातकिनोवध्याब्राम्हणंतुविवासयेत्॥६०॥ कृतचिन्हंस्वदेशाच्चश्रृणुचिन्हानितत्तः॥

अर्थ — तो असा कीं, त्या महापातकी लोकांचा वध करावा. परंतु ब्राम्हणा

महा पातकी असला. तरी त्यास प्राणांत शिक्षा न करतां त्याचे अंगावर-चिन्ह करून स्वराज्यांतून घालवून द्यावें. यास्तव आतां त्या ब्राम्हणांच्या अंगावर करण्याचे चिन्हांची आकृति श्रवण कर.

गुरुतल्पेभगः कार्यःसुरापानेसुराध्वजः ॥ ६१ ॥ स्तेने तुश्वपदंतद्वद्ब्रम्हहण्य शिराःपुमान् ॥

अर्थ- तो असा कीं, ब्राम्हणानें गुरुस्त्री गमन केलें असतां त्याचे कपाळावर योनीच्या आकृतीचा डाग द्यावा. आणि त्यानें सुरा पान केलें असतां, सुरा नष्ट करून त्यासुरेनें त्याचे कपाळीं ध्वजाकार डाग द्यावा. तसेंच ब्राम्हणानें सुवर्ण स्तेय केलें. तर त्याचे कपाळीं कुत्र्याच्या पाया सारख्या आकृतीचें चिन्ह करावें. व ब्रम्ह हत्या करणाऱ्या ब्राम्हणाच्या कपाळावर मस्तक हीन पुरुषा कार चिन्ह करावें. परंतु जर तो प्रायश्चित्त न करील.

असंभाष्याह्यसंभोज्याअसंवाह्याविशेषतः ॥ ६२ ॥ त्यक्तव्याश्चतथाराजन्ज्ञातिसंबंधिबांधवैः ॥

अर्थ- हे राजन् त्या पतित ब्राम्हणाच्या ज्ञाति, संबंधि, बांधव यानीं त्या महापातकि ब्राम्हणा समागमें भाषण व भोजन करूंनये. आणि त्यानीं त्या पतित ब्राम्हणाचें प्रेत नेऊंनये. तसाच घटस्फोट करून त्याच्या संबंधाचा त्याग करावा.

महापातकिनोवित्तमादायनृपतिःस्वयं ॥ ६३ ॥ अप्सु प्रवेशयेद्दंडं वरुणायोप पादयेत् ॥

अर्थ- तसेंच त्या महा पातकि पतित मनुष्याच्या दंडाचें द्रव्य घेऊन राजानें स्वतः तें दंड धन उदकांत टाकून वरुणास निवेदन करावें.

सहोढंनविनाचोरंघातयेद्धार्मिकोनृपः ॥ ६४ ॥ सहोढं सोपकरणंघातयेदविचारयन् ॥

अर्थ- त्याच प्रमाणें धार्मिक राजानें, चोरास मात्र मारावें परंतु त्याजबरोबर केवल भार वाहक पणानें आलेल्या मनुष्यास मारूंनये. आणि त्या चोरासमागमें आलेला सहाय्यकर्ता हत्यार बंद असल्यास त्यास राजानें विचार न करतां मारावें.

ग्रामेष्वपिचयेकेचिच्चोराणांभक्तदायकाः ॥ ६५ ॥ भां

डावकाशदाश्चैवसर्वांस्तानपिघातयेत्॥

अर्थ- तसेंच ग्रामांतील जे कोणी लोक, चोरांस भक्ष्य, भांडी व अवकाश देणारे असतील त्या सर्वांस राजानें मारावें.

राष्ट्रेषुराज्ञाधिकृताःसामंताश्चैवदूषकाः॥ ६६॥ अभ्य
घातेषुमध्यस्थाःक्षिप्रंशास्याश्चौरवत्॥

अर्थ- आणि सार्वभौम राजानें स्वकीय राष्ट्रांत अधिकारावर योजलेले अधिकारी व मांडलिक राजे हेत्या पृथ्वीपतीस निरर्थक दूषण देतील किंवा राजा व प्रजा यांच्या घातक कर्मांत मध्यस्थ होतील तर त्यानें त्यांचें शीघ्र चोरासारखें शासन करावें.

ग्रामघातेमठाभंगेपथिमोषाभिमर्दने॥ ६७॥ शक्तितो
नाभिधावंतोनिर्वास्याःसपरिच्छदाः॥

अर्थ- तसेंच ग्राम व मठ यांचा नाश होत असतां व मार्गांत चोरांचा उपद्रव झाला असतां; जे अधिकारी स्वशक्त्यनुसार धांवत नाहींत त्यांस परिवार; आप्तादिक सेवक व स्थावर, जंगम जिनगी यांसहित स्वराष्ट्रांतून घालवून द्यावें.

राज्ञःकोशापहर्तॄंश्चप्रतिकूलेषुसंस्थितान्॥ ६८॥ अरी
णामुपजतॄंश्चघातयेद्विविधैर्वधैः॥

अर्थ- आणि राजाच्या भांडार गृहांतील द्रव्याचा अपहार करणारे, राजाच्या प्रतिकूल लोकांचा आश्रय करणारे किंवा प्रतिकूल कार्यांविषयीं प्रवृत्त झालेले, व स्वकीय राजाच्या शत्रूंपासून लांच घेणारे अशा लोकांचा राजानें ताडनादिक अनेक प्रकारचे उपायानीं वध करावा.

संधिंकृत्वातुयेचौर्यंरात्रौकुर्वंतितस्कराः॥ ६९॥ तेषां
छित्वानृपोहस्तौतीक्ष्णशूलेनिवेशयेत्॥

अर्थ- तसेंच जे चोर परस्पर संकेतानें रात्रीं चौर्य करतात; त्यांचे हस्त राजानें छेदून त्यांस तीक्ष्ण शूला वर द्यावें.

तडागभेदकंहन्यात्अप्सुशुद्धवधेनतु॥ ७०॥ यस्तु
पूर्वनिविष्टस्यात्तडागस्योदकंहरेत्॥ आगमंचाप्यपां
भिंद्यात्सदाप्यःपूर्वशासनं॥ ७१॥

अर्थ- तसाच जो मनुष्य सरोवर मोडील त्यास केवल उदकांत बुडवून मा-

रावें. तसेंच पूर्वी आलेलें तळ्यांचें जल हरण करील; आणि पाणि येण्याच्या नळ फोडील; त्यासही पाण्यांतच बुडवून मारावें.

कोष्ठागारायुधागारदेवागारविभेदकान् ॥ पापान्पापसमाचारान्घातयेच्छीघ्रमेवच ॥ ७२ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें राजानें भांडार गृह, शस्त्रालय व देव मंदिर यांचा भंग करणाऱ्या दुराचारीपापी लोकांचा नाश राजानें शीघ्र करावा.

समुत्सृजेद्राजमार्गेयस्त्वमेध्यमनापदि ॥ सहिकार्षापणंदंड्यस्तत्वमेध्यंचशोधयेत् ॥ ७३ ॥

अर्थ- तसाच जो मनुष्य विपत्ति नसून मल मूत्रादिक अमंगल पदार्थ राजमार्गांत टाकतो त्यास त्याच्या शक्त्यनु सार राजानें एकरुपया किंवा एक पावला दंड करून त्याज कडून तें स्थल स्वच्छ करवावें.

अजंगमोथवावृद्धोगर्भिणीबालएववा ॥ परिभाषणमर्हंतिनचशोध्यमितिस्थितिः ॥ ७४ ॥

अर्थ- आणि पांगळा, अतिवृद्ध, आसन्न प्रसव गर्भिणी व बालक यानीं राज मार्गांत अशुद्ध पदार्थ टाकला असतां त्यास रागें मात्र भरावें. परंतु त्यांज कडून मार्ग स्वच्छ करून घेऊं नये.

प्रथमंसाहसंदंड्योयश्चमिथ्याचिकित्सते ॥ परुषेमध्यमंदंडमुत्तमंचतथोत्तमे ॥ ७५ ॥

अर्थ- तशीच जो वैद्य मिथ्या परीक्षा करतो त्यास राजानें दोनशें सत्तर पैसे दंड करावा. आणि सामान्य मनुष्याच्या रोग परीक्षा प्रसंगीं जो वैद्य द्रव्य लोभानें भयंकर भाषण करील त्यास पांचशें चाळीस पैसे दंड करावा व बहु जन पालक राजादिकश्रेष्ठ मनुष्याचे परीक्षा समयीं जो वैद्य धन लोभानें भीति कारक भाषण करतो त्यास राजानें एक हजार ऐशीं पैसे दंड करावा.

छत्रस्यध्वजयष्टीनांप्रतिमानांचभेदकाः ॥ प्रतिकुर्युश्चतत्सर्वेपंचदंड्याःशतानिच ॥ ७६ ॥

अर्थ- तसेंच राजकीय छत्र, ध्वज, राज चिन्हांच्या काठ्या व देवादिक- प्रतिमा यांचा भंग जे करतील अथवा त्या छत्रादिकांस जे प्रति बंध कर-

तील त्यासर्वास राजानें पांचशें पैसे दंड करावा.

अदूषितानांद्रव्याणांदूषणेभेदनेतथा॥ मणीनामपि भेदेनदंड्यःप्रथमसाहसं॥ ७७॥

अर्थ- तशाच निर्दोष पदार्थास कोणी दूषित केलें; किंवा त्यांचें विदारण केलें; अथवा रत्नादिक मणी फोडले असतां, त्यास दोनशें सत्तर पैसे दंड करून त्या मण्यांचें मौल्य घ्यावें. आणि मौल्य देण्याची शक्ति नसल्यास हस्त छेदावे.

समंचविषमंचैवकुरुतेमूल्यतोपिवा॥ समाप्नुयात्स वैपूर्वंदमंमध्यममेवच॥ ७८॥

अर्थ- तसाच कोणी मनुष्य परस्पर सम वस्तूंत एकाद्या वस्तूस मौल्यानें न्यून किंवा अधिक करतो; त्यास दोनशें सत्तर पैसे दंड करावा. आणि- जो परस्पर विषम (न्यूनाधिक) वस्तूंस किमतीनें सम करतो- त्यास पांचशें चाळीस पैसे दंड करावा.

बंधनानिचसर्वाणिराजमार्गेनिवेशयेत्॥ कर्षतो- यत्रदृश्यंतेविकृताःपापकारिणः॥ ७९॥ प्राकारस्य चभेत्तारंपरिखाणांचभेदकं॥ द्वाराणांचैवभेत्तारंक्षि प्रंनिर्वासयेत्पुरात्॥ ८०॥

अर्थ- त्याच प्रमाणें राजकीय निर्बंधाचीं सर्व पत्रें (जाहरनामे) राजमार्गीत लावावे. आणि जे पाप कर्मी क्रूर लोक जेथें तीं राजनियमाचीं पत्रें काढणारे दृष्टि पडतात ते; तसेंच राजधानीचे तट त्याच्या सभोंवतींचे खंदक व नगर संबंधि सीमा द्वारें यांचा नाश करणारे यासर्वांस राजानें स्वकीय पुरांतून घालवून द्यावें.

मूलकर्माभिचारेषुकर्तव्योद्विशतोदमः॥ अबीज विक्रयीयश्चबीजोत्कर्षकएवच॥ ८१॥ मर्यादाभे दकश्चापिविकृतंबंधमाप्नुयात्॥

अर्थ- तसेंच कोणी स्वकीय वर्णाश्रम संबंधि मूल कर्माचा त्याग केला- असतां त्यास दोनशें पैसे दंडकरावा. आणि धान्यें वफल वृक्षादिकहीं- पूर्व संकेता प्रमाणें बीजोपयोगी झाल्या वांचून त्यांचा त्या संकेत विरुद्ध- विक्रय करील; अथवा कोणी लावलेलीं बीजें उपटील- किंवा जो लोक मर्या

द्या,राजकीय मर्यादा यांचा भंग करील. तर त्यांस राजानें भयंकर प्रतिबंधांत ठवावें.

सर्वसंकरपापिष्ठंहेमकारंनराधिप ॥ ८२ ॥ अन्याये वर्तमानंच्छेदयेल्लवशःक्षुरैः ॥

अर्थ - हे मानव राजा, सोनार जातिही सर्वसंकर जातींत अधिक पापिष्ठ असून तो देव, ब्राम्हण व राजा यांचे सुवर्णाचा अपहार करील. तर राजानें त्याच्या अंगाचे बारीक तुकडे वस्तऱ्यानीं काढावे.

द्रव्यमादायवणिजांमनर्घेणावरुंधतां ॥ ८३ ॥ द्रव्याणांदूषकोयस्तुप्रतिच्छन्नस्यविक्रयी ॥ मध्यमंप्राप्नुयाद्दंडकूटकर्तातथोत्तमं ॥ ८४ ॥ राजापृथक्पृथक्कुर्याद्दंडंचोत्तमसाहसं ॥

अर्थ - तसाच देशांतराहून आलेला पदार्थ सर्व व्यापारी मिळून संकेतानें कमी किमतीला पाडून घेतात. तसाच जो त्या वस्तूंवर मिथ्या रोपानें दोष स्थापन करतो. किंवा जो कोणी जिन्नस उघड नकरतां विकतो या सर्वांस पांचशें चाळीस पैसे दंड करावा. आणि हीं पूर्वीचीं सांगितलेलीं कर्मे जे लोक कपटानें करतील; त्यांस प्रत्येक कर्म निमित्त राजानें यथायोग्य उत्तमसाहस दंड करावा.

शास्त्राणांयज्ञतपसांदेशानांक्षेपकोनरः ॥ ८५ ॥ देवतानांसतीनांचउत्तमंदंडमर्हति ॥

अर्थ - तशींच शास्त्रें, यज्ञ, तपें, देश, देवता व पतिव्रतास्त्रिया यांवर मिथ्या दोषारोप करतो. तो उग्र दंडास योग्य होतो.

एकस्यदंडपारुष्येबहूनांद्विगुणोदमः ॥ ८६ ॥ कलहोद्धृतोदाप्योदंडश्चद्विगुणस्ततः ॥ मध्यमंब्राम्हणंराजाविषयाद्विप्रवासयेत् ॥ ८७ ॥

अर्थ - त्याच प्रमाणें एकाद्या राजकीय अधिकाऱ्यानें बहुत लोकांस उग्र दंड केला असतां, त्यास राजानें त्या उग्र दंडाच्या द्विगुणित दंड करावा. तसेंच कलहाचे मूळ ज्या मनुष्या पासून निघालें त्यास पुढें कलह करणारा पेक्षां दुप्पट दंड करावा. आणि त्या कलह होण्यांत ब्राम्हण जर मध्यस्थ-

असेल. तर त्यास राजानें स्वदेशांतून घालवून द्यावें.

लशुनंचपलांडुंचसूकरंग्रामकुक्कुरं॥ तथापंचनखं-
सर्वभक्ष्यादन्यत्तुभक्षयेत्॥८८॥ विवासयेत्क्षिप्र-
मेवब्राम्हणंविषयात्स्वकात्॥

अर्थ- तसाच लसूण, पलांडु (कांदा), सूकर (डुकर), गांवांतील कु-
क्कुट (कोंबडा) तसेच ससा, साळई नावाचा पक्षी व त्यांतील अवांतर भेद,
कासव व घोरपड यां पांच नखवांचे प्राण्यां वांचून इतर अभक्ष्य सर्व पंचन
ख प्राणी यांचें ब्राम्हणानें भक्षण केलें असतां, राजानें त्यास स्वदेशांतून शी
घ्र घालवून द्यावें.

अभक्ष्यभक्षणेदंड्यःशूद्रोभवतिकृष्णलं॥८९॥ब्रा
म्हणक्षत्रियविशांचतुस्त्रिद्विगुणंस्मृतं॥ यःसाहसंका
रयतिसदंड्योद्विगुणंदमं॥९०॥यस्त्वेवमुक्काहंदाता-
कारयेत्सचतुर्गुणं॥

अर्थ- तसेंच अभक्ष्य भक्षिणाऱ्या शूद्रास १ गुंज सोनें दंड, व ब्राम्हणादिक त्रिवर्णा
स क्रमानें शूद्राचें चौपट, त्रिगुण, दुप्पट असा दंड आहे. आणि परवस्तु हरणार्थ या
चेनेंच सांगेल. त्यास दंड, परधनापहारकानें हरण केलेल्या वस्तूच्या किमतीचे द्वि
गुणित उक्त दंडाचे दुप्पट करावा. व मी तुला धन देईन असें बोलून जो परद्रव्य हरण
करवील त्यास परधनापहारकाचे चतुर्गुणित दंड करावा.

संदिष्टस्याप्रदाताचसमुद्रगृहभेदकः॥९१॥पंचाशत्प
णिकोदंडस्तत्रकार्योमहीक्षिता॥

अर्थ- तसेंच राजाज्ञे वरून देण्याचें किंवा स्वतः वाचा दत्त केलेली वस्तु
जो देत नाहीं; आणि मोहोर केलेले घर, अनधिकारी मनुष्य उघडील, तर
त्यांस राजानें पन्नास पैसे दंड करावा.

अस्पृश्यंचस्पृशन्नार्योद्वियोग्योयोग्यकर्मकृत्॥९२॥
पुंस्त्वहर्तापशूनांचदासीगर्भविनाशकृत्॥ शूद्रप्रव्र-
जितानांचदैवेपैत्रेचभोजकः॥९३॥ अप्रजन्नुवादमु-
क्कातुतथैवचनिमंत्रणे॥ एतेकार्षापणशतंसर्वेदंड्या
महीक्षिता॥९४॥

अर्थ- तसाच जो कोणी श्रेष्ठ मनुष्य, अस्पृश्य (स्पर्श करण्यास अयोग्य) मनुष्यादिकांस स्पर्श करील, आणि अयोग्य मनुष्य आपले अधिकारावरील कर्म करील. तसेंच पशूंचें पुरुषत्व निष्कारण हरण करणारा दासीचे गर्भाचा नाश करणारा, तसेंच शूद्रांतील दिगंबर (नग्न) गोसावी किंवा शूद्राच्या उपदेशानें झालेले संन्यासी, ब्राम्हण यांस जो दैविक व पैतृक या कर्मांत भोजन घालतो. अथवा श्राद्धाचें आमंत्रण निश्चित घेऊन तेथें नजाणारा. या सर्वांस पृथक् पृथक्. राजानें त्यांच्या शक्त्यनुसार शंभर रुपये किंवा शंभर पावले असा दंड करावा.

दुःखोत्पादि गृहेद्रव्यं क्षिपेदंधस्य कृष्णालं ॥ पितापुत्रविरोधच साक्षिणां द्विशतो दमः ॥ स्यान्नरश्च तथार्यः स्यात्तस्याप्यष्टशतो दमः ॥ ९५ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो मनुष्य अंध मनुष्याचे गृहांत त्या अंधास दुःख उत्पन्न होण्या योग्य पदार्थ टाकतो. अथवा त्या अंधाचें द्रव्य त्यास नसापडून त्याचे मनास दुःख होण्यासारखें जो त्याच घरांत ठेवतो.- आणि पिता व पुत्र यांच्या परस्पर विरोधांत जो कोणी साधारण मनुष्य, साक्षी देईल. त्यास दोनशें पैसे दंड करावा. व त्या पिता, पुत्र विरोधाचे साक्षि प्रकरणांत श्रेष्ठ मनुष्य पडला तर त्यास आठशें पैसे दंड करावा.

तुलाशासनमानानां कूटकृन्नाकणस्य च ॥ एभिश्च व्यवहर्ता च स दंड्यो दममुत्तमं ॥ ९६ ॥

अर्थ- तसेंच कांटा आदि करून तोलण्याचें साधन, शासन, वजनें, मापें व नाणें हीं कोणी कपटानें केलीं किंवा या खोट्या साधनानीं कोणी व्यापार केला असतां, त्यास राजानें सर्वस्व हरण अथवा अंगछेदन इत्यादिक यथेच्छ उग्र दंड करावा.

विषाग्निदां पतिगुरुनिजापत्यप्रमापणीं ॥ विकर्णनासिकौष्ठीं कृत्वा गोभिः प्रमापयेत् ॥ ९७ ॥

अर्थ- तशीच जी दुष्ट स्त्री, लोकांस विष देणारी, दुसऱ्याचे घरांस अग्नि लावणारी, तसेच पति, गुरु व स्वकीय अपत्यें (बालकें) यांस मार-

णारी अशा स्त्रींचे कर्ण, नासिक व ओष्ठ यांचा छेद करून तिला बैलां कडून मारवावी.

खलस्यदाहकार्येचग्रेचक्षेत्रस्यवेश्मनः॥ राजपत्न्यभिगामीचदग्धव्यास्तेकराग्निना ॥ १९८॥

अर्थ - त्याच प्रमाणें जे धान्याचे खळें, क्षेत्र (शेत) व गृह यांस अग्नि लावणारे व राजपत्नीशीं गमन करणारा यांस सर्वांस गवताच्या वगैरे गंजीचे अग्नींत दग्ध करावें.

ऊनंवाप्यधिकंवापिलिखेद्योराजशासनं॥ पारदारिकचोरंवामुंचतोदंडउत्तमः ॥ १९९॥

अर्थ - तसाच जो राजकीय अधिकारी, राजाज्ञेंत न्यून किंवा अधिक लिहील; अथवा परस्त्री रत व चोर यांस जो सोडील; त्यास राजानें अपराध तारतम्या वरून यथेच्छ उत्तम साहस दंड करावा.

अभक्ष्येणद्विजंदूष्यदंडउत्तमसाहसः॥ क्षत्रियंमध्यमं वैश्यंप्रथमंशूद्रमर्धकं॥ २००॥

अर्थ - तसेंच कोणी पलांडु आदिकरून अभक्ष्य पदार्थानें ब्राम्हणास - दूषित केलें असतां; त्यास एक हजार ऐशीं पैसे दंड करावा आणि क्षत्रिया स दोष फक्त केलें तर पांचशेंचाळीस पैसे दंड करावा. वैश्यास अशा रीतीनें दूषित केलें असतां त्यास दोनशें सत्तर पैसे दंड करावा. व शूद्रास याच रीतीनें दूषित केलें असतां त्यास एकशें पस्तीस पैसे दंड करावा.

मृतांगलग्नविक्रेतु गौंलुताडयतस्तथा॥ राजयानासनारोढुर्दंडउत्तमसाहसः॥ २०१॥

अर्थ - तसाच मरण पावलेल्या मनुष्याचे अंग संबंधि वस्त्रादिकांचा

---

* टीप. या दंडाची मर्यादा एक सहस्त्र ऐशीं पैसे दंड यापासून सर्वस्व हरण, डाग देणें, स्वपुरांतून घालवून देणें, अंगच्छेदन करणें, व वध करणें येथून राजानें अपराध तारतम्यानुसार सर्व किंवा एकेक अशा रीतीनें या दंडाची योजना करावी. अशी योजना या अध्यायांत अन्यत्र कांहीं स्थळीं दृष्टिदोषानें न्यूनाधिक झाली असल्यास सांगितलेल्या प्रकारावरून नीट जाणावी.

---

१ टीप. तसाच येथें गुरूंताडयतस्तथा असाही पाठ आहे. त्या पक्षीं गुरूस ताडन करणारा असा अर्थ समजावा.

विक्रय जो करतो, आणि गायीस ताडन करणारा. व राजाचें वाहन, आसन यांवर कोणी आरोहण करील तर त्या सर्वांस अपराधानुरूप साहस दंड करावा.

योमन्येताजितोस्मीतिन्यायेनापिपराजितः॥ तमायांतंपुनर्जित्वादंडयेद्द्विगुणंदमं ॥ २॥

अर्थ- त्याच प्रमाणें एकाद्या मनुष्यास अधिकाऱ्यानें वाद प्रकरणांत न्यायानें जिंकलें असून ही, मी पराजित झालों नाहीं असें मानून जो पुनः त्या वादास येईल. तर पुनः रीतीनें त्यास कुंठित करून पराजय निमित्त दंडा पेक्षां द्विगुणित दंड करावा.

आह्वानकारीमध्यःस्यादनाह्वानेतथाह्वयन् ॥ दंडिकस्यचयोहस्तादभियुक्तःपलायते ॥ ३॥ हीनपुरुषकारेणतंदद्याद्दांडिकोधनं ॥

अर्थ- तसेंच राजाज्ञे प्रमाणें लोकांस राज सभे कडील बोलावणें करणारा त्या कार्यो विषयीं उदासीन होईल; अथवा ज्यास बोलावणें कर्तव्य नाहीं त्यास बोलावील; किंवा राजकीय प्रतिबंधांतील कोणी मनुष्य, राज दूताच्या हातून पळून जाईल तर, त्यां वरील दंडाधिकाऱ्यानें त्यांस कमी कामांवर नेमून कांहीं धनाचा दंड करावा.

प्रेष्यापराधात्प्रेष्यस्तुसदंड्यश्चार्धमेवच ॥ ४॥ दंडार्थेनियमार्थेचनीयमानेषुबंधनं॥ यदिकश्चित्पलायेत दंडश्चाष्टगुणोभवेत् ॥ ५॥

अर्थ- तसाच श्रेष्ठ अधिकाऱ्याच्याहाता खालचे मनुष्यानें महान् अपराध केला असतां; त्या वरिष्ठ अधिकाऱ्यास अर्ध मासिक किंवा अर्ध वार्षिक वेतनाचा दंड करावा. आणि दंडार्थ अथवा निर्बंधार्थ राजाचे बंधन स्थानास नेलेल्या कैदी लोकांतून कोणी पळाला असतां, त्यावरील अधिकाऱ्यास त्याच्या पगारा पेक्षां अष्ट गुणित दंड करावा.

अनिंदितेविवादेतुनरवरोमावतारणं। कारयेद्यःसपुरुषोमध्यमंदंडमर्हति ॥ ६॥

अर्थ- त्याच प्रमाणें एकाद्याचा वाद सत्य असून जो अधिकारी पुरुष

त्यास मुंडनाचीशिक्षाकरतो. त्यास राजानें अपराध तारतम्यानुरूप मध्यम दंडकरावा*

बंधनंवाप्यवध्यस्यबलान्मोचयतेतुयः॥ वध्यंविमोचयेद्यस्तुदंडाद्द्विगुणभाग्भवेत्॥ ७॥

अर्थ– तशाच राज प्रति बंधातील एकाद्या जन्म टेपी मनुष्याचें शरीरबलादिक बंधन राजाज्ञे वांचून जो बलात्कारानें मुक्त करतो किंवा प्राणांत शिक्षा योग्य मनुष्यास त्या शासनांतून कपटानें सोडवितो त्यास त्या दंड्य मनुष्या पेक्षां द्विगुण दंड करावा.

दुर्दृष्टव्यवहाराणांसभ्यानांद्विगुणोदमः॥ राज्ञात्रिंशद्गुणोदंडःप्रक्षेप्यउदकेभवेत्॥ ८॥

अर्थ– तसेच राजसभासदांनीं लोभादिकानें स्मृत्युक्त धर्माचें उल्लंघन केलें तर त्यांस सत्य कीं अन्यायानें जिंकलेल्या मनुष्या पेक्षां द्विगुण दंड करावा. आणि राजानें ही तसा लोभा दिकानें दंड घेतला असतां. त्यानें त्या पेक्षां तीस पट धन, उदका समीप वरुणाचे उद्देशानें संकल्पून तें स्वतः ब्राम्हणांस द्यावें.

अल्पदंडेधिकंकुर्याद्विपुलेचाल्पमेवच॥ ऊनाधिकंतुतंदंडंसभ्योदद्यात्स्वकाद्गृहात्॥ ९॥

अर्थ– तसाच जो सभ्य अधिकारी, लोकांस अल्प दंडयोग्य अपराधा विषयीं अधिक दंड करील. किंवा बहु दंड योग्य कृत्य निमित्त प्रजेस अल्प दंड करील तर तोन्यून अथवा अधिक दंड राजानें त्या लोकांपासून न घेतां, त्यासभ्य अधिकाऱ्यांचे स्वगृहांतून घ्यावा.

यावानवध्यस्यवधेतावान्वध्यस्यरक्षणे॥ अधर्मोनृपतेर्दृष्टस्तथावध्यस्यमोक्षणे॥ १०॥

अर्थ– तसेंच अवध्य मनुष्यास प्राणांत शिक्षा केली असतां जेवढा अधर्म आहे. तेवढाच अधर्म देहांत शासन योग्य अपराधि मनुष्याचें. रक्षण केलें असतां, होतो. व वध रूप दंडास पात्र झालेल्या अपराधि मनुष्यास सोडलें तर तितकाच अधर्म असून हा सर्व, राजास पडतो.

---

* टीप. हा दंड ही उत्तम साहस दंडा सारखा अनेक प्रकारचा आहे यास्तव राजानें त्याचें मध्यम धन हरण करावें. असेंच अन्यत्र ही याचें स्वरूप चुकले असलें तरी अपराध तारतम्यानुसार घ्यावें. व प्रथम साहस दंडा विषयीं ही अशीच तारतम्यानें हीन द्रव्य हरणाची योजना करावी.

ब्राम्हणंनैवहन्यात्तुसर्वपापेष्ववस्थितं ॥ प्रवासयेत्स्वका-
द्राष्ट्रात्समग्रधनसंयुतं ॥ ११ ॥

अर्थ- तसाच ब्राम्हण सर्वपाप कर्मीत आसक्त असला तरी राजानें त्याचा वधक रूंनये; तर सर्व धना सह वर्तमान त्यास स्वकीय राष्ट्रांतून घालवून द्यावें.

नजातुब्राम्हणंवध्यात्स्यात्कंत्वधिकंभवेत् ॥ यस्मात्तस्मा
त्प्रयत्नेनब्रम्हहत्यांविवर्जयेत् ॥ १२ ॥

अर्थ- कारण ब्रह्महत्येचें पातक प्रायश्चित्तानींही,नजाण्या साररवें अधिक होतें; यास्तवब्राम्हणास प्राणांत शिक्षा कदापि करूंनये. असा शास्त्र सिद्धांत आहे. तस्मात् राजानें प्रयत्नें करून ब्राम्हण हत्या वर्ज करावी.

अदंड्यान्दंडयेद्राजादंड्यांश्चैवाप्यदंडयन् ॥ अयशो
महदाप्नोतिनरकंचाधिगच्छति ॥ १३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें राजा जर कोणी दंडास योग्य नसून त्यास दंड करील, किंवा कोणी दंडासपात्र असून त्यास दंड नकरील; तर त्या राजाची यालोकीं मोठी अपकीर्ति होऊन देहांतीं तो नरकास जातो.

ज्ञात्वापराधंपुरुषस्यराजाकालंतथाचानुमतंद्विजानां
॥ दंड्येषुदंडंपरिकल्पयेत्तुयोयस्ययुक्तःससमीक्ष्य-
कुर्यात् ॥ १४ ॥

अर्थ- तसाच राजानें पुरुषाचा अपराध जाणून कालव ब्राम्हणांचें अनुमत जाणावें; आणि त्यानें दंड योग्य मनुष्यास जो दंड युक्त असेल तो - शास्त्रांत अवलोकन करून तदनु सार योजावा. " या अध्यायांत प्रायः दंड प्रकरणीं बहुत श्लोक आहेत. यांचा न्यूनाधिक अर्थ याज्ञवल्क्य स्मृतीतील समाख्या स्मृति वाक्यांच्या मिताक्षरानामक टीकेंत केलेल्या विनियोगानुसार लिहिला आहे. " इतिश्री मत्स्यपुराणे दंडप्रशंसानामद्विशतोत्तरसप्तविंशति तमोऽध्यायः ॥ २२७ ॥

अध्याय २२८ वा.

मनुरुवाच ॥ दिव्यांतरिक्षभौमेषुयाशांतिरभि
धीयते ॥ तामहंश्रोतुमिच्छामिमहोत्पातेषुकेश
व ॥ १ ॥

अर्थ- मनुराजा प्रश्न करतो हे केशवा, आकाश, अंतरिक्ष व भूमि या-स्थानांत जे महा उत्पात होतात; त्याविषयीं जी शांति शास्त्रांत सांगितली आहे. तीमी श्रवण करण्यास इच्छितों.

मत्स्यउवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामित्रिविधा-मद्भुतादिषु ॥ विशेषेणतुभौमेषुशांतिःकार्यात-थाभवेत् ॥ २ ॥

अर्थ- तेसमयीं मत्स्य रूपी भगवान् बोलले हे राजन् यानंतर आकाश, अंतरिक्ष, व भूमि, यास्थानत्रयांतील अद्भुतादिक होणाऱ्या अनेक उत्पातां विषयीं तीन प्रकारची शांति सांगतों; त्यांत भूमी वरील उत्पात झाले असतां, त्यां वर शास्त्रोक्त शांति अवश्य करावी.

अभयाचांतरिक्षेषुसौम्यादिव्येषुपार्थिव ॥ विजिगीषुःपरंराजन्भूतिकामस्तथाभवेत् ॥ ३ ॥ विजिगीषुःपरानेवमभियुक्तस्तथापरैः ॥ तथाभिचारशंकायांशत्रूणामभिनाशने ॥ ४ ॥ भयेमहतिसंप्राप्तेअभयाशांतिरिष्यते ॥

अर्थ- हे राजा अंतरिक्ष लोकांत धूमकेतु दर्शनादिक उत्पात झाले असतां, तत्प्रयुक्त अभया नामें शांति करावी. तसेंच आकाशांतील उत्पात निमित्त सौम्या नामक शांति करावी. हे राजन् आणि जो परलोक - प्राप्तीची इच्छा करणारा, आपणास संपत्ती इच्छिणारा तसाच शत्रूंस जिंकण्या विषयीं उद्युक्त, शत्रूंनीं आसमंतात् व्याप्त झालेला त्याच प्रमाणें आपणा वर लोकां कडून ज्यारण, मारणादिक प्रयोगाची शंका आली असतां, शत्रूंचें शासन कर्तव्य असतां, अथवा कांहीं एक महा भय प्राप्त झालें,तर यासर्व संकट निवारणार्थ त्या लोकांनीं अभया नामक शांति करावी.

राजयक्ष्माभिभूतस्यक्षतक्षीणस्यचाप्यथ ॥ ५ ॥-सौम्याप्रशस्यतेशांतिर्यज्ञकामस्यचाप्यथ ॥

अर्थ- आणि राजयक्ष्मा (क्षयरोग) वक्षत (व्रण) यानीं मनुष्य क्षीण झाला असतां, किंवा आपल्या हातून यज्ञ कर्म घडावें; अशी कोणास-

इच्छा झाली तर त्यानीं चंद्र शांति करावी.

भूकंपेचसमुत्पन्नेप्राप्तेचान्नक्षयेतथा ॥ ६ ॥ अति-
वृष्ट्यामनावृष्ट्यांशलभानांभयेषुच ॥ प्रमत्तेषुचचोरे
षुवैष्णवीशांतिरिष्यते ॥ ७ ॥

अर्थ— तसाच भूमिकंप उत्पन्न झाला किंवा अन्नलाभ संबंधि द्रव्य प्राप्तीचे व्यवसाय क्षीण झाले असतां, तशीच अतिवृष्टि, अनावृष्टि, शेतावर होणारें टोळांचें भय व उन्मत्त चोर यांपासून संकट प्राप्त झालें असतां, विष्णु शांति करावी.

पशूनांमरणेप्राप्तेनराणामपिदारुणे ॥ भूतेषुदृश्य
मानेषुरौद्रीशांतिस्तथेष्यते ॥ ८ ॥

अर्थ— त्याच प्रमाणें पशूंचा नाश व मनुष्यांसही महद्भय प्राप्त झालें असतां, तशींच पिशाच्चें मनुष्यांच्या दृष्टीस पडूं लागलीं तर यांविषयीं भयनिवारणार्थ रुद्रशांति करावी.

वेदनाशेसमुत्पन्नेजनेजातेचनास्तिके ॥ अपूज्यपूज
नेजातेब्राम्हीशांतिस्तथेष्यते ॥ ९ ॥

अर्थ— आणि वेदांचा नाश होण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतां, तसेच जन नास्तिक झाले अथवा अपूज्य लोकांची पूजा होऊं लागली तर ब्रम्हदेवांची शांति करावी.

भविष्यत्यभिषेकेचपरचक्रभयेपिच ॥ स्वराष्ट्रभेदेरि-
वधेरौद्रीशांतिःप्रशस्यते ॥ १० ॥

अर्थ— तसाच राज्याभिषेक कर्तव्य असतां, परचक्र(शत्रु)भय, स्वकीयराष्ट्र नाश व शत्रुवध प्रसंग हे प्राप्त झाले तर त्याविषयीं रुद्रशांतिच प्रशस्त आहे.

त्र्यहातिरिक्तेपवनेभक्ष्येसर्वेविगर्हिते ॥ वैकृतेवातजे
व्याधौवायवीशांतिरिष्यते ॥ ११ ॥

अर्थ— आणि तीन दिवस अतिरिक्त वायु सुटला किंवा भक्ष्य पदार्थ सर्व प्रकारें विशेषतः निंद्य झाले असतां, व पक्षघातादिक भयंकर वात विकृति झाली असतां वायु शांति करावी.

अनावृष्टिभयेजातेप्राप्तेविकृतिवर्षणे ॥ जलाशय
विकारेषुवारुणीशांतिरिष्यते ॥ १२ ॥

अर्थ– तसेंच अनावृष्टि (मुळींच पर्जन्य न पडणें) हें भय प्राप्त झालें किंवा रक्तादिकाची वृष्टि अथवा पर्जन्य वृष्टी पासून लोकांस विकार प्राप्ति झाली व सरोवरादिक जलाशयांस (उदकस्थानांस) कांहीं विकार झाला असतां, या भीतीचे निवारणार्थ वरुणशांति उक्त आहे.

अभिशापभयेप्राप्तेभार्गवीचतथैवच ॥ जातेप्रसव-
वैकृत्येप्राजापत्यामहाभुज ॥ १३ ॥

अर्थ– आणि मिथ्या पापाच्या आरोपाचें भय प्राप्त झालें तर शुक्र शांति करावी. व प्रसूति संबंधानें गर्भाचें आगमन सरळ मार्गानें न होणें किंवा त्याच संबंधि कांहीं इतर विकार झाले असतां, प्राजापत्यानामें शांति विहित आहे.

उपस्कराणांवैकृत्येत्वाष्ट्रीपार्थिवनंदन ॥ बालानां-
शांतिकामस्यकौमारीञ्चतथानृप ॥ १४ ॥

अर्थ– हे राज कुलानंद दायका, कोणतेही साहित्य पदार्थ अकस्मात् भंगले असतां, त्वष्टानामक देवतेची शांति करावी. हे नृपा, बालकांस सर्वारिष्ट-निवृत्ति पूर्वक सुख प्राप्तीची इच्छा करणारानें कार्तिक स्वामीची शांति करावी.

कुर्याच्छांतिमथाग्नेयींसंप्राप्तेवन्हिवैकृते ॥ आज्ञाभंगे
तुसंजातेतथाभृत्यादिसंक्षये ॥ १५ ॥

अर्थ– तसेंच अग्नी पासून कांहीं भय प्राप्त झालें किंवा अग्नीनें अंग बहुत भाजलें असतां, तशाच प्रजा, राजाचा आज्ञा भंग करूं लागल्या अथवा सेवकादिकांचा क्षय झाला तर अग्नि शांति करावी.

अश्वानांशांतिकामस्यतद्विकारेसमुत्थिते ॥ अश्वानां
कामयानस्यगांधर्वीशांतिरिष्यते ॥ १६ ॥

अर्थ– आणि अश्वांस कांहीं महा विकार उत्पन्न झाला असतां, त्याची निवृत्ति होऊन अश्वांस सुख प्राप्तीची इच्छा करणारा व आपणास अश्व प्राप्त व्हावे असें इच्छिणारा यानीं गंधर्व शांति करावी.

गजानांशांतिकामस्यतद्विकारेसमुत्थिते॥ गजानां
कामयानस्यशांतिरांगिरसीभवेत्॥ १७॥

अर्थ— तसाच कांहीं भोग विकार गजास उपस्थित झाला असतां, तो दूर होऊन त्यास स्फुरण होण्याची इच्छा करणारा व जो आपणास गजला भाची इच्छा करतो. त्यानीं बृहस्पति शांति करावी.

पिशाचादिभयेजातेशांतिर्वैनैर्ऋतीस्मृता॥ अपमृ
त्युभयेजातेदुःस्वप्नेचतथास्थिते॥ १८॥

अर्थ— तसेंच पिशाचादिक अपमृत्यु व दुःस्वप्न यांपासून भयप्राप्त झालें असतां, नैर्ऋति नामक लोकपालाची शांति विहित आहे.

याम्यांतुकारयेच्छांतिंप्राप्तेतुनरकेतथा॥ धननाशे
समुत्पन्नेकौबेरीशांतिरिष्यते॥ १९॥

अर्थ— त्याच प्रमाणें नरकयातने समान या मनुष्य लोकीं दुःख प्राप्त झालें असतां यमशांति करावी. व धननाश उपस्थित झाला तर तन्निवारणार्थ कुबेर शांति करावी.

वृक्षाणांचतथार्थानांवैकृतेसमुपस्थिते॥ भूतिका
मस्तथाशांतिंपार्थिवींप्रतियोजयेत्॥ २०॥

अर्थ— तसेंच वृक्ष व अनेक प्रकारच्या वस्तु किंवा कार्यें यांचा नाश प्रसंग प्राप्त झाला असतां अथवा ज्यास संपत्तीची इच्छा असेल त्यानें पृथ्वी शांति करावी.

प्रथमेदिनयामेचरात्रौवामनुजोत्तम॥ हस्तेस्वातौचचि
त्रायामादित्येचाश्विनेतथा॥ २१॥ अर्यम्णिसौम्यजा
तेषुवायव्यांत्वद्भुतेषुच॥ द्वितीयेदिनयामेतुरात्रौच
रविनंदन॥ २२॥ पुष्याग्नेयविशाखासुपित्र्यासुभरणी
षुच॥ उत्पातेषुतथाभाग्येआग्नेयीतेषुकारयेत्॥ २३॥

अर्थ— लिंवा प्रकार असा कीं हे मानवोत्तमा, दिवसाचा किंवा रात्रीचा प्रथम प्रहर, हस्त, स्वाती, चित्रा, पुनर्वसु, अश्विनी, उत्तरा व मृग या कालां वर उत्पात झाला असतां, वायु शांति करावी. तसेंच हे सूर्य नंदना, दिवस व रात्र यांचा द्वितीय प्रहर, पुष्य, कृत्तिका, विशाखा, मघा, भरणी व पूर्वा, या कालीं उत्पात झा

ला तर त्या सूचित अरिष्ट निवारणार्थ अग्नि शांति करावी.

तृतीये दिनयामेच रात्रौ च रविनंदन ॥ रोहिण्यां वैष्ण-
वे ब्राम्हे वासवे वैश्वदेवते ॥ २४ ॥ ज्येष्ठायां च तथा मै-
त्रे ये भवंत्यद्भुताः क्वचित् ॥ ऐंद्री तेषु प्रयोक्तव्या शांती
रविकुलोद्वह ॥ २५ ॥

अर्थ— त्याच प्रमाणें हे रविनंदना, दिवस व रात्र यांचा तृतीय प्रहर, रोहिणी, श्रवण, अभिजित्, धनिष्ठा, उत्तराषाढा, ज्येष्ठा व अनुराधा या कालांवर उत्पात झाला असतां, इंद्र शांति करावी.

चतुर्थे दिनयामे च रात्रौ वा रविनंदन ॥ सार्पे पौष्णे तथा
द्रीयां महिर्बुध्न्ये च दारुणे ॥ २६ ॥ मूले वरुणदैवत्ये ये भ
वंत्यद्भुतास्तथा ॥ वारुणी तेषु कर्तव्या महाशांतिर्महीक्षिता ॥ २७ ॥

अर्थ— हे सूर्यसुता, आणि दिवस व रात्र यांचा चतुर्थ प्रहर, आश्लेषा, रेवती, आर्द्रा, उत्तराभाद्रपदा, पूर्वा, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, मूल व शततारका या कालीं उत्पात झाला तर त्यावरून सूचित झालेल्या अरिष्टांचे निवारणार्थ राजानें वरुणाची महा शांति करावी.

मित्रमंडलवेलास्तये ये भवंत्यद्भुताः क्वचित् ॥ तत्र शांति
द्वयं कार्यं निमित्तेषु च नान्यथा ॥ निर्निमित्तकृता शां-
तिर्निमित्तेनोपयुज्यते ॥ २८ ॥

अर्थ— तसेच सूर्यमंडलाचे उदय व अस्त या कालीं कदाचित् उत्पात झाले असतां, तन्निमित्त प्रत्येकीं दोन शांति कराव्या. त्या अशाकीं, सूर्योदय कालीं झालेल्या उत्पाता वर रात्रीचा चतुर्थ प्रहर व दिवसाचा प्रथम प्रहर या दोनी कालच्या दोन्ही शांति कराव्या. आणि सूर्यास्त कालीं झालेल्या उत्पातां विषयीं दिवसाचा चतुर्थ प्रहर व रात्रीचा प्रथम प्रहर या दोन काल प्रयुक्त दोन्ही शांति कराव्या. परंतु या सर्व शांतिहीं उत्पात निमित्तें झाल्या वांचून करूं नये. असें असून या शांति, झालेल्या उत्पात निमित्ता वांचून केल्या असतां, त्यामुळेंहीं उत्पात रूप दुश्चिन्हें उत्पन्न होतात.

बाणप्रहारा न भवंति यद्वद्राजन्नृणां सन्नहने धृतानां ॥

दैवोपघातानभवंतितद्वद्धर्मात्मिनांशांतिपरायणानां ॥२९॥

अर्थ- कारण हे राजन् अनेक कवचें धारण केलेल्या मनुष्यांस जसे बाण प्रहार लागत नाहींत. तसे शांति कर्मे करणाऱ्या धर्म शील मानवांस-दैविक उपद्रव होत नाहींत. इतिश्री मत्स्य पुराणे अद्भुत शांति नीम-द्विशतोत्तर अष्टाविंशति तमो ऽध्यायः ॥ २२८ ॥

अध्याय २२९ वा.

मनुरुवाच ॥ अद्भुतानांफलंदेवशमनंचतथावद ॥ त्वं हिवेत्सिविशालाक्षज्ञेयंसर्वमशेषतः ॥ १ ॥

अर्थ- मनु राजा पुनः प्रश्न करतो हे मत्स्य देवा, तसेच उत्पात झाले असतां, त्यांचें फल व त्या अद्भुत सूचित अरिष्टांचें निवारण कोणत्या उपायानें होतें हें मला कथन करा. कारण हे विशाल नयना, आपणच ज्ञान संपादन योग्य सर्व विषय जाणतां.

मत्स्यउवाच ॥ अत्रतेवर्णयिष्यामियदुवाचमहातपाः ॥ अत्रयेवृद्धगर्गस्तुसर्वधर्मभृतांवरः ॥ २ ॥

अर्थ- ते समयीं मत्स्यरूपी भगवान् बोलले कीं, हे राजन्, या विषयीं-सर्व धार्मिक श्रेष्ठ महा तपस्वी वृद्ध गर्ग मुनीनीं जें अत्रिऋषीस कथन केलें तेंच मी तुला वर्णन करून सांगतों.

सरस्वत्याःसुखासीनंगर्गस्रोतसिपार्थिव ॥ पप्रच्छात्रौमहातेजाअत्रिर्मुनिजनप्रियं ॥ ३ ॥

अर्थ- तें असें कीं, हे पृथ्वी पते, पूर्वी त्या महातेजस्वि अत्रिऋषीनें, सरस्वती नदीच्या प्रवाह तीरीं सुखानें बसलेले असून ऋषिजनांवर प्रीति करणारे अशा गर्ग मुनींस प्रश्न केला.

अत्रिरुवाच ॥ नश्यतांपूर्वरूपाणिजनानांकथय स्वमे ॥ नगराणांतथाराज्ञांत्वंहिसर्वंवदस्वमा ॥ ४ ॥

अर्थ- कीं, हे मुनीश्वरा, विनाश पावणाऱ्या प्रजा तशींच नगरें व राजे यांचीं पूर्व रूपें (पूर्वचिन्हें) हीं सर्व आपण मला कथन करा.

गर्गउवाच ॥ पुरुषापचारान्नियतमपरज्यंतिदेवताः ॥

ततोपरागाद्देवानामुपसर्गः प्रवर्तते ॥ ५ ॥

अर्थ - तेव्हां गर्ग बोलले हे अत्रिसुते पुरुषांच्या अनाचाराने देवता निश्चयेंक्रुद्ध होतात. नंतर त्यांच्या कोपाने लोकांस पीडा होते.

दिव्यांतरिक्षभौमंचत्रिविधंसंप्रकीर्तितं ॥ ग्रहर्क्षवैकृतं-
दिव्यमांतरिक्षंनिबोधमे ॥ ६ ॥

अर्थ - त्यापीडेंतदिव्य, आंतरिक्ष व भौम असे तीन प्रकार आहेत त्यांत ग्रह, नक्षत्रां पासून होणाऱ्या उत्पातांस दिव्य उत्पात म्हणतात. आतां आंतरिक्ष उत्पात-मज पासून श्रवण कर.

उल्कापातोदिशांदाहः परिवेषस्तथैवच ॥ गंधर्वनगरंचैव
वृष्टिश्चविकृतातुया ॥ ७ ॥ एवमादीनिलोकेस्मिन्नांतरिक्षं-
विनिर्दिशेत् ॥

अर्थ - तो असाकीं, उल्कापात (अग्नितुल्यप्रज्वलिततारेकिंवाज ळत काष्ठें) पडणें, सर्वदिशा प्रज्वलित होणें, चंद्र सूर्याचे आसमंतात् मंडला कार चिन्ह होणें, संध्याकाळीं आकाशांत अनेक रंगाचे अभ्र होऊन चमत्कारिक शोभा दिसणें आणि धान्य व उदक इत्यादिकांस विकार उत्पन्न करणारी पर्जन्य वृष्टि होणें, अशारीतीचेजे उत्पात या लोकांत होतात. ते आंतरिक्ष जाणावे.

चरस्थिरभवोभौमोभूकंपश्चापिभूमिजः ॥ ८ ॥ जलाशया
नांवैकृत्यंभौमंतदपिकीर्तितं ॥ भौमेत्वल्पफलंज्ञेयंचिरे-
णचविपच्यते ॥ ९ ॥

अर्थ - आणि चर (मनुष्य, पशु, पक्ष्यादिक) व स्थिर (वृक्ष, पाषाणादिक) यां पासून अकस्मात् देशादिकांचा नाश होणें किंवा त्याचरांचर प्राण्यांचाच एकाएकीं नाश होणें तसाच भूमी संबंधि कारणानेंच भूकंप होणें व सरोवरादिक जलस्थानांस जो विकार होतो या सर्वांस भौम उत्पात असें म्हणतात. या भौम उत्पात संबंधि होणारें फल अल्प असून तें बहुकालानें पक्व दशेस येतें.

अभ्रजंमध्यफलदं मध्य कालफलप्रदं ॥ अद्भुतेतुसमुत्प
न्नेयदिवृष्टिःशिवाभवेत् ॥ १० ॥ सप्ताहाभ्यंतरेज्ञेयमद्भुतं-
निष्फलंभवेत् ॥ अद्भुतस्यविपाकश्चविनाशाल्लामदस्य

ते ॥ ११ ॥

अर्थ - त्याच प्रमाणें नक्षत्र पातादिक अंतरिक्षलोक संबंधि उत्पात झाला असतां, त्याचें फल मध्यम असून तें त्वरित व चिरकालानें न होतां मध्या वस्थित-कालीं होतें. आणि तो उत्पात स्पष्ट रीतीनें उत्पन्न झाल्या पासून सात दिवसांचे आंत स्फरवकारक पर्जन्य वृष्टि झाली असतां, तो उत्पात निष्फल होतो. व त्या उत्पातांवर अशी पर्जन्य वृष्टि न झाली तर त्या उत्पाताचे अनिष्ट फलाची निवृत्ति, शांति कर्मा वांचून होत नाहीं.

त्रिभिर्वर्षैस्तथाज्ञेयंस्फमहद्भय कारकं ॥ राज्ञः शरीरेलोके चपुरद्वारेपुरोहिते ॥ १२ ॥ पाकमायातिपुत्रेषुतथावैको-शवाहने ॥

अर्थ - आणि ज्या देशांत उत्पात होतो त्याचें अति भयंकर अनिष्ट फल तीन वर्षांनीं तेथील राजाच्या शरीरीं प्रजेस, सीमा द्वारावर, राज्याच्या उपाध्यापास किंवा राजपुत्रास अथवा भांडार गृह गज व अश्व इत्यादिक पशूंस असें होतें.

ऋतुस्वभावाद्राजेंद्र भवंत्यद्भुतसंज्ञिताः ॥ १३ ॥ शुभावहास्तेविज्ञेयास्तांश्चमेगदतः शृणु ॥

अर्थ - आतां ऋतूंच्या मानानें शुभकारक होणारे उत्पात सांगतों. हे राजेंद्रा तूं मजपासून श्रवण करून ते जाण.

वज्राशनिमहीकंपसंध्यानिर्घातनिःस्वनाः ॥ १४ ॥ परिवेषरजोधूमरक्तार्कास्तमयोदयाः ॥ द्रुमेभ्योदकरसस्नेहोबहुशः सफलद्रुमः ॥ १५ ॥ गोपक्षिमधुवृद्धिश्चशुभानिमधुमाधवे ॥

अर्थ - ते असे कीं वज्रें विद्युल्लता भूकंप संध्याकाळ यांसंबंधि भयंकर गर्जना, नादरूप शब्द उदयास्त कालीं सूर्य बिंब आरक्त वर्ण, सूर्याच्या आसमंतात्भागचें वर्तुलाकृति स्थळें तसेंच धूळ, धूर यानीं अकस्मात् सर्व दिशा व्याप्त होणें, वृक्षांचे चिकापासून दुसरा वृक्ष उत्पन्न होणें बहुत करून वृक्षांस फलें येणें, गायी, पक्षी व फुलांतील मध यांची वृद्धि, इत्यादिक प्रकार चैत्र वैशाखां

---

* टीप गृहेतथा असाही पाठ आहे त्यापक्षीं तसेंच राजमंदिरावर असा अर्थ समजावा.

त पडले असतां ते रूखकारक होतात.

ऋक्षोल्कापातकलुषंकपिलार्केंदुमंडलं ॥ १६ ॥ कृष्णश्वे
तंतथापीतंधूसरध्वांतलोहितं ॥ रक्तपुष्पारुणंसांध्यंन
भःक्षुब्धार्णवोपमं ॥ १७ ॥ सरितांचांबुसंशोषंदृष्ट्वाग्री
ष्मेशुभंवदेत् ॥

अर्थ - तसेंच आकाश, नक्षत्रां पासून निघालेल्या ज्वालांच्या पातानें गढूळ होणें, सूर्य चंद्रांचीं मंडळें पिंगट वर्ण भासणें अथवा तें आकाश कृष्णवर्ण-श्वेत, पीतवर्ण किंवा धूम्रवर्ण अंधकारानें रूक्ष होणें, आरक्त वर्ण होणें अथवा संध्याकाळीं फुलणाऱ्या आरक्त पुष्पासमान ताम्र वर्ण तसेंच क्षुब्ध(भयंकर) समुद्रासमान भासणारें नद्यांच्या उदकाचें शोषण होणें अशीं लक्षणें ग्रीष्म ऋतूंत (ज्येष्ठ आषाढ) झालीं असतां तीं शुभ जाणावीं.

शक्रायुधपरीवेषंविद्युदुल्काधिरोहणं ॥ १८ ॥ कंपोद्वर्त
नवैकृत्यंन्हसनंदारणंक्षितेः ॥ नद्योदपानसरसांविधून-
तरणप्लवाः ॥ १९ ॥ श्रृंगिणांचवराहाणांवर्षासुशुभ-
मिष्यते ॥

अर्थ - आणि आकाशांत इंद्रधनुष्य दिसणें, सूर्यचंद्रांसभोंवतीं खळें वीज व उल्का (अग्नितुल्य प्रज्वलित तारा) हे पडून एकाच स्थळीं बहुकाल राहणें, भूमिकंप व प्रतिमादिकांचें उद्वर्तन (उद्घाटन) केलें तरीं पुनः विना कारण त्या कळकट होणें भूमीचा ऱ्हास, विदारण होणें, नद्या, विहिरी, सरोवरें यामध्यें गेंडे, वराह (डुकर) यांचे कांहीं कांपत तरून जाण्या करितां उड्या मारणें हे सर्व प्रकार वर्षाऋतूंत (श्रावण, भाद्रपद) झाले तरी ते शुभच आहेत.

शीतानिलतुषारत्वंनर्दनंमृगपक्षिणां ॥ २० ॥ रक्षोभू
तपिशाचानांदर्शनंवागमानुषी ॥ दिशोधूमांधकाराश्च
सनभोवनपर्वताः ॥ २१ ॥ उच्चैःसूर्योदयास्तौचहेमंतेशो
भनाःस्मृताः ॥

अर्थ - तसेच शीतवायु, रूक्ष जलाचें तुषार, मृगपक्षी यांचे शब्द, राक्षस, भूत, पिशाच यांचें दर्शन आणि आकाशवाणी, आकाश, वनें, पर्वत-

यांसहित दशदिशा धूम (धूर) व अंधकार यानीं व्याप्त होणें सूर्याचें उदयवअ स्तहे स्पष्ट दिसणे ह्या सर्व रीती हेमंत ऋतूंत (मार्गशीर्ष, पौष) शुभ कारक समजाव्या.

दिव्यस्त्रीरूपगंधर्वविमानाद्भुतदर्शनं ॥ २२ ॥ ग्रहनक्ष-
त्रताराणांदर्शनंवागमानुषी ॥ गीतवादित्रनिर्घोषोवनप
र्वतसानुषु ॥ २३ ॥ सस्यवृद्धीरसोत्पत्तिः शरत्कालेशुभ
भाःस्मृताः ॥

अर्थ- आणि दिव्यस्त्री रूपें, (अप्सरादिक स्वर्गवासी स्त्रिया) गंधर्वांचीं विमानें इत्यादिक अद्भुतांचें दर्शन, ग्रह, नक्षत्रें, तारा यांचें दर्शन, आकाश वाणी, वनें व पर्वत शिखरें यांवर गायन व वाजंत्री यांचा शब्द होणें तशीच धान्याची वृद्धि, जल व अन्न यांत रसाची उत्पत्ति इत्यादिक सर्व प्रकार शरदृतूंत (आश्विन, कार्तिक) झाले तरीते शुभ कारक आहेत.

हिमपातानिलोत्पातविरूपाद्भुतदर्शनं ॥ २४ ॥ कृष्णांज
नाभमाकाशंतारोल्कापातपिंजरं ॥ चित्रगर्भोद्भवःस्त्री-
षुगोजाश्वमृगपक्षिषु ॥ पत्रांकुरलतानांचविकाराःशिशि
रेशुभाः ॥ २५ ॥

अर्थ- तसेंच थंडी पडणें, वायू पासून उत्पात होणें, अनेक प्रकारच्या अद्भुतांचीं दर्शनें आकाश काजळा समान कृष्णवर्ण होणें आणि उल्का पातानें अनेक रंग आकाशांत दिसणें तशाच स्त्रिया, गायी, अजा (शेळ्या) अश्व, मृग, पक्षी यांचे ठिकाणीं नानाप्रकारचे गर्भ उत्पन्न होणें, पत्रें, अंकुर (कोंब) वेल, यांस विकार होणेंहें शिशिर ऋतूंत (माघ, फाल्गुन) शुभ आहेत.

ऋतुस्वभावेनविनाद्भुतस्यजातस्यदृष्टस्यतुशीघ्रमेव ॥
यथागमंशांतिरनंतरंतुकार्यायथोक्तावसुधाधिपेन ॥
॥ २६ ॥

अर्थ- आणि ऋतु माना वांचून झालेलें अद्भुत दिसलें असतां पश्चात्त्वरेनेंच शास्त्रांत सांगितल्या प्रमाणें पृथिवी पतीनें शांति करावी.

इतिश्री मत्स्य पुराणे अद्भुत शांतिरोत्पातिकोनाम एकोन त्रिंशदुत्तर द्वि

ततमोऽध्यायः ॥२२९॥

अध्याय २३० वा.

गर्गउवाच ॥ देवतार्चाःप्रनृत्यंति वेपंतेप्रज्वलंतिच ॥ वमंत्यग्नितथाधूमंस्नेहंरक्तंतथावसां ॥१॥ आरयंतिरुदंत्येताःप्रस्विद्यंतिहसंतिच ॥ उत्तिष्ठंतिनिषीदंतिप्रधावंतिधमंतिच ॥२॥ भुंजतेविक्षिपंतेवाकोशप्रहरणध्वजान् ॥ अवाङ्मुखावैभवंतिस्थानात्स्थानंभ्रमंतिच ॥३॥ एवमाद्याहिदृश्यंतेविकाराःसहसोत्थिताः ॥ लिंगायतनविप्रेषुतत्रवासंनरोचयेत् ॥४॥ राज्ञोवाव्यसनंतत्रसचदेशोविनश्यति ॥

अर्थ - गर्ग म्हणतात. हे अत्रिमुने, देवांच्या प्रतिमांनीं नृत्यकरणें, कंपित व प्रज्वित होणें तसेंच त्या मूर्तींचे मुखांतून अग्नि, धूम, स्नेह (तैलघृतादिक), रक्त, वपा, यांचें वमन होणें, अथवा त्या मूर्तीपासून गर्जना किंवा रोदन होणें, अथवा त्यांच्या अंगांतून घर्म निघणें, त्यांनीं भोजन करणें तशींच, कोश (तरवारीचेम्यान) आयुधें ध्वज इत्यादिक पदार्थ मूर्तींनीं फेंकणें तसेंच प्रतिमांनीं खालीं मुखें करणें किंवा एका स्थानावरून स्थलांतरीं भ्रमण पावणें इत्यादिक उत्पात अकस्मात् उत्पन्न झालेले जेथें दिसतात किंवा महापापादिक निमित्तानें डागदिलेले ब्राम्हण असतात. तेथें राहण्याचें मनांत आणूं नये. कारण त्यास्थलीं राजास दुःख प्राप्त होतें अथवा तो देशच नाश पावतो.

देवयात्रासुचोत्पातान्दृष्ट्वादेशभयंवदेत् ॥५॥ पितामहस्यहर्म्येषुतत्रवासंनरोचयेत् ॥

अर्थ - आणि देवयात्रेंत रथ, कणा, ध्वजयांचेभंगादिकउत्पात दृष्टी पडले असतां, त्यादेशांस भय प्राप्त होईल असें सांगावें. व ब्रम्हदेवाच्या मंदिरांत वास करूंनये. कारण तेथें राहिलें असतां भय उत्पन्न होतें. असें समजावें.

पशूनांरुद्रजंज्ञेयंनृपाणांलोकपालजं ॥६॥ ज्ञेयंसेनापतीनांतुयत्स्यात्स्कंदविशारवजं ॥

अर्थ - तसेंच मागें सांगितलेलें अद्भुत शिव प्रतिमेवर झालें असतां त्यापासून सर्व पशूंस भय जाणावें इंद्रादिक लोकपालांच्या मूर्तीत असें अद्भुत झालें तर त्या पासून राजांस भय उत्पन्न होतें. आणि कार्त्तिक स्वामीची प्रतिमा व विशाखा नक्षत्र यांचे ठिकाणीं उत्पात झाला असतां तेणें करून सेनापतींस भीति प्राप्त होते.

लोकानांविष्णुवस्वींद्रविश्वकर्मसमुद्भवं ॥ ७ ॥ विनायकोद्भवंज्ञेयंगणानांयेतुनायकाः ॥

अर्थ - तसेंच विष्णु अष्टवसू, इंद्र व विश्वकर्मा यांच्या प्रतिमांचे ठिकाणीं पूर्वीं सांगितलेले उत्पात झाले तर प्रजेस भीति उत्पन्न होये. आणि गणपतीच्या मूर्ती वरते उत्पात झाले असतां सैन्यादिक अनेक समुदायांचें रक्षण करणाऱ्या नायकांस पीडा होते असें जाणावें.

देवप्रेष्यान्नृपप्रेष्यान्देवस्त्रीभिर्नृपस्त्रियः ॥ ८ ॥ वासुदेवोद्भवंज्ञेयंग्रहाणामेवनान्यथा ॥

अर्थ - तसेंच गरुड, मारुती व नंदी इत्यादिक देव दूतांच्या प्रतिमांचे ठिकाणीं ते पूर्वीचे उत्पात झाले असतां राज दूतांस पीडा होते. आणि लक्ष्मी पार्वती या मूर्तीवर तीं उत्पात चिन्हें झालीं तर तेणें करून राजस्त्रियांस पीडा होते व कृष्णमूर्तीवर तीं दुश्चिन्हें झालीं तर त्यांपासून लोकांस ग्रहपीडाच होईल इतर दुःख होणार नाहीं.

देवतानांविकारेषुश्रुतिवेत्तापुरोहितः ॥ ९ ॥ देवतार्चांतुगत्वैस्नानमाच्छाद्यभूषयेत् ॥ पूजयेच्चमहाभागगंधमाल्यान्नसंपदा ॥ १० ॥ मधुपर्केणविधिवत्उपतिष्ठेदनंतरं ॥ तल्लिंगेनचमंत्रेणस्थालीपाकंयथाविधि ॥ पुरोधाजुहुयात्होमंसप्तरात्रमतंद्रितः ॥ ११ ॥

अर्थ - हे महा भाग्य शालिन् देवतांच्या प्रतिमे वर उत्पातसंबंधि विकार झाले असतां, वेद ज्ञान संपन्न पुरोहितानें देवाच्या प्रतिमेसमीप जाऊन त्यामूर्तीस यथाविधि मधुपर्कनिवेदन पूर्वक स्नान घालून वस्त्र भूषणानीं अलंकृत करावें. आणि गंधपुष्प व अन्न इत्यादिक उत्तम उपचारानीं त्या प्रतिमेची महा पूजा सात दिवस करावी. तसाच सातदिवस आलस्य रहित होऊन पूजे नंतर

त्यात्या देवतांच्या एश्वर्यादिक वर्णनफक्त मंत्रें करून स्थाली पाक रीतीनें यथा शास्त्र होम ही सात दिवस करून प्रतिदिवशीं होमांतीं उपाध्यायानें त्या देवतेचें उप स्थान करावें.

विप्रांश्चपूज्यामधरान्नपानैःसदक्षिणंसप्तदिनंनरेंद्र ॥ प्राप्तेष्टमेन्हिक्षितिगोप्रदानैःसकांचनैःशांतिमुपैतिपापं ॥१२॥

अर्थ- आणि हे नरश्रेष्ठा मधुर अन्न व उदकादिक प्राशनीय पदार्थ यानीं ब्राम्हणांस सात दिवस तृप्त करून त्यांस प्रत्यहीं भोजन दक्षिणा द्यावी. व आठवा दिवस प्राप्त झाला असतां त्या ब्राम्हणांस भूमि, गायी, व सुवर्ण हीं दानें करावीं. म्हणजे तेणें करून त्या झालेल्या उत्पातानीं सूचित जें अनिष्ट फलदायक पाप असतें. त्याची निवृत्ति होते. इतिश्री मत्स्य पुराणे अर्चा विकारोपशमनं नाम त्रिंशदुत्तरद्विशत तमोऽध्यायः ॥ २३० ॥

अध्याय २३१ वा.

गर्गउवाच ॥ अनग्निर्दीप्यतेयत्रराष्ट्रेयस्यनिरिंधनः ॥ नदीप्यतेचेंधनवान्तद्राष्ट्रंपीड्यतेनृपैः ॥ १ ॥

अर्थ- गर्ग म्हणतात हे अत्रिऋषे ज्या राष्ट्रांत काष्टें नसून अग्नी वांचून पदार्थ प्रज्वित होतो. आणि इंधनें, (काष्टें) असून अग्नि प्रदीप्त होत नाहीं तें राष्ट्र परराजानीं पीडित होतें.

प्रज्वलेदप्सुमांसंवातथार्द्रंवापिकिंचन ॥ प्राकारंतोरणांद्वारंनृपवेश्मसुरालयं ॥ २ ॥ एतानियत्रदीप्यंतेतत्रराज्ञोभयंभवेत् ॥ विद्युतावाप्रदह्यंतेतदापिनृपतेर्भयं ॥ ३ ॥

अर्थ- आणि उदकांत ठेवलेलें मांस पेट घेतें व कांहीं ओली वस्तु दग्ध होते. किंवा ज्या देशांत गांवाचा प्राकार (तट) तोरणें, नगराचें द्वार, राजमंदिर, देवालय, हीं अकस्मात् दग्ध होतात. तेथें राजांस भीति प्राप्त होईल. अथवा विजेनें ज्यावेळेस हीं सर्व दग्ध होतात. तें व्हांही राजास भय उत्पन्न होतें.

---

* दीप. अग्निःप्रदीप्यतेयत्रराष्ट्रेयस्यनिरिंधनः ॥ असाही पाठ आहे त्यापक्षीं ज्या राष्ट्रांत इंधना (काष्टें समिधा इत्यादिकां) वांचून अकस्मात् अतिशयें अग्निप्रदीप्त होतो असा अर्थ समजावा.

अनैशानिलमांसिस्फर्विनापांसूरजांसिच ॥ धूमश्चान-
ग्निजोयत्रतत्रविंद्यान्महाभयं ॥ ४॥

अर्थ- आणि ज्या देशांत रात्र नसतां व कोणताही दोष नसून धूळी वांचून अंधःकार उत्पन्न होईल किंवा अग्नि नसतां धूर होईल तेथें महाभयमास होईल.

तडित्वनभ्रेगगनेभयंस्यादृक्षवर्जिते ॥ दिवासतारेगग
नेतथैवभयमादिशेत् ॥ ५॥

अर्थ- तसेंच आकाशांत अभ्र नसतां वीज उत्पन्न होईल किंवा नक्षत्रें नाहीशीं होतील अथवा दिवसा गगनांत तारा (नक्षत्रें) दिसतील तर भय उत्पन्न होईल. असें ज्योतिष शास्त्रज्ञ लोकांनीं सांगावें.

ग्रहनक्षत्रवैकृत्येताराविषमदर्शने ॥ पुरवाहनयानेषुच
तुष्पान्मृगपक्षिषु ॥ ६॥ आयुधेषुचदीप्तेषुधूमायत्सुत
थैवच ॥ निर्गमत्सुचकोशाच्चसंग्रामस्तुमुलोभवेत् ॥ ७॥

अर्थ- आणि ग्रह नक्षत्रें यांचें कांहीं रूपांतर दिसलें नक्षत्रांत कांहीं वैषम्य दृष्टीस पडलें किंवा पुरें, अश्वादिक वाहनें, रथादिक यानें (गमनसाधनें)- चार पायांचे पशु- वृषभादिक, मृग, पक्षी, आयुधें हीं प्रज्वलित किंवा धूम्रवर्ण झालीं असतां, व तशींच तरवारी इत्यादिक शस्त्रें म्यानांतून निघालीं तर बहुवीरनाशक संग्राम उत्पन्न होईल.

विनाग्निंविस्फुलिंगाश्चदृश्यंतेयत्रकुत्रचित् ॥ स्वभावा
च्चापिपूर्यंतेधनूंषिविकृतानिच ८॥ विकारश्चायुधानां
स्यात्तत्रसंग्राममादिशेत् ॥

अर्थ- आणि ज्या देशांत अग्नी वांचून विस्फुलिंग (ठिणग्या) दिसतात- तशींच स्वभावानेंच बिघडलेलीं धनुष्यें अकस्मात् आपो आप दोरी चढून टणत्कारशब्दानें युक्त होतात. व आयुधें एका एकीं इतरांच्या हस्तस्पर्शा वांचून बिघडतात. त्याठिकाणीं संग्राम होईल असें समजावें.

त्रिरात्रोपोषितस्तत्रपुरोधाःसुसमाहितः ॥ समिद्भिः
क्षीरवृक्षाणांसर्षपैश्चघृतेनच ॥ होमंकुर्यादग्निमंत्रै-
र्ब्राम्हणांश्चैवभोजयेत् ॥ ९॥

अर्थ:- अशीं अद्भुत चिन्हें झालीं असतां पुरोहितानें त्रिरात्र उपोषण करून एकाग्र चित्त होऊन क्षीर वृक्षाच्या (रुयीच्या) समिधा, सर्षप (मोहऱ्या) इत्यादि पदार्थांनीं अग्निदेवतेच्या मंत्रानीं होम करून तत्सांगता सिद्ध्यर्थ ब्राम्हण भोजन करवावें.

दद्यात्सुवर्णंचतथाद्विजेभ्योगाश्चैववस्त्राणितथाभुवंच ॥
एवंकृतेपापमुपैतिनाशंयदग्निवैकृत्यभवंद्विजेंद्र ॥१०॥

अर्थ:- हे द्विजश्रेष्ठा, आणि सुवर्ण, गायी, वस्त्रें व भूमि हीं दानें ब्राह्मणांस करावीं, असें केलें असतां जें अग्नीच्या विकारा पासून उत्पन्न झालेल्या उत्पातानें पाप सूचित झालें त्याचा नाश होतो. इतिश्री मत्स्य पुराणें अद्भुतशांतावग्निवैकृत्यंनाम एकत्रिंशदुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥२३१॥

अध्याय २३२ वा.

गर्गउवाच ॥ पुरेषुयेषुदृश्यंतेपादपादेवचोदिताः ॥ रुदंतोवा हसंतोवास्रवंतोवारसान्बहून् ॥१॥

अर्थ:- गर्ग सांगतात. ज्या नगरांत देवांच्या प्रेरणेनें वृक्ष रोदन करितात, किंवा हास्य करितात, अथवा त्यां पासून अनेक प्रकारच्या रसांचा स्राव होतो. असें अवलोकनांत येतें.

अरोगावाविनावातंशाखांमुंचंत्ययद्रुमाः ॥ फलंपुष्पंतथाकालंदर्शयंतित्रिहायनाः ॥२॥ पूर्ववत्संदर्शयंतिफलंपुष्पंतथांतरे ॥ क्षीरंस्नेहंतथारक्तंमधुतोयंस्रवंतिच ॥३॥ शुष्यंत्यरोगाःसहसाशुष्काःरोहंतिवापुनः ॥ उत्तिष्ठंतीहपतिताःपतंतिचतथोत्थिताः ॥४॥

अर्थ:- अथवा कांहीं रोग नसतां वायू वांचून वृक्षां पासून शाखा (फांद्या) सुटून पडते किंवा वृक्षा पासून अकालीं फलमूलांची उत्पत्ति दिसते, तसेच तीन वर्षांनीं फलादिक येणाऱ्या वृक्षांस मध्येंच फलें व पुष्पें आलेलीं दृष्टीस पडतात, आणि त्यां पासून क्षीर, (दूध) तैल, घृतादिक, सुरा, (मद्य) रक्त, मध, उदक इत्यादिकांचा स्राव होतो त्याच प्रमाणें कांहीं विकार नसून तें वृक्ष अकस्मात् निर्जीव होतात, किंवा शुष्क झालेल्या वृक्षांस पुनः अंकुर फुटतात. अथवा भूमीवर पडलेले पुनः पूर्ववत् उभे रहातात. आणि उभे राहिलेले वृक्ष पुनश्च पडतात. असें झालें असतां हे सर्व उत्पात समजावे.

तत्रवक्ष्यामितेब्रह्मन्विपाकंफलमेवच ॥ रोदनेव्याधिम

ध्योनिहसनेदेशविभ्रमम् ॥५॥

अर्थ- हे ब्राम्हणा पूर्वी सांगितल्या प्रमाणें ते उत्पात घडले असतां त्यांच्या परिणाम दर्शक फल मी तुला सांगतो. तें असें कीं, वृक्षाच्या ठिकाणीं रुदन दृष्टीस पडलें तर लोकांस आधि उत्पन्न होते. आणि त्याच ठिकाणीं हास्य भासलें असतां देशास विपरीत स्थिति प्राप्त होते.

शाखाप्रपतनंकुर्यात्संग्रामेयोधपातनम् ॥ बालानां मरणंकुर्यात्बालानांबालपुष्पिताः ॥६॥

अर्थ- आणि विनाकारण वृक्षांच्या शाखेचें पतन झालें असतां त्या योगानें संग्रामांत युद्ध करणाऱ्या वीरांचें पतन होतें. तसेंच लहान जातींच्या फुलझाडांस बाल्यावस्थेंत पुष्पें प्राप्त झालीं तर तेणें करून बालांस मरण प्राप्त होतें.

स्वराष्ट्रभेदंकुरुतेफलपुष्पमथांतरे ॥ क्षयःसर्वत्रगोक्षीरेस्नेहेदुर्भिक्षलक्षणम् ॥७॥

अर्थ- तसेंच ज्या राष्ट्रांत वृक्षांस फल पुष्पें मध्यें अकालींच येतील तर तीं त्या स्वदेशाच्या भंगाचीं सूचक होतात; आणि वृक्षांतून गायीच्या दुग्धा सारखें दूध निघालें तर त्या सर्व देशांतील दुधाचा नाश होतो; व वृक्षांतून घृत तैलादिक द्रवीभूत पदार्थ निघाले असतां तें दुर्भिक्ष पडण्याचें लक्षण जाणावें.

वाहनापचयंमद्येरक्तेसंग्राममादिशेत् ॥ मधुस्रावेभवेद्व्याधिर्जलस्रावेनवर्षति ॥८॥

अर्थ- आणि वृक्षां पासून मद्याचा स्राव झाला तर गज, अश्व इत्यादिक वाहनांचा नाश होतो; तसाच त्या झाडांतून रक्त प्रवाह निघाला असतां संग्राम उत्पन्न होतो. मधाचा स्राव झाला म्हणजे व्याधि उत्पन्न होते; व वृक्षांतून जलाचा स्राव झाल्यानें पर्जन्यवृष्टि होते.

अरोगशोषणंज्ञेयंब्रह्मन्दुर्भिक्षलक्षणम् ॥ शुष्केषुसंप्ररोहस्तुवीर्यमन्नंचहीयते ॥९॥

अर्थ- हे ब्राह्मणा, रोग उत्पन्न न होतां वृक्ष अकस्मात् शुष्क होणें हें दुष्काळ पडण्याचें चिन्ह समजावें. आणि शुष्क झालेलीं झाडें नवीन अंकुर युक्त झालीं असतां वीर्य व अन्न यांचा नाश होतो असें जाणावें.

उत्थानेपतितानांचभयंभेदकरंभवेत् ॥ स्थानात्स्थानं-

तुगमनेदेशभंगस्तथाभवेत् ॥१०॥

अर्थ:- आणि पडलेल्या वृक्षांची पुनः पूर्ववत् स्थिति झाली असतां चोर (फितूर) उत्पन्न होण्याचें भय प्राप्त होईल. आणि झाडें एका स्थलांतून दुसऱ्या स्थलीं गेलीं तर त्या देशाचा नाश होईल असें समजावें.

ज्वलत्स्वपि च वृक्षेषु रुदत्स्वपि धनक्षयम् ॥ एतत्पूजितवृक्षेषु सर्वराज्ञो विपद्यते ॥११॥

अर्थ:- तशींच एकाएकीं झाडें अग्नीनें पेटलीं किंवा तीं रुदन करितात असें भासलें असतां धनाचा क्षय होईल. परंतु हे सर्वही सांगितलेले प्रकार अश्वत्थ तुलसी इत्यादिक लोकपूज्य वृक्षांवर पडले तरच राजास यांपासून विपत्ति प्राप्त होते

पुष्पेफलेवाविकृतेराज्ञोमृत्युंतथादिशेत् ॥ अन्येषुचैववृक्षेषुवृक्षोत्पातेष्वतंद्रितः १२ ॥ आच्छादयित्वातंवृक्षंगंधमाल्यैर्विभूषयेत् ॥ वृक्षोपरितथाछत्रंकुर्यात्पापप्रशांतये ॥१३॥ शिवमभ्यर्चयेद्देवंपशुंचास्मैनिवेदयेत् ॥ रुद्रेभ्यइतिवृक्षेषुहुत्वारुद्रंजपेत्ततः ॥१४॥

अर्थ:- त्याच प्रमाणें त्या पूज्य वृक्षांस आलेलीं पुष्पें व फलें यांस अकस्मात् विकार झाला तर तेणें करून राजास मृत्यु प्राप्त होतो असें जाणावें. तसेंच अन्य वृक्षांचे ठिकाणीं उत्पात झाले असतां राजानें किंवा त्याच्या पुरोहितानें आलस्य रहित होऊन त्या वृक्षांस वस्त्रानें आच्छादित करावें. आणि गंध व पुष्पमाला यानीं ते वृक्ष सुशोभित करून त्यांवर पापशांत्यर्थ छत्र बांधावें. पश्चात् त्या वृक्षांचे मूलावर शिवनामक देवाचें पूजन करून त्यास पशु निवेदन करावा. व रुद्रेभ्यः या मंत्रानें होम करून मग रुद्रजप करावा.

मध्वाज्ययुक्तेनतुपायसेनसंपूज्यविप्रांश्चभुवंचदद्यात् ॥ गीतेननृत्येनतथार्चयेत्तुदेवंहरंपापविनाशहेतोः ॥१५॥

अर्थ:- नंतर त्या वृक्षांच्या उत्पातां पासून सूचित झालेल्या दोषांच्या नाशार्थ मधु (मध) घृत मिश्रित पायसानें ब्राम्हणांस तृप्त उत्तमरीतीनें करून त्यांस भूमिदान करावें. व गीत नृत्यानीं शिव देवाची पूजा करावी.

इतिश्रीमत्स्यपुराणे वृक्षोत्पातप्रशमनंनाम द्वात्रिंशदुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २३२॥

अध्याय २३३वा.

गर्गउवाच ॥ अतिवृष्टिरनावृष्टिर्दुर्भिक्षादिभयंमतम् ॥ अनृतौतुदिवानंतावृष्टिर्ज्ञेयाभयानका ॥१॥

अर्थ- गर्ग म्हणतात. हे अत्रिमुने, अति वृष्टि किंवा अवर्षण झालें असतां दुर्भिक्षादिभय प्राप्त होतें. आणि वर्षाऋतु (पर्जन्यकाल) नसून दिवसां बहुत वृष्टि झाली तरी तीही भयकारकच होते.

अनभ्रेवैकृताश्चैवविज्ञेयाराजमृत्यवे ॥ शीतोष्णानांविपर्यासेनृपाणांरिपुजंभयम् ॥२॥

अर्थ- आणि अभ्र न येतां गर्जनादिक विकार होतील तर ते राजाच्या मृत्यूस कारण जाणावे. तसेंच शीत काळांत उष्ण व उष्णकाळांत शीत असे विपरीत प्रकार घडले असतां राजास शत्रूपासून भय उत्पन्न होतें.

शोणितंवर्षतेयत्रतत्रशस्त्रभयंभवेत् ॥ अंगारपांसुवर्षेषुनगरंतद्विनश्यति ॥३॥

अर्थ- ज्या देशांत रक्ताची वृष्टि होते तेथें शस्त्रांचें भय होईल. आणि अंगार (निखारे) व धूळ यांची वृष्टि ज्या नगरांत होते तें नगर नाश पावतें.

मज्जास्थिस्नेहमांसानांजनमारभयंभवेत् ॥ फलंपुष्पंतथाधान्यंपरेणातिभयायतु ॥४॥

अर्थ- आणि जेथें मज्जा (मेंदू) अस्थि स्नेह व मांस यांची वृष्टि होईल तरत्या योगानें लोकांस मरणाचें भय प्राप्त होईल. तसेंच फळें, व पुष्पें व धान्य यांचा वर्षाव झाला असतां शत्रूपासून भय उत्पन्न होतें.

पांसुजंतुफलानांचवर्षतोरोगजंभयम् ॥ छिद्रेवान्नप्रवर्षेणसस्यानांभीतिवर्धनम् ॥५॥

अर्थ- नशीच धूळ जंतु(प्राणी) व पाषाण यांच्या वृष्टीनें रोगापासून भय प्राप्त होतें. अथवा भूमीवर छिद्रांत (खाचेंत) अन्नाच्या पर्जन्यानें धान्यास भयाची वृद्धि होईल.

निरभ्रस्केरवौव्यभ्रेयदाच्छायानदृश्यते ॥ दृश्यतेतुप्रतीपावातत्रदेशभयंभवेत् ॥६॥

अर्थ- आणि निरभ्र आकाशांत सूर्यबिंब स्वच्छ असून ज्या काळीं त्याचें प्रति-

बिंब जलादिकांत दिसत नाहीं. किंवा विपरीत ज्या देशांत दिसतें त्या देशास तेव्हां भय प्राप्त होईल.

निरभ्रेवाथरात्रौवा श्वेतंयाम्योत्तरेणतु ॥ इंद्रायुधंतथादृष्ट्वाउल्कापातंतथैवच ॥ ७ ॥ दिग्दाहपरिवेषोच गंधर्वनगरंतथा ॥ परचक्रभयंब्रूयाद्देशोपद्रवमेवच ८

अर्थः- तसेंच अभ्र नसून दिवसां किंवा रात्रीं दक्षिणोत्तर शुभ्र इंद्र धनुष्य, तसाच उल्कापात, दिशांचा दाह, सूर्य चंद्रां सभोंवतीं परिधि, (खळें) गंधर्व नगर हीं दृष्टीनें दृष्टीस पडलीं असतां त्या राष्ट्रास परचक्रा (शत्रुसैन्या) पासून भय व देशास उपद्रव होईल असें सांगावें.

सूर्येंदुपर्जन्यसमीरणानांयागस्तुकार्योविधिवद्विजेंद्र ॥ धनानिगोःकांचनदक्षिणाचदेयाद्विजानामघनाशहेतोः ॥ ९ ॥

अर्थः- हे ब्राम्हणश्रेष्ठा, दृष्टि आदि करून या उत्पातां पासून उत्पन्न झालेल्या दोषांच्या नाशार्थ शास्त्रोक्त विधानानें सूर्य, चंद्र, पर्जन्य, समीरण (वायु) यांच्या उद्देशानें याग करावा; आणि त्या यज्ञांत ब्राम्हणांस धनें, गायी, सुवर्ण त्या दक्षिणा द्याव्या.

इतिश्री मत्स्यपुराणे अद्भुतशांतौ दृष्टिवैकृतोपशमनं नाम त्र्यस्त्रिंशदुत्तरद्विशततमोऽध्यायः ॥ २३३ ॥

अध्याय २३४ वा.

गर्गउवाच ॥ नगरादपसर्पंतेसमीपमुपयांतिच ॥ नद्योह्रदप्रस्रवणाविरसाश्चभवंतिच ॥ १ ॥ विवर्णकलुषंतप्तंफेनवज्जंतुसंकुलम् ॥ स्नेहक्षीरसुरारक्तंवहंतेवाकुलोदकाः ॥ २ ॥ षण्मासाभ्यंतरेतत्रपरचक्रभयंभवेत् ॥

अर्थः- गर्ग सांगतात. हे अत्रिऋषे, ज्या देशांत नद्या, ह्रद, (डोह) प्रस्रवण (झरे) हे नगरा समीप असून ते दूर जातात. किंवा अत्यंत समीप येतात. व त्यांच्या उदकांचें माधुर्य नाहींसें होतें. तसेंच नदी, डोह, झरे यांचे प्रवाह निस्तेज, गढूळ, तप्त, फेंसयुक्त व कृमि, कीटकांनीं व्याप्त अथवा तेल, दूध, मद्य, रक्त यानीं मिश्रित अशा उदकानें वाहतात त्या देशांतील राजा व प्रजा यांस सहा महिन्यांचे आंत परचक्रा पासून भय

प्राप्त होईल.

जलाशयानदंतेवाप्रज्वलंतिकथंचन ३॥ विमुंचंतित थाब्रह्मन्ज्वालाधूमरजांसिच॥ अखातेवाजलोत्पत्तिः सप्तसत्त्वाजलाशयाः॥४॥ संगीतशब्दाःश्रूयंते जनमारभयंभवेत्॥

अर्थ- आणि जेथें डोह, सरोवरें इत्यादिक उदक स्थानांतून शब्द उत्पन्न होतात. किंवा हीं प्रज्वलित होतात. तसेंच त्यां पासून ज्वाला, धूम, (धूर) धूळ हीं उत्पन्न होतात. व भूमि नखाणतां उदक उत्पन्न होतें. किंवा सरोवरादिक केलें असतां त्यांत पाणि लागत नाहीं. अथवा त्यांत कृमि कीटकादिकांची उत्पत्ति होत्ये. व त्यां पासून संगीताचे (उत्तम गायन) शब्द ऐकूं येतात, ते थील लोकांस मृत्यु भय प्राप्त होईल.

दिव्यमंभोमयंसर्पिर्मधुतैलावसेचनम्॥५॥ जप्तव्या वारुणा मंत्रास्तैश्चहोमोजलेभवेत्॥६॥

अर्थ- असे हे सांगितलेले जलाशय संबंधि उत्पात जाहले असतां वरुण देवतेच्या मंत्रांचा जप करावा. आणि त्याच मंत्रानीं दिव्य (स्वर्गांतील) उदका पासून उत्पन्न झालेलें घृत, मध, तैल, हे पदार्थ त्या जळाच्या स्थानांवर सिंचन करून जळांत त्याच पदार्थांचा होम करावा.

मध्वाज्ययुक्तंपरमान्नमत्रदेयंद्विजानांद्विजभोजनार्थम्॥ गावश्चदेयाःसितवस्त्रयुक्तास्तथोदकुंभाःसलिलाघशांत्यै॥७॥

अर्थ- हे ब्राम्हणा, उदक संबंधि या सांगितलेल्या उत्पातसूचित अरिष्ट परिहाराविषयीं मधु घृतमिश्रित परमान्न (क्षिरा) युक्त भोजन ब्राम्हणांस द्यावें; आणि त्या उदक विकारां पासून सूचित झालेल्या दोषांच्या शांत्यर्थ शुभ्र वस्त्र सहित गोप्रदानें व उदकुंभही त्यांस द्यावे. इतिश्री मत्स्यपुराणे अद्भुतशांतौ सलिलाशयवैकृतंनामचतुस्त्रिंशदुत्तरद्विशततमोऽध्यायः॥२३४॥

अध्याय २३५ वा.

गर्गउवाच॥ अकालप्रसवानार्यःकालातीतप्रजास्तथा॥ विकृतप्रसवाश्चैवयुग्मसंप्रसवास्तथा॥१॥ अमानुषाल्पतुंडाश्चसंजातव्यसनास्तथा॥ हीना

गा अधिकांगाश्च जायंते यदि वा स्त्रियः ॥२॥ पशवः पक्षिणश्चैव तथैव च सरीसृपाः ॥ विनाशं तस्य देशस्य कुलस्य च विनिर्दिशेत् ॥३॥

अर्थ- गर्ग सांगतात. हे अत्रिमुने, ज्या देशांत किंवा कुलांत अकाळीं स्त्रिया प्रसवतात. अथवा त्या प्रसूति समयाचा अतिक्रम झाल्यावर प्रजांस प्रसवतात. किंवा कितीएक स्त्रियांपासून जन्मतःच विकार युक्त गर्भाची उत्पत्ति होते. तशीच त्यांस एकेच समयीं युग्म प्रजा (जुळें) होतात. आणि कोणांस मनुष्यावांचून इतर संतति कदाचित् होईल किंवा कोणी मुखविरहित प्रजेस प्रसवतील. तसेच गर्भाच्या क्लेशदायक प्रसूतीनें स्त्रियांस अति विकार होणें. तशाच कितीएक कन्या अंगहीन व कांहीं अधिक अंगयुक्त अशा उत्पन्न होतील. अथवा जेथें स्त्रियांपासून पशु पक्षि अथवा सर्प उत्पन्न होतील तर अशा या दुश्चिन्हांनीं त्या देशाचा व त्या कुलाचा नाश होईल असें सांगावें.

विवासयेतान्नृपतिः स्वराष्ट्रात्स्त्रियश्च पूज्याश्च ततो द्विजेंद्राः ॥ कस्येच्छकैर्ब्राह्मणतर्पणं च लोके ततः शांतिमुपैति पापम् ॥४॥

अर्थ- ब्राह्मणश्रेष्ठ ऋषीहो, असे प्रसूति संबंधानें अद्भुत विकार घडले असतां त्या मानव स्त्रियांपासून झालेल्या पशुपक्ष्यादिकांस राजानें आपल्या राष्ट्रांतून घालवून द्यावें. नंतर त्या प्रसूत झालेल्या स्त्रियांची पूजा करावी, आणि स्वेच्छु लोकांनीं ब्राह्मणांस दान मानादिकांनीं संतुष्ट करावें ह्मणजे तेणें करून या प्रसूति संबंधि झालेल्या उत्पात सूचित अरिष्टकारक पापाची निवृत्ति होत्ये. इतिश्री मत्स्यपुराणे स्त्रीप्रसववैकृतं नाम पंचत्रिंशदुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥२३५॥

अध्याय २३६वा.

गर्ग उवाच ॥ यांति यानान्ययुक्तानि युक्तान्यपि न यांति च ॥ चोद्यमानानि तत्र स्यात् महद्भयमुपस्थितं ॥१॥

अर्थ- गर्ग बोलतात. हे अत्रिमुने, रथादिक वाहनांस अश्वादिक जोडले नसून तीं आपल्या आपण चालतात. आणि अश्वादिक जोडून तीं रथादिक चालविलीं तरी हीं चालत नाहींत असें झालें असतां तेथें महाभय प्राप्त होतें.

वाद्यमानान वाद्यंते वाद्यंते चाप्यनाहताः ॥ अचलाश्च

लंत्येवनचलंतिचलानिच ॥२॥ आकाशेतूर्यनादश्च गीतगंधर्वनिःस्वनाः ॥ काष्ठदर्वीकुठारादिविकारंकुरुते यदि ॥३॥ गावोलांगूलसंघैश्चस्त्रियःस्त्रीचविघातयेत् ॥ उपस्करादिविकृतौघोरंशस्त्रभयंभवेत् ॥४॥

अर्थ- आणि नगारे आदिकरून वाद्यें वाजविलीं असून तीं वाजत नाहींत. व न वाजवितां केव्हां केव्हां वाजतात. तसेंच ज्या वस्तूंत चलन वलन सामर्थ्य नाहीं त्या वस्तू चलन पावतात. तसेच कांहीं पदार्थ चलनवलन योग्य असूनही ते चलनवलन पावत नाहींत. तसाच आकाशांत वाद्यांचा नाद व गायन व गंधर्वांचे नादयुक्त शब्द हे होतात. आणि लांकडें पळ्या कुन्हाडी इत्यादिक पदार्थ एका एकीं त्यां पासून जर कांहीं भंगादिक विकार पावतील. अथवा गायी आपले पुच्छ समुदायानीं स्त्रियांस प्रहार करतील. किंवा स्त्री गायींचा घात करील. त्याच प्रमाणें उलूखल (उखळ) आदिकरून गृहांतील उपयोगी पदार्थ अकस्मात् भग्न झाले असतां तेथें उग्र शस्त्रां पासून भय उत्पन्न होईल असें जाणावें.

वायोस्तुपूजांद्विजसक्तुभिश्चकृत्वानियुक्तांश्चजपेच्चमंत्रान् ॥ दद्यात्प्रभूतंपरमान्नमत्रसदक्षिणंतेनशमोस्यभूयात् ॥५॥

अर्थ- यास्तव हे ब्राम्हणा, सक्तू (सातु) नीं वायूची पूजा करून त्या साहित्य पदार्थांच्या भंगानें सूचित झालेल्या अरिष्ट शमना विषयीं नियुक्त(योजलेल्या मंत्रांचा जप करावा. आणि ब्राम्हणांस बहुत परमान्न (खीर) दान करून त्यांस दक्षिणाही द्यावी. ह्मणजे तेणें करून त्या साहित्य वस्तूंच्या भंगादिक विकारा पासून सूचित झालेल्या दोषांचें शमन होईल. इतिश्रीमत्स्यपुराणे उपस्करवैकृतं नाम षट्त्रिंशदुत्तरद्विशततमोऽध्यायः ॥२३६॥

अध्याय २३७ वा.

गर्गउवाच ॥ प्रविशंतियदाग्राममारण्यामृगपक्षिणः ॥ अरण्यंयांतिवाग्राम्याःस्थलंयांतिजलोद्भवाः ॥१॥ स्थलजाश्चजलंयांतिघोरंवाशंतिनिर्भयाः ॥ राजद्वारेपुरद्वारेशिवाचाप्यशिवप्रदा ॥२॥ दिवारात्रिंचरावापिरात्रावपिदिवाचराः ॥ ग्राम्यास्त्यजंतिग्रामंच

शून्यतांतस्यनिर्दिशेत्॥३॥

अर्थ- गर्ग सांगतात. हे अत्रिमुने, ज्या काळीं अरण्यांतील मृग, पक्षि हे ग्रामांत प्रवेश करतात. किंवा ग्रामांतील मृग, पक्षी, अरण्यांत जातात. आणि जळांत उत्पन्न झालेले पक्षी आदि करून प्राणी स्थळावर येतात. तसेंच भूमीवरील प्राणी उदकांत प्रवेश करतात. व ते निर्भय होऊन तेथें भयंकर शब्द करितात. अथवा राजद्वारांत किंवा नगर सीमाद्वारीं कोल्ही ही रुदन शब्द करील तर तें दुःखास कारण होतें. तसेंच रात्रीं संचार करणारे दिवसां फिरतील व दिवसां संचार करणारे रात्रीं संचार करतील. किंवा ग्रामांतील पक्षि मृगादिक प्राणी ग्राम सोडून बाहेर गमन करतील तर ते ग्राम नगरादिक शून्य (ओस) पडतील असें समजावें.

दीप्तावाशंतिसंध्यासुमंडलानिचकुर्वते॥वाशंतिवि

स्वरंयत्रतदाप्येतत्फलंलभेत्॥४॥

अर्थ- आणि ग्रामांतील पशुपक्षी आदि करून क्रुद्ध होऊन सायंकाळीं क्रूर शब्द करतात. किंवा मंडलाकार भ्रमण करून जेथें विस्वर (आक्रोशपूर्वक) गर्जना करतात तेथेंही पूर्वी सांगितलेलें ग्रामशून्य (निर्जन) होण्याचें फल प्राप्त होईल.

प्रदोषेकुक्कुटोवाशेद्धेमंतेवापिकोकिलः॥अर्कोदये

त्वभिमुखीशिवारौतिभयंवदेत्॥५॥

अर्थ- तसाच प्रदोष काळीं कुक्कुट (कोंबडा) आक्रोश करील. किंवा हेमंत ऋतूंत कोकिल पक्षी शब्द करील. अथवा सूर्योदय काळीं कोल्ही सूर्यासन्मुख रुदन करील तर तेथें भय प्राप्त होईल असें सांगावें.

गृहंकपोतःप्रविशेत्क्रव्यादोमूर्ध्निलीयते॥मधुवाम

क्षिकाःकुर्युर्मृत्युंगृहपतेर्भवेत्॥६॥

अर्थ- आणि पारवा किंवा कबुतर हे पक्षी घरांत प्रवेश करतील. अथवा मांसभक्षक गीध आदि करून कोणताही पक्षी घराच्या अग्र भागावर स्थिति करून राहील. तसेंच ज्या घरावर मधमाशा मधाचा संचय करतील म्हणजे मोहोळ लावतील त्या घराच्या यजमानास मृत्यु प्राप्त होईल.

प्राकारद्वारगेहेषुतोरणापणवीथिषु॥केतुच्छत्रायु

धाद्येषुक्रव्यादःप्रपतेद्यदि॥७॥जायंतेवायवल्मी

कामधुवास्यंदतेयदि॥सदेशोनाशमायातिराजाच
म्रियतेतथा॥८॥

अर्थ- तसाच प्राकार (तट) द्वार किंवा गृह, तोरण*, बाजार, दुकान ध्वजच्छत्र व आयुधादिक यांवर मांसभक्षक गिधाड इत्यादिक कोणी पक्षी वरून उतरेल किंवा वारुळें तेथें होतील. अथवा मधाचा स्राव होईल तर तो देश नाश पावतो. तसाच तेथील राजाही मृत्यु पावेल.

मूषकान्शलभान्दृष्ट्वाप्रभूतंक्षुद्भयंभवेत्॥काष्ठो
ल्मुकास्थिश्रृंगाढ्याश्वानोमर्कटवेदनाः॥९॥दुर्भि
क्षवेदनाज्ञेयाकाकाधान्यमुखायदि॥जनानभिभवंती
हनिर्भयारणवेदिनः॥१०॥

अर्थ- आच प्रमाणें उंदीर, टोळ हे ज्या स्थळीं बहुत होतील तेथील लोकांस क्षुधेच्या योगानें अत्यंत पीडा उत्पन्न होईल. आणि काष्ठें, उल्मुक, (कोलती) अस्थि, शिंगें, यांतील कोणतेंही मुखांत घेऊन श्वान (कुत्रे) संचार करतील व त्यांस मर्कटानीं दंश करून वेदना केल्या किंवा त्यानीं दंश करून वानरांस वेदना उत्पन्न केल्या असतां त्या राष्ट्रांत दुर्भिक्ष पीडा होईल. तसेंच कावळे मुखांत धान्य ग्रहण करून जर संचार करतील तर या लोकीं युद्धाशिवाय निर्भय होऊन जनांस उपद्रव करतील असें समजावें.

काकोमैथुनसक्तश्चश्वेतस्तुयदिदृश्यते॥राजावा
म्रियतेतत्रसचदेशोविनश्यति॥११॥

अर्थ- आणि जर पांढरा कावळा मैथुना विषयीं आसक्त झालेला ज्या देशांत दृष्टीस पडेल त्या देशांतील राजा मृत्यु पावतो अथवा त्या देशाचा नाश होतो.

उलूकोदृश्यतेयत्रनृपद्वारेतथागृहे॥ज्ञेयोगृहपतेर्मृ
त्युर्धननाशंतथैवच॥१२॥

अर्थ- हे राजा जेथें गृहद्वारावर किंवा घरावर उलूक (घुबड) बसलेला दृष्टीस

टीप * शाद्य द्वार द्वारावरील चित्र विचित्र मैरप मंगल कार्यांत आम्र पल्लव व पुष्पें इत्यादिकांचे बांधलेले द्वारावरील तोरण तें, रेशमी वस्त्रें चमत्कारिक कापून शोभार्थ दरवाज्यावर बांधतात तें, मोठी नसज्ज दागण्या साठीं उभी केलेलें लिकटें इत्यादि जाणावें.

पडतो, तेथें गृहाचा यजमान मरण पावतो आणि त्याच्या धनाचा नाशही होतो.

मृगपक्षिविकारेषुकुर्याद्धोमंसदक्षिणम् ॥ देवाःकपो
ताइतिवाजमब्याःपंचभिर्द्विजैः॥१३॥

अर्थ- या प्रमाणें मृग व पक्षि इत्यादिक संबंधि हीं दुर्लक्षणें आढळीं असतां यानीं सूचविलेल्या अरिष्ट शांत्यर्थ देवाः कपोता या मंत्रानें दक्षिणा दान सहित होम करावा. अथवा पांच ब्राह्मणां कडून त्याच मंत्राचा जप करावा.

गावश्चदेयाविधिवद्द्विजानांसकांचनावस्त्रयुगोत्तरी
याः॥ एवंकृतेशांतिमुपैतिपापंमृगैर्द्विजैर्वाविनिवेदि
तंयत्॥१४॥

अर्थ- आणि त्या ब्राह्मणांस यथाविधीनें सुवर्ण व पाठीवर पांघरावयासाठीं घालण्याचीं दोन वस्त्रें यांसहित गोप्रदानें करावीं असें केलें असतां मृग व पक्षी इत्यादिकाचीं सूचित झालेलें पाप शांत होतें. इतिश्री मत्स्य पुराणें मृगपक्षि विकृतोप शमनं नाम सप्तत्रिंशोत्तर द्विशततमोऽध्यायः ॥२३७॥

अध्याय २३८ वा.

गर्गउवाच॥ प्रासादतोरणाट्टाल द्वार प्राकार वेश्मना
म्॥ निर्निमित्तंतुपतनंदृढानांराजमृत्यवे॥१॥

अर्थ- गर्ग ह्मणतात. हे अत्रि मुने, देव किंवा राजे यांचीं मंदिरें व तोरणें अट्टाल, (उपर माड्या) द्वारें, प्राकार, (तट) घरें हीं दृढ असून बिनाकारण अकस्मात् पडलीं असतां राजास मरण प्राप्त होतें असें समजावें.

रजसावाथधूमेनदिशोयत्रसमाकुलाः॥ आदित्यचं
द्रताराश्चविवर्णाभयवृद्धये॥२॥

अर्थ- आणि धुरळा किंवा धूर यानीं ज्या स्थानीं दिशा व्याप्त होतील. अथवा सूर्य चंद्र व अश्विनी आदि करून नक्षत्रें यांतून ज्या देशांत कोणी निस्तेज दिसतील तर त्या योगानें त्या देशास भय द्विगुणित होईल असें जाणावें.

राक्षसायत्रदृश्यंतेब्राह्मणाश्चविधर्मिणः॥ ऋतवश्च
विपर्यस्ताअपूज्यःपूज्यतेजनैः॥३॥ नक्षत्राणिवि
योगीनितन्महद्भयलक्षणम्॥

अर्थ- तसेच राक्षस जेथें दृष्टी पडतील. किंवा ब्राम्हण ज्या स्थलीं अधर्मिष्ठ हो

तील. ऋतुचर्या विपरीत होईल. अथवा सर्व जन, अपूज्य लोकांची पूजा करतील. तशींच सप्तर्षि आदिकरून परस्पर समागमानें चालणारीं एक गणांतील नक्षत्रें एकमेकांशीं वियोग पावतील तर या कारणांवरून राष्ट्रास महाभयकारक हें लक्षण जाणावें.

केतूदयोपरागौ च छिद्रवा शशिसूर्ययोः ॥ ४ ॥ ग्रहर्क्षविकृतिर्यत्र तत्रापि भयमादिशेत् ॥

अर्थ- त्याचप्रमाणें धूमकेतु आदिकरून सर्व केतु गणांतील कोणत्याही केतूचा उदय होणें, वारंवार बहुत ग्रहणें येणें, किंवा चंद्र सूर्यांचीं मंडलें सछिद्र भासणें. अथवा सूर्यादि ग्रह व इतर नक्षत्रांचें स्वरूप किंवा गति व स्वभाव यांत विपर्यास होणें हीं दुर्लक्षणें झालीं असतां भय प्राप्त होतें.

स्त्रियश्च कलहायंते बाला निघ्नंति बालकान् ॥ ५ ॥ क्रियाणामुचितानां च विच्छितिर्यत्र जायते ॥ हूयमानस्तु यत्राग्निर्दीप्यते न च शांतिषु ॥ ६ ॥ पिपीलिकाश्च क्रव्यादा यांति चोत्तरतस्तथा ॥ पूर्णकुंभाः स्रवंते च हविर्वापि प्रलुप्यते ॥ ७ ॥ मंगल्याश्च गिरो यत्र न श्रूयंते समंततः ॥ क्षवथुर्बाधते वाथ प्रहसंति स्खलंति च ॥ ८ ॥ न च देवेषु वर्तंते यथावद्ब्राह्मणेषु च ॥ मंदघोषाणि वाद्यानि वाद्यंते विस्वराणि च ॥ ९ ॥ गुरुमित्रद्विषो यत्र शत्रुपूजारता नराः ॥ ब्राह्मणान्स्कंददोषान्यान्जनो यत्रावमन्यते ॥ १० ॥ शांतिमंगलहोमेषु नास्तिक्यं यत्र जायते ॥ राजा वा म्रियते तत्र स देशो वा विनश्यति ॥ ११ ॥

अर्थ- तशाच स्त्रिया प्रायः सर्व कृत्यांत कलहाविषयीं प्रवृत्त झाल्या किंवा बालकें परस्परांस ताडन करूं लागलीं. तशींच शास्त्रविहित योग्य कर्में आरंभलीं असतां तीं बहु विघ्नांनीं जेथें खंडित होतात, त्याचप्रमाणें ज्या स्थलीं शांतिकर्मांत उत्तम मंत्रानीं अग्नीचें आवाहन केलें असून तो अग्नि उत्कृष्टरीतीनें प्रदीप्त होत नाहीं; आणि तेथें पिपीलिका (मुंग्या) अथवा गीधें आदिकरून मांसभक्षक पक्षी उत्तरेकडे गमन करतात. तसेंच शांतिकर्मसिद्ध्यर्थ उदकानें भरून स्थापन केलेले पूर्ण कुंभ स्रवणें. तसेंच होमार्थ ठेवलेले चरु पुरोडाशादिक पदार्थ अकस्मात् नाहींसे होणें. तशाचप्रमं-

गलकारक वाणी जेथें आसमंताद्भागीं श्रवणांत येत नाहींत. किंवा पुनः पुनः अनिष्ट शिंका येणें. असेंच तेथें अतिहास्य अथवा नेत्रद्वारा अश्रुपातांचा स्राव होणें, आणि देवब्राम्हणां विषयीं मनःपूर्वक यथार्थ विनयानें न वर्तणें, तसेंच वाद्यें मंगल कार्यांत मंद घोषानें किंवा अपस्वरानें (बेसूर) वाजणें. तसेंच जेथें लोक स्वकीय गुरु व मित्र यांचा द्वेष करीत आहेत. किंवा त्यांच्या शत्रूंची पूजा करण्या विषयीं तत्पर झाले. तसेंच जेथें लोक ब्राम्हण,संबंधि जन व कोणतेही मान्य मनुष्य यांचा अवमान करतात. आणि शांतिकर्म, मंगलकार्य व होम या कर्मांत जेथें नास्तिक बुद्धि उत्पन्न होते. तर या प्रायः सर्व कारणानीं तेथील राजा किंवा तो देश यांचा नाश होतो असें समजावें.

राज्ञोविनाशेसंप्राप्तेनिमित्तानिनिबोधमे ॥ ब्राह्मणान्प्रथमंद्वेष्टिब्राह्मणैश्चविरुध्यते ॥१२॥

अर्थ:- तसाच राजाचा विनाश काल प्राप्त जाहला असतां त्याचीं लक्षणें मज पासून श्रवण कर। तीं अशीं कीं, राजा आपले विनाश कालीं प्रथमतः ब्राह्मणांशीं द्वेष करतो. व त्यांच्याशीं विरुद्धाचरणानें वर्ततो.

ब्राह्मणस्वानिचादत्तेब्राह्मणांश्चजिघांसति ॥ नच स्मरतिकृत्येषुयाचितश्चप्रकुप्यति ॥१३॥ रमतेनिंदयातेषांप्रशंसांनाभिनंदति ॥ अपूर्वंतुकरंलोभात्तथापातयतेजने ॥१४॥

अर्थ:- त्याच प्रमाणें तो राजा, ब्राम्हणद्रव्याचा अपहार करतो. किंवा त्यांस वधादिक शरीर दंड करण्या विषयीं प्रवृत्त होतो. तसेंच तो कोणत्याही कृत्यांत ब्राम्हणांचें स्मरण करीत नाहीं. व त्यांस पूज्यत्वानें मानीत नाहीं. तसेंच ब्राह्मणानीं राजास कांहीं याचना केली असतां तो आंजवर अत्यंत क्रुद्ध होतो. आणि तो त्यांच्या निंदेनें रमत असून कोणी त्यांची प्रशंसा केली तरी तिला अनुमोदन देत नाहीं व तो राजा लोभानें स्वकीय प्रजेवर अनेक प्रकारचे अपूर्व (विलक्षण) कर बसवितो.

एतेष्वभ्यर्चयेच्छक्रंसपत्नीकंद्विजोत्तम ॥ भोज्यानिचैवकार्याणिस्कराणांबलयस्तथा ॥ संतोविप्राश्च पूज्यास्फस्तेभ्योदानंचदीयतां ॥१५॥

अर्थः- हे ब्राम्हणोत्तमा अत्रिमुने, या अध्यायांत सांगितलेल्या सर्व दुश्चिन्हांच्या परिहारा विषयीं शची नामक पत्नी सहित इंद्राची पूजा करून अनेक प्रकारचे भक्ष्य भोज्य पदार्थ व बलि, देवांस समर्पण करावे. तसेंच साधु ब्राम्हणांची पूजा करून त्यांस अन्न दानादिक विपुल करावें.

गावश्चदेयाद्विजपुंगवेभ्योभुवस्तथाकांचनमंबराणि ॥ होमश्चकार्योमरपूजनंचएवंकृतेपापमुपैतिशांतिम् ॥१६॥

अर्थः- तें असें कीं, श्रेष्ठ ब्राह्मणांस गायी, भूमि, सुवर्ण व वस्त्रें हीं दानें देऊन होम व इंद्रादि देवतांचें पूजन करावें तेणें करून या सर्व दुश्चिन्ह सूचित पापाची निवृत्ति होते.

अद्भुतेतुसमुत्पन्नेयदिवृष्टिःशिवाभवेत् ॥ सप्ताहाभ्यंतरेज्ञेयमद्भुतंनिष्फलंहितत् ॥१७॥

अर्थः- या सर्व उत्पातांतील कोणताही उत्पात झाल्या नंतर त्यावर सात दिवसांचे आंत जर उत्तम सुखकारक पर्जन्य वृष्टि होईल तर तो उत्पात निष्फल होतो.

इतिश्री मत्स्य पुराणे उत्पात प्रशंसाद्भुत शांतिर्नाम अष्टत्रिंशदुत्तर द्विशततमोऽध्यायः २३८

अध्याय २३९ वा.

मनुरुवाच ॥ ग्रहयज्ञःकथंकार्योलक्षहोमःकथंनृपैः ॥ कोटिहोमोऽपिवादेवसर्वपापप्रणाशनः ॥१॥

अर्थः- मनुराजा प्रश्न करतो, हे देवा, ग्रह यज्ञ कसा करावा? तसाच राजानीं लक्ष होम किंवा सर्व पापनाशक कोटि होमही कसा कोणत्या विधीनें करावा?

क्रियतेविधिनायेनयद्दृष्टंशांतिचिंतकैः ॥ तत्सर्वंविस्तराद्देवकथयस्वजनार्दन ॥२॥

अर्थः- तसेंच सर्व शांति कर्मांचा विचार करणाऱ्या ज्ञानसंपन्न ब्राम्हणानीं या ग्रह यज्ञाचें विधान शास्त्रांत जसें अवलोकन केलें आहे, आणि ते ज्ञाते ज्या विधीनें हा यज्ञ करतात. तें सर्व विधान, हे दुष्ट जन संहारक देवा, मला विस्तारानें कथन करा?

मत्स्यउवाच ॥ इदानींकथयिष्यामिप्रसंगादेवतेनृप ॥ राज्ञाधर्मप्रसक्तेनप्रजानांचहितेप्सुना ॥३॥ ग्रहयज्ञःसदाकार्योलक्षहोमसमन्वितः ॥

अर्थः- ते समयीं मत्स्यरूपी भगवान् बोलले. हे राजा, प्रसंगवशात्च मी या का-

ली तुला ग्रह यज्ञाचें विधान सांगतों. तें असें कीं, धर्मनिष्ठ असून जगद्धितेच्छु अशा राजानें लक्ष होमयुक्त ग्रह यज्ञ निरंतर करावा.

नदीनांसंगमेचैवसुराणामग्रतस्तथा ॥ ४ ॥ सुसमे भूमिभागेचदेवज्ञाधिष्ठितोनृपः ॥ गुरुणाचैवऋत्विग्भिःसार्धंभूमिंपरीक्षयेत् ॥ ५ ॥

अर्थ:- तो असा कीं, राजानें ज्योतिष शास्त्रज्ञ ब्राम्हण, गुरु व ऋत्विज यांसह वर्तमान नद्यांचा संगम व देवांचा अग्रभाग या प्रदेशांतील उत्तम समांतर भूभाग संबंधि यज्ञयोग्य भूमीची परीक्षा करावी.

खनेत्कुंडंचतत्रैवसुसमंहस्तमात्रकम् ॥ द्विगुणंलक्षहोमेतुकोटिहोमेचतुर्गुणम् ॥ ६ ॥

अर्थ:- आणि दशसहस्र संख्यापरिमित ग्रहमखास त्या भूमींतच एक हाताचें उत्कृष्ट समांतर चतुष्कोण (चौकोनी) असें कुंड खणावें. तसेंच लक्ष होमयुक्त ग्रह यज्ञार्थ दोन हस्त परिमित औरस चौरस कुंड करावें. व कोटिसंख्या युक्त ग्रहमखाविषयीं चार हातांचें समांतर चौकोनी कुंड करावें.

युग्माऋऋत्विजःप्रोक्ताअष्टौवैवेदपारगाः ॥ कंदमूलफलाहारादधिक्षीराशिनोपिवा ॥ ७ ॥

अर्थ:- नंतर प्रति होमद्रव्यास दोन उत्तम ऋत्विज करावे. असे चार होमद्रव्यें मिळून वेदपारंगत आठ ऋत्विज असावे त्यानीं त्या ग्रहयज्ञाचे अनुष्ठान समाप्तिपर्यंत कंद, मूलें व फलें यांचा आहार करावा. किंवा दही दूध यांचें भक्षण करावें.

वेद्यांनिधापयेच्चैवरत्नानिविविधानिच ॥ सिकतापरिवेषाश्चततोग्निंचसमिंधयेत् ॥ ८ ॥

अर्थ:- त्याचप्रमाणें कुंडासमीप देवतास्थापनार्थ घातलेल्या ओट्यावर अनेक प्रकारचीं रत्नें स्थापन करावीं. आणि ते कुंड व ओटा यांसभोंवतीं वाळू घालून पश्चात् अग्नि प्रदीप्त करावा.

गायत्र्यादशसाहस्रंमानस्तोकेनषड्गुणः ॥ त्रिंशद्ब्रह्मादिमंत्रैश्चचत्वारोविष्णुदेवतैः ॥ ९ ॥ कूष्मांडैर्जुहुयात्पंचकुसुमाद्यैस्तुषोडश ॥ होतव्यादशसाहस्रंबादरेजातवेदसि ॥ १० ॥ श्रियोमंत्रेणहोतव्याःसहस्राणिच

तुर्दश॥ शेषाः पंचसहस्राख्क होतव्यास्त्विंद्रदेवतैः॥
११॥ हुत्वाशतसहस्रंतु पुण्यस्नानंसमाचरेत्

अर्थ- नंतर गायत्री मंत्रानें दशसहस्र होम करावा. तसाच मानस्तोके या मंत्रानें साठ हजार आहुति, सूर्यादि नवग्रह प्रभृति जे हे तीस मंत्रानी प्रत्येक मंत्रास तीस आहुति, विष्णुदेवतेच्या मंत्रानें चार अवदानें, कोहोळ्यांची पांच अवदानें, फळांच्या सोळा आहुति, तत्पश्चात बोरांच्या आहुति अग्नींत दशसहस्र द्याव्या. आणि श्रीमंत्रानें चवदा सहस्र अवदानें, अवशिष्ट आहुति इंद्रदेवतेच्या मंत्रानीं पांच हजार द्याव्या. अशा लक्ष आहुतींनीं होम करून पश्चात् मंगलस्नान करावें.

कुंभैःषोडशसंख्यैश्चसहिरण्यैसमंगलैः॥१२॥स्ना
पयेद्यजमानंतुततः शांतिर्भविष्यति॥

अर्थ- तें असें कीं, सुवर्णसहित उत्तम मंगलकारक सोळा कलशानीं यजमानास स्नान घालावें. म्हणजे तेणें करून ग्रहसूचित अरिष्टाची शांति होते.

एवंकृतेतुयत्किंचिद्ग्रहपीडासमुद्भवम्॥१३॥तत्सर्वंना
शमायातिदत्वावैदक्षिणांनृप॥तस्मात्सर्वप्रयत्नेन
प्रधानादक्षिणास्मृता॥१४॥

अर्थ- हे राजा, अशा विधानें ग्रहमख केला असतां ग्रहपीडेपासून उत्पन्न होणारें जें कांहीं एक दुःख तें सर्वही ब्राम्हणास यथोक्त दक्षिणा दिली असतां नाश पावतें. तस्मात् सर्व कर्मांत दक्षिणाच मुख्य आहे यास्तव यजमानानें सर्व प्रयत्नें करून उत्तम दक्षिणा द्यावी.

हस्त्यश्वरथयानानिभूमिवस्त्रयुगानिच॥अनडु
होशतंदद्यादृत्विजांचैवदक्षिणाम्॥१५॥

अर्थ- ती अशी कीं, गज, अश्व व रथ इत्यादिक वाहनें, भूमि, दोन दोन वस्त्रें व शतावधि वृषभ गायी इत्यादिक विपुल दक्षिणा ऋत्विजांस द्यावी.

यथाविभवसारंतुवित्तशाठ्यंनकारयेत्॥मासेपू
र्णेसमाप्तस्तुलक्षहोमोनराधिप॥१६॥

अर्थ- ती यजमानानें स्वकीय वैभवानुसार द्यावी त्या विषयीं वित्तशाठ्य करूं नये. हे मानवराजा, या प्रमाणें एक मास पूर्ण होईल त्या दिवशीं तो लक्ष होम समाप्त करावा.

लक्षहोमस्यराजेंद्रविधानंपरिकीर्तितम् ॥ इदानींकोटिहोमस्यशृणुत्वंकथयाम्यहम् ॥१७॥

अर्थ- असें हें लक्ष होमाचें विधान तुला सांगितलें. आतां कोटि संख्या परिमित ग्रहयज्ञ संबंधि होमाचा विधि मी तुला कथन करतों. तूं श्रवण कर.

गंगातटेथयमुनासरस्वत्योर्नरेश्वर ॥ नर्मदादेविकायास्तुतटेहोमोविधीयते ॥१८॥

अर्थ- तें असें कीं, हे नरेश्वरा, भागीरथी, यमुना, सरस्वती, नर्मदा व देविका या नदींचे तीरीं हा कोटि होम करावा.

तत्रापिऋत्विजःकार्यारविनंदनषोडश ॥ सर्वंहोमेतुराजर्षेदद्याद्विप्रेथवाधनम् ॥१९॥

अर्थ- हे रविनंदना, त्या कोटि होमांत सोळा ऋत्विज करावे. अथवा हे राजर्षे, सर्व कर्तव्य होमांचे स्थानीं त्या ऋत्विज ब्राम्हणांस धन द्यावें तेणें करून त्या होमाचें फल प्राप्त होतें.

ऋत्विगाचार्यसहितोदीक्षांसांवत्सरींस्थितः ॥ चैत्रेमासेतुसंप्राप्तेकार्तिकेवाविशेषतः ॥२०॥

अर्थ- आणि चैत्र किंवा विशेषतः उक्त कार्तिक हे मास प्राप्त झाले असतां कोटि होम करणाऱ्या यजमानानें ऋत्विज व मुख्य आचार्य यांसह वर्तमान एक संवत्सर पर्यंत त्या होम संबंधि नियमांची कंकणबंधनपूर्वक दीक्षा ग्रहण करून व्रतस्थ असावें.

प्रारंभःकरणीयोवावत्सरंवत्सरंनृप ॥ यजमानःपयोभक्षीफलाशीचतथानघ ॥२१॥

अर्थ- हे निष्पाप राजा, या कोटि होमास संवत्सर प्रतिपदेच्या दिवशीं प्रारंभ करावा. आणि यजमानानें आरंभा पासून एक वर्ष पर्यंत दुग्ध प्राशन किंवा फलाहार करून रहावें.

यवाद्व्रीहयोमाषास्तिलाश्चसहसर्षपैः ॥ पालाशाःसमिधःशस्तावसोर्धारा तथोपरि ॥२२॥

अर्थ- तसेंच सातु गहूं, मूग, सांवे, राळे, साळी, उडीद, तीळ, मोहऱ्या हीं धान्यें; व पळसाच्या समिधा हे पदार्थ होमास प्रशस्त असून वर घृताची धारा अति उत्तमत्वें करून उक्त आहे.

मासेथप्रथमेदद्यात्ऋत्विग्भ्यः क्षीरभोजनम् ॥ द्वि
तीयेकृसरांदद्याद्धर्मकामार्थसाधनीम् ॥२३॥

अर्थ:- तसाच या होमास आरंभ झाला असतां, यजमानानें प्रथम मासीं ऋत्विजांस दुग्धमिश्रित क्षीर भोजन अर्पण करावें. आणि द्वितीय मासांत त्यांस तिलमिश्रित ओदनाचें भोजन घालावें. कारण तो ओदन धर्म, काम व अर्थ या तीन पुरुषार्थांस साधक आहे.

तृतीयेमासिसंयावोदेयोवैरविनंदन ॥ चतुर्थेमोदका
देयाविप्राणांप्रीतिमावहन् ॥२४॥

अर्थ:- हे रविनंदना तृतीयमासीं त्या ब्राम्हणांस सांज्याचें भोजन द्यावें. व चतुर्थ मासांत त्यांस संतुष्ट करण्या साठीं मोदक भोजन द्यावें.

पंचमेदधिभक्तंतुषष्ठेवैसक्तुभोजनम् ॥ पूपाश्चस
प्तमेदेयाह्यष्टमेघृतपूपकाः ॥२५॥

अर्थ:- त्याच प्रमाणें पंचम मासीं त्या होम संबंधि ऋत्विजांस दहिभाताचें भोजन घालावें. सहावे मासांत सातूंचें भोजन अर्पण करावें. सप्तम मासीं त्या ब्राम्हणास तैलपाचित वडे, घारगे इत्यादिक पदार्थ भक्षणास द्यावे. व अष्टम मासांत घृतपक्व घिवर, अनारसे इत्यादिक पदार्थ भक्षणास समर्पण करावे.

षष्ट्योदनंचनवमेदशमेयवषष्टिका ॥ एकादशेसमा
षंतुभोजनंरविनंदन ॥२६॥

अर्थ:- हे सूर्य कुमरा, तसाच साठ दिवसानीं पिकणाच्या साळींचा ओदन नवम मासीं त्या ऋत्विजांस भोजनार्थ घालावा. दशम मासांत सातु व त्याच साठ दिवसांच्या साळींचा भात, अकरावे मासीं माषान्न सहित भोजन त्या ब्राम्हणांस द्यावें.

द्वादशेत्वथसंप्राप्तेमासेरविकुलोद्वह ॥ षड्रसैःसह
भक्ष्यैश्चभोजनंसार्वकामिकम् ॥२७॥

अर्थ:- हे सूर्यवंशोत्कर्षकारका, पश्चात् बारावा मास प्राप्त झाला असतां, त्या महिन्यांत सर्व इच्छा पूर्ण करण्या विषयीं योग्य असें अनेक पक्वान्न युक्त षड्रस अन्नाचें भोजन त्या ऋत्विजांस अर्पण करावें.

देयाद्विजानांराजेंद्रमासिमासिचदक्षिणाः ॥ अह
तवासःसंवीतोदिनार्धंहोमयेच्छुचिः ॥२८॥

अर्थः- हे राजेंद्रा, यजमानानें स्वतः शुचि असून, नूतन वस्त्रें परिधान करून ऋत्विजां कडून प्रातःकाल पासून मध्यान्ह समय पर्यंत होम करावा. आणि त्यांस प्रतिमासीं होम दक्षिणा द्यावी.

तस्मात्सदोत्थितैर्भाव्यं यजमानैः सहद्विजैः ॥ इंद्राद्या
दिसुराणांच प्रीणनं सर्वकामिकम् ॥२९॥ कृत्वासुरा-
णांराजेंद्र पशुघातसमन्वितम् ॥ सर्वदानानि देयाना
मग्निष्टोमंचकारयेत् ॥३०॥

अर्थः- यास्तव यजमानानें सर्व ऋत्विज ब्राम्हणांसह वर्तमान निरंतर त्या होम कर्माविषयीं सावध चित्त असावें. कारण इंद्रादिक लोकपाल व सूर्यादि नवग्रह प्रमुख अधिदेवता व प्रत्यधिदेवता यांचा संतोष या होमानें झाला असतां तेणें करून आपले सर्व मनोरथ पूर्ण होतात एतदर्थ हे राजेंद्रा, महयज्ञांतील देवांचे प्रीत्यर्थ पशुहिंसे सहित सर्व दानें करून त्या सर्व देवांच्या तृप्त्यर्थ हा कोटिहोम शंभर अग्नि स्थापन करून त्या सर्व अग्नीमध्यें मिळून करावा.

एवंकृत्वाविधानेन पूर्णाहुतिः शतेशते ॥ सहस्रेद्विगुणादे
याचावच्छतसहस्रकम् ॥३१॥

अर्थः- असा होम करून प्रत्येक शंभर होमास पूर्णाहुति द्यावी. आणि प्रत्येक सहस्र होमास त्या शत होमाच्या पूर्णाहुतीपेक्षां द्विगुणित मोठी पूर्णाहुति द्यावी. असें लक्ष होम पर्यंत करून याच क्रमानें पुढें शत लक्ष संख्ये पर्यंत होम करावा.

पुरोडाशस्ततः साध्योदेवतार्थेचऋत्विजैः ॥ युक्तोवसन्
मानवैश्च* पुनः प्रासार्चितान्द्विजान् ॥३२॥ प्रीणयित्वा
सुरान्सर्वान्पितॄनेवततः क्रमात् ॥ कृत्वाशास्त्रवि
धानेनपिंडानांचसमर्पणम् ॥३३॥

अर्थः- नंतर त्या नवग्रहादिक स्थापित सर्व देवता प्रीत्यर्थ त्या सोळा ऋत्विजानीं पुरोडाश सिद्ध करावा. आणि यजमानें एकाग्रचित्तें करून मंत्रार्थ ज्ञानसंपन्न ब्राह्मणांसहित त्या पूजित ऋत्विजांस पुनः दानमानानीं संतुष्ट करून त्या

---

* मनून अधीयते विदन्ति वा मानवाः तैः मानवैः मनु (मंत्र) या तें अध्ययन किंवा ज्ञान यानीं युक्त ते मानव (मंत्रार्थज्ञाते)

सिद्ध केलेल्या पुरोडाशानें क्रमशः सर्व देव व पितर यांस तृप्त करून पश्चात् यथा शास्त्र विधानानें पितरांस पिंडदान करावें.

समाप्तेतस्यहोमस्यविप्राणामथदक्षिणाम् ॥ समांचे
वतुलांकृत्वाबध्वाशिक्यद्वयंपुनः ॥३४॥ आत्मानंतोल
येत्तत्रपत्नींचैवद्वितीयकाम् ॥ सुवर्णेनतथात्मानंरज
तेनतथाप्रियाम् ॥३५॥ तोलयित्वाददेद्राजावित्तशा
ठ्यविवर्जितः ॥ ददेच्छतसहस्रंतुरूप्यस्यकनकस्यच
॥३६॥

अर्थ- अशी त्या कोटि होमाची समाप्ति झाल्यावर ऋत्विजादिक सर्व ब्राह्मणांस दक्षिणा द्यावी. नंतर एक समान कांटा किंवा दांडी करून तिला दोन शिंकी बांधावीं. मग त्यांत यजमानानें प्रथमतः सुवर्णानें आपली व दुसरी रुप्यानें पत्नीची अशी तुळा करावी. आणि ही तुळा राजानें केली असतां त्यानें वित्त शाठ्य (द्रव्याच्या विषयीं कृपणता) न करतां एक लक्ष रौप्य मुद्रिका व सुवर्ण मुद्रिकाही त्या तुळेवर दक्षिणा द्यावी.

सर्वस्वंवाददेत्तत्रराजसूयफलंलभेत् ॥ एवंकृत्वाविधाने
नविप्रांस्तांश्चविसर्जयेत् ॥३७॥

अर्थ- अथवा या कोटिसंख्यापरिमित होमयुक्त ग्रहमखांत सर्वस्व (स्वकीय सर्व धन) दक्षिणा दिली असतां राजसूय यज्ञाचें फल प्राप्त होतें. अशा विधीनें हा ग्रहयज्ञ करून त्या आचार्यादिक ब्राम्हणांचें विसर्जन करावें.

प्रीयतांपुंडरीकाक्षः सर्वयज्ञेश्वरोहरिः ॥ तस्मिंस्तुष्टेज
गत्तुष्टंप्रीणितेप्रीणितंभवेत् ॥३८॥

अर्थ- पश्चात् या कर्माचे अंतीं सर्व यज्ञेश्वर कमलनयन हरि या यज्ञानें प्रसन्न होवोत. अशी प्रार्थना करून तें कर्म परमेश्वरास अर्पण करावें. कारण तो ईश्वर संतुष्ट झाला असतां सर्व जग संतुष्ट होतें. व तो भगवान् तृप्त झाल्यानें सम्पूर्ण विश्व तृप्त होतें.

एवंसर्वोपघातेतुदेवमानुषकारिते ॥ एवंशांतिस्तवा
ख्यातायांकृत्वासुकृतीभवेत् ॥३९॥

अर्थ- या प्रमाणें देव किंवा मनुष्य यां पासून प्राप्त झालेल्या सर्व घातक

अरिष्टांच्या नाशाविषयीं अशीही महाशांति तुला कथन केली; कारण ही शांति केली असतां मनुष्याचें सर्व पाप दूर होऊन तो पुण्यवान् होतो.

नशोचेज्जन्ममरणेकृताकृतविचारणे ॥ सर्वतीर्थेषुयत्स्नानंसर्वयज्ञेषुयत्फलम् ॥ तत्फलंसमवाप्नोतिकृत्वायज्ञत्रयंनृप ॥ ४१ ॥

अर्थः- हे राजा दशसहस्र संख्यापरिमित होमयुक्त प्रथम ग्रहमख, द्वितीय लक्षहोम व तृतीय कोटिहोम हे तीन प्रकारचे ग्रहयज्ञ केले असतां सर्व तीर्थ स्नानें व सकल यज्ञ यां संबंधि पूर्ण फल प्राप्त होतें. यास्तव हे तीन यज्ञ करणारानीं जन्म, मरण व स्वकीय कर्माकर्म विचार या विषयीं खेद मानूं नये. इतिश्री मत्स्यपुराणे ग्रहयज्ञ विधानं नाम एकोन चत्वारिंश दुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २३९ ॥

अध्याय २४० वा.

मनुरुवाच ॥ इदानींसर्वधर्मज्ञसर्वशास्त्रविशारद ॥ यात्राकालविधानंमेकथयस्वमहीक्षिताम् ॥ १ ॥

अर्थः- पुनः मनुराजा प्रश्न करतो. हे भगवन्, आपण सर्व धर्म व सर्व शास्त्रें यांच्या ज्ञाना विषयीं पूर्ण आहां. यास्तव राजानीं कोणत्या कालीं शत्रूस जिंकण्या विषयीं प्रयाण करावें हा विषय या कालीं मला कथन करा?

मत्स्यउवाच ॥ यदामन्येतनृपतिराक्रंदेनबलीयसा ॥ पार्ष्णिग्राहाभिभूतोयंतदायात्रांप्रयोजयेत् ॥ २ ॥

अर्थः- तेसमयीं मत्स्यरूपी नारायण बोलले. हे राजा ज्या कालीं स्वकीय शत्रूचे राज्यांतील पीडित झालेल्या प्रजांचे आक्रोशयुक्त शब्दां वरून हा राजा आपल्या शत्रू पासून पराजय पावला आहे असें निश्चित समजेल. त्या कालीं राजानें त्या शत्रूवर गमन करावें.

दुष्टायोधाभृताभृत्याःसांप्रतंचबलंमम ॥ मूलरक्षासमर्थोस्मितदायात्रांप्रयोजयेत् ॥ ३ ॥

अर्थः- तसेंच ज्या शत्रूचे सेवक योद्धे त्या पासून वेतना द्वारानें जीवन पावत असूनही ते दुष्ट असून आपलें सैन्य सांप्रतकालीं पूर्ण सबल असल्यामुळें मी स्वकीय राज्याच्या मूल संरक्षणा विषयीं समर्थ आहें अशी आपली स्थिति जेव्हां राजास वाटेल, तेव्हां त्यानें परराष्ट्रावर जावें.

अशक्तपार्ष्णिर्नृपतिर्नतुयात्रांप्रयोजयेत् ॥ पार्ष्णि ग्राहाधिकंसैन्यंमूलेनिक्षिप्यचव्रजेत् ॥ ४ ॥

अर्थ:- तसेंच स्वराज्याच्या पृष्ठभाग रक्षक राजाचें अंतःकरण शक्त नसलें तर त्या राजानें परराज्यावर जाऊं नये. आणि जाणें अवश्य असल्यास त्यानें आपले पृष्ठभाग रक्षक राजाचे सैन्या पेक्षां अधिक सैन्य स्वकीय मूळ राज्याचे रक्षणा विषयीं स्थापन करून आपण शत्रूवर जावें.

चैत्र्यांवामार्गशीर्ष्यांवायात्रांयायान्नराधिपः ॥ चैत्र्यां पश्यंन्नैदाघंहंतिपुष्टिंचशारदीं ॥ ५ ॥

अर्थ:- तें असें कीं, चैत्री पूर्णिमा किंवा मार्गशीर्ष पूर्णिमा या काळीं राजानें शत्रूवर स्वारी करण्यास निघावें. परंतु त्यांत मार्गशीर्ष मासीं निघावें हेंच युक्त आहे. कारण चैत्रांतील उष्णकाळ शरदतूंत मनुष्यास प्राप्त झालेल्या शक्तीचा नाश करितो.

एतदेवविपर्यस्तंमार्गशीर्ष्यांनराधिपः ॥ शत्रोर्वाव्यसने यायात्कालएवसुदुर्लभः ॥ ६ ॥

अर्थ:- आणि हेंच ऋतुमान मार्गशीर्षांत विपरीत आहे. अथवा जेव्हां आपल्या शत्रूस संकट समय प्राप्त होईल त्या काळीं त्यानें शत्रूवर जावें. असा शत्रूचा विषम काळ अति दुर्लभ आहे.

दिव्यांतरिक्षक्षितिजैरुत्पातैःपीडितंपरम् ॥ षडृक्षपीडासंतप्तंपीडितंचतथाग्रहैः ॥ ७ ॥ ज्वलंतीचतथैवोल्कादिशंयांचप्रपद्यते ॥ भूकंपोल्कादिसंयानियांचकेतुःप्रसूयते ॥ ८ ॥ निर्घातश्चपतेद्यत्रतांयायाद्वसुधाधिपः ॥

अर्थ:- त्या प्रतिकूळ काळाचीं लक्षणें अशीं कीं, आकाश, अंतरिक्ष व भूमि यां पासून झालेल्या उत्पातानीं अत्यंत पीडित असून षट्कर्णि मंत्राच्या दुःखानें संतप्त व ग्रहपीडेनें व्याप्त झालेला, तशीच प्रज्वलित उल्का (ज्वालायुक्त अग्नी सारखा तारा) ज्या दिशेस गमन करील भूमिकंप व उल्कापातादिक उत्पात ज्या राष्ट्रांत होतात ज्या दिशेस धूमकेतु उदय पावेल. व निरभ्र आकाशांतून वीज ज्या देशांत पडेल त्या दिशेस राजानें शत्रुपराजयार्थ गमन करावें.

सबलव्यसनोपेतंतथादुर्भिक्षपीडितम् ॥ ९ ॥ संभूतां
तरकोपंचक्षिप्रंयायादरिंनृपः ॥

अर्थः- तसाच जो शत्रु सबल दुःखानें युक्त किंवा स्वकीय सेन्या सहित दुःखानें युक्त अथवा दुर्भिक्षानें पीडित व अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या अतिक्रोधानें व्याप्त अशा शत्रूवर राजानें शीघ्र स्वारी करावी.

यूकामाक्षीकबहुलंबहुपंकंतथाविलम् ॥ १० ॥ नास्तिकं
भिन्नमर्यादंतथामंगलवादिनम् ॥ अपेतप्रकृतिंचैवनिः
सारंचतथाजयेत् ॥ ११ ॥

अर्थः- तसेंच ज्याचें सैन्य बहुत यूकानीं (उवा) ग्रस्त झालें असेल अथवा ज्याचे राष्ट्रांत मधुमक्षिका (मधमाश्या) चीं मोहोळें बहुत लागलीं असतील, आणि अकाळीं अति चिखल व गढुळ उदक यांनीं ज्याचा देश युक्त झाला असेल किंवा पापानें युक्त तसाच जो शत्रु नास्तिक अथवा लोक व वेद या संबंधि मर्यादेचा त्याग करणारा, अमंगल भाषण करणारा, सर्व प्रजा ज्या विषयीं उदासीन होतील व जोमंत्री आदि करून सर्व राज्यांगानीं बलहीन झाला असेल अशा शत्रूस जिंकण्याविषयीं राजानें त्यावर जावें.

विद्दिष्टनायकंसैन्यंतथाभिन्नंपरस्परम् ॥ व्यसनासक्त
नृपतिंबलंराजाभियोजयेत् ॥ १२ ॥

अर्थः- तसेंच ज्याच्या सैन्यांतील नायक (सरदार) परस्परें अतिद्वेष युक्त झाले असून तें सैन्यही एकमेकांशीं ऐक्य मतानें नसेल. किंवा जो राजा कांहीं दुर्व्यसनांत अति आसक्त असेल त्यावर राजानें आपलें सैन्य योजावें.

सैनिकानांनशस्त्राणिस्फुरंत्यंगानियत्रच ॥ दुःस्वमानि
चपश्यंतिबलंतदभियोजयेत् ॥ १३ ॥

अर्थः- त्याच प्रमाणें ज्याच्या सेनेंतील योद्ध्यांचीं शस्त्रें व दक्षिण बाजूचीं अंगें स्फुरण पावत नाहींत. आणि त्या सैन्यांतील लोक रात्रीं निद्रेंत दुःस्वप्नें अवलोकन करतात तर अशा स्थितींत आलेल्या शत्रूवर राजानें आपलें सैन्य योजावें.

उत्साहबलसंपन्नः स्वानुरक्तबलस्तथा ॥ तुष्टपुष्टबलोरा
जापरानभिमुखोव्रजेत् ॥ १४ ॥

अर्थः- तसाच जो राजा मनोत्साह शक्तीनें युक्त असून स्वकीय सैन्य आपणा

वर मनःपूर्वक प्रीति करीत आहे व आपणही स्वतः संतोष पूर्वक बलानें संपन्न अ-थवा हर्ष व पुष्टि यानीं संपन्न सैन्य युक्त आहे त्या राजानें शत्रूंवर युद्धार्थ सन्मुख गमन करावें.

शरीरस्फुरणेधन्येतथादुःस्वमनाशने ॥ निमित्तेशकुने धन्येजातेशत्रुपुरंव्रजेत् ॥१५॥

अर्थ- तसेंच ज्या राजाच्या दक्षिण भागाचीं हस्तपादादिक अंगें स्फुरण पावत असून दुःस्वप्नेंही त्यास पडत नसून चिन्हें व शकुन-हे उत्तम होत आहेत तर त्यानें शत्रूचे राजधानीवर चालून जावें.

ऋक्षेषुषट्सुशुद्धेषुग्रहेष्वनुगुणेषुच ॥ प्रश्नकालेशुभे जातेपरान्यायान्नराधिपः ॥१६॥

अर्थ- तशींच सहां नक्षत्रें शुद्ध व सूर्यादिक सर्व ग्रहही अनुकूल उच्चस्थानीं असून ज्योतिषशास्त्राभिज्ञ लोकांस केलेल्या प्रश्नानुसार शुभकाळ प्राप्त झाला असतां राजानें तत्काळ शत्रूवर प्रयाण करावें.

एवंतुदैवसंपन्नस्तथापौरुषसंयुतः ॥ देशकालोपपन्नां तुयात्रांकुर्यान्नराधिपः ॥१७॥

अर्थ- या प्रमाणें सर्व दैवसंपत्ती व पराक्रम यानीं संपन्न राजानें देशकालानुरूप शत्रूवर स्वारी करण्या विषयीं निघावें.

स्थलेनक्रस्तुनागस्यतस्यापिसजलेवशो ॥ उलूकस्यनिशिध्वांक्षःसचतस्यदिवावशो ॥१८॥

अर्थ- तो देशकाळ विचार असा कीं, नक्र (सुसर) हा प्राणी भूमीवर असतां, गजाचे स्वाधीन होतो. आणि तो गज जलांत सांपडला तर त्या नक्राच्या स्वाधीन होतो. तसाच काकपक्षि रात्रीं अंध झाल्यानें तो उलूकाच्या स्वाधीन होतो व तो दिवांधीन पक्षि, दिवसास अंध झाल्या मुळें तो काकपक्ष्यानें जिंकला जातो.

एवंदेशंचकालंचज्ञात्वायात्रांप्रयोजयेत् ॥ पदातिनागबहुलांसेनांप्रावृषियोजयेत् ॥१९॥

---

* स्वकीय जन्मनक्षत्र १ लें, त्या पासून १० वें कर्मनक्षत्र २, १६ वें संघातनक्षत्र ३, १८ वें समुदायनक्षत्र ४. २३ वें विनाशनक्षत्र ५, २५ वें मानसनक्षत्र ६. हीं सहा नक्षत्रें शुभग्रह युक्त असलीं तर तीं शुद्ध जाणावीं, आणि पापग्रह युक्त असलीं तर तीं अशुभ समजावीं.

अर्थ:- अशारीतीनें देशकालांची अनुकूलता राजानें जाणून आपले शत्रूवर जाण्याची योजना करावी. ती अशी कीं, बहुत पायदळ व गज यानीं युक्त अशी सेना राजानें प्रावृट (श्रावण भाद्रपद) ऋतूंत शत्रूवर जाण्याविषयीं योजावी.

हेमंतेशिशिरेचैवरथवाजिसमाकुलाम् ॥ खरोष्ट्रबहुला सेनांतथाग्रीष्मेनराधिपः ॥२०॥ चतुरंगबलोपेतांवसंतेवा शरद्यथ ॥

अर्थ:- त्याच प्रमाणें राजानें हेमंत (मार्गशीर्ष, पौष) व शिशिर (माघ, फाल्गुन) या दोन ऋतूंत रथ व अश्व यानीं युक्त अशी सेना योजावी. तशीच त्यानें ग्रीष्म (ज्येष्ठ, आषाढ) ऋतूंत बहुत खर (गर्दभ) व उष्ट्र (उंट) यानीं युक्त अशी सेना योजावी. आणि वसंत (चैत्र, वैशाख) किंवा शरत् (आश्विन, कार्तिक) या दोन्ही ऋतूंत रथ, गज, अश्व व पायदळ या चतुरंग सेनेची योजना शत्रूवर जाण्या विषयीं करावी.

सेनापदातिबहुलायस्यस्यात्पृथिवीपतेः ॥२१॥ अभियो ज्योभवेत्तेनशत्रुर्विषमसाश्रितः ॥ गम्येवृक्षावृतेदेशेस्थि तंशत्रुंतथैवच ॥२२॥

अर्थ:- तशीच ज्या राजाची सेना बहुत पायदळानें युक्त आहे, त्यानें आपला शत्रु विषम (अडचणीचे) स्थलीं किंवा सर्वांनीं गमन करण्या योग्य असून वृक्षवेष्टित अशा प्रदेशांत असतां त्या सन्मुख राजानें युद्धास जावें.

किंचित्पंकेतथायायाद्बहुनागोनराधिपः ॥ तथाश्वबहु लोयायाच्छत्रुंसमपथिस्थितम् ॥२३॥ तमाश्रयंतोब हुलास्तांस्तुराजाप्रपूजयेत् ॥

अर्थ:- तसेच ज्या राजा जवळ गज बहुत आहेत त्यानें आपला शत्रु किंचित् कर्दमयुक्त प्रदेशांत असला तरी त्यावर जावें. आणि ज्याचें सैन्य बहु अश्वयुक्त असेल त्यानें स्वकीय शत्रु सम प्रदेशीं असतां तेथें त्यावर गमन करावें, व त्याच्या आश्रयानें राहिलेले चतुर मंत्री किंवा योद्धे इत्यादिक लोक आपणा पेक्षां बहुत असले तर राजानें त्यांची बहुमानानें पूजा करून त्यांस आपणाकडे अनुकूल करून घ्यावें.

खरोष्ट्रबहुलोराजाशत्रुर्बंधेनसंस्थितः ॥२४॥ बंधन

स्योभियोज्योरिस्तथाप्रावृषिभूभुजा ॥ हिमपातयु
तेदेशेस्थितंग्रीष्मेभियोजयेत् ॥ २५ ॥

अर्थ:- तसाच जो राजा, आपलें सैन्य बहुत गर्दभ व उष्ट्र (उंट) यानीं युक्त असल्यामुळें खंदक नद्या व पर्वत इत्यादिकांचें बंधारण युक्त देशांत बंदोबस्तानें राहिला असेल तर त्या बंधन युक्त प्रदेशांतील शत्रूवर राजानें वर्षाऋतूंत (श्रावण, भाद्रपद) सन्मुख युद्धार्थ गमन करावें. आणि हिम (बर्फ) व्याप्त देशांतील शत्रूवर राजानें ग्रीष्म ऋतूंत (ज्येष्ठ, आषाढ) सन्मुख युद्धाविषयीं जाण्याची योजना करावी.

यवसेंधनसंयुक्तःकालःपार्थिवहैमनः ॥ शरद्वसंतोधर्म
ज्ञकालौसाधारणौस्मृतौ ॥ २६ ॥

अर्थ:- हे धर्मज्ञ राजा, बहु तृण व काष्ठें यानीं संपन्न हेमंत ऋतु (मार्गशीर्ष, पौष) संबंधिकाल राजास युद्धार्थ प्रयाण करण्या विषयीं उत्तम आहे. आणि शरत् (आश्विन, कार्तिक) वसंत (चैत्र, वैशाख) हे दोन्ही ऋतु राजास शत्रूवर स्वारी करण्यास मध्यम आहेत असें जाणावें.

विज्ञायराजाहितदेशकालौदेवंत्रिकालंन्वतथैवबुध्वा ॥ या
यात्परंकालविदांमतेनसंचिंत्यसार्धंद्विजमंत्रविद्भिः ॥ २७ ॥

अर्थ:- हे शौनका, अशारीतीनें अनुकूल देश, काल व तसेंच त्रिकालाबाधित स्वकीय दैव हें सर्व प्रकरण कालज्ञान संपन्न ब्राम्हणांच्या संमतानें जाणून मंत्र (मसलत) ज्ञानकुशल प्रधानादिकां सहवर्तमान उत्तम विचार करून त्यां सहित राजानें शत्रूवर स्वारी करण्या साठीं निघावें. इतिश्री मत्स्य पुराणे यात्रानिमित्ताभियोज्यं नाम चत्वारिंशदुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २४० ॥

अध्याय २४१ वा.

मनुरुवाच ॥ ब्रूहिमेत्वंनिमित्तानिअशुभानिशुभानि
च ॥ सर्वधर्मभृतांश्रेष्ठत्वंहिसर्वविदुच्यसे ॥ १ ॥

अर्थ:- मनुराजा, प्रश्न करतो. हे सर्व धर्म रक्षकश्रेष्ठा, आपण सर्वज्ञ आहां! यास्तव जय, पराजय व सुख, दुःख इत्यादिकांचीं शुभ व अशुभ हीं लक्षणें मला कथन करा. १

मत्स्यउवाच ॥ अंगदक्षिणभागेतुशस्तंप्रस्फुरणंभवे

त्॥ अप्रशस्तंतथावामेपृष्ठस्यहृदयस्यच॥२॥

अर्थ- त्या काळीं मत्स्यरूपधारी भगवान् बोलले. हे राजा, शरीराच्या दक्षिण भागचें अंग स्फुरण पावलें असतां शुभकारक आहे, तसेंच देहाचा वाम (डावा) भाग, पृष्ठ (पाठ) व हृद यांचा वाम भाग या स्थानीं स्फुरण झालें असतां तें अशुभ जाणावें.

मनुरुवाच॥ अंगानांस्पंदनंचैवशुभाशुभविचेष्टितम्॥ तन्मेविस्तरतोब्रूहियेनस्यांतद्विदोभुवि॥३॥

अर्थ- तेसमयीं तो वैवस्वत मनु पुनः प्रश्न करतो कीं, हे भगवन् शुभ किंवा अशुभ यांचें सूचक जें अंगस्फुरण तें मला अशा विस्तारानें कथन करा कीं, जेणें करून मी या भूलोकीं त्या शुभाशुभ लक्षणांचा ज्ञाता होईन,

मत्स्यउवाच॥ पृथ्वीलाभोभवेन्मूर्ध्निललाटेरविनंदन॥ स्थानंविवृद्धिमायातिभ्रूनसोःप्रियसंगमः॥४॥

अर्थ- ते समयीं मत्स्यरूपी भगवान् बोलले. हे रविनंदना, मस्तकीं स्फुरण झालें असतां पृथ्वी लाभ होतो. ललाट (कपाळ) स्थानीं स्फुरण झालें तर स्वकीय स्थान ऐश्वर्यादिकानीं वृद्धिंगत होतें. आणि भ्रुकुटि (भोंवया) व नासिका या ठिकाणीं स्फुरण झाल्यानें प्रिय (इष्टवस्तु किंवा मित्रादिक) यांचा संगम प्राप्त होतो.

भृत्यलब्धिश्चाक्षिदेशेदृगुपांतेधनागमः॥ उत्कंठोपगमोमध्येदृष्टंराजन्विचक्षणैः॥५॥

अर्थ- हे राजन्, नेत्रस्थानीं स्फुरण झालें असतां सेवक प्राप्त होतात. तसेंच नयनाच्या समीप भागाचें स्फुरण झालें तर धन प्राप्ति होते. व नेत्रांचा मध्यभाग स्फुरण पावला तर शुभ कार्याविषयीं उत्कंठा उत्पन्न होते. असें विचक्षण पुरुषांच्या अवलोकनांत आहे.

दृग्बंधनेसंगरेचजयंशीघ्रमवाप्नुयात्॥ योषिद्भोगोपांगदेशेश्रवणांतेप्रियाश्रुतिः॥६॥

अर्थ- तसेच नेत्र मिटले असूनही ते स्फुरण पावले असतां, संग्रामांत शीघ्र जय प्राप्त होतो. आणि नेत्रांचे प्रांत भाग स्फुरले तर स्त्रियांपासून सुख प्राप्त होईल. व कर्णांचे प्रांतभाग स्फुरले असतां प्रियवार्तेचें श्रवण होतें.

नासिकायांप्रीतिसौख्यंप्रजाप्तिरधरोष्ठजे॥ कंठेतुभोगलाभःस्याद्भोगवृद्धिरथांसयोः॥७॥

अर्थ- नासिकास्थानीं स्फुरण झालें असतां प्रीति युक्त सुखाची प्राप्ति होते. अधरोष्ठ (खालच्या ओंठ) स्फुरण पावला तर प्रजेची प्राप्ति होईल. तसेंच कंठ स्थानीं स्फुरण झाल्यानें सुख प्राप्ति होते. व स्कंधाच्या स्फुरणानें सुखाची वृद्धि होते.

स्फुरत्स्नेहश्चबाहुभ्यांहस्तेनैवधनागमः॥ पृष्ठेपराज यःसद्यःजयोवक्षस्थलेभवेत्॥८॥

अर्थ- तसेंच भुजानें स्फुरण झालें असतां, सत्पुरुषांशीं स्नेह घडतो, आणि हस्तसंबंधि स्फुरणाच्या योगानें धन प्राप्ति होते; तसाच पृष्ठ भाग स्फुरण पावला असतां, तत्काळ पराजय होतो, व वक्षस्थलाच्या दक्षिणभागसंबंधि स्फुरणापासून जयप्राप्ति होईल.

कुक्षिभ्यांप्रीतिरुद्दिष्टास्त्रियाःप्रजननंस्तने॥ स्थान भ्रंशोनाभिदेशेअंत्रेचैवधनागमः॥९॥

अर्थ- त्याच प्रमाणें कुक्षि (कुशी) स्थानीं स्फुरण झालें असतां, आपणावर प्रिय मनुष्याची प्रीति उत्पन्न होते, स्त्रीचे स्तन स्फुरण पावले तर, ती त्वरित प्रसूत होईल; आणि नाभिस्थानीं स्फुरण झालें असतां, स्थानभ्रंश होईल; व आंतडीं स्फुरल्यानें धन प्राप्ति होते.

जानुसंधौपरैःसंधिर्बलवद्भिर्भवेन्नृप॥ दिशैकदेशना शोथजंघायांरविनंदन॥१०॥

अर्थ- हे रविनंदना मनुराजा, जानूच्या (गुडघे) संधि स्थानीं स्फुरण झालें असतां, बळवत्तर (अतिबलिष्ठ) शत्रूंशीं संधि होईल, व जंघा (पोटऱ्या) स्फुरण पावल्यातर, त्यापासून आपल्या सत्तेंतील चतु सीमा संबंधि दिशेच्या कांहीं भागाचा नाश होतो.

उत्तमंस्थानमाप्नोतिपद्भ्यांप्रस्फुरणान्नृप॥ सलाभं चाध्वगमनंभवेत्पादतलेनृप॥११॥

अर्थ- हे राजेंद्रा, चरण स्थानीं स्फुरण झालें असतां, उत्तम स्थानाची प्राप्ति होते; आणि तळ पाय स्फुरण पावला तर, त्या योगानें लाभ प्राप्ति युक्त मार्ग गमन घडतें.

लांछनंपिटकंचैवज्ञेयंस्फुरणवत्तथा॥ विपर्ययेणवि हितःसर्वस्त्रीणांफलागमः॥ दक्षिणेपिप्रशस्तेंगेप्रश स्तंस्याद्विशेषतः॥१२॥

अर्थः- तशींच नीळ आदिकरून शरीरावरील चिन्हें व पिटक (फुटकुळ्या) यांचें, स्फुरणा सारखेंच फल जाणावें. या स्फुरणादिक लक्षणांचीं फल प्राप्ति स्त्रियांस व्यत्क्रमानें जाणावी; आणि पुरुषांचीं दक्षिणांगें व स्त्रियांचीं वामांगें यांतील श्रेष्ठ अगांचे ठिकाणीं तीं स्फुरणादिक लक्षणें झालीं असतां, त्यांचे विशेषें करून उत्कृष्ट फल होतें.

अतोन्यथासिद्धिप्रजल्पनात्तु फलस्यशस्तस्यचनिंदि
तस्य॥ अनिष्टचिन्होपगमेद्विजानांकार्यंसुवर्णेनतुतर्प
णंस्यात्॥१३॥

अर्थः- या प्रमाणें सांगितलेल्या स्फुरणादिकांच्या शुभकारक फलाहून इतर कथन केलेल्या निंदित फलांचें सूचक अनिष्ट चिन्ह प्राप्त झालें असतां त्याचे निवारणार्थ सुवर्ण दानानें ब्राम्हणांस संतुष्ट करावें. इतिश्री मत्स्य पुराणे यात्रानिमित्ते देहस्पंदनंनाम एकचत्वारिंशदुत्तर द्विशततमोऽध्यायः॥२४१॥

अध्याय २४२ वा.

मनुरुवाच॥ स्वप्नाख्यानंकथंदेवगमनेप्रत्युपस्थिते॥
दृश्यंतेविविधाकाराः कथंतेषांफलंभवेत्॥१॥

अर्थः- वैवस्वत मनु प्रश्न करतो. हे देवा राजा किंवा इतर लोक यांचे प्रयाणादि कार्य उपस्थित झालें असतां, स्वप्नांवरून त्यांच्या होष्यमाण कार्याची फल स्थिति कशी सांगावी, कारण रात्रीं निद्रेंत अनेक प्रकारचीं स्वप्नें पडतात, तेव्हां त्यांचें शुभाशुभ फल कसें होतें, तें आपण मला कथन करा?

मत्स्यउवाच॥ इदानींकथयिष्यामिनिमित्तंस्वप्नदर्शने
॥नाभिंविनान्यगात्रेषुतृणवृक्षसमुद्भवः॥२॥ चूर्णनंमू
र्ध्निकांस्यानांमुंडनंनग्नतातथा॥ मलिनांबरधारित्वम-
भ्यंगःपंकदिग्धता ॥३॥ उच्चात्प्रपतनंचैवदोलारोहण
मेवच॥ अर्जनंपक्वलोहानांहयानामपिमारणम्॥४॥
रक्तपुष्पद्रुमाणांचमंडलस्यतथैवच॥ वराहर्क्षखरो
ष्ट्राणांतथाचारोहणक्रिया॥५॥ भक्षणंपक्षमांसानांतै
लस्यकृसरस्यच॥ नर्तनंहसनंचैवविवाहोगीतमेवच॥
६॥ तंत्रीवाद्यविहीनानांवाद्यानामभिवादनम्॥ स्रो-
तोवगाहगमनंस्नानंगोमयवारिणा॥७॥ पंकोदकेन-

चतथामहीतोयेनचाप्यथ ॥ मातुःप्रवेशोजठरेचितारोहणमेवच ॥ ८ ॥ शक्रध्वजाभिपतनंपतनंशशिसूर्ययोः दिव्यांतरिक्षभौमानामुत्पातानांचदर्शनम् ॥ ९ ॥ देवद्विजातिभूपालगुरूणांक्रोधएवच ॥ आलिंगनंकुमारीणांपुरुषाणांचमैथुनम् ॥ १० ॥ हानिश्चैवस्वगात्राणांविरेकवमनक्रिया ॥ दक्षिणाशाभिगमनंव्याधिनाभिभवस्तथा ॥ ११ ॥ फलापहानिश्चतथापुष्पहानिस्तथैवच ॥ गृहाणांचैवपातश्चगृहसंमार्जनंतथा ॥ १२ ॥ क्रीडापिशाचक्रव्यादवानरर्क्षनरैरपि ॥ परादभिभवश्चैवतस्माच्चव्यसनोद्भवः ॥ १३ ॥ काषायवस्त्रधारित्वंतद्वत्स्त्रीक्रीडनंतथा ॥ स्नेहपानावगाहोचरक्तमाल्यानुलेपनम् ॥ १४ ॥ एवमादीनिचान्यानिदुःस्वप्नानिविनिर्दिशेत् ॥

अर्थः- ते समयीं मत्स्यावतारधारी नारायण, बोलले कीं, हे राजा, मी या काळीं स्वप्न दर्शनांतील इष्टानिष्ट फलसूचक कारण सांगतों. तें असें कीं, नाभी वांचून इतर अवयवावर तृण किंवा वृक्ष यांची उत्पत्ति होणें, तसेंच मस्तकावर कांस्य पात्रांचें चूर्ण होणें मुंडन व नग्नत्व भासणें, मलिन वस्त्र परिधान करणें, अभ्यंग करणें, पंक (चिखल) अंगास लागणें, उच्च प्रदेशा पासून पडणें, हिंडोळांत बसणें, पंक व लोह (लोखंड) यांचें संपादन होणें, अश्वांचें मरण होणें, किंवा अश्वांस मारणें, आरक्त पुष्प युक्त वृक्षांच्या समुदायाचें दर्शन होणें, वराह (डुकर) ऋक्ष (आस्वल) खर (गर्दभ) उष्ट्र (उंट) यांवर बसणें, पक्व (शिजलेलें) मांस तैल व कृसर (तिलमिश्रित ओदन) यांचें भक्षण, नृत्य, हास्य, विवाह, गायन यांचा योग घडणें, वीणा आदि करून तंतु वाद्यरहित इतर वाद्यें वाजणें, स्रोतस् (झरा किंवा नदी) यांचे उदकांत अवगाह (बुडी) स्नानार्थ गमन करणें, अथवा गोमय (शेण) युक्त जलानें स्नान करणें, कर्दम मिश्रित उदकानें किंवा भूमीवर जमलेल्या पाण्यानें स्नान करणें, मातेच्या उदरांत प्रवेश होणें, चितेवर आरोहण करणें, वर्ष प्रतिपदेचे दिवशीं उभारलेली गुढी, किंवा उत्सवादिकांत उभा केलेला इंद्रध्वज यांचें अकस्मात् निर्निमित्त पतन होणें, तसेंच चंद्र, सूर्याचें पतन, आकाश, अंतरिक्ष व भूमि यांतील उत्पातांचें दर्शन, देव, ब्राह्मण, राजे व मातापितरादिक गुरु यांचा क्रोध होणें, कुमारींचें आलिंगन घडणें, पुरुषांचें परस्परें मै-

षमैथुन योग घडणें, स्वकीय अवयवांची हानि होणें, तसेंच रेच किंवा वांति होणें, अथवा रेचक किंवा वांति होण्याचें औषध घेणें, दक्षिण दिशेस सन्मुख गमन करणें, तसेंच रोगानें अतिपीडित होणें, तशींच फळें व पुष्पें यांचा नाश होणें, याच प्रमाणें घरें पडणें, किंवा त्यांत सडा संमार्जन होणें, तसेच पिशाच, राक्षस, किंवा गीध आदिकरून मांस भक्षक पक्षी, वानर, आस्वल व मनुष्य यांशीं क्रीडा घडणें, अथवा यानीं क्रीडा करणें, शत्रूपासून पराजय किंवा दुःख प्राप्त होणें, काषाय (आरक्त वर्ण) वस्त्रांचें परिधान करणें, तशीच स्त्रियांशीं संभोगादिक क्रीडा करणें, अथवा स्त्रियांचीच परस्परें क्रीडा होणें, तसेच घृत तैलादिक स्नेह पदार्थांचें प्राशन किंवा त्यानीं स्नान करणें, आणि आरक्त वर्ण पुष्पें व चंदन यांचें धारण करणें हीं अशीं इतर जीं स्वप्नें तीं सर्व दुःस्वप्नें जाणावीं.

एषांसंकथनंधन्यंभूयःप्रस्वापनंतथा ॥१५॥ कल्कस्नानंतिलैर्होमोब्राह्मणानांचपूजनम् ॥ स्तुतिश्चवासुदेवस्यतथातस्यैवपूजनम् ॥१६॥ नागेंद्रमोक्षश्रवणंज्ञेयं दुःस्वप्ननाशनम् ॥

अर्थ:- अशीं हीं दुःस्वप्नें अवलोकन केलीं असतां तत्सूचित अनिष्ट परिहारार्थ तीं स्वप्नें सत्पुरुषां समीप उत्तम रीतीनें कथन केलीं असतां त्याचा परिहार होतो, अथवा त्या स्वप्नावर पुनः निद्रा केली तर तें दुःस्वप्न निष्फल होतें, किंवा दुसरे दिवशीं प्रातःकाळीं तिळ व आमलक (आंवळकठी) यांचा कल्क (चटणी सारखा बारीक वाटलेला पदार्थ) अंगास लावून स्नान करून तिळ होम व ब्राम्हण पूजन करावें, आणि वासुदेवाची स्तुति करून त्याचीच पूजा करावी, व भारत किंवा भागवत यांतील गजेंद्रमोक्ष श्रवण करावा तेणें करून त्या दुःस्वप्नसूचित अरिष्टाचें निवारण होतें. असें जाणावें.

स्वप्नास्तुप्रथमेयामेसंवत्सरविपाकिनः ॥१७॥ षड्भिर्मासैर्द्वितीयेतुत्रिभिर्मासैस्तृतीयके ॥ चतुर्थेमासमात्रेणपश्यतोनात्रसंशयः ॥१८॥ अरुणोदयवेलायांदशाहेनफलंभवेत् ॥

अर्थ:- तशींच रात्रीच्या प्रथम प्रहरांतील स्वप्नें एक वर्षानें फलद्रूप होतात, द्वितीय प्रहरांतील स्वप्नें सहा महिन्यानीं फलास येतात, तृतीय प्रहरांत पडलेलीं स्वप्नें तीन महि-

त्यांनीं पश्चिमाकडेस येतात, आणि चतुर्थ प्रहरांतील स्वप्नें एक मासांतच फलद्रूप होतात, व अरुणोदयकालच्या स्वप्नाचें फल दहा दिवसांनीं प्राप्त होतें यांत संशय नाहीं.

एकस्यांयदिवारात्रौशुभंवायदिवाशुभम् ॥१९॥ पश्चा
द्दृष्टस्तुयस्तत्रतस्यपाकंविनिर्दिशेत् ॥ तस्माच्छोभनके
स्वप्नेपश्चात्स्वप्नोनपश्यति ॥२०॥

अर्थ- तसेंच एकाच रात्रीं जर शुभ किंवा अशुभ अशीं स्वप्नें अवलोकन केलीं तर त्या दोन्ही प्रकारचे स्वप्नांत जें पश्चात् पडलें असेल त्याचें फल होईल असें जाणावें, यास्तव शुभकारक स्वप्न पडल्या नंतर ज्ञाता मनुष्य इतर स्वप्न अवलोकन करीत नाहीं, म्हणजे तो पुनः निद्रा घेत नाहीं.

शैलप्रासादनागाश्ववृषभारोहणंहितम् ॥ द्रुमाणांश्वे
तपुष्पाणांगमनेचतथाद्विज ॥२१॥ द्रुमतृणोद्भवोनाभौ
तथैवबहुबाहुता ॥ तथैवबहुशीर्षत्वंफलितोद्भवएवच ॥
२२॥ सुशुक्लमाल्यधारित्वंसुशुक्लांबरधारिता ॥ चंद्रा
र्कताराग्रहणंपरिमार्जनमेवच ॥२३॥ शक्रध्वजालिंग
नंचतदुच्छ्रायक्रियातथा ॥ भूम्यंबुधीनांग्रसनंशत्रूणां
चवधक्रिया ॥२४॥ जयोविवादेद्यूतेचसंग्रामेचतथा-
द्विज ॥ भक्षणंचार्द्रमांसानांमत्स्यानांपायसस्यच ॥२५
॥ दर्शनंरुधिरस्यापिस्नानंवारुधिरेणच ॥ सुरारुधिर
मद्यानांपानंक्षीरस्यचाथवा ॥२६॥ अंत्रैर्वाविष्टनंभूमौ
निर्मलंगगनंतथा ॥ मुखेनदोहनंशस्तंमहिषीणांतथा
गवां ॥२७॥ सिंहीनांहस्तिनीनांचवडवानांतथैवच ॥ प्र
सादोदेवविप्रेभ्योगुरुभ्यश्चतथाशुभः ॥२८॥

अर्थ- हे ब्रम्हनिष्ठ शौनका, पर्वत, देव किंवा राजे यांचीं मंदिरें, गज, अश्व व वृषभ (बैल) यांवर स्वप्नांत आरोहण करणें हें हितकारक आहे, त्याच प्रमाणें शुभ्र पुष्पयुक्त वृक्षांकडे गमन करणें, नाभीवर वृक्ष किंवा तृण यांची उत्पत्ति होणें, तसेंच बहुतबाहु व मस्तकें अथवा फलयुक्त वृक्षादिकांची उत्पत्ति होणें, आणि उत्तम शुभ्र पुष्पमाला किंवा तशींच वस्त्रें परिधान करणें, चंद्र, सूर्य व नक्षत्रें यांस ग्रहण करणें, अथवा त्यां-

चीं मंडलें स्वच्छ दृष्टीस पडणें, शक्रध्वजास (गुढी) आलिंगन करणें, किंवा उभारणें, भूमि व समुद्र यां संबंधि मृत्तिका किंवा उदक यांचें भक्षण करणें, शत्रूचा वध करणें, तसेंच हे शौनक ब्राम्हणा, कांहीं वाद, द्यूत व संग्राम यांत जय प्राप्ति होणें, आर्द्र (ओलीं मांसें) मत्स्य व पायस (दुधाचीखीर) यांचें भक्षण, रक्तचें अवलोकन किंवा त्यानें स्नान करणें, अथवा सुरा, रक्त, मद्य, दुग्ध किंवा उदक यांचें प्राशन, अंतड्यांच्या गुंडाळ्या इतस्ततः पडणें, तसेंच आकाश निरभ्र दृष्टीस पडणें, तशाच महिषी, (म्हशी) गायी, सिंहिणी, हस्तिनी व वडवा (घोडी) यांचें दुग्ध मुखानें वांसरां सारखें पिणें आणि देव, ब्राम्हण व माता पितरादिक गुरु यां पासून प्रसाद प्राप्ति होणें, हे असे प्रकार स्वप्नांत पडले असतां ते शुभकारक जाणावे.

अंभसात्वभिषेकस्तुगवांशृंगाश्रितेनवा ॥ चंद्राद्भ्रष्टेन वाराजन्ज्ञेयोराज्यप्रदोहिसः ॥२९॥

अर्थ- हे राजन्, स्वप्नांत गायीच्या शिंगांतील उदक किंवा चंद्र मंडला पासून निघालेलें जल यांचा अभिषेक मस्तकावर झाला असतां, तो राज्य फल दायक जाणावा.

राज्याभिषेकश्चतथाच्छेदनंशिरसस्तथा ॥ मरणंवन्हि दाहश्चवन्हिदाहोगृहादिषु ॥३०॥ लब्धिश्चराज्यलिंगानांतंत्रीवाद्याभिवादनम् ॥ तथोदकानांतरणंतथावि षमलंघनम् ॥३१॥ हस्तिनीवडवानांचगवांचप्रसवो गृहे ॥आरोहणमथाश्वानांरोदनंचतथाशुभम् ॥३२॥

अर्थ- त्याच प्रमाणें राज्याभिषेक होणें, शिरच्छेद होणें, मरण, अग्नीनें शरीर किंवा गृहादिक वस्तु यांचा दग्ध होणें, छत्र, चामरादिक राज्य चिन्हांचा लाभ होणें, वीणा-आदि करून तंतु वाद्यें वाजणें, तसेंच उदकांत तरणें, विषम स्थानांचें (दुर्गम स्थल) उल्लंघन होणें, हस्तिनी, वडवा, (घोडी) व गायी त्या गृहांत प्रसूत होणें, अश्वांवर आरोहण करणें व रुदन करणें हे स्वप्नांतील सर्व प्रकार शुभकारक समजावे.

वरस्त्रीणांतथालाभस्तथालिंगनमेवच ॥ निगडैर्बंधनं धन्यंतथाविष्ठानुलेपनम् ॥३३॥

अर्थ- तसाच सुंदर स्त्रियांचा लाभ, अथवा आलिंगन घडणें, आणि शृंखला बंधन किंवा विष्ठालेपन होणें, हे ही स्वप्नांतील प्रकार शुभ आहेत.

जीवितांभूमिपालानांसुहृदामपिदर्शनम् ॥ दर्शनंदे-

वतानांचविमलानांतथांभसाम् ॥३४॥

अर्थ- तसेच जिवंत राजे, मित्र, देवता व स्वच्छ उदकें यांचें दर्शन झालें असतां, तें उत्तम जाणावें.

शुभान्यथैतानिनरस्तुदृष्ट्वाप्राप्नोत्ययत्नाद्ध्रुवमर्थलाभम् ॥ स्वप्नानिचैधर्मभृतांवरिष्ठव्याधेर्विमोक्षंचतथातुरोपि ॥३५॥

अर्थ- तें असें कीं, तीं राजादिकांचीं शुभकारक दर्शनें स्वप्नांत अवलोकन केलीं असतां तेणें करून मनुष्यास प्रयत्नावांचून द्रव्य लाभ होतो, आणि हे धार्मिकश्रेष्ठ मनुराजा, हीं उत्तम स्वप्नें अवलोकनांत आलीं तर त्या योगानें रोगग्रस्त झालेला मानव त्या व्याधींतून शीघ्र मुक्त होतो. इतिश्री मत्स्यपुराणे स्वप्नाध्यायो नामद्विचत्वारिंशदुत्तर द्विशततमोऽध्यायः २४२

अध्याय २४३ वा.

मनुरुवाच ॥ गमनंप्रतिराज्ञांतुसंमुखादर्शनेचकिम् ॥ प्रशस्तांश्चैवसंभाष्यसर्वानेतान्प्रकीर्तय ॥१॥

अर्थ- पुनः वैवस्वत मनु प्रश्न करतो. हे भगवन्, राजास बाहेर गमन करणें किंवा राजांकडे इतर लोकांस जाणें या प्रसंगीं सन्मुख दर्शना विषयीं अयोग्य कायतें प्रथमतः सांगून पश्चात् शकुनास योग्य कोण हें सर्व मला कथन करा!

मत्स्यउवाच ॥ औषधानित्वयुक्तानिधान्यंकृष्णंतथाभवेत् ॥ कार्पासश्चतृणंराजन्शुष्कंगोमयमेवच ॥२॥ इंधनंचतथांगारंगुडंतैलंतथाशुभम् ॥

अर्थ- तेव्हां मत्स्यरूपी विष्णु ह्मणतात. हे राजन्, रेचकादिक अयोग्य औषधें, माष, (उडीद) आदिकरून कृष्ण वर्ण धान्यें, कापुस, तृण, (गवत) शुष्क गोमय, (गोंवऱ्या) काष्ठें, सधूम अग्नि, गूळ व तेल हे पदार्थ शकुना विषयीं अशुभ आहेत.

अभ्यक्तंमलिनंमुंडंतथानग्नंचमानवम् ॥३॥ मुक्तकेशंरुजार्तंचकाषायांबरधारिणम् ॥ उन्मत्तकंतथासत्वंदीनंचाथनपुंसकम् ॥४॥ अयःपंकस्तथाचर्मकेशबंधनमेवच ॥ तथैवोद्धृतसाराणिपिण्याकादीनियानिच ॥५॥ चंडालश्वपचाश्चैवराजबंधनपालकाः ॥

वधकाःपापकर्माणोगर्भिणीस्त्रीतथैवच ॥६॥ तुष भस्मकपालास्थिभिन्नभांडानियानिच ॥ रक्तानिचे वर्मांडानिमृतंशार्ङ्गिकमेवच ॥ ७॥ एवमादीनिचान्यानिअशस्तान्यभिदर्शने ॥

अर्थः- तसाच अभ्यंग केलेला, अथवा मलिन किंवा मुंड, (गोसावी आदि करून मुंडलेला) किंवा नग्न असा मनुष्य, केश मोकळे सोडलेला, रोगानें पीडित, काषाय, (आरक्त वर्ण) वस्त्र धारण केलेला, उन्मत्त, दीन व नपुंसक असा प्राणी, तसेंच लोखंड, चिखल, चर्म (कातडें), केसारीच्या दोऱ्या, तशींच जीं आंतील सारभूत-अंश काढून घेतलेली तिळांची पेंड आदिकरून द्रव्यें, चंडाळ, श्वपच, (नीचपुरुष) शत्रु बंदिशाळेवरील रक्षण करणारे राजदूत, तसेच प्राणि हिंसा करणारे, इतर पापकर्में करणारे, गर्भिणी स्त्री तुष, (फोल) भस्म, कपाल, अस्थि, फुटकीं भांडीं रंगविलेली मडकीं, रुदन सहित शव, (प्रेत) शिंगाचे केलेले मूठ आदिकरून पदार्थ इत्यादिक अशा ज्या इतर वस्तु त्या सर्वही गमन कालीं शकुन ग्रहण करण्या विषयीं वर्ज्य आहेत.

अशस्तोवाद्यशब्दश्चभिन्नभैरवजर्जरः ॥८॥ पुरतः शब्दएहीतिशस्यतेनतुपृष्ठतः ॥

अर्थः- त्याच प्रमाणें प्रेत संबंधि जो फुटक्या वाद्याच्या शब्दा सारखा असून भयंकर जर्जर (ग्लानि युक्त) रुदन शब्द, तो प्रयाण कालीं श्रवणांत आला असतां अशुभ जाणावा. आणि गमन करणारांचे अग्रभागीं ये, असा शब्द जाहला तर तो शुभकारक जाणावा. व ये, हा शब्द त्याचे पृष्ठ भागीं झाला असतां, अशुभ समजावा.

गच्छेतिपश्चात्धर्मज्ञपुरस्तात्तुविगर्हितः ॥९॥ क्वयासितिष्ठमागच्छकिंतेतत्रगतस्यतु ॥ अन्येशब्दाश्चयेनिष्टास्तेविपत्तिकराअपि ॥१०॥

अर्थः- हे धर्मज्ञा, तसाच गमन कालीं त्याच्या पृष्ठ भागीं जा, असा शब्द झाला तर तो, उत्तम आहे. व तोच शब्द अग्रभागीं झाला असतां, अति निंद्य जाणावा. तसेंच कोठें गमन करतोस, उभा राहा, जाऊं नको, तेथें जाण्यांत काय तुझें कार्य आहे, अशा रीतीचे जे अनिष्ट इतर शब्द आहेत, ते सर्वही विपत्तिकारक होतात.

ध्वजादिषु तथास्थानं क्रव्यादानां विगर्हितम् ॥ स्खलनं वाहनानां च वस्त्रसंगस्तथैव च ॥ ११ ॥ निर्गतस्य तु द्वारादौ शिरसश्चाभिघातिता ॥ छत्रध्वजानां वस्त्राणां पतनं च तथाशुभम् ॥ १२ ॥

अर्थ:- आणि प्रयाण समयीं ध्वज वाहनें इत्यादिकांवर गीध आदिकरून मांस भक्षक पक्षी बसणें शकुन प्रकरणीं अति निंद्य आहे. तसेंच वाहनांचें स्खलन होणें, अंगावरील वस्त्र कोठें अडकणें, गमन कालीं घरांतून बाहेर निघते वेळेस द्वारा दिकस्थानीं मस्तकास लागणें, प्रयाण कालीं छत्र, ध्वज व वस्त्रें यांचें पतन, हीं सर्व अशुभच आहेत.

दृष्टे निमित्ते प्रथमममंगल्यविनाशनम् ॥ केशवं पूजयेद्विद्वान्स्तवेन मधुसूदनम् ॥ १३ ॥

अर्थ:- अशा या अपशकुन प्रकरणांतील दुश्चिन्हें, प्रयाण कालीं प्रथमतः अवलोकनांत आलें असतां, ज्ञात्यानें अशुभ विनाशक असून मधुदैत्य संहारक अशा महाविष्णूची स्तुतीनें पूजा करावी.

द्वितीये तु ततो दृष्टे प्रतीपे प्रविशेद्गृहम् ॥ अथेष्टानि प्रवक्ष्यामि मंगल्यानि तथानघ ॥ १४ ॥

अर्थ:- आणि पुनः तसा द्वितीय अपशकुन, गमन समयीं झाला असतां, प्रयाण न करतां गृहांत प्रवेश करावा. हे निष्पापा, यानंतर शुभकारक उत्तम शकुन तुला कथन करतों.

श्वेताः सुमनसः श्रेष्ठाः पूर्णकुंभास्तथैव च ॥ जलजाः पक्षिणश्चैव मांसं मत्स्याश्च पार्थिव ॥ १५ ॥

अर्थ:- ते असे कीं, हे राजेंद्रा, शुभ्र पुष्पें किंवा तसे गहूं, जलपूर्ण कुंभ, उदकांत उत्पन्न झालेले पक्षी, मांस व मत्स्य हे प्रयाण कालीं शकुनास उत्तम आहेत.

गावस्तुरंगमा नागा बद्ध एकः पशुस्त्वजः ॥ त्रिदशाः सुहृदो विप्रा ज्वलितश्च हुताशनः ॥ १६ ॥ गणिकाश्च महाभाग दूर्वा चार्द्रं च गोमयम् ॥ रुक्मं रूप्यं तथा ताम्रं सर्वरत्नानि चाप्यथ ॥ १७ ॥ औषधानि च धर्मज्ञ यवाः सिद्धार्थका स्तथा ॥ नृवाह्यमानं यानं च भद्रपीठं तथैव च ॥ १८ ॥ ख

ड्गंछत्रंपताकाचमृदश्चायुधमेवच ॥ राजलिंगानि सर्वाणिसर्वेरुदितवर्जिताः ॥ १९ ॥ घृतंदधिपयश्चैव फलानिविविधानिच ॥ स्वस्तिकंवर्धमानंचनंद्यावर्तंस कौस्तुभम् ॥ २० ॥ वादित्राणांसुखःशब्दः गंभीरःसुम नोहरः ॥ गांधारषड्जऋषभायेचशस्तास्तथास्वराः ॥ २१ ॥

अर्थ:- हे महाभाग्यशालिन् धर्मज्ञा, तसाच गायी किंवा वृषभ, अश्व, गज, अथवा प्रसिद्ध नाग, एकाकी ही ज्ञाननिष्ठ, अज, (बोकड) देव, मित्र किंवा उत्तम अंतःकरणाचे सत्पुरुष, अनेक ब्राम्हण, निर्धूम प्रदीप्त अग्नि, वेश्या, दूर्वा, आर्द्र, (ओलें) गोमय (गायीचें शेण) सुवर्ण, रौप्य, ताम्र, (तांबें) सर्व रत्नें, अभ्रकादिक उत्तम औषधें, यव, (सातु) मोहोंऱ्या, मनुष्यानीं नेण्याचें पालखी आदि करून वाहन, भद्रपीठ,* खड्ग, छत्र, पताका, मृत्तिका, कोणतेंही इतर आयुध, छत्र चामरादिक सर्व राजचिन्हें, रुदन रहित सर्व जन, घृत, दधि, दुग्ध, अनेक जातीचीं फळें, स्वस्तिक, वर्धमान, (यज्ञांतील पुरोडाश करण्याचा परळ) नंद्यावर्त, (तगरीचें पुष्प) कौस्तुभाकृति भूषण, मंगलवाद्यांचा अति मधुर गंभीर सुखकारक शब्द, तसेच गांधार, षड्ज व ऋषभ इत्यादिक जे गायनांतील उत्तम स्वर हे सर्वही शकुन शुभकारक जाणावे

वायुःसशर्करोरुक्षःसर्वत्रसमुपस्थितः ॥ प्रतिलोमस्त थानीचोविज्ञेयोभयकृद्विज ॥ २२ ॥

अर्थ:- हे शौनक ब्राम्हणा, प्रयाण समयीं वायु रुक्ष व वाळू सहित सुटला असून सर्वत्र अतिशयें वाहात आहे, किंवा स्वकीय पृष्ठ भागाकडून वाहात आहे तर, तो अधम वायु भयदायक होईल असें समजावें.

अनुकूलोमृदुःस्निग्धःसुखस्पर्शःसुखावहः ॥ रुक्षारु क्षस्वराभद्राःक्रव्यादाःपरिगच्छताम् ॥ २३ ॥ मेघाःश स्ताघनाःस्निग्धागजबृंहितसन्निभाः ॥ अनुलोमास्त डित्वन्तःशक्रचापंतथैवच ॥ २४ ॥

अर्थ:- तसाच आपल्या पृष्ठ भागानें वाहणारा असून मंद (शीतल) व स्निग्ध अ-

---

* सुवर्ण, रौप्य, ताम्र किंवा औदुंबर वृक्ष, यांचें केलेलें दीड हात उंचीचें आसन.

सल्यामुळें सुखकारक स्पर्शानें सुखावह असा वायु, आकृतीनें शुष्क असून रुक्ष स्वर युक्त क्रव्याद, (मांस भक्षक पशु) आणि गजा सारखी गर्जना करणारे असून विद्युलतेनें व्याप्त व दाट असे आपल्ले मागून येणारे सजल मेघ व तसें इंद्र धनुष्य हें सर्व प्रकार गमन करणारास प्रयाणकाळीं शुभकारक आहेत.

अप्रशस्तेतथाज्ञेयेपरिवेषप्रवर्षणे ॥ अनुलोमाग्रहाः शस्तावाक्पतिस्तुविशेषतः ॥२५॥

अर्थ- त्याच प्रमाणें चंद्र सूर्यांचीं खळीं व अतिवृष्टि हीं गमना विषयीं वर्ज्य आहेत, आणि सर्व ग्रह आपल्ये प्रयाण दिशेस गमन करणारे व विशेषें करून तसा चालणारा बृहस्पति हे सर्व गमन करणारास हितकारक होतात.

आस्तिक्यंश्रद्दधानत्वंतथापूज्याभिपूजनम् ॥ शस्तान्येतानिधर्मज्ञयच्चस्यान्मनसःप्रियम् ॥२६॥

अर्थ- हे धर्मज्ञा, आस्तिक्य युक्त बुद्धि, श्रेष्ठांच्या वाक्यावर विश्वास, तसेंच पूज्य लोकांचा सत्कार करणें, व अपशकुनांतलें नसून चित्त प्रिय वस्तु सन्मुख येणें, हे सर्व प्रकार, प्रयाणकाळीं घडले असतां, ते त्यास शुभकारक समजावे.

मनसस्तुष्टिरेवात्रपरमंजयलक्षणम् ॥ एकतःसर्वलिंगानिमनसस्तुष्टिरेकतः ॥२७॥

अर्थ- तसाच प्रयाणकाळीं मनांत उत्साह उत्पन्न होणें हें जय प्राप्तीचें सूचक मुख्य लक्षण जाणावें, कारण कार्यसिद्धीचीं सर्व उत्तम लक्षणें एकीकडे व मनोत्साह हें चिन्ह एकीकडे आहे.

मनोत्सुकत्वंमनसःप्रहर्षःशुभस्यलाभोविजयप्रवादः ॥ मंगल्यलब्धिःश्रवणंचराजन्ज्ञेयानिनित्यंविजयावहानि ॥२८॥

अर्थ- हे राजन्, आणि मनास सर्व कार्या विषयीं उल्हास व अति हर्ष असणें, शुभकारक वस्तूचा लाभ होणें, सर्वत्र विजय वाक्यांचा घोष होणें, मंगलदायक पदार्थांची प्राप्ति होणें, व शुभसूचक भाषणांचें श्रवण होणें, हीं सर्व लक्षणें निरंतर विजय प्राप्तिकारक जाणावीं. इतिश्री मत्स्यपुराणें यात्रानिमित्ते मंगलाध्याये त्रिचत्वारिंश दुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥२४३॥

ऋषयऊचुः॥ राजधर्मस्त्वयासूतकथितोविस्तरेण
तु॥ तथैवाद्भुतमंगल्यंस्वप्नदर्शनमेवच॥१॥

अर्थ:- शौनकादिक ऋषि प्रश्न करतात. हे सूता, आपण विस्तरानें राजधर्म, तसेच उत्पात, शकुन आणि स्वप्न यांचें अवलोकन हा सर्व विषय कथन केला.

विष्णोरिदानींमाहात्म्यंपुनर्वक्तुमिहार्हसि॥ कथंस
वामनोभूत्वाबबंधबलिदानवम्॥२॥ क्रमतःकीदृ-
शंरूपमासीलोकत्रयेहरेः॥

अर्थ:- या कालीं विष्णूचें माहात्म्य तुम्ही पुनः सांगण्यास योग्य आहां! तें असें कीं, त्या विष्णूनीं या भूलोकीं वामनावतार ग्रहण करून बलि नामक दानवास कोणत्या रीतीनें बांधलें, आणि विष्णूचें वामन रूप पूर्वी अति लघु असून पश्चात् तें त्रैलोक्यांत व्याप्त झालेलें रूप तें पादादिक अवयव क्रमानें कसें होतें.

सूतउवाच॥ एतदेवपुरापृष्टः कुरुक्षेत्रेतपोधनाः॥३॥
शौनकस्तीर्थयात्रायांवामनायतनेपुरा॥ यदासमय
भेदित्वंद्रौपद्याःपार्थिवंमति॥४॥ अर्जुनेनकृतंतत्र
तीर्थयात्रांतदाययौ॥

अर्थ:- ते समयीं सूत बोलले कीं, तपच स्वकीय धन मानणारे ऋषी हो, पूर्वी पांडव वनवासांत असतां ज्या कालीं अर्जुनानें ब्राम्हणांच्या नेलेल्या अरणी (यज्ञपात्रें) आणण्या साठीं द्रौपदी संबंधि नियमित दिवसांचे संकेतांत धर्मराजाशीं समयबंधाचें उल्लंघन केलें. त्या कालीं तन्निमित्त पूर्व निबंधा प्रमाणें अर्जुन तीर्थयात्रेस गेला. तेव्हां त्या तीर्थयात्रा प्रसंगीं कुरुक्षेत्रांत वामनाश्रमीं अर्जुन जाऊन, त्यानें हाच प्रश्न शौनकास केला.

धर्मक्षेत्रेकुरुक्षेत्रेवामनायतनेस्थितः॥५॥ दृष्ट्वासवा
मनंतत्रअर्जुनोवाक्यमब्रवीत्॥

अर्थ:- तो असा कीं, धर्मभूमिरूप कुरुक्षेत्रांतील वामनाश्रमांत विराजमान वामन मूर्तीस अर्जुनानें अवलोकन करून, तो शौनक मुनीस प्रश्न करतो.

अर्जुनउवाच॥ किन्निमित्तमयंदेवोवामनाकृतिरि
ज्यते॥६॥ वराहरूपीभगवान्कस्मात्पूज्योभवत्पु
रा॥ कस्माच्चवामनस्येदमिष्टंक्षेत्रमजायत॥७॥

अर्थ- कीं, हे शौनकमुने, लोक या वामनरूपी देवाची किन्निमित्त पूजा करतात, तसाच पूर्वी वराहरूपधारी देव कोणत्या कारणानें लोकांत पूज्य झाला, आणि हें कुरुक्षेत्र वामनास काय कारणानें प्रिय झालें.

शौनकउवाच ॥ वामनस्यचवक्ष्यामिवराहस्यचधी
मतः ॥ पुरानिवारितेशक्रेसुरेषुविजितेषुच ॥ ८ ॥
चिंतयामासदेवानांजननीपुनरुद्भवम् ॥

अर्थ- त्या काळीं शौनक म्हणतात. हे अर्जुना, वामन व महाबुद्धिमान् वराह, यांचें माहात्म्य मी तुला कथन करतों. तें असें कीं, पूर्वी दैत्यानीं युद्धांत इंद्रानें निवारण करून सर्व देवांस पराजित केलें असतां, त्या इंद्रादि देवांची जननी (माता) अदिति, आपले पुत्रांस पुनः स्वकीय ऐश्वर्य प्राप्त्यर्थ उपाय चिंतन करूं लागली.

अदितिर्देवमाताचपरमंदुश्चरंतपः ॥ ९ ॥ तीव्रंचचार
वर्षाणांसहस्रंपृथिवीपते ॥ आराधनायकृष्णस्य
वाताहाराल्पभोजना ॥ १० ॥

अर्थ- हे पृथ्वीपालका अर्जुना, नंतर ती देवमाता अदिति, एक सहस्र वर्षे पर्यंत श्रीकृष्णाच्या आराधनार्थ निरशनपूर्वक वायु भक्षण करून परम दुष्कर तीव्र तप करीत होती.

दैत्यैर्निराकृतान्दृष्ट्वातनयान्कुरुनंदन ॥ वृथापुत्रा
हमस्मीतिनिर्वेदात्प्रणताहरिम् ॥ ११ ॥

अर्थ- कारण हे कुरुकुलानंददायक अर्जुना, अदितीनें स्वकीयपुत्रांस आपल्या राज्यावरून दैत्यानीं पदच्युत केलें असें अवलोकन करून ती देवमाता मनांत खिन्न झाली कीं, मी पुत्रवती असून व्यर्थ आहें, असें मानूनती अनिनम्रतेनें भक्तसंकट हरण करणाऱ्या महाविष्णूस शरण गेली.

तुष्टाववाग्भिरिष्टाभिःपरमार्थनिबोधने ॥ देवदेवं
हृषीकेशंनत्वासर्वगतंहरिम् ॥ १२ ॥

अर्थ- आणि ती अदिति, मुख्य परमार्थाच्या उत्कृष्ट बोधाविषयीं साधक वाक्यानीं सर्वव्यापक हरीस नमस्कार करून ब्रह्मादि संपूर्ण चराचर विश्वाच्या सकल इंद्रियांचे पालक रूप त्या देवाधिदेवाची स्तुति करूं लागली.

अदितिरुवाच ॥ नमःस्मृतार्तिनाशायनमःपुष्करमालिने ॥ नमःपरमकल्याणकल्याणायादिवेधसे ॥१३॥

अर्थः- ती अशी कीं, हे भगवन्, आपण सर्व ब्रम्हादिक चराचर जगाची उत्पत्ति करणारे असल्यामुळें परमकल्याणरूपास (मुक्त) ही परम सुख देणारे असून गजेंद्रादिक स्वभक्तांची पीडा स्मरणमात्रानें दूर करणारे आहां, आणि तुमचे कंठांतील कमळमाळा कदापि म्लान न होतां निरंतर नूतन व रमणीय दिसते, तस्मात् तुम्हा जगदीश्वरास मी वारंवार नमस्कार करितें.

नमः पंकजनेत्रायनमःपंकजनाभये ॥ श्रियःकांताय दांतायदांतदृश्यायचक्रिणे ॥१४॥

अर्थः- हे नारायणा, तुमचे नेत्र कमळा सारखे अति रमणीय असून, तुमच्या नाभिस्थानीं चतुर्दशलोकरूप कमळ उत्पन्न झालें आहे, आणि आपण साक्षात् लक्ष्मीकांत व दांत (अनादि स्वभावसिद्ध स्वाधीन सर्वेंद्रियानीं युक्त) असल्यामुळें, इंद्रिय निग्रह युक्त योगिजनांस दर्शन देणारे असून, आपल्या हस्त कमळांत सुदर्शनचक्र शोभत आहे, तस्मात् तुम्हास माझें वारंवार नमस्कार असोत.

नमः पंकजसंभूतिसंभवायात्मयोनये ॥ नमःशंखासिहस्तायनमःकनकरेतसे ॥१५॥

अर्थः- तसेच तुम्ही स्वयंभू असून, आपल्या नाभिकमला पासून, चतुर्दश लोकरूप कमल उत्पन्न करून, त्यांत सर्व जीवांस स्थूलदेहसंबंधद्वारा उत्पन्न केलें आहे, आणि तुमच्या करारविंदांत शंख व नंदकनामा श्रेष्ठ खड्ग हे शोभत असून, तुमचें वीर्य लोकांत सुवर्णरूपानें प्रसिद्ध आहे, तस्मात् हे देवा, मी तुम्हांस पुनःपुनः नमस्कार करितें.

तथात्मज्ञातविज्ञातयोगिचिंत्यात्मयोगिने ॥ निर्गुणायाविशेषायहरयेब्रह्मरूपिणे ॥१६॥ जगत्प्रतिष्ठितंयत्रजगतायोनदृश्यते ॥ नमःस्थूलातिसूक्ष्मायतस्मैदेवायशांखिने ॥१७॥

अर्थः- त्याच प्रमाणें आत्मज्ञानानें अपरोक्षज्ञानसंपन्न जीवन्मुक्त योगिजनानींच तुमचा आत्मयोग चिंतन करण्यास योग्य असून, तुम्ही निर्गुण

असल्यामुळें तुमच्या स्वरूपीं महत्तत्वादिकांचा विकार संबंध सर्वथा नाहीं, असे आपण भक्त दुःख हरण करणारे पूर्णब्रम्हस्वरूपी आहां, यास्तव सर्व चराचर जग तुमच्या स्वरूपाचे आश्रयानें वर्तत असून, आपण त्या जगास दृष्टिगोचर होत नाहीं, यावरून तुम्ही नाहीं असें नाहीं, तर आपण सर्वापेक्षां महान् असून, अतिसूक्ष्महीं आहां। आणि हस्तकमलांत शंख धारण करून, स्वेच्छानुसार ध्रुवादिकांस ज्ञानदानादिक अश्या अनेक अनेकलीला करतां, तस्मात् तुम्हांस माझे वारंवार नमस्कार असोत.

यन्नपश्यंतिपश्यंतोजगदप्यखिलंनराः॥ अपश्य
द्भिर्जगद्यत्रसदेवोत्हृदिसंस्थितः॥१८॥ यस्मिन्नन्नं
पयश्चैवनद्यश्चैवाखिलंजगत्॥ तस्मैसमस्तजगता
माधारायनमोनमः॥१९॥

अर्थ- तसेच हे मानव, संपूर्ण जगास अवलोकन करीत असूनही, ज्या परमेश्वरास जाणत नाहींत, तो देव, त्या अज्ञानिजनांसहित या जगांत त्या प्रत्येक प्राण्याचा हृदयांत स्वतः अलिप्त स्थितीनें आहे; आणि अन्न, उदक, नद्या व संपूर्ण चरचर जग हें ज्याच्या आश्रयानें आहे, त्या समस्त जगाचे आधारभूत परमेश्वरास मी वारंवार नमस्कार करितों.

आद्यःप्रजापतिपतिःयःप्रभूणांपतिःपरः॥ पतिः
सुराणांयस्तस्मैनमःकृष्णायवेधसे॥२०॥

अर्थ- तसाच जो सर्वांत आद्य असून, दक्षादिक प्रजापति, स्वायंभुव मनुप्रभृति सर्व राजे व ब्रम्हादिक सकल देव यांस उत्पन्न करून, उत्तम रीतीनें पालन करणारा, अशा श्रीकृष्णास माझा नमस्कार असो.

यःप्रवृत्तेंनिवृत्तौचइज्यतेकर्मभिःस्वकैः॥ स्वर्गाप
वर्गफलदंनमस्तस्मैगदाभृते॥२१॥

अर्थ- तसेच प्रमाणें प्रवृत्ति मार्ग व निवृत्ति मार्ग यांस अनुसरून वर्तणारे संपूर्ण वर्ण व आश्रम यांतील लोक, स्वकीय सर्व कर्मांनीं ज्या परमेश्वराची पूजा करीत असून, जो त्या सर्व उपासकांस स्वर्ग व मोक्ष हीं फलें देतो, त्या गदाधर भगवंतास मी नमस्कार करितों.

यःश्चिंत्यमानोमनसासद्यःपापंव्यपोहति॥ नमस्त

तस्मैविशुद्धायपरायहरिवेधसे ॥२२॥

अर्थ:- आणि मनानें चिंतन करणारांचें पाप जो तत्काळ दूर करतो, त्या मायातीत अतिशुद्ध स्वरूपी हरिनामक जगदीश्वरास माझा नमस्कार असो.

यंबुध्वासर्वभूतानिदेवदेवेशमव्ययम् ॥ नपुनर्जन्ममरणेप्राप्नुवंतिनमामितम् ॥२३॥

अर्थ:- तसेंच ज्या त्रिकालाबाधित देवाधिदेवाचें यथार्थ स्वरूप ज्ञान संपादन केलें असतां, सर्व प्राणिमात्र पुनः जन्म मरण संबंधि क्लेश पावत नाहींत, अशा नारायणास मी नमस्कार करितों.

योयज्ञेयज्ञपरमैरिज्यतेयज्ञसंज्ञितः ॥ तंयज्ञपुरुषंविष्णुंनमामिप्रभुमीश्वरम् ॥२४॥

अर्थ:- तसाच जो यज्ञ नामें प्रसिद्ध असून, सर्व यज्ञतत्पर लोकांनीं स्वकीय यज्ञ कर्मांत मुख्यत्वें करून पूजित आहे, त्या विष्णु नामक यज्ञ पुरुषमूर्ति जगदीश्वर प्रभूस माझे नमस्कार असोत.

गीयतेसर्वदेवेषुवेदविद्भिर्विदांपतिः ॥ यस्तस्मैवेदवेद्यायविष्णवेजिष्णवेनमः ॥२५॥

अर्थ:- आणि सर्व देवांत जो ज्ञानिश्रेष्ठ, असें वेदवेत्ते गायन करीत असून, वेदानींच ज्याचें महात्म्य ज्ञान होतें, अशा त्या नित्य जयशालि विष्णूस मी नमस्कार करितों.

यतोविश्वंसमुत्पन्नंयस्मिंश्चलयमेष्यति ॥ विश्वागमप्रतिष्ठायनमस्तस्मैमहात्मने ॥२६॥

अर्थ:- तसेंच सर्व चराचर विश्व, ज्यापासून उत्पन्न होऊन, प्रळयकाळीं ज्याचे स्वरूपीं लीन होतें, आणि जग व आगम (वेदादिक सर्व शास्त्रें) यांच्या स्थितीचे स्थानभूत, अशा त्या महात्म स्वरूप परमात्म्यास माझे नमस्कार असोत.

ब्रह्मादिस्तंबपर्यंतंयेनविश्वमिदंततम् ॥ मायाजालंसमुत्तर्तुंतमुपेंद्रंनमाम्यहम् ॥२७॥

अर्थ:- त्याच प्रमाणें ज्यानें हें ब्रम्हादि तृण समुदायांत सर्व विश्व सबाह्याभ्यंतरीं व्याप्त केलें आहे, त्या उपेंद्र नामक विष्णूस मी या मायाजालांतून उत्तम

प्रकारें तरून जाण्यासाठीं नमस्कार करीत आहें.

यस्तु तोयस्वरूपस्थो बिभर्त्यखिलमीश्वरः ॥ वि
श्वं विश्वपतिं विष्णुं तं नमामि प्रजापतिम् ॥ २८ ॥

अर्थ:- तसाच जो शुद्ध उदकांत शयन करणारा ईश्वर, या संपूर्ण जगाचें पोषण करतो, त्या विश्वंभर प्रजापालक विश्वरूपी विष्णूस मी नमस्कार करितों.

यमाराध्य विशुद्धेन मनसा कर्मणा गिरा ॥ तरंत्य
विद्यामखिलां तमुपेंद्रं नमाम्यहम् ॥ २९ ॥

अर्थ:- तसेच सर्व मुमुक्षु जन, स्वकीय अतिशुद्ध मन, कर्म व वाणी यानीं ज्याचें आराधन करून, समूल अज्ञानांतून तरतात म्हणजे अज्ञान मूलक संसारांतून (जन्ममरण प्रवाह) मुक्त होतात, त्या इंद्रसहाय रूपी विष्णूस मी, प्रणाम (नमस्कार) करीत आहें.

विषादतोषरोषाद्यैर्योजस्रं सुखदुःखजैः ॥ नृत्यत्य
खिलभूतस्थस्तमुपेंद्रं नमाम्यहम् ॥ ३० ॥

अर्थ:- यद्यपि सुख, दुःखां पासून विषाद (खेद) संतोष व रोष इत्यादिक प्राणिमात्रांस प्राप्त झाले, तथापि या सर्व प्राण्यांच्या हृदयकमलांत असून जो निजानंद तृप्तीनें निरंतर नृत्य करीत असल्यामुळें त्या जीवसंबंधि सुखदुःखादिकानीं लिप्त होत नाही, अशा त्या वामनरूपधारी देवास मी नमस्कार करितों.

मूर्तं तमोसुरमयं तद्वधाद्विनिहंति यः ॥ रात्रिरूपी
सूर्यरूपी तमुपेंद्रं नमाम्यहम् ॥ ३१ ॥

अर्थ:- त्याच प्रमाणें स्वभावसिद्ध तम (अज्ञान) स्वरूपी असुरमय जग व त्या सारखे इतर लोक यांचा संहार करीत असून, जो रात्रि व सूर्य यांच्या रूपानें प्रसिद्ध आहे, त्या इंद्ररक्षक नारायणास मी नमस्कार करीत आहें.

यस्याक्षिणी चंद्रसूर्यौ सर्वलोक शुभाशुभम् ॥ प
श्यतः कर्म सततं तमुपेंद्रं नमाम्यहम् ॥ ३२ ॥

अर्थ:- तसेच चंद्र सूर्य हे ज्या परमात्म्याचे नेत्र असल्यामुळें, निरंतर सर्व लोकांचें शुभाशुभ कर्म अवलोकन करतात, त्यानें इंद्राचे संरक्षणार्थ त्रिविक्रमरूप धारण केलें, त्या दीनवत्सल हरीस मीं नमस्कार करितों.

यस्मिन्सर्वेश्वरेसर्वंसत्यमेतन्मयोदितम् ॥ नानृ
तंतमजंविष्णुंनमामिप्रभवाव्ययम् ॥ ३३ ॥

अर्थ- असें जें मीं ज्या सर्वेश्वरा विषयीं सत्यत्वें करून सर्व वर्णन केलें, तें हें लेशमात्रही अनृत (असत्य) नाहीं, अशा त्या स्वयंभूरूप विष्णूस नमस्कार करित्यें, कारण तो देव सर्वथा त्रिकालाबाधित स्वरूपी असून, सर्व ब्रम्हादिकांच्या उत्पत्ति आदि करून संपूर्ण ऐश्वर्य इन्द्रीस कारण आहे

यच्चैतत्सत्यमुक्तंमेभूयांश्चातोजनार्दनः ॥ सत्ये
नतेनसकलाःपूर्यंतांमेमनोरथाः ॥ ३४ ॥

अर्थ- तसेंच हें मीं जें सत्यत्वानें स्तवन केलें यापेक्षांही तो दीन जनानीं प्रार्थनीय नारायण, भक्तवात्सल्यादिक अनंत गुणानीं पूर्ण आहे, तस्मात् यास त्यानें सर्व माझे मनोरथ परिपूर्ण होवोत.

शौनकउवाच ॥ एवंस्तुतःसभगवान्वासुदेवउ
वाचताम् ॥ अदृश्यःसर्वभूतानांतस्याःसंदर्शने
स्थितः ॥ ३५ ॥

अर्थ- शौनक म्हणतात. हे अर्जुना, चराचर विश्वास आश्रय स्वरूपी हरि, सर्व प्राण्यांस अदृश्य असूनही ते भगवान्, त्या कालीं अदितीनें अशी स्तुति केली असतां, तिला उत्तम दर्शन देऊन भाषण करतात.

श्रीभगवानुवाच ॥ मनोरथांस्त्वमदितेयानिच्छ
स्यभिवांछितान् ॥ तांस्त्वंप्राप्स्यसिधर्मज्ञेमत्प्र
सादान्नसंशयः ॥ ३६ ॥

अर्थ- कीं, हे धर्मज्ञे अदिति, तूं ज्या मनःपूर्वक वांछित मनोरथां विषयीं इच्छा करीत आहेस, ते सर्व माझ्या प्रसादानें (प्रसन्नता) तुला प्राप्त होतील.

शृणुष्वत्वमहाभागेवरोयस्तेहृदिस्थितः ॥ तमाशु
व्रियतांकामंश्रेयस्तेसंभविष्यति ॥ मद्दर्शनंहिविफलं
नकदाचिद्भविष्यति ॥ ३७ ॥

अर्थ- यास्तव हे उत्तम महाभाग्यशालिनि, माझें वाक्य श्रवण कर. तें असें कीं, तुझ्या मनांत जो इष्ट वर असेल तो तूं यथेच्छ माग. तुला उत्कृष्ट कल्याण प्राप्ति होईल, कारण माझें दर्शन झालें असतां, तें कदापि निष्फळ होत नाहीं.

अदितिरुवाच ॥ यदिदेवप्रसन्नस्त्वंमद्भक्त्याभक्त
वत्सल ॥ त्रैलोक्याधिपतिःपुत्रस्तदस्तुममवास-
वः ॥३८॥

अर्थ:- ते समयीं अदिति बोलली कीं, हे भक्तवत्सल देवा, आपण जर माझ्या भक्तीनें प्रसन्न झाला आहां, तर आपल्या कृपेनें माझा पुत्र इंद्र, पूर्ववत् त्रैलोक्य राज्याचा अधिपति होवो.

हृतंराज्यंहृताश्चास्ययज्ञभागामहासुरैः ॥ त्व
यिप्रसन्नेवरदेतान्प्राप्नोतुसुतोमम ॥३९॥

अर्थ:- आणि हे भगवन्, आपण वरदाते असून, मला प्रसन्न झालां, तर महासुरानीं माझ्या पुत्राचें राज्य व यज्ञभाग हरण केले आहेत, ते तुमच्या वरप्रदानानें त्यास यथा पूर्ववत् प्राप्त होवोत.

हृतंराज्यंनदुःखायममपुत्रस्यकेशव ॥ सापत्नाद्दा
यनिर्भ्रंशोबाधांनःकुरुतेहृदि ॥४०॥

अर्थ:- कारण हे केशवा, माझ्या पुत्राचें राज्य हरण केलें हें दुःखास कारण नाहीं; परंतु सपत्नीचे (सवत) पुत्रानीं माझे पुत्रांच्या दायभागाचा बलात्कारानें अपहार केला, ही गोष्ट आमच्या मनास बहु दुःखकारक झाली आहे.

श्रीभगवानुवाच ॥ कृतःप्रसादोहिमयातवदेविय
थेप्सितः ॥ स्वांशेनचैवतेगर्भेसंभविष्यामिकश्यपा
त् ॥४१॥

अर्थ:- त्यावेळीं भगवान् बोलले. हे विजयेच्छु अदिति, मी तुला यथेच्छ प्रसन्न झालों आहे, तस्मात् मी आपले अंशानें कश्यपा पासून तुझे गर्भांत अवतार ग्रहण करीन.

तवगर्भसमुद्भूतस्ततस्तेयेसुरारयः ॥ तानहंनिहनि
ष्यामिनिर्वृत्ताभवनंदिनि ॥४२॥

अर्थ:- हे इंद्र समृद्धिकारक अदिति, असा मी तुझ्या गर्भांतून उत्तम रीतीनें अवतार घेतल्यावर, जे देवांचे शत्रु आहेत त्यांचा मी संहार करीन, तूं आतां तपा पासून निवृत्त हो.

अदितिरुवाच ॥ प्रसीददेवदेवेशनमस्तोविश्वभाव

न॥ नाहं त्वामुदरे देव वोढुं शक्ष्यामि केशव॥४३॥

अर्थ- तेव्हां अदिति म्हणत्ये. हे विश्वपालक देवाधिदेवा केशवा, मी तुम्हास नमस्कार करित्यें, आपण मला प्रसन्न व्हा! कारण हे देवा, मी आपले उदरांत तुम्हास धारण करण्या विषयीं समर्थ होणार नाहीं.

यस्मिन्प्रतिष्ठितं विश्वं यो विश्वं स्वयमीश्वरः॥ तमहं नोदरेण त्वां वोढुं शक्ष्यामि दुर्धरम्॥४४॥

अर्थ- कारण हे भगवन्, आपण स्वयें विश्वरूप असून, सर्व चराचर विश्वास आश्रयस्थानभूत आहां! यास्तव अशा तुम्हा दुर्धर स्वरूपी परमेश्वरास मी स्वकीय उदरानें धारण करण्यास समर्थ नाहीं.

श्रीभगवानुवाच॥ सत्यमात्थ महाभागे मयि सर्वमिदं जगत्॥ प्रतिष्ठितं न मां शक्ता वोढुं सेंद्रा दिवौकसः॥४५॥

अर्थ- ते समयीं भगवान् म्हणतात. हे महा भाग्यशालिनि, तूं हें भाषण सत्यच केलेंस, कारण, सर्व हें जग माझ्या स्वरूपाचे आधारावर स्थित आहे, यामुळें इंद्रा सहित सर्व देवही माझा भार धारण करण्यास समर्थ नाहींत.

किंत्वहं सकलान्लोकान्सदेवासुरमानुषान्॥ जंगमान्स्थावरान्सर्वान्त्वां च देवि सकश्यपाम्॥४६ धारयिष्यामि भद्रं ते तदलं संभ्रमेण ते॥ न ते ग्लानिर्न ते खेदो गर्भस्थे भविता मयि॥४७॥

अर्थ- तर सर्व देव, असुर व मनुष्य यांहून इतर जंगम (पशुपक्ष्यादिक) व स्थावर (वृक्ष पाषाणादिक) इत्यादिक सकल लोकांस मी धारण करीत आहें, तस्मात् हे ज्ञान संपन्न अदिति, मी तुझे गर्भांत असून कश्यपा सहित तुला धारण करीन, यास्तव तुझें कल्याण होईल, तेव्हां आतां तूं भय मानूं नको, कारण मी तुझ्या गर्भांत असलों तरी तुला ग्लानि व घर्म येण्या सारखे श्रम होणार नाहींत.

दाक्षायणि प्रसादं ते करोम्यन्यैः सुदुर्लभम्॥ गर्भस्थे मयि पुत्राणां तव यो भिभविष्यति॥ तेजसस्तस्य हानिं च करिष्ये माव्यथां कृथाः॥४८॥

अर्थ- आणि हे दक्षकन्ये, मी तुजवर असा प्रसाद (कृपा) करीन कीं, तसा इतर कोणासही प्राप्त झाला नसेल, तो कसा म्हणशील, तर मी तुझे गर्भांत असतां, तुझ्या पुत्रांचा जो पराभव करील, त्याच्या तेजाचा मी नाश करीन, तूं मनांत वृथा खेद करूं नको.

शौनकउवाच ॥ एवमुक्त्वाततः सद्योयातोंतर्धानमी
श्वरः ॥ सापिकालेनतंगर्भमवापकुरुसत्तम ॥ ४९ ॥

अर्थ- शौनक म्हणतात. हे कुरुकुलश्रेष्ठ अर्जुना, असें भाषण करून तो ईश्वर गुप्त झाला. पश्चात् कालांतरीं अदितीनेंही कश्यपा पासून गर्भ धारण केला.

गर्भस्थितेततः कृष्णेचचालसकलाक्षितिः ॥ चकंपि
रेमहाशैलाः क्षोभंजग्मुस्तथाब्धयः ॥ ५० ॥

अर्थ- नंतर असे ते श्रीकृष्ण, अदितीच्या गर्भांत प्राप्त झाले असतां, संपूर्ण पृथ्वी चलन पावली, हिमालयादिक महा पर्वत कंपित झाले, तसेंच सर्व समुद्रही क्षुब्ध (खवळणें) झाले.

यतोयतोदितिर्यातिददातिललितंपदम् ॥ ततस्ततः
क्षितिःखेदान्ननामवसुधाधिप ॥ ५१ ॥

अर्थ- हे पृथ्वीपते, आणि ती अदिति, आपलें सुंदर पद (पाऊल) ज्या ज्या स्थलीं ठेवीत असे, त्या त्या स्थानीं पृथ्वी, अदितीच्या चरण संबंधि भाराच्या श्रमानें नौके सारखी हालूं लागली.

दैत्यानामथसर्वेषांगर्भस्थेमधुसूदने ॥ बभूवतेज
सांहानिर्यथोक्तंपरमेष्ठिना ॥ ५२ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ते मधुदैत्यनाशक विष्णु, अदितीच्या गर्भांत आले असतां, नंतर त्या परमात्म्यानें, पूर्वी सांगितल्या प्रमाणें, त्या कालीं सर्व दैत्यांच्या तेजांचा नाश जाहला. इतिश्री मत्स्यपुराणें वामन प्रादुर्भावे चतुश्चत्वारिंशदुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २४४ ॥

अध्याय २४५ वा.

शौनकउवाच ॥ निस्तेजसोसुरान्दृष्ट्वासमस्तान
सुरेश्वरः ॥ प्रल्हादमथपप्रच्छबलिरात्मपितामहम्
॥ १ ॥

अर्थ- शौनक बोलले. हे अर्जुना, असे सर्व असुर निस्तेज झालेले अवलोकन करून, पश्चात् त्या असुरांचा राजा बलि, प्र्हाद नामक आपल्या पितामहास (पित्याचा पिता) प्रश्न करतो.

बलिरुवाच ॥ तातनिस्तेजसोदैत्यानिर्दग्धाइववन्हिना ॥ किमेतेसहसैवाद्यब्रह्मदंडहताइव ॥२॥

अर्थ- कीं, बलि म्हणतो. अहो ताता, हे सर्व दैत्य, अग्नीनें दग्ध झाल्या सारखे किंवा अकस्मात्च ब्राम्हण शापानें ग्रस्त झाले कीं काय? असे सांप्रतकालीं निस्तेज दिसत आहेत, याचें कारण काय?

दुरिष्टंकिन्नुदैत्यानांकिंकृत्यावैरिनिर्मिता ॥ नाशायैषांसमुद्भूतायथानिस्तेजसोसुराः ॥३॥

अर्थ- तस्मात् हें कांहीं दैत्यांवर अरिष्ट प्राप्त झालें आहे, अथवा वैरी लोकानीं निर्माण केलेली ही कृत्या यांच्या नाशार्थ येथें अतिशयें प्रगट झाली म्हणूनच तिच्या योगानें हे असुर अत्यंत निस्तेज झाले आहेत काय?

शौनक उवाच ॥ इतिदैत्यपतिर्धीरःपृष्टःपौत्रेणपार्थिव ॥ चिरंध्यात्वाजगादेनमसुरेंद्रंबलिंतदा ॥४॥

अर्थ- शौनक म्हणतात. हे सकल पृथ्वी मरव्यात अर्जुना, असा बलि नामक पौत्रानें, (पुत्राचा पुत्र) धैर्यसंपन्न दैत्यपालक प्र्हादास प्रश्न केला असतां, त्याकालीं तो प्र्हाद, बहुकाल ध्यान करून, त्या असुरराज बलीस भाषण करतो.

चलंतिगिरयोभूमिर्जहातिसहसाधृतिम् ॥ सर्वेसमुद्राःक्षुभितादैत्यानिस्तेजसःकृताः ॥५॥

अर्थ- हे वत्सा, प्रस्तुतकालीं मेरु आदि करून सर्व पर्वत, स्वस्थानीं चलन पावतात, तशीच भूमि अचल असून ही आपले अचंचलत्व रूप धैर्याचा अकस्मात् त्याग करिते, तसेच सर्व समुद्र क्षोभ (खवळणें) पावले असून, संपूर्ण दैत्यही निस्तेज झाले आहेत.

सूर्योदयोयथापूर्वंतथागच्छंतिनग्रहाः ॥ देवानांचपरालक्ष्मीःकारणैरनुमीयते ॥६॥

अर्थ- तसाच सांप्रतकालीं सूर्योदय यथा पूर्व होत नसून गुरु शुक्रादिक ग्रह ही यथा पूर्व गतीनें चालत नाहींत. या लक्षणां वरून प्रस्तुत देवांस उत्तम लक्ष्मी

प्राप्त होण्याचा समय दिसत आहे.

महद्देतन्महाबाहोकारणंदानवेश्वर ॥ नह्यल्पमितिमं
तव्यंत्वयाकार्यंसुरार्दन ॥ ७॥

अर्थ- आणि हे दानवराज महाबाहो, हें दैत्यांचे नाशा विषयीं महत्कारण आहे, तसेंच हे देवमर्दना, यांत देवांचें अल्प कार्य आहे असें तूं मानूं नको.

शौनकउवाच ॥ इत्युक्त्वादानवपतिंप्रल्हादःसोसुरो
त्तमः ॥ अत्यंतभक्तोदेवेशंजगामंमनसाहरिम् ॥ ८॥

अर्थ- शौनक म्हणतात. हे अर्जुना, असें दानवराज बलीस भाषण करून, तो असुरश्रेष्ठ महाभक्त शिरोमणि प्रल्हाद, त्या अरिष्ट निवारणार्थ मनःपूर्वक देवाधिदेव हरीस शरण गेला.

सध्यानयोगंकृत्वाथप्रल्हादःसुमनोहरम् ॥ विचा
रयामासततोयत्रोदेवोजनार्दनः ॥ ९॥

अर्थ- आणि प्रल्हादानें अत्युत्तम ध्यान योग करून नंतर त्या ध्यानांत दीनवत्सल देव कोणत्या स्थानीं आहे असा विचार करूं लागला.

सददर्शोदरेदित्याःप्रल्हादोवामनाकृतिम् ॥ अंतस्थान्
बिभ्रतंसप्तलोकानादिप्रजापतिम् ॥ १०॥ तदंतस्थान्
वसून्रुद्रानश्विनौमरुतस्तथा ॥ साध्यान्विश्वांस्त-
थादित्यान्गंधर्वोरगराक्षसान् ॥ ११॥ विरोचनंसतन
यंबलिंचासुरनायकम् ॥ जंभंकुजंभंनरकंतत्रैवान्या
न्महासुरान् ॥ १२॥ आत्मानमुर्वींगगनंवायुमंभोहुता
शनम् ॥ समुद्रान्वेद्रुमसरित्सरांसिचपशून्मृगान् ॥
वयोमनुष्यानखिलांस्तथैवचसरीसृपान् ॥ १३॥

अर्थ- त्या कालीं प्रल्हाद अदितीच्या उदरांत वामनाकृति हरीस अवलोकन केलें; तें असेंकीं, तो देव, आपले उदरांत सप्त लोक, आदिप्रजापति, (ब्रम्हदेव) यांस धारण करीत असून त्याचे स्वरूपांत अष्टवसु, एकादश रुद्र, अश्विनी कुमार, तसेंच एकोनपंचाशत् मरुद्गण, साध्यगण, विश्वेदेव, द्वादशादित्य, गंधर्व, शेषादिक नाग, राक्षस, पुत्रांसहित विरोचन, असुरनायक बलि, जंभ, कुजंभ, नरकासुर, तसेंच इतर मोठमोठे असुर, पृथ्वी, गगन, वायु, उदक, अग्नि, सर्व समुद्र, संपूर्ण वृक्ष, सक-

ल नद्या, समग्र सरोवरें, तसे पशु, मृग, (हरिण) पक्षी, सर्व मनुष्यें, जातिमात्र सर्प व आपण हे सर्व त्या देवाच्या देहांत आहों, असें प्रल्हादानें अवलोकन केलें.

प्रल्हाद उवाच ॥ वत्सज्ञातंमयासर्वंयदर्थंभवतामियम् ॥ तेजसोहानिरुत्पन्नातच्छृणुत्वमशेषतः ॥१४॥

अर्थः- आणि प्रल्हाद, बलीस बोलला कीं, हे वत्सा, तुम्हा सर्व असुरांच्या तेजाचीही हानि ज्या कार्यार्थ उत्पन्न जाहली आहे, त्याचें सर्व कारण मीं जाणलें, तें तूं साकल्यानें श्रवण कर.

देवदेवोजगद्योनिरयोनिर्जगदादिकृत् ॥ अनादिरादिर्विश्वस्यवरेण्योवरदोहरिः ॥१५॥ परंपराणांपरमःपरःपरवतामपि ॥ प्रमाणंचप्रमाणानांसप्तलोकगुरोर्गुरुः ॥१६॥ प्रभुःप्रभूणांपरमःपराणामनादिमध्योभगवाननंतः ॥ त्रैलोक्यमंशेनसनाथमेषकर्तुंमहात्मादितिजोवतीर्णः ॥१७॥

अर्थः- तें असें कीं, जो स्वयंभु असल्यामुळें, स्वतः अनादि असून जगदुत्पादक, ब्रह्मदेवास उत्पन्न करून त्याच्या द्वारानें सर्व चराचर विश्वास उत्पन्न करणारा व जगाच्या पालनादि कृत्यांस आदिकारण स्वरूपी असल्यावरून, सर्वांस वरप्रदाना विषयीं समर्थ असल्यानें सकल ब्रम्हादिकानीं भजन करण्यास योग्य असे देवाधिदेव हरि, अत्युत्कृष्ट ब्रम्हादिकांपेक्षां श्रेष्ठ असूनही, तो परतंत्र लोकांहून अत्यंत भक्तपराधीन आहे आणि तो भगवान् वेदादिक सर्व प्रमाणांस प्रमाणभूत असून सप्तलोकांचें गुरुत्व करणाऱ्या ब्रह्मदेवांचाही गुरु आहे, त्याच प्रमाणें तो पूर्णषड्गुणैश्वर्य संपन्न महात्मा सर्व जगत् प्रभूंचा प्रभु व श्रेष्ठ देवादिकांपेक्षांही सर्व प्रकारें उत्कृष्ट असल्यानें आदि, मध्य व अंत यानीं रहित असून, तो ईश्वर सांप्रत कालीं हें त्रैलोक्य तुम्हा असुरांच्या योगानें अनाथा सारखें अतिदीन झालें आहे, यास्तव ते तीन लोक सनाथ करण्या साठीं तो विष्णु, आपले अंशानें अवतार ग्रहण करण्याविषयीं अदितीच्या उदरीं प्राप्त झाला आहे.

नतस्यरुद्रोनचपद्मयोनिर्नेंद्रोनसूर्येंदुमरीचिमुख्याः ॥ जानंतिदैत्याधिपयत्स्वरूपंसवासुदेवःकलयावतीर्णः ॥१८॥

अर्थ- हे दैत्याधिपते, तसेंच शंकर, नाभिकमलोत्पन्न ब्रम्हदेव, इंद्र, सूर्य, चंद्र, मरीचि प्रभृति ऋषि हे सर्व ही ज्याचें स्वरूप जाणत नाहींत, तो वासुदेव सर्व भूताश्रयस्वरूपी स्वकीय अंशानें अवतार घेण्यासाठीं अदितीच्या उदरीं प्राप्त झाला आहे.

योसौकलांशेननृसिंहरूपी जघानपूर्वंपितरंममेशः
यःसर्वयोगीशमनोनिवासः सवासुदेवःकुक्ष्यव
तीर्णः ॥१९॥

अर्थ- आणि जो योगिश्रेष्ठांचे मनांत प्रीतीनें वास करीत असून, स्वकीय कलारूप अंशानें पूर्वीं नृसिंह अवतार धारण करून, ज्यानें माझ्या हिरण्यकशिपुनामक पित्यास मारलें, तो प्रभु स्वकीय अंशानें अदितीच्या उदरीं आला आहे.

यमक्षरंवेदविदोविदित्वाविशंतियंज्ञानविधूतपापाः
॥ यस्मिन्प्रविष्टानपुनर्भवंतितंवासुदेवंप्रणमामिनि
त्यम् ॥२०॥

अर्थ- तसेंच वेदवेत्ते ज्या परमेश्वरास सर्वदा अविनाशी असें जाणून, त्या ज्ञानानें सर्व पापांतून मुक्त होऊन, ज्या परमेश्वर स्वरूपीं प्रविष्ट झाले असतां, ते प्राणी पुनः गर्भवासांत येत नाहींत, त्या वासुदेवास मी निरंतर नमस्कार करीत आहें.

भूतान्यशेषाणियतोभवंतियथोर्मयस्तोयनिधेरजस्रम्
॥ लयंचयस्मिन्प्रलयेप्रयांतितंवासुदेवंप्रणमाम्यचिं
त्यम् ॥२१॥

अर्थ- तशींच सर्व भूतें (प्राणिमात्र) सृष्टिकाळीं ज्यापासून निरंतर जलनिधी (समुद्र) पासून निघालेल्या लहरी सारखीं उत्पन्न होऊन अंतीं प्रलय काळीं ज्याचे स्वरूपीं लीन होतात, त्या अचिंत्यरूप वासुदेवास मी सार्वकाळ नमस्कार करतों.

नयस्यरूपंनबलंप्रभावोनयस्यभावःपरमस्यपुंसः
॥ विज्ञायतेशर्वपितामहाद्यैस्तंवासुदेवंप्रणमाम्यज
स्रम् ॥२२॥

अर्थ- तसेंच ज्या परम पुरुषाचें रूप, बल, प्रभाव व अभिप्राय हीं शंकर, ब्रम्हदेव प्रभृति देवांसीं जाणलीं जात नाहींत, त्या वासुदेवास मी नित्य नमस्कार करतों.

रूपस्यचक्षुर्ग्रहणेत्वगेषास्पर्शोग्रहित्रीरसनारस-

स्य ॥ श्रोत्रंचशब्दग्रहणेनराणांघ्राणंचगंधग्रहणेनियु
क्तम् ॥२३॥ येनैकदंष्ट्राग्रसमुद्धृतेयंधराचलान्धारय
तीहसर्वान् ॥ यस्मिंश्चशेतेसकलंजगच्चतमीशमाद्यं
प्रणतोऽस्मिविष्णुम् ॥२४॥

अर्थ- त्याच प्रमाणें रूपाच्या ज्ञाना विषयीं कारण नेत्र; मृदु, कठिण किंवा शीतोष्णादिक वस्तूंच्या स्पर्श ज्ञाना विषयीं कारण त्वचा; मधुरादिक रसज्ञानास कारण जिव्हा; शब्दज्ञानास कारण कर्ण व सुगंधादिक गंधज्ञानास कारण मनुष्यांची नासिका अशी ज्या इश्वरानें योजना केली आहे, आणि पूर्वी ज्यानें हिरण्याक्ष दैत्याचा वध करून, त्यानें उदकांत बुडविलेली सर्व पर्वतांस धारण करणारी ही पृथ्वी, आपल्या दंष्ट्रेच्या (दाढ) अग्रभागावर धारण करून त्या जलांतून यथा पूर्व स्थितीनें वर आणली, व सकल चराचर जग, ज्याच्या आधारानें सर्वदा वर्तत आहे, त्या विष्णुरूपी आद्य प्रभूस मी निरंतर प्रणाम करीत आहें.

नघ्राणग्राह्यःश्रवणादिभिर्यःसर्वेश्वरोवेदितुमक्षया
त्मा ॥ शक्यस्तमीड्यंमनसैवदेवंग्राह्यंततोहंहरिमीशि
तारम् ॥२५॥

अर्थ- तसेच सर्व लोक, स्वकीय नासिका व कर्ण इत्यादिक इंद्रियानीं ज्या अविनाशि स्वरूपी सर्वेश्वरास जाणण्या विषयीं समर्थ नाहींत, त्या देवाचें किंचित् ज्ञान तरी मनानेंच होतें, यास्तव त्या सर्व नियामक स्तुत्य हरीस मी, अंतःकरण पूर्वक शरण जातों.

अंशावतीर्णेनचयेनगर्भेहृतानितेजांसिमहासुरा
णाम् ॥ नमामितंदेवमनंतमीशमशेषसंसारतरोःकु
ठारम् ॥२६॥

अर्थ- आणि प्रस्तुत ज्या भगवंतानें अंशें करून अवतार घेण्या साठीं अदितीच्या गर्भांत येऊन, या महा पराक्रमी सर्व असुरांचें तेज हरण केलें, त्या, समूल संसार (जन्म मरण प्रवाह) रूप वृक्षास कुठारा (कुऱ्हाड) समान नाशक असून, अपरिमित माहात्म्य युक्त अशा त्या लक्ष्मीकांत देवास मी नमस्कार करतों.

देवोजगद्योनिरयंमहात्मासषोडशांशेनमहासुरेंद्र ॥
सदेवमातुर्जठरंप्रविष्टोहृतानिवस्तेनबलाद्वपूंषि ॥२७॥

अर्थ- कारण हे महादैत्य राजा, जो सर्व जगास आदिकारण भूत महात्मा देव, तो

स्वकीय षोडशांशानें अदिति नामक देवमातेच्या उदरीं अवतार घेण्यासाठीं प्राप्त झाला आहे, त्यानें बलात्कारें करून तुमचीं शरीरें निस्तेज केलीं आहेत.

बलिरुवाच ॥ तातकोयंहरिर्नामयतोनोभयमागत
म् ॥ संतिमेशतशोदैत्यावासुदेवबलाधिकाः ॥२८॥

अर्थ- ते समयीं बलि म्हणतो कीं, हे ताता, ज्यापासून आम्हांस भय प्राप्त झालें असा हा हरिनामें कोण देव प्रसिद्ध आहे; कारण वासुदेवापेक्षां अधिक बलाढ्य असे माझे शतशः दैत्य आहेत.

विप्रचित्तिः शिबिः शंकुरयः शंकुस्तथैवच ॥ अयःशिरा
श्वाश्वशिराभंगकारोमहाहनुः ॥२९॥ प्रतापःप्रघसः
शंभुःकुकुरश्चसुदुर्जयः ॥ एतेचान्येचमेसंतिदैतेया
दानवास्तथा ॥३०॥ महाबलामहावीर्याभूभारोद्धर
णक्षमाः ॥ एषामेकैकशःकृष्णोनवीर्यार्धेनसंमितः
॥३१॥

अर्थ- ते असे कीं, विप्रचित्ति, शिबि, शंकु, अयःशंकु, तसाच अयःशिरा, अश्वशिरा, भंगकार, महाहनु, प्रताप, प्रघस, शंभु, पराजय होण्यास फारच अशक्य असा कुकुर हे आणि अन्य दैत्य व दानव महा बलाढ्य असून महा पराक्रमी व भूभार दूर करण्या विषयीं समर्थ आहेत, या माझ्या एकेक दैत्याच्या अर्ध्या पराक्रमाशींही तो कृष्ण समान नाहीं

शौनकउवाच ॥ पौत्रस्यैतद्वचःश्रुत्वाप्रल्हादोदैत्य
पुंगवः ॥ धिग्धिगित्याहसबलिंवैकुंठक्षेपवादिनं ॥३२

अर्थ- शौनक म्हणतात. हे अर्जुना, असें पौत्राचें (नातु) वाक्य श्रवण करून, दैत्यश्रेष्ठ प्रल्हादानें तुला धिक्कार असो धिक्कार असो असें बलीस भाषण केलें; कारण बलीनें स्वमुखांतून विष्णु निंदाकारक वचन काढिलें.

प्रल्हादउवाच ॥ विनाशमुपयास्यंतिमन्येदैतेयदान
वाः ॥ येषांत्वमीदृशोराजादुर्बुद्धिरविवेकवान् ॥३३॥

अर्थ- प्रल्हाद बोलला कीं हे बले, हे सर्व दैत्य, दानव, अतिशयित नाश पावतील असें मला भासतें; कारण त्या दैत्यादिकांचा असा तूं दुर्बुद्धि युक्त अविवेकी राजा आहेस;

देवदेवंमहाभागंवासुदेवमजंविभुम् ॥ त्वामृतेपाप संकल्पः कोन्यएवंवदिष्यति ॥३४॥

अर्थः- कारण जो सर्व भूतांस आश्रय असून स्वयें जन्म रहित व सर्व व्यापक असल्यामुळें पूर्ण षड्गुणैश्वर्य संपन्न देवाधिदेव त्या विष्णूस तुज वांचून अन्य कोण पापसंकल्प युक्त पुरुष असें दुर्भाषण करील कोणीही करणार नाहीं.

यएतेभवताप्रोक्ताः समस्तादैत्यदानवाः ॥ सब्रह्मका स्तथादेवाःस्थावरानंतभूमयः ॥३५॥ त्वंचाहंचजगच्चे दंसाद्रिद्रुमनदीनदम् ॥ समुद्रद्वीपलोकाश्चनसमंके शवस्यहि ॥३६॥

अर्थः- आणि तूं समस्त जे हे दैत्य,दानव मला सांगितलेस, तसेच ब्रह्मदेव सहित सर्व देव, अपार भूमींल सर्व स्थावर,(वृक्ष पाषाणादिक) तूं,मी, पर्वत,वृक्ष,नद्या व शोण भद्रादिक नद यां सहित हें सकल जग,समुद्र,जंबुद्वीपादिक समग्र द्वीपें व पाताल आदि करून सत्यलोक पर्यंत चतुर्दश लोक हे सर्व मिळून ही त्या केशवाशीं कोणत्याही बलज्ञानादिक अंशानें समान नाहींत.

यस्याभिवंद्यवंद्यस्यव्यापिनःपरमात्मनः ॥ एकांशेन जगत्सर्वंकस्तमेवंप्रवक्ष्यति ॥३७॥ ऋतेविनाशाभि मुखंत्वामेकमविवेकिनम् ॥ कुबुद्धिमजितात्मानंवृद्धा नांशासनातिगम् ॥३८॥

अर्थः- त्याच प्रमाणें अतिशयें सर्व जगद्वंद्य ब्रह्मादिकांसही वंद्य असून सर्वव्यापक अशा त्या श्रीकृष्ण परमात्म्याच्या एकांशानें संपूर्ण जग व्याप्त आहे,त्या परमेश्वरास एक तुज वांचून कोण असें अवाच्य भाषण करील ; कारण तूं अविचारशील असल्यामुळें कुत्सितबुद्धियुक्त असून अजितेंद्रिय आहेस,त्यामुळें तूं ज्ञानवृद्धांच्या शिक्षामार्गाचें उल्लंघन करतोस, म्हणून तूं असें साहस भाषण बोललास.

शोच्योहंयस्यमेगेहेजातस्तवपिताधमः ॥ यस्यत्वमी दृशःपुत्रोदेवदेवस्यनिंदकः ॥३९॥

अर्थः- तस्मात् तुझ्या संबंधानें मीही लोकांत निंदेस पात्र झालों; कारण तूं, ज्यास असा देवाधिदेवाची निंदा करणारा कुपुत्र झालास तो विरोचन नामक तुझा अधम पिता माझे घरीं पुत्रत्वें करून जन्मला.

तिष्ठत्येषाहिसंसारसंभृताघविनाशनी ॥ कृष्णेभ
क्तिरहंतावदवेक्ष्योभवतानुकिम् ॥ ४० ॥

अर्थः- आणि संसार संबंधानें अति संचित झालेल्या पापांचा समूळ नाश करणारी श्रीकृष्ण भक्ति ही माझे ठिकाणीं जागरूक पणानें आहे, यास्तव अशा तूं विष्णु निंदकानें मजकडे अवलोकन तरी करावें काय ? तर अशा तूं दुष्टानें माझे अग्रभागींही न रहावें हेंच युक्त आहे.

नमेप्रियनमः कृष्णादपिदेहोमहात्मनः ॥ इतिजा
नात्ययंलोकोनभवान्दितिजाधम ॥ ४१ ॥

अर्थः- हे दैत्याधमा त्या महात्म स्वरूप श्रीकृष्णाहून मला देहही अति प्रिय नाहीं, तेव्हां अन्य वस्तू त्या कृष्णा पेक्षां प्रिय नाहींत यांत काय आश्चर्य सांगावें, हें माझें स्वभावसिद्ध श्रीकृष्णा विषयींचें प्रेम सर्व इतरही लोक जाणत आहेत, तथापि ही गोष्ट तुला विदित नाहीं काय ?

नजानासिप्रियतरंप्राणेभ्योपिहरिंमम ॥ निंदांकरो
षितस्यलमकुर्वन्गौरवंमम ॥ ४२ ॥

अर्थः- असा मला हरि, स्वकीय प्राणांपेक्षांही अतिशयित प्रिय आहे, हें तूं जाणत नाहींस काय ? म्हणून तूं माझें गुरुत्व नमानून हरीची निंदा करीत आहेस.

विरोचनस्तवगुरुर्गुरुस्तस्याप्यहंबले ॥ ममापिसर्व
जगतांगुरोर्नारायणोगुरुः ॥ ४३ ॥

अर्थः- हे बले, विरोचन हा तुझा गुरु (पिता) असून त्याचाही मी गुरु आहें; आणि मज सहित सर्व जगाचे गुरु जे ब्रम्हदेव, त्यांचे ही गुरु नारायणच आहेत.

निंदांकरोषियस्तस्मिन्कृष्णेगुरुगुरोर्गुरौ ॥ यस्मा
त्तस्मादिहैश्वर्यादचिराद्भ्रंशमेष्यसि ॥ ४४ ॥

अर्थः- असे ते श्रीकृष्ण, विरोचन नामक तुझ्या गुरूचा गुरु जो मी प्रऱ्हाद त्याचेही गुरु आहेत, असें असून तूं त्यांची निंदा करतोस, तस्मात् आतां तूं या ऐश्वर्या पासून शीघ्रच भ्रष्ट होशील.

ममदेवोजगन्नाथोबलेतावज्जनार्दनः ॥ भवत्वहमु
पेक्ष्यस्तेप्रीतिमानस्तुमेगुरुः ॥ ४५ ॥

अर्थः- हे बले, सर्व जगाचा नाथ जो जनार्दन, तोच माझा देव आहे, यास्तव म-

ज विषयीं तुझी उपेक्षाच असावी, तसाच माझा गुरूजो नारायण,तो मजवर संतुष्ट असो.

एतावन्मात्रमप्येवंनिंदितोजगतोगुरुः॥नावेक्षितं त्वयायस्मात्तस्माच्छापंददामिते॥४६॥

अर्थ- आणि तूं विचार न करतां अशा रीतीनें जगद्गुरूची इतकी अति निंदा केलीस,यास्तव मी तुला या काळीं शाप देतों.

यथामेशिरसच्छेदादिदंगुरुतरंवचः॥त्वयोक्तम च्युताक्षेपिराज्यभ्रष्टस्तथापत॥४७॥

अर्थ- तो असा कीं,जसें तूं हें माझ्या शिरच्छेदापेक्षांही अति दुःखकारक विष्णु निंदेचें भाषण केलेंस,तसें तुला या त्रैलोक्य राज्यावरून भ्रष्ट होऊन पतन पावण्याचें बहु दुःख प्राप्त होईल.

यथाचकृष्णान्नपरंपरित्राणंभवार्णवे॥तथाचिरे णपश्येयंभवंतंराज्यविच्युतम्॥४८॥

अर्थ- आणि या भव सागरांत जसें श्रीकृष्णा वांचून इतर कोणी ही संरक्षक नाहीं,तसें मी तुला त्वरितच या राज्या पासून भ्रष्ट झालेल्या दशेंत अवलोकन करीन.

शौनकउवाच॥इतिदैत्यपतिःश्रुत्वागुरोर्वचनमप्रि यम्॥प्रसादयामासगुरुंप्रणिपत्यपुनःपुनः॥४९॥

अर्थ- शौनक म्हणतात.हे अर्जुना,असें दैत्यराज बलीनें तें पितामहाचें अप्रिय वचन श्रवण करून त्या प्रल्हाद नामक गुरूस वारंवार नमस्कार करून प्रसन्न केलें.

बलिरुवाच॥प्रसीदतातमाकोपंकुरुमोहहतेमयि ॥बलावलेपमत्तेनमयैतद्वाक्यमीरितम्॥५०॥

अर्थ- तें असें कीं बलि प्रार्थना करतो कीं,हे ताता,मी अज्ञान ग्रस्त झाल्या मुळें बलाच्या गर्वानें उन्मत्त झालों.तेणें करून मीं असें अमर्याद भाषण केलें हें अन्याय कर्म घडलें हें सत्य आहे, परंतु आपण आतां मजवर कोप न करतां प्रसन्न व्हावें.

मोहोपहतविज्ञानःपापोहंदितिजोत्तम॥यच्छ-

सोस्मिदुराचारस्तत्साधुभवताकृतम् ॥५१॥

अर्थ- कारण हे दैत्यश्रेष्ठा, मी पापी असल्यामुळें अज्ञानानें माझें उत्तम ज्ञान नष्ट झालें तेणें करून मीं हें विष्णु निंदारूप दुराचरण केलें, यास्तव आपण मला शाप दिला हें युक्तच केलें.

राज्यभ्रंशंवसुभ्रंशंप्राप्येवनतथाप्यहं ॥ विषण्णोस्मियथाताततवैवाविनयेकृते ॥५२॥

अर्थ- म्हणूनच हे ताता मला राज्यभ्रंश व द्रव्य नाश हीं दुःखें प्राप्त झालीं तथापि मी तुम्हां विषयीं मात्र केलेल्या अपराधाचरणानें जसा दुःखित झालों आहें, तसा त्या राज्यादि हानीनें खिन्न होत नाहीं.

त्रैलोक्यराज्यमैश्वर्यमन्यद्वानातिदुर्लभम् ॥ संसारेदुर्लभास्तेतुगुरवोयेभवद्विधाः ॥५३॥

अर्थ- कारण त्रैलोक्य राज्य किंवा इतर ऐश्वर्य हें संसारांत अति दुर्लभ नाहीं, परंतु तुम्हा सारखे जे गुरु ते मात्र दुर्लभ आहेत.

तत्प्रसीदनमेकोपंकर्तुमर्हसिदैत्यप ॥ त्वत्कोपदृष्ट्याताताहंपरितप्येनशापतः ॥५४॥

अर्थ- तस्मात् हे दैत्यपालक ताता, आतां आपण मजवर कोप करण्या विषयीं योग्य नाहीं; कारण मी तुमच्या शापानें खिन्न झालों नाहीं, तर तुमच्या कोपदृष्टीनें अति दुःखित झालों आहें.

प्रऱ्हादउवाच ॥ वत्सकोपोनमोहेनजनितस्तेनतेमया ॥ शापोदत्तोविवेकश्चमोहेनापहृतोमम ॥५५॥

अर्थ- ते समयीं प्रऱ्हाद म्हणतो कीं, हे वत्सा, मला कोप आला नाहीं, तर माझा विवेक अज्ञानानें हरण केला, त्यामुळे मीं अविचारानें तुला शाप दिला.

यदिमोहेनमेज्ञानंनक्षिप्तंस्यान्महासुर ॥ तत्कथंसर्वगंजानन्हरिंकिंचिच्छपाम्यहम् ॥५६॥

अर्थ- कारण हे महासुरा जर अविचारानें माझें ज्ञान विपरीत झालें नसतें तर मी स्वयोग्यतानुसार सर्वव्यापक हरीस किंचित् जाणत असून कसा शाप देईन.

योयंशापोमयादत्तोभवतोसुरपुंगव ॥ भाव्यमेतेन

नूनंनेतस्मान्मात्वंविषीदवै ॥५७॥

अर्थः- आणि हे असुरश्रेष्ठा, मीं जो हा तुला शाप दिला आहे, यानें निश्चयें करून तुझें कल्याण होईल, तस्मात् तूं खिन्न होऊं नको.

अद्यप्रभृतिदेवेशेभगवत्यच्युतेहरौ॥ भवेथाभक्तिमानीशेसतेत्राताभविष्यति॥५८॥

अर्थः- तें असें कीं, अखंड पूर्ण षड्गुणैश्वर्य संपन्न देवाधिदेव लक्ष्मीकांत हरीविषयीं आज पासून तूं महाभक्तिमान् होशील, तेणें करून ते नारायण तुझें संरक्षण करतील.

शापंप्राप्याथमांवीरसंस्मरेथाःस्मृतस्त्वया॥ तथाहंतथायतिष्येहंश्रेयसायोज्यसेयथा॥५९॥

अर्थः- आणि हे वीरा, हा शाप तुला प्राप्तझाल्यानंतर तूं माझें मनःपूर्वक स्मरण कर. असें तूं माझें स्मरण केलें असतां, तूंज्यारीतीनें कल्याण युक्त होशील त्या त्या उपाया विषयीं मी यत्न करीन.

एवमुक्त्वासदैत्येंद्रंविरराममहाद्युतिः॥ अजायतसगोविंदोभगवान्वामनाकृतिः॥६०॥

अर्थः- असें दैत्यराज बलीस भाषण करून तो महातेजस्वी प्रल्हाद स्वस्थ बसला. त्या कालीं इकडे गोप्रतिपालक भगवान् विष्णु कश्यपाचे आश्रमीं वामनाकृतीनें प्रगट झाले.

अवतीर्णेजगन्नाथेतस्मिन्सर्वामरेश्वरे॥ देवाश्चमुमुचुर्दुःखंदेवमातादितिस्तथा॥६१॥

अर्थः- असेते सर्व देवाधिपति जगन्नाथ, अदितीचे अग्रभागीं अवतीर्ण झाले असतां, इंद्रादिक देव व त्यांची माता अदिति, यानीं स्वकीय दुःखाचा त्याग केला.

ववुर्वाताःसुखस्पर्शाविरजस्कमभून्नभः॥ धर्मेचसर्वभूतानांतदामतिरजायत॥६२॥

अर्थः- तसेच स्पर्शमात्रें सुख उत्पन्न करणारे वायु त्या कालीं वाहूं लागले. आकाश निर्मल झालें. तशीच धर्माविषयीं मति प्राणिमात्रांस उत्पन्न झाली.

नोद्वेगश्चाप्यभूत्तत्र मनुजेंद्रासुरेष्वपि ॥ तदादिसर्वभूतानां भूम्यंबरदिवौकसाम् ॥ ६३ ॥

अर्थ:- आणि हे मानवराजा, त्या वामनावतार समयापासून पुढें असुरांच्या अंतःकरणांत ही उद्वेग उत्पन्न झाला नाहीं, तेव्हां भूमि, आकाश व स्वर्ग यांतील लोकांस त्रास झाला नाहीं यांत काय आश्चर्य सांगावें.

तं जातमात्रं भगवान् ब्रम्हा लोकपितामहः ॥ जातकर्मादिकं कृत्वा कृष्ण इत्वाच पार्थिव ॥ तुष्टाव देवदेवेशमृषीणांचैव शृण्वताम् ॥ ६४ ॥

अर्थ:- हे राजा, वामनावतार ग्रहण केलेल्या विष्णूस अवलोकन करून सर्व लोकांचे पितामह भगवान् ब्रम्हदेव, त्या वामनाचे जातकर्मादिक संस्कार करून तेथील सर्व ऋषी श्रवण करीत असतां त्या देवाधिदेवाची स्तुति करूं लागले.

ब्रह्मोवाच ॥ जयाधेश जयाजेय जय सर्वात्मिकात्मक ॥ जय जन्मजरापेत जयानंत जयाच्युत ॥ ६५ ॥

अर्थ:- कीं हे भगवन्, आपण सर्वांचे अंतर्यामी असल्यामुळें जन्म, जरा व नाश यानीं रहित असून अखंड ऐश्वर्यानें पूर्ण आहां; यास्तव तुम्ही सर्वांस अजिंक असल्यानें जगत्प्रमुख ब्रम्हादिकांचे स्वामी आहां; तस्मात् तुम्ही सर्वदा सर्वोत्कर्षानें वर्तत आहां.

जयाजित जयामेय जयाव्यक्तस्थिते जय ॥ परमार्थार्थ सर्वज्ञ ज्ञानज्ञेयात्मनिःसृत ॥ ६६ ॥

अर्थ:- तसेच आपण अमितमाहात्म्ययुक्त असल्यामुळें सर्वथा अजिंक असून अव्यक्त तत्वांत (माया) स्थित आहां; तथापि तुम्ही परमार्थ (वास्तविक) सत्यस्वरूप व सर्वज्ञ असून इतरांस ज्ञानद्वाराच जाणले जातां, आणि तुम्ही आपले अवतार स्वकीय स्वरूपापासूनच प्रगट करतां; तस्मात् निरंतर आपण सर्वोत्कर्षानें वर्तत आहां.

जयाशेषजगत्साक्षिन् जगत्कर्तर्जगद्गुरो ॥ जगतोस्यांतकृद्देव स्थितिं पालयितुं जय ॥ ६७ ॥

अर्थ:- हे सर्व चराचर जगत्साक्षिन्, आपण सर्व जगास उत्पन्न करणारे अ-

सल्यामुळें जगाचे गुरु असून या जगाचा संहारही करणारे आहां यास्तव तुम्ही देवांच्या स्थितीचें पालन करण्यासाठीं सांप्रतकाळीं सर्वोत्कर्षानें वर्तावें.

जयाशेषजयाशेषजयाखिलहृदिस्थित ॥ जयादिमध्यांतजयसर्वज्ञाननिधेजय ॥६८॥

अर्थ- कारण आपणच सर्वांच्या हृदयांत नियामकत्वें करून असल्यामुळें सर्वव्यापक असून सर्वांस जिंकणारे आहां आणि तुह्मीं पूर्णज्ञान निधि असल्यानें चराचर सर्व विश्वाचे उत्पत्ति, स्थिति व प्रळय यांचे नियंते आहां. यास्तव प्रसन्न तुह्मीं देवांच्या उत्कर्षाविषयीं प्रसन्न व्हावें.

मुमुक्षुभिरनिर्देश्यस्वयंदृष्टजनेश्वर ॥ योगिनांमुक्तिफलदद्माादिगुणभूषण ॥६९॥

अर्थ- त्याचप्रमाणें मुमुक्षु जनांस तुमच्या स्वरूपाचें ज्ञान साकल्यानें होत नसून आत्मस्वरूप लाभानेंच संतोष पावणाऱ्या जनांचे स्वामी आहां आणि तुह्मीं योगिजनांस मुक्तिरूप फळ देणारे असून शमदमादिक अनंतगुणानीं शोभत आहां.

जयातिसूक्ष्मदुर्ज्ञेयजयस्थूलजगन्मय ॥ जयस्थूलातिसूक्ष्मत्वंजयानींद्रियसेंद्रिय ॥ ७० ॥

अर्थ- तसेच तुह्मीं अति सूक्ष्म व स्थूल असल्यामुळें जगव्यापक असून सर्वांस तुमचें ज्ञान होणें अशक्य आहे. कारण आपण सर्वापेक्षां स्थूल व अतिसूक्ष्म असून सर्व इंद्रियानीं युक्त आहां तथापि सर्वांच्या मन आदिकरून इंद्रियांस अगोचर आहां, असें असून आपण या काळीं अवतार घेऊन आमच्या दृष्टिगोचर झालांत आतां आमच्या उत्कर्षाविषयीं तुह्मीं वर्तावें.

जयस्वमायायोगस्थशेषभोगजयाक्षर ॥ जयैकदंष्ट्राप्रांताग्रसमुद्धृतवसुंधर ॥ ७१ ॥

अर्थ- हे भगवन् आपण स्वकीय मायेच्या योगानें सृष्टि आदिकरून जगाचे सर्व व्यापार करीत असून स्वतः निर्विकार स्वरूपानें शेष देहावर शयन करतां आणि पूर्वी सृष्टिकाळीं हिरण्याक्षानें प्रळयोदकांत पृथ्वी बुडविली असतां तुह्मीं स्वकीय दंष्ट्रेच्या एकभागाचे अग्रावर उत्तमरीतीनें पृथ्वी धारण करून उदकांतून तिचा उद्धार केला, तस्मात् आतांही तुह्मीं आमच्या उत्कर्षाविषयीं वर्तावें.

नृकेसरिजयाराति वक्षस्थळविदारण ॥ सांप्रतंजयवि-

श्वात्मन् जयवामन केशव ॥ ७२ ॥

अर्थ- हे विश्वव्यापक केश सुशोभित वामना, आपण जसें पूर्वी नृसिंह रूप धारण करून हिरण्यकशिपु नामक देव शत्रूच्या वक्षस्थलाचें विदारण केलें, तसें सांप्रत बलिप्रभृति दैत्यांचा संहार करून आमच्या राज्यप्राप्ति आदि करून उत्कर्षा विषयीं वर्तावें.

निजमायापटच्छन्नजगन्मूर्तेजनार्दन ॥ जयाजितजयानेकस्वरूपैकविधप्रभो ॥ ७३ ॥

अर्थ- हे जनार्दना, तुमची विश्वमूर्ति जगांत व्याप्त असून ती आपल्या मायारूप वस्त्रानें आच्छादित असल्यामुळे दृष्टिगोचर होत नाहीं; आणि हे प्रभो आपण अनेक स्वरूपी असून त्या सर्व रूपांत निर्विकार एक स्थितीनें असल्यानें सर्वांस अजिंक आहां तस्मात् तुम्ही आमच्या उदयार्थ सर्वोत्कर्षानें वर्तावें.

वर्धस्ववर्धिताशेषविकारप्रकृतेहरे ॥ त्वय्येषाजगतामीशे संस्थिता धर्मपद्धतिः ॥ ७४ ॥

अर्थ- तें असें कीं, आतां आपण रूपानें दृष्टिंगत व्हावें; कारण तुम्हीं महत्तत्वादिक मायिक सर्वविकारांची वृद्धि करून ब्रह्मांड निर्माण केलें आहे. तस्मात् आपणच जगदीश्वर आहां. यास्तव धर्ममार्गाची स्थिति तुमच्याच आश्रयानें सुरक्षित चालते.

नत्वामहंनचेशानोनेंद्राद्यास्त्रिदशाहरे ॥ नज्ञातुमीशामुनयःसनकाद्यानयोगिनः ॥ ७५ ॥

अर्थ- हे हरे असें हें तुमचें अनंत माहात्म्य जाणण्याविषयीं मी सृष्टिकर्त्ता ब्रह्मा, शिव इंद्रादिक देव, सनकादिक योगी व नारदादिक सर्व मुनि हे कोणीही समर्थ नाहींत.

त्वन्मायापटसंवीतेजगत्यत्रजगत्पते ॥ कस्त्वांवेत्स्यतिसर्वेश त्वत्प्रसादंविनानरः ॥ ७६ ॥

अर्थ- कारण हे जगत्पालक सर्वेश्वरा, तुमच्या मायारूप पटानें (पडदा) वेष्टित झालेल्या या जगांत कोण पुरुष तुमच्या प्रसादावांचून तुम्हास जाणण्याविषयीं समर्थ आहे.

त्वमेवाराधितोयेनप्रसादसुमुखप्रभो ॥ सएकः केवलोदेव वेत्तित्वांनेतरेजनाः ॥ ७७ ॥

अर्थ- तर हे देवा, आपण भक्तांवर प्रसाद करण्यां विषयीं निरंतर उत्सुक आहां,

यास्तव हे प्रभो जो तुमचें आराधन करतो तोच एक तुह्मास जाणण्या विषयीं योग्य होतो; इतर लोक तुम्हास जाणण्यास समर्थ होत नाहींत.

नंदीश्वरेश्वरेशान प्रभो वर्धस्व वामन ॥ प्रभवायास्य वि-
श्वस्य विश्वात्मन् पृथुलोचन ॥ ७८

अर्थ- हे लक्ष्मीकांत प्रभो आपण आकृतीनें वामन आहां तथापि सर्व चराचर विश्वाचे आत्मा असल्यामुळें नंदीश्वर शिवाचेही ईश्वर असून उदार दृष्टि आहां; यास्तव आतां आपण या विश्वाच्या उद्‍यार्थ वृद्धिंगत व्हावें.

शौनक उवाच ॥ एवंस्तुतो हृषीकेशः स तदा वामनाकृतिः ॥
प्रहस्य भावगंभीर मुवाचाब्जसमुद्भवं ॥ ७९ ॥

अर्थ- शौनक ह्मणतात हे अर्जुना अशी ब्रह्मदेवानीं स्तुति केली असतां त्या काळीं ते सर्व इंद्रियांचे पालक वामन रूपी भगवान् हास्य करून स्वकीय नाभिकमलांतून उत्पन्न झालेल्या ब्रह्मदेवांस गंभीर अभिप्राय युक्त भाषण करतात.

स्तुतोहं भवता पूर्वमिंद्राद्यैः कश्यपेनच ॥ मयाचवः प्रतिज्ञात
मिंद्रस्य भुवनत्रयं ॥ ८० ॥

अर्थ- कीं, हे ब्रह्मदेवा, पूर्वी तूं इंद्रादिक देव व कश्यप ऋषि यानीं या कार्या विषयीं माझी स्तुति केली होती, तेव्हां मींही इंद्रास त्रिभुवनाचें राज्य यथा पूर्व देण्या विषयीं प्रतिज्ञा केली होती.

भूयश्चाहं स्तुतो देव्या तस्याश्चापि प्रतिश्रुतं ॥ यथा शक्राय
दास्यामि त्रैलोक्यं हतकंटकं ॥ ८१ ॥

अर्थ- त्यावर अदितीनें माझी स्तुति केली असतां, मी पुनः तिलाही प्रतिज्ञा पूर्वक सांगितलें कीं, ज्या रीतीनें इंद्रास निष्कंटक (शत्रुरहित) त्रैलोक्य राज्य साध्य होईल, त्या रीतीनें मी त्यास तें प्राप्त करून देईन.

सोहं तथा करिष्यामि महेंद्रो जगतः पतिः ॥ भविष्यति सह
स्राक्षः सत्यमेतद्ब्रवीमिवः ॥ ८२ ॥

अर्थ- यास्तव सहस्रनयन देवराज इंद्र हा ज्या रीतीनें त्रैलोक्याचा राजा होईल, तसा मी प्रयत्न करीन हें तुह्मासीं सत्य वचन बोलतों.

ततः कृष्णाजिनं ब्रह्मा हृषीकेशाय दत्तवान् ॥ यज्ञोपवीतं भ
गवान् ददौ तस्मै बृहस्पतिः ॥ ८३

अर्थ- नंतर ब्रह्मदेवानीं त्या सर्वेंद्रिय पालक वामनास कृष्णाजिन दिलें. आणि यो गैश्वर्य संपन्न बृहस्पतीनें त्यांस यज्ञोपवीत दिलें.

आषाढमददाद्दंडं मरीचिर्ब्रह्मणः सुतः ॥ कमंडलुं वसिष्ठ
श्च कौशं वेदमथांगिराः ॥ ८४ ॥

अर्थ- तसाच ब्रह्मपुत्र मरीचि ऋषीनें वामनास पालाश (पळसाचा) दंड दिला. आणि वसिष्ठानीं कमंडलु व अंगिराऋषीनें दर्भ पवित्र सहित वेदहे वामनास दिले.

अक्षसूत्रं च पुलहः पुलस्त्यः सितवाससी ॥ उपतस्थुश्च तं
वेदाः प्रणवोच्चार भूषणाः ॥ ८५ ॥ शास्त्राण्यशेषाणि तथा
सांख्ययोगोक्तयश्च याः ॥

अर्थ- तसेंच पुलह मुनीनें अक्षसूत्र (अक्षमाळा) व पुलस्त्य ऋषीनें दोन शुभ्रवस्त्रें हीं वामनास दिलीं. आणि आद्यंतीं प्रणवाच्या (ओंकार) उच्चारणानें शोभणारे वेद, व तशींच सांख्य योगादिक सर्व शास्त्रें हीं मूर्तिमंत त्या वामनाच्या अग्रभागीं प्राप्त होऊन त्यांची स्तुति करूं लागलीं.

स वामनो जटी दंडी च्छत्री धृतकमंडलुः ॥ ८६ ॥ सर्वदेवम
यो भूत्वा बलेरध्वरमभ्यगात् ॥

अर्थ- नंतर ते भगवान् जटाधारी वामन, दंड, छत्र व कमंडलु हे ग्रहण करून सर्व वेदयुक्त होत्साते बलीच्या यज्ञांत गमन करण्या साठीं निघाले.

यत्र यत्र पदं भूयो भूभागे वामनो ददौ ॥ ८७ ॥ ददाति भूमि
र्विवरं तत्र तत्रातिपीडिता ॥

अर्थ- तेव्हां ते वामनरूप धारी विष्णु वारंवार ज्याज्या भूभागावर चरण स्थापन करूं लागले तेथें तेथें भूमि अत्यंत पीडित होऊन खालीं जाऊं लागली.

स वामनो जडगतिर्मृदु गच्छन् सपर्वतां ॥ साब्धिद्वीपव
तीं सर्वां चालयामास मेदिनीं ॥ ८८ ॥

अर्थ- असे ते वामन रूप धारी भगवान् भारयुक्त गतीनें मंदगमन करीत असतां, सर्व पर्वत समुद्र व द्वीपें यां सहित संपूर्ण पृथ्वी सकंपित करूं लागले.

इतिश्रीमत्स्यपुराणे वामनप्रादुर्भावे पंचचत्वारिंशदुत्तर द्विशततमोऽध्यायः

२४५

शौनक उवाच ॥ सपर्वतवनामूर्वीं दृष्ट्वा संक्षोभितां बलिः ॥
पप्रच्छोशनसं शक्रं प्रणिपत्य कृतांजलिः ॥ १ ॥

अर्थ- शौनक ह्मणतात हे अर्जुना, ते समयीं पर्वत व वनें यांसहित पृथ्वी अतिकंपित झाली असें अवलोकन करून बलि हात जोडून आपल्या हिताची इच्छा करणाऱ्या शुक्राचार्यांस नमस्कार करून प्रश्न करतो.

आचार्य क्षोभमायाता साब्धिभूभृद्वना मही ॥ कस्माच्च नासुरान्भागान् प्रतिगृण्हंति वन्हयः ॥ २ ॥

अर्थ- हे गुरो, समुद्र, पर्वत व वनें यांसहित ही पृथ्वी, कोणत्या कारणानें अत्यंत कंपायमान झाली? आणि यज्ञांत असुरांस दिलेले भाग अग्नि काय कारणानें ग्रहण करीत नाहींत.

इति पृष्टोथ बलिना काव्यो वेदविदांवरः ॥ उवाच दैत्याधिपतिं चिरं ध्यात्वा महामतिः ॥ ३ ॥

अर्थ- असा बलीनें प्रश्न केला असतां वेदज्ञांतील श्रेष्ठ महाबुद्धिशाली शुक्राचार्य बहुकाल ध्यान करून पश्चात् त्या दैत्यराज बलीस भाषण करतात.

अवतीर्णो जगद्योनिः कश्यपस्य गृहे हरिः ॥ वामनेनेह रूपेण जगदात्मा सनातनः ॥ ४ ॥

अर्थ- कीं, हे राजा, जगाच्या सृष्टि आदिकरून कार्यांस आदिकारण असल्यामुळें जो जगदात्मा भक्तदुःखहरण करणारा त्या भगवंतानें प्रस्तुत वामनरूपें करून पृथ्वीवर अवतार घेतला आहे.

स एष यज्ञमायाति तव दानवपुंगव ॥ तत्पादन्यासविक्षोभादियं प्रचलिता मही ॥ ५ ॥

अर्थ- हे दानवश्रेष्ठा, तोच हा नारायण तुझ्या यज्ञांत येत आहे, त्यामुळें त्याच्या चरण स्थापनाच्या भारानें ही धरणि अतिशयें कंपितझाली आहे.

कंपंते गिरयश्चामी क्षुभितो मकरालयः ॥ नैनं भूतपतिं भूमिः समर्था वोढुमीश्वरं ॥ ६ ॥

अर्थ- आणि त्या प्रभूच्या भारानें हे सर्व पर्वत कंपायमान झाले असून मत्स्यादि जलचर प्राणिमात्रांचा निवासस्थानभूत समुद्रही क्षुब्ध (खवळला) आहे. तस्मात् ही भूमी या सर्व भूत पालक वामन रूपधारी ईश्वरास धारण क-

रण्या विषयीं संपर्थ नाहीं.

सदेवासुर गंधर्वा यक्षराक्षस किन्नरा ॥ अनेनैव धृता भू-
मिरापोऽग्निः पवनोनभः ॥ ७ ॥

अर्थ- कारण सर्व देव, असुर, गंधर्व, यक्ष, राक्षस, व किन्नर यां सहित सर्व भू-
मि, उदक, अग्नि, वायु व आकाश इत्यादिक सकल तत्वांस त्या परमेश्वरानेंच आ-
पल्या स्वरूपाचे आधारानें धारण केलें आहे.

धारयत्यखिलान्देवोमन्वादींश्चमहासुरः ॥ इयमेवजग
द्धेतोर्माया कृष्णस्य गव्हरी ॥ ८ ॥

अर्थ- आणि हा वामनरूपी स्वतंत्र महादेव, स्वायंभुवादिक चतुर्दशमनुप्र
भृति सर्व प्राणिमात्रांस धारण करतो, हीच केवळ त्या जगदादि कारण स्वरूप-
श्री कृष्णाची गहन माया आहे.

धार्यधारक भावेन ययासंपीडितं जगत् ॥ तत्संन्निधानादसुरा
भागार्हानासुरोत्तम ॥ भुंजतेनासुराभागानमीतेनैवचाग्नयः
॥ ९ ॥

अर्थ- हे असुर श्रेष्ठा, याच कृष्ण मायेनें धार्य (धारण केलेली) वस्तु, व धारक (धार
ण करणारी) वस्तु या स्वरूपानें सर्व जग अत्यंत व्याप्त केलें आहे. त्या श्रीकृष्णाचें-
आगमन प्रस्तुत तुझ्या यज्ञांत होत आहे. त्या मुळें हे असुर, यज्ञ संबंधि भागाविष-
यीं योग्य नाहींत. यास्तव हे अग्नि, असुरांस दिलेले भाग ग्रहण करीत नाहींत.

बलिरुवाच ॥ धन्योहं कृत पुण्यश्च यन्मेयज्ञपतिः स्वयं ॥ यज्ञ
मभ्यागतो ब्रह्मन् मत्तः कोन्योधिकः पुमान् ॥ १० ॥

अर्थ- असें शुक्राचार्यांनें भाषण श्रवण करतांच बलि ह्मणतो हे ब्रह्मनिष्ठ गुरो, मी
पूर्वी जन्म जन्मांतरीं बहु पुण्य संपादन केलें तेणें करून मी अत्यंत धन्य आहें कारण-
साक्षात् यज्ञपति विष्णु स्वतः माझ्या यज्ञांत येत आहे. तस्मात् मजपेक्षां श्रेष्ठ पुरुष-
अन्य कोण आहे? कोणी नाहीं.

यंयोगिनः सदायुक्ताः परमात्मानमव्ययं ॥ द्रष्टुमिच्छंतिदेवे
शं समेध्वरमुपैष्यति ॥ ११ ॥

अर्थ- कारण सर्व योगी निरंतर एकाग्रचित्तानें योगधारण करून ज्या अविना
शी देवाधिदेव परमात्म्याच्या दर्शनाची इच्छा करतात; तो भगवान् माझ्या यज्ञास सां

मत आगमन करीत आहे.

होता भागप्रदो यं च यमुद्गाता च गायति ॥ तमध्वरेश्वरं विष्णुं
मत्तः कोन्य उपेष्यति ॥१२॥

अर्थ- त्याच प्रमाणें होम करणारा ऋत्विज ज्यास यज्ञ भाग देतो; आणि उद्गाता 'य
ज्ञांतील सामगायन करणारा' यज्ञांत ज्याचें माहात्म्य उच्चस्वरानें गायन करतो तो यज्ञा
ध्यक्ष ब्रह्मादिदेवताधिपति विष्णु मज वांचून इतर कोणत्या यजमानास अतिथि रू
पानें प्राप्त होईल.

सर्वेश्वरेश्वरे कृष्णे मदध्वर मुपागते ॥ यन्मया कार्य कर्तव्यं
तन्मामादेष्टु मर्हसि ॥१३॥

अर्थ- असो परंतु ब्रह्मादिक सर्वेश्वरांचे ही ईश्वर जे वामनरूप धारी श्रीकृष्ण ते आ
तां आपल्या यज्ञांत आले असतां हे प्रसिद्ध कवीश्वरा, मी त्या भगवंताशीं कसें वर्ता
वें या विषयीं मला आज्ञा करण्यास आपण योग्य आहां.

शुक्र उवाच ॥ यज्ञभागभुजो देवा वेदप्रामाण्यतोसुर ॥ त्व
या तु दानवा दैत्या मख भाग भुजः कृताः ॥१४॥

अर्थ- ते समयीं शुक्राचार्य ह्मणतात हे असुरा, वेद प्रमाणा वरून देव यज्ञांतील
भाग ग्रहण करणारे असून तूं तर दानव व दैत्य यांस यज्ञांतील भाग ग्रहण करण्या
विषयीं अधिकारी योजले आहेस हें तूं बहु अयोग्य केलेंस.

अयं च देवः सत्त्वस्थः करोति स्थितिपालनं ॥ विसृष्टेरनु चा-
न्येन स्वयमत्ति प्रजाः प्रभुः ॥१५

अर्थ- आणि हा देव विश्व सृष्टी नंतर सत्वगुणांत राहून अन्यानें सर्वांचें स्थितिपू-
र्वक पालन करतो. व अंतीं प्रलय काळीं तो प्रभु स्वयेंच सर्व लोकांचा संहार ही करतो.

त्वत्कृते भविता नूनं देवो विष्णुः स्थितौ स्थितः ॥ विदित्वेत
न्महा भाग कुरु यत्नमनागतं ॥१६॥

अर्थ- असा हा स्वतंत्र विष्णु सांप्रत लोकांच्या संरक्षणा विषयीं प्रवृत्त अस-
ल्यामुळें तुझ्यासाठींच अवतीर्ण झाला आहे. हें जाणून हे महा भाग्यशालिन् इतः
पर कर्तव्य जो प्रयत्न असेल तो कर.

त्वया हि दैत्याधिपते स्वल्पकेपि हि वस्तुनि ॥ प्रतिज्ञा न हि
वोढव्या वाच्यं साम वृथाफलं ॥१७॥

अर्थ- तो असा कीं, हे दैत्याधिपते तूं त्या वामनाशीं अति अल्प वस्तू विषयीं ही प्रतिज्ञा न करावी. आणि त्यांशीं निष्फल असून सयुक्तिक असें भाषण यथेच्छ करावें.

नालंदातुमहंदेवदैत्यवाच्यंत्वयावचः॥ कृष्णास्यदेवभूत्यर्थं प्रवृत्तस्यमहासुर ॥१८॥

अर्थ- तसेंच हे दैत्य वंशस्थ महासुरा भक्त देवांस ऐश्वर्य प्राप्त्यर्थ प्रवृत्त झालेल्या वामन रूप विष्णूस तूं असें बोलावें कीं, हे देवा मी तुह्मांस दान करण्याविषयीं समर्थ नाहीं.

बलिरुवाच॥ ब्रह्मन्कथमहंब्रूयामन्येनापिहियाचितः॥ नास्तीतिकिमुदेवेन संसारौघाघहारिणा॥१९॥

अर्थ- ते समयीं बलि ह्मणतो कीं, हे ब्राह्मणश्रेष्ठगुरो, इतर सामान्य याचकानें याचना केली असतां त्या विषयीं ही मी नाहीं असें बोलत नाहीं तेव्हां मग जन्म मरण रूप दुःख कारक पाप समुदाय नाशक देवानें याचना केली असतां मी त्यास नाहीं असें भाषण कसें करावें.

व्रतोपवासैर्विविधैः प्रतिसंग्राह्यतेहरिः॥ सन्मेदास्यतिदेहीतिगोविंदः किमतोधिकं॥२०॥

अर्थ- कारण सर्व योगी अनेक प्रकारचीं व्रतें व उपवास यानीं उत्तम प्रकारें ज्या हरीनें आराधन करतात तो साक्षात् गोविंद जर दाना विषयीं मला याचना करील तर यापेक्षां अधिक लाभ तो कोणता आहे.

यदर्थमुपहाराद्यानपः शौचगुणान्वितैः॥ यज्ञाः क्रियंतेदेवेशः समांदेहीतिवक्ष्यति॥२१॥

अर्थ- तसेंच तप, शौच (सबाह्याभ्यंतर शुद्धि) व भूत दया दिक गुण यानीं युक्त ब्राह्मणादिक वर्ण व ब्रह्मचर्यादिक आश्रम यांतील सर्वजन ज्याच्या प्रीत्यर्थ यज्ञ पूजादिक सकल कर्मे करतात तो देवाधिदेव विष्णु, मला याचना करील काय? केली असतां महा भाग्यच समजलें पाहिजे.

तत्साधुसुकृतंकर्मतपः सुचरितंमम॥ यन्मयादत्तमीशेशः स्वयमादास्यतेहरिः॥२२॥

अर्थ- आणि तो देवाधिदेव हरी जर मी दिलेलें दान स्वतः ग्रहण करील; तर तें मा-

ह्रें कर्म व उत्तमरीतीनें आचरिलेलें तप हीं अत्युत्तम पुण्यकारक होतील.

नास्ति नास्तीत्यहं वस्येतमभ्यागतमीश्वरं ॥ यदा वंचामितं प्राप्तं वृथा तज्जन्मनः फलं ॥२३॥

अर्थ- असा तो ईश्वर स्वतः माझ्या यज्ञमंडपांत प्राप्त झाल्यावर नास्ति नास्ति असें बोलून मी त्याची वंचना केली असतां माझें तें जन्मकर्मादिक सर्व व्यर्थ होईल.

यज्ञेऽस्मिन्यदि यज्ञेशो याचते मां जनार्दनः ॥ निजमूर्धानमप्यत्र तद्दास्याम्यविचारितं ॥२४॥

अर्थ- यास्तव सकल यज्ञाधिपति तो वामनरूपी जनार्दन या यज्ञांत येऊन मला याचना करील तरमी किमपि विचार न करतां आपला मस्तकही त्यास देईन.

नास्तीति यन्मया नोक्तमन्येषामपि याचतां ॥ वक्ष्यामि कथमायाते तदनभ्यस्तमच्युते ॥२५॥

अर्थ- कारण इतर सामान्य याचकांसही मी नास्ति असें ह्मटलें नाहीं; तेव्हां तो अखंड ऐश्वर्यपूर्ण परमात्मा अतिथिरूपानें प्राप्त झाला असतां, नाहीं हें अनभ्यस्त भाषण कसें करूं.

श्लाघ्य एव हि वीराणां दानादापत्समागमः ॥ नाबाधकारि यद्दानं तदंगमलवत्स्मृतं ॥२६॥

अर्थ- आणि दुसरें कारण असें कीं, दान करण्याचे समयीं नास्ति ह्मणण्याच्या प्रसंगापेक्षां विपत्तीची प्राप्तीच श्लाघ्य आहे. तसेंच जें दान आपणास बाधाकारक झालें नाहीं, तर तें आपले अंगावरील मळ काढल्यासारखें जाणावें.

मद्राज्ये नासुखी कश्चिन्न दरिद्रो न चातुरः ॥ नाभूषितो न चोद्विग्नो न स्रगादिविवर्जितः ॥२७॥ हृष्टस्तुष्टः सुगंधिश्च तृप्तः सर्वसुखान्वितः ॥ जनः सर्वो महाभाग किमुताहं सदा सुखी ॥२८॥

अर्थ- त्याचप्रमाणें माझ्या राज्यांत कोणी दुःखी, कोणी दरिद्री, कोणी आतुर (रोगादिकांनीं ग्रस्त झालेले) किंवा कोणी भूषणहीन, अथवा कोणी भयादिकानें उद्विग्न व कोणी पुष्पमालादिकानीं रहित असे लोक सर्वथा कोणीही नाहींत. तर माझ्या राज्यांत सर्व प्रजा हर्ष, संतोष, सुगंध, तृप्ति, इत्यादिक सर्व सुखानीं युक्त आहेत तस्मात् हे महाभाग्यशालिन् शुक्राचार्य गुरो मी सदा सुखी आहें, यांत काय आश्चर्य आहे. तेव्हां

मला दान प्रसंगीं नाहीं ह्मणण्यापेक्षां त्या दान प्रसंगानें माझें स्वर्गांनन्यूनता झा लेली बरी.

एतद्विशिष्टपात्रोयंदानबीजफलंमम॥ विदितंभृगुशा र्दूलमयैतत्त्वत्प्रसादतः॥२९॥

अर्थ- आणि हा वामन तर दाना विषयीं सर्वोत्कृष्ट पात्र भूत असल्या मुळें हें पात्र सर्व दानांचें बीज (कारण) असून फल ही आहे हें सकल शास्त्र तात्पर्य मीं हे-भृगु कुल श्रेष्ठा तुमच्याच प्रसादानें जाणलें आहे.

एतद्विजानता दान बीजं पतति चेद्गुरो॥जनार्दन महापा त्रेकिंन्नप्राप्तंततोमया॥३०॥

अर्थ- तस्मात् हे गुरो, सर्वदानरूप वृक्षाचें बीजरूप हें दान जरमाझे हातून ज्ञा न पूर्वक महा पात्ररूपी जनार्दनाचे हस्त कमलावर पडेल तर मला काय एकमा प्त होणार नाहींतर सर्व फल प्राप्ति होईलच.

मत्तोदानमवाप्येशोयदिपुष्णानिदेवताः॥उपभोगाद्दश गुणंदानंश्लाघ्यतमंमम॥३१॥

अर्थ- आणि तो हा सर्वस्वामी वामन,मजपासून दान घेऊन तेणें करून दे-वांचें पोषण करील तर तें दान मला स्वकीय उपभोगा पेक्षां दश गुणित अति-शयें श्लाघ्य आहे.

मत्प्रसादपरोनूनंयज्ञेनाराधितोहरिः॥तेनाभ्येतिनसं देहोदर्शनादुपकारकृत्॥३२॥

अर्थ- कारण मीं पूर्वी जन्मजन्मांतरीं यज्ञानें हरीचें आराधन केलें ह्मणून तो भगवान् स्वकीय दर्शन मात्रानें सर्वांवर उपकार करणारा असून मजवर केव-ळ प्रसाद करण्या साठींच माझे यज्ञांत येत आहे यांत संदेह नाहीं असें मलाभा सत आहे.

अथकोपेनचाभ्येतिदेवभागोपरोधिनं॥मांनिहंतुम नाश्चेववधःश्लाघ्यतरोच्युतात्॥३३॥

अर्थ- किंवा मीं देवांचा भाग बंद केल्या मुळें हरि,कोपयुक्त मनानें माझ्या संहा-रार्थ येईल तर त्या अच्युता पासून माझा वध होणें ही गोष्ट अत्यंत श्लाघ्य-आहे.

तन्मयं सर्वमेवेदं नाप्राप्यं यस्य विद्यते ॥ समां याचितु-
मभ्येति नानुग्रहमृते हरिः ॥ ३४ ॥

अर्थ- तसेंच हें सर्व चराचर जग विष्णुमय असून कोणतीही वस्तु ज्यास दुर्लभ नाहीं; तो हरि अनुग्रहा वांचून अन्य कारणानें मला याचना करण्यास येणार नाहीं.

यः सृजत्यात्मभूः सर्वं चैतसैव च संहरेत् ॥ समां हंतुं हृषी-
केशः कथं यत्नं करिष्यति ॥ ३५ ॥

अर्थ- कारण जो परमात्मा स्वतः स्वयंभू असून केवल मनः संकल्पानेंच हें सर्व विश्व उत्पन्न करून अंतीं याचा संहार ही करतो तो सर्व इंद्रिय पालक प्रभु माझ्या वधा विषयीं किमर्थ यत्न करील.

एतद्विदित्वा न गुरो दानविघ्नकरेण च ॥ त्वया भाव्यं जग-
न्नाथे गोविंदे समुपस्थिते ॥ ३६ ॥

अर्थ- हे गुरो हें सर्व शास्त्र तात्पर्य जाणून ते गोप्रतिपालक वामन रूपी सर्व जगाचे नाथ गोविंद येथें प्राप्त झाले असतां, त्या कालीं त्यांस दान करण्याचे विषयांत तुह्मीं मला विघ्न न करावें.

शौनक उवाच ॥ इत्येवं वदतस्तस्य संप्राप्तः स जगत्पतिः ॥
सर्वदेवमयोऽचिंत्यो मायया वामनरूपधृक् ॥ ३७

अर्थ- शौनक ह्मणतात हे अर्जुना असें बलि भाषण करीत आहे. तों तत्काल सर्वदेवस्वरूपी असून आपले मायेनें वामनरूप धारण केलेले ते जगत्पालक विष्णु, बलीच्या यज्ञ मंडपांत प्राप्त झाले.

तं दृष्ट्वा यज्ञवाटांतः प्रविष्टमसुराः प्रभुं ॥ जग्मुः सभास-
दः क्षोभं तेजसा तस्य निष्प्रभाः ॥ ३८ ॥

अर्थ- तेव्हां त्या यज्ञ मंडपांत प्रविष्ट झालेल्या त्या प्रभूस अवलोकन करून-त्या सभेंतील सर्व असुर त्याच्या तेजानें निस्तेज झाल्यामुळें मनांत अत्यंत क्षोभ पावले.

जेपुश्च मुनयस्तत्र ये समेता महाध्वरे ॥ बलिश्चैवाखिलं ज-
न्म मेने सफलमात्मनः ॥ ३९

अर्थ- तसेच त्या महा यज्ञांत आलेले सर्व मुनि प्रीतियुक्त एकाग्र चित्तानें त्या वामनाच्या तेजादिक गुणांचें चिंतन करूं लागले. आणि बलीनें तर त्या कालीं

स्वकीय जन्माचें पूर्ण साफल्य मानलें.

ततः संक्षोभमापन्नो न कश्चित्किंचिदुक्तवान् ॥ प्रत्येकं दे
व देवेशं पूजयामास चेतसा ॥ ४० ॥

अर्थ- नंतर अंतःकरणांत क्षुब्ध झालेल्या असुरांतील कोणी किंचिदपि भाषण केलें नाहीं. आणि वामन दर्शनानें संतुष्ट झालेल्या तेथील सर्व सज्जनानीं प्रत्येकीं, त्या देवाधिदेवाची मनःपूर्वक पूजा केली.

अथासुरपतिं प्रव्हं दृष्ट्वा मुनिवरांश्च तान् ॥ देवदेवपतिः
साक्षी विष्णुर्वामनरूपधृक् ॥ ४१ ॥ तुष्टाव यज्ञ वन्हिंच
यजमानमथ र्त्विजः ॥ यज्ञकर्माधिकारस्थान् सदस्या
न् द्रव्यसंपदः ॥ ४२ ॥

अर्थ- पश्चात् नम्र झालेला असुरराज बलि व तेथील शुक्रादिक श्रेष्ठ मुनियांस अवलोकन करून ते वामन रूप धारी सर्वसाक्षी देवाधिदेव विष्णु त्या यज्ञांतील अग्नि, यजमान बलि, होम करणारे ऋत्विज, यज्ञ कर्मसंबंधि युक्तायुक्त विचारा विषयींच्या अधिकारावर योजलेले सदस्य (सभासद) व यज्ञ योग्य चरु पुरोडाशादिक द्रव्य संपत्ति यांची स्तुति करूं लागले.

ततः प्रसन्नमखिलं वामनं प्रति तत्क्षणात् ॥ यज्ञवाट
स्थितं वीरः साधुसाध्वित्युदीरयन् ॥ ४३ ॥

अर्थ- नंतर त्या यज्ञमंडपांतील अग्नि व ऋत्विजादिक सर्व ब्राह्मण आदि करून समग्र सज्जन मंडळ तत्क्षणीं वामना वर संतुष्ट झालें तेसमयीं तो वीर बलि, त्या भगवंतास असें वारंवार बोलला कीं, आपलें आगमन झालें हें बहुत उत्तम जाहलें.

सचार्घमादाय बलिः प्रोद्भूतपुलकस्तदा ॥ पूजयामास
गोविंदं प्राहचेदं महासुरः ॥ ४४ ॥

अर्थ- आणि तो बलि, वामन दर्शनाच्या आल्हादानें सर्वांगीं हर्ष रोमांच युक्त होत्साता त्या काळीं पूजा साहित्य आणून त्या गोविंदाची पूजा करून तो असुर श्रेष्ठ त्या भगवंतास हें पुढील भाषण बोलतो.

बलिरुवाच ॥ सुवर्णरत्नसंघातं गजाश्वममितं तथा ॥
स्त्रियो वस्त्राण्यलंकारांस्तथा ग्रामांश्च पुष्कलान् ॥ ४५

सर्वस्वं सकलामुर्वीं भवतो वाय दीप्सितं ॥ तद्दास्मिशृणु ष्वलं येनार्थी वामनः प्रियः ॥ ४६ ॥

अर्थ- कीं, हे वामना आपण मला अति प्रिय असून आज अतिथि रूपानें प्राप्त झालां; यास्तव मीं कांहीं भाषण करतों हें आपण श्रवण करावें, तें असें कीं, सुवर्ण व रत्नें यांचा समुदाय, तसेच असंख्यात गज व अश्व, स्त्रिया, वस्त्रें, अलंकार तसे बहुत ग्राम (गांव) सर्वस्व (सर्व धन) किंवा सकल पृथ्वी अथवा तुह्मास जें इच्छित असेल तें सर्व देतों

इत्युक्तो दैत्य पतिना प्रीतिगर्भान्वितं वचः ॥ प्राह सस्मित गंभीरं भगवान् वामनाकृतिः ॥ ४७

अर्थ- असें दैत्यराज बलीनें भाषण केलें असतां, ते वामना कृति भगवान् किंचित् हास्य करून प्रीति युक्त गंभीर अभिप्रायानें बलीस भाषण करतात.

ममाग्निशरणार्थाय देहि राजन् पदत्रयं ॥ सुवर्ण ग्राम रत्नानि तदर्थिभ्यः प्रदीयतां ॥ ४८ ॥

अर्थ- कीं, हे राजन्, अग्नीच्या होमशाला सिद्ध्यर्थ माझे चरणानीं त्रिपाद परिमित भूमि मला दे. आणि सुवर्ण ग्राम, व रत्नें यांची इच्छा करणारांस तीं दानें यथेच्छ कर.

बलिरुवाच ॥ त्रिभिः प्रयोजनं किं ते पादैः पदवतांवर ॥ शतं शतसहस्राणां पदानां मार्गतां भवान् ॥ ४९ ॥

अर्थ- तेव्हां बलि ह्मणतो हे बटो, तुह्मीं पूज्य चरण सर्व लोकांत श्रेष्ठ आहां तेव्हां त्रिपाद भूमीनें आपलें कार्य काय होणार. तस्मात् आपण कोट्यावधि चरण परिमित भूमि मागा.

वामनउवाच ॥ एतावतैव दैत्येंद्र कृतकृत्योस्मि मार्गतां ॥ अन्येषामर्थिनां वित्तमीहितं दास्यते भवान् ॥ ५० ॥

अर्थ- ते समयीं वामन ह्मणतात कीं, हे दैत्य राजा, त्रिपाद भूमीनेंमी कृतकृत्य आहें आणि तूं इतर कार्यार्थि सर्व याचकांस यथेच्छ धन अर्पण करीतच आहेस; परंतु मी एवढी इच्छा करीत नाहीं.

एतच्छ्रुत्वा तु गदितं वामनस्य महात्मनः ॥ ददौ तस्मै महाबाहुर्वामनाय पदत्रयं ॥ ५१ ॥

अर्थ- हें महा बुद्धिमंत वामनाचें भाषण श्रवण करून तो महा बाहु (महापराक्रमी)

बलीनें त्या वामनास त्रिपाद भूमि दान केलें.

पाणौ तु पतिते तोये वामनोऽभूदवामनः॥ सर्वदेवमयं रूपं दर्शयामास तत्क्षणात्॥ ५२॥

अर्थ- तें भूमि दानाचें उदक वामनाच्या हस्तावर पडतांच तो वामन रूपी भगवान् त त्क्षणीं स्वरूपानें वृद्धि पावून त्यानें आपलें तें सर्व देवमय रूप सर्वांस दर्शविलें.

चंद्रसूर्यौ च नयने द्यौर्मूर्धा चरणौ क्षितिः॥ पादांगुल्यः पिशाचास्तु हस्तांगुल्यश्च गुह्यकाः॥ ५३॥

अर्थ- तें असें कीं, चंद्रसूर्य हे त्या रूपाच्या नेत्रांचे आश्रयानें असून स्वर्ग, मस्तकाच्या आधारानें आहे. आणि पृथ्वी चरणाच्या आधारानें असून पिशाच हे पादांगुलीच्या आश्रयानें व गुह्यक हे हस्तांगुलींच्या आधारानें आहेत.

विश्वेदेवाश्च जानुस्था जंघे साध्याः सुरोत्तमाः॥ यक्षा नखेषु संभूता रेखाश्चाप्सरसस्तथा॥ ५४॥

अर्थ- तसेच विश्वेदेव हे त्या स्वरूपाच्या जानु (गुडघे) स्थानीं असून साध्यनाम क उत्तम देवगण हे जंघा (पोट्या) स्थानीं आहेत. आणि यक्ष, त्याच्या नखस्थानीं असून अप्सरा रेषा स्थानीं आहेत.

दृष्टी ऋक्षाण्यशेषाणि केशाः सूर्यांशवः प्रभोः॥ तारका रोमकूपाणि रोमाणि च महर्षयः॥ ५५॥

अर्थ- तशींच सर्व महा नक्षत्रें त्या प्रभूचे दृष्टि (नयन) स्थानीं असून सूर्य किरण त्याचे मस्तक संबंधि केश आहेत. आणि इतर सर्व नक्षत्रें त्याच्या रोम रंध्रस्थानीं असून नारदादिक सर्व महर्षि, त्याचे सर्वांगावरील रोमस्थानीं आहेत.

बाहवो विदिशस्तस्य दिशः श्रोत्रे महात्मनः॥ अश्विनौ श्रवणे तस्य नासा वायुर्महात्मनः॥ ५६॥

अर्थ- तश्याच पूर्वादिक दिशा त्या महास्वरूपी परमात्म्याच्या श्रोत्र (कर्ण) स्थानीं असून आग्नेया दिक् कोण दिशा त्याच्या भुजस्थानीं आहेत. तसेच अश्विनी कुमार हे त्या महात्म्याचे कर्ण स्थानीं असून वायु हा त्याच्या नासिका स्थानीं आहे.

प्रसादश्चंद्रमा देवो मनो धर्मः समाश्रितः॥ सत्यं तस्याभवद्वाणी जिव्हा देवी सरस्वती॥ ५७

अर्थ:- तसाच चंद्रमादेव, त्या भगवंताच्या प्रसादस्थानीं असून धर्म त्याच्या म न स्थानाचे आश्रयानें आहे. आणि सत्य हेंच त्याची वाणी असून सरस्वती देवीही त्याची जिव्हा आहे.

ग्रीवादितिर्देवमाता विद्यास्तद्वलयस्तथा ॥ स्वर्गद्वारमभून्मैत्रं त्वष्टापूषाच वैभ्रुवो ॥ ५८॥

अर्थ:- तशीच देवमाता अदितीही त्या देवाची ग्रीवा (मान) असून सर्व विद्याहीं त्यांचीं कडितोडे इत्यादिक हस्त भूषणें आहेत. आणि सूर्य मंडळ हें त्याच्या स्वर्ग लोकाचें द्वार असून विश्वकर्मा व पूषा नामक आदित्य हे त्याच्या भ्रुकुटि (भोंवया) आहेत.

मुखं वैश्वानरश्चास्य वृषणौतु प्रजापतिः ॥ हृदयंच परंब्रह्मपुंस्त्वंवैकश्यपो मुनिः ॥ ५९॥

अर्थ:- त्याच प्रमाणें अग्नि हा त्या परमेश्वराचें मुख असून दक्षप्रजापति हा, त्याचे अंडकोश आहेत. आणि परब्रह्म (वेद) हें त्याचें हृदय (अंतःकरण) असून कश्यप मुनि हा त्याचें पौरुष आहे.

पृष्ठेस्यवसवो देवा मरुतः सर्वसंधिषु ॥ सर्वसूक्तानि दशना ज्योतींषि विमलप्रभाः ॥ ६०॥

अर्थ:- तसेच अष्टवसु हे त्या ईश्वर स्वरूपाच्या पृष्ठ भागाचे आश्रयानें असून एकोन पंचाशत् (एकुणपन्नास) मरुद्गण नामक देव हे त्याच्या सर्व संधिस्थानीं आहेत. आणि सर्व सूक्तें व नक्षत्रें हीं त्याचे निर्मल कांतियुक्त दंत जाणावे.

वक्षस्थलंमहादेवो धैर्येचास्यमहार्णवाः ॥ उदरेचास्य गंधर्वाः संभूताश्चमहाबलाः ॥ ६१॥

अर्थ:- तसेच महादेव हे त्याचें वक्ष स्थल असून सर्व समुद्र हें त्याचें धैर्य आहे. आणि महाबलाढ्य गंधर्व हे त्याच्या उदर स्थानीं उत्तम रीतीनें आहेत.

लक्ष्मीर्मेधाधृतिः कांतिः सर्वविद्याश्चवैकटिः ॥ सर्वज्योतींषि जानीहि तस्य तत्परमंमहः ॥ ६२॥

अर्थ:- तशीच लक्ष्मी, मेधा (धारणा युक्त बुद्धि) धैर्य, कांति, व सर्वविद्या त्या त्या भगवत्स्वरूपाच्या कटीच्या (कमरेच्या) आश्रयानें असून सूर्यचंद्रादिक सर्व ज्योतिर्गण हे त्याचें उत्तम तेज आहे असें जाण.

तस्यदेवाधिदेवस्य तेजः प्रोद्भूत मुत्तमं ॥ स्तनौकुक्षीचवे
दाश्च उदरंच महामखाः ॥ ६३॥ इष्टयः पशुबंधाश्च द्वि-
जानां वीक्षितानिच ॥

अर्थ- तसेंच संपूर्ण उत्तम तेज हें त्या देवाधिदेव विष्णू पासून उत्पन्न झालें असून ऋग्वेदादिक चार वेद हे दोन स्तन व दोन्ही कुक्षी (कुशी) या चार स्थानीं क्रमानें आहेत; आणि राजसूय व अश्वमेध इत्यादिक महा यज्ञ इष्टि पशुबंध (पशुबंधनविधि) व कर्मांतील युक्तायुक्त विचारा विषयीं ब्राह्मणाची दृष्टी हीं त्या नारायणाच्या उदर स्थानीं आहेत.

तस्य देवमयंरूपं दृष्ट्वा विष्णोर्महाबलाः ॥ ६४॥ उपासर्प
तदैत्येंद्राः पतंगा इवपावकं ॥ प्रमथ्य सर्वानसुरान् पाद-
हस्ततलैर्वि भुः ॥ ६५॥ कृत्वारूपंमहाकायंजहाराशु
समेदिनीं ॥

अर्थ- असें तें विष्णूचें सर्व देवमय (देवयुक्त) रूप अवलोकन करून तेथील महा बलिष्ठ श्रेष्ठ दैत्य अग्नीवर येणाऱ्या पतंग नामक पक्ष्यां सारखे त्या वामना वर आले; तेव्हां त्या सर्वव्यापक वामनानें आपले हस्त व चरण यांच्या तळव्यानीं त्या सर्व असुरांचा संहार केला आणि तें स्वकीय रूप अतिदीर्घ गत करून त्या स्वदेहानें सर्व भूमि बळी पासून शीघ्र हरण केली.

तस्यविक्रमतो भूमिंचंद्रादित्यौस्तनांतरे ॥ ६६॥ नाभौ
विक्रममाणस्य सक्थिदेशस्थितावुभौ॥ परंविक्रमत-
स्तस्यजानुमूलेप्रभाकरौ ॥ ६७॥ विष्णोरास्तां महीपाल
देवपालन कर्मणि ॥

अर्थ- त्याकाळीं असे ते भगवान् स्वकीय महा देहानें त्रैलोक्य भूमि व्याप्त करीत असतां चंद्र व आदित्य (सूर्य) हे त्याच्या स्तन मध्य भागीं (वक्षस्थळीं) दिसूं लागले. पश्चात् तें भगवद्रूप वर व्याप्त करीत चाललें तेव्हां ते त्याच्या नाभिस्थानीं आले. नंतर ते दोघे मांड्यांचे प्रदेशीं दिसले. पुढें तें वामनरूप ऊर्ध्व लोक-व्याप्त करीत असतां, हे राजा, त्या देव पालनार्थ कर्मा विषयीं प्रवृत्त झालेल्या विष्णु रूपाच्या जानूंचे (गुडघे) अधोभागीं ते चंद्र सूर्य प्राप्त झाले.

जित्वालोकत्रयंकृत्स्नंहत्वाचासुरपुंगवान् ॥ ६८॥ पुरंद

रायत्रैलोक्यंददौविष्णुर्जगत्पतिः॥

अर्थ- असें हें संपूर्ण त्रैलोक्य आपले स्वाधीन केल्यावर तेथील असूर श्रेष्ठांस मारून त्या जगत्पालक विष्णूनीं तें त्रैलोक्यराज्य इंद्रास दिलें.

सुतलंनामपातालमधस्ताद्वसुधातलात्॥ ६९॥ बलेर्द त्तंभगवताविष्णुनाप्रभविष्णुना॥

अर्थ- आणि पृथ्वीतलाचे अधोभागीं सुतल नामें पाताल आहे. तें त्या षड्गुणैश्वर्य संपन्न स्वतः सिद्ध महाप्रताप युक्त वामन स्वरूप विष्णूनीं बलीस दिलें.

अथदैत्येश्वरंप्राह विष्णुः सर्वेश्वरेश्वरः॥ ७०॥ यत्त्वयासलिलंदत्तंगृहीतंपाणिनामया॥ कल्पप्रमाणंतस्मात्ते भविष्यत्यायुरुत्तमं॥ ७१॥

अर्थ- नंतर सर्वेश्वर ब्रह्मादिकांचेही ईश्वर स्वरूपी विष्णु त्या दैत्यराज बलीस बोलले कीं, तूंजें त्रिपाद भूमिदा नाचें दिलेलें उदक मीं स्वहस्तानें ग्रहण केलें; त्यानें तुला एक-कल्प प्रमाण उत्तम आयुष्य प्राप्त होईल.

वैवस्वते तथातीते बलेमन्वंतरे त्वथ॥ सावर्णिके तुसंप्राप्तेभवानिंद्रोभविष्यति॥७२॥

अर्थ- तसेंच हे बले हें वैवस्वत मन्वंतर गेल्यावर सावर्णि मन्वंतर प्राप्त झालें असतां त्यांत तूं इंद्रपदाचा अधिकारी होशील.

सांप्रतंदेवराजायत्रैलोक्यंसकलंमया॥ दत्तंचतुर्युगानांच साधिकाह्येकसप्ततिः॥७३॥

अर्थ- कारण सांप्रत कृत त्रेता, द्वापर व कलि याचौकडींचें एकाहत्तर पर्याय वसाडेअगरालक्षवर्षे परिमित काल पर्यंत मी देवराज इंद्रास सकल त्रैलोक्य राज्य दिलें आहे.

नियंतव्यामयासर्वेयेतस्यपरिपंथिनः॥तेनाहंपरयाभक्त्यापूर्वमाराधितोबले॥ ७४॥

अर्थ- यास्तवच इंद्राचें शत्रुत्व करणारेजे असतील त्यांचा निग्रह करणें मला अवश्य आहे; कारण हे बले पूर्वी त्यानें माझें परम भक्तीनें आराधन केलें होतें.

सुतलंनामपातालंत्वमासाद्यमनोरमं॥ वसासुरम-

मादेशं यथावत्परिपालयन्॥ ७५॥

अर्थ- तस्मात् हे बले तूं सुतल नामक रमणीय पातालांत गमन करून तेथें माझी आज्ञा यथास्थित पालन करीत होत्साता वास कर.

तत्र दिव्यवनोपेते प्रासादशतसंकुले॥ प्रोत्फुल्लपद्मसरसि स्वच्छशुद्धसरिद्वरे॥ ७६॥ सुगंधिधूपस्रग्वस्त्रवराभरणभूषितः॥ स्रक्चंदनादिमुदितो गेयनृत्यमनोरमे॥ ७७॥ पानान्नभोगान्विविधानुपभुंक्ष्व महासुर॥

अर्थ- कारण हे महासुरा तें सुतल, उत्तम वनानीं युक्त असून शतशः देवालयें व राजमंदिरें यानीं व्याप्त आहे. आणि प्रफुल्लित कमल युक्त सरोवरें व-शुद्ध असून श्रेष्ठ असे नदीप्रवाह यानीं सुशोभित असून गायन व नृत्य यानीं तें सुतल सर्वांच्या मनास रमविणारें आहे. अशा त्या सुतलांत सुगंधयुक्त धूप सुवर्णादिक माला, वस्त्रें उत्कृष्ट आभरणें यानीं तूं भूषित होत्सातां पुष्प माला व गंध इत्यादिक पदार्थांनीं संतुष्ट होऊन अन्न व उदकादिक प्राशनीय पदार्थ अशा अनेक प्रकारच्या विषयांचा उपभोग कर.

ममाज्ञया कालमिमं तिष्ठ त्वं सततं वृतः॥ ७८॥ यावत्सुरैश्च विप्रैश्च न विरोधं करिष्यसि॥ तावदेतान्महाभोगानवाप्स्यसि महासुर॥ ७९॥

अर्थ- आणि तूं माझ्या आज्ञेनें या वैवस्वत मन्वंतर समाप्तिकालपर्यंत स्वकीय असुरां सहित सतत वास कर आणि हे महासुरा, तूं यावत्काल पर्यंत देव व-ब्राह्मण यांशीं विरोध करणार नाहींस. तावत्काल पर्यंतच हे महाभोग तुला प्राप्त होतील.

यदा च देवविप्राणां विरोधं त्वं करिष्यसि॥ बंधिष्यंति तदा पाशा वारुणास्त्वामसंशयं॥ ८०॥

अर्थ- आणि ज्या कालीं तूं देव ब्राह्मणांशीं विरोध करशील, तेव्हां वरुणाचे पाश तुला निश्चयें करून बांधतील.

एतद्विदित्वा भवता मयाज्ञप्तमशेषतः॥ न विरोधः सुरैः कार्यो विप्रैर्वा दैत्यसत्तम॥ ८१॥

अर्थ- हे दैत्यश्रेष्ठा मीं आज्ञा केलेलें हें सर्व प्रकरण जाणून तूं देव किंवा ब्राह्मण यांशीं विरोध न करावा.

इत्येवमुक्तो देवेन विष्णुना प्रभविष्णुना॥ बलिः प्राह महाराज प्रणिपत्य मुदायुतः॥ ८२॥

अर्थ- हे महाराज असें स्वतःसिद्ध पराक्रम शालि तेजस्वी विष्णूनें भाषण केलें असतां, बलि हर्षयुक्त होत्साता विष्णूस नमस्कार करून बोलतो.

बलिरुवाच॥ तत्रासतो मे पाताले भगवन् भवदाज्ञया॥ किं भविष्यत्युपादानमुपभोगोपपादकं॥ ८३॥

अर्थ- कीं, हे भगवन् आपल्या आज्ञेनें मी त्या सुतल नामक पातालांत असतां, तेथें मला अन्नादिक उपभोग यासीचें साधन काय होईल.

श्रीभगवानुवाच॥ दानान्यविधिदत्तानि श्राद्धान्यश्रोत्रियाणि च॥ हुतान्यश्रद्धया यानि तानि दास्यंति ते फलं॥ ८४॥

अर्थ- ते समयीं वामनरूपी ते श्री भगवान् बोलले कीं, हे असुराधिपते, अविधीनें दिलेलीं दानें वेदाध्ययन रहित ब्राह्मणयुक्त श्राद्धें व नास्तिक बुद्धीनें केलेले होम हीं लोकांचीं कर्में तुला अन्नादिक सर्व उपभोग रूप फल देतील.

अदक्षिणास्तथा यज्ञाः क्रियाश्चाविधिना कृताः॥ फलानि तव दास्यंति अधीतान्यव्रतानि च॥ ८५॥

अर्थ- तसेच दक्षिणाहीन यज्ञ, अविधीनें केलेल्या स्नान संध्यादिक क्रिया व मौंजी बंधनादिक नियम धारणा वांचून केलेलीं वेदादिक अध्ययनें हीं लोकांचीं कर्में तुला उपभोग यासी विषयीं फलरूप होतील.

शौनक उवाच॥ बलेर्वरमिमं दत्वा शक्राय त्रिदिवं तथा॥ व्यापिनानेन रूपेण जगामादर्शनं हरिः॥ ८६॥

अर्थ- शौनक ह्मणतात हे अर्जुना असा बलीस वर व तसाच इंद्रास स्वर्ग देऊन त्या सर्वव्यापक रूपानें वामन रूपी हरि गुप्त झाले.

प्रशशास यथापूर्वमिंद्रस्त्रैलोक्यपूजितः॥ सिषेवेच परान् कामान् बलिः पाताल संस्थितः॥ ८७॥

अर्थ- नंतर इंद्र त्रैलोक्य पूजित होत्साता यथापूर्व त्रैलोक्याचें पालन करूं

लागला. तसाच बलिही सुतल नामक पातालांत उत्तम स्थितीनें वास करीत असून उत्कृष्ट विषय भोगूं लागला.

इहैवदेवदेवेनबद्धोसौदानवोत्तमः॥ देवानांकार्यकरणे भूयोपिजगतिस्थितः॥ ८८॥

अर्थ- असा देवकार्य सिद्ध्यर्थ देवाधिदेव विष्णूनें दान व श्रेष्ठ बलीस त्याच भूलोकीं बांधिलें आणि तो भगवान् पुनः या जगांत देवांचें कार्य करण्या साठीं पुनः ही सांप्रत कालीं रूपांतरानें राहिला आहे.

संबंधीते महाभाग द्वारकायांव्यवस्थितः॥ दानवानां-विनाशाय भारावतरणायच॥ ८९॥

अर्थ- तो असा कीं, हे महाभाग्य शालिन् अर्जुना, तोच विष्णु सत्कुल तुझा संबंधी होऊन दानवांचा नाश करून भूभार हरणार्थ श्रीकृष्ण रूपानें द्वारकेंत वास-करीत आहे.

यतो यदुकुले कृष्णो भवतः शत्रुनिग्रहे॥ सहायभूतः सारथ्यं करिष्यति बलानुजः॥ ९०॥

अर्थ- तो श्रीकृष्ण यदुकुलांत अवतीर्ण झाला आहे. यास्तव तो बलरामाचा कनिष्ठ बंधु तुझ्या शत्रुनिग्रहाविषयीं साहाय्य होऊन तुझें सारथ्यही करील.

एतत्सर्वसमाख्यातंवामनस्यच धीमतः॥ अवतारं महावीर श्रोतुमिच्छोस्त्वयार्जुन॥ ९१॥

अर्थ- हे महावीर अर्जुना, महाबुद्धिशालि वामनाचें अवतार चरित्र तुला श्रवण करण्याची इच्छा होती यास्तव मीं हें सर्व वामन चरित्र तुला उत्तम रीतीनें-कथन केलें.

अर्जुनउवाच॥ श्रुतवानिहते पृष्टं माहात्म्यंकेशवस्यच॥ गंगाद्वारमितोयास्याम्यनुज्ञांदेहिमेविभो॥ एवमुक्त्वा ययौपार्थो नैमिषंशौनकोगतः॥ ९२॥

अर्थ- पश्चात् अर्जुन ह्मणतो हे समर्थ शौनक मुने मी आपणांस विचारलेलें केशवाचें माहात्म्य तुझ्यापासून श्रवण केलें. इत उत्तर मी गंगाद्वार यात्रेस गमन करणार आहें. यास्तव आतां आपण मला आज्ञा द्यावी असें भाषण करून कुंती पुत्र अर्जुन गंगाद्वारास गेला आणि शौनक ऋषि नैमिषारण्यांत

गेले.

सूतउवाच ॥ इत्येतद्देवदेवस्यविष्णोर्माहात्म्यमुत्तमं ॥ वामन
स्यपठेद्यस्तु सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ९३ ॥

अर्थ- सूत ह्मणतात ऋषीहो असें हें देवाधिदेव विष्णूचें वामनावतार संबंधि उत्तम माहात्म्य जो पठन करील तो सर्व पापांतून मुक्त होतो.

बलिप्रल्हादसंवादं मंत्रितं बलिशुक्रयोः ॥ बलेर्विष्णोश्च
थितं यः स्मरिष्यति मानवः ॥ ९४ ॥

अर्थ- तसाच बलि व प्रल्हाद यांचा संवाद, बलि व शुक्राचार्य यांचें परस्परें विचारानें भाषण आणि वामन रूपी विष्णूनीं बलीस केलेली आज्ञा हें सर्व जो मानव स्मरण करील.

नाधयो व्याधयस्तस्य नच मोहाकुलं मनः ॥ भविष्यति-
कुरुश्रेष्ठ पुंसस्तस्य कदाचन ॥ ९५ ॥

अर्थ- त्यास आधि (मानसिक व्यथा) व्याधि (रोग) होणार नाहींत. आणि हे कुरुश्रेष्ठा, त्या पुरुषाचें मन कदापि मोहानें व्याकुल होणार नाहीं.

च्युतराज्यो निजं राज्यमिष्टाभिंत्र वियोगवान् ॥ अवाप्नो
ति महाभागो नरः श्रुत्वा कथामिमां ॥ ९६ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो महा भाग्यशाली पुरुष, ही वामनावतार संबंधि कथाश्रवण करील तो राज्या वरून पदच्युत झाला असला तरी त्यास स्वराज्य प्राप्ति होते. आणि ज्यास प्रिय वस्तूचा वियोग झाला असेल त्यास त्या इष्ट वस्तूचा संयोग घडतो. इतिश्री मत्स्यपुराणे वामन प्रादुर्भावो नाम षट्चत्वारिंशदुत्तर द्विशततमोध्यायः ॥ २४६ ॥

अध्याय २४७.

अर्जुनउवाच ॥ प्रादुर्भावान्पुराणेषु विष्णोरमिततेजसः ॥
सतां कथयतां विप्र वाराह इति नः श्रुतं ॥ १ ॥

अर्थ- पुनः अर्जुन प्रश्न करतो कीं, हे ब्रह्म ज्ञान संपन्न शौनका, बहुत पुराणांत वर्णिलेले अप्रतिम तेजस्वि विष्णूचे अवतार कथन करणाऱ्या सत्पुरुषां पासून मी त्यांचा वराह नामें एक अवतार श्रवण केला आहे.

जानेन तस्य चरितं न विधिं नच विस्तरं ॥ न कर्मगुणसं

स्थानंनचाप्यंतंमनीषिणः॥२॥

अर्थ- परंतु मी त्या वराहावतार संबंधि चरित्र व निमित्त हें विस्तारानें कांहींएक जाणत नाहीं, कारण महाज्ञानीही त्याचें कर्म व गुण यांनी उत्तम स्थिति साकल्यानें जाणण्या विषयीं समर्थ नाहींत.

किमात्मकोवराहोसौकिंमूर्त्तिः कास्यदेवता॥ किंप्रमाणः किंप्रभावः किंवातेनपुराकृतं॥३॥

अर्थ- तस्मात् या वराहाचें मूलरूप कोणतें असून याची आकृति, त्याची देवता, तिचें प्रमाण, त्याचा पराक्रम व त्यानें पूर्वी काय चरित्र केलें?

एतन्मेशंसतत्वेन वाराहंश्रुतिविस्तरं॥ यथार्हंच समेतानां द्विजातीनां विशेषतः॥४॥

अर्थ- आणि येथें मिळालेल्या या ब्राह्मणांसही विशेषें करून यथा योग्यतानुरूप श्रवणांत विस्तारानें येण्या सारखें यथार्थ रीतीनें वराहचरित्र आपण मला कथन करा.

शौनकउवाच॥ एतत्तेकथयिष्यामि पुराणंब्रह्मसंमितं॥ महावराहचरितं कृष्णस्याद्भुतकर्मणः॥५

अर्थ- ते समयीं शौनक सांगतात हे अर्जुना, अद्भुत चरित्रें करणाऱ्या श्रीकृष्णाचें महावराहावतार संबंधि चरित्र युक्त हें वेदतुल्य पुराण तुला कथन करतों.

यथानारायणोराजन् वाराहंवपुरास्थितः॥ दंष्ट्रयागांसमुद्रस्थामुज्जहारारिमर्दनः॥६

अर्थ- तें असें कीं, हे राजन् जसें शत्रुमर्दन नारायणानें वराहरूप धारण करून स्वदंष्ट्रेनें (दाढ) पूर्वी हिरण्याक्षानें समुद्रांत नेलेल्या पृथ्वीचा उद्धार केला.

छंदोगीभिरुदाराभिः श्रुतिभिः समलंकृतः॥ मनःप्रसन्नतां कृत्वा निबोधविजयाधुना॥७॥

अर्थ- आणि गायत्री आदिकरून छंदयुक्त श्रेष्ठ श्रुति वाक्यानीं तूं उत्तम-अलंकृत आहेस; यास्तव तूं मनस्वस्थ करून याकालीं श्रवण कर.

इदंपुराणंपरमं पुण्यंवेदैश्चसंमितं॥ नानाश्रुतिसमायुक्तं नास्तिकायनकीर्तयेत्॥८॥

अर्थ- कारण हें पुराण अनेक श्रुति वाक्यानीं युक्त असून सर्व वेदांसमान अस-

त्यामुळें परम पुण्यकारक आहे; यास्तव हें नास्तिकांस कथन न करावें.

पुराणंवेदमखिलं सांख्यं योगंच वेद्यः ॥ कार्त्स्न्येन विधिना प्रोक्तं सौख्यार्थं वै वदिष्यति ॥ ९ ॥

अर्थ- आणि संपूर्ण विधीनें सांगितलेलें पुराण, सर्व वेद, सांख्य व योग हीं जो वक्ता जाणतो तो सज्जनांस सौख्य होण्या साठीं कथन करतो.

विश्वेदेवास्तथासाध्या रुद्रादित्यास्तथाश्विनौ ॥ प्रजानां पतयश्चैवसप्तचैवमहर्षयः ॥१०॥ मनःसंकल्पजाश्चैव पूर्वजा ऋषयस्तथा ॥ वसवो मरुतश्चैव गंधर्वायक्षराक्षसाः ॥ ११॥ दैत्याः पिशाचानागाश्च भूतानि विविधानिच ॥ ब्राह्मणाः क्षत्रियावैश्याः शूद्राम्लेच्छाश्चयेभुवि ॥१२॥ चतुष्पदानिसर्वाणितिर्यग्योनिशतानिच ॥-जंगमानिचसत्वानियच्चान्यज्जीवसंज्ञितं ॥ १३॥ पूर्णे युगसहस्रेतु ब्राह्मेहनितथागते ॥ निर्वाणेसर्वभूतानां-सर्वोत्पातसमुद्भवे ॥ १४॥ हिरण्यरेतास्त्रिशिखस्ततो भूत्वावृषाकपिः ॥ शिखाभिर्विधमल्लोकानशोषयन वन्हिना ॥ १५ ॥

अर्थ- तें असें कीं, विश्वेदेव, साध्यगण, एकादशरुद्र, द्वादशादित्य, अश्विनीकुमार, दक्षादिक प्रजापति, सप्तमहर्षि, तसेंच ब्रह्मदेवांच्या मनःसंकल्पा पासून-उत्पन्न झालेले सर्वांचे पूर्वज सनकादिक ऋषि, अष्टवसू, एकुण पन्नास मरुद्गण, गंधर्व, यक्ष, राक्षस, दैत्य, पिशाच, नाग, अनेक प्रकारचीं भूतें, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, म्लेच्छ (यवन), तशींच पृथ्वीवरील सर्व चतुष्पद (चारपायांचीं) श्वापदें, इतर पक्षपक्ष्यादिक अनंत तिर्यग्योनि (ज्ञानरहित जाति) गमन करणारे प्राणिमात्र व तसेंच यांवांचून अन्य प्राणिमात्र हे सर्वही कृतादिक चार युगाच्या एक सहस्र चौकड्या परिमित काल पूर्ण होऊन ब्रह्मदेवांचा दिवस गेला असतां सर्व प्राणिमात्रांचा प्रलय काल प्राप्त झाला; ते समयीं प्रलय संबंधि संपूर्ण उत्पात उत्पन्न झाल्यावर साक्षात् विष्णूच स्वतः तीन ज्वाला युक्त अग्निरूपी होऊन त्यास्वकीय ज्वालानीं सर्व लोकांस प्रज्वलित करून त्या अग्नि रूपानें सर्वांस भस्म केलें.

दह्यमानास्ततस्तस्य तेजोराशिभिरुद्धतैः ॥ विवर्णवर्णा दग्धांगा हतार्चिष्मद्भिराननैः ॥ १६ ॥ सांगोपनिषदो वेदा इतिहासपुरोगमाः ॥ सर्वविद्याः क्रियाश्चैव सर्वधर्मपरायणाः ॥ १७ ॥ ब्रह्माणमग्रतः कृत्वा प्रभवं विश्वतोमुखं ॥ सर्वदेवगणाश्चैव त्रयस्त्रिंशत्तु कोटयः ॥ १८ ॥ तस्मिन्नहनि संप्राप्ते तं हंसमहदक्षरं ॥ प्रविशंति महात्मानं हरिं नारायणं प्रभुं ॥ १९ ॥

अर्थ- नंतर ते सर्व लोक त्या विष्णुरूपी अग्नी पासून निघालेल्या तेज समुदायानीं दाह पावले. आणि त्या दाहाच्या योगानें त्या लोकांचे शरीरांचा वर्ण-विपरीत होऊन तीं त्यांचीं अंगें दग्ध होऊं लागलीं तेव्हां अग्निरूपी विष्णूच्या ज्वाला युक्त मुखानीं ते सर्व लोक नाश पावले. त्या काळीं शिक्षादिक सर्व वेदांगें व उपनिषदें, यांसहित वेद, भारतादिक इतिहास प्रभृति सर्व विद्या, यज्ञादिक-क्रिया व संपूर्ण धर्मा विषयीं अति तत्पर समग्र ते हे तीस कोटी देवगण, ब्रह्मदेवास अग्रभागीं करून ते सर्वही प्राप्त झालेल्या त्या प्रलय दिवशीं महात्मस्वरूपी नारायण प्रभूच्या रूपांत प्रवेश करतात; कारण तो हरिच सर्व ब्रह्मादिकांचें उत्पत्तिस्थान असून सर्वव्यापक हंसरूपी (पुण्यपापादिकांचा विभाग करणारा), सर्वांपेक्षां श्रेष्ठ व कालत्रयीं निर्विकार स्वरूप स्थितीनें विराजमान-असतो.

तेषां भूयः प्रवृत्तानां निधनोत्पत्तिरुच्यते ॥ यथा सूर्यस्य सततमुदयास्तमनेऽरिह ॥ २० ॥

अर्थ- पश्चात् ते ब्रह्मादिक सर्व चराचर लोक, सृष्टिक्रमांत प्राप्त झाले असतां, त्यांचें वारंवार जन्ममरण जसे निरंतर या लोकीं सूर्याचे उदय व अस्त हे होतात तसें घडतें.

पूर्णे युगसहस्रांते कल्पो निःशेष उच्यते ॥ यस्मिन् जीवकृतं सर्वं निःशेषं समतिष्ठत ॥ २१ ॥

अर्थ- या प्रमाणें चार युगांचा एक पर्याय अशा महायुगाचे सहस्र पर्याय पूर्ण झाले असतां त्यांचे अंतीं, एक कल्प पूर्ण होतो. हा ब्रह्मदेवाचा एक दिवस जाणावा. या ब्रह्मदेवाच्या दिवसाचे अंतीं झालेल्या प्रलयांत जीवानीं पूर्वी के-

ले लें सर्व कर्म निःशेष लीन होतें.

संहृत्य लोकानखिलान्सदेवासुरमानुषान् ॥ कृत्वासु
संस्थां भगवानास्त एको जगद्गुरुः ॥ २२

अर्थ- अशा रीतीनें देव, असुर व मानव यांसहित सर्व लोकांचा, संहार द्वारा नाश करून सर्व जगाचा गुरु भगवान् त्या काळीं स्वयें एकाकी असतो.

सस्रष्टासर्वभूतानांकल्पांतेषुपुनःपुनः ॥ अव्ययःशा
श्वतोदेवोयस्यसर्वमिदंजगत् ॥ २३

अर्थ- तोच नारायण प्रति कल्पाचे अंतीं पुनःपुनः सर्व प्राणिमात्रांस उत्पन्न करतो. तो देव स्वतः सर्व काळीं नाशरहित असल्यामुळें हें संपूर्ण चराचर जग त्याच्या स्वाधीन आहे.

नष्टार्ककिरणेलोकेचंद्रग्रहविवर्जिते ॥ त्यक्तधूमाग्निप
वनेक्षीणयज्ञवषट्क्रिये ॥ २४ ॥ अपक्षिगणसंपाते
सर्वप्राणिहरेपथि ॥ अमर्यादाकुलेरौद्रेसर्वतस्तमसा-
वृते ॥ २५ ॥ अदृश्येसर्वलोकेस्मिन् अभावेसर्वकर्म-
णां ॥ प्रशांतेसर्वसंपातेनष्टेवैरपरिग्रहे ॥ २६ ॥ गतेस्व
भावसंस्थानेलोकेनारायणात्मके ॥ परमेष्ठीहृषीकेशः
शयनायोपचक्रमे ॥ २७

अर्थ- नसेच सूर्य किरण, चंद्र, गुरुशुक्रादिक सर्व ग्रह, धूम (धूर), अग्नि व वायु यानीं तो सर्वलोक, रहित झाला असतां त्या काळीं तेथें यज्ञसंबंधि वषट्कारादिक सकलक्रिया लुप्त झाल्या असून पक्षि गणांचा संचार सर्वथा नसतां, अशा त्या सर्व प्राणि नाशक स्थितीत कोणतीही धर्मादिक मर्यादा नसून सर्वत्र तमानें (अंधकार) व्याप्त झालेल्या त्या भयंकर सर्व अदृश्य लोकांत सर्व कर्मांचा अभाव होऊन संपूर्ण प्राणि मात्रांचा संचार नाहींसा झाल्यामुळें त्यांचें परस्पर वैर व निवासस्थान ही नष्ट झालें असतां सर्व लोक, स्वसत्तात्मक उत्तम निर्विकार स्थितीनें सर्वदा रहाणाऱ्या नारायणाच्या स्वरूपीं लय पावल्यावर तोच परब्रह्मस्वरूपी सर्व इंद्रियाधिपति नारायण शयन करण्या विषयीं उपक्रम करूं लागला.

पीतवासालोहिताक्षःकृष्णोजीमूतसन्निभः ॥ शि-

खासहस्त्रविकचजटाभारंसमुद्वहन् ॥ २८ ॥ श्रीव-
त्सलक्षणधरंरक्तचंदनभूषितं ॥ वक्षोबिभ्रन्महा
बाहुः सविष्णुरिवतोयदः ॥ २९ ॥

अर्थ- तो नारायण स्वरूपी विष्णु सजल मेघासमान श्याम सुंदर व आरक्त नयन असून त्यानें पीतांबर परिधान केला आहे. आणि तो महाभुज स्वकीय मस्तकां वरील अनंत शिखांच्या प्रफुल्लित सुंदर जटाभारानें शोभत असून त्याचें वक्षस्थल श्री वत्सलांछन सहित आरक्त वर्ण केशरीगंधाच्या उटीनें भूषित आहे.

पुंडरीकसहस्त्रेणस्रगस्यशुशुभेशुभा ॥ पत्नीचास्यस्व
यंलक्ष्मीर्देहमावृत्यतिष्ठति ॥ ३० ॥

अर्थ- तशीच सहस्त्र शुभ्र कमलांची उत्तम माला त्या भगवंताच्या कंठांत अतिशयें शोभत आहे. आणि त्याचीपत्नी साक्षात् लक्ष्मी स्वयें त्याच्या देहास आलिंगन करून सर्वदा रहात आहे.

ततःस्वपितिशांतात्मासर्वलोकशुभावहः ॥ किमप्य-
मितयोगात्मानिद्रायोगमुपागतः ॥ ३१ ॥

अर्थ- असा तो सर्व लोक कल्याण कर्ता शांत रूपी भगवान् अपरिमित-योगांचा नियंता असून प्रलयानंतर योग निद्रेचा अंगीकार करतो.

ततोयुगसहस्रेतुपूर्णेसपुरुषोत्तमः ॥ स्वयमेवविभुर्भू
त्वाबुध्यतेविबुधाधिपः ॥ ३२ ॥

अर्थ- पश्चात् त्या ब्रम्हदेवाच्या दिवसा इतकाच हजार चौकड्या परिमित रात्रीचा पूर्ण काल गेला असतां, तो देवाधिदेव पुरुषोत्तम स्वतः च सर्वांचा प्रभु असल्या मुळें जागृत होतो.

ततश्चिंतयतेभूयः सृष्टिंलोकस्यलोककृत् ॥ नरान्दे
वगणांश्चैवपारमेष्ठ्येनकर्मणा ॥ ३३ ॥

अर्थ- नंतर सर्व लोक कर्ता ईश्वर पुनः लोक सृष्टि विषयीं चिंतन करून मानव व देव गण यांस सृष्टि करण्याच्या रीतीनें उत्पन्न करतो.

ततः संचिंतयन्कार्यंदेवेषुसमितिंजयः ॥ संभवंसर्वलो
कस्यविदधातिसतांगतिः ॥ ३४ ॥

अर्थ- नंतर साधूंचे परमगति असून देवगणांत श्रेष्ठ सभ्य विष्णु सृष्टि कार्याचें

उत्तम रीतीनें चिंतन करून इच्छामात्रानें सर्व लोकांस उत्पन्न करतो.

कर्ताचैवविकर्ताचसंहर्तावैप्रजापतिः ॥ नारायणः परंस-
त्यंनारायणः परंपदं ॥ ३५ ॥

अर्थ— कारण नारायणच परम सत्य स्वरूप असल्या मुळें तोच सर्वांस परम आ श्रय आहे; तस्मात् तोच देव महत तत्वादिक सर्व सूक्ष्म तत्वांस उत्पन्न करून त्यां-च्या दृष्टीनें ब्रम्हांडादिक संपूर्ण स्थूल देह सृष्टि उत्पन्न केल्यावर त्या प्रजांचें-पालन करून अंतीं सर्वांचा संहार ही करतो.

नारायणः परोयज्ञोनारायणः परागतिः ॥ सस्वयंभूरि-
तिज्ञेयः सस्रष्टाभुवनाधिपः ॥ ३६ ॥

अर्थ— या वरून नारायणच श्रेष्ठ यज्ञ मूर्ति असल्यानें तोच उत्तम गति आहे. तस्मात् तोच देव स्वयंभू असून सर्व ब्रम्हादिकांस उत्पन्न करतो; यास्तव तो नारा यणच सर्व भुवनांचा अधिपति आहे. असें जाणावें.

ससर्वमितिविज्ञेयोह्येषयज्ञः प्रजापतिः ॥ यद्वेदितव्यंत्रि
दशैस्तदेषपरिकीर्त्यते ॥ ३७ ॥

अर्थ— तस्मात् हा संपूर्ण प्रजापालक यज्ञ मूर्ति नारायणच सर्व व्यापक असल्या व रून समग्र देवानीं जाणण्यास योग्यजें तत्वतोच परमात्मा नारायण आहे असें वेदा दिक सकल शास्त्रांत वर्णिलें आहे.

यत्तुवेद्यंभगवतोदेवाअपिनतद्विदुः ॥ प्रजानांपतयः सर्वेऋ
षयश्चसहामरैः ॥ ३८ ॥ नास्यांतमधिगच्छंतिविचिन्वंतइ
तिश्रुतिः ॥ यदस्यपरमंरूपंनतत्पश्यंतिदेवताः ॥ ३९ ॥

अर्थ— तसेंच त्या भगवंतानें जाणलेलें जें तत्व तें देवही जाणत नाहींत. तसेंच द-क्षादिक प्रजापति, ब्रम्हादिक देवांसहित नारद प्रभृति सर्व ऋषि हे सर्वदा अतिशयि-त मननादिक उपायानीं शोध करीत असून त्यांसही भगवत्स्वरूप माहात्म्याचा अं-त लागत नाहीं असें श्रुतींत प्रतिपादन केलें आहे. आणि याभगवंताचें जें मुख्य स्वरूप आहे. त्यारूपाचें दर्शनास देवताही समर्थ नाहींत.

प्रादुर्भावेतुयद्रूपंतदर्चंतिदिवौकसः ॥ दर्शितंयदितेनैव
तदवेक्ष्यंतिदेवताः ॥ ४० ॥

अर्थ— तर नारायणानें भक्तवात्सल्यें करून जर स्वकीय रूप अवतारांत दाख-

विलें तरच स्वर्गवासी संपूर्ण देवतातें रूप अवलोकन करून त्याचें पूजन करतात.

यन्नदर्शितवानेष कस्तदन्वेष्टुमीहते ॥ ग्राम्याणांसर्वभू-
तानामग्निमारुतयोर्गतिः ॥ ४१ ॥

अर्थ-. तस्मात् अग्नि व वायु यांस गतिदायक हा परमेश्वर जें आपलें रूप दाखवीत नाहीं तें रूप अवलोकन करण्या विषयीं ग्राम्य (विषय) सर्वप्राणिमात्रांत कोण समर्थ होईल कोणीही होणार नाहीं.

तेजसस्तपसश्चैवनिधानममृतस्यच ॥ चतुराश्रमध-
र्मेशश्चातुर्होत्रफलाशनः ॥ ४२ ॥ चतुःसागरपर्यंत-
श्चतुर्युगनिवर्तकः ॥ तदेषसंहृत्यजगत्कृत्वागर्भस्थ
मात्मनः ॥ मुमोचांडंमहायोगीधृतंवर्षसहस्रकं ॥-
॥ ४३ ॥

अर्थ- कारण तो परमात्मा पूर्ण तेज, तप व मोक्ष यांचा केवल निधि असून: ब्रम्हचर्यादिक चार आश्रम संबंधि धर्मांचा स्वामी व चार होम करणाऱ्या ऋत्विजानीं केलेल्या यज्ञादि कर्मांचा मुख्यत्वें फल भोक्ता आहे. आणि तो महायोगी नारायण स्वकीय रूपानें चारी समुद्रांस व्याप्त करून कृतादिक चतुर्युगांचे पर्याय सर्वदा वारंवारचक्रवत् फिरविणारा असून प्रलय कालीं सर्व जगाचा संहार करून तें आपल्या उदरांत घेऊन एक सहस्र वर्ष पर्यंत धारण केलेलें ब्रम्हांड उत्पन्न करतो.

सुरासुरद्विजभुजगाप्सरोगणैर्द्रुमौषधिक्षितिधरयक्ष-
गुह्यकैः ॥ प्रजापतिःश्रुतिभिरसंकुलंतदासवैसृजज्जग
दिदमात्मनाप्रभुः ॥ ४४ ॥

अर्थ- नंतर या ब्रम्हांडांत देव, असूर, ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य सर्व, पक्षिगण, नाग, अप्सरागण, वृक्ष, औषधिगण, पर्वत, यक्ष, गुह्यक इत्यादिक हें सर्व चराचर-जग परस्परें आकृत्यादिकानीं भिन्न असें त्याकालीं सर्व प्रजापालक प्रभूनें स्वतः संपूर्ण श्रुतीं सहवर्तमान उत्पन्न केलें. इतिश्री मत्स्यपुराणे वराहप्रादुर्भावो नाम सप्तचत्वारिंशदुत्तर द्विशततमो ऽध्यायः ॥ २४७ ॥

अध्याय २४८ वा.

शौनकउवाच ॥ जगदंडमिदंपूर्वमासीद्दिव्यंहिरण्मयं ॥

प्रजापतेरियंमूर्तिरितीयंवैदिकीश्रुतिः॥१॥

अर्थ- शौनक म्हणतात हे अर्जुना, सर्व जगाचें निवासस्थान भूत ब्रम्हांड हें पूर्वी उत्तम सुवर्ण मय असून सर्व प्रजापालक विष्णूचें प्रतिमा स्थान आहे. अशी ही वेदश्रुति प्रसिध्ध प्रमाण आहे.

तत्तुवर्षसहस्रांतेबिभेदोर्ध्वमुखंविभुः॥लोकसर्जनहेतोस्तुबिभेदाधोमुखंनृप॥२॥

अर्थ- हे राजा नंतर एकसहस्र वर्षांचे अंतीं व्यापक विष्णूनें सर्व लोकांस उत्पन्न करण्या साठीं त्या ब्रम्हांडास एक उर्ध्व भागीं व एक अधोभागीं अशीं दोन छिद्रें पाडलीं.

भूयोष्टधाविभेदांडंविष्णुर्वैलोकजन्मकृत्॥चकारजगतश्चात्रविभागंसविभागकृत्॥३॥

अर्थ- तसेंच लोकांस उत्पन्न करणाऱ्या विष्णूनें त्या ब्रम्हांडास पुनः आठ छिद्रें करून त्यांत लोकांची विभागानें स्थिति होण्या साठीं त्या ब्रम्हांडांत स्थल विभाग केला.

यच्छिद्रमूर्ध्वमाकाशंविवराकृतितांगतं॥विहितंविश्वयोगेनयदधस्तद्रसातलं॥४॥

अर्थ- तो असाकीं, उर्ध्व भागींजें छिद्र झालें तें आकाश विवराकृति झालें. आणि अधोभागीं विष्णूनें जे छिद्र केलें तें रसातल झालें.

यदंडमकरोत्पूर्वंदेवोलोकचिकीर्षया॥तत्रयत्सलिलंस्कन्नंसोभवत्कांचनोगिरिः॥५॥

अर्थ- तसेंच पूर्वी विष्णूनें जे ब्रम्हांड, लोक रचनेच्या इच्छेनें उत्पन्न केलें होतें, त्यांत जें उदक स्रवलें तो सुवर्ण मय मेरु पर्वत झाला.

टीपः- पूर्वी वामन चरित्र वर्णनाचे अंतीं शौनक मुनि नैमिषारण्यांत गेले. व अर्जुन गंगा द्वार यात्रेस गेला असें सांगितलें. परंतु हें वराहावतार चरित्रा नंतर समजावें. कारण पूर्वी अर्जुनानें वामन व वराह या दोन अवतारचे चरित्रा विषयीं प्रश्न केला आहे. आणि पुराणांत कालक्रम व्यासानें सांगण्याची अशी एक रीति ही आहे.

शैलैः सहस्रैर्महतीमेदिनी विषमाभवत् ॥ तैश्च पर्वतजालौघैर्बहुयोजनविस्तृतैः ॥ ६ ॥ पीडितागुरुभिर्देवी व्यथितामेदिनी तदा ॥ महामते भूरिबलं दिव्यं नारायणात्मकं ॥ ७ ॥ हिरण्मयं समुत्सृज्य तेजोवै जातरूपिण ॥ अशक्ता वै धारयितुमधस्तात्प्राविशत्तदा ॥ ८ ॥

अर्थ- तशीच पृथ्वीही महाविशाल असून अनेक सहस्र पर्वतांनीं विषम झाली - आणि त्या बहुयोजन विस्तीर्ण पर्वतांचे समुदायानीं पीडित झाल्यामुळें ती पृथ्वी देवी ज्या कालीं व्यथित झाली; त्या कालीं हे महा बुद्धिमन् अर्जुना, तें नारायणाचें दिव्य सुवर्ण मय अग्निरूप महाबलिष्ठ तेज धारण करण्या विषयीं असमर्थ - झाली असतां त्या तेजाचा त्याग करून ती पृथ्वी अधोभागीं जाऊं लागली -

पीड्यमाना भगवतस्तेजसा तस्य सा क्षितिः ॥ पृथ्वीं विशतीं दृष्ट्वा तु तामधो मधुसूदनः ॥ ९ ॥ उद्धारार्थं मनश्चक्रे तस्या वै हितकाम्यया ॥ १० ॥

अर्थ- अशीती धरणि त्या भगवंताच्या तेजानें पीडित होऊन अधो भागीं जात आहे असें अवलोकन करून मधु दैत्य संहारक विष्णूनें तिच्याच हितार्थ तिचा उद्धार करण्या विषयीं मनांत आणलें.

भगवानुवाच ॥ मत्तेज एषा वसुधा समासाद्य तपस्विनी ॥ रसातलं प्रविशति पंके गौरिव दुर्बला ॥ ११ ॥

अर्थ- आणि ते भगवान् बोलले कीं, हीं तपस्विनी पृथ्वी माझें तेज प्राप्त झालें असतां, तें सहन न होऊन कर्दमांत निमग्न झालेल्या दुर्बल गायी सारखी रसातलांत जात आहे.

पृथिव्युवाच ॥ त्रिविक्रमायामितविक्रमाय महावराहाय सुरोत्तमाय ॥ श्रीशार्ङ्गचक्रासिगदाधराय नमोस्तु ते देव वरप्रसीद ॥ १२ ॥

अर्थ- तें भगवंताचें दीनवात्सल्य युक्त भाषण श्रवण करून पृथ्वी त्या नारायणाची स्तुति करते कीं, हे देवश्रेष्ठा, मी तुम्हास नमस्कार करतें आपण मला प्रसन्न असावें. कारण आपण अपार पराक्रमी असल्यामुळें वामनावतारीं आपले चरणानीं त्रैलोक्य व्याप्त केलें. आणि अप्रतिम शोभा युक्त शार्ङ्ग धनुष्य, सुदर्शन च-

क,नंदक नामाखड्ग व गदाहीं आयुधें धारण करणारे असून महाबाहू रूपी देवश्रेष्ठ आहां.

तवदेहाज्जगज्जातंपुष्करद्वीपसुस्थितम्॥ब्रम्हाणमिह लोकानांभूतानांशाश्वतंविदुः॥१३॥

अर्थ- तसेंच चतुर्दश लोकरूप हें कमल, तुमच्याच नाभि कमलांतून उत्पन्न होऊन त्यांतील चराचर जग, तुमच्याच देहांतून झालें आहे.आणि नाभि कमलांतून झालेले ब्रम्हदेव, या ब्रम्हांडांतील सर्व लोक व प्राणि मात्र यांचे आदि गुरु. आहेत असें पुरातन ज्ञात्यांचें मत आहे.

तवप्रसादाद्देवोयंदिवंभुंक्ते पुरंदरः॥तवक्रोधाधिबल- वान्जनार्दनजितोबलिः॥१४॥

अर्थ- हे जनार्दना, बलिहा बलवान् असून ही तो तुझ्या क्रोधानें पराजित झाला. आणि शत्रूंच्या पुरांचें विदारण करणाराहा इंद्रदेव तुझ्या कृपेनें स्वर्ग राज्याचा उपभोग करीत आहे.

धाताविधातासंहर्तात्वयिसर्वंप्रतिष्ठितम्॥मनुः कृतांतो धिपतिर्ज्वलनःपवनोघनः॥१५॥ वर्णाश्चाश्रमधर्माश्च- सागरास्तरवोजलं॥नद्योधर्मश्चकामश्चयज्ञायज्ञस्यच क्रियाः॥१६॥विद्यावेद्यंचसत्यंचह्रीःश्रीः कीर्तिर्धृतिःक्षमा॥ पुराणंवेदवेदांगंसांख्ययोगोभवाभवौ ॥१७॥जंगमंस्थावरंचैवभविष्यंचभवच्चयत्॥सर्वतच्चत्रिलोके- षुप्रभावोपहितंतव॥१८॥

अर्थ- तसेंच धाता नामक सूर्य, ब्रम्हदेव, संहार करणारे शिव, स्वायंभुवमनु, प्राण्यांचा अधिपतियम, अग्नि, वायु, मेघ, ब्राम्हणादिक वर्ण, ब्रम्हचर्यादिक आश्रम संबंधिधर्म, सर्वसागर, वृक्ष, उदक, नद्या, धर्म, काम, सकल यज्ञ व त्यांचें अनुष्ठान, संपूर्ण विद्या, ज्ञान,सत्य,(उत्कृष्टत्व), ह्री,(लज्जा), श्री(सर्वसंपत्ति), कीर्ति, धैर्य, क्षमा, पुराणें, वेद, वेदांगें, सांख्ययोग, उत्पत्ति, प्रलय, जंगम (मनुष्यपशुपक्ष्यादिक), स्थावर (वृक्षपाषाणादिक), तसेंच जें त्रैलोक्यांतील भूत, भविष्य व विद्यमान तें सर्वही तुझ्या सामर्थ्यानें युक्त असून तुझ्या स्वरूपाच्या आधारावर स्थित आहे.

त्रिदशोदारफलदः स्वर्गस्त्रीचारुपल्लवः ॥ सर्वलोकमनः
कांतः सर्वसत्वमनोहरः ॥ १९ ॥ विमानानेकविटपस्तोय
दांबुमधुस्त्रवः ॥ दिव्यलोकमहास्कंधसत्यलोकप्रशा
खवान् ॥ २० ॥ सागराकारनिर्यासोरसातलजलाश्र-
यः ॥ नागेंद्रपादपोपेतोजंतुपक्षिनिषेवितः ॥ २१ ॥-
शीलाचारार्यगंधस्त्वंसर्वलोकमयोद्रुमः ॥ द्वादशार्क-
मयद्वीपोरुद्रैकादशपत्तनः ॥ २२ ॥ वस्वष्टाचलसंयुक्त
स्त्रैलोक्यांभोमहोदधिः ॥ सिद्धसाध्योर्मिकलिलः सु
पर्णानिलसेवितः ॥ २३ ॥ दैत्यलोकमहाग्राहोरक्षोरग-
झषाकुलः ॥ पितामहमहाधैर्यः स्वर्गस्त्रीरत्नभूषितः ॥ २४
॥ धीश्रीन्हीकांतिभिर्नित्यंनदीभिरुपशोभितः ॥ काल
योगमहापर्वप्रयागगतिवेगवान् ॥ २५ ॥ त्वंस्वयोगम-
हावीर्योनारायणमहार्णवः ॥ कालोभूत्वाप्रसन्नाभिर
द्भिर्ह्लादयसेपुनः ॥ २६ ॥

अर्थ- हे भगवन् तसाच तूं अनेक प्रकारें शोभतोस; तो असाकीं, देवहींच-काहीं एक उदार फलें देणारा असून देवांगना व अप्सरा इत्यादिक स्वर्गवासिस्त्रिया याच कोणी एक सुंदर पल्लवानीं सुशोभित असल्या मुळें सर्व लोकांच्या मनास रमणीय असून इतर ही सर्व प्राणि मात्रांच्या मनास हरण करणारा; आणि विमानें हींच कोणी एक अनेक शाखा विस्तार, मेघानीं पर्जन्य वृष्टि द्वारा दिलेलें उदक हेंच कांहीं एक मधाचे पाझर, तसेच पातालादिक उत्तम लोक हेच कोणी एक मूळा पासून शाखे पर्यंत गेलेले मोठे सोट व सत्यलोक रूप वरच्या शाखा यानीं युक्त आहे आणि या वृक्षाचा निर्यास (चीक) पृथ्वीवर सागराकारानें पसरला असून हा वृक्ष रसातल संबंधि जलाच्या आश्रयानेंच काय दृष्टिगत झाला आहे. तसेच शेषादिक नागराज हेच कोणी या वृक्षा वरील वेल असून ही हा वृक्ष अनेक प्रकारचे जंतु व पक्षी यानीं युक्त आहे. तसेंच शील (सुस्वभाव) व आचार याच कांहीं एक श्रेष्ठ सुगंधानीं युक्त असा तूं सर्व लोक स्वरूप महा वृक्ष आहेस. त्याच प्रमाणें द्वादशादित्य हींच कांहीं एक द्वीपें (बेटें) असून एकादश रुद्रहींच त्यांतील कोणी-

एक नगरें, अष्टवसु हेंच कोणी एक आठ पर्वत व त्रैलोक्य हेंच कांहीं एक उदक यानीं-तूं महा समुद्रा सारखा शोभत असून सिद्ध गण व साध्य गण याच कोणी एक उर्मी-नीं (लाटा) सर्वत्र व्याप्त आहेस. तसाच गरुड हाच कांहीं एक वायु यानें तूं सेवित असून दैत्य लोक हेच कोणी महानक्र (मकर) राक्षस व नाग हेच कोणी मत्स्य यानीं व्याप्त आहेस. आणि ब्रम्हदेव हेंच कांहीं एक गंभीरत्व स्वर्गस्थस्त्रिया हीं च रत्नें, धी (बुध्दि), श्री, ह्री (लज्जा), व कांति याच नद्या यानीं शोभत असून का ल, अणि मादिक योग व कपिलाषष्ठी आदिकरून महा पर्वें हींच कोणी एक गंगा, यमुना व सरस्वती यांच्या संगमरूप प्रयागाचे गतीनें वेग फक्त असा तूं स्वकीय वेगानेंच म हा पराक्रमी नारायण रूपी महा समुद्र आहेस. व तूं पर्जन्यादि कालरूप होऊन निर्दोष उदकानें सर्व लोकांस वारंवार आह्लादित करतोस.

त्वयासृष्टास्त्रयोलोकास्त्वयैवप्रतिसंहृताः॥ विशंतियोगिनः सर्वेत्वामेवप्रतियोजिताः॥२७॥

अर्थ- आणि हे भगवन् आपणच स्वर्ग, मृत्यु व पाताल हे तीन लोक उत्पन्न करून त्यांचा संहारही करतां. व सर्व योगी तुम्हीच योगादिक साधनानीं युक्त केले असतां ते मोक्ष कालीं तुमचे स्वरूपीं प्रवेश करतात.

युगेयुगेयुगांताग्निः कालमेघोयुगेयुगे॥ महाभारावताराय देवत्वंहियुगेयुगे॥२८॥

अर्थ- जसा युगांत (प्रलय) समयींचा अग्नि, कृतादि युगांच्या प्रत्येक सहस्र-चौकडीचे अंतीं प्रगट होतो व जसा प्रलय मेघ, त्या प्रतिदैनंदिन प्रलय कालीं-त्या प्रलयाग्नीनें त्रैलोक्य दग्ध केल्यावर उदक वृष्टि करतो. त्याच प्रमाणें हे देवा, तुम्ही माझा महाभार दूर करण्या साठीं प्रति युगीं अवतार घेतां.

त्वंहिशुक्लः कृतयुगेत्रेतायांचंपकप्रभः॥ द्वापारेरक्तसंकाशः कृष्णः कलियुगेभवान्॥२९॥

अर्थ- तें असें कीं, तुम्ही कृतयुगांत शुक्ल वर्णानें अवतार घेत असून त्रेतायुगांत चंपक (चांफा) पुष्पासारखे पीत वर्णानें अवतीर्ण होतां. आणि द्वापार युगांत आपण आरक्त रूपानें अवतरत असून कलियुगांत कृष्ण रूपानें अवतार-घेतां.

वैवर्ण्यमभिधत्सेत्वंप्राप्तेषुयुगसंधिषु॥ वैवर्ण्यंसर्वधर्माणा

मुत्पादयसिवेदवित्॥ ३०॥

अर्थ- त्याचा समय असा कीं, कृतादिक युगांचे संधिकाल मात्र झाले असतां त्या कालीं तुम्ही प्रथम रूपावें आच्छादन करून रूपांतर धारण करतां. आणि आपण वेद वेत्ते आहां. यास्तव त्या प्रत्येक संधिकालांत लोकांचें ज्ञानानुसार सर्व धर्मांत ही न्यूनाधिक भाव उत्पन्न करतां.

भासिवासिप्रतपसित्वंचपासिविचेष्टसे॥ क्रुध्यसिक्षांति मायासित्वंदीपयसिवर्षसि॥ ३१॥

अर्थ- तसेंच तुम्ही नक्षत्र गणांत राहून प्रकाश करीत असून वायूंत स्थित होऊन सर्वांस गति देतां. आणि आपण सूर्यांत असून अतिशयें सर्वत्र प्रकाश करतां. देव व राजे इत्यादिक अधिष्ठानीं राहून सर्व लोकांचें संरक्षण करतां व त्या मनआदि करून सर्व इंद्रियांच्या शक्तिप्रवृत्त करतां. यमादिक दंडधर अधिष्ठानीं असून अपराधि जनांवर कुद्धहोतां तसेंच मातापितरांदिकांचे अधिष्ठानीं राहून क्षमा करीत असून जठराग्नींत वास करून प्राणि मात्रांच्या शक्तीचें दीपन करतां. आणि मेघ व उदार पुरुष यांचे अंतर्यामीं राहून पर्जन्य वृष्टि व दानादिक करून सर्वांचे मनोरथ पूर्ण करतां.

त्वंहास्यसिननिर्यासिनिर्वापयसिजाग्रसि॥ निःशेषयसिभूतानिकालोभूत्वायुगक्षये॥ ३२॥

अर्थ- आणि हे देवा, तूं सर्व प्राण्यांचा त्याग करीत नसून त्यापासून निघून जात नाहींस. तशींच सर्व बीज मात्रांची उत्पत्ति करीत असून तूं सर्वत्र जागृत असतोस. व युगांतीं तूं कालरूपी होऊन सर्वभूतांचा संहार करतोस.

शेषमात्मानमालोक्यविशेषयसित्वंपुनः॥ युगांताग्निवल्लीढेषुसर्वभूतेषुकिंचन॥ ३३॥ यांतेष्ठुशेषोभवसित स्माच्छेषोसिकीर्तितः॥

अर्थ- ते समयीं तूं आपणास एकाकी उर्वरित अवलोकन करून पुनः अनेक प्रकारची सृष्टि उत्पन्न करतोस. नंतर युगांतीं प्रलयाग्नीनें प्राणि मात्र दग्ध होऊन स्वस्वरूपीं लीन झाल्यावर कांहीं एक वस्तु नसून केवळ तूंच अवशेष राहतोस यास्तव वेद, तुला शेष नामानें वर्णितात.

च्यवनोत्पत्तियुक्तेषुब्रम्हेंद्रवरुणादिषु॥ यस्मान्नच्यवसे

स्थानात्तस्मात्संकीर्त्यसेच्युतः ॥

अर्थ- त्याच प्रमाणें उत्पत्ति व नाश यानीं युक्त जे ब्रम्हदेव, इंद्र व वरुण इत्यादिक सर्व प्राणि मात्रांच्या अंतर्यामीं असून तुम्ही वृद्धि व ऱ्हास (न्यूनता) यानीं रहित अशा स्वकीय अचल स्वरूप स्थिती पासून भ्रष्ट होत नाहीं. यास्तव तुम्हास अच्युत असें म्हणतात.

ब्रम्हाणमिंद्रंचयमंरुद्रंवरुणमेवच ॥ ३५॥ निगृह्यहरसे यस्मात्तस्माद्धरिरिहोच्यसे ॥

अर्थ- आणि ब्रम्हदेव, इंद्र, यम, रुद्र व वरुण इत्यादिक सर्वांस निग्रह करून प्रलय काळीं हरण करतां यास्तव तुम्हांस लोकांत हरि असें म्हणतात.

संमानयसिभूतानिवपुषायशसाश्रिया ॥ ३६॥ परेण वपुषादेवतस्मात्वमसिसनातनः ॥

अर्थ- तसेंच हे देवा, आपण स्वकीय उत्कृष्ट रूपानें सर्व प्राण्यांस देह, यश व संपत्ति यानीं सन्मान युक्त करतां यास्तव तुम्हास सनातन असें म्हणतात.

यस्माद्ब्रम्हादयोदेवामुनयश्चोग्रतेजसः ॥ ३७॥ नतेंतं त्वधिगच्छंतितेनानंतस्त्वमुच्यसे ॥

अर्थ- तसेच उग्र तेजस्वि ब्रम्हादिक देव व ऋषि हे तुमच्या माहात्म्याचा अंत जाणत नाहींत यास्तव तुम्हास अनंत असें सर्व म्हणतात.

नक्षीयसेनक्षरसेकल्पकोटिशतैरपि ॥ ३८॥ तस्मात्त्वमक्षरत्वाच्चविष्णुरित्येवकीर्त्यसे ॥

अर्थ- त्याच प्रमाणें तुम्ही अनंत कोटि कल्पानींही क्षीण होत नाहीं व नाश ही पावत नाहीं. तस्मात् क्षीण न होणें व नाश न पावणें या कारणां वरून तुम्हास विष्णु म्हणतात.

विष्टब्धंयत्त्वयासर्वंजगत्स्थावरजंगमं ॥ ३९॥ जगद्विष्टंभनाच्चेवविष्णुरेवेतिकीर्त्यसे ॥

अर्थ- तसेंच आपण चराचर सर्व जग अंतर्बाह्य व्याप्त केलें आहे; या जगद्व्यापकत्वानें ही तुम्हांसच विष्णु नामानें सर्व लोक वर्णितात.

विष्टभ्यातिष्ठसेनित्यंत्रैलोक्यंसचराचरं ॥ ४०॥ यक्षगंधर्वनगरंसुमहद्भूतपन्नगं ॥ व्याप्तंत्वयैवविशतात्रै-

लोक्यंसचराचरं ॥ ४१ ॥ तस्माद्विष्णुरितिप्रोक्तः स्वय
मेवस्वयंभुवा ॥

अर्थ- आणि यक्ष, गंधर्व, सर्वनगरें, अतिमोठे भूत गण व नाग इत्यादिकच राचर प्राणि सहित त्रैलोक्य आपणच सबाह्याभ्यंतरीं प्रवेश पूर्वक व्याप्त करून सर्व कालीं स्थित आहां; यास्तव स्वयंभू ब्रम्हदेवानीं स्वमुखानें तुमचें विष्णु नाम, लोकांत प्रसिद्ध केलें.

नाराइत्युच्यतेह्यापोऋषिभिस्तत्वदर्शिभिः ॥ ४२ ॥ -
अयनंतस्यताः पूर्वतेननारायणः स्मृतः

अर्थ- तसेच तत्वज्ञाते ऋषि उदकास नारा असें म्हणतात. तें उदक पूर्वी पासून तुमचें वास करण्याचें स्थान आहे. यास्तव तुम्हास नारायण म्हणतात.

युगेयुगेप्रनष्टांगांविष्णोविंदसितत्वतः ॥ ४३ ॥ गोविं
देतिततोनाम्नाप्रोच्यसेऋषिभिस्तथा ॥

अर्थ- तशीच मी पृथ्वी प्रति युगीं अधर्मिष्ठ लोकांच्या योगानें नाश पावत असतां, तुम्ही निश्चयें करून माझें संरक्षण करतां यास्तव सर्व ऋषि, गोविंद नामानें तुमचें वर्णन करतात.

हृषीकाणींद्रियाण्याहुस्तत्वज्ञानविशारदाः ॥ ४४ ॥ -
ईशिताचत्वमेतेषांहृषीकेशस्तथोच्यते ॥

अर्थ - तसेच तत्वज्ञान निपुण मुनि, मन आदि सर्व इंद्रियांस हृषीक म्हणतात; त्यांचे तुम्ही नियंते आहां. यास्तव तुम्हास हृषीकेश हें नाम आहे.

वसंतित्वयिभूतानिब्रम्हादीनियुगक्षये ॥ ४५ ॥ त्वं-
वावससिभूतेषुवासुदेवस्तथोच्यसे ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ब्रम्हादिक सर्व भूतें प्रलय कालीं तुमचे स्वरूपीं वास करतात. व तुम्ही सृष्टि कालीं सर्व भूतांत वास करतां. यास्तव तुम्हास वासुदेव म्हणतात.

संकर्षयसिभूतानिकल्पेकल्पेपुनःपुनः ॥ ४६ ॥ -
ततःसंकर्षणःप्रोक्तस्तत्वज्ञानविशारदैः ॥

अर्थ- आणि आपण प्रति कल्पीं प्रलय कालीं पुनःपुनः प्राणि मात्रांचा - संहार करतां; यास्तव तत्वज्ञान कुशल ऋषि, तुम्हास संकर्षण असें म्हणतात.

प्रतिव्यूहेनतिष्ठंतिसदेवासुरराक्षसाः ॥ ४७ ॥ प्रविद्धः सर्व धर्माणांप्रद्युम्नस्तेनचोच्यसे ॥

अर्थ- तसेंच देवांसहित असुर व राक्षस हे प्रतिस्पर्धेनें व्यूह करून तुम्हाशीं युद्धास उभे रहात नाहींत व सत्पुरुष तुमच्याच योगानें सर्व धर्मांचें तत्व जाणतात यास्तव तुम्हास प्रद्युम्न म्हणतात.

निरोधाविद्यतेयस्मान्नतेभूतेषुकश्चन ॥ ४८ ॥ अनिरुद्ध स्ततःप्रोक्तः पूर्वमेवमहर्षिभिः ॥

अर्थ- हे भगवन् तुमचा निरोध करण्याविषयीं प्राणिमात्रांत कोणीही समर्थ नाहीं; यास्तव महर्षि पूर्वीपासूनच तुम्हास अनिरुद्ध म्हणतात.

यत्वयाधार्यतेविश्वंत्वयासंह्रियतेजगत् ॥ ४९ ॥ त्वंधार यसिभूतानिभुवनंत्वांबिभर्षिच ॥

अर्थ- तसेंच हें चराचर विश्व आपण धारण करून अंतीं या जगाचा संहार ही करतां. यावरून तुम्हीच, हीं सर्व भूतें व यांचीं वसति स्थान भूत सर्व भुवनें यांचें धारण व पोषण ही करतां.

यत्त्वयाधार्यतेकिंचित्तेजसाचबलेनच ॥ ५० मया- हिधार्यतेपश्चान्नाधृतंधारयेत्वया ॥

अर्थ- तस्मात् तुम्ही स्वकीय तेजानें व बलानें जी कांहीं एक वस्तु धारण करतां. तीच मीही पश्चात् धारण करितें; कारण तुम्ही धारण न केलेला पदार्थ धारण करण्याविषयीं मी समर्थ नाहीं.

नहितद्विद्यतेभूतंत्वयायन्नात्रधार्यते ॥ ५१ ॥ त्वमेव- कुरुषेदेवनारायणयुगेयुगे ॥ महाभारावतरणंजगतो हितकाम्यया ॥ ५२ ॥

अर्थ- तस्मात् तुम्ही धारण न केलेलें भूत (प्राणी) मजवर नाहीं. आणि हे देवा नारायणा आपणच जगद्धितेच्छेनें प्रति युगीं माझ्या महा भाराचें निवारण करतां.

तवैवतेजसाक्रांतांरसातलतलंगतां ॥ त्रायस्वमांसुर- श्रेष्ठत्वामेवशरणंगतां ॥ ५३ ॥

अर्थ- यास्तव हे देव श्रेष्ठा तुम्ही माझें संरक्षण करावें. कारण मी तुमच्याच धारक तेजानें युक्त असून रसातलाचे अधोभागीं गेल्यामुळें तुम्हास-

शरण आल्यें आहें.

दानवैःपीड्यमानाहंराक्षसैश्चदुरात्मभिः॥त्वामेवश
रणंनित्यमुपयामिसनातनं॥ ५४॥

अर्थ- आणि दुष्टस्वभाव यक्त दानव वराक्षस यानीं मी अति पीडित झाल्यानें-तुम्हा आदि देवा सच सर्वदा शरण आहे.

तावन्मेस्तिभयंदेवयावन्नत्वांककुद्मिनं॥ शरणंया-
मिमनसाशतशोप्युपलक्षये॥ ५५॥

अर्थ- हे देवा, मी यावत्काल पर्यंत तुम्हासर्व श्रेष्ठांस मनःपूर्वक शरण येत नाहीं,-तावत्काल पर्यंतच मला शतशः ही भयें आहेत असें मी तर्कानें निश्चित जाणलें.

उपमानंनतेशक्ताःकर्तुंसेंद्रादिवौकसः॥तत्त्वंत्वमेवतर
त्सिनिरुत्तरमतःपरं ॥ ५६॥

अर्थ- कारण इंद्रसहित सर्वदेवही तुमची साम्यता करण्यास समर्थ नाहींत. तस्मात् माझाभार दूर करण्याचेंतें सर्व यथार्थ तत्त्व तुम्हीच जाणतां; याउपरतु मचें माहात्म्य वर्णन करण्या विषयीं मी समर्थ नाहीं.

शौनकउवाच ॥ ततःप्रीतःसभगवान्पृथिव्यैशार्ङ्ग
चक्रधृक्॥ काममस्यायथाकाममभिपूरितवान्हरिः
॥ ५७॥

अर्थ- शौनक म्हणतात हे अर्जुना, अशी स्तुति केल्या नंतर शार्ङ्ग धनुष्य व चक्र यांस धारण करणारा तो भगवान् पृथिवीला प्रसन्न झाला. आणि त्या हरीनें त्या पृथ्वीचा मनोरथ यथेच्छ पूर्ण केला.

अब्रवीच्चमहादेविमाधवीयंस्तवोत्तमं॥धारयिष्यति-
योमर्त्योनास्तितस्यपराभवः ॥ ५८॥

अर्थ- आणि तो नारायण, पृथ्वीस बोलला कीं, हे महादेवि तूं केलेला हा माधव स्तवराज, जो मानव, श्रवण पठन द्वारा धारण करील; त्याचापराभव होत नाहीं.

लोकान्निष्कल्मषांश्चैववैष्णवान्प्रतिपत्स्यते॥एत
दाश्चर्यसर्वस्वंमाधवीयंस्तवोत्तमं॥ ५९॥ अधीतवेदः

पुरुषोमुनिःप्रीतमनाभवेत् ॥ ६०॥

अर्थ- तसाच तो देहांतीं अकल्मष (निर्दोष) विष्णुलोकांस गमन करतो; कारण हा माधवस्तवराज सर्व स्तोत्रांत श्रेष्ठ आहे. यास्तव वेदाध्ययन केले-ला मनन शील पुरुष, या स्तव राजाचे श्रवण पठनानें मनः शांति पावतो.

श्रीभगवानुवाच ॥ माभैर्धरणिकल्याणिशांतिंव्रजममाग्रतः ॥ एषत्वामुचितंस्थानंप्रापयामिमनीषितम् ॥ ६१॥

अर्थ- आणि श्रीभगवान् बोलले कीं; हे कल्याण रूपे धरणि देवि तूं भयमानूंनको. माझे अग्रभागीं शांत हो. कारण मी आतां तुला इच्छित योग्य स्थान देतो.

शौनक उवाच ॥ ततोमहात्मामनसादिव्यंरूपमचिंतयत् ॥ किन्नुरूपमहंकृत्वाउद्धरेयंधरामिमां ॥ ६२॥

अर्थ- शौनक म्हणतात. हे अर्जुना, नंतर तो महात्मा हरि, पृथ्वीच्या उद्धारार्थ दिव्य रूप धारण करण्या विषयीं मनानें चिंतन करूं लागला कीं; मी कोणतें रूप ग्रहण करून या पृथ्वीचा उद्धार करूं.

जलक्रीडारुचिस्तस्माद्वाराहंवपुरास्थितः ॥ अदृश्यंसर्वभूतानांवाङ्मयंब्रम्हसंस्थितं ॥ ६३॥

अर्थ- असा विचार करून त्याकाळीं भगवंतास जलक्रीडेची इच्छा झाली. तेव्हां त्यानें वराह रूप धारण केलें., में वाङ्मय वेदांत उत्तम रीतीनें वर्णित असून सर्व प्राण्यांचे चर्म चक्षूंस अदृश्य आहे.

शतयोजनविस्तीर्णमुच्छ्रितंद्विगुणंततः ॥ नीलजीमूतसंकाशंमेघस्तनितनिस्वनं ॥ ६४ ॥ गिरिसंहननंभीमंश्वेततीक्ष्णाग्रदंष्ट्रिणम् ॥ विद्युदग्निप्रतीकाशमादित्यसमतेजसं ॥ ६५ ॥ पीनोन्नतकटीदेशंवृषलक्षणपूजितं ॥ रूपमास्थायविपुलंवाराहमजितोहरिः ॥ ६६ ॥ पृथिव्युध्दरणायैवप्रविवेशरसातलं ॥

अर्थ- तें असें कीं; शतयोजनें विस्तीर्ण (रुंद) असून. त्यापेक्षां द्विगुणित उंच होतें. आणि सजल नील मेघासमान श्याम सुंदर असून मेघ गर्जने सार-

रुया शब्दानें युक्त व पर्वतासमान दृढ महा शरीरानें शोभत आहे. तसेंच भयंकर-असून शुभ्र वर्ण तीक्ष्ण अग्र युक्त दंष्ट्रानीं (दाढा) सुशोभित आहे. त्याचप्रमाणें विद्युत् (वीज) स्वरूप अग्नी समान, चंचल असून सूर्यासारख्या तेजानें पूर्ण आहे. व पुष्ट असून उंच अशा कटि (कमर) प्रदेशीं उत्तम लक्षणानें संपन्न आहे. असें महा वराह रूप धारण करून अपराजित हरि, त्या पृथ्वीच्या उध्दारार्थंच रसातलांत प्रविष्ट झाला.

वेदपादोयूपदंष्ट्रः क्रतुदंतश्चितीमुखः ॥ ६७॥ अग्निजिह्वोदर्भलोमाब्रम्हशीर्षोमहातपाः॥ अहोरात्रेक्षणधरोवेदांगश्रुतिभूषणः॥ ६८ ॥ आज्यनासः स्रुवतुंडः सामघोषस्वनोमहान्॥ सत्यधर्ममयःश्रीमान्कर्मविक्रमसत्क्रमः॥ ६९॥ प्रायश्चित्तनखोघोरः पशुजानुर्मखाकृतिः॥ उद्गाथाहोमलिंगोथबीजौषधिमहाफलः॥ ७०॥ वाय्वंतरात्मायज्ञास्थिविकृतिःसोमशोणितः॥ वेदस्कंधोहविर्गंधोहव्यकव्यविभागवान्॥ ७१ ॥ प्राग्वंशकायोद्युतिमान्नानादीक्षाभिरन्वितः॥ दक्षिणाहृदयोयोगीमहासत्रमयोमहान्॥ ७२॥ उपाकर्मोष्ठरुचकः प्रवर्ग्यावर्तभूषणः॥ नानाच्छंदोगतिपथोगुह्योपनिषदासनः॥ ७३ ॥च्छायापत्नीसहायोवैमणिशृंगइवोछ्रितः॥ रसातलतलेमग्नांरसातलतलंगतां ॥ ७४ ॥ प्रभुर्लोकहितार्थायदंष्ट्राग्रेणोज्जहारतां ॥

अर्थ— तो वराह देव असा कीं, ज्याचे चरण वेदरूप असून त्याच्या दंष्ट्रा (दाढा) हेच कोणी एक, यज्ञांतील स्तंभ व त्याचे दंत हे कोणी एक, क्रतु (पशु हिंसा साध्य यज्ञ) आहेत. आणि त्याचें मुख हेंच कांहीं एक, यज्ञांतीलचयननामक कर्म असून अग्निच जिव्हा, दर्भहे अंगावरील केश व वेद हेंच मस्तक यानीं सुशोभित-असा तो वराह रूपी महा तपस्वी विष्णु, दिवस व रात्र हींच कोणी एक, नेत्रें-धारण करणारा असून वेद हेच कर्ण व शिक्षाव्याकरणादिक वेदांगें या कर्णभूषणानीं शोभायमान आहे. तसेंच यज्ञांतील घृत हींच नासिका, स्रुवा हेंच-मुख व सामगायन संबंधि घोष रूप शब्द यानीं युक्त असून अत्यंत पूज्य आ-

हे. त्याच प्रमाणें सत्य व धर्म यानीं युक्त असून तो नारायण श्रीमान् व कर्मा विषयीं-च्या पराक्रम रूप उत्तम क्रमानें वर्तणारा आहे. तशींच प्रायश्चित्तें हींच कांहीं एक,न खें व यज्ञांतील पशू हेच कोणी एक, जानु (गुडघे) यानीं युक्त असा सौम्य यज्ञाकृति असून उच्चस्वरानें साम गायन व होमहें लिंगस्थान, यज्ञोपयोगी सर्व ओषधी व यज्ञ संबंधि पुण्यरूप महाफल हेंच कांहीं एक, वीर्य यानीं युक्त आहे. तसाच तो भगवान् वायूचा अंतरात्मा (अंतर्यामीं मुख्यनियंता) असून यज्ञ (पशू हिंसारहित) हेच त्याच्या अस्थिसंधि व सोम वल्लीरस हेंच त्याचें रक्तस्थानीं आहे. तसेच वेद हेच स्कंध, होम संबंधि चरू घृतादिक पदार्थ हेच रू गंध यानीं युक्त असून हव्य (देवांच्या उद्देशानें दिलेला भाग) व कव्य (पितरांच्या उद्देशानें दिलेला भाग) या विभागानें युक्त आहे. आणि प्राग्वंश (होमद्रव्य शालेच्या पूर्वेचा स्तंभ किंवा यज्ञशालेंत पूर्व दिशेस वेदोक्त यज्ञकर्म करणाऱ्या ऋत्विजादिकांची जागा अथवा यज्ञशालेच्या पूर्वे कडील स्तंभावर टाकलेलें लांब काष्ठ) हींच त्या नारायणाच्या देहस्थानापन्न असून तो अप्रतिम कांतिमान् अनेक दीक्षा व दक्षिणा हेंच हृदय यानीं युक्त आहे. असा सकल योगैश्वर्य संपन्न महासत्र (यज्ञ) स्वरूपी असल्या मुळें महान् (श्रेष्ठ) आहे. तसेंच उपाकर्म (श्रावणी) हेच कोणी एक, ओष्ठ (ओंठ) व कपाळचा तिलक तसाच प्रवर्ग्य नामें ऋत्विजांतील भेद हाच दक्षिण स्तनावरील कोणी एक भूषणभूत केशांचा भोंवरा यानीं शोभणारा तो नारायण, वेदांतील अनेक छंदरूप गतीचे मार्गांनीं गमन करणारा व गुह्य उपनिषद् रूप आसनावर स्थित असून छायारूप पत्नीच्या साहाय्यानें युक्त आहे. आणि मण्यांचे शिखरा समान उंच अशा त्या वराहप्रभूनें रसातलाच्या अधोभागीं जाऊन तेथें निमग्न (बुडणें) झालेल्या त्या पृथ्वीस सर्व लोकांच्या हितार्थ-आपल्या दंष्ट्रेच्या (दाट) अग्रभागानें वर काढिलें.

ततःस्वस्थानमानीयवराहःपृथिवीधरः॥७५॥मुमोच
पूर्वमनसाधारितांचवसुंधरां॥

अर्थ- नंतर पृथ्वीधर वराहानें पूर्वी मनःपूर्वक धारण केलेल्या त्या पृथ्वीस स्वस्थानीं आणून सोडिली.

ततोजगामनिर्वाणंमेदिनीतस्यधारणात्।७६॥चका
रचनमस्कारंतस्मैदेवायशंभवे॥

अर्थ- त्या कालीं ती पृथ्वी आपलें स्वस्थानीं वराह देवानें स्थापन केलें; तेणें करून अत्यंत सुख पावली तेव्हां तिणें त्या कल्याण कारक वराह स्वरूप देवास पुनः नमस्कार केला.

एवंयज्ञवराहेणभूत्वाभूतहितार्थिना ॥ ७७ ॥ उद्धृतापृथिवीदेवीसागरांबुगतापुरा ॥

अर्थ- या प्रमाणें विष्णूनें सर्व जीवांच्या हितेच्छेनें यज्ञरूप वराहावतार घेऊन पूर्वी प्रलय समुद्राचे उदकांत बुडालेल्या पृथ्वीदेवीचा उध्दार केला.

अथोध्दृत्यक्षितिंदेवोजगतःस्थापनेच्छया ॥ पृथिवीप्रविभागायमनश्चक्रेंबुजेक्षणः ॥ ७८ ॥

अर्थ- अशा रीतीनें पृथ्वीस प्रलयो दकांतून वर काढून निज बल सर्व चराचर जग स्थापन करण्याच्या इच्छेनें त्या कमल नयन वासुदेवानें पृथ्वीचे उत्तम विभाग करण्या विषयीं मनांत आणलें.

रसांगतामवनिमचिंत्यविक्रमः सुरोत्तमः प्रवरवराहरूपधृक् ॥ वृषाकपिः प्रसभमथैकदंष्ट्रयासमुध्दरध्दरणिमतुल्यपौरुषः ॥ ७९ ॥

अर्थ- असा तो विष्णु अचिंत्य अप्रतिम पराक्रम युक्त असल्या मुळें दीनजनांचें दुःख दूर करून त्यांस इष्ट फल देणारा आहे. यास्तव त्या देवश्रेष्ठानें अतिउत्कृष्ट वराह रूप धारण करून, पूर्वी हिरण्याक्ष दैत्यानें रसातलास नेलेल्या पृथ्वीस बलात्कारें करून आपल्या एका दंष्ट्रेनें (दाढ) वर काढिलें. ॥ ॥

इतिश्री मत्स्य पुराणे वराह प्रादुर्भावो नाम अष्टचत्वारिंश दुत्तर द्विशततमो ऽध्यायः ॥ २४८ ॥ ७ ॥

अध्याय २४९ वा.

ऋषयऊचुः ॥ नारायणस्यमाहात्म्यंश्रुत्वासूतयथाक्रमं ॥ नतृप्तिर्जायतेस्माकमतःपुनरिहोच्यतां ॥ १ ॥

अर्थ- ऋषी प्रश्न करतात. कीं हे सूता, नारायणाचें माहात्म्य क्रमानें कितीही श्रवण केलें. तरी आमची तृप्ति होत नाहीं. यास्तव तें नारायण माहात्म्य पुनः या कालीं आम्हास कथन करावें.

कथंदेवागताः पूर्वममरत्वंविचक्षणाः ॥ तपसाकर्मणा-

वापिप्रसादात्कस्यतेजसा ॥ २ ॥

अर्थ- तें असेंकीं; ज्ञान संपन्न देवहे पूर्वी तप किंवा कर्म अथवा कोणाचा प्रसाद व तेज यांतून कोणत्या प्रकारानें अमरत्व पावले. १

सूतउवाच ॥यत्रनारायणोदेवोमहादेवश्चशूलधृक् ॥-
तत्रामरत्वेसर्वेषांसहायौतत्रतौस्मृतौ॥ ३॥

अर्थ- तेव्हां सूत म्हणतात- ऋषीहो जेथें देवांस अमरत्व प्राप्त झालें- तेथें त्या सर्वांस तें अमरत्व प्राप्त होण्याविषयीं नारायण नामक देव व त्रिशूल धारी महा देव हे उभयतांही साह्याय्य होते.

पुरादेवासुरेयुद्धेहताश्चशतशःसुरैः॥ पुनःसंजीविनीं-
विद्यांप्रयोज्यभृगुनंदनः॥ ४ ॥जीवापयतिदैत्येंद्रान्यथा
सुप्तोत्थितानिव॥

अर्थ- कारण पूर्वी देव व असुर यांचें युद्ध झालें असतां त्या प्रसंगीं देवानीं शतशः असुरांचा वध केला,तरी भृगु कुला नंद वर्धक शुक्राचार्य संजीविनी विद्येच्या प्रयोगानें,त्या मृत झालेल्या दैत्यवीरांस निद्राघेऊन उठल्या सारखें पुनःजीवंत करतात.

तस्यतुष्टेनदेवेनशंकरेणमहात्मना ॥ ५॥ मृतसंजीवि-
नीनामविद्यादत्तामहाप्रभा ॥ तांतुमाहेश्वरींविद्यांमहे
श्वरमुखोद्गतां ॥ ६॥भार्गवेसंस्थितांदृष्ट्वामुमुदुःसर्वदा
नवाः॥ ततोमरत्वंदैत्यानांकृतंशुक्रेणधीमता॥ ७॥

अर्थ- तीमरण पावलेल्या प्राण्यांस जीवंत करण्या मुळें मृत संजीविनी नामक महातेजस्विनी विद्या, महात्म रूपी शंकर देवानें प्रसन्न होऊन शुक्राचार्यास दिली. ती महेश्वरांच्या मुखांतून प्राप्त झालेली माहेश्वरी विद्या शुक्राचार्यांचे समीप उत्तम प्रकारें स्थित आहे असें अवलोकन करून सर्व दानव हर्ष पावले. असें त्या बुद्धिमान् शुक्राचार्यांनें त्या विद्या बळें करून दैत्यांस अमरत्व - साधिलें.

यानास्तिसर्वलोकानांदेवानांसवरक्षसां ॥ ननागाना
मृषीणांचनचब्रह्मेंद्रविष्णुषु॥ ८॥

अर्थ- ती मृत संजीवनी विद्या, सर्व मानव, देव, सर्व राक्षस, सकल नाग, संपूर्ण ऋषि, ब्रम्हदेव, इंद्र व विष्णु यां मध्यें ही कोणा जवळ नव्हती.

तांलब्ध्वाशंकराच्छुक्रः परांनिर्वृतिमागतः ॥ ततोदेवा
सुरोघोरः समरः सुमहानभूत् ॥ ९ ॥

अर्थ- ती अपूर्व विद्या शंकरा पासून प्राप्त होऊन शुक्राचार्य अत्यंत हर्ष पावला. तेव्हां पश्चात् देव व असुर यांचा अति महा भयंकर संग्राम झाला.

तत्रदेवैर्हतान्दैत्यान्शुक्रोविद्याबलेनच ॥ उत्थापय
तिदैत्येंद्रान्लीलयैवविचक्षणः ॥ १० ॥

अर्थ- त्यांत देवानीं मारलेल्या दैत्यांस ज्ञान संपन्न शुक्राचार्य त्यामरण पावलेल्या दैत्य वीरांस संजीविनी विद्येच्या बलानें अनायासें करून तत्काल उठवीत असे.

एवंविधेनशक्रस्तु बृहस्पतिरुदारधीः ॥ हन्यमानास्त
तोदेवाःशतशोथसहस्रशः ॥ ११ ॥

अर्थ- या प्रकारें त्या विद्येच्या आश्रयानें इंद्र व उदार बुद्धिमान् बृहस्पति व शतशः सहस्रशः देव, त्या दैत्यांच्या योगानें ताडित झाले.

विषण्णवदनाः सर्वे बभूवुर्विकलेंद्रियाः ॥ ततस्तेषुवि
षण्णेषुभगवान्कमलोद्भवः ॥ मेरुपृष्ठेसुरेंद्राणामिदं
माहजगत्पतिः ॥ १२ ॥

अर्थ- ते समयीं सर्व देव, स्वकीय हस्त पादादिक इंद्रियानीं व्याकुल झाल्या मुळें म्लान वदन झाले. तेव्हां असे ते देव खिन्न झाले असतां विष्णूच्या नाभिकमला पासून उत्पन्न झालेले जगत्पालक भगवान् ब्रम्हदेव, मेरु पर्वतावर त्या देव श्रेष्ठांस हें पुढील भाषण बोलतात.

ब्रम्होवाच ॥ देवाः शृणुत मद्वाक्यंतत्तथैवनिरूप्यतां ॥
क्षिप्यतांदानवैःसार्धंसख्यमत्रप्रवर्ततां ॥ १३ ॥

अर्थ- कीं, देवहो, माझें वाक्य श्रवण करून तें तसेंच आचरण करा. तें असें कीं, तुम्ही सत्वर दानवांशीं वैर त्याग करून त्यांशीं सख्य करावें.

क्रियतामृतोद्योगोमथ्यतांक्षीरवारिधिः ॥ सहायं
वरुणंकृत्वाचक्रपाणिर्विबोध्यतां ॥ १४ ॥

अर्थ - आणि अमृत उत्पन्न होण्यासाठीं उद्योग करावा तो असाकीं, वरुणा स साहाय्य घेऊन चक्रपाणि विष्णूस प्रार्थून क्षीर समुद्राचें मथन करावें.

मंथानंमंदरंकृत्वाशेषनेत्रेणवेष्टितम्॥ दानवेंद्रोबलिः स्वामीस्तोककालंनिवेश्यतां॥ १५॥

अर्थ - तसाच मंदर पर्वत मंथा (रवि) करून त्यास शेष रूप दोरीनें वेष्टित करावें. आणि दानवराज बलीस कांहीं काल पर्यंत सर्वांचे स्वामित्वावर योजावें.

प्रार्थ्यतांकूर्मरूपश्चपातालेविष्णुरव्ययः॥ प्रार्थ्यतां मंदरः शैलः मंथकार्यप्रवर्त्यतां॥ १६॥

अर्थ - तसेंच पाताळवासी अविनाशी कर्मरूपी विष्णु व मंदरपर्वत यांची प्रार्थना करून मग समुद्र मथन कार्यास आरंभ करावा.

तच्छ्रुत्वावचनंदेवाजग्मुर्दानवमंदिरं॥ अलंविरोधेनवयंभृत्यास्तवबलेधुना॥ १७॥

अर्थ - असें ते ब्रम्हदेवांचें वचन श्रवण करून इंद्रादिक देव त्या बलिनामक दानवाच्या मंदिरास गेले. आणि ब्रम्हदेवाच्या शिक्षे प्रमाणें ते बलीस म्हणाले कीं, हे बलिराजा, आपला परस्पर विरोध पुरे. आतां आम्ही तुझे दास झालों.

क्रियतामम्रृतोद्योगोव्रीयतांशेषनेत्रकं॥ त्वयाचोत्पादितेदैत्यअमृतेमृतमंथने॥ १८॥ भविष्यामोमराःसर्वेत्वत्प्रसादान्नसंशयः॥ एवमुक्तस्तदादेवैः परितुष्टः सदानवः॥ १९॥

अर्थ - तस्मात् सांप्रत आपण सर्व देव दैत्य मिळून शेषास दोरी होण्या साठीं प्रार्थून अमृताच्या उत्पत्यर्थ समुद्र मथन रूप उद्योग करावा. कारण हे दैत्यश्रेष्ठा, असें समुद्र मथनांत तूं मुख्यत्वें उद्योग करून अमृत उत्पन्न केलें असतां, आपण सर्वही तुझ्या कृपेनें अमर होऊं यांत संशय नाहीं. असें देवांनीं भाषण केलें असतां त्या कालीं तो दानव राज बलि संतुष्ट झाला.

यथावदतहेदेवास्तथाकार्यंमयाधुना॥ शक्तोहमेकएवात्रमथितुंक्षीरवारिधिं॥ २०॥

अर्थ - आणि तो बोलला कीं, देवहो, तुम्ही जसें भाषण करतां. तसें मी या-

कालीं अवश्य करीन. आणिमी या कार्याविषयीं क्षीरसमुद्र मंथनास एकाकीच समर्थ आहें.

आहरिष्येमृतंदिव्यममृतत्वायवोधना ॥ सुदूरादाश्रयं-प्राप्तान्प्रणातानपिवैरिणः ॥ २१ ॥ योनपूजयतेभक्त्याप्रेत्यचेहविनश्यति ॥ पालयिष्यामिवःसर्वानधुनास्नेहमास्थितः ॥ २२ ॥

अर्थ- तस्मात् तुम्हास अमरत्व प्राप्त होण्यासाठीं या कालीं मी उत्तम अमृत उत्पन्न होण्यासाठीं उद्योग करतों; कारण कोणी वैरीही असून ते बहुदूर देशांतून आपणास शरण येऊन अतिनम्र झाले असतां जो भक्तीनें त्यांचा आदर करीत नाहींतो यालोकीं व देहत्यागानंतर परलोकीं ही अत्यंत नाश पावतो; यास्तव मी सांप्रत कालीं तुमचें स्नेहानें पालन करीन.

एवमुक्त्वासदैत्येंद्रोदेवैःसहययौतदा ॥ मंदरंप्रार्थयामास सहायत्वेधराधरं ॥ २३ ॥

अर्थ- असें भाषण करून तो दैत्यराजबलित्याकालींदेवांसह वर्तमान मंदराचलासमीप आला. आणि आपणास सहाय होण्याविषयीं त्या पर्वताची प्रार्थना करूं लागला.

सखाभवत्वमस्माकमधुनामृतमंथने ॥ सुरासुराणांसर्वेषांमहत्कार्यमिदंजगत् ॥ २४ ॥

अर्थ कीं, हे अचलश्रेष्ठा तूं या कालीं अमृत मंथना विषयीं साहाय्य करणारा आमचासखाहो; कारण सर्वदेव, दैत्य व संपूर्ण जग यांचें हें महत्कार्यच आहे.

तथेतिमंदरःप्राहयद्याधारोभवेन्मम ॥ यत्रस्थित्वाभ्रमिष्यामिमथिष्येवरुणालयं ॥ २५ ॥

अर्थ- तेसमयीं मंदर पर्वत तथास्तु असें बोलून म्हणाला कीं, ज्यास्थलीं मी स्थित होऊन गरगरा सभोंवतीं फिरून वरुण स्थानभूत समुद्राचें मथन करीन त्यास्थलीं अधोभागीं जर मला आधार असेल तरमी सिद्ध आहें.

कल्प्यतांनेत्रकार्येयःशक्तःस्यादुद्वहनेमम ॥ ततस्तुनिर्गतौदेवौकूर्मशेषौमहाबलौ ॥ २६ ॥ विष्णोर्भागौचतुर्थांशाधरण्याधारणेस्थितौ ॥

अर्थ- तसेंच मला वेष्टन करण्यास दोरी होण्याचे कार्याविषयीं जो समर्थ असेल त्याची योजना करा. असें मंदराचलाचें भाषण होतांच तत्काल कूर्म व शेष हे महाबलिष्ठ उभयतां देव वर आले. ते विष्णूच्या चतुर्थांश शक्ति भागानें युक्त असून पृथ्वीस धारण करण्याच्या कार्यांत स्थित आहेत.

ऊचतुर्गर्वसंयुक्तं वचनं शेषकच्छपौ ॥ २७ ॥ त्रैलोक्य धारणेनापिनग्लानिर्ममजायते ॥ किंसुमदरकात्क्षुद्रात्स्फटिकासन्निभादिह ॥ २८ ॥

अर्थ- आणि ते शेष कूर्म गर्वयुक्त पृथक् पृथक् भाषण बोलले कीं, त्रैलोक्य धारणानें ही मला ग्लानि प्राप्त होत नाहीं. तेव्हां समुद्रमथनांत गोटी- सारख्या या लघु मंदर पर्वताच्या धारणाचा पदार्थ काय आहे.

शेषउवाच ॥ ब्रम्हांडवेष्टनेनापि ब्रम्हांडमथनेनवा ॥ नमे ग्लानिर्भवेद्देहेकिंसुमंदरवर्तने ॥ २९ ॥

अर्थ- तसेंच पुनः शेष बोलला कीं, मी ब्रम्हांडास वेष्टन केलें किंवा ब्रम्हांडाचें मथन केलें तरी माझ्या देहास ग्लानि उत्पन्न होणार नाहीं तेथें मंदराचल फिरविल्यानें काय ग्लानि येणार आहे.

तलउत्पाट्यतंशैलंतत्क्षणात्क्षीरसागरे ॥ चिक्षेप- लीलयानागः कूर्मश्चाधस्थितस्तदा ॥ ३० ॥

अर्थ- असें त्या उभयतांनीं भाषण करून पश्चात् शेषानें अनायासें करून मंदराचल उपटून तत्क्षणीं क्षीर सागरांत टाकला. आणि त्या कालीं कूर्म- ही त्या पर्वताचे अधोभागीं जाऊन राहिला.

निराधारंयदाशैलंनशेकुर्देवदानवाः ॥ मंदरभ्रामणंकर्तुंक्षीरोदमथनेतथा ॥ ३१ ॥

अर्थ- तथापि त्या कूर्माचा आधार पूर्ण होईना. यामुळें ते देवदानव त्या- क्षीर समुद्र मथनांत त्या निराधार मंदर पर्वतास धारण करणें व फिरविणें या विषयीं जेव्हां समर्थ होईनात.

नारायणनिवासंतेजग्मुर्बलिसमन्विताः ॥ यत्रास्तेदेवदेवेशः स्वयमेवजनार्दनः ॥ ३२ ॥

अर्थ- त्या कालीं बलिसहित ते सर्वही, ज्यास्थानीं ब्रम्हादि मुख्य देवांचा

नियंता जनार्दन स्वतः वास करीत आहे. त्या नारायणाच्या लोकास-
गेले.

तत्रापश्यंततंदेवंसितपद्मप्रभंशुभं ॥ योगनिद्रासक्त-
निरतंपीतवाससमच्युतं ॥ ३३ ॥ हारकेयूरनद्धांग
महिपर्यंकसंस्थितं ॥ पादपद्मेनपद्मायाःस्पृशंतं-
नाभिमंडलं ॥ ३४ ॥ स्वपक्षव्यजनेनाथवीज्यमा-
नंगरुत्मता ॥ स्तूयमानंसमंताच्चसिद्धचारणकिन्न
रैः ॥ ३५ ॥ आम्नायैर्मूर्तिमद्भिश्चस्तूयमानंसमंततः ॥
सव्यबाहूपधानंतंतुष्टुवुर्देवदानवाः ॥ ३६ ॥ कृतांज-
लिपुटाःसर्वेप्रणताःसर्वतोदिशं ॥

अर्थ- आणि त्यांनीं तेथें कल्याण कारक देवास अवलोकन केलें. तो देव असाकीं, शुभ्रकमलासमान कांतियुक्त असून पीतांबर परिधान करून योग निद्रेंत अत्यंत आसक्त आहे; तथापि स्वकीयपूर्ण ऐश्वर्यापासून कदापि भ्रष्ट होतनाहीं. तसेच हारव बाहुभूषणें इत्यादिक अलंकारानीं सर्वांगीं सुशोभित व शेषपर्यंकावर उत्तमरीतीनें शयन केलेला असून आपल्या चरण कमलानीं लक्ष्मीच्या नाभिमंडलास स्पर्श करीत आहे. त्याचप्रमाणें गरुड स्वकीयपक्ष (पंख) रूपविंझणवाऱ्यानें त्या देवासच हू करून वारा घालीत असून आसमंताद्भागीं सिद्ध, चारण, किन्नर व मूर्तिमंत वेद हे त्याची स्तुति करीत आहेत. व तो देव आपला वामहस्त उशीसारखा मस्तका खालीं ठेवून शयन केलेला आहे. अशा त्या देवास नमस्कार करून ते सर्व देवदानव स्वकीय अंजालि संपुष्टाकार जोडून सर्वदिशांसउभे राहून त्या नारायणाची स्तुति करूं लागले.

देवदानवाऊचुः ॥ नमोलोकत्रयाध्यक्षतेजसामितभा-
स्कर ॥ ३७ ॥ नमोविष्णोनमोजिष्णोनमस्तेकैटभार्दन ॥

अर्थ- ते असें कीं, हे भगवन् आपण सर्वव्यापक असून तेजानें अमित सूर्यासमान असल्यामुळें सर्वांस नियमें करून पराजित करणारे आहां; यामुळें तुम्हीच त्रैलोक्याचे अध्यक्ष आहां. म्हणून तुम्ही लोकांस पीडा करणाऱ्या कैटभ दैत्याचा संहार केला; तस्मात् आम्ही तुम्हांस वारंवार नम-

स्कार करतों.

नमः सर्गक्रियाकर्त्रेजगत्पालायतेनमः॥ ३८॥ रुद्ररूपायशर्वायनमःसंहारकारिणे॥

अर्थ- तसेच तुम्ही ब्रम्हदेवरूपानें संपूर्णजगाची सृष्टिक्रिया करून विष्णुरूपानें याचराचर विश्वाचें पालन केल्या नंतर अंतीउग्रशिवरूपानें सर्व-जगाचा संहार करतां. यास्तव तुम्हांस आमचेअनेक नमस्कार असोत.

नमः शूलायुधाधृष्यनमोदानवघातिने॥ ३९॥ नमः क्रमत्रयाक्रांतत्रैलोक्यायाभवायच

अर्थ- आणि आपला पराक्रम शूलायुध धारीशिवासही सहन नहोण्यासारखा असून तुम्ही आपल्याचरणस्थापनानें संपूर्ण त्रैलोक्य व्याप्तकरून बलिदानवास पातालांत घालून त्यांच्या ऐश्वर्याचाऱ्हास केला तस्मात् हे अपार माहात्म्य पूर्णा तुम्हास आम्हीपुनः पुनः नमस्कार करतों.

नमः प्रचंडदैत्येंद्रकुलकालमहानल॥ ४०॥ नमो-नाभिहृदोद्भूलपद्मगर्भमहाचल॥

अर्थ- त्याच प्रमाणें तुम्ही, प्रचंड दैत्य वीरांचे कुलांस प्रलय कालच्या महा अग्नीसारखे असून स्वकीय नाभिरूपहृदा (डोह) तूनउत्पन्न झालेल्या ब्रम्हांड कमलाच्या गर्भांत उत्पन्न झालेल्या ब्रम्हदेवरूप महापर्वतानें शोभत आहां. यास्तवतुम्हास वारंवार आमचे नमस्कार असोत.

पद्मभूतमहाभूतकर्त्रेहर्त्रेजगत्प्रिय॥ ४१॥ जनिता-सर्वलोकेशक्रियाकारणकारिणे॥

अर्थ- हे जगत्प्रिया, आपणचतुर्दश लोकरूप कमलांत उत्पन्न झालेल्या महाभूतांचे कर्ते असून सर्वलोकांचे नियंते, त्यांस उत्पन्न करणारे व चलनवलनादिक संपूर्ण क्रिया होण्यास जीं कारणें आहेत; त्यांसही उत्पन्न करणारे तुम्हीच असून सर्वांचा संहार करतां. यास्तव आम्ही तुम्हांस नमस्कार करतों.

अमरारिविनाशायमहासमरशालिने॥ ४२॥ लक्ष्मीमुखाब्जमधुपनमः कीर्तिनिवासिने॥

अर्थ- तसेच आपण देवशत्रूंचा समूलनाश करणारे असल्यामुळे महा

संग्रामांत अतिशयें शोभतां आणि तुम्ही लक्ष्मीच्या मुख कमल संबंधि- रस प्राशन करणारे. असून जेथें वास करतां तेथें गोकुला सारखी उत्तम- कीर्ति अनायासें प्राप्त होते. तस्मात् तुम्हास आमचे वारंवार. नमस्कार अ- सोत.

अस्माकममरत्वायध्रियतांध्रियतामयं ॥ ४३॥ मंद
रःसर्वशैलानामयुतायुतविस्तृतः ॥

अर्थ कारणआम्हीं आपणासअमृत प्राशनानें अमरत्व प्राप्त होण्यासाठीं - समुद्रांत मंथनार्थ घातलेला हा सर्व पर्वत श्रेष्ठ मंदर पर्वत दशकोटि योज नें विस्तृत असून अधोभागीं आधार नसल्यामुळें उदकांत बुडत आहे. यास्तव आम्हांस तें अमरत्व साध्य होण्यासाठीं तुम्ही हा पर्वत अवश्य धारणकरावा.

अनंतबलबाहुभ्यामवष्टभ्भैकपाणिना ॥ ४४॥ मथ्य
तामम्रुतंदेवस्वधास्वाहार्थकामिनाम् ॥

अर्थ- तो असाकीं, अहोदेवा तुम्ही अनंत बलयुक्त दोन्ही स्वभुजानीं तो पर्व तधरून स्वधा (पितृभाग) वस्वाहा (देवभाग) याकार्यांची इच्छा करणा रांस अमृत प्राप्त्यर्थ एक हस्तानें मथन करावें.

ततःश्रुत्वासभगवान्स्तोत्रपूर्वंवचस्तदा ॥ विहाययो-
गनिद्रांतामुवाचमधुसूदनः ॥ ४५॥

अर्थ- असें त्याकाळीं देवदानवांचें स्तुतिपूर्वक वाक्य श्रवण करून पश्चा त् ते मधुदैत्य संहारक भगवान् विष्णु स्वकीय योगनिद्रेचा त्याग करून बोलतात.

श्रीभगवानुवाच ॥ स्वागतंविबुधाःसर्वेकिमागम
नकारणम् ॥ यस्मात्कार्यादिहप्राप्तास्तद्ब्रूतवि
गतज्वराः ॥ ४६॥

अर्थ- कीं, सर्व देवहो, आपलें आगमन झालें हें बहुत उत्तम जाहलें; परंतु तुमचें येण्याचें कारण कोणतेंआहे. आणि तुम्ही ज्याकार्यार्थ येथें प्राप्त झालां. तें स्वस्थ मनानें मला कथन करा.

नारायणेनैवमुक्ताःप्रोचुस्तत्रदिवौकसः ॥ अमर-

त्वायदेवेशमथ्यमानेमहोदधौ ॥ ४७॥ यथामृतत्वं
देवेशतथाप्रः कुरुमाधव ॥ त्वयाविनानतच्छक्यम-
स्माभिः कैटभार्दन ॥ ४८॥

अर्थ- असा नारायणानें प्रश्न केला असतां, त्याविषयीं देव बोलले कीं, हे देवाधि देवा, आम्ही आपणास अमरत्व प्राप्त्यर्थ क्षीरसमुद्र मथन करीत आहों. तथापि हे कैटभ दैत्य संहारका, तुम्हा वांचून हें कार्य करण्यास-आम्ही समर्थ नाहीं, यास्तव हे देवाध्यक्ष माधवा, ज्यारीतीनें आम्हांस अमरत्व प्राप्त होईल. तसा आपण प्रयत्न करावा.

प्राप्तुंतदमृतंनाथततोग्रेभवनोविभो ॥ इत्युक्तश्चततो-
विष्णुरमधृष्योरिमर्दनः ॥ ४९॥ जगामदेवैःसहितो-
यत्रासौमंदराचलः ॥ वेष्टितोभोगिभोगेनधृतश्चाम-
रदानवैः ॥ ५०॥

अर्थ- तो असा कीं, हे विश्वव्यापकनाथ, तें अमरत्व साधक अमृत प्राप्त-होण्यासाठीं आपण आमच्या अग्रभागीं समुद्र मथनार्थ उभें रहावें; अशी देवानीं प्रार्थना केली असतां, तेजादिक सर्व गुणानीं इतरांस सहन होण्याविषयीं अशक्य असल्या मुळें सर्व शत्रूंचें मर्दन करणारा विष्णु, प्रार्थना करण्यास आलेल्या त्या देवांसहवर्तमान निघाला तो जेथें शेष देहानें-वेष्टित असून देवदानवानीं ग्रहण केलेला मंदराचल होता तेथें आला.

विषभीतास्ततोदेवायतःपुच्छंततःस्थिताः॥ मुखतो
दैत्यसंघास्तुसैंहिकेयपुरःसराः ॥ ५१॥

अर्थ- नंतर देव त्या शेष मुखांतून चाललेल्या विषफूत्कारानीं भयभीत-होऊन जिकडें त्याचें पुच्छ होतें तिकडे उभे राहिले; आणि सिंहिकापुत्र राहु आदिकरून दैत्य समुदाय अभिमाना मुळें शेषाच्या मुखाकडे झाले.

सहस्रवदनंचास्यशिरःसव्येनपाणिना॥ दक्षिणेनब-
लिर्देहंनागस्याकृष्टवांस्तथा ॥ ५२॥

अर्थ- तसाच बलिही शेषनागाच्या दक्षिण बाजूनें म्हणजे मुखाकडे होऊन वाम (डावा) हस्तानें त्याचें सहस्र वदन युक्त मस्तक धरून उभा रा

हिला.

दधारामृतमंथानंमंदरंचारुकंदरं ॥ नारायणःस भ-
गवान्भुजयुग्मद्वयेनतु ॥ ५३ ॥

अर्थ- तसेच तें भगवान् नारायण स्वकीय चतुर्भुजानीं त्या अमृत उत्पन्न कर- ण्याच्या मंथ्याचें (रवी) स्थानीं योजलेल्या सुंदर गुहा शोभित मंदराच- लास धरून उभे राहिले.

ततोदेवासुरैःसर्वैर्जयशब्दपुरःसरं ॥ दिव्यंवर्षशतं-
साग्रंमथितःक्षीरसागरः ॥ ५४ ॥

अर्थ- पश्चात् देव व असुर या सर्वांनीं जयशब्द पूर्वक देवांच्या सवांशें व- र्षे पर्यंत क्षीर सागराचें मथन केलें.

ततःश्रांतास्तुतेसर्वेदेवादैत्यपुरःसराः ॥ श्रांतेषुतेषु
देवेंद्रोमेघोभूत्वांबुशीकरान् ॥ ५५ ॥ ववर्षामृतकल्पां
स्तान्ववौवायुश्चशीतलः ॥ भग्नप्रायेषुदेवेषुशांतेषु-
कमलासनः ॥ ५६ ॥ मथ्यतांमथ्यतांसिंधुरित्युवाच
पुनःपुनः ॥ अवश्यमुद्योगवतांश्रीरपाराभवेत्सदा ५७

अर्थ- नंतर ते दैत्य व सुरवसर्व देव श्रमलेले समयीं देव राज इंद्र, मेघ होऊनअ- से आयासानें खिन्न झालेल्या त्या देव दानवांवर अमृतासमान उदक बिंदूंची वृष्टि करूं लागला. तसाच शीतल वायुही वाहूं लागला. ते ह्यांते ग्लानि पाव- लेले देव शांत झाले असतां. त्या कालीं कमलासन ब्रम्हदेव, पुनःपुनः बोल- ले कीं, देवदैत्यहो तुम्ही समुद्राचें मथन करा मथन करा, कारण उद्योगशील पुरुषांस नियमें करून निरंतर अपार सर्वसंपत्ति प्राप्त होते.

ब्रह्मप्रोत्साहितादेवाममंथुःपुनरंबुधिं ॥ भ्राम्यमा
णेततःशैलेयोजनायुतशेखरे ॥ ५८ ॥ निपेतुर्हस्ति
यूथानिवराहशरभादयः ॥ श्वापदायुतलक्षाणित
थापुष्पफलाद्रुमाः ॥ ५९ ॥

अर्थ- असें ब्रम्हदेवानीं उत्तेजन दिलेले ते देव पुनः समुद्रमथन करूं ला- गले असतां, दशलक्ष योजन विस्तीर्ण शिखर युक्त तो पर्वत, चक्राकार भ्र- मण पावूं लागल्या वर त्या वरील गज समुदाय, वराह (डुकर), शरभ जाती

चे पशू आदिकरून प्रत्येकीं श्वापदांचे दशलक्षाधिक अनेक समूह तसेच पुष्प फलयुक्त वृक्ष हे त्या समुद्रांत पतन पावले.

तत: फलानांवीर्येणपुष्पौषधिरसेनच ॥ क्षीरसंघर्षणाच्चापिदधिरूपमजायत ॥ ६०॥

अर्थ- नंतर त्या फलांचीं बीजें, पुष्पें व ओषधि यांचा रस यांशीं दुग्धाचें-संघर्षण झाल्यानें त्या पासून दधिरूप वस्तु (दहीं) उत्पन्न झालें.

ततस्तुसर्वजीवेषुचूर्णितेषुसहस्रशः ॥ तदंबुमेदसोत्सर्गाद्वारुणीसमपद्यत ॥ ६१॥

अर्थ- पश्चात् ते समुद्रांत पडलेले हजारों प्रकारचे सर्वजीव-चूर्णित झाले-असतां, त्यासमुद्रोदकाच्या लाटेनें प्राण्यांचा मेद बाहेर येऊन पडला; त्यापासून वारुणी नामक मदिरा (मद्य) उत्पन्न झाली.

वारुणीगंधमाघ्रायमुमुदुर्देवदानवाः ॥ तदास्वादेनबलिनोदेवदैत्यादयोभवन् ॥ ६२॥

अर्थ- त्या वारुणी मदिरेच्या सुगंधाचें अवघ्राण करून देव, दानव हर्ष पावले. आणि ते देवदैत्यादिक त्या मदिराप्राशनानें पूर्वीपेक्षां अधिक बलाढ्य झाले.

ततोतिवेगाज्जगृहुर्नागेंद्रंसर्वतोसुराः ॥ मंथानंमंथयष्टिस्तुमेरुस्तत्राचलोभवत् ॥ ६३॥

अर्थ- तेव्हांते देवदैत्य अतिवेगानें चहूंकडून त्या नागराज शेषास ग्रहण करून उभे राहिले. त्याकाळीं पूर्वीच्या त्या रविस्थानापन्न मंदराचलास मेरुपर्वत, दोरीफिरविण्याची वरील यष्टि (दांडी) झाला.

अभवच्चाग्रतोविष्णुर्भुजैर्मंदरबंधनः ॥ सवासुकिफणालग्नपाणिःकृष्णोव्यराजत ॥ ६४॥

अर्थ- तेसमयीं विष्णु सर्वांच्या अग्रभागीं होऊन त्यानीं त्यासमग्र महापर्वतास स्वकीय भुजांनीं वेष्टन केलें. तेव्हां तो श्यामसुंदर विष्णू दोरीचे स्थानीं योजलेल्या वासुकीच्या फणांस लागले त्या हस्तानीं अतिशयें शोभला.

यथानीलोत्पलैर्युक्तोब्रम्हदंडोतिविस्तरः ॥ ध्वनिर्मेघसहस्रस्यजलधेरुत्थितस्तदा ॥ ६५॥

अर्थ- आणि जसा अतिलंबायमान ब्रम्हदंड (ब्राम्हणाचा दंड) नीलवर्ण कमलानीं शोभतो तसाच तो वासुकीही विष्णूच्या हस्तकमलानीं शोभला.

भागेद्वितीयेमघवानादित्यस्ततःपरं ॥ ततोरुद्रा-
महोत्साहावसवोगुह्यकादयः ॥ ६६ ॥

अर्थ- नंतर द्वितीय भागांत इंद्र त्यापुढें सूर्य आणि त्यापलीकडे महाउत्साहशक्तियुक्त एकादश रुद्र, याच क्रमानें पुढील भागीं अष्टवसु व गुह्यकादिक सर्व देवगण असेहे समुद्रमंथनास उभेराहिले. ॥

पुरतोविप्रचित्तिश्चनमुचिर्वृत्रशंबरौ ॥ द्विमूर्धावज्रदं-
ष्ट्रश्चसैंहिकेयोबलिस्तथा ॥ ६७ ॥

अर्थ- तसेच त्या असुरमंडळांत सर्वांच्या अग्रभागीं प्रथमतः बलि, विप्रचित्ति, नमुचि, वृत्र, शंबर, द्विमूर्धा, वज्रदंष्ट्र, सिंहिकापुत्र राहु.

एतेचान्येचबहवोमुखभागमुपस्थिताः ॥ ममंथुरंबुधिं
दृप्ताबलतेजोविभूषिताः ॥ ६८ ॥

अर्थ- हे वइतरही बहुत दैत्य, दानव असे ते बलवतेजयानीं अतिप्रसिद्ध पराक्रमी असल्यामुळें गर्वयुक्त होत्साते वासुकीच्या मुखाकडील प्रदेशीं समीप उभेराहून पुनः समुद्र मथन करूं लागले.

बभूवात्रमहाघोषोमहामेघरवोपमः ॥ उदधेर्मथ्यमा-
नस्यमंदरेणसुरासुरैः ॥ ६९ ॥

अर्थ- तेव्हां अशात्या महाबलिष्ठ देवदैत्यानीं मंदरपर्वतानें मथन केलेल्या समुद्राचा, प्रलयकालच्या महामेघांच्या शब्दासमान महाघोषत्या प्रदेशीं झाला.

तत्रनानाजलचराविनिर्धूतामहाद्रिणा ॥ विलयंसमु
पाजग्मुःशतशोथसहस्रशः ॥ ७० ॥

अर्थ- तसेच त्या समुद्रांतील अनेक प्रकारचे जलचर प्राणी मंदर पर्वताच्या भ्रमणानें अत्यंत कंपित होऊन त्यांतील शतशः सहस्रशः विशेषें करून लयास (मरण) गेले.

वारुणानिचभूतानिविविधानिमहेश्वरः ॥ पातालत
लवासीनिविलयंसमुपानयत् ॥ ७१ ॥

अर्थ- तशींच त्यासमुद्रांतील अनेक जातींचीं व पातालाचे अधोभागीं वास करणारीं अशीं तीं सर्व प्राणिमात्रें त्या महामंदराचलानें लयास नेलीं.

तस्मिंश्च भ्राम्यमाणेद्रौ संघृष्टाश्च परस्परं ॥ न्यपतन्पतगोपेताः पर्वताग्रान्महाद्रुमाः ॥ ७२॥

अर्थ- असा तो मंदराचल अतिवेगानें भ्रमण पावत असतां त्यावरील पक्षिसहित महावृक्ष परस्परांस घर्षण होऊन त्यापर्वताचे अग्रभागापासून खालीं पडूं लागले.

तेषांसंघर्षणाच्चाग्निरर्चिभिः प्रज्वलन्मुहुः विद्युद्भिरिवनीलाभ्रमावृणोन्मंदरंगिरिं ॥ ७३॥

अर्थ- तसाच त्या वृक्षांच्या अतिसंघर्षणानें उत्पन्न झालेला महाप्रज्वलित अग्निस्वकीय ज्वालांनीं वारंवार विद्युल्लतांनीं (विजा) व्याप्त केलेल्या कृष्णवर्ण अभ्रासारख्या मंदरपर्वतास आच्छादित करूं लागला.

ददाह कुंजरांश्चैव सिंहांश्चैव विनिःसृतान् ॥ विगतासूनि सर्वाणि सत्वानि विविधानि च ॥ ७४॥

अर्थ- आणि तो अग्नि त्या पर्वतांतून निघालेले गज, सिंह व इतर अनेक प्रकारचीं सर्व प्राणिमात्रें हीं त्या पर्वताच्या भ्रमणाचे वेगानें गतप्राण होऊन पडतांच त्यांस तो अग्नि दग्ध करूं लागला.

तमग्निममरश्रेष्ठः प्रदहंतमितस्ततः ॥ वारिणा मेघजेनेंद्रः शमयामास सर्वतः ॥ ७५॥

अर्थ- तेव्हां अमरश्रेष्ठ इंद्रानें इतस्ततः सर्वत्र अतिशयें दग्ध करणाऱ्या त्या अग्नीस मेघांकडून पर्जन्यवृष्टि करवून त्याच उदकानें सर्वत्र शांत केलें.

ततो नानारसास्तत्र सुस्रुवुः सागरांभसि ॥ महाद्रुमाणां निर्यासा बहवश्चौषधीरसाः ॥ ७६॥

अर्थ- नंतर त्या पर्वतावरील अनेक प्रकारचे गैरिकादिक धातूंचे रस, महावृक्षांचे निर्यास (चीक) ओषधींचे बहुत रस हे त्या समुद्रोदकांत स्रवूं लागले.

तेषाममृतवीर्याणां रसानां पयसैव च ॥ अमरत्वं सुरा जग्मुः कांचनछविसन्निभाः ॥ ७७॥

अर्थ- तेव्हां अमृत उत्पन्न करण्याच्या सामर्थ्यानें युक्त ते रस व समुद्राचे दुग्ध

यांच्या उडालेल्या बिंदूनीं ते देवस्वकीय देहाच्या सुवर्ण समान कांतियुक्त वर्णा नें अम्लत्व पावले.

अथतस्य समुद्रस्यतज्जातमुदकंपयः ॥ रसोंतरैर्विमिश्रं
चततः क्षीरादभूद्घृतम् ॥ ७८ ॥

अर्थ- पश्चात् त्या क्षीरसमुद्राचें तें दुग्धरूप उदक इतर अनेक रसानीं मिश्रित झा लें असतां त्या दुधा पासून घृत उत्पन्न झालें.

ततोब्रम्हाणमासीनंदेवावचनमब्रुवन् ॥ श्रांतास्मस्सु-
भृशंब्रम्हन्नोद्भवत्यमृतंचयत् ॥ ७९ ॥

अर्थ- त्याकाळीं ते इंद्रादिक सर्व देव तेथें बसलेल्या ब्रम्हदेवांस वाक्य बोलले. कीं, अहो ब्रम्हदेवा, आम्ही समुद्रमथनाचे आयासानीं अत्यंत श्रमलों; कारण अद्यापि अमृत उत्पन्न होत नाहीं.

ऋतेनारायणात्सर्वेदैत्यादेवोत्तमास्तथा ॥ चिरायितमि-
दंचापिसागरस्यतुमंथनं ॥ ८० ॥

अर्थ- तसेच नारायणावांचून इतर सर्व देवश्रेष्ठ व दैत्य हे ब्रम्हदेवांस बोलले. कीं; आणि हें समुद्रमथन तरी बहुकाळ चाललें आहे.

ततोनारायणंदेवंब्रम्हावचनमब्रवीत् ॥ विधत्स्वैषांबलं
विष्णोभवानेवपरायणम् ॥ ८१ ॥

अर्थ- नंतर ब्रम्हदेव, सर्वगतिरूपी नारायणास वचन बोलले कीं, हे विष्णो आ पण या सर्व देवादिकांस बलद्या. कारण तुम्हीच सर्वांस मुख्य आश्रय आहां.

विष्णुरुवाच ॥ बलंददामिसर्वेषांकर्मैतद्येसमास्थि-
ताः ॥ क्षोभ्यतांक्रमशःसर्वैर्मंदरःपरिवर्त्यतां ॥ ८२ ॥

अर्थ- तेसमयीं विष्णु बोलले कीं, या समुद्र मथन कार्याविषयीं जे उत्तम रीतीनें मग्न झाले आहेत. ते अमृतोत्पत्ति नझाल्या मुळें उद्विग्न झाले आहेत. आस्तव त्या सर्वांस क्रमें करून यथायोग्यतानुसार बळ देतों आणि सर्वांनीं स मुद्र मथनार्थ मंदर पर्वत फिरवावा. इतिश्री मत्स्यपुराण अमृत मथने द्विशत्यु त्तरएकोनपंचाशत्तमो ऽध्यायः ॥ २४९ ॥

अध्याय २५०

सूतउवाच ॥ नारायणवचःश्रुत्वाबलिनस्तेमहोदधिं ॥

तत्पश्चात् संहिता भूत्वा चक्रिरे भृशमाकुलं ॥१॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषीहो, असें नारायणाचें वचन श्रवण करून ते सर्व बलिष्ठ देवदैत्य आपल्या मित्रांसहवर्तमान एकत्र होऊन क्षीरमहासागराचें मथन करून त्यांनीं समुद्रांतील दुग्ध अत्यंत चंचल केलें.

ततः शतसहस्रांशुसमान इव सागरात् ॥ प्रसन्नाभः समुत्पन्नः सोमः शीतांशुरुज्वलः ॥२॥

अर्थ- नंतर त्या सागरापासून चंद्र उत्तम रीतीनें उत्पन्न झाला, तो लक्षशः किरणयुक्त सूर्यासमान लोकप्रकाशक असून शीतल किरणयुक्त असल्यामुळें आल्हाद कारक देदीप्यमान कांतीनें पूर्ण आहे.

श्रीरनंतरमुत्पन्ना घृतात्पांडुरवासिनी ॥ सुरादेवी समुत्पन्ना तुरगः पांडुरस्तथा ॥३॥

अर्थ- पश्चात् साक्षात् लक्ष्मी त्या समुद्रांतून उत्पन्न झाली, ती घृतापेक्षां अति शुभ्र वस्त्रांनीं सुशोभित आहे. त्याचप्रमाणें सुरेची वारुणी नामक देवता व शुभ्रवर्णाचा सुमुख अश्व हे उत्पन्न झाले.

कौस्तुभश्च मणिर्दिव्य उत्पन्नोमृतसंभवः मरीचिविकच श्रीमान्नारायणउरोगतः ॥४॥

अर्थ- तसाच अमृतस्रावी उत्तम कौस्तुभ मणि उत्पन्न झाला, तो किरणांनीं सर्वत्र देदीप्यमान असल्यानें अप्रतिम कांतिमान् आहे यास्तव तो नारायणाच्या वक्षस्थलीं भूषण होऊन राहिला आहे.

पारिजातश्च विकचकुसुमस्तबकांचितः ॥ अनंतरमदृश्यंस्ते धूममंबरसन्निभं ॥५॥ आपूरितदिशाभागं दुःसहं सर्वदेहिनां ॥ तमाघ्राय सुराः सर्वे मूर्छिताः परिलंघिताः ॥६॥

अर्थ- त्याचप्रमाणें प्रफुल्लित पुष्पांचे घोसांनीं सुशोभित पारिजातक वृक्ष उत्पन्न झाला. नंतर त्या सर्व दैत्यांनीं आकाश समान सर्वत्र व्याप्त असा धूम (धूम्र) त्या समुद्रांतून निघालेला अवलोकन केला तो धूम दशदिशांचे भागांत व्याप्त झाला असून सर्व देहधारि लोकांस सहन करण्याविषयीं सर्वथा अशक्य होता. अशा त्या धूराचें अवघ्राण (वास) करून सर्व देव त्यानें व्याकुल होऊन

मूर्च्छित झाले.

उपाविशन्नबुधितटेशिरः संगृह्य पाणिना ॥ ततः क्रमे णदुर्वारः सोनलः प्रत्यदृश्यत ॥ ७ ॥ ज्वालामालाकुलाकारः समंताद्भीषणोर्चिषा ॥ तेनाग्निनापरिक्षिप्ताः प्रायशस्तस्करास्कराः ॥ ८ ॥

अर्थ- तेव्हां ते संपूर्ण देवदैत्य स्वहस्तानें मस्तक धरून समुद्रतटाकीं बसले. तों पश्चात् क्रमानें तो दुस्तर अग्नि त्यासर्वांस दृष्टिगोचर झाला. तो अग्नि आसमंतात् पसरे केल्या ज्वाला समुदायानें सर्वत्र व्याप्त झालेल्या आकारानें युक्त असून स्वकीय ज्वालांनी भयंकर होता. त्या अग्नीनें प्रायशः देवदैत्य संतप्त झाले.

दग्धाश्चाप्यर्धदग्धाश्च बभ्रमुः सकलादिशः ॥ प्रधानादेवदैत्याश्च भीषितास्तेन वह्निना ॥ ९ ॥

अर्थ- आणि कोणी सर्वांगीं दग्ध होऊं लागले व कित्येक अर्धदग्ध झाले. असे ते सकल दिशांत भ्रमण करीत होते तसेच प्रमुख देवदैत्य ही त्या अग्नीनें अत्यंत भयभीत झाले.

अनंतरं समुद्भूतास्तस्माड्डुंडुभजातयः ॥ कृष्णासर्पामहादंष्ट्रारक्ताश्च पवनाशनाः ॥ १० ॥

अर्थ- नंतर त्या अग्नीपासून डुंडुभ (निर्विष द्विमुख) जातीचे सर्प, कृष्णसर्प, तीक्ष्ण विषयुक्त दंष्ट्रेचे (दाढ) व आरक्त वर्ण असे वायुभक्षक अनेक जातीचे महासर्प उत्पन्न झाले.

श्वेतपीतास्तथाचान्येतथागोनसजातयः ॥ मशकाभ्रमरादंशा मक्षिकाः शलभास्तथा ॥ ११ ॥ कर्णशल्याः कृकलासा अनेकाश्चैव बभ्रमुः ॥ प्राणिनोदंष्ट्रिणोरौद्रास्तथाहिविषजातयः ॥ १२ ॥ शार्ङ्गहालाहलामुस्तवत्सकं गूरुभस्मगाः ॥ नीलपत्रादयश्चान्येशतशोबहुभेदिनः ॥ येषांगंधेनदह्यंतेगिरिशृंगाण्यपिद्रुतं ॥ ॥ १३ ॥

अर्थ- तसेच शुभ्र व पीतवर्ण, अन्य गोनस (घोणस) जातीचे हे सर्प, मश-

क (डांस आदिकरून दंश करणारे प्राणी), भ्रमर (भुंगे), दंश (वनमक्षिका व गांधील माशी), मक्षिका (माश्या), शलभ (शेतावर पडणारे टोळ), कर्णशल्य (कर्णास शब्दमात्रानें शल्यासारखे दुःखदायक), कृकलास (सरडे), कितीएक महादंष्ट्रा (दाढ), युक्त सिंह व्याघ्रादिक प्राणी, भयंकर विषयुक्त जाति, शार्ङ्ग नामक पक्षी, हालाहल नामें अतिदाहक विषयुक्त प्राणी नागर मोथ्यांत रहाणारे, वत्सनाभ (बचनाग) नामक विषानें युक्त, राख्यांत असणारे, बहु भस्मांत वास करणारे व बहुतांचें विदारण करणारे कृष्णवर्ण पंखाचें अन्य शतशः प्राणी हे सर्वही त्या अग्नीपासून उत्पन्न होऊन त्यांस्थानीं इतस्ततः संचार करूं लागले. आणि त्यांतील कांहीं प्राण्यांच्या देहाचे वासानेंही पर्वतशिखरें शीघ्र दग्ध होत.

अनंतरं नीलरसौघभृंगभिन्नाजनाभं विषमं श्वसंतं ॥
कायेन लोकांतरपूरकेण केशैश्च वन्हिप्रतिमैर्ज्वलद्भिः
॥१४॥ सुवर्णमुक्ताफलभूषितांगं किरीटिनं पीतदु-
कूलजुष्टं ॥ नीलोत्पलाभैः कुसुमैः कृतार्थं गर्जंतमंभो
धरभीमवेगं ॥ १५॥ अद्राक्षुरंभोनिधिमध्यसंस्थं स-
विग्रहं देहिभयाश्रयं तं ॥ विलोक्य तं भीषणमुग्रनेत्रं भू-
तान्यवित्रेसुरथापि सर्वे ॥ १६॥

अर्थ- नंतर केवल नीलवर्ण रसाचा ओघ किंवा भृंग (भ्रमर) अथवा तुटलेल्या अंजन पर्वताचा भाग यांसमान कृष्णवर्ण [illegible] कांतीनें युक्त असून ती क्ष्ण श्वासोच्छ्वास टाकीत आहे; तसाच लो[illegible] किंवा मूलोकाच्या मध्यभागीं व्याप्त झालेला देह व अग्नीसारखे [illegible] केशांनीं संपन्न आहे. आणि सुवर्ण, मुक्ताफलें (मौक्तिकें) मुगुट व पीतांबर वस्त्र यांनीं सर्वांगीं यथायुक्त शोभत असून कृष्णवर्ण कमलासमान कांतियुक्त पुष्पांनीं सुशोभित आहे;- त्याचप्रमाणें सजल मेघासारख्या भयंकर वेगानें पूर्ववत् समुद्राच्या मध्यभागीं मूर्तिमान् स्थित असून गर्जना करीत आहे. अशा [illegible] आणि भयदायकास त्या देवदैत्यांनीं अवलोकन केलें. तसेंच त्या उग्रनेत्र युक्त भयंकर पुरुषास अवलोकन करून तत्क्षणीं सर्व प्राणीही अत्यंत त्रास पावले.

केचिद्विलोक्यैव गताह्यभावं निःसंज्ञतां चाप्यपरे मप-

न्नाः ॥ वेमुर्सुरेभ्योपिचफेनमन्येकेचित्त्वबासाविष
मामवस्थां ॥ १७॥

अर्थ- तसेच कोणी त्यापुरुषास अवलोकन करतांच तत्काल मृत्यु पावले. इतर कोणी मूर्छित झाले. अन्यादिक एकांचे मुखांतून फेंस बाहेर चालला व कांहीं प्राणी प्राणांत अवस्थेस प्राप्त झाले.

श्वासेनतस्यनिर्दग्धाततोविधिवंद्ददानवाः ॥ दग्धां-
गारनिभाजातायेभूतादिव्यरूपिणः ॥ ततस्तुसं-
भ्रमाद्विष्णुस्तमुवाचसरात्मकं ॥१८॥

अर्थ- नंतर विष्णु, इंद्र, दानव व इतर जे दिव्यरूपी देवादिक प्राणी हे सर्व त्या घोरपुरुषाच्या श्वासानें दग्ध प्राय झाल्यामुळे देहसंबंधि वर्णानें दग्ध झालेल्या अंगारा (कोळसा) सारखे दिसूं लागले. पश्चात् भगवान् विष्णु, भययुक्त त्वरेनें त्या देवस्वरूप पुरुषास प्रश्न करतात.

भगवानुवाच ॥ कोभवानन्तकप्रख्यः किमिच्छसि
कुतोपिच ॥ किंकृत्वातेप्रियंजायेदेवमाचक्ष्वमेखि
लं ॥ १९ ॥

अर्थ- कीं, तूं मृत्युसमान कोण असून काय इच्छितोस? कोठून आला आहेस? आणि आम्ही काय केले असतां, तुझें प्रिय होईल तो सर्व प्रकार मला कथन कर.

तच्चतस्यवचः श्रुत्वाविष्णोःकालाग्निसन्निभः ॥ उवा
चकालकूटस्तु भिन्नदुंदुभिनिस्वनः ॥ २० ॥

अर्थ- तें त्याविष्णूचें वाक्यश्रवण करून कालाग्निसमान तो कालकूट नामक क्रूर पुरुष छिन्नभिन्न झालेल्या दुंदुभी (नौबद) सारख्या शब्दानें भाषण करतो.

कालकूटउवाच ॥ अहंहिकालकूटाख्योविषो-
बुधिसमुद्भवः ॥ यदातीव्रतरामर्षैः परस्परवधैषि-
भिः ॥ २१ ॥ सुरासुरैर्विमथितोदुग्धांभोनिधिर-
च्युतः ॥ संभूतोहंतदासर्वान्हंतुंदेवान्सदानवान् ॥
॥ २२ ॥

अर्थ- कीं, मी कालकूट नामक विषरूपी असून समुद्रापासून उत्पन्न झालों तो असा कीं, ज्याकाळीं अतितीक्ष्णक्रोधानें परस्परांच्या वधाची इच्छा करणाऱ्या देवदैत्यांनीं या अद्भुत क्षीरसमुद्रानें बहुत मथन केलें; त्याकाळींमी दानवसहित देवांचा संहार करण्यासाठीं यामथनापासून उत्पन्न झालों.

सर्वानिहहनिष्यामिक्षणमात्रेणदेहिनः॥ मामांग्रसतवैस वैयातवागिरिशांतिकं॥२३॥

अर्थ- तस्मात् आतांमी सर्वप्राण्यांस क्षणमात्रानें मारीन; यास्तव तुम्ही सर्वांनीं मला भक्षण करूनये; तरमजपासून भयन व्हावें अशी इच्छा असल्यास कैलासवासीशंकरासमीप शरण जावें.

श्रुत्वैतद्वचनंतस्यततोभीताः सुरासुराः॥ ब्रम्हविष्णू-पुरस्कृत्यगतास्तेशंकरांतिकं॥२४॥

अर्थ- हें त्यानें वचनश्रवणकरून सर्वदेवदैत्य भयभीत झाले. आणि ब्रम्हदेव व विष्णु यांसपुढें करून तेथून शंकरासमीप गेले.

निवेदितास्ततोद्वास्थैस्तेगणेशैः सुरासुराः॥ अनुज्ञाताःशिवेनाथविविशुर्गिरिशांतिकं॥२५॥

अर्थ- तेव्हां नंदिकेश्वरादिगणनायक द्वारपालानीं शिवास निवेदन केलें कीं, आपणाकडे देवदैत्य आले आहेत. तेसमयीं शिवानीं आज्ञादिल्यानंतर ते शंकराचे अग्रभागीं आले.

मंदरस्यगुहांहैमींमुक्तामणिविभूषितां॥ सुस्वच्छमणिसोपानांवैडूर्यस्तंभमंडितां॥२६॥ तत्रदेवासुरैः सर्वैर्जानुभिर्धरणींगतैः॥ ब्रम्हाणमग्रतः कृत्वाइदंस्तोत्रमुदाहृतम्॥२७॥

अर्थ- तोमंदरपर्वताची गुहासुवर्णरचित असून मौक्तिकें वरत्न मणि यानीं करून अलंकृत आहेतसेच उत्तमतेजस्विस्वच्छहिरे आदिकरून मण्यांच्या पायऱ्या वैडूर्य नामकमण्यांचे स्तंभ (खांब) यानींसुशोभित आहे. अशात्या गुहेंत सर्वदेवासुरानीं पृथ्वीवर गुडघे टेंकून व ब्रम्हदेवास पुढें करून शिवाचे सुत्यर्थ हेंपुढील स्तोत्र आरंभिलें.

देवदानवाऊचुः॥ नमस्तुभ्यंविरूपाक्षसर्वतोनंतचक्षु

षे ॥ नमः पिनाकहस्ताय वज्रहस्ताय धन्विने ॥ २८ ॥ नम
स्त्रिशूलहस्ताय दंडहस्ताय धूर्जटे ॥ नमस्त्रैलोक्यनाथा
य भूतग्रामशरीरिणे ॥ २९ ॥ नमः सुरारिहंत्रे च सोमाग्न्य
र्काग्र्यचक्षुषे ॥ ब्रम्हणे चैव रुद्राय नमस्ते विष्णुरूपिणे ॥ ३०
॥ ब्रम्हणे वेदरूपाय नमस्ते देवरूपिणे ॥ सांख्ययोगाय
भूतानां नमस्ते शंभवाय ते ॥ ३१ ॥ मन्मथांगविनाशाय न
मः कालक्षयंकर ॥ रंहसे देवदेवाय नमस्ते च सुरोत्तम ॥ ३२
॥ एकवीराय शर्वाय नमः पिंगकपर्दिने ॥ उमाभर्त्रे नमस्तु
भ्यं यज्ञत्रिपुरघातिने ॥ ३३ ॥ शुद्धबोधप्रबुद्धाय मुक्तकै
वल्यरूपिणे ॥ लोकत्रयविधात्रे च वरुणेंद्राग्निरूपिणे ॥
॥ ३४ ॥ ऋग्यजुःसामवेदाय पुरुषायेश्वराय च ॥ अग्र्याय
चैव चोग्राय विप्राय श्रुतिचक्षुषे ॥ ३५ ॥ रजसे चैव सत्वाय
नमस्ते स्तिमितात्मने ॥ अनित्यनित्यभावाय नमो नित्य-
चरात्मने ॥ ३६ ॥ व्यक्ताय चैवाव्यक्ताय व्यक्ताव्यक्ताय
वै नमः ॥ भक्तानामार्तिनाशाय प्रियनारायणाय च ॥ ३७
॥ उमाप्रियाय शर्वाय नंदिवक्त्रांचिताय च ॥ ऋतुमन्वं
तकल्पाय पक्षमासदिनात्मने ॥ ३८ ॥ नानारूपाय मुंडाय
वरूथपृथुदंडिने ॥ नमः कमलहस्ताय दिग्वासाय शि-
खंडिने ॥ ३९ ॥ धन्विने रथिने चैव यतये ब्रम्हचारिणे ॥ इ
त्येवमादिचरितैस्तुत तुभ्यं नमो नमः ॥ ४१ ॥

अर्थ- तें असें कीं, देवदानवब्रम्हणनात. (हे विरूपाक्ष) अनेक प्रकारच्या नयन सुशो
भित) देवा तुमचे नेत्र (ज्ञान) अंतररहित असल्यामुळें सर्वत्र व्यापक असून तुम्ही
भक्तसंकर परिहारार्थ हस्तांत पिनाकधनुष्य व वज्र धारण केलें आहे. यास्तव तु-
म्हास आमचे वारंवार नमस्कार असोत ॥ २८ ॥ हे धूर्जटे (जटाभारभूषितमस्त
का) महादेवा आपण पांचभौतिक प्राणिमात्रांचे शरीरांत वास करणारे अस
ल्यामुळें त्रैलोक्यनाथ आहां. आणि भक्तसंरक्षणार्थ स्वहस्तांत त्रिशूळ व दंड
हीं आयुधें धारण करतां. तस्मात् आम्ही तुम्हास पुनःपुनः नमस्कार करतों ॥ २९ ॥
तसेच तुम्ही चराचर सर्व जगाची सृष्टि, प्रळय व पालन यांविषयीं क्रमें करू

न ब्रम्ह देवरुद्र वविष्णु हींरूपें धारण करीत असून देवसंरक्षणार्थ त्यांच्याश त्रूंचा वध करतां. आणि चंद्र, अग्नि व सूर्य या उत्तमत्रिनेत्रांनीं सर्वजगास प्रकाशकरतां यास्तव तुम्हांस आमचे अनेक नमस्कार असोत. ॥ ३०॥ त्याचप्रमाणें आपण वेदरूप ब्रम्ह असून सर्वदेवस्वरूपी आहां. आणि सांख्य (आत्मानात्मविचार) व ध्यानादिक योग यारूपानीं सर्वप्राण्यांस कल्याणोत्पत्तीचे स्थानरूप आहां. यास्तव आम्ही तुम्हास बहुत प्रणाम करतों. ॥ ३१॥ तसाच कालाचाही क्षय करण्याविषयीं तुम्ही समर्थ असल्यामुळें मदनाचें अंग दग्ध केलें; असे आपण अतिवेगशाली देवाधिदेव आहां. तस्मात् हे देवोत्तमा तुम्हास आमचे वारंवार नमस्कार असोत. ॥ ३२॥ तसेच तुम्ही अप्रतिमवीर असल्यामुळें सर्वदुष्टांचा संहार करणारे असून स्फरवानें सर्वांस इष्टफलदायक पिंगट वर्णजटा जूटानें म्हणजे जटासमुदायानें स्फशोभित आहां. आणि पार्वतीचे पति असल्यामुळें तिचा दक्ष प्रजापतीनें आपल्या यज्ञांत अनादर केल्या वरून पार्वतीनें देहत्याग केला असतां, आपण त्याक्रोधानें तो दक्षयज्ञ व कालांतरीं त्रिपुरासुर यांचा संहार केला. यास्तव आम्ही तुम्हास सर्वदा नमस्कार करीत आहों. ॥ ३३॥ त्याचप्रमाणें आपण शब्दज्ञानानें सर्व कार्यां विषयीं अति जागृतियुक्त असल्यामुळें त्रैलोक्य धारण करणारे असून वरुण इंद्र व अग्नि यांच्यारूपानें प्रसिद्ध व मुक्तियोग्य जीवांस कैवल्यरूप देणारे आहां यास्तव आम्ही तुम्हास निरंतर प्रणाम करतो. ॥ ३४॥ आणि तुम्ही ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या वेदत्रयरूपानें प्रसिद्ध असून सर्वप्राण्यांच्या देहपुरांत ईश्वर (नियंता) रूपें करून वास करीत आहां. आणि आपण सर्वश्रुतींचे नेत्र असल्यामुळें उग्र तपस्वी श्रेष्ठ ब्राम्हणरूपी आहां. यास्तव तुम्हास वारंवार आमचे नमस्कार असोत. ॥ ३५॥ तसेच तुम्ही रज, सत्व व तम या त्रिगुणात्मक स्वरूपानें वर्तत असून अत्यंत दयालु स्वभावानें पूर्ण असल्यानें नश्वर जगास ब्रम्हरूपत्व देतां व नित्य संचार करणाऱ्या मुक्तांचेही आत्मा (परमगति) आहां; यास्तव आम्ही तुम्हास सर्वकाल नमस्कार करतों. ॥ ३६॥ आणि आपण स्वकीय रूपेंनेंच भक्तजनांस दर्शन देतां यामुळें तुम्हास व्यक्त म्हणतात; व आपल्या दये वांचून केवळ या भक्तांच्या साधनानेंच दर्शन देतां असें नाहीं म्हणून अव्यक्त म्हणतात. तशीच भक्तांची पीडा दूर करीत असून नारायण तुम्हास प्रि-

य आहेत. यास्तव निरंतर आपणास आमचे नमस्कार असोत. ॥ ३७॥ त्या
चप्रमाणें तुम्ही दुर्जनसंहारक असल्यामुळें पार्वतीला अतिप्रिय असून नंदि
केश्वराच्या मुखानें पूजित आहां. आणि ऋतु, मन्वंतर, कल्प, पक्ष, मास व
दिवस यांचे आत्मा (नियामक) आहां यास्तव हे कालरूपा, आम्ही पुनः-
पुनः तुम्हांस नमस्कार करतों. ॥ ३८॥ आणि आपण अनेकरूपी असून
मुंडस्वरूपही आहां. तसेंच रथसंरक्षणार्थ केलेल्या लोहमय (लोखंडी)
आदिकरून आवरणाच्या महा दंडानें युक्त असून हस्तात कमळें धार
ण करतां किंवा तुमचे हस्त कमळासारखे शोभतात. व तुम्ही दिगंबर असून
आपलें मस्तक मयूरपिच्छांनीं (पीस) सुशोभित आहे. तस्मात् तुम्हा
स वारंवार आमचे नमस्कार असोत. ॥ ३९॥ तसेंच तुम्ही पिनाक धनुष्य-
ग्रहण करून रथांत आरोहण करतां तथापि संन्यास व्रत व ब्रम्हचर्य यां
पासून भ्रष्ट होत नाहीं. इत्यादिक अद्भुत चरित्रानीं तुम्ही सर्वदा स्तुत्य अ
सल्यावरून तुम्हांस आम्ही निरंतर नमस्कार करीत आहों. ॥ ४०॥

एवंसुरासुरैःस्थाणुस्तुतस्तोषमुपागतः॥ उवाचवाक्यंभीता
नांस्मितान्वितशुभाक्षरं ॥ ४१॥

अर्थ - अशी सर्व देवासुरानीं स्तुति केली असतां, कालत्रयीं अचलस्वरूपी शं
कर प्रसन्न होऊन त्या भयभीत झालेल्या देवांस मंदहास्य पूर्वक असून शुभ कार-
क अक्षरानीं युक्त असें वाक्य बोलतात.

श्रीशंकरउवाच ॥ किमर्थमागताब्रूतत्रासम्लानमुखां
बुजाः॥ किंवाभीष्टंददाम्यद्यकामंप्रब्रूतमाचिरम् ॥ इ-
त्युक्तास्तेतुदेवेनप्रोचुस्तंससुरासुराः॥ ४२॥

अर्थ - कीं, देवदैत्यहो, तुम्ही यथें किमर्थ आगमन केलें; आणि तुमचीं मुख
कमलें त्रासानें म्लान झालीं आहेत. तेव्हां या कालीं मी तुम्हांस इष्ट (इच्छित) काय
वस्तू देऊं. हें यथेष्ट कथन करा. त्याविषयीं विलंब करूं नका. असें महादेवानीं भा
षण केलें असतां, ते देवदैत्य त्यांस वाक्य बोलतात.

सुरासुराऊचुः ॥ अमृतार्थेमहादेवमथ्यमानेमहोदधौ
॥विषमद्भुतमुद्भूतंलोकसंक्षयकारकं॥ ४३॥

अर्थ - कीं, अहो महादेवा, आम्ही अमृत उत्पन्न होण्यासाठीं क्षीरमहासागराचें-

मथन केलें असतां त्यांत अद्भुत विष उत्पन्न झालेलें लोकांचा अतिक्षय करणारें-आहे.

सउवाचाथसर्वेषांदेवानांभयकारकः॥सर्वान्वाभक्ष-
यिष्यामिअथवामापिबस्त्वथा॥४४॥

अर्थ- नंतर तो विषपुरुष सर्व देवांस भय उत्पन्न करीत होत्सातां बोलला कीं; मी तुम्हा सर्वांस भक्षण करीन. अथवा तसें तुम्ही मला भक्षावें.

नमशक्तावयंग्रस्तुंसोस्मान्शक्तोबलोत्कटः॥एषनि
श्वासमात्रेणशतपर्वसमद्युतिः॥४५॥विष्णुः कृष्णः
कृतस्तेनयमश्चविषमात्मवान्॥मूर्छिताः पतिताश्चा
न्येविप्रणाशंगताःपरे॥४६॥

अर्थ- परंतु आम्ही त्यांस भक्षण करण्याविषयीं समर्थ नाहीं. व तो मात्र अति बलिष्ठ असल्यामुळें आम्हांस ग्रासण्याविषयीं समर्थ आहे. आणि तो तेजानें वज्रासमान असून त्यानें आपल्या केवल श्वासें करूनच विष्णूस कृष्णावर्ण केलें. यमास उग्ररूप केलें. तसेंच अन्य कितीएक त्याच्या श्वासमात्रानें मूर्छित होऊन पडले. व इतर कितीएक मृत्यु पावले.

अर्थोनर्थक्रियांयातिदुर्भगानांयथाविभो॥दुर्बलानां
चसंकल्पोयथाभवतिचापदि॥४७॥

अर्थ- तस्मात् हे प्रभो, जसें अभाग्याचें कांहीं कार्य अनर्थ (दुःख) कारक क्रियेच्या परिणामास प्राप्त होतें. व दुर्बल लोकांचा मनोरथ आपत्कालांत जसा व्यर्थ होतो.

विषमेतत्समुद्भूतंतस्मादाम्रतकांक्षया॥अस्माद्भयान्मो-
चयत्वंगतिस्त्वंचपरायणम्॥४८॥

अर्थ- तसें आम्ही अमृताच्या इच्छेनें समुद्रमथन करीत असतां, त्यापासून विष उत्पन्न झालें; या भयापासून आपणच आम्हास मुक्त करावें; कारण तुम्हीच आम्हास सर्वकालीं गति असून उत्तम आश्रय ही आहां.

भक्तानुकंपीभावज्ञोभुवनादीश्वरोविभुः॥यज्ञाग्रभु
क्सर्वहविःसोमः सौम्यः स्मरांतकृत्॥४९॥त्वमेकोः
नोगतिर्देवगीर्वाणगणशर्मकृत्॥रक्षास्मान्भक्षसंक

ल्पाद्विरूपाक्षविषज्वरात् ॥ ५० ॥

अर्थ- कारण आपण सर्व भुवनांस उत्पन्न करणारे व्यापक ईश्वर असल्या मुळें सर्व यज्ञांत मुख्यत्वें भाग ग्रहण करणारे व भक्तांचा भाव जाणून त्यांवर दया करणारे असून शालि (साळी) आदिकरून सर्व होम द्रव्यें हृद्विंगत करणारा चंद्र तुमच्या ललाटावर शोभत आहे. आणि तुम्ही मदनास दग्ध केलें तथापि भक्तांविषयीं सौम्य असल्यानें देवगणांस सुखदायक आहां. यावरून हे देवा-तुम्हीच आम्हास गति आहां. यास्तव आतां आपण स्वेच्छेनें या विषरूप ज्वरापासून आम्हास रक्षावें किंवा त्या विषापेक्षां तुम्हीच आम्हांस भक्षावें.

तच्छ्रुत्वा भगवानाह भगनेत्रांतकृद्भवः ॥ भक्षयिष्याम्यहं घोरं कालकूटं महाविषम् ॥ ५१ ॥ तथान्यदपि यत्कृत्यं कृच्छ्रसाध्यं सुरासुराः ॥ तच्चापि साधयिष्यामि तिष्ठध्वं विगतज्वराः ॥ ५२ ॥

अर्थ- तें देवांचें स्तुतिपूर्वक वाक्य श्रवण करून ते भगनामक देवाच्या नेत्रांचा नाश करणारे शंकर, भाषण करतात कीं, देवदैत्यहो तें कालकूटनामक घोर महाविष भक्षण करीन. तसेंच अन्यही कष्टसाध्य जें कांहीं कृत्य असेल तेंही मी साधीन. तुम्ही मनांतील दुःखाचा त्याग करून स्वस्थ व्हा.

इत्युक्ता हृष्टरोमाणो बाष्पगद्गदकंठिनः ॥ आनंदाश्रुपरीताक्षाः सनाथा इव मेनिरे ॥ सुरा ब्रम्हादयः सर्वे समाश्वस्ताः सुमानसाः ॥ ५३ ॥

अर्थ- असें शिवानीं भाषण करून उत्तम अंतःकरण संपन्न ब्रम्हादिक सर्व देवांस आश्वासन दिलें असतां, ते हर्षरोमांच, प्रेम गहिंवरानें सद्गदित कंठ व आनंदाश्रुयुक्त नयन यानीं युक्त झाले. आणि आम्ही सनाथासारखे आहों असें त्यांनी-मानलें.

ततोऽव्रजद्द्रुतगतिना ककुद्मिना हरोंबरे पवनगतिर्जगत्पतिः ॥ प्रधाविते रसुरसुरेंद्रनायकैः स्ववाहनैर्विगृहीतशशिचामरैः ॥ पुरःसरैः सतुरुशशमेशमाश्रयैः शिवो वशीशिखिकपिशोर्ध्वजूटकः ॥ ५४ ॥

अर्थ- नंतर ते जगत्पालक शिव त्वरित गमन करणाऱ्या नंदिकेश्वरावर आ

रोहण करून वायुसमान शीघ्रगतीनें आकाशमार्गें चालले. त्याकाळीं असुर व देव यांतील प्रमुख अध्यक्ष स्वकीय वाहनांवर आरूढ होत्साते शुभ्र चामरें हस्तांत ग्रहण करून त्यांचे अग्रभागीं अतित्वरेनें गमन करूं लागले; ते समयीं ते शिव, सर्वांस स्वसत्तेंत वर्तविणारे व मयूरासारख्या पिंगट वर्ण ऊर्ध्वज टाजूटानें (जटासमुदाय) युक्त असून आपल्या उत्तम आश्रयानें आसमंतात् चाललेल्या त्या देवदैत्यांनीं अतिशयें शोभले.

आसाद्य दुग्धसिंधुं तं कालकूटं विषं यतः ॥ ततो देवो महादेवो विलोक्य विषमं विषम् ॥ ५५ ॥ छायास्थानकमास्थाय सोपिबद्वामपाणिना ॥

अर्थ- असे ते शंकर, तें कालकूट विष ज्या स्थानीं होतें त्या क्षीरसागरास आले. पश्चात् अतितेजस्वि महादेवानीं तें तीक्ष्ण विष अवलोकन करून छायायुक्त स्थलीं बसून वामहस्तानें प्राशन केलें.

पीयमाने विषे तस्मिंस्ततो देवाः सहासुराः ॥ ५६ ॥ जगुश्च ननृतुश्चापि सिंहनादांश्च पुष्कलान् ॥ चक्रुः शक्रमुखाद्याश्च हिरण्याक्षादयस्तथा ॥ ५७ ॥ स्तुवंतश्चैव देवेशं प्रसन्नाश्चाभवंस्तदा ॥

अर्थ- असें तें विषप्राशन केल्यावर ते असुरसहित देव, शिवाचें यशगायन करीत नृत्य करूं लागले. तसेंच इंद्रप्रमुख देव व हिरण्याक्षादिक दैत्य हे सर्वही बहु हर्षयुक्त झाल्यामुळें त्याकालीं बहुत सिंहनाद करीत होत्साते त्या देवाधिदेवाची स्तुति करूं लागले.

कंठदेशे ततः प्राप्ते विषे देवमथाब्रुवन् ॥ ५८ ॥ विरंचिप्रमुखा देवा बलिप्रमुखतोसुराः ॥ शोभते देव कंठस्ते गात्रे कुंदनिभप्रभे ॥ ५९ ॥

अर्थ- नंतर तें विष शिवाच्या कंठस्थानीं प्राप्त झालें असतां, ब्रम्हदेवप्रमुख देव व बलि प्रभृति असुर, महादेवांस बोलले कीं, हे देवा, कुंदपुष्पासमान शुभ्र वर्णयुक्त तुमच्या देहांत हा कंठ शोभतो.

भृंगमालानिभं कंठेप्यत्रैवास्तु विषं तव ॥ इत्युक्तः शंकरो देवस्तथाप्राह पुरांतकृत् ॥ ६० ॥

अर्थ- तस्मात् भ्रमरांच्या मालेसारखें शोभायमान हें विष, तुमच्या कंठांतच असो. असें देवदैत्यांनीं भाषण केलें असतां त्रिपुरासुर नाशक महातेजस्वि शंकरानीं तथास्तु असें भाषण केलें.

पीतेविषेदेवगणानुविमुच्यगतोहरोमंदरशैलमेव॥त स्मिन्गतेदेवगणाःपुनस्तंममंथुरब्धिंविविधप्रकारैः॥ ॥६१॥

अर्थ- असें विष प्राशन करून शंकर, देवगणांस सोडून स्वकीय मंदर पर्वतासच गेले. त्याकालीं ते गेल्यावर पुनः देवगण अनेक प्रकारानीं त्या क्षीर समुद्राचें मथन करूं लागले. इतिश्री मत्स्यपुराणे अमृत मथने कालकूटोत्पत्तिर्नामद्विशतोत्तरपंचाशत्तमो ऽध्यायः ॥ २५०॥

अध्याय २५१ वा.

सूतउवाच ॥ मथ्यमानेपुनस्तस्मिन्जलधौसमदृश्यत ॥धन्वंतरिःसभगवान्आयुर्वेदप्रजापतिः॥ १॥

अर्थ- सूत बोलले ऋषीहो याप्रमाणें पुनः त्यानीं त्या समुद्राचें मथन केलें असतां, त्या समुद्रांतून प्रगट झालेले भगवान् धन्वंतरि, त्या देवदैत्यांच्या दृष्टी पडले; ते आयुर्वेदानें (वैद्यशास्त्र) सर्वलोकांचें संरक्षण करतात.

मदिराचायताक्षीसालोकचित्तप्रमाथिनी॥ततोमृतं चसुरभिःसर्वभूतभयापहा॥ २॥

अर्थ- तशीच पूर्वी निघालेली मदिरेची (मद्य) देवता आकर्ण विशाल नेत्रानीं सुशोभित असून तीलोकांच्या चित्तास अत्यंत मोहित करणारी आहे. नंतर अमृत व कामधेनु हीं रत्नें त्यांतून निघालीं. ती कामधेनु सर्वप्राण्यांच्या भयाचा नाश करणारी आहे.

जग्राहकमलांविष्णुः कौस्तुभंचमहामणिं॥गजेंद्रंच सहस्राक्षोहयरत्नंचभास्करः॥ ३॥

अर्थ- अशा त्या समुद्रमथनांतून निघालेल्या रत्नांतील लक्ष्मी व कौस्तुभ नामक महामणिही विष्णूनीं ग्रहण केली. आणि सहस्त्रनयन इंद्रानें सर्वगजश्रेष्ठ ऐरावत गज घेतला. व सूर्यानें सप्तमुख अश्व रत्न स्वीकारिलें.

धन्वंतरिंचजग्राहलोकारोग्यप्रवर्तकं॥ छत्रंजग्राह

वरुणः कुंडलेचशचीपतिः ॥ ४॥

अर्थ - तसेंच वरुणानें धन्वंतरीस ग्रहण केलें; तो सर्व लोकांस आरोग्य दायक आहे. आणि त्यानें अमृत स्त्राविछत्राचा अंगीकार केला. व शचीपति इंद्रानें कर्णकुंडलें घेतली.

पारिजाततरुंवायुर्जग्राहमुदितस्तथा ॥ धन्वंतरिस्ततोदेवोवपुष्मानुदतिष्ठत ॥ ५॥ श्वेतंकमंडलुंबिभ्रदमृतंयत्रतिष्ठति ॥ एतदत्यद्भुतंदृष्ट्वादानवानांसमुत्थितः॥ ॥६॥ अमृतार्थेमहान्नादोममेदमितिजल्पताम् ॥

अर्थ - त्याचप्रमाणें वायूनें हर्षे करून पारिजात वृक्षग्रहण केला. नंतर सर्वांग सुंदर धन्वंतरि देवत्या समुद्रांतून वर आला त्यानें स्वहस्तांत एक शुभ्र कमंडलु-(कलश) ग्रहण केला होता; त्यांतच अमृत होतें. तें अति अद्भुत अवलोकन करून हें माझें असें भाषण करणाऱ्या सर्व दानवांचा महान् शब्द त्या अमृता साठीं अतिशयें झाला.

ततोनारायणोमायामास्थितोमोहिनींप्रभुः ॥७॥ स्त्रीरूपमतुलंकृत्वादानवानभिसंसृतः ॥ ततस्तदमृतंतस्यैददुस्तेमूढचेतनाः ॥ स्त्रियैदानवदैतेयाः सर्वेतद्गतमानसाः ॥ ८ ॥

अर्थ - तेव्हां प्रभु नारायण, मायेच्या योगानें अप्रतिम मोहिनी नामें स्त्रीरूप धारण करून त्या दानवांचे सन्मुख गेले. ते समयीं ते सर्व दैत्य, दानव, मूढचित्त असल्यामुळें त्या मोहिनी विषयीं मनःपूर्वक आसक्त होऊन त्यांनीं त्या स्त्रीस तें अमृत दिलें.

अथास्त्राणिचमुख्यानिमहाप्रहरणानिच ॥ प्रगृह्याभ्यद्रवन्देवान्सहितादैत्यदानवाः ॥ ९॥

अर्थ - आणि पश्चात् ते दैत्यदानव, मुख्य अस्त्रें व महा आयुधें ग्रहण करून एक कालींच देवांवर धांवले.

ततस्तदमृतंदेवोविष्णुरादायवीर्यवान् ॥ जहारदानवेंद्रेभ्योनरेणसहितः प्रभुः ॥ १०॥

अर्थ - नंतर महापराक्रमी तेजोनिधि नरसहित प्रभु विष्णूनें त्या दानव ची-

पासून ते अमृत ग्रहण करून अन्यत्र नेलें.

ततोदेवगणाःसर्वेपपुस्तदमृतंतदा ॥ विष्णोःसकाशात्सं-
प्राप्यसंग्रामेतुमुलेसति ॥ ११ ॥

अर्थ- भगविष्णूपासून अमृत उत्तमरीतीनें प्राप्त झालें असतां, तें सर्वदेवगणानीं प्राशन केलें; त्याकालीं त्या देवदैत्यांचा परस्परें बहुत संग्राम होत चालला होता.

ततःपिबत्सुतत्कालंदेवेष्वमृतमीप्सितम् ॥ राहुर्विबुध
रूपेणदानवोप्यपिबत्तदा ॥ १२ ॥

अर्थ- असें त्याकाली तें प्रियअमृतदेवप्राशनकरीत असतां, पश्चात् राहुनामक दानवही देवरूप धारण करून तत्काल प्राशन करूं लागला.

तस्यकंठमनुप्राप्तेदानवस्यामृतेतदा ॥ आख्यातंचंद्रसू
र्याभ्यांसुराणांहितकाम्यया ॥ १३ ॥

अर्थ- तें अमृत, त्या दानवाच्या कंठांत प्राप्त झालें असतां, ते समयीं चंद्र सूर्यानीं देवांच्या हितार्थ मोहिनी रूपी विष्णूस निवेदन केलें.

ततोभगवतातस्यशिरश्छिन्नमलंकृतम् ॥ चक्रायुधे
नचक्रेणपिबतोमृतमोजसा ॥ १४ ॥

अर्थ- तेव्हां त्या चक्रायुधधारी विष्णूनें, त्या अमृत प्राशन करणाऱ्या राहूचें अलंकृत मस्तक बलात्कारानें चक्रें करून छेदिलें.

तच्छैलशृंगप्रतिमंदानवस्यशिरोमहत् ॥ चक्रेणोत्कृत्तम-
पतच्चालयन्वसुधातलं ॥ १५ ॥

अर्थ- तें त्या दानवाचें पर्वत शिखराकार मोठें मस्तक असें चक्रानें छेदून उडविलें असतां, तें भूतलावर पडलें; तेणें करून पृथ्वी कंपायमान झाली.

ततोवैरविनिर्बंधःकृतोराहुमुखेननवै ॥ शश्वत्तश्चंद्रसू-
र्याभ्यांप्रसह्याद्यापिबाधते ॥ १६ ॥

अर्थ- तेव्हांपासून संपूर्ण दानवानीं त्या राहु मुखाच्या द्वारानें चंद्रसूर्याशीं निर्बंधपूर्वक सतत वैर केलें; तो राहु अद्यापि चंद्रसूर्यास बलात्कारानें पीडा करतो.

विहायभगवांश्चापिस्त्रीरूपमतुलंहरिः ॥ नानाप्रहरणै
र्भीमैर्दानवान्समकंपयत् ॥ १७ ॥

अर्थ- नंतर त्या मोहिनीरूपी षड्गुणैश्वर्यपूर्ण हरीनें ही तें अद्भुत स्त्रीरूप गुप्त करून भयंकर अनेक आयुधानीं त्या दानवांस अत्यंत कंपायमान केलें.

प्रासाः सुविपुलास्तीक्ष्णाः पतंतश्च सहस्रशः ॥ तेऽसुराश्चक्रनिर्भिन्ना वमंतो रुधिरं बहु ॥ १८ ॥ असिशक्तिगदाभिन्ना निपेतुर्धरणीतले ॥

अर्थ- तसेच देवसमुदायांतून अतिमहातीक्ष्ण हजारों प्रास (सांग) दैत्यांवर पडूं लागले. आणि ते असुर, विष्णुचक्रानें छिन्नभिन्न होऊन मुखांतून बहुरक्त ओकूं लागले. त्याच प्रमाणें खड्ग, शक्ति, गदा यानीं ते दानव छिन्नभिन्न होऊन धरणीतलावर पडले.

भिन्नानि पट्टिशैश्चापि शिरांसि युधि दारुणैः ॥ १९ ॥ तप्तकांचनमाल्यानि निपेतुरनिशं तदा ॥

अर्थ- त्याकाळीं युद्धांत अग्नीनें तप्त केलेल्या सुवर्णमालांनीं सुशोभित अशीं त्या दानवांचीं मस्तकें, भयंकर पट्टिश नामक शस्त्रानींही छिन्नभिन्न होऊन अहोरात्र भूमीवर पडूं लागलीं.

रुधिरेणावलिप्तांगा निहताश्च महासुराः ॥ २० ॥ अद्रीणामिव कूटानि धातुरक्तानि शेरते ॥

अर्थ- तेव्हां ते महादैत्य सर्वांगीं रक्तानें स्नान केल्यासारखे होऊन मरण पावून रणभूमीवर पडले. ते गेरिका (काव) दिक धातु हेंच कांहीं एक रक्त त्यानें युक्त जो पर्वतशिखरें त्यासारखे शोभूं लागले.

ततो हलहलाशब्दः संबभूव समंततः ॥ २१ ॥ अन्योन्यं छिंदतां शस्त्रैरादित्ये लोहितायति ॥

अर्थ- नंतर अस्तसमयीं सूर्य आरक्तवर्ण झाला; ते समयीं ते देवदैत्य परस्परांस छिन्नभिन्न करीत असतां, त्या स्थलीं आसमंतात् भागीं हलहला असा बहुत शब्द झाला.

परिघैश्चायसैः पीतैः सन्निकर्षैश्च मुष्टिभिः ॥ २२ ॥ निघ्नतां समरेऽन्योन्यं शब्दो दिवमिवास्पृशत् ॥

अर्थ- तसेच पीतवर्ण लोहमय (लोखंडी) परिघ, सन्निकर्ष (परस्परांस ओढणें) व मुष्टि यानीं रणांत एकमेकांस प्रहार करणाऱ्या त्या देवदानवांचा महान्-

शब्द स्वर्गास श्रवणांत येण्यासारखा चालला.

छिंधिभिंधिप्रधावेतिपातयेभिसरेतिवै ॥२३॥ विश्रूयं-
तेमहाघोराः शब्दास्तत्रसमंततः ॥

अर्थ- आणि छिंधि (तोड), भिंधि (विदारणकर), वेगानें शत्रूंवर चालकर, शत्रूंस पाड, युद्धार्थ शत्रूंच्यासन्मुखहो, इत्यादिक भयंकर शब्द त्यासंग्रामांत होणारे अतिशयें श्रवणांत येऊं लागले.

एवंसुतुमुलेयुद्धेवर्तमानेमहाभये ॥२४॥ नरनारायणौ
देवौसमाजग्मतुराहवम् ॥

अर्थ- असेंतें महाभयंकर अत्यंत दारुणयुद्ध चाललें असतां त्यायुद्धांत नरनारायण हे देव प्राप्त झाले.

तत्रदिव्यंधनुर्दृष्ट्वानरस्यभगवानपि ॥ चिंतयामासवैचक्रं
विष्णुर्दानवसत्तमान् ॥२५॥

अर्थ- आणि तेथें नराचे हस्तांत दिव्यधनुष्य अवलोकन करून भगवान् विष्णूनीं ही त्यादानवश्रेष्ठांच्यासंहारार्थ सुदर्शन चक्राचें स्मरण केलें.

ततोंबराच्चिंतितमात्रमागतंमहाप्रभंचक्रममित्रना-
शनम् ॥ विभावसोस्तुल्यमकुंठमंडलंसुदर्शनंभी-
ममसह्यमुत्तमम् ॥२६॥

अर्थ- असें स्मरण करतांच तत्काल महातेजोमय उत्तमचक्र आकाशमार्गानें प्राप्तझालें; तें सुदर्शन, अग्नीसमान अखंडित मंडलानें युक्त असून भयंकर व इतरानीं सहन करण्याविषयीं अशक्य असल्यामुळें सर्वशत्रूंचा नाश करणारें आहे.

तदागतंज्वलितहुताशनप्रभंभयंकरंकरिकरबाहुरच्यु
तः ॥ महाप्रभंदनुकुलदैत्यदारणंतथोज्वलज्ज्वलनसमा
नविग्रहम् ॥२७॥ मुमोचवैलपनमुदग्रवेगवान्महाप्र
भंरिपुनगरावदारणम् ॥ संवर्तकज्वलनसमानवर्चसंपुनः
पुनर्न्यपतत्वेगवत्तदा ॥२८॥

अर्थ- असेंतें आलेलें प्रज्वलित अग्नीसारखें महाकांतीनें तेजःपुंज व भयंकर असून आकृतीनें ही अतिदेदीप्यमान अग्नीसमान असल्यामुळें दानव

कुल व दैत्य यांचें विदारण कारक आहे तसेंच तें जोमय ऐश्वर्यानें पूर्ण असल्यानें इतरांसही कांतिदायक असून शत्रूंच्या नगरांचें विदारण करणारें आहे; आणि मलय काळच्या अग्नी सारखें तेज व वेग यानीं युक्त आहे, असें तें चक्र, गजाच्या शुंडा दंडासमान सरळ चतुर्भुज युक्त अखंडैश्वर्य पूर्ण नारायण दैत्यांवर टाकूं लागले; तेव्हां तें पुनः पुनः त्या दैत्य समुदायावर वेगानें पडूं लागलें.

व्यदारयद्दितितनयान्सहस्रशः करेरितंपुरुषवरेणसंयुगे॥ दहत्क्वचिज्ज्वलनइवानिलेरितंप्रसह्यतानसुरगणानकृंतत ॥२९॥

अर्थ— आणि त्या पुरुषश्रेष्ठ नारायणानें स्वहस्तें करून टाकलेलें चक्र, त्या रणभूमींत हजारो दितिपुत्र जे दैत्य त्यांचें विदारण करूं लागलें. तसेंच तें सुदर्शन, क्वचित् स्थलीं वायूनें प्रेरित केलेल्या अग्नीसारखें त्या असुर गणांस दग्ध करूं लागलें व कांहीं जागीं बलात्कारानें त्यांचा शिरच्छेद करीत होतें.

प्रवेरितंवियतिमुहुःक्षितौतदापपौरणेरुधिरमथःपिशाचवत्॥ अथासुरागिरिभिरदीनमानसामुहुर्मुहुःसुरगणमर्दयंस्तथा ॥३०॥

अर्थ— त्याच प्रमाणें विष्णूनीं लोहमयचक्र, वारंवार आकाश मार्गें दैत्यांवर टाकलें असतां, तें त्याकालीं रणांत दैत्यांचे शिरच्छेद करून त्याच भूमीवर पडलेलें रक्त, पिशाचा सारखें प्राशन करूं लागलें. तथापि पश्चात् ते असुर, दैन्य रहित अंतःकरणानें वारंवार पर्वत वृष्टि करून देवगणांस पीडा करीत होते.

महाचलाविगलितमेघवर्चसः सहस्रशोगगनमहाप्रपातिनः॥ अथांतराभयजननाः प्रपेदिरेसपादपाबहुविधमेघरूपिणः ॥ ३१॥

अर्थ— तसेंच कितीएक सहस्रशः महापर्वत, गगनास गेलेले मोठमोठे सुटलेले उंचकडे व वृक्षयानीं युक्त असून आकृतीनें बहुत प्रकारचे मेघच काय असे शोभत होते. ते त्याकालीं चक्रप्रहारानें छिन्नभिन्न होऊन अतिशयें-

खालीं पडूं लागले तेव्हां ते कांतीनें मेघांसारखे दिसत असून असुरांस भयउ-
त्पन्न करीत होत्साते त्यांचे मध्यभागीं येऊन पडत होते.

महाद्रयः प्रविगलिताग्रसानवः परस्परं द्रुतमभिपत्य
भास्वराः॥ ततो मही प्रचलितसाद्रिकाननामहीधराः-
पवनहताः समंततः॥ ३२॥

अर्थ- नंतर ते महापर्वत त्या चक्रमहारानें तुटलेल्या आपल्या अग्रावरी-
ल शिखरां सहित परस्परांस वेगानें घर्षण पावले असतां त्या घर्षणा पासून-
निघालेल्या अग्नीनें अत्यंत देदीप्यमान दिसत होते. आणि असे ते पर्वत,आ
समंतात् भागीं वायु वेगानें एकमेकांवर पडूं लागले; तेव्हां सर्व पर्वत अर-
ण्यें यांसह वर्तमान पृथ्वी अतिकंपित झाली.

परस्परं भृशमभिगर्जितं मुहूरणाजिरे भृशमभिसंप्रव
र्तते॥ नरस्ततो वरकनकाग्रभूषणैर्महेषुभिः पवनप-
थं समावृणोत्॥ ३३॥

अर्थ- तदयाच त्या देव दैत्यांच्या रणभूमींत परस्परें वारंवार अतिशयें गर्ज
ना चालल्या ते समयीं त्या नरानें उत्तम सुवर्ण खचित अग्रानीं शोभणाऱ्या
महा बाणानीं वायूचें मार्गभूत आकाश अत्यंत व्याप्त केलें.

विदारयन्गिरिशिखराणि पत्रिभिर्महाभयेसुरगणावि
ग्रहे तदा॥ ततो महीं लवणजलं च सागरं महासुराः प्रवि
विशुः सुरार्दिताः सुरैः॥ ३४॥

अर्थ- आणि त्या कालीं देवदानवांच्या महाभयंकर युद्धांत नरानें स्वकीय
बाणानीं पर्वत शिखरांचें विदारण करून त्या असुर सैन्यावर टाकलीं आ
णि देवानीं ही मोठमोठे असुर पीडित केले असतां, ते कोणी पृथ्वीच्या विवरां
त व कोणी लवण (मीठ) होणाऱ्या जलाचे सागरांत प्रविष्ट झाले.

वियद्गतं ज्वलितहुताशनप्रभं सुदर्शनं परिकुपितं नि-
शाम्य च॥ ततः सुरैर्विजयमवाप्य मंदरः स्वमेव देशं ग
मितः सुपूजितः॥ ३५॥

अर्थ- त्याचप्रमाणें अतिक्रुद्ध झालेलें प्रज्वलित अग्नीसमान तेजोमय-
सुदर्शन चक्र आकाश मार्गानें गेलें असें अवलोकन करून देवांस विजय-

मास झाला असें जाणून पश्चात् मंदर पर्वत ही स्वदेशासच गेला. तेसमयीं सर्व देवानीं त्याची उत्कृष्ट पूजा केली.

विनादयन्स्वदिशमुपेत्यसर्वशस्ततोगताः सलिलधरायथागतम् ॥ ततोऽमृतंसुनिहितमेवचक्रिरेसुराः- परांमुदमभिगम्यपुष्कलां ॥ ददुश्चतंनिधिममृतस्यरक्षितुंकिरीटिनेबलिभिरथामरैःसह ॥ ३६ ॥

अर्थ- नंतर सर्व जलधर (मेघ) देवांस प्राप्त झालेल्या जयाच्या हर्षानें अतिशयें गर्जना करीत पूर्वीज्या मार्गानें जसे आले होते; तसेच पुनः त्यास्वकीय मार्गाच्या दिशेकडे येऊन स्वस्थानीं गेले. पश्चात् देवानीं बहुत उत्कृष्ट आनंद पावून तें अमृत उत्तमरीतीनेंच स्थापन केलें. आणि त्यां विष्णु प्रभृति देवानीं तो अमृत निधि सुरक्षित ठेवण्या साठीं बलिष्ठ देवांसहित इंद्राच्या - स्वाधीन केला. इतिश्री मत्स्यपुराणे अमृत मंथन समाप्तिर्नामद्विशततमएकपंचाशत्तमोऽध्यायः ॥ २५१ ॥

अध्याय २५२वा.

ऋषयऊचुः ॥ प्रासादभवनादीनांनिवेशंविस्तराद्वद ॥ कुर्यात्केनविधानेनकश्चवास्तुरुदाहृतः ॥ १ ॥

अर्थ- ऋषि प्रश्न करितात कीं, हे सूता, देवालयें, राजमंदिरें व इतर सामान्य गृहें इत्यादिकांची रचना कोणत्या विधानानें करावी व वास्तु, कोणास म्हणावें ह्या विषय आम्हास विस्तारानें कथन करावा.

सूतउवाच ॥ भृगुरत्रिर्वसिष्ठश्चविश्वकर्मामयस्तथा ॥ - नारदोनग्नजिच्चैवविशालाक्षःपुरंदरः ॥ २ ॥ ब्रम्हाकुमारोनंदीशः शौनकोगर्गएवच ॥ वासुदेवोनिरुद्धश्चतथाशुक्रबृहस्पती ॥ ३ ॥ अष्टादशैतेविख्यातावास्तुशास्त्रोपदेशकाः ॥ संक्षेपेणोपदिष्टंतुमनवेमत्स्यरूपिणा ॥ ४ ॥

अर्थ- तेसमयीं सूत म्हणतात ऋषीहो, भृगु, अत्रि, वसिष्ठ, विश्वकर्मा, मयासुर, तसेच नारदमुनि, नग्नजित् राजा, विशालाक्ष, इंद्र, ब्रम्हदेव, कुमार, (कार्ति

कस्वामी), नंदिकेश्वर, शौनक, गर्गाचार्य, वासुदेव (श्रीकृष्ण) अनिरुद्ध,-तसेच शुक्र, बृहस्पति हे वास्तु (गृह) शास्त्राचाविधि प्रतिपादन करण्याचे प्रवर्तकाचार्य आहेत. तसेंच मत्स्यरूपी भगवंतानींही वैवस्वतमनूस संक्षेपानें हें शास्त्र कथन केलें आहे.

तदिदानींप्रवक्ष्यामिवास्तुशास्त्रमनुत्तमम् ॥ पुरांधक-
वधेघोरेघोररूपस्यशूलिनः ॥ ५ ॥ ललाटस्वेदसलिल-
मपतद्भुविभीषणम् ॥ करालवदनंतस्मात्भूतमुद्भूतमु-
ल्बणम् ॥ ६ ॥

अर्थ- तेंच अत्युत्तम वास्तुशास्त्र मी याकाळीं तुम्हांस निवेदन करतों. त्याचा उपक्रम असा कीं, पूर्वी शिवानीं अंधकासुराचा वध केला; त्याभयंकर युद्धप्रसंगीं त्यात्रिशूलधारी उग्ररूप शंकराच्या ललाटांतून घर्म (घाम) संबंधितस उदक पृथ्वीवर पडलें त्यापासून अतिक्रूर मुखयुक्त घोर एक भूत (प्राणी) उत्पन्न झालें.

ग्रसमानमिवाकाशंसप्तद्वीपांवसुंधरां ॥ ततोंधकानां-
रुधिरमपिबत्पतितंक्षितौ ॥ ७ ॥

अर्थ- तें भूत, आकाश व सप्तद्वीपवती पृथ्वी यांस ग्राशीतच आहे कीं काय-असें अद्भुत होतें; नंतर त्यानें मुख्य अंधकासुराच्या रक्तापासून उत्पन्न होऊन-युद्ध करणाऱ्या सर्व अंधकासुरांचें, पृथ्वीवर पडलेलें रक्त प्राशन केलें.

तेनतत्समरेसर्वंपतितंयन्महीतले ॥ तथापितृप्तिमगमन्न
तद्भूतंयदातदा ॥ ८ ॥ सदाशिवस्यपुरतस्तपश्चक्रेसु-
दारुणम् ॥ क्षुधाविष्टंतुतद्भूतमाहर्तुं जगतीत्रयं ॥ ९ ॥

अर्थ- असें युद्धांत भूतलावर पडलेलें जें रक्त तें सर्व त्याभूतानें प्राशन केलें, तथापि त्याची जेव्हां तृप्ति होईना. त्याकाळीं तें भूत सदाशिवाच्या अग्रभागीं अतिउग्र तप करूं लागलें. कारण तें भूत, जगत्रय भक्षण करण्यासारख्या क्षुधेनें व्याप्त झालें होतें.

ततःकालेनसंतुष्टोभैरवस्तस्यचाहवे ॥ वरंवृणीष्व-
भद्रंतेयदभीष्टंतवानघ ॥ १० ॥

अर्थ- नंतर कांहीं कालानें त्यासंग्रामांत तो भैरव (उग्र) रूपी शंकर त्याभूता

स प्रसन्न होऊन बोलले कीं, हे निष्पापा तुझें कल्याण असो. आणि तुला जो इश्वर असेल तो तूं माग.

तमुवाचततोभूतंत्रैलोक्यग्रसनक्षमं ॥ भक्षामिदेवदेवेश-
तथेत्युक्तंत्रिशूलिना ॥ ११ ॥

अर्थ- तें समयीं त्या भूतानें शिवास भाषण केलें कीं, हे प्रभुरव देव स्वामिन्, मी त्रैलोक्य भक्षणा विषयीं समर्थ असावें. तेव्हां त्रिशूल धारी शिवानीं तथास्तु असें म्हटलें.

ततस्त्त्रिदिवंसर्वंभूमंडलमशेषतः ॥ स्वदेहेनांतरिक्षं-
चरुंधानंप्रपतद्भुवि ॥ १२ ॥

अर्थ- नंतर तें महाभूत स्वकीय देहानें सर्वस्वर्गलोक, संपूर्ण भूमंडल व अंतरिक्ष-लोक यांस व्यापून भूमीवर पडूं लागलें.

भीतभीतैस्ततोदेवैर्ब्रम्हणाचाथशूलिना ॥ दानवासुर
रक्षोभिरवष्टब्धंसमंततः ॥ १३ ॥

अर्थ- त्याकाळीं अत्यंत भयभीत झालेले देव, ब्रम्हदेव, शंकर, दानव, असुर व राक्षस यानीं चहूं कडून त्या भूतास धरलें.

येनयत्रैवचाक्रांतंसतत्रैवावसत्पुनः ॥ निवासात्सर्वदे
वानांवास्तुरित्यभिधीयते ॥ १४ ॥

अर्थ- असें ज्या देवानें त्या भूतास जेथें धरलें; तो त्यास्थानींच राहिला; अशा सर्व-देवांच्या निवासा (रहाणें) मुळें त्यास वास्तु पुरुष म्हणतात.

अवष्टब्धाश्चतेनापिविज्ञप्ताःसर्वदेवताः ॥ प्रसीदध्वंसु-
राःसर्वेयुष्माभिर्निश्चलीकृतः ॥ १५ ॥ स्थास्याम्यहं
किमाहारोह्यवष्टब्धोह्यधोमुखः ॥ ततोब्रम्हादिभिःप्रो-
क्तंवास्तुमध्येतुयोबलिः ॥ १६ ॥ आहारोवैश्वदेवांतेनू-
नमस्मिन्भविष्यति ॥ वास्तुपूजामकुर्वाणस्तवाहारोभ
विष्यति ॥ १७ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या वास्तु पुरुषानेंही धारण केलेल्या सर्व देवतांस विज्ञापना केली कीं, सर्वदेवहो मी पतन पावत असतां; तुम्ही मला धरून एकत्र स्थलीं निश्चल केलें; तर तुम्ही मला प्रसन्न व्हा. आणि मी आतां तुम्ही धारण केलेल्याच्या आश्रयानें अधोमुख राहून काय आहार करूं. तेव्हां ब्रम्हादिक देवानीं भाषण केलें कीं,

याबास्तू (गृह) मध्यें वैश्वदेवाच्या अंतीं वास्तु देवतांच्या उद्देशानें जो बलि आहे. तो-आहार तुला निश्चयें करून प्राप्त होईल व जो प्राणी वास्तु देवतांची पूजा न करील तो-तुझा आहार होईल.

अज्ञानात्तु कृतोयज्ञस्तवाहारोभविष्यति ॥ यज्ञोत्सवादौ चबलिस्तवाहारोभविष्यति ॥ १८ ॥

अर्थ- तसाच अज्ञानानें केलेला यज्ञ तुझा आहार होईल. आणि यज्ञ व उत्सव इत्यादि कर्मांत केलेला बलि तुला भक्षणार्थ प्राप्त होईल.

एवमुक्त स्ततोहृष्टः सवास्तुरभवत्तदा ॥ वास्तुयज्ञः स्मृत स्तस्मात्ततःप्रभृतिशांतये ॥ १९ ॥

अर्थ- असें देवानीं भाषण केल्यावर तो वास्तु पुरुष त्याकालीं संतुष्ट झाला. तस्मात् त्या काला पासून गृहांत सर्व प्रकारें शांति होण्यासाठीं वास्तुयज्ञ (वास्तुशांति) अवश्य करावी. ॥ ॥ इतिश्री मत्स्यपुराणे वास्तुभूताद्भवो नाम द्विपंचाशदुत्तरद्विशततमो ऽध्यायः ॥ २५२ ॥

अध्याय २५३ वा.

सूतउवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामि गृहकालविनिर्णयं ॥ यथाकालं शुभंज्ञात्वासदाभवनमारभेत् ॥ १ ॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषीहो यानंतर गृहारंभसंबंधि कालाचा उत्तम निर्णय कथन करतों. तो असा कीं, सर्वदा यथा कालानुसार शुभ मुहूर्तादिक जाणून गृह बांधण्यास आरंभ करावा.

चैत्रेव्याधिमवाप्नोतियोगृहंकारयेन्नरः ॥ वैशाखेधेनुरत्नानिज्येष्ठेमृत्युंतथैवच ॥ २ ॥

अर्थ- तो गृहारंभ संबंधी शुभाशुभ विचार असा कीं, जो मानव, चैत्र मासीं गृहरचनेस आरंभ करील तो रोगग्रस्त होतो. आणि वैशाख मासांत गृहारंभ करणारास धेनु (गायी) व रत्नें प्राप्त होतात. व ज्येष्ठांत गृहास आरंभ करणारा मृत्यु पावतो.

आषाढेभृत्यरत्नानिपशुवर्गमवाप्नुयात् ॥ श्रावणेभृत्यलाभंतुहानिंभाद्रपदेतथा ॥ ३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें आषाढांत गृहारंभ करणारास सेवक, रत्नें व गजाश्वादिक पशूंचा समुदाय प्राप्त होतो. श्रावणांत आरंभ करणारास सेवक प्राप्त होतात. तसाच

भाद्रपदांत आरंभ केला असतां, त्याची कांहीं तरी हानि होते.

पत्नीनाशोश्विनेविंद्यात्कार्तिकेधनधान्यकं॥ मार्गशीर्षे तथाभक्तंपौषेतस्करतोभयं॥४॥

अर्थ- आणि आश्विनांत गृहास आरंभ केलातर त्या कर्त्याच्या पत्नीचा नाश होतो. कार्तिकमासीं गृहारंभ कर्त्यास धन धान्य प्राप्ति होते. तसेंच मार्गशीर्षमासीं गृहारंभ करतो त्यास अन्नलाभ होतो. व पौषांत आरंभ केलातर त्या गृहांत चोरापासून भीति होते.

लाभंच बहुशोविंद्यात्अग्निंमाघेविनिर्दिशेत्॥फाल्गुने कांचनंपुत्रानितिकालबलंस्मृतं॥५॥

अर्थ- तसाच माघमासीं गृहारंभ करणारास बहुत प्रकारानीं लाभ होतो; परंतु त्या गृहांत अग्निबाधा होईल असें जाणावें. आणि फाल्गुनमासांत गृहारंभ करणारास सुवर्ण व पुत्र यांचा लाभ होतो असें कालपरत्वें बलाबल समजावें.

अश्विनीरोहिणीमूलंउत्तरात्रयमैंदवं॥स्वातीहस्तोनुराधाचगृहारंभेप्रशस्यते॥६॥

अर्थ- त्याचप्रमाणें अश्वनी, रोहिणी, मूल, उत्तरा, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, मृग, स्वाती, हस्त व अनुराधा हीं नक्षत्रें गृहबांधण्याचे आरंभास प्रशस्त आहेत.

आदित्यभौमवर्ज्यास्तुसर्वेवाराःशुभावहाः॥ वर्ज्यंव्याघातशूलेचव्यतीपातातिगंडयोः॥७॥ विष्कंभगंडपरिघवज्रयोगेषुकारयेत्॥ श्वेतमैत्रेथमाहेंद्रेगांधर्वाभिजितिरौहिणे॥८॥तथावैराजसावित्रेमुहूर्तेगृहमारभेत्॥

अर्थ- तसेंच रविव मंगळ याशिवाय इतर पांचही वार गृहारंभाविषयीं शुभकारक आहेत. आणि व्याघात, शूल, व्यतीपात, अतिगंड, विष्कंभ, गंड, परिघ व वज्र या कुयोगांवर गृहास आरंभ करूं नये. तसेंच श्वेत, मैत्र, माहेंद्र, गांधर्व, अभिजित्, रौहिण तसाच वैराज व सावित्र यानांवाचे मुहूर्तांतील एकाद्या मुहूर्तावर गृहास आरंभ करावा.

चंद्रादित्यबलंलब्ध्वाशुभलग्नंनिरीक्षयेत्॥९॥स्तंभोच्छ्रायादिकर्तव्यमन्यत्तुपरिवर्जयेत्॥

अर्थ- आणि चंद्र व सूर्य यांच्या बलानें युक्त शुभ लग्न पाहून गृहाचे स्तंभ-

(खांब) उभे करणें इत्यादि कर्म करावें परंतु चंद्रसूर्यांचे बलावांचून इतर लग्नया कार्यास ग्रहण करूंनये.

प्रासादेष्वेवमेवस्यात्कूपवापीषुचैवहि ॥१०॥ पूर्वंभूमिं-
परीक्षेत पश्चाद्वास्तुंप्रकल्पयेत् ॥

अर्थ- त्याचप्रमाणें देवालयें, राजमंदिरें, कूप (आड) व वापी (विहीर) यांविषयीं असाच मुहूर्त घ्यावा. आणि या गृहबांधण्याचे प्रकरणांत पूर्वी भूमीची परीक्षा करून पश्चात् त्या स्थलीं वास्तु (गृह) रचना करावी.

श्वेतारक्तातथापीताकृष्णाचैवानुपूर्वशः ॥११॥ विप्रादेः-
शस्यतेभूमिरतःकार्यंपरीक्षणं ॥

अर्थ- त्यापरीक्षेचा प्रकार असाकीं, शुभ्र, आरक्त, तशी पीत वर्ण व कृष्णवर्ण या-चार भूमींतील एकेक भूमि प्रत्येकीं क्रमानें ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांसप्रशस्त (हितकारक) आहेत यास्तव भूमीची परीक्षा करावी.

विप्राणांमधुरास्वादा कटुका क्षत्रियस्यतु ॥१२॥ तिक्ता
कषायाचतथावैश्यशूद्रेषुशस्यते ॥

अर्थ- तशीच मधुरस्वादयुक्त भूमि ब्राम्हणांस उक्त असून क्षत्रियास तीक्ष्णरस युक्त उक्त आहे. आणि कडुरसाची वैश्यांस उक्त असून तुरट भूमि शूद्रास सुखकारक आहे.

अरत्निमात्रेवैगर्तेस्वनुलिप्तेचसर्वशः ॥१३॥ घृतमामश
रावस्थंकृत्वावर्तिचतुष्टयं ॥ज्वालयेद्भूपरीक्षार्थंतत्पूर्णंस
र्वदिङ्मुखं ॥१४॥

अर्थ- त्याचप्रमाणें ब्राम्हणादिक वर्णास अशया उक्तज्या भूमि सांगितल्या आहेत. त्यांत एकखळी खाणावी. तिची खोली कोपरा पासून पसरलेल्या करंगळीपर्यंतच्या हाताचे प्रमाणा इतकी असूनतीच हूं कडून चांगली सारवावी. आणि त्यांत एक कच्चा परळ ठेऊन तो तुपानें पूर्ण भरून त्यांत चारीदिशांस मिळून चारवाती घालाव्या वत्याभूमीच्या परीक्षार्थ त्यातुपानें भरलेल्या परळांतील चारीवाती अग्नीनें प्रज्वलित कराव्या.

दीप्तोपूर्वादिगृण्हीयाद्वर्णानामनुपूर्वशः ॥ वास्तुःसा
सूहिकोनामदीप्यतेसर्वतस्तुयः ॥१५॥ शुभदःसर्व-

वर्णानांप्रासादेषुगृहेषुच ॥ अरत्निमात्रमधोगर्तंपरीक्ष्यंखा

तपूरणे ॥ १६ ॥ अधिकेश्रियमाप्नोतिन्यूनेहानिंसमेसमं ॥

फालकृष्टेथवादेशेसर्वबीजानिवापयेत् ॥ १७ ॥

अर्थ:- नंतर तो परळ पेरला असतां, त्याचें मरणें ब्राम्हणादिक चार वर्णांस पूर्वा दिदिशांच्या क्रमानें हितकारक जाणावें. तें असें कीं, पूर्वेस पेरला असतां, ब्राम्हणांस इष्ट, दक्षिणेस पेरला तर क्षत्रियास हितावह, पश्चिमेस पेरल्यानें वैश्यास कल्याण कारक व उत्तरेकडे पेरण्यापासून शूद्रास सुखदायक होईल असें त्याभूमीचें फळ जाणावें. आणि तो परळ एककालींच सर्व बाजूंनीं पेरला असतां, त्यास्थलावरील गृह, देवालय व राजमंदिर यांत सर्व वर्णांचे लोक राहून त्यांस सुख होईल; यास्तव त्या वास्तूस (गृह) सामूहिक वास्तु म्हणावें. आणि कोपरापासून पसरलेल्या करंगळी पर्यंतच्या हाताचे ममापाच्या केलेल्या त्या खळींतील माती काढून ती पुनः त्याखळींत भरावी. ती माती खळी भरून अधिक राहिली असतां, तेथें गृह बांधणारास संपत्ति प्राप्त होते. आणि त्या मातीनें खळी न भरली तर त्यास हानि प्राप्त होते व ती माती त्या खळींत बरोबर झाली असतां यजमानास लाभ, हानि न होतां त्याचें ऐश्वर्य समान राहतें. किंवा ती भूमि नांगरून त्या प्रदेशांत सर्व बीजें पेरावीं.

त्रिपंचसप्तरात्रेणयत्रारोहंतितान्यपि ॥ ज्येष्ठोत्तमाकनिष्ठा

भूर्वर्जनीयतरासदा ॥ १८ ॥

अर्थ:- तीं बीजें त्रिरात्रानें ज्यास्थानीं उगवतात ती भूमि ज्येष्ठ जाणावी. तशींच तीं बीजें पांचरात्रीनीं ज्यास्थलीं अंकुरास येतील ती भूमि उत्तम समजावी. आणि जेथें त्या बीजांपासून सात दिवसांनीं अंकुर येतील. ती भूमि कनिष्ठ असल्यामुळें ती सर्वदा वर्ज करावी.

पंचगव्यौषधिजलैः परीक्षितांचसेचयेत् ॥ एकाशीतिप

दंकृत्वारेखाभिःकनकेनच ॥ १९ ॥ पश्चात्पिष्टेनचालि-

प्यसूत्रेणालोड्यसर्वतः ॥ दशपूर्वायतालेखादशचैवोत्त

रायताः ॥ २० ॥ सर्ववास्तुविभागेषुविज्ञेयानवकान-

व ॥

अर्थ:- अशी भूमि परीक्षा करून पंचगव्य व यज्ञोपयोगि अनेक औषधि यांच्या मिश्रित उदकानें त्या भूमीवर सिंचन करून त्या प्रदेशांत सुवर्णाच्या शलाकेनें (काडी)

रेखा (रेघा) काढून त्यांत एक्यायशीं स्थानें करावीं. तीं अशीं कीं, त्यास्थलांत पश्चिमे कडून पूर्वेकडे लांब दहा व दक्षिणे कडून उत्तरे कडे दहा लांब अशा रेखा करून पश्चात् सूत्रास (दोरी) पिष्टलेपन करून त्या दारीनें वास्तूच्या त्या नऊ विभागांत प्रत्येकीं नऊ असे नऊ विभागांत मिळून एक्यायशीं भाग करावे. याप्रमाणें सर्व वास्तूचे सर्व प्रदेशांत नव नव एक्यायशीं भाग जाणावे.

एकाशीतिपदं कृत्वा वास्तुवित्सर्ववास्तुषु ॥ २१ ॥ पदस्थान्पूजयेद्देवांस्त्रिंशत्पंचदशैव तु ॥ द्वात्रिंशद्बाह्यतः पूज्याः पूज्याश्चांतस्त्रयोदश ॥ २२ ॥

अर्थ- असे एक्यायशीं भाग वास्तु शास्त्रज्ञ पुरुषानें सर्व वास्तूंत करून त्या एक्यायशीं स्थानांत तीस आणि पंधरा पंचेचाळीस देवतांचें पूजन करावें. तें असें कीं, बाह्य भागांवर बत्तीस देवता व आंतील भागांवर तेरा देवता अशा स्थापन करून त्यांची पूजा करावी.

नामतस्तान्प्रवक्ष्यामि स्थानानि च निबोधत ॥ ईशानकोणादिषु तान्पूजयेत्थविषा नरः ॥ २३ ॥

अर्थ- त्या देवतांचीं नामें व स्थानें सांगतों तीं श्रवण करा. आणि ईशान कोणादिक सर्व स्थानांत मानवानें त्या त्या देवतेच्या उक्त द्रव्यानें त्यांची पृथक् पृथक् पूजा करावी.

शिखी चैवाथ पर्जन्यो जयंतः कुलिशायुधः ॥ सूर्यः सत्यो भृशश्चैव आकाशो वायुरेव च ॥ २४ ॥ पूषा च वितथश्चैव गृहक्षतयमावुभौ ॥ गंधर्वो भृंगराजश्च मृगः पितृगणस्तथा ॥ २५ ॥ दौवारिकोथ सुग्रीवः पुष्पदंतो जलाधिपः ॥ असुरः शोषपापौ च रोगो हिर्मुख्य एव च ॥ २६ ॥ भल्लाटः सोमसर्पौ च अदितिश्च दितिस्तथा ॥ बहिर्द्वात्रिंशदेते तु तदंतस्तु ततः शृणु ॥ २७ ॥

अर्थ- त्या देवता अशा कीं, शिखी १, पर्जन्य २, जयंत ३, वज्रायुध इंद्र ४, सूर्य ५, अश्विनीकुमार ६, भृश ७, आकाश ८, वायु ९, पूषा १०, वितथ ११, गृहक्षत १२, यम १३, गंधर्व १४, भृंगराज १५, मृग १६, पितृगण १७, दौवारिक १८, सुग्रीव १९, पुष्पदंत २०, जलाधिपति वरुण २१, असुर २२, शोष २३, पाप २४, रोग २५, अहि २६, मुख्य २७, भल्लाट २८, सोम २९, सर्प ३०, अदिति ३१, दिति ३२ ह्या बत्तीस

देवता बाह्य भागांवर आहेत; आतां त्यांच्या आंतील स्थानांवरील देवता सांगतो.

ईशानादिचतुष्कोणसंस्थितान्पूजयेद्बुधः॥ आपश्चैवाथ सावित्रोजयोरुद्रस्तथैवच ॥ २८॥

अर्थ- त्या अशा कीं, ईशान कोणादिक चतुष्कोणांत म्हणजे ईशान, आग्नेय, नैर्ऋत्य व वायव्य या चार स्थानांत प्रत्येकीं एक देवता याक्रमानें आप, सावित्र, जय व रुद्र या उत्तम प्रकारें राहिलेल्या देवतांचें पूजन ज्ञात्यानें करावें.

मध्येनव पदे ब्रम्हा तस्या ष्टौच समीपगान् ॥ साध्यानेकांतरान्विद्यात्पूर्वाद्यान्नामतः शृणु ॥ २९॥

अर्थ- आणि मध्यभागच्या नऊस्थानांतील मध्यस्थानीं ब्रम्हदेव असून त्यांचे सभोंवतीं समीपभागीं एकस्थानाच्या अंतरानें स्थापन करण्याच्या आठ देवता पूर्वादिकदिशांचे क्रमानें स्थापन कराव्या. त्यांचीं नामें श्रवण कर.

अर्यमा सविताचैव विवस्वान् विबुधाधिपः॥ मित्रोथ राजयक्ष्माच तथा पृथ्वीधरः स्मृतः ॥ ३०॥ अष्टमश्चापवत्सस्तु परितो ब्रम्हणः स्मृतः ॥

अर्थ- तीं अशीं कीं, अर्यमा १, सविता २, विवस्वान् ३, विबुधाधिप ४, मित्र ५, राजयक्ष्मा ६, पृथ्वीधर ७ व आठवा आपवत्स ८ हे देव, ब्रम्हदेवांच्या आसमंताद्भागीं स्थापन करावे.

आपश्चैवापवत्सश्च पर्जन्योग्निर्दितिस्तथा॥ ३१॥ पदिकानां तु वर्गोयमेवं कोणेष्वशेषतः॥

अर्थ- तसाच आप १, अपवत्स २, पर्जन्य ३, अग्नि ४ व दिति ५ हा पांच देवतांचा वर्ग एक कोणीं असून अशा पाच देवतांचे वर्ग इतर तीन कोणांवर ही प्रत्येक स्थानीं आहेत; त्याच्यार वर्गांतील पांच पांच देवतांचें स्थापन प्रत्येकीं, भिन्न आहे.

तन्मध्ये तु बहिर्विंशद्विपदास्ते तु सर्वशः॥ ३२॥ अर्यमाच विवस्वांश्च मित्रः पृथ्वीधर स्तथा ॥ ब्रम्हणः परितो दिक्षु त्रिपदास्ते तु सर्वशः॥ ३३॥

अर्थ- तसेच त्यामध्यें बाह्यभागांवर जे वीस देव आहेत त्यासर्वांस प्रत्येकीं दोन स्थानें आहेत. आणि अर्यमा १, विवस्वान् २, मित्र ३, व पृथ्वीधर ४ हे ब्रम्हदेवांच्या आसमंताद्भागीं चारदिशांस मिळून चौघे आहेत. त्यासर्वांचीं प्रत्येकीं तीन स्थानें-

आहेत.

वंशानिदानींवक्ष्यामिऋजूनपिपृथक्पृथक् ॥ वायुंयाव-
त्तथारोगात्पितृभ्यःशिखिनंपुनः ॥ ३४॥ मुख्याद्भृशं
तथाशोषाद्वितथंयावदेवतु ॥ सुग्रीवाददितिंयावत्भृ-
गात्पर्ज्जन्यमेवच ॥ ३५॥ एतेवंशाःसमाख्याताःक्वचिच्च
जयमेवतु ॥

अर्थ-आतां त्या वास्तूचे भागांतील निरनिराळे सरळ वंश सांगतों; ते असे कीं, रोग देवतेपासून वायूपर्यंत, पितरांपासून शिखिदेवते पर्यंत, मुख्य नामक देवतेपासून भृश नांवाच्या देवते पर्यंत, तसेंच शोष नामें देवापासून वितथ नामें देवापर्यंत, सुग्रीवापासून अदिती पर्यंत व भृग देवतेपासून पर्जन्य देवते पर्यंत असे हे वंश, वास्तुशास्त्र प्रकरणीं प्रसिद्ध आहेत. आणि क्वचित् भृगापासून जय नाम देवते पर्यंत असे हे वंश जाणावे.

एतेषांयस्तुसंपातःपदंमध्यंसमंतथा ॥ ३६॥ मर्मचैत-
त्समाख्यातंत्रिशूलंकोणगंचयत् ॥ स्तंभन्यासेषुवर्ज्या-
नितुलाविधिषुसर्वदा ॥ ३७॥

अर्थ- या वंशांचा सांधा, त्या एक्यायशीं भागांतील मध्य व समसंख्येचें स्थान व कोणांतील त्रिशूलाकृति स्थान यांस मर्म हें नाम प्रसिद्ध आहे. हीं स्थानें स्तंभ पुरणें व तुळा करणें यांविषयीं सर्वदा वर्ज करावीं.

कीलोच्छिष्टोपघातादिवर्जयेद्यत्नतोनरः ॥ सर्वत्रवास्तु
र्निर्दिष्टोपितृवैश्वानरायतः ॥ ३८॥

अर्थ- त्याच प्रमाणें अस्थि व उच्छिष्ट व मलादिक पदार्थ यांपासून होणाऱ्या नाशादिकांचें कारण, मनुष्यानीं यत्नानें दूर करावें. आणि वास्तु पुरुष, सर्वत्र पितरांचे-स्थानापासून अग्नीच्या स्थानापर्यंत लांबीचा आहे.

मूर्धन्यग्निःसमादिष्टोमुखेचापःसमाश्रितः ॥ पृथ्वीध
रोर्यमाचैवस्तनयोस्तावधिष्ठितौ ॥ ३९॥

अर्थ- त्या वास्तु पुरुषाच्या मस्तकीं अग्नि असून मुख स्थानीं आप नामें देव आहे. आणि पृथ्वीधर व अर्यमा हे स्तन द्वयावर स्थित आहेत.

वक्षस्थलेचापवत्सःपूजनीयःसदाबुधैः ॥ नेत्रयोर्दिति-
पर्जन्यौश्रोत्रेऽदितिजयंतकौ ॥ ४०॥

अर्थ- तसाच अपवत्स हा देव ज्ञात्यानीं वास्तु पुरुषाच्या वक्षस्थलावर निरंतर पूजावा. आणि दिति व पर्जन्य यांची पूजा त्याच्यानेत्रस्थानीं करावी. व त्याच्या कर्णावर अदिति व जयंत यांचें पूजन करावें.

सर्पेंद्रावंससंस्थौतुपूजनीयौप्रयत्नतः॥ सूर्यसोमादय स्तद्वत्बाह्वोःपंचचपंचच ॥ ४१॥

अर्थ- आणि सर्प व इंद्र यांची पूजा वास्तु पुरुषाचे स्कंधस्थानीं प्रयत्नानें करावी. तसेच सूर्य व सोम इत्यादिक पांच देव त्याच्या बाहुस्थानीं पुजावे.

रुद्रश्चराजयक्ष्माचवामहस्तेसमास्थितौ॥ सावित्रःस वितातद्वद्धस्तंदक्षिणमास्थितौ ॥ ४२॥

अर्थ- त्याच प्रमाणें रुद्र व राजयक्ष्मा हे त्या पुरुषाच्या वाम हस्तस्थानीं पूज्य असून सावित्र व सविता हे उभयतां दक्षिण हस्तावर आहेत.

विवस्वानथमित्रश्चजठरेसंव्यवस्थितौ ॥ पूषाचपापय क्ष्माचहस्तयोर्मणिबंधने ॥ ४३॥

अर्थ- आणि विवस्वान् व मित्र हे उदर स्थानीं स्थित असून पूषा व पापयक्ष्मा हे दोघे त्याच्या मनगटांचे स्थानीं आहेत.

तथैवासुरशोषौचवामपार्श्वंसमाश्रितौ॥ पार्श्वेतुदक्षि णेतद्वद्वितथःसगृहक्षतः॥ ४४॥

अर्थ- तसेच असुर व शोष हे त्या पुरुषाच्या वाम कुक्षीचे आश्रयानें आहेत व वितथ, गृहक्षत हे त्याच्या दक्षिण कुक्षीस आहेत.

ऊर्वोर्यमांबुपौज्ञेयौजान्वोर्गंधर्वपुष्पकौ॥ जंघयोर्भृंगस ग्रीवौस्फिक्स्थौदौवारिकोमृगः॥ ४५॥

अर्थ- आणि यम व उदक पालक वरुण हे वास्तु पुरुषाच्या ऊरु (मांड्या) स्थानीं असून त्याचे जानु (गुडघे) स्थानीं गंधर्व व पुष्पक हे देव आहेत. तसेच भृंगराज व सुग्रीव हे त्याच्या जंघा (पोटऱ्या) स्थानीं असून दौवारिक व मृग हे त्याच्या स्फिच् (कुले) स्थानीं आहेत.

जयशक्रौतयामेढ्रेपादयोःपितरस्तथा॥ मध्येनवपदेब्र ह्माहृदयेसतुपूज्यते ॥ ४६॥

अर्थ- त्याच प्रमाणें जय व इंद्र हे त्या पुरुषाच्या गुह्य(लिंग)स्थानीं असून पितर

त्याच्या चरण स्थानीं आहेत. व ब्रम्हदेव, त्याच्या हृदया वरील नऊ स्थानांतील मुख्य मध्य स्थानीं पूजन करण्या विषयीं उक्त आहेत.

चतुःषष्टिपदो वास्तुः प्रासादे ब्रम्हणा स्मृतः॥ ब्रम्हा चतुष्पदस्तत्र कोणेष्वर्धपदास्तथा॥ ४७॥

अर्थ- तशींच देवालयें व राजमंदिरे यांच्या वास्तूंत पश्चिमे कडून पूर्वे पर्यंत नऊ व दक्षिणे कडून उत्तरे पर्यंत नऊ अशया अठरा रेषा काढून त्या आठ कोष्टकांत मिळून आठिआठि चौसष्ट स्थानें करावीं. असें ब्रम्हदेवानीं सांगितलें आहे; त्यांतील मध्य भागीं स्थानचतुष्टया वर देवता ब्रम्हदेव असून आंतील कोणां वरचे आठ अर्ध कोष्टकांत मिळून सोळा देवता आहेत.

बहिः कोणेषु वास्तोतु सार्धाश्चोभयसंस्थिताः॥ विंशतिर्द्विपदाश्चैव चतुःषष्टिपदे स्मृताः॥ ४८॥

अर्थ- आणि वास्तूंतील बाह्य कोणां वरचे बारा स्थानांत मिळून आठ देवता स्थित असून अवशिष्ट राहिलेल्या चाळीस कोष्टकांतील दोन स्थानां वर एक देवता अशा वीस देवता त्या चाळीस कोष्टकांत आहेत. असे चौसष्ट भाग त्या देवालय व राजमंदिर या वास्तूंत आहेत. असें जाणावें.

गृहारंभेषु कंडूतिः स्वाम्यंगे यत्र जायते॥ शल्यं त्वपनयेत्तत्र प्रासादे भवने तथा॥ ४९॥

अर्थ- त्याच प्रमाणें ज्या स्थानीं गृह बांधण्यास आरंभ केला असतां, त्या गृहस्वामीच्या अंगास कंडू उत्पन्न झाली तर तेथें शल्य॰ आहे असें समजून तीं देवालयें, राजमंदिरें व गृहें यांतील तें शल्य दूर करावें.

सशल्यं भयदं यस्मादशल्यं शुभदायकं॥ हीनाधिकांगता वास्तोः सर्वथा तु विवर्जयेत्॥ ५०॥

अर्थ- कारण शल्य युक्त स्थल यजमानास भय उत्पन्न करणारें आहे; यावरून शल्य रहित स्थान, गृहस्वामीस शुभ दायक आहे. आणि वास्तूचे भाग कोठें न्यून कोठें

॰. टीप गृहादिक बांधण्याचे भूमींत मनुष्यादिकांच्या अस्थि, लूस, कोळसे, राख, लोखंड व नरकपाल हीं यजमानाचें नाशां विषयीं कारण असल्या मुळें यांस शल्य (दुःखकारक) म्हणतात यास्तव हें शल्य काढून भूमि शुध्द केल्या वर तेथें घर बांधावें. या शल्य ज्ञानाचा प्रकार ज्योतिष शास्त्रांत आहे.

अधिक होणें हेंही सर्वथा वर्ज करावें.

नगरग्रामदेशेषुसर्वत्रैवंविवर्जयेत्॥ चतुःशालंत्रिशालंचद्विशालंचैकशालकं॥ नामतस्तान्प्रवक्ष्यामिस्वरूपेणद्विजोत्तमाः॥ ५१॥

अर्थ- असेहे शाल्यादिक सर्व अनिष्टकारक प्रकार, नगरें, ग्राम (गांव), व देशा-या सर्वस्थानीं वर्ज करावे. ब्राम्हणश्रेष्ठ ऋषीहो, या पुढें आतां चतुःशाल, त्रिशाल, द्विशाल व एकशाल हीं गृहें, नाम व आकृति या दोन्ही प्रकारानीं निवेदन करतों. ॥

॥ इतिश्री मत्स्यपुराणे एकाशीतिपद निर्णयो नाम त्रिपंचाशदुत्तर द्विशततमोऽध्यायः॥ २५३॥

अध्याय २५४वा.

सूतउवाच॥ चतुःशालंप्रवक्ष्यामिस्वरूपान्नामतस्तथा॥ चतुःशालंचतुर्द्वारैरलिंदैःसर्वतोमुखं॥ १॥

अर्थ- तें असें कीं, त्यांत प्रथमतः आकृति व नाम यांवरून चतुःशाल गृह सांगतों; त्याची रचना अशी कीं, चारदिशांस चार द्वारें व त्या द्वारांस चहूंकडे कोपऱ्या बाहेर द्वारांचे अग्रभागीं केलेल्या चौकोनी काष्ठानीं युक्त असून परस्पर सन्मुख चार शालानीं (सोपे) सुशोभित गृहास चतुःशाल असें म्हणतात.

नाम्नातत्सर्वतोभद्रंशुभंदेवनृपालये॥ पश्चिमद्वारहीनंच नंद्यावर्तंप्रचक्षते॥ २॥

अर्थ- त्या चतुःशाल गृहास सर्वतोभद्र म्हणतात हें देव व राजे यांचे गृहास शुभप्रकारक आहे. आणि पश्चिम द्वार रहित जें चौसोपी वर्तुलाकृति राजगृह किंवा देवालय यांस नंद्यावर्त म्हणतात.

दक्षिणद्वारहीनंतुवर्धमानमुदाहृतं॥ पूर्वद्वारविहीनंतत्स्वस्तिकंनामविश्रुतं॥ ३॥

अर्थ- तसेंच तें चौकाचें राजमंदिर अथवा देवमंदिर हां पूर्वेकडील द्वारानें हीन असलीतर त्यास स्वस्तिक म्हणतात.

रुचकंचोत्तरद्वारविहीनंतत्प्रचक्षते॥ सौम्यशालाविहीनंयत्त्रिशालंधान्यकंचतत्॥ ४॥

अर्थ- त्याप्रमाणें तें चतुःशालगृह, उत्तरद्वार रहित असल्यास त्यास रुचक-

म्हणतात. आणि उत्तरे कडील शालेनें (सोपा) रहित जें तीनसोप्यांचें गृह, त्यास धान्यक हें नाम आहे.

क्षेमवृद्धिकरंनृणांबहुपुत्रफलप्रदं॥शालयापूर्वयाहीनंसूक्षेत्रमितिविश्रुतं॥५॥

अर्थ- आणि पूर्वे कडील सोप्या विरहित जें त्रिशाल (तीनसोप्यांचें) गृह तें सूक्षेत्र नामें प्रसिध्द असून मानवांस कल्याण वृद्धिकारक व बहुपुत्र रूप फल दायक आ.

धन्यंयशस्यमायुष्यंशोकमोहविनाशनं॥शालयायाम्ययाहीनंयत्त्रिशालंतुशालया॥६॥

अर्थ- तसेंच दक्षिणे कडील सोप्या विरहित जें तीनसोप्यांचें गृह व एकाच शालेनें (सोपा) जें विस्तीर्ण एकशाल (एकसोप्याचें) गृह हीं धन, यश व आयुष्य यांस देणारीं असून शोक व मोह यांचा नाश करणारीं आहेत.

कुलक्षयकरंनृणांसर्वव्याधिविनाशनं॥हीनंपश्चिमयायत्तुपक्षघ्नंनामतत्पुनः॥७॥

अर्थ- आणि पश्चिमे कडील सोप्यानें हीन जें तीनसोप्यांचें गृह तें कुलक्षय कारक असून सर्वव्याधि नाशक आहे. असेंहें एक पक्षाचें नाश करणारें असल्या मुळें यास पक्षघ्न म्हणतात.

मित्रबंधुसुतान्हंतितथासर्वभयापहं॥याम्यापराभ्यांशालाभ्यांधनधान्यफलप्रदं॥८॥

अर्थ- त्याच प्रमाणें दक्षिण व पश्चिम ह्या दोन शालानीं युक्त जें गृह त्यास द्विशाल (दोनसोप्यांचें) म्हणतात हें मित्र, बंधु व पुत्र यांचा नाश करतें; परंतु तसेंस र्व भयांचें ही नाश कारक असून धन व धान्य हीं फलें देणारें आहे.

क्षेमवृद्धिकरंनृणांतथापुत्रफलप्रदं॥यमसूर्यंचविज्ञेयंपश्चिमोत्तरशालिकं॥९॥

अर्थ- तसेंच जें गृह, पश्चिम व उत्तर या दोनच शालानीं युक्त आहे; त्याच्या देवता यम व सूर्य या असून तें मनुष्यांस क्षेम वृद्धि कारक व पुत्र फलदायक असेंआ.

राजाग्निभयदंनृणांकुलक्षयकरंचयत्॥उदक्पूर्वेतुशालेहेदंडाख्योयत्रतद्भवेत्॥१०॥

अर्थ- आणि उत्तर व पूर्व या दोनच दिशां कडे दंडासारख्या लांब असल्या वरू

न दंड शाला नामें प्रसिद्ध दोन शाला ज्या गृहांत आहेत तें गृह, मनुष्यांस राजा व अग्नि यांसंबंधि भयदायक असून कुलक्षय कारक ही आहे.

अकालमृत्युभयदंपरचक्रभयावहं॥ धनाख्यंपूर्वयाम्याभ्यांशालाभ्यांयद्विशालकं॥ ११॥

अर्थ- तसेंच जें गृह पूर्व व दक्षिण या दिशांकडील दोन शालांनीं युक्त आहे तें द्विशाल (दोनसोप्याचें) गृह, धन या नामानें प्रसिद्ध असून अकाल मृत्यु व परचक्र (शत्रु) यांपासून भय उत्पन्न करतें.

तच्छस्त्रभयदंनृणांपराभवभयावहं॥ चुल्लीपूर्वापराभ्यांतुसाभवेन्मृत्युसूचनी॥ १२॥

अर्थ- आणि तें गृह, मानवांस, शस्त्र व पराभव यांसंबंधि ही भय देणारें होतें; व त्या गृहांत पूर्व किंवा पश्चिम या दिशेस चूल घातली असतां ती गृहस्वामीस मृत्यु सूचक आहे.

वैधव्यदायकंस्त्रीणामनेकभयकारकं॥ कार्यमुत्तरयाम्याभ्यांशालाभ्यांभयदंनृणां॥ १३॥

अर्थ- त्याच प्रमाणें चतुःशाल गृहांतील उत्तर व दक्षिण या शालांत कांहीं कार्य केलें असतां त्यापासून स्त्रियांस वैधव्यादिक अनेक भयें प्राप्त होऊन तेथील मनुष्यांस ही भय उत्पन्न होतें.

सिद्धार्थवज्र्यवर्ज्यानिविशालानिसदाबुधैः॥ अथातःसंप्रवक्ष्यामिभवनंपृथिवीपतेः॥ १४॥

अर्थ- आणि मोहोऱ्या सारखे ही सूक्ष्म अस्थि आदि करून अमंगल पदार्थ रहित असून विस्तीर्ण अशीं घरें ज्ञात्यांनीं सर्वदा बांधावीं. आतां या पुढें राजाचीं पांच प्रकारचीं मंदिरें सांगतों.

पंचप्रकारंतत्प्रोक्तमुत्तमादिविभेदतः॥ अष्टोत्तरंहस्तशतंविस्तरश्चोत्तमोमतः॥ १५॥

अर्थ- तें राजमंदिर उत्तमादिक भेदानीं पांच प्रकारचें आहे. त्यांत त्या मंदिराचा विस्तार (रुंदी) एकशें आठ हात असणें हा उत्तमोत्तम आहे.

चतुर्ष्वन्येषुविस्तारोहीयतेचाष्टभिः करैः॥ चतुर्थांशाधिकंदैर्घ्यंपंचस्वपिनिगद्यते॥ १६॥

अर्थ- आणि इतर चार मंदिरांत आठ हात विस्तार न्यून करावा. व कनिष्ठ मंदिरापेक्षां मध्यम व उत्तम या चार मंदिरांत उत्तरोत्तर एक चतुर्थांश लांबी अधिक असावी.

युवराजस्यवक्ष्यामितथाभवनपंचकं॥ षड्भिःषड्भिस्तथाशीतिर्हीयतेतत्रविस्तरात्॥ १७॥

अर्थ- तशींच युवराजाचीं (राजपुत्र) पांच मंदिरें सांगतों. तीं अशीं कीं, त्यांचें उत्तम गृह ऐशीं हात विस्तीर्ण असून मध्यमादिक इतर चार गृहांत प्रत्येकीं सहा हात रुंदी कमी करावी.

त्र्यंशेनचाधिकंदैर्घ्यंपंचस्वपिनिगद्यते॥ सेनापतेःप्रवक्ष्यामितथाभवनपंचकं॥ १८॥

अर्थ- आणि त्या राजपुत्राचे पांचही मंदिरांत कनिष्ठापासून उत्तम मंदिरापर्यंत प्रत्येकीं तीन अंश लांबी अधिक असावी. तसेंच सेनापतीचीं पांच घरें सांग०

चतुःषष्टिस्तुविस्तारात्षड्भिःषड्भिस्तुहीयते॥ पंचस्वेतेषुदैर्घ्यंचषड्भागेनाधिकंभवेत्॥ १९॥

अर्थ- तीं अशीं कीं, त्याच्या उत्तम गृहाचा विस्तार चौसष्ट हात असून इतर चार घरांची रुंदी सहासहा हात कमी ठेवावी. व कनिष्ठ घरापासून उत्तम गृहापर्यंत एकाहून एकाची लांबी सहावा भाग अधिक असावी.

मंत्रिणामथवक्ष्यामितथाभवनपंचकं॥ चतुश्चतुर्भिर्हीनास्यात्करषष्टिप्रविस्तरे॥ २०॥ अष्टांशेनाधिकंदैर्घ्यं पंचस्वपिनिगद्यते॥

अर्थ- तसेंच यानंतर प्रधानांचे प्रत्येकीं गृहपंचक सांगतों; तें असें कीं, त्यांच्या साठ हात रुंदीचे उत्तम गृहापेक्षां मध्यमादि अन्य चार घरांची रुंदी प्रत्येकीं चार हात न्यून घ्यावी. आणि कनिष्ठ घरापेक्षां उत्तम गृहापर्यंत उत्तरोत्तर पांचही गृहांस अष्टांश लांबी अधिक करावी.

सामंतामात्यलोकानांवक्ष्येभवनपंचकं॥ २१॥ चत्वारिंशत्तथाष्टौचचतुर्भिर्हीयतेक्रमात्॥ चतुर्थांशाधिकंदैर्घ्यं पंचस्वेतेषुशस्यते॥ २२॥

अर्थ- तसेंच मांडलिक राजांचे प्रधान लोकांचीं पांच घरें सांगतों. तीं अशीं कीं; - त्यांच्या उत्तम गृहाची रुंदी चाळीस आणि आठ अठ्ठेचाळीस हात असून त्यांतील

मध्यमादिक इतर चार गृहांची रुंदी एकापेक्षां एकाची चार हात न्यूनकरण्याचेक्रमानें प्रत्येकीं असावी. आणि पांचही घरांची लांबी कनिष्ठ गृहापासून उत्तम गृहापर्यंत प्रत्येकीं चतुर्थांश अधिक असावी.

शिल्पिनांकंचुकीनांचवेश्यानांगृहपंचकं ॥ अष्टाविंशत्क राणांतुविहीनंविस्तरेक्रमात् ॥ २३ ॥ द्विगुणंदैर्घ्यमेवोक्तं मध्यमेष्वेवमेवतत् ॥

अर्थ- सर्व शिल्पी (शिल्पकर्मानें उपजीविका करणारे सुतार व लोहार इत्यादिक) कंचुकी (भालदार, चोपदार व स्त्री गृहांचा पाहारेकरी) व वेश्या यांचें गृह पंचक तें असेंकीं, उत्तम गृह अठ्ठावीस हात रुंदीचें असून इतर चार गृहांची रुंदी प्रत्येकीं क्रमानें चार हात कमी करावी. आणि कनिष्ठापासून उत्तम गृहापर्यंत एकाहून एकाची लांबी द्विगुणित असावी. तसेच प्रधान व शिल्पी यांचे मधील लोकांचीं-घरेंही याच मानानें करावीं.

दूतीकर्मांतिकादीनांवक्ष्येभवनपंचकं ॥ २४ ॥ चतुर्थांशा धिकंदैर्घ्यंविस्तारोद्वादशैवतु ॥ अर्धार्धकरहानिःस्याद्वि- स्तरात्पंचशः क्रमात् ॥ २५ ॥

अर्थ- आतां दासी व राजसेवार्थ समीप रहाणारे लोकयांचींप्रत्येकीं पांच घरें सांगतों. तीं अशीं कीं, कनिष्ठापासून उत्तमापर्यंत पांचही घरांची लांबी प्रत्येकीं चतुर्थांश अधिक असून त्या उत्तम गृहाची रुंदी बाराचहातअसावी. वइतर चार घरांची रुंदी प्रत्येकीं, क्रमानें अर्धा हात कमी असावी.

दैवज्ञगुरुवैद्यानांसभास्तारपुरोधसां ॥ तेषामपिप्रवक्ष्या- मितथाभवनपंचकं ॥ २६ ॥

अर्थ- तसेच ज्योतिषशास्त्रज्ञ, गुरु, वैद्य, सभासद व पुरोहित (उपाध्याय) यांचीही प्रत्येकीं पांच घरें सांगतों.

चत्वारिंशत्तुविस्ताराच्चतुर्भिर्हीयतेक्रमात् ॥ पंचस्वेतेषुदै- र्घ्यंचषड्भागेनाधिकंभवेत् ॥ २७ ॥

अर्थ- तीं अशीं कीं, त्यांच्या उत्तम गृहाची रुंदी चाळीसहात असून अन्य चार घराची रुंदी प्रत्येकीं, क्रमानें चार हात न्यून असावी. आणि कनिष्ठापासून उत्तमापर्यंत पांचही घरांची लांबी प्रत्येकीं, सहाभाग अधिक करावी.

चतुर्वर्णस्य वक्ष्यामि सामान्यं गृहपंचकं ॥ द्वात्रिंशति कराणां तु चतुर्भिर्हीयते क्रमात् ॥ २८ ॥

अर्थ- तसेच ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांची साधारण रीतीचीं प्रत्येकीं पांच घरें सांगतों. तीं अशीं कीं, त्यांचें उत्तम गृह बत्तीस हात रुंद असून इतर चार गृहांत क्रमानें प्रत्येकीं, चार हात रुंदी कमी करावी.

आषोडशादिति परं नूनमंते वसायियां ॥ दशांशेनाष्टभागेन त्रिभागेनाथ पादिकं ॥ २९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें चांडालादिक लोकांचें उत्तम गृह सोळा हात औरस चौरस लांबी, रुंदीचें असून इतर चार गृहें यथायोग्य क्रमानें दशांश, अष्टांश, तीन अंश व एक अंश अशा रीतीनें क्षेत्र विस्ताराविषयीं प्रत्येकीं न्यून असावी.

अधिकं दैर्घ्यमित्याहुर्ब्राम्हणादेः प्रशस्यते ॥ सेनापते र्नृपस्यापि गृहयोरंतरेण तु ॥ ३० ॥ नृपवास गृहं कार्यं भांडागारं तथैव च ॥ ३० ॥

अर्थ- आणि ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचे घरांची लांबी चांडालादिकांपेक्षां अधिक असून त्या चार वर्णांत ही शूद्रापासून ब्राम्हणापर्यंत एकाहून एकाची लांबी अधिक असावी. तसेच सेनापति व राजा यांचें गृहांच्या मध्य भागीं राजास केवळ रहाण्याचें व भांडीं ठेवण्याचें अशीं दोन घरें करावीं.

सेनापतेर्गृहस्यापि चातुर्वर्ण्यस्य चांतरे ॥ वासाय च गृहं कार्यं राजपूज्येषु सर्वदा ॥ ३१ ॥

अर्थ- आणि राजास जे निरंतर पूज्य आहेत त्या सर्वांस रहाण्याविषयीं कर्तव्य गृहें, सेनापति व ब्राम्हणादिक चार वर्ण यांचे घरांच्या मध्य भागीं असावीं.

अंतरप्रभवानां च स्वपितुर्गृहमिष्यते ॥ तथा हस्तशतादर्धं गदितं वनवासिनां ॥ ३२ ॥

अर्थ- आणि सेनापति व राजा यांचे घरांच्या मध्य भागांतील वास करणारांचे मध्य भागीं राजाचें निद्रागृह असावें. तसेंच वनांत रहाणाऱ्या वानप्रस्थाश्रमी लोकांचें गृह पन्नास हात लांबी रुंदीचें उक्त आहे.

सेनापतेर्नृपस्यापि सप्तत्या सहितेऽन्विते ॥ चतुर्दशहृते व्यासे शालान्यासः प्रकीर्तितः ॥ ३३ ॥

अर्थ- त्यांच प्रमाणें सेनापतीच्या उत्तम गृहाची रुंदी चौसष्ट हात व उत्तम राज गृहाची रुंदी एकशें आठ हात अशा आहेत या दोन्ही रुंदी मिळून एकशें बाहत्तर हात झाले; त्यांत सत्तर हात मिळवून दोनशें बेचाळीस हात झाले; त्यांस चवदानीं भागून सतरा हात आले; ही इतकी रुंदी त्या चौसोपी गृहांतील प्रत्येक सोप्याची असावी.

पंचत्रिंशान्वितेतस्मिन्नलिंदःसमुदाहृतः॥तथाषट्त्रिंशत्धस्तातुसप्तांगुलसमन्विता॥३४॥विप्रस्यमहतोशालानदैर्घ्यंपरतोभवेत्॥

अर्थ- आणि सेनापति व राजा या उभयतांचे गृहांची रुंदी मिळून आलेल्या एकशें बाहात्तर संख्येंत पसतीस मिळवून झालेल्या दोनशें सात संख्येस चवदानीं भागून आलेली संख्या हात पंधराही रुंदी देवडीची असावी. तसेच छत्तीस हात व सात अंगुलें या प्रमाणाची लांबी ब्राम्हणाच्या मोठ्या सोप्याची असावी. या पेक्षां अधिक लांबी नसावी.

दशांगुलाधिकातद्वत्क्षत्रियस्यनविद्यते॥३५॥पंचत्रिंशत्करावैश्येअंगुलानित्रयोदश॥

अर्थ- तशीच क्षत्रियाच्या उत्तम गृहांतील सोप्याची लांबी छत्तीस हात व दहा अंगुलें इतकी असून वैश्याच्या उत्तम सोप्याची लांबी पसतीस हात व तेरा अंगुलें प्रमाणाची असावी.

तावत्करैवशूद्रस्ययुतापंचदशांगुलैः॥३६॥शालायास्तुत्रिभागेनयस्याग्रेवीथिकाभवेत्॥सोष्णीषंनामतद्वास्तुपश्चाच्छ्रेयोच्छ्रयंभवेत्॥३७॥

अर्थ- त्याच प्रमाणें शूद्राच्याही मोठ्या सोप्याची लांबी पसतीस हात व पंधरा अंगुलें इतकीच आहे. आणि सोप्याच्या तृतीयांश प्रमाणाची देवडी किंवा ओटा हीं ज्या वास्तूच्या अग्रभागीं (बाह्यप्रदेशीं) असेल त्या गृहास सोष्णीष वास्तु हें नाम शास्त्रांत प्रसिद्ध असून तें गृह सिद्ध झाल्यावर यजमानास अति कल्याण कारक होतें.

पार्श्वयोर्वीथिकायत्रसावष्टंभंतदुच्यते॥समंताद्वीथिकायत्रसुस्थितंतदिहोच्यते॥३८॥

अर्थ- तशाच ज्या गृहाचे दोन्ही बाजूंस दोन देवड्या असतात तें सावष्टंभ नामें

प्रसिद्ध असून ज्या घराच्या आसमंतात् सभोंवतीं देवडी किंवा ओटा असतो त्यास सुस्थित असें म्हणतात.

शुभदं सर्वमेतत्स्याच्चातुर्वर्ण्ये चतुर्विधम् ॥ विस्तरात्षोडशो भागस्तथा हस्तचतुष्टयं ॥ ३९ ॥ प्रथमो भूमिकोच्छ्राय उपरिष्टात्प्रहीयते ॥ द्वादशांशेन सर्वासु भूमिकासु तथोच्छ्रयः ॥ ४० ॥

अर्थ- असें हें सर्व चार प्रकारचें साध्याचें मान ब्राम्हणादिक चार वर्णांस शुभकारक आहे. तसाच घराच्या रुंदीचा षोडशांश व चार हात इतकी मध्य गृहाची उंची असावी. आणि या पेक्षां अधिक उंची करूं नये. व घराच्या त्या रुंदीच्या द्वादशांशानें सर्व इतर भूमींची उंची असावी.

पक्वेष्टकाभवेद्भित्तिः षोडशांशेन विस्तरात् ॥ दारवैरपि कल्पास्यात्तथा मृन्मयभित्तिका ॥ ४१ ॥

अर्थ- तशीच घराच्या रुंदीचे षोडशांशानें रुंद अशी भिंत, पक्क्या विटा, किंवा लांकडी फळ्या अथवा मृत्तिका यांची भिंत करावी.

गर्भमानेन मानं तु सर्ववास्तुषु शस्यते ॥ गृहव्यासस्य पंचाशदष्टदशभिरंगुलैः ॥ ४२ ॥ संयुतो द्वारविष्कंभो द्विगुणश्चोच्छ्रयो भवेत् ॥ द्वारशाखासु बाहुल्यमुच्छ्रायकरसंमितैः ॥ ४३ ॥ अंगुलैः सर्ववास्तूनां पृथक्त्वं शस्यते बुधैः ॥ उदुंबरोत्तमागं च तदर्धार्धप्रविस्तरात् ॥ ४४ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें सर्व वास्तूंत मध्य गृहाच्या मानानें सर्वत्र मान घेणें प्रशस्त आहे. आणि गृहाच्या परिघाचा पन्नासावा भाग, अठरा अंगुलें यांनीं युक्त अशी द्वाराची रुंदी असून त्या पेक्षां त्याची उंची द्विगुणित करावी. आणि सर्व वास्तूंतील बाह्य द्वाराच्या चौकटीचे लांकडांची जाडी चौकटीच्या उंचीचे जितके हात असतील तितक्या अंगुलें परिमित असणें हें वास्तुशास्त्रज्ञ लोकांच्या मतानें बहुत प्रशस्त आहे. तसाच उंबरा व चौकटीचें वरील लांकूड हीं दोन्ही ही द्वाराच्या रुंदी संबंधि अर्धाच्या अर्धा एवढीं करावीं. ॥ ॥ इतिश्री मत्स्यपुराणे वास्तुविद्यासु गृहमान भित्तिनिर्णयो नाम चतुःपंचाशदुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २५४ ॥

अध्याय २५५ वा.

सूतउवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामिस्तंभमानविनिर्णयं॥ कृत्वास्वभवनोच्छ्रायंसदासप्तगुणंबुधैः ॥१॥ अशीत्यंशः पृथक्त्वंस्यादग्रेणावगुणैःसह ॥ रुचकश्चतुरःस्यादष्टास्रोवज्रउच्यते ॥२॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषीहो, यानंतर आतां मी तुम्हांस वास्तूंतील स्तंभांच्या मानाचा निर्णय सांगतो. तो असाकीं, ज्ञात्यानीं स्वगृहाच्या उंचीची सातपट्ट करून त्याचा ऐंशावा अंशपरिमित एवढा स्तंभाचा विस्तार असून तो अग्रस्थानीं दृढ आधार युक्त गुणानीं युक्त असावा. त्यांत जो चतुष्कोण स्तंभ त्यास रुचक म्हणतात. व जो अष्ट पैलु स्तंभ तो वज्र नामें वास्तुशास्त्रांत प्रसिद्ध आहे.

द्विवज्रःषोडशास्रस्तुद्वात्रिंशास्रःप्रलीनकः॥ मध्यप्रदेशेयस्तंभोवृत्तोवृत्तइतिस्मृतः ॥३॥

अर्थ- तसाच जो सोळा कोणांचा स्तंभ त्यास द्विवज्र हें नाम असून जो बत्तीस कोपऱ्यांचा असतो त्यास प्रलीनक म्हणतात. आणि गृहाच्या मध्यभागीं जो वर्तुलाकार स्तंभ तो लोकांत वृत्त नामानें प्रसिद्ध आहे.

एतेपंचमहास्तंभाःप्रशस्ताःसर्ववास्तुषु॥ पद्मवल्लीलताकुंभपत्रदर्पणरूपिताः ॥४॥

अर्थ- याप्रमाणें रुचक १, वज्र २, द्विवज्र ३, प्रलीनक ४, वृत्त ५, हे पांच महास्तंभ, सर्व वास्तूंत उत्तम रीतीनें उक्त आहेत. आणि कमलें १, वेली २, वक्रतंतूंच्या वेली ३, कुंभ ४, व पत्र ५ या आकृतींच्या नकशीनें ते स्तंभ चिन्हित असून दर्पणा (आरसा) प्रमाणें प्रतिबिंब दिसण्यासारखे लखलखीत असावे.

स्तंभस्यनवमांशेनपद्मकुंभांतराणितु ॥ स्तंभतुल्यातुला प्रोक्ताहीनाचोपतुलाततः ॥५॥ त्रिभागेनेहसर्वत्रचतुर्भागेनवापुनः ॥ हीनंहीनंचतुर्थांशात्तथासर्वासुभूमिषु ॥६॥

अर्थ- तशीच त्या स्तंभाच्या नवमांशाचें अंतरानें त्या स्तंभावरील पद्म (कमळें) व कुंभ या आकृतींची नकशी करावी. तशीच तुळई ही स्तंभा एवढीच जाड असून त्याखालची लग त्या तुळईपेक्षां जाडीला कमी असावी. आणि ती लग कोठें कोठें तीन बाजूनीं असून सर्वत्र प्रायः मोठमोठ्या गृहांत चारी बाजूनीं असते. त्याचप्रमाणें मध्य गृहाहून इतर सर्व भूमीवरील स्तंभ, त्या महा स्तंभा पेक्षां चतु

र्शीशानें न्यून असावे. अथवा मध्य घराच्या भूमी पेक्षां अन्य प्रदेशांची उंची नऋ र्शीशानें कमी असावी.

वासगेहानिसर्वेषांप्रवेशोदक्षिणेनतु ॥ द्वाराणितुप्रव-
क्ष्यामिप्रशस्तानीह्यानितु ॥ ७ ॥

अर्थ- तशींच सर्व लोकांचीं रहाण्याचीं घरें आंत प्रवेश करतानां दक्षिण भागीं असावीं. आतां गृहाचीं द्वारें कोणत्या स्थानीं केलीं असतां तीं उत्तम होतात; तो विषय कथन करतों.

पूर्वेणेंद्रंजयंतंचद्वारंसर्वत्रशस्यते ॥ याम्यंचवितथंचैव
दक्षिणेनविदुर्बुधाः ॥ ८ ॥

अर्थ- तो असा कीं, सर्व वास्तूंत पूर्वे कडे इंद्र व जयंत या देवतांच्या मध्यभागीं पूर्वद्वार असणें हें प्रशस्त असून दक्षिण द्वार हे यम व वितथ या देवतांचे मध्यप्र देशीं असावें असें ज्ञाते लोकांचें मत आहे.

पश्चिमेपुष्पदंतंचवारुणंचप्रशस्यते ॥ उत्तरेणतुभल्ला
टंसौम्यंतुशुभदंभवेत् ॥ ९ ॥

अर्थ- तसेंच पश्चिम द्वारहें पश्चिमे कडील पुष्पदंत व वरुण यांचे मध्य भागीं असणें उत्कृष्ट असून उत्तरेस भल्लाट व सोम या देवांच्या मध्य प्रदेशीं उत्तर द्वार शुभ दायक आहे.

तथावास्तुषुसर्वत्रवेधंद्वारस्यवर्जयेत् ॥ द्वारेतुरथ्यया-
विद्धेभवेत्सर्वकुलक्षयः ॥ १० ॥

अर्थ- तसाच सर्व वास्तूंच्या द्वारास येणारा वेध वर्ज करावा; कारण गृहाचे द्वारास मार्गानें वेध आला असतां, म्हणजे मार्गच आपल्या गृहद्वारा सन्मुख आलातर तेणें करून गृहस्वामीच्या सर्व कुलाचा क्षय होतो.

तरुणाद्वेषबाहुल्यंशोकःपंकेनजायते ॥ अपस्मारो-
भवेन्नूनंकूपवेधेनसर्वदा ॥ ११ ॥

अर्थ- तसेंच गृहद्वारा समोर वृक्ष आला तर त्यापासून आपले घरांत बहुत द्वेष उत्पन्न होतात. तसाच स्नानादिकांनीं निरंतर रहाणारा कर्दम, गृहद्वारा सन्मुख आला असतां, आपले घरांत कांहीं कारणानें शोक उत्पन्न होतो. व द्वारा समोर कूप (आड) आल्यानें घरातील मनुष्यास निरंतर अपस्मार-

(फेंपरें) रोग निश्चयेंकरून उत्पन्न होईल.

व्यथाप्रस्रवणेनस्यात्कीलेनाग्निभयंभवेत्॥ विनाशो देवताविद्धेस्तंभेनस्त्रीकृतंभवेत्॥१२॥

अर्थ- त्याचप्रमाणें द्वारा सन्मुख झरा आल्यास त्या योगानें गृहस्वामीस कांहीं व्यथा होते; तसेंच दरवाजा समोर कील (खिळा किंवा शंकु व मेट वगैरे) हे आले असतां, गृह अथवा गृहस्वामी यांस अग्निभय उत्पन्न होतें, स्थापित देवता, द्वारा सन्मुख आली तर गृहस्वामीचा नाश होतो. व द्वारासमोर स्तंभ आला असतां, स्त्रीपासून गृहनाश होईल.

गृहभर्तुर्विनाशःस्यात्गृहेणचगृहेकृते॥ अमेध्यावस्करै विद्धेगृहिणीबंधकीभवेत्॥१३॥

अर्थ- तसेंच प्रथम गृह द्वारा सन्मुख कोणी दुसऱ्यानें आपल्या गृहाचें द्वार केलें; अथवा पहिल्या घरासमोर त्याच्या समांतर दुसरें गृह बांधलें; किंवा प्राचीन घराच्या सामानानें नवीन घर केलें असतां; त्या गृहस्वामीचा नाश होतो. आणि मल मूत्रादिक अमंगल पदार्थांचें स्थान व अवस्कर (केर, कचरा इत्यादिकांचा उकरडा) हे दरवाजा समोर आले असतां, गृहस्वामीची पत्नी बंधकी (पांच पुरुषांपेक्षां अधिक पुरुषांशीं व्यभिचार करणारी होईल.

तथाशस्त्रभयंविद्यादंत्यजस्यगृहेणतु॥ उच्छ्रायाद्विगुणांभूमित्यक्त्वावधोनजायते॥१४॥

अर्थ- तसेंच अंत्यजाच्या घराचें द्वार समोर आपल्या गृहाचें द्वार आलें असतां त्यापासून त्या गृहस्वामीस शस्त्र भय होईल असें जाणावें. आणि स्वगृहाच्या उंचीचे द्विगुणित भूमिप्रदेश, मध्यें टाकून गृह बांधलें असतां त्या गृहाचे द्वारास कोणताच वेध होऊं शकत नाहीं.

स्वयमुद्घाटितेद्वारेउन्मादोगृहवासिनाम्॥ स्वयंवापिहितेविद्यात्कुलनाशंविचक्षणः॥१५॥

अर्थ- त्याचप्रमाणें स्वकीय गृहाचें द्वार आपाप उघडलें असतां, त्या गृहवासि लोकांस उन्माद उत्पन्न होईल व तें द्वार आपाप लागलें गेलें तर त्या गृहपतीचा कुलक्षय होईल असें ज्ञात्यानें समजावें.

मानाधिकेराजभयंन्यूनेतस्करतोभवेत्॥ द्वारोपरिच

यद्द्वारंतदंतकसुरवंस्मृतं ॥ १६॥

अर्थ- तसेंच गृहद्वार, प्रमाणा पेक्षां अधिक केलें असतां, राजा पासून भय होतें आणि तें द्वाराचें मान न्यून झालें तर गृहपतीस चोरभय उत्पन्न होतें. व द्वारावर द्वार केलें असतां तें केवल मृत्यूचें सुरवच आहे असें जाणावें.

अध्वनोमध्यदेशेतुअधिकोयस्यविस्तरः॥ वज्रंतुसंकटं मध्येसद्योभर्तुर्विनाशनम् ॥ १७॥

अर्थ- आणिज्या सुरव्य द्वाराच्या मध्यप्रदेशीं मार्गाचा विस्तार प्रमाणा पेक्षां अधिक झाला. व वज्रनामक अष्टपैलु स्तंभ त्याचार महा स्तंभांचे मध्यभागीं आला. तर हे दोन्ही तत्काल गृहस्वामीस नाशक आहेत यास्तव त्यांस संकट असें म्हणतात.

तथान्यपीडितंद्वारंबहुदोषकरंभवेत् ॥ मूलद्वारात्तथा- न्यत्तुनाधिकंशोभनंभवेत् ॥ १८॥

अर्थ- तसेंच जें गृहद्वार, इतर जनांच्या जाण्या येण्याचा मार्ग झाला असतां, तेणें करून त्या गृहांत बहुत दोष उत्पन्न होतील. आणि त्या मुरव्य द्वारा पेक्षां घरांतील अन्य द्वार अधिक सुशोभित करूं नये.

कुंभश्रीपर्णिवल्लीभिर्मूलद्वारंतुशोभयेत् ॥ पूजयेच्चापि तन्नित्यंबलिनाचाक्षतोदकैः ॥ १९॥

अर्थ- आणि गुगुल वृक्षाचीं पत्रें, कमलें व चमत्कारिक अनेक वेली यानीं मुरव्य द्वार सुशोभित करावें. तशीच बलि, अक्षता व उदक यानीं नित्यशः त्या महाद्वाराच्या देवतांची पूजा करावी.

भवनस्यवटः पूर्वेदिग्भागेसर्वकामिकः॥ उदुंबरस्तथा- याम्येवारुण्यांपिप्पलःशुभः ॥ २०॥

अर्थ- तसाच वटवृक्ष हा गृहाच्या पूर्व दिशे कडील भागांत असला तर तो गृहस्वामीचे सर्व मनोरथ पूर्ण करतो. आणि गृहाच्या दक्षिणेस उदुंबर (उंबर) व पश्चिमेस पिपल (अश्वथ) हे वृक्ष यजमानास हितकारक आहेत.

प्लक्षःश्चोत्तरतोधन्योविपरीतास्त्वसिद्धये॥ कंटकीक्षीरवृक्षश्चआसनःसफलोद्रुमः ॥ २१॥ भार्याहानौप्र- जाहानौभवेतांक्रमशस्तदा ॥ नच्छिंद्याद्यदितानन्या- नंतरेस्थापयेच्छुभान् ॥ २२॥

अर्थ- तसेंच पिंपरीचें झाड हें गृहाच्या उत्तर भागीं असल्यास तें गृहपतीस- धनप्राप्ति कारक होतें. आणि ते वटादिक वृक्ष सांगितलेल्या दिशांचे क्रमानें न- सून व्युत्क्रमानें असले तर यजमानाच्या कार्यसिद्धीस प्रतिकूल होतात. आणि कंटक युक्त क्षीर वृक्ष (निवडुंग) व फलसहित आसन्न वृक्ष हे दोन, क्रमानें भार्या हानि व प्रजा हानि यां विषयीं कारण होतात. यास्तव ते अनिष्ट कारक वृक्ष तोडावे; असें असून ते वृक्ष न तोडले तर त्यांचे मध्यभागीं शुभ कारक अन्य वृक्ष स्थापन करावे.

पुन्नागाशोकबकुलशमीतिलकचंपकान् ॥ दाडिमीपिप्प
लीद्राक्षातथाकुसुममंडपान् ॥ २३ ॥

अर्थ- ते असेकीं, पुन्नाग (उंडणी) वृक्ष, अशोक, बकुल, शमी, तिलक (तिळवा), चंपक, दाळिंबी, पिंपळी, द्राक्षी व तसेंच पुष्पवेलीचे मंडप हे त्या अहित कारक वृक्षांच्या मध्यभागीं लावले असतां ते वृक्ष बाधक होत नाहींत.

जंबीरपूगपनसद्रुमकेतकीभिर्जातीसरोजशतपत्रिकम
ल्लिकाभिः ॥ यन्नालिकेरकदलीदलपाटलाभिर्युतंत-
द्त्रभवनंश्रियमातनोति ॥ २४ ॥

अर्थ- तसेंच जंबीर (कागदीलिंबोणी आदिकरून लिंबाच्या जातींतील वृक्ष) पूग (सुपारी) वृक्ष, फणसाचे वृक्ष, केतकीवृक्ष, जाईचे वेल, आंवळीचे वृक्ष, कमलें, शंभरपाकळ्यांचीं कमलें, मल्लिका (मोगरी), नालिकेर (नारळ) वृक्ष, कदलींचा (केळी) समूह व पाटला (पाडळ) या वृक्षादिकांनीं युक्त जें गृह असनें तें संपत्तीची वृद्धि करतें. ॥ ॥ इतिश्री मत्स्यपुराणे वास्तुविद्यायां वेध परिवर्जनं नाम पंचपंचाशदुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २५५ ॥ ॥ ७ ॥

अध्याय २५६वा.

सूतउवाच ॥ उदगादिप्लवंवास्तुसमानशिखरंतथा ॥ प-
रीक्ष्यपूर्ववत्कुर्यात्स्तंभोच्छ्रायंविचक्षणः ॥ १ ॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषीहो, ज्ञानसंपन्न पुरुषानें आपली वास्तु बांधण्यानें स्थल, उर्ध्वभागीं समांतर असून उत्तर किंवा पूर्व या दिशेस उतरतें असावें अशी- पूर्वीं स्थान परीक्षा करून त्यानें तेथें पूर्वोक्त रीतीनें स्तंभ उभे करावे.

नदेवधूर्तसचिवचत्वराणांसमंततः ॥ कारयेद्भवनंप्राज्ञो.

दुःखशोकभयंततः ॥ २ ॥

अर्थ- आणि देव, धूर्त (वंचक) प्रधान व चत्वर (चव्हाटा) यांच्या समीप भागीं ज्ञात्यानें स्वगृह बांधूंनये; कारण त्या पासून दुःख व शोक यांसंबंधि अनेक प्रकारें भय प्राप्त होतें. धूर्तशब्दस्थानीं भर्तृ असाही पाठ आहे त्या पक्षीं राजा किंवा यजमान यांच्याजवळ आपलें घर नसावें.

तस्यप्रदेशाश्चत्वारस्तथोत्सर्गोग्रतःशुभः ॥ पृष्ठतः पृष्ठ भागस्तुसव्यावर्तःप्रशस्यते ॥ ३ ॥

अर्थ- तसेच त्या गृहाचे प्रदेश चार असतात; त्यांत अग्रभागचा प्रदेश, उत्सर्ग नामानें प्रसिद्ध असल्या मुळें त्यास्थलीं धर्मशालादिक केले असतां, तें शुभ कारक होतें. आणि घराच्या मागील जो पृष्ठभाग असतो तो डाव्या बाजूनें वर्तुलाकृति असल्यास उत्तम जाणावा.

अपसव्योविनाशायदक्षिणेशीर्षकस्तथा ॥ सर्वकामफलोनृणांसंपूर्णोनामवामतः ॥ ४ ॥

अर्थ- कारण तो पृष्ठभाग, दक्षिण बाजूनें वर्तुलाकार असला तर गृहस्वामीच्या नाशास कारण होतो. आणि घराचा जो दक्षिण भाग तो शीर्षक नामें प्रसिद्ध असून तोही दक्षिणबाजूनें वर्तुळ असेल तर नाश कारक होतो; व डाव्या बाजूनें वाटोळा असल्यास त्या गृहवासि जनांचे सर्व मनोरथ पूर्ण करणारा असल्या मुळें त्यास संपूर्ण असें शास्त्रांत म्हटलें आहे.

एवंप्रदेशमालोक्ययत्नेनगृहमारभेत् ॥ अथसांवत्सरप्रोक्तेमुहूर्तेशुभलक्षणे ॥ ५ ॥

अर्थ- असा भूमिप्रदेश अवलोकन करून पश्चात् ज्योतिष शास्त्रज्ञ पंडितानें सांगितलेल्या शुभकारक लक्षण युक्त मुहूर्तावर प्रयत्नानें गृह बांधण्यास आरंभ करावा.

रत्नोपरिशिलांकृत्वासर्वबीजसमन्विताम् ॥ चतुर्भिर्ब्राम्हणैःस्तंभंकारयित्वासुपूजितम् ॥ ६ ॥ शुक्लांबरधरःशिल्पिसहितोवेदपारगैः ॥ स्नापितंविन्यसेत्तद्वत्सर्वौषधिसमन्वितम् ॥ ७ ॥ नानाक्षतसमोपेतंवस्त्रालंकारसंयुतम् ॥ ब्रम्हघोषेणवाद्येनगीतमंगलनिःस्वनैः ८

अर्थ- तो असाकीं, अधोभागीं रत्न घालून त्यावर सर्व औषधि बीजयुक्त शिला स्थापन करून शुभ्रवस्त्रें परिधान केलेल्या यजमानानें वेदपारंगत चार ब्राम्हण व शिल्पी (सुतार व गवंडी इत्यादिक) यांसह वर्तमान त्या गृह संबंधि मुख्य स्तंभास स्नान घालून आरक्त व पीत या रंगाच्या अक्षता, वस्त्रें व अलंकार यानीं उत्तम रीतीनें पूजित करून तो स्तंभ सुशोभित करावा. आणि वेदमंत्रांचा घोष, मंगलकारक गीत व वाद्यें यांचे अनेक शब्द हे होत असून सर्व औषधीं सहित तो स्तंभ त्या शिले वर स्थापन करावा.

पायसंभोजयेद्विप्रान्होमंतुमधुसर्पिषा॥ वास्तोष्पते प्रतिजानीहिमंत्रेणानेनसर्वदा॥९॥

अर्थ- त्या कालीं वास्तोष्पते प्रतिजानीहि या मंत्रानें सर्व काल मध व घृत या द्रव्यानीं होम करून पायसानें (दुधाची अथवा खीर) ब्राम्हणांस भोजन घालावें.

सूत्रपातेतथाकार्यमेवंस्तंभोदयेपुनः॥ द्वारवंशोच्छ्रयेतद्वत्प्रवेशसमयेतथा॥१०॥ वास्तूपशमनेतद्वद्वास्तुयज्ञस्तुपंचधा॥ ईशानेसूत्रपातःस्यादाग्नेयेस्तंभरोपणम्॥११॥

अर्थ- असाच हा होम पंचवार करावा. तो असाकीं, वास्तु बांधण्याचे स्थलीं सूत्रपात (दोऱ्या मारून पूर्वीं सांगितलेलीं एक्यायशीं किंवा चौसष्ट स्थानें) कर्तव्य असतां, तसेंच पुनः स्तंभ स्थापन कालीं तशांच द्वाराच्या चौकटीचीं लांकडें उभीं करावयाच्या वेळेस आणि यजमानानें गृहांत प्रवेश करण्याचे समयीं व वास्तु शांतीचे विधींत या प्रमाणें हा वास्तुयज्ञ पांच प्रकारचा आहे. तसाच सूत्र पात हा ईशान्य दिशे पासून करावा. आणि स्तंभ स्थापन हें आग्नेय कोणापासून आरंभून करावें.

प्रदक्षिणंचकुर्वीतवास्तोःपदविलेखनम्॥ तर्जनीमध्यमाचैवतथांगुष्ठस्तुदक्षिणे॥१२॥

---

*टीप. दक्षिणे हें सर्वनामसंज्ञक दक्षिणशब्दाचें एक शेष करून बहुवचन केलेलें आहे. तें असें कीं जसें माता च पिता च पितरौ तसें दक्षिणाच दक्षिणाच दक्षिणश्च दक्षिणे.

अर्थ- त्याच प्रमाणें उजवे हाताची तर्जनी (अंगुष्ठाजवळची) तशीच मध्यमा (मधील अंगुली) व उजवाच अंगुष्ठयातीन बोटानीं प्रदक्षिणा क्रमानें वास्तूंतील एक्यायशीं अथवा चौसष्ट असे भाग, रेषा काढून करावे.

प्रवालरत्नकनकफलंपिष्टाकृतोदकं ॥ सर्ववास्तुविभा
गेषुशस्तंपदविलेखने ॥ १३ ॥

अर्थ- त्याविषयीं प्रवाल (पोंवळें), रत्न, कनक व कांहीं फल यांचें बरोबर गाळीव चूर्ण करून त्याचूर्णानें मिश्रित केलेलें उदक, सर्व वास्तूंतील विभागांत तीपूर्वीं सांगितलेली एक्यायशीं किंवा चौसष्ठ अशीं पदें (स्थानें) काढण्याविषयीं उक्त आहे.

नभस्मांगारकाष्ठेननखशस्त्रेणचर्मभिः ॥ नशृंगास्थि
कपालैश्चक्वचिद्वास्तुविलेखयेत् ॥ १४ ॥

अर्थ- परंतु भस्म, कोळसा, काष्ठ, नख, शस्त्र, चर्म, शिंग, अस्थि व नरकपाल यानीं वास्तूंतीलते स्थानभाग कदापि काढूंनये.

एभिर्विलिखितंकुर्याद्दुःखशोकभयादिकम् ॥ यदागृह-
प्रवेशःस्याच्छिल्पीतत्रापिलक्षयेत् ॥ १५ ॥ स्तंभसूत्रा-
दिकंतद्वच्छुभाशुभफलप्रदम् ॥

अर्थ- कारण त्या पदार्थानीं वास्तूंतील ते भाग काढले असतां, त्यांतील लोकांस दुःखशोक व भय इत्यादिक प्राप्त होतात. आणि ज्या काळीं यजमान त्या गृहांत प्रथमतः प्रवेश करील. त्या वेळेस त्याँ वास्तूची रचना करणाऱ्या शिल्पकारानें (कारागीर) तेथें स्तंभ व ते भाग पाडण्याचें सूत्र(दोरी) इत्यादिक संबंधि शुभाशुभ फल कसें होत आहे हें अवलोकन करावें.

आदित्याभिमुखंरौतिशकुनिःपरुषंयदि ॥ १६ ॥ तुल्य
कालंस्पृशेदंगंगृहभर्तुर्यदात्मनः ॥ वास्त्वंगेतद्द्विजानीया
न्नरशल्यंभयप्रदम् ॥ १७ ॥

अर्थ- तें असेंकीं, वास्तूंतील ते एक्यायशीं भाग करण्यासाठीं दोऱ्या सडकण्याचे वेळेस किंवा स्तंभ पुरते समयीं काक आदि करून पक्षी सूर्यासन्मुख कर्कश शब्द करील. अथवा प्रथमतः गृहप्रवेश काळीं तो पक्षी गृहस्वामीच्या अंगास स्पर्श करील. तर त्या वास्तुभूमींत मनुष्याच्या अस्थि असून त्या यजमानास भयदा

यक आहेत असें जाणावें.

अंकनानंतरंयत्र हस्त्यश्वश्वापदंभवेत् ॥ तदंगसंभवंविं-
द्यात्तत्रशल्यंविचक्षणः ॥ १८ ॥

अर्थ- तसेंच त्या वास्तुस्थलांत तीं एक्यायशीं किंवा चौसष्ट कोष्टकें पाडल्याव र तेथें ज्यास्थानीं गज, अश्व अथवा अन्य कांहीं श्वापदें हीं आलीं असतां, त्या प्रदेशांत त्या पशूंच्या अस्थिरवाली आहेत असें ज्ञात्यानें समजावें.

प्रसार्यमाणेसूत्रेतुश्वागोमायुर्विलंघते ॥ तत्तुशल्यंविजा
नीयात्खरशब्देतिभैरवे ॥ १९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें सूत्र, वास्तु भूमीवर पसरलें असतां, श्वान व कोल्हा हे त्या सूत्राचें उल्लंघन करतील. किंवा त्याजागीं गर्दभ जेथें अतिभयंकर श ब्द करील तेथें त्या पशूंच्या अस्थि आहेत असें जाणावें.

यदीशानेतुदिग्भागेमधुरंरौतिवायसः ॥ धनंतत्रविजा
नीयाद्भागेवास्वाम्यधिष्ठिते ॥ २० ॥

अर्थ- आणि त्या गृहभूमीच्या ईशान्य कोणदिशेच्या प्रदेशांत काकपक्षी - मधुर शब्द करील तर त्या गृहस्वामीच्या त्या भागांत धन आहे असें समजावें.

सूत्रच्छेदेभवेन्मृत्युर्व्याधिःकीलेत्वधोमुखे ॥ अंगारे
षुतथोन्मादंकपालेषुचसंभ्रमम् ॥ २१ ॥

अर्थ- तसेंच तें सूत्र तुटलें असतां, गृहपतीस मृत्यु प्राप्त होईल. आणि त्या प्रदेशांत खिळा अधोमुख ठोकलेला असलातर तेथील यजमानास व्याधि होते. तसेंच त्या भूमींत कोळसे असले तर त्यागृहांत रहाणाऱ्या लोकांस उन्मा द प्राप्त होईल. व तेथें नरकपालसंबंधि अस्थि असल्यातर तेथील मनुष्यांस अत्यंत भ्रम उत्पन्न होईल.

कंबुशल्येषुजानीयात्पौंश्चल्यंस्त्रीषुवास्तुवित् ॥ गृहभर्तु
र्गृहस्यापिविनाशःशिल्पिसंभ्रमे ॥ २२ ॥

अर्थ- तसेंच शंखाचे तुकडे त्या वास्तु भूमींत असलेतर त्या गृहांतील स्त्रि या व्यभिचारिणी होतात. आणि वास्तु बांधणाऱ्या शिल्पकाराची त्या कामां त कांहीं चूक झाली असतां, तें गृह व त्या गृहाचा स्वामी यांचा नाश होतो. अ सें वास्तु शास्त्रज्ञानें जाणावें.

स्तंभेस्कंधच्युतेकुंभेशिरोरोगंविनिर्दिशेत् ॥ कुंभापहारेसर्वस्यकुलस्यापिक्षयोभवेत् ॥ २३॥

अर्थ- त्याच प्रमाणें यजमान मुख्यस्तंभास स्पर्श करीत असतां तो त्याच्या - स्कंधावर पडला किंवा त्यागृहाचे भूमीत वास्तुपुरुष पुरण्याच्या खड्ड्या इतक्या खळींत पुरून ठेवण्याचा कुंभअथवा वास्तुशांतीच्या वेळेस ईशान्य कोणीं चारशिलांवर स्थापन करण्याचा कुंभ आणतांना तोरवांद्यावरून खालीं पडला असतां, गृहस्वामीस शिरोरोग होईल. असें सांगावें. आणि तो कुंभ- चोरीस गेलातर त्या गृहपतीचा सर्व कुल क्षय होईल.

मृत्युःस्थानच्युतेकुंभेभग्नेबंधंविदुर्बुधाः॥ करसंख्याविनाशेतुनाशंगृहपतेर्विदुः॥ २४॥

अर्थ- तसाच तो कुंभ, स्थापन केलेल्या स्थानावरून भ्रष्ट झाला असतां, यजमान शीघ्र मृत्यु पावेल आणि तो कुंभ भग्न झाला असतां त्या यजमानास प्रतिबंध प्राप्त होईल. आणि तो कुंभ, जितक्या हातांवर बसावयाचा, तित - क्या हातांवर न बसला अथवा तो मुख्य स्तंभ जितक्या करसंख्येनें युक्त असावा तितका असून त्यांत कांहीं न्यून झालें असतां, तेणें करून गृहपतीचा- नाश जाणावा.

बीजौषधिविहीनेतुभूतेभ्योभयमादिशेत् ॥ ततःप्रदक्षिणेनान्यान्न्यसेत्स्तंभान्विचक्षणः॥ २५

अर्थ- त्याच प्रमाणें तो स्थापन करण्याचा कुंभकिंवा स्तंभ हे बीजें व ओषधि याविरहित स्थापन केले असतां त्यावास्तूंत रहाणाऱ्या लोकांस भूतांपासून- भय होईल असें सांगावें. असा मुख्य स्तंभ प्रथमतः स्थापन करून नंतर प्र दक्षिण क्रमानेंच इतर सर्व स्तंभ, ज्ञात्यानें स्थापन करावे.

यस्माद्भयकरंनृणांयोजिताह्यप्रदक्षिणम् ॥ रक्षांकुर्वीतयत्नेनस्तंभोपद्रवनाशिनीं ॥ २६॥

अर्थ- कारण यस्मात् ते गृह संबंधि स्तंभ अप्रदक्षिण क्रमानें स्थापन केले असतां, ते रुख्य, त्या गृहवासि जनांस भयकारक होतें; तस्मात् स्तंभ संबंधानें होणाऱ्या उपद्रवांचा नाश करण्या विषयीं समर्थ अशी स्वकीय रक्षणाची रीति प्रयत्नानें करावी.

तथाफलवतीशाखावांस्तंभोपरिनिवेशयेत् ॥ प्रागुदक्-
प्रवणंकुर्याद्दिङ्मूढंतुनकारयेत् ॥ २७ ॥

अर्थ- तशीच वृक्षाची फल युक्त शाखा मुख्यस्तंभावर स्थापन करावी. तसें च गृहहें मनुष्यानें पूर्व किंवा उत्तर या दिशेस उतरतें करावें. आणि तें गृह पूर्वा दिकदिशांकडे वक्रन होऊ देतां चारी दिशा साधून करावें.

स्तंभंवाभवनंवापिद्वारंवासगृहंतथा ॥ दिङ्मूढेकु-
लनाशःस्यान्नचसंवर्धयेद्गृहम् ॥ २८ ॥

अर्थ- कारण वास्तूंतील स्तंभ किंवा तें गृह, गृह द्वार अथवा वास करण्याचें स्थलहीं बरोबर दिशा साधून न करतां त्या पूर्वादिक दिशांकडे वक्र झालीं असतां, तेणें करून कुलनाश होतो. तसेंच गृह एकदा बांधल्या वर पुनः कालांतरीं तें वाढवूं नये.

यदिसंवर्धयेद्गेहंसर्वदिक्षुविवर्धयेत् ॥ पूर्वेणवर्धितं-
वास्तुकुर्याद्वैराणिसर्वदा ॥ २९ ॥

अर्थ- आणि जर कदाचित् कारण वशात् तें गृह वाढवील. तरतें सर्वदिशांकडून वाढवावें; कारण केवल पूर्वेकडूनच गृह वाढविलें तर त्या गृहांत रहाणाऱ्या लोकांत परस्परें सर्वकाल वैर उत्पन्न होतें.

दक्षिणेवर्धितंवास्तुमृत्यवेस्यान्नसंशयः ॥ पश्चाद्वि-
वृद्धंयद्वास्तुतदर्थक्षयकारकम् ॥ ३० ॥

अर्थ- तसेंच केवल दक्षिण दिशेकडे वृद्धिंगत केलेलें गृह तेथील लोकांस अकाल मृत्यु दायक होईल यात संशय नाहीं. आणि पश्चिमेच्याच भागास वाढविलेलें घर आपल्या अर्थभागाच्या नाशास कारण होतें.

वर्धापितंतथासौम्येबहुसंतापकारकं ॥ आग्नेयेयत्र
वृद्धिःस्यात्तदग्निभयदंभवेत् ॥ ३१ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें उत्तरेच्याच बाजूस गृह वाढविलें असतां तें यजमानास बहुसंताप कारक होतें; व आग्नेय (पूर्व व दक्षिण यांचामध्य कोण) दिशेसच गृहवाढविलें असतां, तें तेथील लोकांस अग्निभय दायक होईल.

वर्धितंराक्षसेकोणेशिशुक्षयकरंभवेत् ॥ वर्धापितंतु
वायव्येवातव्याधिप्रकोपकृत् ॥ ३२ ॥

अर्थ- तसेंच घर, केवल नैर्ऋत्य (दक्षिण व पश्चिम यांचामध्यभाग) को णास वाढविलें तर त्यापासून त्या घरांतील बाल कांस क्षय (नाश किंवा क्षयरोग) प्राप्त होईल. आणि वायव्य (पश्चिमवउत्तर यांचा मध्य) दिशेसच गृह वाढविलें असतां, तें यजमानाचे शरीरांत वायुरोग संबंधि अतिपीडा होण्यास कारण होतें.

ईशान्यांअन्नहानिःस्यात्तथास्तोसंवर्धितेसदा ॥ ईशा नेदेवतागारंतथाशांतिगृहंभवेत् ॥ ३३॥

अर्थ- त्याच प्रमाणें ईशान्य (उत्तर व पूर्व यांचा मध्य कोण) दिशेसच घर वृद्धिंगत केलें, तर तें तेथील लोकांच्या अन्न नाशास निरंतर कारण होतें. आणि वास्तूंत देवतास्थान, ईशान्य कोणास असावें. व शांति कर्म करण्याचें स्थल ही त्याच दिशेस असावें.

महानसंतथाग्नेयेतत्पार्श्वेचोत्तरेजलम् ॥ गृहस्योपस्करंसर्वंनैर्ऋत्येस्थापयेद्बुधः ॥ ३४॥

अर्थ- तसेंच पाक गृह, आग्नेय कोणास असून त्याच्या उत्तर भागीं उदक-स्थान करावें. आणि गृहाचे सर्वसाहित्य पदार्थ, ज्ञात्यानें नैर्ऋत्य दिशेसस्थापन करावे.

वधस्थानंबहिःकुर्यात्स्नानमंडपमेवच ॥ धनधान्यंचवायव्येकर्मशालांततोबहिः ॥ एवंवास्तुविशेषःस्यात्गृहभर्तुःशुभावहः ॥ ३५ ॥

अर्थ- आणि वधस्थान (फाशी देणें किंवा फटके वगैरे मारणें यांची जागा), राजानें स्वगृहाच्या बाह्यप्रदेशीं करावें. तसाच स्नान करण्याचा मंडप ही बाहेरच्या बाजूस करावा. तशींच धन, धान्यांचीं स्थलें वायव्य दिशेस करून त्याचे पलीकडले भागांत कांहीं कामें व राज्य कारभार इत्यादिक कृत्यें करण्याच्या शाला बांधाव्या. या प्रमाणें वास्तु संबंधि प्रदेशांची रचना केली असतांही गृहस्वामीस शुभ कारक आहे. ॥ ॥ इतिश्री मत्स्यपुराणे वास्तुविद्यायां गृहनिवेशनं नाम षट्पंचाशदुत्तर द्विशततमो ऽध्यायः ॥ २५६॥

अध्याय २५७ वा.

सूतउवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामिदारुवाहरणमुत्त

मम् ॥ धनिष्ठापंचकंमुक्त्वाविष्ट्यादिकमतःपरम् ॥ ॥१॥ ततःसांवत्सरादिष्टेदिनेयायाद्वनंबुधः॥ प्रथमं- बलिपूजांचकुर्याद्वृक्षस्यसर्वदा ॥ २॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषीहो, यानंतर मी, गृहरचने विषयीं काष्ठें आण ण्याचा उत्तम प्रकार सांगतों, तो असाकीं, धनिष्ठा १, शततारका २, पूर्वा भाद्रपदा ३, उत्तराभाद्रपदा ४ व रेवती हीं पांच नक्षत्रें व भद्रा आदिकरून- सर्व वर्ज्य प्रकरण त्यजून पश्चात् ज्योतिष शास्त्रज्ञ ब्राम्हणानें सांगितले- ल्या दिवशीं शुभमुहूर्ता वर ज्ञाल्यानें अरण्यांत गमन करावें. आणि वृक्षास मीप जाऊन प्रथमतः त्या वृक्षाची सर्वदा बलिदान युक्त पूजा करावी.

पूर्वोत्तरेणपतितंगृहदारुप्रशस्यते ॥ अन्यथानशुभंवि- द्यात्तयास्योपरिनिपातनम् ॥ ३॥

अर्थ- नंतर वृक्षच्छेदनोत्तर जें काष्ठ पूर्व किंवा उत्तर यादिशे कडे पडेल तें- गृह रचनेस उत्तम जाणावें आणि यांवांचून अन्यजी पश्चिम व दक्षिण - यादिशांस जे काष्ठ पडेल. तें गृहास शुभ कारक होत नाहीं असें समजावें.

क्षीरवृक्षोद्भवंदारुनगृहेविनिवेशयेत् ॥ कृताधिवासं विहगैरनिलानलपीडितम् ॥ ४॥ गजावरुग्णंचतथावि द्युन्निर्घातपीडितम् ॥ अर्धशुष्कंतथादारुभग्नंशुष्कंत थैवच ॥ ५॥ चैत्यदेवालयोत्पन्नंनदीसंगमजंतथा ॥ श्म शानकूपनिलयंतडागादिसमुद्भवम् ॥ ६॥ वर्जयेत्सर्वथा दारुयदीच्छेद्विपुलांश्रियम् ॥

अर्थ- तसेंच क्षीरवृक्षा (चीकनिघणारा) पासून उत्पन्न झालेलें काष्ठ गृहर चने विषयीं योजूनये. आणि पक्ष्यानीं वासकेलेला वृक्ष, वायुव अग्नि यानीं- पीडित वृक्ष, गजानें भग्न केलेले वृक्ष, तसेंच विद्युल्लतापातानें दग्ध झालेलें काष्ठ, अर्धवट शुष्क झालेलें, त्याचप्रमाणें शुष्क असूनही भग्न (पिंजले- लें) झालेलें, यज्ञस्थान, देवालय, नदी, संगम, स्मशान कूप (आड) व सरो वरादिक प्रदेश यास्थानांत उत्पन्न झालेले वृक्ष, यांचीं काष्ठें हीं सर्वही काष्ठें, - ज्यास विपुल संपत्तीची इच्छा आहे त्यानें वर्ज्य करावीं.

तथाकंटकिनोवृक्षान्नीपनिंबबिभीतकान् ॥ ७॥ श्ले

श्मानकानाम्नतरून्वर्जयेद्गृहकर्मणि ॥

अर्थ- तसेच कंटक (कांटे) युक्त वृक्ष, कळंब, निंब, बिभीतक, (ब्याहाड्याचें झाड) भोकरी व आम्रवृक्ष यांचें काष्ठ, गृह बांधण्याचे कामांत वर्ज करावें.

आसनाशोकमधूकसर्जशालाःशुभावहाः॥ ८ ॥ चंदनं पनसंधन्यं सुरदारुहरिद्रवः॥

अर्थ- तसाच असाण्याचा वृक्ष, अशोक, मोहाचा वृक्ष, सर्ज (सागवान्), शाल (सायल्याचा वृक्ष), चंदन वृक्ष, पनस वृक्ष (फणस), देवदारु, वदारुहळद- हे वृक्ष गृहरचनेस अत्यंत शुभ कारक आहेत.

द्वाभ्यामेकेनवाकुर्यात्त्रिभिर्वाभवनंशुभम् ॥ ९ ॥ बहुभिः कारितंयस्मादनेकभयदंभवेत् ॥

अर्थ- तसेंच घरहें, एक, दोन किंवा तीन इतक्या जातींच्या वृक्षानींच गृह बांधणें शुभकारक आहे; कारण योपेक्षां अधिक जातीचे वृक्षानीं गृह बांधलें असतां, तें अनेक भय कारक होतें.

एकैवशिंशपाधन्याश्रीपर्णीतिंदुकीतथा ॥ १० ॥ एतानान्यसमायुक्ताः कदाचिच्छुभकारकाः ॥

अर्थ- आणि शिशवी ही एकटीच घर बांधण्यास उक्त आहे. तशीच श्रीपर्णी (शिवणी), टेंबुरणी ह्याही एकट्याच गृहाविषयीं उक्त आहेत; कारण या प्रत्येक वृक्षाचीं लांकडें इतर काष्ठाशीं युक्त झालीं असतां, तीं गृहस्वामीस कदापि शुभकारक होत नाहींत.

स्यंदनः पनसस्तद्वत्सरलार्जुनपद्मकाः॥ ११ ॥ एतेनान्यसमायुक्तावास्तुकार्यफलप्रदाः॥

अर्थ- तसाच तिवस, पनस (फणस) वृक्ष, सुरूनांवाचा देवदारूंतील एक भेद, अर्जुन वृक्ष व पद्मकाष्ठ या वृक्षांचीं ही काष्ठें अन्य वृक्षांच्या लाकडांशीं युक्त झालीं असतां, तीं, वास्तु संबंधि सुरवादिक इष्ट कार्याच्या सिद्धी विषयीं फलद्रूप होत नाहींत.

तरुच्छेदेमहापीतेगोधाविंद्याद्विचक्षणः॥ १२ ॥ मांजिष्ठवर्णेभेकःस्यान्नीलेसर्पादिनिर्दिशेत् ॥

अर्थ- त्याच प्रमाणें गृह रचनार्थ काष्ठें आणण्यासाठीं छेदन केलेल्या वृ

क्षाचा गाभा अति पीत वर्ण असल्यास ज्ञात्यानें त्यापासून आपले घरास - घोर पडीचे योगानें उपद्रव होईल असें जाणावें आणि मंजिष्ठ औषधासारख्या वर्ण युक्त गाभ्याचे लाकडानीं घरास बेडुकांची पीडा होईल. व निळ्या- रंगाचे काष्ठाच्या योगानें घरांत सर्पांचा वास होईल. असें सांगावें.

अरुणेसरठंविद्यान्मुक्ताभेशुक्लमादिशेत्॥१३॥ क- पिलेमूषकान्विद्यात्खड्गाभेजलमादिशेत्॥एवंवि- धंसगर्भंसुवर्जयेद्वास्तुकर्मणि॥१४॥

अर्थ- तसेंच आरक्त वर्ण काष्ठ घरास लावलें असतां, त्यास्थलांत सर- ड्यांचा उपद्रव होईल; मौक्तिका समान शुभ्र वर्ण गाभ्याचें लाकडानीं गृह बांधलें असतां, तेथें रायूची बहुत वस्ति होईल; आणि पिंगट रंग गाभ्याचे काष्ठानीं बांधलेल्या घरांत मूषकांचा (उंदीर) उपद्रव होतो; व गेंड्या- सारख्या रंगाच्या गाभ्याचे लाकडानीं घर बांधलें तर त्यास जलानें पीडा होईल. असें जाणून या सांगितलेल्या पिवळा आदिकरून रंगाच्या गाभ्याचें- लांकूड वास्तु रचनेच्या कार्यास ग्रहण करूं नये.

पूर्वच्छिन्नंतुगृण्हीयान्निमित्तशकुनैःशुभैः॥ व्यासेन गुणितेदैर्घ्येअष्टाभिर्विहृतेतथा॥१५॥ यच्छेषमायतं विद्यादष्टभेदंवदामिवः॥ ध्वजोधूमश्चसिंहश्च वृषभः खरएवच॥१६॥ हस्तीध्वांक्षश्चपूर्वाद्याः करशोषामय- वस्यमी॥

अर्थ- त्याच प्रमाणें पूर्वी सांगितलेल्या विधीनें जें लांकूड तोडलें तें ही - शुभ कारक निमित्तें व शकुन यानीं गृह रचनास्थानीं आणावें. आणि वास्तु भूमीच्या रुंदीच्या संख्येनें त्या क्षेत्राच्या लांबीस गुणून त्या गुणाकारा- स आठानीं भागदिल्यावर जी संख्या शेष (बाकी) राहील तो त्या वास्तूस आय जाणावा. तो आठ प्रकारचा आय मी तुम्हांस निवेदन करतों; तो असा कीं, ध्वज १, धूम २, सिंह ३, श्वान ४, वृषभ ५, खर (गर्दभ) ६, हस्ती, ७, ध्वांक्ष (काकपक्षी) ८, हे आठ प्रकारचे आय पूर्वादि दिशा परत्वें ग्राह्याग्राह्य विभागानें स्थित असून पूर्वीच्या लांबी रुंदी गुणलेल्या सर्व क्षेत्रफल संबंधि आलेल्या हातांस आठानीं भागून जे हात शेष रहातात त्यांवरून हे आय ये-

तात असे समजावें.

ध्वजः सर्वमुखो धन्यः प्रत्यग्द्वारो विशेषतः ॥ १७ ॥ उदङ्मुखो भवेत्सिंहः प्राङ्मुखो वृषभो भवेत् ॥

अर्थ - त्यांतील ध्वजनामक आय हा पूर्वादिक चारी दिशांकडे आला तरी तो शुभकारक असून पश्चिम दिशेस आला असतां; तो अत्युत्तम जाणावा. - आणि सिंह नांवाचा आय उत्तरेस आला तर तो हितावह असून वृषभ नामा-आय पूर्वेस येईल तर तो उत्तम समजावा.

दक्षिणाभिमुखो हस्ती सप्तभिः समुदाहृतः ॥ १८ ॥ एकेन ध्वज उद्दिष्टस्त्रिभिः सिंहः प्रकीर्तितः ॥ पंचभिर्वृषभः प्रोक्तो विकोणस्थांश्च वर्जयेत् ॥ १९ ॥

अर्थ - तसाच गज नामें जो प्रसिद्ध आय आहे, तो दक्षिणेस आला तर उत्तम असून सात शेष (बाकी) राहिले असतां त्या संख्येनें जाणावा. आणि एक, शेष राहिला तर ध्वजनामा आय होतो; तीन बाकी आले तर सिंहनामक आय-जाणावा. तसेच पांच बाकी आले असतां वृषभ नामाचा आय समजावा. व हे आय आग्नेयादि कोण दिशांस आले तर ते वर्ज करावे.

तमेवाष्टगुणं कृत्वा करराशिं विचक्षणः ॥ सप्तविंशा-हृते भागे ऋक्षं विद्याद्विचक्षणः ॥ २० ॥

अर्थ - त्याच प्रमाणें ज्ञाता पुरुषानें स्वकीय वास्तुभूमीचें क्षेत्र फल अष्टगुणित करून आलेल्या हस्तसंख्येस सत्ताविसानीं भागून जी भाग संख्या येईल; तें त्या गृहाचें नक्षत्र जाणावें.

अष्टभिर्भाजिते ऋक्षे यः शेषः स व्ययो मतः ॥ व्ययाधिकं न कुर्वीत यतो दोषकरं भवेत् ॥ आयाधिके भवेच्छांति-रित्याह भगवान्हरिः ॥ २१ ॥

अर्थ - आणि त्या भागाकारांतील आलेल्या नक्षत्रास आठानीं भागून जी-संख्या शेष राहील तो त्या गृहाचा व्यय समजावा. तसेंच ज्या भूमीचे क्षेत्र फळास आया पेक्षां व्यय अधिक होईल. त्या स्थलीं गृह बांधूं नये; कारण तेथें घर केलें असतां बहुत दोष उत्पन्न होतात. परंतु अन्यत्र स्थलाची उपपत्ति होत नसल्यास आया पेक्षां अधिक व्यययुक्त स्थानीं शांति करून वास्तु रचना

करावी. किंवा ज्या स्थलीं व्ययापेक्षां आयसंख्या अधिक येईल, तेथें रहाणारास सुख प्राप्ति होते असें भगवान् हरि बोलले आहेत; यास्तव अशा भूमीवर गृह बांधावें.

कृत्वाग्रतोद्विजवरानथ पूर्णकुंभंदध्यक्षताम्रदलपुष्प फलोपशोभम् ॥ कृत्वाहिरण्यवसनानितदाद्विजेभ्योमं गल्यशांतिनिलयायगृहंविशेत्तु ॥ २२ ॥

अर्थ- नंतर त्या गृहस्वामीनें सहस्तांत दधि, अक्षता, आम्रपल्लव, पुष्पें व फलें यानीं सुशोभित पूर्ण कुंभ ग्रहण करून त्या कालीं ब्राम्हणांस सुवर्ण व वस्त्रें हीं दानें द्यावीं. आणि त्या ब्राम्हणांस अग्रभागीं करून मंगल कारक शांति कर्म करण्या साठीं त्या वास्तूंत प्रथम प्रवेश करावा.

गृह्योक्तहोमविधिनाबलिकर्मकुर्यात्प्रासादवास्तुशम नेचविधिर्यउक्तः ॥ संतर्पयेद्विजवरानथभक्ष्यभोज्यैःशु क्लांबरःस्वभवनंप्रविशेत्सधूपम् ॥ २३ ॥

अर्थ- पश्चात् त्या यजमानानें देवालयें, राजमंदिरें व अन्य गृहें यांच्या वास्तुशांती विषयीं जो विधि उक्त आहे त्या स्वकीय गृह्यसूत्रोक्त विधीनें बलिदान कर्म करावें. आणि भक्ष्य (पक्वान्नादिक) व भोज्य (ओदनादिक अन्नें) अशा अनेक पदार्थांनीं ब्राम्हण श्रेष्ठांस आदरपूर्वक उत्तमरीतीनें तृप्त करून आपण शुभ्र वस्त्रें धारण करून त्या सुगंध धूपयुक्त स्वगृहांतील अंतर्गृहांत स्वस्थांतःकरणानें गमन करावें. ॥ ॥ इतिश्री मत्स्यपुराणे वास्तुविद्यायां अभिनवभवन प्रवेशो नाम सप्तपंचाशदुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २५७ ॥

अध्याय २५८वा.

ऋषयऊचुः ॥ क्रियायोगः कथंसिध्येद्गृहस्थादिषुस र्वदा ॥ ज्ञानयोगसहस्राद्धि कर्मयोगोविशिष्यते ॥ १ ॥

अर्थ- शौनकादिक ऋषि प्रश्न करतात हे सूता, गृहस्थाश्रमादिक आश्रमांतील लोकांचा निरंतर चालणारा कर्मयोग कोणत्या रीतीनें सिद्ध होईल, तें आम्हांस कथन कर; कारण सहस्रावधि केवल ज्ञानयोगां पेक्षां, कर्मयोग हा योग्यतेनें अधिक आहे.

सूतउवाच ॥ क्रियायोगंप्रवक्ष्यामिदेवतार्चानुकीर्तन

मू॥ भक्तिमुक्तिप्रदंयस्मान्नान्यल्लोकेषुविद्यते॥ २॥

अर्थ- तेसमयीं सूतम्हणतोऋषीहो, मी तुम्हास नित्य देवपूजा रूप कर्म- योग कथन करतों; कारण देवतार्चना वांचून भुक्ति मुक्ति दायक इतर साध- न नाहीं.

प्रतिष्ठायांसुराणांतुदेवतार्चानुकीर्तनम्॥ देवयज्ञो- त्सवंचापिबंधनाद्येनमुच्यते॥ ३॥

अर्थ- आणि देवप्रतिष्ठा (देवस्थापना) व रामनवमी आदिकरून उत्स व यांसंबंधानें कर्तव्य जें देवता पूजन तें सांगतों; कारण त्यायोगानें हाजीव संसार बंधनांतून मुक्त होतो.

विष्णोस्तावत्प्रवक्ष्यामियादृग्रूपंप्रशस्यते॥ शंखच- क्रधरंशांतंपद्महस्तंगदाधरं॥ ४॥ छत्राकारंशिरस्तस्य कंबुग्रीवंशुभेक्षणम्॥ तुंगनासंशुक्तिकर्णंप्रशांतोरु भुजक्रमम्॥ ५॥

अर्थ- यास्तव त्या मुक्ति दायक विष्णूचें जसें रूप पूजे विषयीं प्रशस्त आ हेतें प्रतिपादन करतों तें असेंकीं, तेंविष्णुरूप शंख, चक्र, गदा व पद्महीं आ- युधें चार हस्तांत धारण करणारें असून त्याचें मस्तक छत्राकार आहे; तसाच त्याचा कंठ, शंखासमान रेखा प्रयानें चिन्हित असून कमलासारखे सुंदर ने- त्र, उंचनासिका, शुक्ति (शिंपला) समान कर्ण व दोनभुजां पासून क्रमानें बहुत असून शांत असे भुजयानीं तें विष्णुरूप सुशोभित आहे.

क्वचिदष्टभुजंविद्याच्चतुर्भुजमथापरम्॥ द्विभुजश्चापि कर्तव्योभवनेषुपुरोधसा॥ ६॥

अर्थ- तें असेंकीं, विष्णुरूप क्वचित् अष्टभुज असूनदुसरें चतुर्भुज आहे. तसाच द्विभुज विष्णुही उपाध्यायानें पूजार्थ गृहांत करावा.

देवस्याष्टभुजस्यास्ययथास्थानंनिबोधत॥ खड्गोग दाशरःपद्मंदिव्यंदक्षिणतोहरेः ७॥ धनुश्चखेटकंचैव- शंखचक्रेचवामतः॥

अर्थ- त्यांतील अष्टभुज देवाचीं आयुधें ज्यास्थानीं जशीं आहेत तशीं आगतो श्रवणकरा. तीं अशींकीं; नंदकनामाखड्ग (तरवार), गदा, बाण, सुंद

र पद्म हीं चार आयुधें दक्षिण भागचे चार हस्तांत आहेत; आणि धनुष्य, खेटक (ढाल), शंख व चक्र हीं चार आयुधें वामभागचे चार भुजांत आहे.

चतुर्भुजस्य वक्ष्यामि यथैवायुधसंस्थितिः॥ ८॥ दक्षिणेन गदापद्मं वासुदेवस्य कारयेत्॥ वामनः शंखचक्रे च कर्तव्ये भूतिमिच्छता ९॥

अर्थ- तशींच आतां चतुर्भुज विष्णूच्या चार हस्तांतील जशीं आयुधें आहेत. त्यांची उत्तम स्थिती सांगतों. ती अशी कीं; त्या सर्वाधार विष्णूच्या दक्षिण-भुजद्वयांत गदा व पद्म असून वामभागचे द्विभुजांत शंख, चक्रें अशीं चार आयुधें, आपणांस संपत्ति इच्छिणारानें करावीं.

कृष्णावतारे तु गदा वामहस्ते प्रशस्यते॥ यथेच्छया शंखचक्रे चोपरिष्टात्प्रकल्पयेत्॥ १०॥

अर्थ- आणि कृष्णावताराच्या मूर्तीचे वामहस्तांत गदा, प्रशस्त रीतीनें उक्त असून शंख व चक्र हीं आयुधें दक्षिण व वाम या दोन्ही बाजूंच्या वरचे हातांत पूजकानें स्वेच्छानुसार करावीं.

अधस्तात्पृथिवी तस्य कर्तव्या पादमध्यतः॥ दक्षिणे प्रणतं तद्वद्गरुत्मंतं निवेशयेत्॥ ११॥

अर्थ- तशीच भूदेवीची प्रतिमा त्या कृष्णमूर्तीच्या दोन्ही चरणांचे मध्यें अधोभागीं करावी. आणि दक्षिण भागीं नम्र झालेला गरुड स्थापन करावा.

वामतस्तु भवेल्लक्ष्मीः पद्महस्ता शुभानना॥ गरुत्मानग्रतो वापि संस्थाप्यो भूतिमिच्छता॥ १२॥

अर्थ- त्याचप्रमाणें त्या कृष्णमूर्तीच्या वामभागीं लक्ष्मीची प्रतिमा करावी; तिच्या हस्तांत कमल असून तिचें मुख सुलक्षण असावें. आणि आपणास ऐश्वर्य प्राप्तीची इच्छा करणारानें त्या कृष्णाचे अग्रभागीं गरुड ही उत्तम प्रकारें स्थापन करावा.

श्रीश्च पुष्टिश्च कर्तव्ये पार्श्वयोः पद्मसंयुते॥ तोरणं चोपरिष्टात्तु विद्याधरसमन्वितम्॥ १३॥ देवदुंदुभिसंयुक्तं गंधर्वमिथुनान्वितम्॥ पत्रवल्लीसमोपेतं सिंहव्या-

प्रसमन्वितम्॥ १४॥ तथाकल्पलतोपेतंस्तुवद्भिरमरे
श्वरैः॥

अर्थ- तश्याच श्रीव पुष्टि यादोन्ही ही देवता हस्तांत कमल धारण केलेल्या अ सून त्या, कृष्णमूर्तीच्या दोन्ही बाजूंस स्थापन कराव्या. आणि त्या कृष्णमूर्ती च्ये ऊर्ध्वभागीं तोरण बांधावें, त्यावर विद्याधर नामक देवगण, देवांच्या दुंदु भि, गंधर्वांचीं दंपत्यें, अनेक प्रकारचीं पत्रें, वेली, सिंह, व्याघ्र, कल्पवृक्षावरी लता (वेली) वस्तुति करणारे श्रेष्ठ देव हीं चित्रें काढून तें तोरण सुशोभि त करावें.

एवंविधोभवेद्विष्णोस्त्रिभागेनास्यपीठिका॥ १५॥ न
वतालप्रमाणास्तु देवदानवकिंनराः॥

अर्थ- असा विष्णुमूर्तीचा आकार करून त्यामूर्तीच्या उंचीचे त्रिभाग परि मित पीठ (सिंहासन) त्यामूर्तीस करावें. आणि देव, दानव व किन्नर यांच्या प्रतिमा नऊ तालें प्रमाणाच्या कराव्या.

अतःपरंप्रवक्ष्यामिमानोन्मानंविशेषतः॥ १६॥ जा-
लांतरप्रविष्टानांभानूनांयद्रजस्फुटं॥ त्रसरेणुःसविज्ञे-
योवालाग्रंतैरथाष्टभिः॥ १७॥ तदष्टकेनलिक्षातुयूका
लिक्षाष्टकैर्मता॥ यवोयूकाष्टकंतद्वदष्टभिस्तैस्तदंगुल-
म्॥ १८॥ स्वकीयांगुलिमानेनमुखंस्याद्द्वादशांगुलम्॥
मुखमानेनकर्तव्यासर्वावयवकल्पना॥ १९॥

अर्थ- यानंतर प्रतिमांच्या मानाचे उत्तम प्रमाणांचें विशेषें करून स्वरूप कथन करतों. तें असें कीं, गृहाच्या जाळ्यांचे छिद्रांतून प्रविष्ट झालेल्या सू र्य किरणांत जें स्पष्ट रज, दृष्टिगोचर होतें. त्यास त्रसरेणु म्हणतात ते रेणु- आठ झाले म्हणजे त्यास वालाग्र हें नाम आहे. तीं वालाग्रें आठ एकत्र झालीं म्हणजे तेणें करून त्यास लिक्षा म्हणतात; त्या लिक्षा आठ झाल्या असतां त्यांची एक यूका होते; त्या आठ यूकांचा एक यव होत असून त्या आठ यवांचें-

---

*टीप. हाताच्या अंगुष्ठापासून पसरलेल्या मधल्या अंगुलीपर्यंतचें प्रमाण-
आहे.

एक अंगुल होतें. या प्रमाणें स्वकीय अंगुलीच्या मानानें द्वादश (बारा) अंगुलें त्या मूर्तीचें मुख असून त्या मुखाच्या मानानें त्या प्रतिमेचे सर्व अवयव करावे.

सौवर्णी राजती वापि ताम्री रत्नमयी तथा ॥ शैली दारुमयी चापि लोहसंघमयी तथा ॥ २० ॥ रीतिकाधातुयुक्ता वा ताम्रकांस्यमयी तथा ॥ शुभदारुमयी वापि देवतार्चा प्रशस्यते ॥ २१ ॥

अर्थ- आणि सुवर्ण, रुपें, तांबें, रत्नें, शिला, काष्ठ, सुवर्णादिक अनेक मिश्रित धातु, पितळ, ताम्र व कांस्य ही दोन मिश्र केलेली एक धातु किंवा चंदनादिक उत्तम काष्ठें यांची प्रतिमा, पूजे विषयीं प्रशस्त रीतीनें उत्तम आहे.

अंगुष्ठपर्वादारभ्य वितस्तिर्यावदेव तु ॥ गृहेषु प्रतिमा कार्या नाधिका शस्यते बुधैः ॥ २२ ॥

अर्थ- ती प्रतिमा अंगुष्ठाच्या अग्रापासून वितीचें मान जितकें आहे तितक्या उंचीची प्रतिमा गृहांत, पूजेविषयीं करावी. या पेक्षां अधिक प्रमाणाची मूर्ती, घरांत पूजेस उक्त नाहीं. असें ज्ञाते लोकांचें मत आहे.

आषोडशा तु प्रासादे कर्तव्या नाधिका ततः ॥ मध्योत्तमकनिष्ठा तु कार्या वित्तानुसारतः ॥ २३ ॥

अर्थ- तसेंच देवालय व राजमंदिर यांत देवपूजेविषयीं कर्तव्य प्रतिमा ती सोळा विती उंचीची असावी. या पेक्षां अधिक उंच करूं नये. आणि ती प्रतिमा यजमानानें स्वकीय द्रव्य शक्त्यनुसार उत्तम, मध्यम व कनिष्ठ यांतून कोणत्या तरी एका मानानें करावी.

द्वारोच्छ्रायस्य यन्मानमष्टधा तत्तु कारयेत् ॥ भागमेकं ततस्त्यक्त्वा परिशिष्टं तु यद्भवेत् ॥ २४ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें देवालयाच्या मुख्य द्वाराचें उंचीचें जें मान असेल; त्याचे आठ भाग करून त्यांतील एक भाग टाकून अवशिष्ट (बाकी) जे सात भाग राहिले.

भागद्वयेन प्रतिमा त्रिभागीकृत्य तत्पुनः ॥ पीठिका भागतः कार्या नातिनीचा न चोच्छ्रिता ॥ २५ ॥

अर्थ- त्यांचे पुनः तीनभाग करून त्यांतील भागद्वय परिमित उंचीची-प्रतिमा करून एकभागा एवढें उंचपीठ (सिंहासन) करावें. या पेक्षां उंचव फार नीच करूंनये.

प्रतिमामुखमानेननवभागान्प्रकल्पयेत्॥ चतुरंगु-
लाभवेद्ग्रीवाभागेनहृदयंपुनः॥२६॥

अर्थ- आणि प्रतिमेच्या मुखाचे मानानें त्या मूर्तीचे चरणा पासून मस्तका पर्यंत नऊ भागांत सर्व अवयवांची रचना करावी. ती अशी कीं, त्या मूर्तीची मानचारअंगुलें उंच असून एकभागांत हृदय करावें.

नाभिस्तस्मादधःकार्याभागेनैकेनशोभना॥ निम्नत्वे
विस्तरत्वेचअंगुलंपरिकीर्तितम्॥२७॥

अर्थ- त्याचे खालच्या बाजूस एकाभागांत वर्तुलाकृतीनें सुशोभित-खोल नाभी करावी. तिची खोली व विस्तार (परिघ) हे एकअंगुल परिमित असावे.

नाभेरधस्तथामेंढ्रंभागेनैकेनकल्पयेत्॥ द्विभागेना
यतावूरूजानुनीचतुरंगुले॥२८॥

अर्थ- तसेंच नाभीचे खाली एकभागांत शिश्न करून खालीं दोन भागांत लंबाय मान ऊरू (मांड्या) जानू (गुडघे) चार अंगुलें उंच असावे.

जंघेद्विभागेविख्यातेपादौचचतुरंगुलौ॥ चतुर्दशां-
गुलस्तद्वन्मौलिरस्यप्रकीर्तितः॥२९॥

अर्थ- त्याचे अधः दोनभागांत जंघा (पोटऱ्या) व त्याखालीं चार अंगुलें उंचीचे चरण करावे. तसाच त्या मूर्तीचा मस्तक चवदा अंगुलें परिमित उंचीचा असावा.

उर्ध्वमानमिदंप्रोक्तंपृथक्त्वंचनिबोधत॥ सर्वावयवमा
नेषुविस्तारंशृणुतद्विजाः॥३०॥

अर्थ- असें हें उंचीचें मानसांगितलें. आतां त्या मूर्तीच्या अवयवांचे जाडीच्या मानाचें ज्ञान होण्या साठीं ऋषीहो, त्या सर्व अवयवांचा विस्तार-श्रवण करावा.

चतुरंगुलंललाटंस्यादूर्ध्वंनासातथैवच॥ द्व्यंगुलंतु

हनुर्ज्ञेयमोष्ठः स्वांगुलसंमितः ॥ ३१ ॥

अर्थ- तो असा कीं, मूर्तीचें ललाट चार अंगुलें रुंद असून त्यापुढें नासिकाही तितक्याच विस्तारानें युक्त असावी. तशीच हनवटी दोन अंगुलें विस्तृत असून ओंठ हे त्या प्रतिमेच्या दोन अंगुलें परिमित विशाल असावे.

अष्टांगुले ललाटे च तावन्मात्रे भ्रुवौ मते ॥ अर्धांगुला भ्रुवो लेखा मध्ये धनुरिवानता ॥ ३२ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें आठ अंगुल परिमित विस्तीर्ण कपाळावरील दोन्ही भृकुटी मिळून त्यांचा एकंदर तितकाच विस्तार असावा आणि त्या भोंवयांची प्रत्येकीं मध्यभागीं जी धनुष्याकार वांकलेली रेखा असते ती अर्धांगुल प्रमाणाची असावी.

उन्नताग्रा भवेत्पार्श्वे श्लक्ष्णा तीक्ष्णा प्रशस्यते ॥ अक्षिणी द्व्यंगुलायामे तदर्धं चैव विस्तरे ॥ ३३ ॥

अर्थ- तशीच ती भोंवई आपल्या अग्राशीं उंच असून खालीं वर या दोन्ही बाजूस सुंदर असून तीक्ष्ण दिसावी. आणि त्या प्रतिमेचे नेत्र, दोन अंगुलें लांबीचे असून त्यांची रुंदी एकांगुल परिमित असावी.

उन्नतोदरमध्ये तु रक्तांते शुभलक्षणे ॥ तारकार्धविभागेन दृष्टिः स्यात्पंचभागिका ॥ ३४ ॥

अर्थ- तसेच ते नेत्र अभ्यंतरीं बुबुळस्थानीं व पापण्यांचे मध्यभागीं उंच करावे. आणि त्या नेत्राचे पांच भाग करून त्यांत मध्यें अर्धभागावर बाहुलीचा मध्य बिंदु करावा.

द्व्यंगुलं तु भ्रुवोर्मध्ये नासामूलमथांगुलम् ॥ नासाग्रविस्तरं तद्वत्पुटद्वयमथानतम् ॥ ३५ ॥

अर्थ- तसेंच भृकुटींच्या मध्यभागीं जें नासिकामूल आहे; तें दोन अंगुल परिमित रुंदीचें असून तिचें अग्र एक अंगुल रुंद असावें. आणि दोन्ही नाकपुड्याही एक अंगुल परिमित रुंद असून त्या दोहों भागीं उतरत्या असाव्या.

नासापुटबिलं तद्वदर्धांगुलमुदाहृतम् ॥ कपोले द्व्यंगुले तद्वत्कर्णमूलाद्विनिर्गते ॥ ३६ ॥

अर्थ- तशींच तीं नासिकाछिद्रें ही प्रत्येकीं, अर्ध अंगुल परिमित विस्तारानें

युक्त असावी. तसेंच गालहे कर्णमूलापासून दोन अंगुल परिमित प्रदेश सोडून आलीकडे असावे.

हन्वग्रमंगुलंतद्वद्विस्तारोद्व्यंगुलोभवेत्॥ अर्धांगुलाभ्रुवोराजीप्रणालसदृशीसमा॥ ३७॥

अर्थ- तसेंच हनवटीचें अग्र एक अंगुल लांबीचें असून तिची रुंदी दोनअंगुलें असावी. आणि भ्रुकुटीची रुंदी अर्धांगुल प्रमाणाची असून ती दोन्ही बाजूंनीं पन्हाळ सारखी उतरती असून आपल्या भागानें परस्परें समान असा.

अर्धांगुलसमस्तद्वदुत्तरोष्ठस्तुविस्तरे॥ निष्पावसदृशंतद्वन्नासापुटदलंभवेत्॥ ३८॥

अर्थ- तसाच वरचा ओष्ठ, रुंदी विषयीं अर्धांगुल प्रमाण असून नासिकेच्या दोही बाजूंचे दोन्ही भाग (नाकपुड्या) हे निष्पावा (पावट्या) समान असावे.

सृक्किणीज्योतिस्तुल्येतुकर्णमूलात्षडंगुले॥ कर्णौतुभ्रूसमौज्ञेयौऊर्ध्वंतुचतुरंगुलौ॥ ३९॥

अर्थ- तसेंच ओष्ठांचे प्रांत (कडेचे) भाग ज्योतीसारखे तेजःपुंज असून ते कर्णमूलापासून सहा अंगुलांचे अंतरानें असावे. आणि त्या मूर्तीचे कर्ण, भ्रुकुटींशीं समांतर असूनते उंचीला चार अंगुलें प्रमाणाचे असावे.

द्व्यंगुलौकर्णपाशौवौतुमात्रामेकांतुविस्तृतौ॥ कर्णयोरुपरिष्टाच्चमस्तकंद्वादशांगुलम्॥ ४०॥

अर्थ- त्याच प्रमाणें कर्णांचे मागले भाग दोन अंगुलें उंचवट असून एक-मात्रा म्हणजे दोन अंगुलेंच रुंद करावे. आणि कर्णांच्या उर्ध्वभागीं मस्तक हें द्वादश (बारा) अंगुलें विस्तृत असावें.

ललाटात्पृष्ठतोर्धंनप्रोक्तमष्टादशांगुलम्॥ षट्त्रिंशदंगुलश्चास्यपरिणाहःशिरोगतः॥ ४१॥

अर्थ- तसेंच त्या मूर्तीच्या कपाळाचे पृष्ठभागाकडील मस्तकाचा अर्धभाग अठरा अंगुलें विस्तृत असावा. आणि त्या प्रतिमेच्या मस्तकाचा सर्वघेर छत्तिस अंगुल परिमित करावा.

सकेशनिचयोयस्यद्विचत्वारिंशदंगुलः॥ केशांतात्धनुकांतद्वदंगुलानितुषोडश॥ ४२॥

अर्थ- आणि केशसमुदाय (शिखास्थान) सहित मस्तकाचा समग्र घेर बे चाळीस अंगुलें असून तशीच हनुवटी ही केश रहित कपाळापासून सोळा अंगुलांचे अंतरावर असावी.

ग्रीवामध्यपरीणाहश्चतुर्विंशतिकांगुलः॥ अष्टांगुला भवेद्ग्रीवापृथुत्वेनप्रशस्यते॥ ४३॥

अर्थ- तसाच मानेचा मध्यघेर चोवीस अंगुलें असून मान आठ अंगुल परिमित जाडी असावी.

स्तनग्रीवांतरंप्रोक्तमेकतालंस्वयंभुवा॥ स्तनयोरंतरं तद्वद्द्वादशांगुलमिष्यते॥ ४४॥

अर्थ- तसेच स्तन व मान यांचें मध्यांतर एकताल (अंगुष्ठापासून पसरले-ल्या मधील अंगुली परिमित) प्रमाण असावें असें ब्रम्हदेवानी सांगितलें असून दोन्ही स्तनांचें अंतर बारा अंगुलें असावें.

स्तनयोर्मंडलंतद्वद्व्यंगुलंपरिकीर्तितम्॥ चूचुकौमंड-लस्यांतर्यवमात्रावुभौस्मृतौ॥ ४५॥

अर्थ- तसेंच मूर्तीच्या स्तनांचें मंडल (वर्तुळ) दोन अंगुल परिमित विस्तृत असून त्यांचें अग्र म्हणजे, त्यांपरिघांत एक यवमात्र विस्तीर्ण असावें.

द्वितालंचापिविस्ताराद्वक्षस्थलमुदाहृतम्॥ कक्षेषडं-गुलेप्रोक्ते बाहुमूलस्तनांतरे॥ ४६॥

अर्थ- आणि वक्षस्थलाचा विस्तार (रुंदी) दोनताल प्रमाण असून कक्षा (काख) ह्या बाहुमूल (बाव्हरा) व स्तन यांच्या मध्य भागावर सहा अंगुलें विशाल कराव्या.

चतुर्दशांगुलौपादावंगुष्ठौतुत्र्यंगुलौ॥ पंचांगुलपरी-णाहमंगुष्ठाग्रंतथोन्नतम्॥ ४७॥

अर्थ- तसेच चरण हे चवदा अंगुलें दीर्घ असून अंगुष्ठ हे तीन अंगुलें लांबीचे असावे. व अंगुष्ठाचें अग्र पांच अंगुल परिमित घेरानें युक्त असून तसेंच कांहीं उंच असावें.

अंगुष्ठकसमातद्वदायामास्यात्प्रदेशिनी॥ तस्याः षोडशभागेनहीयतेमध्यमांगुली॥ ४८॥

अर्थ- तशीच प्रदेशिनी (अंगुष्ठाजवळची अंगुली) ही अंगुष्ठा समान लांब असून तिच्या समीपची मध्यांगुली, तिचे सोळाव्या अंशानें न्यून असावी.

अनामिकाष्टभागेन कनिष्ठा चापि हीयते ॥ पर्वत्रयेण चांगुल्यो गुल्फौ द्व्यंगुलकौ मतौ ॥ ४९ ॥

अर्थ- आणि करंगळी जवळची अनामिका नामक अंगुली व करंगळी ह्या त्या मधल्या अंगुली पेक्षां अष्टमांशानें हीन असाव्या. तशाच हाताच्या अंगुष्ठ रहित चारी अंगुली तीन पर्वांनीं (पेरीं) युक्त असून पायांचे घोटे दोन अंगुलें विस्तीर्ण करावे.

पार्ष्णिर्द्व्यंगुलमात्रस्तु कलयोच्चः प्रकीर्तितः ॥ द्विपर्वांगुष्ठकः प्रोक्तः परीणाहश्च द्व्यंगुलः ॥ ५० ॥

अर्थ- तशीच टांच दोन अंगुलें रुंद असून एक कलेनें म्हणजे दोनच अंगुलें उंच असावी. आणि हाताचा अंगुष्ठ दोन पर्वांनीं युक्त असून त्याचा घेर ही-दोन अंगुल परिमितच विस्तृत असावा.

प्रदेशिनीपरीणाहस्त्र्यंगुलः समुदाहृतः ॥ कन्यसाच्चाष्टभागेन हीयते क्रमशो द्विजाः ॥ ५१ ॥

अर्थ- ऋषीहो अंगुष्ठा जवळची प्रदेशिनी नामें करांगुली तीन अंगुल परिमित विस्तृत असून करंगळी क्रमानें तिज पेक्षां अष्टमांशानें न्यून असावी.

अंगुलेनोच्छ्रयः कार्यो ह्यंगुष्ठस्य विशेषतः ॥ तदर्धेन तु शेषाणामंगुलीनां तथोच्छ्रयः ॥ ५२ ॥

अर्थ- तशीच अंगुष्ठाची उंची, चार अंगुली पेक्षां विशेषें करून एक अंगुल परिमित करावी. आणि त्याच्या अर्धप्रमाणानें इतर अंगुलींची उंची असावी.

जंघाग्रे परिणाहस्तु अंगुलानि चतुर्दश ॥ जंघामध्ये परीणाहस्तथैवाष्टादशांगुलः ॥ ५३ ॥

अर्थ- तसाच पोटऱ्यांचे अग्रभागीं चवदा अंगुलें घेर असून मध्यभागीं अठरा अंगुलें विस्तार असावा.

जानुमध्ये परीणाह एकविंशतिरंगुलः ॥ जानूच्छ्रयोंगुलः प्रोक्तो मंडलं तु त्रिरंगुलम् ॥ ५४ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जानूंचा (गुडघे) मध्यविस्तार एकवीस अंगुलें असून

त्याची उंची एक अंगुल असावी; व त्यांचे वर्तुलाचा व्यास तीन अंगुल परिमित विस्तीर्ण असावा.

ऊरू मध्येपरीणाहोह्यष्टाविंशतिकांगुलः ॥ एकत्रिंशो परिष्टाच्च वृषणौतुत्रिरंगुलौ ॥ ५५॥

अर्थ- तसाच ऊरूंचा (मांड्या) मध्यविस्तार अठ्ठावीस अंगुलें असून त्यांची वरच्या भागाची विशालता एकतीस अंगुलें असावी. व वृषण (अंडकोश) हे तीन अंगुल परिमित विशाल असावे.

द्व्यंगुलंचतथामेढ्रंपरीणाहः षडंगुलम् ॥ मणिबंधादधोविद्यात्केशरेखास्तथैवच ॥ ५६॥

अर्थ- तसेंच शिश्न हें दोन अंगुलें रुंद असून त्याचा घेर सहा अंगुलें असावा. आणि त्या प्रतिमेच्या मनगटाचे अधोभागीं केशांच्या रेखा (रेषा) कराव्या.

मणिकोशपरीणाहश्चतुरंगुलइष्यते ॥ विस्तरेणभवेत्तद्वत्कटिरष्टादशांगुला ॥ ५७॥

अर्थ- तसाच मनगटाचा विस्तार चार अंगुलें असून मूर्तीची कटि (कंबर) अठरा अंगुलें विस्तृत असावी.

द्वाविंशतिलथास्त्रीणांस्तनौच द्वादशांगुलौ ॥ नाभिमध्यपरीणाहोद्विचत्वारिंशदंगुलः ॥ ५८॥

अर्थ- तशीच स्त्रियांच्या करीची विस्तीर्णता बेवीस अंगुलें असून स्तनहे बारा अंगुलें विस्तृत असावे. आणि नाभि प्रदेशींच्या मध्यभागाचा घेर बेचाळीस अंगुलें असावा.

पुरुषेपंचपंचाशत्कट्यांचैवतुवेष्टनम् ॥ कक्षयोरुपरिष्टात्तुस्कंधौप्रोक्तौषडंगुलौ ॥ ५९॥

अर्थ- त्याच प्रमाणें पुरुषाच्या कंबरेचें वर्तुल पंचावन अंगुलें विस्तीर्ण असावें. तसेंच स्कंध (खांदे) हे कक्षे (काख) वरसहा अंगुल प्रमाणानें असावे.

अष्टांगुलांतुविस्तारेग्रीवांचैवविनिर्दिशेत् ॥ परिणाहेतथाग्रीवांकलाद्वादशनिर्दिशेत् ॥ ६०॥

अर्थ- तशीच मान, रुंदीनें अष्टांगुल परिमित असून तिचा घेरबारा क-

ला म्हणजे चोवीस अंगुलें असावा.

आयामोभुजयोस्तद्वत्द्विचत्वारिंशदंगुलः॥ कार्यंतुबा-
हुशिखरंप्रमाणेषोडशांगुलम्॥ ६१॥

अर्थ- तसेंच मूर्तीचे भुजांच्या लांबीचें प्रमाण बेचाळीस अंगुलें करावें. व तिच्या बाहुशिखराचें वर्तुल प्रमाण सोळा अंगुलें असावें.

ऊर्ध्वंयद्बाहुपर्यंतंविंद्यादष्टांगुलंशतम्॥ तथैकांगुलहीनं
तुद्वितीयंपर्वउच्यते॥ ६२॥

अर्थ- तशीच चरणांपासून बाहूपर्यंत मूर्तीची उंची एकशें आठ अंगुल परिमित असावी. आणि हाताच्या अंगुलीचे प्रथम पर्वा (पेरें) पेक्षां द्वितीय पर्व एक अंगुल प्रमाणानें न्यून असावें.

बाहुमध्येपरीणाहोभवेदष्टादशांगुलः॥ षोडशोक्तः प्र
बाहुस्तुषट्कलोग्रकरोमतः॥ ६३॥

अर्थ- त्याच प्रमाणें बाहूचा मध्य विस्तार, अठरा अंगुलें असून कोपराचा मध्यविस्तार सोळा अंगुल परिमित करावा. व कराग्राचा (मनगट) घेरसहा कला परिमित म्हणजे सहा दुण बारा अंगुलें असावा.

सप्तांगुलंकरतलंपंचमध्यांगुलीमता॥ अनामिकामध्य
मायाःसप्तभागेनहीयते॥ ६४॥

अर्थ- तसाच तळहात सप्तांगुल परिमित विस्तृत असून मध्यम अंगुली - पांच अंगुलें दीर्घ असावी. आणि करंगळी जवळची अनामिका नामक अंगुलीही त्यामध्यांगुलीच्या सप्तमांशानें हीन असावी.

तस्यास्तुपंचभागेनकनिष्ठापरिहीयते॥ मध्यमायास्तु-
हीनावैपंचभागेनतर्जनी॥ ६५॥

अर्थ- तशीच करंगळी त्या अनामिकेच्या पंचमांशानें हीन असावी. व तर्जनी (अंगुष्ठाजवळची अंगुली) ही त्या मध्यमांगुलीचे पंचमांशानें हीन करावी.

अंगुष्ठस्तर्जनीमूलादधःप्रोक्तस्तुतत्समः॥ अंगुष्ठपरि-
णाहस्तुविज्ञेयश्चतुरंगुलः॥ ६६॥

अर्थ- तसाच अंगुष्ठ हा तर्जनीच्या मूलाचे अधोभागीं असून तो लांबीनें त्याच्या समान असून त्याचा विस्तार चार अंगुळ परिमित करावा.

शेषाणामंगुलीनांतु भागोभागेनहीयते ॥ मध्यमामध्यभागंतुअंगुलद्वयमायतम् ॥ ६७ ॥

अर्थ:- आणि इतर चारी अंगुलींचा भाग, एकेक अंशानें कमी असावा व मध्यांगुलीचा मध्य भाग दोन अंगुलें लांब करावा.

यवोयवेनसर्वासांतस्यास्तस्याःप्रहीयते ॥ अंगुष्ठपर्वमध्यंतुतर्जन्यासदृशंभवेत् ॥ ६८ ॥

अर्थ:- त्याच प्रमाणें अंगुष्ठादिक सर्व अंगुलींतील प्रत्येक अंगुलीचा यव एकयवानें न्यून असावा. व अंगुष्ठाचे दोन पर्वांचा मध्यभाग त्या जवळच्या तर्जनी नामक अंगुलीच्या मध्य यवासमान रुंद असावा.

यवद्वयाधिकंतद्वदग्रपर्वउदाहृतम् ॥ पर्वार्धेतुनखान्विद्यादंगुलीषुसमंततः ॥ ६९ ॥

अर्थ:- तसेंच सर्व अंगुलींच्या अग्रभागाचें पर्व (पेर.) पूर्व पर्वापेक्षां दोन यव अधिक असावें. आणि त्या संपूर्ण अंगुलींचे पुढील पेराचे अर्धांतील आसमंतात् भागांवर नखांची आकृति करावी.

स्निग्धंश्लक्ष्णंप्रकुर्वीतईषद्रक्तंतथाग्रतः ॥ निम्नपृष्ठंभवेन्मध्येपार्श्वतःकलयोच्छ्रितम् ॥ ७० ॥

अर्थ:- ती सतेज सुंदर अशी असून अग्रभागीं किंचित् आरक्त असावी. आणि तिचा पृष्ठभाग मध्यें खोल असून दोहों कडे दोन्ही बाजूंस मिळून कलेनें म्हणजे दोन अंगुलें उंच असावा.

तथैवकेशवल्लीयंस्कंधोपरिदशांगुला ॥ स्त्रियः कार्याः स्तनन्वंग्यः स्तनोरुजघनाधिकाः ॥ ७१ ॥

अर्थ:- तशाच देवस्त्रिया ह्या आकृतीनें कृशांग युक्त कराव्या. आणि स्तन ऊरू (मांड्या), व जघन, (कटीचा पुढील भाग) हे ह्यांचे इतर अंगा पेक्षां प्रमाणानें पुष्टते विषयीं अधिक असून त्यांची केशवल्ली त्यांच्या स्कंधावर दहा अंगुल परिमित यावी.

चतुर्दशांगुलायाममुदरंनामनिर्दिशेत् ॥ नानाभरणसं-

---

*: टीप अंगुलीचा अष्टमांश. **: टीप २ कला हें दोन अंगुल प्रमाणाचें मान आहे.

पन्नाः किंचिच्छ्लक्ष्णाःभुजास्ततः ॥ ७२ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या देवस्त्रियांच्या मूर्ति अनेक आभरणानीं सुशोभित करण्यासाठीं त्यांचे भुज सुंदर व उदर नवदा अंगुलें लांब अशी अवयव रचना करावी.

किंचिद्दीर्घंभवेद्वक्त्रमलकावलिरुत्तमा ॥ नासाग्रीवाल लाटंचसार्धमात्रंत्रिरंगुलम् ॥ ७३ ॥

अर्थ- तसेंच त्या देवींच्या प्रतिमेचें मुख किंचित् दीर्घ असून मस्तकांवरील केशांची पंक्ति सुंदर असावी. आणि नासिका, मान व ललाट (कपाळ) हे-त्यांचे अवयव दीड मात्रा म्हणजे तीन अंगुल परिमित विस्तृत करावे.

अध्यर्धांगुलविस्तारःशस्यतेऽधरपल्लवः ॥ अधिकंनेत्रयुग्मंतुचतुर्भागेननिर्दिशेत् ॥ ग्रीवावलिश्चकर्तव्याकिंचिदर्धांगुलोच्छ्रया ॥ ७४ ॥

अर्थ- तसाच त्या देविप्रतिमांच्या अधरोष्ठाचा (खालचा ओष्ठ) विस्तार दीड अंगुल परिमित प्रशस्त असून दोन नेत्र मिळून चार भाग रुंदी अधिक असावी. आणि मानेचा शंख किंचित् अर्धांगुल परिमित उंच करावा.

एवंनारीषुसर्वासुदेवानांप्रतिमासुच ॥ नवतालमिदं प्रोक्तंलक्षणंपापनाशनम् ॥ ७५ ॥

अर्थ- हे मनुराजा, याप्रमाणें सर्व देव व देवांगना यांच्या प्रतिमां विषयीं तुला हें जें लक्षण सांगितलें. तें, सर्व पापनाशा विषयीं समर्थ आहे. म्हणजे अशा सुलक्षण युक्त मूर्ती करून त्यांची पूजा केली असतां, पूजकाचे सकल-पातकांचा नाश होतो. ॥ ॥ इतिश्री मत्स्यपुराणे देवतार्चानुकीर्तने प्रमाण विभागो नाम अष्टपंचाशदुत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २५८ ॥

अध्याय २५९ वा.

सूतउवाच ॥ अतःपरंप्रवक्ष्यामिदेवाकारान्विशेषतः ॥ दशतालःस्मृतोरामोबलिर्वैरोचनिस्तथा ॥ १ ॥

अर्थ- सूत म्हणतात. ऋषीहो, यानंतर मी तुम्हांस विशेषें करून आतां देवांचे आकार कथन करतों. ते असे कीं, राम व विरोचन पुत्र बलि यांची आहू

* टीप तसेंच मात्रा हें ही दोन अंगुल प्रमाणाचेंच मान आहे.

वराहोनारसिंहश्चसप्ततालस्तुवामनः॥मत्स्यकूर्मौचनि
र्दिष्टौयथाशोभंस्वयंभुवा ॥ २॥

अर्थ- तसेच वराह, नारसिंह व वामन यांच्या मूर्ति सप्तताल प्रमाणाच्या असाव्या. आणि मत्स्य व कूर्म हे ज्या रीतीनें सुशोभित होतील. तसे करावे. असें ब्रम्हदेवानीं कथन केलें आहे.

अतः परंप्रवक्ष्यामिरुद्राद्याकारमुत्तमम्॥सपीनोरुभुज
स्कंधस्तप्तकांचनसप्रभः॥ ३॥ शुक्लोर्करश्मिसंघात-
श्चंद्रांकितजटोविभुः॥ जटामुकुटधारीचद्व्यष्टवर्षाकृति
श्चसः॥ ४॥

अर्थ- यानंतर आतां मी, रुद्रादिक मूर्तींचा उत्तम आकार कथन करतों तो असा कीं, शिवमूर्ति, अग्नितप्त सुवर्णा समान कांतियुक्त असून ऊरु (मांड्या), भुज व स्कंध या पुष्ट अवयवानीं सुशोभित असावी. तशीच ती शिवमूर्ति शुभ्र वर्ण असून सूर्यकिरण समुदाया समान तेजःपुंज करावी. आणि त्या व्यापक शंकराची प्रतिमा, चंद्रासारखा प्रकाश व आकार यानीं युक्त, जटामुगुट धारण केलेली असून ती षोडश वर्षाकृतीनें सुशोभित असावी.

बाहूवारणहस्ताभौवृत्तजंघोरुमंडलः॥ऊर्ध्वकेशश्चकर्त
व्योदीर्घायतविलोचनः॥ ५॥व्याघ्रचर्मपरीधानः कटि-
सूत्रत्रयान्वितः॥हारकेयूरसंपन्नोभुजंगाभरणस्तथा ६

अर्थ- तसेच त्या शिवप्रतिमेचे बाहू गज शुंडे समान दीर्घ सरळ असून जंघा (पोट्र्या) व ऊरु (मांड्या), यांचा घेर वर्तुलाकार करावा. आणि ती मूर्ति उर्ध्वकेश व आकर्ण विशाल नेत्र यानीं युक्त असून व्याघ्रचर्म परिधान केलेली असावी. त्याच प्रमाणें ती शिव प्रतिमा तिहिरी कटिसूत्र, हार, बाहुभूषणें व नागभूषणें यानीं सुशोभित करावी.

बाहवश्चापिकर्तव्यानानाभरणभूषिताः॥ पीनोरुगंड-
फलकः कुंडलाभ्यामलंकृतः॥ ७॥ आजानुलंबबाहुश्च
सौम्यमूर्तिः सुशोभनः॥

अर्थ- तसेच त्या शिव प्रतिमेचे बाहु अनेक आभरणानीं भूषित करावे. आणि त्या मूर्तीचे ऊरु (मांड्या) व गालांचे प्रदेश हे पुष्ट असून कर्ण कुंडलानीं शिव-

* हाताच्या अंगुष्ठा पासून पसरलेल्या मध्यमांगुली इतकें प्रमाण आहे.

मूर्ति सुशोभित असावी. तशीच ती शिव मूर्ति आजानु बाहु असून सौम्य आकृती नें अतिशोभायमान करावी.

खेटकंवामहस्तेतुशंखंचैवतुदक्षिणे ॥ ८ ॥ शक्तिंदंडंत्रिशूलंचदक्षिणेषुनिवेशयेत् ॥ कपालंवामपार्श्वेतुनागंखट्वांगमेवच ॥ ९ ॥

अर्थ- तशीच ढाल त्या शिवमूर्तीच्या वामहस्तांत असून दक्षिण हस्तांत शंख शक्ति, दंड व त्रिशूल हे स्थापन करावे. आणि नरकपाल, नाग व खट्वांग (शिवाचें एक आयुध), हीं आयुधें वामहस्तांत स्थापन करावीं.

एकश्चवरदोहस्तस्तथाक्षवलयोपरः ॥ वैशाखस्थानकं कृत्वानृत्याभिनयसंस्थितः ॥ १० ॥

अर्थ- तसाच त्या शिवमूर्तीचा एक हस्त, वरदाकृतीनें युक्त व द्वितीय हस्त, रुद्राक्षांचे कंकणानें युक्त असे करावे. आणि त्या शिवमूर्तीची आकृति, मयूराकार नृत्याच्या- भावें करून उत्तम स्थितीनें उभी आहे अशी करावी.

नृत्यन्दशभुजः कार्योगजचर्मधरस्तथा ॥ तथात्रिपुरदाहेचबाहवःषोडशैवतु ॥ ११ ॥

अर्थ- अशी शिव प्रतिमा नृत्याकृतीनें युक्त दर्शवून दशभुज व गजचर्म परिधान- केलेली करावी. तशीच त्रिपुर दग्ध करणाऱ्या शिवाची मूर्ति कर्तव्य असतां, तिला सोळाच बाहु करावे.

शंखंचक्रंगदाशार्ङ्गंघंटातत्राधिकाभवेत् ॥ तथाधनुःपिनाकंचशरोविष्णुमयस्तथा ॥ १२ ॥

अर्थ- त्यांतील दशभुज पूर्वोक्त स्थितीनें करावे. आणि इतर सहा भुजांत शंख १ चक्र २ गदा ३ शार्ङ्गधनुष्य ४ व घंटा ५ ही त्यांत अधिक असावी. तसेंच पिनाकधनुष्य ६ व विष्णुरूपीबाण ७ हे असावे.

चतुर्भुजोष्टबाहुर्वाज्ञानयोगेश्वरोमतः ॥ तीक्ष्णनासाग्रदशनः करालवदनोमहान् ॥ १३ ॥ भैरवःशस्यतेलोकेप्रत्यायतनसंस्थितः ॥ नमूलायतनेकार्योभैरवस्तुभयंकरः ॥ १४ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें चतुर्भुज किंवा अष्टभुज या शिव प्रतिमा ज्ञानयोग दायक आहेत. आणि तीक्ष्ण नासिकाग्र, तसेंच दंत व भयंकर मुख यानीं युक्त अशी भै-

रवाचीमोठी मूर्त्ति, मुख्यशिवालयाचे सन्मुख मंदिरांत करावी. हेंच लोकांत कल्याण कारक आहे यास्तव हीभयंकर भैरवमूर्त्ति, मुख्यशिवालयांत करूंनये.

नारसिंहोवराहोवातथान्येपिभयंकराः॥ नाधिकांगानहीनांगाः कर्तव्यादेवताः क्वचित्॥१५॥

अर्थ- तसेच नारसिंह, वराह व इतरही भयंकर देवहे सांगितलेल्या प्रमाणा पेक्षां अधिकवन्यून अशा अंगानीं युक्त असे न करावे.

स्वामिनंघातयेन्न्यूनाकरालवदनातथा॥ अधिकाशिल्पिनंहन्यात्कृशाचैवार्थनाशिनी॥१६॥

अर्थ- कारण न्यून प्रमाण युक्त अवयवांची व भयंकर मुखयुक्त अशी मूर्त्ति,-स्वकीय यजमानाचा नाश करील. आणि सांगितलेल्या मानाहून अधिक प्रमाणाचे अंगानीं युक्त झाली असतां, ती आपणास करणाऱ्या शिल्पीस मारील व-जी प्रतिमा कृश होईल. ती आपल्या यजमानाच्या द्रव्याचा नाश करील.

कृशोदरीतुदुर्भिक्षंनिर्मांसाधननाशिनी॥ वक्रनासातुदुःखायसंक्षिप्तांगीभयंकरी॥१७॥

अर्थ- तशीच ज्यादेशांतील मुख्य मूर्त्ति, कृश उदरानें युक्त होईल तरती त्यादेशांत दुर्भिक्ष पडण्यास कारण होईल. आणि कृशमूर्त्ति, धननाशकारक होईल. त्याचप्रमाणें वक्रनासिका युक्त मूर्त्ति, दुःखकारक होईल. व उक्तप्रमाणा पेक्षां संक्षिप्त (न्यून) अंगयुक्त प्रतिमा यजमानास भयउत्पन्न करील.

चिपिटादुःखशोकायअनेत्रानेत्रनाशिनी॥ दुःखदाहीनवक्त्रातुपाणिपादकृशातथा॥१८॥

अर्थ- तशीच जीमूर्त्ति, आकृतीनें उक्त मानापेक्षां लहान असली तर ती यजमानास दुःखवशोक यांस कारण होते. आणि मूर्त्ति, नेत्ररहित झालीतर तीयजमानाचे नेत्रांचा नाश करिते; तसेंच ज्यामूर्त्तीचें मुख उक्त प्रमाणाचे भागानीं-किंवा सौंदर्यानें हीन झालें तरती पूजकास दुःख दायक होते. व जिचे हस्तपाद कृश होतील, तीही यजमानास दुःख कारक होईल.

हीनांगाहीनजंघाचभ्रमोन्मादकरीनृणां॥ शुष्कवक्त्रातुराजानंकटिहीनाचयाभवेत्॥१९॥

अर्थ- त्याचप्रमाणें सांगितलेल्या मानापेक्षां जंघा (पोटऱ्या) दिक अंगेंन्यू

न झाली असतां, ती तेथील मनुष्यांस भ्रमव उन्माद उत्पन्न करणारी होईल. आणि जी प्रतिमा कृश(निस्तेज) मुखव हीन कटि (कंबर) यानीं युक्त होईल ती त्या देशासंबंधि राजास बाधक होईल.

पाणिपादविहीनोयोजायतेमारकोमहान् ॥ जंघाजानुविहीनाचशत्रुकल्याणकारिणी ॥ २०॥

अर्थ- तसाच जोदेव, हस्त, पाद विरहित असेल, तो यजमानास महा नाशक होतो. आणि जंघा (पोरया) व जानु (गुडघे) यानीं रहित झालेली मूर्त्ति, त्या पूजकाचे शत्रूंस कल्याण दायिकारक होईल.

पुत्रमित्रविनाशायहीनवक्षस्थलातुया ॥ संपूर्णावयवायातुआयुर्लक्ष्मीप्रदासदा ॥ २१॥

अर्थ- तशीच जीमूर्त्ति, वक्षस्थल रहित होईल; ती, पूजकाचे पुत्र व मित्र यांच्यानाशांस कारण होईल. आणि जी मूर्त्ति, शास्त्रोक्त सकललक्षण युक्त सर्व अवयवानीं संपन्न होईल, तीस्वकीय पूजकांस निरंतर आयुष्य व लक्ष्मीहीं फलें देणारी आहे.

एवंलक्षणमासाद्यकर्तव्यःपरमेश्वरः ॥ स्तूयमानःसुरैःसर्वैःसमंतादर्शयेद्भवम् ॥ २२॥

अर्थ- असें मूर्त्तींचें सर्वलक्षण जाणून शिवमूर्त्ति करावी. ती अशीकीं, मध्य भागीं शिवमूर्त्ति, असून तिचे आसमंतात् भागीं सर्व देव स्तुति करीत आहेतअसें शिवाचें ऐश्वर्य दर्शवावें.

शक्रेणनंदिनाचैवमहाकालेनशंकरम् ॥ प्रणतालोकपालास्तुपार्श्वेतुगणनायकाः ॥ २३॥ नृत्यत्भृंगीरिटिश्चैवभूतवेतालसंवृताः ॥ सर्वेहृष्टास्तुकर्तव्यास्तुवंतःपरमेश्वरम् ॥ २४॥

अर्थ- तें असेंकीं, इंद्र, नंदी व महाकालनामक गण यांसहित विराजमान शंकरांस लोकपाल नम्र असून त्यांचे पार्श्वभागीं प्रमथादि गणनायक उभे असूनतेथें नृत्य करणारा भृंगी व रिटि तसेच भूत, वेताल यांसहवर्तमान सर्वही हर्षयुक्त होऊन परमेश्वर रूपशिवाची स्तुति करीत आहेत असेहे शिवाच्या आसमंतात् भागीं करावे.

गंधर्वविद्याधरकिन्नराणामथाप्सरोगुह्यकनायकानाम्
॥ गणैरनेकैः शतशो महेंद्रैर्मुनिप्रवीरैरपिनम्यमानम्
॥ २५ ॥ धृताक्षसूत्रैः शतशः प्रवालपुष्पोपहारप्रचयंद-
दद्भिः ॥ संस्तूयमानं भगवंतमीड्यं नेत्रत्रयेणामरमर्त्य
पूज्यम् ॥ २६ ॥

अर्थ — तसेच गंधर्व, विद्याधर, किन्नर, अप्सरा व गुह्यक प्रमुख यांचे अनेक गण, शतशः इंद्रपदाधिकारी व श्रेष्ठ मुनि हे सर्वही स्वहस्तांत रुद्राक्ष माला धारण करून शेकडों प्रकारचे कोमल पल्लव, पुष्पें व फलादिक अनेक भक्षणीय पदार्थ यांचे समुदाय शिवास अर्पण करीत असून उत्तम स्तुतिपूर्वक नमस्कार करीत आहेत; असे सर्व स्तुत्य भगवान् शंकर, त्रिनेत्रानीं सुशोभित असून संपूर्ण अमर व मानव यानीं सुपूजित आहेत. अशारीतीनें शिवाची मूर्ति, करावी. ॥ २

तिश्री मत्स्यपुराणे नृत्येश्वर कीर्तनं नाम एकोन षष्ठ्युत्तर द्विशततमोऽध्याय २५९

अध्याय २६० वा.

सूत उवाच ॥ अधुनासंप्रवक्ष्यामि अर्धनारीश्वरंपरम् ॥
अर्धेनदेवदेवस्यनारीरूपंसुशोभनम् ॥ १ ॥

अर्थ — सूत म्हणतात ऋषीहो या कालीं मी तुम्हास शिवाचें उत्तम अर्धनारीश्वररूप कथन करतों. तें असेंकीं, त्या देवाधिदेव शिवाचे अर्धांगीं अतिसुंदर स्त्रीरूप करावें.

ईशार्धेतुजटाभागोबालेंदुकलयायुतः ॥ उमार्धेचापि-
दातव्यौसीमंततिलकावुभौ ॥ २ ॥

अर्थ — तसाच शिवाच्या अर्धभागीं बालचंद्र कलायुक्त जटाभाग करावा. आणि पार्वतीच्या अर्धभागीं सीमंत (भांग) व कुंकुम तिलक हे दोन्ही करावे.

वासुकिर्दक्षिणेकर्णेवामेकुंडलमादिशेत् ॥ बालिकाचो
परिष्टात्तुकपालंदक्षिणेकरे ॥ त्रिशूलंवापिकर्तव्यंदेवदे-
वस्यशूलिनः ॥ ३ ॥

अर्थ — तसाच त्या अर्धनारीश्वर शिवाच्या दक्षिण कर्णांत वासुकि व वामकर्णांत कुंडल घालावें. आणि त्या कुंडलाचे ऊर्ध्वभागीं बाळी असून त्या त्रिशूलधारि देवाधिदेवाच्या दक्षिण हस्तांत नरकपाल व त्रिशूल हीं असावीं.

वामतोदर्पणंदद्यादुत्पलंतुविशेषतः॥४॥वामबाहुश्वक
र्तव्यः केयूरवलयान्वितः॥उपवीतंचकर्तव्यंमणिमुक्ता
मयंतथा॥५॥

अर्थ- त्याच प्रमाणें वामभागीं पार्वतीचे हस्तांत दर्पण (आरसा) व विशेषतः कमलही देऊन तो वामबाहु, बाहुभूषण (बाजुबंद व कंकणायानीं भूषित करावा. आणि शिवाचें यज्ञोपवीत, रत्न मणि व मौक्तिकें यांचें करावें.

स्तनभारंतथार्धेतुवामेपीनंप्रकल्पयेत्॥परार्घ्यमुज्ज्व
लंकुर्यात्श्रोण्यर्धेतुतथैवच॥६॥

अर्थ- तसाच पार्वती कडील वामार्धभागीं एक पुष्ट स्तन करावा. आणि त्याच वामार्धांतील कंबरेच्या भागांत बहुमूल्ययुक्त कमर पट्टा घालावा.

लिंगार्धमूर्ध्वगंकुर्यात्व्यालाजिनकृतांबरम्॥वामेलं
बपरीधानंकटिसूत्रत्रयान्वितम्॥७॥

अर्थ- तसेंच शिवाकडील दक्षिणार्धांत लिंगाचा अर्धभाग स्पष्ट दिसण्यासाठीं तो किंचित् उंच करावा. आणि तो शिवाचा दक्षिण अर्धभाग नाग व कृष्णाजिनरूप वस्त्र यानीं युक्त करावा. तसेंच पार्वती कडील वामभागीं तिचें परिधान वस्त्र लंबायमान असून तें वरून त्रिसूत्री कंबर पट्यानें युक्त असावें.

नानारत्नसमोपेतंदक्षिणेभुजगान्वितम्॥देवस्यदक्षि
णंपादंपद्मोपरिसुसंस्थितम्॥८॥

अर्थ- त्याच प्रमाणें दक्षिणार्ध भागांतील शिवाचें रूप अनेक रत्नें व नाग यानीं सुशोभित करावें. तसाच महादेवाचा दक्षिण चरण, अधोभागीं कमलाकृति करून त्यावर उत्तमरीतीनें स्थापन करावा.

कंचिदर्धेतथावामंभूषितंनूपुरेणतु॥रत्नैर्विभूषितान्
कुर्यादंगुलीष्वंगुलीयकान्॥९॥

अर्थ- पार्वती कडील अर्धांगांतील वामचरण, नूपुरानें (पैंजण) अलंकृत करावा. आणि शिव पार्वतीचे हस्तांच्या अंगुळींतील (बोटें) आंगठ्या आदिकरून भूषणें रत्नांच्या जडावानें सुशोभित करावीं.

सालक्तकंतथापादंपार्वत्यादर्शयेत्सदा॥अर्धनारी-
श्वरस्येदंरूपमस्मिन्नुदाहृतम्॥१०॥

अर्थ- आणि त्या अर्धांगी पार्वतीचा चरण निरंतर आरक्त वर्णानें सुशोभित दर्शवावा. असें हें अर्धनारीश्वराचें रूप या ग्रंथांत वर्णिलें आहे.

उमामहेश्वरस्यापिलक्षणंशृणुतद्विजाः॥ संस्थानंतु-
तयोर्वक्ष्येलीलाललितविभ्रमम्॥११॥चतुर्भुजंद्वि-
बाहुंवाजटाभारेंदुभूषणम्॥ लोचनत्रयसंयुक्तमुमैक
स्कंधपाणिनम्॥१२॥

अर्थ- शौनकादि ब्राम्हण हो आतां उमामहेश्वर मूर्तीचें ही लक्षण श्रवण करा. त्या उमामहेश्वर मूर्तीचा आकार मी सांगतों, तो असा कीं, उमामहेश्वराची मूर्त्ति; चतुर्भुज किंवा द्विभुज असून मस्तकीं जटाभार, चंद्रभूषण व त्रिनयन यानीं शोभायमान करावी. आणि त्याशंकरानें स्वकीय एक हस्त पार्वतीच्या स्कंधावर स्थापन केलेला असून लीलायुक्त सुंदर विलास शोभित असावी.

दक्षिणेनोत्पलंशूलंवामेकुचभरेकरम्॥ द्वीपिचर्मपरी-
धानंनानारत्नोपशोभितम्॥१३॥सुप्रतिष्ठंसुवेषंच
तथार्धेंदुकृताननम्॥

अर्थ- तसेंच त्या उमामहेश्वराच्या दक्षिण हस्तांत कमल व त्रिशूल हीं द्यावीं. तसाच त्याचा वामहस्त पार्वतीच्या स्तनावर स्थापन करावा. आणि ती प्रतिमा व्याघ्रचर्मपरिधान केलेली असून अनेक प्रकारचीं रत्नें, उत्तम वेष व मस्तकीं अर्धचंद्र यानीं अतिसुशोभित असावी; व त्या उमामहेश्वराची प्रतिमा उत्तम विधियुक्त रीतीनें स्थापन करावी.

वामेतुसंस्थितादेवीतस्योरौबाहुगूहिता॥१४॥ शिरोभू-
षणसंयुक्तैरलकैर्ललितानना॥ सवालिका कर्णवती-
ललाटतिलकोज्वला॥१५॥ मणिकुंडलसंयुक्ता कर्णि
काभरणान्विता॥ हारकेयूरबहुला हरवक्त्रावलोकि
नी॥१६॥

अर्थ- तशीच पार्वती देवी त्या उमामहेश्वराचे वामभागीं मांडीवर बसलेली असून त्यांचे भुजानीं आलिंगित असावी. आणि ती, मस्तक भूषण युक्त केशानीं सुंदर मुख शोभित असावी. तसेंच कुरळ केश उत्तम वर्ण व कपाळावरील कुंकुमादिक तिलक यानीं ती देवी दैदीप्यमान दिसत असून रत्नखचित कुंडलें,

कर्णीका (तानवडें), बहुत हार व बाहुभूषणें (बाजुबंद) यानीं अलंकृत असू न ती सप्रेम नेत्र कटाक्षानीं शंकराचे मुखाकडे अवलोकन करीत आहे, अशी करावी.

वामांसंदेवदेवस्यस्पृशंतीलीलयातनः॥ दक्षिणंतुबहिः कृत्वाबाहुंदक्षिणतस्तथा ॥१७॥

अर्थ- आणि ती पार्वती, लीलेनें त्यादेवाधि देवाच्या वामस्कंधास स्पर्श करीत असून तसाच आपला दक्षिणभुज शिवाच्या हस्ता बाहेर करून त्यांच्या दक्षिण भुजासही स्पर्श करीत आहे.

स्कंधंवादक्षिणेकुक्षौस्पृशंत्यंगुलजैः क्वचित्॥ वामेतु दर्पणंदद्यात्उत्पलंवासुशोभनम्॥१८॥

अर्थ- तसाच त्या महादेवाचा दक्षिणस्कंध व दक्षिण कुक्षियांस ती पार्वती - कदाचित् स्पर्श करीत आहे. आणि तिचे वाम हस्तांत दर्पण व उत्कृष्ट कमल - हीं द्यावीं.

कटिसूत्रत्रयंचैवनितंबेस्यात्प्रलंबकम्॥ जयाचविज याचैवकार्तिकेयविनायकौ॥१९॥ पार्श्वयोर्दर्शयेत्तत्र तोरणेगणगुह्यकान्॥ मालाविद्याधरास्तद्वद्वीणावा- नप्सरोगणः॥२०॥

अर्थ- त्याच प्रमाणें उमामहेश्वरास तिहिरी करिसूत्र असून त्याच्या साख ळांचा घोंस करिपश्चाद्भागाचे बाजूवर लोंबता करावा. आणि जया, विजया, कार्तिकस्वामी व गणपति हे त्या महादेवाच्या दोन्ही बाजूंस मिळून करावे. तसेच प्रमथादिक गण, गुह्यक, विद्याधर व वीणा ग्रहण केलेल्या अप्सरांचा समुदाय हे त्याशिवालयाच्या मुख्य द्वारावर दोन्ही बाजूनीं मालाकार क्रमा- नें असावे.

एतद्रूपमुमेशस्यकर्तव्यंभूतिमिच्छता॥ शिवनारायणं वक्ष्येसर्वपापप्रणाशनम्॥२१॥

अर्थ- असें हें उमामहेश्वर मूर्तीचें रूप, आपणास संपत्ति इच्छिणारानें का- वें यापुढें सर्वपापांचा समूल नाश करण्या विषयीं समर्थ असें शिवनाराय णाचें स्वरूप कथन करतों.

वामार्धेमाधवंविंद्यात्दक्षिणेशूलपाणिनम्॥ बाहुद्वयंचकृष्णास्यमणिकेयूरभूषितम्॥ २२॥

अर्थ- तें असें कीं, त्याशिवनारायणाचे वामार्धभागीं माधवाची आकृति करून दक्षिणभागीं शूलपाणिशिवाची आकृति करावी. आणि वामभागाकडील कृष्णाचे दोन हस्त रत्नजडित बाहुभूषणानीं भूषित करावे.

शंखचक्रधरंशांतमारक्तांगुलिविभ्रमम्॥ चक्रस्थानेगदांवापिपाणौदद्याद्गदाभृतः॥ २३॥

अर्थ- तसेंच तें माधवरूप, हस्तद्वयांत शंख, चक्र धारण केलेलें शांत व आरक्त अंगुलींच्या विलासानें युक्त असें असावें. किंवा त्या गदाधारिमाधवाच्या हस्तांत गदा द्यावी.

शंखंचैवेतरेदद्यात्कट्यर्धंभूषणोज्वलम्॥ पीतवस्त्रपरीधानंचरणंमणिभूषणम्॥ २४॥

अर्थ- तसाच अन्य हस्तांत शंख द्यावा. आणि वामकटीवर तेजःपुंज कटिसूत्र नामक भूषण घालावें. तसेंच त्यामाधवरूपास परिधानार्थ पीतवस्त्र घालून त्याचा चरण रत्नजडित भूषणानें अलंकृत करावा.

दक्षिणार्धेजटाभारमर्धेंदुकृतभूषणम्॥ भुजंगहारवलयंवरदंदक्षिणंकरम्॥ २५॥

अर्थ- त्याचप्रमाणें त्याशिवनारायणाच्या दक्षिणार्धांतील जटाभार अर्धचंद्राकृति भूषणानें भूषित करून तो अर्धभाग भुजंगरूप हार व कंकणें (कडि, तोडे) यानीं सुशोभित असून दक्षिणकर वरदलक्षणानें युक्त असा करावा.

द्वितीयंचापिकुर्वीतत्रिशूलवरधारिणम्॥ व्यालोपवीतसंयुक्तंकट्यर्धकृतिवाससम्॥ २६॥

अर्थ- तसेंच तें दक्षिणार्धाकडील शिवाकार स्वरूप, त्रिशूल नामक श्रेष्ठ आयुध व नागरूप यज्ञोपवीत हीं धारण केलेलें असून त्याच्या अर्धकटींत गजचर्मरूप-वस्त्र परिधान केलेलें असावें.

मणिरत्नैश्चसंयुक्तंपादंनागविभूषितम्॥ शिवनारायणस्यैवंकल्पयेद्रूपमुत्तमम्॥ २७॥

अर्थ- आणि त्याशिवाकृतीचा दक्षिणचरण, वैडूर्यादिमणि, रत्नें व नाग यानीं अ

लिप्त भूषित करावा. असें शिवनारायणाचें रूप उत्तम रीतीनें करावें.

महावराहं वक्ष्यामि पद्महस्तं गदाधरम्॥ तीक्ष्णदंष्ट्राग्रघोणास्यं मेदिनीवामकूर्परम्॥ २८॥

अर्थ- आतां महावराह स्वरूपाची आकृति सांगतों ती अशी कीं, महावराहाच्या एकहस्तांत कमल व एकहस्तांत गदा धारण केलेली असून तीक्ष्ण दंष्ट्राग्र, नासिका व मुख यानीं युक्त असावें. आणि पृथ्वीही त्याच्या वाम कूर्परावर (कोंपर) असावी.

दंष्ट्राग्रेणोद्धृतां दांतां धरणीमुत्पलान्विताम्॥ विस्मयोत्फुल्लवदनामुपरिष्टात्प्रकल्पयेत्॥ २९॥ दक्षिणं कटिसंस्थं तु करं तस्याः प्रकल्पयेत्॥

अर्थ- अथवा ती धरणी दांत (इंद्रियनिग्रहयुक्त) स्वरूपानें युक्त असून एकहस्तांत कमल धारण केलेलें व त्या अद्भुत महावराहरूप दर्शनाच्या विस्मयानें प्रफुल्लित वदन युक्त झालेली असून त्या वराह देवानें स्वकीय दंष्ट्रेवर धारण केली आहे अशी त्या दंष्ट्रेचे उर्ध्वभागीं ती धरणी देवी करून तिचा द्वितीय कर स्वकटीवर स्थापन केला आहे असा करावा.

कूर्मोपरि तथा पादमेकं नागेंद्रमूर्धनि॥ ३०॥ संस्तूयमानं लोकेशैः समंतात्परिकल्पयेत्॥

अर्थ- तसाच त्या महावराह मूर्तीचा एक चरण कूर्मावर (कांसव) स्थापन केलेला असून द्वितीय चरण शेषाचे मस्तकीं स्थापन केलेला असावा. आणि त्यांचे आसमंतान्दागीं ब्रम्हादिक लोकपाल त्यांची स्तुति करीत आहेत अशी महावराह मूर्ति करावी.

नारसिंहं तु कर्तव्यं भुजाष्टकसमन्वितम्॥ ३१॥ रौद्रं सिंहासनं तद्वद्विदारितमुखेक्षणम्॥ स्तब्धपीनसटाकर्णं दारयंतं दितेः सुतम्॥ ३२॥

अर्थ- तसेंच अष्टभुजयुक्त नारसिंह करावे ते असे कीं, त्यांचें सिंहासनही भयंकर असून विदारित (विस्तीर्ण केलेले) मुख व नेत्र यानीं युक्त असावे. आणि स्तब्ध (ताठ) असून पुष्ट असे सटा (सिंहाच्या मानेवरील केशांसारखे केश) व कर्ण यानीं शोभत असून हिरण्यकशिपु नामक दितिपुत्रानें विदारण करात आहेत.

विनिर्गतांत्रजालंचदानवंपरिकल्पयेत्॥ वमंतंरुधिरं्रो
रंभ्रुकुटीवदनेक्षणम् ॥ ३३॥

अर्थ- आणि त्या हिरण्यकशिपूच्या अंतड्यांचा समुदाय बाहेर निघालेला-असून तो भ्रुकुटी, मुख, नेत्र यांपासून ऊर्ध्ववेगानें रक्त वमन करीत आहे अ-सा करावा.

युध्यमानश्चकर्तव्यः क्वचित्करणबंधनैः॥ परिश्रांतेन
दैत्येनतर्ज्यमानोमुहुर्मुहुः॥ ३४॥ दैत्यंप्रदर्शयेत्तत्ररव
ड्गखेटकधारिणम् ॥ स्तूयमानंतथाविष्णुंदर्शयेदमराधि
पैः॥ ३५॥

अर्थ- किंवा नारसिंहानें युद्ध करते समयीं त्याच्या इंद्रियांस बद्ध केलें; तेणें क रून तो दैत्य अत्यंत श्रमयुक्त झालेला असूनही तो वारंवार नृसिंहाची निर्भर्त्सना करीत आहे. आणि त्यानें हस्तांत खड्ग व खेटक (ढाल) हीं आयुधें धारण केलीं आहेत. व ब्रम्हादिक प्रमुख देव त्या नृसिंह रूप विष्णूची स्तुति करीत आसमंताद्भागीं उभे आहेत अशी नारसिंह मूर्ति करावी.

तथात्रिविक्रमंवक्ष्येब्रम्हांडक्रमणोल्बणम् ॥ पादपार्श्वे
तथाबाहुमुपरिष्टात्प्रकल्पयेत्॥ ३६॥

अर्थ- तसाच त्रिविक्रम मूर्तीचा आकार सांगतों तो असाकीं; ती त्रिविक्रममूर्ति संपूर्ण ब्रम्हांडास व्याप्त करण्या साठीं अति क्षुब्ध झालेली अशी महाभयंकर व मोठी असावी. आणि चरणाच्या एका बाजूस एक हस्त स्थापन केलेला असून एक हस्त ऊर्ध्वभागीं केला आहे. असा दर्शवावा.

अधस्ताद्वामनंतद्वत्कलयेत्सकमंडलुं॥ दक्षिणे छत्रि-
कांदद्यान्मुखंदीनंप्रकल्पयेत्॥ ३७॥

अर्थ- तशीच त्या त्रिविक्रम मूर्तीचे अधोभागीं वामन प्रतिमा करावी. तिच्यावामहस्तीं कमंडलु व दक्षिण हस्तांत छत्र हीं देऊन त्याचें मुख याचका सारखें दीन आकार युक्त करावें.

भृंगारधारिणंतद्वद्बलिंतस्यचपार्श्वतः॥ बंधनंचास्यकुर्व
तंगरुडंतस्यदर्शयेत्॥ ३८॥

अर्थ- आणि त्या वामनाचें बाजूस हस्तांत सुवर्ण पात्र ग्रहण केलेला बलि क-

णावा. व त्या बळीस गरुड,नागपाशानीं बद्ध करीत आहे असें दर्शवावें.

मत्स्यरूपंतथामात्स्यंकूर्मेकूर्माकृतिंन्यसेत् ॥ एवंरूप
स्तुभगवान्कार्योनारायणोहरिः॥ ३९॥

अर्थ- तशीच मत्स्य प्रतिमा मत्स्याकृति करावी. व कूर्ममूर्ति कूर्माकार करावी.- अशारूपानीं युक्त भगवान् भक्त दुःखनिवारक नारायण करावा.

ब्रम्हाकमंडलुधरः कर्तव्यः सचतुर्मुखः॥ हंसारूढः क्व
चित्कार्यः क्वचिच्चकमलासनः॥ ४०॥

अर्थ- तसेच ब्रम्हदेव हे चतुर्मुख व हस्तांत कमंडलु धारण केलेले असून हंसवाहनारूढ किंवा क्वचित्कमलासनस्थित आहेत असे करावे.

वर्णतः पद्मगर्भाभश्चतुर्बाहुः शुभेक्षणः॥ कमंडलुंवामक
रेस्रुवंहस्तेतुदक्षिणे॥ ४१॥ वामेदंडधरंतद्वत्स्रुचंचापि
प्रदर्शयेत्॥

अर्थ- त्याच प्रमाणें ती ब्रम्हदेवमूर्ति,वर्णानें कमलाच्या अंतर्भागासमान असून चार भुज व सुंदर नेत्र यानीं सुशोभित असावी. आणि त्यांचे दोन्ही वामहस्तांतील एकांत कमंडलु व एकांत दंड हे धारण केलेले असून दक्षिण हस्त द्वयांत क्रमानें स्रुवा व स्रुचि हीं यज्ञपात्रें ग्रहण केलेलीं असावीं.

मुनिभिर्देवगंधर्वैस्तूयमानंसमंततः॥ ४२॥ कुर्वाणमि-
वलोकांस्त्रीन्शुक्लांबरधरंविभुम्॥ मृगचर्मधरंचापिदि
व्ययज्ञोपवीतिनम्॥ ४३॥

अर्थ- तसेच अनेक मुनि,देव,गंधर्व हे ब्रम्हदेवांची स्तुति करीत आसमंताद्भागीं उभे असून ते प्रभु ब्रम्हदेव,शुभ्रवस्त्रें,कृष्णाजिन व दिव्य यज्ञोपवीत हीं धारण करून-त्रैलोक्य उत्पन्न करीतच आहेत काय असें करावे.

आज्यस्थालिंन्यसेत्पार्श्वेवेदांश्चचतुरःपुनः॥ वामपार्श्वे-
ऽस्यसावित्रींदक्षिणेचसरस्वतीं॥ ४४॥ अग्रेचऋषय
स्तद्वत्कार्याः पैतामहेपदे॥

अर्थ- तशीच आज्यस्थाली व चार वेद हे त्याच्या दक्षिण बाजूस स्थापन केलेले- असून वामभागीं सावित्री, दक्षिणभागीं सरस्वती व त्या ब्रम्हदेवांचे सिंहासनावर अग्रभागीं ऋषि स्तुति करीत उभे राहिले आहेत असे करावे.

कार्तिकेयंप्रवक्ष्यामितरुणादित्यसप्रभम् ॥ ४५॥ कम
लोदरवर्णाभंकुमारंसुकुमारकम् ॥ दंडकैश्चीरकैर्युक्तंम
यूरवरवाहनम् ॥ ४६॥ स्थापयेत्स्वेष्टनगरेभुजान्द्वादश-
कारयेत् ॥

अर्थ- आतां कार्तिक स्वामीच्या प्रतिमेची आकृति सांगतों ती अशी कीं, तो कृत्तिका नंदन, मध्यान्ह सूर्यसमान अतितेजस्वी असून कमल गर्भा सारख्या वर्णानें सुशोभित व अत्यंत कोमलाकृतियुक्त बालरूपी असावा. आणि अनेक पालाशदंड व वल्कलें परिधान केलेला असून श्रेष्ठ मयूर वाहनावर आरूढ असा राजानें स्वकीय मुख्य नगरांत स्थापून त्यास बाराभुज करावे.

चतुर्भुजः खर्वटेस्याद्वनेग्रामेद्विबाहुकः ॥ ४७॥ शक्तिः
पाशस्तथाखड्गः शरः शूलंतथैवच ॥ वरदश्चैकहस्तः
स्याद्थचाभयदोभवेत् ॥ ४८ ॥ एतेदक्षिणतोज्ञेयाः के
यूरकटकोज्वलाः ॥ धनुः पताकामुष्टिश्चतर्जनीतुप्र-
सारिता ॥ ४९॥ खेटकंताम्रचूडंचवामहस्तेतुशस्यते ॥
द्विभुजस्यकरेशक्तिर्वामेस्यात्कुक्कुटोपरि ॥ ५०॥

अर्थ- तसाच चतुर्भुज कार्तिकस्वामी, खर्वटांत (नदी किंवा पर्वत यांचे समीप असून अर्धे गांव, अर्धे नगर अशीं मिश्रस्थानें) आणि तो वन, ग्राम यांत द्विभुज असा स्थापन करावा. त्याच प्रमाणें राजधानींत स्थापन केलेल्या त्या कार्तिकस्वामीचे द्वादश भुजांची व्यवस्था अशी कीं, शक्ति, पाश, खड्ग, शर, शूल, हीं पांच आयुधें चार हस्तांत धारण केलेलीं असून एक वरद हस्त व एक अभय हस्त असे असावे. हे त्याचे दक्षिणांगा कडील सहा हात बाहुभूषणें व कडितोडे यानीं सुशोभित करावे. आणि धनुष्य व पताका, या पृथक् दोन हस्तांत असून दोन हस्त मुष्टिबद्ध असावे; परंतु त्यांची अंगुष्ठ सन्निहित अंगुली पसरलेली असावी; तशीच ढाल व ताम्रचूड (कोंबडा) हे ही वामभागचे हस्तांत असावे. हें प्रशस्त आहे. आणि द्विभुज कार्तिक स्वामीच्या दक्षिण हस्तांत शक्ति द्यावी ती वामकरांतील कुक्कुटाचे उर्ध्वभागीं येऊन पोचावी.

चतुर्भुजेशक्तिपाशौवामतोदक्षिणेत्वसिः ॥ वरदोभय-
दोवापि दक्षिणः स्याच्चतुर्थकः ॥ ५१॥

अर्थ- तसेंच चतुर्भुज कार्तिकस्वामीचे वामहस्तद्वयांत शक्ति व पाशहीं आयुधें असून एका दक्षिण करांत बाण व द्वितीय दक्षिण हस्त वरद किंवा अभय या लक्षणानें युक्त असावा. अशी कार्तिकस्वामीची मूर्ति करावी.

विनायकं प्रवक्ष्यामि गजवक्त्रं त्रिलोचनं ॥ लंबोदरं शूर्पकर्णं व्यालयज्ञोपवीतिनम् ॥ ५२ ॥ ध्वस्तकर्णं बृहत्तुंडमेकदंष्ट्रं पृथूदरम् ॥ स्वदंतं दक्षिणकरे उत्पलं चापरे तथा ५३
मोदकं परशुं चैव वामतः परिकल्पयेत् ॥

अर्थ- तसाच आतां विनायकमूर्तीचा आकार सांगतों तो असा कीं, गणपति, गजासारखें एकदंष्ट्रायुक्त मोठें मुख व त्रिनेत्र, लंबायमान विशाल (रुंद) व उंच उदर, शूर्पा (सूप) समान स्कंधावर पतन पावलेले कर्णयानीं युक्त असून स्वकीय एका दक्षिण करावर भक्तानीं अर्पण केलेला पदार्थ भक्षणच करीत आहे काय ? अशी आकृति दर्शवावी. व द्वितीय दक्षिण करांत कमल धारण केलें असावें. आणि त्याचे वाम हस्तद्वयांत क्रमानें एकांत मोदक व दुसऱ्यांत परशु हे द्यावे.

बृहत्वात्क्षिप्तवदनं पीनस्कंधांघ्रिपाणिकं ॥ ५४ ॥ युक्तं तु ऋद्धिबुद्धिभ्यामधस्तान्मूषकान्वितम् ॥

अर्थ- तसेंच त्याचें तें मुख, उदरादिक इतर सर्व अंगाच्या स्थूलत्वामुळें कांहीं लहान दिसत असून त्याचे स्कंध, चरण व हस्त हे पुष्ट असावे. आणि ऋद्धि व बुद्धि या क्रमानें दोहीं बाजूंस असून मूषक (उंदीर) हा त्याचे अधोभागीं वाहनस्थानीं असावा.

कात्यायन्याः प्रवक्ष्यामि रूपं दशभुजं तथा ॥ ५५ ॥ त्रयाणामपि देवानामनुकारानुकारिणीम् ॥ जटाजूटसमायुक्तामर्धेंदुकृतलक्षणाम् ॥ ५६ ॥ लोचनत्रयसंपन्नां पूर्णेंदुसदृशाननाम् ॥ अतसीपुष्पसंकाशां सुप्रतिष्ठां सुलोचनाम् ॥ ५७ ॥ नवयौवनसंपन्नां सर्वाभरणभूषिताम् ॥ सुचारुदशनां तद्वत्पीनोन्नतपयोधराम् ॥ ५८ ॥ त्रिभंगस्थानसंस्थानां महिषासुरमर्दिनीम् ॥ त्रिशूलं दक्षिणे दद्यात्खङ्गं चक्रं तथैव च ॥ ५९ ॥ तीक्ष्णं बा

णंतथाशक्तिंवामतोपिनिबोधत॥

अर्थ- त्याच प्रमाणें आतां कात्यायनीनें दशभुजरूप कसें आहे तें कथन करतों तें असेंकीं, ब्रम्हा, विष्णु व शिव या तिन्ही देवांच्या आकृतींतील कांहीं कांहीं-साम्य त्या कात्यायनी देवीच्या मूर्तीत असावें. त्याचा प्रकार असाकीं, मस्तकीं जटाजूट व अर्धचंद्राकृति चिन्ह यानीं उत्तम प्रकारें युक्त असून सुंदर त्रिनयन व कमलाकार पूर्णचंद्रुवत् आल्हादकारक मुखयानीं सुशोभित असावी. आणिती देवी अतसी (जवस) पुष्पासमानवर्णानें युक्त असून विद्यादिसकल सद्गुण कीर्तीनें अलौलिक अचल स्थितीनें रहाणारी आहे. तशीचती प्रतिमा, नूतन तारुण्याकृति व सर्व आभरणें यानीं भूषित असावी. आणि अति सुंदर दंतपंक्ति; तसेच पुष्ट असून उंच असे स्तन यानीं संपन्न असावी. व तिच्या उदराची त्रिवली-नें युक्त अशी उत्तम ठेवण असावी. महिषासुराचें मर्दन करीत आहे. तसाच त्रिशूल, खड्ग, चक्र, तीक्ष्णबाण व शक्ति हीं आयुधें त्या देवीच्या दक्षिणांगा कडील पांच हस्तांत प्रत्येकीं, एकेक अशीं द्यावीं. आतां वामभागच्चे पांच हस्तांतील आयुधें श्रवण करा.

खेटकंपूर्णचापंचपाशमंकुशमेवच॥ ६०॥ घंटांवापरशुं चापिवामतःसन्निवेशयेत्॥

अर्थ- तीं अशींकीं, खेटक (ढाल) दोरी लावून सिद्ध केलेलें धनुष्य, पाश, अंकुश व घंटा किंवा परशु हीं आयुधें वामांगा कडील पांच हस्तांत स्थापन करावीं.

अधस्तान्महिषंतद्वद्विशिरस्कंप्रदर्शयेत्॥ ६१॥ शिरच्छेदोद्भवंतद्वद्दानवंखड्गपाणिनं॥ रक्तरक्तीकृतांगंचरक्तविस्फारितेक्षणम्॥ ६२॥

अर्थ- तसाच शिरच्छेद केलेला महिषासुर, त्या देवीच्या अधोभागीं दर्शवावा. आणि मस्तकच्छेद केलेल्या त्या महिषासुराचे मानेंतून निघालेला तोच दानव-स्वहस्तांत खड्ग धारण करून वटारलेल्या आरक्त नेत्रानीं देवीकडे अवलोकन-करीत असून रक्तानें सर्वांगीं आरक्त वर्ण झाला आहे. असा करावा.

वेष्टितंनागपाशेनभ्रुकुटीभीषणाननम्॥ वमद्रुधिरवक्त्रंचदेव्याःसिंहंप्रदर्शयेत्॥ ६३॥

अर्थ- त्याचप्रमाणें तो महिषासुर, देवीनें नागपाशानीं बद्ध केलेला असून है-

तो आपल्या वक्र भ्रुकुटीनीं भयंकर मुखानें क्रूर दिसत आहे· आणि देवीचा सिं-
हही युद्धश्रमानें रक्तवमन करीत आहे असा दाखवावा·

देव्यास्तु दक्षिणं पादं समं सिंहोपरिस्थितं॥ किंचिदू-
र्ध्वं तथा वाममंगुष्ठं महिषोपरि॥ ६४॥ स्तूयमानं च तद्-
द्रूपममरैः सन्निवेशोत्॥

अर्थ- तसाच देवीचा दक्षिण चरण, सिंहाचे पृष्ठावर समांतर मध्यभागीं स्था
पन केलेला असून वामचरणाचा अंगुष्ठ, त्या असुराच्या मस्तकावर स्थापन
करून तो पाय, टांचेच्या बाजूनें किंचित् वर केलेला असावा· आणि सर्व देव-
त्या देवी रूपाची स्तुति करीत आहेत· अशी देवीच्या मूर्तीची रचना करावी·

इदानीं सुरराजस्य रूपं वक्ष्ये विशेषतः॥ ६५॥ सहस्र
नयनं देवं मत्तवारणसंस्थितम्॥ पृथूरुवक्षोवदनं सिंह
स्कंधं महाभुजम्॥ ६६॥ किरीटकुंडलधरं पीवरोरुभु
जेक्षणम्॥ वज्रोत्पलधरं तद्वन्नानाभरणभूषितम्॥ ६७
॥ पूजितं देवगंधर्वैरप्सरोगणसेवितम्॥ छत्रचामरधा
रिण्यः स्त्रियः पार्श्वे प्रदर्शयेत्॥ ६८॥ सिंहासनगतं-
चापि गंधर्वगणसंयुतम्॥ इंद्राणीं वामतश्चास्य कुर्या
दुत्पलधारिणीम्॥ ६९॥

अर्थ- आतां देवराज इंद्राचें स्वरूप विशेषतः कथन करतों· तें असें कीं, तो देव;
सहस्र नयनयुक्त असून उन्मत्त ऐरावत गजावर आरूढ झाला आहे· तसेंच वि
शाल असून उंच असें वक्षस्थल व मुख, सिंहासमान स्कंध व पुष्ट आजानुबा
हु, पुष्ट ऊरू (मांड्या) व नेत्र यानीं तो इंद्रमूर्ति शोभायमान असून मुगुट, कुंड
लें, इत्यादिक अनेक आभरणानीं भूषित करावी· तसेंच वज्र, कमल हीं त्या मू
र्तीनें धारण केलीं असून अनेक देव, गंधर्व व अप्सरांचे समुदाय यानीं केले-
ल्या पूजेनें निरंतर सेवित आहे· त्याचप्रमाणें छत्र व चामरें हीं धारण केलेल्या-
अनेक स्त्रिया इंद्रमूर्तीच्या दोन्ही बाजूंस दाखवाव्या· अथवा ती इंद्रमूर्ति;-
सिंहासनावर आरूढ असून गंधर्व गणानीं युक्त आहे अशी करावी; आणि-
दोन्ही प्रकारच्या इंद्रप्रतिमेचे वामांगीं हस्तांत कमल धारण केलेली इंद्राणी
चीमूर्तिकरावी·॥ ॥ इतिश्री मत्स्यपुराणे देवार्चानुकीर्तनं नाम षष्ट्युत्तर द्वि-

शततमोऽध्यायः ॥ २६०॥

अध्याय २६१ वा.

सूत उवाच ॥ प्रभाकरस्य प्रतिमामिदानीं शृणुत द्विजाः॥ रथस्थं कारयेद्देवं पद्महस्तं सुलोचनम् ॥१॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषीहो, याकालीं सूर्याची प्रतिमा करण्याचा प्रकार श्रवणकरा; तो असा कीं, सूर्य देव, सुंदर नयन व हस्तांत कमल धारण केलेला असून रथांत आरूढ झालेला असा करावा.

सप्ताश्वं चैकचक्रं च रथं तस्य प्रकल्पयेत् ॥ मुकुटेन विचित्रेण पद्मगर्भसमप्रभम् ॥ २॥ नानाभरणभूषाभ्यां भुजाभ्यां धृतपुष्करम् ॥

अर्थ- तो सूर्याचा रथ, सात अश्व व एक चक्र यानीं युक्त असा करावा. आणि तें सूर्यरूप विचित्र मुगुटानें युक्त असून कमलगर्भासमान कोमलकांतीनें सुशोभित असावें. तसेंच कमल द्वय त्या सूर्यप्रतिमेच्या अनेक हस्तभूषण भूषित भुजद्वयांत धारण केलेलें असावें.

स्कंधस्थे पुष्करे ते तु लीलयैव धृते सदा ॥ ३॥ चोलकच्छन्नवपुषं क्वचिच्चित्रेषु दर्शयेत् ॥

अर्थ- तीं दोन कमलें सूर्यानें लीलेंकरून स्कंधावर निरंतर हस्तानीं धारण केलेलीं असावीं. तसेंच तें सूर्यरूप चोलकानें आच्छादित देह युक्त, म्हणजे चोळणा घातलेलें असें चित्रांत क्वचित् स्थलीं दर्शवावें.

वस्त्रयुग्मसमोपेतं चरणौ तेजसावृतौ ॥ ४ ॥ प्रतिहारौ च कर्तव्यौ पार्श्वयोर्दंडिपिंगलौ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें तें सूर्यरूप दोन वस्त्रें धारण केलेलें असून त्याचे चरण अतितेजामुळें अदृश्य आहेत. आणि दोहीं बाजूंस दंड धारण केलेले पिंगट वर्ण द्वारपाल उभे आहेत असे करावे.

कर्तव्यौ खड्गहस्तौ तौ पार्श्वयोः पुरुषावुभौ ॥ ५॥ लेखनीकृतहस्तं च पार्श्वे धातारमव्ययम् ॥ नानादेवगणैर्युक्तमेवं कुर्याद्दिवाकरम् ॥ ६॥

अर्थ- आणि ते दोहीं भागीं उभे राहिलेले दोन्ही पुरुष, दुसरे हस्तांत खड्ग धारण के

लेले व हस्तांत लेखनी धारण करून एका बाजूस अविनाशी ब्रम्हदेव अनेक दे व गणांसह वर्तमान उभे आहेत. असा दिवाकर (सूर्य) प्रतिमेचा आकार करावा.

अरुणः सारथिश्चास्य पद्मिनीपत्रसन्निभः॥ अश्वौस्त्र वलयग्रीवावंतस्थौतस्य पार्श्वयोः॥७॥

अर्थ- आणि त्याचा अरुण नामक सारथी कमल पत्रासारखा आरक्त वर्ण असू न रथांत दोहींकडे कंठांत माळा घातलेले दोन अश्व असावे.

भुजंगरज्जुभिर्बद्धाः सप्ताश्वा रश्मिसंयुताः॥ पद्मस्थं वाहनस्थंवापद्महस्तंप्रकल्पयेत्॥८॥

अर्थ- तसेंच सर्परूप रज्जूंनी (दोऱ्या) बांधलेले असून रश्मि (लगामाच्या दो ऱ्या) युक्त असे सात अश्व त्या सूर्य रथास योजले आहेत. आणि तो सूर्य कमला वर किंवा उच्चैःश्रवा नामक सप्तमुख अश्वावर स्वहस्तांत पद्मधारण करून बस लेला आहे असा करावा.

वन्हेस्तु लक्षणंवक्ष्येसर्वकामफलप्रदम्॥ दीप्तंस्वर्ण वपुषमर्धचंद्रासनेस्थितम्॥९॥ बालार्कसदृशंतस्यव दनंचापिदर्शयेत्॥ यज्ञोपवीतिनंदेवंलंबकूर्चधरंतथा॥१०

अर्थ- आतां सर्व इच्छित फल दायक अग्निमूर्तीचें लक्षण सांगतों तें असें कीं; अग्निमूर्तीचा आकार सवर्णा समान पीत वर्ण व अति देदीप्यमान असून अर्धचं द्राकृति आसनावर स्थित असावा. आणि तो उदय कालच्या बालसूर्यासारख्या मुखानें सुशोभित असून त्यानें यज्ञोपवीत व लंबायमान अनेक दर्भ धारण के ले आहेत असें दर्शवावें.

कमंडलुंवामकरेदक्षिणेत्वक्षसूत्रकम्॥ ज्वालावितान संयुक्तमजवाहनमुज्वलम्॥११॥ कुंडस्थंवापिकुर्वीत मूर्धिसप्तशिखान्वितम्॥

अर्थ- आणि त्या अग्नीच्या वाम हस्तांत कमंडलु व दक्षिण हस्तांत अक्षांची (रु द्राक्ष किंवा कमलाक्ष) माला असावी. त्याच प्रमाणें तो अग्नि स्वकीय तेजानें जा ज्वल्यमान असल्यामुळें उर्ध्वभागीं विशाल ज्वालासमुदायानें युक्त असून अज (बोकड) वाहनावर किंवा यज्ञ कुंडांत स्थित व मस्तकावर सप्तशिखांनीं युक्त अ शी अग्निमूर्त्ति करावी.

तथायमंप्रवक्ष्यामिदंडपाशधरंविभ्रम्॥१२॥महामहि षमारूढंकृष्णांजनचयोपमम्॥सिंहासनगतंचापिदीप्ता ग्निसमलोचनम्॥१३॥महिषश्चित्रगुप्तश्चकरालाःकिं करास्तथा॥समंतादूर्शयेत्तस्यसौम्यासौम्यास्क्रूरास्क्रू- रान्॥१४॥

अर्थ- आतां यमाचा आकार सांगतों तो असाकीं. यमधर्म, स्वहस्तीं दंड व पाश- धारण करून मोठ्या महिष (रेडा) वाहनावर आरोहण केलेला असून अंजना- (काजळा) च्याराशी समान कृष्ण वर्णवप्रभु (समर्थ) असा करावा. किंवा तो देव सिं हासनारूढ झालेला असून प्रदीप्त अग्नी समान नेत्रानीं युक्त असावा; आणि महा- न्महिष, चित्रगुप्त, भयंकर दूत, सौम्यदेवव क्रूर दैत्य हेही त्याच्या आसमंतात् भा- गीं असावे.

राक्षसेंद्रंतथावक्ष्येलोकपालंचनैर्ऋतम्॥नरारूढंमहा कायंरक्षोभिर्बहुभिर्वृतम्॥१५॥खड्गहस्तंमहालीलं- कज्जलाचलसन्निभम्॥नरयुक्तविमानस्थंपीताभर णभूषितम्॥१६॥

अर्थ- तसाच आतां राक्षसश्रेष्ठनिर्ऋतिनामक नैर्ऋत्यदिशाधिपति लोकपालाच्या मूर्तीचा आकार सांगतों तो असाकीं, तोनिर्ऋतिदेव मनुष्यांवर बसलेला, अतिस्थू ल शरीरी व आसमंतात् बहुत राक्षसानींवेष्टित असून खड्गधारी, महाक्रीडा क रणारा व काजळाच्या पर्वतासारखा वर्णयुक्त असा करावा. अथवा तो मनुष्या नीं धारण केलेल्या विमानांत आरूढ झालेला असून पीतवर्ण भूषणानीं अलं कृत आहे असा करावा.

वरुणंचप्रवक्ष्यामिपाशहस्तंमहाबलम्॥ शंखस्फ- टिकवर्णाभंसितहारांबरावृतम्॥१७॥झषासनगतंशां तंकिरीटांगदधारिणं॥

अर्थ- आतां वरुण प्रतिमेची आकृति सांगतों ती अशीकीं, तिचा आकार, शं ख व स्फटिक यांसमान तेजःपुंज शुभ्रवर्णयुक्त व महा बलिष्ठ दर्शवावा. आ णि त्याच्या हस्तांत पाश असून कंठांत शुभ्ररत्नांचे व पुष्पांचे हार, मस्तकीं- मुगुट व बाहुभूषणें असावीं. व तो देव श्वेत वस्त्रें परिधान करून मत्स्याकृति-

आसनावर शांत रूपानें स्थित आहे असा करावा.

वायुरूपंप्रवक्ष्यामिधूम्रंतुमृगवाहनम् ॥ १८ ॥ चित्रां बरधरंशांतंयुवानंकुंचितभ्रुवम् ॥ मृगाधिरूढंवरदंप ताकाध्वजसंयुतम् ॥ १९ ॥

अर्थ- तसेंच वायूचें रूपसांगतों तें असें कीं, वायूची मूर्ति धूम्र वर्ण, असून मृगवाहनावर स्थापित करून ती अनेक रंगांचीं वस्त्रें परिधान केलेली शांत, तरुण आकृतियुक्त असावी. आणि भ्रुकुटी संकोचित (अरबुड), असाव्या आणि ती वायुप्रतिमा पताका, ध्वज यानीं युक्त व भक्तांस इच्छित वर देणारी अशी करावी.

कुबेरंचप्रवक्ष्यामिकुंडलाभ्यामलंकृतम् ॥ महोदरं महाकायंनिध्यष्टकसमन्वितम् ॥ २० ॥ गुह्यकैर्बहुभि- र्युक्तंधनव्ययकरैस्तथा ॥ हारकेयूररचितं सितांबर- धरंसदा ॥ २१ ॥ गदाधरंचकर्तव्यंवरदंमुकुटान्वितम् ॥ नरयुक्तविमानस्थंएवंरीत्याचकारयेत् ॥ २२ ॥

अर्थ- कुबेराचें रूप कसें असावें तें सांगतों तें असें कीं, त्याचें शरीर स्थूल व त्यापेक्षां उदर विशेष स्थूल असून तें मुगुट, कर्णकुंडलें, मौक्तिकादिहार, बाहुभूषणें व शुभ्र वस्त्रें यानीं सर्वदा अलंकृत असावें. आणि तो देव, अष्टनिधीनीं युक्त असून बहुत द्रव्याचा व्यय करणारे गुह्यकनामक दूत, त्याच्या आसमंताद्भागीं उभे असावे. आणि तो देव स्वहस्तांत गदाधारण करून मानवानीं धारण केलेल्या पुष्पक विमानांत आरूढ झालेला असून स्वकीय उपासना करणाऱ्या भक्तांस वर देणारा प्रसन्न मुख अशा रीतीनें कुबेर प्रतिमा करावी.

तथैवेशंप्रवक्ष्यामिधवलंधवलेक्षणं ॥ त्रिशूलपा- णिनंदेवंत्र्यक्षंवृषगतंप्रभुम् ॥ २३ ॥

अर्थ- तसेंच ईश्वराचें रूप सांगतो. तें असें कीं, महादेवाची अंग कांति शुभ्र व नेत्रांतील प्रांत भाग आरक्त नसून श्वेतवर्णच दर्शवावे. अशा दोन नेत्रांच्या मध्यें भाल देशीं झाकलेला तृतीय नेत्र असावा. व हस्तांत त्रिशूल धारण करून नंदी

---

* दीप. महापद्म १, पद्म २, शंख ३, मकर ४, कच्छप ५, मुकुंद ६, कुंद ७, नील ८, हें आठ निधि आहेत.

वर आरोहण केलेलें देदीप्य मान असें करावें.

मातॄणांलक्षणंवक्ष्येयथावदनुपूर्वशः॥ ब्रम्हाणीब्र
म्हसदृशीचतुर्वक्त्राचतुर्भुजा॥२४॥हंसाधिरूढाक
र्तव्यासाक्षसूत्रकमंडलुः॥

अर्थ- आतां मातृकांच्या मूर्तींचीं लक्षणें अनुक्रमानें जशीं आहेत तशीं सांगतों. त्यांतप्रथम ब्रम्हदेवांची स्त्री, ब्रम्हाणी ही त्यांसारखीच असावी ती अशी कीं, चतुर्मुखी व चतुर्भुज असून दक्षिण हस्तांत रुद्राक्ष अथवा कमलाक्ष यांची माला व वामहस्तांत कमंडलु धारण करून हंसावर आरोहण केलेली अशी करावी.

महेश्वरस्यरूपेणतथामाहेश्वरीमता॥२५॥जटामु
कुटसंयुक्तावृषस्थाचंद्रशेखरा॥ कपालशूलखट्वांग
वरदाढ्याचतुर्भुजा॥२६॥

अर्थ- तशीच माहेश्वरी नामें शिवशक्ति आहे तिचें रूप महेश्वराच्या रूपासारखेंच असावें. तें असें कीं, मस्तकीं जटेचा मुगुट असून त्यावर चंद्ररेषा असावी. आणि नृकपाल, त्रिशूल व खट्वांग हीं तीन आयुधें तीन हस्तांत असून भक्तांस वर देण्याविषयीं अधोभागीं केलेला वरदलक्षण युक्त एक हस्त अशा च्यार भुजानीं युक्त, नंदीवर आरोहण केलेलें असें करावें.

कुमाररूपाकौमारीमयूरवरवाहना॥ रक्तवस्त्रधरात
द्वच्छूलशक्तिधरामता॥२७॥हारकेयूरसंपन्नाकृ
कवाकुधरातथा॥

अर्थ- तसेंच कौमारी नामक देवीचें रूप कुमार जो (स्वामिकार्तिक) त्याच्या रूपासारखेंच असावें. तें असें कीं, रक्तवस्त्र परिधान केलेलें असून हार व केयूर (बांजुबंद वाकी इत्यादि) यानीं युक्त आणि उर्ध्व हस्तद्वयांत शूल, शक्ति व अधोभागीं एक हस्तांत ताम्रचूड (कोंबडा) पक्षी धारण करून द्वितीय हस्त वरदचिन्हयुक्त असावा. व मयूर वाहनावर आरोहण केलेलें असें करावें.

वैष्णवीविष्णुसदृशागरुडसमुपस्थिता॥२८॥चतु
र्बाहुश्चवरदाशंखचक्रगदाधरा॥ सिंहासनगतावा
पिबालकेनसमन्विता॥२९॥

अर्थ- तशीच वैष्णवी नामक विष्णुशक्ति ही विष्णुसारखीच गरुडारूढ अ-सून उर्ध्व, दक्षिण, वामहस्तांत शंख व चक्र हीं आयुधें धारण केलेली असावी.- आणि अधोभागचे वामहस्तांत गदा व दक्षिण हस्त वरद अशा चार भुजानीं युक्त असावी. अथवा बालकांस अंगावर घेऊन सिंहासनारूढ झाली आहे अशीती प्रतिमा करावी.

> वाराहींचप्रवक्ष्यामिमहिषोपरिसंस्थिताम् ॥ वराहसदृशी देवीशिरश्चामरधारिणी ॥ ३०॥ गदाचक्रधरात्तद्दानवेंद्र विनाशिनी ॥

अर्थ- वाराही नामक देवीचें रूपसांगतों तें असें कीं, तिची मूर्ति, वराहदेवाच्या-आकृति समान असून तिच्या उर्ध्वभागचे दोन्ही हस्तांत गदा व चक्र हीं आयुधें धारण केलेली असावी. आणि अधो भागचे दक्षिण हस्तांत चामर व वाम हस्तांत हिरण्याक्ष दैत्याचा संहार करण्या करितां त्याचें मोठें मस्तक धारण करून महिषावर आरोहण केलेली अशी करावी.

> इंद्राणीमिंद्रसदृशींवज्रशूलगदाधराम् ॥ ३१॥ गजास नगतांदेवींलोचनैर्बहुभिर्वृताम् ॥ तप्तकांचनवर्णाभां दिव्याभरणभूषिताम् ॥ ३२॥

अर्थ- तशीच इंद्राणी देवीची प्रतिमा इंद्रासारखी वज्र, शूल व गदाहीं तीन आयुधें तीन स्व हस्तांत धारण केलेली असून तिचा चतुर्थ कर वरद लक्षण युक्त असावा. तसेंच तिचें अंग बहुत नेत्रानीं व्याप्त असून तिची कांति तप्त स्वर्णासारखी असावी. आणिती देवी दिव्य अलंकारानीं युक्त असून ऐरावत गजावर आरोहण केलेली अशी करावी.

> तीक्ष्णखड्गधरंतद्वद्धक्ष्येयोगेश्वरीमिमाम् ॥ दीर्घजि-ह्वामूर्ध्वकेशीमस्थिखंडैश्चमंडिताम् ॥ ३३॥ दंष्ट्रा-करालवदनांकुर्याच्चैवकृशोदरीम् ॥

अर्थ- तसेंच योगीश्वरीचें रूप सांगतों तें असें कीं, ती देवी दुष्टसंहारार्थ अतितीक्ष्ण खड्ग व रुद्राक्षादिक मण्यांचीं शकलें धारण करणारी असून दीर्घ जिह्वा व तीक्ष्ण दंष्ट्रा यानीं भयंकर मुख, मस्तका वरील उर्ध्वकेश व कृश, उदर यानीं युक्त अशी करावी.

कपालमालिनीं देवीं मुंडमालाविभूषिताम् ॥ ३४॥- कपालं वामहस्ते तु मांसशोणितपूरितम् ॥ मस्तिष्का- क्तं च बिभ्राणां शक्तिकां दक्षिणे करे ॥ ३५॥

अर्थ- तशीच कपालमालिनी देवीची प्रतिमा करण्याची रीती ती अशी- कीं, तिच्या कंठांत नरकपालें व मस्तकें यांची माळ, दक्षिण हस्तांत शक्ती (ब र्ची) व वामहस्तांत रक्त, मांस व मस्तकांतील मेंदु यानीं भरलेलें नरकपाल हीं धारण केलेली अशी असावी.

गृध्रस्था वायसस्था वा निर्मांसा विनतोदरी ॥ करालवद- ना तद्वत्कर्तव्या सा त्रिलोचना ॥ ३६॥

अर्थ- आणि ती देवी गृध्र (गिधाड) पक्ष्यावर किंवा काकपक्ष्यावर आरू ढ असून अंगांत मांस नसल्यासारखी कृश असावी. व तिचें उदर नम्र (वा कलेलें) व तीन नेत्रानीं युक्त असें भयंकर मुख असावें. अशी तिची प्रति- मा करावी.

चामुंडा बद्धघंटा वा द्वीपिचर्मधरा शुभा ॥ दिग्वासाः- कालिका तद्वद्रासभस्था कपालिनी ॥ ३७॥ सुरक्तपुष्पा भरणा वर्धनीध्वजसंयुता ॥

अर्थ- तशीच चामुंडा, ही देवी व्याघ्रचर्म परिधान केलेली किंवा सभोंवत्या घं टा बांधलेली अशी सुशोभित असावी. आणि कालिका ही दिगंबर असून ग र्दभावर बसलेली, अत्यंत रक्तवर्ण पुष्पानीं अलंकृत, नरकपाल धारण केले- ली असून वर्धनीच्या (केरसुणी) ध्वजेंकरून युक्त अशी करावी.

विनायकं च कुर्वीत मातॄणामंतिके सदा ॥ ३८॥ वीरेश्वर- श्च भगवान्वृषारूढो जटाधरः ॥ वीणाहस्तस्त्रिशू- ली च मातॄणामग्रतो भवेत् ॥ ३९॥

अर्थ- ह्या सर्व मातृका, क्रमानें स्थापन करून त्यांच्या समीप भागीं एक विना यकाची प्रतिमा करून बसवावी. आणि दक्षिण हस्तांत वीणा व वामहस्तांत त्रि शूल धारण करून वृषभावर आरोहण केलेली जटाधारी अशी वीरेश्वर ना- मक महादेवाची मूर्ति त्यांच्या अग्रभागीं स्थापित करावी.

श्रियं देवीं प्रवक्ष्यामि नवे वयसि संस्थिताम् ॥ सुयौवनां

पीनगंडांरक्तोष्ठींकुंचितभ्रुवम् ॥ ४० ॥ पीनोन्नतस्त
नतटांमणिकुंडलधारिणीम् ॥ सुमंडलंमुखंतस्याः
शिरःसीमंतभूषणाम् ॥ ४१ ॥ पद्मस्वस्तिकशंखैर्वा-
भूषितांकुंडलालकैः ॥ कंचुकाबद्धगात्रौचहारभूषौ
पयोधरौ ॥ ४२ ॥ नागहस्तोपमौबाहूकेयूरकरको-
ज्वलौ ॥ पद्महस्तेप्रदातव्यंश्रीफलंदक्षिणेभुजे ॥ ४३ ॥

अर्थ- आतां लक्ष्मीदेवीची मूर्त्ति कशी असावी तीं लक्षणें सांगतों तीं अशीं-कीं, हीदेवी षोडश वर्षात्मक नूतन वयोवस्थेंतील उत्तम तारुण्याकृतीनें युक्त असून तिचें मुख, कुंकुमादि सौभाग्य संबंधि अलंकारानीं अलंकृत असावें; आणि तें, पुष्टगाल, आरक्त व वक्र भ्रुकुटी यानीं सुशोभित असावें तसाच मस्तकावर सुंदर भांग केश, पद्म, स्वस्तिक व शंख यांच्या आकृती सारखे रत्न खचित शिरोभूषणें व रत्नमणिजडित कुंडलें यानीं शोभायमान असावे. त्याचप्रमाणें तिच्या स्तनांचा प्रांतभाग पुष्ट असून शरणागत बालकांस तृप्त करण्या साठीं परिपूर्ण भरलेले, पुष्ट, उच्च, वर्तुल, व कंचुकीनें आच्छादित असून अनेक हारानीं शोभत असावे. व तिचे भुज गजाच्या शुंडा दंडा समान पुष्ट व सरळ असून ते बाजुबंद व अत्यंत तेजःपुंज कंकणें यानीं सुशोभित असावे. व तिच्या दक्षिण हस्तांत श्रीफल (नारळ), वाम-हस्तांत कमल द्यावें.

मेखलाभरणांतद्वत्तप्तकांचनसप्रभाम् ॥ नानाभरण
संपन्नांशोभनांबरधारिणीम् ॥ ४४ ॥ पार्श्वेतस्याःस्त्रि
यःकार्याश्चामरव्यग्रपाणयः ॥

अर्थ- तशीच त्या लक्ष्मीची कांती तप्त सुवर्णा सारखी असून कंबरपट्टा-आदिकरून अनेक प्रकारच्या सर्वभूषणानीं ती सर्वांगीं भूषित असावी-आणि ती देवी श्वेत वस्त्र परिधान केलेली असून तिच्या दोहीं बाजूंस चामरें (चवऱ्या) धारण करून अनेक स्त्रिया उभ्या राहिलेल्या कराव्या.

पद्मासनोपविष्टातुपद्मसिंहासनस्थिता ॥ ४५ ॥ क
रिभ्यांस्नाप्यमानासौभृंगाराभ्यामनेकशः ॥

अर्थ- आणिती लक्ष्मीदेवी पद्माकृति सिंहासनावर पद्मासन घालून

आरूढ झालेली असून तिच्या दोहीं कडे दोन गज उभे राहून ते स्वकीय शुंडाग्रानीं सुवर्णाचे उदकपूर्ण कलश धारण करून त्या उदकानें तिला स्नान घालीत आहेत. असें दर्शवावें.

प्रक्षालयंतौकरिणौभृंगाराभ्यांतथापरौ ॥ ४६॥ स्तूयमानाचलोकेशैस्तथागंधर्वगुह्यकैः॥

अर्थ- तसेंच अन्य दोन गज तिचें अंग प्रक्षालन करीत आहेत व सर्वलोकपाल, गंधर्व व गुह्यक हे तिचें स्तवन करीत आहेत अशा लक्षणें करून युक्त लक्ष्मीची प्रतिमा करावी.

तथैवयक्षिणीकार्यासिद्धासुरनिषेविता ॥ ४७॥ पार्श्वयोः कलशौतस्यास्तोरणेदेवदानवाः॥ नागाश्चैवतु कर्तव्याः खड्गखेटकधारिणः॥ ४८॥

अर्थ- तशीच यक्षिणीची मूर्तिकरण्याचीरीति सांगतों ती अशी कीं, ती यक्षिणी देवी, सिद्ध असुर यानीं सेवित असून तिच्या दोहीं बाजूंस दोन कलश स्थापन करावे. आणि त्या यक्षिणी मंदिराचे बहिर्द्वारावर अनेक देव, दानव व नाग हे स्वहस्तांत ढाल, तरवार ग्रहण करून उभे राहिले आहेत. अशीं चित्रें करावीं.

अधस्तात्प्रकृतिस्तेषांनाभेरूर्ध्वंतुपौरुषी ॥ फणाश्चमूर्ध्निकर्तव्याद्विजिव्हाबहवः समाः॥ ४९॥ पिशाचाराक्षसाश्चैवभूतवेतालजातयः॥ निर्मांसाश्चैवतेसर्वेरौद्राविकृतरूपिणः॥ ५०॥

अर्थ- आणि त्या नागांची आकृति नाभीच्या अधोभागीं स्वजातीय असून नाभीच्या उर्ध्वभागीं पुरुषाकृति प्रतिमा करून त्यांचे मस्तकावर दोन जिव्हा युक्त फणा केलेले सर्व एकसारखे समसंख्या युक्त असे बहुत नाग करावे. तसेंच मांसहीन अंगासारखे कृश असून महाभयंकर विचित्ररूप धारी असे अनेक पिशाच, राक्षस, भूतगण व वेताल अशा बहुत जातीच्या मूर्ति करून त्या यक्षिणीच्या आसमंताद्भागीं स्थापन कराव्या.

क्षेत्रपालश्चकर्तव्योजटिलोविकृताननः॥ दिग्वासाजटिलस्तद्वच्छ्वगोमायुनिषेवितः॥ कपालंवामहस्तेतुशि

र: केशै: समावृतम् ॥ दक्षिणेशक्तिकांदद्यादसुरक्षयका रिणीं ॥ ५२॥

अर्थ- आतां क्षेत्रपाल (कालभैरव) प्रतिमा अशी करावी कीं, त्याच्या मुखाची आकृति, क्रूर असून जटारहित व त्याचें मस्तक बहुत केशानीं आच्छादित असावें. अथवा ती प्रतिमा दिगंबर असून तिच्या वाम हस्तांत नरकपाल व दक्षिण हस्तांत दैत्यांचा संहार करणारी उग्र शक्ति हीं आयुधें. तसेंच अंगावर बहुत केशयुक्त श्वान व कोल्हे हे त्या क्षेत्रपालाच्या समीप भागीं असावे.

अथातः संप्रवक्ष्यामिद्विभुजंकुसुमायुधम् ॥ पार्श्वेचाश्वमुखंतस्यमकरध्वजसंयुतम् ॥ ५३॥

अर्थ- यानंतर मदनाची प्रतिमा सांगतों ती अशी कीं, त्या प्रतिमेला दोन भुज व पुष्प हेंच आयुध असावें. आणि एका बाजूस अश्वमुख किन्नर स्वहस्तीं मत्स्य चिन्हयुक्त ध्वज ग्रहण करून उभा असावा.

दक्षिणेपुष्पबाणंचवामेपुष्पमयंधनुः ॥ प्रीतिःस्याद्दक्षिणेतस्यभोजनोपस्करान्विता ॥ ५४॥

अर्थ- आणि त्या मदनाच्या दक्षिण हस्तांत पुष्प बाण व वाम हस्तांत धनुष्य ही पुष्पाचेंच असावें. तशीच दक्षिण भागीं प्रीतिनामक स्त्री नाना प्रकारचे पक्वान्नादिक भोजनाचे साधन पदार्थ घेऊन उभी असावी.

रतिश्चवामपार्श्वेतुशयनंसारसान्वितम् ॥ पटैश्चपटहश्चैवखर: कामातुरस्तथा ॥ ५५॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या कामदेवाचे वामभागीं दुसरी रतिनामक स्त्री असावी. आणि त्याची शय्या कमलपुष्पें व उत्तम वस्त्रें यानीं युक्त करून समीप भागीं पटह नामक वाद्य व जो अत्यंत विषय लंपट झालेला मनुष्य तो गर्दभासारखा हें सूचविण्या करितां कामातुर झालेल्याएका गर्दभानें चित्र त्या काम मूर्त्तिचे समीपभागीं करून ठेवावें.

पार्श्वतोजलवापीचवनंनंदनमेवच ॥ सुशोभनश्चकर्तव्योभगवान्कुसुमायुधः ॥ ५६॥

अर्थ- आणि ती मदनाची मूर्त्ति इंद्राच्या नंदन वनांत पुष्प शय्येवर आरोहण केलेली असून तिच्या एका बाजूस अमृत तुल्य उदकानें पूर्ण भरलेली एक विहीर अ

असावी. अशा लक्षणानीं युक्त जो पुष्पायुध भगवान् मदन त्याची उत्कृष्ट शोभाय मान प्रतिमा करावी.

संस्थानमीषद्धास्यं स्याद्विस्मयस्मितवक्त्रकम्॥ एतदुद्देशतः प्रोक्तं प्रतिमालक्षणं मया॥ विस्तरेण न शक्नोति बृहस्पतिरपि द्विजाः॥ ५७॥

अर्थ- अशी पूर्वोक्त प्रतिमांचीं मुखें स्थान विशेषें करून किंचित् हास्ययुक्त व विस्मययुक्त अथवा बहुहास्ययुक्त अशीं ज्याज्या प्रतिमेस जसं जशीं शोभतील तसतशीं करावीं. ऋषीहो याप्रकारें हीं पूर्वोक्त प्रतिमांचीं लक्षणें व आकृति ह्या मी आपणांस संक्षेपानें कथन केलीं; कारण यांचें विस्तृत वर्णन करण्याविषयीं बृहस्पतिही समर्थ नाहीं.॥ ॥ इतिश्री मत्स्यपुराणे देवतार्चानुकीर्तने प्रतिमा लक्षणं नामएक षष्ठ्युत्तर द्विशततमो ऽध्यायः॥ २६१॥ ॥

अध्याय २६२ वा.

सूतउवाच॥ पीठिकालक्षणं वक्ष्ये यथावदनुपूर्वशः पीठोच्छ्रायं यथावच्च भागान्षोडश कारयेत्॥ १॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषीहो, आतां मी देवांच्या सिंहासनाचें यथार्थ लक्षण अनुक्रमानें कथन करतों; तें असें कीं; त्या सिंहासनाची उंची शास्त्रोक्त मानानें सोळा भाग करावी.

भूमावेकः प्रविष्टः स्याच्चतुर्भिर्जगती मता॥ वृत्तो भागस्तथैकः स्याद्वृत्तः पटलभागतः॥ २॥

अर्थ- ती अशी कीं, त्या सोळा भागांतील एक भाग भूमींत प्रविष्ट असून भूमी वरील त्याचा अधोभाग चार अंशानीं युक्त असावा. तसाच त्या अंशावरील एकांश परिमित मध्यभाग वर्तुलाकार असून तो वरच्या एका विस्तीर्ण भागानें आच्छादित करावा.

भागैस्त्रिभिस्तथा कंठः कंठपट्टस्त्रिभागतः॥ भागाभ्यामूर्ध्वपट्टश्च शेषभागेन पट्टिका॥ ३॥

अर्थ- तसाच त्यावर तीन भागानीं त्या सिंहासनास कंठस्थान करून त्यावर तीन भागानीं कंठपट्ट (कंगवरील पट्टी) करावा. आणि त्यावरील पट्टी दोन भागानीं करून शेष राहिलेल्या एका भागानें वरची शेवटली पट्टी करावी.

प्रविष्टं भागमेकैकं जगतीयावदेवतु ॥ निर्गमस्तु पु-
नस्तस्ययावद्वेशेषपट्टिका ॥ ४ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें त्या सिंहासनांतील भूमिसंबंधि खालचे चार भाग,- त्याच्या मध्यापर्यंत एकावर एक न्यून करून आंत आणावे. आणि- त्या मध्यावरील शेवटच्या पट्टीपर्यंतचे सर्वभाग पुनः एकापेक्षां एक अ-धिक करून ते बाहेर आणावे.

वारिनिर्गमनार्थंतु तत्र कार्यः प्रणालकः ॥ पीठिका
नांतुसर्वासामेतत्सामान्यलक्षणम् ॥ ५ ॥

अर्थ- तसेंच त्यादेवतेस अभिषेक केल्याचें उदक त्या सिंहासनांवरू-न अधोभागीं जाण्यासाठीं त्यावर एक प्रणालक (पन्हाळासमानजल-मार्ग) करावा; हें सर्व सिंहासनांचें सामान्य लक्षण जाणावें.

विशेषान्देवताभेदाच्छृणुध्वंद्विजसत्तमाः ॥ स्थंडि-
लावाथवापी वायक्षीवेदीच मंडला ॥ ६ ॥ पूर्णचंद्रा-
चवज्राचपद्मावार्धशशिस्तथा ॥ त्रिकोणादशमी-
तासांसंस्थानंवानिबोधत ॥ ७ ॥

अर्थ- ब्राम्हणश्रेष्ठहो आतां देवता भेदें करून सिंहासनांचेही अनेक-भेद सांगतों ते श्रवण करा. ते असे कीं; स्थंडिला १, वापी २, यक्षी ३,- वेदी ४, मंडला ५, पूर्णचंद्रा ६, वज्रा ७, पद्मा ८, अर्धशशि ९ व त्रिको णा १० अशा दहा प्रकारच्या पीठिका (सिंहासनें) आहेत. त्यांचीं लक्षणें व आकार सांगतों तें श्रवण करा.

स्थंडिलाचतुरस्त्रातुवर्जितामेखलादिभिः ॥ वापी-
द्विमेखलाज्ञेयायक्षीचैवत्रिमेखला ॥ ८ ॥

अर्थ- तो प्रकार असा कीं. जी पीठिका चतुष्कोण असून मेखला (अग्नि होत्र कुंडासारख्या च्यारी बाजूनीं एकावर एक केलेल्या पायऱ्या) दिकानीं- रहित असेल ती स्थंडिला जाणावी. आणि जिला दोन मेखला असतील ती- वापीनामक पीठिका समजावी. व जीतीन मेखलानीं युक्त आहे तिला य-क्षी म्हणावें.

चतुरस्त्रायतावेदीनतांलिंगेषुयोजयेत् ॥ मं-

डला वर्तुलायातुमेखलाभिर्गणप्रिया ॥ ९ ॥

अर्थ- तशीच जी वेदी चतुष्कोण (चौकोनी) असून लंबायमान असते ती वेदी नामक पीठिका लिंगस्थापनेविषयीं योजूं नये. आणि जी पीठिका वर्तुलाकृति आहे ती, त्रिमेखलांनीं युक्त केली असतां, ती देवता समुदाय स्थापनास योग्य होते.

रक्ता हि मेखलामध्ये पूर्णचंद्रा तु सा भवेत् ॥ मेखलात्रयसंयुक्ता षडस्त्रा वज्रिका भवेत् ॥ १० ॥

अर्थ- त्याचप्रमाणें जी पीठिका दोन मेखलानीं युक्त असून मध्यभागीं आरक्त वर्ण असेल तिला पूर्णचंद्रा म्हणतात. आणि जी तीन मेखलानीं संयुक्त असून सहा कोणानीं युक्त असेल ती वज्रिका नामें प्रसिद्ध आहे.

षोडशास्त्रा भवेत्पद्मा किंचिध्रस्वा तु मूलतः ॥ तथैव धनुषाकारा सार्धचंद्रा प्रशस्यते ॥ ११ ॥

अर्थ- आणि जी पीठिका षोडश कोण युक्त असून मूलभागीं ती विस्तारानें वरील भागापेक्षां लघु असावी. तशीच जी धनुष्याकार पीठिका ती अर्धचंद्रा, देवतास्थापनेविषयीं अत्युत्तम जाणावी.

त्रिशूलसदृशी तद्वत्त्रिकोणा ह्यूर्ध्वतो मता ॥ प्रागुदक्प्रवणा तद्वत्प्रशस्ता लक्षणान्विता ॥ १२ ॥

अर्थ- तशीच जी पीठिका उर्ध्वभागीं त्रिशूलासमान त्रिकोणाकृति आहे तिला त्रिकोणा म्हणतात. ही, पूर्व व उत्तर या दिशांस उतरती असून त्रिकोण लक्षणानें युक्त असेल तर ती अत्युत्कृष्ट समजावी.

परिवेषं त्रिभागेन निर्गमं तत्र कारयेत् ॥ विस्तारं तत्प्रमाणं च मूले चाग्रे तथोर्ध्वतः ॥ १३ ॥ जलमार्गश्च कर्तव्यस्त्रिभागेन सुशोभनः ॥

अर्थ- तसेंच सिंहासनाच्या कडेवर तीन बाजूनी उंचवर कडें व शेष राहिलेल्या चतुर्थ प्रदेशीं अभिषेकादिकांचें जलादिक खालीं जाण्याचा पन्हाळ हीं करावीं. आणि त्या सिंहासनावरील अभिषेकादिकांचें उदक खाली जाण्यास पन्हाळासारखा उत्तम आकृतीचा जलमार्ग ही मूर्तीचे तिन्ही बाजूंस करून त्याचें मूळ, अग्र वरवोलीं यांचा विस्तार त्या कड्या एवढ्याच प्रमाणानें करावा.

लिंगस्यार्धविभागेनस्थौल्येनसमधिष्ठिता ॥ १३ ॥ मे
खलातत्त्रिभागेनखातंतत्रैवप्रमाणतः

अर्थ- तशीच सिंहासनाची मेखला ही मूर्तीच्या अर्धभागपरिमितस्थूलतेच्या (जाडी) प्रमाणानें करून त्यामेखलेचे त्रिभाग मानानें देवतें च्यानी स्थापन करण्याचे स्थानीं खोल जागा करावी.

अथवापादहीनंतुशोभनंकारयेत्सदा ॥ १४ ॥ उत्तरस्थं
प्रणालंचप्रमाणादधिकारयेत् ॥

अर्थ- अथवा तें देवतास्थापनस्थल, त्यातीन भागांत एकचतुर्थांश न्यून करून- शेष (राहिलेल्या) भागानीं करावें तसाच तीर्थ जाण्याचा पन्हाळ उत्तरेच्या बाजूस पाणी खालीं जाऊन पडण्यासारखा सांगितलेल्या प्रमाणानें मोठा करावा.

स्थंडिलायामथारोग्यंधनंधान्यंचपुष्कलम् ॥ १५ ॥
गोप्रदाचभवेद्यक्षी वेदीसंपत्प्रदाभवेत् ॥

अर्थ- आतां त्या पीठिकांचीं फलें सांगतात तीं अशीं कीं स्थंडिला नामक पीठिकेपासून यजमानास आरोग्य, धन व धान्य हीं बहुत प्राप्त होतात. आणि यक्षी नांवाचे पीठिकेपासून गोधनें प्राप्त होतात. व वेदीनें यजमानास संपत्ति प्राप्त होते.

मंडलायांभवेत्कीर्तिर्वरदापूर्णचंद्रिका ॥ १६ ॥ आयुः
प्रदाभवेद्वज्रापद्मासौभाग्यदाभवेत् ॥

अर्थ- तशीच मंडला नामें पीठिका यजमानास कीर्तिदायक होत असून पूर्णचंद्रिका, त्या स्थापित देवतेपासून वरप्रदान लाभास कारण होते. आणि वज्रानामें पीठिका आयुष्य वृद्धि कारक असून पद्मानामक पीठिका सौभाग्य दायक- होते.

पुत्रप्रदार्धचंद्रास्यात्त्रिकोणाशत्रुनाशिनी ॥ १७ ॥ दे
वस्ययजनार्थंतुपीठिकादशकीर्तिताः ॥

अर्थ- त्याच प्रमाणें अर्धचंद्रा नांवाची पीठिका पुत्रदायक असून त्रिकोणा पीठिका यजमानाच्या शत्रूंचा नाश करिते. अशीं हीं दहाप्रकारचीं सिंहासनें देवता स्थापन करून त्यांच्या पूजा सिध्यर्थ कथन केलीं आहेत.

शैलेशैलमयींदद्यात्पार्थिवेपार्थिवींतथा ॥ १८ ॥ दा
रुजेदारुजांकुर्यात्मिश्रेमिश्रांतथैवच ॥

अर्थ- तशीच शिलेच्या सिंहासनावर शिलामय मूर्ति स्थापन करावी. आणि मृन्मय पीठिकेवर मृन्मयमूर्ति, काष्ठाच्या सिंहासनावर काष्ठप्रतिमा व शिलादिकांच्या मिश्रपीठावर धातु आदिकरून मिश्रवस्तूंची मूर्ति अशा त्या देवता स्थापन कराव्या.

नान्ययोनिस्तु कर्तव्या सदा शुभफलेप्सुभिः ॥१९॥
अर्चायामासमं दैर्घ्यं लिंगायामसमं तथा ॥

अर्थ- तसेंच सर्वदा आपणास शुभ फलेच्छु पुरुषानीं सांगितलेल्या प्रमाणा वांचून इतर प्रमाण त्या सिंहासनादिकांस करूं नये. आणि मूर्तीच्या विस्तारापेक्षां देवतेच्या पीठाचा विस्तार अधिक किंवा त्या प्रतिमेच्या विस्तारा समान तरी असावा; परंतु याहून सिंहासनाचें न्यून प्रमाण न करावें.

यस्य देवस्य या पत्नी तां पीठे परिकल्पयेत् ॥ एतत्सर्वं समाख्यातं समासात्पीठलक्षणम् ॥ २० ॥

अर्थ- आणि ज्या देवाची जी पत्नी आहे; तिचें त्या पीठ (सिंहासन) स्थानीं आवाहन करावें किंवा तिला वामभागीं पीठावर ही स्थापन करावें. हें देवता पीठाचें सर्व लक्षण संक्षेपानें कथन केलें. इतिश्री मत्स्यपुराणे-पीठानुकीर्तनं नाम द्विषष्ठ्युत्तरद्विशततमोऽध्यायः ॥२६२॥

अध्याय २६३वा.

सूत उवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामि लिंगलक्षणमुत्तमम् ॥ सुस्निग्धं च सुवर्णं च लिंगं कुर्याद्विचक्षणः ॥ १ ॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषीहो, यानंतर मी तुम्हांस प्रतिमांचें उत्तम लक्षण यथार्थरीतीनें सांगतो. तें असें कीं, ज्ञात्यानें ती पूज्य प्रतिमा सुंदर वर्णयुक्त असून उत्तम स्निग्ध आकृतीनें सुशोभित अशी करावी.

प्रासादस्य प्रमाणेन लिंगमानं विधीयते ॥ लिंगमानेन वा विद्यात्प्रासादं शुभलक्षणम् ॥ २ ॥

अर्थ- आणि देवालयाच्या प्रमाणानें स्थापन करण्याच्या मूर्तीचें मान करावें. अथवा मूर्तीच्या मानावरून शुभकारक लक्षण युक्त देव मंदि

राची रचना करावी.

चतुरस्रेसमेगर्तेब्रम्हसूत्रंनिपातयेत् ॥ वामेनब्र-
म्हसूत्रस्यअर्चावालिंगमेवच ॥ ३॥

अर्थ- त्याचाप्रकार असा कीं, त्या पूर्वोक्त सिंहासनावरील मध्यभागीं च-तुष्कोण समांतर गर्तेंत (खोलजाग्यांत) ब्रम्हसूत्रनामक सूत्र मधोमध टाकावें आणि त्या ब्रम्हसूत्राच्या वामभागीं मूर्ति किंवा लिंगस्थापन करावें.

प्रागुत्तरेणलीनंतुदक्षिणापरयाश्रितम् ॥ पुरस्या
परदिग्भागेपूर्वद्वारंप्रकल्पयेत् ॥ ४ ॥

अर्थ- तें ब्रम्हसूत्र पूर्व व उत्तर यांच्या ईशान्य नामक मध्यकोणापासून दक्षिण व पश्चिम यांमधील नैर्ऋत्यनामक कोणदिशेपर्यंत टाकावें. नसेंच नगराच्या पश्चिमदिशेकडे देवालयाचें पूर्वद्वार करावें.

पूर्वेणचापरंद्वारंमाहेंद्रंदक्षिणोत्तरम् ॥ द्वारंविभज्य
पूर्वंतुएकविंशतिभागिकम् ॥ ततोमध्यगतंज्ञात्वा
ब्रम्हसूत्रंप्रकल्पयेत् ॥ तस्यार्धंतुत्रिधाकृत्वाभागं-
चोत्तरतस्त्यजेत् ॥ ६॥

अर्थ- आणि ग्रामाच्या पूर्वेस त्या देवमंदिराचें पश्चिमद्वार करावें. तशींच त्या देवालयाचीं दक्षिणोत्तरद्वारें पूर्वद्वारासारखींच करावीं. त्याचप्रमाणें देवमंदिराच्या पूर्वद्वाराचे एकवीस भाग करून त्यावरून मध्यभागाचें चिन्हजाणावें आणि त्या चिन्हावरून सिंहासनाचे मध्यचिन्हावर पूर्वपश्चिम ब्रम्हसूत्र टाकून त्याच्या अर्धाचे तीनभाग करून त्यांतील-उत्तरेचा एकभाग टाकावा.

एवंदक्षिणतस्त्यक्त्वाब्रम्हस्थानंप्रकल्पयेत् ॥ भा
गार्धेनतुयल्लिंगंकार्यंतदिहशस्यते ॥ ७॥

अर्थ- तसाच दक्षिणे कडील ही एकभाग टाकून मध्यभागावर ब्रम्हस्थान (देवतास्थान) कल्पावें आणि त्या ब्रम्हस्थान नामक मध्यभागाच्या अर्धभाग प्रमाण परिमित लिंग करावें. हें उत्तम आहे.

पंचभागविभक्तेवात्रिभागेज्येष्ठमुच्यते ॥ भा-

जितेनवधागर्भेमध्यमंपंचभागिकम् ॥ ८ ॥

अर्थ- किंवा त्या पूर्व पश्चिम मध्यसूत्राच्या अर्धाचे पांच विभाग करून त्यांतील दक्षिणे कडले दोन व उत्तरे कडचे दोन असे चार भाग टाकून मध्यभागाच्या अर्ध प्रमाणा एवढें लिंग करावें, परंतु पंचविभागां पेक्षां त्रिभाग रीतीनें लिंग करावें हें श्रेष्ठ आहे. तसेच त्या मध्य गर्भाचे नऊ भाग करून मध्य भागाच्या अर्ध प्रमाणानें लिंगस्थापन करणें कनिष्ठ असून पंच भाग करण्याचा पक्ष मध्यम आहे.

एकस्मिन्नेवनवधागर्भेलिंगानिकारयेत् ॥ समसूत्रं
विभज्याथनवधागर्भभाजितम् ॥ ९ ॥

अर्थ- ते नऊ विभाग असे करावे कीं, त्याचे पूर्व पश्चिम समसूत्राचे नऊ विभाग करून त्या गर्भातील मध्यस्थ एकाच नवम भागांत त्याच्या अर्ध प्रमाणाचे पूर्वोक्त मानानें लिंग स्थापना करावी.

ज्येष्ठमर्धंकनीयोर्धंतथामध्यममध्यमम् ॥ एवंगर्भः
समाख्यातस्त्रिभिर्भागैर्विभाजयेत् ॥ १० ॥

अर्थ- असे त्या मध्यसूत्राचे तीनविभाग करून त्यातील मध्यभागाचें अर्ध लिंगस्थापनास ग्रहण करणें हें उत्तम असून त्याचे नऊभाग करून त्या मध्यभागाचें अर्ध लिंगस्थापनेस घेणें हें कनिष्ठ आहे. व त्याचे पांच विभाग करून त्यांतील मध्यभागाच्या अर्धावर देवता स्थापन करणें हें मध्यम आहे. या प्रमाणें त्या सिंहासनाचे तीन प्रकारें विभाग करावे.

ज्येष्ठंतुत्रिविधंज्ञेयंमध्यमंत्रिविधंतथा ॥ कन्यसंत्रिवि
धंतद्धल्लिंगभेदानवैवतु ॥ ११ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ते श्रेष्ठ त्रिभाग, मध्यम पंचभाग व कनिष्ठ नऊभाग हे तिन्ही प्रकार प्रत्येकीं उत्तमादिभेदानीं तीन प्रकारचे आहेत. असेहे लिंग स्थापनाचे नऊभेद आहेत.

नाभ्यर्धमष्टभागेनविभज्याथसमंबुधैः ॥ भागत्रयं
परित्यज्यविष्कंभंचतुरस्त्रकम् ॥ १२ ॥

अर्थ- तसेंच ज्ञात्यानीं सिंहासनांतील मध्य अर्धाचे समान आठ विभाग करून त्यांतील दोहीकडचे मिळून तीन भाग टाकून मध्यभागीं जो

प्रदेश येईल तो चतुष्कोण करावा.

अष्टास्त्रं मध्यमं ज्ञेयं भागं लिंगस्य वै ध्रुवम् ॥ विकीर्णे
चेत्ततो गृह्य कोणाभ्यां लांछयेद्बुधः ॥ १३ ॥

अर्थ- तसाच त्या लिंगस्थानाच्या चतुष्कोण परिघाचे मध्यांतरीं अष्टकोण आकृतीचा एकभाग करावा. आणि कदाचित् त्या पूर्व पश्चिमसूत्रानें आलेला मध्य चुकला तर ईशान्य, नैर्ऋत्य व आग्नेय, वायव्य या कोणाहूनवर प्रत्येकीं, एकेक ब्रम्हसूत्र निरकस टाकून त्या दोन्ही सूत्रांचा संयोग जेथें होईल तेथें ज्ञात्यानें समांतर मध्य जाणून त्या स्थलीं ब्रम्हस्थानाचें चिन्ह करावें.

अष्टास्त्रं कारयेत्तद्वदूर्ध्वं मध्ये वमेवतु ॥ षोडशास्त्री-
कृतं पश्चाद्वर्तुलं कारयेत्ततः ॥ १४ ॥

अर्थ- आणि त्यावर तसेंच एक अष्ट कोण मडल करून त्याचे ऊर्ध्व भागीं षोडश कोणाकृति एकभाग करून पश्चात् त्यावर एक वर्तुलाकार भाग करावा.

आयामात्तस्य देवस्य नाभ्यां वै कुंडलीकृतम् ॥ माहेश्वरं त्रिभागं तु ऊर्ध्वं वृत्तं तव स्थितम् ॥ १५ ॥

अर्थ- तो असाकीं, त्या स्थापन करण्याच्या देवतेचे विस्तारापेक्षां त्रिगुणित अधिक असून खालच्या त्या षोडश कोण भागाचे मध्यांतरीं त्याचे ऊर्ध्वभागीं तो कुंडलाकार वर्तुल भाग असावा. त्यास माहेश्वर (महेश्वराचा) असें म्हणतात.

अधस्ताद्ब्रम्हभागस्तु चतुरस्त्रो विधीयते ॥ अष्टास्त्रो
वैष्णवो भागो मध्यस्तस्य उदाहृतः ॥ १६ ॥

अर्थ- तसाच त्या सिंहासनावरील सर्व खालचा जो चतुष्कोण भाग तो ब्रम्हदेवांचा असून त्यावरील अष्ट कोण भाग हा विष्णूचा असून त्या सर्व भागांत मध्यस्थ आहे.

एवं प्रमाणसंयुक्तं लिंगं वृत्तिप्रदं भवेत् ॥ तथान्यदपि
वक्ष्यामि गर्भमानप्रमाणतः ॥ १७ ॥

अर्थ- अशा प्रमाणानें युक्त जें लिंग तें यजमान व पूजक इत्यादिकांचे क

त्याण हत्थीस कारण होतें. तसेंच आतां देवालयाच्या गाभाऱ्याचें मान-लिंगाच्या प्रमाणावरून अन्यप्रकारानें ही कथन करतों.

गर्भमानप्रमाणेनयल्लिंगमुचितंभवेत् ॥ चतुर्भात-
हृतिभज्याथविष्कंभंतुप्रकल्पयेत् ॥ १८ ॥ देवतायत
नेसूत्रंभागत्रयविकल्पितम् ॥ अधस्ताच्चतुरस्रंतुअ
ष्टास्रंमध्यभागतः ॥ १९ ॥

अर्थ- तसेंच देव मंदिराचे गर्भाच्या (गाभारा) प्रमाणानें जें लिंग, पूजा योग्य होईल तें ही सांगतों. तें असें कीं, पूर्वी देवालयांतील जें सूत्र तीन भागानीं-युक्त केलें; त्याचे च्यार भाग करून त्यांतील लिंगस्थापने विषयींमध्यस्थ-ब्रम्हस्थानाचा विस्तार पूर्वोक्तरीतीनें कल्पावा तो असाकीं; त्या च्यार भागांतील दक्षिणोत्तर दोन भाग टाकून शेषराहिलेल्या मध्यस्थ भागहूयाच्या अर्धावर त्याचे प्रमाण परिमित लिंग स्थापन करावें. आणि त्याचे अधोभागांत सिंहासनावरील प्रथम चतुष्कोण मंडलावर अष्टकोण मंडल असावें हें त्या सर्व परियांचे मध्यभागीं असतें.

पूज्यभागस्ततोर्ध्वंतुनाभिभागस्तथोच्यते ॥ आया-
मेयद्भवेत्सूत्रंनाहस्यचतुरस्रके ॥ २० ॥

अर्थ- आणि त्याचें ऊर्ध्व भागीं केलेल्या षोडश कोण मंडल, पूजासंबंधि उपचार निवेदन करण्याचें स्थान असून त्यावर मध्यभागीं एक वर्तुल भाग करावा. तसेंच सिंहासनाच्या उंचीचें जें प्रमाण सूत्र असेल तेंच विस्तार मान-त्या वरील चतुष्कोण मंडलाचें असावें.

चतुरस्रार्धंपरित्यज्यअष्टास्रस्यतुयद्भवेत् ॥ तस्या
प्यर्धंपरित्यज्यततोवृत्तंतुकारयेत् ॥ २१ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या चतुष्कोण परिघाचें अर्धमान न्यून करून राहिलेल्या अर्धभाग प्रमाणानें त्यावरील अष्टकोण परिघ करावा. आणि त्या अष्टकोण मंडलाचे ही अर्ध कमी करून शेष अर्ध प्रमाणानें त्यावरील शेवटचें वर्तुल करावें.

शिरःप्रदक्षिणंतस्यसंक्षिप्तंमूलतोन्यसेत् ॥ ज्येष्ठ-
पूज्यंभवेल्लिंगमधस्ताद्द्विपुलंचयत् ॥ २२ ॥

अर्थ- तसेंच त्या प्रतिमेचें मस्तक वर्तुलाकार असून मूल भाग पेक्षां संक्षिप्त करावें. असें अधोभागीं विशाल लिंग जें असेल तें श्रेष्ठानीं पूजा करण्यास योग्य आहे.

शिरसाचसदानिम्नंमनोज्ञंलक्षणान्वितम् ॥ सौम्यं
तुदृश्यतेयत्रलिंगंतदृद्धिदंभवेत् ॥ २३॥

अर्थ- आणि जें लिंग, शिरोभागीं न्हूं कडून उतरतें, सुंदर, सुलक्षणयुक्त व सौम्य असें ज्या स्थानीं दृष्टीस पडेल तें तेथें ऐश्वर्यादि वृद्धिदायक होईल.

अथमूलेचमध्येतुप्रमाणेसर्वतःसमम् ॥ एवंविधं-
तुयल्लिंगंभवेत्तत्सार्वकामिकम् ॥ २४॥

अर्थ- तसेंच मूल, मध्य व अग्र या स्थानीं प्रमाणानें सर्वत्र समान असें जें लिंग असेल तें पूजकाचे सर्वमनोरथ पूर्ण करणारें होईल.

अन्यथायद्भवेल्लिंगंतदसत्संप्रचक्षते ॥ एवंरत्नमयं-
कुर्यात्स्फाटिकंपार्थिवंतथा ॥ २५॥ शुभंदारुमयं
चापियद्वामनसिरोचते ॥

अर्थ- आणि जें लिंग या उक्तलक्षणास विरुद्ध असेल तें अहितकारक जाणावें. यास्तव असें उक्त लक्षण युक्त लिंग करावें; तें रत्नाचें, स्फटिकाचें, पार्थिव (पाषाणादिकांचें) अथवा काष्ठाचें यांतून जें पूजकाच्या मनास रुचेल तें त्यास शुभ कारक होतें. इतिश्री मत्स्यपुराणे देवतार्च्चानुकीर्तनंनाम त्रिषष्ट्युत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २६३॥

अध्याय २६४ वा.

ऋषयऊचुः ॥ देवतानामथैतासांप्रतिष्ठाविधि-
मुत्तमम् ॥ वदसूतयथान्यायंसर्वेषामप्यशे-
षतः ॥ १॥

अर्थ- शौनकादिक ऋषिप्रश्न करतात हे सूता तुम्ही वर्णिलेल्या या देवतांचा उत्तम प्रतिष्ठा (स्थापन) विधि सर्वांनीं ही कसा करावा; हें सर्व यथार्थ रीतीनें आम्हांस कथन करा.

सूतउवाच ॥ अथातःसंप्रवक्ष्यामिप्रतिष्ठा-
विधिमुत्तमम् ॥ कुंडमंडपवेदीनांप्रमाणंच्चय-

थाक्रमं ॥२॥

अर्थ- सूत म्हणताल ऋषीहो आतां या पुढें देवांचा उत्तम स्थापन विधि, कुंड, मंडप व वेदी (ओटा) यांचें क्रमें करून प्रमाण हीं सांगतों.

चैत्रेवाफाल्गुनेवापिज्येष्ठेवामाधवेतथा ॥ माघेवास र्वदेवानांप्रतिष्ठाशुभदाभवेत् ॥ ३॥

अर्थ- तें असें कीं; चैत्र १, वैशाख २, ज्येष्ठ ३, माघ ४, व फाल्गुन ५ या मासांत सर्व देवता स्थापन केलें असतां तें शुभ दायक होईल.

प्राप्यपक्षंशुभंशुक्लमतीतेदक्षिणायने ॥ पंचमीच द्वितीयाचतृतीयासप्तमीतथा ॥ ४ ॥ दशमीपौर्णमासीचतथाश्रेष्ठात्रयोदशी ॥ आसुप्रतिष्ठाविधिवत् कृताबहुफलाभवेत् ॥ ५ ॥

अर्थ- दक्षिणायन कालाचें अतिक्रमण झाल्यानंतर पूर्वोक्त मासांचे शुक्लपक्षांतील द्वितीया, तृतीया, पंचमी, सप्तमी, दशमी, पूर्णिमा व त्रयोदशी- या तिथि श्रेष्ठ आहेत. यांतून कोणत्याही तिथीला देवाची विधि युक्त स्थापना केली असतां ती बहुत उत्तम फल देणारी होईल.

आषाढेद्वेतथामूलमुत्तराद्वयमेवच ॥ ज्येष्ठाश्रवण रोहिण्यःपूर्वाभाद्रपदातथा ॥ ६ ॥ हस्ताश्विनीरेव तीचपुष्योमृगशिरस्तथा ॥ अनुराधातथास्वातीप्र तिष्ठादिषुशस्यते ॥ ७ ॥

अर्थ- पूर्वोक्त तिथीला नक्षत्रें कोणतीं असावीं, तीं अशीं कीं, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, मूल, उत्तराभाद्रपदा, उत्तरा, ज्येष्ठा, श्रवण, रोहिणी, पूर्वाभाद्रपदा, हस्त, अश्विनी, रेवती, पुष्य, मृग, अनुराधा व स्वाती हीं नक्षत्रें देवता स्थापनास- उत्तम आहेत.

बुधोबृहस्पतिःशुक्रस्त्रयोप्येतेशुभग्रहाः ॥ एभि- र्निरीक्षितंलग्नंनक्षत्रंचप्रशस्यते ॥ ८ ॥

अर्थ- तसेंच बुध, बृहस्पति व शुक्र हे वार प्रशस्त. आणि या शुभ ग्रहांची दृष्टि ज्या लग्नावर ज्या नक्षत्रावर असेल. तें लग्न व नक्षत्र हीं देवस्थापनेस प्रशस्त आहेत.

ग्रहताराबलंलब्ध्वाग्रहपूजांविधायच ॥ निमित्तंश-
कुनंलब्ध्वावर्जयित्वाद्भुतादिकम् ॥९॥ शुभयोगे-
शुभस्थानेक्रूरग्रहविवर्जिते ॥ लग्नेऋक्षेप्रकुर्वीत-
प्रतिष्ठादिकमुत्तमम् ॥१०॥

अर्थ- त्याच प्रमाणें चंद्र, व सूर्यादिग्रह व तारा यांचें बल, शुभसूचक नि मित्त (लक्षण) व शकुन हीं अवलोकन करून पूर्वी सांगितलेलीं उत्पातादिक चिन्हें वर्जकरावीं आणि नवग्रह पूजा करून शुभयोग व क्रूरग्रह रहित लग्न व नक्षत्र यांवर शुभ कारक स्थानांत देवस्थापना किंवा धर्मशाला इत्यादि कार्यें करावीं.

अयनेविषुवेतद्वत्षडशीतिमुखेतथा ॥ एतेषुस्थाप
नंकार्यंविधिदृष्टेनकर्मणा ॥११॥

अर्थ- तसेंच दक्षिणायन, उत्तरायण, तूळसंक्रांति, मेषसंक्रमण व षडशीति मुख नामक संक्रांतींचे या पर्वकालांत पूर्वोक्त सुमुहूर्तीं शास्त्रोक्त विधियुक्त कर्मानें देवता स्थापन करावें.

प्राजापत्येतुशयनंश्वेतेतूत्थापनंतथा ॥ मुहूर्तेस्था
पनंकुर्यात्पुनर्ब्राम्हेविचक्षणः ॥१२॥

अर्थ- तसेंच त्या देवास प्राजापत्य नामक मुहूर्तावर शयन करवून पश्चात् श्वेत नांवाचे मुहूर्ता वर उठवावें. आणि पुनः उत्तर दिवशीं ब्राम्हमुहूर्तां वर ज्ञात्यानें त्या देवतेचा स्थापन विधि पूर्ण करावा.

प्रासादस्योत्तरेवापिपूर्वेवामंडपोभवेत् ॥ हस्तान्षो
डशकुर्वीतदशद्वादशवापुनः ॥१३॥ मध्येवेदिक-
यायुक्तःपरिक्षिप्तःसमंततः ॥ पंचसप्तापिचतु-
रःकरान्कुर्वीतवेदिकाम् ॥१४॥ चतुर्भिस्तोरणे-

---

* टीप मिथुन, कन्या, धनुः व मीन या चार संक्रांतींस षडशीति मुख हें नाम ज्योतिष शास्त्रांत प्रसिद्ध आहे.

टीप २ दिवसांतील दहावा मुहूर्त म्हणजे एकुणीस व वीस या दोन घटिकांस प्राजापत्य म्हणतात.

टीप ३ तसेंच रात्रींतील दशम मुहूर्तास श्वेत असें म्हणतात.

युक्तोमंडपःस्याच्चतुर्मुखः ॥

अर्थ- तसाच देवालयाच्या उत्तरेस किंवा पूर्वेस मंडप बांधावा; तो सोळा हात किंवा बारा हात अथवा दहा हात अशा प्रमाणानें करावा. आणि तो- आसमंतात् ऊर्ध्वभागीं आच्छादित असून त्याचे तीन भाग करून त्यांतील मध्यभागीं एक वेदिका (ओटा) करावी. ती सात, पांच किंवा चार अशा हातांचे प्रमाणानें युक्त असावी. त्याचप्रमाणें त्याचे चारी दिशांस चार द्वारें करून त्या प्रतिद्वारावर एकतोरण बांधावें. अशा चार तोरणानीं तो मंडपसुशोभित करावा.

प्लक्षद्वारंभवेत्पूर्वेयाम्येचौदुंबरंभवेत् ॥ १५ ॥ पश्चा
दश्वत्थपदितंनैय्यग्रोधंतथोत्तरे ॥ भूमौहस्तप्रवि-
ष्टानिचतुर्हस्तानिचोच्छ्रये ॥ १६॥

अर्थ- तशींच तीं द्वारें अशींकीं, त्या मंडपास पूर्वदिशेकडे प्लक्ष (पिंपरी) द्वार असून दक्षिण बाजूस औदुंबरद्वार असावें. तसेंच अश्वत्थ द्वार त्याच्या पश्चिम बाजूस असून वट वृक्ष काष्ठाचें द्वार उत्तर भागीं करावें. आणि तीं- द्वारें एकहस्तमात्र भूमींत प्रविष्ट असून वर चार हात उंच अशा प्रमाणाचीं असावीं.

सूपलिप्तंतथाश्लक्ष्णंभूतलंस्यात्सुशोभनम् ॥ वस्त्रै
र्नानाविधैस्तद्वत्पुष्पपल्लवशोभितम् ॥ १७॥ कृत्वैवं
मडपंपूर्वंचतुर्द्वारेषुविन्यसेत् ॥ अव्रणान्कलशानष्टौ
ज्वलत्कांचनगर्भितान् ॥ १८॥ चूतपल्लवसंछन्नान्
सितवस्त्रयुगान्वितान् ॥ सर्वौषधिफलोपेतांश्चंदनो
दकपूरितान् ॥ १९॥ एवंनिवेश्यतद्वर्भैगंधधूपार्चना
दिभिः ॥ ध्वजादिरोहणंकार्यंमंडपस्यसमंततः ॥२०॥

अर्थ- तशीच ती मंडप भूमि सुंदर असून वर उत्तम रीतीच्या सारविण्यानें- सुशोभित असून अनेकप्रकारचीं वस्त्रें तशींच पुष्पें व कोमल पल्लव यानीं तो मंडप शोभायमान करावा. अशा रीतीनें तो मंडप पूर्वी सिद्ध करून त्याचे- चारी द्वारांवर भिन्न छिद्र रहित आठ कलश स्थापन करावे. ते असे कीं, त्यांत तेजःपुंज सुवर्ण, सर्व ओषधि, अनेक फलें, चंदन व उदक घालून पूर्ण-

करावे. आणि त्या अग्निकलशास दोन शुभ्र वस्त्रानीं वेष्टन करून त्यांवर आम्र पल्लव उत्तम रीतीनें आच्छादनार्थ ठेवावे. तसेंच त्या मंडपाच्या आसमंतात् चहूंकडे गंध, धूप सहित पूजादिक विधीनें ध्वजादिक लावावे.

ध्वजांश्चलोकपालानांसर्वदिक्षुनिवेशयेत् ॥ पताका जलदाकारामध्येस्यान्मंडपस्यतु ॥ २१ ॥

अर्थ- ते असेकीं, इंद्रादिक लोकपालांचे ध्वज सर्व दिशांस लावावे. व मेघाकार एक पताका मंडपाच्या मध्यभागीं लावावी.

गंधधूपादिकंकुर्यात्स्वैस्वैर्मंत्रैरनुक्रमात् ॥ बलिंच लोकपालेभ्यः स्वमंत्रेणनिवेदयेत् ॥ २२ ॥

अर्थ- नंतर त्या ध्वजांस अनुक्रमानें त्यात्या देवतांच्या मंत्रानीं गंधधूपादिक उपचार समर्पण करून त्या सर्वलोकपालांस त्यांच्या स्वकीय मंत्रानें पृथक् पृथक् बलि निवेदन करावा.

ऊर्ध्वंतुब्रम्हणेदेयंत्वधस्ताच्छेषवासुकेः ॥ संहितायां तुयेमंत्रास्तद्दैवत्याः श्रुतौस्मृताः ॥ २३ ॥ तैः पूजा लोकपालानांकर्तव्याचसमंततः ॥

अर्थ- तो असाकीं, त्या मंडपांतील वेदीवरील स्थापित देवतांचे ऊर्ध्वभागीं ब्रम्हदेवांस व अधोभागीं शेषवासुकीस असा बलि अर्पण करावा. आणि वेदांतील संहितेंत त्या देवतांचे जे मंत्र आहेत. त्यानीं त्या लोकपालांची पूजा आसमंतात् भागीं अष्टदिशेस करावी.

त्रिरात्रमेकरात्रंवापंचरात्रमथापिवा ॥ २४ ॥ अथवा सप्तरात्रंतुकार्यंस्यादधिवासनम् ॥ एवंसतोरणंकुर्यात् लाअधिवासनमुत्तमम् ॥ २५ ॥

अर्थ- अशा रीतीनें तो मंडप, तोरणानीं सुशोभित करून नंतर तेथें सप्तरात्र, पंचरात्र, त्रिरात्र अथवा एकरात्र असें पूर्वी अधिवासन (देवतास्थापन) करावें.

तस्याप्युत्तरतः कुर्यात्स्नानमंडपमुत्तमम् ॥ तदर्धेन त्रिभागेनचतुर्भागेनवापुनः ॥ २६ ॥ आनीयलिंग-मर्चांवाशिल्पिनः पूजयेद्बुधः ॥ वस्त्राभरणरत्नैश्च

येपिनत्परिचारकाः ॥ २७ ॥

अर्थ- त्या मुख्य मंडपाच्या उत्तरेस देवाचा स्नानमंडप करावा; तो त्या मुख्य-मंडपाच्या अर्धभाग, तृतीयांश किंवा चतुर्थांश अशा प्रमाणानें करून तेथें लिंग अथवा मूर्ति, शिल्पकारां कडून आणवून ज्ञात्यानें वस्त्रें आभरणें व रत्नें यानीं ते शिल्पिजन व त्यांच्या हाता खालचे लोक यांची पूजा करावी.

क्षमध्वमितितान्ब्रूयाद्यजमानोप्यतः परम् ॥ देवंप्र-
स्तरणेकृत्वानेत्रज्योतिः प्रकल्पयेत् ॥ २८ ॥

अर्थ- आणि त्यानें त्या शिल्पिलोकांस प्रार्थावें कीं, आपण माझी क्षमा करावी. पश्चात् यजमानानें प्रतिमा अथवा लिंगरूप देवास दर्भासनावर ठेऊन त्यास नेत्रेंद्रियाचें चिन्ह करावें.

अक्ष्णोरुध्धरणंवक्ष्येलिंगस्यापिसमासतः ॥ सर्वतस्तुब
लिंदद्यात्सिध्धार्थघृतपायसैः ॥ २९ ॥ शुक्लपुष्पैरलंकृ
त्यघृतगुग्गुलधूपितम् ॥

अर्थ- तदर्थ आतां लिंगास नेत्रांचा उध्धरण प्रकार ही संक्षेपानें पुढें कथन करीन. परंतु पूर्वीं त्या मंडपाचे आसमंतात् भागीं सर्वत्र मोहऱ्या, घृत व पायस यांचा बलि त्या मंडप देवतांस द्यावा. तो शुभ्र पुष्पानीं सुशोभित करून-घृतसहित गुग्गुलाच्या (गुग्गूळ) धूपानें युक्त असावा.

विप्राणांचार्चनंकुर्याद्दद्याच्छक्त्याचदक्षिणाम् ॥ ३० ॥
गांमहींकनकंचैवस्थापकायनिवेदयेत् ॥

अर्थ- तसेंच यजमानानें देवतास्थापनेंतील ऋत्विज ब्राम्हणांचें पूजन करून त्यांस यथाशक्ति दक्षिणा द्यावी. आणि देवता स्थापना करणाऱ्या मुख्य-आचार्यास गोप्रदान, पृथ्वी व सुवर्ण हीं दानें निवेदन करावीं.

लक्षणंकारयेद्भक्त्या मंत्रेणानेनवैद्विजः ॥ ओंनमो-
भगवतेतुभ्यंशिवायपरमात्मने ॥ हिरण्यरेतसेविष्णो
विश्वरूपायतेनमः ॥ ३२ ॥

अर्थ- नंतर ओंनमोभगवतेतुभ्यं ० या मंत्रें करून मुख्य आचार्य ब्राम्हणानें भक्तिपुरःसर त्या मूर्तीस नेत्रचिन्ह करावें. या मंत्राचा अर्थ असा कीं, हे भगवन् सुवर्ण कारक वीर्य संपन्न परमात्म स्वरूप शिवा तुम्हास नम-

स्कार असो. आणि हे विश्वरूप विष्णो तुम्हास नमस्कार करतों.

मंत्रोयंसर्वदेवानांनेत्रज्योतिष्वपिस्मृतः ॥ एववामंत्र्य
देवेशंकांचनेनविलेखयेत् ॥ ३३ ॥

अर्थ- हा मंत्र सर्व देवांच्या नेत्रेंद्रिय कल्पने विषयीं ही विहित आहे; असें-
या मंत्रानें देवाचें अभिमंत्रण करून सुवर्ण शलाकेनें देवाच्या नेत्र गोल-
कांचें चिन्ह व त्यांतील इंद्रिय (नेत्रांतील बाहुली) हीं याच मंत्रानें करावीं.

मंगल्यानिचवाद्यानिब्रह्मघोषंसगीतकम् ॥ वृध्यर्थं
कारयेद्विद्वान्अमंगल्यविनाशनम् ॥ ३४ ॥ लक्षणो-
ध्धरणं वक्ष्येलिंगस्यस्तुसमाहितः ॥

अर्थ- ते समयीं मंगल कारक वाद्यें व गायन सहित वेदघोष ही ज्ञात्यानें त्या
स्थलीं कल्याण वृध्यर्थ करवावा. म्हणजे तेणें करून सर्व प्रति बंधक पापा-
दिक अमंगलांचा नाश होतो. नंतर लिंग, किंवा मूर्ति, यांची स्थापना करणा
ज्ञानें एकाग्र अंतःकरणें करून त्या देवास नेत्रचिन्ह करण्याचा प्रकार सांगतों;

त्रिधाविभज्यपूज्याथांलक्षणंस्याद्विभाजकम् ॥ ३५ ॥
लेखात्रयंतुकर्तव्यंयवाष्टांतरसंयुतम् ॥ नस्थूलंनकृ
शंनहृन्नवक्रंछेदवर्जितम् ॥ ३६ ॥ निम्नंयवप्रमाणेन
ज्येष्ठलिंगस्यकारयेत् ॥ सूक्ष्मास्ततस्तुकर्तव्यायथा
मध्यमकेन्यसेत् ॥ ३७ ॥

अर्थ- तो असा कीं, त्या पूज्य प्रतिमेवर नेत्र गोलकाचें चिन्ह करणें हेंच त्या प्र-
तिमेचें ज्येष्ठत्व, मध्यमत्व व कनिष्ठत्व यांचा विभाग दर्शविणारें आहे तें असें
कीं, त्या प्रतिमेच्या नेत्रस्थानीं आडव्या तीन रेषा एकेक अंगुल रुंदीच्या करा-
व्या त्यांतील प्रतिरेषेस अष्टयव अंतर असावें; त्या रेषा बहुत मोठ्या, अति
बारीक, तशाच वक्र व मध्यें तुटक्या अशा नसून त्या एक यव प्रमाण निम्न (खो
ल) अशा, ज्येष्ठलिंगास कराव्या. आणि मध्यम लिंगास त्या पूर्वोक्त रेषां पेक्षां
अशा सूक्ष्म रेषा, कराव्या कीं, कनिष्ठ लिंगाच्या याच रेषा त्या मध्यम लिंगाच्या रेषा
हून सूक्ष्म होतील अशा कराव्या त्यांतील वरील पापणीस्थानची रेषा, बुबूळाचे
दोन्ही बाजूंस खालीं उतरती असून खालच्या पापणी स्थानची रेषा बुबुळाचें
दोहो बाजूंस वर चढती असावी. व बुबुळाच्या भागावरील मध्य रेषा सरळ क

रावी.


अष्टभक्तं ततः कृत्वात्यक्त्वा भागत्रयं बुधः ॥ लंबयेत्सप्त रेखास्तु पार्श्वयोरुभयोः समाः ॥ ३८ ॥ तावत्प्रलंबयेद्विद्वान्यावद्भागचतुष्टयम् ॥

अर्थ- नंतर त्यात्यानें नेत्राच्या चोवीस यव लांबी चे आठ विभाग करून-त्यांतील एक भाग नासिका मांतीं व दोन भाग कर्णा मांतीं असे तीन भाग सोडावे. आणि अवशेष राहिलेल्या पांच भागांवर आडव्या लांब सात रेषा कराव्या. त्या मध्यभागच्या कनीनिकेचे (बुबुळ) वाम व दक्षिण या उभय पार्श्वी (दोन्ही बाजू) कडील मिळून चार भागाच्या समाप्ती पर्यंत लांब असाव्या त्यांत बुबुळाचे ऊर्ध्वभागीं दोन्ही बाजूंस उतरत्या तीन रेषा करून तशाच त्या बुबुळाच्या अधोभागीं दोहो बाजूंस चढत्या तीन रेषा, व बुबुळावरून मध्यभागावर एक सरळ रेषा, दोहीं बाजूस मिळून पांची भागांवर अशा त्या सातही रेषा समांतर कराव्या.

भ्राम्यते पंचभागोर्ध्वे कारयेत्संगमं ततः ॥ ३९ ॥ रेखयोः संगमे तद्वत्पृष्ठे भागद्वयं भवेत् ॥ एवमेतत्समाख्यातं समासाल्लक्षणं मया ॥ ४० ॥

अर्थ- पश्चात् त्या पांच भागांतील मध्य भागच्या मध्य यवावर एक कर्कटक-(कयवार) शकल ठेऊन दुसरें शकल, त्या पांच भागांच्या दोही बाजूं कडील शेवटच्या सातव्या यवांवर फिरवून त्या सात रेषांशीं संगम करून वर्तुळाकृति करावी. अशारीतीनें तें वर्तुळ व त्या सप्त रेषेंतील प्रत्येक रेषा यांच्या मध्यभागीं संगम होऊन त्या वर्तुळाच्या पृष्ठाकडे म्हणजे कर्णा कडील बाजूस नेत्राचे दोन भाग रहातात. असें हें नेत्र चिन्हाचें लक्षण मी तुला संक्षेपांत उत्तम रीतीनें कथन केलें.

नेत्र.



इतिश्री मत्स्यपुराणे प्रतिष्ठानुकीर्तने मंडप वर्णनं नाम चतुःषष्ठ्युत्तर द्विशततमोऽध्यायः २६४

अध्याय २६५ वा.

सूत उवाच ॥ अतः परं प्रवक्ष्यामि मूर्तिपानां तु लक्ष
णम् ॥ स्थापकस्य समासेन लक्षणं शृणुत द्विजाः ॥१॥

अर्थ- सूत सांगताात. ब्राम्हण हो, यानंतर मूर्तिस्थापन करणारा व स्वकीय तपोबलादि सामर्थ्यानें मूर्तीचे ठिकाणीं देवता सान्निध्य निरंतर होण्यासा ररवें देवतास्थापना करणारा यांचीं लक्षणें संक्षेपानें सांगतों श्रवण करा.

सर्वावयवसंपूर्णो वेदमंत्रविशारदः ॥ पुराणवेत्ता त-
त्वज्ञो दंभलोभविवर्जितः ॥२॥ कृष्णसारमये देशे-
उत्पन्नश्च शुभाकृतिः ॥ शौचाचारपरो नित्यं पाखंड
कुलनिस्पृहः ॥३॥ समः शत्रौ च मित्रे च ब्रम्होपेंद्र ह-
रप्रियः ॥ ऊहापोहार्थतत्वज्ञो वास्तुशास्त्रस्य पारगः
॥४॥ आचार्यस्तु भवेन्नित्यं सर्वदोषविवर्जितः ॥

अर्थ- तीं अशीं कीं. कृष्णसारमृग (काळ्यापाठीची हरण जाती) संचार युक्त देशांत उत्पन्न झालेला असून आकृतीनें सुंदर हस्तपादादिक सर्वसांग अवयवानीं पूर्ण, वेद व मंत्र यांविषयीं प्रवीण, पुराणज्ञाता, तत्वज्ञानी, दंभ, लोभ रहित, अंतःशौच (मनांत भगवत्स्मरण व ध्यानादि करणें) बाह्यशौच (मृत्तिकादिकानीं शरीरशुद्धि व स्नानादि करणें) यांविषयीं निरंतर तत्पर, वेदबाह्य कर्म करणाऱ्या कुळाविषयीं निस्पृह, शत्रु व मित्र यांविषयीं समबुध्धी, ब्रम्हा,-विष्णु व शिव यांवर प्रीति करणारा किंवा त्यांस भक्तीनें प्रिय, ऊहापोह (तर्क-व शंका निराकरणें) यानीं यथार्थ तत्व जाणणारा असून वास्तुशास्त्रांत पारंगत असा जो दोषरहित ब्राम्हण असेल तो सर्वदा या मूर्तिस्थापनेस व त्या-स्थापित मूर्तींत देवता सान्निध्यार्थ पूजेविषयीं असावा.

मूर्तिपास्तु द्विजाश्चैव कुलीना ऋजवस्तथा ॥५॥ द्वा
त्रिंशत् षोडशाथापि अष्टौ वा श्रुतिपारगाः ॥ ज्येष्ठम-
ध्यकनिष्ठेषु मूर्तिपाः प्रकीर्तिताः ॥६॥

अर्थ- तसेच मूर्तींतील देवता सान्निध्याचें संरक्षण करणारे ब्राम्हण पूर्वीक्त लक्षणानीं युक्त, कुलीन व सरळ स्वभावानें वर्तणारे असून प्रत्येक मूर्तीस बत्तीस असावे हा उत्तम पक्ष असून षोडश ब्राम्हण असणें हा मध्यम पक्ष आ

णि अष्टब्राम्हण असावे हा कनिष्ठ पक्ष आहे तसेच हे सर्व ब्राम्हण वेद पारंगत असावे असे तुम्हांस कथन केले.

ततोलिंगमथार्चांवानीत्वास्नपनमंडपम् ॥ गीतमंग-
लशब्देनस्नपनंतत्रकारयेत् ॥ ७ ॥

अर्थ- नंतर ज्या मूर्तीचें स्थापन कर्तव्य असेल ती प्रतिमा, अथवा सुव- र्णादिक धातूंचें किंवा पाषाणादिकांचें शिवलिंग यास स्नानार्थ केलेल्या मंडपांत नेऊन तेथें गीत व मंगलकारक शब्द होत असतां स्नान घालावें.

पंचगव्यकषायेनमृद्भिर्भस्मोदकेनवा ॥ शौचंतत्रप्र
कुर्वीतवेदमंत्रचतुष्टयात् ॥ ८ ॥

अर्थ- तें असें कीं. पंचगव्याचा कषाय (उटणें), मृत्तिका, भस्म व उदक या चार द्रव्यानीं चार वेदमंत्र म्हणून प्रतिमेची शुद्धि करावी.

समुद्रज्येष्ठमंत्रेणआपोदिव्येतिचापरः ॥ यासांराजे
तिमंत्रस्तुआपोहिष्ठेतिचापरः ॥ ९ ॥

अर्थ- त्या ऋचा अशा कीं, समुद्रज्येष्ठा० या मंत्रानें पंचगव्याचे उटणें लावून- प्रतिमेचे उद्वर्तन करून आपोदिव्या० या मंत्रानें मृत्तिकास्नान घालावें आणि यासां राजा० यामंत्रानें भस्मस्नान व आपोहिष्ठा० यामंत्रानें शुध्धोदकस्नान घालावें.

एवंस्नाप्यततोदेवंपूज्यगंधानुलेपनैः ॥ प्रच्छाद्यवस्त्र
युग्मेनअभिवस्त्रेत्युदाहृतम् ॥ १० ॥

अर्थ- अशा रीतीनें स्नान घालून पश्चात् अभिवस्त्र यामंत्राचा उच्चार करून प्रतिमेला दोन वस्त्रानीं आच्छादन करून त्या देवास गंधानुलेपनादिक उपचारानीं- पूजित करावें.

उत्थापयेत्ततोदेवमुत्तिष्ठब्रम्हणस्पते ॥ अमूरजेतिचतथा
रथेतिष्ठेतिचापरः ॥ ११ ॥ रथेब्रम्हरथेवापिधृतांशि-
ल्पिगणेनतु ॥ आरोप्यचततोविद्वानाकृष्येनप्रवेशये
त् ॥ १२ ॥

अर्थ- नंतर उत्तिष्ठब्रम्हणस्पते० या मंत्रानें देवास उठवावें आणि अमूरज० तसाच दुसरा रथेतिष्ठ० या मंत्रानीं देवाकरितांच केलेल्या रथांत अथवा साम्रा

न्य रथांत त्या मूर्तीस स्थापन करून तिला धरून शिल्पिगणानीं समागमें असा वें. अशीती मूर्ति समारंभानें आणून नंतर विद्वानानें आकृष्णेन ० या मंत्रानें तिला पूर्वी निर्माण केले त्या देवालयांत प्रवेश करवावा.

ततःप्रास्तीर्यशय्यायांस्थापयेच्छनकैर्बुधः॥कुशा नास्तीर्यपुष्पाणिस्थापयेत्प्राङ्मुखंततः॥१३॥

अर्थ- पश्चात् त्या ज्ञात्यानें त्या मंदिरांत दर्भांचें आस्तरण पूर्वक पुष्पशय्या करून तिजवर त्या मूर्तीस युक्तीनें स्थापन करावें; आणि तिला त्या शय्येवर पूर्वाभिमुख शयन करवून तिचें मस्तक दक्षिणे कडे करावें.

ततस्तुनिद्राकलशंवस्त्रकांचनसंयुतम्॥शिरोभागे- तुदेवस्यजपन्नेवंनिधापयेत्॥१४॥आपोदेवीतिमं त्रेण आपोस्मान्मातरोपिच॥

अर्थ- नंतर त्या देवाच्या शिरोभागीं दक्षिणे कडे आपोदेवी ० व आपोस्मान् मातरः ० या दोन मंत्राचा जप करून निद्राकाळीं स्थापन करण्याचा उदकपूर्ण-कलश वस्त्रानें आच्छादित करून त्यांत सुवर्ण घालून स्थापन करावा.

ततोदुकूलपट्टैश्चच्छाद्यनेत्रोपधानकम्॥दद्याच्छिर सिदेवस्यकौशेयंवाविचक्षणः॥

अर्थ- पश्चात् त्या ज्ञानसंपन्न अर्चकानें त्या देवाचे नेत्र, उत्तम रेशमी वस्त्राच्या दोन घड्यानीं आच्छादन करून त्याच्या मस्तकाखालीं रेशमी उपधान (उशी) द्यावी.

मधुनासर्पिषाभ्यज्यपूज्यसिध्दार्थकैस्ततः॥१६॥आ प्यायस्वेतिमंत्रेण यातेरुद्रशिवेतिच॥उपविश्यार्च- येद्देवंगंधपुष्पैःसमंततः॥१७॥

अर्थ- नंतर मध व गोघृत यानीं त्या देवाचे नेत्रांच्याप्रांतभागांस अभ्यंजन (लेपन) करून शुभ्रमोहऱ्यानीं पूजा करावी. आणि आप्यायस्व ० व यातेरुद्रशिवा ० या दोन मंत्रानीं पुनः देवास बसवून आसमंतात् गंधपुष्पानीं पूजन करावें.

सितंप्रतिसरंदद्याद्बार्हस्पत्येतिमंत्रतः॥दुकूलप- ट्टैःकार्पासैर्नानाचित्रैरथापिवा॥१८॥आच्छाद्यदे- वसर्वत्रच्छत्रचामरदर्पणम्॥पार्श्वतस्थापयेत्तत्र-

वितानंपुष्पसंयुतम् ॥१९॥

अर्थ - पश्चात् बार्हस्पत्य० या मंत्रानें शुभ्र पुष्पांचा हार देवास घालून उत्तम रेशमी वस्त्रें व चित्र विचित्र रंगित कार्पास वस्त्रें यांचे सर्वबाजूनीं पडदे लावून त्या देवास आच्छादित करून गुप्तरीतीनें ठेवावें आणि देवाच्या वाम किंवा दक्षिण या बाजूंस छत्र, चामरें (चंवऱ्या) व दर्पण हीं स्थापन करून ऊर्ध्वभागीं पुष्पयुक्त चांदवा बांधावा.

रत्नान्योषधयस्तत्रगृहोपकरणानिच ॥ भाजनानि विचित्राणिशयनान्यासनानिच ॥ २० ॥ अभित्वाशूरमंत्रेणयथाविभवतोन्यसेत् ॥

अर्थ - तशींच नाना प्रकारचीं रत्नें, औषधि (फलांच्या पक्कदशेनंतर लयास जाणाऱ्या), गृहसंबंधि उपकरणें, चित्रविचित्र अनेक पात्रें तशींच शयनें व आसनें इत्यादिक देवोपयोगी सकल पदार्थ यजमानानें स्वकीय वैभवानुसार) अभित्वाशूर० या मंत्रानें देवाच्या मंदिरांत स्थापन करावे.

क्षीरंक्षौद्रंघृतंतद्वत्भक्ष्यभोज्यान्नपायसैः ॥ २१ ॥- षड्विधैश्चरसैस्तद्वत्समंतात्परिपूजयेत

अर्थ - आणि दुग्ध, मधु, घृत, तसेंच भक्ष्य (पक्कान्नादिक पदार्थ), भोज्यान्न (भोजनयोग्य ओदनादि पदार्थ), पायस (खीर, बासुंदि इत्यादि); मधुर, कटु (तिखट), कषाय (तुरट) आम्ल, क्षार व तिक्त (कडु) असे षड्रसयुक्त असे अनेक उपचार देवाचे आसमंताद्भागीं स्थापन करून त्या देवाची पूजा करावी.

बलिंदद्यात्प्रयत्नेनमंत्रेणानेनभूरिशः ॥ २२ ॥ त्र्यंबकंयजामहेइतिसर्वतःशनकैर्भुवि ॥

अर्थ - त्याच प्रमाणें त्र्यंबकंयजामहे० या मंत्रानें देवाच्या अष्टदिशेस आसमंतात् भागीं भूमीवर क्रमपूर्वक युक्तीनें प्रयत्नें करून बहुत बलि समर्पण करावा.

मूर्तिपान्स्थापयेत्पश्चात्सर्वदिक्षुविचक्षणः ॥ २३ ॥ चतुरोद्वारपालांश्चद्वारेषुविनिवेशयेत् ॥

अर्थ - पश्चात् ज्ञानसंपन्न यजमानानें ते पूर्वोक्त ब्राम्हण मूर्तिसंरक्षण

करणारे बत्तीस असले तर ते प्रत्येक दिशेस चार अथवा सोळा ब्राम्हण असले तर प्रतिदिशेस दोन व आठ ब्राम्हण असले तर प्रतिदिशेस एक तसेच चार द्वारांपाशीं चार द्वारपाळ असे स्थापन करावे.

श्रीसूक्तंपावमानंचसोमसूक्तंसुमंगलम् ॥ २४ ॥ तथाचशांतिकाध्यायमिंद्रसूक्तंतथैवच ॥ रक्षोघ्नंचतथासूक्तंपूर्वतोबह्वृचोजपेत् ॥ २५ ॥

अर्थ- ते द्वारपाल कोणते व त्यांचीं कर्मे कोणतीं तें सांगतात. कीं, पूर्वद्वारपाल ऋग्वेदी असून त्यानें श्रीसूक्त, पवमान, सोमसूक्त तसाच शांतिकाध्याय, इंद्रसूक्त व रक्षोघ्नसूक्त या मंगल कारक सूक्तांचा जप करावा.

रौद्रंपुरुषसूक्तंचश्लोकाध्यायंसशुक्रियम् ॥ तथैवमंडलाध्यायमध्वर्युर्दक्षिणेजपेत् ॥ २६ ॥

अर्थ- तसाच दक्षिण द्वारपाल यजुर्वेदि अध्वर्यूनें दक्षिणद्वारीं असून रुद्र, पुरुषसूक्त, शुक्रसूक्त सहित श्लोकाध्याय व मंडलाध्याय यांचा जप करावा.

वामदेवंबृहत्सामज्येष्ठसामरथंतरम् ॥ तथापुरुषसूक्तंचरुद्रसूक्तंसशांतिकम् ॥ २७ ॥ भारुंडानिचसामानिच्छंदोगःपश्चिमेजपेत् ॥

अर्थ- तसाच पश्चिम द्वारपाल सामवेदी असून त्यानें वामदेव, बृहत्साम, ज्येष्ठसाम व रथंतर नामक सामहे सामवेदांतील चारभाग तसेंच शांतिसूक्तसहित पुरुषसूक्त, रुद्रसूक्त व भारुंड नामक सामें यांचा जप करावा.

अथर्वांगिरसंतद्वन्नीलंरौद्रंतथैवच ॥ २८ ॥ तथापराजितादेवीसप्तसूक्तंसरौद्रकम् ॥ तथैवशांतिकाध्यायमथर्वाचोत्तरेजपेत् ॥ २९ ॥

अर्थ- आणि अथर्वण वेदी ब्राम्हणानें उत्तर द्वारावर असून त्यानें तेथें अंगिरस तसेंच नील, रौद्र, अपराजिता देवीचें सप्तसूक्त, रुद्रसूक्त, व शांतिकाध्याय यांचा जप करीत असावें.

शिरस्थानेतुदेवस्यस्थापकोहोममाचरेत् ॥ शांतिकैःपौष्टिकैस्तद्वन्मंत्रैर्व्याहृतिपूर्वकैः ॥ ३० ॥

अर्थ- तसेंच देवस्थापक मुख्य आचार्यानें त्या देवतेच्या शिरस्थानीं

त्या प्रांत भागचे कुंडांत व्याहृति पूर्वक शांतिक व पौष्टिक या मंत्रांनीं होम करावा.

पलाशोदुंबराश्वत्थअपामार्गःशमीतथा॥हुतासहस्र मेकैकंदेवपादेतुसंस्पृशेत्॥३१॥

अर्थ- तो असा कीं, पलाश (पळस), औदुंबर, अश्वत्थ, अपामार्ग (अघाडा), तशीच शमी यांच्या समिधानीं मल्येकीं एकसहस्र संख्या युक्त होम करून आचा यीनें त्या स्थापना करण्याच्या देवमूर्तीचे चरणांस स्पर्श करावा.

ततोहोमसहस्रेणहुत्वाहुत्वाततस्ततः॥नाभिमध्यंतथा वक्षःशिरश्चाप्यालभेत्पुनः॥३२॥

अर्थ- नंतर कुंडाच्या अष्टदिशांस बसलेल्या ब्राम्हणानीं वहूं कडून पुनः सहस्र होम करून मुख्य आचार्यानें त्या देवाचें नाभि मध्य तसेंच वक्षस्थल व मस्तक यांस स्पर्श करावा.

हस्तमात्रेषुकुंडेषुमूर्तिपाःसर्वतोदिशम्॥समेखलेषुते- कुर्युर्योनिवक्रेषुचादरात्॥३३॥

अर्थ- पश्चात् त्या मूर्तिस रक्षक ब्राम्हणानीं सर्व दिशांस बसून योनिमुख वमेखला यानीं युक्त असून हस्तमात्र प्रमाण परिमितअशाकुंडांतप्रीतीनें होम करावा.

वितस्तिमात्रायोनिःस्यात्द्गजोष्ठसदृशीतथा॥आयता- च्छिद्रसंयुक्तापार्श्वतःकलयोच्छ्रिता॥३४॥कुंडात्क- लानुसारेणसर्वतश्चतुरंगुला॥विस्तारेणोच्छ्रयातद्वच्चतु रस्त्रासमाभवेत्॥३५॥वेदीभित्तिंपरित्यज्यत्रयोदश- भिरंगुलैः॥एवंनवसुकुंडेषुलक्षणंचैवदृश्यते॥३६॥

अर्थ- ती कुंडाच्या मेखले वर केलेली योनीची आकृति वितस्ति (वीत) मात्र लंबाय मान, पृष्ठभागीं छिद्रयुक्त व दोन्ही बाजूनीं एक अंगुल परिमित उंच असून गजाच्या ओष्ठा समान असावी. तशीच कुंडाच्या मध्यभागीं करण्याची नाभि अशी असावी कीं, कुंडाचे चोवीस भाग करून त्यांतील एकभागास कला (अंगुळ) म्हणतात त्या एक कले इतक्या उंचीनें युक्त व समांतर चतुष्कोण असून ती नाभि सर्व विस्तारानें चार अंगुळ परिमित करावी. आणि देवता स्थापनार्थ केलेल्या वेदीची (ओटा) भिंत सोडून तेराअंगुलांच्या अंतरा वर केलेल्या नऊ कुंडांत असें प्रत्येकीं चिन्ह करावें.

आग्नेयशाक्रयाम्येषुहोतव्यमुदगाननैः ॥ शांतयेलोकपालेभ्योमूर्तिभ्यः क्रमशस्तथा ॥ ३७ ॥ तथामूर्त्यधिदेवानां होमंकुर्यात्समाहितः ॥

अर्थ- तसेंच आग्नेय कोणा वरील कुंड व पूर्व दक्षिण या दिशां कडील कुंडें यां वरील ऋत्विजानीं उत्तराभिमुख बसून सर्वारिष्ट शांत्यर्थ होम करावा, आणि दश लोकपाल, मूर्ति व त्यामूर्तींचे अधिपति यांच्या प्रीत्यर्थ क्रमानें होम स्वस्थचित्तें करून करावा.

वसुधावसुरेताचयजमानोदिवाकरः ॥ जलंवायुस्तथासोमआकाशश्चाष्टमः स्मृतः ॥ देवस्यमूर्तयस्त्वष्टावेताः कुंडेषुसंस्मरेत् ॥ ३९ ॥

अर्थ- त्या पूर्वोक्त मूर्ति अशाकीं, वसुधा १, वसुरेता २, यजमान ३, दिवाकर ४, जल ५, वायु ६, सोम ७ व आकाश ह्या, देवाच्या आठ मूर्ति होम करणाऱ्या ब्राम्हणानीं त्या कुंडांत आदरानें स्मराव्या.

एतासामधिपान्वक्ष्ये पवित्रान्मूर्तिनामतः ॥ पृथ्वींपातिच शर्वश्चपशुपश्चाग्निमेवच ॥ ४० ॥ यजमानंतथैवोग्रोरुद्रश्चादित्यमेवच ॥ भवोजलंसदापातिवायुमीशानएवच ॥ ४१ ॥ महादेवस्तथाचंद्रंभीमश्चाकाशमेवच ॥ सर्वदेवप्रतिष्ठासुमूर्तिपाह्येतएवच ॥ ४२ ॥

अर्थ- त्या अष्टमूर्तींचे पवित्रमूर्ति अधिपति सांगतों ते असे कीं, शर्व पृथ्वीचें रक्षण करीत असून पशुपति अग्नीस रक्षितो. तसाच यजमानास उग्रमूर्ति शंकर रक्षीत असून आदित्यास रुद्र संरक्षण करितो. आणि भवनामा शिव, जल देवतांचें संरक्षण करीत असून ईशान हा वायूचें रक्षण करितो. त्याच प्रमाणें महादेव चंद्रास व भीमनामक शिव, आकाशास असें संरक्षण करितात. असे हे अष्टमूर्ति सदाशिव च सर्व देवस्थापना रूप कर्मांत पूर्वोक्त आठ मूर्तींचे रक्षक आहेत असें जाणावें.

एतेभ्योवैदिकैर्मंत्रैर्यथास्वंहोममाचरेत् ॥ तथाशांतिघटंकुर्यात्प्रतिकुंडेषुसंन्यसेत् ॥ ४३ ॥

अर्थ- या देवांच्या प्रीत्यर्थ यजमानानें स्वकीय द्रव्य शक्त्यनुसार वेदोक्त मंत्रा-

नीं होम करावा. तसाच त्यानें प्रति कुंडावर शांति कारक कलश स्थापन करावा.

शतांतेवासहस्रांतेसंपूर्णाहुतिरिष्यते ॥ समपादः पृथिव्यांतुप्रशांतात्माविनिक्षिपेत् ॥ ४४ ॥

अर्थ- आणि शत होम किंवा सहस्र होम झाला असतां, त्याचे अंतीं उत्तम रीतीनें पूर्णाहुति द्यावी; ती अशी कीं, यजमानानें आपले चरण समान जुळून पृथ्वीवर उभें राहून अतिशांत चित्तानें ती पूर्णाहुति अग्नींत समर्पण करावी.

आहुतीनांतुसंपातंपूर्णकुंभेषुवैन्यसेत् ॥ मूलमध्योत्तमांगेषुदेवंतेनावसेचयेत् ॥ ४५ ॥

अर्थ- तसेंच अग्नींत आहुति प्रक्षेप करण्याचे समयीं प्रति आहुतीच्या कुंडाचे समीप स्थापन केलेल्या पूर्ण कुंभांत एकेक जल बिंदु टाकावा. आणि त्या होमा नंतर त्या उदकानें स्थापन करण्याच्या त्या देवाचे चरण, कटि प्रदेश व मस्तकयांवर सिंचन करावें.

स्थितंचस्नापयेत्तेनसंपाताहुतिवारिणा ॥ प्रतियामेषुधूपंतुनैवेद्यंचदनोदकम् ॥ ४६ ॥ पुनः पुनः प्रकुर्वीत होमः कार्यः पुनः पुनः ॥ पुनः पुनश्चदातव्यायजमानेनदक्षिणा ॥ ४७ ॥ सितवस्त्रैश्चतेसर्वेपूजनीयाःसमंततः ॥

अर्थ- पश्चात् त्याच आहुति कालीं प्रत्येक आहुतीला, पूर्ण कलशांत घातलेल्या जल बिंदु संचित उदकानें त्या शयन स्थित देवास स्नान घालावें; आणि प्रति प्रहरास धूप, नैवेद्य व चंदन मिश्रित उदक हे उपचार देवास पुनः पुनः समर्पण करून वारंवार होम ही करावा. तशीच प्रत्येक होमाचे अंतीं यजमानानें ब्राम्हणास दक्षिणा द्यावी. व त्यानें शुभ्र वस्त्रानीं त्या होम करणाऱ्या सर्व ऋत्विजांचा सत्कार करावा.

विचित्रैर्हेमकटकैर्हेमसूत्रांगुलीयकैः ॥ ४८ ॥ वासोभिः शयनीयैश्चपरिधाप्याःस्वशक्तितः ॥ भोजनंचापिदातव्यंयावत्स्यादधिवासनम् ॥ ४९ ॥

अर्थ- तशींच सुवर्णाचीं विचित्र कडीं, सुवर्णाचे गोफ व अंगठ्या व शयनोपयुक्त वस्त्रें हीं त्या ब्राम्हणांस कर्त्यानें स्वशक्त्यनुसार द्यावीं. तसेंच देवाच्या -

स्थापनांगभूत त्या देवतांचें अधिवासन यावत्काल पर्यंत असेल तावत्काल प र्यंत त्या ब्राम्हणांस भोजन द्यावें.

बलिस्त्रिसंध्यंदातव्यो भूतेभ्यः सर्वतोदिशम् ॥ ब्राम्ह- णान्भोजयेत्पूर्वंशेषान् वर्णांस्तु कामतः ॥ ५०॥

अर्थ- त्याच प्रमाणें सर्व दिशांकडे भूत गणांस त्रिकाल बलिदान करावें. तसें- च प्रति दिवशीं ब्राम्हणांस पूर्वी भोजन घालून पश्चात् इतर वर्णांस यथेच्छ भो जन द्यावें.

रात्रौमहोत्सवः कार्योनृत्यगीतकमंगलैः ॥ सदापूज्याः प्रयत्नेनचतुर्थीकर्मयावता ॥ ५१ ॥

अर्थ- तसाच नृत्य,गीत व पुराणश्रवणादिक मंगल यानीं रात्रौ महान् उत्सव क रावा. आणि चतुर्थी नामक कर्म होई तों पर्यंत प्रति दिवशीं प्रयत्नानें त्या स्थापित देवता व ब्राम्हण यांची पूर्वोक्त प्रकारें सर्वदा पूजा करावी.

त्रिरात्रमेकरात्रंवापंचरात्रमथापिवा ॥ सप्तरात्रमथो कुर्यात्क्वचित्सद्योधिवासनम् ॥ सर्वयज्ञफलोयस्मा दधिवासोत्सवःसदा ॥ ५२॥

अर्थ- तसेंच तें देवतांचें अधिवासन, त्रिरात्र, एकरात्र, किंवा पंचरात्र, सप्तरात्र अथवा क्वचित् ज्यादिवशीं देवाची स्थापना कर्तव्य असेल त्याच दिवशीं सद्यःप क्षानें तरी करावें; कारण देवतांचा अधिवासनोत्सव सर्व यज्ञ फलदायक आहे;या त्सव तो सर्वदा अवश्य करावा. इतिश्री मत्स्यपुराणे अधिवासन विधि र्नाम पंच षष्ठ्युत्तर द्विशततमो ऽध्यायः ॥ २६५ ॥

अध्याय २६६वा.

सूतउवाच ॥ कृत्वाधिवासंदेवानांशुभंकुर्यात्समाहि- तः ॥ प्रासादस्यानुरूपेणमानंलिंगस्यवापुनः ॥ १ ॥

अर्थ- सूत म्हणतात ऋर्षीहो असें देवतांचें अधिवासन करून पश्चात् देव- स्थापना रूप शुभ कर्म एकाग्रचित्तानें करावें तें असें कीं, देवालयाच्या मानानें लिं गाचें (देव) मान करावें किंवा लिंगाच्या मानानुरूप देवालयाचें मान करावें.

पुष्पोदकेनप्रासादंप्रोक्ष्यमंत्रयुतेनतु ॥ पातयेत्पक्षसू त्रंतुद्वारसूत्रंतथैवच ॥ २॥

अर्थ- नंतर अभिमंत्रित केलेल्या पुष्पयुक्त उदकानें देवालयास प्रोक्षण करून-देवाच्या गाभाऱ्यांत दोहों भागांत सूत्र टाकून तसेंच महाद्वारावर ही सूत्र टाकावें.

आग्नेयेत्किंचिदीशानींमध्यंज्ञात्वादिशंबुधः॥ इशानी माश्रितंदेवंपूजयंतिदिवौकसः॥३॥

अर्थ- आणि ज्ञात्यानें त्या सिंहासनाचा मध्यभाग जाणून देवाची पूर्वाभिमुख स्थापना करावी. व त्या देवाचें मुख किंचित् ईशान्य दिशेकडे असावें; कारण ईशानी दिशाभिमुख देवास सर्व देवही पूजित करतात.

आयुरारोग्यफलदमथोत्तरसमाश्रितम्॥ शुभंस्याद शुभंप्रोक्तमन्यथास्थापनंबुधैः॥४॥

अर्थ- तशीच देवाची उत्तराभिमुख स्थापना केली असतां, ती यजमानादिकांस आयुष्य व आरोग्य हीं फलें देणारी होते. यास्तव देवता स्थापना पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख अशी केली तरच तें शुभ दायक होतें. व या वांचून अन्यरीतीनें केली असतां तें अशुभ कारक होतें.

अधः कूर्मशिलाप्रोक्तासदाब्रम्हशिलाधिका॥ उपर्यव स्थितातस्याब्रम्हभागाधिकाशिला॥५॥

अर्थ- त्याच प्रमाणें देवाच्या सिंहासनांत अधोभागीं सर्वदा कूर्म शिला असून तिचे ऊर्ध्व ब्रम्हशिला अधिक प्रमाण युक्त असावी. ती शिला ब्रम्हभागानें सर्वोत्कृष्ट आहे.

ततस्तुपिंडिकाकार्यापूर्वोक्तैर्नामलक्षणैः॥ ततः प्रक्षालितांकृत्वापंचगव्येनपिंडिकां॥६॥ कषायतोयेनपुनर्मंत्रयुक्तेनसर्वतः॥ देवतार्चाश्रयंमंत्रंपिंडिकासु नियोजयेत्॥७॥

अर्थ- नंतर ती पिंडिका (सिंहासन) पूर्वोक्त नाम व लक्षण (चिन्ह) यानीं सिद्ध करून पश्चात् पंचगव्यानें तिचें प्रक्षालन करावें. आणि अश्वत्थ, वट व तुरटी यांच्या अभिमंत्रित कषायानें तिला सर्व बाजूंनीं प्रक्षालित करून देवाच्या अर्चेला जो मंत्र उक्त आहे तोच मंत्र त्या पिंडिकेच्या स्थापने विषयीं योजावा.

ततउत्थाप्यदेवेशंउत्तिष्ठब्रम्हणेतिच॥ आनीयगर्भभवनंपीठांतेस्थापयेत्पुनः॥८॥

अर्थ- नंतर त्या स्थापन करण्याच्या देवास उत्तिष्ठ ब्रम्हणस्पते या मंत्रानें उठवून गाभाऱ्यांत आणून पुनः सिंहासनाच्या मांल भागीं स्थापन करावें.

अर्घ्यपाद्यादिकंतत्रमधुपर्कमयोजयेत् ॥ ततोमुहूर्तंविश्रम्यरत्नन्यासंसमाचरेत् ॥ ९॥

अर्थ- आणि त्या स्थळीं त्या देवास अर्घ्यपाद्यादिक उपचार देऊन मधुपर्क निवेदन करावा. नंतर एक मुहूर्त पर्यंत विश्रांति करून त्या देवाच्या स्थापन करण्याचे स्थानीं पूर्वी रत्नें घालावीं.

वज्रमौक्तिकवैडूर्यशंखस्फटिकमेवच ॥ पुष्परागेंद्रनीलंचनीलंपूर्वादिदिक्क्रमात् ॥ १०॥

अर्थ- तीं अशीं कीं, वज्र (हिरे), मौक्तिकें, वैडूर्यमणि, शंख, स्फटिक, पुष्पराग (पुष्कराजमणि), इंद्रनीलमणि व नीलनामक मणि हीं आठ रत्नें पूर्व दिशादि क्रमानें त्या देवाच्या अधोभागीं त्या सिंहासनाचे गर्तेत घालावीं.

तालकंचशिलावज्रमंजनंश्याममेवच ॥ कासीकाशीसमाक्षीकंगैरिकंचादितःक्रमात् ॥ ११॥

अर्थ- नंतर हरताळ, मनशीळ, हिरे, श्यामवर्ण अंजन (सुरमा), कासी (सोरटीमाती किंवा तुरटी), काशी (मोळ), माक्षीक (सुवर्णमुखी), गैरिक (काव) हे पदार्थ क्रमानें आरंभा पासून घेऊन यांचें लुकण करून देव बसविण्याच्या अधोभागचे प्रदेशीं बळकटी येण्या साठीं घालावें.

गोधूमंचयवंतद्वत्तिलमुद्गंतथैवच ॥ नीवारमथश्यामाकंसर्षपंव्रीहिमेवच ॥ १२॥ न्यस्यक्रमेणपूर्वादिचंदनंरक्तचंदनम् ॥ अगरुंचांजनंचापिउशीरंचततःपरं ॥ १३ ॥ वैष्णवींसहदेवींचलक्ष्मणांचततःपरम् ॥ स्वलोकपालनाम्नातुन्यसेदोंकारपूर्वकम् ॥ १४॥

अर्थ- तसेंच गोधूम (गहूं), यव (सातु), तिल, मुद्ग (मूग), नीवार (देवभात), श्यामाक (सांवे), सर्षप (मोहऱ्या), व्रीहि (साळी), हीं धान्यें आणि चंदन, रक्तचंदन, अगरु, अंजन (सुरमा), व उशीर (वाळा) तशीच वैष्णवी (लघुशतावरी), सहदेवी (बायांटीची वेल), लक्ष्मणा (जास्वंद) हे ही पदार्थ त्या सिंहासनाच्या गर्तेत पूर्वदिशादि क्रमानें घालावे.

सर्वबीजानिधातूंश्वरत्नान्योषधयस्तथा ॥ कांचनंप-
द्मरागंतुपारदंपद्ममेवच ॥ १५ ॥ कूर्मंधरांवृषंतत्रन्य-
सेत्पूर्वादितःक्रमात् ॥

अर्थ - तशींच सर्व बीजें, सुवर्णादिधातु, नवरत्नें, ओषधि, कांचन, पद्मराग (माणीक), पारद (पारा), कमल हे पदार्थ सिंहासनाच्या गर्तेंत पूर्वदिशादिक्रमानें घालून त्या सिंहासनावर कूर्म, पृथ्वी व वृषभ यांचें स्थापन करावें.

ब्रम्हस्थानेतुदातव्याःसंहतास्युःपरस्परम् ॥ १६ ॥ क
नकंविद्रुमंताम्रंकांस्यंचैवारकूटकम् ॥ रजतंविमलंपु
ष्पलोहंचैवक्रमेणतु ॥ १७ ॥

अर्थ - त्याच प्रमाणें सुवर्ण, विद्रुम (पोवळें), ताम्र, कांस्य, आरकूट (पितळ), रजत (रुपें), शुध्धपुष्प व लोह (लोखंड) हीं सर्व परस्परांस संलग्न होतील अशी रीतीनें पूर्वादिक दिशाक्रमें करून सिंहासनावरील देवस्थापन करण्याचे ब्रम्हस्थानीं घालावें.

कांचनंहरितालंचसर्वाभावेपिनिक्षिपेत् ॥ दद्याद्व्री
जौषधिस्थानेसहदेवींयवानपि ॥ १८ ॥

अर्थ - तसेंच कांचन व हरिताल हे त्या सिंहासनांत सर्व धातु व रत्नें यांचे अभावीं घालावे. आणि सर्व बीजें व ओषधी यांचे अभावीं वाघांटी व सातु हे घालावे.

न्यासमंत्रानतोवक्ष्येलोकपालात्मकानिह ॥ इंद्रस्तु
सहसादीप्तःसर्वदेवाधिपोमहान् ॥ १९ ॥ वज्रहस्तो-
महासत्वस्तस्मैनित्यंनमोनमः ॥

अर्थ - आतां मुख्य प्रतिमेच्या सभोंवतीं पूर्वदिशादिक्रमानें इंद्रादिलोकपालस्वरूप देवतांचे न्यास (स्थापन) मंत्र सांगतों. ते असे कीं, पूर्वदिशेस जो सर्व देवांचा अधिपति महादेदीप्यमान, वज्र धारण करणारा, महापराक्रमी अशा इंद्राणी सहवर्तमान इंद्रास निरंतर वारंवार नमस्कार असो.

आग्नेयःपुरुषोरक्तःसर्वदेवमयःशिखी ॥ २० ॥ धूम
केतुरनाधृष्यस्तस्मैनित्यंनमोनमः ॥

अर्थ - आग्नेय दिशेस आरक्त वर्ण, पुरुषाकृति असून ज्याचे ठिकाणीं हवन

केलें असतां सर्व देव तृप्त होतात. आणि सर्वांनीं धारण करण्यास अशक्य असा ज्वालायुक्त असून ज्याचा धूम्र, ऊर्ध्वभागीं ध्वजरूप आहे त्या अग्नीस सर्वदा नमस्कार असो.

यमश्चोत्पलवर्णाभः किरीटी दंडधृक्सदा ॥२१॥ धर्मसाक्षी विशुद्धात्मा तस्मै नित्यं नमो नमः ॥

अर्थ- तसाच दक्षिण दिशेस स्थित असून नील कमल वर्ण, किरीटधारी, पातकी जनशासनार्थ सर्वदा दंडधारण करणारा, शुद्धांत करणानें सर्वांच्या शुभाशुभ कर्मांचा साक्षी असा जो यमधर्म त्यास सर्व काल नमस्कार असो.

निर्ऋतिस्तु पुमान्कृष्णः सर्वरक्षोधिपो महान् ॥२२॥ खड्गहस्तो महासत्वस्तस्मै नित्यं नमो नमः

अर्थ- नैर्ऋत्य दिशेस विराजमान असून कृष्ण वर्ण, महापुरुषाकार, सर्व राक्षसांचा अधिपति, महापराक्रमी असा जो खड्गधारी, निर्ऋति त्यास नित्यशः नमस्कार असो.

वरुणो धवलो विष्णुः पुरुषो निम्नगाधिपः ॥२३॥ पाशहस्तो महाबाहुस्तस्मै नित्यं नमो नमः ॥

अर्थ- पश्चिम दिशेस वर्तमान असून सर्व नद्यांचा अधिपति, शुभ्र वर्ण, विष्णुसारखा पुरुषाकृति, पुष्ट व दीर्घभुजयुक्त असा जो पाशधारण करणारा वरुण त्यास प्रति दिवशीं नमस्कार असो.

वायुश्च सर्ववर्णो वै सर्वगंधवहः शुभः ॥२४॥ पुरुषो ध्वजहस्तश्च तस्मै नित्यं नमो नमः ॥

अर्थ- वायव्य दिशेस स्थित असून जो सर्वत्र व्याप्त असल्यामुळें सर्व वर्णधारण करणारा, व सर्वगंध वाहणारा, शुभ कारक पुरुषाकृति असून ज्यानें हस्तांत ध्वज धारण केला आहे त्या वायूस प्रतिक्षणीं नमस्कार असो.

गौरो यश्च पुमान्सौम्यः सर्वौषधिसमन्वितः ॥२५॥ ॥नक्षत्राधिपतिः सोमस्तस्मै नित्यं नमो नमः ॥

अर्थ- उत्तर दिशेस विद्यमान असून गौर वर्ण, आल्हाद कारक पुरुषाकृति व सर्व वनस्पति सहित नक्षत्रांचा अधिपति असा जो चंद्र त्यास प्रतिपदीं नमस्कार असो.

मस्कार असो.

ईशानपुरुषः शुक्लः सर्वविद्याधिपोमहान् ॥२६॥ शूल
हस्तोविरूपाक्षस्तस्मैनित्यंनमोनमः॥

अर्थ - ईशान्य दिशेस विराजमान असून शुक्लवर्ण, पुरुषाकार, सर्व विद्यांचा अधिपति, विरूपाक्ष व त्रिशूलधारण करणारा असा महान् जो ईश्वर त्यास सदा नमस्कार असो.

पद्मयोनिश्चतुर्मूर्तिर्वेदवासाः पितामहः ॥२७॥ यज्ञा
ध्यक्षश्चतुर्वक्त्रस्तस्मैनित्यंनमोनमः॥

अर्थ - तसेच विष्णूच्या नाभिकमलापासून उत्पन्न झालेले असून चतुर्मुख असल्यामुळें चतुर्मूर्तिस्वरूपी व वेदमय वस्त्र परिधान करणारे असून यज्ञांचे अध्यक्ष असे जे ब्रम्हदेव त्यांस नित्यशः नमस्कार असो.

योसावनंतरूपेण ब्रम्हांडंसचराचरम् ॥२८॥ पुष्प
वद्धारयेन्मूर्ध्नि तस्मैनित्यंनमोनमः॥

अर्थ - आणि जो हा, शेषरूपानें स्वकीय मस्तकावर हें चराचर विश्व सहित ब्रम्हांड पुष्पवत् धारण करतो त्या देवास आमचे सर्वदा नमस्कार असोत.

ओंकारपूर्वका ह्येतेन्यासेबलिनिवेदने ॥२९॥ मंत्राः
स्युः सर्वकार्याणां वृध्दिपुत्रफलप्रदाः॥

अर्थ - हे दशलोकपालांचे मंत्र सर्व शुभ कार्यांची वृध्दि, पुत्र इत्यादि अनेक फलदायक आहेत. हे ओंकारपूर्वक मंत्र या देवतांचें त्या पीठावर स्थापन व त्यांचे प्रीत्यर्थ कर्तव्य बलिदान यां विषयीं उक्त आहेत.

न्यासंकृत्वातुमंत्राणांपायसेनानुलेपितम् ॥३०॥
पटेनाच्छादयेश्वभ्रंशुक्लेनोपरियत्नतः॥

अर्थ - असे या दशमंत्रानीं त्या सिंहासनाच्या गर्तेवर न्यास करून त्या गर्तेस पायसानें लेपन करावें. आणि ती गर्ता प्रयत्नें करून शुभ्र वस्त्रानें वरून आच्छादित करावी.

ततउत्थाप्यदेवेशमिष्टदेशेतुशोभने ॥ ३१॥ ध्रुवा-
द्यौरितिमंत्रेणश्वभ्रोपरिनिवेशयेत् ॥

अर्थ - नंतर त्या शयन करविलेल्या ईश्वर रूप देवास उचलून स्थापन यो

म्य इष्ट शुभ स्थानीं ध्रुवाद्यो या मंत्रानें त्या गर्तेवर स्थापन करावें.

ततः स्थिरीकृतस्यास्य हस्तं दत्वातु मस्तके ॥ ३२॥ ध्यात्वा परमसद्भावाद्देवदेवंच निष्कलम् ॥ देवव्रतं तथा सोमं रुद्रसूक्तं तथैवच ॥ ३३॥ आत्मानमीश्वरं कृत्वा नानाभरणभूषितम् ॥ यस्य देवस्य यद्रूपं तद्ध्याने संस्मरेत्तथा ॥ ३४॥

अर्थ- पश्चात् बसवून त्या स्थळीं स्थिर केले त्या त्या देवाच्या मस्तकावर स्थापकानें स्वहस्त ठेऊन अतिउत्तम सद्भावानें त्या मूर्तीत निरुपाधिक अखंडित ब्रम्हस्वरूप देवाधिदेवाचें ध्यान करून देवव्रत सूक्त तसेंच सोमसूक्त व रुद्रसूक्त यांचा जप करावा. आणि आपली बुध्दि शमदमादिक साधनानीं ध्यान समर्थ करून जो देव स्थापन कर्तव्य असेल त्या देवाचें सर्वाभरण भूषितरूप त्या स्थापकानें स्वहृदय कमलांत ध्यान योगानें उत्तम प्रकारें स्मरावें.

अतसीपुष्पसंकाशं शंखचक्रगदाधरम् ॥ संस्थापयामि देवेशं देवो भूत्वा जनार्दनम् ॥ ३५॥

अर्थ- तसेच विष्णु प्रभृति देवता स्थापने विषयीं त्या देवांचे पृथक् मंत्र सांगतों ते असे कीं, अतसी (जवस) पुष्प समान कांति करशोभित असून शंख, चक्र व गदा हीं आयुधें धारण करणारा व दुष्टजन संहारक अशा देवाधिदेव- विष्णूस, मी देव (ज्ञानसंपन्न) होऊन स्थापन करतो.

त्र्यक्षंच दशबाहुंच चंद्रार्धकृतशेखरम् ॥ गणेशं वृषसंस्थंच स्थापयामि त्रिलोचनम् ॥ ३६॥

अर्थ- तसाच दशभुज असून मस्तकीं अर्धचंद्ररूप भूषण धारण करणारा व प्रमथादि गणाधिपति अशा नंदिवाहनारूढ त्रिनयन शंकरास मी स्थापित करतों.

ऋषिभिः संस्तुतं देवं चतुर्वक्त्रं जटाधरम् ॥ पितामहं महाबाहुं स्थापयाम्यंबुजोद्भवम् ॥ ३७॥

अर्थ- त्याच प्रमाणें सर्व ऋषीनीं उत्तम प्रकारें स्तुत असून विष्णूच्या नाभिकमलापासून उत्पन्न झाल्यामुळें सर्वांचे पितामह अशा जटाधारि चतुर्मुख महाभुज ब्रम्हदेवास मी स्थापन करतों.

सहस्रकिरणंशांतमप्सरोगणसंयुतम् ॥ पद्महस्तं महाबाहुंस्थापयामिदिवाकरम् ॥ ३८॥

अर्थ- आणि सहस्र किरण करून शोभित असून अप्सरा समुदाय युक्त, व हस्तांत कमल धारण करणारा अशा महाभुज शांत स्वरूप दिवाकरास (सूर्य) मी स्थापित करतों.

देवमंत्रांस्तथारौद्रान् रुद्रस्यस्थापनेजपेत् ॥ विष्णोस्तु वैष्णवांस्तद्वत्ब्राम्हान्वैब्रम्हणोबुधैः ॥ ३९॥

अर्थ- तसेच रुद्र देवाचे मंत्र त्याच्या रुद्राच्या स्थापन काळीं जपावे. आणि विष्णु स्थापने विषयीं विष्णु मंत्र म्हणावे. व ब्रम्हदेवाच्या स्थापन समयीं ब्रम्ह मंत्रच जपावे.

सौराःसूर्यस्यजप्तव्यास्तथान्येषुतदाश्रयाः ॥ वेदमंत्रप्रतिष्ठातुयस्मादानंददायिनी ॥ ४०॥

अर्थ- तसेच सूर्याचे मंत्र सूर्य स्थापने विषयीं जपावे व अन्य देवतांचे स्थापनार्थ त्या त्या देवतांचे मंत्र म्हणावे; कारण वेद मंत्रानीं देवता स्थापना केली असतां ती सर्व पूजकांस आनंद दायक होते.

स्थापयेद्यंतुदेवेशंतंप्रधानंप्रकल्पयेत् ॥ तस्यपार्श्वस्थितानन्यान्संस्मरेत्परिवारितः ॥ ४१॥

अर्थ- आणि ज्या देवास स्थापन केलें असेल त्या देवास मुख्यत्वें मानावें. व त्याच्या दोही पार्श्व भागीं स्थित ज्या इतर देवता असतात त्यांस त्या मुख्य देवाच्या परिवारत्वें करून मानावें.

गणंनंदिंमहाकालंवृषंभृंगिंरिटिंगुहं ॥ देवींविनायकंचैवविष्णुंब्रम्हाणमेवच ॥ ४२॥ रुद्रंशक्रंजयंतंचलोकपालान्समंततः ॥ तथैवाप्सरसःसर्वागंधर्वगुणगुह्यकान् ॥ ४३॥ योयत्रस्थाप्यतेदेवस्तस्यतान्परितःस्मरेत् ॥

अर्थ- त्याचप्रमाणें नंदिनामा गण, महाकाल, वृष (नंदिकेश्वर), भृंगि, रिटि, कार्तिकस्वामी, देवी, विनायक, विष्णु, ब्रम्हदेव, रुद्र, इंद्र, जयंत, सर्व लोकपाल तशाच संपूर्ण अप्सरा, गंधर्व गण, व गुह्यक यासकल देवता, जो

देव ज्या स्थलीं स्थापित केला असेल त्याच्या आसमंताद्भागीं परिवारलें-
करून स्मरावा.

अवाहयेत्तथारुद्रंमंत्रेणानेनयत्नतः ॥ ४४ ॥ यस्यसिंहा
रथेयुक्ताव्याघ्राभूतास्तथोरगाः ॥ ऋषयोलोकपाला-
श्चदेवःस्कंदस्तथावृषः ॥ ४५ ॥ प्रियोगणोमातरश्च-
सोमोविष्णुःपितामहः ॥ नागायक्षाःसगंधर्वायेचदिव्या
नभश्चराः ॥ ४६ ॥ तमहंऋक्षमीशानंशिवंरुद्रमुमापतिं ॥
आवाहयामिसगणंसपत्नीकंवृषध्वजम् ॥ ४७ ॥ आग
च्छभगवन्रुद्रानुग्रहायशिवोभव ॥ शाश्वतोभवपूजां
मेगृहाणत्वंनमोनमः ॥ ४८ ॥

अर्थ - तसेंच यापुढील मंत्रें करून मयत्नानें रुद्राचें आवाहन करावें. त्या मं-
त्राचा अर्थ असाकीं, ज्याच्या रथास सिंह, व्याघ्र, भूतगण तसेच सर्प हे योजले-
ले असून नारदादि ऋषि, इंद्रादिलोकपाल, कार्तिकस्वामी, तसाच नंदिकेश्व
र, प्रमथादिक प्रियगण, ब्राम्ही प्रभृतिसप्तमातृका, चंद्र, विष्णु ब्रम्हदेव, वा-
सुकिप्रमुखनाग, यक्ष, गंधर्व व जे दिव्य आकाश संचारी देवगण हे ज्याचे परि
वार आहेत असा जो ऋक्षरूपी प्रभु असून कल्याण कारक त्यासर्व गण स-
हित वृषभ ध्वजस्वरूप सपत्नीक उमापति रुद्रास मी आवाहित करतों; का
रणा हे भगवन् रुद्रा आपण या लिंगरूप प्रतिमेंत आगमन करून नित्यसं-
न्निहित असावें आणि आमची पूजा ग्रहण करून आम्हा विषयीं अनुग्रह-
दृष्टीनें कल्याण कारक व्हावें; यास्तव आम्ही तुम्हास वारंवार नमस्कार क
करतों.

ओंनमःस्वागतंभगवतेनमः ओंनमःसोमायसगणा-
यसपरिवारायप्रतिगृण्हातुभगवन्मंत्रपूतमिदंसर्वम
र्घ्यपाद्यमाचनीयमासनंब्रम्हणाभिहितंनमोनमःस्वा-
हा ॥ ४९ ॥

अर्थ - आणि हे भगवन् आपणास आमचे प्रमाद पूर्वक पुनःपुनः नम
स्कार असोत, कारण या प्रतिमेंत आपलें उत्तम रीतीनें आगमन व्हावें. नंतर
पार्वती, गण व अवांतर परिवार देवता यां सहित आपणांस आम्ही वेदोक्त म-

कारें मंत्रानीं पवित्र केलेलें अर्घ्य, पाद्य आचमनीय व आसन इत्यादि हें सर्व ओंकार पूर्वक नमस्कार युक्त स्वाहा कारानें समर्पण करून वारंवार नमस्कार ही करतो.

ततः पुण्याहघोषेण ब्रम्हघोषैश्च पुष्कलैः ॥ स्नापये-
त्तु ततो देवं दधिक्षीरघृतेनच ॥ ५० ॥ मधुशार्करया-
तद्वत्पुष्पगंधोदकेनच ॥ शिवध्यानैकचित्तस्तु मंत्राने-
तानुदीरयेत् ॥ ५१ ॥

अर्थ- पश्चात् ब्राम्हणां कडून पुण्याह वाचन करवून बहुत वेदमंत्र घोषानीं त्या स्थापित देवास, दधि, क्षीर (दुग्ध), घृत, मधु (मध) व शर्करा यां-पंचमृतानें व पुष्पमिश्रित गंधोदकानें स्नान घालावें. त्या काळीं अर्चकानीं शिवध्यानाविषयीं एकाग्र चित्त असून हे पुढील मंत्र म्हणावे.

यज्जाग्रतोदूरमुदेतीति ॥ ततोविराडजायतइतिच ॥ स
हस्रशीर्षापुरुषइतिच ॥ अभित्वाशूरनोनमइतिच ॥ पुरु
षऽएवेदंसर्वमिति ॥ त्रिपादूर्ध्वमिति ॥ येनेदंभूतमिति
॥ नत्वाअवीन्यइति ॥ सर्वांश्चैतान्प्रतिष्ठास्तुमंत्रान्ज
प्त्वापुनःपुनः ॥ चतुःकृत्वास्पृशेदद्भिर्मूलेमध्येशिरस्य
पि ॥ ५२ ॥

अर्थ- ते असे कीं, यज्जाग्रतो दूरमुदेति, ततो विराडजायत, सहस्रशीर्षा पुरुष, अभित्वा शूर नोनमः, पुरुष एवेदं सर्वं, त्रिपादूर्ध्व, येनेदं भूतं, नत्वा अवी-अन्य हे सर्व मंत्र देव स्थापने विषयीं पुनःपुनः जपून त्या जपानें अभिमंत्रित केलेल्या उदकानें त्या देवाचें मूल, मध्यभाग व मस्तक या स्थानत्रयास प्रत्येकीं चतुर्वार स्पर्श करावा.

स्थापितेतु ततो देवे यजमानोथमूर्तिपम् ॥ आचार्यं पू
जयेद्भक्त्या वस्त्रालंकारभूषणैः ॥ ५३ ॥ दीनांधकृ
पणांस्तद्वद्येचान्ये समुपस्थिताः ॥

अर्थ- अशा उत्तम विधीनें देवस्थापना झाल्या नंतर यजमानानें त्या मूर्तिस्थापक मुख्य आचार्यास भक्तीनें वस्त्रें, अलंकार, भूषणें यानीं पूजित करावें. तदुत्तर दीन, अंध व कृपण (दरिद्री), इत्यादिक इतर ही जे त्या स्थलीं

आले असतील त्यांस ही त्यानें यथायोग्यतानुसार सन्मान युक्त करावें.

ततस्तु मधुनादेवंप्रथमेहनिलेपयेत् ॥ ५४ ॥ हरिद्र
याथसिध्दार्थैर्द्वितीयेहनितत्वतः ॥

अर्थ- पश्चात् प्रथम दिवशीं त्या स्थापित देवास मधानें लेपन करावें. आणि द्वितीय दिवशीं हरिद्रा व सिध्दार्थ (मोहऱ्या) यानीं निश्चयें करून त्या मूर्तीस लेपन करावें.

चंदनेनयवैस्तद्वत्तृतीयेहनिलेपयेत् ॥ ५५ ॥ मनः
शिलाप्रियंगुभ्यांचतुर्थेहनिलेपयेत् ॥

अर्थ- तसेंच तृतीय दिनीं त्या प्रतिमेला यवमिश्रित चंदनाचा लेप करून चतुर्थ दिवशीं मनशीळ व राळे यांच्या कल्कानें लेप करावा.

सौभाग्यशुभदंयस्माल्लेपनंव्याधिनाशनम् ॥ ५६ ॥
परंप्रीतिकरन्नृणामेतद्वेदविदोविदुः ॥ कृष्णांजनंति
लंतद्वत्पंचमेपिनिवेदयेत् ॥ ५७ ॥

अर्थ- कारण हे मूर्ति लेपन सौभाग्या (उत्तमभाग्य) दि शुभदायक व व्याधिनाशक असून मनुष्यांस अत्यंत प्रीति कारक ही आहे असें वेद वेत्त्यांचें मत आहे; यास्तव कृष्णवर्ण अंजन (सुरमा) व तिल यानीं त्या देवास पंचम दिवशीं लेपन करावें.

षष्ठेतुसघृतंदद्याच्चंदनंपद्मकेसरम् ॥ रोचनागरु
पुष्पंतुसप्तमेहनिदापयेत् ॥ ५८ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें षष्ठ दिवशीं त्या प्रतिमेस घृतयुक्त कमल केसर मिश्रित चंदनानें लेप करावा. आणि गोरोचन व अगरु पुष्प यांच्या कल्काचा लेप त्या देवास सप्तम दिवशीं करावा.

यत्रसद्योधिवासःस्यात्तत्रसर्वंनिवेदयेत् ॥ स्थितंन-
चालयेद्देवमन्यथादोषभाग्भवेत् ॥ ५९ ॥

अर्थ- तसेंच ज्यादिवशीं देवस्थापन त्याच दिवशीं देवस्थापनांग भूत देवतांचें अधिवासन कर्तव्य असेल त्या एकच दिवशीं हे सात दिवसांचे ही लेपन तत्काल करावे. आणि अशा विधीनें स्थापित झालेल्या देवास चलित करूनये, कारण त्या देवाचें चलन झालें असतां दोष घडतो.

पूरयेत्सिकताभिस्तु निश्छिद्रं सर्वतो भवेत् ॥ लोक-
पालस्य दिग्भागे यस्य संचलते विभुः ॥ ६० ॥ तस्य लो
कपतेः शांतिं दद्यात्स्वे माश्च दक्षिणाः ॥

अर्थ- नंतर त्या मूर्तीचे अधोभागच्या गर्तेंत सर्वांवर वाळू घालून सर्व बाजू छिद्र रहित कराव्या. आणि ती वाळू खालीं घालते समयीं तो स्थापित देव ज्या लोकपालाच्या दिशेस चलन पावेल त्या लोकपाल देवतेची शांति करून त्यास पुढील सांगितलेल्या दक्षिणा द्याव्या.

इंद्रायाभरणं दद्यात्कांचनं चाल्पवित्तवान् ॥ ६१ ॥
अग्नेः सुवर्णमेवस्याद्यमस्य महिषं तथा ॥ अन्नं चकां
चनं दद्यान्नैर्ऋतं राक्षसं प्रति ॥ ६२ ॥

अर्थ- त्या अशाकीं, धनाढ्यानें इंद्रास आभरण द्यावें. आणि अल्प द्रव्य वानानें कांचन द्यावें. तसेंच अग्नीस सुवर्ण व यमास महिष हीं अर्पण करावीं. व राक्षसेंद्र निर्ऋति नामक लोकपालास अन्न व कांचन हीं द्यावीं.

वरुणं प्रति मुक्तानि सशुक्तीनि प्रदापयेत् ॥ रीतिकं वा
यवे दद्याद्वस्त्रयुग्मेन सांप्रतम् ॥ ६३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें वरुणास शिंप्यासहित मौक्तिकें अर्पण करावीं. आणि वायूस वस्त्रद्वय सहित पितळ द्यावें हें युक्त आहे.

सोमाय धेनुर्दातव्या रजतं सवृषं शिवे ॥ यस्यां यस्यां-
संचलनं शांतिः स्यात्तत्र तत्र तु ॥ ६४ ॥

अर्थ- तसेंच चंद्रास गोप्रदान व शिवास वृषभ सहित रजत अर्पण करावें. आणि त्या स्थापित देवाचें चलन ज्या ज्या दिशेस होईल त्या त्या दिशेच्या लोकपालाची शांति त्या त्या दिशेस करावी.

अन्यथा तु भवेद्घोरं भयं कुलविनाशनम् ॥ अचलं का
रयेत्तस्मात्सिकताभिः सुरेश्वरम् ॥ ६५ ॥

अर्थ- कारण ती शांति न केली तर यजमानादिकांस कुलविनाशक घोर भय उत्पन्न होतें. यास्तव खालीं वाळू घालून त्या स्थापित देवास अचलतेनें स्थित करावें.

अन्नं वस्त्रं च दातव्यं पुण्याहजयमंगलम् ॥ त्रिः पंच

सप्तदशवादिनानिस्यान्महोत्सवः ॥६६॥

अर्थ- तसेंच त्या देवमंदिरांत त्या स्थापन प्रसंगीं ब्राम्हणादिक सर्वांस- अन्न, वस्त्र, दानपूर्वक स्वदिन शब्द व देवाचा सर्वोत्कर्ष सूचक जय शब्दा नीं तेथें मंगल करावें. असा तीन पांच सात किंवा दहा इतके दिवस त्या स्थ- ळीं महान् उत्सव करावा.

चतुर्थेन्हिमहास्नानंचतुर्थीकर्मकारयेत् ॥ दक्षिणा चपुनस्तद्द्यात्अतिभक्तितः ॥६७॥

अर्थ- नंतर चतुर्थ दिवशीं त्या स्थापित देवास महाभिषेक स्नान घालून च तुर्थी नामें कर्म करावें. आणि त्या कर्माच्या सांगता सिध्यर्थ पुनः अति भक्तीनें ते थें दक्षिणा द्यावी.

देवप्रतिष्ठाविधिरेषतुभ्यंनिवेदितःपापविनाशहेतोः ॥ यस्माद्बुधैः पूर्वमनंतमुक्तमनेकविद्याधरदेवपूज्य म् ॥६८॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, पूर्वी ज्ञानसंपन्न ऋ षीनीं हा अपार देवप्रतिष्ठा विधि सर्वलोकांच्या पापनाशार्थ कथन केला यास्तव मी हा विधि तुला निवेदन केला; कारण हा विधि अनेक विद्याधर व देव यांस ही मान्य आहे. इतिश्री मत्स्यपुराणे देवप्रतिष्ठानुकीर्तनंस मासम् ॥ २६६ ॥

अध्याय २६७वा.

सूतउवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामि देवस्नपनमुत्त मम् ॥ अर्घस्यापिसमासेनश्रृणुत्वंविधिमुत्तमं ॥१॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषी हो यानंतर मी देवास स्नान घालण्याचा उत्त- म विधि व अर्घ्याचाही उत्कृष्ट विधि तुला संक्षेपानें कथन करतों तूं श्रवण कर.

दध्यक्षतकुशाग्राणिक्षीरंदूर्वातथामधु ॥ यवाःसि- ध्दार्थकास्तद्वदष्टांगोर्घःफलैःसह ॥ २ ॥

अर्थ- तो असा कीं, दधि १, अक्षता २, दर्भाग्रें ३, क्षीर (उदक व दुग्ध) ४, दूर्वा ५ तसाच मध ६, यव (सातु) ७, सिध्दार्थक (मोहऱ्या) ८ या अष्टांग सहित अर्घ्य उत्तम असून त्यांत फल ही अधिक घालावें हें विशेष च आहे.

गजाश्वरथ्यावल्मीकवराहोत्खातमंडलात् ॥ अग्न्यागा
रात्तथातीर्थाद्व्रजाद्गोमंडलादपि ॥ ३ ॥ कुंभेतुमृत्तिकां
दद्यादुद्धतासीतिमंत्रवित् ॥ शन्नादेवीत्यपांमंत्रमापो
हिष्ठेतिवैतथा ॥ ४ ॥

अर्थ- तसाच आतां देवाच्या त्या महा स्नानविधीचा प्रकार असा कीं, गज व अश्व यांचा संचार मार्ग, वल्मीक (वारूळ), वराहानें (सूकर) उकरलेलें शुद्धभूमिस्थल, होमशाला तसेंच तीर्थ स्थान, व्रज (गौळवाडा), गायींचें स्थान या सर्व प्रदेशांतील पवित्र मृत्तिका उद्धतासि या मंत्रानें अभिमंत्रित करून ती, देवाच्या स्नानार्थ स्थापन केलेल्या कुंभांत घालून त्या मंत्र ज्ञात्यानें शंन्नोदेवी व आपोहिष्ठा या उदक देवतांच्या मंत्रानीं त्या कलशांत जलपूर्ण घालावें.

सावित्र्यादायगोमूत्रंगंधद्वारेतिगोमयम् ॥ आप्याय
स्वेतिचक्षीरंदधिक्राव्णेतिवैदधि ॥ ५ ॥ तेजोसीतिघृ-
तंतद्वद्देवस्यत्वेतिचोदकम् ॥ कुशमिश्रंक्षिपेद्विद्वान्-
पंचगव्यंभवेत्ततः ॥ ६ ॥

अर्थ- पश्चात् गायत्री मंत्रानें गोमूत्र ग्रहण करून गंधद्वारा या मंत्रानें गोमय (गायीचेंशेण) घ्यावें. तसेंच आप्यायस्व या मंत्रानें दुग्ध, दधिक्राव्णो या मंत्रानें दधि, तेजोसि या मंत्रानें घृत, हीं एकत्र ताम्रपात्रांत करून त्यांत देवस्यत्वा या मंत्रानें दर्भ मिश्रित उदक घालावें. असें विद्वानानें विधिपूर्वक केलें असतां तें पंचगव्य होतें.

स्नाप्यार्च्यपंचगव्येनदध्नाशक्त्येनवैततः ॥ दधिक्राव्णो
तिमंत्रेणस्नापयेद्रत्नवारिणा ॥ ७ ॥

अर्थ- असें पंचगव्य सिध्द झाल्यानंतर त्यानें त्या देवास स्नान घालून पश्चात् दधिक्राव्णो या मंत्रानें केवल दधिस्नान घालून मगरत्नयुक्त उदकानें स्नान घालावें.

कुशांभसाततःस्नानंदेवस्यत्वेतिकारयेत् ॥ फलो-
दकेनचस्नानमग्नआयाहिकारयेत् ॥ ८ ॥

अर्थ- तदुत्तर दर्भयुक्त जलानें त्या देवास देवस्यत्वा या मंत्रानें स्नान घालून

अथ आयाहि या मंत्रें करून फलसहित उदकानें स्नान घालावें.

ततस्तुगंधतोयेनसावित्र्याचाभिमंत्रयेत्॥ ततोष्ट
टसहस्रेणसहस्रार्धेनवापुनः॥९॥

अर्थ- नंतर गायत्री मंत्रें करून अभिमंत्रित केलेल्या गंधोदकानें त्या-देवास स्नान घालून मग सहस्र कलशानीं स्नान घालावें. किंवा पांचशें कलशानीं त्या स्थापित मूर्त्तीस स्नान घालावें.

तस्याप्यर्धेनवाकुर्यात्सपादेनशतेनवा॥ चतुःषष्ट्या
ततोर्धेनतदर्धार्धेनवापुनः॥१०॥ चतुर्भिरथवाकु-
र्याद्घटानामल्पवित्तवान्॥ सौवर्णैराजतैर्वापिताम्रै-
र्वारीतिकोद्भवैः॥११॥ कांस्यैर्वापार्थिवैर्वापिस्नप-
नंशक्तितोभवेत्॥

अर्थ- तितकी ही शक्ति नसेल तर अडीच शें कलशानीं त्या देवास स्नान घालावें. अथवा सवाशें कलशानीं घालावें. आणि त्याचे ही अभावीं चौसष्ट किंवा बत्तीस, सोळा, आठ अथवा चार अशा घटानीं अल्पद्रव्यवानानें-त्या देवास महास्नान घालावें. परंतु ते देवाचे स्नान कलश स्वशक्त्यनुसार सुवर्ण किंवा रौप्य, ताम्र, पितळ, कांस्य अथवा मृत्तिका यांचे करवून देवास स्नान घालावें.

सहदेवीवचाव्याघ्रीबलाचातिबलातथा॥१२॥ शं
खपुष्पीतथासिंहीह्यष्टमीचसुवर्चला॥ महौषध्य
ष्टकंह्येतत्महास्नानेषुयोजयेत्॥१३॥

अर्थ- तशीच सहदेवी (लघुशतावरी) १, वचा (वेखंड किंवा अकलकारा) २, व्याघ्री (रिंगणी) ३, बला (चिकणा) ४, अतिबला (नागबला) ५, शंखपुष्पी (सारवेल) ६, सिंही (डोर्लीवांगी) ७, वसुवर्चला (जवसाचें झाड) ८ या अष्टमहौषधि देवाच्या या महास्नानाचे उदकांत घालाव्या.

यवगोधूमनीवारतिलश्यामाकशालयः॥ प्रियंगवो
व्रीहयश्चस्नानेषुपरिकल्पिताः॥१४॥

अर्थ- तसेच यव (सातु), गोधूम (गहूं), नीवार (देवभात), तिल, श्यामाक (सांवे), शालि (साळींतील भेद), प्रियंगु (राळे), व्रीहि (भात) हीं

धान्येंही त्या महास्नानोदकांत घालावीं.

स्वस्तिकं पद्मकं शंखमुत्पलं कमलं तथा ॥ श्रीवत्सं दर्पणं तद्वन्नंद्यावर्तमथाष्टकम् ॥ १५ ॥ एतानि गोमयैः कुर्यान्मृदा च शुभया ततः ॥ पंचवर्णादिकं तद्वत् पंचवर्णरजस्तथा ॥ १६ ॥ दूर्वाकृष्णतिलान्दद्यान्नीराजनविधिं ततः ॥ एवं नीराजनं कृत्वा दद्यादाचमनं बुधः ॥ १७ ॥ मंदाकिन्यास्तु तद्वारि सर्वपापापहं शुभम् ॥

अर्थ- नंतर स्वस्तिक १, पद्म २, शंख ३, कमल ४, सहस्र पाकळ्यांचें कमळ ५ श्रीवत्साकृति ६, दर्पण ७ व नंद्यावर्त नामक पुष्प किंवा अंतरपदाच्या शेल्यावरस गंधिद्रव्यानें काढलेली आकृति ८ हीं आठ, शुध्धमृत्तिकासहित गोमयानें करून पंचवर्णयुक्त ओदनादिक पदार्थ तसेंच पंचरंगमिश्रित रज (रांगोळी) तशाच दूर्वा व कृष्णवर्ण तिल हे सर्व पदार्थ एकत्र ठेवावे. आणि त्यावर अनेक दीप स्थापन करून त्यानीं त्या देवास नीराजन (आर्ती) करावें. असा हा आरार्तिक्य विधि झाल्यावर ज्ञात्यानें देवास आचमन द्यावें. त्याविषयीं सर्वपापहरण करणारें भागीरथीचें शुभकारक उदक असावें तें नसेल तर हा मंत्र म्हणावा.

ततो वस्त्रयुगं दद्यान्मंत्रेणानेन यत्नतः ॥ १८ ॥ देवसूत्रसमायुक्ते यज्ञदानसमन्विते ॥ सर्ववर्णे शुभे देववाससी ते विनिर्मिते ॥ १९ ॥

अर्थ- नंतर त्या स्थापित देवास वस्त्रद्वय, देवसूत्रसमायुक्ते या, पुढील मंत्रानें प्रयत्नें करून अर्पण करावें. या मंत्राचा अर्थ असा कीं देवाच्याच उद्देशानें काढलेल्या सूत्रानें (सूत) निर्माण केलेलीं व यज्ञांतील मुख्य दानभूत दक्षिणायुक्त असून केशरादि सुगंधि द्रव्य सुवासित अशीं हीं तेजःपुंज उत्तम वस्त्रें हे देवा तुम्हासच परिधानार्थ मयासानें निर्माण केलीं आहेत तर ती आपण यांचा अंगीकार करावा.

ततस्तु चंदनं दद्यात् समं कर्पूरकुंकुमैः ॥ इममुच्चारयेन्मंत्रं दर्भपाणिः प्रयत्नतः ॥ २० ॥ शरीरं ते न जानामि चेष्टां नैव च नैव च ॥ मया निवेदितान्गंधान्प्रतिगृह्य विलिप्यताम् ॥ २१ ॥

अर्थ- पश्चात् स्थापक आचार्यांनें स्व हस्तांत दर्भ पवित्र असून कर्पूर व कुंकुम (केशर) एतद्युक्त चंदन, प्रयत्नानें शरीरंते हा पुढील मंत्र उच्चारण करून त्यास्थापित देवास समर्पण करावें; या मंत्राचा अर्थ असाकीं, हे देवा तुझें स्वरूप व लीला इत्यादिक प्रकारसर्वथामीजाणत नाहीं. परंतु मी यथामति निवेदन केलेलें हें गंधस्वीकारून आपण आपले स्वरूपास लेपन करावें.

चत्वारिंशत्ततोदीपान्दद्याच्चैवप्रदक्षिणान् ॥त्वंसूर्य-
चंद्रज्योतींषिविद्युदग्निस्तथैवच ॥२२॥त्वमेवसर्वज्यो-
तींषिदीपोयंप्रतिगृह्यताम् ॥

अर्थ- नंतर त्वंसूर्यचंद्रज्योतींषि या मंत्रानें त्या देवाच्या आसमंताद्भागीं प्रदक्षिणा कार चाळीस दीप लावावे. त्या मंत्राचा अर्थ असाकीं, हे देवा, आपण च सूर्य, चंद्र, सकल नक्षत्रें, विद्युल्लता, अग्नि व तसेंच प्रकाश मय स्वरूप सर्व देव या संपूर्ण रूपानीं सर्वत्र व्याप्त आहांत तथापी मीं अर्पण केलेला हा दीप आपण कृपादृष्टीनें ग्रहण करावा.

ततस्त्वनेन मंत्रेणधूपंदद्याद्विचक्षणः॥२३॥ वनस्पति
रसोदिव्योगंधाढ्योगंधउत्तमः॥ मयानिवेदितोभक्त्या-
धूपोयंप्रतिगृह्यताम् ॥ २४ ॥

अर्थ- तदुत्तर त्या ज्ञानसंपन्न आचार्यांनें वनस्पतिरसोदिव्यो हा मंत्र म्हणून त्या देवास धूप अर्पण करावा. त्या मंत्राचा अर्थ असाकीं, वनस्पतींचा उत्तम रस असल्या मुळें सुगंध युक्त आहे. त्या योगानें हा धूप उत्कृष्ट स्रुवासिक आहे यास्तव असाहाश्रेष्ठ धूपमीं भक्तीनें तुम्हांस निवेदन केला आहे याचा आपण अंगीकार करावा.

ततस्त्वाभरणंदद्यान्महाभूषायतेनमः॥ अनेनविधि
नाकृत्वासप्तरात्रंमहोत्सवम् ॥ २५ ॥

अर्थ- पश्चात् हे देवा आपण स्वरूपतःच महान् भूषणरूप आहां तुम्हास नमस्कार असो असें म्हणून त्या देवास स्वशक्त्यनुसार एक आभरण समर्पण करावें. अशा पूर्वोक्त महाभिषेक स्नान पूर्वक सर्व विधीनें त्या देवाचा महोत्सव, स्थापनादिवसा पासून सात दिवस करावा.

देवकुंभैस्ततः कुर्याद्यजमानोभिषेचनम् ॥ चतुर्भिर-

ष्टभिर्वापिद्वाभ्यामेकेनवापुनः ॥ २६ ॥ सपंचरत्नकल-
शैः सितवस्त्राभिवेष्टितैः ॥ देवस्यत्वेतिमंत्रेणसाम्नाचा
थर्वणेनच ॥ २७ ॥ अभिषेकेचयेमंत्रानवग्रहमखेस्मृताः ॥

अर्थ- पुढें अष्टम दिवशीं देवस्थापकमुख्य आचार्यादिक ब्राम्हणां कडून पूर्वीं देवाच्या महाभिषेक स्नानार्थ स्थापित केलेले शुभ्र वस्त्र वेष्टित पंचरत्न-युक्त सकल कलश अथवा आठ, चार, दोन किंवा एक अशा त्या कलशांतील देवाच्या अभिषेक शेषोदकें करून यजमानानें आपणास त्या आचार्यादिक-ब्राम्हणां कडून अभिषेक करून घ्यावा; त्या कालीं देवस्यत्वा हा मंत्र तसेच साम व अथर्वण या वेदांतील मंत्र आणि नवग्रह मखांतील जे मंत्र अभिषेका विषयीं उक्त आहेत ते सर्व मंत्र त्या ब्राम्हणानीं म्हणावे.

सितांबरधरः स्नात्वा देवान् संपूज्ययत्नतः ॥ २८ ॥ स्था
पकंपूजयेद्भक्त्या वस्त्रालंकारभूषणैः ॥

अर्थ- असें स्नान झाल्यावर त्यानें शुभ्र वस्त्रें परिधान करून अधिवासनांग भूत स्थापित देवतांचें प्रयत्न पूर्वक उत्तम रीतीनें पूजन करून त्यांचें विसर्जन करावें. पश्चात् देवस्थापक मुख्य आचार्यास भक्तिपुरःसर वस्त्रें, अलंकार व भूषणें यानीं पूजित करावें.

यज्ञभांडानिसर्वाणिमंडपोपस्करादिकम् ॥ २९ ॥-
यच्चान्यदपिसद्गेहे तदाचार्यायदापयेत् ॥ स्कप्रसन्नेगु
रौयस्मात्तुष्यंतेसर्वदेवताः ॥ ३० ॥

अर्थ- नंतर त्या देवार्च्चारूप यज्ञांतील सर्व भांडीं, मंडप व अवांतर उपसाहित्यादिक पदार्थ तसेच त्या अर्च्चा मंदिरांत जे इतर पदार्थ असतील; ते सर्वही त्या मुख्य आचार्यास द्यावे; कारण तो देवस्थापक आचार्य स्कप्रसन्न झाला असतां सर्व देवता संतुष्ट होतात.

नैतद्दुःशीलेनचदांभिकेननलिंगिनास्थापनमत्र-
कार्यम् ॥ विप्रेणकार्यंश्रुतिपारगेणगृहस्थधर्मा-
भिरतेननित्यम् ॥ ३१ ॥

अर्थ- तसेंच हें देवतास्थापन, दुष्टशील युक्त, दांभिक, निषिद्धाश्रमांतील दीक्षाधारक अशा पुरुषानें करूं नये. आणि वेद पारंगत असून निरंतर गृहस्था

श्रमधर्म तत्पर अशा ब्राम्हणा कडून करवावी.

पाखंडिनंयस्तुकरोतिभक्त्याविहायविप्रान्श्रुतिध-
र्मयुक्तान् ॥ गुरुंप्रतिष्ठादिषुतत्रनूनंकुलक्षयःस्यादचि
रादपूज्यः ॥ ३२ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें श्रुतिविहित धर्मयुक्त ब्राम्हणांचा त्याग करून जो यजमान भक्तीनें देवस्थापने विषयीं पाखंडि मार्गस्थास देवस्थापनादि कर्मांत आचार्य करतो. त्यास्थानीं निश्चयें करून यजमानाचा कुलक्षय होऊन तो सर्व लोकांत अमान्य होतो.

स्थानंपिशाचैः परिगृह्यतेवा अपूज्यतांयात्यचिरेण-
शोकः ॥ विप्रैःकृतंयच्छुभदंकुलेस्यात्प्रपूज्यतांया
तिचिरंचकालम् ॥ ३३ ॥

अर्थ- आणि तेथें देवता सान्निध्य न झाल्यामुळें तें स्थान पिशाच गणग्रहण करतात. किंवा तें स्थान त्वरितच अपूज्य तेस प्राप्त होतें व यजमानादिकांस शोक होतो. आणि पूर्वोक्त गुणसंपन्न ब्राम्हणानीं देवस्थापना केली असतां, ती यजमानादिकांच्या कुलास शुभदायक होऊन तें देवस्थान लोकांत बहुत काल पर्यंत अत्यंत पूज्यत्वास प्राप्त होतें. इतिश्री मत्स्यपुराणे देवतास्नानसमाप्तिर्नाम सप्तषष्ठ्युत्तर द्विशततमोध्यायः ॥ २६७ ॥

अध्याय २६८ वा.

ऋषय ऊचुः ॥ प्रासादाः कीदृशाः सूतकर्तव्याभूति
मिच्छता ॥ प्रमाणंलक्षणंतद्वद्विस्तरतोधुना ॥ १ ॥

अर्थ- शौनकादिक ऋषि प्रश्न करितात हे सूता, आपणास संपत्ति प्राप्तीची इच्छा करणारानें प्रासाद (देवालयें) कशा आकृतीचे करावे. तसेंच त्यांचें प्रमाण व लक्षण कसें असावें तें या कालीं आम्हास विस्तरानें कथन कर.

सूतउवाच ॥ अथातःसंप्रवक्ष्यामिप्रासादविधिनि
र्णयम् ॥ वास्तोपरीक्षितेसम्यग्वास्तुदेहविचक्षणः
॥ २ ॥ वास्तूपशमनंकुर्यात्समिद्भिर्बलिकर्मणा ॥-
जीर्णोद्धारेतथोद्यानेतथागृहनिवेशने ॥ ३ ॥ नव
प्रासादभवनेप्रासादपरिवर्तने ॥ द्वाराभिवर्तनेतद्व-

त्प्रासादेषुगृहेषुच ॥ ४ ॥ वास्तूपशमनंकुर्यात्पूर्वमे
वविचक्षणः ॥

अर्थ - ते समयीं सूत म्हणतात ऋषीहो, मी या पुढें तुम्हास देवमंदिराच्या रचनेचा निर्णय कथन करतों तो असाकीं, वास्तुस्वरूपाभिज्ञ पुरुषानें पूर्वी उत्तम रीतीनें परीक्षा केलेल्या वास्तुस्थानीं समिधायुक्त बलि कर्मानें वास्तु शांति करावी. ही जीर्णोद्धार तसेंच उद्यान (क्रीडावन), गृहरचना, नवीन प्रासाद (देवालय किंवा राजमंदिर) रूप भवन, प्रासाद संबंधि कांहीं भागानें न्यूनाधिक्य अथवा दिशाभेदानें फिरविणें, आणि प्रासाद व गृहें यांचें द्वार फिरविणें या सर्व कार्यां विषयीं विचक्षण पुरुषानें प्रथमतःच वास्तु शांति करावी.

एकाशीतिपदंलिख्यवास्तुमध्येचपृष्ठतः ॥ ५ ॥ हो
मस्त्रिमेखलेकार्यः कुंडे हस्तप्रमाणके ॥

अर्थ - नंतर त्या वास्तुभूमीमध्यें पूर्वींच्या वास्तु प्रकरणोक्त रीतीनें रेघा-सडकून एक्यायशीं भाग करावे. आणि त्या वास्तु पुरुषाच्या पृष्ठभागावर - त्रिमेखलायुक्त एकहस्त प्रमाण परिमित कुंडांत होम करावा.

यवैःकृष्णतिलैस्तद्वत्समिद्भिः क्षीरवृक्षजैः ॥ ६ ॥ पा
लाशैरवादिरैश्चापिमधुसर्पिसमन्वितैः ॥ कुशदूर्वा
मयैर्वापिमधुसर्पिसमन्वितैः ॥ ७ ॥ कार्यस्तु पंच-
भिर्बिल्वैर्बिल्वबीजैरथापिवा ॥

अर्थ - तो असाकीं, सातु, काळे तीळ तसेंच चीक निघणारे औदुंबरादि क वृक्ष, पळस, खैर यांच्या समिधा, मध व घृत यानीं लिप्त दर्भ, दूर्वा, पंच बिं-ल्वकिंवात्यातीलब्यायानीं तो पूर्वोक्त होम करावा.

होमांतेभक्ष्यभोज्यैस्तुवास्तुदेशेबलिंहरेत् ॥ ८ ॥
तद्वद्विशेषनैवेद्यमेवंदद्यात्क्रमेणतु ॥

अर्थ - असा होम झाल्यावर अनेक भक्ष्य व भोज्य पदार्थानीं वास्तुपुरुषा-च्या स्थापन प्रदेशीं बलि अर्पण करावा. पश्चात् तसाच पक्वान्नादि कांचा

---

*टीप पांचबेलफळें.

महान् नैवेद्य ही त्यास्थलीं अशा क्रमानें निवेदन करावा.

ईशाकोणेघृतान्नंतुशिखिनेविनिवेदयेत् ॥ ९ ॥ ओ
दनंसफलंदद्यात्पर्जन्यायघृतान्वितं ॥ जयायच-
ध्वजान्पीतान्पैष्टंकूर्मंचसंन्यसेत् ॥ १० ॥

अर्थ- त्या बलिदानाचा प्रकार असा कीं, ईशान्य कोणावर घृतमिश्रित अन्न निवेदन करावें. तसाच फलसहित घृतयुक्त ओदन पर्जन्य देवतेस द्यावा. आणि पीत वर्णध्वज व पिष्टाचा कूर्म (कांसव) हे जयनामक देवास अर्पण करावे.

इंद्रायपंचरत्नानिपैष्टंचकुलिशंतथा ॥ वितानकंच
सूर्यायधूम्रसक्तुंतथैवच ॥ ११ ॥

अर्थ- तशींच पंचरत्नें व पिष्टाचें वज्र हीं इंद्रास समर्पण करावीं. तसाच सूर्यास चांदवा द्यावा. व सातु, धूम्र नामक देवतेस द्यावे.

सत्यायघृतगोधूमंमत्स्यंदद्याद्भृशायच ॥ शष्कुली-
श्चांतरिक्षायदद्यात्सक्तुंश्चवायवे ॥ १२ ॥

अर्थ- तसेच घृतसहित गोधूम सत्यनामक देवास निवेदन करून भृशनांवाच्या देवतेला मत्स्य अर्पण करावा. आणि अंतरिक्ष नामक देवास शष्कुली (करंज्या) अर्पाव्या व वायूस सातु समर्पावे.

लाजाःपूष्णेतुदातव्याःवितथेचणकौदनम् ॥ गृहक्षता
यमध्वन्नंयमायपिशितौदनम् ॥ १३ ॥

अर्थ- तशाच लाजा (लाह्या) पूषानांवाच्या आदित्यास देऊन वितथ नामक देवास चणक (हरभरे) मिश्रित ओदन अर्पण करावा. तसेंच गृहक्षतनांवाच्या देवतेला मधयुक्त अन्न समर्पण करून यमास जटामांसी नामक वनस्पति सहित ओदन निवेदन करावा.

गंधौदनंचगंधर्वेभृंगराजस्यभृंगिकाम् ॥ मृगाययाव
कंदद्यात्पितृभ्यः कृसरामता ॥ १४ ॥

अर्थ- तसाच गंधयुक्त ओदन गंधर्वास अर्पण करून भृंगराजनामक देवतेला भृंगिराज पत्रें समर्पण करावीं. तसेंच मृगास यावक (सातूंची अंबील) देऊन पितरांस कृसरा (तीळ व तांदूळ यांच्या मिश्रणानें पक्वान्न) हीं द्यावीं.

दौवारिके दंतकाष्ठं पैष्टं कृष्णबलिं तथा ॥ सुग्रीवे पुष्पकं द-
द्यात् पुष्पदंताय पायसम् ॥ १५ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें दौवारिक नामक देवास दंतकाष्ठ व पिष्टाचा (पीठ) कृष्णव-
र्ण बलि समर्पण करून सुग्रीवास पुष्पक व पुष्पदंतास पायस अशीं द्यावीं.

कुशस्तंबेन संयुक्तं तथा पद्मं च वारुणम् ॥ पिष्टं हिरण्मयं
दद्यादसुराय सुरामलं ॥ १६ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें वरुणास दर्भाच्या झुपक्यासहित सुवर्ण कमल व पिष्ट-
हीं द्यावीं. आणि असुर नामक देवतेला सुरा द्यावी.

घृतौदनं च शोषाय यवान्नं पापयक्ष्मणे ॥ घृतलड्डुकांस्तु
रोगाय नागे पुष्पफलानि तु ॥ १७ ॥

अर्थ- तसाच घृतयुक्त ओदन शोष नांवाच्या देवास निवेदन करून पापयक्ष्म ना
मक देवतेला यव (सातु) मिश्रित अन्न द्यावें. तसेंच घृतपाचित लड्डुक (लाडू) रो
ग नामक देवतेस अर्पण करावे. आणि नागदेवतेला पुष्पें व फलें हीं द्यावीं.

सर्पिर्मुख्याय दातव्यं मुद्गौदनमतः परम् ॥ भल्लाटस्था
नके दद्यात्सोमाय घृतपायसम् ॥ १८ ॥

अर्थ- तसेंच मुख्य नामक देवास घृत द्यावें. त्यापुढें भल्लाट देवाच्या स्थानीं मु-
द्गान्न (खिचडी) निवेदन करून सोमास घृतमिश्रित पायस द्यावें.

भगाय शालिकं पिष्टमदित्यै पोलिकास्तथा ॥ दित्यै तु
पूरिका दद्याद्दिस्येवं बाह्यतो बलिः ॥ १९ ॥

अर्थ- आणि भगास शालि (साळी) पिष्ट तशाच अदितीला पोलिका
(पोळ्या) व दितीला पूरिका (पुऱ्या) असाल्या एक्यायशीं स्थानांतील
बाह्य भागांवर बलि द्यावा.

क्षीरं यमाय दातव्यमापवत्साय वै दधि ॥ सावित्रे ल-
ड्डुकान्दद्यात्समरीचं कुशौदनम् ॥ २० ॥

अर्थ- तसाच आंतील भागचे देवतास्थानीं देण्याच्या बलीचा प्रकार अ-
साकीं, यमास दुग्ध, आपवत्स नामक देवास दधि, हीं देऊन सावित्र नामक दे
वास लड्डुक, मरीच (मिरच्या किंवा मिर्च्यें) सहित दर्भयुक्त ओदन हे पदार्थ
समर्पण करावे.

सवितुर्गुडपूपांस्तुजयायघृतचंदनम् ॥ विवस्वतेपु
नर्दद्याद्रक्तचंदन पायसम् ॥ २१ ॥

अर्थ- तसेच सूर्यास गुडयुक्त अपूप, जयास घृतसहित चंदन आणि विवस्वानास पुनः रक्तचंदनासह पायस असेहे पदार्थ अर्पण करावे.

हरितालौदनंदद्यादिंद्रायघृतसंयुतम् ॥ घृतौदनंचमि
त्रायरुद्रायघृतपायसम् ॥ २२ ॥

अर्थ- तसाच इंद्रास हरिताल सहित घृतयुक्त ओदन, मित्रदेवास घृतमिश्रित ओदन व रुद्रास घृतयुक्त पायस असेहे पदार्थ निवेदन करावे.

आमंपक्वंतथामासंदेयंस्याद्राजयक्ष्मणे ॥ पृथ्वीधरायमां
सानिकूष्मांडानिचदापयेत् ॥ २३ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें राजयक्ष्म नामक देवतेला आम (अपक्व) व पक्व असें दोन्हीं प्रकारचें मांस द्यावें. आणि पृथ्वीधरास मांससहित कूष्मांडें (कोहोळीं) द्यावीं.

शर्करापायसंदद्यादर्यम्णेपुनरेवहि ॥ पंचगव्यंयवांश्चै-
वतिलाक्षतमयंचरुम् ॥ २४ ॥

अर्थ- तसेंच शर्करायुक्त पायस अर्यम्ण नामक पितरास समर्पण करून पुनः पंचगव्य, सातु व तिलाक्षता मिश्रित चरूही त्यास द्यावा.

भक्ष्यंभोज्यंचविविधंब्रम्हणेविनिवेदयेत् ॥ एवंसंपू-
जितादेवाःशांतिंकुर्वंतितेसदा ॥ २५ ॥

अर्थ- आणि अनेक प्रकारचें भक्ष्य, भोज्य अन्न, मुख्यमध्यस्थान स्थापित ब्रम्हदेवास विशेषें करून निवेदन करावें. असेते देव उत्तम रीतीनें पूजित केले असतां, ते त्यास्थानीं सर्वदा सर्वानिष्ट शांति करतात.

सर्वेभ्यःकांचनंदद्याद्ब्रम्हणेगांपयस्विनीम् ॥ राक्षसी-
नांबलिर्देयोअपियादृक्तथाशृणु ॥ २६ ॥

अर्थ- तसेंच या ब्रम्हादि सकल वास्तुदेवतांस सुवर्ण दान करून ब्रम्हदेव मीत्यर्थ बहु दुग्ध संपन्न एक गोप्रदान करावें. आतां त्यास्थलीं राक्षसींस ज्या रीतीनें बलि द्यावयाचा आहे तो प्रकार श्रवण कर.

मांसौदनंघृतंपद्मकेसररुधिरान्वितम् ॥ ईशानभागमा
श्रित्यचरक्यैविनिवेदयेत् ॥ २७ ॥

अर्थ - तसाच मांस सहित ओदन, घृत व रक्तयुक्त कमलरज हे पदार्थ, ईशान दिग्भागाचा आश्रय करून वर्तणाऱ्या चरकी नामक राक्षसीला निवेदन करावे.

मांसौदनंचरुधिरंहरिद्रौदनमेवच ॥ आग्नेयींदिशमाश्रित्यविदार्यैविनिवेदयेत् ॥ २८ ॥

अर्थ - आणि मांस व हरिद्रा (हळद) यानीं युक्त असा ओदन, आग्नेयी दिशेचा आश्रय करून राहिलेल्या विदारी नांवाच्या राक्षसीला अर्पण करावा.

दध्योदनंसरुधिरमस्थिखंडैश्चसंयुतम् ॥ पीतरक्तंबलिंदद्यात्पूतनायैसरक्षसे ॥ २९ ॥

अर्थ - त्याच प्रमाणें रक्त व अस्थिखंडें यांसहित असून पीत व आरक्त, अशा वर्णानीं युक्त दधि मिश्रित ओदन बलि, राक्षस सहित पूतनेला द्यावा.

वायव्यांपापराक्षस्यैमत्स्यमांसंसुरासवम् ॥ पायसंचापिदातव्यंस्वनाम्नासर्वतःक्रमात् ॥ ३० ॥ नमस्कारांतयुक्तेनप्रणवाद्येनसंयुतः ॥

अर्थ - तसेंच मत्स्यसहित मांस व सुरायुक्त मद्य हीं पापराक्षसीला वायव्य दिशेस निवेदन करावें आणि पायस हें सर्वत्र त्या सर्व देवतांस त्यांच्या स्वनाम मंत्रानीं क्रमानें अपर्ण करावें. त्याविषयीं त्या नाममंत्रांस अंतीं नमस्कार व आरंभीं प्रणव ही योजावा.

ततःसर्वौषधीस्नानंयजमानस्यकारयेत् ॥ ३१ ॥ द्विजान्संपूजयेद्भक्त्याद्येचान्येगृहमागताः ॥ एतद्वास्तूपशमनंकृत्वाकर्मसमारभेत् ॥ ३२ ॥

अर्थ - नंतर मुख्य आचार्यादिक ऋत्विजानीं पूर्वोक्त सर्व ओषधि युक्त उदकानें यजमानाकडून स्नान करवावें. पश्चात् यजमानानें ते आचार्यादिक ब्राम्हण व अन्यही जे याच कत्या गृहास आले असतील त्यांची भक्तीनें दान मानादिकें करून उत्तम पूजा करावी. हें वास्तुशांति कर्म करून मगत्यास्थानीं शुभ कर्मास आरंभ करावा.

प्रासादभवनोद्यानप्रारंभेविनिवर्तने ॥ पुरवेश्मप्रवेशेषुसर्वदोषापनुत्तये ॥ ३३ ॥ रक्षोघ्नपावमानेनसूक्ते-

नभवनादिकम् ॥ नृत्यमंगलवाद्येन कुर्याद्ब्राम्हण-
वाचनम् ॥ ३४ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें प्रासाद (देवालय व राजमंदिर) सामान्यगृह, उद्यान (राजादिकांचें क्रीडावन) यांच्या रचनेचा आरंभ किंवा त्यांत कांहीं उलट पालट करणें तसेंच नगर व नवीन गृह यांतील अपूर्व प्रवेश यांविषयींच्या सर्व दोष परिहारार्थ अशा विधीनें वास्तु शांति करून रक्षोघ्न (राक्षस नाशक) सूक्तें व पवमान सूक्त यांचें पठन करीत त्या गृहादिक स्थानांस सूत्रानें (सूत) वेष्टन करावें. आणि त्यास्थलीं ब्राम्हणां कडून पुण्याहवाचन करावें. त्याकालीं तेथें नृत्य व मंगल वाद्यें यांचा समारंभ होत असावा.

अनेनविधिनायस्तुप्रतिसंवत्सरंबुधः ॥ गृहेवाय
तनेकुर्यान्नसदुःखमवाप्नुयात् ॥ ३५ ॥

अर्थ- अशाविधीनें प्रतिसंवत्सरीं जो ज्ञाता स्वकीय गृह व देवालयादि- स्थान यांत वास्तु शांति करील तर वास्तुसंबंधानें त्यास दुःख प्राप्त होणार नाहीं.

नचव्याधिभयंतस्यनचबंधुधनक्षयः ॥ जीवेद्वर्षश
तंस्वर्गेकल्पमेकंचतिष्ठति ॥ ३६ ॥

अर्थ- तसेंच त्यास व्याधिभय, बंधु व धन यांचा क्षयही अनिष्टें प्राप्त होणार नाहींत. आणि तो याला की पूर्ण शतवर्षे जिवंत राहून देहांतीं एक कल्प पर्यंत स्वर्गलोकांत वास करतो. इतिश्री मत्स्यपुराणे सर्व वास्तूपशमनो नामअष्ट षष्ट्युत्तर द्विशततमो ऽध्यायः ॥ २६८ ॥

अध्याय २६९ वा.

सूतउवाच ॥ एवंवास्तुबलिंकृत्वाभजेत्षोडशभा-
गिकम् ॥ तस्यमध्येचतुर्भिस्तुभागैर्गर्भंतुकारयेत् ॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषीहो, या पूर्वोक्त रीतीनें वास्तु संबंधि बलि कर्म करून त्या प्रासादांत (देवालय) सोळा भाग करावे. आणि त्याच्या मध्यम देशीं चारभागांत देवाचा गर्भ (गाभारा) करावा.

भागद्वादशकंसार्धंततस्तुपरिकल्पयेत् ॥ चतुर्दिक्

तथाज्ञेयंनिर्गमंतुततोबुधैः ॥२॥

अर्थ- तसेच त्या गर्भाच्या आससंतात् समान बाराभाग कल्पावे. आणिज्ञा त्यानीं त्या प्रासादांतून बाहेर निघण्यासाठीं चार दिशांस चारद्वारें करावीं.

चतुर्भागेनभित्तीनामुच्छ्रायःस्यात्प्रमाणतः॥ द्विगुणःशिखरोच्छ्रायोभित्त्युच्छ्रायानुमानतः॥३॥

अर्थ- त्याच प्रमाणें गाभाऱ्याचे द्वारांच्या उंची पेक्षां बाह्य भिंती चतुर्गुणित उंच असून त्या बाह्य भिंतीच्या उंचीचे प्रमाणा पेक्षां शिखराची उंची द्विगुणित असावी.

शिखरार्धस्यचार्धेनविधेयातुप्रदक्षिणा॥ गर्भसूत्रद्वयंचाग्रेविस्तारोमंडपस्यतु॥४॥

अर्थ- तशीच त्या देवालयांतील प्रदक्षिणांतर शिखराच्या उंचीचे चतुर्थांशानें करावी. आणि गाभाऱ्याच्या अग्रभागीं कर्तव्य मंडपाचा विस्तार त्या गर्भसूत्राच्या द्विगुणित मानानें युक्त असावा.

आयतःस्यात्त्रिभिर्भागैर्भद्रयुक्तःसुशोभनः॥ पंचभागेनसंभज्यगर्भमानंविचक्षणः॥५॥ भागमेकंगृहीत्वातुप्राग्ग्रीवंकल्पयेद्बुधः॥ गर्भसूत्रसमाद्भागादग्रतोमुखमंडपः॥६॥

अर्थ- तसाच तो मंडप गर्भसूत्रापेक्षां त्रिगुणित प्रमाणानें लंबायमान व सर्वतो भद्राकृतीनें युक्त असून सुशोभित करावा. तसेच ज्ञात्यानें गाभाऱ्याचे पांच विभाग करून त्यांतील एक विभाग घेऊन त्यानें त्या गाभाऱ्याचें द्वार, पूर्वदिशेस समांतर मध्यभागीं करावें. आणि गर्भसूत्राच्या समान भागानें अग्रभागीं थोरल्या मंडपांत जाण्याविषयीं द्वारभूत लहान मंडप करावा यास मुखमंडप म्हणतात.

एतत्सामान्यमुद्दिष्टंप्रासादस्येहलक्षणम्॥ तथान्यंतुप्रवक्ष्यामिप्रासादंलिंगमानतः॥७॥

---

* दीप गाभाऱ्याला लागून जी एक किंवातीन दालनी जागा बांधलेली असते ती.

अर्थ- असें हें प्रासादाचें सामान्य लक्षण मीं येथें वर्णिलें. तसाच आतां-मूर्तीच्या मानानुसार अन्य प्रासाद कथन करतों.

लिंगपूजाप्रमाणेन कर्तव्या पीठिका बुधैः॥ पिंडिकार्धे विभागः स्यात्तन्मानेन तु भित्तयः॥८॥

अर्थ- तो असा कीं, ज्ञात्यांनीं प्रतिमेच्या कर्तव्य पूजानुरूप देवाचें सिंहासन करावें. आणि सिंहासनाचा अर्धा विभाग पूजासाहित्य स्थापनार्थ मोकळा ठेवावा. व सिंहासनाच्या रुंदीचे मानानें देवालया संबंधि भिंतींची रुंदी करावी.

बाह्यभित्तिप्रमाणेन उत्सेधस्तु भवेत्पुनः॥ भित्त्युच्छ्रायात्तु द्विगुणः शिखरस्य समुच्छ्रयः॥९॥

अर्थ- तसाच बाह्यभिंतीच्या उंचीचे प्रमाणानें गाभाऱ्या संबंधि भिंतींची उंची करावी. आणि त्या भिंतीच्या उंची पेक्षां शिखराची उंची द्विगुणित असावी.

शिखरस्य चतुर्भागात्कर्तव्या प्रदक्षिणा॥ प्रदक्षिणायास्तु समस्त्वग्रतो मंडपो भवेत्॥१०॥

अर्थ- तशीच देवाची प्रदक्षिणा शिखराच्या उंचीचे चतुर्थांश मानानें करावी. आणि प्रदक्षिणेच्या प्रमाण सूत्रा समान अग्रभागचा मंडप करावा.

तस्य चार्धेन कर्तव्यस्त्वग्रतो मुखमंडपः॥ प्रासादान्निर्गतौ कार्यौ कपालौ गर्भमानतः॥११॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या मंडपाच्या अर्ध प्रमाणानें अग्रभागीं त्या मोठ्या मंडपांत जाण्यास द्वारभूत लहान मंडप करावा त्यास मुखमंडप म्हणतात आणि देवालयांतून बाह्य भागीं निघालेले दोन गवाक्षाकृति भाग करावे; व त्यांचें मान गाभाऱ्याच्या प्रमाणानुरूप असावें.

ऊर्ध्वं भित्त्युच्छ्रयात्तस्य मंजरीं तु प्रकल्पयेत्॥ मंजर्याश्चार्धभागेन शुकनासां प्रकल्पयेत्॥१२॥

---

* ते शिखरांतील शुकनासाकृतीच्या दोन्ही बाजूंस करावे.

अर्थ- तशीच देवालया संबंधि गाभाऱ्याच्या भिंतींच्या उंचीचे ऊर्ध्वभागीं मंजिरी करून त्याचे वरील भागीं शुकनासिकाकृति करावी तिचें प्रमाण- मंजरीच्या अर्ध भागानें असावें.

ऊर्ध्वंतथार्धभागेनवेदीबंधोभवेदिह ॥ वेद्याश्चोप- रियच्छेषंकंठश्चामलसारकः ॥ १३ ॥

अर्थ- तसाच त्या शुकनासेच्या उपरिभागच्या स्थानीं अर्धभागानें वेदीबंध करावा. आणि त्या वेदीचे वर जो अवशिष्ट भाग राहील त्यास्थलीं कंठाकृति करावी. ती आसमंताद्भागानें येणाऱ्या मलाचें निवारण करण्या विषयीं योग्य असावी.

एवंविभज्यप्रासादंशोभनंकारयेद्बुधः ॥ अथान्यच्च प्रवक्ष्यामिप्रासादस्येहलक्षणम् ॥ १४ ॥

अर्थ- असे विभाग करून ज्ञात्यानें सुशोभित देवमंदिर, शिल्पीच्या हस्ता नें सिद्ध करवावें. या नंतर देवालयाचें अन्य रीतीनें लक्षण येथें कथन करतों.

गर्भमानप्रमाणेनप्रासादंशृणुतद्विजाः ॥ विभज्यन वधागर्भंमध्येस्याल्लिंगपीठिका ॥ १५ ॥

अर्थ- तर आतां ब्राम्हण हो, प्रासाद, गाभाऱ्या संबंधि मानाच्या प्रमा णानुसार श्रवण करा. तो असा कीं, गाभाऱ्याचे नऊ विभाग करून मध्य भागीं देवाचें सिंहासन स्थापन करावें.

पादाष्टकंतुरुचिरंपार्श्वतःपरिकल्पयेत् ॥ मानेन तेनविस्तारोभित्तीनांतुविधीयते ॥ १६ ॥

अर्थ- आणि त्या सिंहासनास दोन्ही बाजूंस मिळून सुंदर आकृति युक्त आठ पाय करावे. व त्या सिंहासनाच्या रुंदीचे मानानें देवालयां संबंधि- भिंतींची रुंदी असावी.

पादंपंचगुणंकृत्वाभित्तीनामुच्छ्रयोभवेत् ॥ स १७

---

* त्या शुकनासिका कृतीच्या अधोभागीं मुखाकृति जाळी करावी. म्हणजे त्यांतून सूर्यप्रकाशमूर्तीचे मुखावर पडून बरोबर मान्ची साधनाचा अनुभव येतो.

* २सभो वतीं ओट्या सारखा गलथा बांधावा.

* कळसाच्या खालचे बाजूस करावी.

वशिखरस्यापिद्विगुणःस्यात्समुच्छ्रयः ॥ १७ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें सिंहासनाच्या एकापायाची पांच पटकरून तितकीच भिंतींची उंची करावी. आणि त्या उंचीच्या द्विगुणित मानानें शिखराची उंची असावी.

चतुर्धाशिखरंभज्यअर्धभागद्वयस्यतु ॥ शुकनासंप्र कुर्वीतत्तृतीयेवेदिकामता ॥ १८ ॥

अर्थ- तसेच त्या शिखराचे चारभाग करून त्यांतील भागद्वय रूप अर्धाची शुकनासिकाकृति करावी. आणि वरील तृतीय भागांत वेदिका (ओटा) करावी.

कंठमामलसारंतुचतुर्थेपरिकल्पयेत् ॥ कपालयो- स्तुसंहारोद्विगुणोत्रविधीयते ॥ १९ ॥

अर्थ- व चतुर्थ भागांत कंठ करावा; तो आसमंतात् प्राप्त होणाऱ्या मलाचे निवारणा विषयीं समर्थ असावा. आणि त्यास्थली दोन्ही बाजूंस गालाकृतींची रचना द्विगुणित प्रमाणानें करावी.

शोभनैः पत्रवल्लीभिरंडकैश्चविभूषितः ॥ प्रासादोयं तृतीयस्तुमयातुभ्यंनिवेदितः ॥ २० ॥

अर्थ- तशीच सुशोभित पत्रें (पत्ती) वेल व अंडक* यानीं देवालय विशेषें करून भूषित करावें. असाहा प्रासाद संबंधी तृतीय प्रकार हे राजा, मीं तुला निवेदन केला.

सूत उवाच ॥ सामान्यमपरंतद्वत्प्रासादंशृणुत द्विजाः ॥ त्रिभेदंकारयेत्क्षेत्रंयत्रतिष्ठंतिदेवताः ॥ २१ ॥

अर्थ- सूत म्हणतात ब्राम्हणहो, तसाच आतां अन्यसामान्य प्रासाद श्रवण करा; तो असाकीं, त्या देवालय रचनेच्या क्षेत्राचे तीन भाग करावे; म्हणजे त्यास्थानीं सकल देवता वास करतात.

रथांकस्तेनमानेनबाह्यभागविनिर्गतः ॥ नेमीपादेन- विस्तीर्णाप्रासादस्यात्समंततः ॥ २२ ॥

---

* कळस अथवा अंडाकृति वर्तुल लहान गोळे.

अर्थ-आणि त्या त्रिभाग मानानें तो प्रासाद मध्यभागावर रथाकृति करून त्या-त्रिभाग क्षेत्रांतील इतर दोनभाग, दोन्ही बाजूंस बाह्यभागीं मोकळे ठेवावे. व त्या रथाकार प्रासादाची नेमी(चाकाचाघेर)एकचतुर्थांशानें रुंद असून आणि दोन्ही बाजूंच्या त्या दोन भागांचे कडेवर प्राकार घालावा.

गर्भंतु द्विगुणंकुर्यात्तस्यमानंभवेदिह ॥ सएवभित्तेरुत्सेधोद्विगुणःशिखरोमतः ॥ २३ ॥

अर्थ- तसाच या रथाकार देवालयाचा गाभारा नेमीच्या द्विगुणित मानानें करावा हेंच त्याचें प्रमाण येथें उक्त आहे. आणि इतकीच या देवालय संबंधि भिंतींची उंची असून त्यापेक्षां शिखराची उंची द्विगुणित असावी.

प्राक्ग्रीवःपंचभागेननिष्कासस्तस्यचोच्यते ॥ कारयेत्सुषिरंतद्वत्प्राकारस्यत्रिभागतः ॥ २४ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें या देवालय संबंधि प्राकारानें द्वार पंचम भागांत समांतर मध्य भागीं पूर्वाभिमुख करून त्यानें छिद्र त्याच्या तृतीयांशानें करावें.

प्राक्ग्रीवंपंचभागेननिष्कासेणविशेषतः ॥ कुर्याद्वापंचभागेनप्राक्ग्रीवेकर्णमूलतः ॥ २५ ॥

अर्थ- अथवा तें रथाकृति देवमंदिर, समांतर पूर्वाभिमुख करून उत्सवादिक विशेष कार्य निमित्तानें लोकांच्या गमनागमनार्थ तें पूर्वद्वार पंचम भागांत करावें. तशींच त्याच्या उभयपार्श्व भागीं देवालयाच्या गवाक्षरूप कर्णाचे अधोभागीं दोनद्वारें पंचम भागांत करावीं.

स्थापयेत्कनकंतत्रगर्भांतेद्वारमूलतः ॥ एवंतुत्रिविधंकुर्याज्ज्येष्ठमध्यकनीयसम् ॥ २६ ॥

अर्थ- आणि देवालयांतील गाभाऱ्याच्या मध्यभागीं व द्वाराच्या मूलप्रदेशीं म्हणजे उंबऱ्यावर सुवर्ण स्थापन करावें. या प्रकारें उत्तम, मध्यम व कनिष्ठ असेहे तीन प्रकारचे प्रासाद करावे.

लिंगमानानुभेदेनरूपभेदेनवापुनः ॥ एतेसमासतःप्रोक्तानामतःशृणुताधुना ॥ २७ ॥

अर्थ- ऋषीहो, या प्रमाणें मूर्ति, पूजा व गर्भादिक भिन्न आकार यांच्या-मानानुरूपें करून हे तीन प्रकारचे प्रासाद मीं तुम्हांस कथन केले. आतां

आपण हे प्रासाद नामपूर्वक पृथक् श्रवण करा.

मेरुमंदरकैलासकुंभसिंहमृगास्तथा ॥ विमानच्छंदकस्तद्वच्चतुरस्रस्तथैवच ॥ २८ ॥ अष्टास्रः षोडशास्रश्चवर्तुलः सर्वभद्रकः ॥ सिंहास्योनंदनश्चैवनंदिवर्धनकस्तथा ॥ २९ ॥ हंसोवृषः सुवर्णेशः पद्मकोथसमुद्गकः ॥ प्रासादानामतः प्रोक्ताविभागंशृणुतद्द्विजाः ॥ ३० ॥

अर्थ- ते असेकीं, मेरु, मंदर, कैलास, कुंभ, सिंह, मृग तसाच विमानच्छंदक, चतुरस्र, अष्टास्र, षोडशास्र, वर्तुल, सर्वभद्रक, सिंहास्य, नंदन, नंदिवर्धनक, हंस, वृष, सुवर्णेश, पद्मक, समुद्गक असे हे अनेक नामानीं प्रसिद्ध प्रासाद कथन केले. आतां ब्राम्हण हो, यांचीं पृथक् लक्षणें श्रवण करा.

शतशृंगश्चतुर्द्वारोभूमिकाषोडशोच्छ्रितः ॥ नानाविचित्रशिखरोमेरुः प्रासादउच्यते ॥ ३१ ॥

अर्थ- तीं अशींकीं, शंभर शिखरें व चारद्वारें यानीं युक्त असून सोळा मजले उंच असावा. तशींच तीं शत शिखरें अनेक प्रकारें विचित्र असावीं त्या देवालयास मेरुनामक प्रासाद म्हणतात.

मंदरोद्वादशप्रोक्तः कैलासोनवभूमिकः ॥ विमानच्छंदकस्तद्वदनेकशिखराननः ॥ ३२ ॥ सचाष्टभूमिकस्तद्वत्सप्तभिर्नंदिवर्धनः ॥ विषाणकसमायुक्तोनंदनः स उदाहृतः ॥ ३३ ॥

अर्थ- आणि मंदर नामक प्रासाद बारामजल्यानीं युक्त असून कैलास नामा प्रासाद नऊ मजल्यानीं युक्त असतो. व विमान च्छंदक नामें प्रासादही मेरुप्रासादा समानच अनेक शिखरें व द्वारें यानीं युक्त असून तो आठमजल्यानीं युक्त असतो. तसाच जो अनेक शिखरें व द्वारें यानीं युक्त असतो त्यास नंदिवर्धन म्हणतात व जो प्रासाद अनेक लघु शिखरानीं युक्त असतो तो नंदन नामें प्रसिद्ध आहे.

षोडशास्रसमायुक्तोनानारूपसमन्वितः ॥ अनेकशिखरस्तद्वत्सर्वतोभद्रउच्यते ॥ ३४ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो प्रासाद सोळा कोणानीं युक्त असून अनेक आकृती नीं संपन्न व अनेक शिखरानीं सुशोभित असेल तो सर्वतोभद्र या नामा नें प्रसिद्ध आहे.

चित्रशालासमोपेतोविज्ञेयः पंचभूमिकः॥ वल-
भीच्छंदकस्तद्वदनेकशिखरानन:॥३५॥

अर्थ- तसाच जो प्रासाद विचित्र सभागृहानीं उत्तम प्रकारें युक्त असू न पांच मजले, अनेक शिखरें व द्वारें यानीं शोभायमान असेल त्यास व लभीच्छंदक हें नाम आहे.

वृषस्योच्छ्रायतस्तुल्योमंडलश्चास्त्रवर्जितः॥ सिंहः-
सिंहाकृतिर्ज्ञेयोगजोगजसमस्तथा॥३६॥

अर्थ- आणि जो प्रासाद वृषभाच्या उंचीसमान उच्च व वर्तुलाकार असू न कोण रहित असेल तो मंडलनामक वर्तुल प्रासाद जाणावा. तसाच सिं ह नामक प्रासाद सिंहाकृति असून गजनामा प्रासाद गजाकार असतो.

कुंभः कुंभाकृतिस्तद्वद्भूमिकानवकोच्छ्रयः॥ अंगु
लीपुटसंस्थानः पंचांडकविभूषितः॥३७॥ षोड-
शास्त्रः समंताच्चविज्ञेयःससमुद्गकः॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो नऊ मजल्यांचा प्रासाद कुंभाकृति असतो त्यास कुंभ प्रासाद म्हणतात. आणि हस्ताच्या अंगुली जुळलेल्या ऊर्ध्वाकृती नें युक्त असून पांच कळसानीं सुशोभित व आसमंताद्भागीं सोळा कोणा नीं जो युक्त असतो. तो समुद्गक जाणावा.

पार्श्वयोश्चंद्रशालेस्य उच्छ्रायोभूमिकाद्वयम्॥३८॥
तथैवपद्मकःप्रोक्तःउच्छ्रायोभूमिकात्रयम्॥ षोड-
शास्त्रःसविज्ञेयोविचित्रशिखरः शुभः॥३९॥ मृग
राजस्तुविख्यातश्चंद्रशालाविभूषितः॥

अर्थ- आणि ज्या प्रासादाच्या वामदक्षिण या उभय पार्श्वभागीं चंद्र शाला (उपरमाडी किंवा गच्ची) असून त्याची दोन मजले उंची असते त्यास पद्मक म्हणतात. तसाच जो प्रासाद तीन मजले उच्च असून सोळा कोण व विचित्र शिखरें यानीं युक्त शुभकारक आहे त्यास षोडशास्त्र

म्हणावें. व अनेक चंद्रशालानीं अतिशयें शोभायमान जो प्रासाद तो मृग-
राजनामें लोकांत विख्यात आहे.

प्राग्ग्रीवेणविशालेनभूमिकासप्तषड्डुन्नतः॥४०॥अ
नेकचंद्रशालश्चगजःप्रासादइष्यते॥

अर्थ- तसाच जो प्रासाद समांतर पूर्वाभिमुख विशाल द्वारानें युक्त व स
हा मजले उंच असून अनेक चंद्रशालानीं सुशोभित असेल तो गजनाम-
क प्रासाद समजावा.

पर्यस्तगृहराजोवैगरुडोनामनामतः॥४१॥सप्तभू
म्युच्छ्रयस्तद्वच्चंद्रशालात्रयान्वितः॥

अर्थ- आणि जो प्रासाद आसमंतात् भागीं विद्यमान श्रेष्ठ गृहानें युक्त असू
न सातमजले उंच व तीन चंद्रशालानीं युक्त असतो तो गरुड नामानें लोकांत
प्रख्यात आहे.

भूमिकाषडशीतिस्तुबाह्यतःसर्वतोभवेत्॥४२॥त
थान्योगरुडस्तद्वदुच्छ्रयादशभूमिकः॥

अर्थ- तसाच जो अन्य गरुड नामा प्रसिद्ध प्रासाद आहे तो दहा मजले उंच
असून आसमंतात् सर्वत्र बाह्यप्रदेशीं शायशीं भूमिकानीं युक्त असतो.

भूमिकाषोडशास्त्रस्तुभूमिद्वयमथाधिकः॥४३॥
पद्मतुल्यप्रमाणेनश्रीवृक्षकइतिस्मृतः॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो प्रासाद षोडश कोणयुक्त भूमिप्रदेशीं दोनमज-
ले उंच व आकृतीनें कमलासमान असेल तो श्रीवृक्षक जाणावा.

पंचांडकोहिभूमिश्चगर्भेहस्तचतुष्टयम्॥४४॥वृ
षोभवतिनाम्नायंप्रासादःसार्वकामिकः॥

अर्थ- आणि जो प्रासाद दोन मजले उंच व पांच कळसानीं युक्त असून गा-
भार्‍यांत चार हात लांब व रुंद या प्रमाणानें युक्त असतो तो वृषनामें प्रसिद्ध
असून यजमान व पूजक यांचे सर्व मनोरथ पूर्ण करतो.

सप्तकाःपंचकाश्चैवप्रासादावैमयोदिताः॥४५॥सिं
हास्येनसमास्तेयायेचान्येतत्प्रमाणकाः॥

अर्थ- तसेच मेरु इत्यादिक सात व हंसादिक पांच असजे प्रासाद मीं कथन

केलेते सिंहमुख प्रासादासमान जाणावे. आणि इतर जे प्रासाद आहेत-तेही त्याच मानानें युक्त असावे.

चंद्रशालैः समोपेताः सर्वेप्राग्ग्रीवसंयुताः ॥ ऐष्टका-
दारवाश्चैवशैलावास्युः सतोरणाः ॥ ४६ ॥

अर्थ- असेहे सर्व प्रासाद समांतर पूर्वाभिमुख द्वार, चंद्रशाला व तोरणेंया नीं युक्त असून ते इष्टका (विटा) व काष्ठ किंवा शिला यानीं रचित असावे.

मेरुः पंचाशद्धस्तः स्यान्मंदरः पंचहीनकः ॥ चत्वारिं
शत्तु कैलासश्चतुस्त्रिंशद्विमानकः ॥ ४७ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें मेरुनामक प्रथम प्रासाद पन्नास हात लांब रुंद असून मंदर नामा द्वितीय प्रासाद त्यापेक्षां पांच हस्तानीं न्यून म्हणजे पंचेचाळीस हात लांबी रुंदीनें युक्त असावा. आणि कैलास नामें प्रासाद चाळीस हात लांबी रुंदीचा असून विमानक प्रासादचवतीस हात लांबरुंद असावा.

नंदिवर्धनकस्तद्वद्द्वात्रिंशत्समुदाहृतः ॥ त्रिंशता नंद
नः प्रोक्तः सर्वतोभद्रकस्तथा ॥ ४८ ॥

अर्थ- तसाच नंदिवर्धनक प्रासाद बत्तीस हात लांबी रुंदीचा असून नंदन व सर्वतोभद्रक हे प्रासाद तीसहात लांब व रुंद असावे.

वर्तुलः पद्मकश्चैवविंशद्धस्तउदाहृतः ॥ गजः सिंहश्च
कुंभश्च वलभीच्छंदकस्तथा ॥ ४९ ॥ एते षोडश हस्ताः
स्युश्चत्वारोदेववल्लभाः ॥

अर्थ- असेच वर्तुल व पद्मक हे दोन्ही प्रासाद वीसहात लांबी रुंदीनें युक्त असावे. आणि गज, सिंह, कुंभ व वलभीच्छंदक हे चार प्रासाद सोळाहात लांबरुंद केले असतां देवास अत्यंत प्रिय होतात.

कैलासोमृगराजश्चविमानच्छंदकोमतः ॥ ५० ॥ ए-
तेद्वादशहस्तास्युरेतेषामिहसम्मतम् ॥ गरुडोष्टक
रोज्ञेयो हंसोदशउदाहृतः ॥ ५१ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें कैलास, मृगराज, विमानच्छंदक हे प्रासाद द्वादश-हस्तप्रमाण परिमित लांबरुंद असावे असें माझें याविषयीं मत आहे. आणि गरुड नामा प्रासाद आठ हात लांबरुंद असून हंसनामक प्रासाद दशह

स्त लांबी रुंदीच्या मानानें युक्त असावा.

एवमेतेप्रमाणेन कर्तव्याःशुभलक्षणाः ॥ यक्षराक्षस नागानांमातृहस्तात्प्रशस्यते ॥ ५२ ॥

अर्थ - असे हे सर्व प्रासाद यजमान हस्तानें यथोक्त शुभ लक्षणानुसार प्रमाणानें सिद्ध करावे. आणि यक्ष, राक्षस व नाग यांचीं देवालयें शिल्पीच्या हस्तानें क्षेत्र मोजून बांधावीं हें प्रशस्त आहे.

तथामेर्वादयःसप्तज्येष्ठलिंगेशुभावहाः ॥ श्रीवृक्षकादयश्चाष्टौमध्यमस्यप्रकीर्तिताः ॥ ५३ ॥ तथाहंसादयःपंचकन्यसेशुभदामताः ॥

अर्थ - तसेच मेरु आदिकरून जे सप्त प्रासाद आहेत ते उत्तम मूर्तीच्या स्थापने विषयीं शुभावह आहेत. आणि श्री वृक्षकादिक आठ प्रासाद हे मध्यम प्रतिमा स्थापनेस उक्त समजावे. त्याच प्रमाणें हंसादिक पंच प्रासाद कनिष्ठमूर्ति स्थापनेला शुभदायक जाणावे.

वलभीच्छंदकेगौरीजटामुकुटधारिणी ॥ ५४ ॥ वरदाभयदातद्वत्साक्षसूत्रकमंडलुः ॥ गृहेतुरक्तमुकुटाउत्पलांकुशधारिणी ॥ वरदाभयदाचापिपूजनीयासभर्तृका ॥ ५५ ॥

अर्थ - तशीच जटामुकुट धारिणी वर व अभय दायक असून अक्षमाला व कमंडलु यांनीं युक्त अशी गौरीची मूर्ति वलभीच्छंदक नामक प्रासादांत स्थापन करावी. आणि आरक्त मुकुट कमल व अंकुश हीं धारण करणारी असून वर व अभय देणारी अशी पती सहित गौरी गृहांत पूजनास योग्य जाणावी.

तपोवनस्थामितरांतांतुसंपूजयेद्बुधः ॥ देव्याविनायकस्तद्वत्वलभीच्छंदकेशुभः ॥ ५६ ॥

अर्थ - तशीच या वांचून गौरीची अन्यमूर्ति तपोवनांत स्थापन करून ज्ञात्यानें तिचें उत्तम रीतीनें पूजन करावें. आणि त्या देवी सहित विनायक, वलभीच्छंदक नामक देवालयांत पूजित करावा. तर तो शुभकारक होतो. इतिश्री मत्स्यपुराणे प्रासादानुकीर्तनं नामनवषष्ट्युत्तर द्विशततमोऽध्यायः ॥

सूतउवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामि मंडपानां तु-
लक्षणम् ॥ मंडपप्रवरान् वक्ष्ये प्रासादस्यानु-
रूपतः ॥ १ ॥

अर्थ - सूत म्हणतात ऋषीहो, या नंतर मी मंडपांचें लक्षण उत्तम प्रकारें कथन करतों तसेंच त्या प्रासादानुरूप श्रेष्ठ मंडप ही सांगतों.

विविधा मंडपाः कार्या ज्येष्ठमध्यकनीयसः ॥ नामत-
स्तान् प्रवक्ष्यामि शृणुध्वमृषिसत्तमाः ॥ २ ॥

अर्थ - ते असे कीं, ऋषिश्रेष्ठहो, उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा रीतीनें अनेक प्रकारचे मंडप सिद्ध करावे. ते नामवर्णन पूर्वक पृथक् कथन करतों. आपण श्रवण करा.

पुष्पकः पुष्पभद्रश्च सुव्रतोऽमृतनंदनः ॥ कौशल्यो बु
द्धिसंकीर्णो गजभद्रो जयावहः ॥ ३ ॥ श्रीवत्सो विजय
श्चैव वास्तुकीर्तिः श्रुतिजयः ॥ यज्ञभद्रो विशालश्च सु
श्लिष्टः शत्रुमर्दनः ॥ ४ ॥ भागपंचो नंदनश्च मानवो मा
नभद्रकः ॥ सुग्रीवो हरितश्चैव कर्णिकारः शतर्धिकः
॥ ५ ॥ सिंहश्च श्यामभद्रश्च सुभद्रश्च तथैव च ॥ सप्त
विंशतिराख्याता लक्षणं शृणुत द्विजाः ॥ ६ ॥

अर्थ - ते असे कीं, पुष्पक, पुष्पभद्रक, सुव्रत, अमृतनंदन, कौशल्य, बुद्धिसंकीर्ण, गजभद्र, जयावह, श्रीवत्स, विजय, वास्तुकीर्ति, श्रुतिजय, यज्ञभद्र, विशाल, सुश्लिष्ट, शत्रुमर्दन, भागपंच, नंदन, मानव, मानभद्रक, सुग्रीव, हरित, कर्णिकार, शतर्धिक, सिंह, श्यामभद्र व सुभद्र असे हे सत्तावीस प्रासाद शास्त्रांत प्रसिद्ध आहेत. ब्राम्हणहो, आतां यांचें प्रत्येकीं लक्षण श्रवण करा.

स्तंभायत्र चतुःषष्टि पुष्पकः समुदाहृतः ॥ द्विषष्टि पु
ष्पभद्रस्तु षष्टिः सुव्रत उच्यते ॥ ७ ॥

अर्थ - तें असें कीं, ज्या मंडपांत चौसष्ट स्तंभ आहेत त्यास पुष्पक म्हणतात. आणि बासष्ट स्तंभ युक्त मंडप पुष्पभद्र नामें असून जो साठ स्तंभांचा मंडप तो सुव्रत जाणावा.

अष्टपंचाशकस्तंभः कथ्यते मृतनंदनः ॥ कौशल्यः ष

इत्थंपंचाशच्चतुःपंचाशतापुनः ॥ ८ ॥ नाम्नातुबुद्धि संकीर्णोद्विहीनोगजभद्रकः ॥ जयावहस्तुपंचाशत् श्रीवत्सस्तद्विहीनकः ॥ ९ ॥

अर्थ - तसाच जो मंडप अठ्ठावन्न स्तंभानीं युक्त असेल त्यास अमृत नंदन म्हणतात. आणि छपन्न स्तंभयुक्त मंडपास कौशल्य म्हणावें. त्याचप्रमाणें जो चौपन्न स्तंभांचा मंडप तो बुद्धिसंकीर्ण जाणावा. आणि बावन्न-स्तंभयुक्त मंडप गजभद्र नामें प्रसिद्ध असून जयावह मंडप पन्नास स्तंभानीं युक्त असतो. व अठ्ठेचाळीस स्तंभांच्या मंडपास श्रीवत्स म्हणावें.

विजयस्तद्विहीनःस्यात् वास्तुकीर्तिस्तथैवच ॥ द्वाभ्या मेवप्रहीयेततः श्रुतिजयोपरः ॥ १० ॥

अर्थ - तसाच विजय नामा मंडप शेचाळीस स्तंभांचा असून वास्तुकीर्ति मंडप चवेचाळीस स्तंभयुक्त असतो. व बेचाळीस स्तंभ ज्या मंडपास असतात तो श्रुतिजय जाणावा.

चत्वारिंशद्यज्ञभद्रस्तद्विहीनोविशालकः ॥ षट्त्रिंश चैवसुश्लिष्टोद्विहीनः शत्रुमर्दनः ॥ ११ ॥

अर्थ - आणि यज्ञभद्र मंडपास चाळीस स्तंभ असून अडतीस स्तंभांचा जो मंडप तो विशालक जाणावा. व सुश्लिष्ट मंडप छत्तीस स्तंभानीं युक्त असून शत्रुमर्दन मंडपास चवतीस स्तंभ असतात.

द्वात्रिंशद्भागपंचस्तुत्रिंशद्भिर्नंदनः स्मृतः ॥ अष्टाविंशा न्मानवस्तुमानभद्रोद्विहीनकः ॥ १२ ॥

अर्थ - तसेच बत्तीस स्तंभ, भाग पंचनामक मंडपास असून तीस स्तंभ ज्या मंडपास असतील तो नंदन समजावा. आणि जो अठ्ठावीस स्तंभांचा असेल तो मानव नामक मंडप समजावा. व सवीस स्तंभांच्या मंडपास मानभद्र म्हणतात.

चतुर्विंशस्तुसुग्रीवोद्वाविंशोवर्षणोमतः ॥ विंशतिः कर्णिकारः स्यादष्टादशशतर्धिकः ॥ १३ ॥

अर्थ - त्याच प्रमाणें चोवीस स्तंभांच्या मंडपास सुग्रीव हें नाम असून बावीस स्तंभ वर्षणमंडपास असतात. आणि जो वीस स्तंभांचा मंडप असेल

त्यास कर्णिकार म्हणतात. व अठरास्तंभ त्यांत असतील तो शतधिक मंडप जाणावा.

सिंहोभवेद्विहीनश्चश्यामभद्रोद्विहीनकः॥ स्फभद्रस्तत धाप्रोक्तोद्वादशास्तंभउच्यते॥ १४॥

अर्थ- तसाच सिंहनामक मंडप सोळास्तंभांचा असून श्याम भद्रमंडपास चतुर्दश स्तंभ असतात. व स्फभद्रमंडपास द्वादश स्तंभ असावे.

मंडपाः कथितास्तुभ्यंयथावल्लक्षणान्विताः॥ त्रिकोणंवृत्तमर्धंतुह्यष्टकोणंद्विरष्टकम्॥ १५॥ चतुःकोणंतुकर्तव्यंसंस्थानंमंडपस्यतु॥

अर्थ- हे राजा, मी असे हे यथोक्त लक्षणयुक्त मंडप तुला कथन केले. त्या मंडपांची रचना त्रिकोण, वर्तुल, अर्धवर्तुल, अष्टकोण, षोडश कोण व चतुष्कोण यांतून कोणत्यातरी एका आकृतीनें करावी.

राज्यंचविजयश्चैवआयुवर्धनमेवच॥ १६॥ पुत्रलाभः श्रियःपुष्टिस्त्रिकोणादिक्रमाद्भवेत्॥ एवंतुशुभदाः प्रोक्ताश्चान्यथात्वशुभावहाः॥ १७॥

अर्थ- कारण राज्य, विजय, आयुष्यवृद्धि, पुत्रलाभ, अनेक संपत्ति व पुष्टि हीं फलें त्रिकोणादिक पूर्वोक्त मंडपांतील प्रत्यकास क्रमानें पृथक् यथासंख्य प्राप्त होतात त्यास्तव अशारीतीनेंच केलेले मंडप शुभदायक आहेत व या वांचून अन्यप्रकारानें केले असतां ते अशुभ कारक जाणावे.

चतुःषष्टिपदंकृत्वामध्येद्वारंप्रकल्पयेत्॥ विस्ताराद्विगुणोच्छ्रायंतत्त्रिभागःकटिर्भवेत्॥ १८॥

अर्थ- अशा त्या सर्वमंडपांत दोऱ्यामारून चौसष्टस्थानें करून समांतर मध्य प्रदेशीं त्यामंडपास द्वारकरावें. तें एकदालनी मंडपाच्या विस्तारापेक्षां द्विगुणित उंच असून त्याचा तृतीय भाग त्यास कटिप्रदेशस्थानीं समजावा.

विस्तारार्धेभवेद्गर्भोभित्तयोऽन्याःसमंततः॥ गर्भपादेनविस्तीर्णंद्वारंत्रिगुणमायतम्॥ १९॥

अर्थ- तसाच तीनदालनी मंडप असल्यास त्या संबंधि रुंदीच्या अर्ध प्रमाणानें मध्यदालनाची रुंदी असून त्याचे आसमंतात् भागीं अन्य भिंती असाव्या. आणि

त्या मध्य दालनाच्या रुंदीचे चतुर्थांशानें द्वाररुंद असून तें त्या रुंदी पेक्षां त्रिगुणित उंचीचें असावें.

तथाद्विगुणविस्तीर्णमुखवत्तदुदुंबरः॥ विस्तारपादप्रतिमं बाहुल्यंशाखयोःस्मृतम्॥२०॥

अर्थ- त्याच प्रमाणें मंडप द्वार संबंधि उंबरा त्या चौकटी इतकाच रुंद असून त्यास बाह्यप्रदेशीं मध्यभागीं एकमुखाकृति करावी ती रुंदी पेक्षां द्विगुणित मानानें रुंद असावी. आणि त्या द्वाराच्या रुंदीचे चतुर्थांश प्रमाणसमान, चौकटींतील दोन्हीं बाजूंच्या दोन्ही लांकडांची रुंदी करावी.

त्रिपंचसप्तनवभिः शाखाभिर्द्वारमिष्यते॥ कनिष्ठमध्यमंज्येष्ठंयथायोगंप्रकल्पयेत्॥२१॥

अर्थ- तसेंच तीन अथवा पांच, सात किंवा नऊ इतकीं लांकडें द्वाराच्या चौकटीला लावून तें द्वार करावें. हें प्रशस्त आहे. त्यांत यथा योग्य रीतीनें उत्तम, मध्यम किंवा कनिष्ठ असें द्वार मंडपास ही करावें.

अंगुलानांशतंसार्धंचत्वारिंशत्तथोन्नतम्॥ त्रिंशाद्विंशोत्तरंचान्यत्धन्यमुत्तममेवच॥२२॥

अर्थ- तें असें कीं, मंडपास द्वार, दीडशें अंगुलें उंच असावें अथवा एकशेंचाळीस अंगुल परिमित उंच करावें. तसेंच एकशें तीस किंवा एकशें वीस अंगुलें उच्च असें त्या मंडपास द्वार असावें. हीं द्वारें उत्तम असून धनप्राप्ति कारक आहेत.

शतंचाशीतिसहितंवातनिर्गमनेभवेत्॥ अधिकंदशभिस्तद्वत्तथाषोडशभिःशतम्॥२३॥

अर्थ- त्याच प्रमाणें एकशें ऐंशीं अंगुलें उंचीचें द्वार, त्या मंडपांतून वायुनिघून जाण्याविषयीं प्रशस्त आहे. आणि एकशें दहा अथवा एकशें सोळा अंगुल उंचीचें द्वार मंडपास करावें. हीं द्वारें मध्यम आहेत.

शतसप्ततृतीयंचनवत्याशीतिभिस्तथा॥ दशद्वाराणिचै[illegible]निक्रमेणोक्तानिसर्वदा॥२४॥

अर्थ- व शंभ[illegible] नव्वद किंवा ऐंशीं अंगुलें उंचीचें द्वार मंडपास असावें हीं कनिष्ठ मानाचीं आ[illegible]त. अशीं दहाद्वारें क्रमानें कथन केलीं यांतील कोणत्या

ही रीतीचें द्वार मंडपास करावें.

अन्यानिवर्जनीयानिमनसोद्वेगदानितु ॥ द्वारवेधंप्रय-
त्नेनसर्ववास्तुषुवर्जयेत् ॥ २५ ॥

अर्थ - आणि यां वांचून न्यूनाधिक अन्य प्रमाण युक्त द्वारें वर्ज करावीं; कारण त्यां पासून तेथील लोकांच्या मनास उद्वेग (त्रास) उत्पन्न होतो. तसाच देवालयादिक सर्व वास्तूंच्या मुख्य द्वारास वृक्षादिकां पासून येणारा वेध प्रयत्नानें वर्ज करावा.

वृक्षकोणभ्रमिद्वारस्तंभकूपध्वजादपि ॥ कुड्यश्व-
भ्रेणवाविद्धंद्वारंनशुभदंभवेत् ॥ २६ ॥

अर्थ - कारण वृक्ष, कोण (कोपरा), तेल्यादिकांचें चक्राकार फिरणारें यंत्र, द्वार, स्तंभ, कूप, ध्वज भिंत व खळगा यानीं वेध युक्त झालेलें द्वार म्हणजे द्वारा समोर हे पदार्थ आले असतां तें द्वार तेथें वास करणारांस शुभ दायक होत नाहीं.

क्षयश्चदुर्गतिश्चैवप्रवासःक्षुद्भयंतथा ॥ दौर्भाग्यंबं
धनंरोगोदारिद्र्यंकलहंतथा ॥ २७ ॥ विरोधश्चार्थना-
शश्चसर्ववेधाद्भवेत्क्रमात् ॥

अर्थ - तें असें कीं, क्षय, दुर्गति, प्रवास, क्षुधा, भय, दौर्भाग्य, बंधन, रोग, दारिद्र्य, कलह, विरोध व अर्थनाश हीं सर्व अनिष्टें द्वारास येणाऱ्या वृक्षादिकांच्या वेधानें क्रमें करून प्राप्त होतात.

पूर्वेणफलिनोवृक्षाःक्षीरवृक्षास्तुदक्षिणे ॥ २८ ॥ प-
श्चिमेनजलंश्रेष्ठंपद्मोत्पलविभूषितम् ॥

अर्थ - तसेंच फळें येणारे वृक्ष प्रासादाच्या पूर्व दिग्भागीं असावे. आणि चीक निघणारे वृक्ष दक्षिण भागीं लावावे. व चंद्रविकासि, सूर्यविकासि अशा कमलानीं सुशोभित सरोवरादिक जलाशय पश्चिमेस असणें हें श्रेष्ठ आहे.

उत्तरेसरलैस्तालैःशुभास्यात्पुष्पवाटिका ॥ २९ ॥ -
सर्वतस्तुजलंश्रेष्ठंस्थिरमस्थिरमेवच ॥

अर्थ - तशीच सरल (सुरू) व ताल (ताड) या वृक्षानीं युक्त पुष्पवा

टिका देवालयाच्या उत्तर दिशेस असावी. आणि झऱ्यानीं स्थिर राहणा रें किंवा पर्जन्यानें साचलेलें सर्वदा न राहणारें कोणतेंही जलस्थान सर्व दिशेस असणें उक्त आहे.

पार्श्वतश्चापिकर्तव्यंपरिवारादिकालयम् ॥ ३०॥
याम्येतपोवनस्थानमुत्तरेमातृकागृहम् ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ज्या देवाच्या परिवार देवता असतील त्यांची स्थापना त्या देवाचे उभय पार्श्व भागांस करावी.

महानसंतथाग्नेयेनैर्ऋत्येच्चविनायकम् ॥ ३०॥ वारुणेश्रीनिवासस्तु वायव्येगृहमालिका ॥

अर्थ- तसेंच स्वयंपाक गृह आग्नेय कोणास असून नैर्ऋत्य दिशेस विनायक असावा. आणि पश्चिम दिशेस धनस्थान व वायव्य कोणास गृहमालिका असावी.

उत्तरेयज्ञशालातुनिर्माल्यस्थानमुत्तरे ॥ ३२॥ वारुणेसोमदैवत्येबलिनिर्वपणंस्मृतम् ॥

अर्थ- तशीच यज्ञशाला व निर्माल्यस्थान हीं देवाच्या उत्तरेस असावीं. आणि पश्चिम अथवा उत्तर यांतील कोणत्याही दिशेला बलिदानस्थान करावें.

पुरतोवृषभस्थानंशेषेस्यात्कुसुमायुधः ॥ ३३ ॥-
जलवापितथैशानेविष्णुस्तुजलशाय्यपि ॥ एव-
मायतनंकुर्यात्कुंडमंडपसंयुतम् ॥ ३४ ॥

अर्थ- तसेंच शिवालय असेल तर त्याच्या अग्रभागीं नंदीची स्थापना करावी. व शेष दिशास्थानीं मदन स्थापन करावा. आणि जलाशय व जलशायी विष्णु हे ईशान कोणास असावे. असें देवालय कुंडाकार मंडपयुक्त करावें.

घंटावितानकसतोरणचित्रयुक्तंनित्योत्सवप्रमुदि-
तेनजनेनसार्धम् ॥ यःकारयेत्सुरगृहंविविधध्व-
जाढ्यंश्रीस्तंनमुंचतिसदादिविपूज्यतेच ॥ ३५ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें घंटा, वितानक (चांदवा), चित्रयुक्त तोरण (ब-

'हिर्हार') व अनेक प्रकारचे ध्वजयानीं चिन्हित असून नित्योत्सवानें अति-हर्षयुक्त जनानीं व्याप्त असें देवालय जो बांधवितो त्यास यालोकीं लक्ष्मी कदापि त्यजीत नाहीं व तो देहांतीं स्वर्गलोकांत सर्वदा पूज्य होतो.

एवंगृहार्चनविधावपिशक्तितस्यात्संस्थापनंसकल
मंत्रविधानयुक्तम् ॥ ३६॥

अर्थ- याच प्रमाणें इतर गृहांच्या रचने विषयीं ही स्वशक्त्यनुसार सिद्धता करून त्यांतील उत्तम स्थापनादिक सर्व प्रकार, सकल उक्त मंत्र व विधानयानीं युक्त अशा रीतीनें करावा. आणि त्या देवतास्थापना कर्मांतील मुख्य आचार्य व ऋत्विजादिक इतर ब्राम्हण श्रेष्ठ यांस गायी, वस्त्रें देदीप्यमान उत्तम सुवर्ण, पृथ्वी व अन्न हीं दानें करावीं. इति श्री मत्स्य पुराणे प्रासाद कीर्तनं नाम सप्तस्कतर द्विशततमोऽध्यायः ॥ २७०॥

अध्याय २७१ वा.

ऋषयऊचुः ॥ पूरोर्वंशस्त्वयासूतसभविष्योनिवेदि
तः॥ सूर्यवंशेनृपायेतुभविष्यंतिहितान्वद ॥ १॥

अर्थ- ऋषि प्रश्न करतात. हे सूत, पूर्वी आपण पुरूचा वंश मागे झालेला व पुरे होणारा ही सांगितला. आतां सूर्य वंशांतील पुढें होणारे राजे कथन करा.

तथैवयादववंशेराजानः कीर्तिवर्धनाः॥ कलौयुगे
भविष्यंतितानपीहवदस्वनः॥ २॥

अर्थ- तसेच यादव वंशांतील, पुढें कलि युगांत होणारे जे कीर्ति वर्धन राजे तेही आम्हांस सांगा.

वंशांतेज्ञातयोयाश्वराज्यंप्राप्स्यंतिसुव्रताः॥ ब्रूहि
संक्षेपतस्तासांयथाभाव्यमनुक्रमात् ॥ ३॥

अर्थ- आणि सर्ववंशांच्या अंतीं कोण त्या उत्तम जाति, राज्य करूं लागतील? त्यांचाही यथानुक्रमें करून संक्षेपानें भविष्य वंश वर्णन करा.

सूत उवाच ॥ बृहद्बलस्यदायादोवीरोराजाबृह
त्क्षयः॥ उरुक्षयसुतश्चापिवत्सद्रोहोमहाय-
शाः॥ ४॥

अर्थ- तेसमयीं सूतम्हणतात कीं, ऋषीहो, पूर्वकथित सूर्यवंशांतील- बृहद्बल राजाचा पुत्र, शूर उरुक्षय नामें राजा होईल. व त्यापासून महा यशस्वी, वत्सद्रोह नामक पुत्र होणार आहे.

वत्सद्रोहात्प्रतिव्योमस्तस्य पुत्रो दिवाकरः॥ तस्यै वमध्यदेशेतु अयोध्यानगरीशुभा ॥ ५॥

अर्थ- त्या वत्सद्रोहाचा प्रतिव्योम, त्याचापुत्र दिवाकर, तो, देशांत पुण्य कारक अयोध्या नगरींत राज्य करील.

दिवाकरस्य भविता सहदेवो महायशाः॥ सहदेवा च्च भविता ध्रुवाश्वो वै महामनाः ॥६॥

अर्थ- दिवाकरास महायशस्वी सहदेव, त्यापासून उदारचित्त ध्रुवाश्व नामा पुत्र होईल.

तस्य भाव्यो महाभागः प्रतीपाश्वस्ततस्सुतः॥ प्रती पाश्वसुतश्चापि सुप्रतीपो भविष्यति ॥ ७॥

अर्थ- त्यास महाभाग्यवान् प्रतीपाश्व, त्यास सुप्रतीप नामक पुत्र होईल.

मरुदेवः सुतस्तस्य सुनक्षत्रस्ततोभवत् ॥ किन्नराश्वः सुनक्षत्राद्भविष्यति परंतपः ॥ ८॥

अर्थ- त्यास मरुदेव, त्याला सुनक्षत्र, त्यापासून शत्रूंस तापदेणारा कि न्नराश्व नामें पुत्र होईल.

किन्नराश्वादंतरिक्षो भविष्यति महामनाः॥ सुषे- णश्चांतरिक्षाच्च सुमित्रश्चाप्यमित्रजित् ॥ ९॥

अर्थ- किन्नराश्वापासून उदारांतःकरण युक्त अंतरिक्ष, त्यापासून सु- षेण व शत्रुपराजय करणारा सुमित्र असे दोनपुत्र होतील.

सुमित्रजो बृहद्राजः बृहद्राजस्य वीर्यवान् ॥ पुत्रः कृ तंजयो नाम धार्मिकश्च भविष्यति ॥ १०॥

अर्थ- त्यांत, सुमित्रास मात्र, बृहद्राजा पुत्र होणार, त्यास, पराक्रमी असून महाधार्मिक असा कृतंजय नामक पुत्र होईल.

कृतंजयसुतो विद्वान् भविष्यति रणेजयः॥ भविता संजयश्चापि वीरो राजा रणेजयात् ॥ ११॥

अर्थ- त्यास, रणंजयपुत्र महाविद्वान् होईल. त्यापासून महावीर संजयनामक पुत्र राजा होईल.

संजयस्यसुतः शाक्यः शाक्याच्छुद्धोदनोनृपः॥ शुद्धोदनस्यभवितासिद्धार्थः पुष्कलः सुतः॥ १२॥

अर्थ- त्यास शाक्यनामक पुत्र, त्यापासून शुद्धोदनराजा त्याला सर्वार्थ सिद्धिकरणारा पुष्कल नामापुत्र होईल.

प्रसेनजित्ततोभाव्यः क्षुद्रकोभवितातत॥ क्षुद्रकात्कुलकोभाव्यः कुलकात्सुरथस्मृतः॥ १३॥

अर्थ- त्या पासून प्रसेनजित्, त्यासक्षुद्रक, त्याला कुलक, त्यापासून सुरथ पुत्र होणार.

सुमित्रः सुरथाज्जातोअन्यस्तु भवितानृपः॥ एतेचैक्ष्वाकवः प्रोक्ताभविष्यायेकलौयुगे॥ १४॥

अर्थ- सुरथा पासून सुमित्र नामक पुत्र होईल. त्यापुढे कोणी अन्य राज्य करील. असे इक्ष्वाकु वंश संबंधि राजे कलियुगांत होतील हे तुम्हांस सांगितले.

बृहद्बलान्ववायेतुभविष्याः कुलवर्धनाः॥ अत्रानुवंशश्लोकोयंविप्रैर्गीतः पुरातनैः॥ १५॥

अर्थ- तसेच बृहद्बल वंशांत कुलवृद्धि करणारे जे राजे पुढें होतील १ त्यांविषयीं पुरातन ब्राम्हणानीं वंशानुक्रम संबंधिश्लोक गायन केलेला आहे.

इक्ष्वाकूणामयंवंशः सुमित्रांतोभविष्यति॥ सुमित्रंप्राप्यराजानंसंस्थांप्राप्स्यतिवैकलौ॥ १६॥

अर्थ- तो असाकीं, हा इक्ष्वाकूचा वंश पूर्वोक्त अनुक्रमानें सुमित्र राजापर्यंत प्राप्तहोऊन पुढें कलियुगांत समाप्त होईल.

इत्येवंमानवोवंशः प्रागेवसमुदाहृतः अतऊर्ध्वंप्रवक्ष्यामिमागधायेबृहद्रथाः॥ १७॥

अर्थ- या प्रकारें मनूचा वंशतर, पूर्वीच सविस्तर सांगीतला. आतां पुढें मगध वंशसंबंधि महारथी राजे सांगतों.

पूर्वेणयेजरासंधात्सहदेवान्वयेनृपाः॥ अतीतावर्तमानाश्चभविष्यांश्चनिबोधत॥ १८॥

अर्थ - पूर्वी मगध देशाधिपति जरासंधापासून झालेल्या सहदेवाच्या वंशांतील मागें झालेले, वर्तमान कालीं असणारे व पुढें होणारे जे राजे ते श्रवण करा.

संग्रामेभारतेवृत्तेसहदेवेनिपातिते ॥ सोमाधिस्तस्य दायादोराजाभूत्सगिरिव्रजे ॥ १९ ॥

अर्थ - ज्या कालीं प्रवृत्त झालेल्या भारत युद्धांत सहदेव मरण पावला, त्याकालीं त्याचा पुत्र सोमाधि, गिरिव्रज नगरांत राज्य करीत होता.

पंचाशतंतथाष्टौचसमाराज्यमकारयत् ॥ श्रुतश्रवाश्चतुःषष्टिंसमास्तस्यान्वयेभवत् ॥ २० ॥

अर्थ - तें त्यानें अठ्ठावन्न वर्षपर्यंत राज्य केलें. नंतर त्याच्या श्रुतश्रवानामक पुत्रानें पुढें, चौसष्ट वर्षें राज्य केलें.

अप्रतीपीचषट्त्रिंशत्समाराज्यमकारयत् ॥ चत्वारिंशत्समास्तस्यनिरमित्रोदिवंगतः ॥ २१ ॥

अर्थ - त्याचा पुत्र अप्रतीपी असून त्यानें छत्तीस वर्षें राज्य केलें. पुढें निरमित्र नामक त्याचा पुत्र चाळीस वर्षें राज्य करून स्वर्गास गेला.

पंचाशतंसमाःषट्चसुरक्षःप्राप्तवान्महीम् ॥ बृहत्कर्मात्रयोविंशद्वैराज्यमकारयत् ॥ २२ ॥

अर्थ - त्यानंतर सुरक्षास छपन्न वर्षें पृथ्वीचें राज्य प्राप्त झालें आणि त्याच्या बृहत्कर्मानामक पुत्रानें तेवीस वर्षें राज्य केलें.

सेनाजित्संप्रयातश्चभुक्त्वापंचशतंमहीम् ॥ श्रुतंजयस्तुवर्षाणिचत्वारिंशद्भविष्यति ॥ २३ ॥

अर्थ - नंतर सेनाजित् व संप्रयात या उभयतानीं पांचशें वर्षें पृथ्वीचा उपभोग केला. त्या पुढें होणारा श्रुतंजय चाळीस वर्षें राज्य करील.

अष्टाविंशतिवर्षाणिमहींप्राप्स्यतिवैविभुः ॥ अष्टपंचाशतंषट्चराज्येस्थास्यतिवैशुचिः ॥ २४ ॥

अर्थ - त्यापुढें विभुनामक राजास अठ्ठावीस वर्षें पृथ्वी प्राप्त होईल. नंतर शुचिनामा राजा होईल तो, चौसष्ट वर्षें पर्यंत राज्यावर स्थित होईल.

अष्टाविंशत्समाराजाक्षेमोभोक्ष्यतिवैमहीम् ॥ अनु

व्रतश्चतुःषष्टिराज्यंप्राप्स्यतिवीर्यवान् ॥ २५ ॥

अर्थ- तसाच त्यापुढें अठ्ठावीस वर्षें क्षेमराजा, पृथ्वीचा उपभोग करील. नंतर महापराक्रमी अनुव्रत, चौसष्टवर्षें राज्य करील.

पंचत्रिंशतिवर्षाणिसुनेत्रोभोक्ष्यतेमहीम् ॥ भोक्ष्य तेनिर्वृतिश्चेमामष्टपंचाशतंसमाः ॥ २६ ॥

अर्थ- पुढें सुनेत्र राजा, पस्तीस वर्षें राज्योप भोगकरील. त्यानंतर निर्वृति अठ्ठावन्न वर्षें पृथ्वीचा उपभोग करील.

अष्टाविंशत्समाराज्यंत्रिनेत्रोभोक्ष्यतेततः ॥ चत्वारिं शत्तथाष्टौचद्युमत्सेनोभविष्यति ॥ २७ ॥

अर्थ- तदनंतर त्रिनेत्र नामकराजा, अठ्ठावीस वर्षें राज्य भोगील. पुढें द्युमत्सेन अठ्ठेचाळीस वर्षें पृथ्वीपालन करील.

त्रयस्त्रिंशत्तुवर्षाणिमहीनेत्रःप्रकाश्यते ॥ द्वात्रिंशत्तुसमाराजाह्यचलस्तुभविष्यति ॥ २८ ॥

अर्थ- नंतर महीनेत्र, तेहेतीस वर्षें राज्य शासन करील. आणि बत्तीस वर्षें-पर्यंत अचलनामकराजा होईल.

रिपुंजयस्तुवर्षाणिपंचाशत्प्राप्स्यतेमहीम् ॥ द्वात्रिंशति नृपाह्येतेभवितारोबृहद्रथाः ॥ २९ ॥

अर्थ- तदनंतर पुरंजय, पन्नास वर्षेंपर्यंत पृथ्वीचें राज्य पावेल. असे सर्वमिळून बत्तीस बृहद्रथ राजे पुढें होतील.

पूर्णंवर्षसहस्त्रंतुतेषांराज्यंभविष्यति ॥ जयतांक्षत्रियाणांचबालकःपुलकोभवेत् ॥ ३० ॥

अर्थ- त्यासर्वांचें मिळून पूर्ण सहस्त्र वर्षपर्यंत राज्य होईल. त्यापुढें परस्परांस पराजित करणाऱ्या क्षत्रियांस पुलकनामक एक बालक होईल. इतिश्री-मत्स्य पुराणे भविष्य राजानु कीर्तनं नामैकसप्तत्युत्तर द्विशततमोऽध्यायः २७१

अध्याय २७२वा.

सूतउवाच ॥ बृहद्रथेष्वतीतेषुवीतिहोत्रेष्ववंतिषु ॥ पुलकःस्वामिनंहत्वास्वपुत्रमभिषेक्ष्यति ॥ १ ॥

अर्थ- सूतम्हणतात. बृहद्रथराजे स्वर्गासि गेल्यानंतर, अवंति देशांत वीतिहो त्र्यांच्या वंशातील कोणीएक तो पुलकनामा जो होईल, तो आपल्या यजमानाचा वध करून त्याच्याराज्यावर स्वपुत्रास स्थापन करण्याविषयीं राज्याभिषेक करील.

मिषतांक्षत्रियाणांचबालकः पुलकोद्भवः सर्वेप्रणत सामंतोभविष्योनचधर्मतः॥२॥

अर्थ- तो पुलकपुत्र, आपणास सर्व मांडलिक राजे नम्र असून तो सर्व क्षत्रियांच्या समक्ष, राज्य करील; परंतु धर्मानें पूर्वोक्त रीतीनेंच राज्य करील असें नाहीं.

त्रयोविंशत्समाराजाभवितासनरोत्तमः॥ अष्टाविंशतिवर्षाणिपालकोभवितानृपः॥३॥

अर्थ- तो पुरुषश्रेष्ठ तरी, तेवीसच वर्षें राज्य करील. त्यापुढें पालकराजा, अठ्ठावीस वर्षें पृथ्वीचें राज्य करील.

विशाखयूपोभवितात्रिपंचाशत्तथासमाः॥ एकविंशत्समाराजासूर्यकस्तुभविष्यति॥४॥

अर्थ- तसाच विशाखयूप त्रेपन्न वर्षें पृथ्वीपालन करील आणि सूर्यकराजा, एकवीस वर्षें पृथ्वीचें संरक्षण करील.

वाराणस्यांसुतंस्थाप्यश्रयिष्यतिगिरिव्रजम्॥ शिशुनाकस्तुवर्षाणिचत्वारिंशद्भविष्यति॥५॥

अर्थ- नंतर तो सूर्यकराजा स्वपुत्रास वाराणसी क्षेत्रांत स्थापन करून आपण गिरिव्रज नगराचा आश्रय करील. तेव्हांतो सूर्यकपुत्र शिशुनाकही त्याक्षेत्रांत असून चाळीस वर्षें राज्य करील.

काकवर्णःसुतस्तस्यषड्विंशत्प्राप्स्यतेमहीम्॥ षट्त्रिंशच्चैववर्षाणिक्षेमधामाभविष्यति॥६॥

अर्थ- त्याच्या काकवर्णनामक पुत्रास सव्वीस वर्षें पृथ्वीचें राज्य प्राप्त होईल नंतर, क्षेमधामास छत्तीस वर्षें पृथ्वी प्राप्त होईल.

चतुर्विंशत्समाःसोपिक्षेमजित्प्राप्स्यतेमहीम्॥ अष्टाविंशतिवर्षाणिविंध्यसेनोभविष्यति॥७॥

अर्थ- तसाच क्षेमजित् ही चोवीस वर्षें आणि अठ्ठावीस वर्षें विंध्यसेनअ

से दोघे क्रमानें पृथ्वीचे अधिपती होतील.

भविष्यतिसमाराजानवकाण्वायनोनृपः॥ भूमिमि
त्रःसुतस्तस्यचतुर्दशभविष्यति॥ ८॥

अर्थ- तदनंतर काण्वायन नृप नऊ वर्षे होऊन पुढें त्याचा पुत्र भूमिमित्र, चवदा वर्षे राजा होईल.

अजातशत्रुर्भविता सप्तविंशत्समानृपः॥ चतुर्विंश
त्समाराजावंशकस्तु भविष्यति॥ ९॥

अर्थ- त्यापुढें अजातशत्रु, सत्तावीस वर्षे, वंशक, चोवीस वर्षे राज्य करणारे होतील.

उदासीभवितातस्मात्त्रयस्त्रिंशत्समानृपः॥चत्वा
रिंशत्समाभाव्योराजावैनंदिवर्धनः॥१०॥

अर्थ- त्यापासून उदासी होईल. तो तेहेतीस वर्षे राज्य करील. नंतर, चाळीस वर्षे नंदिवर्धन राजा होईल.

चत्वारिंशत्त्रयश्चैवमहानंदीभविष्यति॥ इत्येते-
भवितारोवैदशद्वौशिशुनाकजाः॥ ११॥

अर्थ- त्यापुढें महानंदी, त्रेचाळीस वर्षे राजा होईल. असे शिशुनाक-वंशस्थ द्वादश राजे होतील.

शतानित्रीणिपूर्णानिषष्टिवर्षाधिकानितु॥शिशु-
नाकाभविष्यंतिराजानःक्षत्रबंधवः॥१२॥

अर्थ- असे ते सर्व मिळून शिशुनाक वंशस्थ द्वादश क्षत्रियराजे, तीनशें साठ वर्षे राज्य करतील.

एतैःसार्धंभविष्यंतियावत्कलिनृपाःपरे॥ तुल्य-
कालंभविष्यंतिसर्वेह्येतेमहीक्षितः॥१३॥

अर्थ- तसेच त्या शिशुनाक राजासारखेच कलियुगाच्या समाप्ती पर्यंत पुढील अन्य राजे होतील. आणि सर्वांच्या राज्य काळीं सुख दुःख एकसारखेंच असेल.

चतुर्विंशत्तथैक्ष्वाकाःपांचालाःसप्तविंशतिः॥
काशेयास्तुचतुर्विंशदष्टाविंशत्तुहैहयाः॥१४॥

अर्थ- ते असे कीं, इक्ष्वाकु कुलस्थ राजे, चोवीस व पंचाल वंशस्थ सत्तावीस होऊन पुढें चोवीस राजे काशीय व अठ्ठावीस हैहय कुलस्थ असे राजे होतील.

कलिंगाश्चैवद्वात्रिंशदश्मकाः पंचविंशतिः॥ कुरवश्चा पिषड्विंशदष्टाविंशास्तमैथिलाः॥ १५॥

अर्थ- नंतर बत्तीस कलिंगराजे, पंचवीस अश्मकराजे, सव्वीस कुरुवंशस्थ व अठ्ठावीस मैथिल राजे अशारीतीनें होतील.

शूरसेनास्त्रयोविंशद्वीतिहोत्राश्चविंशतिः॥ एतेसर्वेभ विष्यंति एककालंमहीक्षितः॥ १६॥

अर्थ- त्याच प्रमाणें तेवीसशूरसेन राजे, व वीस,वीति होत्र राजे, हे सर्व एक कालींच स्व स्वदेशांत राज्य करतील.

महानंदिसुतश्चापिशूद्रायां कलिकांशजः॥ उत्पत्स्य तेमहापद्मः सर्वक्षत्रांतकोनृपः॥ १७॥

अर्थ- पुढें महानंदीला शूद्रीचे उदरीं कलीचा अंशभूत महापद्मनामक, सर्वक्षत्रियांचा अंत करणारा पुत्र होऊन राज्य करील.

ततःप्रभृतिराजानोभविष्याः शूद्रयोनयः॥ एकरा ट्समहापद्मोएकच्छत्रोभविष्यति॥ १८॥ अष्टाशीति तुवर्षाणि पृथिव्यांचभविष्यति॥ सर्वक्षत्रमथोत्साद्य भाविनार्थेनचोदितः॥ १९॥

अर्थ- तो महापद्म एकच राजा, अठ्ठ्यायशीं वर्षपर्यंत पृथ्वीवर भवितव्य देवानें प्रेरित होत्साता सर्वक्षत्रियांचा नाश करून एकछत्र राज्य करील. त्यापासून पुढें शूद्रयोनींत उत्पन्न होणारे शूद्रराजे होतील.

सुकल्यादिसुताह्यष्टौसमाद्वादशतेनृपाः॥ महापद्म स्यपर्यायेभविष्यंतिनृपाःक्रमात्॥ २०॥

अर्थ- त्या महापद्माच्या समाप्ती नंतर त्याचे सुकल्यादि आठ पुत्र, यथाक्रमानें द्वादश वर्षपर्यंत राज्य करणारे होतील.

उद्धरिष्यतिकौटिल्यः समैर्द्वादशभिः सुतान्॥ भु- क्त्वामहींवर्षशतंततोमौर्यान्गमिष्यति॥ २१॥

अर्थ- पुढें कोणीएक कौटिल्यराजा उत्पन्न होऊन त्या सुकल्यादि अष्टपु

त्यांस द्वादश वर्षांनंतर राज्यापासून भ्रष्ट करील. आणि आपण शत वर्ष पर्यंत पृथिवीचा उपभोग करील. नंतर ती पृथ्वी, मौर्य नामक राजांस प्राप्त होईल.

भविताशतधन्वाचतस्यपुत्रस्तु षट्समाः ॥ बृहद्रथस्तु वर्षाणितस्यपुत्रश्चसप्तति: ॥ २२ ॥

अर्थ- तसाच त्या मौर्यांत प्रथम शतधन्वा होईल. त्याचापुत्र, सहा वर्षें राज्य करील. नंतर त्याचापुत्र बृहद्रथ सत्तर वर्षें व त्याचाही पुत्र, सत्तर वर्षें व असे राजे होतील.

षट्त्रिंशत्तुसमाराजाभविताशकुएवच ॥ सप्तानांदश वर्षाणितस्यनप्ता भविष्यति ॥ २३ ॥

अर्थ- पुढें त्याचा शकनामा पुत्र, छत्तीस वर्ष पर्यंत व त्यानंतर त्याचा नातु सत्तर वर्षें हे दोन राजे होतील.

राजादशरथोष्टौतु तस्यपुत्रोभविष्यति ॥ भविता नव वर्षाणि तस्यपुत्रश्चसप्तति: ॥ २४ ॥

अर्थ- त्याचापुत्र दशरथ, आठ वर्षें आणि त्याचापुत्र, नऊ वर्षें व त्याचापुत्र, सत्तर वर्षें असे हे त्रिवर्ग राज्य करणारे होतील.

इत्येते दश मौर्यास्तु येभोक्ष्यंतिवसुंधराम् ॥ सप्तत्रिंशच्छतं पूर्णं तेभ्यः शुंगान्गमिष्यति ॥ २५ ॥

अर्थ- असे हे दहा मौर्यनामक राजे एकशें सदतीस वर्षें पर्यंत पृथ्वीचा उपभोग करतील. नंतर त्यांपासून ही पृथ्वी शुंगनामक राजांच्या सत्तेंत जाईल.

पुष्यमित्रस्तु सेनानीरुत्सृज्यस बृहद्रथान् ॥ कारयिष्यतिवैराज्यंषट्त्रिंशतिसमान्नृपः ॥ २६ ॥

अर्थ- आणि त्या शुंग राजांत कोणी एक पुष्यमित्र नामा सेनापति, तो, सर्व बृहद्रथ राजांचें, राज्यापासून उच्चाटण करून आपण छत्तीस वर्ष पर्यंत राज्य करील.

भवितापिवसुज्येष्ठ:सप्तवर्षाणिवैनृपः ॥ वसुमित्रस्तथाभाव्योदशवर्षाणिवैततः ॥ २७ ॥

अर्थ- त्या पुष्पमित्राचा ज्येष्ठपुत्र वसु, सात वर्ष पर्यंत राजा होईल. त्यास वसुमित्र पुत्र होईल तो दहा वर्षें राज्य करील.

ततोंतकः समेद्वेतुतस्यपुत्रोभविष्यति ॥ भविष्यति-

समस्तस्मात्त्रीण्येवंसपुलिंदकः॥ २८॥

अर्थ- त्यापासून अंतकनामाराजा होईल तो व त्याचापुत्र हे दोघे, दोनदोन वर्षे राज्य करतील. पश्चात् त्यापुत्रापासून समनामक पुत्र होईल तो व त्याचा पुत्र पुलिंदक हे तीन तीन वर्षे राज्योपभोग करतील.

भवितावज्रमित्रस्तु समाराजापुनर्भवः॥ द्वात्रिंशत्तु समाभागः समाभागात्ततोनृपः॥ २९॥

अर्थ- त्यापुलिंदकापासून वज्रमित्र, कांहीं वर्षें राज्य करील. नंतर त्याचा- पुत्र पुनर्भव, बत्तीस वर्षे व त्याचापुत्र समाभाग ही तिनकींच वर्षे असे हे रा- ज्य करतील पुढें त्यापासून कोणी एक नृप होईल.

भविष्यतिसुतस्तस्यदेवभूमिः समादश॥ दशैतेक्षुद्रराजानोभोक्ष्यंतीमांवसुंधराम्॥ ३०॥

अर्थ- त्यास पुढें देवभूमिनामें पुत्र होऊन तो दहावर्षे राज्य करील. असेहे द- हा क्षुद्रराजे या पृथ्वीचा उपभोग करतील.

शतंपूर्णंशतेद्वेच ततः शुंगान्गमिष्यति॥ अमात्योवसुदेवस्तु प्रसह्यह्यवनींनृपः॥ ३१॥

अर्थ- त्या दहा राजांचीं सर्व मिळून तीनशें वर्षे झाल्यानंतर पुनः ही पृथ्वी, शुं- गराजांस प्राप्त होईल. ती अशीकीं, कोणी एक वसुदेवनामक प्रधान, होईल तो बलात्कारानें पृथ्वी हरण करून राज्य करूं लागेल.

देवभूमिमथोत्साद्यशौंगस्तुभवितानृपः॥ भविष्यति समाराजानवकाण्वायनोनृपः॥ ३२॥

अर्थ- पुढें कोणी एक शौंग (शुंगभृत्य) राजा, देवभूमिराजाचें राज्यापासू न उच्चाटन करून आपण राज्य करील. त्याचे पश्चात् नउ वर्ष पर्यंत काण्वा यन राजा होईल.

भूमिमित्रः सुतस्तस्यचतुर्दशभविष्यति॥ नारायणः सुतस्तस्य भविताद्वादशैवतु॥ ३३॥

अर्थ- त्याचा पुत्र भूमिमित्र, चवदा वर्षे व त्याचापुत्र नारायण ही द्वादश व र्षे असें राज्य करतील.

सुशर्मातत्सुतश्चापिभविष्यतिदशैवतु॥ इत्येतेशुंगभृ-

स्यास्तुस्मृताःकाण्वायनानृपाः॥३४॥

अर्थ- त्याचा पुत्र सुशर्मा दहा वर्षे राज्य करील. असे हे शुंगभत्य, काण्वायन (कण्वकुलीन किंवा कण्वशाखाश्रित) राजे होतील.

चत्वारिंशद्द्विजाह्येतेकाण्वाभोक्ष्यंतिवैमहीम्॥ चत्वारिंशत्पंचचैवभोक्ष्यंतीमांवसुंधराम्॥३५॥

अर्थ- असे हे चाळीस काण्व ब्राम्हण, पंचेचाळीस वर्षे सर्वद्रव्यधारक पृथ्वीचा उपभोग करतील.

एतेप्रणतसामंताभविष्याधार्मिकाश्चये॥ येषांपर्यायकालेतुभूमिरांध्रान्गमिष्यति॥३६॥

अर्थ- ते काण्व राजे, धार्मिक असल्यामुळें सर्व मांडलिक राजानीं नमस्कृत असे होतील. त्यांची राज्य करण्याची कालमर्यादा झाल्यानंतर, ती भूमी-आंध्र राजांस प्राप्त होईल. इतिश्री मत्स्यपुराणे भविष्य राजानुकीर्तनं नाम द्विसप्तत्युत्तर द्विशततमो ऽध्यायः॥२७२॥

अध्याय २७३वा.

सूत उवाच॥ काण्वायनास्ततोभूपाःसुशर्माणः प्रसह्यताम्॥ शुंगानांचैवयच्छेषंक्षपित्वातुबलीयसः॥१॥

अर्थ- सूत सांगतात ऋषीहो, सुशर्म नामक जे काण्वायन राजे, ते बलाढ्य असल्यामुळें शुंगराजांचा निःशेष नाश करून आपणच बलात्कारानें पृथ्वी हरण करतील.

शिशुकोंध्रःसजातीयःप्राप्स्यतीमांवसुंधराम्॥ त्रयोविंशत्समाराजाशिशुकस्तुभविष्यति॥२॥

अर्थ- पुढें आंध्र राजांचा सजातीय शिशुक नामक राजा होईल. त्यासही पृथ्वी प्राप्त झाल्यावर तो तेवीस वर्षे राज्य करील.

श्रीमल्लकर्णिर्भविता तस्य पुत्रस्तुवैदश॥ पूर्णोत्संगस्ततोराजावर्षाण्यष्टादशैवतु॥३॥ पंचाशतंसमाःषट्चशांतकर्णिर्भविष्यति॥ दशचाष्टौनवर्षाणितस्यलंबोदरःसुतः॥४ आपीनकोदशद्वेचतस्यपुत्रोभविष्यति॥दशचाष्टौचवर्षाणिमेघ

स्वातिर्भविष्यति ॥ ५ ॥ स्वातिश्च भविता राजा स-
मास्त्वष्टादशैव तु ॥ स्कंदस्वातिस्तथा राजा सप्तै-
व तु भविष्यति ॥ ६ ॥

अर्थ- त्याचा पुत्र श्रीमल्लकर्णि, तो दहा वर्षे व त्याचा पूर्णोत्संग अठरा वर्षे राजा होई-
ल. आणि त्याचा पुत्र शांतकर्णि, छपन्न वर्षे व तत्पुत्र लंबोदर, अठरा वर्षे हे दोघे राज्य क-
रतील. व त्याचा पुत्र आपीतक, बारा वर्षे व त्याचा मेघस्वाति, अठरा वर्षे असे राजे होतील.
नंतर स्वाति नामक अठरा वर्षे राजा होईल. तसाच स्कंदस्वाति राजा, सात
वर्षे राज्य करील.

मृगेंद्रस्वातिकर्णस्तु भविष्यति समास्त्रयः ॥ कुंतलः
स्वातिकर्णस्तु भविताष्टौ समा नृपः ॥ ७ ॥

अर्थ- पुढें मृगेंद्र स्वातिकर्ण, होऊन तो तीन वर्षे राज्य करील आणि कुंतल
स्वातिकर्ण, आठ वर्षे राजा होईल.

एकसंवत्सरं राजा स्वातिवर्णो भविष्यति ॥ षट्त्रिंश
च्चैव वर्षाणि पुलोमाविर्भविष्यति ॥ ८ ॥

अर्थ- तदनंतर, स्वातिवर्ण, एक वर्ष राज्य करील. त्यापुढें पुलोमा उत्पन्न
होऊन छत्तीस वर्षे राज्य करील.

भविता रिक्तवर्णस्तु वर्षाणि पंचविंशतिः ॥ ततः संव
त्सरान्पंच हालो राजा भविष्यति ॥ ९ ॥

अर्थ- पुढें होणारा रिक्तवर्ण, तो पंचवीस वर्षे, तदनंतर हालनामें राजा, पां-
च वर्षे असे हे दोघे राज्य करणारे होतील.

पंच मंदुलको राजा भविष्यति समा नृपः ॥ पुरींद्रसेनो
भविता तस्मात्सौम्यो भविष्यति ॥ १० ॥

अर्थ- नंतर मंदुलक राजा, होऊन तो पांच वर्षे राज्य करील. त्यास पुरींद्रसे-
न व त्यापासून सौम्य असे हे दोन राजे होतील.

सुंदरः शांतिकर्णस्तु अब्दमेकं भविष्यति ॥ चको
रः स्वातिकर्णस्तु षण्मासान्वै भविष्यति ॥ ११ ॥

अर्थ- नंतर शांतिकर्ण सुंदराकृति असून एक वर्ष राज्य करणारा होईल. पु-
ढें चकोर सदृश स्वातिकर्ण हा षण्मास राज्य करील.

अष्टाविंशतिवर्षाणि शिवस्वातिर्भविष्यति ॥ राजाच-
गौतमीपुत्रोह्येकविंशत्यतोनृप: ॥१२॥

अर्थ- पुढें शिवस्वाति, अठ्ठावीस वर्षें राजा होईल. नंतर गौतमीचा पुत्र तो एकवीस वर्षें राजा होईल.

अष्टाविंशतिसुतस्तस्य स्कलोमावैभविष्यति ॥ शिवश्री-
र्वैस्कलोमात्तुसप्तैवभवितानृप: ॥ १३ ॥

अर्थ- त्याचा पुत्र स्कलोमा, अठ्ठावीस वर्षं पर्यंत राजा होईल. आणि स्कलोमा पासून शिवश्री राजा होईल. तो, सातवर्षेंच राज्य करील.

शिवस्कंध: शांतिकर्णाद्भविताह्यात्मज:समा: ॥ नवविं-
शतिवर्षाणियज्ञश्री: शांतिकर्णिक: ॥ १४ ॥

अर्थ- नंतर शांतिकर्णाचापुत्र शिवस्कंध होईल. तो, एकुणतीस वर्षपर्यंत राज्य करणारा होईल. त्यापुढें यज्ञश्री नामक राजाही तितकींच वर्षें पर्यंत होईल हा शांति कर्ण वंशस्थ आहे.

षडेवभवितातस्माद्विजयस्तुसमास्तत: ॥ चंडश्री:-
शांतिकर्णस्तुतस्यपुत्र: समादश ॥ १५ ॥

अर्थ- त्या यज्ञश्री राजास विजय नामा पुत्र होईल. तो, सहा वर्षें व त्या विजयाचा पुत्र चंडश्री, दहा वर्षें असे हे दोघे राज्य करतील.

स्कलोमासप्तवर्षाणि अन्यस्तेषांभविष्यति ॥ एको
नविंशतिर्ह्येते आंध्राभोक्ष्यंति वैमहीम् ॥ १६ ॥

अर्थ- यापूर्वोक्त राजांत कोणी एक अन्य स्कलोमा होईल. तो, सात वर्षें राज्य करील. असे हे एकूणीस आंध्रराजे, पृथ्वीचा उपभोग करतील.

तेषां वर्षशतानिस्युश्चत्वारि षष्टिरेवच ॥ आंध्राणां
संस्थितारांज्येतेषांभृत्यान्वयेनृपा: ॥ १७ ॥

अर्थ- नंतर त्या आंध्रांचे जे भृत्य, त्यांचे वंशस्थराजे, चारशें साठ वर्षपर्यंत राज्यावर स्थित होतील.

सप्तैवांध्राभविष्यंतिदशाभीरास्तथानृपा: ॥ सप्त
गर्दभिलाश्चापिशकाश्चाष्टादशैवतु ॥ १८ ॥

अर्थ- नंतर सात आंध्र, दहा आभीर राजे, सात गर्दभिल्ल व अठरा श

कराजे असे होतील.

यवनाष्टौभविष्यंतितुषाराश्चचतुर्दश ॥ त्रयोदशगुरुं-
डाश्चहूणाह्येकोनविंशतिः ॥ १९ ॥

अर्थ- तसेच आठ यवन, चवदा तुषार राजे, गुरुंडराजे तेरा व हूणराजे एकूणी-
स असे होतील.

यवनाष्टौभविष्यंतिसप्ताशीतिमहीमिमाम् ॥ सप्तगर्द-
भिलाभूयोभोक्ष्यंतीमांवसुंधराम् ॥ २० ॥

अर्थ- पुनः आठ यवन होतील. ते, सत्यायशीं वर्षे राज्य करतील. नंतर पुनः
सात गर्द्दभिल्लराजे, पृथ्वीचा उपभोग करतील.

सप्तवर्षसहस्राणितुषाराणांमहीस्मृता ॥ शतानित्री-
ण्यशीतिंचशतान्यष्टादशैवतु ॥ २१ ॥

अर्थ- नंतर दोनसहस्र एकशें ऐशीं तुषार नामक राजे होतील. त्यांस, सातस
हस्र वर्ष पर्यंत ही पृथ्वी प्राप्त होईल.

शतान्यर्द्धंचतुष्काणिभवितव्यास्त्रयोदश ॥ गुरुंडा-
वृषलैःसार्धंभोक्ष्यंतेम्लेच्छसंभवाः ॥ २२ ॥

अर्थ- पुढें म्लेंच्छां पासून उत्पन्न होणारे तेरा गुरुंडराजे, वृषलां सहवर्तमा
न, साडेचारशें वर्षें राज्योपभोग करतील.

शतानित्रीणिभोक्ष्यंतेवर्षाण्येकादशैवतु ॥ आंध्राः
श्रीपार्वतीयाश्चतेद्विपंचाशतंसमाः ॥ २३ ॥

अर्थ- नंतर आंध्रराजे, तीनशें अकरा वर्षे राज्याचा उपभोग करतील. आणि
श्री पार्वतीय राजे बावन्न वर्षें राज्य करतील.

सप्तषष्टिस्तुवर्षाणिदशाभीरास्तथैवच ॥ तेषूत्स-
न्नेषुकालेनततःकिलकिलानृपाः ॥ २४ ॥

अर्थ- पुढें दहा आभीर राजे, सदुसष्ट वर्षे राज्य करतील. नंतर कालें करून
त्यांचा नाश झाला असतां तदनंतर किलकिल नामक राजे होतील.

भविष्यंतीहयवनाधर्मतःकामतोर्थतः ॥ तैर्विमि-
श्राजनपदाआर्याम्लेच्छाश्चसर्वशः ॥ २५ ॥

अर्थ- नंतर या पृथ्वीवर यवन नृपति होतील. आणि त्यांनी धर्म, काम व अ

र्थ यानीं सर्वदेश, मिश्रित होऊन प्रायशः श्रेष्ठलोकही म्लेंच्छासारखे
चरण करणारे होतील.

विपर्ययेणवर्ततेक्षयमेष्यंतिवैप्रजाः॥ लुब्धानृतश्रु
वाश्चैवभवितारोनृपास्तथा ॥२६॥

अर्थ- तसेच राजेही, लुब्ध व अनृत भाषण करणारे होतील. मग अर्था
च सर्वलोक ही, विपरीत धर्मानें वर्तूं लागल्यामुळें प्रजा क्षय पावतील.

कल्किनानुहताःसर्वेआर्याम्लेच्छाश्चसर्वतः॥ अ-
धार्मिकाश्चयेत्यर्थंपाखंडाश्चैवसर्वशः ॥२७॥

अर्थ- असे अधार्मिक, अत्यंत पाखंडि व श्रेष्ठ असून म्लेंच्छ प्राय झाले
ले या सर्वांचा कलीच्या अंतीं भगवान् कल्की अवतार धारण करून सं-
हार करील.

प्रणष्टेनृपवंशेतुसंध्याशिष्टेकलौयुगे॥ किंचिच्छि-
ष्टाःप्रजास्तावैधर्मेनष्टेऽपरिग्रहाः॥२८॥ असाध-
वोह्यसत्वाश्चव्याधिशोकेनपीडिताः॥ अनावृष्टि
हताश्चैवपरस्परवधेप्सवः॥२९॥ अशरण्याःपरि-
त्रस्ताःसंकटेघोरमाश्रिताः॥ सरित्पर्वतवासिन्योभ
विष्यंत्यखिलाःप्रजाः॥ ३०॥ पत्रमूलफलाहाराश्ची
रपत्राजिनांबराः॥ वृत्यर्थमभिलिप्संत्यश्चरिष्यंति
वसुंधराम् ॥३१॥

अर्थ- त्याचा प्रसंग असाकीं, ज्याकालीं कलियुगाचा अंत्य संधिकाल अव
शिष्ट राहिला असतां त्याकालीं सर्वराजवंश व वर्णाश्रम धर्म नष्ट होतील. आणि
कांहीं शेष राहिलेल्या प्रजा, वस्त्रपात्रादि समस्त वस्तु संग्रह व यथाविधि-
स्त्री परिग्रह यानीं रहित असून सज्जन रीतीशून्य, पराक्रमहीन, रोगादि कां
च्या व्यथा व शोक यानीं पीडित अशा होत्सात्या पर्जन्य वृष्टि न होण्यामुळें धा
न्यादिकांचा अभाव झाल्यानें परस्पर वधाची इच्छा करीत असून परस्प-
रांस आश्रय व वासकरण्यास गृहें नसल्यावरून अत्यंत घोरसंकटांत प्रा
प्त होऊन त्रास युक्त होतात. आणि नदी पर्वतादिकस्थानीं वास करून पत्र
फलें, पर्ण व हरिणाजिनें हींच प्रावर्णें धारण केलेल्या अशा त्या पत्रमूल

हार करील निर्वाहाच्या इच्छेनें पृथ्वीवर संचार करणाऱ्या होतील.

एवंकष्टमनुप्राप्ताः प्रजाः कालेयुगांतके ॥ निःशेषा
स्तुभविष्यंतिसार्धंकलियुगेनतु ॥ ३२ ॥

अर्थ - अशारीतीनें युगांत समयीं प्रजांस अनेक कष्ट प्राप्त होतील. नंत
र त्या सर्वप्रजा, कलियुगासह वर्तमान अंतीं निःशेष होतील.

क्षीणेकलियुगेतस्मिन्दिव्येवर्षसहस्रके ॥ ससं-
ध्यांशेस्तुनिःशेषेकृतंतुप्रतिपत्स्यते ॥ ३३ ॥

अर्थ - आणि ज्या काळीं युगाचा पूर्वसंधि व अंत्य संध्यंश यां सहित देवां-
चीं सहस्र वर्षे पूर्ण झाल्यावर, कलियुग निःशेष क्षीण होईल ते समयीं कृ
त युगाची प्रवृत्ति होईल.

एवंवंशक्रमः कृत्स्नः कीर्तितोयोमयाक्रमात् ॥ अ-
तीतावर्तमानाश्चतथैवानागताश्चये ॥ ३४ ॥

अर्थ - याप्रकारें पूर्वीं झालेले, वर्तमानकाळीं विद्यमान व पुढें होणारे जे
राजे त्यांचा संपूर्ण वंशक्रम, यथाक्रमानें मीं कथन केला.

महापद्माभिषेकात्तुयावज्जन्मपरीक्षितः ॥ एवंवर्ष-
सहस्रंतुज्ञेयंपंचाशदुत्तरम् ॥ ३५ ॥

अर्थ - तसाच आतां कलियुगांतील अवांतर प्रकार सांगतात कीं, परी-
क्षिति जन्म आरंभ करून महापद्माभिषेक पर्यंत एकसहस्र पन्नास वर्षप-
रिमित काळ होईल.

पौलोमास्तुतथांध्रास्तुमहापद्मांतरेपुनः ॥ अनंतरंश
तान्यष्टौषट्त्रिंशत्तुसमास्तथा ॥ ३६ ॥

अर्थ - त्यांत महापद्मानंतर पुलोमाचे वंशस्थ व आंध्रराजे हे आठशें छत्ती
स वर्षे राज्य करतील.

तावत्कालांतरंभाव्यमांध्रांतादापरीक्षितः ॥ भविष्ये
तेप्रसंख्याताः पुराणज्ञैः श्रुतर्षिभिः ॥ ३७ ॥

अर्थ - पुढें परीक्षिती पासून आंध्र राजांच्या समाप्ती पर्यंत जे राजे होतील
त्यांत ही आठशें छत्तीस वर्षपरिमितच काळ होईल. अशी शास्त्र पुराण
ज्ञ ऋषीनीं भविष्य संख्या कथन केली आहे.

सप्तर्षयस्तदाप्रांशुप्रदीप्तेनाग्निनासमाः॥ सप्तविंश तिभाव्यानां आंध्राणांतुयदापुनः॥३८॥

अर्थ- नंतर कलिप्रवेश काळ विवरण सांगतात. तें असें कीं, ज्याकाळीं सत्तावीस आंध्रराजे पुनः उत्पन्न होतील. त्याकाळीं सप्तऋषि, अति तीक्ष्णाग्र दीप्त किरण युक्त अग्नितुल्य प्रकाश मान होतील.

सप्तर्षयस्तुवर्ततेयत्र नक्षत्रमंडले॥ सप्तर्षयस्तुतिष्ठं तिपर्यायेणशतंशतम्॥३९॥

अर्थ- आणि ते सप्तऋषि, ज्या अश्विनी प्रभृति सप्तविंशति नक्षत्र मंडलावर स्थित आहेत त्यांतील प्रत्येक नक्षत्रावर ते पर्यायानें मनुष्य मानाच्या शतशत वर्ष पर्यंत वर्तत असतात.

सप्तर्षीणासुपर्येतत्स्मृतंवैदिव्यसंज्ञया॥ समादिव्याःस्मृ ताःषष्टिर्दिव्याब्दानितुसप्तभिः॥४०॥

अर्थ- तें अश्विनी प्रभृति नक्षत्र मंडल, सप्तर्षीच्या ऊर्ध्वभागीं असून दिव्य नामानें प्रसिद्ध आहे. आणि या सप्तर्षीनीं नक्षत्र मंडलावर केलेल्या एकाप्रदक्षिणेंत देवांचीं साठ* वर्षें होतात. कारण देव, सप्तर्षी समान आहेत.

एभिःप्रवर्ततेकालोदिव्यःसप्तर्षिभिःस्तुवै॥ सप्तर्षीणांत्व यौपूर्वौदृश्येतेह्युदितौनिशि॥४१॥

अर्थ- व या सप्तऋषीं वरून देवमानसंबंधि कालाची गणना होत असते. तसेच जे त्या सप्तऋषींतील पूर्वीचे पुलह व क्रतु हे दोन ऋषी रात्रीं प्रथमतः उदयास आले-ले दृष्टिगोचर होतात.

तयोर्मध्येतुनक्षत्रंदृश्यतेयत्समंदिवि॥ तेनसप्तर्षयोज्ञेया युक्ताव्योम्निशतंसमाः॥४२॥

अर्थ- त्यांचे मध्यभागीं समांतर दक्षिण प्रदेशीं अश्विन्यादिक सप्तविंशति नक्षत्रांतील जें नक्षत्र आकाशांत दृष्टिगोचर होतें त्या नक्षत्रा वरून सप्तऋषी जाणावे; व असेते सप्तऋषी त्या नक्षत्रा सहित आकाशांत मनुष्य मानानें शत वर्षें असतात.

*टीप असेहे सप्तऋषि, प्रतिनक्षत्रावर शंभर वर्षे असतात. आणि प्रत्येक नक्षत्राचें आठ लिप्ती अंतर आहे. या माना वरून १०० नीं ८ ना गुणून ८०० कला झाल्या व यांस २७ नक्षत्रानीं गुणलें असतां त्या सर्व नक्षत्र मंडलाच्या २१६०० कला झाल्या व त्यांस ३६० नीं भागिले म्हणजे देवांचीं ६० वर्षे होतात.

नक्षत्राणामृषीणांचयोगस्यैतन्निदर्शनम्॥ सप्तर्षयोमघा
युक्ता: कालेपारिक्षितेशतम् ॥ ४३॥

अर्थ- असें हें सप्तविंशति नक्षत्रें व सप्तऋषि यांच्या परस्पर योगाचें उदाहरण दर्शविलें. तर अशा पूर्वी सांगितलेल्या प्रकारानें हे सप्तऋषि परिक्षिति राजाच्या राज्य समयीं मघा नक्षत्रावर प्राप्त होऊन तेथें शतवर्ष पर्यंत स्थित होतील.

ब्राम्हणास्तुचतुर्विंशाभविष्यंतिशतंसमा:॥ ततःप्रभृत्ययंसर्वोलोकोव्यापत्स्यतेभृशम्॥ ४४॥

अर्थ- तसेच चोवीस ब्राम्हण या अठ्ठाविसाव्या कलींत शतवर्ष पर्यंत राजे होतील. त्याच काला पासून हा सर्व मनुष्यलोक अतिशयें विपत्तीनें व्याप्त होईल.

अनृतोपहताल्लुब्धाधर्मत:कामतोर्थत:॥ श्रौतस्मार्ते
तिशिथिलेनष्टवर्णाश्रमेतथा॥ ४५॥ संकरंदुर्बला-
त्मान:प्रतिपत्स्यंतिमोहिता:॥ ब्राम्हणा:शूद्रयोनि-
स्था:शूद्रावैमंत्रयोनय:॥ ४६॥

अर्थ- तो असाकीं, ते लोक लोभग्रस्त असून धर्म, काम व अर्थ यां पासून अनृतानें भ्रष्ट होऊन विषय संबंधानें मोहित होतात. तसेच त्याकालीं श्रौत (वेदोक्त), स्मार्त (स्मृत्युक्त), हीं कर्मे अतिक्षीण होऊन वर्ण व आश्रम हे नाश पावले असतां ते लोक दुर्बलांत:करण युक्त होत्साते वर्णसंकरांत प्राप्त होतात. आणि ब्राम्हण, शूद्रजातींत जातात व शूद्र, वेदोक्त कर्म निष्ठ होतात.

उपस्थास्यंतितान्विप्रास्तदर्थमभिलिप्सव:॥ क्रमेणै
वचदृश्यंतेस्ववर्णांतरदायकम्॥ ४७॥ क्षयमेवगमि-
ष्यंतिक्षीणशेषायुगक्षये॥

अर्थ- त्याच प्रमाणें ते ब्राम्हण त्या शूद्रां पासून द्रव्य प्राप्तीच्या इच्छेनें त्यांसमीप आर्जव वृत्तीनें राहिलेले क्रमानें अधिकाधिक दृष्टिगोचर होतात. आणि त्या अठ्ठाविसाव्या चौकडींतील कलियुगाच्या अंतीं क्षयहोऊन अवशिष्टराहिलेले लोक स्वकीय वर्णांतून अन्य वर्णांत जाऊन नाश पावतील.

यस्मिन्कृष्णोदिवंयातस्तस्मिन्नेवतदाहनि॥ ४८॥ प्र

तिपन्नंकलियुगंप्रमाणंतस्यमेश्टणु ॥

अर्थ- आणि श्री कृष्ण ज्याकाळीं भूलोकाचा त्याग करून स्वर्गास गेले. त्याकाळीं ते च दिवशीं भूमीवर कलियुगाची प्रवृत्ति झाली. त्याकालांचें प्रमाण मजपासून श्रवण कर.

चतुःशतसहस्रंतुवर्षाणांवैस्मृतंबुधैः ॥ ४९ ॥ चत्वारिंशत्सहस्राणिसंख्यातंमानुषेणतु ॥ दिव्यंवर्षसहस्रंतु-तदासंख्याप्रवर्तते ॥ ५० ॥ निःशेषेतुतदातस्मिन्कृतंवैप्रतिपत्स्यते ॥

अर्थ- तें असें कीं, मनुष्य मानानें चारलक्ष बत्तीस हजार इतक्या संख्येनें विद्वज्जनानीं गणलेलें आहे. आणि याच युगाची संख्या देवमानानें एकसहस्र वर्षें गणलेली आहे. असें हें कलियुग पूर्ण समाप्त झालें असतां, त्याकाळीं पुनः कृत युग प्रवृत्त होतें.

ऐलश्चेक्ष्वाकुवंशश्चसहदेवःप्रकीर्तिताः ॥ ५१ ॥ इक्ष्वाकोः संस्मृतंक्षत्रंसुमित्रांतंभविष्यति ॥ ऐलंक्षत्रंसमाक्रांतंसोमवंशविदोविदुः ॥ ५२ ॥

अर्थ- तसेच ऐलराजा, इक्ष्वाकु वंश व सहदेव हे कथन केले. आणि सूर्य वंशस्थ इक्ष्वाकु राजाच्या वंशातील क्षत्रिय, सुमित्रराजापर्यंतच होतील. व सोम वंशस्थ क्षत्रियराजांचा वंश ऐलराजा पासून झाला असें सोम वंशज्ञाते जाणतात.

एतेविवस्वतःपुत्राः कीर्तिताः कीर्तिवर्धनाः ॥ अतीता-वर्तमानाश्चतथैवानागताश्चये ॥ ५३ ॥ ब्राम्हणाः क्षत्रियावैश्यास्तथाशूद्राश्चवैस्मृताः ॥ वैवस्वतेंतरेतस्मिन्नितिवंशः समाप्यते ॥ ५४ ॥

अर्थ- असेहे इक्ष्वाकु प्रभृतिराजे सूर्याचे पुत्रभूत असून स्व वंशाची कीर्ति वृद्धिंगतकरणारे झालेले कथन केले. तसेच भूत, वर्तमान व भविष्य असे जे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र तेही वर्णिले. या प्रकारें त्या वैवस्वत मन्वतरांत तो क्षत्रिय वंश समाप्त होतो.

देवापिःपौरवोराजाऐक्ष्वाकोयश्चतेमतः ॥ महायोगब

लोपेतौकलापग्राममाश्रितौ ॥ ५५॥

अर्थ- आणिपुरूचावंशस्थ देवापि व इक्ष्वाकु कुलस्थ ऐक्ष्वाक हे दोन राजे महायोग बलानें युक्त असून या अठ्ठाविसाव्या कलीच्या अंतीं कलाप ग्रामांत वास करतील.

एतौक्षत्रप्रणेतारौनवविंशेचतुर्युगे ॥ स्कवर्चामनुपुत्रस्त ऐक्ष्वाकार्द्योभविष्यति ॥ ५६॥

अर्थ- नंतर एकुण तिसाव्या चौकडींतील कृतयुगांत आरंभीं ते उभयतां क्षत्रिय वंशाचे प्रवर्तक होतील. ते असे कीं, ऐक्ष्वाकापासून झालेला स्कवर्चा नामक मनुपुत्र जो होईल

नवविंशेयुगेसोवैवंशस्यादिर्भविष्यति ॥ देवापिपुत्रः सत्यस्त ऐलानांभवितानृपः ॥ ५७॥

अर्थ- तो एकुण तिसाव्या चतुर्युग पर्यायाच्या आरंभीं कृतयुगांत सूर्य वंशांतील क्षत्रियांचा आदिपुरुष होईल. तसाच जो देवापि पुत्रसत्य नामक राजा तो चंद्र वंशांतील ऐलादिक राजांचा आदिपुरुष होईल.

क्षत्रप्रवर्तकावेतौभविष्येतुचतुर्युगे ॥ एवंसर्वेषुविज्ञेयं संतानार्थंतुलक्षणम् ॥ ५८॥

अर्थ- असे हे दोघे एकुण तिसाव्या भविष्य कृतादि चतुर्युगांच्या पर्यायांतील कृतयुगाच्या आरंभीं क्षत्रिय कुलाचे उत्पादक होतील. अशा रीतीनें सर्वच तुर्युगांचे पर्यायांत क्षत्रिय वंशांच्या उत्पत्तीचें स्वरूप जाणावें.

क्षीणेकलियुगेचैवतिष्ठंतीतिकृतेयुगे ॥ सप्तर्षयस्तैःसार्धंमध्येत्रेतायुगेपुनः ॥ ५९॥ बीजार्थंतेभविष्यंतिब्रम्हक्षत्रस्यवैपुनः ॥ एवमेवंतुसर्वेषुतिष्ठंतेष्वंतरेषुच ॥ ६०॥

अर्थ- त्याचप्रमाणें हें कलियुग समाप्त झाल्यावर कृतयुगांत ते सप्तर्षि असतात. नंतर ते ऋषी त्या कृतयुगोत्पन्न चंद्रसूर्य वंशस्थ राजांसहित पुनःपुनः मध्यें त्रेतायुगांत ब्राम्हण व क्षत्रियांच्याउत्पत्त्यर्थ स्थित होतात. असेहे ऋषिसहित क्षत्रिय, सर्व मन्वंतरांत वर्तत असतात. त्या सकल मन्वंतरांचे अंतीं कलियुग असतें.

सप्तर्षयोनृपैःसार्धंसंतानार्थंयुगेयुगे ॥ एवंक्षत्रस्य-
चोत्सेधःसंबंधोवैद्विजैःस्मृतः ॥ ६१ ॥

अर्थ- अशारीतीनें सप्तर्षि, चंद्र सूर्य वंशोद्भव राजां सह वर्तमान प्रतियुगीं स्व संतानोत्पत्यर्थ स्थित असतात. असा क्षत्रिय कुलाचा उच्छ्राय व संबंध हे ब्राम्हणांच्या योगानें होतात.

मन्वंतराणांसंतानेसंतानाश्चश्रुतौस्मृताः ॥ अतिक्रां-
तयुगाश्चैवब्रम्हक्षत्रस्यसंभवाः ॥ ६२ ॥

अर्थ- या प्रमाणें मन्वंतरांच्या परंपरेंत वंशोत्पादक ब्राम्हण व राजे हे वेदांत-प्रसिद्ध आहेत. आणि असे ब्राम्हणक्षत्रियांसउत्पन्न करणारे होऊन पूर्वी बहुत युगें अतिक्रांत झाली.

यथाप्रशांतिस्तेषांवैप्रकृतीनांयथाक्षयः ॥ सप्तर्षयोवि
दुस्तेषांदीर्घायुस्त्वंक्षयोदयौ ॥ ६३ ॥

अर्थ- त्यांचें जसें सुख तसाच त्यांच्या प्रधानादिक राज्यांगांचाक्षय आणि त्यांचें दीर्घायुष्य, क्षय व उदय यांस सप्तर्षि जाणतात.

एलेनक्रमयोगेनऐलाइक्ष्वाकवोनृपाः ॥ उत्पद्यमाना-
स्त्रेतायांक्षीयमाणाःकलौयुगे ॥ ६४ ॥ अनुयांतियुगा
ख्यांतुयावन्मन्वंतरक्षयम् ॥ जामदग्न्येनरामेणक्षत्रेनि
रवशेषिते ॥ ६५ ॥ रिक्तेयंवसुधासर्वाक्षत्रियैर्वसुधा
धिपैः ॥

अर्थ- अशा क्रम योगानें चंद्र वंशस्थ ऐल व सूर्य वंशांतील इक्ष्वाकु कुलस्थ हे राजे त्रेता युगांत उत्पन्न झाले असून पुढें कलि युगांत क्षीण होतात. या प्रमाणें मन्वंतर समाप्ती पर्यंत प्रति युगीं त्या त्या युगानु सार वर्तत असतात. आणि जमदग्नि पुत्र परशुरामानें क्षत्रिय वंश निर्मूल केले असतां, संपूर्ण ही-पृथ्वी धराधिप क्षत्रियानीं शून्य झाली.

द्विवंशकरणंसर्वंकीर्तयिष्येनिबोधमे ॥ ६६ ॥ ऐलंचेक्ष्वा
कुवंशंचप्रकृतिंपरिचक्षते ॥

अर्थ- नंतर चंद्रवंश व सूर्यवंश या उभय वंशस्थ राजांची सर्व प्रकृति कथन करतों ती मजपासून श्रवण कर. तें असें कीं, चंद्र वंशांतील ऐल व सूर्य वं

शस्य इक्ष्वाकु हे दोन राजे दोन्ही वंशांचे मूलभूत आहेत.

राजानः श्रेणिबद्धाश्च तथान्ये क्षत्रिया भुवि ॥ ६७ ॥ ऐलवंशास्तु भूयांसो न तथेक्ष्वाकवो नृपाः ॥

अर्थ- तसेच त्या चंद्रसूर्य वंश पंक्तींतील राजे व पृथ्वी वरील जे इतर क्षत्रिय यांत जसे ऐल वंशस्थ नृप बहुत आहेत तसे इक्ष्वाकु वंशांतील राजे बहुत नाहींत.

एषामेकशतं पूर्णं कुलानामभिरोचते ॥ ६८ ॥ तावदेव तु भोजानां विस्तारो द्विगुणं स्मृतम् ॥

अर्थ- त्या ऐल राजांचीं पूर्ण एकशें एक कुलें आहेत. आणि भोज कुलोत्पन्न राजांचीं कुलें प्रथमतः तितकींच असून पुढें तीं विस्तृत झाल्यामुळें द्विगुणित अधिक झालीं.

भोजानां द्विगुणं क्षत्रं चतुर्धा तद्यथातथं ॥ ६९ ॥ ते ह्यतीताः सनामानो ब्रुवतस्तान्निबोध मे ॥

अर्थ- तेंच भोज कुलांतील द्विगुणित क्षत्रिय पश्चात् कालांतरीं यथास्थित रीतीनें चतुर्गुणित झाले. ते स्वकीय देश संबंधि नामानें युक्त असून पूर्वींच होऊन गेले. त्यांचें वर्णन मजपासून श्रवण कर.

शतं वै प्रतिविंध्यानां शतं नागाः शतं हयाः ॥ ७० ॥ शतमेकं धार्तराष्ट्राह्यशीतिर्जनमेजयाः ॥ शतं वै ब्रम्हदत्तानां वीराणां कुरवः शतम् ॥ ७१ ॥

अर्थ- तें असें कीं, त्यांतील प्रतिविंध्य नामक कुलांतील शत राजे असून त्यां समीप गज व अश्व हे शतशः होते. आणि त्यांत धार्तराष्ट्र हे तितकेच असून जनमेजय कुलस्थ राजे ऐंशीं होते. तसेच ब्रम्हदत्त कुलांतील वीर राजे शत संख्या परिमित असून कुरु कुलांतले राजेही शंभर होते.

ततः शतं च पंचालाः शतं काशिकुशादयः ॥ तथापरे सहस्रे द्वे ये नीपाः शशबिंदवः ॥ ७२ ॥

अर्थ- त्यापुढें पंचाल राजे शंभर होऊन पश्चात् काशिराजे शंभर व कुशराजेही तितकेच झाले. तसेच अन्य जे नीप कुलस्थ व शशबिंदु कु

लोत्पन्न राजे झाले ते ही उभय कुलस्थ मिळून सर्वराजे द्विसहस्र होते.

इष्टवंतश्चतेसर्वेसर्वैर्नियुतदक्षिणाः॥ एवंराजर्षयोतीताः श
तशोथसहस्रशः॥७३॥

अर्थ- या प्रमाणें ते सर्वराजे यज्ञ कर्ते असून संपूर्ण ही लक्षावधि संख्या परिमि
त दक्षिणा देणारे होते. असे शतशः व सहस्रशः हे सकल राजर्षि पूर्वी अतिक्रां
त झाले.

मनोर्वैवस्वतस्यासन्वर्तमानेंतरेविभो॥ तेषांतुनिधनो-
त्पत्तौलोकसंस्थितयःस्थिताः॥७४॥

अर्थ- ते या वैवस्वत मनुराजाच्या वर्तमान मन्वंतरांत होते. त्यांची उत्पत्ति व-
नाश झाल्या नंतर ही त्यानीं स्थापन केलेल्या लोकस्थिति यथाकालानुसार चा
लल्या आहेत.

नशक्योविस्तरस्तेषांसंतानस्य परस्परम्॥ तत्पूर्वापर
योगेनवक्तुंवर्षशतैरपि॥७५॥

अर्थ- अशात्या पूर्वोक्त राजांच्यापरस्पर संबंधानें झालेला वंश विस्तार पू-
र्वोत्तर भागानीं वर्णन करण्याविषयीं शतवर्षानीं ही कोणी समर्थ होणार नाहीं.

अष्टाविंशसमाख्यातागतावैवस्वतेंतरे॥ एतेदेवगणैः
सार्धंशिष्टायेतान्निबोधत॥७६॥

अर्थ- या प्रमाणें वैवस्वत मन्वंतरांतील अठ्ठाविसाव्या चौकडींत अतिप्रसि
द्ध राजे होऊन गेले. तसेच या मन्वंतरांतील अधिकारि देवगणां सह वर्तमान
जे राजे पुढें होणारे आहेत ते, ऋषी हो तुम्ही श्रवण करा.

चत्वारिंशत्त्रयश्चैवभाविष्यास्तेमहात्मनः॥ अवशि-
ष्टायुगाख्यास्तेततोवैवस्वतोह्ययम्॥७७॥

अर्थ- ते असेकीं, यामहा तेजस्वि वैवस्वत मनूच्या इतउत्तर शेष कालांत
प्रसिद्ध असेत्रेचाळीस राजे होतील; असे अवशिष्ट राजेही या युगांत प्रख्या
त असून ते वैवस्वत मनूच्या वंशासं बंधानें असल्या मुळें यास वैवस्वत म
न्वंतर म्हणतात.

एतद्वः कीर्तितंसम्यक्समास व्यासयोगतः॥ पुन-
र्वक्तुंबहुत्वात्तुनशक्यंविस्तरेणतु॥७८॥ उक्काराज

र्षयोयेतुअतीतास्तेयुगैःसह ॥ येतेययातिवंश्यानांये चवंशाविशांपते॥ ७९॥ कीर्तिताह्युतिमंतस्तेयएता न्धारयेन्नरः॥ लभतेसवरान्पंचदुर्लभानैहलौकि कान्॥ ८०॥

अर्थ- ऋषीहो, हे राजवंश प्रकरणमीं, संक्षिप्त विस्तार पूर्वक उत्तम रीतीनें तुम्हांस कथन केलें; कारण वर्णन करून अवशिष्ट राहिलेल्या राजांहून अन्य राजे बहुत असल्यामुळें तें विस्तारानें वर्णन करणें शक्य नाहीं. तसेंच जे पूर्वी राजर्षि सांगितले ते त्या पुरातन युगांसहित अतिक्रांत झाले. आणि हे राजा, ययाति वंशोद्भव राजांचे जे तेजस्वि वंश तेमीं तुला कथन केले; कारण जो मानव या राजांचे वंश अंतःकरणांत धारण करील. त्यास इहलोकचे पांच दुर्लभ वर प्राप्त होतात.

आयुःकीर्तिंधनंस्वर्गंपुत्रवांश्चाभिजायते॥ धारणा च्छ्रवणाच्चैवपरंस्वर्गस्यधीमतः॥ ८१॥

अर्थ- ते असे कीं, आयुष्य १, कीर्ति २, धन ३, स्वर्ग ४ हे चार वर प्राप्त होऊन तो पुत्रवान् ही होतो. आणि बुद्धिमान् पुरुषानें ऐकून हे वंश चित्तांत धारण केले असतां तो, स्वर्गापेक्षां उत्कृष्ट अशा महर्लोकादि स्थानास गमन करील. इतिश्री मत्स्यपुराणे भविष्यराजानुकीर्तनं नाम त्रिसप्तत्युत्तर द्विशततमो ऽध्यायः ॥ २७३॥

अध्याय २७४ वा.

ऋषयऊचुः॥ न्यायेनार्जनमर्थानांवर्धनंचाभिरक्षणम्॥ सत्पात्रप्रतिपत्तिश्चसर्वशास्त्रेषुपठ्यते॥ १॥

अर्थ- ऋषि प्रश्न करतात. हे सूत, यथान्यायें करून संपादन केलेल्या द्रव्याची, सत्पात्रीं यथाशास्त्र दान व्यवस्था केली असतां. त्याची वृद्धि व रक्षण होतें. असें सर्व शास्त्रांत वर्णन केलें आहे.

कृतकृत्योभवेत्केनमनस्वीधनवान्बुधः॥ महादानेनदत्ते नतन्नोविस्तरतोवद॥ २॥

अर्थ- तस्मात् धनवान् असून स्वस्थचित्त व ज्ञानसंपन्न असा पुरुष, कोणतें महादान केलें असतां कृतकृत्य होईल? हें विस्तारानें कथन करा.

सूतउवाच ॥ अथातःसंप्रवक्ष्यामिमहादानानुकीर्तन-
म्॥दानधर्मेपियन्नोक्तंविष्णुनाप्रभविष्णुना॥३॥

अर्थ- ते समयीं सूत म्हणतात- भारत संबंधि, दान धर्मीही प्रभाव शालि विष्णु रूप वेदव्यासानीं जी वर्णन केली नाहीं? ती महा दान प्रशंसा मीं या ग्रंथांत इतउत्तर; उत्तम रीतीनें सांगतो.

तदहंसंप्रवक्ष्यामिमहादानमनुत्तमम्॥सर्वपापक्षय
करंनृणांदुःस्वप्ननाशनम्॥४॥

अर्थ- ती अशीकीं, मनुष्यांचें सर्वपाप क्षयकारक व दुःस्वप्न नाशन असें उत्कृष्ट जें महादान, तें मीं तुम्हांस सांगतों.

यत्तत्षोडशधाप्रोक्तंवासुदेवेनभूतले॥पुण्यंपवित्र-
मायुष्यंसर्वपापहरंशुभम्॥५॥पूजितंदेवताभिश्च
ब्रम्हविष्णुशिवादिभिः॥आद्यंतुसर्वदानानांतुलापुरुष-
संज्ञकम्॥६॥

अर्थ- तें असेंकीं, जें वासुदेवानीं या भूतलीं दानधर्म, व्यतिरिक्त इतर ग्रंथांत पुण्य कारक, पवित्र, आयुर्दायक, सर्वपाप हरण करणारें, शुभदायक व विष्णु ब्रम्हशिवादि देवानीं पूजित असें षोडश प्रकारचें दान कथन केलें आहे. त्यासर्व दानांत प्रथम तुलापुरुष नामक दान सांगितलें आहे.

हिरण्यगर्भदानंचब्रम्हांडंतदनंतरम्॥कल्पपादपदा
नंचगोसहस्रंचपंचमम्॥७॥हिरण्यकामधेनुश्चहिर
ण्याश्वस्तथैवच॥हिरण्याश्वरथस्तद्वत्हेमहस्तिरथ-
स्तथा॥८॥पंचलांगलकंतद्वत्धरादानंतथैवच॥द्वाद
शांविश्वचक्रंतुततःकल्पलतात्मकम्॥९॥सप्तसागरदा
नंचरत्नधेनुस्तथैवच॥महाभूतघटस्तद्वत्षोडशंपरिकी
र्तितम्॥१०॥

अर्थ- आणि द्वितीय हिरण्य गर्भ दान, तदनंतर तृतीय ब्रम्हांड दान, चतुर्थ कल्प वृक्षदान, पंचम गोसहस्र दान, षष्ठ हिरण्य कामधेनुदान, सप्तम हिरण्याश्व दान, अष्टम हिरण्याश्व रथदान, नवम हेम हस्ति रथ दान, दशम पंच लांगलक दान, एकादश भूमिदान, द्वादश विश्वचक्र दान, त्रयोदश कल्पलता दान, चतुर्दश सप्त

सागरदान, पंचदश रत्नधेनुदान, तसेंच महाभूत घटदान अशीं सोळा प्रकारचीं दानें कथन केलीं आहेत. यांचें यथार्थ व्याख्यान पुढें वर्णन होईल.

सर्वाण्येतानि कृतवान्पुराशंबरसूदनः॥ वासुदेवश्च भगवानंबरीषोथभार्गवः॥११॥

अर्थ- हीं सर्वदानें पूर्वी मदन, भगवान् वासुदेव, अंबरीष राजा व परशुराम यानीं केलीं होतीं.

कार्तवीर्यार्जुनोनामप्रल्हादःपृथुरेवच॥ कुर्युरन्येमहीपालाः केचिच्चभरतादयः॥१२॥

अर्थ- तसेंच कार्तवीर्यार्जुन, प्रल्हाद, पृथुराजा व अन्य ही कितीएक भरतादि राजे यानीं हीं दानें केलीं. तस्मात् हीं दानें यथायोग्यतानुसार लोकानीं करावीं.

यस्माद्विघ्नसहस्रेणमहादानानिसर्वदा॥ रक्षंतेदेवताः सर्वाएकैकमपिभूतले॥१३॥

अर्थ- कारण पृथ्वीतलावर हीं महादानें करणारास, तत्तद्दानाभिमानिदेवता; सहस्रावधि विघ्नांपासून सर्वदा रक्षण करतात. अथवा एक एक दान करणारास ही, तदभिमानी देवता रक्षण करिते.

एषामन्यतमंकुर्याद्वासुदेवप्रसादतः॥ नशक्यमन्यथाकर्तुमपिशक्रेणभूतले॥१४॥

अर्थ- आणि या षोडश दानांतील कोणतेंही दान, जो, वासुदेव प्रसादानें करील १ त्याच्या यथोक्त फल प्राप्तीला या भूतलीं अन्यथा करण्या विषयीं इंद्र हीस मर्थ नाहीं.

तस्मादाराध्यगोविंदमुमापतिविनायकौ॥ महादानमखंकुर्याद्विप्रैश्चैवानुमोदितः॥१५॥

अर्थ- तस्मात् या षोडश महादानांतून कोणतें ही दान करणानें प्रथमतः गोविंद, शिव व विनायक यांचें आराधन करून ब्राम्हणांचे अनुमोदनानें या महादान नामक यज्ञास आरंभ करावा.

एतदेवाहमनवेपरिपृष्टोजनार्दनः॥ यथावदनुवक्ष्यामिश्रृणुध्वमृषिसत्तमाः॥१६॥

अर्थ- ऋषिश्रेष्ठहो, या महादाना विषयीं पूर्वी मनूनें प्रश्न केला असतां म

त्स्यरूपी जनार्दनानीं जसें त्यास सांगीतलें , तदनुसार मी, तुम्हांस कथन करतों श्रवण करा.

मनुरुवाच ॥ महादानानियानीह पवित्राणिशुभानिच॥
रहस्यानिप्रदेयानितानिमेकथयाच्युत ॥ १७॥

अर्थ - मनूनें प्रश्न केला कीं, हे अच्युता, यालोकीं पवित्र, शुभदायक, परमगुह्य व उत्तम रीतीनें देण्यास योग्य अशीं जीं महादानें तीं मला सांगा.

मत्स्यउवाच ॥ यानिनोक्तानिगुह्यानिमहादानानिषोड-
श ॥ तानितेकथयिष्यामियथावदनुपूर्वशः ॥ १८॥ तुला
पुरुषयागोयंयेषामादौविधीयते ॥

अर्थ - तेव्हां मत्स्यरूपी भगवान् म्हणतात. हे मनुराजा, जींपूर्वी षोडश महादानें कोणींच नकथन केल्यामुळें अति गुह्य होतीं तीं, अनुक्रमें करून जशीं करण्यास योग्य आहेत तशीं मी तुला सांगतों. त्यांत प्रथम तुला पुरुष दान रूप हा याग यथा विधीनें करावा.

अयने विषुवेपुण्येव्यतीपातेदिनक्षये ॥ १९ ॥ युगादि
षूपरागेषुतथामन्वंतरादिषु ॥ संक्रांतौवैधृतिदिनेच
तुर्दश्यष्टमीषुच ॥ २०॥ सितपंचदशीपर्वद्वादशीष्वष्ट-
कासुच ॥ यज्ञोत्सवविवाहेषुदुःस्वप्नाद्भुतदर्शने ॥ २१॥
द्रव्यब्राम्हणलाभेवाश्रद्धावायत्रजायते ॥ तीर्थेवाय-
तनेगोष्ठेकूपारामसरित्सुच ॥ २२॥ गृहेवायतनेवापि
तडागेरुचिरेतथा ॥ महादानानिदेयानिसंसारभय-
भीरुणा ॥ २३॥

अर्थ - हीं महादानें करण्यास उक्तकाल व देश हे सांगतात. ते असे कीं, उत्तरायण व दक्षिणायन आरंभ म्हणजे मकर संक्रमण व कर्कसंक्रमण, मेष व तुला संक्रांतिकाल, व्यतीपात, दिनक्षय, कृतादियुगांचे आरंभ दिवस, सूर्यचंद्र ग्रहण, मन्वंतराचे आरंभ दिवस, पूर्वोक्त चार संक्रांति व्यतिरिक्त इतर आठ संक्रांति, वैधृतियोग, चतुर्दशी, अष्टमी, पूर्णिमा, द्वादशी, मार्गशीष, पौष, माघ, फाल्गुन व भाद्रपद या मासांतील कृष्णाष्टमी तिथी, यज्ञ, देवांचा उत्सव व लग्न हे समारंभ काल, दुःस्वप्न व स्वप्नांत अद्भुत दर्शन झा

लें असतां द्रव्य व उत्तम ब्राम्हण लाभ झाला असतां तशीच मनांत श्रद्धेनें इच्छाउत्पन्न झाली असतां दानें करावीं हे काल सांगितले. आतां देश सांगतात कीं, भागीरथ्यादितीर्थें, तीर्थ संबंधि देवस्थानें, गोष्ठ, धर्मार्थ व देवतोद्देशें केलेले कूप व बाग, सामान्यनदी, उत्तम तडाग अशाप्रकारें पवित्र स्थानानुकूल्य नसल्यास गृहसंबंधि देवगृह अथवा गृहांतील शुद्धस्थान अशास्थानीं संसार भयांतून मुक्त होणारानें हीं महादानें करावीं.

अनित्यंजीवितंयस्मात् वसुचातीवचंचलम् ॥ केशे-
ष्वेवगृहीतःसन्मृत्युनाधर्ममाचरेत् ॥ २४ ॥

अर्थ - कारण देहाची शाश्वती नाहीं व द्रव्य हीं अत्यंत चंचल आहे. तसाच मृत्युहा, केश ग्रहण करून आकर्षण करीत आहे तस्मात् कोणत्या वेळेस जीवित नाश होईल. याचा नियम नाहीं. असें जाणून धर्माचरणा विषयीं त्वराकरावी.

पुण्यांतिथिमथासाद्यकृत्वाब्राम्हणवाचनम् ॥ षोड-
शारत्निमात्रंतुदशद्वादशवाकरान् ॥ २५ ॥ मंडपंका
रयेद्दिद्वान्चतुर्भद्रासनंबुधः ॥ सप्तहस्ताभवेद्वेदीमध्येपं
चकरातथा ॥ २६ ॥

अर्थ - आतां दानविधि सांगतात. तो असा कीं, पुण्य कारक तिथि अवलोकन करून प्रथम पुण्याह वाचन करावें नंतर कोपरा पासून कनिष्ठिकाग्रापर्यंत जें प्रमाण त्या मानानें षोडश अथवा दश किंवा द्वादश हस्त प्रमाण चतुष्कोण मंडप करावा. त्यांत चार दिशांस चार उत्तम आसनें स्थापन करावीं. आणि मंडप मध्यभागीं सप्त हस्त चतुष्कोण वेदी (ओटा) करून त्यावर पंचहस्त प्रमाण द्वितीय वेदी करावी.

तन्मध्येतोरणंकुर्यात्सारदारुमयंबुधः ॥ कुर्यात् कुंडा
निचत्वारिचतुर्दिक्षुविचक्षणः ॥ २७ ॥

अर्थ - तसेंच त्या मंडपास खदिर (खैर) काष्ठाचें द्वार करावें. आणि उत्तम चतुर पुरुषानें चार दिशांस चार कुंडे करावीं.

समेखलायोनियुतानिकुर्यात्संपूर्णकुंभानिसहा
सनानि ॥ सुताम्रपात्रद्वयसंयुतानिसयज्ञपात्रा-
णिसुविष्टराणि ॥ २८ ॥ हस्तप्रमाणानितिलाज्यधू

पपुष्पोपहाराणिसुशोभनानि ॥ पूर्वोत्तरेहस्तमिताथवेदी-
ग्रहादिदेवेश्वरपूजनाय ॥ २९॥

अर्थ- तीं अशींकीं, पूर्वादि दिशाक्रमानें एक हस्त प्रमाण चारमेखला युक्त चतु
ष्कोण व पश्चिम बाजूस पूर्वाभिमुख योन्याकृतीनें युक्त अशीं करून त्यांच्या आ
समंतात् आसना सहित पूर्ण कुंभ स्थापन करावे. त्याच प्रमाणें प्रत्येक कुंडसंन्निध उ-
त्तम ताम्रमय पात्र द्वय व स्रुक्स्रुवादि यज्ञपात्रें, कुंडाचे दक्षिण भागीं दर्भांचें आस्त
रण करून त्यावर स्थापन करावीं. तशींच यज्ञकर्त्याच्या दक्षिण भागीं तिल व-
आज्य हीं होम द्रव्यें सुशोभित पुष्पादि पूजाद्रव्यें व बलि आदि करून अर्पणाक
रण्याचीं द्रव्यें स्थापन करावीं. आणि ग्रहादि देवता व कर्मनियामक देवता यां-
च्या पूजनार्थ प्रत्येक कुंडासमीप ईशान्य नामक कोण दिशेस एक हस्त प्रमाण
वेदी करावी.

अत्रार्चनंब्रम्हशिवाच्युतानांतत्रैवकार्यंफलमाल्यवस्त्रैः॥
लोकेशवर्णाःपरितःपताकामध्येध्वजःकिंकिणिकायु
तःस्यात् ॥३०॥

अर्थ- आणि या महादान प्रकरणांत ज्यास्थानीं ब्रम्हदेव, शिव व विष्णु-
यांचें पूजास्थान असेल १ त्यास्थलीं फलें, पुष्पें व वस्त्रें यानीं, ज्याज्या लोक
पालांचे जसे वर्ण आहेत तशा पताका आसमंताद्भागीं लावून मध्यभागीं क्षु
द्र घंटिका युक्त एक ध्वज स्थापन करावा.

द्वारेषुकार्याणिचतोरणानिचत्वार्यपिक्षीर वनस्पती-
नाम् ॥ द्वारेषुकुंभद्वयमत्रकार्यंस्रग्गंधधूपांबररत्न
युक्तम् ॥३१॥

अर्थ- त्याच प्रमाणें च्यार द्वारांवर औदुंबर पल्लवानीं शोभार्थ मंगल-
दायक तोरणें बांधावीं. व प्रत्येक द्वाराच्या दोहों भागीं वस्त्र वेष्टित, गंध, पु
ष्पमाला, धूप व रत्नयुक्त असे दोन दोन कुंभ स्थापन करावे.

शालेंगुदीचंदनदेवदारुश्रीपर्णिबिल्वप्रियकांचनोत्-
त्थम् ॥ स्तंभद्वयंहस्तयुगावखातंकृत्वाद्दृढंपंचकरो
च्छ्रितंच ॥३२॥ तदंतरंहस्तचतुष्टयंस्याद्द्योदरंगम्य-
तदंगमेव ॥

अर्थ - तसेंच प्रत्येक दिशेस दोन असे चार दिशांस आठ स्तंभ स्थापन करावे. ते १ सागवान् २, हिंगणबेर ३, चंदन ४, देवदारु ५, शिसवा ६, बिल्व ७, कळंब ८ व सुवर्णचंपक या काष्ठांचे स्तंभ यथाक्रमानें हस्तद्वय प्रमाण भूमींत आच्छादन करावे. आणि बाहेर पंचहस्त प्रमाण उंच असावे. व त्या स्तंभद्वयाच्या मध्यें चार हस्तांचें अंतर असावें. तसेंच त्या दोन दोन स्तंभांवर मिळून स्थापन करण्याचें आडवें काष्ठही त्या स्तंभजातीचेंच असावें.

समानजातिश्च तुलावलंब्या हैमेन मध्ये पुरुषेण युक्ता ॥ ३३ ॥ दैर्घ्येण सा हस्तचतुष्टयं स्यात् पृथक्त्वमस्यास्तु दशांगुलानि ॥ सुवर्णपट्टाभरणा तु कार्या सा लोहपाशद्वयशृंखलाभिः ॥ ३४ ॥ युता सुवर्णेन तु रत्नमालाविभूषिता माल्यविलेपनाभ्याम्

अर्थ - आणि त्या तुळेच्या मध्यभागच्या कांड्यावर एक सुवर्णमय गोविंद प्रतिमा बांधून तीउभय भागीं समानांतर असून चार हस्त लांब व दशांगुलें वर्तुल, लोहमय कड्यांनीं दुहेरी ग्रथित दोहों बाजूंस आठ साखळ्यानीं युक्त व उत्तम वर्ण रेशमी वस्त्राभरणानें सुशोभित आणि रत्नखचित सुवर्णमाला व गंध पुष्प माळांनीं भूषित अशी तुला (तराजु) करावी.

चक्रं लिखेद्धारिजगर्भयुक्तं नानारजोभिर्भुवि पुष्पकीर्णम् ॥ ३५ ॥ वितानकं चोपरि पंचवर्णं संस्थापयेत्पुष्पफलोपशोभम् ॥

अर्थ - तसेंच भूमीवर अनेक रंगयुक्त रंगवल्लीनें कमलगर्भयुक्त सुशोभित एक चक्र लेखन करून तें उत्तम पुष्पानीं अलंकृत करावें. आणि ऊर्ध्वभागीं पंचरंगी वितान (चांदवा) लावून त्यास पुष्पें व फलें यानीं अलंकृत करावें.

अथर्त्विजो वेदविदश्च कार्याः सुरूपवेषान्वयशीलयुक्ताः ॥ ३६ ॥ विधानदक्षाः पटवोनुकूला ये चार्यदेशप्रभवा द्विजेंद्राः ॥

अर्थ - नंतर यजमानानें वदवेत्ते ऋत्विज करावे; ते असे असावे कीं, सुरूप, वेष, श्रेष्ठवंश, उत्तमशील यानीं युक्त असून कर्मविधानाचे ज्ञाते, शरीरानें समर्थ, कर्मविषयीं अनुकूल व पुण्यदेशोत्पन्न असे ते ब्राम्हण श्रेष्ठ असावे.

गुरुश्च वेदांतविदार्यवंशसमुद्भवः शीलकुलाभिरूपः ॥ ३७
पुराणशास्त्राभिरतोतिदक्षः प्रसन्नगंभीरसरस्वतीकः ॥
सितांबरः कुंडलहेमसूत्रकेयूरकंगाभरणाभिरामः ॥ ३८ ॥

अर्थ- तसाच यजमानास कर्तव्य जो मुख्य आचार्य तो असा असावा. कीं, तो गुरु वेदांत शास्त्रज्ञ व श्रेष्ठ वंशोद्भव असून शीलकुलानीं सुंदर असावा. आणि पुराणशास्त्रांत तत्पर असल्यामुळें अतिदक्ष असून निर्दोष गंभीर वाणीनें युक्त असावा. त्याच प्रमाणें शुभ्रवस्त्रें, कुंडलें, सुवर्णमय कटिसूत्र, बाहुभूषणें व कंगभरणें यानीं सुशोभित असावा.

पूर्वेणऋग्वेदविदावथास्तांयजुर्विदौदक्षिणतश्च शस्तौ ॥
स्थाप्यौद्विजौसामविदौतुपश्चादाथर्वणावुत्तरतस्तु का-
र्यौ ॥ ३९ ॥

अर्थ- तसेच ऋग्वेद वेत्ते दोन ऋत्विज पूर्वेस असून दक्षिणेस यजुर्वेदज्ञ ऋत्विज असावे. आणि पश्चिम दिशेस सामवेदज्ञाते दोन ऋत्विज व अथर्वण वेदी ऋत्विज उत्तरेस असे स्थापन करावे.

विनायकादिग्रहलोकपालवस्वष्टकादित्यमरुद्गणा
नाम् ॥ ब्रम्हाच्युतेशार्कवनस्पतीनांस्वमंत्रतोहोम-
चतुष्टयंस्यात् ॥ ४० ॥

अर्थ- विनायकादि ग्रह, लोकपाल, अष्टवसु, आदित्य, मरुद्गण, ब्रम्हदेव, विष्णु, शिव, सूर्य व वनस्पति, या देवतांच्या स्वकीय मंत्रानीं प्रत्येकीं चार अवदानें घालून होम करावा.

जप्यानिसूक्तानितथैवचैषामनुक्रमेणापियथास्वरूप-
म् ॥ होमावसानेकृततूर्यनादोगुरुर्गृहीत्वाबलिपुष्पधूप
म् ॥ आवाहयेल्लोकपतीन्क्रमेणमंत्रैरमीभिर्यजमा
नयुक्तः ॥ ४१ ॥

अर्थ- तशींच त्या विनायकादिक देवतांचीं सूक्तें त्यांच्या यथार्थ स्वरूप वर्णन युक्त सूक्तें अनुक्रमानें जपावीं. आणि होमाचे अंतीं मंगल वाद्यांचा घोष करीत असून यजमान सहित मुख्य आचार्यानें बलि, पुष्पें व धूप हीं ग्रहण करून, क्रमानें पुढें सांगितलेल्या मंत्रानीं लोकपालांचें आवाहन क-

एह्येहि सर्वामरसिद्धसाध्यैरभिष्टुतो वज्रधरोमरेशः॥
संवीज्यमानोप्सरसांगणेन रक्षाध्वरं नो भगवन्नमस्ते ४२

अर्थ- तें असें कीं, हे ऐश्वर्य संपन्न वज्रधर इंद्रा, तूं देवराज असल्या मुळें सर्व अमर सिद्ध व साध्य यानीं स्तुत असून अप्सरागण तुजला उत्तम रीतीनें वाराघालीत आहेत यास्तव तूं आमच्या यज्ञांत अवश्य आगमन करून या यज्ञाचें संरक्षण कर.

एह्येहि सर्वामरहव्यवाह मुनिप्रवीरैरभितोभिजुष्टः॥
तेजस्वतालोकगणेन सार्धं ममाध्वरं रक्ष कवे नमस्ते ॥४३

अर्थ- आणि हे अग्ने, तूं सर्व देवांस भाग प्राप्त करणारा असल्यामुळें सर्वमुनिश्रेष्ठानीं सेवित आहेस, यास्तव तूं तेजोमय शरीरि देवगणां सहित यास्थलीं येऊन माझ्या यज्ञाचें रक्षण कर. मी तुला नमस्कार करतों.

एह्येहि वैवस्वत धर्मराज सर्वामरैरर्चित दिव्यमूर्ते॥
शुभाशुभानंदशुचामधीश शिवाय नः पाहि मखं-
नमस्ते ॥ ४४॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे सूर्यसुत धर्मराजा, तूं दिव्य मूर्ति असल्या मुळें सर्व अमरानीं पूजित असून सकल मानवांस त्यांच्या शुभाशुभ कर्मानुसार आनंद व शोक हीं फलें देण्याचा अध्यक्ष आहेस यास्तव मी तुला नमस्कार करतों. तर आतां तूं आमच्या कल्याणार्थ या यज्ञाचें संरक्षण कर.

एह्येहि रक्षोगणनायकस्त्वं सर्वैस्तु वेतालपिशा-
चसंघैः॥ ममाध्वरं पाहि शुभादिनाथ लोकेश्व
रस्त्वं भगवन्नमस्ते ॥ ४५॥

अर्थ- हे ऐश्वर्य संपन्न निर्ऋते, तूं मंगल कार्यादिकांचा नाथ असून राक्षस गणांचा नायक व लोकपाल आहेस. यास्तव तूं वेताल व पिशाच समुदाय या सर्वांसहित अवश्य ये. आणि माझ्या यज्ञाचें रक्षण कर. तुला नमस्कार असो.

एह्येहि यादोगणवारिधीनां गणेन पर्जन्यमहाप्स-
रोभिः॥ विद्याधरेंद्रामरगीयमान पाहि त्वमस्मा-

न्भगवन्नमस्ते ॥ ४६॥

अर्थ- हे ऐश्वर्य संपन्न वरुणा, विद्याधर श्रेष्ठ व देव यानीं तुझें माहात्म्य वर्णित आहे. तस्मात् तूं, जलजंतुगण, समुद्रसमूह, पर्जन्य व श्रेष्ठ अप्सरा यां सहवर्तमान या यज्ञांत येऊन आम्हांस रक्षावें. तुला नमस्कार असो.

एह्येहियज्ञेममरक्षणायमृगाधिरूढः सहसिद्धसंघैः ॥ प्राणाधिपः कालकवेः सहायः गृहाणपूजांभगवन्नमस्ते ॥ ४७॥

अर्थ- हे प्राणाधिप वायो, तूं मृग वाहनारूढ असून त्या त्या कालीं अग्नीस सहाय आहेस. यास्तव हे भगवन्, तूं सिद्धसमुदाया सहवर्तमान या दान यज्ञांत माझ्या संरक्षणार्थ कृपाकरूनये. आणिमीं केलीली पूजा ग्रहण कर. मी तुला नमस्कार करतों.

एह्येहियज्ञेश्वरयज्ञरक्षांविधत्स्वनक्षत्रगणेनसार्धम् ॥ सर्वौषधीभिः पितृभिः सहैवगृहाणपूजांभगवन्नमस्ते ॥ ४८॥

अर्थ- हे भगवन्चंद्रा, तूं सकल यज्ञांचा स्वामी आहेस यास्तव तूं नक्षत्रगण, सर्वओषधी व पितृगण यांसह येऊन माझ्या या दान यज्ञाचें रक्षण करावें. आणि मीं केलेली पूजा ग्रहण कर. तुला माझे नमस्कार असोत.

एह्येहिविश्वेश्वरनस्त्रिशूलकपालखट्वांगधरेणसार्धम् ॥ लोकेशयज्ञेश्वरयज्ञसिध्यैगृहाणपूजांभगवन्नमस्ते ॥ ४९॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे विश्वेश्वर यज्ञाधिपते शंकरा, आपण, त्रिशूल, कपाल व खट्वांग हीं धारण करणाऱ्या गणासह आमच्या यज्ञसिध्यर्थ यावें आणि हे लोकेश भगवन् मीं केलेली पूजा ग्रहण करावी. मी तुम्हांस नमस्कार करतों.

एह्येहिपातालधराधरेंद्रनागांगनाकिन्नरगीयमान ॥ यक्षोरगेंद्रामरलोकसार्धमनंतरक्षाध्वरमस्मदीयम् ॥ ५०॥

अर्थ- हे शेषा, तूं पाताल भूमीचा स्वामी असून नागस्त्रिया व किन्न

र हे तुझी कीर्ति गायन करितात. असा तूं श्रेष्ठ आहेस, यास्तव तूं यज्ञ,नागश्रेष्ठ व देवलोक यांसह वर्तमान येऊन आमच्या यज्ञाचें रक्षण कर.

एह्येहि विश्वाधिपते मुनींद्र लोकेन सार्धं पितृदेवताभिः॥ सर्वस्य धातास्यमितप्रभाव विशाध्वरं नो भगवन्नमस्ते ॥ ५१॥

अर्थ- तसेंच अहो अपरिमित प्रताप शालिन् ऐश्वर्यसंपन्न ब्रम्हदेवा, आपण सर्व चराचर जगाचे उत्पादक असल्या वरून त्या विश्वाचे अधिपति आहां यास्तव तुम्हीं ऋषिश्रेष्ठ लोक, पितर व देवता यांसहित आमच्या या दानयज्ञांत येऊन प्रविष्ट व्हा. तुम्हांस आमचा नमस्कार असो.

त्रैलोक्ये यानि भूतानि स्थावराणि चराणि च ॥ ब्रम्ह विष्णु शिवैः सार्धं रक्षां कुर्वंतु तानि मे ॥ ५२॥

अर्थ- तशींच त्रैलोक्यांतील जीं चराचर भूतें आहेत; तीं ब्रम्हदेव, विष्णु व शिव यां सह येऊन माझें संरक्षण करोत.

देवदानवगांधर्वा यक्षराक्षसपन्नगाः॥ ऋषयो मनवो गावो देवमातर एव च ॥ ५३॥ सर्वे ममाध्वरे रक्षां प्रकुर्वंतु मुदान्विताः॥

अर्थ- तसेंच देव,दानव, गधर्व, यक्ष, राक्षस, नाग, नारद प्रभृति ऋषि, स्वायंभुवादिक मनु, कामधेनु प्रमुख गायी व ब्राम्ही आदि करून देवमाता हे सर्व माझ्या यज्ञांत हर्षयुक्त होऊन रक्षण करोत.

इत्यावाह्य सुरान्दद्यादृत्विग्भ्यो हेमभूषणम् ॥ ५४ ॥ कुंडलानि च हैमानि सूत्राणि कटकानि च ॥ अंगुलीयपवित्राणि वासांसि शयनानि च ॥ ५५॥

अर्थ- असें आचार्य सहित यजमानानें देवांचें आवाहन करून सुवर्णकुंडलें, कटिसूत्रें, गोफ, कडीं, ताडे, अंगुलीं तील अंगठ्या व पवित्रें इत्यादिक सुवर्णभूषणें, वस्त्रें व अनेक शय्याही ऋत्विजांस द्यावीं.

द्विगुणं गुरवे दद्याद्भूषणाच्छादनानि च ॥ जपेयुः शांतिकाध्यायं जापकाः सर्वतो दिशम् ॥ ५६॥

अर्थ- तशींच भूषणें, वस्त्रें व शय्या हे पदार्थ मुख्य आचार्यास ऋत्वि

जांपेक्षां द्विगुणित द्यावे. पश्चात् जप करणाऱ्या ब्राम्हणानीं कुंडांच्या सर्व-दिशांस बसून शांति सूक्ताच्या अध्यायाचा जप करावा.

तत्रोषितास्तुतेसर्वेकृत्वैवमधिवासनम् ॥ आदावंते चमध्येचकुर्याद्ब्राम्हणवाचनम् ॥ ५७ ॥

अर्थ- अशा रीतीनें त्या सर्व ब्राम्हणानीं त्याच दान यज्ञस्थानीं त्या दिवशीं राहून असें देवतांचें अधिवासन करून आरंभीं, मध्यें, व अंतीं ब्राम्हणां कडून पुण्याहवाचन करवावें.

ततोमंगलशब्देनस्नापितोवेदपुंगवैः ॥ त्रिःप्रदक्षिणमावृत्यगृहीतकुसुमांजलिः ॥ ५८ ॥ शुक्लमाल्यांबरोभूत्वातांतुलामभिमंत्रयेत् ॥

अर्थ- नंतर द्वितीय दिवशीं वेदानें श्रेष्ठत्व पावलेल्या ब्राम्हणानीं यजमानास मंगल सूक्तानें स्नान घातल्या वर त्यानें शुभ्रमाला व शुक्ल वस्त्रें धारण करून अंजलीन पुष्पें ग्रहण करावीं. आणि त्या तुळेस तीन प्रदक्षिणा घालून तिला अभिमंत्रित करावें.

नमस्तेसर्वदेवानांशक्तिस्त्वंसत्यमास्थिता ॥ ५९ ॥ साक्षिभूताजगद्धात्रीनिर्मिताविश्वयोनिना ॥ एकतःसर्वसत्यानितथानृतशतानिच ॥ ६० ॥ धर्माधर्मकृतांमध्येस्थापितासिजगद्धिते ॥ त्वंतुलेसर्वभूतानांप्रमाणमिहकीर्तिता ॥ ६१ ॥ मांतोलयंतीसंसारादुद्धरस्वनमोस्तुते ॥

अर्थ- तें असें कीं, हे तुळे तूं सर्व देवांची शक्तिभूत असल्या मुळें सत्यांत स्थित आहेस. तेणें करून तूं सर्वांस साक्षिभूत असून सर्व जगास धारण करण्या साठीं विश्वोत्पादक ईश्वरानें तुला निर्माण केलें आहे; कारण सर्व सत्यें एकीकडे असून तशींच शतशः अनृतें एकीकडे आहेत. आणि हे तुळे, तूं जगद्धितकारिणी असल्या वरून सर्व प्राणि मात्रांस प्रमाणात्वें करून वर्णित-आहेस यास्तव तुला धर्म व अधर्म यांचें आचरण करणारांचे मध्य भागीं-स्थापन केलेली आहे; तस्मात् तूं मला तोलून या संसारांतून मुक्त कर. एतदर्थ मी तुला वारंवार नमस्कार करतों.

योसौतत्वाधिपोदेवः पुरुषः पंचविंशकः॥ ६२॥ सः
एकोधिष्ठितोदेवित्वयितस्मान्नमोनमः॥

अर्थ- तसाच जो हा महत्तत्वादि सकल तत्वांचा अधिपति देव पंचविसावा पुरुष आहे तो मुख्य तुझ्याठिकाणीं अध्यक्षत्वानें स्थित आहे; यास्तव हे देवि तुलामी वारंवार नमस्कार करतों.

नमोनमस्तेगोविंदतुलापुरुषसंज्ञक॥ ६३॥ त्वंहरेता
रयस्वास्मान्नस्मात्संसारकर्दमात्॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे तुला पुरुष नामक गोविंदा, तुम्हीं भक्तजनांचें दुःख हरण करणारे आहां यास्तव मी वारंवार नमस्कार करतों. तर आतां आपण या संसार कर्दमांतून आम्हांस उद्धरावें.

पुण्यकालंसमासाद्यकृत्वैवमधिवासनम्॥ ६४॥-
पुनःप्रदक्षिणांकृत्वातुलामारोहयेद्बुधः॥

अर्थ- असा पूर्वोक्त पुण्यकाल प्राप्त झाला असतां अशारीतीनें पूर्वदिवशीं देवतांचें अधिवासन (स्थापन) करून द्वितीय दिवशीं पुढील हा विधि झाल्यावर पुनः तुळेला प्रदक्षिणा करून ज्ञानसंपन्न कर्त्यानें त्या तुळेंत आरोहण करावें.

सखड्गचर्मकवचः सर्वाभरणभूषितः॥ ६५॥ ध-
र्मराजमथादायहेमंसूर्येणसंयुतम्॥ कराभ्यांबद्ध
मुष्टिभ्यामास्तेपश्यन्हरेर्मुखम्॥ ६६॥

अर्थ- तें असें कीं, त्यानें खड्ग, चर्म व कवच यां सहित सर्व आभरणानीं भूषित होऊन सूर्य व यमधर्मराज यांच्या दोन सुवर्ण प्रतिमा दोन हस्तांत ग्रहण करून त्या हस्तांच्या मुष्टि वळाव्या व त्या तुळेच्या मध्यभागीं कांड्याला बांधलेल्या गोविंद प्रतिमारूप हरीचें मुख अवलोकन करीत त्या तुळेच्या एका पारड्यांत बसलें असावें.

ततोपरेतुलाभागेन्यसेयुर्द्विजपुंगवाः॥ समादभ्यधि
कंयावत्कांचनंचातिनिर्मलम्॥ ६७॥

अर्थ- नंतर त्या तुळेच्या दुसऱ्या पारड्यांत आचार्यादिक ब्राम्हणश्रेष्ठानीं अतिनिर्मळ सुवर्ण असें घालावें कीं, तें सुवर्णाचें पारडें यजमान-

सलेल्या पारड्यापेक्षां अधिक खालीं जावें.

पुष्टिकामस्तु कुर्वीत भूमिसंस्थं नरेश्वरः ॥ क्षणमात्रं ततः स्थित्वा पुनरेवमुदीरयेत् ॥ ६८ ॥

अर्थ- आणि ज्या राजादिक मानवश्रेष्ठास पुष्टीची इच्छा असेल त्यानें तेंसो न्यानें पारडें भूमीवर बसेल असें करावें. पश्चात् यजमानानें तेथेंच पारड्यांत क्षणमात्र असून पुनः असें वाक्य बोलावें.

नमस्ते सर्वभूतानां साक्षिभूते सनातनि ॥ पितामहेन देवि त्वं निर्मिता परमेष्ठिना ॥ ६९ ॥ त्वया धृतं जगत्सर्वं सहस्थावरजंगमम् ॥ सर्वभूतात्मभूतस्थे नमस्ते विश्वधारिणि ॥ ७० ॥

अर्थ- कीं, हे तुळे देवि, तूं जगत्पितामह ब्रम्हदेवानीं सृष्टीचे आरंभीं निर्माण केलेली असल्यामुळें वेदांत अनादित्वानें वर्णित व सर्वप्राणिमात्रांस साक्षिभूत असून तूं चराचर वस्तुसहित सर्वजग धारण केलें आहेस. या वरून तूं सर्व भूतांच्या आत्मभूत परमेश्वराच्या साक्षात् आश्रयानें स्थित आहेस; तस्मात् हे विश्वधारिणि मी तुला पुनःपुनः नमःस्कार करतों.

ततोवतीर्य गुरवे पूर्वमर्धं निवेदयेत् ॥ ऋत्विग्भ्योपरमर्धं तु दद्यादुदकपूर्वकम् ॥ ७१ ॥

अर्थ- पश्चात् त्या यजमानानें त्या तुळेंतून खालीं उतरून त्यांतील प्रथम अर्ध द्रव्य मुख्य आचार्यास द्यावें. आणि द्वितीय अर्धद्रव्य उदकपूर्वक ऋत्विजांस द्यावें.

गुरवे ग्रामरत्नानि ऋत्विग्भ्यश्च निवेदयेत् ॥ प्राप्य तेषामनुज्ञां तु तथान्येभ्योपि दापयेत् ॥ ७२ ॥

अर्थ- तशींच गांवें व रत्नें मुख्य आचार्य व ऋत्विज यांस द्यावीं. आणि त्या आचार्य ऋत्विजांची आज्ञा ग्रहण करून तें तुळेंतील द्रव्य इतरांस द्यावें.

दीनानाथविशिष्टादीन् पूजयेद्ब्राम्हणैः सह ॥ न चिरं धारयेद्गेहे सुवर्णं प्रोक्षितं बुधः ॥ ७३ ॥ तिष्ठेद्भयावहं यस्माच्छोकव्याधिकरं नृणाम् ॥

अर्थ- तें असें कीं, दीन, अनाथ व अभ्यादिसेवक, इत्यादिकांस ब्राम्हणां सहवर्तमान पूजित करावें. परंतु तें तुळेंतील प्रोक्षित सुवर्ण बहुकाल यजमा

नानें स्वगृहीं नेऊं नये, कारण तें द्रव्य गृहांत राहिलें असतां कर्त्यास भयाव ह व त्याच्या संबंधि मनुष्यांस शोक व्याधि कारक होतें.

शीघ्रंपरस्वीकरणाच्छ्रेयःप्राप्नोतिमानवः॥ ७४ ॥अ
नेनविधिनायस्तुतुलापुरुषमाचरेत् ॥ प्रतिलोकाधि
पस्थानेप्रतिमन्वंतरंवसेत् ॥ ७५ ॥

अर्थ- आणि तें तुला द्रव्य शीघ्र प्रतिग्राहकांच्या स्वामित्वांत प्रविष्ट केलें असतां तुला कर्ता मानव कल्याण पावतो. व अशाविधीनें जो तुला पुरुष दान करतो. तो इंद्रादिक लोकपालांच्या प्रत्येक लोकांत एकेक मन्वंतर परिमित कालपर्यंत वास करतो.

विमानेनार्कवर्णेनकिंकिणीजालमालिना ॥ पूज्य
मानोप्सरोभिश्चततोविष्णुपुरंव्रजेत् ॥ कल्पकोटि
शतंयावत्तस्मिन्लोकेमहीयते ॥ ७६ ॥

अर्थ- तो असाकीं, क्षुद्र घंटा समुदायांच्या माळानीं युक्त असून सूर्या समान तेजःपुंज अशाविमानांत अप्सरानीं पूजित असून संचार करतो. अशाक्रमानें सर्व लोकपालांच्या स्थानांचें उल्लंघन करून पश्चात् विष्णुपुरास गमन करतो व त्यालोकांत शतकोटि कल्प पर्यंत पूज्य होतो.

कर्मक्षयादिहपुनर्भुविराजराजोभूपालमौलिमणि-
रंजितपादपीठः ॥ श्रद्धान्वितोभवतियज्ञसहस्रयाजी
दीप्तप्रतापजितसर्वमहीपलोकः ॥ ७७ ॥

अर्थ- नंतर तुला पुरुष नामक त्या महादान रूप कर्मसंबंधि पुण्याचा क्षय झाल्यावर पुनः या भूलोकांत सार्वभौमराजा होतो तो असाकीं, तो प्रकाशमान स्व प्रतापानें सर्व भूपाल लोक पराजित करतो त्यामुळें ते सकल भूपाल त्याच्या चरण सिंहासनास स्वकीय किरीट स्पर्शपूर्वक नमस्कार करतात. तेव्हां त्यांचे मुकुट संबंधि मण्यांच्या कांतीनें तें सिंहासन अधिकरम्य दिसतें आणि तो श्रद्धालु असल्यानें सहस्र यज्ञानीं परमेश्वराचें यजन करणारा होतो.

योदीयमानमपिपश्यतिभक्तियुक्तः कालांतरेस्मर-
तिवान्वयतीहलोके ॥ योवाशृणोतिपठतींद्रसमान

रूपः प्राप्नोति धाम स पुरंदरदेवजुष्टम् ॥ ७८ ॥

अर्थ— तसेंच हें तुलापुरुष दान कोणी देत असतां जो भक्तियुक्त मानव अवलोकन करील. किंवा त्या दानाचें कालांतरीं जो स्मरण करील अथवा जो कोणी या लोकीं हें तुलापुरुषदान माहात्म्य वाचील. यद्वा जो श्रवण करील. तसाच जो कोणी पठन करील तो इंद्रासमान रूप पावून पुरंदर इंद्रनामक देव सेवित धामा सम्प्राप्त होतो. इतिश्री मत्स्यपुराणे महादानानुकीर्तने तुलापुरुषप्रदानिकं नाम चतुःसप्तत्युत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २७४ ॥

अध्याय २७५ वा.

मत्स्य उवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामि महादानमनुत्तमम् ॥
नाम्ना हिरण्यगर्भाख्यं महापातकनाशनम् ॥ १ ॥

अर्थ— इतर उत्तर मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, आतां मी तुला अत्युत्तम महादान उत्तम रीतीनें कथन करतों. तें महापातक नाशक असून लोकांत हिरण्यगर्भ नामानें प्रसिद्ध आहे.

पुण्यं दिनमथासाद्य तुलापुरुषदानवत् ॥ ऋत्विग्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम् ॥ २ ॥ कुर्यादुपोषितस्तद्वल्लोकेशावाहनं बुधः ॥ पुण्याहवाचनं कृत्वा तद्वत् कृत्वाधिवासनम् ॥ ३ ॥

अर्थ— त्याचा विधि असाकीं, पुण्यकारक दिवस अवलोकन करून त्यापूर्वी ऋत्विज, मंडप, तत्कर्मोपयोगि साहित्य, भूषणें व आच्छादनें इत्यादिक पदार्थ सिद्ध करावे. आणि दानाच्या पूर्वदिवशीं ज्ञानसंपन्न कर्त्यानें उपोषित राहून ब्राम्हणां कडून पुण्याहवाचन करवून लोकपालावाहन पूर्वक तत्कर्म प्रधान देवतांचें अधिवासन (स्थापन) करावें.

ब्राम्हणैरानयेत्कुंभं तपनीयमयं शुभम् ॥ द्विसप्तत्यंगुलोच्छ्रायं हेमपंकजगर्भवत् ॥ ४ ॥ त्रिभागहीनविस्तारमाज्यक्षीराभिपूरितम् ॥

अर्थ— नंतर मुख्य आचार्य व ऋत्विज या ब्राम्हणांकडून एकपद्मगाकार सुवर्णमय उत्कृष्ट कलश आणवून स्थापन करावा. तो बाहत्तर अंगुळें

प्रमाण उंच व अठ्ठेचाळीस अंगुल परिमित घेरानें युक्त असून त्यांत सुव-
र्ण कमल ठेऊन घृत व दुग्ध यानीं तो कलश कांहीं पूर्ण करावा.

दशास्त्राणिच रत्नानि दात्रीं सूचीं तथैवच ॥ ५॥ हे
मनालं सपिटकं बहिरादित्यसंयुतम्॥ तथैवावरणं-
नाभेरुपवीतंच कांचनम् ॥ ६॥ पार्श्वतः स्थापयेत्तद्वत्
धैमदंडकमंडलू ॥ पद्माकारं पिधानं स्यात्समंतादंगुला
धिकम् ॥ ७॥ मुक्तावलीसमोपेतं पद्मरागसमन्वितम्॥
तिलद्रोणोपरिगतं वेदीमध्ये व्यवस्थितम् ॥ ८ ॥

अर्थ- आणि खड्ग १, चक्र २, शक्ति ३, दंड ४, पाश ५, ध्वज ६, गदा ७,
शूल ८, परशु ९, व वज्र हीं दहा शस्त्रें, पंचरत्नें, सुरी, सुई, हेमनाल (सो-
न्याचें नाल) पेटी, सूर्यप्रतिमा, तसेंच नाभीचें आवरण वस्त्र, सुवर्ण, यज्ञो-
पवीत व सुवर्णाचे दंड कमंडलु हे सुवर्णमय सर्व पदार्थ त्यापात्राच्या बाह्य
उभयपार्श्वभागीं यथोक्तस्थानीं स्थापन करून त्यापात्रावर कमलाकृ
ति एक पात्र आच्छादनार्थ करावें. तें आसमंताद्भागानें खालच्या पात्रापे-
क्षां एक अंगुल वर्तुल घेरानें अधिक असावें; तसेंच पद्मरागमणियुक्त मौक्तिकां
चे सरानीं तें आच्छादन पात्र सुशोभित करावें. आणि तें पात्र, वेदीवर मध्यभा
गीं सोळाशेर तीळ घालून त्यावर स्थापन करावें.

ततो मंगलशब्देन ब्रह्मघोषरवेणच ॥ सर्वौषध्युदक-
स्नानस्नापितो वेदपुंगवैः॥ ९॥ शुक्लमाल्यांबरधरः स
र्वाभरणभूषितः॥ इममुच्चारयेन्मंत्रं गृहीतकुसुमांज-
लिः॥ १०॥

अर्थ- नंतर मंगल वाद्यांचे शब्द व वेदघोषशब्द हे होत असून वेदानें श्रेष्ठ
त्व पावलेल्या त्या आचार्य ऋत्विजादिक ब्राम्हण श्रेष्ठानीं सर्वौषधियुक्त उद-
कानें यजमानास स्नान घातल्या वर त्यानें शुभ्रवस्त्रें व तशाच माला धार
ण करून सर्व आभरणानीं भूषित व्हावें. व त्यानें हस्तांत पुष्पांजलि ग्रहण क
रून हा पुढील मंत्र उच्चारण करावा.

नमो हिरण्यगर्भाय हिरण्यकवचायच ॥ सप्तलोक-
सुराध्यक्ष जगद्धात्रे नमो नमः॥ ११॥ भूर्लोकप्रमुखा

लोकास्त्वगर्भेव्यवस्थिताः॥ ब्रम्हादयस्तथादेवाःन
मस्तेविश्वधारिणे ॥ १२ ॥ नमस्तेभुवनाधारनमस्ते
भुवनाश्रय ॥ नमोहिरण्यगर्भायगर्भेयस्यपिताम
हः॥ १३॥ यतस्त्वमेवभूतात्माभूतेभूतेव्यवस्थितः॥
तस्मान्मामुध्दराशेषदुःखसंसारसागरात् ॥ १४ ॥-

अर्थ- तो असा कीं, हे हिरण्यगर्भा, तूं सुवर्ण कवचधारी असून सप्तलोक व देव यांचा अध्यक्ष व सर्वजगाचा उत्पादक आहेस; तसेच भूर्लोकादिक लोक व ब्रम्हादिक देव तुझ्या गर्भांत स्थित आहेत. आणि तुझ्या गर्भांत पितामह आहे. कारण तूंच सर्वभूतांचा आत्मा असल्यामुळें सर्वप्राणिमात्रांचे अंतर्यामी स्थित आहेस. या वरून तूं सर्वभुवनांस आधारभूत व सर्वप्रकारें आश्रय भूत असल्यामुळें सकल विश्वाचा धारण कर्ता आहेस. तस्मात् तूं मला या संपूर्ण दुःखसंसार सागरांतून मुक्त कर. यास्तव हे हिरण्य गर्भस्वरूप परमेश्वरा, मी तुजला वारंवार नमस्कार करतों.

एवमामंत्र्यतन्मध्यमाविश्यास्तउदङ्मुखः॥ मु
ष्टिभ्यांपरिसंगृह्यधर्मराजचतुर्मुखौ॥ १५॥

अर्थ- या प्रकारें विधि झाल्यावर यजमानानें ब्राम्हणाज्ञा ग्रहण पूर्वक धर्मराज व चतुर्मुख ब्रम्हदेव यांच्या प्रतिमा स्वमुष्टींनीं ग्रहण करून त्यापात्रांत प्रविष्ट होऊन मध्यभागीं उत्तराभिमुख स्थित व्हावें.

जानुमध्येशिरःकृत्वातिष्ठेदुच्छ्वासपंचकम् ॥ गर्भा
धानंपुंसवनंसीमंतोन्नयनंतथा ॥ १६॥ कुर्युर्हिरण्य
गर्भस्यततस्तेद्विजपुंगवाः॥ गीतमंगलघोषेणागु
रुरुत्थापयेत्ततः॥ १७॥

अर्थ- तें असें कीं, जानु (गुडघे) ह्यांच्या मध्यभागीं मस्तक करून पांचपल परिमित कालपर्यंत उभें राहवें. नंतर त्या पात्रावर आच्छादन पात्र ठेऊन बाहेर आचार्यादिक ब्राम्हणश्रेष्ठांनीं त्या जमान हस्तांतील हिरण्यगर्भ मूर्तीचे गर्भाधान, पुंसवन, अनवलोभन व सीमतोन्नयन हे संस्कार करून पश्चात् मुख्य आचार्यानें गायन व मंगल घोष क

रून यजमानास त्या पात्रा बाहेर आणावें.

जातकर्मादिकाः कुर्युः क्रियाः षोडशचापराः ॥ सूच्यादिकं च गुरवे दद्यान्मंत्रमिमं जपेत् ॥ १८ ॥

अर्थ— नंतर त्या ब्राम्हणांनीं त्या हिरण्यगर्भमूर्तीच्या जातकर्मादिक अन्य षोडश कर्में करावीं. आणि पूर्वी त्या पात्राच्या आसमंताद्भागीं सूचि (सुई) आदि करून स्थापन केलेले सर्व पदार्थ मुख्य आचार्यास देऊन यजमानें हा पुढील मंत्र जपावा.

नमो हिरण्यगर्भाय विश्वगर्भाय वै नमः ॥ चराचरस्य जगतो गृहभूताय वै नमः ॥ १९ ॥ यथाहं जनितः पूर्वं मर्त्यधर्मा सुरोत्तम ॥ त्वद्गर्भसंभवादेष दिव्यदेहो भवाम्यहम् ॥ २० ॥

अर्थ— तो असा कीं, हे देवोत्तमा, तूं हिरण्यगर्भरूपी असून तुझ्या गर्भांत सकळ विश्व आहे यावरून तूं चराचर सर्व जगास गृहासमान निवासस्थानभूत आहेस; आणि जसा मी पूर्वी मानवजातींत उत्पन्न झालों, तो तुमच्या गर्भापासून झाल्यामुळें मी दिव्य देह होईन.

चतुर्भिः कलशैर्भूयः ततस्ते द्विजपुंगवाः ॥ स्नापयेयुः प्रसन्नांगाः सर्वाभरणभूषिताः ॥ २१ ॥

अर्थ— पश्चात् सर्वाभरण भूषित प्रसन्न चित्त आचार्यादिक ब्राम्हणश्रेष्ठांनीं पूर्वस्थापित चार कलशांतील उदकानें पुनः यजमानास स्नान घालावें.

देवस्य त्वेति मंत्रेण स्थितस्य कनकासने ॥ अद्य जातस्य तेंगानि अभिषेक्ष्यामहे वयम् ॥ २२ ॥ दिव्येनानेन वपुषा चिरंजीव सुखी भव ॥

अर्थ— तें असें कीं, त्यास सुवर्णासनावर बसवुन देवस्यत्वा या मंत्रानें अभिषेक करावा. ते समयीं त्या ब्राम्हणांनीं यजमानास म्हणावें कीं, तूं आज या हिरण्यगर्भमूर्तीसह झाला आहेस यास्तव आम्हीं तुझ्या अंगांवर अभिषेक करतों; तेणें करून तूं या अभिषिक्त दिव्यदेहानें चिरकाल वांचून सुखी हो.

ततोहिरण्यगर्भंतंतेभ्योदद्याद्विचक्षणः॥ २३॥ ते
पूज्याः सर्वभावेनबहवोवातदाज्ञया॥ तत्रोपकर-
णंसर्वंगुरवेविनिवेदयेत्॥ २४॥

अर्थ- नंतर तो हिरण्यगर्भमूर्ति, ज्ञानसंपन्न यजमानानें आचार्यादिक ब्राम्हणांस यथोक्त रीतीनें द्यावी. आणि सर्वभावें करून त्यांची पूजा करून पश्चात् त्यांच्या आज्ञेनें इतर बहुत ब्राम्हणांचीही पूजा करावी. व त्या दानांतील जे उपसाहित्य पदार्थ असतील ते सर्व त्यानें मुख्य आचार्यास निवेदन करावे.

पादुकोपानहच्छत्रचामरासनभाजनम्॥ ग्रामं
वाविषयंवापियदन्यदपिसंभवेत्॥ २५॥

अर्थ- तशाच पादुका, उपानह (जोडा), छत्र, चामर (चंवरी), आसन, पात्र, ग्राम, किंवा देश अथवा जी अनुकूल अन्यही वस्तु असेल ती सर्व आचार्यादिक ब्राम्हणांस यथा योग्यतानुसार द्यावी.

अनेनविधिनायस्तुपुण्येहनिनिवेदयेत्॥ हिरण्य
गर्भदानंसब्रम्हलोकेमहीयते॥ २६॥

अर्थ- अशा विधीनें जो मानव पुण्यदिवशीं हें हिरण्यगर्भ दान ब्राम्हणास निवेदन करील तो ब्रम्हलोकांत पूज्य होतो.

पुरेषुलोकपालानांप्रतिमन्वंतरं वसेत्॥ क-
ल्पकोटिशतंयावद्ब्रम्हलोकेमहीयते॥ २७॥

अर्थ- तो असा कीं, प्रथमतः इंद्रादिक लोकपालांच्या प्रतिपुरांत एक मन्वंतर पर्यंत वास करून पश्चात् शतकोटि कल्प पर्यंत ब्रम्हलोकांत वास करतो.

कलिकलुषविमुक्तः पूजितः सिद्धसाध्यैरमरच
मरमालावीज्यमानोप्सरोभिः॥ पितृशतमथबं
धून्पुत्रपौत्रान्प्रपौत्रानपिनरकनिमग्नांस्तार
येदेकएव॥ २८॥

अर्थ- आणि तो कलिकलुषांतून सर्वथा मुक्त होऊन सिद्ध, साध्य व अप्सरा यानीं पूजित व अमरांच्या चामर पक्तीनीं वीज्यमान हो-

तो. त्याप्रमाणें स्वकीय शतशः पितर तसेंच बंधु, पुत्र, पौ व प्रपौत्र (ए यातु) हे नरकांत पतन पावले असले तरी त्यांस हिरण्यगर्भ दान कर्ता एकाकी पुरुष तारितो.

इतिपठतियइत्थंयःशृणोतीहसम्यक्मधुरिपुरिवलोके पूज्यतेसोपिसिद्धैः॥ मतिमपिचजनानां-यो ददातिप्रियार्थीविबुधपतिजनानांनायकःस्याद-मोघम्॥२७॥

अर्थ- तसाच जो पुरुष याप्रकारें कथन केलेल्या अशा या हिरण्यगर्भ दानाध्यायाचें पठन, किंवा श्रवण करतो तोही लोकांत सिद्धानीं मधुमथन विष्णुसमान पूज्य होतो. आणि जो या दानाविषयीं इतर जनांस इष्टप्राप्त्यर्थ बुद्धि सांगतो; तो निश्चयें करून ज्ञानसंपन्न पालकजनांचा नायक होतो. इतिश्री मत्स्यपुराणे महादानानुकीर्तने हिरण्य गर्भप्रदानिको नामपंचसप्तत्युत्तर द्विशततमो ऽध्यायः॥ ॥२७५॥

अध्याय २७६वा.

मत्स्यउवाच॥ अथातःसंप्रवक्ष्यामिब्रम्हांडवि-धिमुत्तमम्॥यच्छ्रेष्ठंसर्वदानानांमहापातकनाशनं१

अर्थ- पुनः मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, यानंतर मी तुला ब्रम्हांड दानाचा विधि उत्तम रीतीनें कथन करतों; कारण हें सर्व दानांत श्रेष्ठ असून महापातकांचें नाशक आहे.

पुण्यंदिनमथासाद्यतुलापुरुषदानवत्॥ ऋत्विग्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम्॥२॥ लोकेशावाहनंकुर्यादधिवासनकंतथा॥ कुर्याद्विंशपलादूर्ध्वमासहस्राच्चशक्तितः॥३॥ कलशद्वयसंयुक्तंब्रम्हांडकांचनंबुधः॥

अर्थ- त्याचें विधान असें कीं, पुण्य दिवस प्राप्त झाला असतां, यजमानानें तुलापुरुष दानवत् ऋत्विज, मंडपसाहित्य, भूषणें व आच्छादनादिक सामग्री सिद्ध करून देवताधिवासन पूर्वक लोकपालांचें आवाहन करावें. आणि वीस पळ (ऐशीं तोळे) परिमित सुवर्णापासून एक सह

स्र पलरूवर्णा पर्यंत यथाशक्त्यनुसार फलशाट्य संयुक्त कांचनमय ब्र
म्हांड ज्ञात्यानें सिद्ध करावें.

दिग्गजाष्टकसंयुक्तं षड्वेदांगसमन्वितम् ॥ ४ ॥-
लोकपालाष्टकोपेतं मध्यस्थितचतुर्मुखम् ॥ शिवा-
च्युतार्कशिखरमुमालक्ष्मीसमन्वितम् ॥ ५ ॥ वस्वा
दित्यमरुद्गर्भमहारत्नसमन्वितम् ॥ वितस्तेरंगुलश
तं यावदायामविस्तरम् ॥ ६ ॥ कौशेयवस्त्रसंवीतंति-
लद्रोणोपरिन्यसेत् ॥

अर्थ- तें असें कीं, अष्टदिग्गॅज, सहामूर्तिमंत वेदांगें व आसमंतात् अ
ष्टलोकपाल, मध्यभागीं स्थित चतुर्मुख ब्रम्हदेव, शिखरस्थानीं शिव,-
विष्णु, सूर्य, पार्वती व लक्ष्मी यानीं युक्त असून त्याच्या गर्भस्थानीं अ
ष्टवसु, द्वादशादित्य, एकोनपंचाशत् मरुद्गण हे असून महारत्नानीं
युक्त असावें. आणि तें ब्रम्हांड, एकविती पासून शंभर अंगुलें पर्यंत य
थाशक्ति लांब रुंद करावें. ती लांबी रुंदी समान असावी. तसेंच तें रे-
शमी वस्त्रानें वेष्टित करून द्रोण (सोळाशेर) परिमित तिलराशी व
र स्थापन करावें.

तथाष्टादशधान्यानिसमंतात्परिकल्पयेत् ॥ ७ ॥ पू-
र्वेणानंतशयनंप्रद्युम्नंपूर्वदक्षिणे ॥ प्रकृतिंदक्षिणे
देशेसंकर्षणमतःपरम् ॥ ८ ॥ पश्चिमेचतुरोवेदाननि
रुद्धमतःपरम् ॥ अग्निमुत्तरतोहेमंवासुदेवमतःपर-
म् ॥ ९ ॥ समंताद्गुडपीठस्थानर्चयेकांचनान्बुधः ॥

अर्थ- तशींच अष्टादश धान्यें त्या मध्यस्थित तिलराशीच्या आसमं-
तात् भागीं स्थापन करावीं. तींही प्रत्येकीं एकद्रोण परिमित असावीं.-
त्या प्रमाणें त्या ब्रम्हांडाच्या पूर्वेस शेषशायी अनंत शयन, आग्नेय दिशे

ः ऐरावत १, पुंडरीक २, वामन ३, कुमुद ४, अंजन ५, पुष्पदंत ६, सार्वभौम ७ व सु
प्रतीक हे अष्ट दिग्गज आहेत.

ः शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष व छंद हीं सहा वेदांगें प्रसिद्ध आहेत.

सप्रद्युम्न, दक्षिण प्रदेशीं प्रकृति, पुढें नैर्ऋत्य कोणास संकर्षण, पश्चि मेलाचार मूर्तिमंत वेद, वायव्य कोणास अनिरुद्ध, उत्तर दिशेला अग्नि व ईशान्यदिशेस वासुदेव यांच्या सुवर्णमय प्रतिमा त्या ब्रम्हांडाच्या आसमंताद्भागीं अशा यथास्थानीं गुडपात्रावर स्थापन करून त्यांची ज्ञात्यानें पूजा करावी.

स्थापयेद्वस्त्रसंवीतान्पूर्णकुंभान्दशैव तु ॥ १० ॥ दशैवधेनवोदेयाःसहेमांबरदोहनाः ॥ पादुकोपा नहच्छत्रचामरासनदर्पणैः ॥ भक्ष्यभोज्यान्नदीपे क्षुफलमाल्यानुलेपनैः ॥ ११ ॥

अर्थ- तसेच वस्त्र वेष्टित दहाच जलपूर्णकुंभ, ब्रम्हांडाच्या आसमंताद्भागीं स्थापन करावे. आणि सुवर्णशृंगें, वस्त्रें, दोहनार्थ कांस्यपात्रें, पादुका, उपानह, (जोडा), छत्र, चामर (चवरी), आसन, दर्पण, भक्ष्य भोज्य अन्नें, दीप, इक्षु (ऊंस), फलें, माल्य (माळा व पुष्पें), अनुलेपनार्थ चंदन यां सहित दहाच गोप्रदानें या ब्रम्हांड दानावर दक्षिणार्थ द्यावीं.

होमाधिवासनांते च स्नापितो वेदपुंगवैः ॥ इममुच्चारये न्मंत्रंत्रिः कृत्वाथप्रदक्षिणम् ॥ १२ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें होम व अधिवासनांत कर्म झाल्यावर, वेदानीं श्रेष्ठत्व पावलेल्या आचार्यादिक ब्राम्हणानीं पूर्वस्थापित कुंभांतील उदकानें यजमानास अभिषेक स्नान घालावें पश्चात् त्या कर्त्यानें त्या ब्रम्हांडास तीन प्रदक्षिणा करून हा पुढील मंत्र म्हणावा.

नमोस्तु विश्वेश्वर विश्वधामजगत्सवित्रे भगवन्नमस्ते ॥ सप्तर्षिलोकामरभूतलेशगर्भेणसार्धंवितराभिरक्षा- म् ॥ १३ ॥ येदुःखितास्तेसुखिनोभवंतुप्रयांतुपापानि चराचराणाम् ॥ त्वद्दानशस्त्राहतपातकानांब्रम्हांडदो षाःप्रलयंव्रजंतु ॥ १४ ॥

अर्थ- तो असाकीं, हे ब्रम्हांड पुरुषा, तूं सकल विश्वास आश्रय स्थानभूत असून त्या जगाचा उत्पादक व ऐश्वर्य संपन्न असल्यामुळें सप्तर्षि लोक, अमर व भूतल इत्यादि विश्वाचा ईश्वर आहेस यास्तव आम्हांतु

ला वारंवार नमस्कार करतों, कारण तूं आम्हांस गर्भासह वर्तमान रक्षणकर. तसेंच जे दुःखित प्राणी आहेत ते तुझ्या रूपेंनें सुखी होवोत.- आणि तुझ्या प्रसादानें चराचर प्राणि मात्रांचीं पापें नाश पावोत. व तुझ्या या दानरूप शस्त्रानें नाडित पातक युक्त झाले त्या पुरुषांचे सर्व दोष अत्यंत ल्यास जावोत.

एवंप्रणम्यामरविश्वगर्भंदद्याद्विजेभ्योदशधाविभज्य ॥ भागद्वयंतत्रगुरोःप्रकल्प्यसमंभजेच्छेष- मनुक्रमेण ॥ १५ ॥

अर्थ- असाऱ्या देवादि सकल विश्वगर्भयुक्त ब्रम्हांडास नमस्कार करून त्याचे दश विभाग करून तें ब्राम्हणांस द्यावें. तें असेंकीं, त्यांतील दोन भाग मुख्य आचार्यास देऊन शेष राहिले त्यांस अनुक्रमानें ऋत्विजादि अन्य ब्राम्हणांस समभाग द्यावे.

स्वल्पेचहोमंगुरुरेकएवकुर्यादथैकाग्निविधानयुक्त्या ॥ स १ एवसंपूज्यतमोल्पवित्तेयथोक्तवस्त्राभरणादिकेन ॥ १६ ॥

अर्थ- आणि ब्राम्हणांस देण्याचें द्रव्य यजमानास स्वल्प अनुकूल असेलतर एकाकि आचार्यानेंच एक अग्निस्थापन करून त्यावर एकाग्नि विधान युक्तीनें होम करावा. नंतर यजमानानें स्वकीय द्रव्य अल्प असल्यामुळें- स्वशक्त्यनुसार वस्त्राभरणादिकानें त्या मुख्य आचार्यासच पूजित करावें.

इत्थंयएतदखिलंपुरुषोत्रकुर्याद्ब्रम्हांडदानमधिगम्यमहद्विमानम् ॥ निर्धूतकल्मषविशुद्धतनुर्मुरारेरानंदकृत्पदमुपैतिसहाप्सरोभिः ॥ १७ ॥

अर्थ- अशा विधीनें जो पुरुष, हें संपूर्ण ब्रम्हांड दान, या लोकीं करील;- तो निर्धूत पातक झाल्यामुळें अतिशुद्ध तनु होत्साता अप्सरां सहित महत् विमान पावून सुरदैत्य नाशक विष्णूच्या आनंद कारक पदास प्राप्त होतो.

संतारयेत्पितृपितामहपुत्रपौत्रबंधुप्रियातिथिकलत्रशताष्टकंसः ॥ ब्रम्हांडदानशकलीकृतपात

कोघमानंदयेच्चजननीकुलमप्यशेषम् ॥ १८ ॥

अर्थ- आणि तो ब्रम्हांड दान कर्ता मानव स्वकीय पिता, पितामह, पुत्र, पौत्र, बंधु, प्रिय, अतिथी व कलत्र (पत्नी) या आठशें प्राण्यांस संसारांतून उत्तम रीतीनें तारील. व त्या ब्रम्हांड दानानें मातृकुलाच्या सर्व पाप राशींचा नाश करून त्या कुलासही आनंद देईल.

इतिपठतिश्टणोतिवाय एतत्सुरभवनेषुगृहेषुधार्मिकाणाम् ॥ मतिमपिचददातिमोदतेसावमरपतेर्भवनेसहाप्सरोभिः ॥ १९ ॥

अर्थ- असें हें ब्रम्हांड दानमहात्म्य, जो मानव धार्मिक लोकांच्या गृहांत पठन किंवा श्रवण करतो. अथवा लोकांस हें दान करण्या विषयीं बुद्धि सांगतो. तो, देवराज इंद्राच्या भवनांत अप्सरांसह हर्ष पावतो. इतिश्री मत्स्यपुराणें महादानानुकीर्तनें ब्रम्हांड प्रदानिकं नामषट् सप्तत्युत्तरद्विशततमो ऽध्यायः ॥ २७६ ॥

अध्याय २७७वा.

मत्स्यउवाच ॥ कल्पपादपदानाख्यमतःपरमनुत्तमम् ॥ महादानंप्रवक्ष्यामिसर्वपातकनाशनम् ॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, यानंतर अत्युत्तम कल्पवृक्ष नामें प्रसिद्ध महादान कथन करतों; कारण हें सर्व पातक नाशक आहे.

पुण्यंदिनमथासाद्यतुलापुरुषदानवत् ॥ पुण्याहवाचनंकृत्वालोकेशावाहनंतथा ॥ २ ॥

अर्थ- त्याचें विधान असें कीं, पुण्य दिवस प्राप्त झाला असतां, त्यादिवशीं पुण्याह वाचन पूर्वक सकल लोकपालांचें आवाहन करावें.

ऋत्विग्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम् ॥ कांचनंकारयेद्वृक्षंनानाफलसमन्वितम् ॥ ३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ऋत्विज, मंडप, साहित्य, भूषणें व आच्छादनादिक हें सर्व सिद्ध करून अनेक फलयुक्त कांचन मय कल्पवृक्ष करावा.

नानाविहगवस्त्राणिभूषणानिचकारयेत् ॥ ४

क्तितस्त्रिपलादूर्ध्वमासहस्त्रंप्रकल्पयेत् ॥ ४॥

अर्थ- तसेच अनेक पक्षि, वस्त्रें व भूषणें करवून स्वशक्त्यनुसार तीन पलीं पासून सहस्त्र पल परिमित सुवर्ण, कल्प वृक्ष दानार्थ कल्पित करावें.

अर्धकूसस्रुवर्णस्यकारयेत्कल्पपादपम् ॥ गुड-प्रस्थोपरिशाच्चसितवस्त्रयुगान्वितम् ॥ ५॥

अर्थ- आणि त्या वृक्ष दानार्थ कल्पित केलेल्या सुवर्णाच्या अर्धभागानें कल्प वृक्ष करावा. आणि तो मध्यभागीं प्रस्थ (शेर) परिमित गुडपात्रावर स्थापन करून शुभ्र वस्त्रद्वयानें वेष्टित करावा.

ब्रम्हविष्णुशिवोपेतंपंचशाखंसभास्करम् ॥ कामदेवमधस्ताच्चसकलत्रंप्रकल्पयेत् ॥ ६॥

अर्थ- तसाच तो वृक्ष पंचशाखा युक्त असून ब्रम्हदेव, विष्णु, शिव व भास्कर यांच्या मूर्त्तीनीं युक्त करून त्याच्या मूल प्रदेशीं सपत्नीक कामदेवाची प्रतिमा स्थापन करावी.

संतानंपूर्वतस्तद्वत्तुरीयांशेनकल्पयेत् ॥ मंदारंदक्षिणेपार्श्वेश्रियासार्धंघृतोपरि ॥ ७॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या कल्प वृक्षाच्या पूर्वेस पूर्वकूस सुवर्णांतील चतुर्थ भाग सुवर्णाचा संतान नामा वृक्ष करावा. आणि दक्षिण-भागीं प्रस्थ परिमित घृतपात्रावर मंदार वृक्ष स्थापन करून त्याच्या मूल प्रदेशीं लक्ष्मीची प्रतिमा स्थापन करावी.

पश्चिमेपारिजातंतुसावित्र्यासहजीरके ॥ सुर-भीसंयुतंतद्वत्तिलेषुहरिचंदनम् ॥ ८॥ तुरीयांशेनकुर्वीतसौम्येनफलसंयुतम् ॥

अर्थ- तसाच पारिजात वृक्ष पश्चिमेस प्रस्थ परिमित जीरक (जिरे) राशीवर स्थापन करून त्याच्या मूळावर सावित्री प्रतिमा ठेवा

---

* टीप. एक पलाचे बार तोळे आहेत.

* पुराणांतील प्रस्थ बत्तीस किंवा सोळा पलाचा आहे.

ची. व प्रस्थमात्र तिलराशीवर हरिचंदन वृक्ष स्थापन करून त्या-
च्या मूलावर कामधेनुप्रतिमा स्थापावी. आणि तो हरिचंदन वृक्ष
पूर्व सुवर्णातील चतुर्थांश मानानेंच करून तो फलयुक्त असून
उत्तर दिशेस स्थापन करावा.

कौशेयवस्त्रसंवीतानिक्षुमाल्यफलान्वितान्॥
॥९॥ तथाष्टौपूर्णकलशान्पादुकाशनभाजनम्॥
दीपिकोपानहच्छत्रचामरासनसंयुतम् ॥१०॥
फलमाल्ययुतंतद्वदुपरिष्टाद्वितानकम् ॥ तथा
ष्टादशधान्यानिसमंतात्परिकल्पयेत् ॥ ११ ॥

अर्थ- नंतर रेशमी वस्त्रानें उत्तम प्रकारें वेष्टित असून इक्षु (ऊंस)
माला, पुष्पें व फलें यानीं युक्त असे उदकपूर्ण आठ कलश वेदीवर-
अष्टदिशेस स्थापन करून पादुका, भोज्यान्नपूरित पात्रें, दीप, उपा
नह (जोडा), छत्र, चामरें (चंवऱ्या), आसनें हे पदार्थ वेदीच्या आ
समंतात् स्थापन करावे. तसाच फलें व माला यानीं युक्त चांदवा-
त्या वेदीच्या ऊर्ध्वभागीं बांधावा. तशींच अष्टादश धान्यें त्या वेदी
च्या आसमंतात् भागीं स्थापन करावीं. व तीं प्रत्येकीं, एकद्रोणीं परि-
मित असावीं.

होमाधिवासनांतेचस्नापितोवेदपुंगवैः ॥ त्रिःप्र-
दक्षिणमावृत्यमंत्रमेतमुदीरयेत् ॥ १२ ॥

अर्थ- पश्चात् पूर्वदिवशीं देवतांचें अधिवासन करून द्वितीय
दिवशीं प्रातःकालीं पूर्णाहुत्यंत होम झाल्यावर, वेदानें श्रेष्ठत्व पाव-
लेल्या ब्राम्हणानीं यजमानास स्नान घालावें. नंतर त्यानें त्या स्था
पित देवतांस तीन प्रदक्षिणा करून हा पुढील प्रार्थना मंत्र म्हणावा.

नमस्तेकल्पवृक्षायचिंतितार्थप्रदायिने ॥ विश्वं
भरायदेवायनमस्तेविश्वमूर्तये ॥ १३ ॥ यस्मात्त्व
मेवविश्वात्माब्रम्हास्थाणुर्दिवाकरः ॥ मूर्तामू

---

* दीप सोळा शेरांचा एकद्रोण समजावा.

र्तपरंबीजमतःपाहिसनातन ॥ १४ ॥ त्वमेवामृतसर्वस्वमनंतःपुरुषोव्ययः संतानाद्यैरुपेता-स्मान्पाहिसंसार सागरात् ॥ १५ ॥

अर्थ- हे कल्पवृक्षा तूं चिंतितार्थ प्रदायक विश्वंभर विश्वमूर्ति देव आहेस तस्मात् मी तुला नमस्कार करतों; कारण यस्मात् तूंच सकल विश्वाचा आत्मा विष्णु, ब्रम्हदेव, शिव व सूर्य एतद्रूप असून मूर्तामूर्त जगाचें श्रेष्ठ बीज आहेस यास्तव हे अनादि स्वरूपा, आमचें रक्षण कर. आणि तूंच आमचें अमृत रूप सर्वस्व असून अविनाशी असल्यामुळें अनंत रूपी पुरुष आहेस. तस्मात् या संतानादिक वृक्षां सहित तूं आम्हांस संसार सागरांतून उध्दर.

एवमामंत्र्यतंदद्यात्गुरवेकल्पपादपम् ॥ चतुर्भ्यश्चाथऋत्विग्भ्यः संतानादीन्प्रकल्पयेत् ॥ १६ ॥

अर्थ- अशी प्रार्थना करून तो कल्पवृक्ष मुख्य आचार्यास द्यावा. आणि संतानादिक अन्यचार वृक्ष चार ऋत्विजांस प्रत्येकीं एक अशा रीतीनें द्यावे.

स्वल्पेत्वेकाग्निवत्कुर्यात्गुरवेचाभिपूजनम् ॥ नवित्तशाठ्यंकुर्वीतनचविस्मयवान्भवेत् ॥ १७ ॥

अर्थ- तसेंच कर्त्यास वित्त अति अल्प अनुकूल असेल तर त्यानें एकाग्नीवर तत्संबंधि होमादि कर्म करून मुख्य आचार्याचें पूजन करावें. परंतु द्रव्य अनुकूल असेल तर यजमानानें वित्तशाठ्य न करावें. व या दानापासून त्यानें गर्वही मानूं नये.

अनेनविधिनायस्तुमहादानंनिवेदयेत् ॥ सर्वपापविनिर्मुक्तःसोश्वमेधफलंलभेत् ॥ १८ ॥

अर्थ- याविधानें जो मानव हें महादान ब्राम्हणांस निवेदन करील तो सर्वपापांतून सर्वथा मुक्त होऊन अश्वमेध यज्ञाच्या फल प्राप्तीनें युक्त होतो.

अप्सरोभिःपरिवृतःसिद्धचारणकिंनरैः ॥ भूतान्भाव्यांश्चमनुजांस्तारयेत्गोत्रसंयुतान् ॥ १९ ॥

स्तूयमानोदिवःपृष्ठेपितृपुत्रप्रपौत्रकान्॥ वि-
मानेनार्कवर्णेनविष्णुलोकंसगच्छति॥२०॥

अर्थ- तसाचतो देहांतीं परलोकांत अप्सरा, सिद्ध, चारण व किन्नर-
यानीं वेष्टित होऊन क्रीडा करतो. आणि स्वगोत्रांतील पूर्वज पितर आ-
पल्यापुढें होणारें पुत्र, पौत्र व प्रपौत्र (पणतु) इत्यादिकांस तारून-
स्वतः सत्यलोकांत तत्रस्थ सिद्धानीं स्तुत होत्साता सूर्यसमान देदीप्य-
मान विमानानें विष्णुलोकास गमन करतो.

दिविकल्पशतंतिष्ठेत्राजराजोभवेत्ततः॥ नारा-
यणबलोपेतोनारायणपरायणः॥ नारायणकथा
सक्तोनारायणपुरंव्रजेत्॥२१॥

अर्थ- असातो शतकल्प पर्यंत स्वर्गलोकांत वास करून पश्चात् भू-
लोकीं सार्वभौमराजा होतो तो असाकीं, तो नारायण परायण असल्या
मुळें नारायणाच्या बलानें युक्त असून नारायण कथे विषयीं आसक्त हो
ऊन त्या योगानें नारायण पुरास गमन करतो.

योवापठेत्सकलकल्पतरुप्रदानंयोवाशृणोति-
पुरुषोल्पधनःस्मरेद्वा॥ सोपींद्रलोकमधिगम्य
सहाप्सरोभिर्मन्वंतरंवसतिपापविमुक्तदेहः॥२२॥

अर्थ- त्याचप्रमाणें जो मानव हें कल्पतरुप्रदानाचें संपूर्ण आख्या
न अर्थसहित वाचील. किंवाजो अल्प धनवान् पुरुष या आख्या-
नाचें श्रवण अथवा स्मरण करील तो ही पाप विमुक्त देहानें युक्त होत्सा
ता इंद्र लोकास प्राप्त होऊन अप्सरांसह वर्तमान त्यास्थानीं एक मन्वंत
र पर्यंत वास करतो. इतिश्री मत्स्यपुराणे महादानानुकीर्तनें कल्प
वृक्ष प्रदानिको नामसप्तसप्त त्यत्तर द्विशततमो ऽध्यायः॥२७७॥

अध्याय २७८ वा

मत्स्यउवाच॥ अथातःसंप्रवक्ष्यामिमहादान
मनुत्तमम्॥गोसहस्रप्रदानाख्यंसर्वपापहरंप
रम्॥१॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, यानंतर मीगोसह

सप्तदान नामक अत्युत्तम महादान तुला उत्कृष्ट रीतीनें कथन करतों; कारण हें सर्वपापांचें समूळ हरण करणारें आहे.

पुण्यांतिथिंसमासाद्ययुगमन्वंतरादिकीं ॥ पयोव्रतंत्रि रात्रंस्यादेकरात्रमथापिवा ॥ २ ॥

अर्थ– त्याचाविधि असाकीं, युगादि किंवा मन्वंतरादि यांतील पुण्यतिथिप्राप्त झाली असतां, त्या तिथीच्या पूर्वीं त्रिरात्र अथवा स्वशक्त्यनुसार एकरात्र केवळ दुग्ध प्राशन करून उपोषित असावें.

लोकेशावाहनंकुर्यात्तुलापुरुषदानवत् ॥ पुण्याहवा चनंकुर्यात्होमःकार्यस्तथैवच ॥ ३ ॥

अर्थ– आणि तुलापुरुष दानासारखें पुण्याहवाचन पूर्वक लोकपाळांचें आवाहन करून नंतर होमही करावा.

गोसहस्रंबहिःकुर्याद्वस्त्रमाल्यविभूषणम् ॥ सुव- र्णशृंगाभरणंरौप्यपादसमन्वितम् ॥ ४ ॥

अर्थ– नंतर एकसहस्र दहा गायीं, वस्त्रें, माळा, सुवर्ण शृंगें व रौप्यखुर इत्यादिक आभरणांनीं अतिशयें भूषित करून मंडपा बाहेर असाव्या.

अंतःप्रवेश्यदशकंवस्त्रमाल्यैश्चपूजयेत् ॥ सुवर्ण घंटिकायुक्तंकांस्यदोहनकान्वितम् ॥ ५ ॥ सुवर्णति- लकोपेतंहेमपट्टैरलंकृतम् ॥ कौशेयवस्त्रसंवीतंमा- ल्यगंधसमन्वितम् ॥ ६ ॥ हेमरत्नमयैःशृंगैश्चामरै- रुपशोभितम् ॥ पादुकोपानहच्छत्रभाजनासनसं युतम् ॥ ७ ॥

अर्थ– नंतर त्यांतील दहागायीं, मंडपांत आणून त्यांचें वस्त्रपुष्पानीं पूजन करावें आणि सुवर्णघंटा, दोहनार्थ कांस्यपात्र, सुवर्णाचा तिलक, सोन्याच्या पट्या, रेशमी वस्त्रें, माळा, गंध, रत्नखचित सुवर्णशृंगें, चामरें (चवऱ्या) पादुका, उपानह (जोडा), छत्र, पात्रें व आसनें यांनीं त्या गायी यथायोग्य रीतीनें अलंकृत व युक्त कराव्या.

गवांदशकमध्येस्यात्कांचनोनंदिकेश्वरः ॥ कौशेय वस्त्रसंवीतोनानाभरणभूषितः ॥ ८ ॥ लवणद्रोण-

शिखरेमाल्यवेक्षुफलसंयुतः॥ कुर्यात्पलशतादूर्ध्वंसर्वमेतदशेषतः॥ ९॥ शक्तितःपलसाहस्रत्रितयंयावदेवतु॥ गोशतेपिदशांशेनसर्वमेतत्समाचरेत्॥ १०॥

अर्थ- आणित्या दशगायींच्या मध्यभागीं एक नंदिकेश्वराची मूर्ति- रेशमी वस्त्रानें वेष्टित व अनेक आभरणानीं भूषित करून ती द्रोणपरिमित लवण राशीच्या मस्तकावर स्थापन करावी. तशींच तिच्या समीप पुष्पें, इक्षु (ऊंस) व फळें हीं स्थापन करावीं. आणि तो नंदिकेश्वर वसरू गायी यांचें अलंकारादिक सर्व, शतपल सुवर्णापासून त्रिसहस्रपल सुवर्णपर्यंत स्वशक्त्यनुसार करावें. त्याचप्रमाणें असें प्रत्यक्ष गोशत कर्तव्य असल्यास हें गायींचें भूषणादिक सर्व साहित्यत्या गोसहस्राच्या दशांश मानानें करावें.

पुण्यकालंसमासाद्यगीतमंगलनिःस्वनैः॥ सर्वौषध्युदकस्नानस्नापितोवेदपुंगवैः॥ ११॥

अर्थ- तसाच पूर्वोक्त तिथ्यादि पुण्यकाल प्राप्त झाला असतां, वेदानें श्रेष्ठत्व पावलेल्या ब्राम्हणानीं सर्व पवित्र ओषधियुक्त उदकानें दान कर्त्यास स्नान घालावें. त्याकाळीं गायन व मंगल शब्द हे होत असावे.

इममुच्चारयेन्मंत्रंगृहीतकुसुमांजलिः॥ नमोस्तुविश्वमूर्तिभ्योविश्वमातृभ्यएवच॥ १२॥ लोकाधिवासिनीभ्यश्चरोहिणीभ्योनमोनमः॥ गवामंगेषुतिष्ठंतिभुवनान्येकविंशतिः॥ १३॥ ब्रम्हादयस्तथादेवारोहिण्यःपांतुमातरः॥ गावोमेअग्रतःसंतुगावःपृष्ठतएवच॥ १४॥ गावःशिरसिमेनित्यंगवांमध्येवसाम्यहम्॥ यस्मात्त्वंवृषरूपेणधर्मएवसनातनः॥ १५॥ अष्टमूर्तेरधिष्ठानमतःपाहिसनातन॥

अर्थ- नंतर यजमानानें स्वहस्तीं पुष्पांजलि ग्रहण करून पुढील मंत्र- उच्चारावा. त्याचा अर्थ असा कीं, अहो गायींहो, तुम्ही विश्वमूर्ति व सकल विश्वमाता असल्यामुळें सर्वलोक तुमच्या आश्रयानें वास करतात. त-

शींच एकवीस भुवनें तुमच्या अंगीं स्थित असून ब्रम्हादिक देवही तुमच्या स्वरूपीं स्थित आहेत. यावरून तुम्ही रोहिणी समान संपूर्ण जगाच्या मा ता आहांत यास्तव मी तुम्हांस वारंवार नमस्कार करतों. तुम्ही आमचें-संरक्षण करा. तसेंच गायींहो, आपण माझ्या अग्रभागीं, पृष्ठभागीं, शिरोभागीं असावें. व मी निरंतर गायींचे मध्यभागीं वास करीन. आणि हे-नंदिकेश्वरा, यस्मात् तूं साक्षात् अनादि धर्म वृषरूपानें लोकांत प्रसिद्ध-असून अष्टमूर्ति शंकराचा अधिष्ठान भूत आहेस. तस्मात् हे अनादि स्वरूपा, तूं आमचें रक्षण कर.

इत्यामंत्र्यततोदद्याद्गुरवेनंदिकेश्वरम् ॥ १६ ॥ सर्वो
पकरणोपेतंगोयुतंचविचक्षणः ॥ ऋत्विग्भ्योधेनुमे
कैकांदशकाद्विनिवेदयेत् ॥ १७ ॥

अर्थ- अशी प्रार्थना करून पश्चात् ज्ञानसंपन्न यजमानानें ती नंदिकेश्वरमूर्ति, सर्वउपसाहित्य व एक गोप्रदान यां सह वर्तमान, गुरव्य आचार्या स द्यावी. आणि मंडपांत पूजार्थ आणलेल्या गो दशकांतून एकेक गाय-ऋत्विजांस निवेदन करावी.

गवांचशतमेकैकंतदर्धंवाथविंशतिम् ॥ दशपंचाथ
वादद्यादन्येभ्यस्तदनुज्ञया ॥ १८ ॥

अर्थ- नंतर अवशिष्ट राहिलेल्या सहस्र गायींतून एकेक शतक किं-वा पंचाशत् (पन्नास), विंशति (वीस), दश अथवा पंच अशा गायीं, त्या आचार्य ऋत्विजादिकांच्या आज्ञेनें अन्य ब्राम्हणांस द्याव्या.

नैकाबहुभ्योदातव्यायतोदोषकरीभवेत् ॥ बह्व्य-
श्चैकस्यदातव्याधीमतारोग्यवृद्धये ॥ १९ ॥

अर्थ- परंतु एक गाय बहुत ब्राम्हणांस देऊं नये; कारण त्यापासून दोष उत्पन्न होतो. आणि बुद्धिमंतानें आरोग्य वृध्यर्थ बहुत गायी एकास द्या.

पयोव्रतःपुनस्तिष्ठेदेकाहंगोसहस्रदः ॥ श्रावयेच्छृ
णुयाद्वापिमहादानानुकीर्तनम् ॥ २० ॥

अर्थ- तसेंच गोसहस्र प्रदान केल्यानें पुनः एक दिवस केवळ दुग्धमात्रा-न करून रहावें. आणि हें गोसहस्र नामक महादान वर्णन जो मानव इत

रांस श्रवण करवील किंवा स्वतः श्रवण करील.

तद्दिने ब्रम्हचारी स्यात् यदीच्छेद्विपुलां श्रियम् ॥ अने
न विधिना यस्तु गोसहस्रप्रदो भवेत् ॥ सर्वपापविनि
र्मुक्तः सिद्धचारणसेवितः ॥ २१ ॥

अर्थ- त्यास विपुल संपत्तीची इच्छा असेल तर त्यानें त्यादिवशीं ब्रम्हच
र्यव्रतानें असावें. अशाविधीनें जो सहस्र गोप्रदानें करील तो सर्वपापांतू
न मुक्त होऊन परलोकीं सिद्धचारण यानीं सेवित होतो.

विमानेनार्कवर्णेन किंकिणीजालमालिना ॥ सर्वे-
षां लोकपालानां लोके सं पूज्यतेमरैः ॥ २२ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें तो क्षुद्र घंटा समुदाय मालायुक्त असून सूर्यसमा-
न देदीप्यमान अशा विमानानें सर्व लोकपालांचे लोकांत संचार करीत-
असतां, तेथील अमरानीं सुपूजित होतो.

प्रतिमन्वंतरं तिष्ठेत्पुत्रपौत्रसमन्वितः ॥ सप्त लोका
नतिक्रम्य ततः शिवपुरं व्रजेत् ॥ २३ ॥

अर्थ- आणि तो पुरुष पुत्रपौत्रांसह एकेक मन्वंतर पर्यंत प्रत्येक लो-
कपालाच्या लोकांत वास करतो. अशा रीतीनें सप्त लोकांचें अतिक्रमण-
करून पश्चात् शिवपुरास गमन करतो.

शतमेकोत्तरं तद्वत्पितॄणां तारयेद्बुधः ॥ मातामहानां तद्वच्च
पुत्रपौत्रसमन्वितः ॥ यावत्कल्पशतं तिष्ठेद्राजराजो भवेत्पुनः २४

अर्थ- तसाच तो ज्ञानसंपन्न स्वकीय एकोत्तर शतपितर व तितकेच मा
तामह यांस तारतो. आणि तो पुत्रपौत्रांसह त्या शिवपुरांत शतकल्पप
र्यंत वास करून पुढें पृथ्वीवर सार्वभौम राजा होतो.

अश्वमेधशतं कुर्याच्छिवध्यानपरायणः ॥ वैष्ण
वं योगमास्थाय ततो मुच्येत बंधनात् ॥ २५ ॥

अर्थ- नंतर तो शिवध्यानपरायण होऊन शत अश्वमेध करतो. पश्चा
त् तो विष्णूचा ध्यानयोग करून त्या योगानें संसार बंधनांतून मुक्त
होईल.

पितरश्चाभिनंदंति गोसहस्रप्रदं सुतम् ॥ अ-

पिस्यात्सकुलेस्माकंपुत्रोदौहित्रएववा ॥ गोसह-
स्रप्रदोभूत्वानरकादुद्धरिष्यति ॥ २६ ॥

अर्थ- तसेंच पितर ही स्वकीय वंशस्थ गोसहस्र नामक महादान क-रणाऱ्या पुत्राचें अभिनंदन करतात कीं, आमच्या कुलांत जो कोणी पु-त्र किंवा कन्यापुत्र, सहस्र गोप्रदानें करील तर तो आम्हांस नरकांतून उद्धरील.

तस्यकर्मकरोवास्यादपिद्रष्टातथैवच ॥ संसारसा
गरादस्माद्योस्मान्संतारयिष्यति ॥ २७ ॥

अर्थ- तसाच जो कोणी आमचा वंशज पुरुष त्या सहस्र गोप्रदान-कर्त्याचा सेवक अथवा त्याचें तें कर्म अवलोकन करणारा होईल, तर तो आम्हांस या संसार सागरांतून उत्तम रीतीनें तारील.

इतिपठतिय एतत्गोसहस्रप्रदानंस्मरभुवन
मुपेयात् संस्मरेद्वाथपश्येत् ॥ अनुभवतिमुदंवामु
च्यमानोतिकामंप्रहतकलुषदेहः सोपियातींद्र-
लोकम् ॥ २८ ॥

अर्थ- असें हें गोसहस्र प्रदान प्रकरण जो मानव पठन, उत्तम प्रका-रें स्मरण किंवा अवलोकन करील तर तो देवलोकांस प्राप्त होतो. अथ-वा हा महादानाध्याय कोणी वाचीत असतां, जो अत्यंत हर्ष पावतो तो ही स्वदेहांतील सर्वपाप समूळ नाश पावून इंद्रलोकास प्राप्त होतो.-

इतिश्री मत्स्यपुराणे महादानानुकीर्तने गोसहस्रप्रदानिकोनामाष्ट सप्तत्युत्तर द्विशततमो ऽध्यायः ॥ २७८ ॥

अध्याय २७९ वा.

मत्स्य उवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामि कामधेनु
विधिंपरम् ॥ सर्वकामप्रदंनृणांमहापातकना
शनम् ॥ १ ॥ लोकेशावाहनंतद्वद्धोमःकार्योधि
वासनेम् ॥ तुलापुरुषवत्कुर्यात्कुंडमंडपवे-
दिकम् ॥ २ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, इतउत्तर मी तु

ला कामधेनुनामक महादानाचा श्रेष्ठविधि उत्तम प्रकारें कथन करतों; कारण हें दान मनुष्यांचे. सर्वपापांचा नाश करून त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण करणारें आहे. यास्तव या दानविधींत तुलापुरुष दानासारखेंच लोकपालांचें आवाहन. तसाच होम, कर्मप्रधान देवतांचें अधिवासन कुंड मंडप व वेदी हीं करावीं.

स्वल्पेत्वेकाग्निवत्कुर्याद्गुरुरेकः समाहितः ॥ कांचनस्यातिशुद्धस्य धेनुं वत्सं च कारयेत् ॥ ३ ॥

अर्थ– तसेंच यजमानास द्रव्यानुकूल्य स्वल्प असेल तरतेंमुख्य आचार्यानें एकाग्र अंतःकरणें करून एकाग्नीवरच होमादि सर्व कर्म करावें आणि अतिशुद्ध सुवर्णाची एक सवत्सा धेनु करवावी.

उत्तमा पलसाहस्रीतदर्धेनतुमध्यमा ॥ कनीयसीतदर्धेन कामधेनुः प्रकीर्तिता ॥ ४ ॥

अर्थ– ती कामधेनुमूर्ति सहस्रपल परिमित सुवर्णाचीउत्तम असून पांचशें पल सुवर्णाची मध्यम व अडीचशें पल सुवर्णप्रतिमा कनिष्ठ असें जाणावें.

शक्तितस्त्रिपलादूर्ध्वमशक्तोपीहकारयेत् ॥ वेद्यां कृष्णाजिनंन्यस्यगुडप्रस्थसमन्वितम् ॥ ५ ॥

अर्थ– तसाच कर्ता कितीही अशक्त असला तरी त्यानें स्वशक्त्यनुसार त्रिपल परिमित सुवर्णापेक्षां अधिक सुवर्णाची वत्ससहित कामधेनुमूर्ति यादानाविषयीं करवावी. आणि वेदीवर प्रस्थपरिमित गुडयुक्त कृष्णाजिन पसरावें.

न्यसेदुपरितांधेनुंमहारत्नैरलंकृतां ॥ कुंभाष्टकसमोपेतांनानाफलसमन्विताम् ॥ ६ ॥

अर्थ– नंतर त्यावर महारत्नानीं अलंकृत केलेली तीसुवर्ण कामधेनुप्रतिमा स्थापन करून तिच्या आसमंतात् अष्टदिशेस आठ कुंभ व अनेक फलें हीं स्थापन करावीं.

तथाष्टादशधान्यानिसमंतात्परिकल्पयेत् ॥ इक्षुदंडाष्टकं तद्वन्नानाफलसमन्वितम् ॥ भाजनंचासन-

तद्वत्ताम्रदोहनकंतथा ॥ ७ ॥

अर्थ- तशींच अष्टादश धान्यें, अनेक जातीय फल युक्त अष्ट इक्षु दंड, पात्रें, आसन व दोहनार्थ ताम्र पात्र हीं त्या कामधेनुमूर्ती च्या आसमंताद्भागीं स्थापन करावीं.

कौशेयवस्त्रद्वयसंयुतांगांदीपातपत्राभरणाभिरामाम् ॥ सचामरांकुंडलिनींसघंटांस्कवर्णशृंगीं परिरूप्यपादाम् ॥ ८ ॥ रसैश्वसर्वैः परितोभिजुष्टांहरिद्रयापुष्पफलैरनेकैः ॥ अजाजिकुस्तुंबुरुशर्करादिभिर्वितानकंचोपरिपंचवर्णम् ॥ ९ ॥ स्नातःस्ततोमंगलवेदघोषैःप्रदक्षिणीकृत्यसपुष्पहस्तः आवाहयेत्तांगुरुणोक्तमंत्रैर्द्विजायदद्यादथदर्भपाणिः ॥ १० ॥

अर्थ- त्याच प्रमाणें दोन रेशमी वस्त्रें, सुवर्णशृंगें, रौप्यखुर, कुंडलें व घंटा या आभरणानीं ती कामधेनुमूर्त्ति, सुंदर अलंकृत असून दीप, छत्र व चामरें यानीं युक्त असावी. तशींच मधुर १, आम्ल २, तिक्त (कडु) ३, कषाय- (तुरट) ४, कडु (तीक्ष्ण) ५, क्षार अशीं षड्रस अन्नें, हरिद्रा, अनेक पुष्पें, फळें, जिरें, धणें व शर्करा इत्यादिक पदार्थ त्या कामधेनु प्रतिमेच्या आसमंताद्भागीं स्थापन केलेले असून ऊर्ध्वभागीं पंचवर्ण वस्त्राचा चांदवा बांधावा. नंतर स्नान केलेल्या यजमानानें स्वहस्तीं पवित्र धारण पूर्वक पुष्पांजलि ग्रहण करून मंगल वाद्यें व वेदघोष होत असून कामधेनुमूर्त्तीस प्रदक्षिणा करावी. आणि गुरूनें उच्चारण केलेल्या मंत्रानीं यजमानानें त्या गोप्रतिमेंत कामधेनूचें आवाहन करून तिची मंत्रपुष्पांत पूजा केल्या वर ती गाय ब्राम्हणास अर्पण करावी.

त्वंसर्वदेवगणमंदिरमंगभूताविश्वेश्वरित्रिपथगोदधिपर्वतानाम् ॥ त्वद्दानशस्त्रशकलीकृतपापकौघः प्राप्तोस्मिनिर्वृतिमतीवपरांनमामि ॥ ११ ॥

अर्थ- त्या पूर्वीं तिचे प्रार्थना मंत्र असे कीं, हे विश्वेश्वरि तूं सर्व देव गणांच्या मंदिर मालीला साधन भूत असून स्वर्ग, मृत्यु व पाताल या त्रि मार्गानीं ग

मन करणारी भागीरथी व पर्वत यांस वसतिस्थान स्वरूप आहेस; यास्त व तुझ्यादानरूप शस्त्रानें माझ्या सकल पातक समूहान्चा नाश होऊन मी याकाळीं अत्यंत सुख पावलों म्हणून मी तुजला नमस्कार करतों.

लोकेयथेप्सितफलार्थविधायिनींत्वामासाद्यकोहि भुविदुःखमुपेतिमर्त्यः ॥ संसारदुःखशमनायथत स्वकामंत्वांकामधेनुमितिदेवगणावदंति ॥ १२ ॥

अर्थ- आणि तूं यालोकीं स्वभक्तजनांचीं यथेच्छितफल रूप कार्यें पूर्ण करणारी आहेस. या वरून तुझा आश्रय करणारा कोणमानव पृथ्वीवर दुःख पावेल तर कोणीही दुःख पावत नाहीं. यास्तव तूं आमच्या संसार दुःखशमनार्थ अतिशयित यत्न कर; कारण तूं सर्वसज्जनांचे मनोरथ पूर्ण करणारी आहेस; यास्तव सर्वदेवगण तुला कामधेनु म्हणतात.

आमंत्र्यशीलकुलरूपगुणान्वितायविप्राययः कनकधेनुमिमांप्रदद्यात् ॥ प्राप्नोतिधामसपुरंदरदेवजुष्टंकन्यागणैः परिवृतः पदमिंदुमौलेः ॥ १३ ॥

अर्थ- अशी कामधेनूची प्रार्थनाकरून जो मनुष्य ही सुवर्ण कामधेनुमूर्ति, शील, कुल, रूप व गुण एतत्संपन्न ब्राम्हणास देईल तो सर्वदा कन्यास्वरूपानें वर्तणाऱ्या अप्सरागणानीं आसमंतात् वेष्टित होऊन पुरंदरनामक इंद्रदेवानें सेवित अशा चंद्रशेखर शंकराच्या देदीप्यमान कैलास पदास प्राप्त होतो. - इतिश्री मत्स्यपुराणे महादानानुकीर्तने कामधेनुप्रदानिको नाम नवसप्तत्युत्तर द्विशततमो ऽध्यायः ॥ २७९ ॥

अध्याय २८० वा.

मत्स्य उवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामिहिरण्याश्वविधिंपरम् ॥ यस्यप्रदानाद्भुवनेचानंत्यंफलमश्नुते ॥ १ ॥ पुण्यांतिथिमथासाद्यकृत्वाब्राम्हणवाचनम् ॥ लोकेशावाहनंकुर्यात्तुलापुरुषदानवत् ॥ २ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, यानंतर मी तुला हिरण्याश्व दानाचा उत्तम विधि कथन करतों; कारण याच्या दानानें पुरुष भुवनांत अनंतफल पावतो. तो दानविधि असा कीं, पूर्वोक्त पुण्यतिथि

मास झाली असतां त्या काळीं यथोक्त दिवशीं ब्राम्हणांकडून पुण्याहवा चन करवून तुलापुरुष दाना सारखें लोकपालादि देवतांचें आवाहन करावें.

ऋत्विक्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम् ॥ स्वल्पे त्वेकाग्निवत्कुर्यात्थेमवाजिमखं बुधः ॥ ३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ऋत्विज, मंडपसाहित्य, भूषणें व आच्छादनादिक पदार्थ हे सिद्ध करावे. व यजमानास स्वल्पद्रव्य अनुकूल असल्यास ज्ञात्यानें त्या स्वर्णाश्व दान यज्ञसंबंधि होमादिकर्म एकाग्नी वरच करावें.

स्थापयेद्वेदिमध्येतु कृष्णाजिनतिलोपरि ॥ कौशेयव-स्त्रसंवीतं कारयेद्धेमवाजिनम् ॥ ४ ॥ शक्तितः त्रिपला दूर्ध्वमासहस्रपलाद्बुधः ॥ पादुकोपानहच्छत्रचामरा सनभाजनैः ॥ ५ ॥ पूर्णकुंभाष्टकोपेतं माल्येक्षुफल-संयुतम् ॥ शय्यां सोपस्करां तद्वत् हेममार्तंड संयुतां म् ॥ ६ ॥ ततः सर्वौषधीस्नानस्नापितो द्विजपुंगवैः ॥ इममुच्चारयेन्मंत्रं गृहीत कुसुमांजलिः ॥ ७ ॥

अर्थ- आणि वेदीच्या मध्यभागीं कृष्णाजिन पसरून त्यावर एकद्रोण परिमित तिल घालून त्यावर रेशमी वस्त्रानें वेष्टित स्वर्णाश्वाची मूर्ति स्थापन करावी. ती ज्ञात्यानें स्वशक्त्यनुसारें तीनपल स्वर्णापासून एक सहस्रपल स्वर्णापर्यंत करावी. तशाच पादुका, उपानह, छत्र, चामर, आसन, पात्र यांसहित जलपूर्ण अष्टकुंभ, माला, ऊंस, फलें हे पदार्थ त्या अश्वमूर्तीच्या आसमंतात्भागीं स्थापन करावे. तशीच त्या वेदीवर सर्व उपसाहित्य युक्त एक शय्या ठेऊन तिजवर स्वर्णाची सूर्यप्रतिमा स्थापन करावी. नंतर होमांत कर्मोत्तर ब्राम्हण श्रेष्ठानीं सर्व पवित्र ओषधि युक्त उदकानें यजमानास स्नान घालत्यावर त्यानें स्वहस्तीं पुष्पांजलि ग्रहण करून हा पुढील मंत्र उच्चारावा.

नमस्ते सर्व देवेश वेदाहरणलंपट ॥ वाजिरूपेण मामस्मात्पाहि संसारसागरात् ॥ ८ ॥ त्वमेव सप्तधा भूत्वा छंदोरूपेण भास्कर ॥ यस्माद्भासयसे लोकानतः

पाहिसनातन ॥ ९ ॥

अर्थ- त्याचा अर्थ असाकीं, हे अश्वमूर्ते, तूं सर्वदेवांचा स्वामी असूनया अश्वरूपानें सृष्टिकालीं लोकांत वेदप्रवृत्ति करण्याविषयीं तत्पर आहेस; यास्तव मलाया संसार सागरांतून रक्षण कर. आणि हे आदिपुरुषभास्करा, तूंच गायत्री आदिकरून छंदरूपानें सात प्रकारचा होऊन सर्वलोकांस प्रकाश करतोस यास्तव माझें संरक्षण कर.

एवमुच्चार्यगुरवेतमश्वंविनिवेदयेत् ॥ दत्वापापक्षयाद्भानोर्लोकमभ्येतिशाश्वतम् ॥ १० ॥

अर्थ- असा हा मंत्र उच्चारून तीसूर्यसहित अश्वमूर्ति मुख्य आचार्यास निवेदन करावी; कारण या अश्वमूर्ति दानानें दानकर्ता पुरुष, स्वपापक्षय होऊन सूर्याच्या अक्षय लोकास प्राप्त होतो.

गोभिर्विभवतः सर्वानृत्विजःश्चापिपूजयेत् ॥ सर्वधान्योपकरणंगुरवेविनिवेदयेत् ॥ ११ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें यजमानानें स्ववैभवानुसार गोप्रदानानीं अन्यस ऋत्विजांस पूजित करावें. आणि अश्वमूर्तीच्या आसमंतात् अधःप्रदेशीं स्थापन केलेलीं अष्टादश धान्यें व इतर उपसाहित्य हें सर्व मुख्य आचार्यास निवेदन करावें.

सर्वशय्यादिकंदत्वाभुंजीतातैलमेवहि ॥ पुराणश्रवणंतद्वत्कारयेद्भोजनादिकम् ॥ १२ ॥

अर्थ- तसेंच शय्यादिक सर्व त्या आचार्यास देऊन कर्त्यानें तैलपक्क पदार्थ वांचून भोजन करावें. तें भोजनादिक पुराणश्रवणोत्तर करावें.

इमंहिरण्याश्वविधिंकरोतियः संपूज्यमानोदिविदेवसंघैः ॥ विमुक्तःपापःसपुरंमुरारेःप्राप्नोनिसिद्धैरभिपूजितःसन् ॥ १३ ॥

अर्थ- असाहा स्वर्णाश्व दानविधि जो पुरुष करतो तो सर्वथा निष्पाप झाल्यामुळें स्वर्गांत देवसमुदायानीं व सिद्धगणानीं उत्तम रीतीनें पूजित होऊन सुरदैत्य नाशक विष्णूच्या पुरास प्राप्त होतो.

इतिपठतिय ः एतद्धेमवाजिप्रदानंसकलकलुषमु

कः सोश्वमेधेन युक्तः ॥ कनकमयविमानेनार्कलो- कं प्रयातित्रिदशपतिवधूभिः पूज्यते योभिपश्ये- त् ॥ १४ ॥

अर्थ- असें हें स्ववर्णाश्व दानमाहात्म्य जो पुरुष पठन करतो तो सकल पापांतून मुक्त होऊन अश्वमेध यज्ञसंबंधि फलानें युक्त होतो. आणि तो स्व- वर्णमय विमानानें सूर्यलोकास गमन करतो. व कोणी केलेलें हें दान जो- स्वतः दानसामर्थ्य नसल्यामुळें भक्तीनें अवलोकन करतो त्याचा सत्कार दे- वराज इंद्राच्या लोकांतील अप्सरादिक स्त्रिया करतात.

योवाश्रृणोतिपुरुषोल्पधनः स्मरेद्वा हेमाश्वदानम- भिनंदयतीह लोके ॥ सोपिप्रयातिहतकल्मषशुद्ध- देहः स्थानं पुरंदरमहेश्वरदेवजुष्टम् ॥ १५ ॥

अर्थ- तसाच जो अल्पधनवान् पुरुष या स्ववर्णाश्व दानाचें श्रवण, स्म- रण किंवा स्तवन याभूलोकीं करतो तो ही पापनाश झाल्यानें शुद्ध देहयु- क्त होऊन इंद्र व महेश्वर या देवानीं सेवित अशा स्थानास गमन करतो. इतिश्री मत्स्यपुराणे हिरण्याश्व दानं नामाशीत्युत्तर द्विशततमो ऽध्या- यः ॥ २८० ॥

अध्याय २८१ वा.

मत्स्यउवाच ॥ अथातः संप्रविक्ष्यामि महादानमनुत्त- मं ॥ पुण्यमश्वरथंनाम महापातकनाशनम् ॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, मी इतउत्तर तुला अ- श्वरथ नामक अत्युत्तम महादान उत्कृष्टरीतीनें कथन करतों; कारण- हें महापातक नाशक असून पुण्य दायक आहे.

पुण्यंदिनमथासाद्य कृत्वा ब्राम्हणवाचनम् ॥ लो- केशावाहनंकुर्यात्तुलापुरुषदानवत् ॥ २ ॥

अर्थ- त्याचाविधि असाकीं, पुण्यकारक दिवस प्राप्त झाला असतां,- ब्राम्हणां कडून पुण्याहवाचन करवून तुलापुरुष दानासारखें लोक- पाला वाहनादि कर्म करावें.

ऋत्विक्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम् ॥ कु-

ष्णाजिनेतिलान्कृत्वाकांचनंस्थापयेद्रथम् ॥ ३॥

अर्थ- तसेंच ऋत्विज,मंडप साहित्य, भूषणें व आच्छादनादिक सर्व पदार्थ सिद्ध करून कृष्णाजिनावर तिल घालून त्यावर सुवर्णाचा रथ स्थापन करावा.

अष्टाश्वंचतुरश्वंवाचतुश्चक्रंसकूबरम् ॥ ऐंद्रनीले नकुंभेनध्वजरूपेणसंयुतम् ॥ ४ ॥

अर्थ- तो असाकीं, आठ किंवा चार सुवर्णमय अश्व, चतुश्चक्रें, कूबर-(रथास अश्व बांधण्याचें लांकूड) व इंद्रनील मययाच्या कळसानें निहि त सुवर्ण दंडाचा ध्वज यांनीं उत्तम प्रकारें युक्त असावा.

लोकपालाष्टकंतद्वत्पद्मरागदलान्वितम् ॥ चतुरः पूर्णकलशान्धान्यान्यष्टादशैवतु ॥ ५॥

अर्थ- तसेंच अष्टौ लोकपाळ, पद्मरागमण्यांचे घोंस, उदकपूर्ण चार क- लश व अष्टादश धान्यराशी हे त्या रथाच्या आसमंताद्भागीं यथास्थानीं स्थापन करावे.

कौशेयवस्त्रसंयुक्तमुपरिष्टाद्वितानकम् ॥ माल्येक्षु फलसंयुक्तंपुरुषेणसमन्वितम् ॥ ६॥

अर्थ- तसाच उर्ध्वभागीं रेशमी वस्त्राचा चांदवा बांधून माला, पुष्पें, ऊस व फलें हीं रथाचे आसमंतात् ठेऊन रथावर मध्यभागीं गोविंद किंवा शि व अथवा स्वकीय इष्टदेवता यांतील प्रतिमा स्थापन करावी.

योयद्भक्तः पुमान्कुर्यात्सतन्नाम्नाधिवासनम् ॥ छत्रचामरकौशेयवस्त्रोपानहपादुकम् ॥ ७॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो यजमान ज्या देवतेचा भक्त असेल त्यानें त्या दे वाच्या नामानें अधिवासन करावें. आणि छत्र, चामर, रेशमी दोन वस्त्रें, उ पानह् व पादुका हे पदार्थ त्या रथासमीप स्थापन करावे.

गोभिर्विभवतःसार्द्धंदद्याच्छयनादिकम् ॥ आभा रात्रिपलादूर्ध्वंशक्तितःकारयेद्बुधः ॥ ८॥

अर्थ- आणि ते शय्यादिक पदार्थ, दान कर्त्यानें स्वकीय वैभवानुसार गोप्र

दानासहित आचार्यादिक ब्राम्हणास द्यावे. तसाच हा सुवर्णरथ ज्ञात्यानें-स्वशक्त्यनुरूप त्रिपल सुवर्णापासून भारपरिमित सुवर्णाचा करावा.

अश्वाष्टकेनसंयुक्तंचतुर्भिरथवाजिभिः॥ द्वाभ्याम पियुतंदद्याद्धेमसिंहध्वजान्वितम्॥९॥

अर्थ- तसेच आठ,चार सोन्याचे किंवा दोन मत्स्य अशा अश्वानीं युक्त असून आठ व चार अशा अश्वयुक्त रथांस इंद्रनीलमणि कुंभयुक्त ध्वज असावा. आणि अश्व द्वय युक्त रथ, सुवर्ण सिंहध्वजयुक्त करावा. व हें रथादिक सर्व, दानार्थ संकल्पित करावें.

चक्ररक्षावुभौतस्यतुरगस्थावथाश्विनौ॥ पुण्यकालमथावाप्यपूर्ववत्स्नापितोद्विजैः॥१०॥

अर्थ- तसाच उभयतां अश्विनीकुमारांच्या प्रतिमा, त्यारथ संबंधि उभयपार्श्व (बाजू) भागच्या अश्वांवर स्थापन कराव्या; कारण हे रथाचे चक्ररक्षक आहेत. पश्चात् पुण्यकारक दिवशीं आचार्यादिक ब्राम्हणानीं यजमानास पूर्ववत् स्नान घालावें.

त्रिःप्रदक्षिणमावृत्यगृहीतकुसुमांजलिः॥ शुक्लमाल्यांबरोदद्यादिमंमंत्रमुदीरयेत्॥११॥

अर्थ- नंतर त्या दान कर्त्यानें शुक्ल माला व त्याच वर्णाचीं वस्त्रं धारण करून स्वहस्तीं पुष्पं ग्रहण करावीं. आणि त्या रथास तीन प्रदक्षिणा घालून हा पुढील मंत्र उच्चारून तोरथ ब्राम्हणास द्यावा.

नमोनमःपापविनाशनायविश्वात्मनेवेदतुरंगमाय॥ धाम्नामधीशायदिवाकरायपापौघदावानलदेहि-शांतिम्॥१२॥

अर्थ- त्यांतील भाव असाकीं, हे रथा, तूं सकल विश्वाचा आत्मा असल्यामुळें सर्वलोकांचा स्वामी व प्रकाशक असून समूलपाप नाशक आहेस. तसेच तुझ्यारथाचे अश्व हे वेद स्वरूप आहेत तस्मात् हे पाप समूहदा

---

* शेप. दोन सहस्त्रपलांची एक भार नामक संख्या होते.

हें दावाग्ने मला अंतःकरण शांतिदे. मी तुजला वारंवार नमस्कार करतों.

वस्वष्टकादित्यमरुद्गणानां त्वमेव धाता परमं निधानम् ॥ यतस्ततो मे हृदयं प्रयातु धर्मैकतानत्वमघौघनाशात् ॥ १३ ॥

अर्थ- आणि अष्टवसू द्वादशादित्य एकोनपंचाशत् मरुद्गण यांस तूंच धारण करणारा व उत्कृष्ट स्थानरूप आहेस यास्तव तुझ्या दानप्रभावानें माझ्या पापसमुदायाचा नाश होऊन माझें अंतःकरण धर्ममार्गांत एकतान वृत्तीनें तत्पर होवो.

इतितुरगरथप्रदानमेकं भवभयसूदनमत्र यः करोति॥ सकलुषपटलैर्विमुक्तदेहः परमुपैति पदं पिनाकपाणेः ॥ १४ ॥

अर्थ- अशारीतीनें हें भवभय नाशक मुख्य अश्वरथदान याभूलोकीं जो करतो तो स्वदेहांतील सकलपाप समुदायांतून मुक्त होऊन पिनाकधनुष्य धारण करणाऱ्या शिवाच्या उत्तम पदास प्राप्त होतो.

देदीप्यमानवपुषां विजितप्रभावमाक्रम्य मंडलमखंडितचंडभानोः ॥ सिद्धांगनानयनषट्पदपीयमानवक्त्रांबुजोंऽबुजभवेन चिरं सहास्ते ॥ १५ ॥

अर्थ- नंतर तो प्राणी, देदीप्यमान शरीरयुक्त पुरुषांचे तेजांस अतिशयें जिंकणाऱ्या अखंडित तीक्ष्ण किरण सूर्यमंडलाचें आक्रमण करून-सत्यलोकांत विष्णुनाभिकमलोत्पन्न ब्रह्मदेवांसहवर्तमान चिरकाल वास करतो. त्याकाली तेथील सिद्धांच्या स्त्रिया स्वकीयनेत्ररूप भ्रमरानीं त्याचें मुखकमल प्रीतीनें अवलोकन करतात.

इतिपठतिशृणोतिवायइत्थं कनकतुरगरथप्रदानमस्मिन्॥ नसनरकपुरं व्रजेत्कदाचिन्नरकरिपोर्भवनं प्रयाति भूयः ॥ १६ ॥

अर्थ- असें हें सुवर्णाश्वरथप्रदान माहात्म्य जो पुरुष या लोकीं यथासांगरीतीनें पठन किंवा श्रवण करील तो, कदापि यमपुरास न जातां पुनः

नरकासुर नाशक विष्णूच्या लोकास प्राप्त होतो. इतिश्री मत्स्य पुराणें हिरण्याश्व रथ प्रदानिको नामें काशी त्र्यूत्तर द्विशततमो ऽध्यायः २८१

अध्याय २८२वा.

मत्स्य उवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामि हेमहस्तिरथं शुभम् ॥ यस्य प्रदानाद्भुवनं वैष्णवं याति मानवः ॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, या नंतर मी तुला शुभ कारक सुवर्णहस्ति रथ नामक महादान सांगतों; कारण या दानपुण्यानें मानव, विष्णूच्या भुवनास प्राप्त होतो.

पुण्यां तिथिमथासाद्य तुलापुरुषदानवत् ॥ विप्रवाचनकं कुर्याल्लोकेशावाहनं बुधः ॥ ऋत्विक्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम् ॥ २ ॥

अर्थ- त्याचा विधि असाकीं, पुण्य कारक तिथि प्राप्त झाली असतां, ज्ञात्यानें ब्राम्हणां कडून पुण्याह वाचन करवून तुलापुरुष दाना सारखें लोकपालांचें आवाहन आणि ऋत्विज, मंडप साहित्य, भूषणें व आच्छादनादिक सर्व पदार्थ हें सर्व कर्म करावें.

अत्राप्युपोषितस्तद्वद्ब्राम्हणैः सह भोजनम् ॥ कुर्यात्पुष्परथाकारं कांचनं मणिमंडितम् ॥ ३ ॥

अर्थ- या दानांत ही यजमानानें पूर्वदिवशीं उपोषित असून द्वितीय दिवशीं दानोत्तर ब्राम्हणां सहवर्तमान भोजन करावें. तसाच तो रथ, चतुष्कोण असून आच्छादित असावा. व तो सुवर्णाचा असून रत्नादि मण्यानीं अलंकृत करावा.

वलभीभिर्विचित्राभिश्चतुश्चक्रसमन्वितम् ॥ कृष्णाजिने तिलद्रोणं कृत्वा संस्थापयेद्रथम् ॥ ४ ॥

अर्थ- तसाच तो चतुश्चक्र रथ, वर बसण्याच्या विचित्र लघुस्थलानीं युक्त असून तो, कृष्णाजिनावर एक द्रोण परिमित तिल घालून त्यावर उत्तम रीतीनें स्थापन करावा.

लोकपालाष्टकोपेतं ब्रम्हार्कशिवसंयुतम् ॥ मध्ये

नारायणोपेतंलक्ष्मीपुष्टिसमन्वितम् ॥ ५ ॥

अर्थ- तसेच अष्टौलोकपाल, ब्रम्हदेव, सूर्य, शिव हे त्या रथावर आसमंतात् असून मध्यभागीं लक्ष्मी व पुष्टि यांसहित नारायणाची मूर्तिस्थापन करावी.

तथाष्टदशधान्यानिभाजनासनचंदनैः ॥ दीपिकोपानहछत्रदर्पणांपादुकान्वितं ॥ ६ ॥

अर्थ- तशींच अष्टादशैंधान्यें, पात्रें, आसनें, चंदन, दीपिका (मशाल), उपानह, छत्र, दर्पण व पादुका हे पदार्थ रथाचे आसमंतात् यथास्थानीं स्थापन करावे.

ध्वजेतुगरुडंकुर्यात्कूबराग्रेविनायकं ॥ नानाफलसमायुक्तमुपरिष्टाद्वितानकम् ॥ ७ ॥ कौशेयंपंचवर्णंतुअम्लानकुसुमान्वितम् ॥

अर्थ- त्याचप्रमाणें या रथाच्या ध्वजावर गरुड व अश्व बांधण्याचा रथ संबंधि लांकडाच्या अग्रावर विनायक असे स्थापन करून ऊर्ध्वभागीं अनेक फलयुक्त चांदवा बांधावा. तो पंचरंगि रेशमी वस्त्राचा असून म्लान न होणाऱ्या पुष्पांचा असावा.

चतुर्भिःकलशैःसार्धंगोभिरष्टाभिरन्वितम् ॥ ॥ ८ ॥ चतुर्भिर्हेममातंगैर्मुक्तादामविभूषितैः ॥ स्वरूपतःकरिभ्यांचयुक्तंकृत्वानिवेदयेत् ॥ ९ ॥

अर्थ- तशाच चार कलश सहित आठ गायी रथाच्या आसमंताद्भागीं स्थापन कराव्या. तसेच मौक्तिकमाला सुशोभित चार सुवर्णगज व प्रत्यक्ष दोन गज यानीं युक्त असा सुवर्णरथ सिद्ध करून ब्राम्हणास निवेदन क॰

कुर्यात्पंचपलादूर्ध्वमाभाराद्पिशक्तितः ॥ तथा मंगलशब्देनस्नापितोवेदपुंगवैः ॥ १० ॥ त्रिःप्रदक्षिणमावृत्य गृहीतकुसुमांजलिः ॥ इममुच्चारयेन्मंत्रं-

---

* टीप. सातु, गहू, साळी, तिळ, कांग, कुळिथ, उडीद, मूग, मसूर, पावटे, मोहऱ्या, कसईचेंथी वर्या, तुरी, वाटाणे, हरबरे, राळे, सांवे. १८

ब्राम्हणेभ्योनिवेदयेत् ॥ ११ ॥

अर्थ- तो रथ यजमानानें स्वशक्त्यनुसार पांच पल सूवर्णापासून एकभार परिमित स्रुवर्णापर्यंत करावा. तसेंच होमांत सर्वकर्म झाल्यावर. वेदानें श्रेष्ठत्व पावलेल्या ब्राम्हणानीं मंगल वाद्यांचे शब्द होत असून मंगल कारक सूक्तानें दान कर्त्यास अभिषेक स्नान घालल्यावर त्यानें हस्तांत पुष्पें ग्रहण करून त्या रथास तीन प्रदक्षिणा घालाव्या. आणि पुढील-हामंत्र उच्चारून प्रतिमादि सर्वउपसाहित्य सहित तो रथ ब्राम्हणांस-द्यावा.

नमोनमः शंकरपद्मजार्कलोकेशविद्याधरवासुदेवैः ॥ त्वंसेव्यसेवेदपुराणयज्ञैस्तेजोमयस्यंदनपाहितस्मात् ॥ १२ ॥

अर्थ- त्यांतील अभिप्राय असाकीं, हे रथा, तूं, तेजोमय असून शंकर, विष्णुनाभिकमलोद्भव ब्रम्हदेव, सूर्य, लोकपाल, विद्याधर, वासुदेव, वेद, पुराणें व यज्ञ या सर्वांनीं यथायोग्य रीतीनें सेवित आहेस, यास्तव तूं मला संरक्षण कर.

यत्तत्पदंपरमगुह्यतमंसुरारेह्यानंदहेतुगुणरूपविमुक्तमंतः ॥ योगैकमानसदृशोमुनयःसमाधौपश्यंतितत्वमसिनाथरथाधिरूढ ॥ १३ ॥

अर्थ- हे रथारूढ नाथ मुरारे विष्णो, सत्वादि गुण व रूप यानीं रहित जें अत्यंत परम गुह्यस्वरूप, योगाविषयींच एकाग्र मानस पूर्वक दृष्टियुक्त मुनि स्वकीय अंतःकरण समाधींत अवलोकन करतात तें तत्व तूंच आहेस.

यस्मात्त्वमेवभवसागरसंप्लुतानामानंदभागमृतमध्वगपारपत्रम् ॥ तस्मादघौघशमनेनकुरुप्रसादंचामीकरेभरथमाधवसंप्रदानात् ॥ १४ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें हे स्रुवर्ण गजयुक्तरथा, यस्मात् तूंच भवसागरांत अतिनिमग्न झालेल्या संसार मार्गस्थ श्रांत पांथरूप जीवांस त्या मार्गांतून पार नेऊन अमृत पूर्ण मोक्षास प्राप्त करण्याविषयीं वाहन रूप आहेस तस्मा-

व तूं आपले मध्यभागस्थित विष्णुमूर्तीच्या उत्तम दानानें माझ्या पापस मुदायाचा नाश करून मजवर प्रसाद कर.

इत्थंप्रणम्यकनकेभरथप्रदानंयःकारयेत्सकल पापविमुक्तदेहः ॥ विद्याधरामरमुनींद्रगणाभिजु ष्टंप्राप्नोत्यसोपदमतींद्रियमिंदुमौलेः ॥ १५ ॥

अर्थ- अशारीतीनें नमस्कार पूर्वक रथास मंत्रपुष्पांजलि समर्पण करून हें सुवर्णहस्तिरथ प्रदान जो मानव करतो तो स्वदेहांतील सकल पापांतून मुक्त होऊन विद्याधर, अमरवमुनिश्रेष्ठ यांच्या गणानीं सर्वत्र सेवित असून मनुष्यांच्या इंद्रियास अगोचर अशा चंद्रशेखर शंकराच्या पदास प्राप्त होतो.

कृतदुरितवितानप्रज्वलद्वह्निजालव्यतिकरकृ तदेहोद्वेगभाजोपिबंधून् ॥ नयतिसपितृपुत्रान् बांधवानप्यशेषान्कृतगजरथदानाच्छाश्वतंस द्मविष्णोः ॥ १६ ॥

अर्थ- आणि तो रथ दानकर्ता, जन्मजन्मांतरीं केलेल्या पातक विस्ताररूप प्रज्वलित अग्नि समुदायाच्या ज्वालानीं उद्विग्न देह झालेले स्वकीय बंधु, पित्तर, पुत्र व सर्व बांधव यांसही या केलेल्या गजरथदानानें विष्णूच्या अक्षय पदास नेतो. इतिश्री मत्स्य पुराणे महादानानुकीर्तनें हस्तिरथ प्रदानिको नाम द्व्यशी त्युत्तर द्विशत तमोऽध्यायः ॥ २८२ ॥

अध्याय २८३ वा.

मत्स्यउवाच ॥ अथातःसंप्रवक्ष्यामिमहादान मनुत्तमम् ॥ पंचलांगलकंनाममहापातकना शनम् ॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, इतउत्तर मी तुला पंचलांगल नामें प्रसिद्ध असून महापातक नाशन असें महादान कथन करतों.

पुण्यांतिथिमथासाद्ययुगादिग्रहणादिकाम् ॥

भूमिदानंनरोदद्यात्पंचलांगलकान्वितम्॥ २॥

अर्थ- तें असें कीं, युगादि किंवा ग्रहणादिक अशी पुण्यकारक तिथि प्राप्त झाली असतां, त्या दिवशीं मानवानें पांच लांगलक (नांगर) युक्त भूमीचें दान करावें.

खर्वटंखेटकंवापिग्रामंवासस्यशालिनम्॥ नि
वर्तनशतंवापितदर्धंवापिशक्तितः॥ ३॥

अर्थ- तें असें कीं, खर्वट,१, खेटक २, किंवा धान्य पूर्णग्राम ३, अथवा निवर्तनशत यद्वा पन्नास निवर्तन यांतून यजमानानें स्वशक्त्यनुसार भूमिदान करावें.

सारदारुमयान्कृत्वाहलान्पंचविचक्षणः॥ स
र्वोपकरणैर्युक्तानन्यान्पंचचकांचनान्॥ कुर्या
त्पंचपलादूर्ध्वमासहस्रपलावधि॥ ४॥

अर्थ- तसेंच ज्ञात्यानें तुलापुरुषदान प्रकरणोक्त चंदनादिक उत्तम काष्ठांचे पांच नांगर व खिळे आदि करून सर्व उपसाहित्य युक्त सुवर्णाचेही पांच नांगर करावे; ते पांचपल सुवर्णापासून सहस्रपल परिमित सुवर्णाचे शक्त्यनुसारें असावे.

वृषान्लक्षणसंयुक्तान्दशचैवधुरंधरान्॥ ५॥ सु
वर्णशृंगाभरणान्मुक्तालांगूलभूषणान्॥ ५॥ रू
प्यपादाग्रतिलकान्रक्तकौशेयभूषणान्॥ स्रग्दा
मचंदनयुतान्शालायामधिवासयेत्॥ ६॥

अर्थ- त्याच प्रमाणें नांगर संबंधि धुरी (अग्रभाग) धारण करणारे तारुण्यादि लक्षण संपन्न दहा वृषभ, मंडपा बाहेरील शालेंत (सोपा) स्थापन करावे; आणि ते सुवर्णशृंगें, मौक्तिक पुच्छें, रौप्य चरण, लखाटावरील रौप्यमय तिलक आरक्त वर्ण रेशमी वस्त्रें, माळा, दाम (दांवें) व

*: उंचतट तसाच तटबंदी दरवाजा व सभोंवतीं सर्वत्र खंदक यानीं युक्त असून एककोस रुंद व आठ कोस लांब असें जें असेल त्यास पुर म्हणतात. आणि त्याच्या अर्धप्रमाणानें युक्त असेल ते खेटक तसेंच त्याच्या चतुर्थांशानें न्यून असतें तें खर्वट व ज्यांत शूद्रजन बहुत असून शेतकरी लोक अति संपन्न असतात आणि असंतान् मार्गानें क्षेत्रांच्या उपभोगार्थ जी भूमि मध्यावरील लोकांची वस्ति असते तिला ग्राम म्हणतात.

चंदन यानीं सुशोभित असावे.

धरण्यादित्यरुद्रेभ्यः पायसंनिर्वपेच्चरुम् ॥ एक-
स्मिन्नेवकुंडेतुगुरुस्तेभ्योनिवेदयेत् ॥ ७ ॥ पलाश
समिधस्तद्वदाज्यंकृष्णतिलास्तथा ॥ तुलापुरुषव-
त्कुर्याल्लोकेशावाहनंबुधः ॥ ८ ॥

अर्थ-आणि धरणी, आदित्य व रुद्र यांच्या उद्देशानें कर्तव्य होमार्थ पायस रूप दुग्धांतील चरुसिद्ध करावा. तशाच पलाश (पळस) समिधा, आज्य (घृत) कृष्णवर्णतिल यांचा होम आचार्यानें ऋत्विजां कडून त्या देवतांच्या प्रीत्यर्थ एकाच कुंडांतील स्थापित अग्नींत करवावा. व ज्ञान संपन्न यजमानानें तुलापुरुषदानविधी सारखेंच या कर्मांत लोकपालांचें आवाहन करावें.

ततोमंगलशब्देन शुक्लमाल्यांबरो बुधः ॥ आहूयद्विज
दांपत्यंहेमसूत्रांगुलीयकैः ॥ ९ ॥ कौशेयवस्त्रकटकैर्म
णिभिश्चाभिपूजयेत् ॥ शय्यांसोपस्करांदद्यात्धेनुमे-
कांपयस्विनीम् ॥ १० ॥

अर्थ- नंतर कर्त्यानें शुभ्र पुष्पमाला व त्याच वर्णाचीं वस्त्रें धारण करून मंगलकारक शब्दानें ब्राम्हण दंपत्यास आव्हान (बोलावणें) करून त्यास-गोफ आदिकरून सुवर्णसूत्रें, अंगुलि भूषणें, रेश्मी वस्त्रें, कटकें (कडितोडे) नवरत्नादिक मणि यानीं पूजित करून सोपस्कर शय्या व एक उत्तम-विपुल दुग्ध संपन्न धेनु हीं दानें त्या दंपतीस द्यावीं.

तथाष्टादशधान्यानिसमंतादधिवासयेत् ॥ ततःप्र
दक्षिणीकृत्यगृहीतकुसुमांजलिः ॥ ११ ॥ इममुच्चार-
येन्मंत्रमथसर्वंनिवेदयेत् ॥ यस्माद्देवगणाःसर्वेस्था
वराणिचराणिच ॥ १२ ॥ धुरंधरांगेतिष्ठंतितस्माद्भ-
क्तिःशिवेस्तुमे ॥ यस्माच्चभूमिदानस्यकलांनार्ह
तिषोडशीम् ॥ १३ ॥ दानान्यन्यानिमेभक्तिर्धर्मए-
वदृढाभवेत् ॥

अर्थ-तशींच अष्टादश धान्यें त्या नांगरांच्या आसमंताद्भागीं स्थापन क

रावी. पश्चात् यजमानानें त्यानांगरांस प्रदक्षिणा घालून स्वहस्तांत पुष्पें ग्रहण करून हा पुढील मंत्र म्हटल्यावर तें सर्व,आचार्यादिक ब्राम्हणांस द्यावें. त्यामंत्रांतील अभिप्राय असाकीं, यस्मात् सर्वदेवगण व सर्वचराचरभूतें, हीं या वृषभांच्या अंगांत वास करतात तस्मात् यांच्या दानानें माझीभक्ति शिवाविषयीं असो. तशीच अन्यसर्वदानें या पंचलांगलक सहित भूमिदानाच्या सोळाव्या कलेसही योग्य होतनाहींत यास्तव याभूमिदानानें माझीभक्ति धर्माविषयींच दृढहोवो.

दंडेन सप्तहस्तेनत्रिंशद्दंडनिवर्तनम् ॥ १४ ॥ त्रिभागहीनंगोचर्ममानमाह प्रजापतिः ॥ मानेनानेन योदद्यान्निवर्तनशतंबुधः ॥ विधिनानेनतस्याशु क्षीयतेपापसंहतिः ॥ १५ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें सप्तहस्त दंडानें तीस दंड परिमित लांबी, रुंदीच्या-क्षेत्रास निवर्तन म्हणतात. आणि त्याचमानाच्या वीस दंड प्रमाण लांब-रुंद क्षेत्रास गोचर्म नाम आहे हें मान ब्रम्हदेवानें कथन केलें. यामानानें जोज्ञाता शतनिवर्तन परिमित भूमीचें याविधीनें दान करील. त्याचा पाप समुदाय शीघ्रनाश पावतो.

तदर्धमथवादद्यादपिगोचर्ममात्रकम् ॥ भवनस्थानमात्रंवासोपिपापैःप्रमुच्यते ॥ १६ ॥

अर्थ- अथवा पन्नास निवर्तन प्रमाण क्षेत्र, तसेंच गोचर्म मात्र भूमि, किंवा गृहस्थान परिमितक्षेत्र यांचें जोदान करतो तोही सर्वपापांतून मुक्त होतो.

यावंतिलांगलकमार्गमुखानिभूमेर्भासांपतेर्दुहितुरंगजरोमकाणि ॥ तावंतिशंकरपुरेसससमाःहितिष्ठेत्भूमिप्रदानमिहयःकुरुतेमनुष्यः ॥ १७ ॥

अर्थ- तसाच जो मनुष्य यालोकीं अशारीतीनें भूमिदान करतो तो नांगराच्या मुखानें नियालेले भूमिसंबंधि मार्गांतील जितके रजःकण व सकलतेजो राशि स्वरूप सूर्याच्या कन्याभूत गायींच्या पुत्ररूप वृषभाचे अंगावरील जितके केश असतील तितके वर्षपर्यंत शंकराच्या कै

लास पुरांत वासकरतो.

गंधर्वकिन्नरसुरासुरसिद्धसंघैराधूतचामरमुपे-
त्यमहद्विमानम् ॥ संपूज्यतेपितृपितामहबंधुयु
क्तः शंभोःपदंव्रजतिचामरनायकःसन् ॥ १८ ॥

अर्थ- आणितो भूमिदान कर्तामानव, गंधर्व, किन्नर, सुरासुर व सिद्ध-
यांचे समुदायानीं वारलेल्या चामर सहित महाविमान पावून पितर,
पितामह व बंधु यानीं युक्त होऊन शंभुपदास गमन करतो. व तेथें देवना
यक होत्सातां उत्तम प्रकारें पूज्य होतो.

इंद्रत्वमप्यधिगतंक्षयमभ्युपैतिगोभूमिलांगल
धुरंधरसंप्रदानात् ॥ तस्मादघौघपटलक्षयका
रिभूमेर्दानंविधेयमितिभूतिभवोद्भवाय ॥ १९ ॥

अर्थ- तसेंच क्षीण दशेला प्राप्त झालेलें इंद्रत्वहीगो, भूमि, लांगल (नांग-
र) व वृषभ यांच्या उत्तमदानानें पुनः प्राप्त होतें. तस्मात् सकल पातक समु
दायरूप पटलानें क्षयकारक भूमिदान आहे यास्तव अतिशयित संपत्ति
प्राप्त्यर्थ हें दान करावें. इतिश्री मत्स्यपुराणे महादानानुकीर्तनें पंचलां
गल प्रदानिको नाम त्र्यशीत्युत्तर द्विशततमोऽध्यायः ॥ २८३ ॥

अध्याय २८४वा.

मत्स्य उवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामिधरादानम-
नुत्तमम् ॥ पापक्षयकरंनृणाममंगल्यविनाशनम् ॥ १ ॥

अर्थ- मत्स्य रूपीभगवान् म्हणतात हे मनुराजा, या नंतर मी तुला अ
त्युत्तम पृथ्वीदान समीचीन रीतीनें कथन करतों; कारण हें दान, मनुष्यां
च्या पातकांचेंनाशक असून अमंगल स्वभावादिकांचा नाश करणारें -
आहे.

कारयेत्पृथिवींहैमींजंबुद्वीपानुकारिणीम् ॥ मर्या-
दापर्वतवतींमध्येमेरुसमन्विताम् ॥ २ ॥

अर्थ- त्याचा प्रकार असाकीं, जंबुद्वीपाच्या आकृतीनें युक्त सुवर्णाची -
पृथ्वी करून तिच्यामध्यभागीं मेरु पर्वत व त्याचे आसमंतात् भागीं मर्यादी

* मंदर, गंधमादन, वैभ्राज व सुपार्श्व हे मर्यादापर्वत पूर्वादिदिशा क्रमानें आहेत.

पर्वत ही करावे.

लोकपालाष्टकोपेतांनववर्षसमन्विताम् ॥ नदीन
दसमोपेतांमंतेसागरवेष्टिताम् ॥ ३ ॥ महारत्न
समाकीर्णांवसुरुद्रार्कसंयुताम् ॥

अर्थ- आणि ती पृथ्वी अष्टौ लोकपाल, नऊ खंडें, भागीरथी प्रभृती नद्या, शोणभद्रादिक नद, व अंत्य प्रदेशीं सभोंवतीं सागर यांनीं वेष्टित असून अनेक महारत्नखचित करावी. त्याच प्रमाणें अष्टवसु, एकादशरुद्र व द्वादशादित्य यांच्या प्रतिमानीं युक्त असावी.

हेम्नः पलसहस्रेण तदर्धेनाथ शक्तितः ॥ ४ ॥ श-
तत्रयेण वा कुर्यात् द्विशतेन शतेन वा ॥ कुर्यात्पंच
पलादूर्ध्वमशक्तोपि विचक्षणः ॥ ५ ॥

अर्थ- तशीच ही प्रतिमादिसहित पृथिवीची आकृति, सहस्र पलपरिमित सुवर्णाची किंवा स्वशक्त्यनुसारें पांचशें पल सुवर्ण, तीनशें पल सुवर्ण, दोनशें पल सुवर्ण अथवा एकशत पल सुवर्ण, तसाच याविषयीं जो अशक्त असेल त्या ज्ञात्यानें स्वशक्त्यनुसार हें सर्व पांचपल सुवर्णापेक्षां अधिक मानानें करावें.

तुलापुरुषवत्कुर्याल्लोकेशावाहनंबुधः ॥ ऋत्वि-
क्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम् ॥ ६ ॥

अर्थ- तसेंच या दानविधींत ज्ञानसंपन्न यजमानानें तुलापुरुषदानवत्च लोकपालांचें आवाहन, ऋत्विज, मंडपसाहित्य, भूषणें व आच्छादनादिक सामग्री यांची सिद्धता करावी.

वेद्यांकृष्णाजिनंकृत्वा तिलानामुपरिन्यसेत् ॥ त
थाष्टादशधान्यानि रसांश्च लवणादिकान् ॥ ७ ॥

अर्थ- तसेंच वेदीवर कृष्णाजिन पसरून त्यावर घातलेल्या तिळांवर ती पृथ्वी ठेवावी. तशींच अष्टादश धान्यें व लवणादि षड्रस पदार्थ स्थापन करावे.

तथाष्टौ पूर्णकलशान्समंतात्परिकल्पयेत् ॥
वितानकंच कौशेयं फलानि विविधानि च ॥ ८ ॥

अर्थ - तसेच उदकपूर्ण अष्टकलश व अनेक प्रकारचीं फळें त्या पृथ्वीच्या आसमंताद्भागीं स्थापन करून तिचे ऊर्ध्वभागीं रेशमी वस्त्राचा चांदवा बांधावा.

तथांशुकानिरम्याणिश्रीखंडशकलानिच ॥
इत्येवंकारयित्वातामधिवासनपूर्वकम् ॥ ९ ॥

अर्थ - तशींच रमणीय वस्त्रें व श्रीखंडनामक जातीच्या चंदनाचीं खोडें हीं त्या पृथ्वीसमीप ठेवावीं. अशा रीतीनें पृथ्वीच्या आकृतीची रचना करून तिचा दानविधि देवताधिवासन पूर्वक करावा.

शुक्लमाल्यांबरधरःशुक्लाभरणभूषितः ॥ प्र
दक्षिणंततःकृत्वागृहीतकुसुमांजलिः ॥ १० ॥

अर्थ - तो असाकीं, होमांत कर्म होऊन ब्राम्हणानीं यजमानास अभिषेक केल्यावर त्यानें शुभ्रवर्णवस्त्रें तशाच माला धारण करून शुभ्र आभरणानीं भूषित व्हावें. पश्चात् त्यानें त्या सुवर्णपृथ्वीला प्रदक्षिणा करून हस्तांत पुष्पें ग्रहण करावीं.

पुण्यंकालमथासाद्यमंत्रानेतानुदीरयेत् ॥ नम
स्तेसर्वदेवानांत्वमेवभवनंयतः ॥ ११ ॥ धात्रीच
सर्वभूतानामतःपाहिवसुंधरे ॥

अर्थ - आणि त्यादिवशीं पुण्यवेळा प्राप्त झाली असतां, त्याकाळीं यजमानानें हे पुढील मंत्र म्हणावे. त्यांचा भाव असाकीं, हे पृथ्वि मी तुला नमस्कार करतों; कारण तूंच सर्व देवांस वसतिस्थान भूत असून सकल चराचर प्राणिमात्रांस धारण करणारी त्यांची माता आहेस; तस्मात् हे वसुंधरे तूं आमचें संरक्षण कर.

वसुधारयसेयस्माद्वसुचातीवनिर्मलं ॥ १२ ॥ वसुं
धरातनोजातातस्मात्पाहिभयादलम् ॥

अर्थ - तसेच अत्यंत निर्मल धन तूं धारण करीत आहेस. यास्तव तूं लोकांत वसुधरानामें प्रसिद्ध झाली आहेस; म्हणून तूं आम्हांस अतिशयित संसार भयांतून रक्षणकर.

चतुर्मुखोपिनोगच्छेद्यस्मादंतंतवाचले ॥ १३ ॥ अ-
नंतायैनमस्तस्मात्पाहिसंसारकर्दमात् ॥ त्वमेवल-
क्ष्मीर्गोविंदेशिवेगौरीतिचास्थिता ॥ १४ ॥

अर्थ- हे अचले पृथ्वि, तुझा अंत जाणण्याविषयीं ब्रम्हदेवही समर्थ नाहींत त्स्मात् तूं अनंतरूपिणी आहेस यास्तव तूं आम्हांस या संसार कर्दमापासून रक्षण कर. मी तुला नमस्कार करतों; कारण विष्णूच्या सन्निधानीं तूं लक्ष्मी रूपानें असून शिवाचे अर्धांगीं गौरी आहेस.

गायत्रीब्रम्हणःपार्श्वेज्योत्स्नाचंद्रेरवौप्रभा ॥ बुद्धि
र्बृहस्पतौख्याता मेधामुनिषुसंस्थिता ॥ १५ ॥

अर्थ- तशीच तूं ब्रम्हदेवाच्या वामपार्श्वभागीं गायत्री असून चंद्रमंडलीं, चंद्रिका व सूर्यमंडलांत प्रभारूपानें अशी आहेस, आणि तूं बृहस्पतीच्या अंगीं बुद्धिरूपानें प्रसिद्ध असून ऋषिगणांत धारणायुक्त बुद्धिरूपानें आहेस.

विश्वंव्याप्यस्थितायस्मात्ततोविश्वंभरास्मृता ॥-
धृतिःस्थितिःक्षमाक्षोणीपृथ्वीवसुमतीरसा ॥ १६ ॥
एताभिर्मूर्तिभिःपाहिदेविसंसारसागरात् ॥ एवमु-
च्चार्यतांदेवींब्राम्हणेभ्योनिवेदयेत् ॥ १७ ॥

अर्थ- तसेंच सकल चराचर विश्व व्यापून तूं सर्वत्र स्थित आहेस यास्तव तुला विश्वंभरा म्हणतात. त्याच प्रमाणें धृति, स्थिति, क्षमा, क्षोणी, पृथ्वी, वसुमती व रसा या स्वकीय मूर्तींनीं हे देवि, मला संसार सागरांतून रक्षण कर. असे हे प्रार्थना मंत्र उच्चारून कर्त्यानें ती सुवर्ण पृथ्वी ब्राम्हणास निवेदन करावी.

धरार्द्धंवाचतुर्भागंगुरवेप्रतिपादयेत् ॥ शेषंचैवाथऋ
त्विग्भ्यःप्रणिपत्यविसर्जयेत् ॥ १८ ॥

अर्थ- ती अशी कीं, त्या पृथ्वीचा अर्धा भाग किंवा चतुर्थांश मुख्य आचार्यास द्यावा. नंतर शेष राहिलेले भाग ऋत्विजांस देऊन त्या आचार्यादिक सर्व ब्राम्हणांस देऊन नमस्कार करून त्यांचें विसर्जन करावें.

अनेनविधिनायस्तुकुर्याद्धेमधरांशुभाम् ॥ पुण्य

कालेतुसंप्राप्तेसपदंयातिवैष्णवम् ॥ १९ ॥

अर्थ- अशाविधीनें जोमानव प्राप्त झालेल्या पुण्य कालीं हें शुभकारक-सुवर्णपृथ्वीचें दान करतो तोविष्णुपदास गमन करतो.

विमानेनार्कवर्णेनकिंकिणीजालमालिना ॥ नारायण पुरंगत्वाकल्पत्रयमथावसेत् ॥ पितॄन्पुत्रांश्चपौत्रांश्च तारयेदेकविंशतिं ॥ २० ॥

अर्थ- तो असा कीं, लहानघंटायुक्त सूर्यसमान देदीप्य मान विमानानें नाराय णपुरांत जाऊन तेथें तीनकल्प परिमित कालपर्यंत वास करतो. आणि तो-स्वकीय पितरपुत्र व पौत्र हे सर्व मिळून अशा एकविंशति पुरुषांस तारतो.

इतिपठतियइत्थंयः शृणोतिप्रसंगादपिकलुषवि तानैर्मुक्तदेहः समंतात् ॥ दिवममरवधूभिर्यातिसंप्रा र्थ्यमानोपदममरसहस्त्रैः सेवितंचंद्रमौलेः ॥ २१ ॥

अर्थ- असें हें भूमिदानाचें आख्यान जो मानव पठन किंवा प्रसंगानेंही श्रवण करतोतो स्वदेहांतील पातक समुदायांतून मुक्त होऊन आपले-आसमंताद्भागीं देवांगनानीं उत्तम प्रकारें प्रार्थित होत्साता स्वर्गलोका-स गमन करून तेथून पुढें सहस्त्रावधि अमर गण सेवित चंद्रशेखर शंक रांच्या कैलास पदास प्राप्त होतो. इतिश्री मत्स्यपुराणे महादानानु कीर्तनें पृथ्वीदान माहात्म्यं नामचतुरशीत्युत्तरद्विशततमोऽध्यायः ॥ २८४ ॥

अध्याय २८५ वा.

मत्स्यउवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामिमहादानमनु त्तमम् ॥ विश्वचक्रमितिख्यातंमहापातकनाश-नम् ॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, यानंतर मी तुला अत्युत्कृष्ट महादान कथन करतों. कारण हें दान लोकांत विश्वचक्रना-में प्रसिद्ध असून महापातक नाशक आहे.

तपनीयस्यशुद्धस्यविषुवादिषुकारयेत् ॥ श्रेष्ठंप लसहस्त्रेणतदर्धेनतुमध्यमम् ॥ २ ॥

अर्थ- त्याचा विधि असा कीं, विषुवादिक पुण्यकालांत शद्भुतपनीय नामक सुवर्णाचें विश्वचक्र करावें. तें सहस्रपल सुवर्णाचें केलें असतां उत्तम पांचशें पलसुवर्णाचें केलें तरतें मध्यम जाणावें.

तस्यार्द्धेनकनिष्ठंस्यात्‌विश्वचक्रमुदाहृतम्‌ ॥ अन्यद्विंशत्पलादूर्ध्वमशक्तोपिनिवेदयेत्‌ ॥ ३ ॥

अर्थ- तसेंच अडीचशें पलसुवर्णाचें विश्वचक्र कनिष्ठ असें शास्त्रांत कथित आहे. आणि जो अशक्त असेल त्यानें ही स्वशक्त्यनुसार विंशति (वीस) पलापेक्षां अधिक सुवर्णाचें दानार्थ करावें परंतु विसाहून न्यूनप्रमाणाचें करूं नये.

षोडशारंततश्चक्रंभ्रमन्नेम्यष्टकावृतम्‌ ॥ नाभिपद्मेस्थितंविष्णुंयोगारूढंचतुर्भुजम्‌ ॥ ४ ॥

अर्थ- तें असें कीं, सोळा अरांचें असून मध्यभागच्या वर्तुलाकार आठ नेमींनीं (धांव) वेष्टित असें चक्र करून त्याचें नाभि (मध्य) स्थानच्या अष्टदल कमलावर स्थित असून योगासनारूढ अशी चतुर्भुज विष्णुमूर्ति करावी.

शंखचक्रेस्यपार्श्वेतुदेव्यष्टकसमावृतम्‌ ॥ द्वितीयावरणेतद्वत्पूर्वतोजलशायिनम्‌ ॥ ५ ॥

अर्थ- तिच्या वामदक्षिण या उभयपार्श्वभागीं हस्तांत शंखचक्रें असून ती मूर्ति आसमंतात्‌ अष्टदिशा स्थापित आठ देवींनीं वेष्टित असावी. हें प्रथमावरण आहे. तशीच द्वितीयावरणांत पूर्वेस जलशायीची मूर्ति स्थापन करावी.

अत्रिर्भृगुर्वसिष्ठश्चब्रह्माकश्यपएवच ॥ मत्स्यः कूर्मोवराहश्चनरसिंहोथवामनः ॥ ६ ॥ रामोरामश्चकृष्णश्चबुद्धः कल्कीतिचक्रमात्‌ ॥ तृतीयावरणे गौरीमातृभिर्वसुभिर्युता ॥ ७ ॥

---

* मेष व तुला या संक्रांतीचे दिवसांत दिनमान व रात्रिमान समान होतें तो काल.

* विमला १, उत्कर्षिणी २, ज्ञाना ३, क्रिया ४, योगा ५, प्रह्वी ६, सत्या ७, ईशाना ८ अशा आहेत.

अर्थ- आणि अत्रि, भृगु, वसिष्ठ, ब्रम्हा, कश्यप, मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुध, कल्की व ब्राम्ही प्रमुख मातृगैण व अष्टवसु यांसहित गौरी या सर्वदेवता प्रतिमा तृतीयावरणांत असाव्या.

चतुर्थेद्वादशादित्यावेदाश्चत्वारएवच ॥ पंचमेपंचभूतानिरुद्राश्चैकादशैवतु ॥ ८ ॥

अर्थ- तसेच द्वादशादित्य व चतुर्वेद हे चतुर्थावरणांत असून पंचमावरणांत पंचमहाभूतें व एकादश रुद्र असावे.

लोकपालाष्टकंषष्ठेदिग्मांतगास्तथैवच ॥ सप्तमेस्त्राणिसर्वाणिमंगलानिचकारयेत् ॥ ९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें अष्टौ लोकपाल व अष्टदिग्गज हे षष्ठावरणांत असून सर्व अस्त्रें व शंखादिक मंगल कारक पदार्थ हे सप्तमावरणांत असावे.

अंतरांतरतोदेवान्विन्यसेदष्टमेपुनः ॥ तुलापुरुषवच्छेषंसमंतात्परिकल्पयेत् ॥ १० ॥

अर्थ- तशाच यासुवर्णमय विश्वचक्र संबंधि अरा व धांवा यांच्या मध्यभागचे कोष्टकांत इतर देव पुनः अष्टमावरणंत स्थापन करावे. आणि अवशिष्ट सर्वसाहित्य त्याचक्राच्या आसमंतात् भागीं तुलापुरुष दानविधिवत् स्थापन करावें.

ऋत्विग्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम् ॥ विश्वचक्रंततःकुर्यात्कृष्णाजिनतिलोपरि ॥ ११ ॥

अर्थ- तसेच ऋत्विज मंडप साहित्य भूषणें व आच्छादनादिक पदार्थही सर्वसामग्री पूर्ववत् स्थापन करून नंतर तें सुवर्णाचें विश्वचक्र, वेदीवर कृष्णाजिनावरील तिलांवर स्थापन करावें.

---

* ब्रम्हाणी १, माहेश्वरी २, कौमारी ३, वैष्णवी ४, वाराही ५, इंद्राणी ६, चामुंडा ७, हा सप्तमातृगण.

* खड्ग १, त्रिशूल २, गदा ३, शक्ति ४, कुंत ५, कुश ६, धनुष्य ७, स्वधिति ८,

* दक्षिणावर्त, शंख, गोरोचन, चंदन, मुक्ता, हेम, छत्र, चामर व आदर्श,

तथाष्टादशधान्यानिरसांश्चलवणादिकान् ॥ पूर्णकुंभा
ष्टकंचैववस्त्राणिविविधानिच ॥ १२ ॥ माल्यैक्षुफलर
त्नानिवितानंचापिकारयेत् ॥ ततोमंगलशब्देनस्नातःशु
क्लांबरोगृही ॥ होमाधिवासनांतेचगृहीतकुसुमांजलिः१३

अर्थ- तशीच अष्टादशधान्यें, लवणादिक षड्रस पदार्थ, आठ पूर्णकुंभ अ
नेक प्रकारचीं वस्त्रें, पुष्पमाळा, इक्षु, फळें व नऊंजातींचीं महारत्नें* हे पदार्थ-
त्याचक्राचें आसमंतात् यथास्थानीं स्थापित करून ऊर्ध्वभागीं चांदवाही-
लावावा. पश्चात् अधिवासनपूर्वक होमांत कर्मोत्तर ब्राम्हणानीं मंगल का
रक वेदमंत्रानें यजमानास अभिषेक केल्यावर त्या गृहस्थाश्रमि कर्त्यानें शु
भ्रवस्त्र परिधानपूर्वक स्वहस्तीं पुष्पें ग्रहण करावीं.

इममुच्चारयेन्मंत्रंत्रिः कृत्वातुप्रदक्षिणम् ॥ नमोविश्व
मयायेतिविश्वचक्रात्मनेनमः ॥ १४ ॥ परमानंदरूपी
त्वंपाहिनः पापकर्दमात् ॥ तेजोमयमिदंयस्मात्सदा
पश्यंतियोगिनः ॥ १५ ॥

अर्थ- आणि त्याविश्वचक्रास प्रदक्षिणा करून हा मंत्र उच्चारावा. त्यांती
ल अभिप्राय असाकीं, हे विश्वचक्रा, तूं सकलविश्वस्वरूप असून त्याचा-
आत्मा असल्यामुळें परमानंदरूपी आहेस; यास्तव आम्हीं तुला वारंवार न-
मस्कार करतों. आम्हांस पाप कर्दमांतून रक्षण कर.

हृदितत्वंगुणातीतंविश्वचक्रंनमाम्यहम् ॥ वासुदेवे-
स्थितचक्रंचक्रमध्येतुमाधवः ॥ १६ ॥ अन्योन्याधाररू
पेणप्रणमामिस्थिताविह ॥ विश्वचक्रमिदंयस्मात्-
सर्वपापहरंपरम् ॥ १७ ॥ आयुधंचाधिवासश्चभ
वादुद्धरमामतः ॥ इत्यामंत्र्यचयोदद्याद्विश्वचक्रंवि
मत्सरः ॥ १८ ॥

अर्थ- तसेंच हें त्रिगुणातीत विश्वचक्र, सर्वांनीं हृदयांत तत्वरूपानें अ-
सून वासुदेवाच्या आधारानें स्थित आहे. व माधव या चक्रामध्यें स्थित -

---

*मुक्ताफळ, पाच, वैडूर्य, माणीक, पुष्कराजमणि, गोमेद, नीळ, गारुत्मन, प्रवाळ.

आहे. असेहे उभयतां परस्परांच्या आधार रूपानें सृष्टींत स्थित आहेत-यास्तव मी यांस वारंवार नमस्कार करतों, कारण हें विश्वचक्र, सर्वपापांचें हरण करण्याविषयीं अति उत्कृष्ट आयुध रूप असून त्याचा सर्वत्र वास ही पापनाशकच आहे. यास्तव हे विश्वचक्रा तूं भवसागरांतून माझा उद्धार कर. अशी प्रार्थना करून जो निर्मत्सर अंतःकरणानें हें विश्वचक्र दान करील.

विमुक्तः सर्वपापेभ्यो विष्णुलोके महीयते ॥ वैकुंठ-
लोकमासाद्य चतुर्बाहुः सनातनः ॥ १९ ॥ सेव्यतेऽप्सर
सांसंघैस्तिष्ठेत्कल्पशतत्रयम् ॥ प्रणमेद्द्वादश कृत्वा-
विश्वचक्रं दिने दिने ॥ तस्यायुर्वर्धते नित्यं लक्ष्मीश्च विपु
ला भवेत् ॥ २० ॥

अर्थ- तो सर्वपापांतून सर्वथा मुक्त होऊन विष्णुलोकांत पूज्य होतो तो असा कीं, तो विश्वचक्र दान कर्ता, वैकुंठलोकीं प्राप्त होऊन अनादि विष्णूसमान चतुर्भुज होत्साता अप्सरांच्या समुदायानीं सेवित असून त्रिशत कल्पपर्यंत तेथें वास करतो. त्याचप्रमाणें जो मानव या विश्वचक्रास प्रतिदिवशीं दश नमस्कार करतो त्याचें आयुष्य वृद्धिंगत होऊन त्यास सर्वदा विपुल संपत्ति प्राप्त होते.

इति सकलजगत्सुराधिवासं वितरति यस्तपनीयषो
डशारम् ॥ हरिभवनमुपागतः ससिद्धैश्चिरमभिग-
म्यनमस्यते शिरोभिः ॥ २१ ॥

अर्थ- असें हें सकल जगत् व देव यांचें अधिष्ठान भूत षोडश अरायुक्त स्वर्णमय विश्वचक्र दान जो करतो. तो विष्णुलोकास प्राप्त होतो. आणि त्यास्थानीं बहुत सिद्ध त्यास सामोरे येऊन स्वकीय मस्तकानीं चिरकाल नमस्कार करतात.

शुभ दर्शनतां प्रयाति शत्रोर्मदन सुदर्शनतां च का
मिनीभ्यः ॥ ससुदर्शन केशवानुरूपः कनकसुदर्श
नदान दग्धपापः ॥ २२ ॥

अर्थ- तसाच तो आपल्या शत्रूंनींही प्रियबुध्धीनें अवलोकन कर-

ण्यास योग्य होऊन सुंदरि स्त्रियांस मदना समान उत्तम सप्रेम दर्शना-स्पद होतो. व तो मानव यास्वर्णमय विश्वचक्र दानानें दग्ध पाप झाल्यामुळें अत्युत्तम दर्शन संपन्न केशवाच्या अनुग्रहास योग्य-होतो.

कृतगुरुदुरितानिषोडशारप्रवितरणेप्रवराकृतिर्मुरारेः॥ अभिभवतिभवोद्भवंतिभीत्याभवमभितोभुवनेभयानिभूयः॥ २३॥

अर्थ- त्याचप्रमाणें षोडश अरायुक्त याविश्वचक्र दानार्थ केलेली मुरदैत्यनाशक विष्णूची सुंदर मूर्ति, संसारांत भोगार्थ उत्पन्न येणारीं अशीं केलेलीं महापातकें यांचा पराभव करिते. आणि संसार भीतीच्या उत्पत्ती-चानाश करिते व त्याजन्मांत वारंवार स्वकीय भुवना विषयीं प्राप्त होणाऱ्या भयांचें ही निवारण ती विष्णुमूर्ति करिते. इतिश्री मत्स्यपुराणे विश्वचक्रदानं नामपंचाशीत्युत्तर द्विशततमो ऽध्यायः॥ ॥ २८५॥

अध्याय २८६ वा.

मत्स्यउवाच ॥ अथातःसंप्रवक्ष्यामिमहादानमनुत्तमम् ॥ महाकल्पलतानाममहापातकनाशनम् ॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात. हे मनुराजा, यानंतर मी तुला अत्युत्तम महादान कथन करतों; तें असेंकीं; हें महा कल्पलता नामक महादान महापातक नाशक आहे.

पुण्यांतिथिमथासाद्यकृत्वाब्राह्मणवाचनम् ॥ऋत्विग्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम्॥२॥२॥ तुलापुरुषवत्कुर्याल्लोकेशावाहनंबुधः॥ चामीकरमयीःकुर्याद्दशकल्पलताःसमाः॥ ३

अर्थ- त्याचा विधि असाकीं, पुण्य कारक तिथि प्राप्त झाली असतां, यजमानानें ब्राम्हणां कडून पुण्याह वाचन करून ऋत्विज मंडपसाहित्य, भूषणें व आच्छादन वस्त्रादिक हें सिद्ध करून तुलापुरुष दान विधीसाररवें ज्ञात्यानें इंद्रादिक लोकपालांचें आवाहन करावें. आणि सुवर्णमय दहा

कल्पलता समान प्रमाणानें कराव्या.

नानापुष्पफलोपेतानानांशुकविभूषिताः ॥ वि
द्याधरसुपर्णानांमिथुनैरुपशोभिताः॥ ४ ॥ हा
रानादित्सुभिः सिद्धैः फलानिचविहंगमैः॥ लो-
कपालानुकारिण्यः कर्तव्यास्तासुदेवताः॥ ५॥

अर्थ- आणि सुवर्णाचीं अनेक पुष्पें, फलें व कापीस वस्त्रें, विद्याधर नामक देव गण, सुपर्ण (नराकारपक्षिरूपी किन्नरगण), यांचीं दांपत्यें, मौक्तिकादिकांच्या माला धारण करणारे सिद्ध व फलें ग्रहण करणारे पक्षिगण यानीं त्या वेली सुशोभित कराव्या. तशाच इंद्रादिक लोकपालां सारख्या कांहीं देवतांच्या प्रतिमा त्या वेलीचे मूल प्रदेशीं स्थापन कराव्या.

ब्राम्हीमनंतशक्तिंचलवणस्योपरिन्यस्येत् ॥ अ
धस्ताद्धृतयोर्मध्येपद्मशंखकरेशुभे ॥ ६॥

अर्थ- त्याच प्रमाणें त्या दहा कल्पलतां तील मध्यस्थित मुख्यलता-द्वयाचे मध्यभागीं विद्यमान लवणराशीच्या ऊर्ध्वभागीं ब्राम्ही देवी-स्थापन करून तिच्या हस्तांत कमल असावें व त्या लवणराशीचे अधो भागीं अनंतशक्तिशेषपत्नीदेवी स्थापन करून तिच्या हस्तांत शंख असावा. या देवी शुभकारक आहेत.

इभासनस्थातुगुडेपूर्वतःकुलिशायुधा ॥ रजनी-
संस्थिताग्नायीस्रुवपाणिरथानले ॥ ७॥

अर्थ- तशीच चतुर्दंत गजवाहनारूढ वज्रायुध युक्त इंद्राणी देवी त्याल तांचे पूर्वेस गुडावर स्थापन करावी आणि आग्नेय कोणच्या हरिद्राराशीवर अज (बोकड) स्थित अग्नायी देवी स्थापन करावी व तिच्या हस्तांत स्रुवा असावा.

याम्येचमहिषारूढागादिनीतंदुलोपरि॥ घृतेतु-
नैर्ऋतीस्थाप्यासखड्गादक्षिणापरे ॥ ८ ॥

अर्थ- आणि दक्षिण दिशेकडील तंदुलांवर महिषारूढ यमपत्नी देवी स्थापन करावी. तिच्या हस्तांत गदा असावी. व नैर्ऋत्य कोणावरील

घृतपात्रावर खड्गधारिणी देवीस्थापनकरावी.

वारुणेवारुणीक्षीरेझषस्थानागपाशिनी ॥ पताकिनीच

वायव्येमृगस्थाशर्करोपरि ॥ ९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें मत्स्यवाहनस्थित असून नागपाशधारिणी अशी देवीपश्चिमे कडील गायीच्या दुग्धपात्रावरस्थापन करावी. आणि मृग वाहन स्थित असून पताका धारण करणारी अशीदेवी, वायव्य कोणस्थ शर्करा पात्रावर स्थापन करावी.

सौम्यातिलेषुसंस्थाप्याशंखिनीनिधिसंस्थिता ॥

माहेश्वरीवृषारूढानवनीतेत्रिशूलिनी ॥ १० ॥

अर्थ- तशीच सौम्या नामक देवी उत्तरे कडील तिलांवर स्थापन करावी ति च्या हस्तांत शंख असावा. तीस्वलोकीं निधीवरस्थित आहे. व वृषवाहनारूढ असून त्रिशूल धारिणी अशी माहेश्वरी देवी, उत्तरे कडील नवनीत पात्रावर स्थापन करावी.

मौलिन्योवरदास्तद्वत्कर्तव्याबालकान्विताः ॥ शक्त्यापंचपलादूर्ध्वमासहस्रात्प्रकल्पयेत् ॥ ११ ॥

अर्थ- तशाच त्या सर्व देवता, वरद चिन्हाकृति वाम हस्तानें युक्त असून मस्तकीं मुकुट व अंकावर बालकयानीं सुशोभित अशा कराव्या. आणि या दानांतील लोकपालादिक प्रतिमा सहित दहा लता यजमानानें स्वशक्त्यनुसार पांचपल सुवर्णापासून सहस्रपल सुवर्णापर्यंत समान मानानें कराव्या.

सर्वासामुपरिस्थाप्यंपंचवर्णंवितानकम् ॥ धेनवो

दशकुंभाश्चवस्त्रायुग्मानिचैवहि ॥ १२ ॥

अर्थ- तसाच पंचरंगी चांदवा त्या लतांच्या उर्ध्वभागीं लावावा. आणि दशधेनु व दहा कुंभ स्थापन करावे. तशींच दंपतीसदान योग्य अशीं दोनदोन वस्त्रें त्याप्रत्येक कुंभासमीप स्थापन करावीं.

मध्यमेद्वेतुगुरवेऋत्विग्भ्योन्यास्तथैवच ॥ ततोमंग

लशब्देनस्नातःशुक्लांबरोबुधः ॥ १३ ॥

अर्थ- तशाच त्या दशलतांतील मध्यस्थ दोन लता मुख्य आचार्यास-

देण्याविषयीं संकल्पित करून अन्य आठलता ऋत्विजांस द्याव्या. पश्चात् ब्राम्हणानीं मंगल कारक सूक्तानें यजमानास अभिषेकस्नान घातल्यावर स्वात्तात्यानें शुभ्र वस्त्रें परिधान करून त्यालतांस तीन प्रदक्षिणा घालाव्या. आणि त्यानें हे पुढील मंत्र म्हणावे.

नमोनमः पापविनाशिनीभ्योब्रम्हांडलोकेश्वरपालिनीभ्यः॥ आशंसिताधिक्यफलप्रदाभ्योदिग्भ्यस्तथाकल्पलतावधूभ्यः॥ १४॥

अर्थ- त्यांचा भाव असाकीं, अहोदिशानों, व अहो कल्पलता स्त्रियाहो, मी तुम्हांस वारंवार नमस्कार करतों; कारण तुम्हीं समूल पापनाशक व ब्रम्हांडांतील लोकेश्वरांच्या ही पालक असून शास्त्रांत कथन केलेलें अधिक फल देणाऱ्या आहां.

इतिसकलदिगंगनाप्रदानंभवभयसूदनकारियःकरोति॥ अभिमतफलदेसनागलोकेवसतिपितामहवत्सराणित्रिंशत्॥ १५॥

अर्थ- असें भवभयनाशक हें सकलदिशा व कल्पलताधिष्ठित देवांगनायांचें दान जो मानव करतो तो इष्टफल दायक नागलोकांत ब्रम्हदेवसंबंधि तीस संवत्सर परिमित कालपर्यंत वास करतो.

पितृशतमथतारयेद्भवाब्धेर्भवदुरितौघविघातशुद्धदेहः॥ सुरपतिवनितासहस्रसंख्यैः परिवृतप्रंबुजसंसदाभिवंद्यः॥ १६॥

अर्थ- आणि तो कल्पलता दान कर्ता स्वतः संसार कारक दुरित समुदायनाशानें शुद्धदेह होत्साता स्वकीयशतपितरांस भवार्णवांतून तारील आणि पश्चात् आपण इंद्रलोकच्या सहस्र अप्सरांसहित सत्यलोकीं गमन करून तेथें ब्रम्हसभासदांच्यामस्तकानीं वंद्य होतो.

इतिविधानमिदंदिगंगनानांकनककल्पलताविनिवेदकम्॥ पठतियःस्मरतीहतथेक्षतेसपदमेतिपुरंदरसेवितम्॥ १७॥

अर्थ- असेंहें दिशा व देवांगना या संबंधि कल्पलता दानानें पठन, स्मरणकिं

वा अवलोकन जो करतो तो इंद्रसेवित पदास प्राप्त होतो. इतिश्री मत्स्यपुराणे महादानानुकीर्तनें कल्पलताप्रदानिको नाम षडशीत्युत्तर द्विशततमो ऽध्यायः ॥ २८६ ॥

अध्याय २८७वा.

मत्स्यउवाच ॥ अथातःसंप्रवक्ष्यामिमहादानमनुत्तमम् ॥ सप्तसागरकंनामसर्वपापप्रणाशनम् ॥ १ ॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, यानंतर मी तुला अत्युत्तम महादान यथासांग रीतीनें कथन करतों; कारण तें सर्वपापांचें समूल नाशक असून सप्तसागर नामें प्रसिद्ध आहे.

पुण्यंदिनमथासाद्यकृत्वाब्राह्मणवाचनम् ॥ तुलापुरुषवत्कुर्याल्लोकेशावाहनंबुधः ॥ २ ॥

अर्थ- तें असें कीं; पुण्यदिवस प्राप्त झाला असतां, ऋत्वीनें ब्राह्मणांकडून पुण्याहवाचन करवून त्या ज्ञानसंपन्न यजमानानें तुलापुरुष दानविधिवत् लोकपालांचें आवाहन करावें.

ऋत्विग्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम् ॥ कारयेत्सप्तकुंडानिकांचनानिविचक्षणः ॥ ३ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें ऋत्विज, मंडपसाहित्य, भूषणें व आच्छादनादिक पदार्थ हे सर्व सिद्ध करून त्या ज्ञात्यानें सुवर्णाचीं सप्त कुंडें करवावीं.

प्रादेशमात्राणितथारत्निमात्राणिवैपुनः ॥ कुर्यात्सप्तपलादूर्ध्वमासहस्राच्चशक्तितः ॥ ४ ॥

अर्थ- तीं प्रादेश (वीत) मात्र रुंद व उंच अथवा अरत्नि* परिमित उंच व रुंद अशीं असून तीं सप्तपल सुवर्णापासून सहस्रपल सुवर्णापर्यंत स्वशक्त्यनुसार प्रमाणानें करावीं.

संस्थाप्यानिचसर्वाणि कृष्णाजिनतिलोपरि ॥ प्रथमंपूरयेत्कुंडंलवणेनविचक्षणः ॥ ५ ॥

अर्थ- नंतर तीं कुंडें पसरलेल्या कृष्णाजिनावरील घातलेल्या तिळां-

---

*: कोंपरापासून कनिष्ठिकेच्या अग्रापर्यंत जें हस्ताचें प्रमाण ती.

वर स्थापन करावीं. आणि त्याच्यानें त्यांतील प्रथम कुंड, लवणानें पूर्ण भरावें.

द्वितीयं पयसा तद्वत्तृतीयं सर्पिषा पुनः ॥ चतुर्थं तु गुडेनैव दध्ना पंचममेव च ॥ ६ ॥

अर्थ- तसेंच द्वितीय कुंड दुग्धानें पूर्ण भरून तृतीय कुंड घृतानें पूर्ण करावें. आणि चतुर्थ कुंड गुडानें व पंचम कुंड दह्यानें पूर्ण करावें.

षष्ठं शर्करया तद्वत्सप्तमं तीर्थवारिणा ॥ स्थापयेल्लवणस्यं तु ब्रम्हाणं कांचनं शुभम् ॥ ७ ॥

अर्थ- तसेंच सहावें कुंड शर्करेनें पूर्ण करून सप्तम कुंड गंगादिक तीर्थोदकानें पूर्ण भरावें. पश्चात् प्रथम कुंडातील लवणराशीवर ब्रम्हदेवाची उत्तम सुवर्ण प्रतिमा स्थापन करावी.

केशवं क्षीरमध्ये तु घृतमध्ये महेश्वरम् ॥ भास्करं गुडमध्ये तु दधिमध्ये निशाधिपम् ॥ ८ ॥

अर्थ- तशीच केशव मूर्ति, द्वितीय कुंडांतील दुग्धामध्यें ठेवावी. आणि तृतीय कुंडांतल्या घृतांत महेश्वर प्रतिमा, चतुर्थ कुंडस्थित गुड राशीवर सूर्य प्रतिमा व पंचम कुंडस्थ दह्यामध्यें चंद्र प्रतिमा अशा स्थापन कराव्या.

शर्करायां न्यसेल्लक्ष्मीं जलमध्ये तु पार्वतीम् ॥ सर्वेषु सर्वरत्नानि धान्यानि च समंततः ॥ ९ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें षष्ठ कुंडांतील शर्करेवर लक्ष्मी मूर्ति व सप्तम कुंडस्थ जलामध्यें पार्वती प्रतिमा अशा स्थापन करून सर्व कुंडांत सर्वरत्नें घालून त्यांच्या आसमंताद्भागीं अष्टादश धान्यें ठेवावीं.

तुलापुरुषवच्छेषमत्रापि परिकल्पयेत् ॥ ततो वारुणहोमांते स्नापितो वेदपुंगवैः ॥ १० ॥

अर्थ- आणि या दानांत ही तुलापुरुष दानवत् इतर सर्व विधि करावा. नंतर वरुण प्रीत्यर्थ होमाचे अंतीं, ब्राम्हणांनीं यजमानास अभिषेक स्नान घालावें. ते ब्राम्हण वेदानें श्रेष्ठत्व संपन्न असे असावे.

त्रिः प्रदक्षिणमावृत्य मंत्रानेतानुदीरयेत् ॥ नमो वः

सर्वसिंधूनामाधारेभ्यः सनातनाः ॥ जंतूनांप्राणदे भ्यश्चसमुद्रेभ्योनमोनमः ॥ ११ ॥

अर्थ- नंतर कर्त्यानें त्या सप्तसागरांस तीन प्रदक्षिणा करून हे पुढील मंत्र म्हणावे त्यांचा भाव असाकीं; अहो सर्व समुद्र हो, तुम्हीं अनादि व आधारभूत असून प्राण्यांस प्राणदायक आहां यास्तव आम्हीं तुम्हांस वारंवार नमस्कार करतों.

क्षीरोदकाज्यदधिमाधुरलावणेक्षुसारामृतेनभुवनत्रयजीवसंघान् ॥ आनंदयंतिवसुभिश्चयतोमवंतस्तस्मान्ममाप्यघविघातमलंदिशंतु ॥ १२ ॥

अर्थ- तसेंच दुग्ध, उदक, घृत, दधि, गुड, लवण व शर्करा या अमृततुल्य पदार्थांनीं व रत्नादि द्रव्यानीं तुम्हीं भुवनत्रयांतील जीवसमुदायांस आनंद देतां यास्तव माझ्याही पातकाचा समूल नाश करावा.

यस्मात्समस्तभुवनेषुभवंतएवतीर्थामरासुरसुवद्धमणिप्रदानम् ॥ पापक्षयामृतविलेपनभूषणायलोकस्यबिभ्रतितदस्तुममापिलक्ष्मीः ॥ १३ ॥

अर्थ- आणि सप्तसागर हो, यस्मात् तुम्हींच सर्वभुवनांतील लोकांस पापक्षय, मोक्ष, अतिशयित वृद्धि व भूषण यांच्या प्रीत्यर्थ रत्नादिमणि प्रदान करीत आहां. यास्तव मलाही तुमच्या प्रसादानें लक्ष्मीप्राप्ती असो, कारण हें मणिदान, तीर्थें, अमर व असुर या सर्वांस ही उत्तम भूषणास्पद आहे.

इतिददातिरसामृतसंयुतान्शुचिरविस्मययुवानिहसागरान् ॥ अमलकांचनवर्णमयानसौपदमुपैतिहरेरमरार्चितः ॥ १४ ॥

अर्थ- तसेंच अमृततुल्य दुग्धादिरस पूर्ण असून निर्मल सोन्याप्रमाणे पीत वर्ण युक्त असे हे सप्तसागर जो शुचिमानव निरहंकार चित्तानें यालोकीं दान करतो तो देवानीं पूजित होऊन हरिपदास प्राप्त होतो.

सकलपापविधौतविराजितः पितृपितामहपुत्रकलत्रकम् ॥ नरकलोकसमाकुलमप्ययंझटिति-

सोपिनयेच्छिवमंदिरम् ॥ १५॥

अर्थ- आणि तो सागर दान कर्ता सकल पापांतून मुक्त झाल्यामुळें सु-शोभित देहयुक्त होऊन, नरकलोकांत व्याकुल झालेल्या पिता, पितामह, पुत्र व भार्या यांस त्वरित शिवमंदिरास नेतो. इतिश्री मत्स्यपुराणे सप्तसागर प्रदानिको नामसप्ताशी त्युत्तर द्विशत तमो ऽध्यायः॥२८७॥

अध्याय २८८वा.

मत्स्य उवाच ॥ अथातःसंप्रवक्ष्यामि महादान मनुत्तमम् ॥ रत्नधेन्विति विख्यातं गोलोकफ-लदंनृणाम् ॥ १॥

अर्थ- मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, इतउत्तर मीतु ला रत्नधेनु नामें प्रसिद्ध अत्युत्तम महादान यथासांग रीतीनें कथन करतों; कारण हें मानवांस गोलोक प्राप्ति कारक आहे.

पुण्यंदिनमथासाद्यतुलापुरुषदानवत् ॥ लोकेशा-वाहनंकृत्वाततोधेनुंप्रकल्पयेत् ॥ २॥

अर्थ- त्याचा विधि असाकीं, यजमानानें पुण्यकारक दिवशीं तुलापुरुष दानवत् यांतही लोकपालांचें आवाहन करून नंतर या रत्नधेनूची स्थापना करावी.

भूमौकृष्णाजिनंकृत्वालवणद्रोणसंयुतम् ॥ धेनुं रत्नमयींकुर्यात्संकल्प्यविधिपूर्वकम् ॥ ३॥

अर्थ- तिचा प्रकार असाकीं, भूमीवर कृष्णाजिन पसरून त्यावर एक द्रोण परिमित लवण घालावें. आणि संकल्प करून लवण खंडानें त्याकृष्णाजिनावरील लवण राशीवर पूर्वेस मुख व उत्तरेस चरण यांनीं युक्त अशी सवत्स गाईच्या आकृतीची रेषा काढावी.

स्थापयेत्पद्मरागाणामेकाशीतिंमुखेबुधः ॥ पु-ष्परागशतंतद्वत्घोणायांपरिकल्पयेत् ॥ ४॥

अर्थ- नंतर ज्ञात्यानें तिच्यामुखावर एक्यायशीं पद्मरागॅमणि स्था-

---

*: रत्न विशेष यांस माणिक असें म्हणतात.

पन करावें. तसेच शतपुष्पराग मणि तिच्या नासिका मध्यावर स्थापन करावे.

ललाटेहेमतिलकंमुक्ताफलशतंदृशोः॥ भ्रूयुगेविद्रुमशतंशुक्तीकर्णद्वयेस्मृतौ ॥५॥

अर्थ- तसाच सुवर्ण तिलक तिच्या ललाटावर व तिचे नेत्रांवर शंभर मुक्ताफलें स्थापन करावीं. आणि तिच्या भृकुटी द्वयावर शंभर पोंवळीं व कर्ण द्वयावर मौक्तिक शिंपलेही स्थापन करावीं.

कांचनानिचशृंगाणिशिरोवज्रशतात्मकम् ॥ ग्रीवायांनेत्रपट्टकंगोमेदकशतान्वितम् ॥६॥

अर्थ- तशीच तिला सुवर्णाचीं शृंगें व शिरस्थानीं शंभर हिरे स्थापन करावे. तसेंच तिच्या मानेवर शतगोमेद मणियुक्त रेशमी सूक्ष्म वस्त्र ठेवावें.

इंद्रनीलशतंपृष्ठेवैडूर्यशतपार्श्वके ॥ स्फाटिकेरुदरंतद्वत्सौगंधिकशतैः कटिम् ॥७॥

अर्थ- त्याच प्रमाणें तिच्या पृष्ठभागावर शत इंद्रनीलमणि, तसेच तिच्या वाम व दक्षिण या उभय पार्श्वभागांवर मिळून शंभर वैडूर्य मणि ठेवावे. आणि उदर स्थानीं स्फटिक व कटिस्थलीं शतपद्मराग मणि हे स्थापन करावे.

खुराहेममयाःकार्याःपुच्छंमुक्तावलीमयं ॥ सूर्यकांतेदुकांतौचघ्राणेकर्पूरचंदने ॥८॥

अर्थ- तसेच त्या धेनूला सुवर्णमय खुर, मुक्ताफलांचें पुच्छ असून तिच्या दक्षिण नासिका पुटस्थानीं सूर्यकांत व कर्पूर हे स्थापन करून वाम नासिका पुटस्थानीं चंद्रकांत व चंदन स्थापन करावें.

कुंकुमानिचरोमाणिरौप्यनाभिंकारयेत् ॥ गारुत्मतशतंतद्वदपानेपरिकल्पयेत् ॥९॥

अर्थ- आणि तिच्या रोमस्थानीं केशर, रौप्यमय नाभि असून शंभ

---

*: रत्न विशेष यांस पुष्कर राजमणि म्हणतात.

र पाच मणि अपान द्वार स्थानीं स्थापन करावे.

तथान्यानिचरत्नानिस्थापयेत्सर्वसंधिषु ॥ कु-
र्याच्छर्करयाजिह्वांगोमयंचगुडात्मकम् ॥ १० ॥

अर्थ- तशींच अन्यरत्नें तिच्या सर्वसंधिस्थलीं स्थापन करून जि
ह्वास्थानीं शर्करा व गोमय स्थानीं गुड असे हे ठेवावे.

गोमूत्रमाज्येनतथादधिदुग्धेस्वरूपतः ॥ पुच्छा
ग्रेचामरंदद्यात्समीपेताम्रदोहनम् ॥ ११ ॥

अर्थ- तसेंच गोमूत्र स्थानीं घृत असून दधि व दुग्ध हीं प्रत्यक्ष अ-
सावीं. आणि तिच्या पुच्छाग्रीं चंवरी ठेऊन समीप भागीं धारकाढ-
ण्याचें ताम्रपात्र ठेवावें.

कुंडलानिचहेमानिभूषणानिचशक्तितः ॥ का-
रयेदेवमेवंतुचतुर्थांशेनवत्सकम् ॥ १२ ॥

अर्थ- अशींच सुवर्णाचीं कुंडलें व भूषणें हीं यजमानानें स्वश-
क्त्यनुसार करावीं. आणि असाच या गायीच्या चतुर्थांश मानानें ए-
क वत्स करावा त्याचें मुख पूर्वेस असून उत्तरे कडे पाय असावे.

तथाधान्यानिसर्वाणिपादाश्चेक्षुमयाःस्मृताः ॥
नानाफलानिसर्वाणिपंचवर्णवितानकम् ॥ १३ ॥

अर्थ- तशींच सर्वधान्यें आसमंताद्भागीं स्थापन करून तिच्या
चरण स्थानीं इक्षु (ऊंस) ठेवावे. आणि अनेक फलें त्या धेनूसमी
प स्थापन करून ऊर्ध्वभागीं पंचरंगी चांदवा लावावा.

एवंविरचनंकृत्वातद्वद्धोमाधिवासनम् ॥ ऋत्विग्भ्यो
दक्षिणांदद्याद्धेनुमामंत्रयेत्ततः ॥ गुडधेनुवदावाह्य
इदंचोदाहरेत्ततः ॥ १४ ॥

अर्थ- अशी या रत्नधेनूची रचना करून देवतांचें अधिवासन तसाच-
होम झाल्यावर ऋत्विजांस दक्षिणा देऊन पूर्वोक्त गुडधेनुवत् या धेनूचें आ
वाहन करून पश्चात् या धेनूची प्रार्थना करावी, त्या विषयीं हा पुढिलमं
त्र म्हणावा.

त्वांसर्वदेवगणधामयतः पठंतिरुद्रेंद्रसूर्यकमलास

नवासुदेवाः ॥ तस्मात्समस्तभुवनत्रयदेहयुक्तामां पाहिदेविभवसागरपीड्यमानम् ॥ १५ ॥

अर्थ - त्याच प्रमाणें हे धेनू, तूं सर्वदेवगणांची स्थानभूत आहेस असें- रुद्र, इंद्र, सूर्य, ब्रम्हदेव व वासुदेव हे यस्मात् म्हणतात तस्मात् तूं समग्रभुवनत्रयाच्या निवासस्थानभूत देहानें युक्त आहेस. आणि मीतर भवसागरांत पीडित झालों आहें. यास्तव हे धेनुदेवि माझें रक्षण कर.

आमंत्र्यचेत्थमभितः परिवृत्यभक्त्यादद्याद्द्विजाय-गुरवेजलपूर्विकांताम् ॥ यः पुण्यमाप्यदिनमत्र कृ-तोपवासः पापैर्विमुक्ततनुरेतिपदंमुरारेः ॥ १६ ॥

अर्थ - अशाप्रया मंत्रानीं प्रार्थना करून त्याधेनूला तीन प्रदक्षिणा घालाव्या. आणि तीधेनु भक्तीनें उदक पूर्वक मुख्य आचार्य ब्राम्हणास द्यावी. व त्या प्राप्तझालेल्या पुण्यदिवशीं यजमानानें उपवास करावा. असें केलें असतां, तो सर्वपापांतून सर्वथा मुक्त देह होऊन सुरदैत्य नाशक विष्णूच्या पदास प्राप्त होतो.

इतिसकलविधिज्ञोरत्नधेनुप्रदानंवितरतिसविमानंप्राप्यदेदीप्यमानम् ॥ सकलकलुषमुक्तोबंधुभिः पुत्रपौत्रैःसहमदनसरूपःस्थानमभ्येतिशांभोः ॥ १७ ॥

अर्थ - अशा रीतीनें जो सकल विधि ज्ञाता पुरुष रत्नधेनु दान करतो. तो सकल पातकांतून मुक्त होऊन मदनासमान रूपवान् होत्साता देदीप्यमान विमान पावून बंधु व पुत्र, पौत्र यां सहवर्तमान शंभु पदास-प्राप्त होतो. इतिश्री मत्स्यपुराणे रत्नधेनुप्रदानिको नामाष्टाशीत्युत्तर द्विशततमो ऽध्यायः ॥ २८८ ॥

अध्याय २८९वा.

मत्स्यउवाच ॥ अथातः संप्रवक्ष्यामिमहादानमनुत्तमम् ॥ महाभूतघटंनाममहापातकनाशनम् ॥ १ ॥

अर्थ - मत्स्यरूपी भगवान् म्हणतात हे मनुराजा, यानंतर मी तुला-महाभूत घट नामक महापातक नाशक महादान उत्तम रीतीनें कथन

करतो.

पुण्यांतिथिमथासाद्यकृत्वाब्राम्हणवाचनम् ॥ ऋ
त्विग्मंडपसंभारभूषणाच्छादनादिकम् ॥ २ ॥

अर्थ- त्याचा विधि असाकीं, पुण्यकारक तिथि प्राप्त झाली असतां; ब्राम्हणांकडून पुण्याहवाचन करवून ऋत्विजमंडप साहित्य, भूषणें व आच्छादनादिक हे पदार्थ सिद्ध करावे.

तुलापुरुषवत्कुर्यात्लोकेशावाहनादिकम् ॥ का
रयेत्कांचनंकुंभंमहारत्नाचितंबुधः ॥ ३ ॥

अर्थ- नंतर ज्ञात्यानें तुलापुरुषदान विधिवत् यांत लोकपालांचें आवाहन इत्यादि कर्म करावें. आणि नव महारत्नखचित एक सुवर्ण कुंभ करावा.

प्रादेशादंगुलशतंयावत्कुर्यात्प्रमाणतः ॥ क्षीरा
ज्यपूरितंतद्वत्कल्पवृक्षसमन्वितम् ॥ ४ ॥

अर्थ तो असाकीं, कर्त्यानें स्वशक्त्यनुरूप एक प्रादेश (वीत) मात्र प्रमाणापासून शंभर अंगुल परिमित प्रमाण युक्त करावा. तसाच तो कुंभ, गोदुग्ध व गोघृत यानीं पूर्ण भरून त्यांत मध्यभागीं पूर्वोक्त कल्पवृक्ष स्थापन करावा.

पद्मासनगतांस्तत्रब्रम्हविष्णुमहेश्वरान् ॥ लोकपा
लान्सहेंद्रांश्चस्वस्ववाहनमास्थितान् ॥ वराहेणो
द्धृतांतद्वत्कुर्यात्पृथ्वींसपंकजाम् ॥ ५ ॥

अर्थ- तसेच पद्मासनस्थित ब्रम्ह, विष्णु, महेश्वर, स्वकीय वाहनस्थित इंद्र सहित सर्व लोकपाल व वराह देवानें प्रळयोदकांतून वर आणलेली कमल सहित पृथ्वी यांच्या प्रतिमा त्याघटांत स्थापन कराव्या.

वरुणंचासनगतंकांचनंमकरोपरि ॥ हुताशनंमेष-
गतंवायुंकृष्णमृगासनम् ॥ ६ ॥

अर्थ- त्यांतील वरुणमूर्ति सुवर्णाची असून आसनावर मकरवाहनारूढ करावी. आणि मेष (मेंढा) वाहनस्थित अग्निप्रतिमा व कृष्णमृगारूढ वायुमूर्ति करावी.

तथाकोशाधिपंकुर्यात्मूषकस्थंविनायकम् ॥ वि
न्यस्यघटमध्येतान्वेदंपंचकसंयुतान् ॥ ७ ॥

अर्थ - तसाच धनाधिपति कुबेर व मूषक वाहनस्थ विनायक हे करू
न त्यांस पांच वेदांसह त्या कलशामध्यें स्थापन करावे.

ऋग्वेदस्याक्षसूत्रंस्याद्यजुर्वेदस्य पंकजम् ॥ साम
वेदस्यवीणास्याद्वेणुंदक्षिणतोन्यसेत् ॥ ८ ॥

अर्थ - ते मूर्तिमंत पांच वेद असे कीं, ऋग्वेदाच्या हस्तांत अक्षमाला व
यजुर्वेदाच्या हस्तांत कमल असून सामवेदाच्या वामहस्तांत वीणा व
दक्षिण हस्तीं वेणु अशीं असावीं.

अथर्ववेदस्यपुनःस्रुक्स्रुचौकमलंकरे ॥ पुराण
वेदोवरदःसाक्षसूत्रकमंडलुः ॥ ९ ॥

अर्थ - तशींच स्रुक् स्रुवाही यज्ञपात्रें अथर्ववेदाच्या दक्षिण हस्तांत
व वामकरांत कमल अशीं असून पुराणरूप वेद, वरदाकृति एकहस्त
व अक्षमाला कमंडलूनीं युक्त द्वितीय कर यानीं सुशोभित असे करावे.

परितःसर्वधान्यानिचामरासनदर्पणम् ॥ पादुको
पानहच्छत्रंदीपिकाभूषणानिच ॥ १० ॥ शय्यांचज
लकुंभांश्चपंचवर्णवितानकम् ॥ स्नात्वाधिवासनां
तेतुमंत्रमेतमुदीरयेत् ॥ ११ ॥

अर्थ - आणि सर्व धान्यें, चामर, आसन, दर्पण, पादुका, उपानह, छत्र-
दीपिका (मशाल) व भूषणें, शय्या व जलपूर्ण अन्य षोडश कुंभ हे सर्व
पदार्थ त्यासुवर्ण कलशाचे आसमंताद्भागीं वेदीवर स्थापन क-
रून उर्ध्वभागीं पंचरंगी रेशमी वस्त्राचा चांदवा बांधावा. नंतर अधिवास
न पूर्वक होमांत कर्म झाल्यावर ब्राम्हणानीं यजमानास मंगलस्नान घा
तल्या वर त्यानें हे पुढील मंत्र म्हणावे.

नमोवःसर्वदेवानामाधारेभ्यश्चराचरे ॥ महाभूता-
धिदेवेभ्यःशांतिरस्तुशिवंमम ॥ १२ ॥

अर्थ - त्यांतील भाव असा कीं, एतत्कुंभस्थापित सर्वदेव हो तुम्हीं पंचमहा
भूतांचे अध्यक्ष देव असल्यामुळें याचराचर सकल विश्वास आधारभू

न आहां यास्तव मी तुम्हांस वारंवार नमस्कार करतों. तेणें करून मला शांति व कल्याण हीं प्राप्त होवोत.

यस्मान्नकिंचिदप्यस्तिमहाभूतैर्विनाकृतम् ॥ ब्रम्हांडेसर्वभूतेषुतस्माच्छ्रीरक्षयास्तुमे ॥ १३॥

अर्थ- आणि यस्मात् ब्रम्हांडांतील सर्व प्राणि मात्रांत पंचमहा भूतांवां चून अन्य पदार्थांनीं निर्माण केलेली अशीं कांहीं एकवस्तु नाहीं, तस्मात् या महाभूत घट दानानें मला अक्षय्य लक्ष्मी प्राप्त असो.

इत्युच्चार्यमहाभूतघटंयोविनिवेदयेत् ॥ सर्वपापविनिर्मुक्तः सयातिपरमांगतिम् ॥ १४॥

अर्थ- असे हे मंत्र उच्चारून जो मानव या महाभूत घटाचें दान करीलतो सर्व पापांतून सर्वथा मुक्त होऊन उत्तम गतीला प्राप्त होतो.

विमानेनार्कवर्णेनपितृबंधुसमन्वितः ॥ स्तूयमानोवरस्त्रीभिःपदमभ्येतिवैष्णवम् ॥ १५॥

अर्थ- तो असाकीं, तो दान कर्ता स्वकीय पितर व बंधुयांसह सूर्यसदृश तेजःपुंजविमानानें देवांगनादिक श्रेष्ठ स्त्रियांनीं स्तुत होऊन विष्णुपदास गमन करतो.

षोडशैतानियःकुर्यात्महादानानिमानवः ॥ नतस्यपुनरावृत्तिरिहलोकेभिजायते ॥ १६॥

अर्थ- त्याच प्रमाणें जो मानव हीं षोडश महादानें करील तो या जन्ममरण प्रवाह लोकांत पुनरावृत्ति पावत नाहीं.

इहपठतियइत्थंवासुदेवस्यपार्श्वेसकृतपितृकलत्रःसंशृणोतीहसम्यक् ॥ सुररिपुभवनेवैमंदिरेवार्कलक्ष्म्यात्वमरपुरवधूभिर्मोदतेसोपिनित्यं ॥ १७॥

अर्थ- आणि असें हें दानाख्यान या भूलोकीं जो मानव वासुदेव मूर्तीच्या वाम किंवा दक्षिण या पार्श्वभागीं पठन करतो अथवा जो मनुष्य स्वकीय पुत्र, पितर व भार्या यांसह उत्तम रीतीनें या लोकीं श्रवण करतो. तो मुरमथनविष्णूच्या लोकांतील सूर्य तुल्य कांति युक्त मंदिरांत अमर पुरस्थ स्त्रियां सह वर्तमान निरंतर आनंद पावतो. इतिश्री मत्स्यपुराणे महादानानुकी

तेनं नांमें को मनव स्कन्तर हि्शत नमो ऽ ध्यायः ॥ २८९ ॥

अध्याय २९० वा.

मनुरुवाच ॥ कल्पमानंत्वयाप्रोक्तंमन्वंतरयुगेषुच ॥ इदानींकल्पनामानिसमासात्कथयाच्युत ॥ १ ॥

अर्थ- नंतर मनुराजा प्रश्न करतो कीं, हे अच्युता, आपण मन्वंतर संबंधि युगकथनप्रसंगीं कल्पाचें प्रमाण पूर्वी सांगितलें. याकाली संक्षपानें कल्पांचीं नामें मला कथन करा.

मत्स्यउवाच ॥ कल्पानांकीर्तनंवक्ष्येमहापातकनाशनम् ॥ यस्यानुकीर्तनादेववेदपुण्येनयुज्यते ॥ ॥ २ ॥

अर्थ- ते समयीं मत्स्यरूपी भगवान् भाषण करतात हेराजा, आतांमी कल्पांचें वर्णन करतों. कारण हें महापातक नाशक असून यांच्या वर्णनानेंच वेदपारायणाच्या पुण्यानें युक्त होतो.

प्रथमंश्वेतकल्पस्तुद्वितीयोनीललोहितः ॥ वामदेवस्तृतीयस्तुततोराथंतरोपरः ॥ ३ ॥

अर्थ- तें असें कीं, प्रथम श्वेत कल्प, द्वितीय नील लोहित, वामदेव कल्प तृतीय व रथंतर हा चतुर्थ कल्प आहे.

रौरवःपंचमःप्रोक्तःषष्ठोदेवइतिस्मृतः ॥ सप्तमोथबृहत्कल्पः कंदर्पोष्टमउच्यते ॥ ४ ॥

अर्थ- आणि रौरव नामा पंचम कल्प असून देवनामक कल्प सहावा जाणावा. नंतर सप्तम बृहत्कल्प व कंदर्प हा अष्टम कल्प आहे.

सद्योथनवमःप्रोक्तोईशानोदशमःस्मृतः ॥ तमएकादशप्रोक्तः तथासारस्वतःपरः ॥ ५ ॥

अर्थ- पश्चात् सद्यनामें नवम कल्प असून ईशान कल्प दहावा आहे. तसाच तमकल्प हा अकरावा असून सारस्वत कल्प बारावा जाणावा.

त्रयोदशउदानस्तुगारुडोथचतुर्दशः ॥ कौर्मःपंचदशःप्रोक्तः पौर्णमास्याप्रजायत ॥ ६ ॥

अर्थ- पुढें उदान कल्प तेरावा असून गारुड कल्प चवदावा आहे. व-

पंधरावा कौर्मनामा कल्प हा पूर्णिमेपासून प्रवृत्त झाला.

षोडशोनारसिंहस्तु समानस्तु ततोपरः ॥ आग्नेयो ष्टादशः प्रोक्तः सोम कल्पस्तथापरः ॥ ७ ॥

अर्थ - तसाच सोळावा नारसिंह कल्प, समान नामा कल्प हा सत्रावा अ सून आग्नेयकल्प अठरावा व सोमकल्प एकूणीसावा आहे.

मानवोविंशतिः प्रोक्त स्तत्पुमानितिचापरः ॥ वैकुंठश्चापरस्तद्वल्लक्ष्मीकल्पस्तथापरः ॥ ८ ॥

अर्थ - त्याचप्रमाणें विसावा मानव कल्प, एकविसावा तत्पुरुष कल्प, बेवीसावा वैकुंठ कल्प व लक्ष्मी कल्प हा तेवीसावा आहे.

चतुर्विंशतिमः प्रोक्तः सावित्रीकल्पसंज्ञकः ॥ पंचविंशस्ततोघोरोवाराहस्तु ततो परः ॥ ९ ॥

अर्थ - आणि चोवीसावा सावित्री संज्ञक कल्प, पंचविसावा घोर कल्प व सव्विसावा वाराह कल्प आहे.

सप्तविंशोथ वैराजोगौरी कल्पस्तथापरः ॥ माहेश्वरस्तु सप्रोक्तस्त्रिपुरोयत्रघातितः ॥ १० ॥

अर्थ - नंतर सत्ताविसावा वैराज कल्प, अठ्ठाविसावा गौरी कल्प व त्रिपुरासुर वध ज्यांत झाला तो माहेश्वर कल्प हा एकूण तिसावा जाणावा.

पितृकल्पस्तथांतेतु याकुहूर्ब्रम्हणः परा ॥ इत्येवं ब्रम्हणोमासः सर्वपातकनाशनः ॥ ११ ॥

अर्थ - तशीच जी ब्रम्हदेवाची अमावास्या ज्याकाळीं येत्ये त्याकाळीं तो सर्व कल्पांच्या अंतींचा पितृकल्प जाणावा. असा हा ब्रम्हदेवाचा मास वर्णिला; कारण हा सर्व पातकांचा नाशक आहे.

आदावेव हि माहात्म्यं यस्मिन्यस्य विधीयते ॥ तस्य कल्पस्य तन्नाम विहितं ब्रम्हणा पुरा ॥ १२ ॥

अर्थ - यापूर्वोक्त कल्पांतील ज्या कल्पाचें आरंभींच ज्याचें माहात्म्य उक्त असतें त्या कल्पास तें नाम ब्रम्हदेवानीं पूर्वी क्लृप्त केलें आहे.

संकीर्णास्तामसाश्चैव राजसाः सात्विकास्तथा ॥ रजस्तमोमयास्तद्वदेते त्रिंशदुदाहृताः ॥ १३ ॥

अर्थ- तसेच हे जे तीस कल्प कथन केले; त्यांत सात्विक, राजस, तामस आणि रज व तम यानीं मिश्रित जे कल्प ते संकीर्ण नामें प्रसिद्ध आहेत.

संकीर्णेषु सरस्वत्याः पितृणां च ऋषिरुच्यते ॥ अग्नेः
शिवस्य माहात्म्यं तामसेषु दिवाकरे ॥ १४ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें संकीर्ण कल्पांत सरस्वती व पितर यांचें माहात्म्य असून तामस कल्पांत अग्नि, शिव व सूर्य यांचें माहात्म्य असतें.

राजसेषु च माहात्म्यमधिकं ब्रम्हणः स्मृतम् ॥ यस्मिन्
कल्पे तु यत्प्रोक्तं पुराणं ब्रम्हणा पुरा ॥ १५ ॥ तस्य तस्य
तु माहात्म्यं तत्स्वरूपेण वर्ण्यते ॥ सात्विकेष्वधिकं
तद्वद्विष्णोर्माहात्म्यमुत्तमम् ॥ १६ ॥

अर्थ- तसेंच राजस कल्पांत ब्रम्हदेवाचें माहात्म्य अधिक असतें. आणि पूर्वी ब्रम्हदेवाच्या ज्या कल्पांत जें पुराण सांगितलें. त्यांत त्या देवतेचें स्वरूप माहात्म्य वर्णित आहे. त्यांतील सात्विक पुराणांत विष्णूचें अधिकोत्तम माहात्म्य वर्णिलें आहे.

तथैव योगसंसिद्धा गमिष्यंति परां गतिम् ॥ ब्राम्हं
पाद्ममिमं यस्तु पठेत्पर्वणि पर्वणि ॥ १७ ॥ तस्य ध
र्मे मतिर्ब्रम्हा करोति विपुलां श्रियम् ॥ यस्तु दद्यादि
मान्कृत्वा हैमानु पर्वणि पर्वणि ॥ १८ ॥ ब्रम्हवि-
ष्णुपुरे वासं मुनिभिः पूज्यते दिवि ॥ सर्वपापक्षय-
करं कल्पदानं यतो भवेत् ॥ १९ ॥ मुनिरूपांस्ततः
कृत्वा दद्यात्कल्पान्विचक्षणः ॥

अर्थ- तसेच त्याच्या कल्पांतील योगसिद्ध पुरुष, मोक्षगतीस प्राप्त होतात. आणि पद्मकल्प द्वारा झालेल्या या कल्पवर्णनाचा हा अध्याय जो मानव प्रतिपर्व कालीं पठन करील त्याची मति धर्माविषयीं होते. व ब्रम्हदेव त्यास विपुल संपत्ति देतात. त्याच प्रमाणें जो मनुष्य, या कल्पांच्या स्वर्ण प्रतिमा करून त्यांचे प्रतिपर्वकालीं दान करील तो ब्रम्हदेव व विष्णु यांच्या पुरांत वास करतो व तो स्वर्गांत ऋषींनीं पूजित होतो. यास्तव ज्ञात्यानें या कल्पांच्या ऋषींसारख्या मूर्ति करून दान कराव्या.

पुराणसंहिताचेयंतवभूपमयोदिता ॥ २० ॥ सर्वपा
पहरानित्यमारोग्यश्रीफलप्रदा ॥ ब्रम्हसंवत्सरश
तादेकाहंशैवमुच्यते ॥ २१ ॥

अर्थ - हे राजन् तशीच ही पुराण संहिता मीं तुला कथन केली; कारणही श्रवण कीर्तन करणारांच्या सर्व पापांचें हरण करणारी असून त्यांस निरंतर आरोग्य फल दायक आहे. त्याच प्रमाणें ब्रम्हदेवाचे शतसंवत्सर झाले असतां तो काल शिवाचा एक दिवस होतो.

शिववर्षशतादेकंनिमेषंवैष्णवंविदुः ॥ यदासवि-
ष्णुर्जागर्तिलदेदंचेष्टतेजगत् ॥ २२ ॥

अर्थ - तशींच शिवाचीं शंभर वर्षें झालीं असतां तो काल विष्णूचा एक निमेष मात्र होतो. असें ज्ञाते जाणतात. तो विष्णु ज्याकालीं जागृत असतो त्याकालांत हें सर्व जगत्स्वकीय व्यापार करीत असतें.

यदास्वपितिशांतात्मातदासर्वंनिमीलति ॥ इत्युक्त्वा
देवदेवेशोमत्स्यरूपीजनार्दनः ॥ २३ ॥ पश्यतांस-
र्वभूतानांतत्रैवांतरधीयत ॥

अर्थ - आणि तो शांतरूपी विष्णु ज्याकालीं शयन करतो, त्याकालीं हें संपूर्ण चराचर विश्वलयास जातें. असें भाषण करून देवाधि देव मत्स्य रूपी जनार्दन तेथील सर्व प्राण्यांच्या समक्ष त्यास्थलींच गुप्त झाले.

वैवस्वतोहिभगवान्विसृज्यविविधाःप्रजाः ॥ २४ ॥
स्वांतरंपालयामासमार्तंडकुलवर्धनः ॥ यस्यमन्वं
तरंचैतदधुनाचानुवर्तते ॥ २५ ॥

अर्थ - नंतर सूर्य कुल वर्धक यौगैश्वर्य वान् वैवस्वतमनु अनेक प्रकारच्या प्रजाउत्पन्न करून स्वकीय मन्वंतराचें पालन करूं लागला. त्याचें मन्वंतर सांप्रत कालीं चाललें आहे.

पुण्यंपवित्रमेतद्वःकथितंमत्स्यभाषितम् ॥ पुरा
णंसर्वशास्त्राणांयदेतन्मूर्ध्निसंस्थितम् ॥ २६ ॥

अर्थ - तसेंच पवित्र व पुण्य कारक असून मत्स्यावतार रूपी भगवंतानीं कथन केलेलें असें हें पुराण सर्व शास्त्रां पेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें-

तुम्हांस सांगितलें. इतिश्री मत्स्यपुराणे कल्यानु कीर्तनं नाम नवत्यूत्तर-द्विशततमो ऽध्यायः ॥ २९० ॥

अध्याय २९१वा.

सूतउवाच ॥ एतद्वः कथितंसर्वंयदुक्तं विश्वरूपिणा ॥ मात्स्यंपुराणमखिलंधर्मकामार्थसाधनम् ॥ १ ॥

अर्थ- सूत म्हणतात ऋषीहो, विश्वरूपी मत्स्यभगवानानें जें संपूर्ण मत्स्य पुराण मनूला सांगितलें. तें सर्व मीं तुम्हांस कथन केलें हें धर्म, काम व अर्थ यापुरुषार्थांचें साधक आहे.

यत्रादौमनुसंवादोब्रम्हांडकथनंतथा ॥ सांख्यंशारीरकंप्रोक्तंचतुर्मुखमुखोद्भवम् ॥ २ ॥

अर्थ- यांत आरंभीं मनु व मत्स्यरूपी नारायण यांचा संवाद असून त्यानीं मनूस ब्रम्हांड कथन केलें. तसेंच ब्रम्हदेवांच्या मुखांतून निघालेलें शरीर संबंधानें प्रवृत्त झालेलें सांख्य शास्त्र कथन केलें.

देवासुराणामुत्पत्तिर्मारुतोत्पत्तिरेवच ॥ मदनद्वादशीतद्वल्लोकपालाभिपूजनम् ॥ ३ ॥

अर्थ- तशीच पुढें देव, असुर व वायु यांची उत्पत्ति सांगून मदन द्वादशीव्रत व लोकपालांचें पूजनही कथन केलें.

मन्वंतराणामुद्देशोवैन्यराजाभिवर्णनम् ॥ सूर्यवैवस्वतोत्पत्तिर्बुधस्यागमनंतथा ॥ ४ ॥

अर्थ- तसेंच मन्वंतरांचें कथन, पृथुराजाचें वर्णन, सूर्य, वैवस्वत मनु यांची उत्पत्ति व बुधाचें पृथ्वीवर आगमन सांगीतलें आहे.

पितृवंशानुकथनंश्राद्धकालस्तथैवच ॥ पितृतीर्थप्रवासश्चसोमोत्पत्तिस्तथैवच ॥ ५ ॥

अर्थ- नंतर पितृवंश व श्राद्धकाल यांचें कथन करून पितृतीर्थ यात्रा व चंद्राची उत्पत्ति हे प्रकार वर्णिले आहेत.

कीर्तनंसोमवंशस्ययातिचरितंतथा ॥ कार्तवीर्यस्य माहात्म्यंवृष्णिवंशानुकीर्तनम् ॥ ६ ॥

अर्थ- तसाच पुढें सोमवंश व ययातिचरित्र यांचे वर्णनोत्तर कार्तवीर्या चें माहात्म्य व यादव वंशाचें वर्णन केलें आहे.

भृगुशापस्तथा विष्णोर्दैत्यशापस्तथैवच ॥ कीर्तनंपु
रुषेशस्य वंशोहौताशनस्तथा ॥ ७ ॥

अर्थ- तसाच विष्णूला झालेला भृगूंचा शाप व त्या शुक्राचार्यांनीं दैत्यास दि- लेला शाप, पुरुषेशांचें वर्णन व अग्नि वंश हे क्रमानें वर्णिले आहेत.

पुराणकीर्तनंतद्वत्क्रियायोगस्तथैवच ॥ व्रतंनक्ष-
त्रसंख्याकं मार्तंडशयनंतथा ॥ ८ ॥

अर्थ- तसेंच पुढें पुराण वर्णन, कर्मयोग, नक्षत्र संख्याव्रत व मार्तंड श यन व्रतहीं अनुक्रमानें कथित आहेत.

कृष्णाष्टमीव्रतं तद्वद्रोहिणीचंद्रसंज्ञितम् ॥ तडाग
विधिमाहात्म्यंपादपोत्सर्ग एवच ॥ ९ ॥

अर्थ- तदुत्तर कृष्णाष्टमीव्रत, रोहिणीचंद्रशयन व्रत, तडाग (सरोवर) विधिमाहात्म्य व वृक्षांचा उत्सर्गविधि प्रकार हे वर्णित आहेत.

सौभाग्यशयनंतद्वदगस्त्यव्रतमेवच ॥ तथानंततृ
तीयातुरसकल्याणिनीतथा ॥ १० ॥

अर्थ- तसेंच पश्चात् सौभाग्य शयनव्रत, अगस्त्य व्रत तशीच अनंत तृती या व रसकल्याणिनी हीं व्रतें क्रमें करून कथिलीं आहेत.

आर्द्रानंदकरी तद्वद्व्रतंसारस्वतंपुनः ॥ उपरागाभिषे
कश्चसप्तमीस्नपनंपुनः ॥ ११ ॥

अर्थ- त्याच प्रमाणें आर्द्रानंदकरीतृतीया, सरस्वतीव्रत, ग्रहणांतील अ भिषेक व सप्तमीस्नपन हीं अनुक्रमानें वर्णित आहेत.

भीमाख्याद्वादशीतद्वदनंगशयनंतथा ॥ अशून्य
शयनंतद्वत्तथैवांकारकव्रतम् ॥ १२ ॥

अर्थ- तसेंच पुढें भीमद्वादशीव्रत, अनंगशयन व्रत, अशून्य शयनव्रत व अंगारक (मंगल) व्रत हीं व्रतें क्रमशः वर्णिलीं आहेत.

सप्तमीसप्तकंतद्वद्विशोकद्वादशीतथा ॥ मेरुप्रदानं
दशधा ग्रहशांतिस्तथैवच ॥ १३ ॥

अर्थ- त्यापुढें सप्तसप्तमीव्रतें, विशोक द्वादशीव्रत तसेंच दहा प्रकारचें मेरुपर्वत दान व ग्रहशांति हे प्रकार अनुक्रमानें सांगितले आहेत.

ग्रहस्वरूपकथनंतथाशिवचतुर्दशी ॥ तथासर्वफलत्यागःसूर्यवारव्रतंतथा ॥ १४ ॥

अर्थ- नंतर ग्रहस्वरूप कथन, शिवचतुर्दशीव्रत, तसेंच सर्वफलत्यागव्रत व सूर्यवार व्रत हीं क्रमानें कथन केलीं आहेत.

संक्रांतिस्नपनंतद्वद्विभूतिद्वादशीव्रतम् ॥ षष्टिव्रतानांमहात्म्यंतथास्नानविधिक्रमः ॥ १५ ॥

अर्थ- त्याचप्रमाणें संक्रांति स्नपन, विभूति द्वादशीव्रत, षष्टिव्रतांचें माहात्म्य व स्नानविधि हे प्रकार वर्णिले आहेत.

प्रयागस्यतुमाहात्म्यंसर्वतीर्थानुकीर्तनम् ॥ पैलाश्रमफलंतद्द्वीपलोकानुकीर्तनम् ॥ १६ ॥

अर्थ- पुढें प्रयागाचें माहात्म्य सर्वतीर्थांचें वर्णन, पैलाश्रमांतील फल, द्वीप, लोक यांचें वर्णन हीं प्रकरणें सांगीतलीं आहेत.

तथांतरिक्षचारश्चध्रुवमाहात्म्यमेवच ॥ भुवनानिसुरेंद्राणांत्रिपुराघोषणंतथा ॥ १७ ॥

अर्थ- तसेच अंतरिक्ष संचारिलोक, ध्रुव यांचें माहात्म्य, देवश्रेष्ठांचीं भुवनें व त्रिपुरांचें वर्णन हे प्रकार क्रमशः सांगितले आहेत.

पितृपिंडदमाहात्म्यंमन्वंतरविनिर्णयम् ॥ वज्रांगस्यतुसंभूतिःतारकोत्पत्तिरेवच ॥ १८ ॥

अर्थ- पश्चात् पितरांस पिंडदेणारांचें माहात्म्य, मन्वंतरांचा निर्णय, वज्रांग दैत्य व तारकासुर यांची उत्पत्ति हे प्रकार अनुक्रमानें वर्णिते आहेत.

तारकासुरमाहात्म्यंब्रम्हदेवानुकीर्तनम् ॥ पार्वतीसंभवस्तद्वत्तथाशिवतपोधनम् ॥ १९ ॥

अर्थ- तदनंतर तारकासुराचें माहात्म्य, ब्रम्हदेवाचें वर्णन पार्वतीचें जन्म व शिवाच्या तपरूपधनाचें वर्णन हीं आख्यानें क्रमानें कथन केलीं आहेत.

अनंगदेहदाहस्तु रतिशोकस्तथैव च ॥ गौरीतपो-
वनंतद्वद्विश्वनाथप्रसादनम् ॥ २० ॥

अर्थ- त्यापुढें मदनाचा देहदाह, तणें करून रतीला झालेला शोक; पार्वतीच्या तपोवनाचें वर्णन व विश्वनाथ शिवाचा पार्वती वर झालेला प्रसाद हे प्रकार क्रमें करून वर्णिले आहेत.

पार्वतीऋषिसंवादस्तथैवोद्वाहमंगलम् ॥ कुमार
संभवस्तद्वत्कुमारविजयस्तथा ॥ २१ ॥

अर्थ- तदुत्तर पार्वती, ऋषि संवाद, शिवपार्वतींचें विवाह मंगल, पश्चात् कार्तिकस्वामीचें जन्म व त्याचा विजय हीं आख्यानें वर्णिलीं आहेत.

तारकस्यवधोघोरोनरसिंहोपवर्णनम् ॥ पद्मोद्भ
वविसर्गस्तुतथैवांधकघातनम् ॥ २२ ॥

अर्थ- त्यानंतर तारकासुराचा भयंकर वध, नरसिंहावताराचें वर्णन, चतुर्दश लोकरूप कमलांतील सृष्टिप्रकार व अंधकासुर वधहीं आख्यानें कथन केलीं आहेत.

वाराणस्यास्तुमाहात्म्यंनर्मदायास्तथैव च ॥ प्रव-
रानुक्रमस्तद्वत्पितृगाथानुकीर्तनम् ॥ २३ ॥

अर्थ- तसेंच पुढें वाराणसी, नर्मदा यांचें माहात्म्य, प्रवरांचा अनुक्रम व पितृगाथांचें वर्णन हीं सांगितलीं आहेत.

ततोभयमुखीदानंदानंकृष्णाजिनस्य च ॥ तथा-
सावित्र्युपाख्यानंराजधर्मास्तथैव च ॥ २४ ॥

अर्थ- नंतर उभयमुखीगोप्रदान, कृष्णाजिन दान, सावित्रीचें आख्यान व राजधर्म हे प्रकार वर्णिले आहेत.

यात्रानिमित्तकथनंस्वप्नमंगल्यकीर्तनम् ॥ वामन
स्यतुमाहात्म्यंतथैवाथवराहजम् ॥ २५ ॥

अर्थ- यापुढें यात्रानिमित्तांचें कथन, उत्तम स्वप्नांचें वर्णन, वामन व वराह या अवतारांचें माहात्म्यहीं क्रमानें निरूपिलीं आहेत.

क्षीरोदमथनंतद्वत्कालकूटाभिशासनम् ॥ २६ ॥

अर्थ— त्याचप्रमाणें क्षीर समुद्रमथन, त्यांतील उत्पन्न झालेल्या का लकूटाचें शासन, पश्चात् द्वारकरांचें शुद्वास्तुशास्त्र, प्रतिमांचें लक्षण व देवता स्थापन हीं प्रकरणें कथन केलीं आहेत.

प्रासादलक्षणंतद्वन्मंडपानांतुलक्षणम् ॥ पूरु- वंशेतुसंप्राप्तंभविष्यद्राजवर्णनम् ॥ २७ ॥

अर्थ— तसेंच प्रासादांचें लक्षण व मंडपांचें लक्षण हीं सांगून पुढें पूरूच्या वंशांत भावि होणाऱ्या राजांचें वर्णन हीं क्रमानें कथन केलीं आहेत.

तुलादानादिबहुशोमहादानानुकीर्तनं ॥ कल्पा- नुकीर्तनंतद्वद्ग्रंथानुक्रमणीतथा ॥ २८॥

अर्थ— तसेंच तुलादानादिक बहुत प्रकारच्या महादानांचें वर्णन, पश्चात् कल्पवर्णन व अंतीं ग्रंथांतील विषयांची अनुक्रमणिका असें हे प्रकार अनुक्रमानें या ग्रंथांत प्रतिपादन केले आहेत.

एतत्पवित्रमायुष्यमेतत्कीर्तिविवर्धनम् ॥ एतत्पवि त्रंकल्याणंमहापापहरंशुभम् ॥ २९ ॥

अर्थ— तस्मात् हें पुराण पवित्र असून आयुष्य व कीर्ति यांची वृद्धि करणारें आहे. तसेंच हें पुराण, श्रवण कीर्तनादिक त्यांस पवित्रता व कल्याण हीं देणारें असून, त्यांचें सर्व पाप हरण करून सकलमंगल दायक आहे.

अस्मात्पुराणादपिपादमेकंपठेत्तुयःसोपिविमु क्तपापः ॥ नारायणाख्यंपदमेतिनूनमनंगवद्दिव्य सुखानिभुंक्ते ॥ ३० ॥

अर्थ— याविषयीं बहुत काय सांगावें कीं, जो मानव या पुराणाच्या एक चरण तरी पठन करील तोही सर्व पातकांतून मुक्त होऊन यालोकीं मदनासमान दिव्यसुखें भोगून अंतीं निश्चयें करून नारायणाच्या पदास प्राप्त होतो. इतिश्रीमत्स्यपुराणे चतुर्दशसाहस्र्यांसंहितायांअनुक्रमणिका कथनोनामैक नवत्युत्तरद्विशततमोऽध्यायः ॥ २९१ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥ शके १७९५ श्रीमुखनामसंवत्सरे ज्येष्ठशुक्ल १३ भानुवासरे प्रथमयामे समाप्तं स्वार्थंपरार्थंच ॥ ता० ८ माहे जून सन १८७३ इसवी.

मत्स्यपुराण.

भाग ३ रा.

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
६७४	४	आता	आतां
६७७	२४	मुळ	मुळें
६७९	२१	उमेरारा	उमेरा
६८०	१३	पडिताः	पंडिताः
६८१	२२	तपासि	तपांसि
६८४	२४	सपूर्ण	संपूर्ण
६८६	१५	खनखल	कनखल
६८६	२६	कडांचे	कडचे
६८७	२१	नर्मदा	नर्मदेंत
६८८	२४	राजेद्रा	राजेंद्रा
६८९	१९	साग हजार	शतसहस्र
६८९	२४	हेषित	ह्रेषित
६९४	१६	नून	न्न
६९६	२०	नदेन	नंदन
६९८	८	तस्मात	तस्मात्
६९९	२४	मूषिते	भूषिते
७०३	२३	मुखबधो	मुखबंधो
७०५	१६	देवो	देवी
७११	२८	तुझा	तुझ्या
७१६	१२	मति	गतिं
७२४	२६	नार्मदे	नार्मदे

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
७२७	१४	त्वीश्वरेण	तीश्वरेण
७२८	९	नशीच तूं	नशीच ऋषिगण वसिष्ठ यानींसेवित असून तूं
७२९	१५	तव्हां	तेव्हां
७३२	२७	पुरां	पुरा
७३८	६	सारिखी होईल	सारिखी निश्चित होईल.
७३९	१४	स्वगात्	स्वर्गात्
७४०	१४	नून	न्न
७४२	४	समीपतास्थितं	समीपतः स्थितं
७४३	८	सप्रासे	संप्रासे
७४३	९	तृप	त्प
७४४	१९	तथें	तेथें
७४४	२१	ब्याप	व्यापक
७४४	२४	गच्छतु	गच्छेत्तु
७४५	५	(भिल)	(भिल्लु)
७४५	२४	गणपत्यंतिक	गणपत्यंतिके
७४६	७	मदन	वामदेव
७४६	२८	रुंदं	रुंद
७५७	६	गगेश्वर	गंगेश्वर
७५७	२०	होतो	होतोच
७६३	२१	तुष्टासि	तुष्टोसि
७६४	१९	स्वर्गप्राप्ती होऊन	स्वर्गास जातान व
७६६	१	नूनु	न्नु
७७०	१५	गच्छेंच्च	गच्छेच्च
७७१	२३	करणाऱ्या	करतोत्या
७७३	१४	संकाशैः ब्रजते	संकाशैर्व्रजते

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
७७४	१४	कुर्यातस्मिं	कुर्यात्तस्मिं
७७४	१९	नृनिं	न्निं
७७५	२५	तीर्थ	तीर्थं
७७६	५	नृनु	न्नु
७८३	१५	श्या	शा
७८३	१७	यनापि	यनोपि
७८६	९	षिीनथैवच	षिस्तथैवच
७८७	१	इत्यने	इत्येने
७८७	१२	क्रोष्टावक्षी	क्रोष्टाक्षी
७८८	२०	संबधास	संबंधास
७८८	२१	नाहीन	नाहींत
७८८	२२	प्रवरा त्र्या	प्रवरास्त्र्या
७८९	४	मुग्दल	मुद्गल
७८९	२१	प्रवराशुभाः	प्रवराः शुभाः
७९०	१	तितिरि	तित्तिरिः
७९०	२५	मौग्दल्य	मौद्गल्य
७९१	१	प्रताप्री	प्रतापी
७९१	२	याच्या	यांच्या
७९१	३	सपूर्ण	संपूर्ण
७९१	२४	संबधास	संबंधास
७९२	१४	संबधास	संबंधास
७९३	१२	ब्राभ्रव्य	बाभ्रव्य
७९३	२३	वेदाक्त	वेदोक्त
७९४	२२	नाहीत	नाहींत
७९५	२६	यापनाः	पायनाः
७९८	१९	गोपायन	गोपायन

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
८०२	७	तदद्भतं	तदद्भुतं
८०२	२२	शंशाप	शशाप
८०२	२५	जें	नें
८०२	२६	श्रातं	श्रांतं
८०३	२२	त्त्व	त्त्व
८०५	१	अकलोकन	अवलोकन
८०७	२	ममहेंद्र	महेंद्र
८०८	१७	अनवयाः	अनन्वयाः
८०८	२२	नाहीत	नाहींत
८०९	२६	वर्चस्‌	वर्चस्‌
८१२	१	त्र्यादशीं	त्रयोदशीं
८१२	१५	खङ्ग	खड्ग
८१२	१८	कामत्वारो	कामचारो
८१२	२०	(ग्रहणं)	(ग्रहण)
८१२	२४	यदेत्पंचक	यदेतत्पंचकं
८१२	२४	वयः	चयः
८१२	२७	गोंडग्याचें	गेंड्याचें
८१३	१६	काणी	कोणी
८१५	११	वल्यस्य	बलस्य
८१६	१५	याविषयी	याविषयीं
८१७	६	लागूलं	लांगूलं
८१८	१५	कास्य	कांस्य
८१८	१७	हूथा	हूया
८१९	१३	आग्निताग्नि	आहिताग्नि
८२०	१७	यजमानाने	यजमानानें
८२०	२४	नाहीत	नाहींत

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
८२१	१४	होते	होतें
८२२	१६	अप्ररक्षिण	अप्रदक्षिण
८२३	१	धनूनां	धेनूनां
८२४	५	उत्तम अवरा	उत्तम नूतन अठरा
८२४	२१	नाष्पत्य	नाष्पंत्य
८२५	२१	म्हणातात	म्हणतात
८२७	११	यामान	मान
८२७	२५	नीलंभिति	नीलभिति
८२८	४	गोरीं	गोरीं
८२८	८	मनुष्यानीं	मनुष्यांनीं
८२८	१३	मुल्कान्शोचेतमरणं	मुल्कानशोचेन्मरणं
८२९	१०	त्याकाली	त्याकालीं
८३०	२७	कालातरी	कालांतरीं
८३१	१९	अंधहोन	अंधहोता
८३३	२७	की	कीं
८३६	२३	स	सं
८३७	३	ने	नें
८३७	४	स्त्न	स्त्ने
८३७	२२	इच्छेनेखोडा	इच्छेनेंबोरीच्याखोडा
८३९	२६	पु	पुं
८४१	१२	ता	तां
८४१	१६	त्व	त्वं
८४२	९	तं	त
८४५	२१	का	कां
८४६	१३	व	ध
८४६	२०	ति	त्तिः

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
८४८	८	पा	त्या
८४८	२८	ए	ऐ
८५०	११	ग्या	ष्या
८५१	१६	स	सं
८५१	१७	मु	मृ
८५५	५	ता	नां
८५५	२५	स्ता	स्तो
८५७	३	ना	नां
८५७	५	दु	दृ
८५७	११	असेल यास्तव आतां	असेल यास्तव त्यासमी पहाण्यास इच्छितों आतां
८५९	१२	ल	लं
८६०	४	व	न
८६१	८	म	मं
८६१	१०	पश	पदेश
८६३	१९	रीं	री
८६४	१८	धिकावर	धिकारावर
८६५	२६	धक्षा	ध्यक्षा
८६८	२१	म	मं
८७१	२३	प्रयत्नानेंपूजा	प्रयत्नानें देवासमान पूजा
८७२	१३	कच्या	कवच्या
८७५	१७	मय	मयं
८८२	६	म	मनो
८८५	१२	सर्वेषांमेव	सर्वेषामेव
८८६	१२	बाहर	बाहेर
८८९	७	निखलते	निळखतें

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
८९०	१७	मदे	मेदे
८९०	२१	खज्जूर	खर्ज्जूर
८९१	११	यो	या
८९३	११	संचिनुयानुया	संचिनुया
८९४	६	नारार	नागर
८९४	२४	गैरिकाजन	गैरिकांजन
८९६	१५	संपत्तिनाम	संपत्तिर्नाम
८९९	२४	जाहलोल्या	जाहलेल्या
९०३	२५	महीमतिः	महीपतिः
९०४	८	लज्जनें	लज्जेनें
९०४	२७	संबधी	संबंधी
९०५	३	नाहीत	नाहींत
९०६	८	फन	फेन
९०७	५	कठिनांना	कठिनानां
९०८	१	तरोमूल	तरोर्मूल
९०८	१९	बसबून	बसवून
९०८	२०	नासो	नासो
९१०	३	राजमंदिरें	राजमंदिरें
९११	९	राजाचीं	राज्याचीं
९१४	७	नावं	नाव
९१८	१२	दान दडश्च	दानं दंडश्च
९१८	२८	माधु	साधु
९१९	१५	पुरुष	पुरुषं
९२०	२६	भद	भेद
९२०	२७	कुशलेर्येर्हि	कुशलेर्येर्हि
९२१	१४	मत्रिणां	मंत्रिणां

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
१२१	२१	जय प्राप्त	जयशी प्रच प्राप्त
१२४	२	तीदेणगी	तें दान
१२८	९	भासहोतो	भासतो
१२९	२५	अतर्यामी	अंतर्यामी
१३०	४	वस्त्रादिकसर्वस्य	वस्त्रादिकस्यसर्वस्य
१३१	१६	स्वंगृहीं	स्वगृहीं
१३३	८	दड्यः	दंड्यः
१३७	१९	स्वयेंउत्पन्न	स्वयें वनांतउत्पन्न
१३७	२३	हनृणां	हर्तृणां
१४०	२	एतास्त्रियस्त	एताःस्त्रियस्त
१४०	१७	पतत्यज्ञानता	पतत्यज्ञानतो
१४६	२	च्छदये	च्छेदये
१४९	२०	भाडानां	भांडानां
१५०	८	पक्कानानां	पक्कान्नानां
१५०	२४	स्तनो	स्तेनो
१५२	७	गरदेश्चैव	गरदश्चैव
१५४	७	सद्रव्या	सद्रव्यां
१५५	१२	अत्यज	अंत्यज
१५७	१२	बहूना	बहूनां
१६१	२०	प्रकरचे	प्रकारचे
१६२	१६	घऊंनये	घेऊंनये
१६२	२६	त	ते
१६३	१७	(जाहर)	(जाहिर)
१६४	२	ठवावे	ठेवावें
१६४	८	वणिजां	वणिजा
१६५	२७	निमत्रणे	निमंत्रणे

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१६६	१०	विरोध	विरोधे
१६६	१९	न्याकणस्य	न्याणकस्य
१६६	२५	विषाग्निदं	विषाग्निदां
१६८	६	अधिकऱ्यानें	अधिकाऱ्यानें.
१६९	११	प्रत्यकीं	प्रत्येकीं.
१६९	१५	द्रहात्	द्रुहात्
१७०	२१	याज्ञवस्य	याज्ञवल्क्य
१७७	१३	ह्राणें	होणें
१७७	१३	चिंहह्राणें	चिन्हहोणें
१७८	१७	सध्या	संध्या
१७९	६	अकाश	आकाश
१७९	९	सध्याकाळीं	संध्याकाळीं
१८१	१२	प्रज्वित	प्रज्वलित
१८२	१	प्रतिमेक	प्रतिमेवर
१८३	१	एश्वर्योरिक	ऐश्वर्यादिक
१८३	१७	प्रज्वित	प्रज्वलित
१८६	१६	पउण्यानें	पडण्यानें
१८९	१६	स्त्रयस्त्रिंशदु	त्रयस्त्रिंशदु
१८९	२०	हृद	ऱ्हद
१९१	१३	विवासयेतान्नृ	विवासयेत्तान्नृ
१९६	१७	ब्राणेषु	ब्राम्हणेषु
१९६	२८	परोडाशा	पुरोडाशा
१९८	२५	मस्यउवाच	मत्स्यउवाच
१०००	९	हिरण्ये	हिरण्येः
१००३	२४	यज मानें	यजमानानें
१०१२	१०	चतुसीमा	चतुःसीमा

शुद्धिपत्र.

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध.
१०१३	२३	पक्	पंक
१०१३	२५	मासानां	मांसानां
१०१४	२६	निर्मित	निर्निमित्त
१०१९	१५	वाल्य	वाद्य
१०२१	४	शद्रुः	शब्दो
१०३४	१३	नंतर त्या	नंतर तो त्या
१०३४	२३	प्रल्हाद	प्रल्हादानें
१०३५	२६	योनिनेंद्रो	योनिर्नेद्रो
१०३६	१८	त्वं वासुदेवं	तं वासुदेवं
१०३९	११	भूमींल	भूमींतील
१०४६	४	राज्यणाप्ति	राज्यप्राप्ति
१०४६	९	असल्यामुळे	असल्यामुळें
१०५२	२२	(बाद्या)	(बाल्या)
१०५७	२८	तो	त्या
१०५९	२०	वक्षस्थळ	वक्षस्थळें
१०६५	२०	चत्वारिश	चत्वारिंश
१०७२	९	श्चतुर्यग	श्चतुर्युग
१०७३	८	ब्रह्माडास	ब्रह्मांडास
१०७३	१३	ब्रह्माडांत	ब्रह्मांडांत
१०७४	५	तुं मधस्तात्	तुमधस्तात्
१०७४	१६	किषयीं	विषयीं
१०७५	१७	धृ	धृं
१०७६	२६	याच कांहीं एक श्रेष्ठ सुगंधानीं ..	हेच कांहीं एक श्रेष्ठ सुगंध यानीं
१०८१	२५	क्राता	क्रांतां
१०८२	७	प्पपलक्षये	श्चुपलक्षये
१०८३	२१	विस्तीर्ण	विस्तीर्ण

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१०८६	१	केलें	केलीं
१०८७	२७	सव	सर्व
१०९०	२८	स्थितो	स्थितौ
१०९१	६	किंसुम	किंसुमं
१०९१	१६	शौलं	शैलं
१०९२	९	तष्टुर्बु	तुष्टुबु
१०९२	१७	विंझण	विंझण
१०९३	२	रुपाय	रूपाय
१०९३	१९	जयत्प्रिय	जगत्प्रिय
१०९४	१२	अवष्टभैक	अवष्टभ्येक
१०९५	९	इत्यत्तः	इत्युक्तः
१०९७	११	वारणी	वारुणी
१०९८	८	द्विसूधा	द्विमूर्धा
१०९८	११	द्विसूधा	द्विमूर्धा
१०९९	२४	रम	रस
११००	२५	पुराण	पुराणे
११०१	१२	समुदांतून	समुद्रांतून
११०२	२	ऽबुधि	ऽब्धि
११०२	१६	डुडुभ	डुंडुभ
११०३	११	भिन्नाजना	भिन्नांजना
११०३	२२	सवर्ण	सुवर्ण
११०४	४	काणी	कोणी
११०५	२०	सरैः	सुरैः
११०८	६	केलेल्या	केलेल्या
११०८	१४	सुरै स्थाणुस्तुत	सुरैः स्थाणुः स्तुत
११०८	२२	यथें	येथें

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१११०	१७	इत्युल्का	इत्युल्का
१११०	२४	तेतो	ततो
१११४	२३	श्वाश्वत	शाश्वत
१११६	१६	सुदर्शन	सुदर्शनं
१११७	५	वगानें	वेगानें
१११७	८	वानिलेरितं	वानिलेरितो
१११९	२५	संक्षपे	संक्षेपे
११२०	३	प्रवर्त्तकाचार्य आहेत	प्रवर्तकाचार्य अष्टादश आहेत
११२२	१२	वास्तुभूताद्भवो	वास्तुभूतोद्भवो
११२३	१५	अश्वनी	अश्विनी
११२५	४	पटणें	पेरणें
११२६	३	दारीनें	दोरीनें
११२८	१२	स्तभं	स्तंभं
११२८	१९	हाणाऱ्या	होणाऱ्या
११२८	२७	नत्रयो	नेत्रयो
११२९	९	तद्वत्धस्तं	तद्वद्धस्तं
११३१	२८	रुचक	रुचक
११३६	६	अंतेवसायियां	अंतेवसायिनां
११३६	२७	सेनापत	सेनापते
११३८	७	साख्याचें	सोख्याचें
११३८	१९	तमार्गं	तमांगं
११३९	३	चतुरःस्या	चतुरस्त्रःस्या
११४०	१८	सवत्र	सर्वत्र
११४०	१९	भर्वत्सर्व	भवेत्सर्व
११४१	१८	वधो	वेधो
११४२	६	कवल	केवल

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
११४२	१३	गहांत	गृहांत
११४२	२८	न्छमान्	न्धुमान्
११४५	१८	सोसष्ट	चौसष्ट
११४६	८	सोसष्ट	चौसष्ट
११४६	१०	नमस्मां	नमस्यां
११४९	२७	काणें	कोणें
११५२	१२	योपेक्षां	यापेक्षां
११५५	१७	श्रष्ठांस	श्रेष्ठांस
११५५	२९	योगं	योगं
११५७	२६	पाश्वर्यो	पार्श्वयोः
११५८	६	कल्पवक्षा	कल्पवृक्षा
११६०	१०	अगुलं	अंगुलं
११६१	१२	द्यगुला	द्यंगुला
११६३	१६	मत्यकी	मत्येकी
११६७	१	अंगुलीनातु	अंगुलीनांतु
११६९	१७	उर्ध्वकेश	ऊर्ध्वकेश
११७१	७	न्यना	न्यूना
११७६	९	कदाचित् स्पर्श	कदाचित् नखांनीं स्पर्श
११७७	२२	कृति	कृत्ति
११७८	७	पोधृतां	पोद्धृतां
११८०	१७	गंधर्वैस्तूयमान	गंधर्वैः स्तूयमान
११८२	१८	स्कध	स्कंध
११८४	५	सन्निवेशेत्	सन्निवेशयेत्
११८४	१६	गधर्व	गंधर्व
११८५	२०	नजसा	तेजसा
११८६	१७	सवर्णा	सुवर्णा

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
११८८	२०	प्रसन्नमुखं	प्रसन्नमुख
११८९	२	मातृणां	मातॄणां
११८९	८	हसावर	हंसावर
११९०	२२	तीक्ष्णखड्गधरं	तीक्ष्णखड्गधरां
११९३	४	भृगाराभ्यां	भृंगाराभ्यां
११९५	९	केलीं	केल्या
११९६	१२	दे	दे
११९६	२४	पायज्या	पायन्या
११९८	४	देवतेंच्यानीस्थापन	देवतेच्यास्थापन
१२०२	१२	मडल	मंडल
१२०५	८	शर्म	शुभं
१२०६	२२	सप्ता	सप्ता
१२०९	१८	स्छ	स्छ
१२१०	२	एववा	एवंवा
१२१४	१६	कौशयं	कौशेयं
१२१४	२८	पार्श्वतस्था	पार्श्वतःस्था
१२१६	१२	यजर्वदि	यजुर्वेदि
१२१७	२१	यानीची	योनीची
१२१९	७	मध्योतमां	मध्योत्तमां
१२१९	१४	चदनोदकं	चंदनोदकं
१२२१	३	इशानी	ईशानी
१२२३	१४	द्वीजों	द्वीजों
१२२४	१६	शभ्रवर्ण	शुभ्रवर्ण
१२२५	२२	श्वभ्रं	स्वभ्रं
१२२७	२४	गुण	गण
१२२८	३	अवाहये	आवाहये

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१२२८	२४	माचनीय	माचमनीय
१२२९	१०	पंचमृतानें	पंचामृतानें
१२३२	२६	दभाग्रे	दर्भाग्रे
१२३३	३	शेन्नादेवी	शन्नोदेवी
१२३३	१३	तजोसि	तेजोसि
१२३४	८	तदर्धा धेन	तदर्धार्धेन
१२३५	४	कुयान्मृदा	कुर्यान्मृदा
१२३५	१३	आरार्त्तिक्य	आर्त्तिक्य
१२३५	१५	तें नसेलतर हामंत्र ह्मणावा ..	०
१२३६	२५	स्वशक्त्युसार	स्वशक्त्यनुसार
१२३९	१७	पालाशैस्वा	पालाशैःस्वा
१२४०	२	अन्न निवेदन	अन्नशिखि देवतेस निवेदन
१२४२	९	मासं	मांसं
१२४४	७	घोंवें	घावें
१२४५	५	भिस्सन्च्छाया	भिस्युन्च्छाया
१२४६	१४	कर्त्तव्यामदक्षिणा	कर्त्तव्यातुमदक्षिणा
१२४६	२०	कपालौ	कपोलौ
१२४८	१०	कपालयोस्तु	कपोलयोस्तु
१२४९	१०	माकुग्रीव	माकुग्रीवं
१२५२	२८	असजे	असेजे
१२५३	१३	द्वात्रिशत्	द्वात्रिंशत्
१२५३	२१	कुभ	कुंभ
१२५६	१९	त्रिशद्भिः	त्रिंशद्भिः
१२५७	७	मडपाः	मंडपाः
१२५७	१५	लशभा	लशफा
१२५७	१७	प्रत्यकास	प्रत्येकास

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१२५७	२२	मध्य	मध्य
१२५८	१४	चत्वारिंशन्नथो	चत्वारिंशन्नथो
१२५८	१४	त्रिंशत्	त्रिंशन्
१२६१	३०	ह्याणारे	होणारे
१२६३	१५	नूव	न्व
१२६३	१६	श्लाको	श्लोको
१२६३	२७	नूव	न्व
१२६६	६	सांमतो	सामंतो
१२६६	२२	सनः	शनः
१२७१	२	शंगभत्स्य	शंगभत्स्य
१२७३	२	ल्यक	ह्येक
१२७३	२३	नूव	न्व
१२७५	४	तरा	तेरा
१२७७	१६	भिःस्त	भिस्त
१२७८	२७	वणांतून	वर्णांतून
१२८०	६	द्यों	द्यो
१२८४	१५	चिनांन	चिन्नांन
१२८६	२३	करणानें	करणारानें
१२८७	१५	पु	बु
१२८७	२४	मेर्ष	मेष
१२९०	९	मस्त्या	मस्त्या
१२९१	१५	वस्त्ल	वस्त्व
१२९१	२६	मगल	मंगल
१२९४	१७	गधर्व	गंधर्व
१२९४	२४	नाडे	नोंडे
१२९५	८	पुगवे	पुंगवे

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
१२९७	२५	ग्देहे	ह्नेहे
१२९९	२१	उपाषित	उपोषित
१३००	६	तुर्थै	द्वै
१३००	१७	शर	शेर
१३०१	२६	स्वाजमान	स्वायजमान
१३०१	२७	सीमतो	सीमंतो
१३०२	७	यजमाने	यजमानानें
१३०४	१	पीव	पौत्र व
१३०५	२०	अनिरुद्ध	अनिरुद्ध
१३०५	२१	येकांचना	येत्कांचना
१३०६	११	सुवण	सुवर्ण
१३०६	१२	(ज्यवरी)	(चवरी)
१३०८	३	तूउत्तम	तूनउत्तम
१३१०	२६	मूर्त्तो	सूर्ता
१३१३	१८	कौशय	कौशेय
१३१४	१४	वदे	वेद
१३१४	२१	विशतिः	विंशतिः
१३१५	२५	श्रावये	श्रावये
१३१६	२६	यागानें	योगानें
१३२१	१०	शक्तितः स्त्रि	शक्तितस्त्रि
१३२१	११	कोपोन	कोपान
१३२२	१२	जः श्वापि	जश्वापि
१३२३	१८	प्रविस्यामि	प्रवक्ष्यामि
१३२४	२४	रश्मी	रेश्मी
१३२७	११	ह्लाकेशा	ह्लोकेशा
१३२९	२	सूवर्णा	सुवर्णा

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
१३३०	५	त्यसो	त्यसो
१३३६	२७	वसुधरा	वसुंधरा
१३३९	२४	मातृर्भि	मातृभि
१३४०	२	बुध	बुद्ध
१३४०	१३	अंतरा तरतो	अंतरे तरतो
१३४२	२३	सामारें	सामोरें
१३४३	१३	पंचारशी	पंचाशी
१३४४	१२	न्यस्येत्	न्यसेत्
१३४४	२०	श्रु	स्नु
१३४९	१	जतूनां	जंतूनां
१३५४	११	दगुल	दंगुल
१३५४	२१	दवानें	देवानें
१३५५	२७	सर्वदवहो	सर्व देवहो
१३५६	३	महार्भूते	महाभूते
१३५६	६	अशीं	अशी
१३५७	३	मात्कं	मोक्तं
१३५७	६	संस्रपाने	संक्षेपानें
१३५७	१५	राथंतती	राथंतरो
१३६१	१९	मं	म्
१३६२	११	अतंद्दू	अनंतद्दू
१३६२	१२	त्सर्व	त्सर्ग
१३६२	२४	वांका	वांगा
१३६३	८	महात्म्य	माहात्म्यं
१३६४	९	सवाद	संवाद
१३६५	२	दवा	देवा
१३६५	५	संमात्कं	संमोक्तं

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
१३६५	२४	पणन	पठन
१३६५	२६	क्रमु	क्रम

भाग ३ रा

समास